पेशवेकालीन महाराष्ट्र

लेखक

वासुदेव कृष्ण भावे, बी. ए.

तुर्कांचें साम्राज्य, ब्राह्मणेतरवादाचें स्वरूप, खरा देशभक्त,
इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

मार्गशीर्ष डिसेंबर
शके १८५७ सन १९३५

साधी बांधणी ३ रु. } किंमत { कापडी बांधणी रु. ३॥

प्रकाशकः—
वा. कृ. भावे, बी. ए.
२२६ सदाशिव पेठ, पुणें.

म/२५१

मुद्रकः—
गो. ब. जोशी,
आनंदमुद्रणमंदिर
१९६/४६ सदाशिव पेठ, पुणें २.

जन्मकथा

सुमारे पाच वर्षांपूर्वीची गोष्ट. भारत-इतिहाससंशोधकमंडळाचे व्यासंगी सभासद रा. शंकर नारायण जोशी व मी पुण्यास पर्वतीच्या वाटेला एके दिवशी सायंकाळी फिरावयास गेलो होतो. त्यावेळीं प्रस्तुत ग्रंथाचे बीजारोपण माझ्या मनात झाले. मंडळाच्या संग्रही इतिहासविषयावरील अनेक ग्रंथ असल्यामुळें ते वाचण्याची इच्छा मला बरेच दिवस होती. परंतु नुसते ग्रंथ वाचीत बसण्यापेक्षां ते वाचून नवीन ग्रंथ निर्माण करण्याचे ध्येय डोळ्यापुढें असले तरच वाचन काळजीपूर्वक होते; या दृष्टीने श्री. शंकररावांस प्रश्न विचारताच त्यानी मराठ्यांच्या इतिहासांतील सामाजिक विषयाचा महाल अद्यापि कोणी बांधला नसल्याचे माझ्या निदर्शनास आणिले. त्यांची ती सूचना मला मानवली व लवकरच त्या दिशेने मी वाचन सुरू केले.

मराठ्यांच्या इतिहासापैकीं शाहू महाराजांपासून पेशवाईअखेरपर्यंतच्या कालखंडांतील बरेच कागदपत्र तेव्हांच छापून प्रसिद्ध झाले असल्यामुळें मीं तेवढाच कालखंड निवडला व त्याचे परिशीलन चालविले. त्याच सुमारास एक मोठे घबाड सापडले. रावसाहेब गोविंद सखाराम सरदेसाई यानी अवाढव्य पेशवेदप्तरास हात घालून त्यांतील माहितीचा खजिना जगासमोर आणण्यास १९३० साली म्हणजे मी वाचनास सुरुवात केल्या नंतर थोडयाच दिवसांत प्रारंभ केला. मी अंगीकारलेल्या कार्यास ही एक खाणच गवसली म्हणावयाची. माझा ग्रंथ केवढा होईल याची नीट कल्पना मला प्रारंभी नव्हती. त्याचप्रमाणें त्याची प्रकरणे कशी पडतील याचीहि अटकळ नव्हती. प्रथम रावबहादुर वाडप्रभृतीनी संपादिलेल्या व मुंबईसरकाराने प्रकाशित केलेल्या पेशव्यांच्या डाय्र्या वाचावयास घेतल्या व त्यांत जी प्रकरणे पाडली आहेत त्याच धर्तीवर मीहि आपली प्रकरणे पाडून टिपणें तयार केली.

पण यानंतर कै. वासुदेवशास्त्री खरे यांचे ऐतिहासिक लेखसंग्रह, सरदेसाई यांचे पेशवे दप्तर, कै. रावबहादूर पारसनीस यांचा इतिहाससंग्रह आणि त्यांच्या अनुषंगाने इतर अनेक ग्रंथ जसजसे मी वाचूं लागलो, तसतसे माझे प्रारंभाचे बात-

बेत फिसकटून वेगळीच प्रकरणें बनत गेली व ग्रंथाचा व्यापहि वाढत गेला. हे वाचन अर्थात्च मी फावल्या वेळांत करीत होतो. पण ते करीत असता मध्यंतरी अचानकपणे केसरीच्या संपादकत्वाचे काम मजकडे आले व ते दीड पावणे दोन वर्षें मीं चालविले. तितक्या मुदतीत पूर्वसंकल्पित कार्यापैकी एक ओळहि मला लिहावयास अगर वाचावयास मिळाली नाहीं. सदर जोखीमदारींतून सन १९३३ च्या आक्टोबर महिन्यात मुक्त झाल्यावर मीं माझे अर्धवट राहिलेले काम पुढें सुरू केले व ते सतत सव्वा वर्ष चालू राहून या वर्षाच्या प्रारंभी संपले.

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासात जो माझा तीन एक वर्षांचा काळ गेला त्यांत अनुभवलेल्या सुखाची नवलाई कांहीं निराळीच आहे. हल्ली पारतंत्र्याच्या काळांत आपण आहो व त्यांतील रुक्ष व खडतर जीवित कंठीत आहो. अशा जीवितांतील दुःखाचा विसर पाडण्याचे जे उपाय असतील त्यापैकी मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास हा एक होय. या अभ्यासांत मन जसजसे रममाण होत जाते तसतसा तो पराक्रमशाली काल व त्यांतील त्या धीमंत ब वीर्यवंत व्यक्ती यांच्याशी एकरूपता पावून अन्तःकरण उच्च विकारानी उचंबळून येते. मराठ्यांच्या लढायांचा व मराठी राज्यकर्त्यांच्या कारकिर्दीचा इतिहास इतरानी लिहिला असल्यामुळें तो वगळून त्यांच्या इतर सर्व हालचालींचे व व्यवहारांचे निरीक्षण मीं पत्करल्याने तत्कालीन मराठ्याबरोबर वावरण्यास, त्यांच्या चालीनेच चालण्यास, त्यांच्या मेंदूनेच विचार करण्यास व त्यांच्या भावनानींच भरून जाण्यास मला सापडले. या कारणाने दोन्ही विभिन्न परिस्थितींचा अनुभव घेणाऱ्या मजपुढें सव्वा दोनशें वर्षांचा चित्रपट पसरल्यासारखा होऊन मी सव्वा दोनशे वर्षांचा वयोवृद्ध नसलो तरी ज्ञानवृद्ध माणूस असल्याचा मधूनमधून मला भास झाल्यावांचून रहात नसें. ही कोणास अतिशयोक्ति भासेल, पण ती वस्तुस्थिति म्हणूनच वाचकासमोर ठेवण्यास मला संकोच वाटत नाहीं. एखाद्या राष्ट्राच्या मनाचा ठाव लागल्याशिवाय त्याने वर्तमान काळांत कसें वागावे हें सत्याच्या जवळ येऊन सांगणें परम कठिण होय.

मराठ्यांच्या इतिहासाची साधने अफाट आहेत. त्यांपैकीं जितकी उपलब्ध आहेत त्याहून अनुपलब्ध अशी कितीतरी पटीनी अधिक आहेत. अनुपलब्ध साधनांचा विचार सोडून उपलब्ध साधने हिशेबात घेतली तरी त्या सर्वांचा परामर्श मला पूर्णपणे घेता आला असे मी कसे म्हणू ? इतिहासाची मला

आवड आहे म्हणून तो माझा पेशा आहे असा अभिमान मी बाळगूं शकत नाहीं. यास्तव मी जे कांहीं वाचले ते अपूर्ण आहे, हे मला प्रांजळपणे कबूल केलेच पाहिजे. तथापि जेवढे वाचले तेवढ्याचे भरपूर चिंतन करूनच लिहिलेला हा ग्रंथ वाचकांपुढें ठेवीत आहे. माझी कित्येक अनुमानें कोणास पटतील न पटतील; परंतु ती मी मजकडून शक्य तितकी कसोशीने निःपक्षपाताने व प्रामाणिकबुद्धीनें काढली आहेत. मात्र ती काढीत असता पूर्वजासंबंधाचा माझ्या अन्तःकरणातील गौरव व अभिमान वाढला हें मला येथे नमूद केले पाहिजे. तशाच प्रकारचा ठसा वाचकांच्याहि मनावर उमटावा अशी अपेक्षा आहे.

प्रस्तुत ग्रंथातील कोणतेहि विधान आधारावाचून केलेले नाहीं. बहुतेक ठिकाणीं आधारभूत पुस्तकांची नांवें दिली आहेत, कांहीं ठिकाणीं नुसतीच अवतरण चिन्हे घातली असली तरी ते जसेच्यातसे अगर सारभूत उतारेच आहेत हे येथें सांगणे जरूर आहे. अशा प्रकारचा प्रयत्न मराठी भाषेत पहिलाच असल्यानें त्याजकडे वाचक सहानुभूतीनें पहातील अशी आशा आहे. या प्रयत्नात माझे स्वतःचे फार थोडे असून बहुतेक भाग अवतरणरूपच असल्यामुळें ज्या अनेक ग्रंथकारांचा व लेखकांचा मला उपयोग झाला, त्यांचे उपकार अगणित होत. किंबहुना या ग्रंथात जर कांहीं चांगला अंश असला तर त्याचे श्रेय त्यानाच आहे. ज्या पुष्कळ ग्रंथांचा आधार या ग्रंथास घेण्यात आला आहे, त्यांपैकी बहुतेक ग्रंथांची नांवे मी निराळया यादींत दिलीं आहेत. पण त्याशिवाय इतर कित्येक ग्रंथ असे आहेत कीं, त्यांचा नामनिर्देश मला वेगळा करता आला नाहीं म्हणून त्यांच्या कर्त्यांचा मी कमी आभारी नाहीं.

प्रस्तुत ग्रंथास ‘ पेशवाईतलि महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास ’ या अर्थाचे नांव देण्याचा प्रथम विचार होता. परंतु ग्रंथांत समाविष्ट झालेले विषय लक्षांत घेतल्यावर ते नांव तितके व्यापक न वाटल्यावरून ‘ पेशवेकालीन महाराष्ट्र ’ हेंच नांव मुक्रर केले. कारण सामाजिक इतिहास या नांवाने फक्त सामाजिक विषयांचाच बोध होऊ शकला असता. पण मला त्यांत शिक्षण, धर्म, व्यापार, उद्योगधंदे, बागबगीचे, गायनवादन, इमारती, पाटबंधारे, लष्करी खाते, मुलकी खाते, न्यायखाते इत्यादि विविध विषयांचा समावेश करावयाचा असल्यामुळें मीं सध्याचे व्यापक नांवच पसंत केले.

हें कार्य अनेक गृहस्थानी हाती घेऊन तडीस नेण्याच्या योग्यतेचे असल्याविषयीं रावसाहेब गोविंदराव सरदेसाई यांनीं एके ठिकाणीं लिहिलेले वाचल्याचे स्मरते. माझा प्रस्तुत प्रयत्न अनेकांचा नसून एकट्याचा आहे. त्यायोगानें त्यांत न्यून राहिले असेल याची जाणीव मला आहे. तत्रापि हें एकट्याचे कामहि इतरांच्या मदतीवाचून होऊं शकले नाहीं याचा निर्देश येथें करणें आवश्यक होय.

अशा सदगृहस्थापैकीं माझे मित्र रा. शंकर नारायण जोशी, रा. दिनकर विनायक काळे, एम्. ए. रा. दत्तात्रय विष्णु आपटे, बी. ए. रा. यशवंत नरसिंह केळकर वाङ्मयविशारद, रा. पांडुरंग विष्णु नेने बी. ए. यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावयास पाहिजे. माझे बालमित्र रा. सदाशिव विनायक बापट यांच्या स्फूर्तिदायक संभाषणानें मला अनेक अडचणीशीं झगडण्याचे सामर्थ्य आले. कॉलेजातलि वर्गबंधु व प्रेमळसुहृद् रा. गोविंद रावजी चोळकर बी. ए. बी. टी. हेडमास्तर गोविंदराव हायस्कूल इचलकरंजी यांच्या सहाय्याचे मला केव्हांहि विस्मरण होणार नाही. खरी व उच्च दर्जाची वाङ्मयसेवा करणारास अर्थप्राप्ति तर नाहीच, उलट झीज सोसावी लागते याची जाणीव ज्या थोड्या महाराष्ट्रीय संस्थानिकांस आहे. त्यापैकीं इचलकरंजी संस्थानचे अधिपति श्रीमंत बाबासाहेब घोरपडे हे होत. त्यांचा मराठ्यांच्या इतिहासाचा आभिमान, त्यांचे महाराष्ट्र वाङ्मयवृद्धीचे प्रयत्न, गुणग्राहकता व रसिकता हीं महशूर आहेत. त्यास अनुसरून त्यानीं ग्रंथ छापण्याच्या कामास सुरुवात झाल्यावर पहिली शंभर पाने वाचली व ती आवडताच अडीचशे रुपयांचे पारितोषिक दिले यामुळें हे खर्चाचे काम शेवटास नेण्यास विशेषच हुरुप आला.

केसरीचे संचालक व महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीस मनोभावाने अहर्निश सहाय्य करणारे थोर गृहस्थ रा. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांस विनंति करताच वेळांत वेळ काढून ग्रंथ छापून होत असतांच त्याची चारशे पानें त्यानी वाचलीं व पत्र लिहून ग्रंथाचा गौरव केला याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. केसरमिराठासंस्था, तिचे एक विश्वस्त रा. धोंडो वासुदेव उर्फ बाबासाहेब विद्वांस व संस्थेतील इतर बंधू आणि भा. इ. स. मंडळ व त्यांतील कार्यकर्ते यांच्या सहाय्यावाचून माझ्या हातून हें कार्य घडण्याची मुळीच आशा नसल्यानें त्या सर्वांचें जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत.

ग्रंथाच्या छपाईचे काम आनंद छापखान्याचे चालकांनीं फार काळजीपूर्वक व वक्तशीर पुरे केले. भारत प्रिंटिंग वर्क्सचे मालक रा. गुर्जर यानीं ग्रंथांत वारंवार आलेल्या महत्त्वाच्या स्थळासुद्धां महाराष्ट्राचा नकाशा हवा तसा करून दिला. महाराष्ट्र–शारदेचे कर्ते रा. दिनकर गंगाधर केळकर ऊर्फ अज्ञातवासी यानी श्रमपूर्वक पैदा केलेल्या स्वतःच्या नमुनेदार चित्रसंग्रहातून सवाई माधवरावांचे अप्रसिद्ध चित्र पुस्तकाकारितां हौसेने दिले आणि त्याचा ठसा व त्याचप्रमाणें शाहूमहाराज व पहिले बाजीराव पेशवे यांच्या ऐतिहासिक चित्रांच्या प्रतिकृति महाराष्ट्र फोटो झिंको वर्क्सचे तरुण व तरतरीत चालक रा. भिडे यानीं झटकन बनवून दिल्या याबद्दल त्या सर्वांचा मी आभारी आहे. चित्र व नकाशा यानीं ग्रंथाची शोभा व उपयुक्तता पुष्कळच वाढविली आहे यांत शंका नाही. त्यांपैकीं शाहूमहाराजांचे चित्र आतांपर्यंत कोठेहि प्रसिद्ध झाले नसून भा. इ. सं. मंडळानें मला ते उपयोजण्यास दिले हे येथें नमूद करणें आवश्यक होय. केसरीचे मुख्य एजंट रा. प. वि. महाजन यानीं ग्रंथ-प्रसाराचे काम उत्साहानें हाती घेऊन टापटिपीनें शेवटास नेले याबद्दल त्यांचेहि मनःपूर्वक आभार मानणें माझे कर्तव्य आहे.

केसरी–कचेरी, पुणें
मार्गशीर्ष शु० १४ दत्तजयंती
शके १८५७.
ता. ९ डिसेंबर सन १९३५.

वासुदेव कृष्ण भावे.

अर्पण – पत्रिका.

ज्यांनीं स्वपराक्रम, उद्योगशीलता, चिकाटी, मुत्सद्दीपणा,
नीतिमत्ता, ईश्वरनिष्ठा व स्वधर्माभिमान या गुणांच्या
जोरावर हिंदवी स्वराज्य संपादून आर्यसंस्कृतीची
स्थापना व विस्तार सर्व भारतवर्षात केला,
त्या मराठेशाहींतील रणशूर व राजकारण-
पटु पूर्वजांच्या ऋणांतून अंशतः
मुक्त होण्याकरितां ही कृति त्यांस
आदरपूर्वक अर्पण करीत
आहें.

ग्रंथकर्ता.

ग्रंथगौरव

रा. रा. वासुदेवराव भावे यांस कृ. सा. न. वि. वि–तुमच्या नवीन पुस्तकाचे छापलि कागद चारशें पृष्ठांपर्यंतचे वाचले. त्यावरून मी असें म्हणूं शकतो कीं, इतिहासाच्या विषयांत मराठी वाचकांना भासत असणारी एक फार मोठी उणीव तुम्हीं या पुस्तकानें दूर केली आहे. आजपर्यंत वाचकांच्या हातीं पडलेले इतिहासविषयक ग्रंथ म्हटले म्हणजे [१] शालोपयोगीं, [२] संशोधनात्मक, [३] संकलनात्मक. पैकीं शालोपयोगी ग्रंथ फार संक्षिप्त व इतिहासाची केवळ रूपरेखा आंखणारे असे असतात. शिवाय असे ग्रंथ प्रायः मूळ इंग्रजी ग्रंथांच्या आधारें लिहिलेले असतात व हे मूळ इंग्रजी ग्रंथ लिहिणाऱ्या इतिहासकारांना महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाचे अंतरंग कळण्यासारखे नव्हते. यामुळें शालोपयोगी पुस्तकांत सामाजिक इतिहास नसतो. खरें पाहिलें तर तरुणवाचक वर्गाला सामाजिक वर्णनें व हकीगती जितक्या मनोरंजक व बोधप्रद होतील तितक्या राजकारणाच्या रूक्ष घडामोडींच्या हकीकती होणार नाहींत; पण अजून इकडे या दृष्टीनें सरकारी व खाजगी शिक्षणाधिकाऱ्यांचें लक्ष गेलेलें नाहीं. यानंतर गेल्या चाळीपन्नास वर्षांपासून महाराष्ट्राच्या इतिहासाचें संशोधन सुरू झालें. परंतु हें संशोधन अनेकांकडून मधून मधून फुटकळ झालें. तें घाऊक होणें शक्यच नव्हते. आणि संशोधनांतून निघालेले कागदपत्र सुटे, तुटक हाताला येतील तसे छापून प्रसिद्ध करणें हेच मुख्यतः आपलें काम अशी संशोधकांची समजूत असून ती रास्तहि होती. क्वचित एखादा संशोधकानें अशा कागदपत्रांतील अंतरंगाकडे सामाजिक कुतूहलदृष्टीनें पाहून स्फुट विधानें कोठें केली असतील व शेरे लिहिले असतील; परंतु सोन्याच्या एकेका कणांत सोनेंच असलें तरी तो दागिना होऊं शकत नाहीं किंवा चित्रांतील रंगांचे कण हे रंगच असले तरी ते विखुरलेले असतां त्यांचे चित्र होत नाहीं, त्याप्रमाणें संशोधनाच्या पद्धतीनें छापलेल्या कागदपत्त्रांवरून समग्र सामाजिक इतिहासाचें चित्र डोळ्याला तर दिसणें शक्यच नव्हतें, परंतु मनानें, स्मरणानें एकत्रित करणेंहि कठीण होतें. यानंतर संकलनग्रंथ झाले व त्यांत सामाजिक

इतिहासाच्या प्रकरणांना अवश्य स्थान असावयाचें. परंतु आपली ग्रंथमर्यादा लक्षांत घेतां त्यांत राजकारणाचा इतिहास समग्र सांगोपांग लिहून, शिवाय सामाजिक इतिहास लिहिण्याला जागा उरत नाहीं असें ग्रंथकर्त्यांच्या अनुभवाला येत असावें. पण यावरून हें आपोआपच सिद्ध होतें कीं, अशा ग्रंथकारांनीं सामाजिक इतिहासाला मनानें दुय्यम स्थान दिलें म्हणूनच त्यांचकडून त्याची अशी उपेक्षा झाली.

एका अर्थानें राज्याच्या इतिहासांत इतर विषयांपेक्षां राजकारणाला अधिक महत्त्व द्यावें हें स्वाभाविक आहे. राज्यसत्ता नाहीं तर समाजजीवन फुकट. राजेलोकांकडे विभूतिमत्त्वांच्या दृष्टीनें पाहण्याची सवय अजून गेलेली नाहीं. राज्यांतील मुलूख नेहमींच कायम व एकजिनसी असतो. भूरचनेचें स्वरूप कालांतरानेंहि दिसण्यासारखें बदलत नाहीं. हजारों वर्षांनीं लहान सहान खुणा बदलल्या तर बदलतील. पण ढोबळ खुणा बदलणार नाहींत. एखादा धरणीकंपच झाला तर गोष्ट वेगळी. राज्यसत्तेच्या खुणा इतक्या कायम नसतात. राज्येंहीं शेंकडो वर्षें एकाच राज्यकर्त्यांच्या हातीं रहात नाहींत. त्यांतील युगांतरांची रूपरेखा स्पष्ट, आंखीव व कोरीव असते. यामुळें राजकारणाचा इतिहास जसा महत्त्वाचा असतो, व लिहिण्याला सोपा असतो, तसा सामाजिक इतिहास असत नाहीं. आणखी एक कारण असें कीं, देशावर राज्यसत्ता एकच असली तरी देशांतील समाज हा वंश, गुण व धर्म यांच्या दृष्टीनें एकजिनसी नसतो, अनेकविध असतो. यामुळें सामाजिक इतिहास लिहिणें तो थोडक्यांत लिहून होण्यासारखा नसतो.

असो. कारणें कोणतींहि असोत, परंतु एवढी गोष्ट खरी कीं, आजवर वाचकांना महाराष्ट्रांतील समाजजीवनांतील इतिहास वाचावयास मिळाला नव्हता, तो तुम्हीं मिळवून दिला. आणि तोहि सांगोपांग आणि मोठ्या प्रमाणावर. नाहीं म्हणावयास पूर्वी न्या. मू. रानडे यांनीं पेशव्यांच्या डायऱ्यांतून टिपणें घेऊन, समाजसुधारणेच्या दृष्टीनें पेशवाईतलि लोकस्थितीचें चित्र इंग्रजी वाचकांपुढे मांडलें होतें. त्याचप्रमाणें न्या. मू. तेलंग यांनीहि अशाच प्रकारचें एक प्रकरण इंग्रजींत लिहिलेलें पुष्कळांनीं वाचलेंच असेल. त्यानंतर रा. पारसनिस यांनीं चालविलेल्या इतिहाससंग्रह मासिकपुस्तकांत मराठ्यांच्या सामाजिक चरित्रावर प्रकाश पाडणारीं टिपणें मधून मधून प्रसिद्ध होत. रा. खरे यांच्या

ऐतिहासिक लेखसंग्रहांच्या पुस्तकांत तळटीपांतून या दृष्टीनें केलेले उल्लेख बरेच आढळतात. आणि रा. सरदेसाई यांच्या ग्रंथांत समाजस्थितिवर्णनाचे उल्लेख थोडथोडे आहेत. परंतु हीं सर्व टिपणें व हे उल्लेख त्रोटक व फुटकळ असल्यामुळें त्यांत संगति व खातेवारी नाहीं. या उणीवेचें शल्य इतिहासवाचकाच्या मनांत आज फार दिवस राहिलें तें तुम्हीं या साडेपांचशें पावणे सहाशें पानांच्या व केवळ याच विषयास वाहिलेल्या ग्रंथानें काढून टाकलें यांत शंका नाहीं. सामाजिक जीवनाची कोणतीहि बाब तुमच्या पुस्तकांतून सुटली नाहीं आणि तुम्ही दिलेली माहिती बहुतेक अस्सल उताऱ्यांच्या रूपाचीच असल्यामुळें तुम्ही स्वतःची कल्पना चालवून, पदरचें घालून अनुमानें बांधिलीं अशी शंका घेण्याचें कोणास कारण उरलें नाहीं. यामुळें जेथें पुस्तक उघडावें तेथें मन गुंततें व वाचकाचें रंजन होतें. मराठ्यांच्या सामाजिक चरित्रांतील अगदीं घरगुती गोष्टीपासून तो सार्वजनिक चालीरीति व समारंभ येथपर्यंत सर्वांवर तुमची नजर फिरलेली आहे. यामुळें मराठेशाहीतील मराठा कसा होता, याचें रंगीत चित्र तुमचें पुस्तक वाचून डोळ्यापुढें उभें राहतें.

राजकीय इतिहासांत राजाच्या वंशावळी, लढाया, तहनामे व फार तर क्रांत्या आणि मामुली राज्यव्यवस्था यांचीच हकीकत वाचावयास मिळते. पण त्यांतून समाजजीवनाचें खरें अंतरंग प्रगट होत नाहीं. पाश्चात्य इतिहासकारांना ही गोष्ट कळत असल्यामुळें त्यांतील कांहींनीं आपल्या ग्रंथांतून राजकीय इतिहासाबरोबर सामाजिक चरित्राचीहि माहिती दिलेली आहे. मेकॉले, ग्रीन, गिबन यांच्या इतिहासांत ही दृष्टि दिसून येतें. परंतु राजकीय इतिहासांत समाजाचें चरित्रवर्णन फार थोडें असतें व मुद्दाम कोंबून दिलेलें असे वाटतें. स्वतंत्र ग्रंथांत मिळणारा वाव राजकीय इतिहासांत मिळूं शकत नाहीं. व ही गोष्ट लक्षांत घेऊन, सामाजिक वर्णनपर असे स्वतंत्र ग्रंथ इंग्रजी राष्ट्रासंबंधानें कांहीं थोड्या ग्रंथकारांनीं लिहिलेहि आहेत. त्याच दृष्टीनें तुमचा हा ग्रंथ अपूर्व होय, यांत शंका नाहीं. तुम्ही झाले तरी आजवर छापून झालेल्या ऐतिहासिक कागदपत्रांचाच उपयोग केलेला आहे. त्याकरितां वेगळें संशोधन असें केलेलें नाहीं. पण अशा छापील कागदपत्रांचें वाचन मी केलें आहे त्यावरून मी सांगूं शकतों कीं, तुमच्या पुस्तकांत दिलेल्या उताऱ्यांवरून त्या वाचनाच्या वेळीं दृष्टी गेली असतांहि त्यांचा ठसा तेव्हां मनावर उमटला

नव्हता तो तुमचें पुस्तक वाचताना आतां खास उमटतो. कारण ते कागदपत्र वाचतांना माझीहि दृष्टी मुख्यतः राजकीय इतिहास लक्षांत घेण्याचीच होती.

असो. प्रस्तुतचें पुस्तक तयार करण्याला तुम्हाला उपलब्ध ऐतिहासिक कागदपत्र किती बारीक नजरेने वाचावें लागले असतील याची कल्पना मला आहे. पण एखाद्या विशेष दृष्टीनें मनुष्य वाचूं लागला म्हणजे अशा वाचनाचे श्रम त्याला भासत नाहींत व खाणीतलि सुवर्णमृत्तिकेचे थर तपाशीत जातांना भूगर्भशास्त्रवेत्त्याला जो आनंद होतो, तसाच आनंद तुम्हाला होत गेला असेल याविषयीं मला शंका वाटत नाहीं.

महाराष्ट्रांतील आजची पिढी ही जुन्या पिढीच्या महाराष्ट्रीयांच्या वंशजांचीच असली तरी त्या पिढीलें आपल्या पूर्वजांचें सामाजिक जीवन कसें होतें याविषयी चिकित्सा व कुतूहल वाटण्याइतका त्या काळच्या व आजच्या महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत फरक पडलेला आहे. तुमचें पुस्तक वाचीत असतां पुष्कळ ठिकाणीं ते आमचे पूर्वज व आम्ही त्यांचे वंशज या विचारानें पुष्कळ वाचकांना अतिशय मौज वाटेल. आणि सामाजिक जीवन हें पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें अखंड असलें तरी चंचल असतें, अशी त्यांची खात्री होईल.

न. चिं. केळकर.

अनुक्रमणिका

संदर्भग्रंथ

१ Selections from the Satara Raja's and Peshwa's Diaries. पुस्तकांतील संक्षेप—पे. डा.

२ पेशवे दप्तर–सं. रावसाहेब गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. संक्षेप–पे. द.

३ ऐतिहासिक लेखसंग्रह–सं. वासुदेव वामनशास्त्री खरे. संक्षेप–ऐ. ले. सं.

४ इतिहाससंग्रह—सं. रावबहादुर दत्तात्रेय बळवंत पारसनीस. संक्षेप—इ. सं.

५ Poona in by-gone-days by, R. B. D. B. Parasnis.

६ नाना फडणविसांचे चरित्र—ले. वासुदेव वामनशास्त्री खरे.

७ भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्रैमासिक.

८ महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास—ले. शंकर दामोदर पेंडसे.

९ महाराष्ट्रधर्म—ले. भास्कर वामन भट वकील.

१० मराठी रियासती—ले. गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए.

११ काव्येतिहाससंग्रह—काशिनाथ नारायण साने बी. ए.

१२ पानसे घराण्याचा इतिहास—ले. रावबहादुर केशव रंगनाथ पानसे.

१३ राजवाडे यांच्या ऐतिहासिक प्रस्तावना–प्र. चित्रशाळा, पुणें.

१४ पेशव्यांची बखर—सं. कृष्णाजी विनायक सोहनी.

१५ हरिवंशाची बखर—सं. वासुदेव वामनशास्त्री खरे.

१६ महाराष्ट्र-सारस्वत—ले. विनायक लक्ष्मण भावे बी. एस्सी.

१७ गावगाडा—ले. त्र्यंबक नारायण अत्रे.

१८ Rise of the Maratha Power, by Rao Bahadur Mahadeo Govind Ranade.

१९ श्री ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचे चरित्र व पत्रव्यवहार–ले. दत्तात्रेय बळवंत पारसनीस.

२० गोखले व गोखले-रास्ते, घराण्याचा इतिहास—ले. गोविंद विनायक आपटे.

२१ Social life in Pre-British Maharashtra (1750-1800) by D. V. Kale M. A.

२२ Administrative Systems of the Marathas by Surendra Nath Sen M. A. Ph. D.

२३ बक्षीबहादर जिवबादादा यांचे चरित्र—ले. केशव मंगेश रांगणेकर बी. ए.

२४ Letters Written in a Mahratta Camp during the year 1809 by Thomas Duer Broughton संक्षेप—ब्रौटन.

२५ वऱ्हाडचा इतिहास—ले. यादव माधव काळे बी. ए., एल्‌एल्. बी.

२६ पुरंदरे दप्तर भाग ३ रा सं. कृ. वा. पुरंदरे.

२७ English Factories in India.

२८ Bombay by Samuel T. Shephard.

२९ न्यायमूर्ती रानडे यांचे किरकोळ लेख.

३० ज्ञानकोश.

३१ नीलकंठाचा व्यवहारमयूख.

३२ कौटिलीय अर्थशास्त्र भाषांतरकार ना. रा. ह्विरगांवकर व ज. स. करंदीकर बी. ए., एल्‌एल्. बी.

३३ Report on the Territories conquerred from the Peshwas, by the Hon Mount Stuart Elphinstone Commissioner.

३४ Encyclopedia Britanica 1914.

३५ मध्वमुनीश्वराची कविता सं. प्रल्हाद व्यंकटेश गुब्बी.

३६ लेखनालंकार सं. आबा बारामतीकर व आबा चांदोरकर.

३७ Gazetteer of the Bombay Presidency.

३८ सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रंथांक २ सं. ले. अ. ना. भागवत.

३९ ऐतिहासिक पोवाडे सं. य. न. केळकर वाङ्मयविशारद.



छत्रपती शाहू महाराज.

(भा. इ. सं. मंडळाच्या परवानगीनें)

पेशवेकालीन महाराष्ट्र

प्रकरण पहिलें.

महाराष्ट्र—वर्णन.

महाराष्ट्राचा आकार साधारणपणें तिकोनी आहे. दक्षिणेस गोवें, उत्तरेस ठाणें जिल्ह्याची सरहद्द व पूर्वेस नागपूर या तीन बिंदूंनीं हा त्रिकोण पुरा होतो. गोवें ते ठाणें जिल्ह्याची सरहद्द हा त्रिकोणाचा पाया. गोव्यापासून नागपुरास भिडणारी एक रेषा ओढावी व दुसरी ठाणें जिल्ह्यापासून तापी नदीच्या कडेकडेनें नागपूरापर्यंत न्यावी, म्हणजे महाराष्ट्रदेशाची कल्पना स्पष्ट झाली. अशा रीतीनें हा देश तिकोनी असल्यामुळें त्याची लांबी व रुंदी बिनचूक सांगणें कठिण आहे. तथापि गोव्यापासून नागपुरापर्यंत ओढलेली रेषा हीच महाराष्ट्राची लांबी समजण्यास हरकत नाहीं. ही लांबी सात-आठशें मैल आहे. रुंदी मात्र त्या मानानें फारच कंमी आहे. ती दक्षिण टोकाला पंचवीस-तीस मैल भरेल, तर नांदेडच्या सुमारास दोन-अडीचशें मैलांच्या घराला येईल. याच्या मधून दक्षिणोत्तर अशी सह्याद्रीची रांग पसरली आहे. ती तीनशें मैल लांब आहे. तिच्या पश्चिमेच्या अंगास कोंकणपट्टी आहे व पूर्वेच्या अंगास देश आहे. कोंकणपट्टीची लांबी तितकीच असून रुंदी मात्र अवघी वीस-पंचवीस मैल आहे. ही पट्टी एकीकडून आरबी समुद्र व दुसरीकडून सह्यपर्वत यांच्या सापटींत सापडली आहे. समुद्र व पर्वत यांनीं महाराष्ट्राच्या रचनेंत व हवापाण्यांत विलक्षण वैचित्र्य घडवून आणिलें आहे. कोंकणांतील प्रदेश समुद्रसपाटीबरोबर असल्यानें तेथील हवा वर्षभर समशीतोष्ण रहाते. सह्याद्रीची उंची समुद्रसपाटीपासून दोन हजार फूट असून तितक्याच उंचीवर सह्याद्रीच्या पूर्वेचा अफाट देश कमी-अधिक प्रमाणांत पसरला आहे. ज्येष्ठ महिन्यांत मृगनक्षत्राच्या सुमारास आगोटीला

सुरुवात होऊन श्रावण महिना अखेरपर्यंत कोकणप्रांतीं मुबलक पर्जन्य पडतो, व त्या मानानें मघापंचकांतील बरसातिचें तिकडील प्रमाण कमी असतें. तथापि पावसाळ्याच्या चार महिन्यांत कोकणांत शंभर ते सव्वाशें इंचांपर्यंत पावसाची भरती होते. ऐन सह्याद्रीच्या माथ्यावर दोन-अडीशें इंचांपर्यंतहि पर्जन्य कोसळतो. जणूं काय उन्हाळ्यांत सतत चार महिने अंगाची तलखी झाल्यामुळें हा गिरिराज पश्चिमेचा सारा समुद्रच्या समुद्र आपल्या डोक्यावर ओतून घेत असतो! पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात चाललेल्या ढगांच्या रहाटगाडग्यांतील कुंभ त्यानें स्वतःच्या स्नानाकरितां बहुतेक रिते केल्यानंतर ते थोडेसे रिकामे पण पालथे कुंभच देशाच्या वांट्यास येतात. याचा परिणाम असा होतो कीं, या मेघमाला सह्याद्रीपासून जों जों पूर्वेला जातात तों तों पर्जन्याचें मान कमी कमी होतें; तें इतकें कीं, सह्याद्रीपासून पूर्वेस सुमारें चाळीस-पन्नास मैलांच्या अंतरापलीकडे पावसाळ्यांतील पावसाऐवजीं ढगांनीं आणिलेल्या शीतळाईवरच शेतकऱ्यांना कैक दिवस समाधान मानून स्वस्थ बसणें भाग पडतें. कोकणांत रोपें तयार होऊन भाताची लावणी झाली, तरी देशावर गवताची हिरवी काडीहि उगवत नाहीं व नक्षत्रामागून नक्षत्रें कोरडीं जाऊं लागल्यामुळें मेघांकडे वारंवार पाहून पाहून माना अवघडलेल्या शेतकऱ्यांची ज्यांना कींव आली आहे, त्यांच्या तोंडीं ‘ यं यं पश्यसि तस्य तस्य पुरतो मा ब्रूहि दीनं वचः ’ ही कव्युक्ति शेतकऱ्यांना उपदेश करण्याकरितां आल्यावांचून रहात नाहीं.

हा नैऋत्येचा पाऊस थोडा पडला तरी तो बऱ्याच अंतरापर्यंत शेतकऱ्यांच्या भरंवशाचा समजला जातो. त्यानें टाळा दिला व मघापंचकाचा ईशान्येकडील पाऊस वेळच्या वेळेला न पडतां उडत उडत पडला तर देशभागांत दुष्काळ किंवा दुर्भिक्ष ठेवलेलें. देशभागांत पावसाचें मान सरसालांत कोठे वीस-पंचवीस किंवा तीस इंचांचें असतें. या कारणानें तीन चार सालांत एखादें साल त्यास सुबत्तेचें जातें. बाकीचीं सालें अर्धवट दुष्काळाचींच. महाराष्ट्राच्या पश्चिमेच्या अंगावर साऱ्या वर्षांत शेंसवाशें इंच पाऊस पडावा व पूर्वांगाच्या वांट्यास तो पंचवीस तीस इंचहि येऊं नये ही विषमता अनेक दुःखांस कारण झाली आहे. कोकणांत पर्जन्यवृष्टि इतकी विपुल होते तरी जमीन हलकी असल्यामुळें तिच्यांत उत्पन्न होणारें पीक तिकडील रहिवाशांच्या पोटास वर्षांतून चार महिनेहि पुरत नाहीं. उलटपक्षीं देशावरची जमीन भारी असली तरी तिला तृप्त करण्या-

इतका मुबलक पाऊस बहुधा मिळत नसल्यामुळें तिकडील रहिवाशांची ददात नेहमीं कायमच रहाते. सह्याद्रि हा एका अर्थानें देशभागाचें नुकसान करीत असला तरी तें नुकसान तो इतर दोन उपायांनीं अंशतः भरून काढतो. सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या प्रचंड रांगेच्या अनेक शाखा देशावर जागजागीं शंभरशंभर दीडदीडशें मैल लांब गेल्या आहेत. जो पाऊस देशाच्या सपाट भागांत पडत नाहीं, तो या लहान रांगांच्या पाठीवर चढून त्यांच्या टोकापर्यंत जातो व त्यांच्या आजू बाजूचा कांहींसा पट्टा भिजवून सोडतो. बाकीचा देशावरील प्रदेश ऐन पावसाळ्यांतहि भयाण व भगभगीत दिसत असला व त्यावरून सर्द वारे भणभण करीत हिंडत असले तरी या रांगा व त्यांचा आश्रित मुलूख गवतानें व बाजरी, मूग, सावा यांसारख्या हलक्या पिकांनीं हिरवळतो. त्याखेरीज सह्याद्रीपासून पूर्वेस वहाणाऱ्या नद्यांमार्फत होणारा फायदा फार मोठा. अशा शेकडों लहान मोठ्या नद्या सह्याद्रींतून निघाल्या आहेत. त्यांच्या कांठच्या जमिनी गाळवंडून व पुरांत बुडून फार पिकाऊ बनल्या आहेत. त्यांच्यावर जीव धरून रहाणारा शेतकरीवर्गहि कांहीं थोडा नाहीं.

महाराष्ट्रांतील पर्जन्याच्या व सृष्टिरचनेच्या विषमतेस सह्याद्रि हाच मुख्यतः कारण झाला आहे. त्यामुळें निरनिराळ्या भागांत निरनिराळीं पिकें उत्पन्न होतात, व निरनिराळें हवामान अनुभवास येतें. कोकणांत तांदूळ, वाल, वरी यांशिवाय ज्वारी, बाजरी, गहूं हीं धान्यें पहावयासहि मिळावयाचीं नाहींत; आणि दूर देशावर ज्वारी, बाजरी, गहूं यांखेरीज तांदुळासारखें धान्य सणवाराशिवाय एरव्हीं खाण्यांतहि यावयाचें नाहीं. अन्नांतील या फरकास सृष्टिवैचित्र्याचीहि जोड लाभली आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेचें तळकोंकण फार खोल असून त्यांत सह्याद्रीनें भूमातेचीं आंतडीं फाडून काढून तीं इतस्ततः फेकून दिल्याप्रमाणें दिसतात. उन्हाळ्यांत हा देखावा फारच भयानक वाटतो. सह्याद्रींत झाडी आहे, पण ती क्वचित् दाट आहे तर बऱ्याच ठिकाणीं अगदीं तुरळक आहे. जेथें ती तुरळक आहे तेथें सह्याद्रीचे असंख्य कडे खोल पाताळापर्यंत तुटत गेलेले व उंच सुळे वर आकाशाला भोसकीत निघालेले उघडेवाघडे आढळतात. पण जेथें ती दाट आहे तेथें भूदेवी वनश्रीनें उत्कृष्ट नटलेली असून तिच्या दर्शनानें उच्च व सुंदर कल्पना आणि भावना उद्भवून मन आनंदून जातें. सारांश, कोठें भयानकपणामुळें तर कोठें रमणीयत्वामुळें सह्याद्रीचा तटप्रदेश आश्चर्य, आनंद, भीति,

भव्यपणा गांभीर्य व तरलत्व या उलट सुलट भावनांचें क्रीडांगणच बनून राहिला आहे.

पर्वताचें हें वैभव महाराष्ट्राच्या सर्व भागांना कमी-अधिक प्रमाणांत वांटून मिळालें आहे. पश्चिम व दक्षिण महाराष्ट्राला सह्याद्रींचा आधार लाभला आहे; तर वऱ्हाडप्रांतासारख्या पूर्वमहाराष्ट्राच्या पाठीशीं उत्तरेच्या बाजूनें सातपुडा हा पर्वत उभा आहे. या दोन मुख्य पर्वतांखेरीज कोठें पूर्वपश्चिम पसरलेल्या रांगा आहेत तर कोठें सह्याद्रि व सातपुडा यांना समांतर असे लहान मोठे घाट आडवे पडले आहेत. त्यांत बालाघाट हा फार व्यापक व महत्त्वाचा होय. तो एकच घाट नसून अशा प्रकारच्या अनेक घाटांना ही एकच संज्ञा आहे असें समजण्यास हरकत नाहीं. हे छोटे घाट औरंगाबाद व बार्शी जवळील मोगलाईचा कांहीं भाग, वऱ्हाडचा दक्षिण भाग यांत आढळतात. अशा रीतीनें पर्वत, डोंगर व घाट ठिकठिकाणीं आहेत, म्हणून पर्जन्याचा प्रवेशहि त्यांच्या मार्फत त्या त्या प्रदेशांतून होऊन सर्व मुलूख वसाहत करण्याच्या योग्यतेस पोंचला आहे.

सोलापूर, नगर आणि पुणें व सातारा यांचा पूर्वभाग, यांत पाऊस जितका बेभरंवशाचा आहे, तितका खानदेश व वऱ्हाड यांत नाहीं. तिकडची जमीन सुपीक आहे व तिला पाऊसहि थोडका पडला तरी पुरतो. या कारणानें महाराष्ट्राचा हा विस्तृत भाग विशेष समृद्ध बनला आहे. पर्वत, डोंगर व घाट यांनीं आणखी एक मोठा फायदा असा केला आहे कीं, जो पाऊस स्वतःच्या अंगावर ओतून घेऊन स्वतःच्या पोटांत तें सांठवितात तो त्यांनीं नद्या, ओढे व नाले यांच्या रूपानें महाराष्ट्रभर सतत वहाता ठेवला आहे. महाराष्ट्रांतील लहानमोठीं शहरें व गांवें त्यांच्याच काठावर वसलीं असून त्यांवर त्यांचें जीवन सर्वस्वीं अवलंबून आहे. या पर्वतांत, डोंगरांत व घाटांत वाघ, लांडगे, तरस, चित्ते यांसारखे हिंस्रपशु आहेत, गुहा आहेत, दऱ्या आहेत व खोरीं आहेत. त्यांच्या आसमंतात् रहाणाऱ्या लोकांना दऱ्या उतराव्या लागतात, कडे चढावे लागतात व हिंस्रपशूंशीं दोन हात करून त्यांचा जीव घेऊन स्वतःचा जीव वांचवावा लागतो. शरीराची इमारत पक्की मजबूत करून तिच्यांत धैर्य, साहस, चिकाटी, कंटकपणा, हिंमत हे सद्गुण बळावण्याकरितां निसर्गानें ठिकठिकाणच्या महाराष्ट्रीयांसाठीं जणूं काय हे मलखांब, आंखाडे व शिकारखानेच ठेवले आहेत.

जंगलाची कमतरता व दलदलीचा अभाव यांमुळें महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व ठिकाणची हवा निरोगी बनली आहे व तिच्यांत समुद्र, पर्वत, नद्या, अरण्यें व मैदानें यांच्या संसर्गानें वैचित्र्य उत्पन्न झालें आहे. कोंकणपट्टींतील घरांच्या परसांत समुद्र व अंगणांत डोंगर असल्यानें तेथील घरें ह्या साहसाच्या व कष्टाच्या शाळाच होऊन राहिल्या आहेत. त्यांतील रहिवाशांनीं समुद्रांत हवें तितकें दूर वल्हवीत हिंडावें व पर्वतावर हवें तितकें उंच चढावें. समुद्रावरील शीतल वायु त्यांच्या आगरांआगरांतून खेळत असतो व सह्याद्रीवरून घाटमाथ्यावर चढून महाराष्ट्रभर धावत असतो. हा वारा मोठा उत्साहवर्धक असून उन्हाची तीव्रता नाहींशी करणारा आहे. म्हणून सह्याद्रीच्या माथ्यापासून पूर्वेस पन्नास-साठ मैलांपर्यंतचा प्रदेश महाराष्ट्रांत उत्कृष्ट हवेचा गणला जातो व त्यांतील रहिवाशी उद्योगी, पाणीदार, चलाख व बुद्धिमान् समजले जातात. या भागांत उष्णतेचें मान हिवाळ्यांत किमान ४५ अंश व ऐन उन्हाळ्यामध्यें कमाल १०३ अंश असतें. परंतु त्याच्या पलीकडे पूर्वेला जों जों जावें तों तों उष्णतामान वाढत वाढत ११२ अंशांपर्यंतहि जातें. खानदेश, वऱ्हाड, सोलापूर हा प्रदेश महाराष्ट्रांत अत्यंत उष्ण असल्यामुळें तिकडील लोक आळशी, मंद व ढिले आढळतात. त्यांतल्या त्यांत अहमदनगर व सोलापूर या बाजूचे रहिवाशी आळशी व मंद असले तरी शरीरानें मजबूत व धिप्पाड असतात. महाराष्ट्रीयांची चण सामान्यतः लहान आहे. तरी पण त्यांच्यापैकीं बांधेसूद, बळकट व कणखर लोक कोठले म्हणून विचारल्यास सातारा, सोलापूर व अहमदनगर या जिल्ह्यांकडेच बोट करावें लागेल.

पर्वत, डोंगर व घाट यांनीं महाराष्ट्रास सामर्थ्य व रमणीयत्व आणून दिलें आहे. त्यांच्या माथ्यावर किल्ल्यांनीं आपले तट व मंदिरांनीं आपले कळस चढविले आहेत आणि त्यापासून वहाणाऱ्या नद्यांच्या काठांना क्षेत्रांनीं पवित्र करून सोडलें आहे. महाराष्ट्रांत असे किल्ले व अशीं मंदिरें शेकडों आहेत. किल्ले राजांनीं बांधले, मंदिरें राजेरजवाड्यांनी, संतमहंतांनीं व श्रीमंतांनीं उभारलीं आणि क्षेत्रें भगवद्भक्तांनीं नांवारूपास आणिलीं. महाराष्ट्रांत कोठेंहि उभें राहून कोणीकडेहि दृष्टि फेकली तरी यांपैकीं कांहींना कांहीं नजरेस पडून मनांत एखादी तरी उच्च भावना जागृत झाल्याशिवाय रहात नाहीं. कोंकणांतील परशुराम, गोमांतकांतील शांतादुर्गा, कोल्हापुरांतील महालक्ष्मी, पंढरपुरांतील विठ्ठलरखुमाई, तुळजापुरची

भवानी, माहूरचे दत्तराज, जेजुरीचे खंडेराय, मोरगांवचा मयूरेश्वर, अशा शेकडो देवदेवतांनीं महाराष्ट्रांतलि कर्त्या लोकांच्या मनाला गेलीं कित्येक शतकें वेध लावून ठेवला आहे. तसेंच आळंदीचे ज्ञानेश्वर, देहूचे तुकारामबुवा, सज्जनगडचे समर्थ, देवगिरीचे जनार्दनस्वामी, पैठणचे एकनाथ, गाणगापूरचे सरस्वतीगंगाधर, इत्यादि संतमहंतांनीं वारकरी, रामदासी, दत्तोपासक महानुभाव, नाथपंथी या अनेक संप्रदायांना जन्म देऊन त्यांत महाराष्ट्रांतील लाखों माणसें गोवून घेतलीं आहेत.

महाराष्ट्रांतील पर्वतावर डोंगरी किल्ले आहेत व मैदानावर भुईकोट व गढ्या आहेत. डोंगरी किल्लयांत रायगड, राजगड, सिंहगड, पुरंदर, शिवनेर, देवगिरी, पन्हाळगड, माहूर, अजिमतारा, प्रतापगड, चंदनवंदन, वर्धनगड, हरिश्चंद्रगड इत्यादि शेकडों किल्ले प्रसिद्ध आहेत. त्यामानानें भुईकोट किल्ले थोडे असून त्यांपैकीं अहमदनगर, सोलापूर, मिरज, मालेगांव इत्यादि कांहीं किल्ले प्रमुख होत. त्यांशिवाय समुद्रकिनाऱ्याला जे किल्ले आहेत त्यांना जंजिरे म्हणतात. रत्नागिरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, मालवण, जयगड, देवगड, अर्नाळा, वसई वगैरे जंजिरे इतिहासकाळांत गाजलेले आहेत. महाराष्ट्रदेश पश्चिमसमुद्राच्या बाजूनें अगदीं उघडा आहे व त्यांत गोव्यापासून वसईपर्यंत पणजी, मालवण, राजापूर, रत्नागिरी, चिपळूण, महाड, हरेश्वर, अलीबाग, मुंबई, वसई अशीं अनेक बंदरें आहेत. त्या बंदरांत युरोप, आफ्रिका व आशिया या तीनहि खंडांमधील देशांतून अनेक धाडशी जातींचे लोक येऊन स्वारी करण्याचा किंवा वसाहत करून रहाण्याचा संभव आहे. अशा प्रकारचीं लक्षावधि माणसें या मार्गानें कोकणांत उतरून त्यांपैकीं पोर्तुगीज, सिद्दी या जातींनीं आपलीं लहानमोठीं राज्यें स्थापिलीं व कांहींनीं कोकणांतून वर घाटीं जाऊन मुसलमानांच्या सैन्यांत अगर मुलकी खात्यांत प्याद्यापासून वजीरापर्यंतच्या हुद्दयाच्या जागाहि पटकावल्या. विजापूर येथलि आदिलशाही राजघराण्याचा संस्थापक अब्बुल मुजफर युसफ आदिलशहा हा तुर्कस्थानच्या राजकुलांतील एक पुरुष १४५९ त दाभोळ बंदरीं उतरून बेदरास गेला व तेथून पुढें उदयास आला. या परकीय जातींना आडवून समुद्रकिनाऱ्याचा बचाव करण्यासाठीं वरील जंजिरे कोकणपट्टींत ठिकठिकाणीं बांधून ठेवले आहेत. जमिनीवरच्या किंवा डोंगरांतल्या धाडसापेक्षां समुद्रांतील धाडस कांहीं वेगळेंच असून त्यांत कोकणच्या कोळी, भंडारी वगैरे

जातींस पटाईत बनण्यास समुद्रकांठ फारच उपयोगीं पडतो. सैन्य व आरमार हीं राष्ट्रसंरक्षणाचीं मुख्य साधनें होत. त्यांस अनुकूल अशी परिस्थिति महाराष्ट्रांत पूर्णपणानें नांदत आहे.

महाराष्ट्रांत आर्यांनीं केलेली वसाहत तीन हजार वर्षांहून जुनी नसावी असें संशोधकांचें मत आहे. परंतु महाराष्ट्रावरील आर्यराजघराण्यांचा छडा लागतो तो शातवाहनांपासून. इ. स. पूर्वीच्या पहिल्या शतकापासून तों इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत शातवाहनांचें राज्य कोकण, महाराष्ट्र व कुंतल या प्रदेशांवर होतें. शातवाहन आपणांस आंध्रभृत्यहि म्हणवीत. त्यांच्या ताब्यांत पाटलीपुत्राचेंहि राज्य होतें. अशा या अफाट साम्राज्याची पैठण ही राजधानी होती. शातवाहनांपासून चालुक्यांपर्यंत जो मधला काळ झाला त्याचा इतिहास नीट सांपडत नाहीं. शातवाहनांमागून चालुक्यांचें राज्य इ. स. च्या ६ व्या शतकांत महाराष्ट्रांत स्थापन झालें. हा राजवंश अयोध्येकडून आला व त्यानें आपली राजधानी बदामी केली. यांचें राज्य नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलें होतें. हें राज्य इ. स. ७५३ पर्यंत टिकलें. त्यांना राष्ट्रकूटांनीं जिंकून मालखेड ही आपली राजधानी केली. गोविंद हा या वंशातला पहिला मोठा राजा. त्याच वंशांतील कृष्णराज नांवाच्या राजानें वेरूळ येथील जगत्प्रसिद्ध कैलास लेणें कोरलें. राष्ट्रकूटांमागून पुनः चालुक्यांचें राज्य होऊन तें इ. स. ९७३ ते ११८९ पर्यंत चाललें. त्यांनीं बेदरजवळ कल्याण नांवाचें नगर वसवून त्यास राजधानीचा मान दिला. मिताक्षराटीकेचा कर्ता विज्ञानेश्वर हा चालुक्यवंशांतील सोमेश्वर नामक राजाच्या दरबारीं होता.

याच सुमारास यादवांचें राज्य महाराष्ट्रांत होतें. त्यांचा काळ इ. स. ७४५ ते ११९१ पर्यंत असून त्यांची राजधानी नाशिकजवळ श्रीनगर येथें होती. हा यादवांचा पहिला वंश. या पहिल्या वंशाची समाप्ति होऊन दुसऱ्या वंशाची सुरुवात झाली. दुसऱ्या वंशाचें राज्य पहिल्या वंशापेक्षां बरेंच मोठें असावें. त्यांतील राजा जैत्रपाळ देवगिरीचे गादीवर स. ११९१ त बसला. तो विद्वान् होता. प्रसिद्ध ज्योतिषी भास्कराचार्य याचा पुत्र लक्ष्मीधर हा जैत्रपाळाच्या दरबारीं प्रमुख पंडित होता. पुढें सिंघण यादव १२१० त गादीवर आला. त्यानें कुंतलदेश म्हणजे द. महाराष्ट्र, माळवा, गुजराथ, पन्हाळा, छत्तीसगड इत्यादि ठिकाणच्या राजांना जिंकलें. त्यावेळीं पन्हाळ्यास शिलाहरवंशीय भोजराजा राज्य

करीत होता. सिंधणानें सातारा जिल्ह्यांत भूषणगड किल्ला बांधला व माण तालुक्यांतील सिंधणापूर ऊर्फ शिंगणापूर हा आपल्या नांवाचा गांव वसविला. भास्कराचार्यांचा नातू चांगदेव सिंधणाच्या दरबारीं मोठा ज्योतिषी होता. खानदेशांत चाळीसगांव तालुक्यांत पाटण येथें चांगदेवानें भास्कराचार्यांचा सिद्धांत शिरोमणि ग्रंथ शिकविण्याकरितां मोठी पाठशाळा घातली. अनंतदेवानें तेथेंच शेजारीं भवानीचें देऊळ बांधलें.

यादववंशापैकीं कृष्णराज हा १२४७ पासून १२६० पर्यंत देवगिरीस राज्य करीत होता. त्यानें कित्येक चित्पावन व देशस्थ ब्राह्मणांना गांवें इनाम दिलीं. त्यांत पटवर्धन, घैसास, पाठक इत्यादि घराणीं होतीं. वेदान्तसूत्रांवरील टीकाकार अमलानंद याच राजाच्या आश्रयाला होता. जहळण हा विद्वान् ब्राह्मण त्यांचा मुख्य मंत्री असून त्यानें सूक्तिमुक्तावली नामक ग्रंथ लिहिला आहे. कृष्णराजाच्या मागून महादेव गादीवर बसला. त्यानें इ. सं. १२७१ पर्यंत राज्य केलें. त्याच्या वेळीं सोमेश्वर नांवाचा शिलाहर वंशीय राजा कोंकणांत ठाणें येथें राज्य करीत होता. महादेवानें त्यास ठार मारून कोकण प्रांत आपल्या राज्यास जोडला. त्यानें काश्यपगोत्री केशव नांवाच्या ब्राह्मणाकरवीं आप्तोर्याम यज्ञ केला. महादेवानंतरचा यादववंशीय राजा रामचंद्र ऊर्फ रामदेव होय. त्यानें इ. स. १२७१ पासून १३०९ पर्यंत राज्योपभोग घेतला. हा कृष्णराजाचा पुत्र. त्याच्या कारकीर्दींत भार्गवगोत्री कृष्ण नांवाच्या ब्राह्मणाकडे कोकणाचा कारभार होता. अच्युतनामक दुसरा एक ब्राह्मण अशाच प्रकारच्या मोठ्या हुद्दयावर होता. रामदेवानें ५७ ब्राह्मणांना तीन गांव इनाम दिले. त्या इनामाच्या शर्तीं ध्यानांत ठेवण्याजोग्या होत्या, त्या अशा—ब्राह्मणांनीं व त्यांच्या वंशजांनीं त्याच गांवांत राहिलें पाहिजे; त्यांनीं आपली इनामे गहाण टाकतां कामा नये; त्या गांवांत वेश्यांना राहूं देऊं नये; जुवा खेळूं नये; हत्यारें वापरूं नयेत व सर्वांनीं आपला वेळ सत्कर्मांत घालवावा. महादेव व रामदेव या दोन्ही राजांचा मुख्य प्रधान प्रसिद्ध विद्वान् हेमाद्रि हा होता. हेमाद्रीनें धर्मशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत. हेमाद्रि हा स्वतः ब्राह्मण असून ब्राह्मणांचा पुरस्कर्ता होता. त्याचा विद्वानांना आश्रय असे. तो रणांगणांत शूर तसा धार्मिक व देवभक्त होता. त्याचा मोठा ग्रंथ चतुर्वर्गचिंतामणि. त्या ग्रंथाचे व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड, मोक्षखंड असे चार भाग आहेत. हेमाद्रिच्या तोडचा दुसरा विद्वान् बोप-

देव, त्यानें लिहिलेलें मुक्ताफळ व हरिलिला हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मुग्धबोध नांवाचें संस्कृत व्याकरण बोपदेवानें लिहिलें. बोपदेवानें वैद्यकावरहि कित्येक ग्रंथ लिहिले आहेत.

देवगिरीस यादवराजे राज्य करीत असतां शिलाहर राजाचा अंमल कोंकण व त्याच्या लगत्याचा प्रांत यांवर असून त्याजबरोबर यादवांनीं केलेल्या युद्धांचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांचे तीन वंश अनुक्रमें उत्तर कोकण, दक्षिण कोकण व कोल्हापूर येथें होते. या तीन वंशांत कोल्हापूरचा वंश विशेष भरभराटींत होता. यादववंशीय सिंधणराजानें पन्हाळ्याचें म्हणजे कोल्हापूरचें राज्य जिंकून आपल्या राज्यास जोडलें व महादेवानें ठाण्याचें शिलाहर राजघराणें बुडविलें. 'श्रीमहालक्ष्मीलब्धवरप्रसाद' अशी पदवी कोल्हापूरचे शिलाहर आपल्या नांवास लावीत. ते पौराणिक व वैदिक धर्म पाळीत. जैनांसहि त्यांचा आश्रय होता.

शिलाहरांच्या सत्तेचा शेवट यादवांनीं केला. तथापि शिलाहर व यादव हीं दोन्ही राजघराणीं हिंदु असून हिंदूंची वैदिक परंपरा चालविणारीं होतीं. पण यादवांचेंहि घराणें अल्लाउद्दिन खिलजीचा सरदार मलिककाफर यानें इ.स. १३१२त बुडविल्यावर मुसल्मानांचा अंमल महाराष्ट्रांत बसला. तो १६७४ पर्यंत म्हणजे ३६२ वर्षेपर्यंत कमी-अधिक प्रमाणांत चालू राहिला. त्या सालीं शिवाजी महाराजांनीं रायगडावर आपणांस राज्याभिषेक करून घेतला. ती मुसलमानी सत्तेची महाराष्ट्रांतील खरी अखेर समजली पाहिजे.

महाराष्ट्रीयास ज्याचा अभिमान वाटेल असें मुसलमानांचें राज्य खात्रीनें नव्हे. उलट त्यांना सदर राज्याची खंतीच वाटली पाहिजे. अशा स्थितींत त्यांना अभिमानपूर्वक पहावयाचे तर देवगिरीच्या यादवाकडे व नंतर शिवाजी महाराजांनीं स्थापलेल्या मराठी राज्याकडेच पाहिलें पाहिजे. परंतु यादव राजघराण्याची माहिती अगदींच त्रोटक म्हणून महाराष्ट्रीयांना आपली ऐतिहासिक जिज्ञासा तृप्त करून घ्यावयाची झाल्यास मराठ्यांच्या अर्वाचीन इतिहासाकडेच धांव घ्यावी लागते. याहि इतिहासापैकीं शिवाजी महाराजांचा इतिहास कमी ज्ञात आहे. पहाटेच्या प्रकाशांत भूप्रदेशाची जितकी ओळख पटते, तितकीच शिवकालाची ओळख उपलब्ध साधनांवरून आज पटत आहे. पहाटेनंतर सकाळ व सकाळानंतर मध्यान्हकाळ या दैनिक क्रमास अनुसरूनच मराठ्यांच्या इतिहासाची माहिती शिवाजीनंतर अधिकाधिक मिळत गेली असून शाहू महाराजां-

पासून रावबाजीपर्यंतचा शंभरांहून अधिक वर्षांचा काळ अनेक इतिहाससंशोधकांनीं डोळ्यासमोर उभा केला आहे. त्यांनीं उजेडांत आणिलेल्या कागदपत्रांच्या राशींवरून मराठ्यांचा राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, वाङ्मयिक इतिहास लिहिण्याचा समय आतां निःसंशय प्राप्त झाला आहे. प्रस्तुत ग्रंथांत राजकीय इतिहास गाळून बाकीचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. हा काळ मुख्यतः पेशवाईचा आहे व त्याची माहिती अशा धोरणानें दिली आहे कीं, ती वाचली असतां त्या काळाचा महाराष्ट्र प्रत्येक मराठ्याला दिसूं लागावा.

प्रकरण दुसरें.

संस्कृतीचा प्रारंभ.

शिवाजीमहाराजांचा जन्म सन १६३० सालीं शिवनेर किल्ल्यावर झाला. त्यांनीं वयाच्या सतराव्या वर्षापासून मुसलमानी सत्तेबरोबर झुंज सुरू करून सन १६७४ त स्वतःस रायगडावर राज्याभिषेक करविला. त्यानंतर अवघ्या सहाच वर्षांनीं त्यांची इहलोकची यात्रा संपली. शिवाजीच्या पश्चात् संभाजी गादीवर बसला असतां औरंगजेब बादशहानें मराठ्यांचें राज्य बुडविण्यास ही नामी संधि आल्याचें समजून सन १६८३ त दक्षिणेवर स्वारी केली व मराठी सत्ता रसातळास नेण्याच्या इराद्यानें तो महाराष्ट्रांत तळ देऊन बसला. औरंगजेबाचें सैन्य मोठें, सामर्थ्य अफाट व निर्धार दांडगा. त्या मानानें मराठ्यांचें बळ अगदींच तोटकें व त्यांचा राजा दुर्व्यसनी. तथापि मराठ्यांची चिकाटी विलक्षण असल्यामुळें त्यांनीं औरंगजेबास महाराष्ट्रांत आपली सत्ता पक्की रोवणें अशक्य करून सोडलें. पण औरंगजेबाशीं झुंजतांना मराठ्यांची व त्यांच्या देशाची हानि थोडी झाली नाहीं. औरंगजेब सन १७०७ त अहमदनगरास मरण पावला, त्यावेळीं महाराष्ट्रांत येऊन त्यास चोवीस वर्षें झालीं होतीं. हीं चोवीस वर्षें महाराष्ट्रानें अत्यंत क्लेशांत काढलीं. सारांश, शिवाजीच्या स्वराज्यप्राप्तीचें महाराष्ट्रास जें थोडें सुख लाभलें होतें तें नष्ट होऊन संस्कृतिदृष्ट्याहि महाराष्ट्राची प्रगति खुंटली. म्हणून छत्रपति शाहूमहाराज मोगलांच्या अटकेंतून सुटून साताऱ्यास गादीवर बसले त्याच वेळीं महाराष्ट्राच्या अर्वाचीन सांस्कृतिक जीवनास प्रारंभ झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. याचा अर्थ असा कीं, महाराष्ट्रीयांच्या शरीरावर व मनावर मुसलमानी संस्कृतीचे पोपडे चढले होते ते खरडून काढून महाराष्ट्रीयांस खऱ्या महाराष्ट्रीय मनाची व आर्यांच्या संस्कृतीची ओळख पटविण्याचें काम महाराष्ट्रीय राज्यकर्त्यांना हातीं घ्यावयास सन १७०८ साल उजाडावें लागलें.

शिवाजीस राज्याभिषेक होण्यापूर्वी महाराष्ट्रावर मुसलमानांचा अंमल ३६२ वर्षें गाजत होता. तितक्या वर्षांत शिवाजीच्या मृत्यूनंतरचीं २८ वर्षें घातल्यास

३९० वर्षे भरतात. म्हणजे जवळ जवळ चारशें वर्षांपर्यंत महाराष्ट्र मुसलमानी संस्कृतीच्या टापेखालीं सांपडला असल्याचे दिसून येतें. त्या काळांत लाखों महाराष्ट्रीयांनीं मुसलमानी धर्माची दीक्षा घेतली आणि हजारों तुर्क, पठाण, आरब महाराष्ट्रांत बायकामुलांसुद्धां कायमचे रहावयास आले. मुसलमान सुलतानांनीं हिंदु स्त्रियांशीं लग्नें लावलीं. विजापूरचा पहिला बादशहा युसूफ आदिलशहा याची बायको मुकुंदराव नामक ब्राह्मणाची बहीण होती. अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक अहमद निजामशहा हा वऱ्हाडांतील तिमाप्पा बहिरव नामक कुळकर्ण्याचा मुलगा होता. वऱ्हाडच्या इमादशाहीचा संस्थापकहि मुसलमानी धर्म स्वीकारलेला हिंदुच होता. हिंदु स्त्रीपुरुष बाटून मुसलमान झाल्यावर व राजाराणी म्हणून दिमाखाने मिरवूं लागल्यावरहि त्यांचा मूळच्या हिंदु घराण्याशीं जिव्हाळ्याचा संबंध कायम राहिल्यामुळें मुसलमानी आचार व मुसलमानी विचार हिंदुसमाजांत तरंगत तरंगत भिसळले आणि हिंदूंतील मातबर लोकांनीं मुसलमान बादशहांच्या पदरीं हुद्दयाचीं कामें पत्करल्यामुळें तर मुसलमानी आचार, मुसलमानी विचार म्हणजेच इस्लामी संस्कृति महाराष्ट्रीयांच्या गांवागांवातून व घराघरांतून घुमली.

अनेक महाराष्ट्रीय मुसलमानांच्या चाकरीस राहिले. त्यांतील कांहीं उदाहरणें पुढीलप्रमाणें देता येतील. कंबरसेन नांवाचा ब्राह्मण मुत्सद्दी इ. स. १५०८ ते १५५३ पर्यंत निजामशाहींत मुख्य प्रधान होता. त्यानें मराठ्यांना मोठ्या योग्यतेस चढविलें. मुरार जगदेव हा ब्राह्मण मुत्सद्दी आदिलशाहींत २५ वर्षे मुख्य प्रधानकीचें काम पहात होता. शहाजीचा शिरकाव विजापूर दरबारांत होण्यास मुरारपंतच कारण झाला. गोवळकोंडा येथील कुतुबशाहींत मुरारराव, मदनपंत, जगदेवराव, रायराव, कदमराव इत्यादि मोठमोठे महाराष्ट्रीय सरदार असून त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें कुतुबशाही अमलास बळकटी आणिली. मुसलमान राज्यकर्त्यांचें साहचर्य महाराष्ट्रीय सरदार, दरकदार, वतनदार, स्वार, प्यादे यांच्या कपाळी अव्याहत साडेतीनशें वर्षेपर्यंत आल्याचा साहजिकच परिणाम असा झाला कीं, मुसलमानी धर्म, मुसलमानी संस्कृति हीं महाराष्ट्रीयांना स्वतःचींच वाटूं लागलीं.

मुसलमानांनीं आपले दर्गे व मशिदी गांवोगांवीं बांधल्या आणि राजसत्ता पाठीशीं घेऊन मुसलमान अवलिये व मुसलमान फकीर यांनीं खेड्यापाड्यांतून

वास्तव्य करून महंमद पैगंबर, त्याची मुलगी फातिमा आणि तिचे पुत्र हसन व हुसेन यांची प्रत्येक महाराष्ट्रीय स्त्री-पुरुषाला व मुलामुलीला ओळख पटविल्यामुळें महाराष्ट्रीय स्त्री-पुरुष व मुलेंमुली यांना त्यांच्या ताबुतांत फकिरी घेण्यास, फात्या फोडण्यास व हायधोस घालण्यास कमीपणा वाटेनासा झाला. अशा स्थितींत हिंदूंनीं आपल्या मुलांमुलींना मुसलमानी नांवें ठेवावीं यांत नवल कसलें? शहाजी, सरीफजी, फिरंगोजी, बाजी, सुलतानजी हीं नांवें मुसलमानी होत. ‘ मालोजी बिन खानाजी पिसाळ ’ हें नांव त्याच मासल्याचें. बिन, वल्लद हे प्रयोग मुसलमानीच. जसें–‘ लक्ष्मण सोनार वल्लद विसाजी सोनार ईबन रामजी सोनार. ’ गांवांची नांवेंहि मुसलमानीच. गुलशनाबाद म्हणजे नाशिक, नसिराबाद म्हणजे धारवाड. अजूनहि खानापूर, रहिमतपूर, इस्लामपूर, अहमदनगर हीं नांवें मुसलमानीच आहेत. सन मुसलमानी व मराठी भाषेंतलि शब्दहि मुसलमानीच. महाराष्ट्र इतका अविंधाक्रांत झाला कीं, सामान्य हिंदूंच्याच काय पण ब्राह्मणांच्याहि घरांत दत्तात्रेयाच्या पादुकांपाशीं पिराची स्थापना होऊन पिरापुढें आरत्या-धूपारत्या करण्यांत अखिल हिंदु लोक पारमार्थिक कल्याण मानूं लागले. मुसलमानी अमलाचा ३६२ वर्षांचा किंबहुना ४०० वर्षांचा काळ हा लहान काळ नव्हे. इंग्रजांची सत्ता महाराष्ट्रावर स्थापन होऊन अद्यापि सव्वाशें वर्षेंहि झालीं नाहींत, तोंच महाराष्ट्रांतील अशिक्षित नसला तरी सुशिक्षित वर्ग पूर्णपणें पाश्चात्य बनण्याच्या पंथास लागला आहे. त्याची शेंडी तर केव्हांच उडाली, मिशांना काट मिळाला, पागोटें मातींत लोळलें, डोकें उघडें पडलें, धोतरें सुटलीं, स्नानसंध्या लोपली, देवधर्म बुडाला, भजनपूजनाचें पूज्य झालें, इंग्रजी शब्द तोंडांत दाताप्रमाणें कायमचे बसले, इंग्रजी आहारविहारांची सवय जडली, पोथीपुस्तक रद्दींत गेलें व हिंदुत्वाचा अभिमान इतर सर्व अभिमानाप्रमाणें फक्त वाणींत काय तो उरला. अवघ्या सव्वाशें वर्षांत महाराष्ट्राची जर ही फजीती तर मुसलमानांच्या तावडींत ३६२ वर्षे सांपडलेला महाराष्ट्र स्वत्वास किती विसरला असेल याची कल्पनाच केलेली बरी !

छत्रपति शाहूमहाराज साताऱ्याच्या गादीवर सन १७०८ सालीं बसले, तेव्हां महाराष्ट्र अशा कष्टमय स्थितींत होता. त्यांतून त्याला बाहेर काढून सन्माननीय पदावर चढविण्याचें काम अत्यंत बिकट होतें. सिंधूनदाच्या वाळूखालीं दडपलेलें मोहेन-जो-डारोसारखें शहर उकरून उजेडात आणण्यापेक्षां सहस्र पटींनीं हा

उद्योग प्रचंड होता. घरें नवीं, वाडे नवे, देवळें नवीं, मूर्ति नव्या, अलंकार नवे, बागबगीचे नवे, सर्व कांहीं नवें उभारावयाचें होतें. धर्माचें पुनरुज्जीवन करून शास्त्री, पंडित, वैदिक, हरिदास, पुराणिक यांची नवी पिढी जन्मास आणावयाची होती. हिंदु धर्माचा डंका वाजवून व झेंडा फडकवून मुसलमानी धर्मास पिटून लावावयाचें होतें. सारांश, मुसलमानी धर्माचीं पाळेंमुळें खणून काढून व मुसलमानी संस्कृतीचें उच्चाटन करून सर्वत्र हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांची प्रभा फाकावयाची होती. या भगीरथप्रयत्नाची सुरुवात शाहूच्या कारकीर्दीत होऊन पेशवाईअखेर तो प्रयत्न कसा शेवटास गेला, हें या ग्रंथांत दाखवावयाचें आहे.

शाहूमहाराज गादीवर बसले तेव्हां प्रेक्षणीय असें महाराष्ट्रांत निसर्गाशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. मोंगलांच्या दरबारीं आयुष्याचीं अठरा वर्षें तऱ्हेतऱ्हेचें वैभव पहाण्यांत व सुखोपभोग घेण्यांत घालविल्यावर त्या डोंगरांत वसलेल्या साताऱ्यांत आल्यानंतर शाहूस क्षणोक्षणीं चुकल्यासारखें व निर्जन वनांत पडल्यासारखें वाटणें स्वाभाविक होतें. अशा स्थितींत राज्याची धुरा धारण करण्यास पेशवे समर्थ असल्याचें दिसून आल्यावर शाहूमहाराजांनीं राज्यकारभार त्यांच्या अंगावर टाकला व आपला फुरसतीचा वेळ आपली राजधानी, आपला राजवाडा, आपले बागबगीचे, शिकारखाना व दरबार हीं बादशाही थाटावर शृंगारण्याकडे लावला. त्यांच्या मनश्चक्षूंपुढें मोंगली ऐश्वर्याचें चित्र होतें. तसें चित्र शक्य तितकें आपल्या चर्मचक्षूंपुढें उभें करण्याचें त्यांनीं योजिलें. याला आवश्यक असें साहित्य महाराष्ट्रांत कोठें मिळावयाचें तर तें एकट्या औरंगाबादेस. त्याकाळीं मोंगलांची दक्षिणेंतील राजधानी औरंगाबाद ही होती. ती औरंगजेब दक्षिणेचा सुभा असतां त्यानें वसविली असून त्याच्या पश्चात्‌हि सर्व मुसलमान सुभेदार तेथेंच रहात आले. त्यामुळ दिल्ली–आग्र्यास जें कांहीं कमीजास्ती घडे त्याचें प्रतिबिंब औरंगाबादेस पहावयास सांपडे. शाहूमहाराजांस हें माहीत असल्यानें त्यांना हवी ती हुन्नर ते प्रथम औरंगाबादेहून मागवीत आणि तेथें नच मिळाली तर काश्मीर, पंजाब, इराक या प्रदेशांतून आणवीत. सारांश, महाराष्ट्राच्या सुधारणेची मुहूर्तमेढ प्रथम शाहूमहाराजांनीं रोवली व त्यांच्या पश्चात् पेशवे, व इतर सरदार यांनीं ती सुधारणा उत्कर्षास नेली आणि नाना फडणविसाच्या सहाय्यानें सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत तिचा कळस झाला.

मनुष्य हा जात्याच सौंदर्यप्रिय आहे. त्याचा मानसिक व बौदिक विकास ज्या प्रमाणांत होतो त्या प्रमाणांत त्याचें सौंदर्यविषयक प्रेम वाढत जातें. शिक्षण हें एक मनुष्याच्या मानसिक व बौद्धिक विकासाचें मुख्य साधन आहे. पेशवे स्वतः त्या काळाच्या मानानें बरेच सुशिक्षित होते असें मानण्यास हरकत नाहीं. छत्रपति शाहूमहाराज सुशिक्षित नसले तरी मोगलांच्या दरबारीं त्यांचें पूर्व आयुष्य गेलेलें व सातान्यास आल्यावर त्यांनीं बेचाळीस वर्षें राज्यपद भोगलेलें, या कारणानें त्यांचा विविध प्रकारच्या गुणिजनांशीं संबंध येऊन आणि अनेक सुंदर, भव्य व रमणीय वस्तूंचें दर्शन त्यांस घडून त्यांची रसिकता व गुणग्राहकता पुष्कळच उमलली होती. छत्रपति व पेशवे यांच्या मानानें सरदारांचा या बाबतींतील दर्जा हलका, पण नाना फडणवीस आदिकरून कित्येक मुत्सद्दी पेशव्यांतल्या प्रमुख पुरुषांच्या बरोबरच लहानाचे मोठे झाले, शिकले व प्रौढपणीं त्यांच्या दरबारचा कारभार स्वतः पेशव्याप्रमाणें हुकमतीनें पाहूं लागले; यामुळें त्यांचाहि मानसिक व बौद्धिक विकास उत्तम प्रकारें झाला. अशा या अनेक पुरुषांनीं महाराष्ट्रास बहुविध अंगांनीं सजविण्याचें श्रेय संपादिलें.

प्रकरण तिसरें.

नगररचना.

मोठीं शहरें व टुमदार गांवें वसविणें हें देश-सुधारणेचें पहिलें काम. पेशव्यांच्या पसंतीचें शहर पुणें. हें शहर मैदानावर असून त्याला डोंगरांचा व किल्ल्यांचाहि आश्रय आहे. शिवाजी महाराजांच्या वेळीं मराठ्यांची राजधानी किल्ल्यावर होती. शाहूमहाराज साताऱ्यास आले, तेव्हांहि साताऱ्याच्या किल्ल्यांतच ताराबाई रहात होती. सातारा शहर वसवून त्यांत किल्ला सोडून येऊन रहाण्याची सुरुवात शाहूमहाराजांनीं केली. पण कांहीं म्हटलें तरी सातारा शहर तिन्ही बाजूंनीं डोंगरांतच कोंडलेलें. त्याचें महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांशीं दळणवळण वाढण्यास नैसर्गिक अडचणी फार. त्यापेक्षां पुणें शहर अधिक सोयीचें व नाक्यावरचें. मुसलमानांच्या अमदानींतहि पुण्याला याच दृष्टीनें महत्त्व असल्यामुळें मुसलमान सुभेदारांनीं तेंच पसंत केलें होतें. हा पूर्वेतिहास व परिस्थिति लक्षांत घेऊन बाजीराव पुण्यांत रहावयास आला. त्यापूर्वी पेशव्यांची कायमची वस्ती सासवडास होती. ती त्यानें सन १७२१ त मोडली. म्हणजे बाळाजी विश्वनाथ सासवडास मरून पेशवाईचीं वस्त्रें बाजीरावास मिळतांच त्यानें आपली वस्ती पुण्यास हालविली.

पुण्यास बाजीरावाचा खासगत वाडा नसल्यामुळें तो धडफळे यांचे वाड्यांत बिऱ्हाड करून होता. त्यावेळीं पुण्यास शहराचा मोठेपणा आला नसून तो एक कसब्याचा गांव होता. रा. कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांनीं पुरंदरेदप्तराच्या तिसऱ्या भागांत शिवापूरकर देशपांडे यांच्या वहीची नकल प्रसिद्ध केली आहे. तिच्यांत पुण्याचा पूर्वेतिहास सांपडतो. तो ऐकीव असला तरी त्यांतील माहिती जमेस धरून चालण्यांत फारसा धोका नाहीं. मुसलमानांचा अंमल दक्षिणेंत बसला तेव्हां पुणें, कुंमारी व कासारी अशी तीन खेडी जवळजवळ होती. ती तीन खेडी मिळून पुणें हा एक गांव झाला. पुणें धर्मदृष्ट्या भ्रष्टविण्याचा मुसलमानांनीं बराच मोठा प्रयत्न केला. पुण्याचें मुख्य दैवत पुणेश्वर महादेव. तो देव फेकून देऊन तेथें मुसलमानांनीं शेखसल्ला हा दर्गा बांधला. हा दर्गा मुठानदीच्या काठीं

आहे. पुणेश्वर व त्याच्या जागीं बांधलेला दर्गा पुण्याच्या बाहेर असावा. ही पुण्याची पश्चिमबाजू. पूर्वेस गारपीर बांधण्यांत आला. तोहि पुण्याच्या बाहेर कांहीं अंतरावर असेल. आजहि तो पुणें शहरच्या बाहेरच आहे. मुसलमानांचा दर्गा पुण्याजवळ झाला त्यावेळीं पुण्यांत कोट होता. या कोटाभोवतीं देशमुख, देशपांडे, व्यापारी, उदमी आणि ऋग्वेदी ब्राह्मण व धर्माधिकारी यांचीं घरें होतीं. त्यांखेरीज तीनहि खेडयांचे पाटील, भाराइत आडनांवाचे कुळकर्णी, कंगले, ऐरले, व भोवंडर या आडनांवांचे सुतार, खडके, आढव व मगर या आडनांवांचे न्हावी, गोळक शेटे, महाजन व्यवहारे व महार हेहि घरें करून राहिले होते. यावरून कोट हा गढीभोंवताली असावा व गढीबाहेरची ही गांवची मुख्य वस्ती असावी असे संभवते.

देशमुख व देशपांडे यांचे घरांचे दरम्यान भेंडयाचे आवारांत जुना गणपति होता. त्याचें देवालय शिवाजी महाराजांची मातुःश्री जिजाबाई हिनें बांधलें. तोच सध्याचा कसब्याचा गणपति. पुण्यावर मध्यंतरीं कांहीं दिवस निजामशाहीचा अंमल झाला. त्याच्यामागून औरंगजेब व नंतर शिवाजीमहाराज त्याचे मालक बनले. या हकीकतीवरून जुन्या पुण्याची हद्द कसब्याच्या गणपतीपर्यंत होती असें समजून चालण्यास हरकत नाहीं. कसबागणपतीची हद्द संपली कीं, पश्चिमेस शनिवारवाडा लागतो हें लक्षांत ठेवल्यास नवें पुणें पश्चिमेस शनिवारवाडयापासूनच सुरूं होतें. कसबा-गणपतीच्या पश्चिमेस मावळ वेस होती. ती अर्थातच पुण्यांत वस्तीच्या भोंवतालच्या तटाचीच असली पाहिजे. बाजीरावानें सन १७२९ त या मावळवेशीपाशींच आपल्या नव्या वाडयाचें काम आरंभलें.

पुणें, कुमारी व कासारी या तीन खेडयांचें पुणें हें एक मोठें गांव मुसलमानांच्या अमदानींत बनलेंच होतें. पण त्याशिवाय पुण्याच्या आसपास इतरहि लहान-लहान खेडीं असून त्यांची भर नव्या पेठांत घालून पुण्यास पेशव्यांनीं शहराचें स्वरूप आणिलें. आदितवार पेठेचें मूळ नांव मलकापूर. तिची वसाहत इ. स. १७४०-४१ मध्यें झाली. त्यावेळीं तिचें कुळकर्ण सालीना ६० रु. करार करून नारो मल्हार व मोरो नरहर मेंडजोगी यांस देण्यांत आलें. पुण्यास पूर्वीचे देश-मुख देशपांडे व महाजन हे जुने वतनदार शहराची काळजी वहाण्यास होतेच. त्यांच्या मदतीस वरील नवीन अधिकारी देण्यांत आले. बुधवार पेठेच्या वसाहतीची व्यवस्था रामाजी नाईक व बाळाजी नाईक भिडे पोतदार यांजकडे सोपविण्यांत

आली. हे दोघे सावकार असून त्यांस नवीन कामगिरीकरितां ‘ मोहतर्फा, ठाण, घरपट्टी, थलमोड, थल भरीत, फुरोई हे हक्क, तसेंच कलाल, गोली, बेलदार, लोणारी, चुनेवाले, छपरबंद, लाकडवाले, लोहार यांजपासून घ्यावयाच्या कराचा मक्ता करण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याचा मोबदला म्हणून सरकारांत त्यांनीं दरसाल अडीच हजार रुपये भरावे असें ठरलें. ’ ‘ आदितवार व बुधवार पेठांतील बेलदार कुंभार, दगडवाले, गवंडी, लोणारी इत्यादिकांवर दर चुलीस (सालीना) ३ रु. प्रमाणें पट्टी बसविण्यांत आली. हल्लींप्रमाणें ह्या काळांत स्थानिक स्वराज्यसंस्था नव्हत्या व पब्लिक वर्क्ससारखें सरकारी खातेंहि नव्हतें. या कारणानें सरकार आपल्या मागचा व्याप कमी करण्यासाठीं केव्हांकेव्हां वरील मक्त्याची पद्धति अवलंबीत असे.

‘ पेशव्यांची शेरी पुण्यांत होती. तिच्यांत पडीक जमीन होती. तेथें वसाहत करण्यास बाजीराव पेशव्यानें आज्ञा केली. तिला १७४८–४९ मध्यें शुक्रवार पेठ हें नांव ठेवलें. हरशेट व सोमशेट वीरकर यांनीं वाणी, बकाल, व उदमी वेवसाई यांस तेथें रहावयास आणिलें. या शेट्यांनीं वाण्यापासून ८ रोजीं एक सुपारी, तेल्यापासून ८ रोजीं तेल नऊ टाक, दर गोणीस किराणा वजन पक्के पावशेर, कोष्टी, साळी या सर्वांपासून सालीना पासोडी एक, साऱ्या चांभारांपासून सालीना पायपोसजोड दोन याप्रमाणें घ्यावे व सरकारांत या वतनाबद्दल शेरणी १००१ रु. भरावी. ’ रोकडीनें घरपट्टी, पाणीपट्टी, भंगपिट्टी असले कर वसूल करण्यापेक्षां ज्यांच्यापाशीं असेल तो माल घेणेंच सोयीस्कर. तो कर भरण्याचें घरमालकांस तितकें जड वाटत नसे. वाण्या–उदम्यास आणण्याचें व त्यांची व्यवस्था लावण्याचें काम त्यांजपैकींच व्यापाऱ्यास सांगितल्यानें ते त्यांस सहज रीतीनें साधावें व व्यापाऱ्यांच्या तक्रारी सरकारापर्यंत सहसा जाऊं नयेत. वरील अनेक व्यवसायी लोकांची यादी दिली आहे ती वाचली असतां पुण्यांत शहराच्या वाढीस सहाय्यक होणारांचाच भरणा केवढा मोठा होता हें लक्षांत येतें. बेलदार, चुनेवाले, लोणारी, छपरबंद, लोहार यांजकडून शेकडों घरें बांधण्याचा प्रचंड उद्योग त्यावेळीं सुरू असला पाहिजे. म्हणूनच ऐशीं वर्षांच्या अल्पावधींत पुणें शहराचा फार मोठा विस्तार होऊं शकला.

‘ गुरुवार पेठ सन १७५०–५१ मध्यें वसविली. ती करण्याबद्दल गंगाराम व दयाराम वल्लद मोहनदास खेत्री यांस शेटेपणाचें वतन दिलें. ’ जिला सदा-

शिव पेठ म्हणतात, तें पूर्वी एक खेडें होतें. त्याचें नांव मौजे नायगांव. नायगांवाचें कागदपत्री वर्णन असें—' मौजे नायगांव तर्फ सांडस प्रांत पुणें. ' सदाशिवपेठेंत वसाहत केलेल्यांना सात वर्षेपर्यंत जकातीची माफी देण्यांत आली. ही माफी कापड, हत्ती, घोडे, उंट, गुरें, जवाहिर इत्यादिकांवर मिळाली. त्यामुळें सरदार, सावकार व व्यापारी यांना सदर पेठेंत घरें व वाडे बांधून राहण्याची इच्छा सहजच झाली. शेटे वसाहतीची जोखीम शिरावर घेत. त्यांत त्यांची कामगिरी व योग्यता दिसून आल्यावर त्यांचा सरकारांतून गौरव व्हावा. वीरकर शेटजींचा याबद्दल अबदागिरी व दिवटी देऊन पेशव्यांनीं गौरव केला. गरीब व मध्यम स्थितींतील लोकांना नव्या पेठेंत नवीं घरें बांधण्याची ऐपत नसल्यास त्यांस तगाई देत. कारागिरांची वसाहत हें शहराची प्रसिद्धि सर्वत्र होण्याचें, त्याची प्रतिष्ठा व संपत्ति वाढण्याचें आणि तें भरभराटीस येण्याचे मुख्य साधन. सदाशिवपेठेची वसाहत झाल्यानंतर नानासाहेब पेशव्यानें आपला मुलगा नारायणराव याच्या नांवानें नारायण पेठ वसविली. सरदार रास्ते व नाना फडणीस यानीहि पुणें शहराच्या वाढीस बराच हातभार लावला. रास्त्यांनीं सन १७७८ त आपला वाडा बांधून रास्ता पेठेची मांडणी केली. सन १७८९ त (शक १७११) नानांनीं गणेश पेठ स्थापिली व तिच्यांत आडते लोकांना बसण्याकरितां चावडी व धर्मशाळा बांधली.

पुण्याचें नांव जरतार व कलाबतू या कामीं आजहि कायम आहे. त्याचा उपक्रम सन १७६६ सालीं झाला. त्यावर्षी ' तारकसी व कलाबतुकार चोबीचे वगैरे कारीगार दुसऱ्या शहराहून आणून कसबे पुणें येथें त्यांस ठेवून घ्यावयाचें ठरलें ' ' कारीगारास पुण्यांत आणल्यावर जागा पाहून त्यांस नेमून देणें. त्यांस चार वर्षे सावकारांचा तगादा न लागे असें करणें. तारकसी कलाबूतचा कारखाना घातल्यास सरकार उपयोगी जाणून कारीगारांचे नांवें पांचा सालांचा कौल सादर केला आहे. पेठकऱ्यांनीं त्यांस पट्टीचा उपसर्ग लावूं नये. कौल भरल्यावर पट्टीजीवनमाफक घेतली जाईल. कारीगार ताफे पुढीलप्रमाणें–गुसलीवाले पावटेकरी सोनार, वोढणार गुंसलीचे, चपडे, वळणार कलाबतूचे, किनारी गोट करणार, किनखाप व मसरू यानें विणणार, तारकस कलाबतूसंबंधीं उदमी वगैरे एकूण दहा ताफे आणावे अशी केसो कृष्ण, व आबाजी गणेश यांस आज्ञा' करण्यांत आली. आपली राजधानी व प्रजा यांविषयीं इतका जिव्हाळा राज्य-

कर्त्याला असावा तेव्हां राजधानी रंगरूपाला येते व कलाकौशल्याची अभिवृद्धि होते.

हल्लींप्रमाणें त्या काळींहि शहरें सधन असल्यामुळें शत्रूंना लुटून संपत्ति मिळविण्यास तें मोठें साधनच असे. दिल्ली, लाहोर, मथुरा, या उत्तर हिंदुस्थानांतील शहरांवर लुटालुटीची व जाळपोळीची आपत्ति किती तरी वेळां गुदरली आहे. पुण्यावरहि ती कोसळल्यावांचून राहिली नाहीं. सन १७६२–६३ सालीं थोरला माधवराव पेशवाईचा कारभार नुकताच पाहूं लागला होता. त्याला राज्य चालविण्याचा अनुभव नव्हता. अशा स्थितींत मोगलाच्या मुलुखांत स्वारी करून मुलूख लुटण्याची दुर्बुद्धि राघोबास सुचली. त्याप्रमाणें सैन्यानिशीं राघोबा व माधवराव मोगलाईत लुटीत व जाळीत फिरत असतां मोगलाची स्वारी पुणें प्रांतावर झाली. त्यांत पुणें शहर जळालें व गांवें उध्वस्त झालीं. हें संकट निघून गेल्यावर त्याची आबादानी करणें पेशव्यांचें कर्तव्य होऊन बसलें. तेव्हां शहरांतील पळून गेलेले व्यापारी व उदमी यांनीं परत रहावयास येऊन अमदानी व्हावी यासाठीं पुढील आज्ञा झाली ‘ कोंकणांतून तांदूळ, मीठ वगैरे घेईल त्यास जकातीचा तगादा न करणें, गावगन्नाचे कुणबी लुटले नागवले. यामुळें दाणे मीठ नेतील त्यास जकातीचा तगादा न लावणें, भुसारास जकात घेण्याचा पहिल्यापासून शिरस्ताच नाहीं. गुरेंढोरें दंग्यांत लुटलीं गेलीं. सबब पुण्यांत अगर हर एक गांवीं कुणबी, बैल टोणगे विकत घेतील त्यांस शिंगोटी मागूं नये. वाणी–उदमी देशांतून तूप, तेल, गूळ, हळद असा जिन्नस घेऊन येतात. त्यांस सांप्रत या जिनसांची अमदानी झाली पाहिजे. म्हणून सदर जिनसास दसऱ्यापर्यंत जकात निमे घेत जाणे व निमे माफ करीत जाणे ’ (पे. रो.) जकातीच्या बाबतींत येणेप्रमाणें सवलती देऊन लोकांचें पुण्याकडे व्यापारी वळण पाडण्याचा प्रयत्न मुद्दाम करण्यांत आला. तसेंच घरेंहि बांधण्यास कारागिराना व कसबी लोकांना पेशव्यांनीं उत्तेजन दिलें. ‘ तानाजी सोमनाथ उपनाम टंकसाळे गोत्र काश्यप जोशी कुळकर्णी मौजे अंजनगाव परगणे परंडे यांनीं विनंति केल्यावरून त्यांस घर बांधून रहाण्यास कसबे पुणें येथें जेजुरी–मलकापूरचें (रविवार पेठेत) रस्त्यावर जागा फुकट दिली. शके १६८५ मध्यें यवनाचे दंग्यांत घर दग्ध झालें होतें ती जागा दिली. ’ (पे. रो.) ‘ सदाशिव शेट कासार तोफेचा कारागिर पुण्यांत तोफखान्याच्या पश्चिमेस शुक्रवार

पेठेंत घर बांधून राहिला आहे. त्यास घराचा सारा माफ केला आहे ' (पे. रो.). थोरला माधवराव नेहमीं स्वारीमुळें बाहेर, राघोबा आनंदवल्लीस, गोपिकाबाई गंगापुरास, मिळून पुण्यास पेशवे घराण्यांपैकीं प्रमुख कोणीच नाहीं. या कारणानें मोगलाच्या स्वारींत पुणें जळाल्यावर व लुटलें गेल्यावर त्याचा जम कांहीं केल्या नीट बसेना. म्हणून नाना फडणविसानें गोपिकाबाईस पत्र लिहून निदान नारायणरावास तरी पुण्यास ठेवण्याची विनंति केली. तें पत्र जसेंच्या तसेंच देणें बरें ' यामुळें (पुण्याचें दहन व पुरंदरचा दंगा) पुण्याची वस्ती यथास्थित न झाली, फुटकी वस्ती आहे. लोक दहशत खाऊन तजावजा आहेत. हल्लीं नारायणराव आले म्हणून लोकांस भरंवसा येऊन पूर्वीप्रमाणें वस्ती होत चालली. याकरितां नारायणराव यांस आपण गंगापुरास न नेणें. आपणच येथें यावें व रावसाहेबाचींहि (माधवरावाचीं) पत्रें आलीं म्हणून (मी) सेवेसी (तुम्हास) लिहून पाठविलें होतें. त्यास उत्तर आलें कीं, पुण्यास येत नाहीं. त्यास ऐसें आपण लिहिल्यास सेवक लोकांचें काय चालतें ? परंतु आपण येथें आल्यानें लोकांस धीर पुरोन गावची भरवस्ती होईल.' (ता. ५-३-१७६५ सरदेसायांची रियासत] पुण्याच्या भरभराटीकरितां गोपिकाबाईनें पुण्यास रहाणेच इष्ट आहे ही गोष्ट माधवरावासहि पटून त्याच्या आज्ञेवरून नानानें बाईस लिहिलें होतें; पण तिनें तें मानलें नाहीं.

कसबे सुखडें या गांवाच्या आणि नाशिक व धारवाड या शहरांच्या वाढीसाठीं पेशव्यांनीं अशाच सवलती दिल्या. थळमोड व थळभरीत यांची माफी वरील शहरांत वस्तीस येणारास तीन ते पांच वर्षे व घरपट्टीहि तितक्याच मुदतीची माफ करण्यांत आली. त्यानंतर थळमोड व थळभरीत व घरपट्टी यांची उगारणी शेटे महाजन प्रभृतींस करण्याचा हक्क मिळाला. धारवाड शहर पुण्यापासून फार दूर. तेथील व आसपासच्या व्यवहारास लागणारें नाणें धारवाडासच पाडणें श्रेयस्कर, या विचारानें धारवाड येथें होन व रुपये यांची टांकसाळ घालण्यास सन १७५३-५४ सालीं विरतशेट यांस पेशव्यांनीं आज्ञा केली. टांकसाळीनें धारवाडच्या उद्योगधंद्यांत चांगली भर पडली. याच कामगिरीबद्दल विरत शेट यांस अबदागिर व दिवटी देऊन पेशव्यांनीं बहुमान केला. औरंगाबाद शहर पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर त्या शहरीं पेशव्यांनीं किल्ले आमदानगर व किल्ले देवगिरी या नव्या पेठा वसविल्या. दौलताबादेचें जुनें व हिंदूंस अभिमानास्पद नांव देव-

गिरी पेशव्यांना माहीत होतें म्हणावयाचें. तसें असेल तर महाराष्ट्राचा जुना इतिहास त्यांना ऐकून माहीत होता असें अनुमान सहजच निघतें.

आनंदीबाई ही राघोबादादाची लाडकी पत्नी होती. नाशिकापासून दोन कोसांवर गोदावरीच्या कांठी चावडस हा लहानसा गांव होता. त्या गांवास दादासाहेबांनीं आनंदीबाईवरून आनंदवल्ली असें नवें नांव दिलें. या स्थळावर आनंदीबाईची फार प्रीति होती. तिच्या मनांत आनंदवल्लीची वस्ती वाढवीत नाशिकपर्यंत नेण्याचें होतें. म्हणून दादासाहेबांनीं किल्ले त्रिंबकची पेठ पसंत करून तेथें नवें घर बांधल्यावर दुसरें घर मौजे चावडस येथें बांधून आनंदीबाईच्या इच्छेस मान दिला. आनंदीबाई ही फार हौशी व शोकी बायको होती. तिला नवीं शहरें वसविण्याचा नाद विशेष होता. ती कोपरगांवीं प्रतिबंधांत रहात असतां तिनें काढलेले उद्गार तिच्या वरील प्रवृत्तीचे द्योतक होत. ती कारभाऱ्यांना दोष देतांना म्हणते, 'सोयीच्या गोष्टी असत्या तर येथें शुक्रेश्वरीं शहर वसतें, उदमी येऊन रहाते. या प्रसंगीं आम्ही आहों तें एक देवालय देखलि होत नाहीं.' (पे. द.) मग शहराची गोष्ट दूरच.

नवीं शहरें व गांवें वसविण्याचा उद्योग एकीकडून चालू असतां परचक्र येऊन किंवा इतर आपत्ति ओढवून जुनीं गांवें मोडत व ओस पडत. त्यांचा जीर्णोद्धार करण्याकडेहि पेशवे दरबाराला लक्ष पुरवावें लागे. त्या बाबतींत पुण्याचें उदाहरण वर दिलेंच आहे. दुसरें उदाहरण विसापुराचें. 'केसो बाबाजी किल्ले विसापूर यांनीं विनंति केली कीं, कसबे विसापूर तोतयाचे पारिपत्यास महादजी शिंदे फौजेसुद्धां गेले तेव्हां जळाला. रयत परागंदा झाली. मातबर उदम्यावाचून बाजाराची आबादानी होत नाहीं. आठा दिवशीं बाजार भरतो. जकातीचा मक्ता १२५ रु. आहे तो तीन सालें माफ करावा.' [पे. रो.] या विनंतीवरून मक्ता तीन सालें माफ करण्यांत आला. या विसापूरचा किल्ला मळवली स्टेशनापाशीं व लोहगडाजवळ पुणें-मुंबई रस्त्याच्या लगत आहे.

पेशव्याप्रमाणें त्यांचे सरदारहि आपआपल्या जहागिरींतून शहरें, गांवें व क्षेत्रें वसविण्याचें कार्य करीत होते. अशाच सरदारापैकीं रास्ते होत. वाईची वस्ती वाढवून तिला महाराष्ट्रांतील क्षेत्रांत उच्च दर्जा मिळवून दिल्याचे श्रेय रास्त्यानाच आहे. आनंदराव रास्त्यांचे लक्ष वाईत ब्राह्मणवस्ती वाढविण्याकडे होतें. वाईंत बादशाही आमदानीपासून प्राबल्य मुसलमानांचें.

तें प्राबल्य रास्त्यानीं आपल्या सत्तेनें पण सामोपचारानें कमी केलें व चांगल्या विद्वान् व सत्पात्र ब्राह्मणांना वाईंत आणविलें; धर्मपुरी ही नवी पेठ वसाविली व तिच्यांत बावन नवीं घरें बांधून ब्राह्मणांना दान केलीं. ब्राह्मणशाही आळीचा उत्तर भाग, व पश्चिम भाग, आदितवार पेठ, गणपति आळी, मधली आळी, व गंगापुरी ही नवी वाईच असून तिची स्थापना आनंदराव रास्त्यांनीं केली.

प्रकरण चौथें.

इमले व देवालयें.

शहरें व गांवें वसविली तरी त्यांना सुंदर व भव्य इमारतींवांचून प्रतिष्ठा नाहीं. या दृष्टीनें पेशवाईंत खुद्द पेशव्यांनीं व त्यांच्या सरदारांनीं आपआपल्या शहरीं, गांवीं व क्षेत्रांत कैक लहान मोठ्या प्रेक्षणीय इमारती बांधल्या. पेशव्यांचा पुण्यांतील शनिवारवाडा हा महाराष्ट्रामध्यें पहिल्या प्रतीचा प्रासाद होय. तो कसा होता याची कल्पना त्याच्या सभोंवार उभा असलेला तट पाहून येण्यासारखी नाहीं. तथापि तो किती विस्तीर्ण होता याची कल्पना मात्र तटावरून येण्यास हरकत नाहीं. शनिवारवाड्याच्या बांधकामास सुरुवात पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत सन १७२९ त सुमुहूर्तावर झाली. बाजीराव नेहमीं मुलूखगिरीवर असल्यानें वाड्याचें काम स्वतःच्या नजरेखालीं करून घेण्यास त्यास कधींच फावलें नाहीं. म्हणून त्यानें सदर कामावर देखरेख करण्यास शिवराम कृष्ण नांवाचा कारकून ठेवला होता. तो १७३१ सालीं बाजीरावास स्वारींत लिहितो ' इमारतीचें वर्तमान, तरी स्वामीच्या निजावयाच्या दोन खोल्यांची तख्तपोशी, गिलाव्यावरील आस्तरगिरीदेखील कारंजे करून शिमग्याकारणें जागा तयार केला आहे. पुढील दिवाणखान्यास रंग लावला. या उपरी जागा जागा वेलपते काढीत आहें. या उपरी रोगण होईल. पुढील दरवाज्यावरलि खण तयार झाला. नवें घर करविलें होतें. त्याचे पाये घातले आहेत. लाकडें तासावयास सुतार लावले आहेत. वाड्याचे विहिरीचे खडक फोडावयास पाथरवट लावले आहेत....पौड खोऱ्यांतील वासे अर्धे आणिले, अर्धे येतील. नाणे मावळांतील कड्या अद्यापि आणिल्या तोडल्या नाहींत.... दिवाणखान्याजवळील राहाटाच्या बंगल्याच्या भिंती चहूंकडून तयार झाल्या ' (पे. द.) बाजीराव शूर तसाच हौशी व विलासी होता. त्यानें मुसलमानांचे नक्षीदार, भव्य व कलाकुसरीचे राजवाडे पाहिले होते.' त्यांचे अमीर-उमराव व सरदार आपल्या राजधानींत आल्यास आपला उणेपणा त्यांच्या दृष्टीस पडूं नये, त्यांनाहि मराठे रसिक, कलाप्रिय व डामडौलांत आपल्या बरोबरीचे वाटावे, अशी ईर्षा बाजीरावानें बाळगणें अगदीं



थोरले बाजीराव साहेब पेशवे.

उचित म्हणूनच शनिवारच्या वाड्यांत आस्तरगिरी, कारंजें, वेलपत्ती इत्यादि नोकझोकाची जरूरी त्यास भासली. ' सन १७३६ त नवीन दिवाणखाना बांधून झाल्यावर त्यांत बाजीराव मुहूर्तानें रहावयास गेला. या वाड्यांत जयपुराहून कारागीर आणवून त्यांजकडून बाजीरावानें भिंतीवर सुंदर चित्रें काढविलीं आणि मागाहून मस्तानी-महाल म्हणून स्वतंत्र जागा बांधिली. हा पेशव्यांचा पहिला जुना वाडा होय. त्यांत प्रथम दोन मजले व दोन चौक होते. पुढें नानासाहेब पेशव्यानें त्यांत अनेक फेरफार करून तो विस्तीर्ण केला. त्याचे चौक चार व कांहीं भागाचे मजले सहा केले. ' (सरदेसाईकृत रियासत).

बाजीरावाप्रमाणें नानासाहेबाचें लक्ष या वाड्याकडे अर्थात् होतें. तोहि बाहेर गांवीं असतां वाड्याविषयीं चौकशी करीत होता व माहिती मागवून योग्य त्या सूचना देत होता. पुढील पत्र कारकुनानें नानासाहेबास लिहिलेलें आहे. 'हौदाचें काम चालीस लावतों. थोरल्या दिवाणखान्यापुढील चौसोपीचें काम चालत आहे. पर्वतीचे वाटेवर तळ्याची माती भर बहुतेक टाकली. वाट तयार होत आली. फरासखान्याचा सोपा तयार झाला. धरणाचें काम चालीस लावलें आहे. ' या एका पत्रांत किती तरी कामांची उभारणी केलेली दिसते. पाणी खेळविण्याचा शोक मुसलमान राजांना फार. कारंजीं, हौद, तळीं, हीं त्यांच्या वाड्यांत व राजधानींत आढळावयाचींच. त्यांचें काम पुण्यांत ठिकठिकाणीं या वेळीं सुरू झालें होतें. पर्वती, पर्वतीजवळचें तळें व त्या तळ्याजवळून पर्वतीस जाण्याची लहानशी वाट हीं पुण्यांतील रमणीय व खुबीदार स्थळें होत. त्यांनीं पुण्याची ऐट वाढवून पुण्याला मजा आणिली. वरील पत्रांत उल्लेख केलेलें धरण आंबिल ओढ्यास बांधलेलें असावें. पर्वतीच्या बाजूनें पुण्याशेजारीं निबिड झाडांचें छत बसण्यास आणि आंबराया व बागबगीचे लागून रहाण्यास पर्वतीचें तळें व धरण यांनींच सर्व मदत केली असली पाहिजे.

नानासाहेब पेशव्यास जिवाजी गणेश व रघुनाथ शिवराम यांनीं वाड्यासंबंधानें पत्र लिहिलें आहे. त्यांतील बराच मजकूर शनिवारवाड्यास अनुलक्षून दिसतो. ' येथील इमारतीच्या कामाची हाजिरी लिहून पाठविली आहे, त्यावरून विदित होईल. कुरणांत दोनशें पसतीस कामाठी पाठविले आहेत. त्यामुळें आठक्या सोळक्या चालत होत्या त्या राहिल्या. छकड्याचे धोंडे रमण्यावर जात होते ते चार दिवाळींचे पायांवर आणून तें काम चालतें केलें. प्रस्तुत रमण्याचें

काम राहिलें आहे. त्यास कानडे बेडेर, दगडवाले व माती खणावयाचे यांस स्वामींनी कौल देऊन आणविलें होतें. ते जवळ आले आहेत. त्याचे शंभर गाडे धोंडे आणावयाचे आहेत, म्हणून त्यांचे जमातदार आले होते त्यांनीं सांगितलें. दोचौ रोजीं येणार आहेत. याप्रमाणें त्यांजपाशीं सामान असलें तरी बेगमी पोक्ती झाली म्हणजे रमण्याचें काम जलदीनें चालेल......मातुःश्री ताईचें (नानासाहेबाची आई) विहिरीचें काम चालीस लावलें आहे. दोन अडीच थर धोंडियाचे बसले. बंगल्याचे दुसरे खणाचे मधील घराचे छतेचें काम चालत आहे. तखतें जडिलें. चहूंकडील दाशिये तयार झाले. मधील दांडे व फुलें जडीत आहेत. ' (पे. द. १८).

त्यांचेंच दुसरें पत्र. ' अलीकडे बंगल्याचे पूर्वेकडील उजवे हातचे हौदाचें काम चालीस लावलें होतें. तो हौद ज्यातप्राय (?) आहे. खजान्यास अलीकडे चार थर बसले. लौकरच भुई बरोबर तयार होईल. राजश्री महादाजीपंत बाबांचे दिवाणखानीयाचे कामास आरंभ केला आहे. खांब व तुळया चढल्या. काम जलदीनें चालत आहे. लौकरच सिद्ध होईल. वाडियांतील पूर्वेची पागा जाया जाली होती. याजमुळें तें मोडून पूर्वेकडे गजभर जागा व पश्चिमेकडे तीन गज जागा घेऊन दुहेरी पागा केली. तेंहि काम फार करून झालें...कवडीच्या पागेचे पंचवीस खण तयार केलें. सेवेशी विदित झालें पाहिजे. ' (पे. द.)

हीं दोन्हीं पत्रें १७४५ मधील आहेत. त्यांत अनेक बांधकामांचा उल्लेख आला आहे. पर्वतीजवळचा रमणा व शनिवारवाडा यांचा उल्लेख प्रमुख होय. शनिवारवाड्यांत दिवाणखाना, बंगला, पागा, हौद व खजिना यांचीं कामें सुरू असून त्यासाठीं हजारों माणसें खपत होतीं. कर्नाटकांतील वडार लोक महाराष्ट्रांत कामाला येण्याचा प्रघात जुना दिसतो. कदाचित् तो याच सुमारास सुरू झाला असावा. सरकारच्या सरदारांच्या इमारती बांधल्या जात असल्यामुळें त्यांकरितां परमुलुखांतील कित्येक कारागीर पुण्यांतच रविवार, शुक्रवार इत्यादि पेठांतून राहूं लागले. त्यांस लागणारा माल पुरविणारे वाणी-उदमीहि आले. अशा रीतीनें पुण्याची वस्ती जलदीनें वाढत गेली.

शनिवारवाड्याचा तट व दरवाजे शाबूद असले तरी खुद्द वाडा सन १८२७ त जळून गेला. त्यामुळें आज त्याचा मागमूसहि उरला नाहीं. पुढें इंग्रज सरकारानें वाड्याच्या जागीं कोर्टाच्या इमारती बांधल्यावर तर वाड्याचा सर्वांना

अजिबात विसर पडत चालला. वाड्याचें दैन्य सन १९२१ सालापर्यंत टिकलें. त्या वर्षी इंग्लंडच्या युवराजाची स्वारी हिंदुस्थानांत यावयाचें व त्या दौऱ्यांत पुणें शहरालाहि भेट देण्याचें ठरलें. युवराजांच्या पूर्वी तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड पुण्यास येऊन व वाडा पाहून गेले. त्यांच्या आगमनानें वाड्याचें नशीब किंचित् उघडल्यासारखें झालें. त्यानंतर वाड्यांतील कोर्ट-कचेऱ्यांच्या इमारती सरकारनें पाडल्या व पुराणवस्तुसंशोधन खात्याकडून मातीच्या ढिगाखालीं गडप झालेले अवशेष उकरून काढले. त्यायोगानें वाड्यांतील चौक, विहिरी, दिवाण-खानें, कारंजीं, सोपे यांच्या खाणाखुणा आतां स्पष्टपणें दिसूं लागल्यामुळें वाड्याची कल्पना कोणासहि करतां येणार आहे. सुदैवानें वाडा अस्तित्वांत असतां ज्यांनीं तो पाहिला होता त्यांनीं लिहिलेलीं वर्णनें सांप्रत उपलब्ध आहेत व तासगांवचे इनामदार रा. केशव नारायण जोशी (मनोळीकर) यांनीं आपल्या संग्रहीं असलेला वाडयाचा नकाशाहि छापून काढला आहे. या साधनांच्या बळा-वर वाडयाचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें तर तें वस्तुस्थितीस धरूनच ठरेल. त्यांतील कित्येक स्थळांना दिलेलीं नांवें बदललेलीं असण्याचा पुष्कळ संभव आहे. कारण सदर वाडयांत पेशव्यांच्या चार पिढ्या नांदल्या. त्या चार पिढ्यांतील प्रत्येक पिढींपैकीं व्यक्ति ज्या भागांत राहिल्या त्या भागांना त्यांचीं नांवें सहजच देण्यांत आलीं. सदर व्यक्ति मरून गेल्याबरोबर त्यांचीं नांवें मागें पडून नवीन व्यक्तींचीं नांवें त्या त्या भागांना मिळत गेलीं. खेरीज इमारतींतहि वारंवार फेरफार झाले. कांहीं भाग जळाले व नवे बांधण्यांत आले. या सर्व घडामोडी जमेस धरून वाडयाचें पुढील वर्णन वाचावें.

‘शनिवारवाडा दोनशें यार्ड लांब व दीडशें यार्ड रुंद आहे. त्याच्या तटाची उंची वीस फूट आहे. त्याला नऊ बुरूज व पांच दरवाजे आहेत. त्या सर्वांत मोठा दिल्ली दरवाजा, हा उत्तरेस आहे. दिल्ली दरवाजाच्या ओळीलाच अल्ली-बहाद्दराचा दरवाजा आहे. वाडयाच्या उत्तर दिशेचे हे दोन दरवाजे होत. पूर्व दिशेला दरवाजे आहेत तेहि दोनच आहेत. त्यांतील गणेशदरवाजा हा मुख्य. त्याच्या खालोखाल कवठी-दरवाजा. वाडयाच्या या पूर्वांगालाच गणपतिमहाल हा पेशव्यांचा इतिहास प्रसिद्ध दिवाणखाना असून त्यांत महत्त्वाचे सर्व दरबार भरले व ऐतिहासिक प्रसंग घडले. गणपतिमहालांत जाण्याचा मार्ग गणेशदर-वाज़ातून होता. वाडयाच्या दक्षिण अंगास एकच दरवाजा आहे. त्याचे नांव

जांभळी दरवाजा. वाडयांत एकंदर चौक दहा असून त्यांपैकीं चार चौक मोठे होते. जितके चौक तितके हौद व कारंजीं होतींच, पण त्याशिवाय आणखी कित्येक हौद होते. वाडयाच्या इमारतींत दोन विहिरी व त्याखेरीज दक्षिणेच्या तटांत खजिन्याची विहिर. सर्व कारंजांत हजारी कारंजे फार विस्तीर्ण. महालांना गणपतीचा रंगमहाल, सवाई माधवरावसाहेबांचा आरसेमहाल, गौरीचा महाल अशीं नांवें होतीं. आणि दिवाणखान्यांना थोरले बाजीराव साहेबांचा दिवाणखाना, थोरले माधवरावसाहेबांचा दिवाणखाना, रमाबाईसाहेबांचा दिवाणखाना, अमृतरावसाहेबांचा दिवाणखाना अशीं नांवें होतीं. चौकांना नवा चौक, जुना थोरला पंगतीचा चौक, गोदूबाईचा चौक, बकुळीचा चौक असें म्हणत. सोप्यांना हुजुरातीच्या चौकीचा, दुमजल्याचा, कचेरीचा, खास बारदारांचा, जरीपटका ठेवण्याचा इत्यादि विशेषणानीं ओळखीत. त्याशिवाय होमशाळा, जवाहिरखाना, गोशाळा, पागा यांच्या जागा पृथक् होत्या. नैऋत्येच्या कोपऱ्यांत दादासाहेबांचा बदामी बंगला होता व ईशान्येच्या कोपऱ्यांत मस्तानीचा नातू अल्लीबहाद्दर याची रहाण्याची इमारत होती. मुख्य व प्रथम बांधलेला वाडा दोन चौकीच असून त्यांत माजघर, सोपा, पडव्या, पंगतीची जागा इत्यादि मामुली प्रकार होते. त्यानंतर इतर इमारती त्यास जरूरीप्रमाणें जोडल्या गेल्या. दिवाणखाने कलमदानी होते. त्यांतील खांब सुरूचे वर कमानी असून कडीपाट लांकडी नकशीदार होता. त्यांत जयपूरचा कारागीर भोजराज यास आणवून त्याजकडून रामायण व महाभारत यांतील कथाप्रसंगांस धरून चित्रें काढविलीं होतीं. नानासाहेबानें गणपतिमहाल सन १७५५ त बांधून त्यांत गणेशोत्सव साजरा केला.'

शनिवारवाडयाचें वर्णन सांगलीचे प्रसिद्ध कवि साधुदास यांनीं आपल्या 'पौर्णिमा' नामक कादंबरींत केलें आहे. त्यावरून वाडयाचें समग्र चित्र डोळ्यांसमोर उभें रहातें. ' सभोवार एक प्रचंड तट [illegible]खून वाडयाचें बांधकाम केलें होतें. वाडयाकरितां आणि भोंवतालच्या बागेकरितां मिळून तीन बिघ्यांहून अधिक जागा गुंतली होती. वाडा उत्तराभिमुखी असून त्याला एकंदर पांच दरवाजे होते. उत्तरेकडचा दिल्ली दरवाजा, ईशान्येकडचा मस्तानी (अल्लीबहाद्दरा) चा दरवाजा, दक्षिणेकडचे आग्नेय व नैऋत्य या दिशांस असलेले गणेश आणि नारायण या नांवांचे दरवाजे, आणि पूर्वेचा जांभळी दरवाजा, अशा नांवांनीं हे दरवाजे प्रसिद्ध होते. सर्व दरवाज्यांवर अष्टौ प्रहर गारद्यांचा टेलता पहारा असे.

दिल्ली दरवाजांतून आंत गेल्याबरोबर एक प्रचंड वाटोळा बुरूज लागे. या बुरूजाच्या माथ्यावर तोफांचा गोल रचला होता. आणि त्याच्या मध्यभागीं महाराष्ट्राचें पंचप्राणभूत जरीपटक्याचें भगवें निशाण फडकत होतें. बुरुजाच्या आंत तीन मोठ्या कमानी असून त्या कमानींवर नगारखान्याची माडी होती. कमानींतून आंत गेल्यावर एक विस्तीर्ण पटांगण लागे. या पटांगणाच्या पूर्व बाजूस व पश्चिम बाजूस दोन दोन लहान चौक असून दक्षिणेच्या बाजूस वाडयाची मुख्य इमारत होती. ही इमारत सहा मजली असून तिचे चार मोठमोठे चौक होते. आग्नेयीकडील चौकास लाल चौक असें नांव होतें, पण तो बाहेरील चौक या नांवानेंहि प्रसिद्ध होता.... नैऋत्येकडील चौकास मोतीचौक असें नांव असून तो बाईचा (गोपिकाबाई) चौक या नांवानें ओळखला जाई...वायव्येकडील चौकास हिरकणी चौक असें नांव असून तो मधला चौक या नांवानें गणला जात असे... ...शेवटच्या म्हणजे ईशान्येकडील चौकास माणिकचौक ही संज्ञा असून तो हौदाचा चौक या नांवानेंहि मशहूर होता. या मोठ्या चौकांतून फडाचा चौक, ताकचौक, मुदपाकचौक, पक्वान्नचौक इत्यादि अनेक पोटचौक होते. त्यांपैकीं फडाचा चौक हा हिरकणी चौकांत असून त्यांत पेशवे सरकारांची कचेरी भरत असे. या सर्व चौकांत मिळून गणपतीचा रंगमहाल, नानांचा दिवाणखाना, नवा आरसेमहाल, जुना आरसेमहाल, दादासाहेबांचा दिवाणखाना, थोरल्या रायांचा जुना दिवाणखाना, खाशांचा दिवाणखाना, हस्तिदंती दिवाणखाना, नारायणरावांचा महाल, अस्मानी महाल इत्यादि अनेक महाल व दिवाणखाने होते. नारायणरावांचें देवघर, रावसाहेबांचें देवघर, दादासाहेबांचें देवघर इत्यादि अनेक देवघरें होतीं. याशिवाय जामदारखाना, जिन्नसखाना, दप्तरखाना, पुस्तकशाळा, गोशाळा, पीलखाना, उष्टरखाना, शिकारखाना, शिलेखाना, वैद्यखाना, कबूतरखाना, कोठी इत्यादि कारखान्यांची योजना वेगवेगळ्या चौकांतून करण्यांत आली होती. कात्रज येथें तलाव बांधून त्यांतून पाणी शहरांत आणून तें वाडयांत सर्वत्र खेळविलें होतें.

'वाडयाचे सर्व चौक उत्तम चिरेबंदी बांधले असून त्यांच्या मध्यभागीं अनेक हौद व कारंजीं असत. त्यांच्यापैकीं हिरकणी चौकांतलें हजारी कारंजें कमलाकृति असून त्याचा घेर सुमारें ऐंशी फूट होता. त्यांत सोळा पाकळ्या असून प्रत्येक पाकळींत सोळा याप्रमाणें सर्व पाकळ्यांत मिळून दोनशें छप्पन्न

कारंजीं उडण्याची सोय केली होती. वाडयाचें सुतारकाम उत्तम सागवानी लाकडाचें असून त्यांतील दिवाणखान्यांचें व महालांचें नक्षीकाम फारच प्रेक्षणीय केलें होतें. दिवाणखाने कलमदानी आकाराचे असून त्यामध्यें एक मोठा सभामंडप व चारी बाजूंस चार दालनें काढलेलीं असत. सभामंडपाचें काम सुरूदार नक्षीचें असून त्याच्यावर नक्षीदार लाकडी कमानी होत्या. त्यांच्यावरून पक्षी, फळें, वेलबुट्टी वगैरे चित्रें कोरलेलीं असत. विशेषतः हिरकणी चौकांतल्या गणपतिमहालाचें चित्रकाम फारच प्रेक्षणीय कोरलेलें होतें. आणि त्यांतून रामायण-महाभारतांतलि अनेक कथांचीं चित्रें होतीं. जयपुराहून भोजराज नावाच्या चित्रकारास बोलावून आणून त्याजकडून हें चित्रकाम तयार करून घेण्यांत आलें होतें. यावरून हा वाडा सजविण्यासाठीं किती पैसा खर्च करण्यांत आला असेल याचा वाचकांनीं अंदाज करावा. ' हे वर्णन रा. साधुदास यांनीं जुन्या कागदपत्रांच्या आधारें केलें असून तें गॅझीटियरमधील वर्णनाशीं बरेंच जुळतें आहे.

सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत इंग्रज रेसिडेंट सर चार्लस मॅलेट पुण्यास रहावयास आला. तो टिपूवर स्वारी करण्याच्या बाबतींत ९ सप्टंबर सन १७९१ सालीं पेशव्यांच्या दरबारांत वाटाघाटीसाठीं गेला असतां त्याजबरोबर कित्येक इंग्रज लोक होते. त्यांतच मेजर प्राइस नांवाचा लष्करी अधिकारी होता. त्यानें सदर दरबाराचें वर्णन केलें आहे; त्याबरोबर ज्या गणपतिमहालांत नेहमीं दरबार भरत त्याचीहि माहिती दिली आहे. ती वाचून शनिवारवाड्यांतील एका प्रमुख भागाची स्पष्ट कल्पना येते. मेजर प्राइस लिहितो—

' रेसिडेंट दरबारांत जाण्यासाठीं आपल्या लव्याजम्यानिशीं निघाले. त्यांच्यापुढें आठ शिपाई चालत असून बरोबरच्या मंडळींत युरोपियन व हिंदीहि लोक होते. त्या सर्वांची संख्या ८० पर्यंत भरेल. आम्ही मुठानदी ओलांडली व शहराच्या भर वस्तींतून जाऊं लागलों व अखेर राजवाडयाच्या दरवाज्यापाशीं आलों. दरवाजा (गणेशदरवाजा) पूर्वेकडे तोंड करून आहे. हा दरवाजा उंच असून त्यांतून आंत गेल्यावर आम्ही डाव्या हाताकडे (दक्षिणेस) वळलों. आमच्या एका अंगाला सामान्य प्रतीच्या खांबांची रांग होती. त्यावरून त्या बाजूचें बांधकाम अद्यापि पुरें झालें नव्हतें असें दिसलें. ती रांग संपल्यावर आम्ही उजव्या हाताला बरेंच वळण मारलें व थेट दिवाणखान्यापाशींच पोंचलो. हा दिवाण-

खाना (हॉल) प्रशस्त व उंच पण अगदीं साधा होता. त्याजवर नक्षीकाम कांहीं नव्हतें. लाकडावर जी काय नक्षी असेल तेवढीच. या दिवाणखान्याच्या उत्तरेकडलि बाजू अगदीं मोकळी होती. दिवाणखान्याचे खांब लाकडी असून जमिनविर या टोकापासून त्या टोकापर्यंत अगदीं पांढरी सफेत बिछायत घातली होती. ' (इ० सं.).

याच गणपतिमहालांत १७९१ त कॅप्टन मूर आला होता. त्याला गणपतिमहाल पुढीलप्रमाणें दिसला. ' पेशव्यांचा गणेशरंगमहाल ही फार भव्य (Very Magnificent) इमारत आहे. त्याला असंख्य लोक येथेंच भेटावयास येतात. या महालांत एकाच वेळीं नाचणाऱ्या शंभर नायकिणी मी पाहिल्या आहेत. महालाच्या कडेला कोनाड्यांत गणपतीची संगमरवरी सुंदर मूर्ति आहे. त्या सभोंवार भिंतींवर पुष्कळ पौराणिक चित्रें काढलीं आहेत. या इमारतीच्या टोकाला हौद असून त्यांत कारंजीं आहेत. त्या पलीकडे सुवासिक फुलांचा बाग आहे. त्या सुगंधांत पाण्याची झुळझुळ मिसळल्यामुळें त्यापासून मनाला आनंद होतो. ' शनिवारवाडा सहा मजली होता. परंतु हा गणपतिरंगमहाल माडीवर नसून तळमजल्यांत असल्याचें वरील वर्णनानें उघड होतें.

शनिवारवाड्याची अधिक ओळख त्याच्या बंदोबस्ताकरितां कोणतें लोक कोठे ठेवले होते हें वाचूनहि पटेल. ' वाड्याबाहेर छबिन्याकरितां प्रातःकाळपासून सायंकाळपर्यंत स्वार असत. त्यांपैकीं ५३ दिल्ली दरवाजापुढें व १० गणेश दरवाजापुढें. खुद्द वाड्यांत २२० पायउतार लोक असत. त्यांपैकीं १०५ इसमांना प्रातःकाळपासून दोन प्रहरपर्यंत रहावें लागे. त्यांची वांटणी अशी— २१ चाफे खणांत व ८४ साऱ्या दिवाणखान्यांत मिळून. दोन प्रहरांपुढें पहिले इसमास सुटी होऊन नवे ११५ इसम येत; व रात्रींच्या वेळीं आंतल्या व बाहेरच्या लोकांची एकूण संख्या २३९ असे. त्यांतील १२५ वाड्याबाहेरचे स्वार व ११४ वाड्यामधील पायउतार. अशा रीतीनें रात्रंदिवसाच्या तीन पाळ्या धरतां ५२२ इसम कामावर येत. यावरून वाड्याचा विस्तार, त्यांतलि विभाग यांचा अंदाज अधिक स्पष्ट रीतीनें बांधतां येतो. ' (इ. सं.)

नानासाहेबाच्या कारकिर्दीत शनिवारवाड्याचें काम चालूच होतें. थोरल्या माधवरावास नवीन इमले बांधण्यास फावलें नसावें. त्याच्या कारकिर्दीच्या आरंभीं मोगलानें पुणें शहर जाळलें. त्याचा फिरून उद्धार करण्याकडेच त्याला लक्ष पुर-

वावें लागलें. पर्वतीचें तळें, तळ्यांतील बाग व हिराबाग हीं नानासाहेबानेंच पुरीं केलीं होतीं. त्यांपैकीं एका बागेंत बंगला होता तो मोगलांच्या दंग्यांत जळून गेल्यावरून त्याची दुरुस्ती व भोंवतालची बागशाही माधवरावानें पुढील पत्रान्वयें नाना फडणविसावरच सोपविली. 'पर्वतीचे तळ्याचे बागांतील बंगला आहे. त्यास इमारत जाळून भिंती मात्र उभ्या राहिल्या आहेत. त्या वाईट दिसतात, यास्तव त्या भिंती पाडून इटा जमा करून ठेवणें आणि जागा हवार करणें. आंत झाडें आहेत त्यांस आळीं बांधून पाणी लावून गुलजार करवणें' (पे. द. ३२ सन १७६४) हें पत्र लिहिलें त्या सुमारास माधवराव कर्नाटकाच्या स्वारीवर होता. या स्वारींत पुण्यापासून श्रीरंगपट्टणापर्यंतचा बहुतेक सारा प्रदेश त्याच्या नजरेखालून गेला होता. तिकडील ठिकठिकाणची विशेष प्रसिद्ध अशी प्राचीन देवालयें, त्यांची उत्कृष्ट घडण, त्यांजवरील नक्षीदार मेहरपी व चित्रें ही त्याच्या पहाण्यांत आलीं असावी आणि राजेरजवाड्यांनीं दिलेल्या मेजवान्यांच्या प्रसंगीं त्यांचे वैभवशाली महाल व मेहनतीनें जतन करून वाढविलेल्या गुलजार व विस्तीर्ण बागा त्याच्या दृष्टीस पडल्या असाव्या. तें परकीयांच्या राजधान्यांतील ऐश्वर्य व शत्रूनीं जाळून टाकलेल्या आपल्या पुण्यनगरीचें भीषण व हीन दृश्य यांमधील विरोधानें चित्त विषण्ण होऊन वरील पत्र माधवरावानें नाना फडणविसास लिहिलें नसेल काय ?

रघुनाथराव पेशव्यास नवीन गांवें वसविण्याप्रमाणें इमारती बांधण्याचाहि नाद होता. त्याच्या बहुतेक इमारती गोदातीरीं आहेत. आनंदवल्लीस जसा त्यानें वाडा बांधला, तसेंच गोदातीरीं कोपरगांवास वाडा वगैरे बांधण्याचें काम राघोबानें १७६७ तच सुरू केलें होतें. तेथें पुढें मागें रहाण्याचा त्याचा तेव्हांपासूनच बेत होता, असें पुढील पत्रावरून दिसतें. 'सेवेसी बापूजी कृष्ण, साष्टांग नमस्कार विज्ञापना, येथील कुशल ता. छ. २७ सफर मुक्काम शुक्रेश्वर यथास्थित असे. विशेष. सरकारवाड्याचें काम चार दिवाली व चौसोपी व घर व बंगले इतकें आज्ञेप्रमाणें काम सिद्ध झालें. पुढें पुण्यास यावयाची आज्ञा झाली पाहिजे म्हणून येथें आहों. किरकोळ आठा चौ दिवसांचें काम आहे, तें इतक्यांत होईल. पुढें काम तूर्त नाहीं.......श्रीमंत राजश्री दादासाहेब या मार्गेकरून आनंदवल्लीस गेले. वद्य १० मंगळवारी येथें स्वारी आली. श्रीमंतांनीं वाडा संपूर्ण हिंडून पाहिला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं भोजन येथेंच करावें ऐसी श्रीमंतांची मर्जी

होती. भोजनाची तरतूद करणें म्हणून आज्ञा केली होती. मागती दिकत निघाली कीं, वास्तुशांति झाली नाहीं. यामुळें तो मनसुबा राहिला. त्यास मातबर इमारत, प्रथम काम झालें त्या तागाईत वास्तुशांति नाहीं. यास्तव सूचनार्थ लिहिलें आहे.' (पे. द. १९) हें पत्र बापूजी कृष्ण यानें पुणें दरबाराकडे पाठविलें होते.

शनिवारवाडा विस्तीर्ण असल्यामुळें त्याचें बांधकाम सवाई माधवरावाच्या कारकिर्दीतहि पुरें झालें नसावें असें मेजर प्राईस याच्या विधानावरून अनुमान निघतें. त्याच्या कारकिर्दीत शनिवारवाड्याचें काम काय पुरें झालें असेल तेवढेंच. पण त्याच्या पश्चात् दुसऱ्या बाजीरावाच्या हातीं राज्यसूत्रें आल्यावर त्यानें नवीन नवीन इमारती बांधण्याचा धडाका चालविला.

दुसरा बाजीराव राजकारणांत नादान असला तरी त्याला वैभवाची, विलासांची व डामडौलाची फार हौस होती. त्यानें जुन्या इमारती दुरुस्त केल्या व नव्या बांधल्या. पुण्यापाशीं कोथरूड गांवाजवळ पेशव्यांच्या बागा असून त्यांत त्यांनीं आरसेमहाल व जलमंदिरहि बांधलें होतें. पेशव्यांकडे देशोदेशींचे राजेरजवाडे व अमीर-उमराव कारणपरत्वें येत. त्यांचाहि मराठ्यांच्या मोठेपणाविषयीं अनुकूल ग्रह होण्यास अशा प्रकारच्या उपभोग्य वस्तूंची गरज होती यांत शंका नाहीं. कोथरूडच्या बागेतील आरसेमहाल जाया झाला होता. तो उत्तम तयार करण्यास बाजीरावानें सन १८०७ मध्यें ४१० रु. खर्च केले. आरसेमहालाप्रमाणें जलमंदिराचीहि दुरवस्था झाली होती. त्याच्या दुरुस्तीसाठीं ८६५ रु. खर्ची पडले. आरसेमहालापुढील तावदानी महालाची डागडुजीहि ३७५ रु. खर्चून करण्यांत आली. या जुन्या इमारतींच्या जीर्णोद्धाराशिवाय नवी चौसोपी बांधण्याकरितां ५९५ रु. मंजूर झाले. शुक्रवारांतील पेशव्यांचा वाडा बराच मोठा होता. त्याच्या पांचव्या मजल्याच्या चार कोपऱ्यांवर चार बंगले होते. त्याजवर नवी गच्ची करण्यासाठीं रा. रामचंद्रपंत अप्पा नगरकर व चिंतोपंत रावजी देशमुख यांच्या हवालीं लिंबकजी डेंगळयानें सरकारांतून सहा हजार रुपये करविले. (पे. द. ३२) पांचव्या मजल्यावरील चार बंगल्यांकरितां बाजीरावानें २७० रुपयांत खारवी पडदे करविले. विश्रामबागचा वाडा बाजीरावानेंच सन १८०७ त बांधला. तो पंचवीस हजार रुपयांत बांधून देण्याचा मनसाराम लक्षुमण व दाजी सुतार यांनीं करार केला होता. वाडा बांधून झाल्यावर त्याच्या वास्तुशांतीकरितां सन १८०८ मध्यें ३५०० रु. खर्च झाले. बुधवार-

वाडा बांधण्याचा करार रूपचंद नाईक व भवानजी नाईक सुतार यांनीं बाजीरावाशीं ता. २२।८।१८११ रोजीं केला. तो असा—

श्रीमंत महाराज राजेश्री बाबासाहेब (बाजीराव) साहेबांचे सेवेसी आज्ञाधारक रूपचंद नाईक व भवानजी नाईक सुतार नि॥ सरकार विज्ञापना. सरकारवाडा पेठ बुधवार शहर पुणें येथें पश्चिमेकडील सोपा दुघई व पुढें अडीच गजाची पडवी अथवा सोप्याबरोबर दुमजला जसी सरकारची आज्ञा होईल तसे खण सुमारी नऊ व चापे खण दोही बाजूचे दोन एकूण अकरा खण व उत्तरेकडील सोप्याचे चालीचे खण चार एकघई व पुढें पडवी अडीच गजाची अथवा सोप्याबराबर दुमजला. येविसी सरकारआज्ञा होईल त्याप्रमाणें. याचें काम खांब सुरूदार महरापासुद्धां व भिंतींचें अंगचे खांब चौरस लांकूड सागवानी चांगलें निकोप लाल उत्तम नामी विश्राम बागचे दिवाणखान्याचे मासल्याप्रमाणें व चुना मसाला व विटा पक्क्या लाल चांगल्या उत्तम लाऊन साडे सहा महिन्यांत काम तैयार करून द्यावयाचा आम्हीं उभयतांनीं करार करून मख्ता कबूल केला. रुपये बावीस हजार मखत्याचे स्वामीनीं राजश्री त्रिंबकजी डेंगळे यांजकडून देविले ते भरून पावलों. वर लिहिल्याप्रमाणें साडेसहा महिन्यांत काम उत्तम चांगलें तैयार करून देऊं. मित्ति प्रजापतिनाम संवत्सरे भाद्रपद शु॥ ३ गुरुवासरे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना ' (पे. द.).

सन १८१४ मध्यें बुधवार वाडा तयार होऊन राहिला होता. 'त्यांत छपर पलंग आहे. त्याचा घटाटोप मखमाली केला आहे. त्यास अस्तर तापत्याचें आहे. ते काढून मखमल लावावी व बाजीरावाची स्वारी परगांवाहून येण्याचे आंत पलंग उत्तम प्रकारें शृंगारून ठेवावा ' अशी त्रिंबकजी डेंगळ्यानें त्या कामावरच्या अधिकाऱ्यांस आज्ञा केली होती. दुसऱ्या बाजीरावाचे कारकीर्दीत पेशव्यांचे शनिवारवाडा, शुक्रवारवाडा, बुधवारवाडा व विश्रामबागवाडा असे चार वाडे होते. त्याखेरीज गणेश पेठेंत एक पांचवा वाडा होता असें त्रिंबकजी डेंगळ्याच्या याच पत्रांतील इतर मजकुरावरून दिसतें. तो वाड्यांच्या व्यवस्थापकास लिहितो, ' सरकारचे चारी वाड्यांत बिछायत घालून वर चांदण्या धुवट घालाव्या व छते धुवट बांधून सरकारमर्जीजोगी तयार करावी व गणेश पेठेंतील वाड्याची

बिछायत घालून चांदण्या घालाव्या. ' (पे. द. ३२) ही सर्व तयारी बाजीराव पुण्यास येणार त्याकरितां होती.

पेशव्यामुळें पुणें ही महाराष्ट्राची राजधानी झाल्यावर सरदार व संस्थानिक यांनी पुण्यांत आपली एखादी हवेली अगर वाडा बांधण्यांत त्यांची सोयच होती. या उपक्रमाला आरंभ पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत झाला. त्याचे उजवे–डावे हात जे शिंदे-होळकर त्यांनीं आपलीं घरें पुण्यांत बांधलीं. ' होळकर, पाटिलाचे इनामकींत पलीकडले सालीं हवेली बांधली तेथें राहिले. शिंदियास हल्लीं नवें घर लालमहाल जुना त्यामध्यें बांधलें तेथें रहाणार ' सन १७३५ (पे. द. २२). जव्हारकरांनीं असेंच केलें. ' मोहनकुंवर राणी जव्हारकर हिनें कसबे पुणें येथें ५०० रु. स (सन १७७१–७२ मध्यें) बाळाजी अनंत ओक यांजपासून घर खरेदी केलें. तिला कौल पत्राचा आकार ५५ रु. माफ केला असे ' (पे. डा.). इचलकरंजीचे सरदार घोरपडे हे पेशव्यांचे आप्त. त्यांचा म्हणजे व्यंकटराव नारायण घोरपडे यांचा बंगला पर्वतीस होता. त्यास नहर बागांतून आला. सबब विहिरीचें पाणी नाहींसें झालें. करितां दुसरी बाग करावयास दहा बिघे जमीन पेशव्यांनीं दिली. ' (पे. डा.) अशा रीतीनें वाडे बंगले व हवेल्या पुण्यांत उठत होत्या तरी पुणें लुटलें जाण्याची भीति थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींत उद्भवल्यामुळें कांहीं सरदार घराण्यांना पुण्यांत घरें बांधून रहाण्याची भीति वाटत होतीच.

नानासाहेबास सातार्‍यास रहाण्याचा वारंवार प्रसंग येई. यास्तव १७५३ सालीं तेथें वाडा बांधून होत होता असें पुढील पेशवे रोजनिशींतील मजकुरावरून सिद्ध होतें. ' सातारचा वाडा बांधण्यास १५ सुतार पाठविले. त्यांत ३ गुजराथी, ५ वैजापुरी, ४ नेवासकर, ३ संगमनेरकर. गुजराथ्यास प्रत्येकीं ३० शेर बाजरी, ४ शेर डाळ, २ शेर मीठ, पाऊणशेर तूप, पावशेर सुपारी, पावशेर तंबाखू, व तीनशें पानें, ' द्यावी. गुजराथेंतील वसाहत महाराष्ट्राच्या पुष्कळ आधींची. प्रांत सुपीक व संपन्न, आणि त्यांत हिंदू व मुसलमान राज्यें पूर्वीं चांगलीं भरभराटीस आलेलीं. महाराष्ट्रांतल्या महाराष्ट्रांतहि पश्चिम महाराष्ट्रापेक्षां उत्तर महाराष्ट्र अधिक सुधारलेला. हिंदु व मुसलमान राजांच्या राजधान्या मराठ्यांच्या आधींपासून त्याच बाजूस. राजांचा आश्रय त्याच भागांतील कारागिरांना कारणाकारणानें मिळत गेल्यानें कारागिरांचें तें उगमस्थान होऊन राहिलें व त्यामुळें पेश-

त्यांना कसबी सुतार पुणें, सातारा प्रांतांत आढळून न आले म्हणजे गुजराथ व अहमदनगर अशा दूर मुलखांतून आणणें भाग पडत असे. त्यांना मजुरी रोख न देतां तिच्याऐवजीं शिधाच दिला जात होता आणि त्यांतूनहि गुजराथ्याचा आहारविहार महाराष्ट्रीयापेक्षां उच्च दर्जाचा असल्याचें पाहून त्यांच्या शिध्यांत तुपाचें प्रमाण अधिक असे. या वाड्याच्या डागडुजीसाठीं शेवटच्या बाजीरावानें सन १८०९ मध्यें दोन हजार रुपये खर्चून त्यांत आपला शागीर्द पांडोबा गोवळेकर यास ठेवलें व त्यास पगाराबद्दल दोनशे रु० (वार्षिक, मासिक नव्हे) दिले.

शाहूमहाराजांच्या हयातींत साताऱ्यात बऱ्याच इमारती बांधून झाल्या. त्यांपैकीं कित्येक इमारतींचें काम पेशव्यांच्या विद्यमानें होत असे. पेशव्यांचा कोणी पुरुष साताऱ्यास ठेवण्याकरितां मोकळा नसे, तेव्हां पुरंदरे त्यांच्या वतीनें साताऱ्यांत असत. शाहूमहाराजांच्या एका बायकोस बहुमानपूर्वक धनीन म्हणत. महाराज धनी व त्यांची राणी धनीन. धनिनीची बाग साताऱ्यास आजहि प्रसिद्ध आहे. त्या बागेंतील बंगल्याचें काम चालू होतें, त्याकारिता नानासाहेब व भाऊसाहेब यांनीं पारनेरच्या चुन्याच्या तीन मण हिरव्या कळया साताऱ्यास पाठविल्या. अहमदनगर हें जुनें राजधानीचें शहर. तेव्हां त्यांत वारंवार इमारतींचीं कामें चालत असल्यामुळें त्यांस उपयुक्त असा मालमसाला आसपास मिळण्याचीं स्थळें साहजिकपणेंच प्रसिद्ध होतीं. म्हणूनच पारनेरचा चुना साताऱ्यास नेण्यांत आला. ऐरव्हीं साताऱ्याच्या आसपास चुन्याला काय तोटा ?

क्षेत्राच्या ठिकाणीं पेशवे जात. तेथें त्यांचा मुक्काम जरी थोडा पडत असला तरी त्यांना स्वतःस रहाण्याकारितां स्वतंत्र वाडा बांधण्यावांचून गत्यंतर नसे. आणि तो वाडा त्यांच्या दर्जास शोभण्याकरितां त्याचें काम प्रेक्षणयि करणें जरूर असे. या प्रकारचे वाडे त्यांनीं पंढरपूर, नाशीक, थेऊर, वडूथ, इत्यादि अनेक लहान-मोठ्या क्षेत्रीं उठविले. पेशव्यांच्या या वाड्यांना खर्च किती थोडा येत होता हें पाहून आश्चर्य वाटतें. त्या खर्चाची कल्पना नारो महादेव कमाविसदार यांस पेशव्यांनीं ठिहिलेल्या पत्रावरून येते. ‘ नारो महादेव कमाविसदार क्षेत्र पंढरपूर यांचे नांवें सनद कीं क्षेत्र मजकुरीं सरकारचा वाडा बांधावयास तुम्हांस आज्ञा केली असे. तरी तीनचार हजार रुपयांत वाडा तयार करणें ? ’ पेशव्यांचा वाडा मोठ्या क्षेत्रांत बांधण्यांत आल्यावर तेथील सावकार, व्यापारी

च सुखवस्तु यांनीं आपलीं घरेंहि चांगलीं बांधून क्षेत्राची शोभा वाढविली असेल यांत संशय नाहीं. सन १७६२ च्या सुमारासच पंढरपूरची पेठ भरभराटीस आली असून तेथें कापडाचा व्यापार मोठा चालत असे. पंढरपूरच्या पेठेंतील कापड मिरजेपर्यंत जात होतें. गोविंद हरि गोपाळरावास लिहितो, ' सणंग आम्हांस आणविणें तर श्रीक्षेत्राहून (पंढरपुराहून) आणवावें. '

पेशव्यांनीं शनिवारवाडा बांधल्यावर त्या धर्तीचे वाडे महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं बांधण्याची सरदार मंडळींत टूमच निघाली. वाड्याचा चौक, दिवाणखाना, हौद, कारंजीं हा थाट ठरून गेला. पेशव्यांप्रमाणेंच सरदारांनीं स्वारीवर असावें व त्यांच्या शहरीं वाड्यांचें बांधकाम कारभाऱ्यांनीं चालू ठेवावें. गोपाळराव पटवर्धनानें मिरजेस आपल्या वाड्याचा दिवाणखाना हौसेनें बांधावयास काढला होता. त्यासंबंधाचें कर्नाटकच्या स्वारींत मिरजेहून पत्र आलें तें असें—' दिवाणखान्याचे गिलाव्याचें काम आटपत आलें. कारंजाचें काम चालीस लागलें आहे.' काम सुरू झालें होतें तरी गोपाळरावाचें कांहीं दिवसांनंतर त्याकडे तितकें लक्ष लागेना. कर्नाटकांत हैदरावर चाललेल्या मोहिमेचें आधिपत्य माधवराव पेशवे आपणास देतील अशी गोपाळरावाची अपेक्षा होती. पण ती सिद्ध न होऊन त्रिंबकरावमामा पेठे यांची नेमणूक पुण्याहून सेनापतित्वाच्या जागेवर करण्यांत आल्यानें गोपाळराव खट्टु झाला. त्याला तो एक प्रकारचा अपमान वाटला. असा अपमान सोसण्यापेक्षां चाकरी सोडून घरीं बसावें अशा उद्वेगानें त्याचें मन घेरलें गेलें. घरीं स्वस्थ येऊन तेजोहीन होऊन जर बसावयाचें तर दिवाणखान्याचा शोक करावयाचा काय असें वाटून तो उलट उत्तर लिहितो, ' आमची चाकरीची उमेद नाहीं. तेव्हां दिवाणखान्याची वगैरे काळजी कशास करावी ? परंतु इतके रुपये लावून बांधिले ते पुरते नीट करावे ' गोपाळरावाला इतका उद्वेग आला होता तरी त्यानें आपली चाकरी आमरण सोडली नव्हती हें विसरतां कामा नये.

वाड्यापेक्षांहि देवालयाकडे पेशव्यांचा व त्यांच्या सरदारांचा पैसा अधिक खर्च झाला. देवालयें व घाट बांधण्यांत त्यांनीं कोट्यवधि रुपये ओतले. निसर्गसौंदर्यावर प्रत्येक मनुष्याचें प्रेम असतें. पेशवे व त्यांचे सरदार यांचें प्रेम विशेष होतें असें त्याकरितां त्यांनीं जीं कित्येक स्थळें निवडलीं त्यावरून वाटतें. एखादें छानदार देवालय, त्याच्या शेजारीं पुष्करणी, तिच्या जिवावर गुलजार

बनलेली पुष्पवाटिका यांची मांडणी केल्यावांचून त्यांनीं रमणीय वनस्थळें सहसा राहूं दिलीं नाहींत. काशीपासून रामेश्वरापर्यंतचीं क्षेत्रस्थानें बहुधा याच वर्गांत मोडत असून तेथें मराठ्यांची कृति बहुधा आढळतेच. शाहूमहाराज, बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, चिमणाजीआप्पा, नानासाहेब यांजपासून तों तहत अहल्याबाई होळकर व बायजाबाई शिंदे यांजपर्यंत सर्वांची नजर वर वर्णिलेल्या विस्तीर्ण भूप्रदेशावर खेळत होती. शाहूमहाराजांच्या पूर्वींपासून काशीस बाबूजी नाईक बरामतकिरांचे वडील सदाशिव जोशी नाईक हे रहात असत. ते मोठे सावकार होते. काशीतील मनकर्णिकेचा घाट त्यांनींच बांधला. त्यांची इच्छा ब्रह्मपुऱ्या बांधाव्या व संन्याशासाठीं मठहि बांधावे अशी होती. त्यांच्या या कार्यास बाळाजी विश्वनाथ पेशव्यांचे एवढे प्रोत्साहन मिळाले कीं, मनकर्णिकेचा घाट त्याच्याच खर्चानें बांधण्यांत आला अशी सार्वत्रिक समजूत झाली. बाळाजी विश्वनाथाच्या पश्चात् बाजीराव व चिमाजी आप्पा हेहि आपल्या हातून काशीस कांहीं धर्म रक्षणाचे कार्य घडावे या हेतूनें सदाशिव नाईकाबरोबर पत्रव्यवहार करीत असत. त्यावरून त्यांजकडून आपला मनोरथ सिद्ध होण्यास कांहीं द्रव्य-सहाय्य मिळेल या भरंवशाने सदाशिव नाईकाने खालील पत्र बाजीराव व चिमाजी आप्पा यांस लिहिले.

महाराज बाजीराव व चिमाजी आप्पा यांस सदाशिव जोशी नाईक यांचें काशीहून पत्र.

‘ हे धर्मवासना या वयांत धरणें हें पुण्य वडिलांचें आहे. महाराजाही लिहिलें घाटाविसी व अकरा ब्रह्मपुऱ्याविसी लिहिलें; तरी रावजी ! मजवरी श्री आयुष्य देईल तरी तुमची सेवा (परलोकची) करावी हा हेत बहुत आहे....नागेशाचे देवळापासून आग्नेस्वराच्या घाटापावेतों स्थल आहे. त्यामध्यें तिसरी तक्षम स्थल आजी हातास येतें. बाकी राहिलें तेंहि काम लागल्या उपरी हातास येईल. सर्व स्थल हातास आल्याउपरी अकरा ब्रह्मपुऱ्या होतील. संन्याशास स्थलें होतील. परंतु तें स्थल बांधावें, ब्रह्मपुऱ्या कराव्या, संन्याशास मठ करावे, त्यास रुपये लक्षांहून दहा वीस अधिक लागतील. संहालींचें (?) स्थल आहे. परंतु मनकर्णिकेचे समीप आहे. श्रीमनकर्णिका समीप टाकून एक घाटी स्नान कोणी करणार

नाहीं. ऐसें असून तेंहि प्रस्तुत हातास येत नाहीं....नाना स्वामींचें (बाळाजी विश्वनाथ) पुण्य कसें आहे ! श्रीमनकर्णिकाघाट सिध होऊन आजीं पांच वरसें कार्तिकी पुर्णिमेस दीप लागती तेव्हां श्रीकैलास होऊन जातो. पन्नास हजार माणूस मज धन्य धन्य म्हणतात. आणि मी नाना स्वामीस धन्य म्हणतों. त्यांचें पुण्य तसेंच आहे. महाराजांचें पुण्य तसेंच आहे. जें मनीं धराल तें सिद्धीस पावेल. जरी महाराजांचे चितास नागेशाचें स्थल मनास येईल तरी हें मोहीम आहे....मनकर्णिकाघाट सिध जाहाला. सर्व लोक येथील तुमचें द्रव्य म्हणतेत. परंतु आम्ही आपले मुखें म्हणत नाहीं. देशाहून यात्रेकरू येतात व आपलें महारास्ट्र आहेत याजवळी म्हणतो, घाट घरें धर्म सर्व बाजीरावजीचा आहे. परंतु गंगापुत्र व येथील अवरद याजपाशीं म्हणत नाहीं. परंतु ते म्हणतेत ' (पे. द. ६) सदाशिव नाईक मोठा धूर्त, चतुर व धोरणी दिसतो. त्याला बाजीरावाविषयीं जसा आदर होता तशीच धर्मवासना व महत्त्वाकांक्षा जबर होती.

सह्याद्रि हा महाराष्ट्राच्या नैसर्गिक सौंदर्याचा खजिनाच आहे. नाशिकापासून गोव्यापर्यंत त्यांत असंख्य मनोहर स्थळें विलसत आहेत. पुण्यानजीक पुरंदर किल्ल्याच्या परिसरांतहि हें मनोहारित्व असेंच भरून राहिलें असून त्याचें चीज पेशवे व पुरंदरे यांनीं केलें आहे. सासवडास कऱ्हेच्या कांठीं वटेश्वराचें देवालय बांधण्यांत आलें. त्यासाठीं निवडून काढलेली जागा पुरंदरे व पेशवे यांच्या रसिकत्वाची साक्ष उत्तम प्रकारें पटविते. त्याहिपेक्षां बनेश्वराचें स्थळ फारच बहारीचें. हें एक वृक्षवेलींचें निबिड वन असून त्याच्या हृदयाची तार छेडीत शिवगंगानदी त्यांतून सतत वहात आहे. त्या नदीच्या दोन्ही कांठांवर उंचवटे आहेत. त्यांची उंची वाढत जाऊन तिचें पर्यवसान टेकड्यांत झालें आहे. या स्थळीं कोणीहि घटकाभर येऊन बसला तरी त्याला त्याच्या सांसारिक दुःखांचा विसर पडावा; पण त्या ओसाड जागेंत उगीच्या उगीच बसतो कोण ! तेथेंच कोणी एखाद्यानें मंदिर, पुष्करणी, धर्मशाळा बांधली तरच ते रसिक मनुष्यास आपलें मन रमविण्याचें आश्रयस्थान होईल. इतकेंच नव्हे, तर त्या रम्य वस्तूंस अनुरूप अशा तितक्याच रम्य वस्तूंचा शेजार तिला लाभल्यास तिचें सौंदर्य द्विगुणित झाल्याशिवाय खचित रहाणार नाहीं. म्हणूनच नानासाहेब पेशव्यानें शिवगंगेच्या तीरावर सन १७४९ त बनेश्वरमंदिराची रचना केली. तें देवालय व त्यांतलि

पुष्करच्या यांनीं भोवतालची वनश्री नवा अलंकार चढविल्याप्रमाणें सुशोभित झाली आहे व उलटपक्षीं त्या मंदिरासहि तिनें भव्यपणा आणिला आहे. पुण्याजवळच्या पर्वतीवर देवदेवेश्वराचें मंदिर त्यानेंच सन १७४९ त बांधून पुणें शहराची दक्षिणबाजू दर्शनीय बनविली. देवालयांतलि देवदेवेश्वराच्या मूर्तींची स्थापना त्याच साली झाली. त्यासंबंधीं ता. ४।६।४९ मधील उल्लेख सांपडतो तो असा ' खर्च रु. ९०२० धर्मादाय पोत्यापैकीं पर्वती येथें श्री देवाच्या स्थापनेस श्रीदेवदेवेश्वर बाण, रुप्याचा महादेव वजन तोळे ६७६३४, मांडीवर मूर्ति सुवर्णाच्या, उजवीकडे गणपति, डावीकडे पार्वती वजन तोळे ६८६, बाहेर गणपति पाषाणाचा व पर्वताई भवानी ' (पे. डा.) या मंदिरावर कळस बसविला त्यास १७६१ सालीं सोनें १०८० तोळे लागलें.

पुण्याहून सातार्‍यास जातांना सातार्‍याच्या अलीकडे कृष्णातीरीं वडूथ नांवाचें खेडें आहे. तें खेडें नानासाहेबांना पुणें-सातारा यांचे दरम्यान जात-येत असतांना वारंवार लागावें व आपल्या रमणीयत्वानें त्यांच्या मनांत भरावें. अशा त्या वडुथांत कृष्णेच्या वाळवंटांतलि खडकावर सन १७५९ त त्यांनीं देवालय बांधूनं तेथील शिवलिंगास शकुंतेश्वर हें नांव दिलें. या देवालयाची व त्याच्या व्यवस्थेची कल्पना नानासाहेबांस कर्नाटकांतील अशाच प्रकारच्या मंदिरावरून सुचली असावी. ज्यावर शकुन्तेश्वराचें देऊळ आहे तें एक बेट असून त्यास पावसाळ्यांत चोहोंकडून कृष्णेच्या पाण्याचा वेढा पडतो. म्हैसूरप्रांतांतील श्रीरंगपट्टणामधील श्रीरंगाचें देउळ कावेरीच्या बेटांत आहे. शिवसमुद्रम् येथील शिवालयालाहि असेंच बेट मिळालें आहे. त्या धर्तीवर शकुन्तेश्वराची उभारणी केली असून त्याची पूजाअर्चा सतत चालू रहाण्याकरितां सदर गांव ब्राह्मणांना अग्राहार दिला आहे. म्हैसुराकडे व कर्नाटकाच्या इतर भागांत गांवोगांवीं ब्राह्मणांची अग्राहार म्हणून स्वतंत्र वस्ती आहे व त्या ब्राह्मणांना इनामेहि आहेत. तीं पाहूनच पेशव्यांनीं अग्राहार इकडे रूढ केला असावा. नाशिक व त्र्यंबक हीं दोन क्षेत्रे सार्‍या भारतवर्षांत महत्वाची आहेत. त्या दोन्ही क्षेत्रीं सगळ्या हिंदुस्थानांतून यात्रा लोटते. त्यांपैकीं त्र्यंबक येथील महादेवास त्याच्या कीर्तीस साजेसें मंदिर मिळणें जरूर असल्यामुळें नानासाहेबानें त्याच्या बांधकामास सन १७५५ त (शके १६७७) सुरुवात केली. हें बांधकाम ३१ वर्षे चालू राहून सन १७८६ त (शके १७०८) संपलें. (पां. न. पटवर्धन भा. इ.

सं. मंडळ वर्ष ४ थें त्रैमासिक) तें देवालय आणि त्याच्या समोरच ब्रह्मगिरीचा पर्वत व त्याच्या पायथ्याची वृक्षराजी पाहिली म्हणजे निसर्गाच्या विशालत्वांशीं व सौंदर्याशीं त्र्यंबकेश्वराच्या मंदिरानें स्पर्धाच मांडली आहे असें वाटल्याशिवाय रहात नाहीं.

नानाफडणीस महान् ईश्वरभक्त व रसिक. त्यांचीं एकट्याचींच बांधकामें घेतलीं तरी लाखों रुपये किंमतीचीं भरतील. त्यांनीं शिल्पांपैकीं अमूक एक तऱ्हा बांधावयाची ठेवली असें घडलें नाहीं. त्यांनीं वाडे उठविले, देवळें बांधलीं, घाट घडविले, हौद तयार केले, आणि तें केवळ पुण्यांतच नव्हे तर वेळासपासून वेरुळापर्यंत व वांईपासून काशपिर्यंत. नानांचें मूळ गांव कोकणांतील वेळास. त्या गांवीं काळभैरवाचें देऊळ त्यांनीं आपलेपणानें बांधलें. पौड पेठ्यांत अवळस येथें त्यांनीं एक तलाव, लहानसा नळ व तलावाच्या कांठीं शंकराचें देवालय बांधलें. भीमाशंकराची योग्यता त्र्यंबकेश्वराच्या खालोखाल. त्या देवास चांगलें मंदिर नाहीं हें न साहून त्याच्या बांधकामास नानांनीं हात घातला. तें कार्य आपल्या हातानें शेवटास नेणें नानांच्या नशिबीं नव्हतें. पण त्यांची ती इच्छा त्यांची अभागी पत्नी जिऊबाई हिनें साठ हजार रुपये लावून पूर्ण केली. कृष्णेचें पाणी तिच्या तीरावरची हवा व तिच्या सभोंवतीं फाकलेलें सृष्टिसौंदर्य याची प्रतीति नानांना होती. ते सन १७९१ त वाईस सवाई माधवरावांना घेऊन थोडे दिवस राहिलेहि होते. त्यांना वाईजवळचा मेणवली हा गांव मंत्री यांजकडून इनाम मिळाला होता. त्या खेडयास त्यांनीं आपल्या करामतीनें टुमदार बनविलें. तेथें त्यांनीं कृष्णेला एक छानदार घाट बांधला. त्या घाटास लागून अगदीं कांठीं-वर अमृतेश्वर व लक्ष्मीवासुदेव यांचीं सुंदर मंदिरें उभारलीं व कृष्णेचें पवित्र उदक सहज दृष्टीस पडेल इतक्या थोडया अंतरावर त्यांनीं आपल्याकरितां वाडाहि तयार केला. त्या वाडयास तटानें वेढून दरवाज्याच्या आसपास ब्राह्मणांना राहण्याकरितां घरें वगैरे इमारती बांधल्या. कायगांव टोकें हें क्षेत्र प्रवरा व गोदा-वरी यांच्या संगमाजवळ आहे. तेथें नानांचा एक घाट व चिरेबंदी वाडा आहे. ही क्षेत्रें दक्षिणेतील झालीं. ‘ पण साऱ्या हिंदुस्थानांत मुख्य क्षेत्र काशी. तेथें दुर्गा-घाटीं नानांनीं दक्षिणी तऱ्हेचा एक मोठा वाडा बांधला. पण याहिपेक्षां कांहीं पुण्यकृत्य काशीस करावें अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणें त्यांनीं कर्मनाशा-नदीच्या पाण्यास यात्रेकरूंचा स्पर्श होऊं नये, यासाठीं एक पूल बांधण्याचें ठर-

वून तसें काशींतील आपला कारकून भास्करपंत कुंटे यास कळविलें. त्यानें पुलाचा पाया खणण्यास सुरुवात केली. परंतु नदीमध्यें वाळूचा भराव व पाण्याचा जोर विशेष होता. त्यामुळें पायास धर लागेना. तेव्हां त्यांनीं तत्कालीन समजुती-प्रमाणें मांत्रिकास बोलावून कुमारस्वामी कोमटी यांचे विद्यमानें शके १७१८ सालीं (सन १७९६) अधिक भाद्रपद वद्य अष्टमीस अनुष्ठान आरंभिलें. ही गोष्ट नाना फडणविसांस कळतांच त्यांनीं मांत्रिकी अनुष्ठान बंद करण्यास सांगून बेकर नामक एका युरोपियन कारागिरास वीस हजार रुपये देऊं केले व पुलाचा पाया खोदण्यास सुरुवात करविली. बेकर यानें प्रथम पुलाचे पायांतील पाणी काढण्यास दोन बंब आणिले. परंतु ते लागूं पडेनात तेव्हां त्यानें कलकत्त्याहून कळीचे बंब नेऊन काम पुरें केलें. ' (इ. सं.).

सरदार रास्ते यांनीं नाना फडनाविसांइतक्या किंबहुना त्यांच्याहूनहि अधिक, भव्य व प्रेक्षणीय इमारती बांधल्या. रास्ते हे कित्येक पिढयांचे गर्भश्रीमंत. त्यांचें मूळगांव वेळणेश्वर, कोकणांत गुहागराजवळ. त्या गावीं ते विजापूरच्या अदिलशाहीपासून सावकारी करीत असत. ते कोंकणप्रांताची रसद विजापुरास पोचवीत. त्यांच्या घराण्यांतील एका पुरुषानें वेळणेश्वरभागांतलि लाखो रुपये किंमतीची बिनवारसी मिळकत जप्त करून विजापुरास बादशहाकडे पावती केली. त्यांची ही रास्त वागणूक पाहून बादशहानें त्यांस रास्ते ही पदवी दिली. तिच्या-वरून त्यांचें पहिलें उपनांव गोखले असतांहि रास्ते हेंच नवें नांव रूढ झालें. इ. स. १७०८ मध्यें शाहूमहाराज सातारच्या गादीवर बसले; तेव्हां त्यांच्या राज-धानींत आपल्या सावकारीच्या धंद्याचा जम चांगला बसेल असा कयास बांधून रास्त्यांच्या घराण्यांतील दोन पुरुष भिकाजी नाईक व सदाशिव नाईक हे साताऱ्यास येऊन राहिले. त्यावेळीं राज्याचा कारभार चालविण्यास व युद्धकर्मास, लागणारा पैसा राजेलोकांना सावकारापासून कर्जाऊ घेण्याचा प्रसंग वारंवार येत असे. अशाच देवघेवीच्या व्यवहारावरून रास्त्यांचा व शाहू महाराजांचा घरोबा वाढला व महाराज रास्त्यांच्या घरीं दिवाळींत फराळाकरितां आले असतां त्यांना वाढ-ण्यास भिकाजी नाइकांची कन्या गोपिकाबाईहि आली. महाराजांच्या नजरेसमोर नानासाहेब पेशवे होतेच. तेव्हां त्या उभयतांचा जोडा ठीक शोभेल असें योजून भिकाजी नाईकापाशीं गोपिकाबाईस नानासाहेबांना देण्याची गोष्ट महाराजांनीं काढली व थोड्याच दिवसांत वाई येथें त्यांच्या देखत त्यांचें लग्न होऊनहि गेलें.

पेशवे व रास्ते घराण्यांची सोयरीक अशा रीतीनें जमल्यावर रास्त्यांचा प्रवेश पेशव्यांच्या दरबारीं होऊन त्यांचे चिरंजीव मल्हारपंत यांस सरदारकी मिळाली. भिकाजीपंतास एकंदर पुत्र सात असून ते एकोप्यानें वागत असल्यामुळें त्यांच्या कर्तबगारीनें घराण्याची भरभराट फार झाली. मल्हारपंताच्या पश्चात् त्यांचे बंधु आनंदराव यांचें विशेष कर्तृत्व पाहून त्यांस पेशव्यांनीं सरदारकी दिली. आनंदराव व त्यांचे बंधु यांच्याच कारकिर्दींत रास्त्यांचीं मोठालीं बांधकामें झालीं. वांई येथें श्री महाविष्णु, लक्ष्मी, गणपति, काशिविश्वेश्वर, गंगा रामेश्वर, व पंचायतन हीं देवालयें व कृष्णानदीस घाट बांधले. धर्मपुरी ही नवी पेठ वसवून व बावन नवीं घरें बांधून ब्राह्मणांस धर्मादाय दिलीं. त्यांजला वर्षासनें व गंगापुरींत ब्राह्मणांना घरें बांधण्यास पैसा दिला. या धर्मकृत्यास खर्च अदमासें पंचवीस लक्ष रुपये झाला. बोपर्डीचा रस्ता व सोनजाईचा मार्ग यांच्या दुतर्फा आंब्याचीं झाडें लावलीं व त्यांचीं फळें ब्राह्मणांनीं धर्मार्थ घ्यावीं असें केलें, वाई गांवाभोवतीं कुसू बांधलें, पुणें व बाई यांच्या दरम्यान खांबटकिचा घाट आहे, त्यांतून दगडी पाट बांधून काढला. वाटेनें प्रवाशांसाठीं विहिरी खोदल्या व देवळें बांधलीं. पुण्यांत आपला वाडा व त्यांत लक्ष्मणेश्वराचें देवालय बांधलें आणि सन १७७८ त रास्त्यांची पेठ वसवून तिचें बाराशें रुपयांचें उत्पन्न देवाला दिलें. अनंतपूर येथें मोठा किल्ला बांधला. त्यास एक लाख रुपये खर्च आला. त्याखेरीज नाशिक, त्र्यंबक, सातारा, तासगांव, अनंतपूर, अथणी, पंढरपूर, तालीकोट व वाल्हें येथें वाडे व मांडवगड येथें बंगला बांधला. या सर्व कृत्यांस तीस चाळीस लाख रुपये खर्च झाला असावा. एका घराण्याची ही कर्तबगारी आश्चर्यकारक समजली पाहिजे. माधवराव पेशव्यानें कर्नाटकावर स्वारी केली, त्यावेळीं त्याजबरोबरच्या सरदारमंडळींत आनंदराव रास्ते व गोपाळराव, परशुरामभाऊ इत्यादि पटवर्धन होते. त्या सर्वांवर कर्नाटकाच्या स्वारीचा विलक्षण परिणाम होऊन त्यांची नजर विस्तृत झाली व त्यांना तिकडील देवालयांचा घाट, त्यांतील मूर्तींची घडण व धर्मादाय संस्था यांचें अनुकरण करावेंसे वाटलें. वाईच्या घाटावरील गणपतीची विशाल मूर्ति, तासगांवांतील गणपतीच्या देवळाचें गोपूर हें कर्नाटकाच्या निरीक्षणाचेंच फळ होय. कर्नाटकांत देवळें प्रसिद्ध व काशींत घाट प्रसिद्ध. रास्त्यांनीं काशीच्या धर्तीवर वाईस घाट बांधले आणि कर्नाटकांतील थाटावर देवालयें व अग्राहाराच्या तऱ्हे-

वर ब्राह्मणांकरितां धर्मादाय आळ्या बसविल्या. वाईचा ढोल्या गणपति पाहून बंगलोरचा गणपति व बसवण्णा यांची कोणासहि आठवण होईल. वाईक्षेत्र रास्त्यांच्या ताब्यांत होतें म्हणून त्यांनीं वाईवर नानाप्रकारचीं लेणीं चढवून तिला नटविलें हें तर खरेंच; परंतु त्या अलंकारांना सर्वस्वीं पात्र असेंच वाईक्षेत्र आहे यांत शंका नाहीं. कारण त्या स्थळावर निसर्गाची पूर्ण कृपा आहे. त्याच्या शेजारून कृष्णानदी वहात आहे व दोन्ही तिन्ही बाजूंस पर्वतांच्या रांगा लागून राहिल्या आहेत. हें स्थळ असेंच्या असेंच घेतलें तरी त्याच्या सौंदर्यांत किमपिहि उणें नाहीं. त्यांत कोठेंहि बसलें किंवा हिंडलें असतां चित्तांत आनंदाच्या नानाविध ऊर्मि उठतात. रास्त्यांनीं वाईस कृष्णेचा सबंध कांठच्याकांठ फरसबंदी केला आहे, कुंडांत पाणी अडवून जलक्रीडेची हौस भागविली आहे, देवालयें बांधून क्षेत्राचें पावित्र्य द्विगुणित वाढविलें आहे आणि तिच्या आजूबाजूस आंबराया लावून वाईला जणू काय भरजरी पैठणीच नेसविली आहे. त्याच वाईपासून पश्चिमेस आंबराईतून विहरत गेलें कीं, नानांच्या मेणवलीच्या अर्ध्या वाटेवर वांकण लागतें व वाकण टाकलें कीं, मेणवलीच. ही मेणवली म्हणजे निसर्गदेवतेचें कुंजवनच. कृष्णेच्या डोहांत जितकें पाणी त्यापेक्षां मेणवलींत एकांत अथांग भरला आहे. जसें मथुरेजवळ वृंदावन, तशी रास्त्यांच्या वाईजवळ नानांची मेणवली.

मुलुखगिऱ्या करून लहान–थोर मराठे लोक पैसा मिळवूं लागल्यामुळें मोठे वाडे, मजबूत घरें, सुंदर देवालयें व घाट सर्वत्र इतक्या मोठ्या प्रमाणावर बांधले गेले कीं, त्यामुळें अखिल महाराष्ट्र नव्यानें बांधून निघाला असें म्हणावयास हरकत नाहीं. हें जें विलक्षण चैतन्य व उत्साह समाजांत उत्पन्न झाला, त्यांतून सत्पुरुषहि सुटले नाहींत. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत ब्रह्मेंद्रस्वामी ही व्यक्ति महाराष्ट्रभर पंचवीस–तीस वर्षें गाजत होती. त्या एकट्या सत्पुरुषानें महाराष्ट्रांत थोडीं थोडकीं बांधकामें केलीं नाहींत. त्यानीं साडेआठ लक्ष रुपये खर्च करून ठिकठिकाणीं कित्येक इमारती उभारल्या. त्यांनीं रमणीय निसर्गस्थळे नेमकीं हुडकून काढावीं आणि ती ईश्वराराधनेची व जपतपाचीं स्थाने बनवावीं. त्यांनीं कोंकणांत चिपळुणाजवळील परशुरामाचें देवालय एक लाख रुपये खर्चून बांधलें. पुण्यापासून पूर्वेस कांहीं कोसांवर सिंहगडापासून सुरू झालेल्या डोंगराच्या रांगेच्या अगदीं शेवटाला भुलेश्वराचें देऊळ बांधून त्यासाठीं

एक लक्ष रुपये खर्च केलेः साताऱ्यापाशीं धावडशीस त्यांचा मुख्य मठच असल्यामुळें तेथील स्वतःचें घर, भार्गवरामाचें मंदिर व तलाव यांना सुमारें तीन लाख रुपये लावले. धावडशीपासून कांहीं अंतरावरील डोंगरावर मेरुलिंग नामक महादेवाचें स्थान आहे. त्या स्थानाची रम्यता काय वर्णावी ! तेथलि एकान्तात व थंड हवेंत ईश्वराराधन अधिक सुखानें करतां यावें यासाठीं त्यानी एक लाख रुपये खर्चून देवालय उभारलें. इतकें करूनहि त्यांनीं कृष्णातीर देवालयावांचून सुनें जाऊं दिलें असतें तर त्यांची अरसिकांतच गणचा व्हावयाची. म्हणून कृष्णाकांठीं मर्ढे या गांवीं रामेश्वराच्या देवालयाकारितां त्यांनीं पन्नास हजार रुपये खर्च केले. स्वामींचा हेतु निरानदीला हल्लींच्या निरा स्टेशनाजवळ पूल बांधण्याचा होता. कारण पावसाळ्यांत साताऱ्याकडून पुण्याच्या बाजूस जाताना चार महिने लोकांची फार खोटी होत असे. नदीवर नावा होत्या. पण नावाना हशील यावें लागे. तेव्हां एकदा पूल बांधला म्हणजे गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना त्याचा सारखा सोफत उपयोग व्हावा. या बाबतींत स्वामी शाहूमहाराजांची दासी (पत्नी ?) विरूबाई हिला लिहितात. ' हल्लीं आमचा हेत आहे जे निरेस दादर बांधावा. काय निमित्य म्हणाल; तर ज्यापाशी द्रव्य आहे तो द्रव्य देऊन (नावेनें) उतरतो. ज्यापाशीं द्रव्य नाहीं तो कष्टी होऊन माघारा जातो. ऐसे चार महिने लोक पावसाळयाचे श्रमी होतात. याकरितां चार कमाना बांधाव्या. पाच सात कामें जाहलीं ही तुम्हास पुसोन केलीं. हल्लींहि पत्र पाठविलें आहे. तर आपले पतीस सांगोन निरेस दादर बांधावयासी सांगणें. दादरास द्रव्य फार पाहिजे. त्यासी चार घरें आणखी चौ दिशास मागोन तुमचे नाव सांगोन चालवूं. दादर तुमच्या कीर्तीचा आहे. आम्ही फुकाचे जागली. तर आपले पतसि पुसोन दादर बांधावयाविशी पत्राचें उत्तर पाठविलें पाहिजे ' (ब्र. स्वा. चरित्र) स्वामींच्या हातून हें काम शेवटास गेले नाहीं असें दिसतें. त्यांनीं इतर इमारती बांधल्या त्यास ८॥ लक्ष रुपये खर्च केले. ही सारी रकम स्वामींनीं केवळ भिक्षेवर जमविली यांतच त्यांचें खरें कर्तृत्व कळून येते. निरेवरचा पूल पेशवाईंतच ब्रह्मेंद्रस्वामींचे पश्चात् पुढें केव्हां तरी बांधण्यांत आला असावा असें दिसतें. कारण दुसऱ्या बाजीरावाचे कारकिर्दीच्या अखेरीस त्याच्या सरदारांच्या व इंग्रजी फौजेच्या लढाया महाराष्ट्रांत ठिकाठिकाणीं झाल्या, तेव्हां त्यापैकीं एक लढाई विंचूरकर व इंग्रज यांची निरापुलाजवळ ता. २९-११-१८१७

च्या सुमारास झाल्याचा उल्लेख आढळतो. (पे. द. ४१) हा पूल हल्लीं एम्. एस्. एम् रेलवेवर निरा स्टेशन आहे त्याच्याजवळच होता.

पेशवाईत शेकडो सरदार निर्माण झाले. त्यांना महाराष्ट्रांत व महाराष्ट्राच्या भागांत जहागिरींचा वेगळा मुलूख तोडून देण्यांत आला. त्या मुलुखांत सरदार रहावयास गेले म्हणजे त्यांना स्वतःच्या योग्यतेस साजेशी राजधानी वसविणें, वाडे व किल्ले बांधणें आवश्यक असल्यामुळें महाराष्ट्रांत लक्ष्मीचा हात लहान खेड्यापासून शहरापर्यंत फिरल्यावाचून राहिला नाहीं. महाराष्ट्रांत डोंगरी किल्ले सर्वत्र आहेत, पण त्यामानानें भुईकोट किल्ले थोडे आहेत. हे भुईकोट किल्ले जेथें म्हणून आहेत ते सर्व राजधानीच्या रक्षणासाठींच बांधले गेले आहेत. ' नारोशंकर राजेबहाद्दर हे पेशवाईतलि एक मोठे सरदार होत. त्यांच्या नाशिक शहर व जिल्हा यांत कांहीं इमारती आहेत. मालेगांव ही त्यांची राजधानीं. विशेषतः तिच्या मजबुतीसाठीं त्यांनीं भुईकोट किल्ला बांधला. हा किल्ला गिरणा व मोक्षगंगा यांच्या संगमापासून एक मैल अंतरावर आहे. याला तीन कोट होते. आंतलि कोट अतिशय मजबूत असून आजहि नवीन कोटासारखा दिसतो. त्याच्या भोवतालीं खंदक व आंत पुनः परकोट आहे. परकोटाची भिंत तिजवरून एक गाडी जाईल इतकी रूंद आहे. किल्ल्याला लागूनच मालेगांव शहर वसलें आहे. हा किल्ला खानदेशाची किल्ली म्हणून प्रसिद्ध होता. नारोशंकरांनी तो १७६५त बांधला. किल्ला पुरा होण्यास दहा वर्षे लागलीं. (इ. सं.)

गांवांगांवांमधील व प्रांताप्रांमधील दळणवळणाकरितां पेशवाईत रस्ते होते. ते चांगले असल्याची साक्ष जनरल वेलस्लीच देत आहे. तो लिहितो ' The roads are excellent except when the rain is heavy ' (पाऊस फार पडत असतो तेव्हां खेरीज करून इतर दिवसांत रस्ते उत्कृष्ट असतात.) पण त्याहून चांगले रस्ते मोठाल्या शहरांतून व त्यांच्या आसपास असणें स्वाभाविक होय. कांहीं प्रमुख क्षेत्रांत व शहरांत आजहि जुने दगडी रस्ते क्वचित् आढळतात. पण सर्वत्र दगडी रस्ते बांधणें शक्य वाटत नाहीं. बाकीचे रस्ते मुरूम घालून तयार करण्यांत येत असावे. नानासाहेब पेशव्याच्या खालील मजकुरावरून हाच समज संभवतो ' पुण्याहून पाषाणपर्यंत, विठ्ठलवाडीपर्यंत, कात्रजपर्यंत, आळंदीपर्यंत, थेऊरपर्यंत वाटेवर झाडें पिंपर वगैरे लावावीं. प्रयत्न थोडा उपकार फार, यास्तव जरूर याप्रमाणें नारो आप्पाजी,

शिवाजीपंताकडून करवावे ?' (पे. द. ४०) या उताऱ्यावरून एक बोध हा होतो कीं, पुण्याहून देवदर्शनाकरितां पाषाण, विठ्ठलवाडी, आळंदी, थेऊर या स्थळीं भाविकांचें वारंवार जाणें असें. त्यांच्याकरितां वाटा असत. अर्थात् त्या गाड्या घोडीं, डोल्या, मेणे, पालख्या जाण्याचा बेताच्या रुंद व साफ असतील हें उघड आहे. फक्त त्यांजवर छाया नव्हती ती करण्याकरितां दुतर्फा झाडें लावण्याची इच्छा नानासाहेबानें प्रदर्शित केली. वरील स्थळांपैकीं पाषाण पांच मैल, विठ्ठलवाडी तीन मैल, कात्रज चार मैल, आळंदी तेरा मैल, थेऊर बारा मैल इतकें पुण्याहून अंतर आहे. साताऱ्याचा रस्ता कात्रजच्या घाटांतूग होता. सातारा पुण्याहून पासष्ट मैल आहे. हा सबंध रस्ता चांगला साफ केला असून त्यांतील कात्रजपर्यंतचा भाग झाडांनीं सजवावा एवढाच वरील इच्छेचा अर्थ आहे. कात्रजला तलाव असून तेथील पाणी पुण्यांत आणिलें होतें. इंग्रजांचें पाऊल महाराष्ट्रांत सत्तेच्या जोरावर पडूं लागल्यावर नवीन धर्तीवर सडका व पूल बांधण्यास त्यांनीं सुरुवात केली. इंग्रजांचा रेसिडेंट प्रथम पुण्यास रहावयास आला. त्याच्या मागून दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दींत इंग्रजी तैनाती फौजहि पुण्यास आली. तिच्या बराक्या खडकीच्या बाजूस झाल्यावर खडकीचा पूल बांधला गेला. हा पूल सन १८१३ त अस्तित्वांत असून इंग्रजांचीं पलटणें येरवड्याहून निघून त्या पुलावरून लकडी पुलानें पुण्यांतून ता. १-८-१८१३ चे सुमारास जावयाचीं ठरलीं होतीं. पुढें घोडनदीवर इंग्रजांचा रिसाला ठेवण्यांत आला. म्हणून अहमदनगराकडे जाण्या-येण्याच्या सोयीकरितां ता. १-३-१८१७ रोजीं घोडनदीवर पुलाच्या कामास सुरुवात झाली व पुढें घोडनदी ते अहमदनगरपर्यंत सडक बांधण्याचें कामहि ता. १-८-१८१७ रोजीं इंग्रजांनीं हातीं घेतलें. त्यासंबंधाचें वर्णन पुढीलप्रमाणें आढळतें. ' इंग्रज घोडनदीपासून नगरापर्यंत पंधरा हात रुंदीची वाट तयार करीत आहे. ' (पे. द. ४१)

प्रकरण पांचवें.

पाणीपुरवठा व इतर कामें

पुणें शहराची वाढ होत चालली त्याबरोबर वाढत्या वस्तीसाठीं पाणीपुरवठ्याची जरूरी भासूं लागली. नदीकांठीं वसलेल्या पेठांना नदीचें पाणी मिळत होतेंच. पण नदीपासून दूर अंतरावर दक्षिण दिशेकडे ज्या पेठा वसूं लागल्या, त्यांच्याकरितां वेगळी व्यवस्था करणें भाग पडलें. इतर ऋतूंपेक्षां उन्हाळ्यांत नदींत पाणी नसल्यामुळें नदीकांठच्याहि वस्तीचे हाल होत. मग नदीपासून दूर अंतरावर असलेल्या लोकांच्या हालांविषयीं बोलावयासच नको. ही स्थिति थोरले बाजीराव यांच्या मृत्यूनंतरहि कांहीं वर्षें होती. सन १७४५ सालची गोष्ट. त्या वर्षीं पुण्यास उन्हाळयात पाण्याचा तुटवडा लोकांना जाणवूं लागला. तेव्हां नानासाहेब पेशवा साताऱ्यास व त्याची आजी राधाबाई पुण्यास होती. पेशव्यांच्या व इतरांच्या अनेक बागा पुण्यांत व पुण्याच्या भोवतालीं असून त्यांतील झाडांना व भाजीपाल्यांला पाणी देण्याकरितां मोटा सुरू होत्या. राधाबाईस लोकांना पाण्याविणें तडफडत ठेवून बागेला पाणी देणें भूतदयेच्या दृष्टीनें अनुचित वाटलें. म्हणून तिनें मोटा लावण्यास आपल्या अधिकारांत मनाई केली. त्याविरुद्ध नानासाहेबाकडे नोकर लोकांच्या कागाळ्या गेल्या. तें कळल्यावरून तिने नानासाहेबांस पुढील पत्र पाठविलें. तें पत्र वाचून बाईच्या कडक स्वभावाची कल्पना येते.

‘ राजश्री त्रिंबकराव यांचे कारभारी आम्हांजवळ बागेच्या मोटा चालवावयासी परवानगी मागत होते. त्यांस आम्हीं सांगितलें कीं, बागेंत केळीं, ऊंस, वांगीचीं झाडें व मीर शेंगांचीं झाडें आहेत. तीं वाळलीं तरी कार्यास येतील. वरकड झाडें आहेत तीं कांहीं महिना दीड महिन्यांत मरत नाहींत. तशाहि मध्यें मरतीलच ऐशीं असतील त्यांस नेहमीं दोन पखाला लावून पाणी घालणें म्हणोन आज्ञा केली तें आइकलें नाहीं. आणि सातारियास लिहून पाठविलें, बहुत उत्तम केलें ! बाग बचावून शहर पाणिया (वांचोन) हैराण करावें हें तों कार्याचें नाहीं. (कारण) सरकारच्या पखालादेखील

(संगमावर) पाणियास जातात ऐसें आहे. नदींत पाणी नाहीं, याजकरितां हा बंदोबस्त आम्हीं केला आहे. मोटा चालत्या केल्यानें पाण्याकरितां आकांत होईल ऐसें आहे. हें खरें, अप्रमाण, ऐसें चित्तांत आलें असलें तरी कोणी शहाणा माणूस पाहावयाशीं पाठवावा. पाणियाचें पुढें कजिये होतील, मारामार होईल तें कांहीं आमच्यानें ऐकवणार नाहीं. याजकरितां लिहिलें आहे. हें चित्तास न ये तरी आम्हीच सातारियास येतों. येथें लोकांची हैराणगत पाहावणार नाहीं. प्रजन्य पडेल न पडेल हें कांहीं निश्चित कळत नाहीं, याजकरितां याप्रमाणें लिहिलें आहे...! (पे. द. १८)

त्याकाळीं घरोघर नळाचें पाणी आणून भिडविण्याची सुधारणा कोणाला माहीत नव्हती. मुसलमान बादशहानीं आपल्या शहरांत पाणी पुरवितांना हौदांची युक्ति अमलांत आणली. हे हौद सार्वजनिक स्वरूपाचे असून त्यांचें पाणी नागरिकांना मोफत मिळत होतें. त्या युक्तीचा अवलंब पेशव्यांनीं केलाच. त्याखेरीज पुरातन कालापासून गांवाशेजारीं तलाव बांधण्यांत येत, व त्या तलावांचें पाणी सरळ घरीं नेणें प्रत्येकास सोयीचें नसलें तरी घरोघरीं आड खणले असतां त्यांना तलवांतील पाण्याचा जिव्हाळा पोचत असे. या युक्तीनें ज्याला त्याला अल्पायासानें माफक पाणी मिळावें. अशा रीतीनें गांवाला पाणी मिळूनच्या मिळून आसपासच्या शेतांत त्याच जिव्हाळ्यावर विहिरी खणल्या जाव्यात व मोटस्थळाचें बागाईत तयार व्हावें. हीं तळीं मद्रास इलाख्यांत व म्हैसूर प्रांतांत गांवोगांवीं असलेलीं मराठ्यांच्या पाहाण्यात आलीं होतीं. अशीं तळीं पुण्याच्या आसपास व महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं पेशव्यांनीं, त्यांच्या सरदारांनीं व मुत्सद्यांनीं बांधलीं. दिवेघाटाच्या पायथ्याशीं व कात्रज गांवापाशीं पहिल्या बाजीराव पेशव्यानें तलाव बांधले. त्यांपैकीं कात्रजचा तलाव पुण्यांत नळानें पाणी आणण्यासाठीं तयार करण्यांत आला. त्याच्या बांधकामाला सुरुवात सन १७२९ त झाली व तें काम पुढें आठ वर्षांनीं पुरें झालें. या तलावाचें पाणी शनिवारवाड्यांत आलें व शहरांतील बऱ्याच पेठांतून बांधलेल्या हौदांना त्यानेंच पाणी पुरविलें. नाना फडणविसांनीं आपल्या प्रयत्नानें याच कार्यास हातभार लावला. पुण्यापासून पश्चिमेस दोन तीन कोसांवर नऱ्हे-आंबेगांव म्हणून खेडें आहे. त्या गांवच्या शिवारांतील एका विहिरीपासून नानांनीं पक्का चुनेगची नळ बांधून आणिला व तेंच पाणी सदाशिवपेठेच्या हौदांतून पुणेंकरास मिळूं लागलें.

दुसऱ्या बाजीरावानें विश्रामबाग वाडा व पुष्करणीचा हौद बांधला. त्याला पाणी आंबेगांवाचेच. पुण्यापासून दक्षिणेस तीन कोसांवर कोंढवें गांव आहे. त्या गांवापासून रास्त्यांनीं नळ बांधून आणिला. त्याचेंच पाणी रास्ते यांनीं आपल्या वाडयांतील हौदांत व बागेंत खेळविलें. या कार्यास त्यांना ९ लक्ष रुपये खर्च आला.

बाजीरावानें सदाशिवपेठेच्या हौदाचें पाणी सन १८०७ मध्यें पुष्करणीच्या हौदांत सोडलें. '५००० रु. सदाशिव पेठ कसबे पुणें येथें नानाफडणीस यांचे हौदांतून विश्रामबागेंत आमचे वाड्यांत नहर चांगला उत्तम प्रत बांधून पाणी आणावयाबद्दल नारोपंत दातार यांचे हवालीं केलें ' (पे. द. २२). सदाशिव पेठेच्या हौदाचें पाणी बाजीरावाच्या कारकीर्दीत बिघडलें असतां त्यानें दोन हजार रुपये नारोपंत दातार यांस देऊन त्यांजकडून दुरुस्तीचें काम मक्त्यानें करविलें. हल्लींचे कॉन्ट्रॅक्टर व तेव्हांचे मक्तेदार एकच. हीं कामें हल्लींप्रमाणें दातारच सव्वाशें वर्षांपूर्वी करीत असत, ही परंपरा लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

असे हौद पुण्यांत कित्येक ठिकाणीं बांधण्यांत आले. तरी त्यांचा लाभ त्या भोंवतालच्या चार दोनशें घरांनाच. पण जीं घरें हौदापासून बरींच दूर, त्यांची सोय होणें जरूर असल्यामुळें पर्वतीच्या तळ्याचें काम नानासाहेब पेशव्यानें हातीं घेतलें. ह्या तळ्याचें काम सन १७४५ त सुरू होतें. त्याविषयीं नानासाहेबास जिवाजी गणेश व रघुनाथ शिवराम यांचें पत्र स्वारींत पुढीलप्रमाणें गेलें—'तळ्याचें खणण्याचें काम एके सोईनें चवकशीनें उन्हाळा आहे तों खणविणें म्हणून आज्ञा केली. ऐशास तळ्यांत पेरू आहेत. त्याचे दक्षिणेकडे पश्चिमेकडे (खणण्याचें) काम लावलें आहे. तीनशें पांच सात अधिक याप्रमाणें गाडवे व टोणगे कामावर आहेत. व पावणे दोनशें बेलदार व त्यांच्या बायेका ऐशा आहेत. जेथें खणीत पहिले आले, पाण्यास भुई लागली तेच ठिकाणीं तूर्त काम चालत आहे. मजुरीचीं माणसें गावगन्ना पैका देऊन करार केला आहे. दोनशें माणूस तें लावून निकडीनें काम करतो. ' (पे. द. १८) हें तळें बांधल्यावर त्या बाजूच्या आडांना व विहिरींना पाणी येऊन वस्ती वाढली व नव्या नव्या बागा लावल्या गेल्यामुळें पुण्याची दक्षिण बाजू शोभिवंत झाली. साताऱ्यांतील पुरंदरे यांचे वाड्यांत यवतेश्वराच्या नहराचें पाणी आणविलें होतें. तेथील पेशव्यांच्या वाड्यांत त्याच वेळीं पाणी आणिलें. (इ. सं.)

पुणें-सातारा या मराठ्यांच्या राजधान्यांना पाणी पुरविण्याचीं कामें पेशवे व छत्रपति या सारख्यांनीं हातीं घेतलीं व शेवटास नेलीं. इतर सरदार आप-आपल्या शहरांतून हीं कामें स्वतःच्या खर्चानें करीत. पण या प्रकारचीं शहरें एकंदरीनें फार थोडीं. तीं वगळून उरलेलीं खेडीं साऱ्या देशांत अतिशय. जे गांव कृष्णा, गोदावरी, प्रवरा, भीमा, कोयना, इंद्रायणी असल्या लहान-मोठ्या नद्यांच्या कांठीं असत त्यांना त्याच नद्यांचें पाणी. त्यांच्याकरितां विशेष व्यवस्था करण्याचें कारण नसे. परंतु हजारों गांवें अशीं असत कीं, त्यांच्याकरितां पाण्याची सोय मुद्दाम केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. हीं कामें सांप्रत इंग्रज सरकार आरोग्यखातें, इमारतखातें व बंधाराखातें यांजमार्फत करवून घेतें. पेशवाईंत या कामासाठीं वेगळीं खातीं नव्हतीं. कोणी उदार व परोपकारी धर्मात्मे स्वतःच्या खर्चानें तलाव-विहिरी वगैरे बांधीत किंवा गांव अथवा गांवांतील प्रमुख लोक पुढाकार घेऊन स्वतःच्या जोखमीवर गांवांची सोय करीत. मात्र त्यांना या कामीं जो खर्च आला असेल त्याचा वांटा सरकारात मागितला असतां तो त्यांस मिळे. लोकोपयोगाकरितां तलाव व विहिरी बांधणारे धर्मात्मे त्या काळीं दुर्मिळ नसत. ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर हे याच कोटींतील सत्पुरुष होत. त्यांनीं पुणें व सातारा या प्रांतांत पाण्याचें दुर्भिक्ष पाहून किती तरी ठिकाणीं विहिरी व तलाव हजारों रुपये खर्चून बांधले आहेत. इंदापूर, नातेपुते, यवत, माळशिरस या भागांत हल्लींप्रमाणें तेव्हांहि पर्जन्य कमी पडून उदकावांचून माणसांचे व गुराढोरांचे हाल होत असत. ते न पहाववून स्वामींनीं विहिरी, बारवा व तलाव बांधिले. इंदापूर, नातेंपुतें येथील तलावांस त्यांनीं अनुक्रमें ४० व १० हजार रु. खर्च केले. फलटण चौऱ्याऐंशीं हा मुलूख असाच निर्जल. त्यांतील वारूगडाखालीं स्वामींनीं एक तळें खणलें.

ब्रह्मेंद्रस्वामी हे छत्रपति व पेशवे यांचे गुरु असल्यामुळें त्यांना धर्मार्थ लाखों रुपये खर्चण्याचें सामर्थ्य होतें. असें सामर्थ्य ज्यांच्या अंगीं नाहीं, परंतु परोपकाराची वासना जागृत आहे ते पुरुष स्वतःची पदरमोड करीतच; पण ती पुरी न पडल्यास ग्रामस्थांची मदत घेऊन गांवांच्या अडचणी निवारीत. हा मार्ग स्वावलंबनाचा असून तो स्वीकारावा लागल्यानें जनतेची सर्वसामान्य कर्तृत्वशक्ति पुष्कळच वाढली असेल यांत संदेह नाहीं. हें विशद करण्यास एक उदाहरण देतों. ' कसबे पाल (गणपतीची) येथें हाटाळे नांवाचें एक जुन्या काळचें

तळें होतें. तळ्यांत भूत आहे या समजुतीनें गांवच्या लोकांनीं त्याचा त्याग केल्यामुळें तें गाळानें भरून अगदीं निरुपयोगी झालें. पण पाल गांवीं चिमणाजी महादेव व माधवराव राम हे धीट व परोपकारी गृहस्थ होते. त्यांनीं भुतादेवतांचा बंदोबस्त करून तळयांतील गाळ काढला, त्यासभोंवतीं दगडी बांध घातला व घाटहि बांधला. इतकेंच नव्हे, तर तळ्याच्या दक्षिणेस, पश्चिमेस व उत्तरेस बांधावर आंबे, केळीं व फुलझाडें लावून त्यास गुलजारपणा आणिला. त्या कामास चिमणाजी महादेव व माधवराव राम यांनीं पदरचे आठशें रुपये लावले. खेरीज गांवकरी, वाणी-उदमी वगैरेंनीं उदकाचें काम परोपकाराचें जाणून पट्टी करून तीनशें बेचाळीस रुपये दिले. अशा रीतीनें गांवाला उदक विपुल झालें. वरील दोघां गृहस्थांनीं तळ्याची व्यवस्था सोळा वर्षें ठेवून त्याचा स्वतःहि उपभोग घेतला. परंतु तेथील सरकारी अधिकारी बाजी गोविंद यांनीं सदर तळें चिमणाजी महादेव व माधव राम यांच्या मालकीचें नसून सरकारी आहे असा प्रश्न उत्पन्न करून तळ्याचा ताबा मागितला. खरें म्हटलें तर तळें त्या दोघांच्या मालकीचें नव्हे. त्याच्या दुरुस्तीचा खर्च गांवकऱ्यांनींहि दिला असल्यामुळें तळें सार्वजनिक म्हणजे सरकारी ठरतें. पण तें सरकारी ठरून तरी उपयोग काय ? त्याची निगा सरकारातर्फे कोण ठेवणार ? व गांवकरी तरी व्यक्तिशः त्याजकडे किती लक्ष देणार ? त्यापेक्षां त्याची मालकी वरील गृहस्थांकडेच राहिल्यास ते मोठेपणा व स्वार्थ या दोन्ही हेतूंनीं तळें सुस्थितींत राखून गांवकऱ्यांस त्याचें पाणी घेऊं देतीलच हें लक्षांत घेऊन सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत पेशवे दरबारानें सदर तळें त्यांच्या मालकीचेंच ठरविलें.

पाल गांवीं सरकारानें आपला मालकी हक्क गमावला एवढीच झीज सोसली, गांवाला वेगळी रक्कम उचलून दिली नाहीं. कारण तसें करण्याची त्यांस गरजच पडली नाहीं. परंतु या बाबतींत गांवकऱ्यांकडून ज्या प्रकारच्या मदतीची अपेक्षा केली जाई त्या प्रकारची मदत करण्यास पेशवे सरकाराकडून हयगय होत नसे. बहुतकरून ही मदत द्रव्यरूपानें न मागतां गांवकरी किंवा गांवांतील प्रमुख लोक इनाम जमिनीच्या रूपानें मागत. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, गांवचे पाटील वगैरे वतनदार अंमलदारांना आपल्या अधिकारांत जमीन इनाम देण्याचीहि सत्ता असे. मात्र त्या इनामाला पेशवे सरकाराची अखेर मंजुरी घ्यावी लागे. ‘बेळगांव जिल्ह्यांत मनोळी व सतगिरे या दोन गांवांच्या दरम्यान सहा

कोसपर्यंत पाणी नव्हतें. याजकरितां रामचंद्र महादेव परांजपे यांनीं पदरचा पैका खर्च करून विहीर बांधून अरण्यांत पाणी उत्पन्न केलें. त्या पाण्याच्या शेजाराला पांथिकांना रहावेसें वाटल्यास सोबतीची गरज होती. तीहि परांजपे यांनीं तेथें कायमचे प्यादे ठेवून भागविण्याचें योजलें. हें सर्व विहिरींपाशीं वसाहत केली तरच घडून यावयाचें. पण वसाहतीस लागणारी जमीन सरकारी असल्यानें ती मिळण्याकरितां गांवातर्फे पेशव्यांना विनंति करण्यांत आल्यावर त्यांनीं दोनशें बिघे जमीन इनाम दिली ' (पे. डा.)

वरील इनाम केवळ सार्वजनिक कामासाठीं देण्यांत आलें. परंतु एखाद्या इसमानें आपल्या हिंमतीवर पाण्याची सोय केली तर त्या इसमास जमीन इनाम देऊन त्याच्या उपकारांतून मुक्त व्हावें असें गांवास वाटल्यास गांवाची ही इच्छा सरकारांतून पुरविली जाई. ' पुणें जिल्ह्यांतील इंदापूर येथें पाण्याचा तोटा होता. यास्तव आनंदराव मोरेश्वर व सदाशिव यादव जावडेकर यांनीं तळ्याची (ब्रह्मेंद्र स्वामींच्या ?) ' इमारत ' करून गांवास पाणी पुरविलें, म्हणून उतराई होऊन परगणे मजकूरचे कमाविसदार व जमीदार यांनीं एक चाहूर जमीन आनंदराव मोरेश्वर व सदाशिव यादव यांजकरितां इनाम करून मागितली व तिला पेशव्यांनीं मंजुरी दिली. ' (पे. डा.) गांवाला तलाव बांधल्यावर तो स्वच्छ ठेवण्याची जोखीम गांवकऱ्यांकडे असे व गांवांतील प्रमुख लोक तलाव शक्य तितका स्वच्छ राखीत. परंतु स्थळपरत्वें स्वच्छतेचें काम आपल्या आटोक्याबाहेरचें वाटल्यास गांवकरी सरकारांतून मदत मागवीत व सरकारहि ती त्यांस देई. ' कल्याणाहून वसईस खुष्कीचे मार्गानें जातां मनुष्यास उन्हाळे दिवशीं पाणी मिळत नाहीं असें पाहून मौजे राजावली तर्फ कामण प्रांत वसई येथील शिवेंत राजमार्गावर रानांत कोणी नवी धर्मपरायण विहीर बांधली. तिचें पाणी बहुत चांगलें असतां खाजणांतील कोळी मच्छीमार यांनीं येऊन विहिरींत पाय धुवावे, ताडाचे मद्य काढणाऱ्या भंडाऱ्यांनीं भोपळे धुवावे असा उपद्रव होऊं लागला. पाणी मूळचें निर्मळ व त्यासभोंवार नव्या लावणीच्या झाडांची छाया यांचा लाभ पान्थांना घेतां येईना. म्हणून बंदोबस्तासाठीं प्रांत मजकूरचे नेमणुकीपैकीं एक शिपाई मिळावा अशी गांवानें विनंति केली, व तिला पेशव्यांनीं मान्यता दिली. (पे. डा.).

' सवाई माधवरावाच्या वेळीं घाशीराम हा पुण्याचा प्रसिद्ध कोतवाल होता.

त्यानें पुण्याच्या पूर्वेस हडपसरच्या मार्गावर चिरेबंदी तळें बांधलें होतें. त्यांतलि पाणी वाटसरांच्या व गुराढोरांच्या उपयोगीं पडत असे. त्याच पाण्यावर त्यानें खासगत बागहि केला होता. तळ्याला उन्हाळ्यांत पाण्याचा तुटवडा येत असे. करितां मौजे मुक्कामीं कोंढवें बुद्रुक येथील ओढ्याचें पाणी नळ बांधून आणून तळ्यांत सोडावें असा विचार करून सदर नळ पांच हजार रुपये खर्चून ८०० गज अंतरापर्यंत त्यानें आणिला. परंतु पुढील कामास २५।३० हजार रुपये लागणार असल्यामुळें तितकी रक्कम त्यानें सरकारांत बक्षिस म्हणून मागितली. ही गोष्ट सन १७८९ मध्यें घडली. ' (इ. सं.)

पिण्याचें पाणी ही गांवाची एक गरज झाली. त्याखेरीज इतर कितीतरी गरजा असत. सार्वजानिक रस्तें, गांवकुसू, धर्मशाळा, देवालयें व पाटबंधारे इत्यादि कामीं खर्च कोणीं व किती करावयाचा याचा ठरलेला एकच नियम नव्हता. तीं कामें झालीं पाहिजेत हें मनाशीं योजून सरकार एकंदर परिस्थितच्यिा विचारानें खर्चाची व्यवस्था करीत असे. जेथें भार सोसण्याजोगे लोक असत तेथें खर्चाचा बोजा त्यांजवर टाकावा, पण जेथें ते असमर्थ असत तेथें सरकारानें तो आपल्याकडे घ्यावा; मात्र खर्चाची रक्कम हुजुरांतून न पाठवितां त्या त्या भागांतलि जमाबंदींतून वारावी, यावर सरकाराचा कटाक्ष असे. ' मौजे राजेवाडी तर्फ करेपठार प्रांत पुणें येथील हणमंताचें देवालय जीर्ण झालें होतें. तें देवालय व त्याच्या शेजारची धर्मशाळा नवी बांधावयाकरितां गांवकऱ्यांनीं सरकारांत अर्ज केला. देवालय हें गांवांतलि धर्माचें अधिष्ठान. हणमंताचें देवालय हें तर सामर्थ्याचें अधिष्ठान. तें नष्ट झाल्यास गांवाची (राष्ट्रीय दृष्ट्या) थोर हानि होईल हें जाणून सदर गांवच्या त्या सालच्या जमाबंदींतून १५० रु. घेऊन देऊळ व धर्मशाळा बांधावी आणि त्याचा खर्च प्रांत मजकूरचे ऐवजीं घ्यावा असें ठरविण्यांत आलें. ' गणपतीच्या पालीस अंताजी नारायण यांनीं धर्मशाळा बांधली होती. तिची शाकारणी करण्याबद्दल कमाविसदारास आज्ञा झाली. मौजे कोरेगांव तर्फ पाबळ येथें भिमा नदीवर धर्मशाळा कृष्णाजी भैरव बांधणार होते. त्यांस जागा द्यावी म्हणून सदाशिव चिमणाजी (पेशवे) यांस आज्ञा करण्यांत आली. पुण्याहून साताऱ्यास जाण्याचा एक रस्ता खांबटकीच्या घाटांतून आहे; त्या घाटापाशीं पोई घालण्यांत आली, व त्या कामावर नथो सदाशिव याची नेमणूक झाली. ' त्यास सामान डाळ चार पायली, गूळ वजन पक्के ८१॥।, पांच रांजण, दहा डेरे, दहा घागरी, दहा मडकीं,

दहा मोघे, दोन चराटे देणें व जोतें घालून देणें. याखेरीज मांडव व रहाण्यास दोन खोपा.' (पे. डा.) पाणपोई घातली तर तिला काय साहित्य लागतें याचा सर्व तपशील या वर्णनांत आहे.

नारोबा नाईक अनगळ हे मोठे सावकार पंढरपुरास भिमेच्या कांठीं पायऱ्या, संन्याशांचे मठ व ब्राह्मणांचीं घरें बांधून देत होते. त्या कामासाठीं ५०।६० हात चौरस जागा देण्याबद्दल आणि कामावरील पाथरवट व गवंडी यांस वेठ-बिगारीचा उपद्रव न लावण्याबद्दल कमाविसदारास आज्ञा झाली. (सन १७४३-४४) (पे. डा.) 'मौजे वेळू (खांबटकीच्या घाटापलीकडचे वेळे ?) येथें सरकारचें अन्नछत्र आहे. त्यास दुभत्या म्हशी सात जुन्या घेऊन नव्या देणे. अन्नछत्राचे गुरास वैरण गवत १५ हजार ठेवले असत.' सध्याच्या काळांत गावकुसाची उपयुक्तता उरलेली नाही. या कारणानें पूर्व काळीं त्याचें महत्त्व किती होतें हें लक्षांत न येणें स्वाभाविक होय. पेशवाईत व त्या पूर्वींहि गांवाच्या रक्षणास त्या सभोंवारचा तट अगदीं आवश्यक होता. बहुधा प्रत्येक गांवाला तट वेशी किंवा दरवाजे असतात. परचक्र गांवावर आलें, पेंढार गांव लुटण्याकरितां जवळ ठेपलें कीं गांवकऱ्यांनीं वेशी लावून घ्याव्या व गांवाचा बचाव करावा. अर्थात् ही तटबंदी मोठा खर्च करून बांधली जाई व ती पडली असतां तिची ताबडतोब दुरुस्ती करण्यांत येई. या कामीं सरकारांतून हयगय बिलकुल होत नसे. 'मौजे बारी परगणे कुंभारी हा गांव गोदारीच्या कांठीं तालुके धोडप येथील बेगमीस होता. गोदावरीस महापूर येऊन वारीच्या कुसास धक्का पोचला व त्याच्या तिन्ही बाजूच्या भिंती वाहून गेल्या. तेव्हां सदर कुसूं घालावयाचें काम गांवच्या मुकदमानें सुरू केलें व त्यासाठीं सरकारांतून ऐवज मागितला. त्याजवरून मौजे मजकूरचें जमाबंदींतून एक हजार रु० देण्यास तालुक्याचे अधिकारी बाजीराव आप्पाजी यांस हुकूम झाला.' (पे. डा.)

गांवचें कुसूं पडल्यानें गांवची वस्ती उठून व्यापारधंदा बसण्याचा संभव कसा असे हें मौजे ठेंगोडें या गांवाच्या हकीकतीवरून कळून येतें. ठेंगोडयाची पेठ मोठी होती. पण त्या गांवाचें कुसूं जागोजागी पडून वाटा झाल्या. वाटा बुजवून कुसूं दुरुस्त न केलें तर तेथील वाणी उदमी लोकांना ठेंगोडयांत राहून आपला धंदा चालविणें धोक्याचें होतें. म्हणून ते तेथून मालेगांवीं जाण्याच्या विचाराला लागले. अशा रीतीनें गांवची पेठच उठली तर पेठेचें सालीना सर-

कारात येणारें सात आठशें रुपयांचें उत्पन्न बुडाल्यावांचून राहिलें नसतें. ही नुकसानी टाळण्याकरितां ठेंगोडयाच्या कुसासाठीं एक हजार रुपये खर्च करण्याचें योजून निम्मा ऐवज गांवानें पट्टी करून द्यावा व बाकीचा सरकारानें सोसावा असें ठरलें (पे. डा.). परंतु ही पट्टी गरीबांना माफ असल्याचें खालील पत्रावरून समजेल. हें पत्र थोरल्या माधवराव पेशव्यानें नाना फडणविसास लिहिलें आहे. ‘सासवडास कुसूं घालावें लागतें. त्यास कसबे मजकुरीं वस्तीस घरें, वाडे आहेत. त्यांची मोजणी करून वाडे-घराचे बरहुकूम वर्गणी ज्याची त्याजवर घालून कुसूं आठ हात उंचीं व तीन हात रुंदी याप्रमाणें मातीचें तेथील कामदार बगाजी साबाजी यांस व गांवकरी यांस ताकीद करून सरकारचा कारकून व ढालाईत देऊन घालवणें. गांवांत नादार कुळें असतील त्यांस कुसाची वर्गणी न घालणें. जाणिजे. (पुरंदरे दप्तर भाग तिसरा).

निरा नदीस वर्षांतून चार महिने पूर येऊन वहातुक बंद पडत असे. तशी खोटी होणें राजकीय व व्यापारी दृष्टीनेंहि अनिष्ट असल्यामुळें नदीवर पूल बांधण्याची खटपट ब्रह्मेंद्रस्वामींनीं शाहूमहाराजांकडे चालविली होती असें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. पण नद्यांपेक्षांहि नित्याची अडचण घाटांची. डोंगराळ महाराष्ट्रांत एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जातांना डोंगरांची रांग आडवी यावयाची. तिच्यांतून पलीकडे जावयास घाट असत. त्या घाटांतून गाडयांची वहातुक अशक्यच. पण त्यांच्या ऐवजीं बैल, घोडीं, डोल्या, पालख्या हींच मुख्य वहानें. मालाची नेआण करण्याचें मुख्य साधन बैल. बैलांचे तांडेचे तांडे लमाण लोक बाळगीत. मोठमोठ्या लोकांनाहि गरजेप्रमाणें बैलांचे तांडे बाळगावे लागत. ब्रह्मेंद्र स्वामीचें दळणवळण कोंकणाशीं फार, म्हणून त्यांनीं आपल्या पाशीं दोनशें बैल ठेवले होते. घाटांचें हें महत्त्व ओळखून त्यांतील वाटा दुरुस्त राखण्याची खबरदारी पेशव्यांकडून घेतली जात असे. शांततेच्या काळीं घाट जितके उपयुक्त तितकेच युद्धप्रसंगीं, त्या अगदीं नाक्याच्या जागा असल्यामुळें शत्रूच्या सैन्याचा प्रवेश आपल्या मुलुखांत होऊं द्यावयाचा नसेल तेव्हां राज्यकर्ते घाटांतील वाटा मोडून टाकीत. मराठे व इंग्रज यांचें युद्ध राघोबाच्या निमित्तानें जुंपलें व मुंबईकर इंग्रजांच्या फौजा घाट चढून कोंकणांतून पुण्याकडे यावयास निघाल्या. त्या आणीबाणीच्या प्रसंगीं पुणें दरबारानें कल्याणाहून जुन्नराकडे यावयाच्या वाटेवरील मालसेजचा घाट पाडून टाकला. पुढें लढाई संपून तह

झाल्यावर नित्याच्या वहातुकीस घाटाची गरज उत्पन्न झाली. पण घाटाची बंदिस्ती कोणीं करावयाची ? त्यांचा उपयोग कोकण व देश या दोन्ही विभागांना होता. म्हणून खर्चाची वांटणी करण्यांत आली. तिच्या अन्वयें ऐवजाचे तीन हिस्से पाडले. त्यांपैकीं कमाविसदार प्रांत कल्याण भिवंडी यांजकडून एक हिस्सा, कमाविसदार जकात प्रांत पुणें व जुन्नर यांनीं दुसरा हिस्सा व बाकी एक हिस्सा शिवनेर तालुक्याचे मामलेदार बाळाजी महादेव यांनीं घालून घाट बंदिस्त करण्यास पुणें दरबारानें फर्माविलें. हीं कामें ज्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या नजरेखालीं होत असल्यानें स्थानिक लोकांना रोजगार मिळून त्यांच्या निर्वाहास मदतच मिळत असे.

मालसेजचा घाट यावेळीं दुरुस्त केल्यावर तो पुढें कांहीं दिवसांनीं पावसाळ्यांत पडल्यामुळें त्याच्या डागडुजीची पुन्हां पाळी आली. त्या बाबतींत पेशवे दरबारानें कृष्णाजी बल्लाळ या शिवनेरच्या मामलेदारांस पत्र लिहिलें, त्यांत घाटाची उपयुक्तता सांगितली आहे. ‘ मालसेज घाट तालुके शिवनेर येथें आहे. त्यास अवघड जागे होते, तेथें जुनी बंदिस्त कोरे दगडांची होती. ती साल मजकुरी पर्जन्य भारी पडल्यामुळें जागा जागा कोसळून गेली. बैल जावयाचा मार्ग मोडला. नवी बंदिस्त केल्याशिवाय घाट चालून जकातीची आबादानी होत नाहीं व याजकरितां नवी बंदिस्त कोरे दगडांची बांधोन हंगामी घाट चालता केल्यास वाणी उदमी जाऊन आबादानी करतील ’ घाटदुरुस्तीचे हे सरकारी प्रयत्न झाले. पण ब्रह्मेंद्रस्वामींसारखा परोपकारी पुरुष स्वतःच्या खर्चानेंच असलीं कामें उरकून टाकी. त्यांनीं सातारा व पुणें यांच्या दरम्यानचा खांबटकीचा घाट ४५ हजार रुपये खर्चून बांधला.

प्रकरण सहावें.

शिक्षणपद्धति

त्या काळीं प्रजेच्या शिक्षणाची गणना सरकारच्या कर्तव्यांत होत नव्हती. ज्यानें त्यानें आपल्या मुलांच्या शिक्षणाची तजवीज आपल्या इच्छेप्रमाणें व शक्ती-प्रमाणें करावी अशी स्थिति असल्यामुळें सर्वांना सारखी लागूं पडणारी शिक्षण-पद्धति तेव्हां नव्हती. शिक्षणांत लष्करी शिक्षण व्यावहारिक शिक्षण व धार्मिक शिक्षण असे तीन भाग दाखवितां येतील. लष्करी शिक्षणाच्या शाळा नव्हत्या व त्यासंबंधीं क्रमशः ज्ञान देणारीं पुस्तकेंहि उपलब्ध नव्हतीं. या शिक्षणाचेहि एक मल्लविद्येचा व दुसरा युद्धोपयोगी हत्यार वापरण्याचा असे दोन भेद आपोआपच उत्पन्न होतात. पहिल्या प्रकारांत जोर, जोडी, मल्लखांब, लेजीम, नमस्कार, कुस्ती या व्यायामाचा समावेश होतो आणि दुसऱ्यांत घोड्यावर बसणें, तलवार, बोथाटी, भाला व बंदूक चालविणें आणि बाण सोडणें यांची गणना करावयास पाहिजे. मल्लविद्येचें शिक्षण गांवगन्नाच्या तालमींतून मिळत असे व त्याचा षोक वाढविण्याकरितां जत्रेच्या किंवा उरुसाच्या वेळीं फडावर कुस्त्या लावण्यांत येऊन यशस्वी जवानास नारळ, पागोटीं, कडीं, तोडे इत्यादि बक्षिसें दिलीं जात.

देशांतील झगड्यांत स्वतःचा टिकाव लागण्याचें साधन शरीरसामर्थ्य हेंच असल्यानें महाराष्ट्रांतील प्रत्येक इसम आपल्या आयुष्याचीं कांहीं वर्षें तें कमा-वण्यांत घालविल्यावांचून रहात नसे. लष्करी शिक्षणाची गरज त्या खालोखाल होतीच. कारण पोट भरण्याचें व उदयास येण्याचें लढाईतील पराक्रम हेंच मुख्य साधन होतें. या कलेंत बहुतेक महाराष्ट्रीय पटाईत असत. दांडपट्टा, बंदूक, भाला, बाण चालविण्याची कला घरच्या घरीं हस्तगत झाली, तरी त्या कलेची पूर्तता रणांगण पाहिल्यावांचून होणारी नव्हे. यासाठीं सरदार लोक आपल्या दहा बारा वर्षांच्या मुलांनाहि आपल्या बरोबर स्वारींत घेऊन जात आणि आपण कसे लढतों, इतर सरदार व शिपाई कसे लढतात, दोनहि पक्ष एकमेकांशीं कसे

डाव खेळतात, शत्रूनें टाकलेला पेंच आपले सैनिक कसा सोडवितात याचा थाट दाखवून त्यांची नजर मारीत. त्यामुळें त्यांना मरण्याची अगर मारण्याची भीति सहजच वाटेनाशी होई. मोठमोठे योद्धे निपजण्याची रणांगण हीच शाळा होती व तेथेंच होतकरू वीरांचे उपजत गुण दृष्टोत्पत्तीस येत.

लष्करी शिक्षणाच्या खालचा मान व्यवहारिक ऊर्फ पुस्तकी शिक्षणास मिळत होता. केवळ किरकोळ स्वाराला व शिपाई गड्याला पुस्तकी शिक्षणाची तितकी गरज वाटत नसली तरी मुत्सद्दी व सरदार यांना त्याचें महत्त्व कळून ते आपल्या मुलास सदर शिक्षण दिल्यावांचून रहात नसत. मुत्सद्दीवर्गांत मुख्यतः ब्राह्मण व तत्सम पांढरपेशे असत आणि सरदारांत ब्राह्मण व मराठे हे उभयतां बरोबरीनें चमकत. पण मराठा सरदार अक्षरओळखीपेक्षा अधिक ज्ञान मिळविण्याच्या खटपटींत पडत नसावा. तथापि ब्राह्मण सरदाराचें तसें नसे. तो परिस्थित्यनुरूप सरदार बनला असला तरी मूळचा जातीनें ब्राह्मण म्हणून ब्राह्मण या नात्यानें त्याला ज्या धर्मज्ञानाची व ब्रह्मकर्माची जरूरी तें सर्व ग्रंथांतून लिहून ठेवलें असल्याकारणानें त्याला लिहिण्यावाचण्यास शिकणें अपरिहार्य होतें. त्यांतील कित्येक ब्राह्मण बहुश्रुत किंबहुना विद्वान् गणले जाण्याच्याहि योग्यतेचे असत.

ब्राह्मणांखेरीज इतर कित्येक जातींना म्हणजे वाणी, उदमी, सोनार, शिंपी इत्यादिकांना आपआपला व्यवहार पहाण्यासाठीं व पारमार्थिक उन्नतीसाठीं पुस्तकी शिक्षणाचें अगत्य बाळगावें लागत होतें. अर्थात् प्रत्येक मोठ्या गांवांत अशांची शिकाऊ मुलें पांचपंचवीस असावयाचींच. ही सार्वत्रिक गरज भागविण्याजोगा एखादा माणूस गांवात असे व तो पंतोजीपणा करून त्यावर आपला प्रपंच चालवी. पण जे समाजांतील मातबर, प्रतिष्ठित व संपन्न गृहस्थ असत ते आपल्या मुलांना अशा गांवठी शाळेंत न पाठवितां पदरीं मनुष्य बाळगून त्याजमार्फत शिक्षण देत. त्यांनाहि आपल्या मुलांचा अभ्यास उत्साहानें चालू रहाण्याकरितां त्यांजबरोबर कोणी चढाओढ करणारीं इतर मुलें भेटलींच तर तीं हवींच असल्यानें त्यांच्या घरगुती शिक्षणाचा फायदा इतरांनाहि सहजच मिळे.

शिक्षण लष्करी असो कीं व्यावहारिक असो, तें एकाच वयांत देण्याची पद्धत होती. इतकेंच काय पण याच शिक्षणाबरोबर सुखवस्तु ब्राह्मणाच्या मुलांस दुपारीं भोजनोत्तर घरच्या भटजीपाशीं बसून ब्रह्मकर्माचेहि पाठ घ्यावे लागत.

किंबहुना असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, मुलगा ५।६ वर्षांचा होतांच त्याला बाळबोध–मोडी लेखनवाचन, उजळणी, हिशेब इत्यादिकांचे धडे क्रमानें देत असतांच त्याच्या व्रतबंधाची वेळ यावी. ती आल्यावर स्नानानंतर व भोजनोत्तरहि त्यानें गुरुजीपाशीं बसून संध्या, पुरुषसूक्त, सौर, रामरक्षा, त्रिसुपर्ण, पूजा, रूपावली, समासचक्र शिकावें आणि बाकीच्या वेळांत सकाळीं व तिसरें प्रहरीं आपला पंतोजीजवळचा अभ्यास करावा. या शिक्षणक्रमांत वाढत वाढत मुलगा दहाव्या बाराव्या वर्षाच्या घराला आला म्हणजे त्याला तालमींत घालावें व पुढें हळू हळू लष्करी शिक्षणांत तरबेज बनवावें. अशा रीतीनें वयाची सुमारें पंधरा सतरा वर्षें झाल्यावर मुलगा कर्ता व प्रौढ समजला जाऊन तो कुटुंबाचा भार उचलण्यास व संसार चालविण्यास समर्थ ठरत असे.

मल्लविद्या व युद्धकला

महाराष्ट्रांत सर्वांत श्रेष्ठ घराणें साताऱ्याच्या छत्रपतींचें. त्यांच्यापैकीं शिवाजी महाराजांखेरीज इतर महाराजांना शिकविण्याची पद्धति कशी होती हें समजण्याचीं साधनें उपलब्ध नाहींत. शिवाजीस शिकविण्याची व्यवस्था दादोजी कोंडदेवाकडे होती. ती ब्रह्मकर्माशिवाय वर वर्णिल्याप्रमाणें असावी. परंतु त्यापेक्षां खरी विश्वसनीय माहिती पेशव्यांपासूनच मिळते. पेशव्यांतहि बाळाजी विश्वनाथाचें लहानपण अज्ञातच आहे. त्याचे पुत्र बाजीराव व चिमाजी अप्पा यांच्या शिक्षणाची माहिती अनुमानिकच.

पण त्यांच्यानंतरच्या पेशव्यांची माहिती क्रमाक्रमानें अधिकाधिक प्रमाणांत मिळूं लागते. नानासाहेब पेशवे स्वतःच्या तालीमखान्यांत नियमानें मेहनत करीत असत. त्यांच्या पदरीं नामांकित पैलवान व जेठी होते. आनंदराव नांवाचा त्यांच्या आप्तवर्गापैकीं एक गृहस्थ चांगला पैलवान असून त्यानें साताऱ्यास शाहूमहाराजांसमक्ष एका कर्नाटकी जेठीशीं कुस्ती करून त्यास जिवें मारलें. म्हणून शाहूमहाराजांनीं खुष होऊन त्यास इनाम दिलें. (पे. द.) सन १७५४ त लच्छा व कन्हैय्या या दोन जेठ्यांनीं कुस्त्या घेतल्या म्हणून त्यास पंचवीस रुपये इनाम देण्यांत आलें. तसेंच त्याच सालीं येगा जेठीला ७५ रुपये इनाम मिळालें. भाऊसाहेबाची तालमीच्या नादाविषयीं विशेष प्रसिद्धि होती. उदगीरच्या मोहिमेस निघण्याच्या सुमारास मुजफरखान नामक गारद्यानें त्याच्या खुनाचा प्रयत्न

केला, पण त्यांतून तो शर्थीनें बचावला. त्या वेळीं झालेल्या जखमांमुळें आपल्याला व्यायाम कसा बंद ठेवावा लागला हें त्यानें ता. १६–१२–१७५९ रोजीं नानासाहेबांस पत्रानें कळविले. त्यांत तो म्हणतो, ' माझी प्रकृत प्रस्तुत बरीच आहे. दोहोंतीहीं दिवसांआड एकदा जेवतों. संभाळून जेवावें लागतें. पथ्य अगदीं नाहीं. जड मात्र फार खात नाहीं. औषध पहिलें चालतें तेंच आहे. जखमेचें कातडें अजून बळकट झालें नाहीं. शिरेवर (जखम) म्हणून अंग थोडेंसें दुखत असतें. शक्ति अजून चांगली येत नाहीं. पाठीमुळें दंड-नमस्कार नाहींत. ते चाली लागल्या, याहून बरें वाटेल. थोडा थोडा प्रारंभ आहे. ' (पे. द.) यावरून दंडनमस्काराचा त्याचा व्यायाम नित्याचा होता हें स्पष्ट झालें.

नानासाहेबांच्या वेळेपासून पेशवे घराण्यांत सत्तेस स्थिरता येत चालली, तसतशी इतर व्यवस्थेप्रमाणें शिक्षणपद्धतीसहि शिस्त प्राप्त झाली. शाहूमहाराज हयात होते तोंपर्यंत पेशव्यांचे दोन पाय दोन ठिकाणीं गुंतलेले असत. एक पाय साताऱ्यांत व दुसरा पाय पुण्यांत. साताऱ्यांत पेशवे घराण्यापैकीं कोणी प्रमुख पुरुष रहात व तेथील राजकारण संभाळीत. नानासाहेबांचा मुक्काम बाजीरावाच्या हयातींत साताऱ्यांत होताच. पण बाजीराव मरण पावल्यावर पेशवेपद नानासाहेबांकडे आलें असतांहि स्वतः नानासाहेबांस साताऱ्यास जावें–यावें लागत होतें; यामुळें केव्हां केव्हां नानासाहेब साताऱ्यांत व सदाशिवरावभाऊ पुण्यांत राहून एकंदर कारभार पहात असत. दोघे भाऊ दोन ठिकाणीं असल्यामुळें कुटुंबांतील माणसेंहि दोन ठिकाणीं विभागलीं गेलीं होती. म्हणून त्यांचीं भावंडें व इतर कौटुंबिक कधीं साताऱ्यांत तर कधीं पुण्यांत जाऊन येऊन असत. शाहूमहाराज मोठे ऐषआरामी, त्यांना साताऱ्यांत एकसारखें राहून चैन पडेनासें झालें म्हणजे ते आसपासच्या रानांत राणीला घेऊन शिकारीला जात. ते शिकारीस गेले असतां राजकारणाचीं बोलणीं बोलण्याकरितां बरोबर नानासाहेबासहि नेत. नानासाहेबांनीं शाहूमहाराजांच्या इच्छेवरून कधीं कधीं आपल्या धाकट्या भावंडांनाहि बरोबर घ्यावें. नानासाहेबांचे दोन धाकटे भाऊ एक रघुनाथराव व दुसरा जनार्दनपंत. सन १७४९ सालचीं गोष्ट. त्या वेळीं नानासाहेब २८ वर्षांचे, रघुनाथराव १५ वर्षांचा व जनार्दनपंत बारा-तेरा वर्षांचा होता. रघुनाथराव साताऱ्यास नानासाहेबापाशीं होता, व जनार्दनपंत पुण्यास भाऊसाहेबापाशीं होता. या नंतर थोड्याच वर्षांनीं रघुनाथराव स्वतः मोठाल्या फौजा बरोबर घेऊन

दिल्ली-अटकेपर्यंत स्वाऱ्यांवर जाऊं लागला. त्या दृष्टीनें त्याचा या वेळीं लष्करी व पुस्तकी अभ्यास संपत आला होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. पेशव्यांनीं पुण्यास आपल्या पदरीं पैलवान बाळगले होते. त्यांतील कांहीं हिंदु व कांहीं मुसलमान होते. पैलवान बाळगण्याचा एक हेतु असा कीं, पेशवे घराण्यांतील तरुणांना त्यांनीं तालमीचें शिक्षण देऊन त्यांचें शरीर कमवावें. या कार्याशिवाय त्यांचे इतरहि उपयोग असत. त्यांच्या आपसांत व इतर ठिकाणच्या पैलवानांशीं कुस्त्या होत. त्यायोगानें कुस्तीच्या व्यवसायास उत्तेजन मिळून बहुजनसमाजांतहि पैलवानगिरीची आवड वाढत असे.

घरीं पैलवान बाळगले असल्यामुळें रघुनाथराव व जनार्दनपंत यांस कुस्तीचा नाद कसा लागला होता हें त्यांज्रमधील पत्रव्यवहारावरून उघड होतें. महंमद हुसेन व ढोले हे दोन जोडीचे पैलवान पुण्यास होते. त्या दोघांत महंमद हुसेन, हा ढोले याला खात्रीनें पाडील असा भरंवसा रघुनाथरावास होता. म्हणून त्या दोघांची कुस्ती भाऊसाहेबास लावावयास सांगून कोण कोणास पाडतो हें कळविण्यास रघुनाथरावानें जनार्दनपंतास लिहिलें. रघुनाथराव जनार्दनपंतास पत्रांत म्हणतो, ‘ महंमद हुसेन याची व ढोल्याची कुस्ती लावावी. आज नानापाशीं मी बोललों कीं, महंमद हुसेन पाडील. त्यास तीर्थरूप राजश्री भाऊस सांगून झोंबी लावून कोण पाडतो, कसें होतें तें सविस्तर लिहावें. सत्वर झोंबी लावावी. तीर्थरूपास कागद वाचून दाखवून लवकर कसें होतें तें लिहिणें. ’ (पे. द. १८)

घोड्यावर बसण्यांतहि रघुनाथराव या वेळीं पटाईत झाला होता असें दिसतें. साताऱ्यास नानासाहेबांपाशीं खंडाईत व अरास हे दोन घोडे होते. त्या घोड्यांवर बसून त्यांना रघुनाथरावासारख्या मुलानी फेरणें व पळविणें या गोष्टी मुलामुलांत अवघड समजल्या जात होत्या. साताऱ्यास गेल्यापासून रघुनाथराव त्या घोड्यांवर बसूं लागला हें समजून जनार्दनपंतास नवल वाटलें व आनंदहि झाला. म्हणून त्यानें स्वतःची खात्री करून घेण्याकरितां रघुनाथरावास लिहिलें. त्यावर रघुनाथराव कळवितो ‘ खंडाईत फेरला व अरास पळवला देखील ! ’ पण हा मजकूर आपण लिहिला व तो वडील बंधु नानासाहेब यांच्या नजरेस चुकून पडला तर ते फुशारकीच्या गोष्टी लिहितो असा दोष देतील म्हणून रघुनाथराव यानें हा वेळपर्यंत लिहिलें नव्हतें. तो जनार्दपंतास सुचवितो ‘ येथें नाना म्हणतील कीं, फुशारकीच्या गोष्टी लिहितात. यास्तवच न लिहिलें ’ (पे. द. १८).

रघुनाथराव १५ वर्षांचा झाला तेव्हां त्याला स्वारी-शिकारीची माहिती होऊन त्याची नजर मेली पाहिजे या हेतूनें शाहूमहाराजांच्या शिकारींत नानासाहेबांनीं त्यास आपल्याबरोबर घेतलें होतें. या हकीकतीचें पुढीलप्रमाणें पत्र रघुनाथरावानें भाऊसाहेबास पाठविलें.

तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामी वडिलांचे सेवेसी (सन २–२–४९) अपत्यें रघुनाथानें चरणावरी मस्तक ठेवून सा. नमस्कार विनंति येथील कुशल तागाईत माघ वद्य ११ शुक्रवार मुक्काम जांब नजीक जरांडा पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असो विशेष......यानंतर राजश्री (शाहूमहाराज) शुक्रवारीं खेडाहून तिरपुटीस आले. आम्ही शनिवारीं जांबास आलों. त्याजपासून येथेंच मुक्काम आहे. त्यास कारण हेंच कीं, बाईसाहेबांस बरें वाटत नाहीं. दोन तीन शिकारी राजश्रींबरोबर केल्या. त्यांस कांहीं ज्वर आला म्हणून येथें रहाणें जाहलें. आणिक दोनतीन दिवस होईलसें वाटतें. पुढें मग जाणार. तूर्त आम्हांस निरोप लवकर होईलसा दिसत नाहीं. दहावीस रोज स्वारीस लागतील.......

जांब, जरंडा डोंगर, तिरुपति हीं स्थळें साताऱ्याजवळ आहेत. तिकडील डोंगराळ व झाडीच्या प्रदेशांत लव्याजम्यानिशीं ऐषआरामानें शाहूमहाराज शिकारी करीत फिरत असून ते त्यांत सुमारें एक महिना घालविणार होते. त्या शिकारीबरोबर असतां रघुनाथरावांचें सारें लक्ष महंमद हुसेनाच्या कुस्तीवर जडलें होतें.

बहुतेक याच सुमारास शाहूमहाराज जांब व जरंड्याचा डोंगर मागें टाकून पूर्वेस वर्धनगडापावेतों शिकारीस गेले. त्या प्रसंगाची रघुनाथरावानें सदाशिवराव भाऊस लिहून पाठविलेली हकीकत वाचनीय आहे. हें पत्र ता. १० फेब्रुवारी सन १७४९ चें आहे.

तर्थिरूप राजश्री भाऊ स्वामी वडिलांचे सेवेसीः—

मुकाम कुवेटनजीक वर्धनगड पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असो. विशेष आपणांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी ऐसे नसावें. सदैव पत्रद्वारा लेंकराचा परामर्ष करीत असलें पाहिजे. विशेष काल आमचें जांबाहून कूच जाहाले तें येथें आलो. राजश्रींचें (महाराजांचे) तेरवांच्याच

दिवशीं कूच होऊन कोरेगांवास आले. आमचें काल जाहाले. आज उद्या निरोप व्हावासा आहे. येथून जेंजुरी-कुरकुंबें करून येतीलसें वाटतें. राजश्री निरोप द्यावयास फार चुकावतात. शिकारीस जातात, नजर घेत नाहींत. फारसे जाहालें तर नजर आम्हांपाशीं ठेवून जातील. आम्हास महिना पंधरा दिवस रहावें लागतें. राजश्रींनीं सांगितले कीं पेशव्याच्या भावास येथें ठेवणें. त्याजवरून आम्हास ठेवावयाचा करार जाहाला आहे. हजार फौज आम्हा-बराबर राहलि. नाना व आम्ही मुंजीस निरोप घेऊन येऊं असें आहे. ' (पे. द. ४०).

शाहूमहाराजांच्या पोटीं संतान नव्हतें. पण मुलांची हौस. यासाठीं करमणूक म्हणून रघुनाथरावास मुद्दाम नानासाहेबाला भीड घालून त्यांनीं बरोबर घेतलें होतें. हल्लीं जांबगांव वांई तालुक्यांत व वर्धनगड कोरेगांव तालुक्याच्या पूर्व हद्दीवर आहे. महाराज शिकारीवर असले तरी त्यांना नजराणा व्हावयाचाच. तो स्वतः न घेता नानासाहेबांस द्यावयास महाराज रयतेला सांगत असावे. एक हजार फौज नानासाहेबाबरोबरच होती. यावरून शिकारीचा थाट लक्षांत येतो. रघुनाथ-रावास केवळ इतर पैलवानांच्या कुस्त्या पहाण्याचा नाद होता असें नव्हे. तर तो स्वतःहि तालीम करीत असे. तो नाना पुरंदरे यांस कळवितो. ' (तुम्ही) ज्वराचा मजकूर लिहिला तर तो सखारामपंतीं सांगितला असावा. परंतु तो लटका ......दूवक्त दंड काढतों. दो रोजाआड घोडीं फेरावयास जातो. खातों तें जिरतें. तुम्हास कळावें म्हणोन लिहिले असे. '

विश्वासराव व माधवराव यांस तालमीचा अभ्यास लहानपणापासून होता. सन १७५४ च्या पेशव्यांच्या रोजकीर्दीत नोंद आहे. ती अशी ' खर्च जिन्नस -राजश्री विश्वासराव व माधवराव येंजकडे. तालीमखान्यांत लावावयाची आगर-बत्ती सुमारें एक.. ' तालमींत मेहनत करताना श्वासोच्छ्वासानें अशुद्ध होणारी हवा शुद्ध बनविण्यासाठीं हल्लींप्रमाणें तेव्हांहि अगरबत्ती लावीत असत. अर्थात् ही तालीम विश्वासराव, माधवराव यांसारख्या खाशाकरितांच असली पाहिजे. माधवरावाची पेशवेपदावर स्थापना झाल्यानंतरहि मेहनत सुरूच होती; परंतु त्याला लवकरच क्षयानें गाठल्यावर त्याच्या शरीरास मेहनत मानवेनाशी झाली. गोपिकाबाई माधवरावापासून दूर गंगापुरास होती. तरी तिच्या डोळ्यापुढें आपल्या कर्तृत्ववान पुत्राची मूर्ती सतत असल्यामुळें तिनें त्यास आतां मेहनत

बंद ठेवण्याविषयीं ममतापूर्वक लिहिलें. माधवरावास दुःखानें पोळलेल्या मातेचें अन्तःकरण माहीत होतें. त्यानें कळविलें, 'मला वडिलांचे आज्ञेपेक्षां तालीम अधिक आहे कीं काय ? तालीम सोडली. हल्लीं नमस्कार मात्र घालीत असतों.' एकदा शरीरास रोजच्या मेहनतीची सवय झाली म्हणजे कांहींना कांहीं व्यायाम हवाच, यासाठीं माधवरावानें किमानपक्ष नमस्कार कायम ठेवले. त्याने आपल्या पदरीं टेकचंद नांवाचा एक पैलवान बाळगला होता. त्याला दररोज एक शेर दुधाचा रतीब होता. (पे. द. २२). अर्थात् हा रतीब फार नाहीं.

पेशवे दरबारांत वारंवार कुस्त्या होत गेल्यामुळें ब्राह्मणांतहि कुस्त्यांचा षोक उत्पन्न झाला. वर सांगितलेल्या कुस्त्यांत नरसोबा पंतोजी नामक ब्राह्मणाचीहि कुस्ती लागली होती. केवळ कुस्त्याच काय पण कोणी कोणतेंहि मर्दुमकीचें अगर धाडसाचें कृत्य केलें तर त्याबद्दल त्यास उत्तेजन मिळत असे. सन १७६७त पेशव्यांच्या दोन खिजमतगारांनीं फार उंचावरून पाण्यांत उड्या टाकल्या. यासाठीं त्यांस ४ रु. बक्षिसी मिळाली. राजगोपाळ नांवाचा एक हत्ती मस्तीला येऊन मोकाट सुटला होता. त्यास पकडून छट्टू महातानें सांखळीस बांधलें म्हणून त्यास बक्षिस देण्यांत आलें [सन १७६७].

थोरला माधवराव, पेशवा झाल्यावर त्यानें आपला धाकटा भाऊ नारायणराव याच्या लष्करी शिक्षणाकडे काळजीपूर्वक लक्ष पुरविलें असल्याचें दिसून येतें. तो कधीं पुण्यास तर कधीं गंगापूर येथें गोपिकाबाईजवळ रहात असे. माधवराव केव्हां केव्हां आपल्याबरोबर त्याला स्वारीवरहि घेऊन जाई. पण तो कोठेंहि असला तरी त्याच्या शिक्षणाची सहसा हेळसांड होत नसे. माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं तेव्हां त्याचें वय अवघें सोळा वर्षांचें होतें. त्याच्याहून नारायणराव बराच धाकटा असून तो सहा वर्षांचा होता. त्याची आई गोपिकाबाई पुणें सोडून लवकरच गंगापुरास राहू लागल्यामुळें नारायणरावाच्या शिक्षणाची त्रिस्थळीच झाली. गंगापुरास असतां त्याच्या शिक्षणाचीं साधनें शक्य तितकीं तेथेंच ठेवलीं होतीं; तरी कांहीं कांहीं साहित्य त्यास पुण्याहून नाना फडणविसाकडून मागवावें लागे. कारण पुण्याचा कारभार माधवरावानें नानाची योग्यता ओळखून त्याजकडेच सोपविला होता. त्याला बोथाट्या व भाले नवीन लागले म्हणजे पुण्याहूनच आणविणें भाग पडे. त्यानें दोन चार दिवसांनीं घोडीं फेरावयास जावें त्यावेळीं बोथाट्या व भाल्यांचीं फळें

मोडावी. म्हणून तो लिहितो ‘ दहा बोथाट्या उत्तम बोंडाच्या बुड्यासमेत, त्यांत आम्हाजोग्या बारा हात लांब, आखूड पेराच्या, व दहा भाले फली बुड्यासमेत तयार करून पाठविणें. दोहो चहू दिवशीं घोडी फेरावयास जाण्यामुळें बोथाट्या फार मोडतात. बोथाट्या व भाले सत्वर ’ पाठविणें. [पे. द.] हें पत्र सन १७६७ मध्यें नारायणरावानें नाना फडणविसास लिहिलें, असें रावसाहेब सर देसाई यांनीं म्हटलें आहे. त्याप्रमाणें नारायणराव या वेळीं बारा वर्षांचा असून त्याचा भालाबोथाटीचा अभ्यास सुरू होता हें सिद्ध होतें. त्यापूर्वी दोन वर्षें म्हणजे नारायणराव दहा वर्षांचा असतां तीरकमठा शिकत होता. त्यानें १७६५त गंगापुराहून नाना फडणविसाला तीर पाठविण्याबद्दल कितीतरी वेळां लिहिलें. पण नानाला त्याच्या मागच्या अनंत उपाधींमुळें ते तीर लवकर पाठवून देण्यास बनलेंच नाहीं. म्हणून नारायणराव अगदीं रंजीस येऊन नानाला लावून लिहितो, ‘ आजपर्यंत तीर येतात म्हणून मार्ग पाहिला. परंतु यावयाची अवधि चुकली. पत्र गेल्यास बहुत दिवस जाहले. तेव्हां तुम्हास कारभारामुळें विस्मृत जाली हा निश्चयहि दिसोन आला. यास्तव खिजमतगार या कामागिरीस मुजरद पाठविला आहे, तर कारभारामध्यें दोन घटका अवकाश करून पूर्वी लिहिल्याप्रमाणें तीर सत्वर पाठविणें. (पे. द.). या पत्रांत एक प्रकारची जरब आहे. हें पत्र नारायणरावानें आपल्या बुद्धीनें लिहिलें असलें तर तें नवलच. बहुधा गोपिकाबाईनें सांगितलें व त्यानें लिहिलें असेंच झालें असावें. कारण नानासारख्या वडिलधाऱ्या व इभ्रतदार माणसास इतके मर्मभेदक शब्द वापरण्याचा अल्पवयी नारायणरावाचा हिय्या होता ना.

याच वयांत नारायणराव गंगापुरास कुस्तीहि शिकत असल्यानें त्याकरितां त्याजपाशीं नंदराम बिन भवानी पहिलवान पुण्याहून पाठविला होता. पुण्यास नंदरामाचे घरीं लग्न निघालें; तेव्हां तो लग्नाकरितां गेला असतां त्याच्या खुराकाची तजवीज झाली पाहिजे म्हणून नारायणरावानें (गोपिकाबाईच्या सांगण्यावरून) शिरस्त्याप्रमाणें पंधरा दिवसांचा शिधा सरकारांतून द्यावा, पुढें न द्यावा असें नानास पत्रानें कळविलें होतें.

नारायणरावाप्रमाणें समशेरबहाद्दराचा मुलगा अलीबहाद्दर याच्या शिक्षणाचीहि व्यवस्था माधवरावानें केली होती. त्याला बसण्याकरितां घोडी दिली होती पण ती मेली तेव्हां त्यानें दुसरी गरीब पण चांगली घोडी पाठविण्याविषयीं

माधवरावास लिहिलें. लष्करी शिक्षणांतील शेवटची पायरी प्रत्यक्ष लढाई पहाण्याची. त्याकरितां नारायणरावाच्या वयाच्या तरुणांना वडीलधारी माणसें आपणांबरोबर घेऊन जात असत. त्या वहिवाटीस अनुसरून सन १७६९ मध्यें हैदरनायकाशीं संग्राम करण्याकरितां माधवराव कर्नाटकाच्या स्वारीवर तिसऱ्यांदा गेला, त्यावेळीं त्यानें आपल्या बरोबर नारायणरावासहि घेतलें होतें. सन १७७१ मध्येंहि नारायणरावाचा मुक्काम माधवरावाच्या स्वारींत अहमदनगरास होता. नारायणरावाच्या वधानंतर बारभाईचा कारभार सुरू झाला. सवाई माधवराव अगदीं अल्पवयी असल्यामुळें खुद्द पेशव्यानें सेनाधिपत्य स्वीकारून लढाईवर जाण्याचें खुंटलें. कारभाराचीं मुख्य सूत्रें नाना फडणविसाच्या हातीं गेलीं. नानाची शिस्त व टापटीप सुप्रसिद्ध होती. त्यानें आपल्या या गुणास अनुसरून सवाई माधवरावाच्या शिक्षणाचीहि सोय केली. कै. वासुदेवशास्त्री खरे, नाना-फडणविसाच्या चरित्रांत लिहितात, ' सवाई माधवराव जसजसे मोठे होत चालले तसतसे त्यांच्यांत अनेक प्रकारचे खेळ खेळण्याची उमेद उत्पन्न झाली व ती नानांनींहि आनंदानें पुरविली. श्रीमंत रावसाहेब लग्न झाल्यानंतर नऊ वर्षांचे झाले तेव्हां त्यांच्या मनांत आलें कीं, नाना तऱ्हेचे खेळ खेळावे, शिकारखाने बाळगावे. हा मजकूर जवळच्या मंडळीनें नानांच्या कानावर घातला. त्याजवरोन नानांनीं तऱ्हतऱ्हेचीं श्वापदें व पक्षी मिळविले. सात-आठ मैना वंगाली बोलणाऱ्या, तसेच बोलणारे पोपट यांचे पिंजरे मिळविले. तसेच चंडोलपक्षी यांचे पिंजरे सातआठ आणिले. तशींच बदकें, पाणकोंबडीं, मोरांच्या जोड्या दहापांच आणून ठेवल्या. तशींच हरिणें शेंदोनशें काळवटीसुद्धां वाड्यांत आणून ठेवलीं. चित्ते दोनचार आणून बांधले. पांचसातशें ससे काळे, पिवळे, अवलक असे पर्वतीच्या वाटेवर बागेंत तळ्याच्या काठीं खोली बांधून तींत ठेवले. तसेंच दहावीस वाघ पर्वतीवर मोठा सोपा बांधून त्यामध्यें सांखळदंडानें बांधून ठेवले. गेंडे हिंदुस्थानांतून महादजी शिंद्यांनीं पाठविले. दहावीस जोडया एडक्याच्या ठेवल्या. पहिलवान कुस्त्या घेणारे सरकारांत चाकर ठेवले. तसेंच वज्रमुष्टी यांच्या जोडया सरकारांत पांचसात चाकरीस ठेवल्या. छडी खेळणेवाले व दांड खेळणेवाले असे नेहमी हुजूर ठेवले. तिरंदाजी व दांड छडी यांचा अभ्यास थोडा श्रीमंतांनीं केला. संध्याकाळीं तालिमखान्यामध्यें जाऊन सरकारची स्वारी तोहि अभ्यास थोडा करी. मुद्गल पेलणें व लेजीम खेळणें खेळे. घोडीं

फिरविणें व बोथाट्या खेळणें हाहि अभ्यास श्रीमंतांनीं केला. हत्तीवर हत्तीच्या किलाऱ्यांत बसून हत्ती चालविणें हाहि अभ्यास श्रीमंतांनीं केला.

गोपिकाबाईनें ता. ८–११–१७८३ रोजीं सवाई माधवरावानें व्यायाम कसा करावा यासंबंधीं नियम लिहून पाठविले. त्यांत पुढील महत्त्वाचें कलम आहे. ‘ तालीमखान्यांत जाऊन दंड काढावे. दिवसेंदिवस शक्तिअन्वये चढते दंड असावे. बरोबर समवयी मुलें ४।५ संभावितांचीं असावीं. व जेठी एक दोघे व नेहमीं विश्वासू गृहस्थ असावयाचे ते असावे. जेठी यांनीं कुस्तीनें डाव शिकवावे. नंतर समवयी मुलांसुद्धां प्रकृतीस जो खुराक मानेल तो नेमेंकरून घेत जावा ’ (का. सं.) सन १७८८–८९ तील खर्चाची एक नोंद आहे. तिजवरूनहि सवाई माधवराव तालीमबाजींत मोडणारे मैदानी खेळ खेळत होते हें समजतें. “ वाजे खर्च राजश्री राव यांजकडे दांडलकडी खेळतेसमयीं हातांस बांधावयास रुमाल तापल्याचा सुमार, तसलमात हणमंता टिळेकर खिजमतगार. तापता कद हात २७ नग २ एकूण आख ६ ” (पे. डा.) सवाई माधवरावांपाशीं पैलवानहि बरेच होते, असें सन १७८६ त मोरो आबाजीनें लिहिलेल्या पत्रा वरून निदर्शनास येतें. ‘ श्रीमंतांच्या वाड्यांत (रंग) पंचमीस जेठी यांच्या लढाया जाहल्या. कर्नाटकांतून पेशजी तीन जेठी आले होते. अडीच महिने रतीब खाऊन बनून गेले. काल कुस्ती जाहली. त्यास तिघां जेठ्यापैकीं दोघे जेठी यांस येथील शहरांतील तालमेच्या आखाड्यांतील गड्यांनीं चीत केलें. एकास मखबा गौळी यानें व एकास कल्ल्या गौळी यानें, याप्रमाणें दोघांनीं दोघांस चीत केलें. आणखी येथील तालमीचे आखाड्यातील गड्यागड्यांच्या कुस्त्या जाहल्या. आणखी कर्नाटकचे पैलवानांस रतीब दिला आहे. मासपक्ष जाहल्या-वर आणखी लढाई होईल. ’(ऐ. ले. सं.) सारांश, देशोदेशींचे पैलवान पुण्यास येऊन आपलें कसब पारखून घेत व त्यांनाहि चीत करणारे जवान पुण्यांतील खाजगी तालमींतूनहि असत, इतकी मल्लविद्येंत पुणेंकरांनीं त्याकाळीं प्रगति केली होती.

पेशव्यांपाशीं पैलवान होते; ते जसे कुस्तींत तसे वज्रमुष्टींतहि पटाईत असत. त्यांच्या कुस्त्या होत तेव्हां त्या पहाण्यास सर चार्लस मॅलेट व त्याचे लोक यांनीं जावें. कुस्तीचें वर्णन मेजर प्राईस यानें पुढीलप्रमाणें केलें आहे. ‘ कुस्ती-करितां एक हौदा खणतात. तो सात फूट खोल असतो. त्याची लांबी तीस फूट

असते. हौद्याच्या तळांत माती घालतात. जेठी उघडे पण चड्डी घातलेले होते. त्यांच्या शिंगांच्या मुठी असून त्यांना नखांचा आकार दिला होता. या खेळांत कुस्ती व वज्रमुष्टि हे दोन्ही प्रकार होते. जेठी खेळांत चांगले तरबेज दिसले. तो खेळ पाहून पेशवा प्रसन्न झाला. ' दख्खनका बादशहा ' म्हणून जेठींनी जेव्हां त्याला मुजरा केला तेव्हां त्याला आनंद वाटलेला दिसला. ' सवाई माधवरावापाशीं गोविंदा जेठी, मिना जेठी, तिम्मा जेठी हे पैलवान असून त्यांना दसऱ्यांत पोशाख देत. त्याची किंमत रु. १५०।१४७।९९॥ अशी होती.

सवाई माधवरावाचा लष्करी खेळ मि. रॉबर्ट मॅबन यानें सन १७९४ त पाहिला होता. तो लिंहितो, ' लांब भाला (Spear) घेऊन राजपुत्रास खेळतांना पाहून मी खुष झालों. त्याजबरोबर परशुरामभाऊ पटवर्धन व इतर मराठे सरदार होते. या खेळांकरितां पर्वतीच्या पायथ्याला मोठें मैदान तयार केलें होतें. मैदानाभोवतीं पुष्कळ शिपाई व हुजरे होते. मध्यभागीं एक लगोऱ्यांची रास रचून ठेवली होती. पेशव्यानें आपला घोडा मंडळावर फिरविला. त्यांच्या भाल्याच्या टोकाला चेंडू बसविलेला असून त्याला लाल फडके गुंडाळलें होतें. पेशवा भाला हातांत धरून घोडा भरधाव टाकीत लगोऱ्यांच्या राशीपाशीं आला. त्यानें घोड्यावरून भाल्यानें लगोऱ्यांची रास पाडली. एवढें करून तो विजयोत्साहानें परत फिरला. त्याच्या मागून परशुरामभाऊ आला. पण त्याला लगोऱ्या पाडण्याचें साधलें नाहीं. इतर सरदारांनाहि तें साधले नाहीं. एका सरदारानें आपला घोडा मंडळावर धरला होता. त्याच्या मागें लागून पेशव्यानें त्याला घोड्यावरून खालीं आणण्याचा व त्याच्या हातचा भाला पाडण्याचा प्रयत्न करून त्यांत यशहि मिळविलें. अश्वविद्येंतील हें श्रेष्ठ प्रतीचें कसब पाहून मी संतुष्ट झालों. त्या सर्वांनीं आपआपले घोडे शिकविलेले होते. ते इतके कीं, ते भरधाव सुटले असले तरी इषाऱ्याच्या एका शब्दाबरोबर खाडकन् थांबत. मराठे लोक आपल्या उमद्या जनावरांना रणांगणासाठीं तरबेज करण्यांत श्रमाकडे पहात नाहींत. ' (Poona in by gone days.)

श्रीमंत सवाई माधवराव रोज सकाळीं घोडीं फेरावयास जात असे. हा अभ्यास पुष्कळदा पागेंतच चालत असे. त्याच्याबरोबर पुरुषोत्तम दाजीबा पटवर्धन यासारखे मातबर लोक असत. ' श्रीमंत प्रातःकाळीं पागेंत घोडीं फेरावयास गेले होते. समागमे राजश्री पुरुषोत्तम दाजीबा पटवर्धन व माधवराव व तात्या जोशी

गेले होते. श्रीमंतांनीं दोन घोडीं फिरविली. (सवाई माधवरावांची दिनचर्या ता. १४ जून सन १७८७) हल्लीं जशा सायकली तशीं त्या काळीं घोडीं. गांवांतल्या गांवांत या घरांतून त्या घरीं जातांनाहि घोडा हवा. सवाई माधवराव एके दिवशीं पुण्यांतच, त्यांच्या घरीं जेवावयास गेला. त्यांचा वाडा शनिवारांत व शनिवारवाड्याजवळ. तरी तो घोड्यावर बसूनच गेला.

आतांपर्यंतच्या वर्णनांत शारीरिक व लष्करी शिक्षणाचें सर्व कांहीं आलें आहे. सवाई माधवरावांकरितां पहिलवान, वज्रमुष्टि, छडी खेळणारे, दांड खेळणारे, इत्यादि शिक्षक ठेवले असून त्यांच्यापाशीं त्यानें तालमीचा अभ्यास केला, वज्रमुष्टि, तिरंदाजी, छडी, बोथाटी, दांड तो शिकला, त्याचप्रमाणें हत्ती चालविण्याचा, मुद्गल पेलण्याचा व लेजीमचाहि सराव त्यानें केला. खर्ड्याची लढाई सन १७९५ त झाली. त्या वेळीं माधवराव वयानें एकवीस वर्षांचा असून तो लढाईवर गेला होता. त्यापूर्वी त्याला रणभूमीचें दर्शन इतर पेशव्यांप्रमाणें झालें होतें असें वाटत नाहीं. कारण त्यास जबाबदारीनें बरोबर घेऊन जाण्यास वडील व त्याच्या पक्षाचा असा पेशवे घराण्यांत कोणीच पुरुष नव्हता. पेशव्यांतला शेवटचा पुरुष दुसरा बाजीराव. त्यास व त्याचे भाऊ चिमाजी अप्पा व अमृतराव यांस आनंदीबाईसह कोपरगांवास ठेऊन नानानें त्यांच्या लष्करी व इतर शिक्षणाचीहि सोय लावली होती. बाजीरावास पेशवेपद मिळालें तेव्हां तो सोळा वर्षांचा होता. त्यापूर्वीच त्याचें लष्करी शिक्षण पूर्ण झालें होतें. त्याला नानांनीं पुढें जुन्नरास आणून ठेवलें होतें. तो जुन्नराहून परशुरामभाऊ पटवर्धनाबरोबर पुण्यास यावयास निघाला त्या प्रसंगाचें वर्णन खरेशास्त्री यांनीं ऐ. लेख संग्रहाच्या नवव्या भागांत केलें आहे. त्यांत म्हटलें आहे. ' नारायणगांव सोडल्यावर पुढें लांबदस्त मैदान पाहून (बाजीरावसाहेब) भाले खेळावयास लागले. श्री. रा. दादास व हरिपंतबाबास व नारायणरावसाहेब (पटवर्धन) यांस भाले खेळावयास बोलावलें. भाले खेळून स्वारी मौजे वडगांवनजीक कळंब घोडनदी तीरीं मुक्कामास दाखल झाले. तेथून छ. १९ रोजीं इंदुवारीं कूच करून अंबारींत स्वारी जाहली होती.......पेठ म्हणून गांव आहे तेथील आंबराईंत दोन प्रहरीं स्वारी आली. तेथें निद्रा जाहली....सहा घटका दिवसास तेथून स्वारी चालती जाहली. घोड्यावर स्वारी होती. मार्गी भाले खेळले...(मोशीच्या पुढें आल्या-

वर) मार्गी चार पाळ्या उभयतां खाशांनीं घोडीं फेरलीं. संध्याकाळच्या चार घटका दिवसास खडकीनजीक पुणें येथील मुक्कामास दाखल जाहले ! '

पेशव्याप्रमाणें त्यांच्या सरदारांनींहि शरीर कमावण्याची व युद्धकला शिकविण्याची परंपरा चालविली होती. मराठ्यांचें राज्य महाराष्ट्राबाहेर जेथें म्हणून पसरलें तेथें मराठे सरदार आपल्या पदरीं शक्य तितके महाराष्ट्रीय पैलवान बाळगीत व त्यांनीं परप्रांतीय पैलवानास कुस्तींत चीत केल्यास मोठें भूषण मानीत. दौलतराव शिंद्याने अशा प्रकारचा एक प्रसिद्ध मराठा पैलवान ग्वाल्हेरीस ठेवल्याचा उल्लेख थॉमस ब्रौटन याच्या पुस्तकांत आढळतो. त्यानें त्याला पांच शेर दूध व एक बकरें असा रोजचा रतीबच सुरू ठेवला होता. सदर पैलवानाबरोबर कुस्ती करण्याकरितां मथुरेचा एक चोबा ईर्षेनें आला. त्या दोघांची कुस्ती होऊन तिच्यांत मराठ्यानें चोब्यास पाडलें. तें पाहून दौलतराव खुष झाला. त्याने त्यास पांचशें रुपये किंमतीचें एक सोन्याचें कडें बक्षीस दिलें. ब्रौटन म्हणतो ' त्या काळीं थोर लोकांनीं पदरीं पैलवान बाळगण्याची चाल साऱ्या हिंदुस्थानांत होती. ते पैलवानांवर इतके खुष असत कीं, आपले हत्तीघोडेहि त्यांना बसावयास देत. पुरुषांनीं शरीर उत्कृष्ट कमावावे यांत नवल नाहीं. कारण कित्येक स्त्रियाहि या कलेंत प्रावीण्य मिळवून व पुरुषाप्रमाणें तनदुरुस्ती ठेवून कुस्त्या मारीत गांवोगांव हिंडत असून त्यांना कुस्तींत लोळविणें पट्टीच्या पैलवानालाहि जड जावें. '

स्त्रिया पैलवानी पेशांत जशी कधीं कधीं पुरुषांची बरोबरी करीत तशी युद्धकलेंतहि त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्याची त्यांची तयारी असे. यशवंतराव होळकराची कन्या भिमाबाई ही घोड्यावर बसण्यांत व भाला फेकण्यांत फार पटाईत असून त्या नैपुण्याबद्दल तिची सर जॉन मालकम यानेहि शिफारस केली होती. बायजाबाई शिंदे हिने एक स्त्रियांचें पलटणच तयार केलें होतें. सवाई माधवराव पेशव्याच्या कारकिर्दीत सन १७८८ सालीं पुण्यांतहि अशीच एक पलटण युरोपियन स्त्रीनें होऊ घातली होती. त्या बाईचें नांव मिसेस जेम्स हॉल. ती मूळची फ्लॉरेन्स येथील रहाणारी. तिने हिंदुस्थानांत येऊन मि. जेम्स हॉल नामक मद्रासेंतील एका युरोपियन बॅरिस्टराशी लग्न केलें. तिचे व तिच्या नवऱ्याचे पुढें पटेना. म्हणून ती शिपाईगिरीचा पेशा पत्करून हिंदुस्थानांतील निरनिराळ्या संस्थानिकापाशी राहून स्त्रियांची पलटणें तयार करूं लागली. ती मोगल सरदारा-

प्रमाणें पोशाख करी. अंगांत एक लांब जामा, पायांत विजार, डोक्यावर परांचा तुरा लावलेला टोप व कमरेस एक समशेर असा तिचा पोशाख असे. तिने हैदराबादेस राहून निजामाकरितां एक स्त्रीपलटण उभारलें. तेथून पुण्यास आल्यावर ती त्याच उद्योगास लागली. पण स्वभावाने फार कडक असल्यामुळें तिचा हा उद्योग सिद्धीस गेला नाहीं. कारण तिच्या तैनांतींतलि एका ब्राह्मण नोकरास त्याच्या कांहीं अपराधावरून तिनें मरेमरेतोंपर्यंत चोपल्यावरून नाना-फडणविसाने तिला कैद करून लोहगडच्या किल्ल्यांत अटकेंत ठेवलें. ती किल्ल्या-वर सात वर्षे होती. पुढें दौलतराव शिंद्याचा फ्रेंच सेनापति मनसूर पेरन याने मध्यस्थी करून तिला मोठ्या मिनतवारीने अटकेंतून सोडविलें. तिचें इंग्रजी नांव मिसेस जेम्स हॉल होतें तरी मराठे लोक तिला जमाल खान ऊर्फ जमाल सरदारच म्हणत. ही बाई पुण्याहून मुंबईस गेली व तेथे १७९८ मध्यें मृत्यु पावली.

महाराष्ट्रांतील शिपाईगिरीचा शोक असलेला प्रत्येक माणूस मिळेल तें लष्करी शिक्षण आपल्या खासगी प्रयत्नानें संपादीत असेच. परंतु विशिष्ट प्रकारच्या शिक्षणाची तजवीज गरजेप्रमाणें पेशव्यांना व त्यांच्या सरदारांना करावी लागे. पाश्चात्यांची शिस्त व त्यांचें हत्यारपात्यार त्यांच्या पद्धतीनें शिकविणारें शिक्षक सर्वत्र उपलब्ध नसत. त्यासाठीं पेशव्यांनीं आपल्या सैन्यांत गारदी लोक ठेवले आणि महादजी शिंद्याने तर डी बायन, जॉर्ज टॉमस, पेरन इत्यादि युरोपियन योद्धयांना सैन्यांत नेमून त्यांजकडून कवाइती पलटणें तयार करविलीं. पेरन हा सन १७९६ त शिंद्यांचा मुख्य सेनापतीच होता. कवाइतीप्रमाणेंच हत्तीना ताब्यांत ठेवण्याची व त्यांजकडून युद्धांत कामें करून घेण्याची कला घरगुती पद्धतीनें साधणारी नसल्यामुळें तिचें शिक्षण शिपायाना फौजेंत शिरल्यानंतरच मिळत असे. हातघाईच्या लडाईत हत्तींच्या सोंडेंत पट्टे देऊन ते हत्ती शत्रूच्या फौजेवर सोडण्याचें काम महातांचें. महातानी हे हत्ती शिकवून तयार केले म्हणजे ते सोंडेंत दोन बाजूना धरलेले दोन पट्टे चालवीत व शत्रुसैन्याची कत्तल उडवीत. हत्ती चालविण्याचे कसब इतकें महत्त्वाचें गणलें गेलें होतें कीं, खुद्द राजेलोक व मोठमोठे सरदार तें शिकत. हत्तीच्या महातांत नुसते मुसलमान जातीचेच लोक नसून मराठे व ब्राह्मणहि असत. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत महातांत भीमराव मोहिते, दादू महात, रंगराव पुरुषोत्तम पानसे, लक्ष्मण त्र्यंबक खुटेकर

इत्यादि वीस महात पेशव्यांपाशीं होते. हे महात प्रख्यात वीरांत मोडत (इ. सं.).

हत्तीच्या झुंजी लावण्याचा नानासाहेब पेशव्यास शोक होता; विल्यम प्राइस नांवाचा मुंबई सरकारच्या कौन्सिलांतील एक सभासद सन १७५९ त पुण्यात वकिलातीवर आला होता. त्यानें आपल्या रोजनिशींत पुढील अर्थाची नोंद करून ठेविली आहे. 'ता. ३० रविवार ' नाना [बाळाजी बाजीराव] यांनी मला बोलावणें पाठविलें. त्यावरून मी शहराबाहेर एका तंबूंत गेलों. तेथें पेशव्यानें तीन तासपर्यंत हत्तीच्या झुंजी लावून माझी करमणूक केली; ' (Poona in by-gone days).

व्यवहारशिक्षण.

शिपाईगिरी हा महाराष्ट्रीयांचा प्रमुख पेशा होऊन राहिल्यामुळें त्या प्रकारचें शिक्षण संपादणारांची संख्या महाराष्ट्रांत फार मोठी होती. तथापि हे शिक्षण संपादून जो लष्करी पेशा पत्करावयाचा त्यांत फार तर दोन चार लाख लोकांचाच समावेश व्हावा. त्यापेक्षां व्यवहारशिक्षणाची गरज समाजांतील अधिक लोकाना. सदर शिक्षण ब्राह्मण, प्रभु, वाणी, उदमी व मराठे या सर्व जातींतील मुले कमी-अधिक प्रमाणांत घेत असत. तरी पण त्यांतहि ब्राह्मण व तत्समजातींच्या मुलांचा भरणा मोठा असून उच्च घरण्यांतील मराठ्यांशिवाय इतर जातींच्या मुलांचें प्रयाण कमी असे. 'व्यवहारशिक्षणांत अक्षर, उजळणी, हिशेब यावर मुख्य भर दिला जाई. त्याकरितां व इतर ज्ञानाकरितां कित्ते, संसारचोपडी, गणित, मराठ्यांच्या व मुसलमानांच्या बखरी, तवारिखा भारत, भागवत, रामायण यांतील आख्यानांच्या मराठी बखरी, रामरक्षादि स्तोत्रें, जमाखर्जाची पद्धति, भूमापन, पत्रें लिहिण्याचे मायने, लिखिते, मराठी कविता इत्यादिकांचा अभ्यासांत समावेश होत असे. पुरुषांप्रमाणें थोर कुलांतील स्त्रियाहि लिहिण्यावाचण्यास शिकत ' (राजवाडे प्रस्तावना); तथापि वर सांगितलें तें सगळें शिक्षण सर्वांना मिळत होतें असें नाहीं. ब्राह्मण व तत्समजाती यांनाच त्याची गरज अधिक वाटावी व त्यांनीच तें आपल्या मुलांना देण्याची व्यवस्था करावी. त्यांतल्या त्यांत पेशवे व ब्राह्मण सरदार यांचे समाधान एवढ्याशा विद्येनें होणारें नव्हतें. त्यांना स्वतःला विद्वान् म्हणविता न आले तरी बहुश्रत म्हणवून घेण्यांत

भूषण वाटे. त्याच महत्त्वाकांक्षेने ते बैदिक व शास्त्री यांच्या विद्येचा जेवढा वाटा हस्तगत करता येईल तेवढा करण्यास चुकत नसत. खेरीज त्यांजकडे विद्वान् व गुणी माणसें आपलें ज्ञान दाखविण्यास व त्या मोबदल्यांत स्वतःची संभावना करून घेण्यास यावयाचीं असल्यामुळें तें पदरी वैदिक व शास्त्री याना ठेवून त्या विद्येचा थोडाबहुन आस्वाद आपल्या मुलांना देत. आजचे सरदार हे कालचे प्रायः भिक्षुक. या कारणाने त्यांना विद्येचीं अभिरुची अंगचीच. म्हणूनहि ते व्यासंग शक्य तितका दीर्घ काल चालू ठेवीत.

पेशवे घराण्यांतील बाजीराव, नानासाहेब, रघुनाथराव, माधवराव इत्यादि पुरुष कालमानाप्रमाणें बरेच विद्वान् व बहुश्रुत होते. बाजीराव व नानासाहेब हे चांगले संस्कृतज्ञ असून महाभारत व रामायण या ग्रंथांतील स्फूर्तिदायक व राजनीतिविषयक भाग त्यांनीं वाचला होता. नानासाहेबाचा महाभारताप्रमाणेंच पंचतंत्र, हितोपदेश, चाणक्यनीति, रघुवंश इत्यादिकांचा अभ्यास झाला होता.

नानासाहेबाचा व्यासंग केवढा होता याची स्पष्ट कल्पना त्यानें आपल्या वयाच्या २१ व्या वर्षी रघुनाथरावास पत्र लिहिले त्यावरून येणार आहे. खालील पत्र नानासाहेबानें रघुनाथरावास स्वारीवरून लिहिले असावे. 'येथून जातेसमयीं जे सुचले ते तुम्हास सांगितले आहे, त्याचे निरंतर स्मरण असू देणें. रघुवंश, विदुरनीति, चाणक्य व जे तुम्हास येत असेल त्याची नेमपूर्वक चिंतनिका करून थोडेबहुत शास्त्री यांजवळ नित्य म्हणत जाणें. विराटपर्वापासून पुढें भारत रिकामपणी वाचीत जाणें. केवळ घोडीं फेरावयाचे छंदास न लागणें. वजनी, कैली, बेरीज करावयाचा सराव बहुत करणें. मातुश्री बाई (आजी) ताई (काशीताई) अनुबाई (आते) याशी एक दो दिवशीं अर्ध घटकाभर जाऊन बसत जाणें. शरीरप्रकृति नीट नाहीं. यास्तव औषध कांहीं नेमेकरून घेत जाणे. भाऊसमागमे घोडी फेरावयास जात जाणे. सातान्यास जावयाची आज्ञा केली तर चिमणगिरी गंगाधरभटास भाऊजवळ विनंति करून बरोबर दिलें तर घेऊन जाणें. सातान्यास गेल्यावर दोनहि बाईकडे (शाहूच्या राण्या) विना बोलावल्यावांचून अथवा गोविंदराव यांनीं आपण सांगितल्यावांचून न जाणें. कालानुरूप, वयास उचित, योग्य वेष करीत असावे. देवपूजा थोडी, परंतु एकांतीं न बोलतां करीत जाणें. इतकेहि नेमेकरून करावें आणि गर्व न करावा. निरंतर साधनवृत्तीनें वडिलांची आज्ञा प्रसन्नतेनें मानावी. सावध

वर्तावे. सर्व जे मनेकरून समजेल ते समजावे. वडिलांची मर्जी उत्तम असलिया पुसावें. शिष्यधर्मे असलिया उपयोग आहे. चिरंजीव जनार्दन (कनिष्ठ भाऊ) बहुत कामहि करून पढतात. ते हरएक गोष्टींत अधिक झाल्यास तुम्ही मान्य पुरुष कसे व्हाल?—' (इ. सं.)

नानासाहेबांचे वरील पत्र फार किंमतीचे आहे. त्यांत पेशवे घराण्यांतील पुरुषांविषयीं त्याची अपेक्षा काय होती हे उत्तम प्रकारे प्रतिबिंबित झाले आहे. पेशवे राज्यकर्ते होते. तरी स्वतंत्र नसून सातारच्या महाराजाचे अंकित होते. राज्य टिकविण्यास व वाढविण्यास त्यांना शिपाईगिरी आवश्यक व ते चालविण्यास राजनीति आवश्यक. शिवाय जातीनें ब्राह्मण असल्यामुळें ब्राह्मणाची कर्तव्येहि आवश्यक. ही सर्व संधानें संभाळण्याचे काम सोपे नव्हते. पेशवे घराण्याकडलि अधिकार कायम रहाण्याकरितां महाराज व त्यांच्या राण्या यांची मर्जी राखलीच पाहिजे, पण ती राखतांना आपला बोज अबाधित ठेवला पाहिजे, सेनापतीची जबाबदारी संभाळूनहि सर्व सरदार, मुत्सद्दी व परकीय दरबार यांची अनुकूलता संपादली पाहिजे व ब्राह्मण्याच्या अभिमानांत प्रहरन् प्रहर नाक धरून न बसतां राज्याची चिंता वाहिली पाहिजे, अशा प्रकारची गुंतागुंतीची जबाबदारी पेशवे घराण्यावर होती. ती ओळखूनच नानासाहेबाने आपल्यां कनिष्ठ बंधूस वरील प्रकारचा बहुमोल उपदेश केला आहे.

एकत्र कुटुंबात रहाणाराला कित्येक धोरणें साधावीं लागतात. त्यासंबंधीं नानासाहेबाने रघुनाथरावास केलेल्या सूचना व्यावहारिक शिक्षणांत मोडतात. वडीलधाऱ्या माणसांची मनोधारणा करावी, नम्रता धरून व शिष्यवृत्तीनें वागून व्यवहारज्ञान संपादावें, नुसती घोडी पिटीत न बसता विद्याभ्यासांत लक्ष घालून आपला धाकटा व अभ्यासी भाऊ जनार्दन याहून अधिक विद्वान् होऊन आपले वडीलपणाचें स्थान अढळ ठेवावें या रघुनाथरावास सांगितलेल्या वागणुकीच्या खाचाखोचा चातुर्याच्या द्योतक होत. हें एकच पत्र वाचले तरी नानासाहेबास लाभलेले उच्चप्रतीचें शिक्षण, त्याची थोर दानत, त्याचे चातुर्य, सूक्ष्म अवलोकन, व्यवहारकुशलता व समकालीन मराठ्यांतील अद्वितीयत्व याविषयीं खात्री पटल्यावांचून रहात नाहीं.

खालील पत्र नानासाहेबाने नाना पुरंदरे यास कर्नाटकाच्या स्वारींतून लिहिले

आहे. नानासाहेबाचे बुद्धिवैभव, सूक्ष्म अवलोकन, विद्वत्ता, हिंदु संस्कृतीचा अभिमान सौंदर्यप्रीति व स्वराज्यासंबंधाची चिंता यांचा तो आरसाच णाहे.

'चिरंजीव राजश्री नाना (पुरंदरे) प्रति बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक आशीर्वाद उपरी. या प्रांती (कर्नाटकांत) प्राचीन हिंदूराजे सर्व संस्कृत–प्रवीण, वेश्यामद्यादिकाचा अति अनादर. साता पिढ्यांचे श्रीमत्. नृत्य-गीतवाद्यांत प्रवीण, स्वजातीय अनेकस्त्रिया प्रवीण, त्यांसी रत. किंचित् जितें-द्रियहि आहेत. नर्माची रीत. देवब्राह्मणांची विशेष मर्यादा व शोभा, जिचे अवलोकनमात्रे अधर्मिष्ठास धर्मरति उत्पन्न होणार. गाणार कंपतम स्वर, वर्ज्यावर्ज्यादिक शास्त्रप्रमाण रीतीने गाणार. वेदशास्त्र किंचित् जाणतात. त्यांत जे मुख्य ते तों पाहिलेच नाहींत. जे मुख्य ते निरपेक्ष, सर्वर्धिसमृद्धि. त्यांचे शिष्यवर्ग अनेक प्रयत्ने आणून विद्यादृष्टीने पहाता अतिश्रेष्ठ स्वदे-शज. स्थूल दृष्टीनें पाहतां माल अरमणयि. बाग फुले कमळे इत्यादि शोभा जे महाप्रयत्ने लहानशी करावी, त्याची तो गणना नाहीं. त्यांचे तेज पहा-ताना असें वाटतें कीं यांची प्रार्थना करून स्वदेशास न्यावें. परंतु ते विदेश-भूमि जाणून प्रार्थना केली असतां न येत. इकडील नद्या अमृतोपम. बहुत जनास स्वजलप्रदाने समृद्धिवंत करतात, व पांथास आनंद व राज्यास द्रव्य-वृद्धि करितात. ज्यांचे सहचारे वोढ्याची उपमाहि आमच्या (महाराष्ट्रांतील) राक्षसस्वभाव नद्यास न ये. उत्तर प्रांतांतील सर्व मनुष्य शुभ्र, त्यांत एक रामचंद्र व कृष्णजीश्याम, त्यांचे वर्णन करतात. देशी एक ईश्वर श्रमयुक्त झाले. इकडील सर्वहि नीलांबुदसंभ्रम. परंतु धर्मरूपे पहातां जे हंसोपम. सर्वहि मर्यादशील. आयापेक्षां व्यय थोडा. अधर्मापेक्षां धर्म फार. शैव, मध्व, लिंगधर्ते, सर्वहि स्वमताभिमानित. शौर्य धर्माविषयीं, नायमारा व्यतिरिक्त सर्वहि युक्ति योद्धे. हें सर्व तुम्हां सहवर्तमान पहाणें उचित असतां अनेक शोभा टाकून एक स्वलम्नशोभा अंगीकारून गेला हें उत्तम न केले. पुढें तरी स्वकीयागमने करून या प्रांताचे अवलोकन करणें उचित असे. तुम्हां सहवर्तमान इकडे येणें झालिया उर्वरित शृंगारसाधने प्रयत्नपूर्वक पाहा-ण्यांत येतील. राज्यकार्यप्रसंगविचार करतां, भगीरथसमान कैलासवासी यांनीं उत्तरेकडून दक्षिणपावेतो सुवर्णनदीप्रवाह चोवीस वर्षे वाहविला. त्यांचे आशीर्वादे अलीकडेहि निरंतर वर्धमान वाहत असतां, देशाधिकारी,

सेनामुख्य व अकृत्रिमास पूर्ण त्या नदीनें संतुष्ट केलें. एक तृष्णामात्र त्या-सुवर्णवोघानें वर्धमान केली. दक्षिणदेशांतून सुवर्णनदी मागें रघूजी–फत्तेसिंग बाबांनी आणिली, परंतु जागा जागा जिरली. मध्ये बहुत दिवस दक्षिण नदी न वाहिली. श्रीइच्छेनें यावर्षीहि कालानुरूप द्रव्यनदी उत्तमच या सैन्यांत आहे. परंतु पुण्याकडे जातां रुक्ष देश फार आहे, त्याजमुळें सर्व जिरून जाईल. एकदां उत्तरेकडील सुवर्णनदी व दक्षिणेची नदी, दोहींचा संगम सागरकूपसमान पुणे या स्थळीं, मध्यें न जिरतां, पूरयुक्त योग घडणें. तेव्हां ऋणोद्धार, श्रमसार्थक, इह परलोकीं उत्तम होईल. भागीरथी सागरासाठीं उत्पन्न, परंतु विश्वातें उद्धरिते, तशी याकाळीं हे उत्तर दक्षिण-नदी वहाते, बहुतजनास उपकारक होते. सर्वहि नद्या जलौघें समुद्रास जातात. एक कावेरी मात्र बहुत लोकांनीं उपयोगास आणिली. तशी हे द्रव्यनदी, मुख्य कार्य थोडें व गौणजनकार्य बहुत करिते. हा न्याय-अन्याय हा विचार साक्षी दृष्टिवंत असतील त्यांनीं विचारून पुण्यांतील रुक्षता दूर होय व मध्यें कार्याकारण जिरे ऐसे करणें, हें योग्य असें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद’

(इ. सं.)

नानासाहेबानें कर्नाटकावर एकंदर चार स्वाऱ्या केल्या त्या अनुक्रमें १७५३, १७५४, १७५५ व १७५७ या सालीं झाल्या. त्यांपैकीं पहिल्या व चौथ्या स्वारींतच तो श्रीरंगपट्टणापर्यंत गेला होता. वरील वर्णनांत कावेरी नदीचा संबंध आला आहे त्यावरून ते वर्णन त्यानें सन १७५३ च्या अगर १७५७ च्या स्वारींतच केलें असले पाहिजे. परंतु एखाद्यानें नवीन प्रदेश पहावा व तो चकित व्हावा त्या प्रकारचेच उद्गार नानासाहेबाच्या लेखणींतून स्रवले असल्यामुळें त्याची ही स्वारी १७५३ मधीलच दिसते. त्यावेळीं तो बत्तीस वर्षांचा म्हणजे तारुण्याच्या ऐन भरांत होता. सर्व इंद्रियें तरतरीत व उपभोगक्षम होती. तोंपर्यंत पेशवाई-चा कारभार पाहूं लागल्यास त्याला तेरा वर्षें झाली होती. तेवढ्या अवधींत उत्तर हिंदुस्थानांत माळवा, बुंदेलखंड, बंगाल, काशी, प्रयाग, गया इत्यादि गंगा यमुना वगैरे नद्यांच्या तीरावरील हिंदूंचीं पवित्र क्षेत्रें व सुपीक प्रदेश त्याच्या सूक्ष्म नजरे-खालून गेला असल्यामुळें अवलोकन व अनुभव पुष्कळ वाढून उत्तर व दक्षिण या दोन दिशांची तुलना करण्याची योग्यता त्याच्या अंगीं आली होती. देशांतील सर्व लहान मोठ्या हालचालींचीं सूत्रें त्याजपासून हालत अगर त्याचपाशीं पोंचत अ-

सल्यामुळें राजकारणांत व व्यवहारांत तो पूर्णपणें तरबेज झाला होता. वरील पत्राची भाषा फारच प्रौढ व संस्कृतप्रचुर आहे. पत्रांतील मजकूर नानासाहेबाची रसिकता, बुद्धीची कुशाग्रता, नजरेची सूक्ष्मता, मनाची सुसंस्कृतता, स्वधर्माचा अभिमान, स्वराज्याचें हितचिंतन यांची साक्ष पटविणारा आहे. ज्या लोकांचा संबंध येईल त्यांनीं आपल्या कच्छपीं लागावें असा जिव्हाळा व मोठेपणा त्यांत भरला आहे. हें पत्र राजकारणाच्या रगाड्यांत क्षणाची फुरसत मुष्किलीनें मिळून रंगेलपणानें लिहिलेलें दिसतें. याच पुरुषास तितका वेळ असतां तर उत्कृष्ट वर्णनपर ग्रंथकारांत अगर नामांकित लेखकांत त्यास समाविष्ट करतां येईल इतक्या प्रकारचें बुद्धिवैभव व कल्पनासामर्थ्य सदर पत्रांत सहज प्रतीत होत आहे. अशा पुरुषाला राजकारणाच्या नित्याच्या भगभगींतून फुरसत व पैशाची अनुकूलता मिळाली असती तर त्यास महाराष्ट्रांत इंद्राचें नंदनवन व ऐश्वर्य आणणें अशक्य होतें काय ?

नानासाहेब १७६१ सालीं मरण पावला. त्याच्या पश्चात् पेशवेपद लाभलें तेव्हां माधवराव सोळा वर्षांचा होता. अर्थात् तत्कालीन पद्धतीस अनुसरून त्याचें सर्व शिक्षण तोंपर्यंत पूर्ण झालें असलें पाहिजे. तें शिक्षण त्यास नानासाहेबासारख्या थोर पित्याच्या नजरेखालीं व त्यानें घालून दिलेल्या मार्गानें मिळालें असल्यामुळें निर्दोष व उच्च प्रतीचें असेल यांत संशय नाहीं. माधवरावाची कारकीर्द अवघी अकरा वर्षांतच संपली. तरी तेवढ्या अल्पावधींत राज्यकारभाराची विस्कटलेली घडी त्यानें पूर्ववत् बसविली आणि राष्ट्रांत नवा जोम व जूट उत्पन्न केली. या त्याच्या अलौकिक कर्तृत्वास त्याचे आनुवंशिक गुण, बापानें लावलेलें वळण व दिलेलें शिक्षणच उपयोगीं पडलें. माधवरावावर नारायणरावांच्या शिक्षणाची जबाबदारी आली. त्याकामीं त्याजसमोर घरांतील परंपरागत शिक्षणक्रम व शिक्षणव्यवस्था होतीच. पण त्याखेरीज त्याची हुशार व कर्ती आई गोपिकाबाई आपल्या पोक्तपणाचा फायदा नारायणरावाच्या शिक्षणाच्या बाबतींत द्यावयास होती. या उभयतांच्या नजरेखालीं नारायणरावास शिक्षण बरेंच व्यवस्थित रीतीनें मिळालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण त्याच्याहि शिक्षणाची त्रिस्थळीच झाली. कारण तो कधीं गंगापुरास गोपिकाबाई-पाशीं, कधीं पुण्यास नानाफडणविसापाशीं तर कधीं माधवरावाच्या स्वारींत राही. सन १७६४ पासून गोपिकाबाईचें वास्तव्य गंगापुरींच होतें. गंगापुरास पुण्या-

इतक्या सर्व सोयी कोठून असणार ? म्हणून नारायणराव नानाफडणविसास पत्रानें कळवून आपणांस जरूर त्या वस्तु मागवून घेई. त्याला लिहिण्यावाचण्यास शिकविण्याकरितां एक पंतोजी, ब्रह्मकर्माची संथा देण्याकरितां एक भिक्षुक व त्याजकडून संस्कृत भाषेचें अध्ययन करून घेण्याकरितां एक शास्त्री अशी व्यवस्था होती. त्यानें सन १७६५ मध्यें नानास एक पत्र लिहून वाचण्याकरितां लिखितें पाठविण्यास सांगितलें. तो म्हणतो ' लिखितें वाचावयाकरितां थोर थोर शेंपन्नास पावेतों जरूर पाठविणें. ' (पे. द. ३२) सुमारें तीस वर्षांपूर्वींहि इकडील प्राथमिक शाळांतून मराठी पांचव्या सहाव्या इयत्तांतील विद्यार्थ्यांना मोडी पुस्तकाखेरीज आठवड्यांतून एखाद्या दुसऱ्या दिवशीं लिखितेंहि वाचावयास देत. या लिखितांची एक फाईल असून त्यांत निरनिराळ्या लोकांच्या पत्रांचे नमुने असत. मोडी अक्षर लागणें एकंदरींत कठिण. तशांत पत्रलेखक कुत्र्याचा पाय मांजरास जोडणारा असला तर वाचकांची त्रेधा विचारावयासच नको. यासाठीं कसलेंहि बिकट अक्षर मुलांना वाचतां यावें या उद्देशानें शाळांतून लिखितें ठेवण्याची वहिवाट होती. तिचा उगम वरील पत्रावरून पेशवाईंत झालेला दिसून येतो.

मुलांची हुशारी त्यांच्या अक्षरांवरून ठरावी. नवरा मुलगा पहावयास कोणी आले तर त्याचें हस्ताक्षर ते मुद्दाम मागून घेत. कारण कारकुनाच्या उदयाची बरीचशी भिस्त त्याच्या अक्षरांवर. कोणाचाहि अनुकूलग्रह अक्षर पाहूनच व्हावयाचा. त्याकाळीं हल्लींप्रमाणें परीक्षा नव्हत्या व त्या परीक्षावर पगाराची इयत्ता व बढती हींहि अवलंबून नव्हतीं. कारकून टाकाचा धड व हिशेबांत पक्का असला म्हणजे केवळ अंगच्या हुषारीने व व्यवहारज्ञानाने कारभाऱ्याच्या हुद्द्यापर्यंतहि चढावयाचा. नानाफडणवीस, सखाराम बापू या मुत्सद्द्यांचा उत्कर्ष अशा रीतिनेंच झाला. पेशव्यानें शिपाई व कारकून या दोन्ही पेशानी सरदार व कारभारी मंडळीवर ताण केली तरच त्याचा वचक त्याजवर बसावयाचा हें इंगित पेशवे कुळांतील पुरुषांनीं ओळखून ते आपल्या पुढील पिढीची या दोन गुणांत फार काळजी घेत. म्हणून नारायणराव गंगापुरांत अगर पुण्यांत आणि माधवराव स्वारीवर अशी स्थिति असे, तेव्हां नारायणरावास आपलें अक्षर पहाण्यासाठीं माधवरावाकडे पाठवावे लागे. अक्षर वळणदार येण्यास लेखणी चांगली पाहिजे. लेखणीचा टाक बरेच दिवस टिकावयाचा तर बोरू मजबूत पाहिजे. यामुळें

लेखण्यांचें प्रकरण त्या काळांत पुष्कळ भानगडीचें झालें होतें. वाटेल त्याची लेखणी वाटेल त्याला चालू नये. ज्यांच्या अक्षरांचें वळण एक त्यांच्याच लेखण्या परस्परांस चालावयाच्या. म्हणून नारायणरावास लेखण्याहि गंगापुरास असतां पुण्याहूनच मागाविणें भाग पडे. म्हणून त्यानें बगाजी रघुनाथास पत्र लिहून दरमहा दहा लेखण्या पाठविण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें त्यानें एकवार दहा लेखण्या धाडल्या. पण त्यांचीं पेरीं चांगली नसल्यामुळें लेखण्या फार दिवस टिकणार नाहींत व नारायणरावाचा आपल्यावर राग होईल अशी बगाजीस धास्ती वाटत होती. म्हणून त्यानें नारायणरावापाशीं दोन मागण्या केल्या. एक सांडणीस्वाराबरोबर चांगलीं शंभर पेरीं पाठवावीं व दुसरी, पन्नास लेखण्या आंत रहातील अशी दोन नळकुटी त्यास पुरवावीं. असें झालें म्हणजे बगाजी लेखण्या पाठविण्यास तयार होता.

सांप्रत एक पैसा टाकला कीं, आयतें टोक (निब) विकत मिळतें. व तें महिना पंधरा दिवस सहज टिकते. तसेंच आणखी एक पैसा खर्चला कीं, निळ्या-काळ्या शाईची पुडी हातीं येते व तिची शाई महिना दोन महिनेहि पुरते. लेखनव्यवसायांतील हें सौकर्य त्या काळीं नव्हतें. आधी धान्याचे शिरे बनवावे, व गोड्या तेलाच्या समईचें काजळ धरून तें त्यांत घोटावें तेव्हां शाई तयार व्हावी. इतक्या मेहनतीचें हें काम सहजासहजी कोठेंहि व केव्हांहि होण्यासारखे नसल्यामुळें शाईचा धंदा करणारे रक्कवान असत. गांवांतल्या गांवांत असो, पण परगांवीं अशी शाई पाठविणें फारच अवघड. जे लोक स्वारीवर असत त्यांचें शाईवांचून नडे. तेव्हां ते आपणास लागणारी शाई पुण्यासारख्या ठिकाणाहून मुजरद स्वार पाठवून त्याजमार्फत कशी आणवीत त्याचा मासला वाचकास कळावा यास्तव खालील पत्र उध्दृत केलें आहे.

‘ नारोपंत चक्रदेव स्वामीस विनंति. उपरी भगवंतजी चव्हाण खास बारदार दिमत संताजी धसन याजबरोबर चंबू शाई भरून पाठविला आहे. त्यास बहुत सावधपणे खर्च करून आठा दिवसी खर्च झालियावर चंबू पाठविणें. म्हणजे आणखी शाई भरून पाठवू. आज कूच कीं मुकाम ते लिहिणें.’ [पे. द. ३२].

नारायणरावास अक्षर घटविण्याकरितां कित्ता कोणाचा दिला होता हें समजत नाहीं. परंतु सन १७८१ मध्यें बिवलकरी कित्ता सर्वमान्य झाला असल्याचा दाखला सांपडतो (ऐ. ले. सं. भाग ७ वा). सन १७७१ त नारायणराव

सतरा वर्षांचा होता. त्यानंतर एका वर्षानें त्याची पेशवे पदावर स्थापना झाली. सतराच्या वर्षी प्राथमिक अभ्यास संपून त्याची संस्कृतांतहि बरीच प्रगति झाली होती. त्याजपाशी संस्कृत शिकविण्यास जगन्नाथ भटजी व बापाजी पुराणिक यांना ठेवले होते. त्यानें जगन्नाथ भटजींपाशी षट्लिंगे म्हटली व बापाजी पुराणिक यांनीं त्यास कौमुदी सांगितली. तो १७७१ त अहमदनगरास माधवरावाच्या स्वारींत गंगापुरास गोपिकाबाईला लिहितो, 'प्रस्तुत बापाजी पुराणिक मला कौमुदी सांगत असतात. लवकरच षट्लिंगे म्हणतो. झाल्यावर सेवेशी लिहीन. कौमुदीची पोथी वाईट आहे. तेथें [गंगापुरास] रामचंद्रपंतापाशीं अथवा भटजींपाशी असल्यास पाठवून द्यावी.' [पे. द.] त्याचें दुसरे पत्र 'मातुश्री बाईसाहेबांची (गोपिकाबाईची) आज्ञा होती कीं, षट्लिंगें कौमुदी म्हणावी. त्यास आज्ञेप्रमाणें षट्लिंगे जगन्नाथभट यांजजवळ म्हटलीं. अर्थ मात्र समजून पुरता घ्यावयाचा आहे. तोहि लवकरच होईल.' (पे. द.) सारांश, नारायणरावाचा पुस्तकी अभ्यास बाळबोध व मोडी अक्षर, मोडी वाचन, संस्कृत काव्य, व्याकरण यांचा, वयाच्या १७ व्या वर्षापर्यंत पुरा झाला होता. त्यास राजकीय शिक्षण देण्याचीहि माधवरावानें तजवीज केली. 'सन १७६९ पासून निरनिराळ्या कारभाऱ्यांजवळ बसून त्याने कामें समजून घ्यावीं व थोडेबहुत निकाल करावे असें माधवरावानें त्यास सांगितले आणि कित्येक कारभार व मसलती त्याचे सुप्रत केल्या. सन १७७० च्या आगष्टांत माधवरावानें नारायणरावास दिवाणगिरीची वस्त्रें दिली, सखारामपंतास त्याची मुतालकी सांगितली; आणि सखारामपंतानें नारायणरावाजवळ बसून कारभार करावा असा त्यास हुकूम दिला.' [मराठी रिसायत मध्य भाग ४ था] ता.२८ आगष्ट १७७१ रोजी माधवरावाने नारायणरावास पत्र पाठविले. त्यांत त्याने नारायणरावाचा तापट स्वभाव ओळखून व त्याची एकंदर वर्तणूक पाहून अगदी तुटक वाक्यानी इषारा दिला असून तो मननीय आहे. 'पुण्यकर्म विशेष करावे. उदासीनता व क्रोध किंचित् धरावा, कार्यकारण. इंद्रियनिग्रह करावा. पुस्तकांचा बंदोबस्त करावा. चित्तशुद्धि करावी. त्रिपादी पाठ करावी.' (इ. सं.)

पेशवे व त्यांचे इतर सरदार यांच्या तरुणांना राज्यकारभाराचे वरिष्ठ प्रतीचे शिक्षण देण्याची ही पद्धति होती. हल्लींहि पुस्तकी शिक्षण पूर्ण झालेल्या राज-

कुमाराचा प्रथम राज्यकारभारांत याच पद्धतीनें प्रवेश करण्यांत येऊन नंतर त्यास कची व पक्की मुखत्यारी अनुक्रमानें मिळते.

बाजीरावास मस्तानीपासून झालेला समशेर बहाद्दर याचा मुलगा अली-बहाद्दर हा बापाप्रमाणेंच पुढें पराक्रमी निघाला. त्यानें सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत म्हणजे नानाफडणीस कारभार पहात असतां बुंदेलखंडांत पराक्रम करून पाऊण कोटीचा मुलूख काबीज केला. त्याचा जन्म १७५८ त झाला असून त्याच्या शिक्षणाची व्यवस्था लावण्याची जबाबदारी थोरल्या माधव-रावांवर पडली होती. कारण पानिपतच्या घनघोर रणसंग्रामांत त्याचा बाप समशेर बहाद्दर मरण पावला होता. सन १७६६ त अलीबहाद्दर आठ वर्षांचा असतां त्याच्या वतीनें माधवरावांस एक पत्र लिहिण्यांत आलें; त्यावरून समशेर बहाद्दरानें त्याच्या शिक्षणांकडे अगदीं लहानपणापासून लक्ष पुरविलेलें दिसतें. समशेर बहाद्दरानें यमाजीपंत नामक एक शिक्षक त्याजकरितां ठेवून त्याला दरसाल ५०० रु. ची नक्त तैनात व १०० आरव कापड याप्रमाणें नेमणूक केली होती. त्याच यमाजीपंताची नेमणूक तशीच पुढें चालवावी अशी विनंति सदर पत्रांत होती. त्याचप्रमाणें बसण्याकरितां एक चांगली गरीब घोडी द्यावी असेंहि त्यांत म्हटले होतें.

थोरल्या माधवरावाच्या पश्चात् पेशवाईचा कारभार पहाण्याची जबाबदारी लवकरच नानाफडणविसांवर पडली. नानाच्या वेळीं काळ बराच बदलला. इंग्र-जांशीं मराठ्यांचा निकट संबंध येऊन त्यांना इंग्रज लोक विद्येंत किती पुढें गेले आहेत हें प्रत्यक्ष पहावयास सांपडले. नानानें या सोयींचा भरपूर फायदा घेण्याचे ठरवून सवाई माधवरावाच्या शिक्षणांत शक्य ती सर्व सुधारणा केली. नाना-प्रमाणें सवाई माधवरावांच्या शिक्षणाची काळजी वहाणारी त्याची आजी गोपिका-बाई हयात होती. ती आतां बरीच वृद्ध व अनुभविक झाली असून नारायण-रावाचें शिक्षण कांहींसें तिच्या नजरेखालींच झालें होतें. तेव्हां तिनेंहि माधव-रावाच्या शिक्षणासंबंधानें बहुमोल सूचना केल्या. माधवराव हा पेशवाईचा एकच डोळा महत्प्रयासानें जतन करून ठेवला असल्यामुळें त्याजवर सर्व स्वराज्य-भक्त महाराष्ट्रीयांचे लक्ष होते म्हणून त्यांनीं सर्वांनीं माधवरावाच्या शिक्षणाच्या बाबतींत जे कांहीं सुचलें ते करून पाहिलें.

नानासहि माधवरावाच्या शिक्षणाची योजना ठरवितांना निरनिराळ्या विषया-वरील पुस्तकांची उणीव भासली. जो कांहीं ग्रंथसंग्रह उपलब्ध होता तो संस्कृतांत. मराठींत जी ग्रंथरचना झाली होती ती संस्कृत मधील पौराणिक ग्रंथांच्या पद्यात्मक मराठी भाषांतराची अगर रूपांतराची. ओव्या, अभंग इत्यादिकांची रचना स्वतंत्र असे. परंतु तीहि आध्यात्मिक विषयांवरचीच असल्यानें तिचा व्यावहारिक शिक्षणाच्या दृष्टीनें तादृश उपयोग नव्हता. संस्कृत भाषेंत साहित्य, संगीत, वेदान्त, न्याय, मीमांसा, व्याकरण, वैद्यक इत्यादि विषयावरची ग्रंथरचना पुष्कळ होती. व त्यांचे विषयवार अध्यायन करणारे शास्त्री, पंडित, नैयायिक, मीमांसक, वैयाकरण, वैद्य इत्यादि मंडळी समाजांत थोडी बहुत निर्माणहि झाली होती. परंतु त्यांचे विषय प्रायः व्यावहारिक विषयांत येत नसल्यानें ज्यांना राज्यकर्ते, मुत्सद्दी, मंत्री, वकील, कारकून या नात्याचा व्यवहार करावयाचा त्यांची गरज सदर विषयांच्या अभ्यासानें भागण्यासारखी नव्हती. याकरितां क्रमिक वाचनपुस्तकें तसेंच इतिहास, भूगोल, गणित, मराठीचें व्याकरण, भौतिकशास्त्रें, भाषाशास्त्र इत्यादि विषयांवरील पुस्तकांची मराठी भाषेत रचना हे काम फार निकडीचें असून ते नानासारख्या अधिकारसंपन्न पुरुषासच सवाई माधवरावांच्या निमित्तानें साधावयाचें. नानाने माधवरावाकरितां पुढीलप्रमाणें व्यवस्था केली.

माधवराव ज्यांच्या कुळांत जन्मला त्या पेशवे घराण्यांतलि मोठा पुरुष त्याजपाशीं कोणीच नव्हता. तेव्हां त्यास पेशवे घराण्याची माहिती मिळून अभिमान वाटणें राजकर्ता या नात्यानें जरूर असल्यामुळें नानानीं त्याजकरितां पेशव्यांची बखर मुद्दाम लिहविली. ती चिटणिसाकडील बाबाजी गणेश या कारकुनानें लिहिली. तिच्यांत सन १७८२ पर्यंतची म्हणजे सवाई माधवरावापर्यंतची सर्व हकीकत आली असून त्रोटक पण विश्वासनीय व इतिहासाच्या तोडीची असल्याविषयीं कै. वि. का. राजवाडे यांनीं आपल्या लेखांत शेरा मारला आहे. दुसरा ग्रंथ नारायणव्यवहारशिक्षा या नांवाचा. तो नारायण नामक मनुष्यानें शके १७२१ त सौम्य नाम संवत्सरीं माघ शुद्ध ५ रोजीं पुरा केला. हा ग्रंथ शिक्षात्मक आहे, शास्त्रात्मक नाहीं. त्यांत व्यवहारोपयोगी, अनुभवजन्य हितोपदेश सांगितला आहे. लाभ, पालन, नाश–संरक्षण असे या ग्रंथाचे तीन भाग आहेत. नारदनीति, कणिकनीति, यक्षप्रश्न, पंचतंत्र, हितोपदेश वगैरे शिष्टग्रंथातून

बरीचशीं वचनें यांत घेतलेली आहेत ' (राजवाडे–प्रस्तावना) अर्थात् राजकर्त्यास जरूर अशी राजनीतीच या ग्रंथांत उपदेशिली आहे.

सुजाउद्दवल्याजवळ गणेश वेन्दाती हा विद्वान् गृहस्थ मराठ्यांतर्फे वकील होता. त्याचा चुलतभाऊ माधवराव अनंत वेदान्ती यानें २२ फेब्रुवारी १७८३ रोजीं सवाई माधवरावास एक उपदेशपर पत्र लिहिलें. सदर पत्रांत राजानीं कसें वागावें व त्यांनीं कोणत्या विषयांचा अभ्यास करावा हें सांगितलें आहे. ' नाना युक्तिप्रयुक्ति बोलणें, वादवेवाद जिंतणे, समयीं समर्पक उत्तर देणें, कलाकुशलता, हावभाव, नटनाट्य, कौतुकगीत, नृत्य, वीर्य, शौर्य, विवेक, शुचिष्मतता, लिहिणें बेरीज, तेरीज, शब्दशब्दांग, देशपरत्वें भाषा, विनोद, साहित्य इत्यादि गुणांची व विषयांची यादीच त्यानें दिली आहे. राजानें लोकसंग्रह करावा व न्यायनीतीनें वागावें हा त्याचा उपदेश योग्य असून बाकच्या गुणांची व विषयांची त्यानें जंत्री केली आहे. त्याप्रमाणें कोणी राजा अभ्यासास लागला तर त्याला राज्यकारभार सोडून जन्मभर विद्यार्थिदशाच पत्करणें भाग पडेल. तथापि माधवराव वेदान्ती याची वरील हकीकतींत जी कळकळ व्यक्त झाली आहे, ती महत्त्वाची असून तिजवरून महाराष्ट्रांतलि सर्व विद्वान् व विचारी लोकांचें लक्ष माधवरावाच्या अभ्युदयावर कसें खिळलें होतें एवढाच बोध घ्यावयाचा आहे.

आतां सवाई माधवरावाकरितां नानानीं आणखी काय केलें हे पाहिले पाहिजे. ' पेशव्यास बोधप्रद मनोरंजक व पौराणिक गोष्टी वाचावयास सापडाव्या व त्यास मोडी वाचण्याचाहि सराव व्हावा म्हणून त्यांनीं बापूजी गोविंद गोखले नांवाच्या व्युत्पन्न गृहस्थाकडून मुद्दाम भारत व भागवत यांच्या सारांशरूपानें मराठींत बखरी लिहविल्या आणि वेताळपंचविशी व शुकबहात्तरीप्रमाणें सारिकाशतकनामक चमत्कारिक गोष्टींचा ग्रंथ रचविला. '(नाना फडणविसांचें चरित्र) पेशव्यांची बखर वाचून त्यास मराठयांच्या इतिहासाचे ज्ञान झालें आणि भारत व भागवत यांच्या बखरींच्या परिशीलनानें त्याला भारतवर्षाचा प्राचीन इतिहास, धर्म नीति व संस्कृति हीं समजली. या बखरी बालबोधींत नसून मोडींत लिहिलेल्या असत. हा सद्यःकालीन ग्रंथापेक्षां जुन्या ग्रंथांतलि ठळक फरक होय. माधवराव सात वर्षांचा असतांच त्यानें मोडी अक्षर चांगलेच घटविलें असल्याचें दिसून येतें. कारण त्यावेळीं तुकोजीराव होळकर पुण्यास आले होते त्यास माधवरावानें पुस्त्या काढून दाखविल्या होत्या.

संस्कृत ग्रंथांतील ज्ञानानें माधवरावाच्या बुद्धीवर प्राचीन संस्कार घडले, पण त्या ज्ञानाचा एकांगीपणा घालविण्याकरितां पाश्चात्य पद्धतीच्या आधुनिक ज्ञानाची जोड मिळणें आवश्यक होतें. यासाठीं पुण्यातील इंग्रजांचा रेसिडेंट सर-चार्ल्स मॅलेट याजबरोबर आलेले डॉ. क्रूसो व डॉ. फिंडले यांची मदत घेण्याचें नानांनीं ठरविलें.

सवाई माधवरावांच्या अभ्यासाची जागा शनिवारवाड्यांतील आरसेमहालांत होती. तेथें ठरल्या दिवशीं येऊन डॉक्टर फिंडले सवाई माधवरावास भूगोल शिकवी. पण फिंडलेला मराठीचें ज्ञान नव्हतें व माधवरावास इंग्रजी भाषा अवगत नव्हती. तेव्हां भूगोल शिकवितांना दुभाष्याचें काम बाबाजी यानें करावें. फिंडले सांगेल तें बाबाजीनें कागदावर मराठींत लिहून काढावें व तें माधवरावानें वाचावें. हा अभ्यास आटोपल्यावर माधवरावानें बुद्धिबळें खेळण्यास बसावें. कारण बुद्धीची कसरत व विचारक्षमता वाढण्यास बुद्धिबलक्रीडेचा फार उपयोग होतो अशी आजच्याप्रमाणें त्या काळींहि समजूत असल्यानें बुद्धिबळाचा खेळ अभ्यासांतच धरला जात असावा. हा अभ्यास माधवराव वयाच्या १२ ते १६ व्या वर्षापर्यंत करीत होता. नीतिशिक्षण मिळण्याचा मार्ग गोष्टी श्रवण करण्याचा. याची सोय माधवरावाकरितां उत्तम केली होती.

राजपुत्रास द्यावयाच्या शिक्षणाचा त्या कांळांतील हा एक उत्कृष्ट नमुनाच होता. हिंदुस्थानाबाहेरील जग कसलें व केवढें आहे याची कल्पना तत्कालीन कोणाहि हिंदी मनुष्यास नव्हती म्हणण्यास हरकत नाहीं. अशा स्थितींत फिंडले याजकडून माधवरावाच्या शिक्षणास भूगोलाची मिळालेली जोड अपूर्वच समजली पाहिजे. बहुश्रुतपणा अंगीं येण्यास व चारचौघांत चतुरस्रता दाखविण्यास संस्कृत पाठांतराची व सुभाषितांची गरज फार. याची जाणीव माधवरावाची आजी गोपिकाबाई हीस असल्याचें तिच्या पत्रावरून दिसतें. तिनें पुढील पत्र माधवरावास उद्देशून १७८३ ज्या जानेवारी महिन्यांत लिहिलें आहे. 'त्यानें प्रातःकाळीं लिहिण्यास बसावें. कित्ता वळवावा, मग वाचावें. भारतांतील कांहीं गोष्टी माहीत असाव्या. जेवतांना विचार करून बोलावें व समयोचित भाषण करावें. राजसूय यज्ञांतील कथेच्या आधारें बोलावे. विराटपर्वाचें चिंतन करावे. वृद्धांच्या व शहाण्यांच्या तोंडून दिल्लीचा व शिवाजीचा इतिहास समजून घ्यावा. आपला बाप व पूर्वज यांची हकीकत कारभाऱ्यांच्या तोंडून ऐकावीं. चित्रे व

नकाशे पहाण्याची काळजी घ्यावी व त्यांचे ज्ञान सुज्ञापासून मिळवावें. हें भोजनोत्तर करावें. दोन प्रहरीं हस्ताक्षर वगैरेच्या अभ्यासास सुरुवात करावी. आपण कसें लिहितों हें पहाण्यास दोन समवयस्क व कुलीन सोबती असावें. नंतर अंकगणित म्हणजे करदान बस्तान, गुणाकार, भागाकार शिकावा. गुरुजींनीं प्रसंगविशेषीं त्याची कानउघडणीहि करावी. परंतु हें सर्व अभ्यासाच्या खोलींतच करावें, इतरत्र सर्वांनीं पेशव्याशीं आदबीनेंच वागावें. या वयांत त्यानें फक्त तिरंदाजी शिकावी व घोड्यावर बसण्यास शिकावें. सायंसंध्येनंतर संस्कृत श्लोक म्हणावें. पुरुषसूक्त व पवमान यांचा भाग म्हणावा. पण तो इतराबरोबर म्हणावा.' गोपिकाबाईनें हा अभ्यासक्रम नऊ वर्षांच्या मुलाकरितलिहिला असतांहि त्याचा बराच भाग प्रौढपणींहि लागू पडण्यासारखा आहे. गोपिकाबाईच्या पत्रांतील प्रत्येक वाक्य अमोलिक व अर्थपूर्ण आहे. माधवरावाच्या संगतींतील मुले कुलीनांची असावी हा शेरा खोचदार आहे. राजपुत्र नीतिमान् चारित्र्यसंपन्न, देशाभिमानी, कुलाभिमानी, कार्यकुशल, व्यवहारपटु, धूर्त व भारदस्त निपजण्यास ज्या शिक्षणाची अपेक्षा आहे त्याचें रहस्य या पत्रांत तंतोतंत उतरलें आहे. दिल्लीचा व शिवाजीचा इतिहास, मराठी राज्यस्थापनेचा उद्देश, मराठी राज्याचा दिल्लीदरबाराशी व इतर मुसलमान राज्यकर्त्यांशीं संबंध व पेशवेपदाचें उगमस्थान हें सर्व कांहीं या उपदेशांत आलें. राज्यकार्यधुरंधर व महान् मुत्सद्दी अशा नानासाहेब पेशव्याची गोपिकाबाई ही पत्नी. खेरीज थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीत प्रारंभी तिनें राज्यकारभार पाहिला होता. पतीच्या व पुत्रांच्या अमदानींत मोठाली राजकारणें चाललेली तिनें पाहिली होतीं. अशा स्त्रीला राजपुत्रास ज्या गुणांची व ज्ञानाची आवश्यकता वाटली तीच वरील उपदेशांत उतरली आहे. ती माधवरावाच्या शिक्षणाची वारंवार विचारपूस करी व त्यांत सुधारणा सुचवी. तिनें एकदा माधवरावाला गंगापुरास आपल्यापाशीं आणून त्याची एक प्रकारें परीक्षाहि घेतली होती.

या गोपिकाबाईच्या योग्यतेविषयीं राघोबाचे मत काय होतें हें त्याने माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली त्यानंतर थोड्या दिवसांनीं तिला लिहिलेल्या पत्रांत नमूद आहे. 'वडिलास मनसुबाहि कळतो. केवळ वरकडी बायकाप्रमाणें नव्हत. प्रपंचपरमार्थ दोन्ही वडिलास कळतात. तेथें काय विस्तारें लिहावे ?'

प्रत्यक्ष राज्यकारभाराचे शिक्षण ही एकंदर शिक्षणक्रमांतील शेवटची पायरी. ती अर्थात् पेशव्यास प्रौढपण येऊं लागले, तेव्हां त्याने नानाच्या मदतीने गाठली. पेशवे वयांत येत चाललेले पाहूनें 'नाना त्याना दररोज सायंकाळीं चार घटका दरबारांत घेऊन बसू लागले. त्या ठिकाणी परराज्यांतील वकील येऊन आपआपल्या सरकाराच्यातर्फे विनंति करीत व त्यांस नाना पेशव्याकडून यथोचित उत्तरे देववीत. दरबारांत जी जी कामे होत ती ती पेशव्यांच्या नजरे-खालून जात असत. कांहीं महत्वाच्या मसलतीबद्दल मुत्सद्दी व सरदार लोकांची खलबते चालत, त्यावेळीं श्रीमंत हजर असत.' (नाना फडणविसांचे चरित्र).

त्या काळांत घर हीच शाळा व बाप हाच गुरु. या कारणाने बापाचा उद्योग मुलाने करावा हा नियमच होऊन बसला होता. सन १७९६ त खंडेराव विठ्ठल विंचूरकर हे मरण पावले. तेव्हां त्यांचा मुलगा बारा वर्षांचा होता. नाना फड-णवीस हे पेशव्यांचे कारभारी म्हणून विंचूरकरांच्या मुलाच्या शिक्षणाची तज-वीज नानांनाच करावी लागली. त्यानी घोड्यावर बसणें, भाला फेकणे, तल-वारीचे हात करणे हें शिकविण्यास गोपाळराव पटाईत याची नेमणूक केली होती. तसेंच अक्षर, वाचन, कारकुनीचे व कारभाराचे ज्ञान यासाठी देवबा भाऊ कारकून यास नेमले. फार्सी शिकविण्यास मुनशी, वेद व ब्रह्मकर्म शिक-विण्यास केशवभट मोघे व प्रकृतीस जपण्यास काशीनाथपंत बाबा जोगळेकर यांची योजना केली.

दुसऱ्या बाजीरावाचे शिक्षण आनंदीबाईच्या नजरेखाली झाले. त्याला व त्याच्या भावंडांना आईसुद्धां कोपरगांवी ठेवले असून त्याच्या शिक्षणाची व्यवस्था नानानी पुण्याहून शिक्षक पाठवून केली होती. अर्थात् त्यास मिळाले ते शिक्षण पेशवे घराण्यांतील इतर पुरुषाप्रमाणेंच असले पाहिजे. रामचंद्र नारायण गोरे यांनी नानाला एक पत्र लिहिले आहे, त्यावरून बाजीरावाच्या शिक्षणाची कांही कल्पना करतां येते. 'श्रीमंत स्वस्ती कुशली आहेत. लेखनादि व्यवहार स्वेच्छे-करून जितका होईल तितकाच. रघुवंश द्वितिय सर्ग झाला. तृतीयाचे पन्नास श्लोक झाले आहेत. क्रीडासक्ति फार आहे. निरंकुश गजसादृश्य आहे.' (पे. द.) बाजीरावाचे लक्ष विद्याभ्यासाकडे नसून तो स्वेच्छ आहे· असेंच गोरे यांना वरील पत्रानें सुचवावयाचे होते.

सारांश, ज्याची जशी योग्यता, जरूरी व परिस्थिति त्याप्रमाणें त्याच्या

शिक्षणांत कमी अधिक विषयांचा अन्तर्भाव करण्यांत येई. व त्यास कमी अधिक अध्यापक ठेवण्यांत येत. सवाईमाधवरावास शिकवावयाच्या विषयांत मराठी व संस्कृत या दोन भाषाच होत्या. फार्सी भाषा नव्हती व इंग्रज लोकांचा रोजचा संबंध जडला होता तरी इंग्रजी भाषाहि त्यास शिकविण्याची नानास गरज भासू लागली नव्हती. कारण मुसलमानी अगर इंग्रजी दरबाराशी कांहीं राजकयि पत्रव्यवहार अगर वाटाघाट करावयाची झाल्यास दुभाष्यामार्फत तें काम होत असे. सवाई माधवरावालाच काय पण खुद्द नाना फडणविसांनाहि इंग्रजीचा मुळींच गंध नव्हता असें दिसते. परंतु विंचूरकरांची जहागीर उत्तर हिंदुस्थानांत व त्यांचे राजकारण मुसलमानी दरबाराशी. याकरितां त्यास फार्सी भाषा शिकविण्याची व्यवस्था नानानी केली.

पेशवाईतलि सरदार व मुत्सद्दी यांचे इंग्रजी भाषा न येण्यानें बहुधा आडलें नाहीं. परंतु पेशवाईच्या अखेरीअखेरीस स्थिति बदलत चालली. मराठ्यांची पिच्छेहाट होत जाऊन इंग्रजांचे वर्चस्व वाढू लागलें. विशेषतः मराठेशाहींतलि जे सरदार पेशव्यापासून फुटले व इंग्रजांच्या कक्षेंत सापडलें त्यांना इंग्रजी भाषा, इंग्रजी चालीरीति यांची मातब्बरी वाटून त्यांत वाकबगार होण्याचा त्यांनीं प्रयत्न चालविला. अशा सरदारांत गायकवाडाना अग्रस्थान मिळेल. गुजराथेंत गायकवाड व इंग्रज यांच्या हद्दीला हद्दी भिडलेल्या होत्या. त्यांचे दिवाण गंगाधर शास्त्री पटवर्धन फार बुद्धिवान् होते. ते संस्कृतज्ञ व विद्वान्हि असल्यामुळें गायकवाडींत वाढत वाढत दिवाणपदावर चढले. सांप्रतकाळीं इंग्रज सरकारच्या नोकरीत पदवीधराना जशा लवकर वरिष्ठ प्रतीच्या जागा मिळतात तशाच पेशवाईत संस्कृतज्ञ पंडिताना मिळत असत. त्यातल्या त्यांत गंगाधरशास्त्री विशेष व्यवहारचतुर व तरतरीत. इंग्रजाशीं दळणवळण वाढत जाणार असें दृष्टीस पडताच त्याने इंग्रजी भाषेंतहि आपली प्रगति करून घेतली. त्याजविषयीं एलफिन्स्टन साहेबानें दिलेला अभिप्राय फार मार्मिक आहे. तो म्हणतो, ‘ गंगाधर शास्त्री हा मनुष्य मोठा बुद्धिमान व धूर्त आहे. त्यानें सगळे बडोदे संस्थान अतिशय व्यवस्थित ठेवलें आहे. येथें (पुण्यांत) आपलें द्रव्य व वजन तो अशा रीतीनें खर्च करतो कीं, प्रत्येकाचे लक्ष त्याजकडेच लागावे. स्वतः विद्वान् शास्त्री असूनहि जसा कांहीं इंग्रजच असल्याप्रमाणें तो ऐट आणितो. तो चालतो जलद, बोलतो जलद, इतर कोणी बोलत असेल त्याला आडवितो व खोडून

काढतो. पेशवा व त्याचे मंत्री याना त्यानें मूर्खच ठरविले आहे. त्यांना तो पाजी (damn rascals) म्हणतो. कांहींहि बोलावयाचें असो त्यात हा इंग्रजी शब्द घुसडावयाचाच. होळकर किंवा दुसरे कोणी याजविषयीं मत देतांना तो म्हणतो ' बहोत ट्रिकवाला था. लेकीन बडा अक्कलमंद काक आयथा. ' (इ. सं.)

इंग्रजांविषयीं आदरबुद्धि व स्वजनाविषयीं हेटाळणी हा दुर्गुण महाराष्ट्रीयांस जडण्यास आरंभ गंगाधरशास्त्र्यापासूनच झालेला दिसतो. मराठीस धेडगुजरी किंबहुना बाटगें स्वरूप देणाराहि पहिला ब्राह्मण गंगाधरशास्त्रीच. रा. ब. गोपाळ हरि देशमुखांची जी पिढी अव्वल इंग्रजमिध्यें महाराष्ट्रांत चमकली तिचे गुरु-स्थान गंगाधरशास्त्र्यास द्यावे लागेल.

आतांपर्यंत शिक्षणविषयक विवेचन आले ते महाराष्ट्रांतील बड्या लोकांचे. त्यावरून मध्यम स्थितीतील समाजाच्या विद्येची नीट कल्पना होणार नाहीं. सामान्य जनाना शिक्षणाच्या सोयी केंव्हांहि परिमितच असावयाच्या. ब्राह्मणां तहि जे अगदींच गरीब त्यांपैकीं पुष्कळांना अक्षरशत्रू रहाण्याचीच पाळी येत असेल. खेड्यापाड्यांतून रहाणाऱ्या ब्राह्मणांना मराठी लिहितां वाचतां आलें व हिशेबठिशेबाचे ज्ञान झाले म्हणजे डोक्यावरून पाणी गेले. तथापि सरकारी नोकरीतलेच पण वरच्या दर्जास न पोंचलेले असे ब्राह्मण कामगार आपल्या मुलांना मराठीबरोबर संस्कृत भाषेचेंहि ज्ञान मिळवून दिल्यावांचून रहात नसले पाहिजेत. ती स्थिति डोळ्यापुढें येण्याकरितां एक उदाहरणच दिलेले बरे.

मस्तानीचा मुलगा समशेर बहाद्दर याच्या हाताखालीं एक स्वतंत्र पथक असून त्याची फडणविशी राघो केशव याला मिळाली होती. त्यानें आपल्या कर्तबगारीनें पालखीपद संपादिलें होते. पाणिपतच्या युद्धांत समशेर बहाद्दरा-बरोबर राघो केशवहि मारला गेला. त्याच्या पश्चात् त्याचा पुत्र सदाशिव रघु-नाथ यानें समशेर बहाद्दराचा पुत्र अल्लीबहाद्दर याजकडील पागेची फडणविशी स्वतःस मिळण्याकरितां पेशवेदरबारांत अनेकवार विनंति केली. परंतु त्यावेळीं शिलेदारांच्या कारकुनाचीच पागेच्या फडणविशीकडे योजना झाल्यामुळें ती जागा सदाशिव रघुनाथाकडे आली नाहीं. अशा स्थितींत नोकरीच्या अभावी त्याचे फार हाल होऊं लागले म्हणून त्याने नानाफडणविसास आपले हाल कळ-विले. सद्यःकाळांत असा अर्ज कोणी वरिष्ठाकडे करण्याचे मनांत आणील तर फर्ड्या इंग्रजी भाषेंतून लिहील आणि इंग्रजी येत नसल्यास प्रौढ मराठींतून निबंध-

रूपानें आपले गाऱ्हाणें मांडील. अर्थात् या दोन्ही पद्धतींच्या पोटांत आपल्या अकलेची व विद्वत्तेची छाप वरिष्ठावर पाडण्याचाच अर्जदाराचा हेतु असतो. परंतु पेशवाईंतील रीत याहून वेगळी होती. त्या वेळीं इंग्रजीच्या जागीं संस्कृत भाषा आढयतेने मिरवीत होती व गद्याऐवजीं पद्यरचनाच प्रतिष्ठित मानली गेली होती. सदाशिव रघुनाथास संस्कृत भाषा थोडबिहुत अवगत असल्या-मुळें त्यानें संस्कृत श्लोक रचून पाठविला तो असा—

त्वयि प्रसन्ने मम किं गुणेन ।
त्वय्यप्रसन्ने मम किं गुणेन ॥
रक्ते विरक्तेच वरे वधूनाम् ।
निरर्थकः कुंकुमपत्रभंगः ॥

आतांपर्यंत शिक्षणपद्धतीचा विचार केला तो ब्राह्मण व ब्राह्मणसदृश जातींचा होय. ब्राह्मणवर्गांत सरदार होते तसे मराठे जातींतहि होते. परंतु ते ब्राह्मणाइतके शिकलेले नव्हते. त्यांपैकीं बहुतेकांचे शिक्षण सही करण्यापुरतें किंवा फार तर आलेले पत्र वाचण्यापुरतें असावें. मराठे सरदारांनीं स्वतःच्या हातानें अथपासून इतिपर्यंत लिहिलेली पत्रें उपलब्ध नाहींत. पण अशी शेंकडो पत्रें ब्राह्मणांपैकीं पेशव्यापासून तो अगदीं कनिष्ठ प्रतीच्या सरदारापर्यंत व मुत्सद्द्यापर्यंत दाख-वितां येतील. असें होणेंहि अगदीं स्वाभाविक. त्यामुळेंच मराठे सरदारांचा व खुद्द सातारच्या महाराजांचाहि सगळा पत्रव्यवहार ब्राह्मण अगर प्रभु कारकुनाकडू-नच लिहिलेला आढळतो. रा. जोशी व चांदोरकर यांनीं लेखनालंकार नांवाचा ग्रंथ प्रकाशित केला असून त्यांत ब्राह्मण, मराठे आदिकरून इतिहासप्रसिद्ध स्त्री-पुरुषांच्या हस्ताक्षरांचे नमुने छापले आहेत. तो चाळला असतां मराठेशाहींतील कोणकोणत्या स्त्री-पुरुषांस लिहितां येत होते हें समजतें. मराठे मंडळींत छत्रपति शाहूमहाराज, मल्हारराव होळकर, तुकोजीराव होळकर, कान्होजीराव आंग्रे, त्रिंबकराव दाभाडे, खंडेराव दाभाडे, राणोजी, दत्ताजी, जनकोजी व महादजी शिंदे, खंडोजीराव माणकर, धार संस्थानाचे संस्थापक उदाजीराव पवार, आप्पा-जीराव पाटणकर प्रभृति पुरुष साक्षर होते. साक्षर मराठे स्त्रिया पुरुषांच्या मानानें फारच थोड्या होत्या. त्यांत जतेच्या येसूबाई डफळे या आढळतात. येसूबाई डफळे यांजवर जत संस्थानाचा कारभार पहाण्याचाच प्रसंग आलेला होता.

पेशवे व इतर ब्राह्मण सरदार यांच्या स्त्रिया बहुतकरून साक्षर असत. त्यांतलि बऱ्याच जणींना पोथी वाचण्याचें व पत्रे लिहिण्याचेंहि ज्ञान होतें. विधवा स्त्रियांना रिकामा वेळ घालविण्याकरितां व सुवासिनींना आपल्या पतींना राज्यकारभारांत हातभार लावण्याकरितां इतक्या भाषाज्ञानाची आवश्यकता वाटत असावी. ब्राह्मण सरदारांच्या भार्या मूळ गरीब घराण्यांतील असल्यामुळें त्यांना माहेरी लिहिण्यावाचण्यास कोणी शिकविलें नसल्यास लग्न होऊन सासरी आल्यावर सासरच्या मंडळीकडून त्यांना अक्षरओळख करून दिली जाणे स्वाभाविक होय. साक्षर ब्राह्मण स्त्रियांची कांहीं नांवें पुढीलप्रमाणें १ राधाबाई–बाळाजी विश्वनाथाची भार्या २ काशीबाई–पहिल्या बाजीरावाची पत्नी ३ सगुणाबाई–बाजीरावाचा पुत्र जनार्दनपंत याची पत्नी ४ आनंदीबाई–राघोबादादाची पत्नी ५ भिऊबाई–बाळाजी विश्वनाथाची कन्या व बाबूजी नाईक बारामतीकर यांचे बंधू आबाजीपंत यांची पत्नी ६ गंगाबाई–सवाई माधवरावाची आई ७ भवानीबाई–चिमणाजी शंकर सचिव (शक १७२०–४९) यांची पत्नी. ८ अनुबाई घोरपडे–व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यांची पत्नी. या स्त्रियांपैकीं जनार्दनपंताची पत्नी सगुणाबाई हिला लिहितांवाचतां चांगले येत असून तिचा ग्रंथसंग्रहहि बराच होता. आनंदीबाईचे लेखनवाचन सर्वश्रुत आहे. अनुबाई व गंगाबाई या राज्यकारभारच पहात होत्या, तेव्हां त्यांची गति पुष्कळच झाली असली पाहिजे.

अशा रीतीनें शिक्षण देण्याचे फुटकळ प्रयत्न कितीहि झाले तरी त्यास स्वतंत्र विद्यापीठाप्रमाणें अनेक विद्या, कला व शास्त्रे यांचे एकीकरण करून राष्ट्रीय ज्ञानाची प्रगति घडवून आणणे साधणे शक्य नव्हतें. उत्तर हिंदुस्थानांत नालंद तक्षशिला इत्यादि विद्यापीठे प्राचीनकाळीं अस्तित्वांत होती. त्या धर्तीचे विद्यापीठ स्थापण्याची कल्पना मराठी राज्यांत कोणास सुचल्याचे दिसत नाहीं. मात्र श्रावणमासांत ब्राह्मणांस दक्षिणा वांटून त्यायोगानें प्राचीन विद्येच्या प्रसारास उत्तेजन देण्याचा प्रयत्न सेनापति दाभाडे यांनीं पूर्वी सुरू केला होता, तो पहिल्या बाजीरावापासून पुण्यास चालू झाला व पेशवाई अखेरपर्यंत टिकला. ब्राह्मणास वेद, काव्य, न्याय, व्याकरण, मीमांसा इत्यादि शिकविण्याकरितां सरकारच्या आश्रयानें वेदशाळा व संस्कृत पाठशाळा चालविण्याचा रिवाज सर्व जुन्या हिंदुराजांचा होता. एखाद्या प्रसिद्ध देवस्थानास लागून वेदशाळा अगर

संस्कृतपाठशाळा ठेवावी, त्यावर गुरुजी नेमून त्यास वर्षासन द्यावें व पाठशाळेंत शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या उदरनिर्वाहार्थ अन्नछत्र घालावें ही जुनी विद्योत्तेजनाची राजे लोकांची रीत असून अद्यापिहि कांहीं लहान मोठ्या हिंदु संस्थानांतून आढळते. त्यायोगानें जुनी विद्या जीव धरून रहाते यांत शंका नाहीं. परंतु तिचा फैलाव मात्र व्हावा तितका होत नाहीं. तो फैलाव त्या विद्वानांची द्रव्यरूपानें संभावना झाली तरच होतो व ती संपादण्यांत होतकरू तरुण भूषण मानतो.

पेशव्यानी वरील प्रकारें वार्षिक दक्षिणा वांटण्यास सुरुवात केल्याचा फायदा अनेक रूपानी समाजास मिळाला. दक्षिणेच्या आशेनें तरुण लोक विद्या शिकू लागल्यामुळें जुन्या पाठशाळा भरभराटीस आल्या व नव्या पाठशाळा स्थापण्यास विद्वानाना उत्तेजन मिळालें. कृष्णा, गोदावरी, भीमा इत्यादि नद्यांच्या कांठीं भिक्षुकवर्गानें जाऊन नवी क्षेत्रें वसविलीं व त्या क्षेत्रांतून सुखवस्तु गृहस्थ रहावयास येऊन त्यांनींहि भिक्षुकाना आश्रय दिला. विद्येच्या या प्रसाराबरोबर नवीन कवि व ग्रंथकार महाराष्ट्रांत निर्माण झाले. पेशव्यांचा कित्ता इतर मराठे सरदारानींहि उचलला व अशा रीतीनें मराठी साम्राज्यांत विद्याभिवृद्धि झालीच; पण पेशव्यांच्या दक्षिणेची कीर्ति आसेतुहिमाचल साऱ्या भरतखंडांत पसरून मराठी साम्राज्याबाहेरचेहि हजारो भिक्षुक पुण्यास लोटूं लागल्यामुळें प्राचीन विद्येच्या वठत चाललेल्या वृक्षाला सर्वत्र नूतन पालवी फुटली.

दक्षिणेची रक्कम थोरल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत लहान होती पण त्यानंतर पेशवाईची भरभराट जसजशी होत गेली तसतसा दक्षिणेचा आंकडाहि मोठा झाला. सन १७३६ त म्हणजे बाजीरावाच्या मरणापूर्वीं चार वर्षें अवघे १६३५४ रुपये दक्षिणा म्हणून वांटण्यांत आले. पण आणखी पंधरा वर्षानीं नानासाहेबाच्या आमदानींत हें मान अठरा लाखावर गेलें. याचें एक कारण असें कीं, दूरदूरचे ब्राह्मण पुण्यांत दरसाल अधिकाधिक येऊं लागले; तेव्हां दक्षिणेकरितां अधिक पैसा खर्च करणें पेशव्याना भागच पडलें. पेशव्यांचा राज्यविस्तार वाढला म्हणून त्यांच्या खजिन्यांतील शिल्लकहि त्याच प्रमाणांत वाढली असें घडलें नाहीं. उलट पक्षीं सैन्याचा खर्च राज्यविस्ताराबरोबर जास्ती जास्ती होत गेल्यानें खजिन्यांत पैशाचा खडखडाटच वाजूं लागला. परंतु हें पुण्यकृत्य असून तेवढेंच ईश्वराच्या घरीं रुजू होईल,

अशा धर्मभावनेनेच अनेक ओढी सहन करून त्यांनीं ते चालू ठेवलें. त्याचा लौकिक दृष्टयाहि त्यांस फायदा झाल्यावांचून राहिला नाहीं. ही एवढी मोठी खैरात एकट्या पेशव्यांकडूनच होत असल्यामुळें त्यांजविषयीं अखिल हिंदुस्थानात साऱ्या हिंदुमात्रांचा ग्रह अनुकूल होऊन ब्रह्मवृंदापासून तर त्यांस दुवाच लाभला. सन १७५२ सालच्या देकाराचें वर्णन तत्कालीन शकावलीकरानी पुढीलप्रमाणें केलें आहे. ' राजश्री भाऊसाहेब पेशवे पर्वतीस जाऊन रमणीयाचा ओटा बांधला, ब्राह्मणास दक्षणा द्यावया कारणें. ही तजवीज श्रावण शु॥ ७ स केली. नंतर शु. ८ सोमवारी पुण्यात ब्राह्मणास दक्षिणा द्यावयास प्रारंभ केला. पाचा ठायी दक्षिणा द्यावयास द्वारे केली आणि दक्षणा फार दिल्या. १२–१३ लाख रुपये वांटले. खबुतरखान्यांत भिकारभंणग यास देकार महादाजी गोविंद याजकडून देवविला. आठरा पगड जातीतून जो घ्यावयास गेला त्यास दिला. रमणियात रात्री दिवट्या लाविल्या. ब्राह्मणावर उजेड पाडविला. गांवांपावेतो वाटेने दुतर्फा हिलाल लाविले. मोठा धर्म जाला. पन्नाससाठी हजार ब्राह्मण हालला. सत्तर हजारपर्यंत गणती जाली. नाना धर्मात्मा थोर. ऐसा कोणी झाला नाहींसा दिसते. '

दक्षिणेचे सालोसालचे आकडे कागदोपत्री आढळतात. त्यांपैकीं १७५२ सालाचा आकडा २॥ लाख होता, १७५४ त अडीच लाखांचा आकडा आठ लाखावर गेला व १७५८ त आठरा लाख रुपये खर्ची पडले. दक्षिणेच्या मुळाशी धर्मादायाची व भूतदयेची बुद्धि होती तरी सबघोडे बाराटक्के असा आंधळा कारभार त्याबाबतींत नव्हता. ब्राह्मणांची पात्रापात्रता ठरविण्याकरितां त्यांची परीक्षा शास्त्री, पंडित व वैदिक यांजकडून घेण्यांत येई व ते ठरवितील त्याप्रमाणांत दक्षिणा वांटली जाई. दक्षिणेबरोबर गरिबाकरितां देकार असे व निवळ भिक्षेकऱ्याकरितां शिधा व खिचडी यांचीहि योजना असे. विद्वान्, अविद्वान्, अब्राह्मण, स्त्रीपुरुष या सर्वांनी पुणे शहर श्रावणमासांत अगदी गजबजून सोडावे.

देकाराच्या जागाहि योग्यतेप्रमाणें वेगवेगळया असत. रमण्याची जागा प्रथम कबुतरखान्यांत होती, पण सन १७५८ त पर्वतीच्या पायथ्याशी रमण्याकरितां स्वतंत्र आवार बांधून झाल्यावर दक्षिणा तेथेंच वाटण्यांत येऊ लागली. रमण्यांत सर्व साधारण ब्राह्मण असत, विद्वान ब्राह्मणांना त्या रगाड्यांत न घालतां शनिवार

वाड्यांत आणून त्या ठिकाणीं त्यांची संभावना होत असे. या विधानास खालील उताऱ्याने पुष्टि मिळते ' सन १७५४ च्या श्रावण मासांत ६७९६८९ रु. रमण्यांतील ब्राह्मणास व भिकाऱ्यांस बायकास वाटले. व शनिवार वाड्यांत १४८६६६ रु. विद्वान् ब्राह्मणास वाटून त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्यांच्या नांवाच्या जंत्रीत महाराष्ट्रांतीलच काय पण अखिल हिंदुस्थानांतील विद्वानांची नांवें आहेत ' (पे. द. २२) सारांश ब्राह्मण ब्राह्मणेतर, विद्वान्, अविद्वान्, स्त्रिया व पुरुष या सर्वांचा अन्तरात्मा श्रावण मासांत संतुष्ट करणें पेशवे आपले पवित्र कर्तव्य समजत असत. दक्षिणेकरितां शृंगेरी, कांची, श्रीरंगपट्टण. कुंभकोण, तंजावर, रामेश्वर, काशी, कनोज, ग्वाल्हेर, मथुरा इत्यादि इष्ट दिशांचे ब्राह्मण पुण्यांत येत. त्यांत वैदिक, वैयाकरण, ज्योतिषी, कवि, वेदान्ती, नैयायिक भिषक् असे सर्व शाखांचे विद्वान् असत. त्यांची परीक्षा रामशास्त्री, बाळशास्त्री, अय्याशास्त्री, काशिनाथशास्त्री यांसारख्या पंडितानी व वैदिकानी घ्यावी. दक्षिगा योग्यता पाहून कशी देण्यांत येत असे हें खालील पत्रांत स्पष्ट सांगितले आहे. सदर पत्र थोरल्या माधवरावाच्या कारकिर्दींत सन १७७० त पटवर्धनांच्या कारकुनाने पुण्याहून मिरजेस लिहिले आहे. ' श्रावण मासाचे दक्षिणेस ३८३५४ ब्राह्मण रमण्यांत आले, त्यांस दोन लक्ष बावन हजार रुपये व १५५८ ब्राह्मग (शनिवार) वाड्यांत आले त्यांना बावन हजार रुपये दक्षिणा. एकूण ३ लक्ष ४ हजार रुपये दक्षिणा वांटली. दक्षणा उत्तम प्रत दिली. दशग्रंथी चांगले यांस २५ रुपयापासून ४० रुपयांपावेतो दक्षिणा दिली. पंचग्रंथी यांस १५ रु. पासून २० रु. पर्यंत, केवळ गृहस्थास ४ रु. पासून १० रु. पावेतो याप्रमाणें दिली. दाक्षिणा उत्तम दिली. ' (ऐ. ले. सं.) वरील पत्रांत वैदिकांचा उल्लेख आहे, पंडितांचा नाहीं. तो खालील पत्रांत आढळतो. ' यंदा श्रीमंतांच्या वाड्यात दशग्रंथी ब्राह्मण चारशे व ४८।४९ पंडित वर्षाप्रमाणें आले आहेत. दक्षिणाहि बरीच होल्ये,' (ऐ. ले. सं. खंड ४ पुण्याचे पत्र) पेशवे दरबाराला सन १७७५ साली पैशाची जरा तंगी भासत असल्यामुळें दक्षिणेचे मान कमी करावयाचे पण लौकिकांत तसे दिसूं द्यावयाचे नाहीं असें योजले होते. त्यासाली दक्षिणेस सुरुवात ता. २-८-१७७५ रोजीं झाली. पर्वतीजवळील रमण्याच्या जागेला चार दरवाजे होते. त्या दरवाजावर वीस घटिका दिवसापासून अस्तमाना पर्यंत ५५७० ब्राह्मणास दक्षिणा मिळाली. सारी दक्षिणा खिचडीच्या खुर्दासुद्धां

२ लक्ष रुपयांत आटोपण्याचा बेत होता. ९० हजार रुपये रमण्यांत, ५३९२७ रुपये वाड्यांत पंडित व आश्रित वगैरेना, चिंचवड, थेऊर. गंगापूर, वाई, यवतेश्वर येथील ब्राह्मणाना व दुखणेकऱ्याना १५ हजार रुपये व आणखी किर-कोळ अशी दक्षिणेची वाटणी योजली होती. दक्षिणेकरितां तीस हजार ब्राह्मण जमतील असा अदमास होता.' (पे. द. ४३)

आलेल्या विद्वानांचा सत्कार पेशव्याकडून झाल्यावर पुणें शहरांतील इतर सरदार-दरकदारांनीं व सावकारानी करून त्यांस सुग्रास भोजन घालावे असा-शिष्टसंप्रदाय होता. त्याप्र अनुसरून मिरजेचे सरदार पटवर्धन आपल्या पुण्यांतील वाड्यांत विद्वानांची संभावना करीत असत. 'आमच्या वाड्यांत (पटवर्धनांच्या) श्रावण मासांत पाच दिवस पावेतों १८०-१९०-२०० पात्रं होत होतीं. दशमीपर्यंत समारंभ (असल्याने) पात्रे याप्रमाणें होतील. मग १००-१२५ होतील' (ऐ. ले. सं. सन १७७०).

दक्षिणा वांटतांना ज्याला त्याला त्याच्या योग्यतेनुरूप दक्षिणा मिळावी अशी व्यवस्था रमण्यांतहि ठेवण्यांत येत होती असें दिसते. सन १७८६ साली दाक्षिणेचे वेळी, चार दरवाजावर योग्य माणसें नेमण्याचे योजिले होतें. दरवाजा-वरील माणसांत दोन वर्ग असत. एक दक्षिणा देणारांचा व दुसरा ती देताना जवळ बसणारांचा. पहिल्या दरवाजावर दक्षिणा देणारांत बालाजी जनार्दन, (नाना फडवीस) बापूभट शिंत्रे, भास्कर दीक्षित कर्वे उपाध्ये (पेशव्यांचे) काशिनाथशास्त्री व त्यांच्याजवळ बसणारात भिक जोशी पंचनदीकर, त्रिमं-गळाचार्य, नीलकंठ जोशी व्यवहारे, महादेव दीक्षित आपटे व बापू पाठक; दुसऱ्या दरवाजावर दक्षिणा देणारांत रामशास्त्री, प्रभुणे, महादेव शास्त्री सदाशिव दीक्षित, कर्वे उपाध्यें व गजानन भट ढेकणे आणि जवळ बसणारात रामचंद्र दीक्षित ओक, विद्याधर जोशी, सदाशिवभट नानल, वासुदेव जोशी चिपळूणकर, हरि दीक्षित दात्ये, चतुर्भुजदेव, गंगाधर दीक्षित गोडबोले. तिसऱ्या दरवाजावर दक्षिणा देणारांत अमृतराव विश्वनाथ, सदाशिव दीक्षित दात्ये, जयवंतराव यशवंतराव पानसी, बाळंभट कर्वे उपाध्ये, बाळ जोशी माल-गुंडकर व जवळ बसणारांत कृष्ण दीक्षित, रानडे, बापूभट लेले, बाजी जोशी श्रीवर्धनकर, चिंतामणशास्त्री काणे, गंगाधर भट विध्वंस, रामजोशी रोडे व बापू जोशी चापेकर आणि चौथ्या दरवाजावर दक्षिणा देणारांत दाजीबा फडके,

लक्ष्मणरावर रास्ते, सदाशिवभट शिंत्रे, बाळंभट थत्ते व जवळ बसणारांत त्रिंबकशास्त्री, रामभट निजसुरे, रघुनाथ जोशी सातारकर, विनायक दीक्षित गुढबेकर. (पे. द. ४२) सारांश, दक्षिणा देणारांत मुख्यतः मातबर गृहस्थ, भिक्षुक व पंडित असत. व जवळ बसून दक्षिणा कोणास किती द्यावी याचा जरूर तेव्हां सल्ला देणारांत सगळेंच भिक्षुक वर्गांतील असत. या सर्वांत कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे द्रवीड, गुजराथी असे ब्राह्मण असून ते ऋग्वेदी, यजुर्वेदी, आपस्तंब, अथर्ववेदी, इत्यादि भिन्न शाखांचे असत. त्याचा हेतु असा कीं, कोणास अन्याय होऊं नये, पात्रापात्रता ओळखूनच दक्षिणा मिळावी व शक्य तर दक्षिणेसाठीं आलेले ब्राह्मण कोणा ना कोणाच्या ओळखीचे निघावे. नाना फडणविशी बेत म्हणतात तो हाच.

दक्षिणेचा हा सोहळा खरोखरच अद्भुत होता. दक्षिणेकरितां हजारों भिक्षुक पुण्यांत जमावयाचे व त्याना लाखो रुपये दक्षिणा वाटली जावयाची. ब्राह्मणाबरोबरच गोसावी, जोगी, बैरागी, कंगाल यावयाचे. 'त्यांना दक्षिणा देण्यासंबंधानें कंगालांत बायका बहुत जमा जाहाल्या आहेत. त्यांचीच दाटी फार. कंगाल भिकारी रांडांची दाटी. ते राहिल्यामुळें गोंगाट फार पडला आहे. यास्तव भिकाऱ्याबरोबर भिकारणी बायकांची दक्षणा दिल्यास ब्राह्मण बायकांची मात्र दक्षिणा राहलि, तें उद्या होईल. आज्ञा होईल त्याप्रमाणें करूं' असें एक अधिकारी वारिष्ठास कळवितो. (पे. द. ४३) हा देखावा पहाण्यास गावोगावच्या तमासगिरांचीं गर्दी पुण्यांत लोटे. तिला दाबांत ठेवून शांतता राखण्याकरिता कोतवाल, प्यादे व लष्कर सिद्ध असे.

सन १७९७ त कॅप्टन मूर याने रमणा पाहून त्याची हकीकत पुढीलप्रमाणें लिहून ठेवली आहे. तो म्हणतो ' प्रत्यक्ष सरकारी दक्षिणा जरी थोडी असली तरी खुद्द पुण्यांतील धनिक व वाटेने येताना गांवोगांवीं भेटणारे उदार लोक अशा परस्थ ब्राह्मणास नाना प्रकारची दाने देत. चातुर्मास्यात दान करण्यानें मोठे पुण्य लागते वेळीं सार्वत्रिक श्रद्धा आहे. पुण्यास सरासरीनें चाळीस हजार ब्राह्मण दक्षिणेकरितां जमतात. घरून निघाल्यापासून परत जाईपर्यंत त्यांचें पोट बाहेरच भरे. आणि वार्षिक निर्वाहापुरती पुंजी त्यांजपाशीं सांचे. रमण्याच्या आवारांत ब्राह्मणेतरांना सोडीत नाहींत. आम्ही मोठ्या मिनतवारीनें तो देखावा पाहण्यासाठीं आंत जाऊं शकलो. एका द्वारावर बाजीरावांचे बंधु

अमृतराव होते.......या द्वारावर रुपये तोलून वाटावयास देण्याचें काम अमृतरावाच्या देखरेखीखालीं चालले होते. जवळच लाल रंगानें भरलेला एक हंडा असून त्यांत हात बुडवून एक नोकर आंत येणाऱ्या प्रत्येक माणसाच्या कपड्यावर किंवा अंगावर आपल्या पंजाचा छाप उठवी. सूर्यास्ताची वेळ आली तरी सर्वांना आंत घेऊन झाले नव्हतें. हजारों लोक बाहेरच होते. आंतल्या आवारांत वीस हजारांहून जास्ती लोक मावतील असें मला वाटले नाहीं......., सर्वांना आंत घेण्यास रात्रीचे दहा तरी वाजले. नंतर प्रत्येकाचे पदरांत रकम घालून त्यास बाहेर सोडण्यांत आले. प्रत्येकांस तीन ते दहा रुपये मिळत. दक्षिणा किती मिळावयाची ही केवळ नशिबाची गोष्ट व देणाराची मर्जी. आम्हांस सुरतेहून आलेला एक ब्राह्मण भेटला, त्यास आम्ही विचारले, ' दहापांच रुपयासाठीं इतके लांब येणे तुम्हांस कसे परवडतें ? ' तो म्हणाला ' घरांत विशेष प्राप्तीचें मला काम नाहीं. दोन महिने पोट बाहेर पडते. वाटेनेंहि कांहीं प्राप्ति होते. मिळून निर्वाह चालतो. खेरीज अमुकच वाटेनें गेले पाहिजे असें नाहीं. वेळेचीहि निकड नाहीं. जरा दुसरीकडे प्राप्तीचा संभव दिसला कीं, चालला तिकडे भटकत. धनिक लोक व दाते सर्वत्र असतातच. शिवाय पुण्याचा प्रवास घडतो. ' हाहि मोठाच लाभ समजला जाई, घरीं पोंचेतोंपर्यंत प्रत्येकाजवळ तीनशेंच्या आंत बाहेर रकम जमे. (मराठी रियासत उत्तर विभाग २)

दक्षिणेला सुरुवात नागपंचमीच्या दुसऱ्या दिवसापासून म्हणजे श्रावण शुद्ध षष्ठीस होऊन दशमीला समारंभ संपावा व त्या सुमारास शहरांतील इतर सुखवस्तु लोकांनीं आलेल्या ब्राह्मणांचा यथाशक्ति सत्कार करावा. पुण्यांत आल्यानंतर ही प्राप्ति व वाटेची जातायेताची अवांतर प्राप्ति मिळून भिक्षुकवर्गाच्या कुटुंबाची वार्षिक बेगमी त्यांवर व्हावी. पुण्यांत येणाऱ्या भिक्षुकांना पेशवे दक्षिणा देतच. पण काशीक्षेत्र हे विद्येचें प्रमुख केंद्र; तेथें देशोदेशींचे विद्वान् ब्राह्मण व त्यांनीं चालविलेल्या पाठशाळा असत. त्या सर्व ब्राह्मणांना पुण्यासारख्या दूर ठिकाणीं दरसाल येणे अशक्य असल्यामुळें पेशवे पुण्याहून त्यांजकरितां दक्षिणेची रकम मुद्दाम पाठवून देत. सन १७६७ त माधवराव पेशव्यानें त्या प्रीत्यर्थ ३१५०० रु. मंजूर केले होते. माधवरावाची ही वहिवाट नानाफडणविसानेंहि पुढें तशीच चालू ठेवली.

पुण्याहून दक्षिणेच्या फुटकळ रकमा घेऊन जे विद्वान् ब्राह्मण परत आपआपल्या गांवीं जात त्यांपैकीं बहुतेक जण आपल्यापाशीं चार दोन शिष्य बाळगून त्यांजकडून

वेदशास्त्रांचे अध्ययन करवीत आणि कित्येक जण संघानें पाठशाळा व वेदशाळाहि चालवीत. वरील एका उताऱ्यांत वाड्यांत जमलेल्या १५५८ ब्राह्मणांचा आंकडा दिला आहे. हे ब्राह्मण वैदिक व पंडित असून महाराष्ट्रांतून व इतर प्रांतांतूनहि आलेले होते. त्यांचें शिक्षण वरील दोन रीतींपैकीं कोणत्या तरी एका रीतीनें झालें असलें पाहिजे. पण या शिक्षणपद्धतींत पूर्वजांनीं मिळविलेली विद्या शिकून जशीच्या तशी जतन करणें याहून अधिक उपयुक्त कार्य साधत नव्हतें. हेंहि कार्य एका अर्थानें महत्त्वाचेंच होतें. कारण मराठी राज्यापूर्वी सर्वत्र गाजत असलेल्या मुसलमानी अमलाखालीं प्राचीन आर्य विद्येचा बहुतेक लोपच झाल्यासारखा होता. तिचें पुनरुज्जीवन पेशव्यांनीं महाराष्ट्रांतच काय, पण सगळ्या हिंदुस्थानांत दरसाल लाखों रुपये खर्चून केलें हे त्यांचे हिंदुधर्मावर मोठेच उपकार होत. त्यांच्यापुढें नालंद व तक्षशिला असल्या विद्यापीठाचें एकादें उदाहरण हिंदुस्थानांत कोठेंहि असतें तर त्यांनींहि महाराष्ट्रांत त्या प्रकारचें विद्यापीठ लहान प्रमाणावर कां होईना स्थापिलें असतें. कारण ते वर्णानें ब्राह्मण असल्यामुळें त्यांना विद्येची अभिरुचि नैसर्गिकच होती. त्या विद्यापीठाचा एक मोठा उपकार असा झाला असता कीं, ठिकठिकाणचे पंडित या निमित्तानें एकत्र जमून त्यांना जुन्या शास्त्रांची खुंटलेली वाढ चालू करण्याची सद्बुद्धि सुचली असती आणि फिंडलेसारखे जे सुशिक्षित युरोपियन लोक हिंदुस्थानांत वारंवार येत त्यांच्या गाठी पडून व त्यांजबरोबर संभाषण होऊन त्यांजकडील इतिहास, भूगोल, गणित हे विषय व रसायन ज्योतिष यांसारख्या शास्त्रांत युरोपांत लागलेल्या शोधांची माहिती मिळून त्या त्या विषयाचा अभ्यास महाराष्ट्रीय विद्यापीठांत करण्याची प्रेरणा झाली असती. अशा रीतीनें आक्सफोर्ड, केंब्रिज इत्यादि विश्वविद्यालयांच्या धर्तीवर निदान एक विश्वविद्यालय चालविणें पेशव्यांच्या किंवा त्यांच्या कारभाऱ्यांच्या विद्याभिरुचीस अशक्य नव्हतें. या पीठाचा परिणाम एकंदर महाराष्ट्रीय समाजावर विलक्षण प्रकारचा होऊन विद्वत्तेंत व अनेक शास्त्रांच्या अध्ययनांत तो युरोपीय राष्ट्रांच्या जोडीस बसता. मराठी राज्य टिकविण्याच्या दृष्टीनेंहि हा प्रयत्न अमोलिक होता. सवाई माधवरावाच्या शिक्षणाचा नानांनीं ज्या प्रगतिपर धोरणानें उपक्रम केला, त्याचें पर्यवसान नानांच्या हातून पुण्यांत प्रथम विद्यालय नंतर विद्यापीठ स्थापण्यांतहि झाले असतें असें अनुमान करण्यास जागा आहे. तथापि ती मजल पेशवाईत गांठली गेली नाहीं हें खरें.

प्रकरण सातवें.

ग्रंथसंग्रह व ग्रंथवाचन

विद्येच्या प्रसारास मुख्य हरकत पुस्तकांची. त्या काळीं मुद्रणकला माहीत नसल्यामुळें पुस्तक ही चीज फार मौल्यवान् व दुर्मिळ होती. पुस्तकें सामान्यतः शास्त्री, पंडित, पुराणिक, वैदिक, वृत्तिवान् जोशी, यांजपाशी असत. त्यांच्या खालोखाल घरंदाज गृहस्थापाशीं सांपडत. सरदार, जहागिरदार व राजेरजवाडे यांचा सामाजिक दर्जा सर्वांत श्रेष्ठ व त्यांचे कार्यहि अत्यंत जिव्हाळ्याचे. या कारणाने त्यांजपाशी पुस्तकसंग्रह साहजिकच मोठा. पेशवाईच्या प्रारंभी महाराष्ट्रास पुस्तकांची वाण फारच भासत होती. खुद्द राजे परागंदा झाल्यामुळें देशांत सर्व बाजूनीं बखेडाच माजला असून महाराष्ट्र इतर प्रांतांच्या मानानेहि मागासलेला होता. शाहूमहाराज साताऱ्याच्या गादीवर येऊन बसले व त्यांच्या राज्यकारभाराला स्थैर्य मिळत चालले, त्या बरोबर ग्रंथसंग्रहाचा उद्योग सर्वत्र मोठ्या उत्साहाने सुरू झाला. मराठी राज्याचा भार पेशवे घराण्यावर ज्या प्रमाणांत अधिक पडत चालला त्या प्रमाणांत त्यांनीं ग्रंथसंग्रहाचे कार्य मनावर घेऊन हळूहळू आपल्या अठरा कारखान्यांत पुस्तकशाळेसहि स्थान दिलें. त्यांच्या पुस्तकशाळेवर गोविंदपंत आपटे नामक गृहस्थ एक वेळ प्रमुख कामगार होता.

पुण्यास शनिवारवाडा बांधून त्यांत बाजीराव पेशवा स्थायिक झाला, त्याच वेळेपासून पेशव्यांच्या पुस्तकसंग्रहास खरी सुरुवात होऊन ते कार्य पेशवाई-अखेरपर्यंत सुमारें ८०।१०० वर्षें अव्याहत चालले. ग्रंथ जमवावयाचे म्हटले तरी ते पेशव्यांसारख्यानाहि सोपे नव्हते. महाराष्ट्रांत कांहीं जुने सरदार घरंदाज गृहस्थ व लहानसा भिक्षुकवर्ग होता. पण त्यांच्या जवळचीं पोथीपुस्तकें त्यांची गरज भागविण्याजोगी अगदीं तुटपुंजी. त्यांतून ज्याचे पुस्तक त्याला लागावयाचेच. एखादे फालतू पुस्तक सुदैवाने आढळलेच तरी ते मोठ्या मुष्किलीने हस्तगत व्हावयाचे. यासाठीं नक्कल करून मूळ ग्रंथ ज्याचा त्यास परत देण्याच्या अटीवरच कोणीहि झाला तरी आपले जपून ठेवलेले पुस्तक भिडेने

बाहेर काढावयाचा. पहिला बाजीराव जसा तलवारबहादूर तसा विद्याभिलाषीहि होता. तो नुसता पुराण ग्रंथावर तृप्त रहाणारा नसून त्याला वेदान्तविषयाचीहि आवड होती. ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर यांचे शिष्यत्व पत्करण्यांत त्याची पारमार्थिक कल्याणाची आस्थाच दिसून येते. त्यानें ब्राह्मणाना दरसाल हजारों रुपये दक्षिणा वाटण्यास सुरुवात केली हे त्याच्या वेदविद्येच्या अभिमानाचेच द्योतक होय. त्याने फावल्या वेळांत कोठून ना कोठून सुगावा ठेवून पुस्तकें जमवावीं व त्यांचे वाचन करावें. या कामांत त्याचा खरा सहाय्यक पिलाजी जाधव. पिलाजीने बाजीरावाच्या मागणीवरून रामायणाचे सुंदरकांड, युद्धकांड व उत्तरकांड ही तीन कांडे पाठविली होती. बाजीरावासारख्या योद्ध्याला रामायणाची व त्यांतील युद्धकांडाची गोडी लागावी यांत नवल नाहीं. खरे नवल त्याने वेदभाष्य बाळगले होते यांत आहे. पण त्याचे ते पुस्तक कोणी वाचावयास नेल्यावर इतकें लांबले कीं, त्याचा अखेर पत्ताच लागेना. हें वेदभाष्य बाजीराव स्वतःच वाचीत असेल तर त्याची गणना चांगल्या विद्वानांत केली पाहिजे; परंतु कदाचित् स्वतः न वाचतां आपल्या शास्त्र्याकडून त्याचा अर्थ समजून घेत असला तरी तो बहुश्रुत होता इतके सिद्ध होईलच.

बाजीरावामागून त्याचा पुत्र नानासाहेब अधिकच विद्वान् व बहुश्रुत निपजला. कारण त्याच्या बालपणांत पेशवे घराण्याची मुळी बरीच खोल गेली. घराण्याचे वजन व दरारा वाढला आणि त्याच्या व त्याच्या बंधूंच्या शिक्षणाची काळजी वाहाणारा चतुर, सहृदय व कुटुंबवत्सल असा चिमणाजी अप्पासारखा चुलता लाभला. नानासाहेबाने महाराष्ट्रांतल्या महाराष्ट्रांतच आपल्या वर्गाच्या माणसामार्फत पोथ्या पैदा केल्या व त्याखेरीज उदेपूर दरबाराशी संधान बांधून तिकडूनहि हस्तलिखित प्रति आणविल्या. सन १७४७–४८ त धार्मिक पुस्तकांच्या ३६ प्रति व १७५५–५६ मध्यें आणखी १५ प्रति त्यानें मागविल्या (पे. डा.). महाराष्ट्रांत पुस्तकांचा सुगावा लागावयाचा जुन्या क्षेत्रांतून. नारोशंकर राजेबहादर याचे वास्तव्य कधी कधी नाशिक क्षेत्रीं असे. म्हणून नानासाहेबाने त्यास ब्रह्मवैवर्त नांवाचे पुराण तपास करून आपणाकडे पाठविण्यास लिहिले. त्यावर नारोशंकर कळवितो ‘ आज्ञापत्र सांडणीस्वाराबरोबर आले. तेथे आज्ञा कीं, ब्रह्मवैवर्त पुराण तलास करून पाठविणे. त्यावरून शोध केला. तो येक पुस्तक आहे. ते आमचे हातास न येसें आहे. व दुसरे तलास करतां येक

ब्राह्मण याचे घरीं दोन औष निघाले. येक औश आवसिष्ट आहे तो त्यानें कोणास दिला आहे. तो ब्राह्मण श्री त्र्यंबकेश्वरींच आहे. आज्ञा जाली तरी त्यास येथे [नाशिकास] वितीय अंशहि तयार करून पाठवू. पाठविलें पुस्तक त्यांतच चरितार्थ जाला तरी कार्यसिद्धि जालीया पुस्तक पाठवून द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. ' पुस्तक पेशवे मागणार, त्यांस ते राजेबहाद्दर पाठविणार. परंतु त्याना देखील पुस्तक हाती येईपर्यंत कोण प्रयास ! आयते पुस्तक सहसा मिळू नये, मिळालेच तर ते प्रत करून घेण्याच्या अटीवर, परतीच्या बोलीने मिळावे, ही स्थिति खुद्द पेशव्यांची. मग सामान्य लोकांच्या अडचणी काय विचाराव्या !

ज्या ब्रह्मवैवर्त पुराणासाठीं नानासाहेब इतका झटून पडला त्यांत होते तरी काय हें पाहणें मौजेचे आहे. या पुराणाच्या पहिल्या खंडांत ब्रह्मदेवाने सृष्टि उत्पन्न कशी केली याची माहिती सांगितली आहे. दुसऱ्या खंडांत सृष्टीचे मूल द्रव्य प्रकृति, तिचे वर्णन आहे. तिसऱ्या खंडांत श्रीगणपतीची कथा आहे. ब्रह्मवैवर्त पुराणाचे सर्वांत मोठे खंड श्रीकृष्णचरित्रपर आहे. त्यांत कृष्णाने गोपीबरोबर व राधेबरोबर गोकुळांत क्रीडा केल्या त्या आहेत. त्यावरून हें पुराण तितके महत्त्वाचे दिसत नाहीं. केवळ अठरा पुराणांपैकीं एक म्हणून अठराहि पुराणांचा संग्रह आपणापाशी पाहिजे याच कारणासाठीं नानासाहेबानें सदर पुराणाचा शोध चालविला असावा.

नानासाहेब श्रीमद्भवद्गीता वाचीत असे. गीतेचा अर्थ संस्कृत भाष्यापेक्षां मराठी टीकेंतून समजणे अधिक सोपे. प्रवासांत असता त्या सारखी दुसरी सोय कोणती नाहीं. यासाठीं एकदा स्वारींतून त्यानें सटीक गीता पुण्याहून मागविली. त्याचा ग्रंथसंग्रह संभाळण्याचे काम अंताजी नारायण याजकडे असून १७५० पर्यंत स्वतंत्र पुस्तकशाला न ठेवता जमली ती पुस्तके जामदारखान्यांतच होती असें दिसतें. नानासाहेब अंताजीस लिहितो. ' समश्लोकी गीतेची वामनी टीका जामदारखान्यांत आहे, तरी तिचा शोध करून पाठवून देणें, टीका गीतेसहवर्तमान आहे. ' वामनाचीं यथार्थदीपिका घेऊन गीता वाचणाऱ्या नानासाहेबाच्या बुद्धीवर वयाच्या २९ व्या वर्षी कसे आध्यात्मिक संस्कार झाले होते हें लक्षांत येते. गीतेची शिकवण ज्याच्या अंगी मुरली त्याचा व्यवहार चोख व बिनचूक व्हावा यांत नवल काय ?

पुस्तक पैदा केल्यावर त्याची नकल करून घेण्यास कित्येक दिवस लागावे.

ज्याने नकल करावयाची त्याच्या स्वाधीन सबंध पोथी न करतां फक्त कांहीं पाने करावी व त्यांच्या नकलांचे काम पुरे झाल्यावर ती पाने परत घेऊन पुढचा हप्ता त्याच्या स्वाधीन करावा अशी व्यवस्था होती. याचा बोध अंताजी नारायण यास त्यानें १७५० तच लिहिलेले दुसरे पत्र वाचल्याने होतो. या साली पद्मपुराणाची नकल करून घेण्याचे काम सुरू होते. आमाणापंत नांवाचा लेखक नकल तयार करीत होता. अंताजीस नानासाहेब लिहितो. 'पद्मपुराणाचे पत्राचा झाडा रा. कृष्णाजी विश्वनाथ यानी सांगितला.

पत्रे २४७ सरकारांत सृष्टि खंड

२४३ रा. महादाजीपंत याजकडे

———

४९०

येणेंप्रमाणें पत्रे आहेत. खंड किती आहेत, हें कळत नाहीं म्हणून सांगितलें. तो मजकूर तुम्ही लिहून पाठविला तो कळला. ऐशास आमाणापंत लेखक याजवळ प्रती ल्याहावयासी पद्म पुराणाची पत्रे दिली आहेत ती किती आहेत व खंड कोणते आहेत ते मनास आणून लेहून पाठविणे' (पे. द.) या वेळी ग्रंथसंग्रहाचा व्याप वाढत चालला असून त्याजकडे तीन कामगार व त्याशिवाय कित्येक लेखक गुंतले होते. पद्मपुराण हेहि ब्रह्मपुराणाच्याच योग्यतेचे. ते आठरा पुराणापैकी एक असून याच्या सृष्टिखंडांत सृष्टीच्या उत्पत्तिकाळीं ब्रह्मदेव ज्या पद्मांत दिसला त्याचे वर्णन आहे. यांत विष्णूच्या कथा आहेत, प्रल्हादाची गोष्ट आहे, पाताळांतील प्रदेशाची हकीकत आहे, विष्णूने भृगुऋषि त्याच्या दर्शनास आले असतां त्यांचा अपमान केला, यामुळें रागावून भृगुऋषीनी त्याच्या छातीवर लाथ दिल्याचा वृत्तान्त आहे. भगवद्गीतेचेहि माहात्म्य त्यांत सांगितले आहे. वैष्णव पंथास हें पुराण आधारभूत मानण्यांत येतें. पेशवे वैष्णवपंथीय होते असें नाहीं. तरीपण सदर पुराण अठरा पुराणांपैकीं आहे, व ज्याच्यायोगाने मोक्षप्राप्ति व्हावयाची अशा प्रकारचे ज्ञान त्यांत सांठविलेलें आहे, या श्रद्धेनेंच त्याचा संग्रह करण्याचा उद्योग इतका अट्टाहासपूर्वक सुरू होता. हीं पुराणें वाचली व श्रवण केली जात असता श्रोत्या–वक्त्याना ब्राह्मणाविषयीं पूज्य बुद्धि उत्पन्न व्हावी व प्रल्हादाच्या कथेने ईश्वरभक्ति हृदयांत बाणावी यांत नवल नाहीं.

नानासाहेबांप्रमाणेंच सदाशिवराव भाऊ व विश्वासराव यांनाहि विद्येचें व्यसन होतें. तेहि स्वारींत पोथ्या-पुस्तकें बरोबर घेऊन जात व त्यांचे परिशीलन निवांत वेळीं करीत. सदाशिवराव स्वारींतून सन १७५० त बाबूराव राम (फडणीस) यास लिहितो, ' तुम्ही पत्र पाठविलें व पोथ्या पाठविल्या त्या पावल्या. महाभारताचे पोथ्यापैकीं विराटपर्व चि. रा. विश्वासराव याजवळ आहे. म्हणून (तुम्ही) लिहिलें. परंतु मनास आणिता येथें त्यांजपाशीं नाहीं. आम्हांकडेहि नाहीं. यास्तव त्याचा शोध करून कोणी येईल त्याजबरोबर मजबुतीनें बांधून पाठविणें. वरकड मजकूर, ज्योतिर्विधाची पोथी व सरकारची नारायण भटीची पोथी पाठवून देणें. नारायण भटी वानवडीचे मुक्कामीं आम्ही आणविली. परंतु येथें आली नाहीं. सदाशिव पाळंद्यास आणून पोथ्यांचें ठिकाण लावून पाठवून देणें. हरिवंशाची तीस पत्रें तीर्थस्वरूप राजश्री नानासाहेबासमागमे आहेत. ती पुण्यास येतील. आलिया उपरी ती तीस पत्रें विराटपर्वाचें पोथींत बांधून पाठविणें. वरकड पोथ्या आल्याची याद अलाहिदा आहे त्यावरून कळेल. विज्ञानेश्वराचे पुस्तकांपैकीं एक अध्याय येथें तुम्ही पाठविला तो पावला. दोन राहिला त्यांचा शोध सदाशिव महादेव पाळंदे यास पुसोन ठिकाणीं लावून ते दोन्ही अध्याय पाठविणें. येथें आले नाहीं. तेथेंच शोध करणें ' (पे. द.) भाऊनें आणखी एक पत्र पुस्तकांसंबंधींच लिहिलें. त्याचे उत्तर पुढीलप्रमाणें आलें–' पुणें याहून रामायणाची पोथी प्रती करावयाची अणविली होती. त्यास श्रीमाहुलीस ब्राह्मणास वाचावयास दिली आहे. आली म्हणजे पाठवून देऊं. ' (पे. द.) पुस्तकांसाठीं कोण ही ओढाताण व वाचनाचा तरी सर्व पेशव्यांना केवढा हव्यास ! महिनोन् महिने मोहिमावर किंवा इतर कामकाजाकरितां घराबाहेर काढावयाचें असल्यामुळें पोथ्यांचे आवकजावक सारखें चाले. महाभारत हा सर्वांचा प्राण. त्याकरितां सगळ्यांच्या उडया. त्यांतील युद्धाच्या रम्य कथा उदात्त भावनानी वाचून मन रमवावें आणि धर्म व नीति यावरील धृतराष्ट्र, विदुर, धर्मराज, श्रीकृष्ण, भीष्माचार्य यांच्या संभाषणांतील बोधामृत प्राशून राजकीय व्यवहारांत निष्णात व्हावें हा त्यांचा क्रम होता. या वाचनानें, श्रवणानें व चिंतनानें तेच पुरुष वंद्य व त्यांचीच वचनें ग्राह्य व सत्य असा मनाचा पक्का ग्रह होऊन जावा. सर्व हिंदुमात्रांना या धर्मग्रंथांतून सर्वसामान्य धर्मतत्वें ऐकावयास मिळत असल्यामुळें हिंदु मनुष्य मग तो कोणत्याहि जातीचा असो, त्याला ती पढून सर्वांची मनोभूमिका एकाच प्रकारची बनण्यास मदत व्हावी.

स्वाऱ्यावर असतां लढाया मारणें एवढेंच पेशव्यांचें काम नव्हतें. ते वाटेवरील मुक्कामांत कित्येक दिवस भिजत पडलेले दिवाणी कज्जे व ग्रामण्यादि प्रकरणें निकालांत काढीत. त्यासाठींहि ते स्वारींत धर्मशास्त्राचे ग्रंथ जवळ बाळगीत व शास्त्री-पंडितानांहि बरोबर घेत. विशेषतः सदाशिवरावभाऊची नेमणूक त्याच कामाकडे प्रारंभी करण्यांत आली असल्यामुळें नारायण भट्टी, विज्ञानेश्वर या पोथ्यांची निकड त्यानें लावली असावी. पोथीची नक्कल करावयाची किंवा एकच पोथी दोघांनीं वाचावयाची असली म्हणजे त्या पोथीचे कांहीं अध्याय अथवा पाने एकाजवळ व अवशिष्ट भाग दुसऱ्याजवळ अशी ओढाताण नानासाहेबांच्याहि वाट्याला येत होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

वरील पत्रव्यवहारांतून इतरहि बोध होतो तो असा कीं, नानासाहेबाप्रमाणें त्याचा चुलतभाऊ सदाशिवराव व पुत्र विश्वासराव हेहि विद्याव्यासंगी असून महाभारत व रामायण या राष्ट्रीय ग्रंथांचे वाचन त्यांनीं प्रवासांतहि चालू ठेवलें होते. सदाशिवराव व विश्वासराव यांची जोडी पाणिपताच्या रणभूमीवर अचानकपणें एकत्र आली नसून या चुलत्या–पुतण्यांचा प्रेमसंबंध पूर्वींपासूनच कायम होता व ते स्वाऱ्या-शिकाऱ्याना पुष्कळ वेळां जोडीनें निघत असेंहि दिसून येतें. भारताचे वाचन करणारे हे वीर भारतीय योद्धयाप्रमाणेंच कुरुक्षेत्राच्या भारतीय रणक्षेत्रावर लढून व देह ठेवून निजधामास गेले याहि घटनेचा चटका मनाला लागल्यावांचून कसा राहील ? पुस्तकसंग्रहांत नाटकांचा संग्रह क्वचित् आढळतो. गोविंद भट्ट बर्वे यांस पत्र–'शंकराचे व विष्णूचे क्रीडेचे नाटक जगन्नाथ कवि यांनीं केलें आहे. ते तुम्हापाशीं आहे ते टीकासहित पाठवून देणें.' (पे. द. ४५)

नानासाहेबाचा धाकटा भाऊ रघुनाथराव मोठा नाक धरून बसणारा असा त्याचा लहानपणापासून लौकिक. म्हणून स्नानसंध्येचें फाजील स्तोम न माजवितां ती एकांतांत थोडक्या वेळांत उरकावी असा नानासाहेबानें त्याला मागील प्रकरणीं दिलेला इषारा वाचकांना आठवत असेलच. मोठेपणीहि राजकारणांत ज्या ज्या वेळीं त्याला हार खावी लागली त्या त्या वेळीं आपण गंगा तरीं स्नानसंध्या करीत रहाणार म्हणून तो दंभपूर्वक सांगत असे. अशा पुरुषाजवळ धार्मिक ग्रंथांचा संग्रह मोठा असावा यांत नवल नाहीं. कधीं आनंदवल्लींत तर कधीं त्र्यंबकेश्वरी त्याचे वास्तव्य असल्यामुळें त्यानें आपल्या पुस्तकशाळा दोनहि ठिकाणीं ठेवल्या होत्या. सन

१७५४ त त्यानें शंकरूरखवान यास संस्कृत पुस्तकांच्या नकला करण्याकरितां १४७ रु. मुशाहिरा दिल्याचा उल्लेख आढळतो. त्या नक्कल करावयाच्या पुस्तकांत मदनपारिजात, विज्ञानेश्वर, गीता शांकरभाष्य, सहस्रचंडीविधान, गयामाहात्म्य, शूद्रकमलाकर, अध्यात्मरामायण, तत्त्वानुसंधान इत्यादि १८ पुस्तकें होती. (पे. द. २२) शंकरू याचा धंदा शाई करण्याचा. त्या धंद्यांतील तुटपुंज्या प्राप्तीमध्यें भर घालण्याकरितां शंकरूनें नकलेच्या धंद्याची मदत घेतलेली असावी. त्याच वर्षी रघुनाथरावानें आणखी ५० रु. खर्च करून पुस्तकें खरेदी केली. त्यांत व्रतार्क, मार्गशीर्षमाहात्म्य, श्राद्धमयूख, ब्रह्मोत्तरखंड, अयोध्याकांड आदिकरून ११ पुस्तकें होती. त्याच्या दुसऱ्या एका खरेदींत मत्स्यपुराण, काव्यप्रकाशटीका, ईशावास्यभाष्य, हठप्रदीपिका, छांदोग्योपनिषद्, रत्नावली इत्यादि पुस्तकांची नांवे आहेत. योगवासिष्ठाची नक्कल करणाऱ्या ब्राह्मणास त्यानें १७६७ मध्यें ४०० रु. करार केले होते.

वर ज्या पुस्तकांची नावे आली आहेत त्यांत कांहीं पुराणे आहेत, कांहीं वेदान्तग्रंथ आहेत, कांहीं शास्त्रार्थाचे निर्णयग्रंथ आहेत, कांहींत कोणती व्रतें कशी करावी याचे विधान आहे व कांहीं काव्यग्रंथ आहेत. रघुनाथरावाला पुराणे वाचण्याचा व वेदान्तश्रवणाचा नाद होता. त्याची मधून मधून व्रतानुष्ठानें चालत असून शनिवारवाड्यांत एक अनिष्ट व्रतानुष्ठान त्यानें सुरू केले होतेच. व्रतानुष्ठानाने कामनासिद्धि होते, या समजुतीचा अंमल त्या काळीं स्त्रीपुरुषांच्या मनावर वाढत्या प्रमाणांत असून त्यास या कामांत भरीं घालणारा भिक्षुकवर्ग रघुनाथरावापाशी इतर कोणाहि पेशव्यापेक्षां अधिक होता. रिकाम्या विधवांचा व इतर स्त्रियांचा काळ समाधानाने जाण्यास व्रते उपयोगी पडत. खेरीज त्यापासून एक प्रकारचा करारीपणा अंगी बाणून ती शीलसंवर्धनासहि कारणीभूत होत असत. परंतु भोळसटपणा ही त्यापासून उद्भवणारी आपत्ति बऱ्याच अंशी नाशकारक व मनुष्यास दैववादी बनविणारी होती याविषयींहि वाद नाहीं. रघुनाथरावास हे दोष कसे जडले होते याची माहिती इतिहासज्ञांना आहेच. खालील पत्र विष्णुराम नामक व्यक्तीस वरदा या व्यक्तीनें लिहिले आहे. वरदा या नांवानें स्वतः संबोधणारा इसम रघुनाथरावच असावा असा रियासतकार सरदेसाई यांचा तर्क आहे.

'विष्णुराम याप्रति वरदाचे आशीर्वाद,' हें पत्र २२-२-१७५६ मध्यें

लिहिलें आहे. ते रघुनाथराव पेशव्यानें माळव्यांतील आपल्या कोणा विश्वासू मनुष्यास लिहिलेलें दिसतें. त्यांत वरदा हा शब्द सांकेतिक आहे. वरदा पत्रांत लिहितो, ' शास्त्री जवळ नाहींत म्हणून संस्कृत न लिहिलें. पुराणश्रवणाखेरीज तुझे बुद्धीस निर्मळता होता दिसत नाहीं. खामखा पुराणिक ठेवून प्रहरपर्यंत पुराण ऐकत जाणे. रेवामाहात्म्य अथवा रेवाखंड असलें तरी जरूर जरूर आइकणें... ...पुराणिक न मिळे तरी तूंच वाचीत जाणे. जितकें कळेल तितकेंच कळो...जवळ असतो तरी शिकवितो. आतां पुराणच शिकवीन. दुसरा इलाज नाहीं. शास्त्री आले तरी तुम्ही दोघे जेवल्यावरी चार घटिका पुराणे वाचावी हें खामखा करणें. चहू घटकासी कार्य; बाकी सारें करणें. तुलाहि वाचतां येईना तरी कौमुदी अथवा अमरकोश हा तरी पहात जाणें. तेथें ब्राह्मण भला पाहून या प्रकारें करणें, नाहींतरी विषयासक्त होशील. मग सारेंच गेलें. लिहिता गाठ पडत नाहीं. तू एक लिहिले हजार जागा मानून नित्य रिकामा न राहणें. सत्कालक्षेप करीत जाणे. परगण्याचा वगैरे बंदोबस्त तरी केलाच असेल. एक कारभारी भला माणूस ठेवून तू रिकामा होऊन हें करीत जाणें. त्याने चार रुपये खादले तरी खाऊ; परंतु हे अगत्य करीत जाणे...विषयासक्त न होणें. आम्हीं पोथी पाठविली ती पाठ केलीच असेल. तिचें मनन एकांतीं करीत जाणें. माघ वद्य सप्तमी आदितवारी रवाना केले', [पे. द. १६].

पेशवे घराण्यांतील पुरुष फार परिश्रमानें पुस्तकसंग्रह करीत असल्यामुळें त्यांच्या संरक्षणासाठीहि तशीच काळजी घेत. माधवरावानें पुस्तकसंग्रह वाढविण्याकरितां काय केले हें समजण्याची साधने उपलब्ध नाहीत. तथापि तो असलेली पुस्तके मोठ्या दक्षतेने जतन करीत होता. त्याची आई गोपिकाबाई गोदातीरीं गंगापुरास रहावयास गेली होती. तिला पुस्तके लागली म्हणजे माधवरावानें पाठवावी. एके प्रसंगी भागवताची पोथी पाठविताना त्यानें पुढीलप्रमाणें इषारा दिला. ' भागवताची पोथी पाठविली आहे. येऊन पावेल. जतन करून ठेवण्यास आज्ञा करावी.'

पेशवाईंत पुस्तकांचा संग्रह जसा काळजीपूर्वक करण्यांत आला, त्याचप्रमाणें एकाद्या ग्रंथाच्या निरनिराळ्या प्रती जमवून त्याजवरून एक शुद्ध प्रत तयार करण्याचाहि उद्योग पेशव्यांच्या आश्रयानें होत गेला. कारण त्यांच्या पदरचे शास्त्री हें संशोधन सहज करूं शकत. गोविंद कृष्ण गोडबोले यास नानाने कोपर-

गावांस आनंदीबाईची व्यवस्था ठेवण्यास नेमले होते. तो नानास लिहितो- ' भारताचे पुस्तक सरकाराचे, मागे बहुत प्रती मेळवून शोधून ठिक केले आहे. ते [आनंदीबाईस] श्रवणास पाहिजे. येथें पुस्तक आहे. तो त्रुटित ग्रंथ आहे. यास्तव तें पुस्तक आल्यानें श्रवणाचे उपयोगी पडून दुसरी प्रत त्याजवरून नीट करावयास येईल. यास्तव ते पुस्तक पाठवावे.-' [पे. द.].

पेशवे घराण्यांतलि पुरुषांप्रमाणें त्यांच्या स्त्रियांतहि ज्ञानलालसा तीव्र होती. स्त्रिया पुरुषाइतक्या शिकलेल्या नव्हत्या. त्यांना लिहिता वाचता येत असले तरी संस्कृत ग्रंथ अगर मराठींतील अवघड ग्रंथ वाचण्याइतकी व ते वाचून समजण्याइतकी त्यांची गति नव्हती. यामुळें श्रवणानेंच त्यांनीं ज्ञान संपादावे आणि आपली आध्यात्मिक व मानसिक उन्नति करून घ्यावी. राधाबाई ही बाजीराव पेशव्याची आई. ती फार शहाणी व चतुर स्त्री होती. तिनें बहुतेक तीर्थयात्रा केल्या होत्या व हिंदुस्थानाचा बराच मोठा प्रदेश पाहिला होता. ती किती बहुश्रुत होती हें पिलाजी जाधवाचा भाऊ संभाजी जाधव याने लिहिलेल्या पत्रावरून कळून येते. ' वडिली पत्र पाठविले व आदिपर्व पुस्तक पाठविले ते पावले. दोन पर्वे राहिली ते पंधरा दिवसांत पाठवितो म्हणून लिहिले तरी बरें; श्रवण करून सावकाश पाठविली पाहिजेत. आणखी पर्वे लागतील ते आज्ञा करावी पाठवून देऊ ' [पे. द. १८] या पत्रापासून आणखी एक बोध होतो तो असा कीं, जाधवांचे घराणे मराठ्यांचे असले तरी सुविद्य असावे. कारण बाजीरावाला लागणारी पुस्तकें पुरविणारा पिलाजी याच जाधव घराण्यांतला. संभाजीच्या वरील पत्रावरून तर जाधवांच्या घरीं पुस्तकसंग्रहहि बराच मोठा असल्याचा ध्वनि निघतो.

माधवरावाची आई गोपिकाबाई ही गोदातीरी गंगापुरास राहून पुराणश्रवण व ईश्वराराधन यांतच आपला काळ घालवीत होती. तिच्याजवळ रामचंद्र नारायण गोरे नांवांचे कारभारी असून त्यास सांगून सावंतवाडीहून आपल्या माहितीतील वे. शा. सं. बापूभट जांभेकर पुराणिक यांस आणविण्याची व्यवस्था बाईने केली होती. ' वे. शा. सं. राजश्री बापूभट जांभेकर पुराणिक सावताचे वाडीत आहेत. त्यास घोडे माणूस व एक कामाठी ऐसे पाठवून पुण्यास घेऊन यावे, म्हणून (गोपिकाबाईची) आज्ञा जाली. पुराणिक बाबास एक पत्र येथून (गंगापुराहून) पाठविलें आहे. हें त्यांस प्रविष्ट व्हावें व आपणहि एक पत्र लिहून

पाठवावे ' (पे. द. ३२ सन १७६२). गोरे याने हें पत्र पुण्यास नाना फडणविसाकडे पाठविले व नानाला पुराणिकास पुण्यास आणवून तेथून त्याची रवानगी गंगापुरास करावी असा पत्राचा एकंदरीत रोख आहे. गोपिकाबाईस यावेळीं वैधव्य आले होते व तिचे वयहि चाळीशीच्या घरांत होते. या दृष्टीनें तिनें आपलें आयुष्य पुराणश्रवणांत घालवावे हें योग्यच. परंतु तिच्यापेक्षां ऐन बालपणांत ज्यांच्या डोक्यावर वैधव्याची कुऱ्हाड पडली अशा बालविधवाना आपले दुःखी आयुष्य कंठण्यास व मनोनिग्रहपूर्वक पवित्र आचरणाने रहाण्यास भजनपूजन, पुराणश्रवण, व्रतवैकल्य हा एकच मार्ग उपलब्ध होता. गोपिकाबाईची धाकटी जाऊ, बाजीरावाचा धाकटा पुत्र जनार्दनपंत याची स्त्री सगुणाबाई हिला वयाच्या १० व्या ११ व्या वर्षींच वैधव्य आले. ती १७८३ साली मरण पावली. तिला नवऱ्याच्या पश्चात् ३४ वर्षे वैधव्य दशेंत काढण्याचा प्रसंग आला. तिला लिहिता येत होते तसेच चांगले वाचताहि येत असले पाहिजे. म्हणूनच तिच्याजवळ ग्रंथसंग्रह बराच जमला होता. तिच्या संग्रही अध्यात्मरामायण; योगवासिष्ठ, पंचदशी, चित्रदीप, भागवताचा एकादशस्कंध, सप्तशति, गजेंद्रमोक्ष, द्रौपदीक्रांतस्तव, विष्णुसहस्रनाम, गीता इत्यादि पोथ्या असून त्या तिच्या पश्चात् पेशव्यांच्या पुस्तकशालेंत दाखल करण्यांत आल्या. यांतील बहुतेक पोथ्या अध्यात्मपर आहेत. चित्रदीप हें पुस्तक चित्रकलेवरील भासण्यासारखे आहे. परंतु वस्तुतः ते पंचदशीचेच एक पोटप्रकरण आहे. विष्णुसहस्रनाम व गीता या नित्य पाठाच्या पोथ्या होत. या पोथ्यांच्या संगतींत वागणाऱ्या स्त्रीच्या आयुष्यांतील सर्व रस आटून जाऊन धगधगीत वैराग्याशिवाय कांहीं उरले असेल काय ? त्या काळांतील स्त्रिया नवऱ्याच्या पश्चात् नीतिमान रहाण्यास घरच्या वडील माणसांची कदर कारणीभूत असे. त्याहिपेक्षां त्यांच्या मनावर ग्रंथांतरातून ठसणारा उदात्त उपदेशहि त्यांस सन्मार्गाने वागण्यास भाग पाडीत असे यांत संशय नाहीं. गोपिकाबाई, सगुणाबाई यांजप्रमाणें, पण उशीराने वैधव्याची पाळी त्यांची तिसरी जाऊ आनंदीबाई इजवर आली. तीही कोपरगांवास आपल्या मुलांसह पुराणश्रवणांत, उपासतापासांत, व्रतवैकल्यात आपले उरलेले आयुष्य घालवीत होती. तिच्याजवळ रघुनाथरावाने जमविलेली पुस्तके होती. त्यापैकीं मोक्षधर्माचे एक पुस्तक परत करण्याच्या कराराने आणविले होते. ते त्याच्या पश्चात् आनंदीबाईच्या कारभाऱ्याने ज्याचे त्यास देण्याकरितां

पुण्यास नाना फडणविसाकडे पाठविले व भागवताचे पारायण आनंदीबाईस करावयाचे होते, त्यासाठीं पुण्याहून पेशव्यांचे उपाध्याय (कर्वे) यांजकडून त्यांचे पुस्तक आणविले. [पे. द.] अहल्याबाई हिलाहि वैधव्य लवकर प्राप्त झाले व होळकरशाहीचा राज्यकारभार पहावा लागला. तिच्या रेखीव नित्य-क्रमांत पुराणश्रवणाला महत्त्वाचे स्थान मिळाले होते.

पेशवे घराण्यांतील पुरुषांच्या हातून ग्रंथप्रसारास फार मोठी मदत झाली. तिजपासून महाराष्ट्रीय सरदार व मुत्सद्दी यांस प्रेरणा मिळून त्यानी या कार्याचा प्रसार आपआपल्या टापूत केला. पेशव्याप्रमाणें त्यांच्या सरदारांचाहि पाय नेहमीं रिकिबींत व मुक्काम राहुटींत. ते कधी कधी वर्षानुवर्ष स्वारीवर असत. दिवसा शत्रूला गांठून त्याची गर्दन छाटण्याचा व युद्धाचा शेवट लावण्याचा उद्योग सुरू असावा व रात्री रामरावणाच्या व कौरव-पांडवांच्या युद्धाच्या अगर शिष्टाईच्या कथा ऐकाव्या किंवा ज्यांत आपल्या उपास्य दैवताची महती वर्णिली आहे, अशा पोथ्या वाचाव्या; याप्रकारचा त्यांचा क्रम असे. लढाईला तोंड लागले म्हणजे सैन्याची वांटणी होऊन त्यांचे कित्येक कोसांच्या अंतरावर तळ पडावे व कधी कधी सरदार-सरदाराना एकत्र रहावयास किंवा संभाषण करावयासहि सवड राहू नये. तेव्हां त्यांचा परस्परामधील व्यवहार जासुदा-करवी चालत असे. मिरजेचे गोपाळराव पटवर्धन व नारोशंकर राजेबहाद्दर यांचा हैदरावरील स्वारीत असाच एकमेकापासून अंतरावर तळ होता. पटवर्धन मंडळी गणेशभक्त. स्वारींतहि त्यांच्या पाशी गणेशपुराण पाहिजेच. गोपाळरावानें ते बरोबर बाळगले असून नारोशंकराला ते ऐकण्याची इच्छा झाली. त्या पुरा-णाचा पूर्वार्ध नारोशंकरानें श्रवण केला होता, उत्तरार्ध ऐकावयाचा होता म्हणून त्यानें पुढील मजकुराचे पत्र गोपाळरावास लिहिले. ‘ गणेशपुराणाची पोथी पूर्वार्ध ब्रह्मगिरी समागमे पाठविली आहे. येऊन पावल्याचे उत्तर पाठवावे. आणि उत्तरार्ध गणेशपुराण पाठवून द्यावे. श्रवण करून पाठवून देऊं आणि रविशिव-पर पुराणाची पोथी तुम्हा जवळ असेल तरी जरूर पाठवून द्यावी. श्रवण करून पाठवून देऊ. ’ छावणींत सरदारलोकांपाशी शास्त्री, पुराणिक, भिक्षुक व शागीर्द असत व तेथें त्यांची स्नानसंध्या, पुराणश्रवण इत्यादि कर्मे नित्य व्यवस्थितपणे चालत. पण पोथीपुस्तकाची वाण त्यानाहि इतकी कीं तीं एकमेकानी एकमेका-पासून उसनी मागून घ्यावी. गणेशपुराण नारोशंकरानी गोपाळरावापासून आण-

विले त्यांत मजकूर काय होता हें पाहण्यासारखे आहे. हें पुराण अठरा पुराणांच्या उपपुराणापैकीं एक आहे. त्याचा पहिला उपासनाखंड व दुसरा क्रीडाखंड. उपासनाखंडांत उपासनेचे विविध प्रकार सांगितले आहेत. गजाननाने वेळोवेळीं अवतार धारण करून क्रीडा केल्या, त्याचे वर्णन क्रीडाखंडांत आहे. त्याशिवाय या ग्रंथांत स्त्रियांचा धर्म, गर्वाचे निरसन, संकष्टी चतुर्थी, अंगारकी चतुर्थी यांचे महात्म्य, तशीच, अग्निलोक, यमलोक, इंद्रलोक, वायुलोक, वैकुंठलोक, गणेशलोक यांची माहिती आहे. पुराणग्रंथांत सांगितलेल्या हकीकतीवर श्रोत्यांची दृढश्रद्धा असे. त्याप्रमाणें वागल्यापासून ऐहिक व पारलौकिक कल्याण घडते असा त्यांस विश्वास असे. विशिष्ट दैवताची भक्ति केल्यानें ते दैवत आपणांस प्राप्त संकटापासून तारील व आपल्या इष्ट कामना सिद्धीस नेईल असे ते मानीत, त्यांतील वाचनाच्या आधारावर संकटकाळ धैर्यानें काढीत, देवावर भार घालून उपोषणे करीत व त्यांत सांगितलेला धर्म आचरून आपले नैतिक बल वाढवीत. संकटाशीं झुंजण्याचे सामर्थ्य त्याना यांतून लाभावे, व संकटांत नाश झाला तरी त्यानीं आपली समाधानवृत्ति दैवावर हवाला ठेवून सोडू नये. पुराणश्रवणाचे हे आत्यंतिक फायदे पुरुषाप्रमाणें स्त्रियांनाहि मिळाल्यावांचून रहात नसत.

पेशव्यांच्या प्रयत्नाने पुण्यास ग्रंथसंग्रह बराच झाल्यावर इतरत्र राहणाऱ्या सरदाराना पोथीपुस्तक लागल्यास ते पुण्याहूनच मागवीत. मिरजेच्या पटवर्धनाना वाल्मीकी रामायणाचे युद्धकांड व उत्तरकांड हवे होते. त्याची चौकशी त्यांनीं पुण्यास महादाजी बल्लाळ यांजमार्फत चालविली. कौस्तुभ नामक ग्रंथांत सोळा संस्कारांचे प्रयोग सांगितले आहेत व शास्त्रार्थहि दिला आहे, तो मिळविण्यासाठीं त्यानी अशीच खटपट केली. चिदंबर दीक्षित हे धारवाडाकडे मोठे साधु होऊन गेले. त्यांजवर पटवर्धन सरदारांची निष्ठा होती. साधूनाहि नव्हती इतकी ग्रंथांची अनुकूलता सरदाराना स्वाभाविक असे. म्हणून पटवर्धनानी एक स्मृतिग्रंथ त्यांस मुद्दाम नजर केला व त्याबरोबर उमामहेश्वराचें एक चित्रहि दिले. [ऐ. ले. सं.]

प्रकरण आठवें.

कवी व कीर्तनकार.

आपल्या उपदेशानें जनतेला सन्मार्गाला लावून तिच्या आध्यात्मिक उन्नतीस सहाय्यभूत होणें हे सत्पुरुषांचे कर्तव्य. हें कर्तव्य ते तोंडी उपदेशानें करोत किंवा ग्रंथलेखनानें घडवून आणोत. शाहुमहाराजांपासून पुढील काळांत सत्पुरुष निपजले व त्यांपैकीं कांहींनीं ग्रंथहि लिहिले. परंतु त्या ग्रंथांची गणना श्रेष्ठ प्रतीच्या उपदेशपर ग्रंथांत करावी इतक्या योग्यतेचे ग्रंथ ते नाहींत. किंबहुना रामदासस्वामी नंतर साधुसंतांनी उपदेशपर ग्रंथ लिहिण्याचा मार्गच थांबला असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांच्यामागून साधूंनीं तोंडी किंवा पत्रद्वारे जे उपदेशाचे कार्य केले असेल तेवढेंच. पेशवाईतील मोठे सत्पुरुष ब्रह्मेंद्रस्वामी होत. त्यांनी एकहि ग्रंथ लिहिलेला नाहीं, आहेत ती फक्त पत्रें. स्वतः सन्मार्गानें वागावें व दुसऱ्याला सन्मार्गाने वर्तावयास सांगावें एवढेंच पारमार्थिक कार्य त्यांनीं केलें. कदाचित् हिंदुधर्माचे रक्षण हिंदुराजाकडूनच होऊं लागल्यामुळें त्या हेतूने ग्रंथ लिहिण्याची, नवीन संप्रदाय काढण्याची व त्यामार्फत धर्मजागृति करण्याची स्फूर्ति त्यांना आतां होत नव्हती असें म्हटलें तरी चालेल. तुकाराम व रामदास यांच्या पश्चात् मोठा सांप्रदायिक साधु महाराष्ट्रांत झाला नाहीं याचे कारण बहुधा हेंच असावें.

आपल्या उपदेशानें जनतेला धर्माच्या म्हणजे शाश्वत कल्याणाच्या मार्गाला लावण्याचा अधिकार साधुसंतांचा; परंतु तितका मोठा अधिकार ज्यांचा नव्हता तथापि ज्यांना जनतेनें धर्मानें चालावें असे वाटत होते ज्यांच्या अंगीं पद्यरचनेचे सामर्थ्य होते अशांनी स्वतःला काव्यरचनेस वाहून घेतलें. या प्रकारचे बरेच कवी पेशवाईंत होऊन गेले. तुकारामरामदासादि साधूनी काव्यरचना केली, परंतु ती कवित्वाकरितां केली नसून उपदेशाचें एक साधन म्हणून केली. त्यांना मुख्यतः उपदेश करावयाचा होता, काव्य रचावयाचे नव्हते. पेशवाईतील कवी त्या धर्तीचे नव्हते. त्यांच्या ठिकाणीं काव्याची स्फूर्ति होती. आपण संस्कृत भाषेंतील ज्या प्रकारचे काव्यग्रंथ व इतर पौराणिक ग्रंथ विद्यार्थी-

दशत असतांना वाचले, त्याचप्रकारचे ग्रंथ आपण आपल्या मराठी भाषेंत रचून स्वजनांत वहावा मिळवावी आणि त्या व्यासंगांत स्वतः आध्यात्मिक सुख व शांति भोगावी असा तत्कालीन कवींचा हेतु स्पष्ट दिसतो.

ब्राह्मणांना दक्षिणा देण्याची पद्धत प्रथम सेनापति खंडेराव दाभाडे यानें सुरू केली. त्याचा पुत्र त्रिंबकराव दाभाडे हा बाजीरावाशी झुंजत असतां डभोईच्या लढाईंत पडल्यावर सन १७३१ सालापासून बाजीरावाने ती पुढें चालविली. दाभाड्यांची दक्षिणा किती होती व तिचा लाभ ब्राह्मणांना काय प्रमाणांत मिळत होता हें समजत नाहीं. तथापि सदर दक्षिणेची रकम फार मोठी नसावी असे वाटते. या कारणानें तिची मदत विद्याप्रसारास थोडीच झाली असली पाहिजे असें मानल्यास बाजीरावापूर्वी महाराष्ट्रांत जे कवी होऊन गेले त्यांच्यांत सुविद्य व सुसंस्कृत कवी थोडेच निपजले असतील. तथापि शाहु महाराज सन १७०८ त साताऱ्यास आले तेव्हांपासून महाराष्ट्रास पूर्वीपेक्षां स्वस्थता अधिक लाभली, त्याचे परधर्मीयांच्या छळापासून संरक्षण अधिक होऊं लागले, मराठ्यांच्या मुलुखगिऱ्या वाढत चालल्यामुळें त्यांत मिळणारे धन घरा-घरांतून भरू लागले, महाराष्ट्राच्या सुकलेल्या तोंडांत जीवनरस पडून तो टव-टवीत व जोमदार बनूं लागला व त्याची ही पालटलेली नवली त्याच्या गात्रा-गात्रावर चमकूं लागली. त्याबरोबर काव्य हेंहि महाराष्ट्राचे अंग मोहक व आक-र्षक बनल्यावांचून कसें राहील?

शाहूमहाराजांच्या कारकीर्दीपासून पेशवाईच्या अखेरीपर्यंत महाराष्ट्रांत असंख्य कवि चमकून गेले. पेशव्यांची दक्षिणा सन १७३१ त सुरू झाली. त्या दक्षिणेच्या जोरावर विद्येचा प्रसार व खोली वाढून तिचा ग्रंथकर्तृत्वावर व कवित्वावर प्रभाव दृष्टीस पडण्यास सहजच सन १७५०।६० साल उजडावयास पाहिजे. त्याची फळे जो जो दक्षिणेची प्रथा जुनी होत गेली असेल तो तो अधिक मधुर, अधिक रसाळ व अधिक रंगदार आली असतील हें उघड होय. या दृष्टीनें या ८०।९० वर्षांच्या काळांतील कवींचे निरीक्षण बुद्धीस रमविणारें वाटेल. वरील काळांत सर्व महाराष्ट्रभर कवि उदयास येऊन त्यांच्या काव्यानें तो दुम-दुमला. नाशिक, नगर, पैठण, सोलापूर, सातारा, कोल्हापूर, पुणें इत्यादि प्रदे-शांतील कवींनीं आपल्या भोंवतालच्या दिशा उजळल्या. त्यांपैकीं कित्येकांना प्रत्यक्ष राजाश्रय लाभला व कित्येकांच्या तो परंपरेनें वांट्यास आला.

महाराष्ट्रांत रूक्षता, खिन्नता, कंगालपणा व भयाणपणा मावळून कवींच्या भोंवतालची समाजस्थिति पालटली. सर्व सुखांचे साधन जो पैसा तो लोकांच्या खिशांत खुळखुळू लागल्यावर लोकांनीं खोपटें मोडून नवीन वाडे उठविले, रकटी फेकून देऊन शाल-दुपट्टे व झगे-अंगरखे पेहेरले, सोन्यामोत्यांच्या दागदागिन्यांनीं आपली शरीरें सजविली, सुगंधी तेलें वापरावयास काढली, त्यांच्या खाण्यांत पक्वान्नें येऊं लागली व त्यांचे मनोरंजन करण्यास नटनर्तकी, व गवय्येबजवय्ये गोळा झाले. अशा गुलहौशी समाजांत वावरणारे जे कवि त्यांच्या वृत्तीवर रंगेलपणाची छटा चढावी हें स्वाभाविक नव्हे काय ? त्यांच्या अभ्यासांत संस्कृतांतील रघु-किरातादि महाकाव्यें, शाकुंतल-उत्तररामचरितादि नाटके, काव्यप्रकाशादि शास्त्रीय ग्रंथ आले आणि अनेक छंद व वृत्ते यांचे ज्ञान होऊन त्यांतील ते रस, तो डौल, व ती धाटणी आपल्या काव्यांत आणण्याची व त्या रीतीनें सभोंवतालच्या समाजास खुष करण्याची उमेद त्याना उत्पन्न झाली.

या दृष्टीनें मराठी काव्यविकासाचा विचार करावयाचा तर पेशवाईतील कवींचे तीन वर्ग पाडावे लागतील. पहिला वर्ग पेशवाईच्या आद्यकालीन कवींचा, दुसरा मध्यकालीन कवींचा व तिसरा अन्त्यकालीनांचा. आद्यकालीन कवींत कृष्णदयार्णव, श्रीधर व मध्वमुनीश्वर हे कवि पडतात. यांचा जन्म व शिक्षण पेशवाईपूर्वीचें आणि काव्यरचनाहि बरीचशी, पेशवाईपूर्वीचीच. म्हणून त्यांच्या काव्यांत वैराग्याचा धगधगीतपणा व स्वास्थ्यांतील सुखदावस्था यांची सरभिसळ आढळते. नरहरी ऊर्फ कृष्णदयार्णव याचा जन्म सातारा जिल्ह्यांत कोपर्डे गांवीं झाला असला तरी त्याचे बहुतेक आयुष्य पैठण, औरंगाबाद या बाजूसच गेले. मध्वमुनीश्वर मूळ नाशिकचा, पण तेहि वेरूळ दौलताबाद औरंगाबाद इकडेच रहात असे. श्रीधर कवीचे वास्तव्य पंढरपुरास होते. या तिघांपैकीं कृष्ण दयार्णव व श्रीधर यांनीं संन्यास घेतला होता व मध्वमुनीश्वर दीक्षेने संन्यासी नव्हता तरी नांवाप्रमाणें त्याची वर्तणूक कांहींशी मुनीप्रमाणें होती. पूर्वीचे संतकवि व पुढचे पंतकवि यांच्या मधील हे कवि असल्यामुळें त्यांच्या वागणुकींत व काव्यरचनेंत परमार्थ व व्यवहार यांचे गुण समसमान प्रमाणांत एकवटले आहेत. मध्वमुनीश्वर व श्रीधर यांचें शिक्षण घरच्या घरीं विद्वानांत गणना होण्याजोगे झाले होते. पण कृष्ण दयार्णवाला घर सोडून हिंडत फिरत असतां तें मिळवावें लागले. कृष्णदयार्णव दुर्धर अशा महारोगाने पीडला असल्यामुळें त्याचे दुःखी

कष्टी मन ऐहिक व्यवहारांत न रमावे यांत आश्चर्य नाहीं. परंतु श्रीधर व मध्वमुनीश्वर यांची मनःस्थिति तशी नव्हती. श्रीधर घरचा सुखी असून तो बारामती, पाथरी व पंढरपूर या गांवीं रहात असतां त्याच्या कानावर शाहूकालीन मराठ्यांच्या पराक्रमाची वर्णने येत होती व त्याच्या डोळ्याना बाबूजी नाईक बारामतकिरांसारखें योद्धे व कारस्थानी पुरुष दिसत होते. म्हणून त्याचे मन केवळ अध्यात्मविद्येंत रंगून न बसता त्याला कृष्णविजय, रामविजय, पांडवप्रताप आदिकरून शूराना व वीराना वाचावयास व ऐकावयास आवडणारे प्रतापशाली ग्रंथ रचण्याची परिस्थितीनें प्रेरणा दिली.

मध्वमुनीश्वर हा नामांकित कवि याच सुमारास झाला. त्याला कवींच्या परंपरेंत पडत असलेला फरक जाणवत होता. संतकवींची परंपरा बुडून त्या जागीं सांसारिक कवि उत्पन्न होऊं लागल्याचें पाहून त्याने खेदोद्गार काढले आहेत. त्याची तक्रार अशी कीं ‘ देखोदेखी लोक करीती कवित्व । परी न ये महत्त्व महंतांचें ॥’ तथापि संतमहंतांच्या काव्याची रचना कायम ठशाची असे. नव्या कवीना तिचा कंटाळा येऊन आपली कविता नव्या मनूतील रसिक जनाना आवडावी, याकरितां नवे कवी विविध वृत्ते योजू लागले हे मध्वमुनश्विर सूक्ष्म नजरेनें कसें पहात होता याची साक्ष त्याच्याच खालील श्लोकावरून पटणारी आहे. तो लिहितो,

‘ ओव्या श्लोक पदें प्रबंधरचना हे तो निघाली नवी ।
टप्पे ख्याल कितेक गाति यमके जाले फुकाचे कवी ॥

मध्वमुनीश्वर अशा रीतीनें इतर कवींवर टीका करीत होता तरी तो स्वतः त्याच सुधारणेस बळी पडत होता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. वृत्तांप्रमाणें विषयांतहि फरक पडून व्यावहारिक विषयाना महत्त्व नवीन लोक व कवी देऊ लागले याबद्दलहि त्याची कुरकुर होती ती अशी—

गीता भारत वेदशास्त्र न रुचे गेली जनांची चवी ।
ऐसे देखुनि मध्वनाथ म्हणतो देवा मला वांचवीं ॥

येथपर्यंतच्या कवीना राजाश्रय असा मिळाला नाहीं. पण येथून पुढच्या कवींना बरीच आश्रयस्थाने उत्पन्न झाली. श्रीधराची योग्यता ओळखून त्याच्या वंशजाना बाजीराव व नानासाहेब यांनीं इनाम जमिनी दिल्या. श्रीधरानंतरचा कवी

निरंजनमाधव याला तर खुद्द बाजीराव पेशव्यानें आपल्या आश्रयाला ठेवून घेतलें. तो विद्वान व उच्च प्रतीचा कवी असून साताऱ्यास बाजीरावापाशी रहात असे. त्याचे मूळ ठिकाण पैठण. पण पैठणाहून तो साताऱ्यास विद्यार्जनाची सोय लागेल या आशेने आला व त्याने बापूभट बर्वे याच्यापाशी विद्याभ्यास पुरा केला. सामान्य काव्यापेक्षां संस्कृतांत चंपूची गणना वरिष्ठ प्रतीची मानण्यांत येते. तशा धर्तीवर सुभद्राचंपू नावाचा सप्तसर्गात्मक ग्रंथ त्याने लिहिला. बाजीराव चांगला संस्कृतज्ञ असल्यामुळें त्याजकडूनहि निरंजन माधवास चंपूची टूम मराठींत प्रविष्ट करण्याची सूचना मिळाली असेल.

बाजीराव व नानासाहेब पेशवे यांच्या कारकीर्दीत मराठे सरदार, शिपाई, प्यादे, कारभारी, वकील व इतर मुलकी अधिकारी यांनीं उत्तर हिंदुस्थानांत वर्षानुवर्ष ठाणी देण्यास सुरुवात केली व कांहीं तर तिकडील कायमचेच रहिवाशी बनले. त्यामुळें मराठ्यांनां हिंदुस्थानी भाषा बरीच अवगत होऊन कित्येक हिंदी व उर्दु शब्दहि त्यांच्या भाषणांत शिरले. अमृतराय कवी नानासाहेबाच्या वेळी बराच प्रसिद्धीस आला. त्याने आपले काव्य हिंदी व संस्कृत शब्दानीं फुलविले व कटाव या चमत्कारिक वृत्ताची ओळख महाराष्ट्रीयाना नव्यानेच करून दिली. अमृतरायास समकालीन असा दुसरा कवी रघुनाथपंत कोशे. तो बारामतीस रहात असून त्याजवर नानासाहेबाची विशेष मर्जी होती. त्याने भीष्मार्जुन व रामरावण यांच्या पराक्रमाची वर्णने तेवढीच लिहिण्याची जुनी प्रथा मोडून खुद्द पेशव्यांच्या पराक्रमावरच काव्य रचण्यास प्रारंभ केला. त्याने आपल्या 'पंतप्रधान' काव्यांत बाळाजी विश्वनाथापासून विश्वासरावापर्यंतच्या सर्व पेशव्यांचे वर्णन लिहिले आहे.

केवळ काव्यरचना हा त्याहि काळांत चरितार्थाचा धंदा झाला नव्हता. हल्लीप्रमाणें काव्यग्रंथ छापून विकावयास व त्यावर दोन पैसे मिळवावयास छापखाने आस्तित्वांत नव्हते. एखाद्या गुणज्ञ राजाने किंवा सरदाराने कवीला जमीन अगर गांव इनाम द्यावा एवढाच संभव, पण तोहि फार विख्यात कवीस. किरकोळ व मध्यम कवीना कोण पुसतो? म्हणून कवीला काव्यरचनेच्या जोडीला दुसरा निर्वाहाचा उद्योग पहावा लागे. तसा उद्योग कीर्तनकाराचा किंवा पुराणिकाचा. कवीनें कीर्तनकार होण्यांत एक मोठा फायदा हा कीं, आपण रचलेल्या कवनाचा कीर्तनांत उपयोग करून त्याचा प्रसार सर्वत्र करावयास सांपडे. खेरीज गांवो-

गांवी इनामदार, सरदार, शिलेदार, सावकार अशी मंडळी असल्यानें कीर्तनाला बिदागी चांगलीं मिळे. आतापर्यंत सांगितलेल्या कवींपैकीं मध्वमुनश्विर हा नामांकित कीर्तनकार होता. ताहराबादेचा महीपतिबुवा याचाहि धंदा कीर्तनाचाच होता. त्याची विद्वत्ता बेताचीच होती. परंतु काव्यरचनेंत त्याने इतर कवीहून निराळा पायंडा पाडला. त्याच्या आधी बहुतेक कवींचा परिपाठ भारत ,भागवत व रामायण यांतील देवदेवतांची व अवतारी पुरुषांची चरित्रे गाण्याचा होता. परंतु महीपतीबुवाला पूर्वकालीन संतांची चरित्रेच भक्तीनें रचण्यांत गोडी वाटून त्याने प्राकृत जनाकरितां भक्तविजय, भक्तलीलामृत व संतविजय या ओवीबद्ध पोथ्या लिहिल्या. त्यामुळें एकनाथ, नामदेव, तुकाराम, यासारखे दोन तीनशे वर्षांपूर्वीं संत होऊन गेले त्यांची चरित्रे जिवंत राहिली व ती जनतेंत भक्तिमार्गाचा प्रसार करण्यास उपयोगी पडली. महीपतिबुवाची ही वाङ्मयसेवा पेशव्यांपाशी रुजू होऊन पहिले बाजीराव पेशवे व इतर सरदार यांनीं त्याला जमिनी व वतनें दिलीं.

कवि मोरोपंत याच्या उदयकाळीं मराठ्यांचे वैभव कळसास पोंचलें होतें. दक्षिणेच्या उत्तेजनाने निर्माण झालेले विद्वान् सर्वत्र आढळू लागले असून त्यांच्या विद्वत्तेमुळें, गृहस्थांच्या बहुश्रुतपणामुळें व कवींच्या ग्रंथरचनेमुळें मराठी भाषा चांगली प्रगल्भ झाली होती. या सर्वांचा लाभ मोरोपंतास मिळून त्यास पेशवाईतील सर्व कवींत अग्रस्थान मिळविता आले. त्याने मराठी भाषा परोपरीने कमावून नानालंकारानी सजविली व विविध वृत्तानी गुंगावयास लावली. तो बाबूजी नाईक बारामतीकाराच्या आश्रयास राहिल्यानें पेशव्यांशीं बापूजी नाईकाचा वाकुडपणा असल्यामुळें त्याला पेशव्याकडून इनाम मिळाले नसावे. परंतु त्याच्या पूर्वींच्या व नंतरच्या कवीस जे स्वास्थ्य लाभले नाहीं ते मयूरपंतास लाभून त्याने वाङ्मयसेवा निर्वेधपणें दीर्घकाल चालविली. त्याचा हा क्रम सुमारें चाळीस वर्षें अखंड सुरू होता. त्याला कीर्तनकार व्हावे लागले असते तर वर्षांतून कांहीं महिने हिंडून त्यांत आयुष्याचा बराच काळ मोडावा लागला असता. परंतु त्याच्या सुदैवाने बारामतींत एके ठिकाणीं बसून नाईकांच्या कौटुंबिकापुढें पुराण सांगण्याकडे त्याची नेमणूक झाली व ते काम घटका दोन घटकांत आटोपल्यावर बाकीचा सारा वेळ त्याला आपल्या इच्छेप्रमाणें स्वस्थ चित्ताने काव्य

रचनेंत घालवावयास सांपडला. म्हणून पंताला आपला ईश्वरदत्तगुण अत्यंत परिपक्क स्वरूपांत प्रकट करता आला.

पंताने काव्यकंदुकाला एकदां आकाश दाखविल्यावर त्याच्या मागून आलेल्या कवींनीं नक्षी कामाची कमाल केली. पंत फार सभ्य, सालस व भक्तिमान् असून त्यानें केवळ स्वतःच्या पारलौकिक सुखार्थ व जगाच्या धार्मिक व नैतिक कल्याणार्थ कविता लिहिली. पण पुढचे कवि रंगेल किंबहुना कांहींसें छचोर व छाकटेहि निघाले. सोलापूरचा राम जोशी व संगमनेरचा अनंत फंदी हे या कोटींतील होत. हे दोघेहि लावणीबहाद्दर असून प्रथम तमाशांत नाचले व तमाशांत लोकांकडून फटके बसल्यावर कीर्तनाकडे वळले. या फटक्यांमुळेंच कीं काय, अनंत फंदी याने रचलेले फटके त्याच्या लावणींपेक्षांहि अधिक खुसखुशीत आहेत. ही नैतिक दृष्ट्या काव्याला लागलेली उतरती कळाच होय. कोठें ते केवळ धर्मोपदेशाकरितां कविता करणारे संतकवि व कोठें हे मनोरंजनाकरितां लावण्या लिहिणारे नाचरे कवि ! परंतु नैतिक बाजू वगळल्यास राम जोशी व अनंत फंदी यांनीं मराठी कवितेस छानछोकीचे नखरेदार वळण लावले यांत शंका नाहीं. अर्थात् तत्कालीन सवंग लोकप्रियतेस भुलूनच ते डफाच्या थापेबरोबर नाचूं लागले असतील हे उघड आहे.

अशा प्रकारचे कवि एकंदर कविकुलाला गालबोटासारखेंच होत. त्यांच्या योगानें कवींच्या नीतीचा पाया डळमळला असें म्हणतां यावयाचे नाहीं. कारण बाकीचे बहुतेक कवि आपला बोज राखूनच होते. त्याकाळीं राजकीय व्यवहाराबाहेरचे जे सुशिक्षित लोक असत त्यांपैकीं पुष्कळाना बसल्या जागीं फुरसतीच्या वेळीं काव्यरचना करण्याचा नाद असे. असे लोक कवित्वाचा ईश्वरदत्त गुण आपल्या अंगी आहे कीं नाहीं याचा शोधहि घेत नसत. अशांची कविता अगदींच सुमार किंवा टाकाऊ असली तर त्यांत नवल काय ? बहुतेकांनीं जुनी संस्कृत पुराणे काढावी व त्यांच्या आधारें एखादे बाड लिहावे. अशी जुनी बाडे ठिकठिकाणीं किती तरी लिहून पडली आहेत. सातारा जिल्ह्यांत विटें या गांवीं ज्ञानसागर नांवाचा कवि होऊन गेला. त्याचे मूळ नांव भैरव ऊर्फ आप्पाजी, बापाचे नांव ज्योतिपंत व आईचे नांव यमुना. याची आजी निराबाई अद्वयचैतन्य नामक सत्पुरुषाची कन्या होती. तिचा चिद्घननामे साधु कवि भाऊ होता. आप्पाजीचा मित्र लक्ष्मनिाथ हाहि परमार्थीच होता. अशा वेढ्यांत सांपड-

लेल्या आप्पाजीबुवास वैराग्य आवडावे व कवित्व सुचावे हें क्रमप्राप्तच समजले पाहिजे. असे तरुण घर सोडून चालते होत व कोणा तरी विद्वानाचा किंवा सत्पुरुषाचा आश्रय करून कालेकरून स्वतः साधुत्वाने प्रकट होत. आप्पाजी हा लक्ष्मीनाथाबरोबर पैठण क्षेत्री गेला व तेथें त्यानें गुरूपाशीं अध्ययन केले. अध्ययन संपल्यावर कवित्व सुरू झाले व ज्ञानसागर नांवाचा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला गेला. ज्ञानसागर कवि पेशवाईच्या अन्त्य काळांतील होय. त्याच्या पोटीं दिगंबरबुवा नामक पुत्र जन्मास आला. तो उत्तम वक्ता, संगीतज्ञ व उत्कृष्ट कीर्तनकार निपजला. ज्ञानसागरांनें विठ्यास एक दत्तमंदिर बांधून मठ स्थापन केला. या मठास शिंदेसरकाराकडून बाराशें रुपयांचे उत्पन्न होते. (इ. सं.)

ज्ञानसागरांत विरक्ति होती व समाजाला सन्मार्गाला लावण्याचे सामर्थ्य होते. पण हाहि समाजसेवेचा गुण ज्यांच्या अंगी नाहीं परंतु सत्पुरुषांच्या कुळांत जन्मले एवढीच ज्यांची शिफारस अशा कित्येक लोकांना आपल्याकडे थोरामोठ्यांचे लक्ष वेधण्याकरितां कवितेचा साचा उपयोगी पडे. त्या साचांत त्यांनीं आपली दुःखद कहाणी ओतली म्हणजे तिच्यांत रसोत्पत्ति होऊन त्यांचे कार्य साधत असे. या कोटीतील एका कवीने नानाफडणविसाकडे याचना केली. हा कवि प्रसिद्ध जनार्दनस्वामींचा शिष्य जनी जनार्दनस्वामी याच्या वंशातला. तो जातीचा वाजसनी ब्राह्मण असून बीडास रहात होता. त्याला दारिद्र्य आल्यावरून त्यानें नानाला कविताबद्ध पत्र लिहिलें. ते वाचून नानाला करुणा आली व त्याने या मनुष्यास बेलबागेमध्यें कांहीं नेमणूक करून दिली. पत्र पुढीलप्रमाणें—

श्रीगजानन प्रसन्न

श्रीमंत विष्णुमूर्ति । काव्यद्रुमतुल्य कीर्ति ॥
वांछित यथा तथा प्रति । निश्चित देती सर्वदा ॥ १ ॥
श्रीजनीजनार्दनवंश । जाणूनि करावा पोष्य ॥
कुटुंब बहु मनुष्य । ययाचा तोष स्वानंदें ॥ २ ॥
धर्मार्थ पुत्रलग्नें । सिद्धान्ने जीव वा प्राण ॥
वसनेंहि जीर्णजीर्णे । संरक्षण यथाविधि ॥ ३ ॥
पुत्रवत् करिता पालन । वंशी होय पुत्ररत्न ॥
सत्य सत्य नारायण । वदे वचन त्रिवाचा ॥ ४ ॥

त्या काळांतील लोकांची स्थिति सामान्यतः गरीबीचीच होती. सत्पात्र व लायक लोकांना नोकरीची वाण नव्हती. पण यांपैकीं ज्यांच्यापाशीं कांहींच नाहीं त्यांचे हाल कसे होत याचे हे वर्णन आहे. अन्न नाहीं वस्त्र नाहीं तरी पुत्राचे लग्न झालेच पाहिजे अशी सर्वांची समजूत असून त्या लग्नाकरितां भिक्षा मागण्यासहि बाप कसा कर्तव्य म्हणून तयार होत असे तें प्रस्तुत पत्र वाचून समजतें.

जनीजनार्दनाचा वंशज अर्ज लिहिण्यापुरताच कवि दिसतो. काव्यरचना हा त्याचा व्यासंग नव्हे. परंतु कित्येक कवींचा हा व्यासंग असूनहि त्यांना दुपारच्या अन्नाची भ्रांति पडे. तथापि त्या कवींना पुराणे व वेदान्तपर ग्रंथ वाचून वैराग्याची व निरिच्छपणाची संवय लागली असल्यामुळें ते विपन्नावस्थेंतहि संतोषाने रहाण्याचा प्रयत्न करीत. या धर्तीचा हरि गोपाळ अंगापूरकर नांवाचा कवि होता. तो कोल्हापुरापाशीं जोतीबाच्या डोंगरावर रहात असे. त्याच्या घरीं अठरा विश्वे दारिद्र्य असूनहि त्याचे ग्रंथलेखनाचे काम सुरूच होते. त्यानें 'श्री केदारविजय' नांवाचा ग्रंथ संपवून लक्ष्मीविजयाचे चार अध्याय पुरे केले होते. गरीबी इतकी कीं, त्याला लिहावयास कोरे कागद नसल्यामुळें त्यानें पुढील ग्रंथरचना बंद ठेवली व खावयास पुरेंसे धान्य न मिळाल्यानें त्याला वर्ष सव्वा वर्ष फाकेच पडले होते. तथापि लग्न ही बाब अशी कीं, ती असल्याहि विपत्तींत उरकून घेतलीच पाहिजे. सद्यःकाळीं मुलीच्या लग्नाकारितां बाप जिवाचे रान करतांना व पायांना पानें बांधताना आढळतो. पण अंगापूरकराला चिंता लागली होती ती पुत्राच्या विवाहाची. जोतीबाच्या आसपास मोठी ब्राह्मणी संस्थानें पटवर्धनांची. म्हणून कवि मिरजेस शके १७११ (सन १७९०) सालीं गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांजकडे आला. त्यानें गंगाधररावास ओवीबद्ध विनंति करून आपली अपेक्षा कळविली. लग्नाची इतर सर्व जुळवाजुळव झाली होती. फक्त एक पैठणी व दीडशें रुपये कमी पडले. ते त्यानें मागितले. कवि अंगापूरकर याची भाषा सुबोध, भारदस्त व सुसंस्कृत आहे. त्यावरून तो बराच विद्वान् दिसतो. परंतु कवित्वास कीर्तनाची जोड नसल्यामुळें त्याला अन्नान्नदशा आली होती. यावरून तत्कालीन कित्येक कवींची स्थिति सामान्यतः कशी कष्टप्रद असे याची कल्पना होते.

कवी असत त्याना निर्वाहासाठीं कीर्तन अगर पुराण यांची जोड घ्यावी लागे.

परंतु कीर्तनकार असत त्याना कवी होण्याची गरज भासत नसे. किंबहुना कीर्तनकारासारखा किफायतशीर व सन्माननीय व्यवसाय त्याकाळीं विद्वानाना क्वचित्च होता, असेंहि म्हटले तरी चालेल. त्या धंद्यांत चांगल्या कीर्तनकाराची सर्वत्र प्रसिद्धि होऊनच्या होऊन प्रचलित कवीस कीर्ति मिळवून दिल्याचें श्रेय लाभे आणि श्रेष्ठ प्रतीचे ज्ञान व संस्कृती यांच्या प्रसाराने त्यांजकडून देशबांधवांचीहि सेवा घडे. महाराष्ट्रांतील हिंदुसमाज जाणता, नीतिमान्, बहुश्रुत व चतुरस्र असल्याचे बरेचसे पुण्य कीर्तनकाराच्याच पदरी पडते यांत शंका नाहीं. पंतांची आर्या, वामनाचा श्लोक, तुकोबाचा अभंग, रामजोशाची लावणी, अमृतरायाचा कटाव, ज्ञानेश्वराची ओवी यांचे वैचित्र्यपूर्ण, सुरस व मार्मिक आधार घेतल्यानें कीर्तनात रसाळपणा चित्तवेधकता व विद्वत्ताप्राचुर्य हे गुण तर चमकतच, पण त्याखेरीज त्या त्या कवीच्या ग्रंथाची माहिती जनतेच्या कानी जाऊन ते ग्रंथ महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून सुलभतेने शिरकत. अर्थात् कीर्तन लोकप्रिय होण्यास कीर्तनकाराला किती तरी गुणांची संपादणी करावी लागत असे. गायन, वादन, पठन, प्रसंगावधान, व्यवहारचातुर्य, सूक्ष्म अवलोकन व स्मरण या सर्वांचे एकीकरण हरिदासाने आपणात व आपल्या साथीदारांत करणें अगत्याचे असे. अशा गुणी हरिदासांची संख्या पंडितगिरीच्या व वाङ्मयाभिवृद्धीच्या पाठोपाठ झपाट्याने होत गेली व हरिदास लोक समाजाची तात्कालिक गरज भागविणारे असल्यामुळें त्याना लोकाश्रय व राजाश्रय भरपूर मिळत गेला. पुण्यांत श्रावणमासी शास्त्री, पंडित, वैदिक, गवई, इत्यादि गुणिजनाबरोबर हरिदासांची संभावना पेशवे करीत. खेरीज भाद्रपद महिन्यांतील गणेशोत्सवांत हरिदासांची कीर्तने करवून घेऊन त्यांस योग्यतेनुरूप बिदागी देण्यांत येई. सन १७७२ त पुण्यास वरील प्रसंगी एकंदर त्रेपन हरिदास आले असून ते औरंगाबाद, पैठण, संगमेश्वर, चांभार गोंदे, शेवगांव, अष्टी, भिंगार, अरणी, बीड टाकळी, जोंगाईचे आंबें, चांदे, पंढरपूर, मुंगी, राशीन, पुणतांबे, तीसगांव, बनवडी, करंदी, तळेगांव इत्यादि ठिकाणचे होते. हीं सर्व स्थळे कोकण, देश, मोगलाई, वऱ्हाड, नागपुर या भागांतील असल्याने हरिदासांनी धर्मरक्षणाचे व धर्मोपदेशाचे केवढे प्रचंड कार्य चालविलें होतें हें लक्षांत येतें..

हरिदासमंडळीत महाराष्ट्राबाहेरील परकीय हरिदासहि क्वचित् मिसळले यावरून हरिकथेची महाराष्ट्रीय पद्धति इतरानाहि प्रिय झाली होती याविषयी

खात्री पटते. ठाकूरदासबुवा यापैकींच एक कीर्तनकार होत. ते जातीचे कनोजी ब्राह्मण व गंगातीरवासी. त्यांचे मूळचे नांव बालाप्रसाद. लहानपणापासून विरक्ति त्यांच्या अंगी बाणलेली. अकरा वर्षांचा असता बालाप्रसाद तीर्थयात्रा करीत हैदराबादेस आला. त्यावेळी हैदराबादेस चंदूलाल हा कायस्थ जातीचा हिंदु दिवाण होता. त्याने त्यास आपल्या घरी ठेवून घेतले. कांहीं दिवस हैदराबादेंत राहून बालाप्रसाद रामेश्वराकडे गेला व तेथून फिरत फिरत पंढरपुरास आला. तेथील अठरापगड जातीतील लोकांचा भक्तिसोहळा पाहून त्याचे मन पंढरीस रमले. तो पंढरपुरास असतां दुसरे बाजीराव पेशवे त्या क्षेत्री कांहीं कारणाने आले. त्यांजबरोबर भूदेवमिश्र नांवाचा कनोजी पंडित असून त्याने बालाप्रसादाची कथा ऐकली. ती ऐकून तो अतिशय खुष झाला व कथेची बातमी त्याने बाजीराव व बापू गोखले यांच्या कानावर घातली. दुसरे दिवशीं ते उभयतां बुवांच्या कीर्तनास आले. बापू गोखले याजवर बोवाचा पगडा इतका बसला कीं, तो त्याचा चेलाच बनला. बापू गोखल्याने पेशव्यास सांगून त्यास सातारा जिल्ह्यांत तारगांव येथील तीन चतुर्थांश मोकासा अमल देवविला. पुढें या अमलाबद्दल साताऱ्याचे प्रतापसिंह महाराज यानी आपली दुमालपत्रे देऊन त्यास तीनचारशे रुपये आकाराची जमीनहि बहाल केली. हेच हरिदास ठाकुरदासबुवा या नांवाने ख्याति पावले.

प्रकरण नववें

वैद्य व वैद्यक्रिया

पेशवाईत प्रजेला शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारावर नव्हती. कोणापाशी विद्या असली तर त्याची संभावना करावी हें सरकार आपलें कर्तव्य समजत असल्यानें त्या रूपानें सरकाराकडून विद्येच्या प्रसाराला उत्तेजन मिळाले तेवढेच. सामान्य विद्येपेक्षां वैद्यकीय ज्ञानाची उपयुक्तता वेगळीं आहे. वैद्य व वैद्यकीय ज्ञान यांजवर देशाचे आरोग्य अवलंबून आहे. आपल्या ज्ञानाने रोगराईचा नायनाट करणारे जितके वैद्य उत्पन्न होतील तितकी प्रजेच्या सुखाची व शरीरसंपत्तीची अभिवृद्धि घडून येईल हें उघड आहे. सध्याच्या वैद्यकीय शास्त्राच्या प्रगतिकडे पाहिल्यास पेशवाईतील देशी वैद्यकपद्धति पुष्कळच मागासलेली होती. चरक, वाग्भट, निघंटू यासारखे वैद्यकावर जे जुने संस्कृत ग्रंथ आहेत त्यांचे अध्ययन गुरुजपाशी राहून करावे व त्यांच्या कारखान्यांत त्यांच्याच नजरेखाली औषधे खलून वैद्यक्रियेचे तात्विक व व्यावहारिक ज्ञान तरुणानी संपादावे असा तत्कालीन क्रम होता.

वैद्यलोक राजधानीतून बरेच असत. त्यांतील ज्या यशस्वी वैद्यांस राजाश्रय मिळे त्याना राजवैद्य म्हणत. ते राजकुटुंबांतील माणसाना औषधोपचार करीत असल्यामुळें त्याना राजाकडून मासिक वेतन असे. वैद्यांच्या औषधालयांतील कांहीं औषधे अगदीं अल्प खर्चांत तयार होत असून मात्रा, चूर्णे, भस्मे इत्यादिकाना फार खर्च येत असे. असल्या मूल्यवान् औषधाकरितां सुवर्ण, मौक्तिक, प्रवाळ यासारखी भारी किंमतीची द्रव्ये लागत. ती द्रव्ये राजेच आपल्या वैद्याना पुरवून त्यांजकडून औषधे तयार करवीत. त्यांचा उपयोग राजाना तसा गोरगरीबानाहि होई. वैद्यक्रियेवर पैसा कमवावयाचा श्रीमंताकडून व दुवा मिळवावयाचा गोरगरीबाकडून असें वैद्यांचे धोरण असे. दर लावून औषधे विकण्याची पद्धति नव्हती. औषधोपचाराकरितां कोणीहि आला तरी त्याच्या रोगाची चिकित्सा करून त्याला औषध द्यावे व तो स्वेच्छेने गुण आल्यावर किंवा क्वचित् न आल्यावरहि जो मोबदला देईल तो घ्यावा असा वैद्यांचा क्रम होता.

खुद्द राजेरजवाड्याना वैद्यांच्या औषधाने गुण आला म्हणजे त्याना जमिनी वगैरे इनाम देत व सदर वैद्य त्यांचे कायमचे आश्रित होऊन रहात. पुष्कळ वैद्य राजधानीबाहेरच्या गांवातून रहात. दहापंधरा कोसांच्या टापूत एखादा तरी नामांकित वैद्य असावयाचाच. त्यांतलि जे वैद्य यशस्वी व परोपकारी असत त्यानाहि सरकारांतून इनामे देण्यांत येत. अशा रीतीने पुणे सातारा हीं मराठ्यांच्या राजधानीची मुख्य शहरे व सरदारांची शहरे यांत त्या त्या शहराच्या मानाने वैद्य असत व त्याखेरीज इतरत्र ठळक गांवातूनहि ते आढळत. आयुर्वेद-पद्धतीने औषधोपचार करणाऱ्या वैद्यांची परंपरा फार जुनी. ती खास स्वदेशी. मुसलमान लोक इराण, अफगाणिस्तान, अरबस्तान यांतून इकडे येऊन त्यानी आपली राज्ये स्थापली व ते स्थायिक बनले; तेव्हां त्यांच्या पाठोपाठ त्यांच्या देशचे हकीम हिंदुस्थानांत आले व ते युनानी पद्धतीने वैद्यक्रिया करू लागले. देशी वैद्याना हा नवीन प्रतिस्पर्धी वर्ग भेटला असला तरी त्या योगाने त्यांच्या स्वार्थास व्यत्यय आला असें घडलें नाहीं. कारण देशांत रोगनिवारकांचा इतका तुटवडा होता कीं, बाहेरच्या हकिमांची त्यांच्यांत भर पडली तर ती हवीच होती.

युरोपांतील पोर्तुगीज, डच, फ्रेंच, इंग्रज इत्यादि लोक व्यापारी पेशाने हिंदुस्थानांत आले व त्यानी आपले बस्तान इकडे चांगले बसविले. थोडीबहुत राजसत्ताहि ते कोठे कोठे उपभोगू लागले. तेव्हां त्यांच्या आधारावर त्यापैकीं कांहींच्या देशांतून त्यांच्या जातभाई डॉक्टराना हिंदुस्थानांत येऊन ख्रिस्ती धर्मप्रसार कराण्याची व पैसे मिळविण्याची इच्छा झाली. याहि डॉक्टरांनी आपला शिरकाव दिल्लीच्या मोगल बादशहापासून तो लहानसान राजेरजवाड्यांच्या दरबारापर्यंत करून घेतला होता. पेशवाईत मराठ्याशी यांचाहि संबंध हळूहळू वाढून वैद्य, हकीम व डॉक्टर यांच्या सहाय्याने आरोग्य संपादण्याचा उपक्रम सर्वत्र सुरू झाला.

राजेलोक आपल्या पदरी कायमचे वैद्य ठेवीत असतच; परंतु त्यांच्या औषधाने एखाद्या दुखण्यांत गुण येत नाहीं असें दिसल्यास इतर वैद्यांचीहि मदत घेत. साताऱ्यास शाहू महाराज आजारी असतां त्यांना सदाशिवभट नानलवैद्य याने औषधोपचार केला. त्यायोगाने महाराजाना उतार पडला. शाहूसारख्या महाराजाला आरोग्य मिळवून दिल्यावर त्याचे बक्षिस मोठे व कायमचे लाभावे

अशी वैद्यबुवाची अपेक्षा असणारच. म्हणून कदाचित् त्याच्याहि विनंतीवरून महाराजानी नसरापूर येथे त्याला एक चाहूर जमीन इनाम दिली असावी.

शाहूमहाराजांच्या मृत्यूपर्यंत राजाचे खरे ऐश्वर्य साताऱ्यासच होते. बाजीरावापासून पेशव्यांनीं पुण्यांत राहाण्यास प्रारंभ केला. त्यावेळीं त्यांना जरूर असणाऱ्या वस्तूंचा संग्रह त्यांनीं पुण्यास सुरू ठेवला तरी पण वैद्य व वैद्यखाना यास कायमचे स्वरूप नानासाहेब पेशव्याची निम्मी कारकीर्द संपेपर्यंत आले नसावें. त्यांना आपली नड पुण्यास किंवा आसपास जो वैद्य मिळेल त्याजवरच भागवून घ्यावी लागे. दुखणे अवघड आहे असें वाटले तर त्यांनी साताऱ्याहून राजवैद्य बोलवावा. नानासाहेबाची पत्नी गोपिकाबाई पुण्यास प्रसूत झाली. त्यातच तिला ज्वर येऊं लागला. अशा स्थितींत पुण्यास चांगला वैद्य नसल्यामुळें कीं काय, साताऱ्यास शाहूमहाराजांपाशीं असलेला दत्ताजीपंत नांवाचा वैद्य आणविण्याकरितां पेशव्यांनीं खटपट चालविली. तो वैद्य शाहूच्या राणीच्या तैनातीस होता. म्हणून राणीला विचारून काय तें करतो असे शाहूमहाराजांनीं सांगितलें. या संबंधांत रघुनाथरावानें पुण्याहून साताऱ्यास मल्हार तुकदेव यास पत्र लिहिलें होते. त्यांतील पुढील वाक्ये महत्त्वाचीं होत. 'सौभाग्यादिसंपन्न मातुश्री गोपिकाबाई प्रसूत जालिया उपरी कांहीं ज्वराची भावना प्राप्त झाली आहे. त्यामुळें अन्नोदकास अंतर पडते. वरकड वैद्याकरवी उपाय करवावे तर नाजूक दिवसांत भलत्याकडून औषध द्यावयाचा भरंवसा पुरत नाहीं. तीर्थस्वरूप नानांच्या चित्तांत होतें कीं, दत्ताजीपंत वैद्याकडून औषध देववावे, याकरितां लिहिले आहे. तर मशारशनिल्हेस पाठवून देणें' (पे. द.) यावेळीं नानासाहेब पेशव्याचा असा खास वैद्य नव्हता याविषयीं सदर पत्रावरून शंका उरत नाहीं.

पेशव्याजवळ स्वतःचा वैद्य नव्हता याचा आणखी एक पुरावा पुढील पत्रांत वाचावयास मिळतो. हें पत्र राधाबाईनें नानासाहेबास लिहिले आहे. त्यांत ती म्हणते, 'चिरंजीव सौभाग्यवती भिऊबाई यास काहाली झाली. परंतु ईश्वरें आरोग्य केलें. एका वैद्यानें औशध दिल्हे होते ते लागले. पथ्य कठीण, त्याजमुळें प्रहरभर वायु झाला. परंतु सांप्रत उतार आहे. ते वोखद टाकाविले. अतःपर दोहोंचहू दिवशीं प्रकृत पूर्ववत् होईल, म्हणून लिहिलेत तेणेकरून चित्तवृत्तीस समाधान जाहले. औषध घेत होती ते टाकविलें फार उत्तम गोष्ट केली. अतःपर

ते औशध घेऊं न देणें. तुमच्या युक्तीस येईल त्या प्रकारचे औशध बाबा वैद्याकडून देवणें ' (पे. द.)

पेशव्यांपाशी पदरचा वैद्य नव्हता, म्हणून औषधेंहि तयार नसत. त्यामुळेंहि अडून पडे. नानासाहेबाच्या वेळचीच गोष्ट. त्याच्या कुटुंबांत माधवरावाला किंवा दुसऱ्या कोणाला औषध पाहिजे होते. हें औषध तयार करणाऱ्या वैद्याचे नांव बदन कवीश्वर. तो परगांवी होता. तेथील अधिकारी अंताजी नारायण यास पेशव्यानें औषधासंबंधीं लिहिले. अंताजीनें बदन कवीश्वर मागेल ते साहित्य पुरवावें असें ठरले. त्यास तांब्याचे पत्रे वगैरे पाहिजे होते ते देण्यांत आले. परंतु औषध लवकर तयार होईल असे अंताजीस वाटेना. तेव्हां वेळेवर औषध न मिळाल्यानें रोग्याच्या जिवाला अपाय होईल या भीतीनें अंताजीनें पेशव्याला पत्र लिहिले व विचारलें कीं, औषध तयार झाल्यावर त्यासुद्धां वैद्याला पाठवू कीं एकट्याच वैद्याला पाठवू ? त्यास पेशव्यानें पुढीलप्रमाणें पत्र रवाना केले. ' ऐशास वैद्यास सांगून औषध लवकर तयार, पंधरा दिवसा अलीकडे करवून त्यास (वैद्यास) पाठविणें. विलंब न लावणें. ' (पे. द.) सांप्रत सर्व औषधे डॉक्टरवैद्यापाशीं अगदीं तयार असतात. कसलाहि दुःसाध्य रोगी आला तरी औषध तयार करण्याकरितां वाट पहावी लागत नाहीं. म्हणून औषध ऐनवेळीं न मिळाल्यामुळें रोगी दगावला असा प्रसंग सहसा घडत नाहीं. पण पेशवाईत वर लिहिल्याप्रमाणें प्रसंग वारंवार येत असतील तर त्यामुळेंहि प्राणहानि पुष्कळच होत असेल यात शंका नाहीं.

वेळेवर औषध न मिळाल्यामुळें प्राणहानीचा संभव तर खराच. पण त्याशिवाय वैद्याच्या औषधांत दुसरा दोष हा कीं, त्याचा गुण त्वरित न येऊन प्राणहानि टळेनाशी होते. पेशवाईत साथी उद्भवत, तेव्हां वैद्यक्रियेतलि हे दोनहि दोष प्रजेच्या प्राणनाशाला कारण होत. महाराष्ट्रांत पावसाळा संपण्याच्या सुमारास शीतज्वराची साथ लहानथोर सर्व गांवांतून फैलावून हजारो लोक महिनामहिना अंथरूण धरून पडतात. त्यावर क्विनाईन हा उपाय रामबाण समजला जातो तरी त्यालाहि हिवताप पुष्कळदा दाद देत नाहीं. मग हेहि औषध जेव्हां माहीत नव्हते त्याकाळीं जनतेची किती हैराणगत होत असेल बरें ? शीतज्वराच्या फेऱ्यांत श्रीमंतांची माणसें सांपडली असतां त्यांचीहि सुटका लवकर होऊं नये, मग गोरगरीबांची कथा काय ? रघुनाथ-

रावाची बायको आनंदीबाई मुलगे व सुना यांच्यासुद्धां कोपरगावास होती, तेव्हां तिच्या बंदोबस्तासाठीं ठेवलेला कारभारी कृष्णाजी जनार्दन नानास लिहितो ‘ भागीर्थीबाई (बाजीरावाची बायको) यांस शीतज्वर आला. ’ तो दुसऱ्या पत्रांत पुन्हा लिहितो, ‘ भागीर्थीबाई यांस ज्वर येतच असतो. किंचित् कमी-अधिक होतो. शरीर क्षीण झाले आहे. ’ त्याच पत्रांत त्यानें बाजीरावासंबंधाने म्हटले आहे ‘ बाजीराव यास ज्वर आला. काविळीचा उपद्रव झाला आहे. सारा वेळ खेळतात. यामुळें (आनंदीबाई) रागे भरतात म्हणोन शरीर किंचित् क्षीण झाले आहे.. त्यांत ज्वरांश होतो ’ (पे. द.) ही हकीकत सन १७८८ मधील आहे.

शीतज्वर किंवा दुसरी एखादी तापसराई आली म्हणजे जनतेची होणारी स्थिति खालील पत्रांत वर्णिली आहे. हें पत्र ठाणे जिल्ह्यांतून कृष्णराव महादेव यानें सन १७३९ त पहिल्या बाजीरावास लिहिले आहे. ‘ सांप्रत या मुलकांत ज्वराचा उपद्रव बहुतच झाला आहे. घरोघर कोणी मनुष्य पाणी द्यावयास नाहीं. राजश्री सखोजी शिंदे यांस तो व्यथा भारीच झाली आहे. वाचा देखलि बंद झाली आहे. आयुष्याची मर्यादा काय असेल ते न कळे. कित्येक मृत्युहि पावले. लोहगडीं (मावळांत) पांचसात मनुष्यें मेली. ऐसा प्रलय जाला आहे. कोंकणात तो या दिवसांत वर्षास व्यथा लोकास थोडथोडी होतच असते. त्यामध्यें हा संचार झाला. यामुळें बहुतच श्रमी लोक झाले. शेतिभात जनावरें खातात. भूमीवर पडोन जाया होतात, त्यास आटोपावयास कोणी नाहीं. आमचे घरी मुलेलेंकरें आदिकरून व्यथस्त पडिली आहेत. कल्याणी मातुश्रीबाईस बरें वाटत नाहीं. जानकीबाई रामचंद्रपंताची स्त्रीस तो अत्यवस्थ व्यथा. दशमीस प्रातः-काळीं भुईवर उतरली ऐसे पत्र आले. बाईसहि व्यथा. यास्तव सर्व काम टाकून आजी द्वादशीस प्रातःकाळीं स्वार होऊन कल्याणास गेलो. पुढें श्री काय करील ते पहावे.’ (पे. द.).

हिंदुस्थानांत हिंदु, मुसलमान आदिकरून भिन्न धर्मीय राजे होते. तरी त्यांचा नित्याचा व्यवहार या भिन्नत्वावर दृष्टि देऊन चालत नसे. तशांत वैद्य-क्रियेची गाठ खुद्द प्राणाशी असल्यामुळें या भेदभावास त्या बाबतींत मुळींच थारा नसे. मोठमोठे राजे लोक आपल्यापाशीं सर्व धर्मांतील लायक माणसांचा संग्रह करीत. निजामाजवळ हकीम असतीलच. पण हिंदू वैद्यहि असत. नाना-

साहेबाच्या वेळीं निजामाच्या दरबारी हैदराबादेस भरमण्णा नांवाचा कानडा वैद्य होता. नानासाहेबाची आई काशीबाई हिच्या पायाला दुःख झाले होते, ते बरे होईना. ही गोष्ट माहित असलेला नानासाहेबाचा एक हितचिंतक [कदाचित् वकीलहि] नबाबाच्या दरबारी होता. त्यानें नानासाहेबास पुढीलप्रमाणें पत्रद्वारें सल्ला दिला. ' येथें नबाबाचे सरकारांत भरमण्णा म्हणून वैद्य प्रामाणिक आहे. मातुश्री काशीबाई यांच्या पायाचे दुःख निश्चयपूर्वक बरे करीन म्हणतो. त्यास पायास निश्चयपूर्वक बरे करील. संदेह नाही. भावना लिहिली पाहिजे. तेणेंप्रमाणें साहित्य घेऊन येईल. नबाबास पत्र कीं, भरमण्णा वैद्यास अगत्य पाठवून देणें म्हणून लिहिलिया हे पाठविताहेत. आम्ही सांगाते घेऊन येतो. बहुत प्रमाणिक. नाना-प्रकारचें रोग दूर करतो. खर्च लागेल तो देऊन, घेऊन या म्हणून आज्ञा आलि-या अगत्यरूप आणितो. ' [पे. द.]

नबाबाच्या पदरीं भरमण्णा हा हिंदू वैद्य होता. तसा नानासाहेबापाशीं हकीम होता. नानासाहेब एकदां आजारी असतां त्यांना औषध हकीमाचेच सुरू होते. त्यावेळीं भाऊसाहेब पेशवे नानासाहेबापाशीं नव्हते. त्यांना नानासाहेबाजवळचा कृष्णराव बापूजी लिहितो ' प्रस्तुत प्रकृत बरीच आहे. हकीमजींचे औषध घेत असतात. आजच पांच दिवस पाचन दिले. आज रविवारी ढाळ दिला असे. बहुत प्रमाणिक वैद्यकशास्त्रांत आहे. तूर्त तो थोडासा गुण वाटतो. ' [पे. द.] रघुनाथराव पेशव्यापाशीं मुस्तफा नामक हकीम असून त्याचा पगार दरमहा २५० रु. होता. त्याला कायमचाच जवळ बाळगलेला असेल असे नाही. विशेष प्रकारचा रोग वैद्याकडून बरा होत नसल्याचें आढळून आल्यावर थोड्या मुदती-पुरते हकीमास बोलावल्यामुळें त्याला एवढा मोठा पगार द्यावा लागला असवा.

पहिल्या बाजीरावापासून इंग्रज डॉक्टरांची माहिती मराठ्यांना झाली असून वैद्य व हकीम यांच्या खालोखाल त्यांजकडूनहि ते औषधोपचार करून घेत असत. बाजीरावाच्या वेळीं डॉ. सँडो याचा प्रवेश मराठ्यांच्या दरबारी झाला होता. त्यानंतर इंग्रज व इतर युरोपियन यांचे दळणवळण अधिक वाढत चाल-ल्यामुळें पाश्चात्य डॉक्टर वारंवार येऊं लागले. परंतु युरोपियन औषधावर हिंदूंचा धर्मदृष्ट्या हल्लीप्रमाणें तेव्हांहि आक्षेप होता व तेव्हांचें हिंदू हल्लीपेक्षां कितीतरी पटीनीं अधिक कर्मठ, याचा विचार केल्यास त्यानीं प्रथम देशी औषधें वापरावी व त्यांचा गुण न आला तरच विलायती औषधाकडे धाव घ्यावी हा क्रम

स्वाभाविक दिसतो. म्हणून वैद्यांवरच त्यांची भिस्त अधिक होती. रघुनाथराव हा माधवरावाशीं बेबनाव झाल्यावर नाशिकाजवळ आनंदवल्लीस राहू लागला. त्याच्यापाशीं वैद्य, हकीम वगैरे असतच; तरी तो केव्हां केव्हां पुण्याहूनच औषधें मागवी. त्याचे दात एकदां दुखत होते. दाताना बळकटी आणण्याचें दातवण हें ठराविक औषध तेव्हांहि होतेंच. पण ते लावल्यानें दात काळे पडत. तेव्हां दात काळे पडून चेहऱ्यास विरूपता येऊ नये, पण दात तर बरे व्हावें असें औषध पाठवून देण्यास त्यानें पुण्यास नाना फडणविसास लिहिलें. ते पत्र- ' दाताचे औषधाचे प्रयोजन असे. तरी दातास औषध लाविल्यानें दात काळे न होत आणि दात बरे होत ऐसे औषध वे. रा. मोरोबा वैद्य याजकडून करवून सत्वर हुजूर पाठवून देणे व लाक्षा तेला विसी पेशजी लिहिलें आहे, त्याप्रमाणें उत्तम तेल करवून सत्वर रवाना करणें.' [पे. द.]

रघुनाथरावाची पत्नी आनंदीबाई ईस मौक्तिक भस्म पाहिजे होते. त्यास लागणारी मोत्यें पुण्याहून आनंदवल्लीस पाठविण्यांत आली. त्याचा उल्लेख पेशवे दप्तरांत पुढीलप्रमाणें केला आहे. ' सौ. आनंदीबाई याचकडे वोषधाबद्दल भस्म करावयास मोत्यें पुण्याहून आनंदवल्लीस पाठविली ते शिलकेंत वाढत होती. त्यास हल्ली रामचंद्रभट वैद्य यानी मोत्याचे भस्म करून दिल्हे म्हणौन पत्र पाठविलें. त्याजवरून खर्च मोत्यें वजन तोळे ६ दर तोळा रु २० प्रमाणें रु. १२० ' (पे. द.)

वैद्य व हकीम यांच्यापेक्षां डॉक्टर लोकांची औषधे अधिक गुणकारी असें अनुभवास आल्यावरूनच डॉक्टरांची औषधे घेण्याचा प्रघात पडला असावा हें उघड आहे. युरोपियन डॉक्टराप्रमाणेंच आर्मीनियन डॉक्टरांचीहि मराठ्यावर छाप पडली होती असें खालील पत्रावरून वाटते. सदर पत्र लिंबकराव विश्वनाथ (पेठे) याने राघोबास लिहिले आहे. ' स्वामीनीं आज्ञा केली होती कीं, आरमाणी वैद्यास साहित्य, कामाठी वगैरे सर्व करून देऊन लौकर पाठविणें. त्याजवरून त्याची तयारी केली होती. तों, इतक्यात पत्री आज्ञा आली कीं न पाठविणें; त्याजवरून राहविला. हकीमजीस आज्ञेप्रमाणें सांगितलें, ते तयार होऊन आजच स्वार होऊन स्वारीकडे येणार. रेवदंडेकर पाद्री यास आज्ञेप्रमाणें सांगितलें. तो लौकरच मुंबईस जाऊन औषधें घेऊन स्वामीकडे परभारा आनंदवल्लीस येणार. स्वामीस विदित व्हावें यास्तव लिहिलें असे.' (पे. द.)

त्या वेळीं धंदा करून पैसा मिळविण्यास हिंदुस्थान हें उत्कृष्ट स्थान असल्याचे पाहून आर्मीनिया प्रभृति परदेशांतील डॉक्टरानीं इकडे येण्याचा प्रघात पडलाच होता. तसेंच युरोपियन मिशनरीहि ख्रिस्तीधर्मप्रसाराच्या हेतूनें डॉक्टरीचे मिष करून ठिकठिकाणीं तळ देऊन बसले होते. त्यापैकींच रेवदंड्याचा पाद्री दिसतो. रेवदंडा हें बंदर कोकणांतील इतर अनेक गांवाप्रमाणें पोर्तुगीजांच्या ताब्यांत होते. त्यांच्या आधारावरच वरील पाद्री रेवदंड्यास येऊन राहिला असावा. मुंबई बंदर इंग्रजांचे असून हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावरील साऱ्या बंदराना त्याने या सुमारास मागे टाकीत आणलेले दिसतें. युरोपांतील कोणताहि माल घ्यावयाचा तर तो मुंबईतच घ्यावा इतकें महत्त्व मुंबईला प्राप्त झाले होतें. रेवदंड्याचा पाद्री प्रथम मुंबईस जाऊन औषधें खरेदी करून आनंदवल्लीस यावयाचा होता. यावरून पाश्चात्य लोक आपल्या मालाचा प्रसार करून इकडील धंदे हळू हळू कसे मारीत चालले होते व आपल्या निरानिराळ्या शास्त्रांतील ज्ञानाने हिंदी लोकावर कसे छाप बसवीत होते हें लक्षांत येतें.

असे पाद्री वैद्य आणावयाचे ठरले म्हणजे त्यांना केव्हां केव्हां पालखीत बसवून आणीत व त्याचा जाण्यायेण्याचा सर्व खर्च ज्याना त्यांची गरज तेच करीत. अर्थात् इतकी अनुकूलता बड्या लोकानाच असे. रेवदंड्याचे डॉक्टर मिशनरी असले तरी पेशव्यासारखे मोठे लोक त्यांची मेहनत फुकट घेत नसत व मिशनऱ्यांची अपेक्षाहि तशी नसे. रेवदंड्याहून एक इंग्लिश वैद्य सन १७७३ त पुणे दरबारी आणिला असून त्याला दरमहा १५० रु. पगार ठरला होता.

पहिला माधवराव पेशवा वारंवार आजारी पडे व शेवटीं तो क्षयाने थेउरास अगदी अल्पवयांत मरण पावलाहि. त्याच्या प्रकृतीस आरोग्य लाभण्याकरितां अनेक उपाय केले. त्यांत इतराप्रमाणें इंग्रज डॉक्टरानाहि आणविले होते. निजामापाशीं डॉक्टर स्टुअर्ट व बाजवेल हे दोन निष्णात डॉक्टर असल्याची त्याने बातमी ऐकली. त्याना पगार जास्ती द्यावा लागला तरी आणावे अशी माधवरावास इच्छा होऊन त्याने निजामाच्या दरबारांतील आपल्या मनुष्यास पुढीलप्रमाणें पत्र पाठविले ‘ डागतर इष्टुरी व बाजवेल हे दोघे वैद्य बहुत प्रामाणिक. त्यांची स्तुति जनवार्तेकडून व नबाबाच्या मुखे फार ऐकतो. त्यांत इष्टुरी बहुत गुणी चांगला माणूस ’ या इष्टुरीस दरमहा दोन तनिशें रुपयापर्यंत पगार देऊन ठेवण्यास माधवराव कबूल होता. मात्र त्यानें चाकर राहिलें पाहिजे

एवढीच त्याची अट होती. ही गोष्ट सन १७७२ मधली. त्यानंतर माधवराव लवकरच निवर्तला.

सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत इंग्रज डॉक्टरांचे प्रस्थ पुण्यांत अधिकच माजले. डॉ. फिंडले व डॉ. क्रूसो हे दोन मिशनरी पुण्यांत स्थायिक झाले असून त्यांची औषधें पेशव्यांच्या वाड्यांत व सरदारांत सुरू होती. फिंडले वैद्यकीय धंदा करून शिवाय सवाई माधवरावाला भूगोलाचा शिक्षकहि होता. पायाचे कुरूप हे दुःख किती क्षुल्लक, पण ते माधवरावाच्या पायाला कोठे तरी काटा मोडून झाले. त्यावर उपाय ते कापून काढणे हा. असली कुरूपे न्हावीहि कापून काढून पाय बरा करतात. पण कुशल पाद्री इंग्रज डॉक्टर गांवांतल्या गांवांत हजर असतां न्हाव्यासारख्याकडून गांवठी इलाज काय म्हणून करून घ्यावयाचा? यासाठीं पाद्री डॉक्टराकडून पायांवर शस्त्रक्रिया कशी करून घेतली याचे वर्णन माधवरावाच्या दिनचर्येंत पुढीलप्रमाणें दिले आहे. 'श्रीमंतांच्या पायास कुरूप होते. त्याजवरील कातडी पाद्री इंग्रजांकडून छिनून काढूंन मलमपट्टी लावली. दुसऱ्या खेपेस पांच घटिका दिवसास पाद्री इंग्रज पायास औषध लावावयासी आला होता. पायाचे कुरूप कांहीं मोडले आहे.' (इ. सं.) जे दुखणे ताबडतोब बरें व्हावयास पाहिजे, त्यावर औषध घ्यावयाचे ते डॉक्टराचेच घ्यावे अशी आज सर्वत्र समजूत आहे. वैद्यापेक्षां डॉक्टरांचे श्रेष्ठत्व जसें या गुणांत आहे तसे ते शस्त्रक्रियेंतहि आहे. माधवरावाच्या पायावर डॉक्टराकडून शस्त्रक्रिया करविण्यांत आली या योगानें शस्त्रक्रियेंत युरोपियन डॉक्टरानीं, त्याकाळीं नांव कमावले असल्याचेंच सिद्ध होते. पुण्यांतील हा डॉक्टर, फिंडले किंवा क्रूसो यापैकींच असावा. ते दोघेहि पाद्री अर्थात् मिशनरी असल्यामुळें ते पुण्यांतील लोकांपैकीं कोणाला मोफत तर कोणाला माफक किंमतीत औषधोपचार करीत असतील व त्या कारणानें विलायती औषधें व शस्त्रक्रिया पुष्कळांच्या परिचयाची झाली असेल.

पेशवाईच्या अखेरीस युरोपांत वैद्यक्रियेमध्यें नवे नवे शोध लागले व त्यांचे फायदे युरोपियन डॉक्टरांच्या मार्फत महाराष्ट्रांतील लोकांच्या अनुभवास आले. तेव्हां महाराष्ट्रांतील विचारी माणसेंहि थक्क होऊन गेली असल्यास आश्चर्य कसले? दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं गोस्तन देवी काढून देवीच्या आजाराचे निवारण करण्याची युक्ति निघाली. त्यापूर्वी देवीच्या सांथीत लाखो माणसे सांप-

ढून त्यापैकीं हजारो मृत्युमुखी पडत व बाकीचे जन्माचे अधू किंवा विरूप होत. पण त्यावर नवा तोडगा निघाला तेव्हां त्याचा प्रभाव पाहून पुष्कळांना ही एक अमृतवल्लीच लाभली असें वाटलें व तिजवरून हजारो रुपये ओवाळून टाकण्यास ते तयार झाले. खुद्द बाजीरावानें इंग्रजांकडील वैद्याकडून देवी काढविल्या. 'त्या यथास्थित कृपा करोन आरोग्य जाहल्या. सबब त्या वैद्यास २००० रु. दिले.' (पे. द. सन २१-१-१८०७). देवीचा हा तोडगा सातान्यासहि त्याच्यापूर्वी कांहीं दिवस एका गृहस्थानें करून पाहिला. त्यानें आपल्या कौटुंबिकास देवी काढविल्यावर त्याच्या मनाची जी अवस्था झाली तिचे वर्णन त्याने येणेप्रमाणें केलें आहे ' अलीकडे आपणांस पत्र पाठवावें. त्यास सातारा शहरांत देवी बहुत आल्या आहेत. आणि देवी आणावयाचा वैद्य सातारा आला होता. आमचे घरी मुलांस व चि. सौ. यमुनेस देवी आल्या नव्हत्या. याजकरितां वैद्यास आणून तोडगा केला. मूल दोन व चिरंजीव सौ. यमुना व आप्पाजी पंताचा मूल व बाळाजी हरी याचा पुत्र इतक्यांस वैद्यानें देवी आणविल्या. यामुळें १५।२० रोज बहुत घाबरे जाहली. कांहीं सुचेनासे झालें होते. परंतु आपले आशीर्वादेकरून आरोग्य जाहली.' (पे. द.)

अशा रीतीनें युरोपियन डॉक्टर आपल्या विद्येचे श्रेष्ठत्व महाराष्ट्रीय जनतेच्या मनावर ठसवीत असले तरी ते बहुजनसमाजास अगदीं दुर्मिळ होते. खेरीज त्यांचे परकीयत्वहि लोकप्रियतेच्या आड येणारे होते. त्यांची भाषा भिन्न, धर्म भिन्न, देश भिन्न व वर्ण भिन्न. इतक्या विरोधामुळें त्यांजविषयीं जनतेस एक प्रकारची अप्रीति वाटत होती. त्यांची औषधे अपवित्र म्हणून लोक सहसा विशेष कारणाशिवाय घेत नसत, इतकेच नव्हे तर त्यांचा विटाळहि मानीत असत. याचा परिणाम असा झाला कीं, वैद्यानीहि युरोपियन डॉक्टरापासून त्यांची विद्या शिकून आत्मसात् करण्याचे मनांत आणिले नाहीं व स्वतःची जुनी विद्याहि संशोधनाने वाढविण्याचे त्यांना सुचले नाहीं. राजकर्त्यांनीहि त्यांत लक्ष न घातल्यामुळें गतानुगतिकत्वाचा मार्ग तसाच पुढे चालू राहिला. वैद्यांचा होईल तितका फायदा घेऊन त्यांचें ज्ञान तोटके पडले कीं, त्या ठिकाणीं पेशवे हकिम, हाडवैद्य, डॉक्टर यांजकडून कामे करवीत. पहिल्या माधवरावाच्या कारकिर्दीत पेशव्यांच्या अठरा कारखान्यांत एक वैद्यशाळाहि असून तिजवर पुढें शामराव बाबूराव करमरकर याची योजना झाली होती. वैद्याची औषधें फार

जिकीरीची. ती बनविण्यास कष्ट पुष्कळ व गुण सावकाशीचा. माधवराव स्वारीवर असतांना त्याची शक्ति क्षीण होत चालली होती. परंतु शत्रूस मोकळा सोडून घरीं बसणेंहि त्यास शक्य नव्हते. अशा स्थितींत नाना फडणविसाला पत्र लिहून त्याने पुढीलप्रमाणें औषधे मागविली. 'आवळयाचा मुरांबा व च्यवन-प्राश याचे प्रयोजन आहे. तरी राजश्री बाबा वैद्यांचे घरी शोध करून तेथें असल्यास पाठवून देणें...गोमुत्र्या शिलाजित फार चांगला व सुरवारी हिर्ड्यांपैकीं हिर्डे एक: शेर व शिलाजित आदशेर याप्रमाणें पाठवून देणें.' [पे. द. सन १७६७]. च्यवन-प्राश हे औषध शक्तिवर्धक आहे व शिलाजितहि शक्तिवर्धकच आहे. बाबा वैद्य हा माधवरावाच्या पदरचा वैद्य दिसतो. माधवरावाचे दुखणे वाढत वाढत क्षयावर गेले तेव्हां पदरच्या वैद्यावर त्याचे भागेनासे होऊन त्यानें चांगला वैद्य कोठेहि आढळला तरी त्याला आणविण्यास पैशाकडे किंवा खटपटीकडे न पहाण्याचे ठरविले. रणछोड नांवाचा एक परदेशी वैद्य होता त्यास त्याने बोलावले. त्याखेरीज गंगाविष्णु हा अत्यंत प्रसिद्ध वैद्य सवाई जयनगरास होता. त्याची कीर्ति माधवरावाच्या कानी येताच त्याने त्यास आणविले. पहिल्या खेपेस तो तीन महिन्यांच्या करारानें पुण्यास आला. पण तेवढ्यांत माधवरावाला यावा तसा गुण न आल्यामुळें त्याची गरज पुनः उत्पन्न झाली. पण सवाई जयनगर कोठें व पुणें कोठें? इतक्या दूर अंतरावर परप्रांतांत बायकामुलांना घरी ठेवून रहाण्यांत त्याची गैरसोय फार होती. यास्तव बिऱ्हाड आणून पुण्यास मुक्काम करावयाचा झाल्यास जागेची सोय त्यास पाहिजे होती. ती केल्यावर चापाजी टिळेकर—ज्याने नारायणरावाकरितां आपला बळी दिला, त्यास घेऊन आला व त्याचे औषध माधवरावास सुरू झाले. [पे. द.] गंगाविष्णु पुण्यांत बरेच दिवस राहिला असावा. कारण प्रकृति बरी होऊन माधवराव लढाईवर गेला असताहि गंगाविष्णूचा मुक्काम पुण्यासच असून त्याचा लाभ इतरहि घेत होते. कारण याच सुमारास माधवरावाची आई गोपिकाबाई गंगापुरास आजारी होती. तिच्याजवळचा कारकून रामचंद्र नारायण गोरे यास माधवराव सन १७६७ त लिहितो. 'प्रस्तुत तीर्थरूप मातुश्री बाईसाहेबांची प्रकृति कशी आहे? गंगाविष्णूच्या मात्रेनें प्रकृति ठीक झाली होती म्हणून ऐकण्यांत आहे...गंगाविष्णूस तेथें न्यावे अशी विनंति वडिलाजवळ केली होती. त्यावरून तुम्ही वडिलास विनंति करून नेलाच असेल.' [ऐ. ले. सं. खंड ३रा].

वैद्यलोक एकमार्गी; त्यांनीं फक्त औषधेच द्यावी. पण त्यांनीं किंवा हाकिमानीहि दिलेल्या औषधानी बरे न होणारे कांहीं विकार असतात. कोणी मनुष्य पडून त्याचे हाड निखळले तर ते बसवावे लागते किंवा लढाईंत गोळी शिरून एखादा अवयव बिघडला असतां तो कापून काढावा लागतो. अशा प्रसंगी वैद्यांचा इलाज चालत नाहीं. म्हणून माधवरावानें हाडवैद्य व शस्त्रवैद्य बाळगले होते. त्याने बाळगलेल्या हाडवैद्याचा मासिक रोजमुरा ३५ रु. होता व शस्त्रवैद्यास अर्ध्या महिन्याचा पगार पुढीलप्रमाणें होता. ' बडेखान ११। रु., राजे महंमद ११। रु., राजे मलीक ९ रु., साहेबखान ७॥ रु. ' वरील नांवावरून शस्त्रवैद्य मुसलमान जातीचेंच असत असे वाटते. शस्त्रवैद्यांची संख्या बरीच दिसते, याचे कारण हे कीं लढाईत पुष्कळ लोक जखमी होत; त्यांच्यावर शस्त्रक्रिया एकाच वेळीं करणें भाग असल्यामुळें शस्त्रवैद्य अधिक ठेवावे लागत.

हिंदु वैद्य, मुसलमान हकीम, युरोपियन डॉक्टर, हाडवैद्य व शस्त्रवैद्य इतक्यांचा जमाव जवळ असूनहि अर्मीनियन वैद्यासहि बाळगावे लागत होते. याचा अर्थ असा कीं, विशिष्ट प्रकारची तेलें वगैरे बनविण्यांत तो निपुण असावा. कारण माधवराव नारायणरावास लिहितो, ' आरमाणी वैद्य याजवळ तेल करावयास दिल्हे आहे. १ बाळंत शोफा १ शहाजिरे १ अम्निसून लष्करांतून आनंदराव जिवाजीकडे पाठविलें होते ते, या तीन जिनसांचे निरनिराळे तेल करविले आहे ते तयार झाले असेल पाठवून देणे. धोंडी काळा याजवळ गंधकाचा अर्क असला तर पाठविणें. त्याजवळ नसल्यास दुसरे जागा असल्यास शोध करून पाठविणें. जंगली पुदिना आणावयास पुण्यांतील कोळयास सांगितले होते तोहि पाठविणें ' (पे. द. सन १७७१) माधवराव कसा व्याधिग्रस्त होता याची कल्पना हे पत्र वाचून सहज येते. वरील पत्रांत निर्दिष्ट केलेली सर्व औषधे एकट्या माधवरावालाच पाहिजे होती असें कोणी म्हणणार नाहीं. परंतु इतके खरे कीं, त्याला औषधांची नेहमी गरज, म्हणून पेशव्यांच्या वैद्यखान्यास व्यवस्थित स्वरूप लवकर आले. त्यांत नाना प्रकारांची औषधे द्रव्ये इत्यादि साहित्य सारखे भरण्यांत येत होते. त्यांत ठेवण्याकरितां रामाजी महादेव याने साष्टीहून ७५ सुरण पाठवून दिले. मीर अबूताल रहाणार सुरत याजकडून एक हजार रुपयांची औषधे आली. मौक्तिक भस्मासारखीं औषधें बनविण्याकरितां वैद्यखान्यांत मोत्यें असत. त्यांची किंमत अर्ध रुपयास एक मोती याहून सामान्यतः अधिक नसे.

अशा प्रकारची एक हजार रुपयांची मोत्ये खरेदी करून पुण्याहून आनंदवल्लीस पाठविण्यांत आली होती. देवीची सांथ वारंवार येत असून तिजवर रामबाण औषध देशी वैद्यांना सांपडले नव्हते. एका वैद्याने देवविर औषध बनविण्याचे कबूल केल्यावरून त्याला सन १७६७ त सात लहान बिनवेजी मोत्यें दिल्याचा उल्लेख सांपडतो. पेशव्यांच्या वैद्यखान्याकडे जे वैद्य होते त्यांत सन १७७२ त राजेश्वर नांवाचा वैद्य दरमहा १५० रु. पगारावर होता. मराठ्यांची सैन्यें लढाईवर जात तेव्हां त्याजबरोबर हाडवैद्य व शस्त्रवैद्य यांजप्रमाणें औषधे देणाऱ्या वैद्यांचीहि गरज असे. सैन्याचा तळ एके ठिकाणीं पडला म्हणजे त्यांत जरूर तितकी स्वच्छता न राहिल्यामुळें भयंकर साथी उद्भवत. मरींची सांथ त्यापैकीं एक ठरलेली. ती सांथ आली कीं, तिनें हजारो लोक मृत्युमुखीं पडावे. सन १७८६ त हरिपंत फडके याचे सैन्य कर्नाटकांत टिपू सुलतानावर चालून गेले. तेव्हां मरीचा उपद्रव फार होऊन मराठी सैन्यांतील शेकडो शिपाई मेलेच; पण त्यांजबरोबर त्याना वाचविण्याकरितां नेलेला लष्करी वैद्य धोंडभट हाहि मृत्यूच्या दाढेंत सांपडला. तेव्हां त्याऐवजीं आण्णाभटाचा पुत्र मोरेश्वरभट यास पाठविण्याबद्दल हरिपंताने पुण्यास नाना फडणविसास लिहिलें. (इ. सं.)

पेशव्यांची पुण्यांतील पागा मोठी होती. तिच्यांतील घोडी आजारी पडावयाची. त्यांच्याकरितां वैद्य व घोडके असत. अशा पागा पुण्याबाहेर ठिकठिकाणीं लहान मोठ्या ठेवल्या असून तेथेंहि हीच व्यवस्था होती. मौजे कुसलंब परगणे जामखेड (खानदेश) येथील पागेवरील अधिकारी विसाजी रघुनाथ होता. तो नानासाहेब पेशव्यास लिहितो ‘ पागेत रोग शिरला. त्या रोगाचे नांव कोणास कळत नाहीं. पागेचा वैद्य व घोडके जे कोणी वोशधे सांगतात तीहि देतो. परंतु उतार पडत नाहीं. नेमणूक पैकीं घोडी व शिंगरे १२ आजतागायत मयत जाहली. नवी शिंगरे ५।६ मेली. त्यांच्या माना उफराट्या होऊन मेली. प्रस्तुत खंडोबा झाडाच्या अंगी येऊं सांगतो कीं, तुम्ही येथें राहिल्यानें पागेची घोडी मारीन. ऐसे पष्ट रामाजी भगवंत केसकर याचे गु॥ने म्हणतो. हे वर्तमान लिहिले आहे. पागेस दुसरा जाग्याची आज्ञा थडीस होऊन येईल. येथें घोडी ठेवलियाने खराब होतील. ’ (पे. द.) रोगाने जनावरांचे होणारे नुकसान भयंकर. वैद्यालाहि साथ आवरेना, याचे कारण औषधे तितकी रामबाण

नव्हती. म्हणून खंडोबा अंगात आला त्यावर विश्वास ठेवावा लागला; दुसरें काय ?

पेशव्याप्रमाणें त्यांच्या सरदारांनींहि आपल्या पदरीं वैद्य बाळगले होते. महादजी शिंदे यांच्याजवळ शुकदेव मिश्र या नांवाचा वैद्य होता. तो पूर्वी झांशीस असतां झांशीचा सुभेदार नारोशंकर राजेबहाद्दर याच्या कारकीर्दीत त्यानें वैद्यचातुर्य प्रकट केल्याबद्दल त्यास सरकारांतून दररोज २॥ रु. प्रमाणें नेमणूक सुरू झाली (इ. सं.) सातारा जिल्ह्यांतील इसलामपूर ही सरदार मंत्री यांची राजधानी. त्यांजपाशीं शिवरामभट नामक वैद्य होता. मिरजेस गोविंद हरि पटवर्धन आजारी पडला, तेव्हां त्यांने औषधोपचाराकरितां शिवरामभट यास आणविले. पण शिवरामभट स्वभावाने तऱ्हेवाईक व आग्रही आणि गोविंदपंत तापट. यामुळें उभयतांचे जातक कांहीं केल्या जमेना. वैद्यबुवा म्हणत ‘मी जशी ओखदे देईन तशी गोविंदपंतानीं घेतली तर मी रहातो नाहींतर जातो ?’ पण शिवरामभटाचे काढे फार कडू. ते गोविंदपंताला जसेच्या तसे घेववेनात. म्हणून दोघांचे न बनून शिवरामभट चालता झाला. इस्लामपूरचा शिवरामभट गेल्यावर गोविंदपंतानें कोल्हापूरचा विद्याधर जोशी वैद्य आणविला. पण या राजश्रीची शिवरामभटावरहि ताण. त्याच्यासंबंधीं गोविंदपंत म्हणतो ‘वैद्य चांगले आहेत. परंतु तिरस्कारी (तिरसट) पंधरावे (रत्न) आहे.’ ही दोन उदाहरणे दिली आहेत. ती वैद्यांची औषधे किती कठिण, त्यांचे स्वभाव कसे तापट व त्यांजपासून रोग्यांना काय हाल सोसावे लागत असतील याची कल्पना येण्यास पुरेशीं आहेत. वैद्यराजाला यमराजसहोदर म्हणण्याची रीत पडली ती यामुळेंच.

तथापि वैद्य कितीहि छळणारा असला तरी त्याच्यावांचून लोकांना सत ना गत. त्यानेंच रोग्याला तारावें किंवा मारावें. सगळेच वैद्य स्वभावाने खाष्ट असत असे नाहीं. पण त्यांची औषधे कडू व पथ्य कडक. याला त्यांनीं काय करावें ? पेशवे व त्यांचे सरदार यांनीं आपण होऊन गांवोगांवी वैद्यांना नेमले नव्हतें. परंतु आपल्या राज्यांतील एखाद्या गांवीं राहून कोणी वैद्य धर्मार्थ औषधे देत आहे अगर चार विद्यार्थ्यांना पढवीत आहे असें आढळल्यास त्यास योग्य तो आश्रय देणे ते आपले कर्तव्य समजत. ‘शिवराम वासुदेव वैद्य उपनाम मांडे हे वैद्यक्रियेत निपुण. त्यांचा योगक्षेम चालला पाहिजे म्हणून वंशपरंपरेनें गांव इनाम

करून दिला ' (पे. रो.) वैद्याला गांव अगर जमीन इनाम देण्यांत सरकाराचे दोन तीन हेतु असत. त्याने धर्मार्थ औषधोपचार करावा हा एक हेतु झालाच. दुसरा हेतु असा कीं, वैद्यांची गणना भिक्षुकवर्गांतच होत असल्यानें त्याला दान केल्यास पुण्य लाभेल व आपले इह–परलोकी कल्याण घडून येईल अशीहि राज्यकर्त्यांना आशा असे. ही उत्पन्ने वंशपरंपरा असण्याचेंहि कारण स्पष्ट आहे. उत्पन्न ज्या वैद्यानें संपादन केले त्याला स्वतःच्या हयातींत चरितार्थाची चिंता उरू नये. त्याचा योगक्षेम नीट चालून तो आपल्या पुत्राला त्याच धंद्यांत तरबेज करून ठेवी; किंबहुना त्याला स्वतःच्या घराण्याचा वैद्य या नात्यानें लौकिक कायम राखण्याचीही आपल्यावर एक जोखीमच आहे असें वाटावे. वैद्यकीचा धंदा एकाच घराण्यांत व एकाच गांवांत वंशपरंपरा चालल्यामुळें हल्लीं म्युनिसिपालिट्या अगर लोकलबोर्डें यांनीं आपले दवाखाने स्थापल्यानें जे कार्य साधते तेंच कार्य त्या काळींहि साधत होते. म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांच्या दवाखान्यांतून औषधोपचार मोफत मिळतो. तसाच मोफत औषधोपचार गोरगरिबास करण्यास हा वैद्य बांधला जात होता. या ठिकाणीं एक महत्त्वाचा मुद्दा लक्षांत ठेवला पाहिजे कीं, त्या काळांत वैद्यक्रिया हा हल्लींप्रमाणें हजारों रुपये कमावण्याचा धंदा झाला नव्हता. म्हणूनहि राज्यकर्त्यांना जनांच्या आरोग्यरक्षणार्थ इनामे बहाल करण्याची आवश्यकता वाटत होती.

' वेदमूर्ति राजश्री प्राण गोविंदभट बिन हरिभट उपनांव त्रिवेदी वैद्य सामवेदी वास्तव्य कसबे अहमदाबाद यांनीं पुण्याचे मुक्कामीं येऊन विनंति केल्यावरून हे थोर सत्पात्र असून धर्मार्थ बुद्धीनें गोरगरिबांस औषधी उपाय करतात. त्यांनीं स्नान, संध्या व षट्कर्मे आचरोन रा. स्वामीस (शाहूमहाराजास) व स्वामींचें राज्यास अभीष्ट चिंतून सुखरूप रहावें म्हणून मौजे मिठापूर परगणे दसक्रोई प्रांत गुजराथ हा गांव दुमाला करून दिला. ' (पे. डा.) या सनदेंत गांव दुमाला देण्याचा उद्देश अगदीं स्पष्ट केला आहे. प्राण गोविंदभट यांच्या अंगच्या सर्व गुणांचे वर्णन वरील सनदेंत आहे. इतक्या कसाला जे उतरले त्यांनाच उत्पन्ने मिळत, लुंग्यासुंग्याना व नालायकाना मिळत नसत. हे वैद्य बहुधा आचारसंपन्न, विद्वान् व पापभीरु असल्यामुळें त्यांजकडे पाहून समाजास उत्कृष्ट नैतिक वळण लागण्यास एक प्रकारची मदतच मिळे.

पढिक वैद्याशिवाय इतरांना सरकारांतून आश्रय मिळत नसे; इतकेंच नव्हे

तर जर एखादा इसम वैद्यक सशास्त्र न शिकतां वैद्यक्रिया करीत असला तर त्याला मनाई करण्यांत येत असे.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान या प्रति—

आश्रित कृपाशास्त्री वास्तव्य उमांमहेश्वर संनिध कुंभकोण आशीर्वाद विनंति उपरी–आम्ही वैद्यक पढलो नसता करीत होतो. त्यास सरकारांतून आज्ञा जाहाली जे, वैद्यक करूं नये आणि कोणासहि औषध देऊं नये. ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. अतःपर कोणास औषध देऊं तरी सरकारचे गुन्हेगार. वैद्यक करणार नाहीं. मित्ति शके १६९४ नंदननाम संवत्सरे चैत्र कृष्ण त्रयोदशी. (पे. द. ४३)

हा प्रतिज्ञालेख पेशव्यांनीं ता. ३–४–१७७२ रोजीं लिहून घेतला असून त्याजवर सहा शास्त्र्यांच्या साक्षी आहेत. कृपाशास्त्री हा कुंभकोणकडील रहिवासी. त्याच्या औषधापासून रोग्यांना अपाय घडल्याच्या तक्रारी पेशव्यांच्या कानीं आल्यावरूनच त्यांना हा बंदोबस्त करावा लागला असें दिसतें; किंवा कदाचित् खुद्द थोरल्या माधवरावालाच सदर वैद्याचा तसा कटु अनुभव तो पुण्यांत असतां आला असेल म्हणून पुण्यांतच त्याला बांधून घेतले असावे.

सगळया वैद्याना उत्पन्नें देण्याची पद्धति एकच नव्हती. वैद्याची गरज व परिस्थिति पाहून देणगींत बदल होत असे. ‘ रणसोड नाईक वैद्य जांजिरे वसईमध्यें होता. त्यास सरकारांतून रहावयास घर दिले होते. त्याशिवाय नारळीची झाडे सहा, पेरूची झाडे तीन व डाळिंबीची झाडे तीन होती. ’ रणसोडदासास घर व घराभोवतालची झाडे मिळाली, तर नवापूरचा वैद्य नारोराम यास तहाहयात सरकारांतून धर्मपट्टी मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली. ती अशी ‘ नारोराम बिन नरहर वैद्य कसबे नवापूर प्रांत बागलाण हे प्रामाणिक वैद्य व परोपकारी म्हणून दरसाल रयतेपासून उरपाड, अंकलेश्वर, हसोठ, पारचोल व सुपे या पाच महालातून कमाविसदारांकडून ३२५ रु० धर्मपट्टी करून देण्यांत आली!’ (पे. डा.) ही उत्पन्नें देतांना जात, धर्म, प्रांत इत्यादि क्षुद्र भेद लक्षांत घेतले जात नसत. वर कांहीं गुजराथी ब्राह्मणांची उदाहरणें आलीच आहेत. पण अशा मदतीस परधर्मीय मनुष्य सत्पात्र आढळल्यास त्यालाहि मदत होत असे. फिर माउतिग पाद्री वैद्य जंजिरे रेवदंडा येथे रहात होता. त्याला नक्त रु० २५ व भात एक खंडी अशी नेमणूक पेशव्यांकडून होती. मात्र ही देणगी देतांना तिचा

उपयोग ख्रिस्ती धर्मप्रसाराकडे न होण्याची काळजी घेण्यात आली असेलच. पुण्यांत पेशव्यांचा वैद्यखाना होताच. तरीपण तेथे लागणारीं रसासनें पुण्यांतल्या पुण्यांत करून घेण्यापेक्षां बाहेरगावांत अधिक सोय असल्यास तेथलि वैद्याकडून करवून घेण्यांत येत व त्या बाबतींत जरूर त्या सर्व सवलती वैद्यास मिळत. ' वेद-मूर्ति आप्पाभट वैद्य वाईकर यांजकडून कसबे वाई येथें सरकारांतून रसायनें करावली आहेत. त्यास औषधी लावावयाबद्दल जमीन बिघा एक देविली असे. तरी कसबे मजकुरी वैद्य यांचे घरासमपि पडे अशी सदरहू एक बिघा जमीन नेमून देणें. त्या जमिनीत हे औषधें लावतलि त्यास पुरेसे पाणी पाटाचे दररोज देत जाणे. औषधाचे काम झाल्यावर जमीन माघारे घेणे. ' [पे. द.] उत्पन्नें देण्यांत गैरवाजवी औदार्यहि दाखविलें जात नसे. त्यांतहि किती कसोशी चालवीत याचे हे ठळक उदाहरण होय.

बापाचे वेळीं उत्पन्न मिळाले व ते पुत्राच्या वेळीं बंद पडलें पण पुत्र बापाचाच धंदा पुढें चालविणारा असला म्हणजे तो सदर उत्पन्न सरकाराशी भांडून संपादल्यावाचून रहात नसे. ' वेदमूर्ति भीमाशंकर भट बिन वासुदेव भट वैद्य याणी हुजूर येऊन विनंती केली कीं, आपले तर्थिरूप वासुदेव भट वैद्य यांस कसबे संगमनेर तर्फ मजकूरचे मालापैकीं वर्षासन दोनशे रुपये पावत होते. त्यास ते मृत्यु पावले. सबब आपले नांवे करार करून चालविले पाहिजे. म्हणोन; त्याजवरून मनास आणितां त्यांचे तर्थिरूपांस वर्षासन गोरगरीबास औषध द्यावे त्याबद्दल रुपये शंभर व उदरपोषणानिमित्त रुपये शंभर याप्रमाणें पावत होते. त्यास ते मृत्यु पावले, सबब यांचे नांवे पेशजीप्रमाणें कसबे मजकूरचे मालापैकी सालनिा रुपये दोनशे करार करून देऊन हे सनद सादर केली असे. तरी सदर-हूप्रमाणें दोनशे रुपये वर्षासन कसबे मजकूरपैकी पाठवति जाणे. दरसाल ताजे सनदेचा आक्षेप न करणे. ' [पे. डा.]

प्रकरण दहावें

गायन, वादन व नर्तन

राजदरबारी कलावान् माणसे हवींत. कारण राजाकडून कलेस उत्तेजन मिळाले तरच ती देशांत उत्कर्षास पोंचावयाची. शाहूमहाराज हा राजैश्वर्यास सर्वस्वी पात्र असा पुरुष असून त्याला इतर अनेक कलाप्रमाणें संगीताचीहि आवड होती. म्हणूनच त्याने मोठ्या प्रयासानें दूरदूरच्या स्थळाहून गवई, नट, भाट, नायकिणी इत्यादिकांचा संच जमविला. दिल्ली ही मोगलांची राजधानी. दिल्ली व उत्तर हिंदुस्थानांतील अनेक शहरें हीं गायनवादनाची आगरे होत. यासाठीं शाहूने तिकडूनच गुणिजन मिळविण्याचा प्रयत्न केला. हें काम तो पेशवे व इतर सरदार यांजमार्फत करवून घेत असे. महाराजांने पेशव्यास पाच सात वेळां पत्रें लिहून दिल्लीहून नायकिणी पाठविण्यास सांगितले. याप्रीत्यर्थ ५।७ हजार रुपये खर्च झाला तरी करण्यास त्याची परवानगी होती. त्यावरून पेशव्यांनीं चांगल्या गाणाऱ्या व नाचणाऱ्या अशा कलावंतिणींचे दोन ताफे आणविले. परंतु शाहूमहाराजांच्या परीक्षेंत त्या किती उतरतलि याविषयीं पेशव्यांना शंकाच होती.

त्या काळीं उत्तर हिंदुस्थानांत सिरोंज हें प्रसिद्ध शहर होते. त्यांत गुणिजन अनेक असत. नारोशंकर राजेबहाद्दर हा मराठ्यांचा त्या प्रांतातील अधिकारी. त्यांनीं पेशव्यांच्या आज्ञेवरून शाहुमहाराजाकरितां सिरोंजेहून तीन पोरी पाठविल्या. उत्तर हिंदुस्थानाप्रमाणें ललित कलांत कर्नाटकाची ख्याति जुनी. यासाठीं तिकडूनहि गुणिजन रवाना करण्यास पेशव्यांची तत्प्रांतिय सरदारांना आज्ञा होती. जयापा देसाई हा नरगुंदचा. त्याने पेशव्याकडे फिर्गी वीणा व उत्तम जातीच्या दोन बायका पाठविल्या. फिर्गी म्हणजे फिरंगी वीणा ही पाश्चात्य पद्धतीची गोवेकर फिरंग्यामार्फत आलेली असावी. व दोन स्त्रियाहि गोवेकरणीच असाव्या. त्या शाहूकरिताच मागविलेल्या दिसतात.

परप्रांतांतून नायकिणी आणविण्यास पैसा फार खर्चावा लागतो असें पाहून

महाराष्ट्रांतल्या महाराष्ट्रांतच चांगल्या होतकरू मुली मिळवून त्याना नृत्यकलेंत तरबेज करण्याचे शाहूने मनास आणिले व कोकणांत खंडोजी माणकर या अधिकाऱ्याकडे ती कामगिरी सोपविली. चांगल्या जातकुळीतील मुली या कामास मिळणाऱ्या नसल्याने शाहूने बटकीच्या पोरींचाच शोध करण्यास खंडोजीस सांगितले. सदर पत्रांत शाहूतर्फे पेशव्याने लिहिले. ' बटकीच्या पोरी, दोन बहुत चांगल्या, दहा अकरा वर्षांच्या, निरोगी, नाचावयासी लायख, लावलियाने उपयोगी पडतील अशा पाठवाव्या ! ' पण बटकीपाशी कोकणांत अशा मुली मिळाव्या कशा ? खंडोजीने पुष्कळ तपास केला. अखेर तो पंतप्रधानास लिहितो ' कुणबी माणूस काळेरीस. देखणे नव्हे. पहाता वीट येतो. त्या कुरूप असल्या तरी यावयास कोणी कबूल होत नाहीं. ' अशा रीतीने शाहूचा हा 'स्वदेशीचा' प्रयत्न फुकट गेला. शाहूच्या पश्चात् रामराजाच्या कारकिर्दीत सन १७७२ त साताऱ्यास त्याच्या दरबारी कलावंतिणींचे दोन ताफे होते. एक हिरा कलावंतिणीचा व दुसरा अच्छीचा. कलावंतीण व तिचे सार्जिंदे मिळून एक ताफा, प्रत्येक ताफ्यास दरमहा वीस रुपये करार केलेले असत.

शाहू मरण पावल्यावर पुण्यास पेशवे आपल्या दरबारी कलावंतास आश्रय देऊ लागले. पुढील पत्र सन १७५५ मध्ये एप्रिल महिन्याच्या १९ तारखेस लिहिलेले आहे. त्याचा लेखक लक्ष्मण नामक चाबूकस्वार नानासाहेब पेशव्याने औरंगाबादेस कलावंतांचे ताफे आणण्यासाठीं मुद्दाम पाठविला होता. तो लिहितो, ' स्वामींनी कलावंताचे ताफ्याविषयीं लिहिले. त्यास पत्र येताच स्वार होऊन शहरास गेलो. तेथून जे ताफे येतील त्यास पाठवून देतो. परंतु एक पत्र दरगा कुलीखान यास आलियाने ताफे येतील. नाहींतर अनमान......याजकरिता शेवेसी विनंति लिहित असे आनी आपनहि त्यास बोलावितो. जर आला तर पाठवीतच आहे. परंतु आमचे ऐकणार नाहींत याकरितां दरगा कुलीखानास पत्र पाहिजे. ' (पे. द. ४०)

हे ताफे विशेष समारंभाकरितां औरंगाबादेहून आणावयास लक्ष्मण चाबूकस्वारास पाठविले होते, कीं त्याना आपल्या तैनातींत कायम ठेवण्याचा नानासाहेबाचा उद्देश होता याचा बोध प्रस्तुत पत्र वाचून होत नाहीं. बहुधा ही योजना प्रासंगिकच असावी. कारण कायम नोकरींत घेण्याकरितां इतके ताफे एकदम कोणी बोलावणार नाहीं. नोकरीची रीत अशी कीं, एखादी दुसरी तयार

नायकीण, गवई व साजिंदे जवळ बाळगावे व त्यांच्या हाताखालीं शाहूमहाराजानी योजिले होते त्याप्रमाणें लहान मुलीना तालीम देऊन कुशल बनवाव्या. तोहि उपक्रम नानासाहेबाने केला होता. त्याला आधार पुढील पत्राचा. हें पत्र नानासाहेबास आत्माराम राजाराम याने लिहिले आहे, “ साहेबी जातेसमयी ताकित केली कीं, ‘ खबरदार रहाणे व पोरींची निगा करणे. तालीम उत्तम प्रकारे करवीत जाणे. ’ त्यासी खाणें जेवणे उत्तम प्रकारे होत आहे. व गावयाची तालीम उत्तम प्रकारें काशीबा पांच सात घटका देत आहेत. व फकीर महमदहि तालीम उत्तम देत आहे. परंतु नाचावयाची तालीम नटवे सुधी देत नाहींत. येक घटकाभर टो टो करितात, आण पोरीस मारितात, आणि उठोनी आपल्या घरास जातात. आम्ही व भवानजीने सांगितले कीं नाचावयाची तालीम सकाळची पाच सात घटका व सांजेची पाच सात घटका देत जाणे ऐसे सांगितले. त्यासी ते म्हणतात कीं, तुम्हास कांहीं कळत नाहीं. आम्ही घटकाच भर तालीम देऊ. महाराजास कळावे म्हणून लिहिले आहे. कळले पाहिजे हे विज्ञाप्त ” [पे. द. ४०] आत्माराम राजाराम हा पेशव्यांच्या ललितकलाखात्यावरील अधिकारी दिसतो. नानासाहेब पेशवा कोठे स्वारीवर गेला असता पुण्यांत वरील खात्यांत घडलेला वृत्तान्त त्याने पेशव्यास कळविला आहे. या पत्रांत तज्ज्ञ म्हणविणारे नटवे वरिष्ठ अधिकाऱ्याना आपल्या कलानैपुण्याच्या घमेंडीत चूप बसण्यास कसे लावित होते याचे प्रत्यंतर आढळते. अशा रीतीने पेशव्यापाशी पगारदार गवई, नायकिणी, नटवे, संगीतराव कायम ठेवलेले असून त्यांच्या तालमींत नवीन माणसेहि तयार होत असत, शिवाय विशेषप्रसंगी परठिकाणच्या गुणी लोकांसहि बोलावून त्यांचा गौरव करण्यांत येई. गणेशोत्सवात गांवोगांवचे गुणिजन येत व हजिरी देऊन योग्यतेप्रमाणें इनामे मिळवीत. सन १७६१ च्या गणेशोत्सवात गवई, गुरव इत्यादिकांना बक्षिसे वांटली. तेव्हां १०६ रु. कलावंतिणीना (१ ते ८१ रु. पर्यंत प्रत्येकीस) बिदागी मिळाली. गुरव १७ होते, त्याना जास्तींत जास्त मिळालेल्या बिदागीचा आंकडा १० रु. होता. कर्णेकरी १० आले होते व त्याना प्रत्येकी १॥ रु. देण्यांत आला. माधवरावाच्या कारकिर्दीत सन १७६७ च्या गणेशोत्सवांत २६८२ रु. बिदागी खर्ची पडून ती मुख्यत्वेकरून हरिदास, गवई व कलावंतिणी याना मिळाली. याच वर्षी पेशव्यांच्या पदरी पखवाजी होता त्याचा मासिक रोजमुरा ३५ रु. होता. विठू गुरव नांवाच्या गवयास २५ रु. पगार होता. (पे. द. २२).

रघुनाथराव पेशव्यास ललितकलेचा नाद विशेष होता. त्याला नायकिणींचे वेडच होते. तो आनंदवल्लीस रहात असतां नटवे व नायकिणी यांजवर देखरेख ठेवण्याकरिता त्याने गुलाबराव खोज्या या नावाचा अधिकारी नेमला होता. आनंदवल्लीहून राघोबा राजकीय कामाकरिता पुण्यास आला असता तेथून तो १७६७ मध्यें गुलाबरावास कळवितो ‘ नारायणदास वगैरे नटवे असामी सहा आनंदवल्लीस आहेत त्यांचे प्रयोजन हुजूर असे. तरी नटव्यास हुजूर पाठवून देणें ’ (पे. द. ३२) नायकिणींविषयीं त्याच वर्षी तो गुलाबरावास बजावतो ‘ कुवरेचा मजकूर लिहिला. तो कळला. त्यास तिजला ठेवून घेणे. खासा स्वारी आनंदवल्लीस दुसरे जेष्ठ आषाढमासी येईल. चौदा पंधरा महिन्यांचा अवकाश आहे. तोपर्यंत तिणे गावयास व नाचावयास शिकोन चांगलें तरबेज व्हावे. कीं खासा स्वारी आलियावर गाणे नाचणे पाहून खुष होय ऐसे करावे. ती संतोषाने जाईल तरच निरोप द्यावा, म्हणोन लिहिलें होते. याउपरी बहुत तिचे समाधान करून ठेवून घेणे. वरकड नाटकशाळासहि हुजूर आणावयाचे नाहीं. त्यास गायननृत्याचा अभ्यास दिवसेदिवस अधिकोत्तर करवून स्वारी येईतोपर्यंत तरबेज व्हावे कीं, मर्जी खुष होय ऐसे कसब करवणे. सोमवारी श्रीजवळ गायन, नृत्य पहिलै आज्ञेप्रमाणें करवीत जाणे.’ (पे. द. ३२)

नटवे म्हणजे नट व नाचे हे बहुरूप्याप्रमाणें वेगवेगळी सोंगे आणीत व गणपति, सरस्वती यांची सोंगे घेऊन कांहीं अंशी नाटकेच करून दाखवीत. नटवे पेशव्यांच्या पदरीं पेशवाईअखेरपर्यंत होते. आनंदवल्लीस राघोबाचे सहा नटवे असल्यानें त्यांजकडून राघोबा दशावतारी खेळाप्रमाणें खेळहि करून घेत असावा. त्याने आनंदवल्लीहून नटवे पुण्यास बोलावले ते याचकारणासाठींहि असतील. नटव्यापेक्षाहि नायकिणींचा जमाव अधिक, त्यांचा उपयोग अधिक व त्यांजपासून आबालवृद्धांचे मनोरंजनहि अधिक. त्यांचे गायन कोणासहि कळण्याजोगे व त्यांचे नर्तन आनंद देण्याजोगें. राजदरबारांत सणवारी व विशेष प्रसंगी त्यांचे गायन व नृत्य व्हावयाचेच. देवालयांतून त्यांची हजेरीच असे. पेशवांईत नायकीणींच्या गायन–नर्तनांत जिवंतपणा होता, त्यास हल्लीप्रमाणें प्रेतकळा आलेली नव्हती. कारण त्या कलेची राजे–रजवाड्याकडून उपेक्षा न होता तिला हर एक प्रकारे प्रोत्साहन मिळत असे. त्याना कलेंत तरबेज करण्याकरितां कसे परिश्रम घेतले जात हें राघोबाचे पत्र वाचून लक्षांत येते. नायकिणींचा नृत्य व गायन

हा एकच उपयोग नसून त्याना राजेलोकापाशीं नाटकशाळा या नात्यानेंहि रहावे लागे. म्हणूनहि कदाचित् त्या संख्येनें पुष्कळ असतील. सदर प्रकार अनाचारांत मोडत असल्यानें गर्हणीय होय यांत शंका नाहीं. परंतु प्राचीनकाळच्या क्षत्रिय राजापासून एकदा रूढ झाल्यावर तो पेशवाई अखेरपर्यंत अवशिष्ट राहिला यांत नवल कसले ? नायकिणींचा व्यभिचाराशीं अशा रीतीनें संबंध येत असल्यामुळेंच त्यांजविषयी समाजाला अलीकडच्या काळांत तिटकारा आला. तथापि त्यामुळें नृत्यकला त्याज्य ठरते असें मात्र नाहीं.

एकट्या राघोबापाशीं नाटकशाळा होत्या एवढेंच नव्हे तर तो पेशव्यांचा कायमचा खर्चच होता असें माधवराव पेशव्याच्या वेळच्या हिशोबावरून दिसतें. कारण सन १७६८ मध्यें नाटक शाळांच्या मासिक खर्चाकरिता रु.७२१-१३-६ खर्ची पडले आहेत. (पे. द. २२) नाटकशाळांच्या मानाने गवई साहजिकच कमी असत. परस्थ गवयांचे गायन करून त्यांस बक्षिसे देण्यांत येत. पुण्यास प्राचीन प्रसिद्ध तानसेन गवयाच्या वंशातील कोणी गाणारा आला असता त्याचे गाणे राघोबाने केलें. त्यासमयीं दशांग व अत्तर-गुलाब लागला त्याचा खर्च नमूद आहे. (पे. द. २२). सन १७७२ त सातान्याहून रामराजे पुण्यास आले होते. त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी झाली त्यासमयीं नाच करण्यांत आला. त्यांत चंदा नाइकीण, आनंदी सुपेकर, गुलाब पुणेकर, मिरा पालकर, अना सातारकर अशा तेरा नायकिणीनी हजेरी दिली. (पे. द. २२)

पेशव्यांच्या वाड्यांत गणेशोत्सव थाटाने होत असे तो १७७४ सालीं कशा प्रकारे साजरा करावा याविषयीं नानांफडणविसानी नारो आप्पाजी खाजगीवाले यांस पत्र लिहिले होते ते पुढीलप्रमाणें, ‘ विनंति उपरी. पत्र पाठविले ते पावले. गणपतिउत्साहाचीं याद पावली. अनुष्ठानाचे एकवीस ब्राह्मण चार दिवस लावणें. कलावंताचे ताफे चांगले पाच सात व हरदास जुने बहुता दिवसांचे सात आठ दहापर्यंत असतील तर तितके याकरवी उच्छाव करणे. सालाबादप्रमाणें इतक्यास बिदागी करणें. विशेष कांही करावयाचे नाहीं.’ (पे. द. ३२) या वर्षी नाना पुरंदरावर सवाई माधवरावापाशी असून राजकारण चिंताजनक असल्यानें नानाने उत्सव थोडक्यांत आटोपण्याचा इषारा दिलेला दिसतो. त्याकाळीं नायकिणीचे नृत्य-गायन ही करमणूक मनोरंजक असून सद्यःकाळांतील तिची उणीव दुसऱ्या कोणत्याहि करमणुकीनें भरून निघणार नाहीं.

नानाचेंहि लक्ष परप्रांतांतील कलावंतावर असून ते हरप्रयत्नानें हस्तगत करण्याविषयीं नानानें ठिकठिकाणच्या वकिलांना एकदांच कळवून ठेवले असावे. निजामाच्या दरबारी गोविंदराव काळे हा पेशव्यांचा इभ्रतदार वकील होता. त्याचे नानास पुढीलप्रमाणे पत्र आले. ' चंद्री कळवंतीण सांप्रत गाण्यांत, नाचण्यांत, सुरतींत, हावभाव बतावर्णीत, येथें सर्व दौलतदारांचे पसंतीत आहे. आमच्या मनांत तिला पुण्यांत आणावी असे आहे. परंतु रावरंभा तिला दरमहा दोन हजार रुपये देतात. आमचे मते एक हजार रुपये देऊन येत असल्यास आणावी. येविशी आज्ञा व्हावी. ' सदर पत्रांत गोविंदरावानें एका होतकरू गवयाचीहि शिफारस करून ठेवली ती अशीः–' प्रयागचा गवयाचा पोर एक नवा आला आहे. त्याजबराबर सरंजाम गाण्याचा चांगला, पसंद पडावयाजोगा. दरमहा तीनशे रुपये पुण्यास येण्यासाठीं मागतो. स्वामी म्हणतील तीनशे रुपये भारी. त्यास सरंजाम तसाच आहे. पुण्यास आल्यावरी मर्जीस येईल तितके दिवस ठेवून घेऊन पुढें निरोप देतां येईल. हजार बाराशे रुपये खर्च दो-चौ महिन्याचा पडला तरी तितक्यांत गुणमहात्म्य ध्यानांत येईल. ' (इ. सं.)

त्या काळीं पैशाला किंमत फार होती. असें असतांहि गुणगौरवार्थ पैसा पाण्यासारखा खर्च करण्यास मुत्सद्दी माघार घेत नसत हें पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाहीं. एक हजार रुपये दरमहा देऊन नायकीण आणावयाची व तीनशे रुपयावर गवई आणावयाचा अशी शिफारस करणारा गोविंदराव गायन-नर्तनकलेचा उत्तम ज्ञाता होता याविषयीं शंका कसली ? नायकणीच्या अंगच्या गुणांचे गोविंदरावानें वर्णन केले ते अत्यंत मार्मिक आहे. ' नायकिण कशी पाहिजे, तर गायन-नर्तनांत पटाईत असून ती सुंदर असावी व तिला अंगविक्षेपहि नाजूक करतां आले पाहिजेत. ' चंद्री या गुणानीं मंडित असल्यामुळेंच गोविंदराव तिजवर इतका भाळला.

सवाई माधवरावाच्या वेळीं पेशवे दरबारात भवाई गुजराथी व व्यंकट नरसी हे दोन मोठे गवई होते. शिमग्याच्या सणांत शनिवारवाड्यांत नायकिणी, नटवे व नाचे पोरे आणून त्यांचे खेळ करून घेतले जात. सन १७८६ त रंगपंचमी आली. तेव्हां ' तिसरा प्रहरा पंचमीचा रंग केला. मजलस गणपतीचे दिवाणखान्यांत केली. कलावंतिणीचे दोन ताफे होते. चार घटिका नाच होऊन मग रंगास प्रारंभ केला. श्रीमंतानी आपले हाते चिळकांडीनें कार्याकारण यांचे

अंगावर घातला. तदनंतर रंगाची व गुलालाची रेल झाली. अंग व पोशाख भिजून चिंव झाली. येथपर्यंत रंग खेळले. मग उठोन संध्येस गेले. रात्रीं खेळ करावयास सांगितले. भोजन करून दोन घटिका रात्रीं चापेखणांत येऊन फडी बसले....खेळ डफगाणे व पोरांचा नाच, गोविंदाची सोंगे झालीं. पांचच दिवस खेळ झाला. त्यांत दिवसां रंग रात्रीं फडगाणे, पोरे नाचणारे, गोविंदा राणू सोंगाडे असा कार्यक्रम होता. पोऱ्यांत चांगला नाचणारा एक सासवडचा व दुसरा जंगमाचा होता. सोंगात भवानीपंतापैकीं दोन सोंगें, एक दाईचे व दुसरे मोगलाचे. गोविंदापैकीं एक सोंग गणपतीचे व दुसरे मुरळीचे. राणूपैकीं तपकिरीची नक्कल याप्रमाणें तमाशा झाला. सुप्याचा लक्ष्मण गुरव दशावतारी खेळ करी'. (इं. सं.)

वरील करमणुकीस नांव तमाशा दिले आहे. पण त्यांत अर्वाचीन गद्य व संगीत नाटकांची सर्व बीजे सांपडतात. फक्त कथानक व एकसूत्रता कमी. नाहींपेक्षां त्या सर्वांचे एक उत्कृष्ट नाटकच व्हावयाचे. बाकी खुद्द संगीत अगर गद्य नाटकांचा उल्लेख वरील वर्णनांत आला नसला तरी दशावतारी व कर्नाटकी खेळ पेशवाईत होत असत हें निर्विवाद आहे. रामदासांच्या काळांत दशावतारी खेळ होत होते तर ते पेशवाईत होत असल्यास नवल कसले? पेशव्यांचे खाजगीवाले यांनीं दशावतारी खेळ आपल्या घरीं करवून तो करणारास पांच रुपये इनाम दिले व कर्नाटकी भोवऱ्यास दीड रुपया दिला, असा उल्लेख आहे. शिमग्यामध्यें थोरामोठ्यांनीं तमाशा करवून पोरे नाचविण्यात अशिष्टपणा मानला जात नव्हता, हें शनिवारवाड्यांतील नाच्या पोऱ्याच्या हकीकतीत स्पष्ट झालेच आहे. खासगीवाले यांनींहि शिमग्यात आपल्या बागेत पोरगा नाचवून त्यास बिदागीदाखल शिरपाव, तिवट व सहा रुपये दिल्याचे आढळते (ना. गो. चापेकर भा. इ. सं. मंडळाचे त्रैमासिक).

दुसरा बाजीराव बापसे बेटा सवाई. त्यानें ललिक कलेच्या शोकाखातर पुष्कळ द्रव्य खर्च केले. त्याच्या आज्ञेवरून नवे नवे उत्सव सुरू होऊन त्यांत गुणिजनांचा परामर्श घेण्यांत येऊं लागला. 'श्रीव्यंकटेशाचे उत्सवांत रामचंद्र गोसावी याजकडून ललित करविले. त्याबद्दल त्यास पोशाख सनगे दिली.' (पे. द. सन १८०६) त्यानंतर दोन वर्षांनीं त्रिंबक आत्माराम गवई यांस १२९२ रु.

दिल्याचा दाखला सांपडतो. (पे. द. सन १८०८) बाजीरावानें आपल्या पदरी देवीदास सारंगवाला ठेवला होता त्याला दरमहा ८० रु. व दावलखान गवई यास १४० रु. रोजमुरा मिळत होता.

प्रकरण अकरावें

ज्योतिष

विद्येच्या अभिवृद्धीस पेशव्याकडून उत्तेजन मिळत होते तरी निरनिराळ्या शास्त्रांतील विद्वानांनी आपली शोधक बुद्धि एखाद्या विषयांत नवीन शोधाची भर घालून अगर आपल्या अनुभवाप्रमाणें नवीन ग्रंथ रचून दाखविल्याचे आढळून येत नाहीं. यादवांच्या काळांत यादवांच्या आश्रयानें अनेक विद्वान् लोक निपजले व त्यांनीं ज्योतिष, संगीत, वेदान्त, धर्मशास्त्र, व्याकरण, वैद्यक इत्यादि विषयावर नावाजण्याजोगे ग्रंथ लिहिले. यावरून तत्कालीन विद्वानांनीं बुद्धीचा स्वतंत्रपणा, शोधकपणा व विषयांतील पारंगतता हीं संपादन केली, तशी पेशवेकालीन विद्वानांनीं संपादिली नाहीं, फक्त उपलब्ध ग्रंथांतलि ज्ञान तेवढेच आत्मसात् केले असेंच म्हणावे लागते. यादव काळातील भास्कराचार्य हे एक विद्वद्रत्न होय. त्यांची संशोधनासंबंधाची कीर्ति अद्यापिहि गाजत आहे. त्यांनीं सिद्धान्तशिरोमणि, करणकुतूहल, लिलावती या नांवांचे ज्योतिष व गणितविषयक सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिले. भास्कराचार्यांचा नातू चांगदेव यानें खानदेशांत पाटण येथें एक ज्योतिषविद्यालयहि सुरू केले होते. शार्ङ्गधरानें संगीतशास्त्रावर संगीत रत्नाकर हा ग्रंथ रचिला. जल्हण याची 'सूक्तिमुक्तावली' व बोपदेव याचा 'सिद्ध मंत्र प्रकाश' प्रसिद्ध आहे. भास्कराचार्यांच्या योग्यतेचा दुसरा मोठा तत्कालीन पंडित हेमाद्रि. त्याचे चतुर्वर्गचिंतामणी, आयुर्वेदरसायन इत्यादि हे ग्रंथ कमी योग्यतेचे नाहींत. हे विविध शास्त्रावरलि ग्रंथ संस्कृतात लिहिलेले आहेत. पेशवेकाळात अशी ग्रंथरचना संस्कृतात तर नाहींच, पण मराठीतहि झाली नाहीं. यावरून अर्वाचीन महाराष्ट्रीय विद्वान् यादवकालीन विद्वानांपेक्षां मागासलेले व कमी योग्यतेचे होते असेच म्हणणे भाग पडते.

नुसत्या ज्योतिषशास्त्रापुरता विचार केला तरी पेशवाईत दुर्बिणीसारखे नवीन साधन उपलब्ध झाले होते. परंतु त्याचे महत्त्व संशोधनाच्या दृष्टीनें ज्योतिष्यांना कळले नसावे असें वाटते. पेशवाईत ज्योतिषाचा अभ्यास जुने शास्त्र टिकविण्यापुरता, पंचांग रचण्यापुरता व ग्रहांचीं फले समजून घेण्यापुर-

ताच चालू होता. फलज्योतिषाची गरज प्रत्येक लहानमोठ्या माणसास असे. पेशवे व त्यांचे सरदार प्रयाणास, गृहप्रवेशास, मोहिमांस व कोणा थोरामोठ्याची भेट घ्यावयाची तर त्यासहि मुहूर्त पहात असत. त्यासाठीं लवकर मुहूर्त सांपडत नसल्यास ते आपली महत्त्वाची कामेहि खोळंबून ठेवीत.

नानासाहेब पेशव्याच्या पदरीं पांडुरंग जोशी हा ज्योतिषी होता. त्यानें नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे यास प्रयाणाचा मुहूर्त कळविला.

'श्रीमंत राजश्री नाना यांस आशीर्वाद
श्रीमंत राजश्री भाऊ याप्रति

आश्रितांतःपाती पांडुरंग जोशी कृतानेक आशीर्वाद विशेष. श्रीस यावयाचे होते परंतु मजल लांब याकरितां येणें न झाले. ऐशियास श्रीस अभिषेकादिक सर्व लिहिल्याप्रमाणें करवितो. आपण मुहूर्ताविशी लिहिले त्यास उदईक उत्तमच आहे. परंतु चंद्रबळ नाहीं व तारांबळहि नाहीं. यास्तव सर्वथैव जावयास कामास नये. प्रतिपदेस शनिवारी अश्विनीवर उभयतासहि चंद्रबळ, ताराबळ आहे. मुहूर्ताचा प्रकार येणेप्रमाणें आहे. या उपर जसे आपले विचारास येईल तसे करावे. कालिंगणे (कलिंगड) दोन पाठविली आहेत ती घ्यावी. श्रीदर्शन करून जावे हें उत्तम आहे. बहुत काय लिहिणें? कृपावृद्धि असो द्यावी हे विनंति. चैत्र वद्य १२ प्रहर ४' (पे. द.).

ता. ३१।३।१७५२ इसवी.

मोहिमाकरितां ज्योतिष्याने मुहूर्त काढून दिला व मोहिमेंत फत्ते झाली म्हणजे ज्योतिष्याला इनामें देण्यांत येई. सन १७६० सालीं भाऊसाहेब पेशवे याने उदगीर येथें निजामाशी लढून त्याचा मोड केला. त्या मोहिमेचा मुहूर्त गोविंद दीक्षित पाटणकर याने काढून दिल्यावरून त्यास पांच हजार रुपये उत्पन्नाचा गांव पेशव्यांनीं इनाम करून दिला. (पे. डा.)

थोरले माधवराव पेशवे हेहि त्या काळांतील सर्व लहान थोर लोकांच्या परिपाठास अनुसरून कोणतेहि विशेष कृत्य मुहूर्त पाहूनच करीत. त्यांनीं खालील पत्र नानाफडणविसास लिहिले आहे. 'बृहस्पतिवारी सायंकाळीं दोन घटिका दिवस शेष राहाता मुहूर्त तुम्हांस लिहून पाठविला आहे. परंतु त्यास दोष आहे. यास्तव बुधवारी पहाटेस सहा घटिका रात्रीचा बृहस्पतिवार तोच चांगला

यास्तव तोच मुहूर्त करार जाहाला. उदईक संगमावर (मुळामुठेच्या) मुक्काम होईल. पर्वतीस भोजनाचे सायंकाळचे साहित्य व निद्रेचे तेथेंच करणें. वरकड दाणावैरणीचे साहित्य संगमावर करणें ’ (पे. द. ३२) माधवराव पुण्याहून सन १७६९ त हैदराच्या मोहिमेवर निघणार होता त्याचा मुहूर्त व प्रस्थानाची जागा या पत्रीं नमूद आहे.

इतर सर्व मोठ्या लोकांप्रमाणें नानाफडणविसास देखील ज्योतिषाचा नाद होता. तो हिंदुस्थानांतील प्रसिद्ध ज्योतिष्यांपासून वर्षफले मागवून आपल्या संग्रही ठेवी. ‘जोधपुरास मुरलीधर जोशी नांवाचा ज्योतिषी होता. त्याजकडून आलेली वर्षफळे नानाच्या संग्रही बरीच होती. ता. ८ जून १७८१ रोजीं नानाने मुकुंद जोशी यास कांहीं प्रश्न विचारले होते. त्यांचे टिपण त्याच्या स्वदस्तुरचे सापडले आहे. त्यांतील कांहीं प्रश्न व उत्तरें महत्त्वाचीं वाटल्यावरून खाली दिली आहेत.

प्रश्न–इंग्रजांचा तह कधीं होईल ? आमचा मुलूख आमचे किल्ले आम्हांस येतील कधीं ?

उत्तर–पुढील वर्षीं.

प्र.–भोसले आम्हासी कसे करतील ?

उ.–इष्टत्व.

प्र.–श्रीमंतांचे लग्न कधीं होईल ?

प्र.–हैदरखान पैका यश कधीं देईल ?

उ.–माघमासी देईल.

प्र.–निजाम अल्लीखान आम्हासी कसे चालतील ?

उ.–कुरकुर चैत्र पावेंतो.

प्र.–शिंद्यांचे येणे देशी होईल कीं नाहीं ?

उ.–या वर्षांत येणे होत नाहीं.

(इ. सं.)

नानाला स्वतःच्या प्रपंचाची फिकीर फारशी वाटत नसून सगळा ध्यास स्वराज्यरक्षणाचाच त्यास कसा लागून राहिला होता, त्याची वरील प्रश्नोत्तरें हा प्रत्यक्ष पुरावाच होय.

हल्लींप्रमाणें तेव्हाहि अधिक मास, तिथिनिश्चय व संवत्सर यासंबंधानें वाद उत्पन्न होत. पण राजसत्ताच हिंदुधर्मीय असल्यामुळें या कामीं पुढाकार सरकारच घेत असे व अधिकारी लोकांकडून त्यांचा निर्णय देववीत असे. नाना-फडणविसाने ता. १२-३-१७७२ रोजीं अशा एका प्रसंगी पंडित व ज्योतिषी यांची सभा सरकारवाड्यांत भरविली. तिची हकीकत अशी, 'शके १३९३ फाल्गुनमासी गुरु कुंभराशिगत होतो. शके पंचाण्णवामध्यें गुरूचा राशिभेद होत नाहीं. त्यास या वर्षाचे नांव काय? या वर्षी शुभकार्यादिक कर्तव्याकर्तव्यविचार पंडित व ज्योतिषी मिळवून निर्णय करून वाक्यसहित सविस्तर लिहून पाठविणे म्हणून आज्ञा.' त्यावरून सरकारचे वाड्यात पंडित व ज्योतिषी यांची सभा केली. त्यांनीं विचार करून निर्णयपत्र ठरविले. तेच बजिन्नस स्वामिकडे [नाना] रवाना केले आहे त्याजपासून निवेदन होईल. सारांश अर्थ पहातां या वर्षाचे नांव लुप्त संवत्सर नव्हे. अधिवत्सर आर्यसिद्धान्त, सूर्यसिद्धान्त, ब्रह्मसिद्धांत या ग्रंथावरून येत नाहीं. परंतु ग्रहलाघवाचे स्फुटगतीनें मात्र अधिवत्सर येतो. त्यास येविशीचा निषेध, नर्मदोत्तर देशी. दक्षिणदेशी विवाहादिक मांगल्यकार्यें केल्यास प्रत्यवाय नाहीं.' [पे. द. ४३].

नाना फडणविसानें कोपारगांवास आनंदीबाईपाशी गोविंद कृष्ण गोड-बोले, आप्पाजीराम सहस्रबुद्धे, कृष्णाजी जनार्दन प्रभृतींना ठेवले होते. देवपूजेसाठीं ब्राह्मण शागीर्द, स्वयंपाकासाठीं आचारीपाणके, पोथी-पुस्तक वाचण्यासाठीं पुराणिक, शास्त्री, वैदिक मुलांच्या विद्येसाठीं शिक्षक, सेवेसाठीं हुजरे व कुणबिणी आणि संरक्षणासाठीं स्वारशिबंदी असा लवाजमा होता. राघोबास दरमहा दहाहजार रुपये करार केले होते. त्याच तनख्यांतून वरील खर्च चालू होता हें उघड आहे. वर सांगितलेल्या परिवारांत धोंडजोशी नांवाचा एक आश्रित असून त्याचे काम तिथिपर्व सांगणें, मुहूर्त काढणें व पेशवेकुळांतील स्त्रीपुरुषांच्या पत्रिका पाहून त्यांची फले वर्तविणें हे असे. आनंदीबाई ही दुःखीकष्टी स्त्री. नवरा मेल्यापासून एकंदर कुटुंबाची काळजी वहाण्याचे काम एकट्या तिजवरच पडले होते. नानाने तिच्या योग्यतेस शोभेल अशा रीतीनेंच इतमाम ठेवला असला तरी तिच्या प्रत्येक हालचालीवर तेथील कारभाऱ्यांची कडक नजर असून कोपरगांवांतलि खडान्-खडा वृत्तान्त व बाईचे एकूणएक उद्गार लिहून त्यानी नानाकडे पत्रानें कळवावे

लागत असत. यामुळें तो तिला कारागृहवासच वाटावा यांत नवल नाहीं. त्या आयुष्यक्रमाला ती इतकी कंटाळून गेली की त्या काचांतून केव्हां सुट्ट असे तिला झालें होते. स्वतःच्या सुटकेसाठीं तिचे इतर काय प्रयत्न चालले असतील ते वेगळे. परंतु त्या प्रयत्नास केव्हां यश येणार हें आगाऊ अंदाजाने कळण्याचा तिच्या मते ज्योतिष हा एकच मार्ग होय. बाईला एक दत्तकपुत्र अमृतराव आणि औरसपुत्र बाजीराव व चिमणाजी आप्पा हे असून त्यांच्या भवितव्याची जिज्ञासा तिला होतीच. दत्तक व औरसपुत्र यांचे बनेल कीं नाहीं, बाजीरावाला पेशव्याची गादी मिळण्याचा योग आहे कीं नाहीं हें तिला समजून घ्यावयाचेच होते. हीं झाली महत्त्वाची राजकारणें. त्याशिवाय पदरी ज्योतिषी असलाच म्हणजे क्षुल्लक निमित्तावरूनहि पुढचे जाणण्याचा चाळा मनुष्याला लागतो. म्हणून बाईनें धोंडजोशास वेळोवेळीं विचारलेले प्रश्न कोणासहि मनोरंजक वाटणारेच आहेत. हे प्रश्न सन १७८७।८८ साली विचारण्यांत आले. आपली जन्मपत्रिका धोंडजोशास दाखवून बाई त्यास वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळी माहिती विचारीत असे. एकदां तिनें त्यांस ‘ जन्मपत्रिका पाहून आपल्या अंतकाळी योग कसे आहेत ते पहावयास सांगितले. ‘ बाईस जन्मकाळीं शुक्र आठवा आहे. त्याचे फळ शत्रु असावा आणि त्याचे पारिपत्यहि व्हावे असे आहे. ’ असें धोंडजोशानें वर्तविले. आनंदीबाईचा जन्म गुहागर येथें सन १७४७ त झाला. तिचे लग्न रघुनाथरावाशी सन १७५५ त लागले. सन १७८७ त ती ४० वर्षांची म्हणजे अगदीं तरणी होती. तोपर्यंत नवरा मरून अवघी चारच वर्षे झाली होती. नवरा मेला होता तरी ती स्वतः वयाने तरुण असल्यामुळें जगाला कशी कंटाळली नव्हती हें पुढील हकीकतविरून कळून येते. त्या वर्षी आश्विनमासीं तिला एकेचाळीसावे वर्ष लागले. जोशीबुवास तिनें पुढील वर्षफल विचारले, तेव्हां त्यानें सांगितले ‘ पुढें अकरा महिन्यांनीं भाद्रपदमासी सूर्याची दशा साडेचार महिने आहे. त्यामध्यें शरीरास दुखणे फार व्हावे; कठिण अवस्था व्हावी; क्लेश असावे, अपमृत्युस्थान आहे.’ जोशापासून इतके कळल्यावर बाईनें अपमृत्यु टाळण्याकरितां ‘ श्रीसूर्याप्रीत्यर्थ अर्घ्यप्रदानास ब्राह्मण लावावयासी उपाध्येबुवाजवळ सांगितलें. ’

पत्रिकेवरून आपणास शत्रु आहेत पण त्यांचे पारिपत्यहि होण्यासारखे आहे इतके बाईस समजले. अर्थात् तिचा शत्रु नाना, हे कैदेने स्पष्ट केलेच होते.

याहि गोष्टीचा पडताळा तिने अमृतरावाची पत्रिका दाखवून पाहिला. त्याची शरीरप्रकृति एकदा ठीक नव्हती म्हणून त्याची पत्रिका दाखविता त्याला आयुष्य ६५ वर्षेपर्यंत असल्याविषयीं तिने खात्री करून घेतली. त्यानंतर इतर योग. ते पाहिले तेव्हां कळले कीं, ' अमृतरावास सहावे स्थानी बुध आहे. त्याचे फल वंशशत्रु असावा असे आहे. ग्रह उंच उंच आहेत. परंतु कांहीं वेध आहेत.' यावरूनहि राघोबाच्या वेळेपासून हात धुवून मागे लागलेला नाना हाच आपला वंशशत्रु अशी बाईची समजूत झाली असली पाहिजे. सर्वांत महत्त्व बाजीरावाच्या पत्रिकेस. ' त्या पत्रिकेंत आहे कीं याजवळ वडिलांचे वेळेचे कांहीं राहू नये. परंतु येथें (कोपरगांवात) त्यांचेच आहे. नवे कोणी दिल्हे नाहीं. पाहिले मात्र घेऊन गेले ' असें आनंदीबाई एकदां बोलली. आनंदीबाई शहाणीच होती. ती सर्वांच्या पत्रिका दाखवून नेहमीं विचक्षणा करीत होती तरी पत्रिकेवरून जे जे वर्तविण्यांत येते ते ते सर्व खरे ठरते असा तिचा अनुभव नव्हता. उलटपक्षी तिचे मत असें बनले होते कीं, ' चांगले ग्रह असले तर त्यांचे फळ येत नाहीं, वाईट आहेत त्यांचे फल येते.' (पे. द. ४). हे तिचे मत बाजीरावाच्या बाबतींत तरी खरे ठरले यांत शंका नाहीं. कारण बाजीरावाने पेशवाई बोळविली त्यावेळीं त्याजपाशी ' वडिलांचे वेळेचे कांहीं राहू नये ' हे भविष्य निर्विवाद अनुभवास आले. आनंदीबाई सन १७९२ पर्यंत म्हणजे राघोबाच्या पश्चात् सुमारें दहा वर्षें कोपरगांवासच रहात होती. कोपरगांवांहून त्या वर्षाच्या आश्विनमासीं ती आपल्या मुलाबाळासह आनंदवल्लीस जाऊन राहिली. तेथें ती ता. २७ मार्च १७९४ रोजीं मरण पावली.

प्रकरण बारावें

मूर्तिकला व चित्रकला

हिंदू लोक मूर्तिपूजक असल्यामुळें त्यांजकडून मूर्तिकलेस पुष्कळच उत्तेजन मिळालें. त्यानीं कोरलेली व बांधलेली हजारो देवालयें साऱ्या हिंदुस्थानभर पसरली आहेत. त्या देवळांतून त्यांनीं उत्कृष्ट प्रकारच्या मूर्ती बसविल्या आहेतच. पण त्याखेरीज देवालयांचा अलंकार म्हणून एकएका देवळाच्या प्राकारांत भिंतींवर व शिखरावर अगणित मूर्ती घडवून ठेवल्या आहेत. तसेच त्यांचे पुतळेहि अवाढव्य आहेत. अवाढव्यांत अवाढव्य मूर्ती घडवून त्यांनीं आपली भव्यपणाची हौस फेडून घेतली व अगदीं लहानांत लहान मूर्ति बनवून आपलें कसब पराकाष्ठेस पोचविलें. या बाबतींत जैन, बौद्ध, शैव, वैष्णव, लिंगायत इत्यादिकांनीं काश्मिरापासून रामेश्वरापर्यंत आणि काबूल-कंदाहारापासून ब्रह्मदेशाच्या सरहद्दीपर्यंत जी कामगिरी बजावली आहे ती प्रशंसनीय होय. महाराष्ट्रांत रामेश्वर, कुंभकोण, मदुरा, त्रिचनापल्ली येथील द्राविड पद्धतीच्या देवळांएवढीं देवळे किंवा मूर्तींसारख्या मूर्ती पहावयास सांपडणार नाहींत किंवा चालुक्यपद्धतीच्या देवळांमधील लहान मूर्तींतलि नैपुण्य आढळणार नाहीं, अथवा बंगाल्यांतील डाक्का जिल्ह्यात असलेला तांडव करणारा शिव किंवा अर्धनारीनटेश्वर यांत प्रगट झालेलीं कलाहि दृष्टीस पडणार नाहीं. या मूर्तिकलेंत महाराष्ट्र अगदींच मागासलेला आहे. हिंदुस्थानांतील मूर्तिपूजेस सुरुवात इसवी सनाच्या अजमासे पाचव्या शतकांत झाली. व तिचा उत्कर्ष बाराव्या–तेराव्या शतकापर्यंत टिकला. पुढें मुसलमानी सत्तेची लाट सर्वत्र चढत जाऊन जेथे जेथे ती पोंचली तेथे तेथे मूर्तिकला नाश पावली. सहाव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रावर चालुक्य राजांचा अंमल असून त्यांची राजधानी बदामी होती. बदामी हें शहर कर्नाटकांतील. त्यांच्यानंतर इ. स. ७५३ पासून ९७३ पर्यंत राष्ट्रकूटानी राज्य केले. त्यांची राजधानी मालखेडास होती. मालखेड हेहि शहर कर्नाटकांतील. राष्ट्रकूटामागून फिरून दुसरे चालुक्य आले. ते

९७३ पासून ११८९ पर्यंत सत्ताधारी होते. त्यांची राजधानी बेदरजवळची कल्याणी. हीहि कल्याणी कर्नाटकांतलिच. पुढें ११९० त चालुक्याना यादवानीं जिंकले व यादव राजानीं देवगिरी हीच आपली राजधानी बनाविली. देवगिरी खास महाराष्ट्रांत असल्यामुळें यादव हेच खरे महाराष्ट्रिय राजे होते. त्यांच्यापूर्वीचे सर्व राजे कर्नाटकांत रहाणारे होते. या कारणानें कर्नाटकांत बदामी, मालखेड, कल्याणी हीं शहरे भरभराटीस येऊन तेथील शिल्पकलेस सहजच राजाश्रय लाभला. म्हणूनच तिकडील बांधकामाबरोबरच मूर्तिकला नांवारूपास आली. महाराष्ट्रांत यादवापूर्वी ठाणे, कोल्हापूर इत्यादि प्रदेशांत शिलाहरांचे राज्य होते. त्यांच्या काळांत कांहीं मंदिरे बांधली गेली. पण त्यांचे बांधकाम व त्यांतील मूर्तींची घडण वाखाणण्याजोगी नव्हती. याचे कारण कदाचित् हा प्रदेश डोंगराळ व असमृद्ध असल्यामुळें त्याजवरील राजेहि निर्धन व साधनशून्य असतील हें असावे. त्यांच्यापेक्षां यादवांचे राज्य मोठे व संपन्न असले तरी ते फार दिवस न टिकल्यानें त्याचाहि फायदा कलेला मिळावा तितका मिळालेला दिसत नाही. त्यांचे राज्य अल्लाउद्दिन खिलजीचा सरदार मलिक काफर यानें इ. स. १३१२ त बुडविले त्याबरोबर सारेंच संपले.

यादवापूर्वी जी परकीय राज्यें महाराष्ट्रावर होती त्यांच्या ताब्यांत महाराष्ट्रांतल्यासारखे कणखर डोंगर इतरत्र नव्हते. म्हणून लेणी कोरण्याची अचाट कामे महाराष्ट्रांतच झाली. महाराष्ट्रीय डोंगरांचा कणखरपणा इतका प्रखर आहे कीं, हिंदुस्थानांतील कोरीव लेण्यापैकीं ९० टक्के कोरीव लेणी एकट्या महाराष्टांतच आढळतात. हिंदुस्थानांतील वास्तुशिल्पाचा प्रारंभ कोरीव लेण्यापासूनच झाला असे म्हणतात. ही कोरीव लेणी बौद्ध व जैन यानी मुख्यतः कोरलेली दिसतात. महाराष्ट्रांतील कोरीव लेण्यांत भाजे, नाशिक, कार्ले, जुन्नर, अजंठा, वेरूळ कान्हेरी येथील लेणी प्रसिद्ध होत. यांपैकीं भाजे व नाशिक येथील लेणी इसवी सनापूर्वीची आहेत. भाजाचे लेणे इ.स. पूर्वी १५०–२०० वर्षे व नाशीकचे लेणे इ. स. पूर्वी ७८ वर्षे कोरले गेले. सर्व लेण्यांत अजंठा व वेरूळ या ठिकाणची लेणी शिल्प व विस्तार या दोन्ही गुणांत अत्यंत प्रख्यात आहेत. ही लेणी इ. स. ५०० च्या सुमारास कोरण्यांत आली असावी असा तर्क आहे. बदामी येथील चालुक्य राजांच्या कारकीर्दीतच या लेण्यांची रचना झाली असून त्यांचे काम द्रविडी घाटाचे आहे. महाराष्ट्रांतील शिल्पकलेचा उत्कर्ष कोठें आढळत असेल

तर तो या लेण्यांमध्येंच. त्यांत शिल्पाचे बहुतेक प्रकार दृष्टीस पडतात. बौद्ध जैन व हिंदु या त्रिवर्गांनीं आपली करामत वेगवेगळी प्रकट केली आहे. दरवाजापासून शिखरापर्यंत, सभामंडपापासून गाभाऱ्यापर्यंत व पृष्ठभागापासून छतापर्यंत जेथें जेथें म्हणून कलाकुसरीस व अलंकृतीस अवसर सांपडला तेथें तेथें त्यांनीं त्यांचा भरपूर शिरकाव केला आहे. कोणताहि भाग साधा म्हणून राहूं द्यावयाचा नाहीं.' असा जणुकाय त्यांनीं विडाच उचलला होता. सभामंडप असो कीं गर्भागार असो ती दोन्ही त्यांनीं खांबानी गजबजून सोडली आहेत. खांबावर, छतावर, भूपृष्ठावर, भिंतीवर व शिखरावर त्यांनीं आपल्या कारागिरीनें चढविली नाही अशी सृष्टींतील एकहि प्रेक्षणीय वस्तु सहसा सुटलेली नाहीं. खांबावरून त्यांनीं तबकाकृति, चक्राकृति, सूर्याकृति व मनुष्याकृति इत्यादि सर्व प्रकारच्या आकृति काढल्या आहेत. त्यांत मधून मधून पानांची, फुलांची, फळांची व वेलांची गर्दी उसळवून दिली आहे. हत्ती, सिंह, वाघ, बैल, पोपट, मैना यांची भव्य, उग्र व मोहक रूपें त्यांनीं ठिकठिकाणीं उभी केली आहेत. मनुष्याकृति काढताना महाभारत व रामायण या आर्ष महाकाव्यांतील कथांच्या आश्रयाने रावणाचे वीस हात व दहा तोंडे दाखवून त्यांनीं आपल्या कारागिरीला अधिकच उठाव आणिला आहे. या मूर्ती काढल्या आहेत त्या विकारशून्य व निर्जीव दिसत नसून त्यांची ऐट व आविर्भाव जिवंत प्राण्यांची बरोबरी करणारा आहे. सृष्टि जशी भासते तशी ती जड मूर्तींत आढळली तरच कला खरोखर साधली. या दृष्टीनेंहि वेरूळ, अजंठा इत्यादि ठिकाणच्या लेण्यांतून उणेपणा मुळींच राहिलेला नाहीं. सारांश, वास्तुशास्त्र व मूर्तिकला या दोनहि बाबतींत लेण्यांचे कोरीव काम श्रेष्ठ प्रतीचे असल्यामुळें महाराष्ट्राला सदर लेणी भूषणभूत झाली आहेत हें कोणासहि कबूल करावे लागेल.

परंतु बांधीव मंदिरें व त्यांतील घडीव मूर्ती हा जो शिल्पकलेचा एक महत्त्वाचा प्रकार त्यांत महाराष्ट्रानें नांव मिळविलें नाहीं. पेशवाईंत देवळें बांधण्यांत आली त्यांचा उल्लेख मागील प्रकरणांत केलाच आहे. ती देवळें बांधताना व त्यांत बसविलेल्या मूर्ती घडविताना मराठ्यांनीं परप्रांतीयांचेच सर्वस्वी अनुकरण केलें. कलेची कामें केव्हांहि घाईनें साधत नसतात. त्याकरितां वर्षानुवर्ष खपावें, लाखों रुपये ओतावे, कसबी कारागीर शोधून आणावे व बांधकाम चालू असतां त्यांजकडे बिनघोरपणानें सतत लक्ष पुरवावें तेव्हांच जगानें विस्मयपूर्वक तोंडांत

बोट घालावे अशी कला दृष्टीसमोर उभी रहाते. तितकें स्वास्थ्य व द्रव्यबळ मराठ्यांना नव्हतें. या कारणानें त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत व दक्षिणेंत स्वारीवर असतां किंवा यात्रेच्या वेळीं जें शिल्प ठिकठिकाणीं पाहिले त्याच्या ढोबळ नकला महाराष्ट्रांत उठविल्या. जी स्थिति देवळांतल्या मूर्तींची तीच स्थिति देवघरांतल्या मूर्तींची. देवघरातल्या मूर्ती अर्थातच चिमुकल्या असतात व त्यांचे काम सोनार करतात. या मूर्ती तांबें, पितळ, सोनें, रुपें इत्यादि धातूंच्या बनवितात. त्यांची गरज प्रत्येक हिंदु कुटुंबास असल्यामुळें त्या कलेस पुष्कळच उत्तेजन मिळाले. पेशव्यांनीं या प्रकारच्या अनेक सुबक मूर्ती घडवून आपल्या देवघरांत पूजेकरितां ठेवल्या होत्या. पर्वतीच्या देवालयांत पार्वती व गणपति यांच्या सोन्याच्या मूर्ती बसविण्यांत आल्या. ज्या ज्या ठिकाणीं अशा मूर्ती उत्तम घडविण्यांत येत त्या त्या ठिकाणाहून पेशवे त्या आणवीत. कर्नाटक प्रांत पूर्वीपासूनच कलानिपुण. तंजावरांत व्यंकोजी भोसल्याची गादी. भोसल्यानी तंजावरास बांधलेली देवालयें कलेविषयीं प्रसिद्ध आहेत. सन १७६७ त तुळजाजी राजे चंदावरकर यास सोन्याचा गणपति तयार करून पाठवून देण्यास माधवराव पेशव्याने लिहिले होते. त्या मूर्तीस किंमत काय पडली हें कोठें उपलब्ध नाहीं. परंतु ज्या माणसाबरोबर तुळजाजीनें मूर्ती पाठविली त्यास १४० रु. इनाम दिल्याचे मात्र कागदोपत्री नमूद आहे. (पे. द. २२) इतर दरबाराकडून मौल्यवान् व नमुनेदार जिनसा अपूर्वाईने नजर म्हणून पेशव्याकडे येत असत. त्याप्रमाणें सन १७६८ मध्यें मुंबईकर इंग्रजांनीं कांहीं जिन्नस पेशव्यास नजर केले असतां त्यांत एक चांदीची गाय असून तिची किंमत ११॥ रु. होती. (पे. द. २२) गाय फार किंमतीची नव्हती हें स्पष्ट आहे. परंतु तिची घडण यथातथ्य असली पाहिजे. इतर दरबाराकडून जिनसा नजर येत त्यांच्या कारागिरीचे श्रेय पेशव्यांना नव्हतें व त्यापासून इकडील कारागिरीस प्रत्यक्ष उत्तेजन मिळत नव्हते. तथापि त्याचा अप्रत्यक्ष रीतीनें महाराष्ट्रीय कलेस फायदा होत असेलच. दुसरीकडून आलेल्या जिनसा इकडील कारागिरांच्या पहाण्यांत येऊन त्यांस आपले कसब वाढविण्यास प्रोत्साहन सहजच मिळावे व त्यांतील त्यांची प्रगति प्रसंगाप्रसंगानें कलेच्या पुरस्कर्त्यांना पहावयास सांपडावी. नानाफडणविसाने माधवराव पेशव्याला एकदां बागेंत मेजवानी केली. त्यासमयीं त्यानें पेशव्यास एक सोन्याचा चौफुला नजर केला. त्याची किंमत ७०५ रु. ५ आणे

होती. सदर चौफुला असा बनविला होता कीं, त्यांत चार आंब्यांचा घड दिसावा. (पे. द. २२) शेख हुसेन याने एक मेणाचे फुलझाड बनविले त्यास माधवराव पेशव्यांने एक तिवट बक्षिस दिला. त्याकाळीं गोकाकच्या मृण्मय चित्रांचीं हल्लींप्रमाणेंच ख्याति होती. त्यांचा स्वतंत्र संग्रहच शनिवारवाड्यांतील एका दिवाणखान्यांत करून त्यास गोकाक दिवाणखाना असें नांव देण्यांत आले होते.

परंतु इतकीहि प्रगति चित्रकलेंत झाली नव्हती. विशिष्ट व्यक्तींचे चित्र काढणें किंवा मूर्ति घडविणे अवघडच. परंतु व्यक्तीचे वैशिष्टय वगळले म्हणजे चित्र अगर मूर्ती सुंदर बनविण्याची एकच जोखीम कारागिरावर राहते. मूर्तिकलेपेक्षा चित्रकला कांहीं बाबतींत बिकट आहे. एकटे एक चित्र कोणी काढलि. पण अनेक व्यक्तिसमूह व वस्तुसमूह एकाच कागदावर अगर भिंतीवर रंगविताना चित्रकाराला कित्येक संधाने संभाळावी लागतात. व्यक्तिसमुह व वस्तुसमूह ज्यावर चितारावयाचे ते स्थळ मर्यादित असून त्या स्थळाच्या मर्यादित जागेंत व्यक्तिव्यक्तीमधील अंतर व त्या अंतरास अनुरूप अशी रुंदी व उंची कारागिरास चित्रकलेचे शास्त्रीय ज्ञान असल्यावांचून बिनचूक दाखविता येणार नाहीं. मूर्ती देवादिकांच्या असतात तेव्हां त्यांना न पाहिलेले सारे लोक केवळ सुबकपणाचीच अपेक्षा करितात. परंतु देवादिकांच्या ऐवजी जिवंत माणसांचे पुतळे एखादा कारागीर घडवितो तेव्हाच त्याच्या गुणाची खरी परीक्षा होते.

परंतु पूर्वकाळी हिंदुस्थानांत मनुष्यांचे पुतळे घडविण्याची रीत बंद पडली तेव्हां मूर्तिकारांचे काम सोपें झाले. चित्रेहि जोंपर्यंत देवादिकांचीच असत तोपर्यंत ती काढण्यास फारसे शास्त्रीय ज्ञान लागत नव्हते. पण देवादिकाप्रमाणें माणसांचीहि चित्रे रंगविण्याचा क्रम सुरू झाला तेव्हांपासून चित्रकलेंतील बिकटपणा वाढला. महाराष्ट्रांतील अत्यंत प्राचीन चित्रे अजिंठ्याची होत. तेथे चित्रे अनेक आहेत व ती अनेक चित्रकारानी भिन्नभिन्न काळीं काढलेली आहेत. तेथलि सर्वांत जुनी चित्रे सुमारे तेराशे वर्षांपूर्वी रंगविण्यांत आली. ती सर्व भिंतीवर व छतावरच आहेत. इतकी जुनी चित्रे हिंदुस्थानात इतरत्र कोठे नाहींत असें म्हणतात. त्यानंतर चित्रकलेची प्रगति मोगल बादशहांच्या आमदानीपर्यंत झालेली आढळत नाहीं. मोगलपूर्वी रजपूत राजांच्या राजधान्यातून ही कला फक्त जीव धरून होती. मोगल बादशहांत अकबराच्या कारकीर्दींत चित्रकलेला

राजाश्रय मिळाला. त्याच्या दरबारी इराणासारख्या दूर देशाचेहि चितारी होते. सदर चित्रकारापैकीं ऐने अकबरींत फरूक, शिराजचा अबदुल सामद, ताब्रीजचा मीर सयद अल्ली यांची नांवे आढळतात. जहांगिरच्या काळांत समरकंदचे चितारीहि आले होते. हे परकीय चित्रकार व हिंदु चित्रकार या उभयताना राजाश्रय होता आणि ते उभयता एकत्रच काम करीत असत. यामुळें उभयकलमांचे मीलन होऊन मोगल चित्रकला अवतरली. रजपूत चित्रकार बहुधा पूर्वकालीन देवादिकांची चित्रे काढीत व ती अजंठ्याच्या चित्राप्रमाणें भिंतीवरचीच असत. पण मोगली चित्रकलेचे तसे नव्हते. ते चित्रकार राजदरबारी, स्वारीशिकारींत, बागबगीच्यांत जे देखावे दृष्टीस पडत त्यांची चित्रे काढीत असत. जहांगीर बादशहाचा या प्रकारावर विशेष कटाक्ष असून त्याने आपल्या चित्रकाराकडून दुर्मिळ फुलांची व जनावरांचीहि चित्रे काढविली.

जहांगीर बादशहाच्या वेळीं युरोपियन मुशाफर हिंदुस्थानात अधिक प्रमाणांत येऊ लागले. त्यानी आपल्या बरोबर इतर वस्तूप्रमाणें चित्रेहि बादशहाला नजर देण्याकरितां आणावी व त्या चित्रांबरहुकूम चित्रे बादशहाने आपल्या दरबारी चित्रकारापासून काढवून घ्यावी. शहाजहान बादशहाचे लक्ष जितके शिल्पाकडे तितके चित्रकलेकडे नव्हते. औरंगजेबाचे लक्ष या दोन्ही कलाकडे नव्हते. यामुळें शहाजहानापासून दिल्लींतील चित्रकला लोप पावली. मोंगल कलम दिल्लींत कांहीं वर्षे प्रस्थापित झाल्यावर तिकडील कित्येक चित्रकार औरंगाबाद व दौलताबाद इकडे वळले व त्यांच्या अनुकरणाने दक्षिणी कलम बनले. दक्षिणेंतील फार प्राचीन चित्रकार जय व विजय हे होत. पण अठराव्या शतकात मोगली धर्तीचे अनुकरण होऊन तंजावर व म्हैसूर येथे आधुनिक पद्धतीचे चित्रकार उत्पन्न झाले.

इतर कलाप्रमाणें चित्रकलेकडेहि मराठे सरदारांचे लक्ष असून त्यानी तिला कालानुरूप शक्य तितके उत्तेजन दिले. प्रत्येक सरदार अगर सुखवस्तू माणूस याला पदरी चित्रकार बाळगण्याचे सामर्थ्य साहजिकच नव्हते व त्या सर्वांना बाळगता येतील इतके कुशल व विपुल चित्रकारहि महाराष्ट्रांत नव्हते. तथापि सर्वजण मिळतील तेवढी चित्रे आपल्या संग्रही ठेवीत असत. त्यापैकीं सहासातशे चित्रे पुणे येथील भारत-इतिहाससंशोधकमंडळाने जमविली आहेत.

त्यांतील बरीचशी चित्रें कोणापासून मिळाली याचा थांग लागत नाहीं. परंतु कांहीं चित्रे कोठून कशी मिळाली याची यादी मंडळाचे संग्रही आहे.

नांव	चित्रसंख्या
१ खाजगीवाले–संग्रह	४२
२ भोसले	१३
३ पारसनीस	१४
४ गोखले	६
५ पिंपळखरे (चित्रकार)	३
६ पोतदार	४
७ भुसारी	३
८ चितळे	२
९ पुरंदरे–पर्वतकर	१
१० चांदोरकर	१
११ गाडगीळ	१
१२ जोशी	१
१३ सोमण सातारा (रा. ग.)	७
१४ मुजुमदार	१
१५ आपटे	१
	९९

या चित्रांत अकबर, जहांगीर, औरंगजेब, शाहूमहाराज, बाजीराव (पहिला व दुसरा) पिलाजी जाधवराव, महादजी शिंदे, नाना फडणवीस इत्यादि अनेक ऐतिहासिक पुरुष आहेत. खेरीज हत्तींची झुंज, बेगम हुक्का पीत आहे, काळवीट धावत सुटला आहे, असली सर्वसामान्य मनोरंजनाचीहि चित्रे आहेत. इतरापेक्षा पेशव्यांचा चित्रसंग्रह फार मोठा असला पाहिजे. परंतु पेशव्यांच्या सर्व वैभवाबरोबर तोहि नष्ट झाल्यामुळें त्याविषयीं कांहींच न लिहिणे बरे. तथापि पेशवे व त्यांचे कारभारी यानी महाराष्ट्रिय कलम उदयास आणण्याकरिता मोठा प्रयत्न केला होता याविषयीं शंका रहात नाहीं. पहिले बाजीराव व नानासाहेब पेशवे यानी या दिशेने कोणती खटपट केली हे समजण्याचें साधन अद्यापि उपलब्ध नाहीं. तरी पण पहिल्या

माधवराव पेशव्यापासून प्रस्तुत बाबतींत प्रयत्न सुरू असल्याचा पुरावा सांपडतो. माधवरावापाशी माणकोजी चितारी नावाचा पगारी चित्रकार होता. त्याला चित्रे व तसबिरा कागदावर काढावयास सांगितल्या होत्या व चित्राकरिता जो रंग लागेल तो देण्याविषयीं कारभाऱ्याना आज्ञा केली होती. माणकोजीचा पगार दीडमाही तीस रुपये होता. (पे. डा.) माधवरावाशी राघोबाचे बनेनासे झाल्यापासून तो नाशिकापाशी त्रिंबक अगर आनंदवल्ली येथें रहात असे. त्या दोन्ही स्थळी त्याने वाडेहि बांधले होते. सदर वाड्यांना शृंगारण्याकरिता चित्रांची गरज असल्यामुळें राघोबाने सन १७६५ सालीं नाना फडणविसास कळवून माणकोजीस तिकडे पाठविण्यास सांगितले. नानास राघोबा लिहितो. ' माणकोजी चितारी यास त्रिंबकी नेहमी चित्रे काढावयास आज्ञा केली आहे. त्यास याचे सामान पुण्यास घडोची, व रंगाचे खळ वगैरे जे असेल त्यास दोन कामाठी वोझ्यास देऊन त्रिंबकास पोहचऊन देणें, (पे. द. ३२).

माधवरावाच्या कारकीर्दीत पुण्यास इंग्रज व मराठे यांचे संघटन वाढत चालले असल्यामुळें युरोपांत कोणताहि नवीन शोध लागला तर त्याचा प्रतिध्वनि पुण्यांत निघाल्याशिवाय रहात नसे. चित्रकलेंत मोठी क्रांति फोटोग्राफीने घडवून आणिली. तो शोध युरोपांत या सुमारास लागला होता इतकेच नव्हे तर त्याचे कॅमेरा वगैरे साहित्यहि पुण्यांत सन १७६५ त उपलब्ध झाले होते असे दिसते.

'विनंति मीर अनवर यांस सावली पाहून तसबीर काढावयाची पटी इंग्रजाकडलि आणिली होती. ती आपण सरकारांत मागितली त्याप्रमाणें शोध करून आपणाकडे नवलोजी चव्हाण याजसमागमे पाठविली आहे. घ्यावी आणि पावती द्यावी. जमा सरकारांत धरली आहे. इंग्रजाचे नावे खर्च लिहिली आहे '(पे. द. ३२) छायाचित्राचे हे साहित्य पेशव्यानी जमविले खरें; पण त्याच्या साहाय्याने त्यानी तसबिरी काढण्याचा उपक्रम केला व तो चालू राहिला असें शाबीद होत नाहीं. कारण तसें असतें तर त्यापुढील ४०।५० वर्षांत अनेक ऐतिहासिक व्यक्तींची व प्रसंगांची हुबेहुब चित्रे महाराष्ट्रांत विपुलता उपलब्ध झाली असती. पेशव्यांचा चितारी माणकोजी हा आपल्या कलेंत किती निष्णात होता व त्याच्या हाताखाली नवे महाराष्ट्रीय चित्रकार तयार होऊन त्यांना महाराष्ट्रीय कलम बनविता आले काय हे समजत नाहीं; परंतु त्याना त्या दिशेने प्रयत्न करण्यास

लावणारा तो काल होता याला फोटोग्राफीचे साहित्य हें कारण अनुकूल होय यांत शंका नाहीं. हें साहित्य जसे त्याना इंग्रजापासून मिळाले तशीच इंग्रजाकडून त्यांस नजर आलेल्या फर्माइषी जिनसांत केव्हा केव्हां विलायती चित्रेहि येत. सन १७५८ त मुंबईकर इंग्रजांकडून पेशव्याना कांहीं जिन्नस आले त्यांत दर्याची चोवसि चित्रे होती. विकत अगर फुकट मिळतील ती चित्रे जमविण्याचा माधवरावाचा कस सुरूच होता. त्याने सन १७६४ त खाशांच्या दिवाणखान्यांत लावण्यासाठीं रागमालेची ३६ चित्रें १९५ रु. स खरेदी केली. मालकंस किंवा मेघमल्हार यासारखे राग गाइले जात असता त्यांचा प्रभाव काय दिसतो हें या चित्रांतून दाखविण्यांत येते. उदाहरणार्थ मेघमल्हार हाच राग घेतला तर तो ऐकून मोर हर्षभरित होऊन आपला रमणीय पिसारा उभारतो. हीं चित्रे देशीच चित्रकार काढीत व ती बहुतेक मोठमोठे लोक आपल्या संग्रहांत ठेवीत. त्या पद्धतीस अनुसरूनच माधवरावाने वर लिहिल्याप्रमाणें सदर चित्रे खरेदी केली होती.

माधवरावाच्या पश्चात् थोड्याच वर्षांनी पेशवाईचा कारभार नाना फडणवीस पाहू लागला. त्याने पेशव्यांच्या दरबारी चितारी बाळगले व हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या राजेरजवाड्यापासून चित्रे आणण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. या कामी त्यास महादजी शिंद्याचे पुष्कळ सहाय्य झाले. जयपुरास जुना चित्रसंग्रह मोठा आणि राजापाशी चित्रकारहि पिढीजाद व नामांकित. म्हणून नानाने तिकडे संधान लावले. त्याच्या काळी जयपुरास प्रतापसिंह (१७७९ ते १८०३) नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला कलाकौशल्याची अभिरुची असल्यामुळें त्याने आपल्या पदरीं उत्तम चित्रकार व मिनेगार (मिन्याचे नक्षी काम करणारे) लोक ठेवले होते. राजाने सदर चित्रकारापासून भागवताचा सचित्र ग्रंथ तयार करविला आहे व प्रत्येक पानावर कथानुसंधानाप्रमाणें सुंदर रंगीत चित्रें काढली आहेत अशी बातमी नानास समजली. तेव्हां त्यानें शिंद्याचा दिवाण आप्पाजीराव दाभोळकर यास सदर ग्रंथाचा शोध करून तो पाठविण्याबद्दल लिहिले. तथापि प्रथम महादजी शिंदे व प्रतापसिंह यांचे नीट नसल्यामुळें ग्रंथ नानास मिळाला नाहीं, पण मागाहून मिळाला. (इ. सं.)

जयपूर, जोधपूर इत्यादि ठिकाणची रजपूत राज्ये फार जुनी. म्हणून हिंदूंचे हरएक प्रकारचे कलाकौशल्य जिवंत स्थितीत सांपाडावयाचे तर त्याजपाशीं.

मराठ्याजवळ तसले पूर्वसंचित मुळींच नव्हते. यासाठीं त्याना अशा प्रकारच्या जुन्या राजदरबाराकडे पहावे लागे. त्याप्रमाणें नानानें चित्रादिकरून कलाकौशल्याच्या वस्तूंसाठीं दिल्ली, आग्रा या मोंगलांच्या राजधानींत तपास केला. पण तेथें त्यास यश मिळालें नाहीं. कारण या बाबतींत महादजी शिंद्याच्या लष्करांतील सदाशिव दिनकर यास नानाने पत्र पाठविले असतां त्यांस त्यानें कळविलें– 'आग्रा शहरांत उजाडी फार झाली आहे. जी वस्ती आहे ती दरिद्री आहे. उत्पन्नभक्षी कारागीर आहेत. त्यास जिन्नस करण्याची शक्ति नाहीं. कोणी घेणाराहि राहिला नाहीं. दिल्लीची अवस्था आग्र्यापेक्षां किंचित् बरीं. तेथेंहि नवा जिन्नस मिळत नाहीं' या पत्रावरून आठराव्या शतकांत हिंदुस्थानांतील सर्व प्रकारच्या कलाकौशल्याचा ऱ्हास होत असून पाश्चात्य देश भरभराटीस येत असल्याचेंच दिसून येते. कालाच्या प्रतिकूलतेमुळें नानाचे असेच कित्येक मनोरथ जागच्या जागींच जिरले नसतील काय ?

'इंग्रजांचा वकील सर चार्ल्स् मॅलेट ३ मार्च सन १७८६ रोजीं पुण्यास रहावयास आला. तो पर्वतीजवळ मस्तानीच्या बागेत उतरला. त्याच्या बरोबर दोन अडीचशे गाडदी व दोन हत्ती होते. त्यानें मुंबईहून निघतांना एक दीड गज उंचीचा पक्षी बरोबर घेतला होता. पण तो वाटेंत खंडाळयास मेला. परंतु मॅलेट यानें त्याला तसेच पिंजऱ्यांत घालून पुण्यास बागेंत आणिलें. हे वर्तमान श्रीमंतास (सवाई माधवराव) कळतांच त्यांनी चितारी यांस पाठवून त्या पक्ष्याची तसबीर काढून आणिली. पक्ष्याचे नांव शहामृग' (इ. सं.) पेशव्यापाशीं फोटोग्राफीचे साहित्य पूर्वीपासून असल्यामुळें ही तसबीर त्याच पद्धतीनें कदाचित् काढली असेल काय ? मॅलेट साहेबाचा तळ पुण्यांत कायमचा पडल्यापासून युरोपियनांना ते भरंवशाचे आश्रयस्थानच होऊन राहिले. 'मॅलेट पुण्यास राहू लागल्यावर चार वर्षांनीं त्याजकडे जेम्स वेल्स या नांवाचा एक प्रसिद्ध इंग्रज चित्रकार पाहुणा आला. वेल्स धंदेवाईक पडल्यामुळें त्याला पुणेंदरबारांत वशिला लावून आपल्या कलेवर शक्य तितकी मोठी प्राप्ति करून घ्यावयाचीच होती. म्हणून त्यानें मॅलेटच्या शिफारशीने पुणें दरबारांत प्रवेश मिळविला. त्याने सवाई माधवराव, नानाफडणीस, महादजी शिंदे, परशुराम भाऊ पटवर्धन प्रभृति प्रसिद्ध पुरुषांची चित्रें काढली. तसेच सवाई माधवराव पेशव्यांच्या गणपतिमहालांतील दरबाराचे एक चित्र त्यानें उत्तम तयार केले. वेल्स चित्र-

कार पुणें येथें सन १७९० ते ९५ पर्यंत होता. मॅलेट याजपाशीं पेशव्यांचा महादाजी चिंतामण हा बातमीदार होता. त्याने आपल्या पत्रांतून जेम्स वेल्स याचा उल्लेख वेल्स मुसावर या नांवानें अनेकवार केला असून त्याने काढलेल्या वरील तसबिरा हुबेहुब असल्याचे लिहिले आहे. त्यावेळी पुण्यात हजर असलेला कॅप्टन मूर आपल्या हिंदु पॅन्थियान या पुस्तकांत या हकीकतीचा उल्लेख करतो. वेल्स यानें सवाई माधवराव, नानाफडणीस व महादजी शिंदे यांचे एक सामुदायिक चित्र काढले असून तें पुण्यास गणेशखिंडीत गव्हर्मेंट हौसमधील बिलियर्ड रूममध्यें आहे. एकट्या सवाई माधवरावांची तसबीर व नानांची तसबीर मेणवलीस नानांच्या वाड्यांत होती. त्या दोन्ही अस्सल तसबिरी शेठ पुरुषोत्तम विश्राम मावजी यांनीं मुंबईस आपल्या पदार्थसंग्रहालयांत ठेवण्यासाठीं नेल्या. पेशव्यांच्या दरबाराची तसबीर ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाची होय. ते चित्र मि. वेल्स याच्या स्केच वरून मि. डानियल नामक दुसऱ्या चित्रकारानें तयार केल्याचा उल्लेख मूर याच्या पुस्तकांतच आहे' [इ. सं] या चित्राची एक नक्कल पुणें येथील भारत-इतिहास-संशोधकमंडळाच्या सभागृहांत प्रमुख ठिकाणीं लावलेली आहे. वेल्स हा चित्रकार पुण्यास १७९० पासून १७९५ पर्यंत राहिला व तेथेंच मरण पावला. मॅलेट यानें सवाई माधवरावास शनिवारवाड्यांत चित्रशाळा स्थापावयास सांगून त्यावर वेल्स याची सुपरिंटेंडंट म्हणून नेमणूक करविली. त्या शाळेंत बरेच विद्यार्थी तयार झाले. त्यांत गंगाराम तांबट नांवाचा विद्यार्थी चित्रकलेंत चांगलाच तरबेज बनला. त्याने वेरूळच्या लेण्यांचीहि चित्रे काढली होती. ती सन १७९४ त गव्हर्नर-जनरल सर जॉन शोअर यास नजर करण्यांत आली. मॅलेटचा सवाई माधवरावापाशीं इतका स्नेह जमला होता कीं तो सन १७९१ च्या नोव्हेंबर महिन्यांत पेशव्यांस महाबळेश्वरासहि घेऊन गेला होता. यावरून माधवरावास सृष्टिसौंदर्याची व कलेची अभिरुचि किती उत्पन्न करण्यांत आली होती हें लक्षांत येतें. मात्र या चित्रकलेचा आज मागमूस न उरल्यामुळें महाराष्ट्रीय चित्रकलेची मोठी हानि झाली आहे यांत शंका नाहीं.

तथापि चित्रकलेचा धंदा करून त्यावर पोट भरणारे लोक महाराष्ट्रांत त्यावेळीं ठिकठिकाणीं तुरळक असावे असें वाटते. विशेषतः भिंतीवर चित्रे काढणारांची संख्या बरीच मोठी असावी. कारण लग्नकार्याच्या व इतर समारंभांच्या निमित्तानें चित्रानीं घराना शोभा आणण्याची चाल सार्वत्रिक होती. श्रीमंतांचे

दिवाणखाने तसबिरानीं व ते शक्य नसल्यास नुसत्या भिंतीवरील चित्रानीं हट-कून भूषविलेले असावयाचे. पहिल्या बाजीरावानें जयपुराहून चितारी आणवून शनिवारवाड्यांतील भिंतीवर पौराणिक चित्रे काढविली होती. त्याचा एक पुरावा पुण्यांतील खाजगीवाल्यांच्या वाड्याचा. ' या वाड्यांत मुंजीचे वेळीं चित्रे काढली त्यासाठीं चित्रकारास ८ रु० दिले.'[भा. इ. सं. त्रैमासिक]

प्रकरण तेरावें

प्राणिसंग्रह

शाहूमहाराज ही महाराष्ट्राच्या सुधारणेची मुहूर्तमेढ होय. प्रत्येक विलासाचा व षौकिनपणाचा उगम त्यांच्यापासून झाला. मराठ्यांना कुत्रा व घोडा यांचा षोक मोठा. विश्वासू कुत्र्याची गरज धनगरापासून सरदारापर्यंत सर्वांस. धनगराची मेंढरें, कुणब्याचीं शेतें, सावकारांचीं घरें व सरदारांच्या शिकारी, कुत्र्याच्या जिवावर. कुत्र्याइतकीच घोड्याची गरज. घोडा हें प्रवासाचें, ओझें वहाण्याचें, स्वारीचें व शिकारीचें मुख्य साधन असल्यानें महाराष्ट्रांतलि हरएक माणूस घोडा बाळगीत असे. म्हणून जातिवंत कुत्रा व चांगल्या अवलादीचा घोडा पैदा करण्यांस मराठे लोक प्रयत्नांची पराकाष्ठा करीत. पण या बाबतींत सामान्यपणे त्यांची शोधक नजर महाराष्ट्रांत व महाराष्ट्राभोवतीच काय ती फिरावयाची. तसाच कोणी मातबर माणूस झाला तर तो भिमथडी, नीरथडी, प्रवरथडी किंवा गंगथडी तट्टावर आपली हौस भागवून न घेतां बहुधा काठेवाडी घोडे आपल्या पागेस लावीत असेल. पण शाहू महाराज सातान्याच्या गादीवर अधिष्ठित झाल्यावर त्यांनीं या बाबतींतील महाराष्ट्राचें दृष्टिक्षेत्र फार व्यापक केलें. केवळ घोडेच काय पण इतर अनेक पशुपक्षी मिळविण्याकरितां ते काबूल कंदाहार, इराण, इराक अरबस्थान व काश्मीर हा मुलूख धुंडूं लागले.

शाहू महाराजांनीं एखाद्या वस्तूचा नाद घेतला म्हणजे तो पुरविल्यावांचून त्यांस चैन पडूं नये व तशी वस्तू कोणी पाठविली असतां ती त्यांच्या पसंतीस लवकर उतरूं नये. अशा त्यांच्या छांदिष्ट व जिकीरखोर स्वभावामुळें त्यांच्या पदरच्या लहानथोर लोकांना फार तखलीफ पडे. एकदां त्यांच्या जवळच्या कुत्तेवानांनीं पुण्यांत चिमाजी आप्पाच्या कुत्रीस उत्तम पिलें झालेलीं पाहिलीं. त्यांच्या सांगण्यावरून तीं अगर दुसरी चांगलीं पिल्लें पाठवून देण्याबद्दल महाराजांनीं आप्पास लिहिलें. आप्पानें महाराजाकडे चारदोन नव्हे चाळीस कुत्रीं पाठविलीं. परंतु त्यांपैकीं एकहि कुत्रें त्यांच्या चित्तास आलें नाहीं. यास्तव दुसरीं कुत्रीं पाठवून द्यावीं म्हणून चिमाजीस त्यांनीं पत्रानें कळविलें. राजाजवळचे

हुजरेपाजरे बारीक बातम्या काढण्यांत पटाईत. मग ज्यांचे कामच कुत्र्यांची परीक्षा करण्याचें व निगा राखण्याचें त्या कुत्तेवानांना कोणत्या गांवीं व कोणाच्या घरीं जातिवंत कुत्रीं आहेत हें कसें माहीत नसेल? महाराजांच्या कारकुनानें चिमाजीस लिहिलें, ' आनंदराव पवार किंवा न्हावीकर शितोळे यांचे घरीं कुत्री आहेत. तीहि आणून पाठवावी. शिकरापुरी धायेभोर यांचे घरीं किंवा ढमेढेरे यांचे घरी उत्तम पिल्लें असतील ती पाठवावी.'

महाराजांपाशीं सन १७४२ मध्यें गोपड, सीतर, बसंता, बंटा, बंधू, मिठू हे कुत्तेवान होते. यापैकीं बहुतेकजण मुसलमान किंवा उत्तर हिंदुस्थानी दिसतात. त्यावरून जातिवंत व किंमतवान कुत्र्याचा सांभाळ करण्याची कला महाराष्ट्रीयाना मुसल्मान अगर हिंदुस्थानी या लोकांइतकी साधली नसावी. कारण जर कुत्र्यांच्या विविध जातीच माहीत नाहींत तर त्यांना कसे वागवावे याचे ज्ञान मराठ्यांना कोठून असणार? वर सांगितलेल्या कुत्तेवानांतील ' गोपडबरोबर सबज जातीचा जोडा (नरमादी) सीतर बरोबर हिरा कुत्री व पसमी कुत्री, बसंतबरोबर व मिठा याजबरोबर अबलख कुत्रा-कुत्री, बंटाबरोबर पसमी कुत्राकुत्री, बंधूबरोबर अबलख कुत्री व भवार कुत्रा, येणेंप्रमाणें कुत्री महाराजांकडे साताऱ्यास रवाना झाली (पे. द, १८) महाराजास एकदां ताजी व लूत या दोन जातींच्या कुत्र्यांच्या दहा बारा जोडया पाहिजे होत्या त्या आणण्याकरितां बुंधेले राजाकडे [छत्रसालाच्या राजघराण्याकडे] जासूद पाठविण्यांत आल्या. ती कुत्री आणविण्याची कामगिरी नानासाहेब पेशव्याकडे इतर राजकीय कामांत सवड काढून बजावण्याकरितां आली.. बुंधेल्याकडून कुत्र्यांच्या जोड्या आल्या म्हणजे त्या आपणांकडे धाडतो असे पत्र खानदेशांतून वरणगांवाहून लक्ष्मण शंकर याने पेशव्यांस लिहिले. घोड्यांच्या बाबतींत त्यांची जिकीर अशीच होती. एक घोडा महाराजांनीं आणविला होता. ' तो पुढीले चौकास जसा आहे तसा मागले चौकास नाहीं. (म्हणून) पागेच्या हवालदारास सांगितले कीं तूर्त डाग न करणें ' म्हणजे त्याला डाग देऊं नये. तो परत करावयाचा आहे. इराक प्रांतांतील घोड्यांची प्रसिद्धि शाहूच्या कानापर्यंत गेली होती. पण इराकचा घोडा मिळावा कसा? तर तो असा ' इराखी घोडयासाठीं माणसें लाहोरास पाठविली आहेत. परंतु या दिवसांत काबलेकडून [काबुलाकडून] सौदागरी घोडे आले नाहींत. ज्यास पाठविलें आहे तो मार्ग पहात बसला आहे. सौदागरी घोडे आल्यावर एखादा उत्त-

मसा खरीद करून आणील ' इराकी घोडे हिंदुस्थानांत येण्यांचा मार्ग खुष्कीचा. सौदागर लोक इराकातून इराण-काबूल या मार्गानें पंजाबात प्रवेश करीत. यास्तव महाराजांनीं पंजाबांत आपला मनुष्य खरेदीसाठीं पाठविला होता. तो सौदागरांची वाट पहात तेथें बसला होता. महाराजांच्या या कामगिऱ्या बाजीराव व चिमाजी आप्पा यांजवर पडावयाच्या. त्यांनीं एक घोडा महाराजांस आणून दिला होता. त्यावर महाराजांचा अभिप्राय काय पडला तो पहा ' आलेला घोडा पसंत नाहीं. म्हणून परत केला आहे. तरी उत्तम आरबी घोडा घेऊन पाठवा. '

महाराज घोडे व कुत्री ही जशी मिळतील तेथून पैदा करून आणवीत, त्याचप्रमाणें बदकेहि मागवीत. त्यांनीं एकदां ऐकले कीं, कडुस गांवच्या (पुणे जिल्ह्यांत खेडानजीकचा गांव) पाटलाजवळ बदकांचा जोडा आहे. लगेच त्याजकडून चिमाजीआप्पास पत्र आले. ' भोपत पायेदामी [जाळ्यानें पक्षी धरणारा] यास आम्ही विचारलें कीं, कडुसांत कोणत्या पाटलाचे घरी बदकाचा जोडा आहे त्याचे नांव सांगणे. तो बोलला कीं, पाटलाचे नांव ठावके नाही. पाटलाचा आहे कीं, आणखी कोणाचा आहे हें न कळे. परंतु त्या गांवात आहे म्हणून बोलिला. तरी स्वामींनी कडुसच्या पाटलाचे घरीं अगर गांवात ज्याचे घरी असेल त्याची तहकीकात करून आणाविला पाहिजे. बदकांच्या जोड्यास बुरुडी करंडे करून चारापाणी वाटेने घालवून निगेने रवाना करावे ' [पे. द. १८]

साताऱ्यास महाराजांच्या शिकारखान्यांत नवीन नवीन तऱ्हेतऱ्हेचे पशुपक्षी येऊन त्यांची सजावट नटि होत चालली असतां ते इतरत्र आपल्या पसंतीच्या ठिकाणीहि कांही कांही प्राण्यांचा संग्रह करीत. साताऱ्यापासून थोडया अंतरावर चंदन व वंदन हे दोन डोंगरी किल्ले आहेत. त्या किल्ल्याकडे शिकारीसाठीं महाराज वारंवार जात व किल्ल्यावर रहातहि. किल्ल्यावरची जागा कबुतरे बाळगण्यास व उडविण्यास प्रशस्त जाणून त्याजवर कबूतरे ठेवण्यांत आलीं. ' किल्ल्यावर मोराचा उपद्रव फार व बारा बहुत. याजकरितां त्यांच्या आज्ञेवरून ती कबूतरे तेथून काढून किल्ल्याखाली गडकरी यांचे वाडीस ठेवली. ती दिडिशे जोडी झाली होती. त्यांतून महाराजानीं खेडच्या मुक्कामी चांगली कबूतरे निवडून शंभर जोडी घेतली. बाकी पन्नास जोडी राहिली ती वाडीस ठेवली होती. त्यास अलीकडे दमाजी गायकवाड साताऱ्यास गेले. त्यांचे पाठीवर त्रिंबकराव नाना होते. त्या दंग्यांत वाडी वाटेवरी होती ते लुटली गेली. ते समई कबूतरे दंग्यांत गेली' असें

पत्र नानासाहेब पेशव्यास मुधोजी भोसले हवालदार व कारकून किल्ले चंदनगड याने लिहिले. [पे.द.१८] या पत्राची तारीख रा. सा. सरदेसाई यांनीं २९ सप्टेंबर सन १७५८ अशी घातली आहे. त्यावरून शाहूच्या मृत्यूनंतर साताऱ्यास ताराबाईची कारस्थानें सुरू झाली; त्या धांदलींत नानासाहेबानें चंदनगडावरची विचारपूस केली तेव्हां त्याला ही माहिती पुरविण्यांत आली असावी. कदाचित् त्याला पुण्यात शिकारखाना नवा काढतांना वरील कबूतरांची गरज भासली असावी.

शाहूस एकदा आपल्या शिकारखान्यांत वनगाई, कस्तूरीमृग व हुमे हा पक्षी ठेवण्याची इच्छा झाली. हे प्राणीं काश्मिरांत मिळत असल्याचें शाहूनें ऐकलें होते. शाहूच्या दरबारांत इतर अनेक राजांच्या वकिलाप्रमाणें श्रीनगरच्या राजाचाहि वकील होता. त्यानें सांगितलें कीं हूमे पक्षी जिवंत मिळत नाहीं. तेव्हां वनगाई व कस्तूरीमृग आणण्यासाठीं एखादा छोटेखानी कारकून श्रीनगरास पाठविण्याचें ठरले. शाहूस लावा (लावी) पक्षी पाहिजे होते. ते त्याजकडे पाठविले असल्याचें त्याचे चिटणीस निळो बल्लाळ यांनीं लिहिलें आहे. दोन बाजजुरे (बहिरी ससाणा) पक्षी शाहूनें मागितल्यावरून त्याकरिता पांच हजार रुपये कारकुनापाशीं दिल्याचें अंबाजी त्रिंबक यानें बाजीरावास कळविलें. वाघ निदान वाघीण बाळगण्याचें शाहूच्या मनांत आल्यावर त्या तजविजीस अधिकारी व कारकून मंडळी लागली. 'मल्हारजी होळकर यांनी महाराजाकडे चित्ता पाठविला. त्याला रतीब सुरू झाला.' (पे.द. ३२)

जलाशयांत मासे धरणें हा शाहूचा एक मनोविनोद होता. माशाच्या जाळयास जो गळ असतो, त्याचे दोरीस बारीक सुताची गरज लागली. सूत तें काय, कोठेहि मिळालें असतें. पण शाहूचें समाधान अशातशानें होणारें नव्हतें. त्याची चिकित्सा इतकी विलक्षण कीं, मासे पकडण्यासाठीं टाकावयाच्या जाळयाच्या गळाचें सूत त्याला हवें तसें बारीक सातारा व पुणें प्रांतीं आढळेना, म्हणून जासूद घोडा पाठवून बऱ्हाणपुराहून तें आणविण्याची त्यानें आज्ञा केली. मासेसुद्धां केव्हांतरी पकडावयाचे नसून त्याचा हंगाम अगदीं ठरलेला. 'दसरादिपवाळीपर्यंत माशाचे शिकारीचा हंगाम आहे. यास्तव माशाचे डाग राजश्रींनीं (महाराजांनीं) जागजागा घातले आहेत. माशाचे शिकारीची चर्चा निघाली असतां 'गळाचे दोरीस बारीक सूत असावे म्हणून (महाराज) बोललें. बऱ्हाणपूर खानदेशचें सूत बहुत बारीक मिळतें. तरी मुजरद जासूद



श्रीमंत सवाई माधवरावसाहेब पेशवे.

(रा. दिनकर गंगाधर केळकर ऊर्फ कवि अज्ञातवासी यांच्या परवानगीने)

घोडा पाठवून सावकाराच्या घरून बारीक सूत घेऊन पाठवावें.' असे महाराजानी सांगितले. याहि कामांत महाराजांची निकड होती. महाराजांचें राज्य 'नवी विटी व नवें राज्य' या म्हणीपैकीं होतें. कोठे जेजुरीस देवदर्शनाकरितां प्रवासास जावयाचें झाल्यास त्यांजपाशीं पुरेसे किंवा त्यांच्या योग्यतेस शोभण्यासारखें उंटहि नसावे असें पुढील पत्रावरून वाटतें. महादोबा पुरंदऱ्यानें चिमाजी आप्पास ता. ३१ जानेवारी १७३१ रोजीं लिहिलें 'निदान दहा उंट खामखा आणवावे. ते आणण्यासाठीं शहरास [औरंगाबादेस] व नबाबाच्या [निजासअलीच्या] लष्करांत माणसें पाठवावीं.'

राजे महाराजे श्रीमंत सरदार यांजपाशी हत्ती हा पाहिजेच. त्याच्यावाचून गजान्त लक्ष्मीची सिद्धि कशी होणार? त्या काळी हत्तीचा उपयोग मोठेपंणाप्रमाणेंच युद्धकर्मांतहि होत असे. रणभूमीवर राजा अगर सेनापति आपल्या सैनिकास दिसावा यासाठीं तो हत्तीवर बसे. शत्रूची फळी फोडून त्याची दाणादाण हत्तीच उडवून देत आणि किल्ल्यांचे दरवाजे हत्तीच आपल्या अजस्र धडकीनें खुले करीत. या दृष्टीनें राजाच्या लव्याजम्यांत व लष्करांत हत्तीला फार मोठा मान होता. अशा प्रकारचे हत्ती शाहूपाशीं किती होते कोण जाणे. पण त्यांची खरेदी मात्र तो करीत होता. त्या बाबतींत बाजीराव व चिमाजीआप्पा या बंधुद्वयास असे पत्र गेलें, 'स्वामींनी राजश्री तारबावा यास आज्ञा केली, राजश्री चंद्रसेन जाधवराऊ यास पत्र पाठविणें कीं, दोन हत्तिणी उत्तम खरेदी करून पाठवून देणें. रा. देवराऊ यास आज्ञा लिहिली पांच हजार रुपये शहरास पाठवून उत्तम दोन हत्तिणी घेऊन येणे' (पे. द.) हत्तिणी सुद्धा औरंगाबादेहूनच आणाव्या लागल्या.

वरील हकीकतीवरून शाहूमहाराजानी साताऱ्यास हत्ती, वाघ, चित्ते, घोडे, कुत्रे, बहिरी ससाणे, बदकें, कबूतरे इत्यादिकांचा प्रेक्षणीय प्राणिसंग्रह जमविला असल्याचें सिद्ध होतें. सन १७४९ त शाहूमहाराज मृत्यु पावल्यानंतर साताऱ्याच्या गादीवर रामराजा आला. पण तो न कर्ता निघाल्यामुळें सत्तेचें केंद्र साताऱ्याहून पुण्यास आले. त्याबरोबर साताऱ्यांतील प्राणिसंग्रहावरचे लक्ष सहजच उडाले व जेथें सत्ता तेथे वैभव या न्यायाने पुण्यास प्राणिसंग्रह ठेवण्याची पेशव्याना आवश्यकता उत्पन्न झाली. या संग्रहास सुरुवात थोडीशी पहिल्या बाजीरावाने केली असली तरी नानासाहेबाच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात

तो संग्रह बराच वाढला व सवाई माधवरावाच्या वेळीं नाना फडणविसाने पराकाष्ठेस नेऊन पोचविला. बाजीराव व चिमाजीआप्पा यानी कुत्रे बाळगले होते. तसेच नमुनेदार घोडे व पाखरेहि बाळगली होती. बाजीरावाकडून लिहून आल्यावरून पुरंदरे यानी सातान्याहून पुण्यास एक पाखरू पाठविले. 'थोर पाखरू दिवाणखान्यांत आहे तें पाठविणे म्हणून लिहिले. त्यावरून पाखरूं, कामाठी व जासूद यांजबरोबर पाठविले आहे. पाखरास तांदूळ कैली एक शेर दिले आहेत.' [पे. द.] बाजीरावाच्या सातान्यांतील वाड्यांत पाखरू होते ते त्याने पुण्यास आणविले, एवढेंच या पत्रावरून समजते. कदाचित् बाजीरावापाशी त्याच्या दिवाणखान्यांतच चार दोन पोपट, मैना, साळूंखी यांचे पिंजरे असतील. पण नानासाहेबाने या छोट्या संग्रहास मोठ्या प्राणिसंग्रहाचे स्वरूप दिले. त्याने आपल्या स्नेहांतील एका मुसलमान उमरावापाशी बहिरी ससाणे मागितले. ते त्याजकडे रवाना करून उमरावाने एक गौरवपर पत्रहि लिहिले. 'मेहरबान दोस्ता बादज, शौक मुलाकात मशहुद आंकीं. येथील खैरसला जाणून आपली खैरखुशी हमेशा कलमी करून दिल ताजा करीत जाणे. दिगर बहिरी विशई आज्ञा केली होती. त्यास बहिरी दोन पाठविले आहेत. ते पोहचतील. वरकड जे ज्यानवरे सिकारी आम्हापासी आहेत ते आवघी आपलीच आहेत......प्यार मोहबत असो दीं जें हे किताबत' [पे. द. १८] पत्र फार आदबीने व दरबारी भाषेनें लिहिले आहे. फारसी भाषेंतील रुबाबाचा हा एक लहानसा मासलाच आहे. नानासाहेबाने स्नेह्यास, त्याचप्रमाणें आपले नोकरचाकर यांसहि लिहून प्राणिसंग्रह वाढविण्याचा उद्योग सतत चालू ठेवला होता. त्याच्या प्राणिसंग्रहावरलि मुख्य अधिकारी त्रिंबक सदाशिव या नांवाचा होता. त्याजकरितां कोणी एकाने तितर जातीचे वीस पक्षी पाठविल्याचे वर्तमान खालील पत्रांत आहे.

'दंडवत विनंति उपरी–तितर सुमारें वीस पाठविले आहेत. घेऊन बागात सोडावे. कांहीं श्रीमंताकडील वर्तमान आले असल्यास लेखन करावे...... तितर चार दिवाळीच्या बागात सोडले तरच रहातील व तमाशा दिसेल. रमन्यात सोडले तर द्रष्टीस पडनार नाहींत. कलावे हे विनंति.' [पे. द. ४०]

पत्रांतील भाषेवरून लेखक मराठा असावा. त्याने प्राणिसंग्रहाचा एक हेतु पलात स्पष्ट केला आहे. प्राणिसंग्रह, त्याच्या मताप्रमाणें लोकानी पहाण्याकरिता असल्याने त्याने पाठविलेली पाखरे विशिष्ट बागांतच सोडावी, रम-

ण्यांत सोडू नयेत असें मुजरत कळविले आहे. पेशव्यांचा प्राणिसंग्रह पर्वती-जवळील एकाच बागेंत नसून जवळपासच्या अनेक स्थळीं होता याचाहि निर्देश वरील पत्रात करण्यांत आला आहे.

कर्णाजी शिंदे नांवाचा अधिकारी ठाणे जिल्ह्यांत माहुलीच्या किल्ल्यावर होता. त्याला माहुलीच्या आसपास अरण्यांत आढळणारे पशू पाठविण्यास नानासाहेबाने आज्ञा केली होती. त्यास उत्तर कर्णाजी पुढीलप्रमाणें लिहितो,– ' आज्ञाधारक कर्णाजी शिंदे नामजाद किल्ले माहुली साष्टांग दंडवत विनंति... स्वामीचे कृपेकरून सेवकाचे व किल्ले मजकुराचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीचे आज्ञापत्र सादर झाले. तेथें आज्ञा कीं, सांबरें व चितळे भेकरी व मोर व डुकरे, गवे [यांच्या] बच्च्यांचे प्रयोजन आहे. लोक रानांत पाठवून बच्याचा तलास करून बच्चे जिवंत धरून जो जिनसाचा बच्चा सांपडेल तो जिवंत धरून जतनेने येऊन पोहचे ते करणें, म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें लोक रानात पाठवून तलास करून जे भिळतील ते सेवेसी रवाना करून. गव्याविसी मागें आज्ञापत्र आले होते त्या तागाइत तलासांत आहो. चाकरी घडोन येईल ते खरे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना ' [पे. द. ४०] कर्णाजीने इतर पशुपक्षी वेळोवेळीं जसे सांपडले तसे पाठविलेच. परंतु त्यांपैकीं गवे तेवढेच न मिळाल्यामुळें पाठवावयाचे राहिले. म्हणून त्यासंबंधीच्या खुलाशाचे हे पत्र आहे.

दौंडाजवळच आलेगांव येथें कुरण-पाण्याची सोय पाहून पेशव्यांनीं आपली पागा ठेविली होती. त्यांतच कबुतरेहि होतीं. त्यांपैकीं चांगल्या कबुतरांचे पंचवीस जोडे राणोजी शिंदे यानें भाऊसाहेब पेशव्याच्या मागणविरून पाठविले. भाऊसाहेब पेशव्यास पशुपक्ष्यांची हौस होती हें वरील हकीकतींत स्पष्ट झालेच आहे. त्याचा अधिक पुरावा त्यास आलेल्या पुढील पत्रांत सांपडतो व शाहूमहाराजांच्या पश्चात् सातारा येथील शिकारखान्याची अनास्था कशी होत चालली याचाहि उलगडा होतो. ' अपत्ये त्रिंबक सदाशिव......येथें [सातान्यांत] कबूतरे होती. त्यांची आबाळ होऊ लागली यास्तव शेवेसी पाठविली आहेत. तरी आज्ञा करून गजांत घालावी ' [पे. द. २२]. शिकारखाना म्हटला कीं, त्यांत किमानपक्ष हरणें ही पाहिजेतच. ' शिकारखान्याकडे हरणास मोहरक्या दोन घेतल्या. त्या जानकीबाई जिनगरणीनें दिल्या. किं. रु. ४८= ॽ

[पे. द. २२] सन १७५४. 'हरणाच्या दोन झुली व रुप्याच्या दोन मोहरक्या जामदारखान्यांत आहेत त्या पाठविणें' [पे. द. १८] पेशव्यांचा शिकारखाना शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर पांच वर्षांच्या आंत थाटला गेला. त्यांत हरणें ठेवण्यांत आली. इतकेंच नव्हे तर त्यास मोठ्या श्रीमंती थाटानें संभाळण्यांत आले. त्याच सुमारास शिकारखान्याच्या निरनिराळ्या विभागावर निरनिराळे अधिकारी नेमण्यांत आल्यानें त्याला व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें. शिकारखान्याकडे पुढील प्रमाणें अधिकारी होते, '२२ हरणबाज, खबुतरबाज, ४ मीरासिकार, ५ वाघवान, २ पायेदामी, ३ शहागोशवाले, ९ अवांतर, २ फदाईतवाले. यांना दीडमाही रोजमुरा ३ ते ७ रु. पर्यंत आहे. फक्त फदाईतवाल्यांना ७ रु. पासून १० रु. पर्यंत पगार आहे' [पे. द.] या वर्णनावरून वाघासुद्धां सर्व प्रकारच्या प्राण्यांचा भरपूर संग्रह १७५४ तच झाला होता याविषयीं कोणाचीहि खात्री पटेल. शिकारखान्यांतलि कांहीं कांहीं प्राण्यांची मिजास स्पृहणीय होती. त्यांत ठेवलेल्या जवादी मांजराकरितां नंदराम प्याद्यापाशी चमेलीचे तेल वजन पक्के दोन तोळे व कापूर अर्धा तोळा देण्यांत आला.'

थोरल्या माधवरावाच्या कारकिर्दींत पक्ष्यांना खुराक देत असत, तो पुढीलप्रमाणें 'बाजपक्षी, बहिरी पक्षी व बसेरापक्षी यांस प्रत्येकी रोजचा खुराक मांस अर्धा शेर' असा असे, [सन १७६७] [पे. द. २२] कोणत्या पक्ष्याला व जनावराला किती व कसला खुराक चारावा याचें शास्त्र असून ते ज्यांस माहीत आहे असेच नोकर शिकारखान्याकडे असत. पुण्याचा शिकारखाना इतका वाढला कीं, साताऱ्यास रामराजास जनावरें हवी असल्यास ती पुण्याहून पाठविण्यांत येऊ लागली. पहिल्या माधवरावानें महाराजाकडे पुण्याहून एक वाघ रवाना केला. त्या वाघास वाटेनें रोज तीन शेर मांस मिळत असून मांसाचा भाव रुपयास सहा शेर होता.

माधवरावानें नानाफडणविसाची हुशारी पाहून राज्यकारभाराची व्यवस्था त्यांजकडेच सोपविली होती. माधवराव व राघोबादादा पुण्याबाहेर असत तेव्हां शिकारखान्यांतील पशुपक्ष्यासंबंधीं सर्व पत्रव्यवहार त्याजबरोबरच करून आपणांस हवी ती योजना त्याजमार्फत पार पाडीत. माधवरावास कळले कीं, सुरतेस कांहीं संग्राह्य पक्षी आहेत; म्हणून त्यानें नानाला पुढील पत्र लिहिलें. 'सुरतेस शहाणा माणूस पाठवून बहिरी २ व शाईन १ येणेंप्रमाणें तीन खरेदी करून

आणविणे ' (पे. द. ३२ सन १७६८) राघोबा आनंदवल्लीस राहू लागल्यावर त्याला तेथें आपल्यासाठीं वेगळा शिकारखाना असावा असें वाटून त्यानें महादजी शिंद्याकडून नानाला पत्रानें कळविलें. ' हरणे पुण्यातील व टोक्याहून नेली ती सत्वर पाठवावी. अगत्य जरूर जाणोन श्रीमंतानी शागीर्द पाठविले आहेत.' (पे. द. ३२) कायगांव टोक्यास पेशव्यांचा वाडा असून ते केव्हां केव्हां तेथें नारायण दीक्षित पाटणकर यांच्या सहवाससुखासाठीं रहात असत. यासाठीं तेथेंहि त्यांचा छोटासा प्राणिसंग्रह असावा असें वाटतें. शिकारखान्यांतील जनावरें जिवंत आहेत तोपर्यंत ती मनोरंजन करतात व मेली म्हणजे त्यांची कातडी सुख देतात. अशा प्रकारें शिकारखान्यापैकीं एक हरिण मेले. तेव्हां त्याचे कातडे कसे रंगविण्यांत आले, हें नारायणरावानें नानास लिहिलेले पत्र वाचून समजते. ' शामा हरणाचे कातडे रंगवून खंडोजी पवार दिमत शिकारखाना याचे स्वाधीन केलें आहे, त्याचे प्रयोजन आहे. तरी त्याजकडील कातडे घेऊन सत्वर पाठवून देणें ' (पे. द. ३२) पर्वतीपाशीं पेशव्यांचा हा प्राणिसंग्रह असून सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत त्याला भव्य स्वरूप प्राप्त झाले होते. त्यांत सिंह, गेंडा, पोपट, बोलक्या मैना, सात आठ चंडोल पक्षी, दहा पांच मोरांच्या जोड्या, शेंदोनशें हरीण, काळवीट, दोनचार चित्ते, पांचसातशें ससे, काळे पिवळे अबलक होते. पर्वतीवर मोठा सोपा बांधून त्यांत दहावसि वाघ ठेवले होते. महादजी शिंद्यानीं उत्तर हिंदुस्थानांतून गेंडे, एडके, बदके, पाणकोंबडी पाठविली होती. हे सर्व प्राणी तळ्याच्या काठापासून पर्वतीच्या माथ्यापर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं ठेवले असल्याचे दिसून येतें.

मेजर प्राइस हा इंग्रज गृहस्थ पुण्यास सन १७९१ त कांहीं दिवस होता. त्यानें शिकारखान्यासंबंधीं लिहिलेले वर्णन वाचनीय आहे. तो म्हणतो ' पेशव्यांचा शिकारखाना नमुनेदार आहे. त्यांतील प्राणी उत्कृष्ट आहेत. एक सिंह व एक गेंडा असून ते उत्तम स्थितीत आहेत. ' इंग्रजांचा पुण्यांतील रेसिडेंट सर चार्ल्स मॅलेट यास सन १७९२ त सवाई माधवराव पेशव्याने आपल्या शिकारखान्यांतील खेळ पहाण्यास बोलावले होते. त्यानें जे पाहिले त्याचे वर्णन येणेंप्रमाणें केले आहे. ' मी निमंत्रणावरून दोन वाजतां रमण्याकडे गेलो. तेथें तंबू ठोकला होता त्यांत बसलो. थोड्या वेळाने पेशव्यांची स्वारी आली. ते आल्यावर चार काळवीट सोडण्यांत आले. ते धांवत होते व त्यांच्या मागून अर्धवर्तुळ करून

स्वार येत होते. स्वारांच्या हातांत तांबडी निशाणें फडकत होती. काळवीट तंबूजवळ आल्यावर वाद्ये वाजण्यास सुरुवात झाली. त्या चार काळविटापैकीं तीन काळवीट तंबूंत डौलानें शिरले. ते दोन झोपाळे टांगले होते त्यावर चढले. तिसरा काळवीट आमच्या शेजारी गालीच्यावर बसला. मोठी वाद्ये वाजण्याचें थांबल्यावर नायकिणींचा ताफा पुढें आला. नायकिणी मंजुळ वाद्यांच्या गोड स्वरांत काळविटापुढें नाचू लागल्या. काळवीट गवत खात स्वस्थ मनाने पडला होता. इतक्यांत भिन्न दिसणारा चौथा काळवीट तंबूंत आला व गालिच्यावर निजला. त्याला नोकराने झोपाळ्यावर चढवून झोके दिले. मग त्याला एक हार घालण्यांत आल्यानंतर काळविटांचा खेळ संपला. काळविटांची इतकी तयारी करण्यास सात महिने लागल्याचें पेशव्यानी सांगितलें. ' (Poona in by-gone days) सवाई माधवराव हा सुविद्य व सुसंस्कृत राजपुत्र असल्यानें त्यानें प्राणिसंग्रहांतील जनावरांची निगा उत्तम ठेवली होती, इतकेंच नव्हे तर त्यांतील कांहीं जनावरांना कसरतहि शिकविली होती याविषयीं कोणाचीहि खात्री पटणारी आहे. मॅलेटला प्राणिसंग्रहांतील जनावरें व पक्षी इतके आवडले कीं त्यानें पुण्यांतील एका ब्राह्मण चितार्‍यापासून त्यांची मातीची चित्रे तयार करून घेतली व त्यावरून त्यांची एक तसबीर काढवून ती आपल्या संग्रहीं ठेवली.

पर्वतीच्या पश्चिमेस मोठें रान असून त्यांत सवाई माधवराव शिकारीस जात असे. एकदां बर्‍याच हरणांचा पाठलाग करून त्यानें त्यांतील कांहीं हरणे धरली. माधवरावाबरोबरच्या शिकारी मंडळींत महादजी शिंदेहि होता. त्यानें त्यांपैकीं एक काळवीट पेशव्यापाशीं मागितला; पण माधवरावानें तो देण्याचे नाकारले. त्याला भय पडले कीं, महादजी मांसाच्या लालुचीनें तो मागत असेल. पण महादजीनें त्याची शंका दूर केल्यावर माधवरावानें त्याच्या स्वाधीन काळवीट केला. प्राणिसंग्रहांतील हरिण व ससे यांची संख्या शिकारीनीच वाढली.

शिकारखान्यांतील प्राण्यांचे वर्णन येथवर झाले. त्याखेरीज गाई, घोडे, उंट व हत्ती यांचा उपयोग विशिष्ट कारणासाठीं असल्यामुळें त्यांचा फार मोठा संग्रह पेशव्यांनीं केला होता. उत्तम गुरांची अवलाद जवळ बाळगून त्यांचा प्रसार शेतकरीवर्गांत व सामान्य जनतेंत करणें राज्यकर्त्यांचे कर्तव्य होय. पेशव्यांना स्वतःच्या प्रपंचासाठीं गाईच्या दुभत्याची गरज होती. त्याकरितां व खिलारा-करितांहि त्यांनीं शेंकडों गाई जवळ बाळगल्या होत्या. शनिवारवाड्यांत पश्चिम

अंगास त्यांची स्वतंत्र गोशाळा होती. तिच्यांत ठेवण्यासाठीं नानासाहेबाने कोन्हेर यांस पत्र लिहून पांचशें हणमगाई मागविल्या. ' हणमगाईंचे प्रयोजन हुजूर आहे. तर हणमगाई तरण्या देखण्या चांगल्या पांचशें पत्र पावतांच पाठवून देणें. विलंब न लावणे. ' (पे. द. १८)

येणेप्रमाणें जातिवंत गाई ते खरेदी करीतच. पण त्याशिवाय सदर गाई मोफत मिळण्याचीहि सोय होती. लढाईत शत्रूच्या मुलखांत लुटालूट सुरूच असे. तिच्यांत इतर अनेक मूल्यवान् वस्तूबरोबर गाईहि मिळत. त्या घेऊन येण्यास नानासाहेब पेशव्यानें ता. १६–५–१७६१ रोजीं विसाजी कृष्ण बिनीवाले व हरिगोपाळ याना पुढील पत्रांत लिहिले आहे. ' सरकारांत हणमगाईचे प्रयोजन आहे. तर हणमगाई चांगल्या चार पांचशेपर्यंत घेऊन येणे. तुमचे लष्करांत लुटीची गुरे यंदा पुष्कळ आली आहेत. कांहीं गाई त्यांतून फुकट मिळवाव्या. येणेप्रमाणें करून चार पांचशें गाईंचा भरणा येऊन पोहचेसे करणें (पे. द. ४३).

पेशव्यांच्या हुजूरपागेची जागा आजहि प्रसिद्ध आहे. तिच्यांत दहा हजार घोडे असत. कागदोपत्री या घोडेस्वारांच्या फौजेस हुजुरात म्हणत. या हुजरातीची ५२ पथके होती. त्यावर ढेरे, ढमढेरे, पवार, विंचुरकर, पुरंदरे, सचिव, थत्ते यासारखे सरदार असत. लढाईत आणीबाणीच्या वेळीं ही हुजरात पुढें सरसावयाची. हुजूरपागेप्रमाणेंच खुद्द शनिवारवाडयांत गोशाळेशेजारी घोडयांची पागा होती. या दोन्ही पागातील घोडे निवडक असून शनिवारवाडयांतील घोडे खाशांच्या स्वारीचे असत. नानासाहेब पेशव्याजवळ त्याचा एक लाडका कुमेद [एकरंगी] घोडा होता. त्याला रोजची चंदी दीड पायली हरभऱ्यांची होती, व मोतद्दाराचा पगार दीड महिन्याला तीन रुपये होता. असल्या घोडयांच्या किंमतीहि दीड दोन हजारापर्यंत असत. नाना पुरंदऱ्यानें पेशव्यास पत्र लिहून एका घोडीची किंमत कळविली. तो लिहितो, ' जठार [हे] राजश्री सटवोजी जाधवराऊ यांजकडे आहेत. त्याजपाशीं घोडी कर्डी दुवेत आहे. आमची चंद्रभागा घोडी होती तिजएवढी आहे. घोडी थोर आणि कोवळी आहे. ते साडेसतराशे रुपयास खरेदी हुजूरपागेस करून आम्ही आपणांस बसावयासी ठेवली आहे ' [पे. द. १८] घोडी हुजूरपागेच्या नांवावर घेतली पण ती हुजूरपागेत न बांधता आपल्या घरींच ठेवली तरी त्यांत शिस्तीचा भंग होतो असे समजले जात नसावे.

कांहीं चांगले घोडे परमुलुखांतून आणावे लागले तरी सगळया घोडयांचा पुरवठा बाहेरून करणें दूरदर्शीपणाचे नसल्यामुळें जातिवंत अवलाद निपजण्याकरितां पेशव्यांना व सरदार मंडळीना वळू घोडे पदरी बाळगण्याची आवश्यकता होतीच. पेशव्यापाशीं वळू घोडे होते, त्याचा पुरावा असा ' वळू घोडयाचा दररोजचा खुराक १। पायली हरभरे, १ शेर मीठ, अर्धाशेर तूप ' पावशेर साखर दोन टाक मिरे. ' [पे. द. २२]

पेशव्यांचा हत्तीकरितां पीलखाना अगदीं स्वतंत्र होता. त्यांत शंभर हत्ती असून त्याजवर भगवंत परसजी हा सरदार, अल्ली हा मुख्य महात व रामचंद्रपंत गाडगीळ हा कारकून होता. (इ. सं.) नानासाहेब पेशव्यास कृष्णाजी गोविंद गोरे याने पत्र लिहिलें त्यांत पुण्यात असलेल्या कांहीं हत्तींचे गुणरूपवर्णन आहे. ' पुण्यांत प्रस्तुत हत्ती आहेत—नर-फत्तेलष्कर मस्त [आहे] फत्तेजंग मस्त, रुस्तुमगज मस्त, वेंकटपति नवा, महासुंदर, कृष्णगज, बाल सुंदर, ममोक, फत्ते मुबारक, कूवरगज. हत्तिणी-आंधळी हत्तीण, कोकिळा ब॥ कृष्णराव, तख्त रावा हत्तीण ब॥ रागबा, बचेवाली ब॥ नरसिंगराव विठ्ठल, सिसफूल बची ब॥ नरासिंगराव.

येणेप्रमाणें आहेत त्यामधीं रुस्तुम गजाचे मस्तीचा जोर फारच चांगला दिसतो. वरकड फत्तेलष्कर व फत्ते जंग हे तो सर्वदा मस्तच असतात. विदित जाहले पाहिजे. हात्ती वेंकटपतीस पेडोल लावावयासी मौजे हडपसर येथें घेतला आहे. येका दो दिवसा लावतील. ' (पे. द. १८) पीलखान्याकडे एकंदर खर्च किती होत असे याचे वर्णनहि सांपडते. अर्थात् ते वरील सर्व हत्ती व हत्तिणी यांच्या वेळचे आहे असे नाहीं. ' पीलखान्याकडे २९०॥ रु. खर्च. तपशील २० रु. खुदाबक्ष [हत्ती], १५॥ रु. आलाबक्ष, २१ रु. फत्तेलष्कर, २१ रु. भवानी प्रसाद, २१ रु. गजराज, १४ रु. फत्ते मुबारख, १६ रु. रामबाण, १६ रु. महबूब गंज, १६ रु. अलीमदत, १६ रु. मोतीगज, ८ रु. तख्तगौरी, ११ रु. सुंदरी. [या हत्ती-हात्तिणींच्या बंदोबस्ताकरितां] ४ रु. पखाली, २४ रु. बारगीर, ६७ रु. शिलेदार लंपी [रु. ७ खंडोजी चौधरी, ६० रु. बैल १२ दर ५] [पे. द. २२]

या यादींतील व पूर्वीच्या यादींतील हत्ती-हत्तिणीत बरीच तफावत पडली आहे. त्यांजकरिता येणारा खर्च तत्कालीन इतर खर्चाप्रमाणेंच माफक आहे.

तो दरमहाचा अगर दीड महिन्याचा असावा. हत्तीच्या महाताना [दरमहा अगर दीडमहा] पगार ११ ते २० रु.पर्यंत असे. [सन १७५४ पे. द. २२] हत्ती हा प्राणी फार मौल्यवान् म्हणून त्याला माणसाच्या जिवापलीकडे जपत. तो आजारी पडला असता औषधोपचार करण्यांत येईच, पण तेवढ्यावर विसंबून न रहाता नवसाचा शेवटचा इलाजहि वगळला जात नसे. ' मोती गज व मनोहर हे पेशव्यांचे दोन हत्ती आजारी असतांना जेजुरीच्या मार्तंडास नवस करण्यांत आला. ते हत्ती बरे झाल्यानंतर श्रीस ४०० रु. भंडारा व मेवामिठाई वाटण्यांत आली [सन १७७३ पे. द. २२]

हत्तीच्या चाऱ्यापाण्याची सोयहि विशेष प्रकारची करावी लागे. त्यांजकरितां खास ऊस लावण्याविषयीं थोरल्या माधवरावाने नाना फडणविसास आज्ञा केली ती अशी ' विनंति उपरी. पुण्याचे आसपास हत्तीकरिता ऊस लावावा. मौजे कोलवडीस तीस बिघे, मौजे हडपसर वीस बिघे.' [पे. द. सन १७६९] उष्टरखान्यावरील अधिकारी गणपतराव मोरेश्वर या नांवाचा असून त्यांत उंट अजमासे एक हजार होते. [इ. सं.]

प्रकरण चवदावें

फुलबागा व फळबागा

शाहू महाराजापूर्वी महाराष्ट्रांत नाव घेण्याजोग्या फुलबागा व फळबागा अगदी विरळा होत्या; त्यांजकडे लक्ष पुरविण्यास पूर्वीच्या महाराजाना स्वास्थ्य नव्हते. शिवापूरची शहाबाग ही शिवकाळांतील प्रसिद्ध फळबाग होय. नाना जातींची फळे व नाना पारमिळांची फुले लोकांच्या पहाण्यांत येत नव्हती. महाराष्ट्रांत आंबेफळ जातिवंत पैदा होण्याजोगे. तसेंच सुंदर, सुवासिक फुलांच्या तरुलतांची लावणी करण्यास जमीन व पाणी यांची चांगली अनुकूलता. परंतु राजाकडून उत्तेजन न मिळाले तर हे आनुकूल्यहि निरुपयोगी ठरून किरकोळ रायवळ आंबे, आंबट बोरे, पिंपळीएवढी जांभळे व डोंगरबारीची करवंदे यावरच मनुष्यास तृप्त राहण्याची पाळी यावयाची. तसेच ओढ्याच्या दरडी झाकून टाकणाऱ्या कण्हेरी व पानें गळून गेल्यावर नुसत्या पांढऱ्या फुलांच्या छत्र्या उघडणारे चाफे यांच्याच वासाला मनुष्याने सुवास समजावयाचा. ही हीन दशा शाहू महाराजाना सहन झाली नाहीं. त्यानी औरंगजेबाच्या आश्रयास असता उत्तमोत्तम फळाफुलांचा आस्वाद घेतला होता. साताऱ्यास आल्यावर त्याना स्वदेशाची अनेक दिशानी सेवा करण्याची वासना होऊन त्यास मनोहारित्व आणण्याचा त्यानी उत्साहपूर्वक उद्योग आरंभिला. दिल्लीच्या बादशहाचे दक्षिणेतील सुभेदार औरंगाबादेस रहात असल्यामुळें औरंगाबाद ही दुसरी दिल्लीच बनली होती. म्हणून कोणताहि दुर्भिळ जिन्नस लागला असतां त्याची गरज भागवू इच्छिणारास औरंगाबादेकडे पाहिल्याशिवाय गत्यंतर नसे. सन १७२४ पर्यंत निजाम उल्मुल्कहि औरंगाबादेंतच रहात होता. त्या साली हैदराबादेचा एक सुभेदार मुबारिज याचा मोड करून त्यास निजामाने बुडविले व आपली राजधानी औरंगाबादेहून हैदराबादेस नेली. तरीसुद्धा औरंगाबादेचे महत्त्व पुढे बरीच वर्षे टिकून असल्यामुळें मराठे त्याना हव्या असणाऱ्या उपभोग्य वस्तू तेथूनच मागवीत. शाहू औरंगाबादेचा पक्का माहितगार. त्याने त्या शहराहून फळझाडांच्या व फुलझाडांच्या हुंड्या वारंवार आणवाव्या. थोरला बाजीरावहि मोठा विलासप्रिय

होता. तो व त्याचा एकनिष्ठ भाऊ चिमाजीआप्पा यांचे त्यास या कामी बहुत सहाय्य झाले. या त्रिकूटास एक चौथी व्यक्ति येऊन मिळाली. तेच ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर हे होत. स्वामींना राजाप्रमाणें सर्व प्रकारच्या ऐश्वर्याचा व ऐष-आरामांचा हव्यास होता. अशा या चौकडीने एकमेकांच्या सहकार्याने महाराष्ट्रास वृक्षवेलींनी नटवून, पुष्पगंधाने दरवळून व विविध वर्णांनीं रंगवून रमणीयत्व आणिले. या दृष्टीने शाहू महाराजांच्या रोजनिशींतील खालील उतारा वाचनीय आहे. त्यांतील मजकूर बाजीरावास उद्देशून लिहिला आहे.

'राजश्री प्रधानपंत यांस-हर जिन्नस झाडे औरंगाबादेहून आणविली आहेत. तरी आपणाकडील कमाविसदारास ताकीद पत्रे देऊन गावगन्ना वेठे बरोबरी देऊन झाडे हुजूर पावतें करणे. झाडे तपशील—विही, शेव, अळू, शफताळू, बेदाणा, नाशपाती, गलगल, चकोतरा, कौला, संगतरा, कमरंद, फणस, बदाम. फुलझाडे—केतकी, मदपोय, बटमोगरा, सुरू, बनमजसली.'

या यादींतील कांहीं झाडांची रोपे उदाहरणार्थ फणस, केतकी, अळू इत्यादि महाराष्ट्रांत इतरत्र मिळाली नसती असें नाहीं. परंतु सोयींत सोय म्हणून इतर दुर्मिळ रोपाबरोबर तीहि आणविण्यांत आली. कौला संतरा या फळांची प्रतिष्ठा आज विशेष असून कांहीं वर्षापूर्वी ती पुण्याच्या भोंबर भागाखेरीज करून महाराष्ट्रांत इतरत्र पैदा होत नव्हती. सदर फळांचा प्रवेश महाराष्ट्रांत अलीकडचा नसून त्याचे श्रेय शाहू महाराजास आहे हें लक्षांत ठेवण्यासारखे आहे.

महाराजांनी झाडासंबंधाचा तगादा बाजीरावास नेहमी करावा. त्यामुळें असतील नसतील तेथून झाडांची रोपे आणविणें हें बाजीरावाचे एक कर्तव्यच होऊन बसले होते. पिलाजी जाधव हा बाजीरावाचा परम विश्वासू सरदार. त्याची स्वतःची बाग होती. शिवाय त्याला पुणे प्रांताची पूर्ण माहितीहि होती. म्हणून नारिंगीच्या रोपांचे पत्र महाराजाकडून येताच बाजीरावाने तो लकडा पिलाजीच्या मागें लावला. महाराजाना नारिंगीची पन्नास रोपें हवी होती. त्यावरून बाजीरावाने पिलाजीस लिहिलेल्या पत्रास पिलाजी उत्तर लिहितो. 'आमचे बागांत नारंगीची रोपे नाहींत. जवळपास आणखी कोण्हाकडील बागांत मिळावयाचे कठीण. याकरितां मुजरद जासूदांची जोडी शहरास नारंगीची रोपे आणावयास पाठविली आहे. रोपे येताच पाठवून देऊ.' [पे. द. १८] या पत्रां-

तील शहर हा शब्द औरंगाबाद या अर्थी आहे. पुणे प्रांतांत नारिंग्या नाहींत असें आढळून आल्यावर पिलाजीने त्यांची रोपे आणविण्याकरिता जासूदजोडी औरंगाबादेस रवाना केली.

जें कमी पडेल ते औरंगाबादेहून आणवावयाचे हा प्रघात बाजीरावाच्याच काय पण थोरल्या माधवरावाच्या कारकिर्दीतहि चालूच होता. सन १७६८ मध्ये त्या अर्थाचा मजकूर आढळतो ' पुण्यांतील बागेंत लावण्याकरिता औरंगाबादेहून ७५ रुपयास २५ सुरूची झाडे आणविण्यांत आली ' [पे. द. २२] असो. शाहूने औरंगाबादेहून रोपे आणविली. त्यांची लावणी त्याने सातान्यांत केली असेलच; पण सातान्याच्या आसपास पाण्याची सोय पाहून इतरत्रहि बागा त्याने लावल्या होत्या. आरळे हा गांव सातान्यापासून ईशान्य दिशेस कृष्णा काठी आहे. त्या गांवाजवळ बाग सजवून तिच्यांत वरील जातीच्या झाडांचा प्रसार करण्यांत आला. या बाबतींत नाना व भाऊ [पेशवे] यांस नाना पुरंदऱ्याने पत्र लिहिले ते असें ' आरळ्याच्या बागांत काय काय फुलझाडे लावली ते लिहिणे म्हणून आज्ञा. त्यास जाई व मोगरा, शेवती, जासुंदीची झाडे, याप्रमाणें आरळ्याच्या बागांत लाविली. नुन्याच्या बागात साखरनिंबे, नारिंगे व पेरू येणेप्रमाणें लावले. धावडशीच्या बागेपैकी लहान गुलाबी जांबाची रोपे आसली तर पाटीमधे घालून माफजतीने पाठविणे आगर कुंडाल्यात घालून पाठवून देणे म्हणून आज्ञा. त्यास धावडसीस माणूस पाठवून गुलाबी जांबाची रोपे आणून लिहिल्याप्रमाणें पाठवितो. पेरूची रोपेहि पंचवीस नुन्यात लावली. वरच्यावर कलमे आणून लावणी होतच आहे. ' (पे. द. १८)

आरळ्याप्रमाणेंच धावडशी, नुने ही गांवे सातान्याजवळची. सातान्यापाशी पाटस्थळाचे व मोटस्थळाचे गांव बरेच आहेत. कृष्णातीरहि नजीक आहेच. कृष्णातीरीहि बागायत गांव आहेत. त्यापैकीं लिंब [निंब] हा गांव प्रसिद्ध होय. लिंब हे नांवहि त्या गांवास लिंब फळाच्या ख्यातिवरून पडले असावे. लिंबचा पेरू आजहि त्या भागांत नामांकित आहे. लिंब गांव आजहि सातान्याच्या महाराजांचा इनामी आहे. त्या गांवात पेरू, साखरलिंबे, नारिंगे यांची लागण याच सुमारास झाली असेल. धावडशी गांव डोंगरकठाडीला पण बागायती आहे. त्या गांवी तेथील शोभा पाहून ब्रह्मेंद्रस्वामी यानी कायमचे वास्तव्य

केले. तो गांवहि स्वामींच्या देवस्थानाकडेच इनामी आहे. त्या गांवी महाराजांचे बाग असून ब्रह्मेंद्रस्वामीहि तेथे राहून बागबगीच्याचा षोक पुरवीत होते. स्वामींचा हा षोक त्यांच्या पत्रानीच प्रतीत होतो. स्वामी आपले सच्छिष्य चिमाजीअप्पा यांस लिहितात ' बनसोड आंबा आला आहे. त्याचे आंबे सुमारें १०० व त्याखेरीज आणखी इरसाल आंबे १०० एकूण दोनशे आंबे धावडशीस पाठवावे. बहिरंभटोंने आम्हास महाळुंग भेटीस ठेवले. त्याचे झाड कोणे ठिकाणी आहे त्याचे ठिकाण लावणे. आम्ही धावडशीस जाऊ तेव्हां त्याचे डहाळ्यासाठीं माणूस पाठवू ' [पे. द. १८]

ब्रह्मेंद्रस्वामी एखाद्या संस्थानिकाप्रमाणें डामडौलाने रहात असत. त्यानीहि ठिकठिकाणाहून शोधपूर्वक शाकभाजा, फळझाडे व फुलझाडे यांची रोपे मागवून धावडशीस उत्तम बागशाई बनविली होती. ते स्वतः त्यांचा उपभोग घेत व आपल्या शिष्यवर्गांकडे ते पाठवून त्यांसहि संतोष देत. त्यानी आपल्या बागातील हुंड्या मराठमंडळाकडे रवाना करून त्याना हरतऱ्हेच्या झाडांची लावणी करण्यास प्रोत्साहन दिले. स्वामीना बागांचा हव्यास एवढा मोठा होता कीं धावडशीची त्यांच्या ताब्यातील जमीन त्याना पुरेना म्हणून शाहू छत्रपति मिरजेच्या मुक्कामी असता त्यांजपाशी त्यानी आंब्याचा बाग लावण्याकरिता धावडशीजवळ एक चाहूर जमीन मागितली होती. स्वामीना हवी तेवढी जमीन महाराजांकडून मिळालीच असेल, असे त्यानी चिमाजीअप्पास लिहिलेल्या पत्रावरून वाटते. त्या काळीं बनसोड आंबा नामांकित होता. त्याची रोपे धावडशीच्या बागांत लावण्याचा त्यांचा फार मानस होता. म्हणून त्यांनी त्या जातीच्या आंब्याच्या थोड्या थोडक्या नव्हेत तर पाचशे आटोळ्या चिमाजीआप्पाजवळ मागितल्या. चिमाजीने स्वामीना फक्त पाचच बनसोड आंबे पाठविले म्हणून स्वामी रागाने लिहितात. ' तुम्ही आंबे बनसोडीचे पाच पाठविले. आणखी पाठवावयास नव्हते कीं काय ?......बनसोडीचे आंब्यांच्या आटोळ्या असतील त्या पाचशे पावेतो पाठवाल त्या कार्याच्या आहेत. ' [ब्र. धा, च.] स्वामीनी जमिनी संपादून व झाडे लावून धावडशीस इतक्या उत्कृष्ट बागा तयार केल्यावर त्यांतील रोपे ते इतराना लावण्याकरिता देऊ लागले. स्वतःच्या बागा बनवाव्या व इतरानाहि बनवावयास लावाव्या असा त्याना बागशाईचा नाद होता. त्यानी मल्हारराव होळकरास ' नारळे दहा

लावावयासी, सुपारीची झाडे ४०, भोईचाफ्याची पांच पाठविली व पिलाजी जाधवास कुंदाची व बटमोगऱ्याची रोपे दिली. ' स्वामी स्वतः अन्न ग्रहण न करता गोमूत्र, दूध, ताक व फळे भक्षून रहात असल्यामुळें त्याना फळझाडांची गरज होती. पण त्यांच्या बागांत सगळया प्रकारची फळे होत नसत. म्हणून ते आपल्या शिष्यगणाकडूनहि फळे मागवीत. एकदा चिमणाजी आप्पाने त्यांस अच्छेर नवी द्राक्षे व अच्छेर जुनी द्राक्षे पाठविली होती. जसा स्वामींना शिष्यांकडून परोपरीच्या जिनसांचा नजराणा येत असे तसे तेहि त्यांजकडे आपल्या बागबगीच्यांतील फळे व शाकभाजा धाडून देऊन आदरसत्कार करीत. चिमणाजीआप्पाचा मुक्काम एकदा कांहीं दिवस साताऱ्याच्या आसपास पडला होता. तेथून धावडशी जवळ असल्यामुळें स्वामी चिमणाजीस फळफळावळ व माळवे आवर्जून पाठवीत व चिमणाजीहि एखाद्या वेळीं ते पाठविण्यास कदाचित् विसरतील म्हणून मागवून घेई. चिमणाजी स्वामींना कळवितो ' फणस १ कापा १ बरका, काशीफळ काशी भोपळा १ केळघड केळी सुमार ४१ केळफुल एक येणेप्रमाणें पाठविले ते पावले. आपले प्रसादाची शाक भक्षू म्हणजे तेणेकरून रोग सर्व दूर होतील. दोहो दिवसा तिही दिवसा शाकभाजी वरचेवर पाठविण्यास आज्ञा केली पाहिजे......बागांत होत जाईल त्यांतील पाठविणे तें पाठवीत जावी. ' [ब्र. धा. च.] ब्रह्मेंद्रस्वामी व शाहूमहाराज परस्परांचें स्वभाव ओळखून होते. महाराजाना जी आवड तीच स्वामींना, यास्तव स्वामींनी महाराजाकडेहि आपल्या बागातील रोपे पाठवावी. स्वामींच्या या षोकाची स्तुति महाराजानी योग्य अशा शब्दानीच पुढीलप्रमाणें केली आहे. ' स्वामी देवालये, वापी, कूप, तटाके, झाडझाडोरा लावतात हे कीर्ति अक्षय करिजेती, यापेक्षा उत्तम काय आहे ? आम्हासहि या गोष्टीचा बहुतसा संतोष आहे. स्वामींनी आणनसे व कण्याचे रोप पाठविले तें पावले. ' [पे. द. १८]

पुण्याजवळच्या शिवापूर येथील शहाबागेची तिच्यांतील मासलेवाईक व इरसाल आंबेफळाविषयीं प्रसिद्धी आहे. शाहूमहाराजांची इच्छा सर्व महाराष्ट्रभर या फळांची लागण व्हावी अशी होती. म्हणून त्यांनीं बाजीराव व चिमणाजीआप्पा यांस पत्रें लिहून शिवापूरचे आंबे गावोगांव रवाना करविले व मुलखांतील कुणब्याकडून त्यांची लावणी करून घेण्याचे सक्त प्रयत्न केले. महाराजांच्या आज्ञेवरून त्यांच्या जवळचा कारकून बाजीराव व चिमणाजी आप्पा यांस

लिहितो. ‘ शिवापूर येथील खासगत बागापैकीं आंबे सुमारे १० हजार स्वामीचे जिल्हेंत गांवगन्ना लावणीस दिले हे वर्तमान पहिले तपसीलवार सेवेसी लिहिले होते. प्रस्तुत आंब्याचे कागद बागावरील कमाविसदारास देऊन पाठविले आहेत. तरी स्वामींनी आंबे आणवून तमाम गांवगन्ना वांटणी करून लावणीस द्यावे. आणि कुणबियास दहशत पडे आणि लावणी मुलकांत आंब्याची होये ते अगत्यरूप करावे. येविसी स्वामी [शाहूमहाराज] वारंवार आज्ञा करितात. यास्तव आम्हीहि सेवेसी लिहितो.’ शाहूमहाराजांनीं महाराष्ट्रास रानटी स्थितींतून सुसंस्कृत स्थितींत आणण्याचा उद्योग केवढा चालविला होता याला आणखी प्रमाण कोणते पाहिजे ?

आंब्याप्रमाणें नारळींचाहि षोक शाहूमहाराजास होता. महाराजांनीं साताऱ्याहून नाना पुरंदरे यांजमार्फत नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे यांना कळविल्यावरून त्यांनी साताऱ्यास नारळींचीं ४७ रोपे पाठविली. ती आल्यावर पुरंदऱ्यांनीं सुपारीचीहि रोपे त्यांस धाडून देण्यास लिहिले. [पे. द. ३२] साताऱ्यास नारळीची व सुपारींची झाडें घरोघरीं आहेत. त्यांचा उगम शाहूच्यावरील उद्योगांत सांपडतो.

शाहूमहाराजांच्या पश्चात् पेशव्यांनीं त्यांचे कार्य अखंड चालविले. महाराजांच्या कारकिर्दीत सातारा प्रांती बागबगीचे झाले. पुढें पेशव्यांनीं पुणे ही आपली राजधानी केल्यावर त्यांत व इतरत्र बागा लावण्याकडे लक्ष पुरविले. बाजीराव व चिमणाजी आप्पा यांनीं आपल्या कारकिर्दीत गावोगांव आंब्याची झाडें लावण्याचा प्रयत्न केला तसा आपल्या कारकीर्दीत व्हावा अशी नानासाहेबाची इच्छा असून त्याने ती पुढीलप्रमाणें व्यक्त केली आहे, ‘ रावाआपाचे वेळेस गांवोगांव...आंबे लाविले ते जाले. पुढें अगदीं न जाले. त्यास जुन्नर, पुणें, खानदेश, गंगथडी, बालेघाट सर्वत्र ताकीद असावी. गांव पाहून शेदोनशे झाडे वर्षास लावावी......दहावीस हजार जमा कमी होईल. परंतु आंबराई फार होईल. यांत लौकिक व पुण्य आहे व कोणाचाहि द्वेष नाहीं. उत्पन्न होईल. ’ [पे. द. ४०] हा सार्वत्रिक प्रयत्न, पण त्याशिवाय पेशव्यांच्या खासगी बागा कित्येक होत्या.

‘ अहमदनगर जिल्ह्यांत संगमनेर येथें खास बाग, बारवबाग व रुस्तमबाग अशा बागा सन १७७२ त होत्या. [पे. द. २२] संगमनेराहून बाळाजी महा-

देव हा लिहितों, ' पौष शु. १ मुक्काम संगमनेर जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. राहुरीची बोरे इरसाल डाली एक पाठविली आहे, ते प्रविष्ट होईल.' [पे. द. १८].

चांगला जिन्नस कोणापाशी असला म्हणजे त्यानें तो आपल्याहून श्रेष्ठ अगर आपल्या बरोबरीच्या माणसाकडे पाठवावा ही जुनी रीत आहे. नानासाहेब पेशव्यास ताराबाईकडून पुढील जिनसा आल्या, ' श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब यांनीं स्वामिकारणे मुरंबा आंब्याच्या घागरी सुमार तीन व आवळ्याची [मुरावळ्याची] घागर एक एकूण चार घागरी. बहुत उत्तम चांगला. आपण सेवावा असा हेतु धरून तयार करून हुजुरियाबरोबर पाठविला आहे. व इरसाल आंबे डाल्या सात एकून तीनसे आंबे उत्तम म्हणून पाठविले आहेत. एतद्विषयी श्रीमंत महाराज मातुश्री साहेबांचेहि पत्र स्वामीस आहे ' [पे. द. १८] अशा रीतीनें महाराष्ट्रांत आंब्यांची व इतर फळांची चंगळ उडूं लागली होती.

फळाप्रमाणें फुलांचा व इतर विलासी वस्तूंचा प्रसार वाढल्या प्रमाणावर असून त्यांच्याहि बागा तयार झाल्या होत्या. पेशव्यांचा मुक्काम स्वारींत जवळपास जेथें असेल तेथें जरूर त्या वस्तूंची डाक बसविलेली असे. त्या वस्तु या व्यवस्थेनें टप्याटप्यानें येऊन पोंचत. ' श्रीमंत राजश्री नाना स्वामीकडे गुलाबाची फुले पाठवावयास बाबूराव शिंदे याचे रावतांची डाक बसविली आहे. त्यास मागाहून कारकून व कोठें कोठें डाक बसली आहे याची याद पाठविली जाईल. ' (पे. द. १८) याच अर्थाचे अंताजी नारायण यास पुढील पत्र आहे. ' पोष्य बाळाजी बाजीराव......चिकाचे पडदे थोर व लहान करावयाविषयीं पूर्वीं लिहून पाठविले होते. त्यावरून तयार केलेच असतील. त्यांपैकीं तीन पडदे थोर पाहून पाठवून देणें. राऊताची डाक बसविली आहे, याजबराबर फुले बागेपैकीं दररोज पाठवीत जाणे. लौकर येथें येऊन पोचत ऐसी डाकेचे राऊतास ताकीद करणें. वाळ्याचे पडदे दोन पाठविणें व आणखी वाळा आणून दोन तीन पंखे उत्तम करून पाठविणें. ' (पे. द. १८)

वर निर्दिष्ट केलेल्या बागाशिवाय पेशव्यांच्या किती तरी इतर बागा होत्या. त्यांपैकीं सुपे, आंबी व पुणें येथील बागांची नांवे खालील पत्रांत आहेत. हें पत्र अंताजी नारायण यासच लिहिले आहे. ' सुप्याचे बागात वाळा नाहीं. आंबीचे अदसरे वाळा व येथील बागातील सहा सात शेर वाळा निघाला आहे. त्या चे

पडदे व पंखे काय जे होतील ते करवून पाठवितो, म्हणोन लिहिले ते कळले. ऐशास वाळा येथें सांपडला आहे. त्याचे पडदे व पंखे होतील ते तयार करून पाठविणें व भेलशाचे स्वारीचे पंखे व पडदे जे वाळयाचे असतील ते कुल पाठवून देणें ' [पे. द. १८] पुण्यात हिराबाग इतर बाग व कोथरूड येथेंहि बाग होते. त्याजवर बाजी गणेश या नांवाचा अधिकारी (सन १७६७) असून बागाकरितां ठेवलेल्या माळयांचा मासिक रोजमुर प्रत्येकीं ४॥रु. ते ६ रु. होता. पुण्यांत ' पेसवीयानी इनामकी पाटलाची तेथें विहीर करून बाग केला असे. त्यांत पानवेली (सन १७७२) लाविल्या आहेत. ' (पे. द. २२).

पानवेली म्हणजे नागवेली यांचा मळा पेशव्यांना करण्याचे कारण नव्हते. विड्याची पाने त्यांना इतर प्रकारें दुर्मिळ नव्हती. असें असतां त्यांनीं पानमळा लावला तो वेगळया हेतूने. आपल्यास नित्याचा जिन्नस लागेल तो विकत न आणतां स्वसत्तेचा असावा अशी जी तत्कालीन रीत तिला अनुसरूनच पेशव्यांचा हा उपक्रम दिसतो.

राघोबादादानेहि बागबगीच्याकडे लक्ष पुरवून झाडांची निगा चांगली ठेवली होती. तो स्वारीवर असतां त्याला पुण्यांतील अधिकारी जिवाजी गणेश यानें पुढील पत्र लिहिले. ' हिराबाग वडगांव येथील समाचार घेत जाणे. वेलाची झाडें यांची निगा करणें म्हणून (आपली) आज्ञा. आज्ञेप्रमाणें बागेचा समाचार घेऊन झाडांची निगा करवितो. सदैव पत्री कुशलार्थ लेहून आज्ञापत्र सादर करणार स्वामी समर्थ आहेत. त्या प्रांती कांहीं अपूर्व जिन्नस असले तरी त्याचे बीज बागेंत पेरावयासी पाठवावयाची आज्ञा करावी. ' (पे. द. ३२) पेशवे व दुसरे कोणी मराठमंडळांतील सरदार परमुलुखांत संचार करीत असतां त्यांचे लक्ष तिकडील निवडक जिनसांचा महाराष्ट्रांत संग्रह वाढविण्याकडे कसे असे व त्यांचे हाताखालील अधिकारीहि त्याविषयीं किती आस्था बाळगीत असत याचे हें प्रत्यंतर होय.

सन १७४७ त पुणें येथें व पुण्याच्या आसपास पेशवे व त्यांचे सरदार आश्रित यांचे ३१ बाग होते. त्यांत दक्षिण व पश्चिम या दिशांना पुढीलप्रमाणें बाग होते. ताईचा बाग, बाईचा बाग, धोंडोपंत जोगळेकर, जिवाजीपंत, महादोबा यांचे बाग, बाईचा बाग पर्वतीचे बंगल्याजवळील, विसाजीपंत, श्रीपतराव बापूजी, शिदोजी राऊत, पुरंदरे भट, पाटणकर चिमणाजी भीवराव यांचे बाग,

अंताजीपंत, गोविंद हरि, सदाशिव भट दीक्षित, रामजी मल्हार, वासुदेव जोशी, शंकराजीपंत, मल्हारजी होळकर, शिवरामबाबा चित्राव यांचे बाग, कबुतर-खान्याजवळ सरकारचा बाग, बाजी भट शाळिग्राम कोन्हेरपंत, भिऊबाई यांचे बाग, उत्तरेकडील व पूर्वेकडील तीन सरकारचे बाग निसबत आनंदराव, महि-पतराव, आयाबा, मल्हारजी होळकर यांचा संगमावरील बाग, सुभेदाराचा व राणोजी शिंदे यांचा बाग. या यादींत ताईचा बाग हा बाजीरावाची बायको काशीताई हिचा व बाईचे बाग म्हणजे नानासाहेबाची बायको गोपिकाबाई हिचे बाग दिसतात. भिऊबाई ही बाजीरावाची बहीण असून तिचा बाग होता तसा गोविंद हरि पटवर्धन याचाहि बाग होता. मल्हारराव होळकरांचे दोन व राणोजी शिंद्याचा एक बाग होता. वरील २९ बागाशिवाय वानवडीचा व त्रिंबक-राव मामाचा असे दोन बाग नमूद आहेत. (पे. द. ४०)

सन १७९१ त पुणें व पुण्याच्या आसपास पेशव्यांच्या बागा पुढीलप्रमाणें होत्या. १ हिराबाग २ सरसबाग [पर्वतच्या तळ्यांतील] ३ वसंतबाग ४ मोतीबाग ५ पर्वतीबाग, ६ बंगला बाग ७ वानवडी-बाग ८ हिंगणे-बाग ९ रमणा-बाग १० वडगांव-बाग ११ माणिक-बाग १२ पाषाण-बाग १३ कात्रज-बाग. या बागांपैकीं हिराबाग ही विशेष प्रसिद्ध असून तिच्यांत इतिहासदृष्ट्या बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. सदर बाग नानासाहेब पेशव्याने सन १७५५ त तयार केली. तिच्यांत येऊन पेशवे वसंत पंचमीचा उत्सव साजरा करीत. पहिल्या माधवरावाच्या कारकीर्दींत मोठाल्या मेजवान्या येथेंच देण्यांत आल्या. सवाई माधवराव व दुसरा बाजीराव यांच्या काळीं युरोपियनांना येथेंच मेज-वान्याना बोलावण्यांत येत असे. पेशव्यांच्या शिवाय नानाफडनवीस, मोरोबा दादा, हरिपंत फडके इत्यादिकांच्या बागा पुण्यात असून त्यांत मोरोबादादाचा बाग उत्कृष्ट होता. (Poona in by gone days) दुसऱ्या बाजीरावाच्या आमदानींत त्याचा कारभारी त्रिंबकजी डेंगळे यानें सदाशिव भिकाजी व हरि भगवंत यांस पुढील हकीकतीचे पत्र लिहिले, ‘ येमा बनकर याजकडे आंब्याचे पन्हेऱ्याबद्दल ३८ हजार रुपये म्हणोन लिहून पाठविले आहे. त्याप्रमाणें तुम्ही बनकर याजकडे भरणा करून पावती घेऊन पाठवून देणें ’ [पे. द. ३२] ३८ हजार रुपये आंब्याची रोपे खरेदी करण्यास खर्च झाले. यावरून हजारो रोपे बाजीरावानें घेतली असल्याचे सिद्ध होते. ही कोणी

व कोठे लावली कोण जाणे ! बाजीरावानें बंगलाबागेकरितां सन १८१३ सालीं फलमेवा व फुलझाडे अवरंगाबाद व पुणें येथें खरेदी केली. त्यांत पुढील कांहीं झाडांचा उल्लेख आहे. ' ४५७ कौली संतरी ५०५ द्राक्षी, १०० अंजीर, १४२ डाळिंबी, २५७ पेरू, ८२१ मोतीया, २०० गुलाब, ३७२ बेलिया, १७०० पिवळी जाई, २०० पोपये, १५०० हदगा, ३५८ मदनबाण, २५ सोनचाफा, १८ रामफळ, २५ बटमोगरा, १ दवणा, १ पांच ' [पे. द. ३२] सांप्रत पुण्यासभोवती वरील बहुतेक सर्व फळझाडांची व फुलझाडांची गर्दी दृष्टीस पडते. संतरे, मुसंबे, अंजीर, डाळिंबे, पेरू, पोपया या फळझाडाची लावणी पुरंदर व हवेली तालुक्यांत इतक्या मोठ्या प्रमाणावर झाली आहे याचा उगम बाजीरावाच्या वरील प्रयत्नातच हुडकला पाहिजे.

प्रकरण पंधरावें

दागदागिने व जडजवाहीर

त्याकाळीं कपड्याइतकेच किंबहुना त्याहिपेक्षां जास्ती दागिन्यांचे महत्त्व होते. वरिष्ठ वर्ग सोडल्यास सामान्य जनतेत कपड्याची वाणच असे. खेरीज एकंदरींत उष्ण हवेमुळें कपडेहि निसर्गतः थोडें लागत. परंतु सौंदर्याची आवड मनुष्यमात्राला सर्वकाळीं सारखीच आहे. परिस्थितीचा परिणाम इतकाच कीं सौंदर्याच्या साधनांत फरक व्हावा. सांप्रत यंत्रकलेनें मुबलक करून सोडलेला कपडा श्रीमंतापासून गरीबापर्यंत प्रत्येकाला भरपूर पेहेरण्यास मिळतो व त्याची ज्याला त्याला आपल्या मगदुराप्रमाणें हौस भागवितां येते. त्यातच पाश्चात्यांच्या संसर्गाची व अनुकरणाची भर पडून स्त्री-पुरुषांचे लक्ष दागिन्यावरून उडून कपड्यावर जडले आहे. तसेंच बदललेल्या आर्थिक परिस्थितींत श्रीमंताला आपला पैका दागिन्यांत अडकवून टाकण्यापेक्षां व्याजी लावणें किंवा उद्योगधंद्यांत गुंतविणें फायदेशीर झाले आहे. म्हणून श्रीमंतांच्या जामदारखान्यांतला दागिन्यांचा संग्रह रोडावला व गरिबांजवळ पैकाच नसल्यामुळें दागिन्यांची मोडत चाललेली चाल त्यांच्या पथ्यावरच पडली. परंतु याच्या उलट स्थिति पेशवाईत होती. त्याकाळीं पुरुषांच्याहि अंगावर एकदाहि दागिना नसणें हा मोठा हीनपणा समजला जात होता; मग स्त्रियांविषयी बोलावयासच नको. आजकाल मनुष्याची ऐपत ओळखण्याचे दृश्य चिन्ह त्याच्या अंगावर बहुधा नसते. पूर्वकाली अलंकार हे मुख्य चिन्ह असल्यामुळें पुरुष व स्त्रिया अंगावर शक्य तितके ठळक दागिने सदैव घालण्यास चुकत नसत. इतर बाबीप्रमाणें मराठ्यांच्या अलंकारामध्येंहि पेशवाईच्या शंभर वर्षांत उत्क्रांतीच होत गेलेली आढळते. मराठे लोक शाहुमहाराजांच्या कारकीर्दीच्या प्रारंभी निर्धनतेमुळें अलंकारशास्त्रातहि मागासलेलेच होते. त्यानंतर मुलुखगिरीवर मिळालेल्या द्रव्यानें व सत्तेने महाराष्ट्रीयांची ऐपत व दर्जा वाढत चालला आणि कर्नाटक, गुजराथ, माळवा, बुंदेलखंड, दिल्ली, आग्रा, बंगाल इत्यादि प्रदेशांतील संचारांत तिकडील अलं-

कारांची बारीक ओळख होत गेली, तसतसे अलंकारांचे नवीन नवीन घाट उचलण्यास व आपल्या वेषभूषेत भर घालण्यास त्यानी सुरुवात केली. शेवटी ही भूषणकला महाराष्ट्रांत इतक्या उत्कर्षास पोचली कीं पेशवाईच्या अखेरीबरोबर त्या कलेचीहि अखेर झाली असे म्हणण्यास हरकत नाहीं.

शाहूमहाराजांनी कोल्हापूरच्या शिवाजी राजाची कन्या सातार्‍यास आपल्यापाशी ठेवून घेतली होती. तिची रवानगी केली तेव्हां तिच्या अंगावर दहा हजार रुपयांचे अलंकार करून घातले असा उल्लेख सांपडतो. पण ते दागिने कोणते होते हें मात्र लिहिलेले नाहीं. पहिले तीन पेशवे बाळाजी विश्वनाथ, बाजीराव व नानासाहेब यांच्या कारकीर्दींत नवे दागिने पुष्कळ रूढ झाले. माधवराव, रघुनाथराव, नारायणराव, आनंदीबाई, दुसरा बाजीराव यांच्या वेळीं स्त्री-पुरुषानी व मुलामुलीनी अंगावर घालावयाच्या अलंकारांची समृद्धि अधिकच झाली; पण संपत्तीच्या विकारांचा सोस वाढत वाढत देव्हार्‍यांतील व देवाल्यांतील देवदेवताहि सोन्या-चांदीच्या व हिर्‍या-माणकांच्या बनविण्यांत थोरपणा वाटू लागला. श्रीमंत कोण ? तर जो आपले ऐश्वर्य वेळी अवेळीं प्रकट करतो तो, अशी व्याख्या केल्यास ती त्या काळांतील श्रीमंतांना पूर्णपणें लागू पडेल. कलगी, तुरा, शिरपेच ही शिरोभूषणें, भिकबाळी, चौकडा ही कर्णभूषणे, कंठी, गोफ ही कंठभूषणे मोठमोठ्या पुरुषांच्या वापरण्यांत त्यांच्या त्यांच्या दर्जाप्रमाणे सर्रास असत. ती माधवरावापूर्वी होती व नंतरहि होती. नानासाहेब पेशवे मोठा रसिक व डामडौली होता. त्यानें आपला थोरला पुत्र विश्वासराव याजकरितां सोन्याचा गोफ करून पाठविण्याविषयीं अंताजी नारायण यास लिहिले होतें.

> ‘ चिरंजीव राजश्री विश्वासराव यांचे कमरेचे मोज घेऊन पाठविले आहे त्या प्रमाणें गोप सोन्याचा तयार करून पाठविणे म्हणोन जासुदाजवळ पत्रें दिली त्यांत लिहिले आहे. परंतु मोज पाठविले नव्हते याकरिता हल्ली डाकेबरोबर मोज गोपाचे, चिरगुटाची धांत पाठविली असे तर घेऊन मोजाप्रमाणें गोप तयार करून पाठवून देणे ’ [पे. द. १८]

गरीब लोकाना कंबरेला रेशमाचा करगोटा किंवा रुप्याची साखळी बांधण्याचे सुचावयाचे. पण श्रीमंत लोक तसलाच करगोटा किंवा साखळी आपल्या मुलाच्या कंबरेला अडकवतील तर त्याना हौशी कोण म्हणेल ?. तेव्हां नानासाहेबानें विश्वासरावाकरिता सोन्याचा गोफ तयार करण्यास सांगावे हें क्रमप्राप्तच सम-

-जले पाहिजे. माधवराव हा विश्वासरावाचा धाकटा बंधु. विश्वासरावाला जसा सोन्याचा गोफ हवा तसे त्याच्या या धाकट्या भावाला चांदीच्या ऐवजी सोन्याचे वाळे व घागऱ्या पायांत घालून दुड्दुड् चालवयाला कां नको ? म्हणून नानासाहेबाने तसे करावयास कारकुनाला आज्ञा केल्यावरून त्याचे उत्तर पुढील प्रमाणें आले, ' पंचपाले रुप्याची तीन, दीडशे तोळयांची करविली आहेत ती व चोपदारास काठ्या रुप्याच्या दोनशेभार रुप्याच्या करविल्या त्या व राजश्री माधवराऊ याजकरिता वाळे घागऱ्या सोन्याच्या हलक्या, जोड दोन करविले आहेत ते आज्ञेप्रमाणें घडविले आहेत ' [पे. द. १८] या पत्रांत चोपदाराच्या काठ्यांचाहि निर्देश आहे, तो नानासाहेब आपल्या इतमामाची जुळणी पेशवेपदास साजेशा रीतीनें करण्यांत कसा गुंतला होता हेंच मनाला पटवितो. आनंदीबाईनेंहि कोपरगांवाहून चिमाजीआप्पाकरिता नानाकडे सोन्याच्या साखळ्या मागितल्या होत्या. विश्वासराव, माधवराव व नारायणराव या त्रिवर्गांना सोन्यामोत्याची बाळलेणी सारखी असतीलच. परंतु नानासाहेब मरून गेल्यावर आपल्या धाकट्या भावाची हौस पुरविण्याची जोखीम माधवरावाकडे आली असता त्याने ती योग्य प्रकारें पार पाडल्याचेच दिसून येतें. माधवरावाच्या मनांत नारायणरावाकरिता मोत्यांची कंठी घडविण्याचे होतें. त्या बाबतींत माधवरावाने नवीन मोत्यांच्या खरेदीची नानाफडणविसास प्रथम केलेली आज्ञा मागाहून कशी फिरविली व शिंद्यांच्या करिता केलेल्या माळेंतील मोत्यांचा विनियोग कंठीकडे करून खर्च वाचविण्याची युक्ति कशी सुचविली हें खालील पत्रावरून समजतें. ' सेवेसी बाळाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना......श्रीमंत राजश्री नारायणराव साहेब यांस कंठी करिता मोत्ये खरेदी करून पाठविणे म्हणोन पेशजी लिहिले होतें. त्यास, मोत्ये खरेदी न करणे म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें खरेदी करीत नाहीं. शिंद्याबाबत माळ आली आहे. त्यापैकीं कंठीची मोत्ये निवडून पाठविणे म्हणोन आज्ञा. त्याजवरून कंठी मोत्याची शिंद्याबाबत जवाहीरपैकी दागिना एक फाजलखान सांडणीस्वार दिमत पागा हुजुर याजबरोबर पाठविली आहे. ' (पे. द. ३२) ही कंठी सन १७६७ च्या मार्च महिन्यांत तयार केली. त्यावेळीं नारायणराव गंगापुरास आपली आई गोपिकाबाई इजजवळ रहात होता. त्यानें कंठी पावल्याचे नानाफडणविसास कळविले. ' पोष्य नारायण बल्लाळ नमस्कार विनंति उपरी...तुम्ही पाच वाट्या सोन्याच्या

व कंठी पाठविली ती पावली. आज सिंनरचा मुक्काम आहे. उदईक नाशिकचा मुक्काम आहे. सोमवारी अगर मंगळवारी गंगापुरास जाऊ ' (पे. द. ३२) या पत्रांत सोन्याच्या पांच वाट्या पाठविल्याचेहि लिहिले आहे. सोन्याची वाटी ही चांदीच्या वाट्यापलीकडची श्रीमंती होय.

कंठीची आणखी एक तऱ्हा खालील पत्रांत वर्णिली आहे. 'यादी कंठी, धुगधुगीस हिरा तरतरा दोहीकडून खुला व लोलक तरतरा, माळेस मोत्ये गंडेरीदार ऐसी कंठी आहे ती पाठवून देणे. दागिन्यांत नसल्यास कोठे आहे तिचा शोध लावून पाठविणे म्हणोन आज्ञा. त्यास, कंठी जवाहीरखान्यांत आहे. लोलक हिरा सन आर्बा सतैनांत श्रीमंत राजश्री राव यांचे कंठीस लावला. या अलीकडे सौ. रमाबाई यांजकडे कंठीस आहे. बाकी धुगधुगी व मोत्ये कंठीस लोलक मोती याप्रमाणे आहे. '(पे. द. ३२) माधवराव पेशव्यास एकदा तीन हजार रुपये किमतीच्या मोत्यांच्या चौकड्याची गरज लागली म्हणून त्याने नानाफडणविसास पुढील पत्र लिहिलें 'विनंति उपरी मोत्यांचा चौकडा तीन हजार रुपयांचे किमतीचा पाहिजे. त्यास, सरकारांत शिलकेस असल्यास शोध करून पाठविणे. सिलकेस नसल्यास तीन हजार रुपयास चौकशीने खरेदी करून पाठवून देणे. सिलकेचा पाठवाल तर तीन हजार किमतीचाच असल्यास पाठविणे. नसल्यास तीन हजारांचा चांगला खरेदी करून पाठविणे ' (पे. द. ३२) हा चौकडा कोणा तरी बड्या माणसास नजर करण्याकरिता पाहिजे असेल. माधवरावाची पत्नी रमाबाई सती जावयास निघाली तेव्हां तिने लाखो रुपये किमतीच्या दागदागिन्यांचा दानधर्म केला. त्यांत जगोबा देव नामक ब्राह्मणाच्या स्त्रीस ५२ मोत्यांच्या घोसबाळ्या, आयाशास्त्री व कृष्णशास्त्री यांस प्रत्येकी मोत्यांच्या पोहचीचा एक जोड [१०० मोती] रामशास्त्री प्रभुणे यांच्या स्त्रीस मोत्यांच्या कंगण्या [१९९ मोती] दिल्या. मोत्यांचा सोस वाढत वाढत व्यावहारिक दागिन्यांतून धर्मकर्मांतहि शिरला. पहिल्या माधवरावाची देवधर्मावर विशेष भक्ति असल्यामुळें त्याने मोत्यांची एक स्मरणी गुंफली होती; तिची किंमत सोन्याच्या सुतासुद्धा ४८००॥ रुपये होती. सदर स्मरणी त्याने मागितल्यावरून नानाफडणविसाने रवाना केली. तेव्हां माधवरावाने पुढीलप्रमाणे पोच पाठविली. ' विनंति उपरी, स्मरणी तेरा मोत्यांची पाठवून देणे म्हणोन तुम्हास आज्ञा केली होती. त्याजवरून तुम्ही जवाहिरखान्यापैकी स्मरणी पाठविली......' [पे. द. ३२] राघोबादादाजवळ सोनेमोती जड-

विलेला दक्षिणावर्त शंख होता. तो शागीर्दाकडून हरवला त्याबद्दल राघोबाचे नाना फडणविसास पत्र ' रत्नशालेपैकी नारोबा गाडगीळ शागीर्द, यांचे तसलमातीस दक्षणावर्त शंख देवपूजेत होता. तो साल गुदस्त शागीर्दाजवळून हरवला. त्याची किंमत शंख सोने मोती सुधा याजवळून गुन्हेगारीबद्दल रुपये ६० साठ करार करून रोख पोता वसूल घेतले असेत. तर शंख याचे तसलमातीस आहे. तो हारवला सबब खर्च लिहिणे. ' [पे. द. ३२] राघोबा मरण पावल्यावर त्याचा देव्हारा त्याची पत्नी आनंदीबाई हिच्या ताब्यांत सहजच आला. त्या देव्हाऱ्यांत व देवघरांत देव कसकसले होते हें आनंदीबाईचा कारभार पहाण्यास नाना फडणविसाने कोपरगांवास अधिकारी ठेवला होता त्याने नानास पाठविलेल्या पत्रांतील मजकुरावरून कळून येते. ' श्रीमंत मातुश्री आनंदीबाईसाहेब यानी आज्ञा केली की आम्हाजवळ थोरले देवघरांत सोन्याच्या मूर्ती आहेत. त्या आम्हास उग्र वाटतात. यास्तव ब्राह्मणास देणार- पार्वती गणपति, स्कंद व भैरवी यंत्र मिळून वजन ३७ तोळे......देवघरांत पोवळ्याचा गणपति आहे व सोन्याचा मोर आहे. मोराचे वजन ३६ तोळे. त्याचा पिसारा पाचेचा आहे. तीन तीन बोटे लांबी रुंदी ऐसी वाटोळी पाच आहे. ' [पे. द. ४] पत्रांत वर्णिलेला मोर मूल्यवान् तर खराच पण प्रेक्षणीयहि असला पाहिजे. तिच्या जवळ जवाहिरहि बरेच होते. त्यांतील कांहीं तिने बारा महिन्यांची बारा लिंगे या रूपाने ब्राह्मणाना देण्याचे योजले होते. ते तिच्या जवळील कारभाऱ्याने कोपरगांवाहून नानास पत्र लिहून कळविले, ' श्रीमंत मातुश्री आनंदीबाईसाहेब चैत्र शुद्ध पौर्णिमेपासून दरमहा पूर्णिमेस बारा महिन्यांची बारा लिंगे ब्राह्मणास देणार याची योजना. नवरत्नाची लिंगे जवाहिरखान्यापैकी खड्याचे ठायी लिंगाची कल्पना करून द्यावी. अंगठ्यांतलि खडे काढून हिरा पाच नलि, पुष्कराज, लसण्या माणिक, मोती, पोवळे, गोमेद, स्फटिक, सुवर्ण, रुपे ' [पे. द. ४]

पेशव्यांच्या जवाहीरखान्यांत मोत्यांचे तऱ्हतऱ्हेचे बहुमूल्य दागिने होते तसे हिऱ्यांचेहि होते. त्यांपैकीं एक हिऱ्याची माळ पाठविण्यास माधवरावाने नानाला लिहिले. त्याचे उत्तर त्यानें पुढीलप्रमाणें पाठविले. ' हिऱ्यांचे माळेस मुकेसाच्या (जरतारीच्या) गंडेऱ्यामध्यें बांधावयास गणेश हरि यांस सांगितलें आहे. त्याप्रमाणें माल बांधोन सांडणीस्वाराबरोबर पाठवून देणे म्हणोन आज्ञा. त्यास

आज्ञेप्रमाणें माल बांधोन साकरू खिजमतगार याजबरोबर कालच गणेश हरि याणी सेवेसी पाठविली आहे.' (पे. द. ३२) हिऱ्यांचा शिरपेच माधवरावास नानापासून पाहिजे होता तो असा, 'पाचेची धुकधुकी पाठविली आहे. इचा शिरपेंच फुलासारखा भवते हिरे लावून तयार करून पाठविणे. जरी सरकारांत हिरे नसले तरी विकत घेऊन शिरपेच उत्तम फुलांचा करवून पाठवून देणे. सोन्याचा तोडा तरतरे हिरे लावून करविला आहे तोहि तयार करून सदरहू दोन्ही दागिने पाठवून देणे. चौकड्याविशीं पेशजी लिहिलेच त्याप्रमाणें चौकडा तुरमुनी गुळधवा रंगाचा पाठविणें.' (पे. द. ३२) या पत्रांत सोन्याच्या तोडयाचे वर्णन आहे तेहि लक्षांत ठेवण्यासारखे आहे. नारायणरावाकरितां हिऱ्याची अंगठी पुण्यास रवाना केली असल्याचे माधवरावानें नानास लिहिले. 'चिरंजीव राजश्री नारायणराव यांस अंगठी हिऱ्याची फिरंगोजी खेडकर खिजमतगार याजबरोबर पाठविली आहे. घेऊन पावलियाचे उत्तर पाठविणे. जवाहिरखान्यांत चार अंगठ्या जडयाजवळ दिल्या आहेत त्या तयार करून सत्वर पाठविणे.' (पे. द. ३२)

साध्वी रमाबाईनें सती जाताना धर्मादाय केला त्यांत बाळकृष्णशास्त्री याचे स्त्रीस कंगण्या हिऱ्यांच्या दिल्या. त्यांना ४५ अष्टपैलू हिरे व ९४ हिरकण्या होत्या. दुसऱ्या कोणाच्या स्त्रीला हिऱ्याच्या पाटल्या दिल्या. माधवरावाने नानापासून ५० हिऱ्याचे ताईत मागविले. 'पाचेचे मणी पुण्यांत पाहिले होते. ते खरेदी करून घेणे म्हणून पूर्वी लिहिले आहे. त्यास मणी घेतलेच असतील. कदाचित् घेतले नसले तर घेऊन पाठवून देणे. हिऱ्याचे ताईत चांगले सुमारें ५० फार चांगले पुण्यांत तलाश करून जे मिळतील ते घ्यावे. बाकी शहरास लिहून आणवावे.' (पे. द. ३२) या दागिन्यांच्या किंमती दिल्या नाहींत. त्या दिल्या असत्या तर सदर जिन्नस किती मूल्यवान् होते याची कल्पना आली असती. त्यांची किंमत दिली नसली तरी दुसऱ्या बाजीरावानें खरेदी केलेल्या जिनसांच्या किंमती उपलब्ध आहेत त्यावरून पूर्वीच्या दागिन्यांच्या किंमतींचा अंदाज बांधता येणार आहे. त्याने सव्वालाख रुपायांची एक हिऱ्यांची पोहची बापू चिपळूणकर याजपासून व ३१ हजार रुपयांची दुसरी पोहची कृपानाथ आरगनाथ देवकाशीकर याजकडून घेतली होती. एक नथ पांच हजार रुपयांची होती व अमरचंद सावकार याजपासून रामचंद्र गोसावी पैठणकर यांचे गुजारतीने ऐशी हजार रुपये किंमतीचा एक मोत्याचा सात पदरी कंठा विकत घेतला होता. (पे. द. २२).

प्रत्येक हिरा किती किंमतीचा असे याचा अंदाज खालील आंकडयावरून बांधता येतो. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींत सन १७६७ त ' दर रतीस २२॥ रु. याप्रमाणें १६३ रती वजनाचे २५ हिरे खरेदी करण्यांत आले. ' [पे. द. २२] या हिशेबाने प्रत्येक हिरा ३६६७॥ रु. चा याप्रमाणें २५ हिऱ्यांची किंमत ९१६८७॥ रु. होती.

हिऱ्यापेक्षां माणकांचे दागिने साहाजिकच कमी होते. पेशवे स्वारीवर असले तरी ते आपल्याबरोबर बरेच जडजवाहीर व दागदागिने बाळगीत. माधवरावाच्या स्वारींत एकदां माणकांचा शिरपेच न्यावयाचा राहिला. त्यासंबंधीं नानाला त्यानें सन १७७० त पुढीलप्रमाणें पत्र लिहिले. ' विनंति उपरी, माणकांचा शिरपेच मधी हिरा व भोंवती माणके तारेने बांधली आहेत तो स्वारीसमागमे आला नाहीं. तो व आणखी दागिने स्वारीसमागमे आणावयाचे तयार करविले होते, ते तयार झाले असले तर लष्करांत पाठवून देणे; व कापडाविसी पेशजी लिहिले आहे त्याप्रमाणें लौकर रवानगी करणें. नीलाची मूर्ति जवाहिरखान्यांत मणिराम पाथरवट याजकडून करविली आहे ती त्यानें चांगली केली असली, तर उत्तम जाहाले. त्याच्यानें चांगली न होय तर बखतरायाकडून चांगली करवणे. मधी तुम्ही दोन वेळा मूर्ति पाहून चांगली सिरा मूर्ति होय असी तयार करवणे' [पे.द.३२]

रमाबाईने धर्मादाय केला त्यांत माणकाची पोहची, माणकाऱ्या, हिऱ्याच्या व पाचेच्या अंगठ्या दिल्याचा उल्लेख आहे. त्यांपैकीं एक हिऱ्याची अंगठी आंत गणपतीची मूर्ती असलेली वामनराव पटवर्धनास व पाचेची अंगठी परशरामभाऊ पटवर्धनास दिली. जे मराठे सरदार महाराष्ट्राबाहेर कामगिरीवर होते त्यांची संपत्ति अपार असावी. ' नारोशंकर वारला तेव्हां त्याचा मुलगा रघुपतराव याजकडे कारभारी नाना व सखाराम बापू यांनीं सरदारी कायम केली. त्याबद्दल सरकारांत नजराणा घेतला. त्यामध्यें पक्के २। मण सोने आले. त्यांपैकीं चौरंग एक (सोन्याचा) कमल एक (सोन्याचे) संपुष्ट एक (सोन्याचे) येणेंप्रमाणें चारशें तोळे वजन आहे. पुतळीचे सोने घडाई, नाहीं. त्या सोन्याची किंमत दहा लक्ष झाली. ' (ऐ. ले. सं. खंड ५) नारोशंकर राजे बहादूराजवळ जर इतकी संपत्ति तर महादजी शिंदे व दौलतराव शिंदे यांजजवळ ती कित्येक पटीनी अधिक असेल ! ' दौलतराव शिंदे व बायजाबाई यांचे लग्न पुण्यास सन १७९८ त थाटाने झाले. लग्नांत रुप्याचे बोहले केले होते. शिवाय सोनेरी चांदवा करून त्याला मोत्याच्या झालरी लावल्या होत्या. '

प्रकरण सोळावें

लोकस्थिति

महाराष्ट्र देश मूळचा दरिद्री. त्यांत निर्वाहाची साधनें थोडी. पर्जन्याच्या अनियमितपणामुळें पिकें बेभरवशाचीं. कारखाने व उद्योगधंदे यावर संपत्ति मिळवावी तर त्यांचाहि शून्याकार. भोंवतालचे कर्नाटक, तेलंगण, गुजराथ, माळवा वगैरे प्रांत सुपीक, कलाकौशल्यवान् व संपन्न. त्या मानानें महाराष्ट्रीयांची स्थिति सर्व बाजूंनीं निकृष्ट प्रतीची व मागासलेली. मराठ्यांचें राज्य स्थापन झालें त्यामुळें त्यांना एक मुख्य फायदा असा झाला कीं, त्यांच्या अंगचे कित्येक नैसर्गिक गुण त्यांस प्रकट करतां आले. त्यांचा शरीरबांधा आखूड असला तरी बळकट होता. त्यांचे शरीर विशेष सामर्थ्यवान नसलें तरी काटक होतें. त्यांची दृष्टि व्यापक नसली तरी धूर्तपणाची होती. त्यांची प्राप्ति मोठी नसली तरी गरजा माफक होत्या. त्यांचें अन्न पौष्टिक नसलें तरी कसदार होतें. ते साहसप्रिय नसले तरी धीट होते. ते प्रसंगावाचून शौर्य दाखवित नसत व गरजेवाचून लढाईला उभे रहात नसत. ते अविचारी नसून हिशेबी असत. नफ्यातोट्याचा जसा कांहीं ताजवाच त्यांच्या समोर सदा टांगून ठेवलेला, इतका त्यांचा व्यवहार तोलून मापून. मोठाल्या चुका क्वचित् घडत. परप्रांतीयांशीं व परकीयांशीं ते तुटकपणानें वागत व जरूरीपेक्षां अधिक दळणवळण त्यांच्याशीं न ठेवल्यानें त्यांचे प्रेमळपणाचे संबंध उत्पन्न झालेच नाहींत. त्यांच्यांत औदार्य व आदरातिथ्य अगदींच बेताचें होतें. जवळ संपत्ति नाहीं, व जुनी संस्कृतीहि उच्च दर्जाची नाहीं. या कारणानें त्यांचीं गावें, गावांतील घरे व घरांतलि सामान अगदी हलक्या प्रतीचें. पण स्वतःचें राज्य स्थापन झाल्यावर त्यांच्या नैसर्गिक शक्ति जागृत होऊन वाढीस लागल्या. त्यांच्यांत एक प्रकारची हिंमत आली. नवे मुलूख पहावयास मिळूं लागले. प्रवास मुख्यतः घोड्यावर किंवा पायीं असल्यानें ज्या मुलखांतून ते जात त्या मुलखाची खडानखडा माहिती त्यांस होत गेली. नद्या, अरण्यें, पर्वत, शहरें यांच्या आजूबाजूस त्यांचे कधीं आठवडा

आठवडा तर कधी महिना महिना तळ पडून त्यांची कल्पनाशक्ति प्रदीप्त झाली, धर्मभावना उचंबळली, सौंदर्याची गोडी लागली, पवित्रपणानें सात्त्विकवृत्ति उदय पावली, वैभव हवेंसें वाटूं लागलें, नित्य मनाशीं होत असलेल्या तुलनेनें बुद्धीला सूक्ष्मपणा आला, महत्त्वाकांक्षा बळावली, संकुचितपणा मावळला, संकटें हीं रोजचीं हातांतलीं खेळणीं बनल्यामुळें त्यांची खातर वाटेनाशी झाली. जेथें जावें तेथें जय मिळत गेल्यानें शत्रु केवढाहि बलाढ्य असला तरी तो डोळयांत भरेनासा झाला.

दक्षिणेस श्रीरंगम, श्रीरंगपट्टण, कावेरी, तुंगभद्रा, नीलगिरी; उत्तरेस कांशी प्रयाग, दिल्ली मथुरा, गंगा यमुना, विंध्य हिमालय; पूर्वेस कलकत्ता कटक, जगन्नाथ, समुद्र, महानदी आणि पश्चिमेस पंचनद व पेशावर, पाहून त्यांचे अंन्तःकरण विविध वृत्तींचे क्रीडांगण बनले. दिल्लीच्या मोगलांचें राज्यवैभव, काशीच्या धर्मक्षेत्राचें प्राचीनत्व, गंगा-यमुनांचा सागरतुल्य संगम. हिंमालयांचीं स्फटिकतुल्य शिखरें, श्रीरंगम्च्या श्रीरंगाचें स्वर्गतुल्य ऐश्वर्य डोळयापुढें उभें राहिल्यावर त्यांना महाराष्ट्राच्या कंगालपणाची कींव येऊन इतर प्रांतांच्या योग्यतेस महाराष्ट्राला आणून सोडण्याच्या विचारानें त्यांच्या डोक्यांत काहूर उठविलें. मोहिमांवर लाखो सैनिकांचे कूच मुक्काम ठरवितांना ते शिस्त शिकले व सदा परकीयांनीं वेढल्यामुळें एका मराठ्यांत दुसऱ्या मराठ्याविषयीं आपलेपणा उत्पन्न झाला. आपण सारे मराठे एका प्रांताचे, एका धर्माचे, एका परंपरेचे व एका संस्कृतीचे आहों याचा चक्क उजेड याच मोहिमांतून त्यांच्या मनांत पडला. म्हणून मराठे मोहिमा संपवून परत स्वदेशीं येत, तेव्हां त्यांचे कसे जसे सोन्यानाण्यानें भरलेले असत तशीं त्यांचीं मने उदात्त भावनांनीं व त्यांचीं डोकीं उन्नत विचारांनीं शृंगारून जात असत. पेशवाईचा सारा काळ शंभर वर्षांचा सुद्धा नव्हता व पेशवाईतील कर्तृत्ववान् पुरुषांना विसावा एका पळाचाहि नव्हता. इकडे लक्ष दिल्यास त्यांनी महाराष्ट्राच्या अंगावर जे दागदागिने चढविले तें त्यांच्या रसिकतेचें, गुणग्राहकतेचें व सौंदर्यप्रियतेचेच फल होय यांत शंका नाहीं. महाराष्ट्रांत संपत्ति बाहेरून यावयाची व ती राजे, सरदार, मुत्सद्दी, शिलेदार, बारगीर व सैनिक यांच्या मार्फत सावकार, कारागीर, कसबी, व शेतकरी यांजपर्यंत झिरपत झिरपत पोचावयाची. तिचा उपभोग कमी अधिक प्रमाणानें जरी सर्वांस घ्यावयास सांपडत होता तरी उपभोगाचीं साधनेंच अत्यल्प असल्यामुळें बड्या लोकांचे वाडे, हवेल्या सोडल्यास एकंदरींत बहुजन-

समाजांत घरांचा, कपड्यांचा, भांड्यांचा व दागदागिन्यांचा थाटमाट बेताचा होता. तांबें पितळ या धातू हिंदुस्थानांत पैदा होत नसून परदेशांतून येत. परदेशांतहि यंत्रसामुग्रीच्या अभावीं त्यांचा सध्यासारखा पुरवठा नसल्यानें त्या फार महाग असत आणि बंदरांतून देशावर जाण्यास वाहतुकीचा-आजोरा फार पडे. या कारणानें धातूंचीं भांडी वापरण्यांत थोडी असत. ब्राह्मणाच्या घरीं देखील घागरी वगैरे मातीच्या असून त्या घेऊन पाणवठ्याच्या जागी भरण्यासाठीं गेल्यावर त्यांची चुकून अदलाबदल झाल्यास शब्दावरून शब्द वाढून स्त्रियांच्या भांडणाची मजल मारामारीपर्यंत जावी.

मालाची नेआण.

मालाची नेआण मोठ्या प्रमाणावर करण्याचा धंदा लमाण व वंजारी लोकांचा होता. त्यांजपाशीं हजार हजार दोन दोन हजार बैलांचा तांडा असे. कोकण व देश हे महाराष्ट्राचे दोन विभाग सह्याद्रीच्या शेकडो मैल लांबीच्या रांगेने पडलेले. परदेशांतून माल येण्याची सारी बंदरें कोकणांत. त्या बंदरांतून मीठ, साखर, कापड, सुपारी, खोबरें, खजूर इत्यादि हर जिन्नसी माल देशावर यावयाचा व देशावरील धान्य, हळद, गूळ, मिरची हे पदार्थ घाटाखालीं उतरावयाचे, या मालाची नेआण लमाण व वंजारी लोक बैलावर लादलेल्या गोण्यांतून करीत. त्याखेरीज मालाचे गाडेहि असत. हे गाडे निराळे व हल्लींच्या गाड्या निराळ्या. गाड्या चालण्यास रस्ता अगदीं सडकेचा नसला तरी साफ लागतो. देशावरच्या देशावर सपाट मुलखांतून जाण्यायेण्यास गाड्या उपयोगीं पडत. परंतु घाट चढण्याउतरण्यास गाडेच सोयीचे. हे गाडे वडारांच्या गाड्यासारखे असावे, कारण तसल्या गाड्यांना कसल्याहि अवघड वाटेनें उलटण्याची भीति कमी. जाणाऱ्या येणाऱ्या मालावर जकात घेण्याकरितां घाटांतून नाकी होती. त्या नाक्यावर जकात वसूल करतेवेळीं दर गोणी, दर गाडा, दर बैली अशी भाषा वापरीत. बैलावरून अवजड सामान जाण्यासारखें नसल्यानें एका गांवचा संसार आवरून तो दुसऱ्या गांवास नेताना छकडे लावीत. रघुनाथराव व माधवराव पेशवे यांनीं गोविंद हरि पटवर्धनापासून मिरजेचा किल्ला जिंकून घेतल्यावर त्यास मिरज सोडून मंगळवेढ्यास जाऊन रहाण्यास सांगितले. तेव्हां गोविंद हरीचा संसार हलविण्यास पेशव्यांनीं त्यास छकडे दिले. छकड्याइतकाच उंट उपयुक्त अथवा मजली जलद मारण्यास उंटाचा वेग अधिक; यासाठीं श्रीमंत लोक व सरदार आपल्या-

पाशीं ओझ्याकरितां उंटहि बाळगीत. पेशव्यांनीं गोविंदपंतास छकडे, तसेच उंटहि दिले. अमुक इतकी पोती किंवा गाडया माल झाला असे आपण सांप्रत म्हणतो, तसे त्या काळीं अमूक बैल इतका जिन्नस असे म्हणत. ‘ मिरच्या भांग-तमाखू, गूळ हा जिन्नस किल्ल्यांत आणिला आहे. एक जिन्नस दहा खंडी गल्ला किल्ल्यांत (मिरजेच्या) आला. याखेरीज एरंडोलीचा गल्ला ५० बैल व किर-कोळ १० बैल सरासरी बारुळे दहा खंडी गल्ला एकूण वीस खंडी गल्ला आला.’ (ऐ. ले. सं. खं. १) असे गोविंदपंताचे पत्र आहे.

मोठ्या लोकांच्या घरीं वाहने व वाहतुकीची जनावरें कोणतीं असत याचा अंदाज सखारामबापू बोकील याच्या घरची वाटणी झाली त्या वाटणी पत्रा-वरून लागतो. सखारामबापूच्या घरी तीन रथ, दोन छकडे व चार गाडे होते. रथांना बैल जुंपीत असून त्या बैलांची संख्या सात होती. त्याशिवाय घोडयांत ६१ माद्या, २५ नर, ३४ तट्टे व ६ खेचरे होती. (पु. द. भा. ३.) हत्ती हे वाहन सरदारांच्या व त्याहूनहि अधिक योग्यतेच्या लोकांच्या संग्रही. मोठ-मोठया मजलींचा प्रवास करतांना घोडयावर बसण्याची दगदग फार. त्यापेक्षां उंट व डोली बरी. पण सर्वांत हत्ती वाहन अधिक सुखदायक. माधवराव पेशवे सन १७७० च्या आक्टोबर महिन्यांत पुण्याहून लोणी, राजेवाडी, जेजुरी, मोरगांव, कुरकुंब या मार्गे बाईस जावयास निघाले होते. मोरगांव सोडून ते सोमेश्वराकडे (सोमयाचे करंजे) चालले असतां हत्तीच्या अंबारीत असून अंबारीत त्याना झोप लागली असल्याचा उल्लेख आढळतो. ‘ मोरगांवीहून कुच करून खासा स्वारी मुरटी शेजारून श्रीसोमयाचे मार्गे गेली. मुरटीच्या पलीकडे स्वारी होती. तेव्हांच श्रीमंतांनीं आंबारींत निद्रा केली. ते सोमयाच्या जवळ माळ आहे तेथे येऊन मग उठले ’ (पु. द. भा. ३.) आंबारींत झोपाहि घेतां येत अस-ल्यामुळे हत्ती हे वाहन त्या दृष्टीनें उत्कृष्ट

समाजाचे अर्थशास्त्र.

हिंदु समाजांत जाती पुष्कळ आहेत व प्रत्येक जातीचा धंदा वाटलेला आहे. धंद्याच्या वाटणीमुळें संपत्तीची विभागणी होऊन विशिष्ट जातींना विशिष्ट धंद्यांचा मक्ता मिळाल्यासारखा झाला. प्रत्येक जात आपल्या धंद्यांत गुंतली असल्यानें तिच्या पोटाची तिला काळजी उरली नाहीं. यामुळें एखादा धंदा एखाद्या वेळीं किफायतशीर आहे असें आढळून येतांच त्यांत इतर जातींच्या लोकांनीं

आपले धंदे टाकून देऊन गर्दी करावयाची व ज्या जातीचा तो मूळ धंदा तिच्या पुढची भाकरी हिसकावून नेल्याने त्या जातींच्या लोकांत व एकंदरीनें सर्व समाजांत असंतोष व तंटे बखेडे उत्पन्न व्हावयाचे, या अनर्थास सहजच आळा बसून समाज शांत व संतुष्ट राहिला. आतां या पद्धतीने एक तोटा असा होतो की, कोणत्याहि धंद्याच्या किंवा कलेच्या सुधारणेस जी चढाओढीची गरज असते त्या चढाओढीस अशा प्रकारच्या समाजरचनेंत स्थान नसल्यानें कला-कौशल्याचा उत्कर्ष त्या समाजांत होण्याचें एक साधन कमी पडतें. खेड्यांतून कुंभार लोक नागपंचमीसाठी नागाचीं चित्रें व पोळ्यासाठीं किंवा बेंदरासाठीं बैलाचीं चित्रें बनवितात, दसऱ्यासाठीं घट तयार करतात आणि पाथरवट किंवा गवंडी गांवच्या देवळांत बहिरोबा, मरिआई, विठोबा यांच्या मूर्ती घडवून बसवितात. त्यांत कळाकुसर व रेखीवपणा दृष्टीस पडत नाहीं. हा दोष चढाओढ नसण्याचा असला तरी राजाश्रय मिळाला, असतां याच कारागिरांतून गुणी माणसे पैदा होऊन तीं उत्कृष्ट प्रकारची कला निर्माण करतात याची साक्ष ठिकठिकाणची सुंदर देवालयें व जिवंत असल्याप्रमाणें दिसणाऱ्या मूर्ती देऊं शकतील. जातिव्यवस्थेमुळें जातींच्या पोटजाती पडतां पडतां अखेर अशी अवस्था येते कीं एकच धंदा करणाऱ्या दोन तीन पोटजाती उत्पन्न होतात व त्यांच्यांत त्या धंद्याच्या विविध अंगांपैकीं कोणत्या अंगाची कोणत्या जातीनें पूर्तता करावी याविषयीं लढा लागतो. परंतु स्वदेशी राजांना आपल्या प्रजेंत सलोखा ठेवणें हें आपलें पवित्र कर्तव्य वाटत असल्यानें त्याजपुढें असलें प्रकरण आल्यावर त्यांत ते आस्थापूर्वक मन घालीत व न्यायास धरून तंटा तोडीत. वाजंत्र्यांत घडशी, न्हावी, जोगी, भराडी व गोंधळी अशा जाती आहत. त्यांपैकीं जोगी, भराडी व गोंधळी यांत सूरसमेळ कोणी वाजवावा यासंबंधी एकदा कज्जा लागला. तेव्हां सरकारांत मनास आणतां जोगी यांनीं सूरसमेळ वाजवावा असा निकाल देण्य.त आला. हा निकाल वहिवाट पाहून देण्यांत येत असे हें उघड आहे.

जातींचे हक्कसंबंध व वहिवाटी.

कोणच्या जातीनें कोणता धंदा करावा यासंबंधानें जसे सूक्ष्म व स्थूल नियम असत तसेच कोणत्या जातीनें कोणत्या चाली पाळाव्या यासंबंधानें जातींचे नियम असून ते नियम सोडून जर एक जात नवे प्रघात पाडील तर त्यायोगानें

आपल्या हक्काची पायमल्ली होते· अशा समजुतीनें दुसरी जात तिच्याशी कज्जा करण्यास उभी राही. ' दत्ताजी कृष्णाजी शेटे सोमवंशी कासार व समस्त कासार यांची पूर्वापार वहिवाट लग्नकार्यांत कलशासह वरात काढून देवदर्शन घेऊन भिरवीत जाण्याची आहे. पण त्यांजबरोबर कऱ्हाडच्या लिंगायत वाण्यांनीं कज्जा केला· याची मनसुबी जिल्ह्याकडील सुभेदार व हुजूर मामलेदार यांनीं शास्त्रमतें केली व त्यांत कासार हे सोमवंशी क्षत्रिय असल्याने त्यांस कलशासह वरात काढण्यास हरकत नसावी असें ठरलें. ' (पे. डा.) जात शुद्ध राखण्याचें शरीरसंबंध हें जसें मुख्य साधन तसेंच त्या खालोखाल अन्नोदकव्यवहार हेंहि साधन मानण्यांत येई. यामुळें दोन पोटजाती ब्राह्मणांतील असल्या तरी त्यांचा परस्पराशीं पंक्तिव्यवहार व्हावाच असें नव्हते. पुष्कळदा असेंहि घडे कीं दोन पोटजाती समान योग्यतेच्या असतांहि एका पोटजातीनें दुसरीहून आपला श्रेष्ठपणा दाखविण्यासाठीं तिजबरोबर पंक्तिव्यवहारास कबूल होऊं नये. खानदेशांत चोपडे गांवाच्या बाजूस अभीर ब्राह्मण व यजुर्वेदी ब्राह्मण यांच्यांत असाच वाद उत्पन्न झाला. यजुर्वेदी ब्राह्मण म्हणूं लागले कीं ' आनंदराव प्रभृति ब्राह्मण अभीर असतां आम्हांस पंक्तीस बसण्याचा आग्रह करतात. पण त्यांची व आमची जात एक नाहीं. आम्ही माध्यंदिन आहों, ते अभीर आहेत. ' अशी फिर्याद विसाजी गणेश देशमुख वगैरे ब्राह्मणांनीं हुजूर केली. तेव्हां पेशव्यांनीं चौकशी केली. तिच्यांत अभीर व माध्यंदिन यांचा पंक्तिव्यवहार पूर्वापार चालत आला आहे, त्या उभयतांचा शरीरसंबंध झाला आहे असें पुराव्यानिशी सिद्ध झाल्यावरून हुजूरनें अभीर ब्राह्मणांना माध्यंदिन ब्राह्मण ठरविले आणि अभीरांबरोबर कोणी माध्यंदिनांनीं अन्नसंबंध केला तरी प्रत्यवाय नाहीं, न केला तरी आग्रह करूं नये असें सांगण्यांत आलें. ' जातींत पोटजाती उत्पन्न होऊन त्या पोटजातींच्या स्वतंत्र जाती बनण्याची प्रवृत्ति हिंदुसमाजांत कशी आहे व त्यामुळें हजारों जाती कशा उद्भवल्या याचा उलगडा या चोपड्याच्या उदाहरणावरून करतां येतो. तथापि मध्यवर्ती सत्तेकडून या प्रवृत्तीस बुद्धिपुरस्सर उत्तेजन मिळत नसे, असें पेशव्यांनीं दिलेल्या वरील निकालावरून दिसून येते. कनिष्ठ पक्षाचा मुळाला चिकटून रहाण्याचा प्रयत्न व वरिष्ठ पक्षाचा कनिष्ठ पक्षाला मुळापासून दूर लोटण्याचा प्रयत्न जातिव्यवस्थेंत प्रतीत होतो. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे आर्यांतलि मुख्य तनि वर्ण आणि त्या वर्णांतून

अनेक जाती वेगवेगळ्या होऊन बाहेर पडल्या. तरी त्या जातींचें लक्ष वर्णाकडे सतत आहे व त्या जाती आपले मूळचे तीन वर्ण विसरत नाहीत. पहिल्या उदाहरणांतील दत्ताजी कृष्णाजी शेट प्रभृति कासार आपणास सोमवंशी म्हणजे क्षत्रिय समजतात व कलशासह वरात काढण्याचा आपला हक्क सांगतात. शास्त्रमतानेंहि ते सोमवंशीय क्षत्रिय असल्याचेंच सिद्ध झालें. तेव्हां जातींची संख्या आखडीत आणावयाची झाल्यास ती अखेर कोणत्या ना कोणत्या वर्णांत पडूं शकते हेंहि कासारांच्या उदाहरणावरून लक्षांत येतें.

माळरान-संस्कृति.

महाराष्ट्राच्या कांहीं भागांत माळरान बरेंच आहे. त्यांत शेतजमिनीपेक्षां माळजमिनी पुष्कळ. खांबटकीचा घाट व निरेचा कांठ यांच्यामधील शिखळापासून माळशिरसापर्यंतचा पट्टा या जातीचा आहे. या पट्ट्यांत पाऊसहि अगदीं थोडा पडतो. घाटापलीकडचीं व नदीच्या अलीकडचीं रानें पिकलीं तरी हा टापू नापीक व उजाड असतो. शेतीचा धंदा या रीतीनें संपुष्टांत आल्यावर तेथील रयतेला निर्वाहाचें दुसरें साधन म्हणजे मेंढरांचे कळप पाळणें व त्यांना चारीत हिंडणें. अर्थात् या धंद्याला मुलूख फार लागत असल्यामुळें निरा नदीच्या कांठावरील भागांत मनुष्यवस्ती पूर्वीं तुरळक होती व आजहि तुरळक आहे. जमिनीचे असले पट्टे महाराष्ट्रांत जागोजागी पसरले असून त्यांतील लोकवस्ती अगदीं कंगाल आहे. इंदूरचे होळकर हे निरा नदीवरील होळचे रहिवाशी. त्यांची जात धनगराचीच. मल्हारराव होळकर खानदेशांत आपल्या मामाच्या घरीं मेंढरें राखीत होता अशी दंतकथा आहे. पण उन्हातान्हांतून माळामाळांनीं भटकणारे धनगर लोक काटक व कसदार असतात. पेशवाईंत शिरवळ प्रांतीं हजारो मेंढरांचे कळप होते. या मेंढरांच्या सपाट्यांत एखादें मधलेंच शेत सांपडलें कीं त्याचा फन्ना उडावयाचा. यासाठीं कोणा धनगरानें किती मेंढरें बाळगावीं हें दाखविणारा सरकारी दस्तक प्रत्येक धनगरास बाळगावा लागे. 'शिरवळच्या बाजूस मेंढरांच्या खिलारांनीं शेताशिवारास उपद्रव दिला. तेव्हां ज्यांच्यापाशीं दस्तक नव्हता किंवा दस्तकांत नमूद केलेल्या आंकड्यापेक्षां अधिक मेंढरें होतीं त्यांचीं मेंढरें जप्त करण्याचा सरकारांतून हुकूम सुटला. सन १७७० सालीं मांडकी या एका गांवांत दहा हजार मेंढरें होती.' (पे. डा.) मेंढपाळाचा धंदा आजहि त्या प्रदेशांत चालतो. परंतु कालवे होऊन बऱ्याच माळजमिनी

लागवडीस आल्यामुळें मेंढरांना चरावयास पुरेशी जागा न मिळून बऱ्याच मेंढपाळांनीं हा धंदा सोडून दिला आहे. मेंढरांचा तिहेरी उपयोग होतो. एक, ती शेतांत खताकरितां बसवावयास सांपडतात; दुसरा, त्यांची लोकर घोंगडया विणण्यास मिळते; आणि तिसरा, मेंढरें हें पुष्कळांचें भक्ष्य आहे. शिरवळच्या भागांत घोंगडया विणण्याचा धंदा आजहि खेडयापाडयांतून थोडथोडा चालतो. यावरून पेशवाईंत हा धंदा हल्लींहून बराच भरभराटींत असावा असें अनुमान काढतां येतें. मेंढपाळाच्या धंद्याची त्या भागांत पूर्वी इतकी गरज होती कीं, ब्राह्मण लोक आपल्यापाशीं एखादा धनगराचा पोर ठेवून मेंढरें पाळीत. कित्येक पाटीलहि धनगर जातीचेच; इतकेंच नव्हे तर त्या पंचवीस तीस कोसांच्या क्षेत्रांत बहुजनांचें दैवतहि धनगरीच आहे. वीर गांवचा म्हसकोबा हें त्या बाजूस प्रसिद्ध दैवत असून शिवरात्रीच्या जत्रेंत त्या देवापुढें हजारो मेंढरांचीं मुंडकीं उडतात व रक्ताचा चिखल होतो. पुणें व सातारा या दोन जिल्ह्यांच्या मध्यभागीं हा टापू असून त्यानें वीरांचा व राऊतांचा पुरवठा मराठी राज्यास भरपूर केला असला पाहिजे. गांवाचें नांव वीर व मजऱ्याचें नांव राऊतवाडी हीं त्यांतील वीरांची व राऊतांचीच द्योतक होत. वीरचे पाटील धुमाळ आहेत व कुळकर्णी भालेराव आहेत. भालेराव या आडनांवावरून त्यांचें भाला हें हत्यार व घोडयावर स्वार होऊन शत्रूवर भाल्याची फेक करण्याचा धंदा उघड होतो. राऊतवाडींत राऊत या आडनांवाचे लोक अद्यापि आहेत. राऊत म्हणजे स्वार. आज त्यांचा धंदा पानमाळ्याचा असून ते अगदींच निर्बळ झाले आहेत. पण ते मराठ्यांच्या घोडेस्वारांतील एक वेळचे राऊत होत. गंगथडीप्रमाणें निरथडींतहि चांगली चलाख व खुटखुटीत घोडी पैदा होत असावी. जशी माळावर मेंढरें चरावयाचीं तशीं निरथडींतील कुरणांत घोडीं कळावा घातलेलीं गवत कुरतडत फिरावयाचीं. तीं घोडीं, ते वीर, ते भालेराव व ते राऊत यांनीं मराठ्यांच्या फौजेंत महत्त्वाची कामगिरी बजावली असेल व पुरंदरावरील बाल पेशव्याच्या संरक्षणाकडील पागा पथकांतहि त्यांची नेमणूक झाली असेल.

प्रवासाचीं साधनें.

मुख्य वाहन घोडे होतें. स्त्रिया व मुलें-बाळें दहाबारा कोसांचा प्रवास घोडयावरूनच करीत. पण त्यापेक्षां दूर अंतरावर जावयाचें असल्यास डोलींत किंवा पालखींत बसत. सरदार व श्रीमंत लोक यांच्या बायका पालख्यांतून

जात. मोठमोठ्या गावांत डोल्या व पालख्या भाड्यानें मिळण्याची सोय होती. पुण्यांत डोलकर आळी म्हणून भाग आहे. त्यांत डोल्या भाड्यानें देणारे लोक रहात असत. पालखी हे वाहन मोठ्या मान्यतेचें. सरकारांतून ज्याला पालखी मिळाली त्याचा मान विशेष झाला. आजारी माणसें, स्त्रिया व मुलें, गर्भारशिणी व बाळंतिणी यांना ऊन्ह पाऊस थंडी यांतून सुखरूपपणें प्रवास करण्यास डोल्या व पालख्या अधिक पसंत करीत. सपाटीच्या मुलखांत एका गांवांहून दुसऱ्या गांवांस जाताना लोक छकडे व गाड्यां यांतहि बसत. दिवस धामधुमीचे होते तरी नित्याच्या व्यवहारांत अडचणी सोसूनहि शिष्टाचार पाळण्यांत येई. पुणें व मिरज या दोन गांवांमधील अंतर सुमारें दीडशें मैलांचें आहे. मिरजेहून पुण्यास जाण्यायेण्यास त्या काळीं पालखींतून सहज दहाबारा दिवस लागत असतील. पटवर्धन सरदार मिरज, कुरुंदवाड, तासगांव येथें आपल्या जहागिरीवर असत. पण पुष्कळ मोठमोठ्या लोकांचें रहाणें पुण्यांत असल्यानें त्यांचा शरीरसंबंध पुण्यांतील मोठमोठ्या घराण्यांशींच होऊन सुना लेकी यांची जा–ये पुण्याशी नेहमीं चालावी. गोपाळराव पटवर्धनाचा धाकटा भाऊ पांडुरंगराव याची भार्या लक्ष्मीबाई मिरजेस गरोदर होती. पण तिचें माहेर पुण्यांत भिडे यांच्या घरीं. तिला बाळंतपणाकरितां मिरजेहून पुण्यास आणण्यासाटीं भिडयांनीं मूळ पाठविलें, त्यासंबंधानें गोपाळरावाची आई सत्यभामाबाई गोपाळरावास घरच्या खुशालीच्या पत्रांत लिहिते ‘ चि. सौभाग्यवती लक्ष्मीबाई सून सगर्भ आहे. ओटी भरून माहेरास पुण्यास रवाना करून दिली. भिडे याणी पालखी, कारकून मूळ पाठविलें होतें. ’ (ऐ. ले. सं.) पण पालखींत बसून जाण्यास मनुष्यबळ मोठें पाहिजे. खांदेबदल करण्यास भोई पुष्कळ पाहिजेत. चार भोयांवर शेपन्नास कोसांचा प्रवास करणें अशक्य होतें. माधवराव पेशवे यांची मातुश्री गोपिकाबाई नाशकास आजारी होती. तिला भेटण्यास माधवरावांनीं नाशकाला जाण्याचें ठरविलें. तेव्हां वाटेनें नाशकापर्यंत म्हणजे गंगापुरापर्यंत पालख्यांची डाक ठेवली होती. (ऐ. ले. सं. खंड ४) पुण्याहून नाशिकचा मार्ग जवळ जवळ हल्लीप्रमाणेंच म्हणजे खेड, ओतूर, सिन्नर या गांवांवरून होता. नाशिक व पुणें यांच्यामधील अंतर दडिशें मैलांचें धरल्यास एवढ्या अंतरांत त्यांस पालख्यांचे टप्पे आठ दहा तरी करावे लागले असतील. व आठ दहा पालख्या व ५०।६० भोई लावावे लागले असतील.

पण पालखी ही किती सुखाची असली तरी तिजपेक्षां जलद व स्वाधीनचा प्रवास म्हणजे घोडयावरचाच. खडखडीत प्रकृतीचा माणूस घोडयावरचाच प्रवास पसंत करी. घोडयाबरोबर धावण्यास एक मोतद्दार असला म्हणजे बस-लांबच्या प्रवासांत घोडयावर बसण्यांत मांडीत जोर व कमरेत अवसान पाहिजे. मनुष्य किंचित् आजारी असला तरी त्याला हा प्रवास क्षेपणें अशक्य होऊन विशेष निकडीच्या कामाखेरीज प्रवासास जाणें टाळावेंच लागे. नाशिक जिल्ह्यांतील कोठुरे गांवचा इनामदार बाबूराव मल्हार बर्वे हा थोरले बाजीराव पेशवे व चिमणाजी आप्पा यांचा मामेभाऊ होता. आप्तेष्टांनीं एकत्र जमून कौटुंबिक सुख भोगण्याचे व मोकळया मनानें बोलण्याचे सुप्रसंग त्या काळीं फार करून सहजासहजी येत नसत. स्वाऱ्याशिकाऱ्या नसल्या व कर्ते पुरुष घरींच सणवारी मोकळे असले म्हणजे त्या निमित्तानें आप्तेष्टांना बोलावीत. दिवाळी व शिमगा असलेच ते सण. सन १७३४ सालीं शिमगी पौर्णिमेकरितां चिमणाजीनें सदरील बाबूराव बर्वे यास पुण्यास येण्याविषयीं पत्र लिहिले. चिमणाजीच्या पत्रास बाबूरावानें उत्तर दिले. ' या बाजूस मोंगलाचा त्रास आहे. वसुलाचे दिवस आहेत. घोड्यावर स्वार होऊन सत्वर यावे तर शरीर समर्थ नाहीं. म्हणून आलो नाहीं.' (पे. द. ३२) घोडयाशिवाय प्रवास नाहीं. अशा स्थितींत प्रत्येकाला आपल्या घरीं एखादे दुसरे घोडें ठेवावेंच लागे. घोडयाखेरीज उंट व हत्ती हीहि वाहनें होती. पण हत्तीचा उपयोग लढाईंत किंवा विशेष समारंभ याशिवाय करीत नसत. उंटावरून प्रवास करण्याचा महाराष्ट्रांत तरी प्रघात नव्हता व उंट हें घोडयासारखे माफत किंमतीचे आणि कोणाहि मनुष्यास बाळगण्याजोगे जनावर महाराष्ट्रांत तरी नव्हते. उंट सरदारांपाशीं असत. व ते युद्धोपयोगी किंवा अवजड सामान वाहून नेण्यास लावीत. टपाल नेण्याआणण्यास जासूद असतच. पण जासुदांची चाल सावकाश. जो निरोप ताबडतोब पोचावयास पाहिजे तो जासुदाऐवजीं सांडणीस्वाराबरोबरच पाठविण्यांत येत असे.

ज्ञातिव्यवस्था.

हिंदूत व्यक्ति, कुटुंब, जात व धर्म अशा समाजव्यवस्थेतील पायऱ्या आहेत. व्यक्तीचे सुखदुःख सर्वस्वी कुटुंबाच्या किंवा कुलाच्या स्वाधीन. कुलांत गोत्रज मोडतात. व त्या गोत्रजांपैकीं जे अगदीं निकटचे ते कौटुंबिक. गोत्रजांशीं अथवा कौटुंबिकांशीं लग्नसंबंधाशिवाय बाकी हरएक व्यवहार व्हावयाचा. गोत्रजांपेक्षां

ज्ञातिबांधवांचें क्षेत्र फार विस्तृत असून अन्नोदकव्यवहार व लग्नसंबंध केला तर त्यांच्याशींच करावयाचा. अन्नोदकव्यवहाराची व लग्नसंबंधाची मर्यादा येथेंच संपली. त्याशिवाय बाकीचा व्यवहार हिंदूंतील जातींना आपसांत करण्यास मोकळीक. रोटीबेटीव्यवहाराचे बंधन पाळून उरलेल्या व्यवहारांत सर्व हिंदु जाती या दृष्टीनें एक, की त्यांचे देव समाईक, वेद समाईक, क्षेत्रें समाईक पुराणें समाईक, सण समाईक व कित्येक धार्मिक संस्कार समाईक. त्यामुळें हिंदूतील जातीजातींत कांहीं बाबतींत तुटकपणा असला तरी त्याहूनहि अधिक बाबतींत ऐक्य असल्यानें त्यांच्यांत परस्परांविषयीं सख्य व प्रेम नांदत असे. वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था यांनीं विशिष्ट जातींना विशिष्ट आचार व विशिष्ट कर्मे लावून दिली. त्यायोगानें श्रेष्ठकनिष्ठभाव उत्पन्न झाला असतांहि त्या जाती विशेष प्रसंग वगळल्यास एकमेकांशीं गुण्यागोविंदानें व शांततेनें नांदत आल्या याचें कारण वेगळें होतें. पोटापाण्याचे व्यवसाय ज्या त्या जातीस धर्मानें व रूढीने वाटून दिले होते. कोणत्याहि समाजांत कलह उत्पन्न होण्याचे मुख्य कारण पोट. एकाच्या पोटावर दुसऱ्याला पाय देण्याची किंवा एकाची भाकरी दुसऱ्याला काढून घेण्याची संधि जो समाज देत नाहीं त्याच समाजांत संतोष व शांति नांदते. हिंदुसमाजांत जातिव्यवस्थेनें ही तरतूद करून ठेवल्यामुळें हिंदुसमाज सहस्रावधि वर्षे टिकला. तथापि ही व्यवस्था मोडून ज्यावेळीं एक जात दुसऱ्या जातीच्या व्यवसायांत शिरली, त्याच वेळीं हिंदूंतील कलहास सुरुवात झाली. हिंदुराजे ज्या जातीचा व्यवसाय त्या जातीला शक्य तितका रूढीस अनुसरून लावून देण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळें हे कलह मिटत. व्यवसाय वाटले गेले म्हणजे व्यवसायांच्या योग्यतेप्रमाणें श्रेष्ठकनिष्ठपणा सहजच वाटला जातो व त्यामुळें श्रेष्ठास अभिमान व कनिष्ठास अपमान वाटण्याची वेळ येते. कलहाचें हेंहि एक कारण असलें तरी त्यामुळें समाजांत किंबहुना दोन जातींत उद्भवणारी अस्वस्थता सबंध समाजचा समाज उलथून पाडण्याइतकी वाढत नाहीं.

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकास वेदाधिकार असला तरी ब्राह्मणाशिवाय इतर दोन वर्णांनीं पेशवाईपूर्वी कित्येक शतकें आपल्या या अधिकारास फाटा दिला होता. क्षत्रिय व वैश्य यांचे वैदिक संस्कारहि लुप्त झाले होते. राष्ट्रकूटांचे राज्य महाराष्ट्रांत दहाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत सुमारें दोनशें

वर्षें होते. त्यावेळीं विद्येच्या दृष्टीने क्षत्रिय व वैश्य यांची स्थिति याच प्रकारची होती. कदाचित् राष्ट्रकूटांच्यापूर्वी चार पांचशें वर्षें हीच परंपरा चालत आलेली असावी. म्हणजे पेशवाईच्या आधी जवळजवळ हजार बाराशें वर्षें क्षत्रिय व वैश्य हे विद्येंत मागासले असल्यामुळें व राज्यकारभार विद्वान् किंवा सुशिक्षित वर्गाच्या सहाय्यावाचून चालणारा नसल्यामुळें विद्वान् व शिक्षित अशा ब्राह्मण-जातीवर राज्यकारभाराचा भार पडून राज्यकारभारातील बहुतेक वरिष्ठ व कनिष्ठ जागा ब्राह्मणांच्या हाती साहजिकच गेल्या. या पूर्वापार वहिवाटीस अनुसरूनच मराठी राज्यात ब्राह्मण लोक राज्यकारभारात प्रामुख्यानें वागू लागले. पेशवाईत मुलुकी कारभाराशिवाय क्षात्रकर्मातहि ब्राह्मण प्रविष्ट झाले. हेहि कर्म महाभारतकालापासून प्रसंगोपात्त ब्राह्मण करीत आले असल्यानें त्यांतहि नवीन असे कांहीं घडलें नाहीं. ब्राह्मण सरदार झाला तरी तो राजाचा अंकितच. परंतु पेशवे याहि पुढें गेले. त्यांनीं स्वतःस राज्याभिषेक करून घेतला नाहीं किंवा राज्यपदहि बळकावले नाहीं, तथापि साताऱ्याच्या राजाचा सर्व कार-भार चालविण्याची मुखत्यारी त्यांच्याकडे येण्याबरोबर ते व्यावहारिक दृष्ट्या राजेच झाले. ही गोष्ट तत्कालीन मराठे सरदारांच्या कदाचित् डोळ्यावरहि आली असेल, पण त्यापासून मराठी राज्यांत बखेडा माजला असे मात्र आढ-ळून येत नाहीं. त्यामुळें एवढें मात्र घडलें कीं, ब्राह्मणांचें राजकारणांतील दुय्यम स्थान नष्ट होऊन त्यांस अग्रस्थान प्राप्त झालें. मराठे लोक वर्णानें क्षत्रिय असोत वा नसोत, ते महाराष्ट्रांतील क्षात्रकर्म करणारे लोक होत यांत शंका नाहीं. त्यांज-कडे शिवाजीमहाराजांपासून राज्यपद आल्यानंतर त्यांच्या क्षात्रवृत्तीविषयी वादच उरला नाहीं. त्यामुळें हिंदुसमाजांत ब्राह्मण श्रेष्ठ कीं क्षत्रिय श्रेष्ठ हा तंटा महाराज घराण्यापुरता मधून मधून डोकें काढीत राहिला.

कोल्हापूरप्रकरण

श्रीशंकराचार्यांचा एक मठ संकेश्वरास व दुसरा मठ कोल्हापुरास होता. मराठ्यांच्या राजधान्यांसहि तोच नियम लागू. मराठ्यांची एक राजधानी साता-ऱ्यास व दुसरी राजधानी भाऊबंदकीमुळें कोल्हापुरास स्थापन झाली. कोल्हा-पुरांत एक मठ व एक गादी असें सान्निध्य जमल्यावर कांहीं प्रसंगानें कलहाचें कारण उद्भवलें. कोल्हापूरचे संभाजी महाराज मरण पावल्यावर त्यांचें दहन स्वामींच्या मठापाशीं करण्यांत आलें. त्यास शंकराचार्यांनीं हरकत आणिली; पण

ती कोल्हापूरची राणी जिजाबाई हिनें जुमानली नाहीं. हें प्रकरण येथेंच थांबतें तरी बरें होतें. पण तसें न होतां जिजाबाईनें दहनभूमीवर देवालय बांधावयास काढलें. सदर देवालय तेथें बांधल्यानें मठाच्या ब्राह्मण भोजनाच्या जागेंतच तें यावयाचें. ही गोष्ट धर्मदृष्ट्या अर्थातच गैर. पण बाईचा हेतु असा कीं, आम्ही या गावचे राजे, आमच्या आश्रयानें असणाऱ्या शंकराचार्यांनीं व भटभिक्षुकांनीं आपली श्रेष्ठपणाची ऐट आमच्यापुढें काय म्हणून मिरवावी व आम्ही तरी ती कां चालू द्यावी ? आम्ही क्षत्रिय राजे असतां आमचा विटाळ ब्राह्मण व आचार्य मानतात यांत आमचा अपमान आहे. राणीपुढें बिचारे आचार्य काय करणार ? बाई हट्ट सोडीना तेव्हां सात आठ दिवस लंघन करून आचार्यांनी देवाला संकट घातलें. कांहीं दैवी चमत्कार घडून आल्याचे दिसल्यावरून राणीने देवालयाचें काम त्या वर्षी बंद ठेवलें. परंतु दुसऱ्या वर्षी राणीनें तें हट्टानें सुरू केल्यानें राणीला गप्प बसावयास लावणारा शेवटचा रामबाण म्हणजे पेशवे. यावेळीं पेशव्यांच्या गादीवर थोरले माधवराव असून ते हैदरावरील स्वारींत कर्नाटकामध्यें गुंतले होते. बाईला ताळ्यावर आणण्यासाठीं त्यांनींच स्वतः कोल्हापुरावर जाण्याचें कारण होतें असे नाहीं, तें काम पटवर्धन सरदारांपैकीं कोणीहि केलें असतें. गोविंद हरि पटवर्धन उतार वयांत मिरजेस स्वस्थपणानें रहात होता. त्याचीहि बाईचा समाचार घेण्याची तयारी होती. पण हें प्रकरण फार नाजूक. ती कोल्हापूरच्या राजाची राणी. साताऱ्याच्या गादी इतकीच कोल्हापूरची छत्रपतीची गादी सर्व मराठे सरदारांना पूज्य. राणीनें त्याहूनहि पूज्य अशा आचार्यपीठाची पायमल्ली चालविली असली तरी पेशव्यांच्या परवानगीवांचून किंबहुना आज्ञेवांचून गोविंदपंतास कोल्हापुराकडे वक्र दृष्टीनें पहाणें अशक्य होतें.

माधवराव पेशव्यापाशी गोविंदपंताचा पराक्रमी पुत्र गोपाळराव होताच. त्याला गोविंदपंतानें ता. २९–११–६४ रोजी श्रीमंताचें मन वळविण्याकरितां पत्र लिहिलें. तें असें ‘ करवीरवासी श्रीमंत मातोश्री याणी श्री स्वामीचा पुरातन मठ आहे, त्या शेजारी राजश्री कैलासवासी (संभाजी महाराज कोल्हापूरकर) यांची स्मशानभूमि श्रीस्वामी नको म्हणत असतां जबरदस्तीनें दहन केलें तेथे देवालय बांधलें. याचा प्रकार स्वामींच्या ब्राह्मणभोजनाची जागा आहे ते आंत सापडवून बांधितात. गुदस्ता प्रारंभ केला तेव्हां श्रीस्वामींनीं

अतिशय (विरोध) केला. लंघनें सात आठ केलीं. पुण्यतिथीचा महोत्सव जाला आणि श्रीस्वामी समाधिस्थली वृंदावनास नमस्कार करून ' ऋणानुबंध तुटला ' म्हणोन उठोन आले, तों मागें वृंदावनाचा डोल अद्भुत झाला. सारे करवीर क्षेत्र पहावया आलें. श्रीमंत मातुश्रीहि आली. कितेकांनीं चमत्कार पहावयासाठीं वृंदावनावरी नारळ ठेवलेले डोलाच्या योगे पडले. तेव्हां भयभीत होऊन आपण भिंती घालीत नाहीं म्हणोन मध्यस्थ घालोन (राणीनें) रदबदली केली. स्वामी एकंदर ऐकेनात तेव्हां राजश्री भगवंतपंत आले. त्यानी कबूल केलें. शपथ केली. तेव्हां स्वामी राहिले. पाचसहा दिवस वृंदावनाचा डोल होत होता. सर्वांनीं पाहिलें. त्यावरी दोन चार महिने काम बंद होते. श्रीमंत मातुश्री पनाळेयासी गेलियावरी मागे काम चालीस लागलें. स्वामीचा उपाय न चाले. (तेव्हां त्यांनीं) आम्हास लिहिलें. आम्हीहि पत्र पाठविलें. परंतु (राणीनें आमचें म्हणणें) मान्य केले नाहीं. त्या उपरी ती गडावरी असतांच श्रीस्वामी ज्येष्ठ वद्यपक्षीं अकस्मात् जगरे निघोन येथे मिरजेस येऊन आम्हाजवळ फारच श्रमी जाले. डोळयास पाणी आणिले. महातपस्वी श्रीस्वामी. या मन्वंतरी या प्रतीचा एकनिष्ठ भक्तिमान कोणी दिसत नाहीं. बोलले कीं ' तुम्ही ब्राह्मण. आजी जें श्रीमंत करतील तें होईल. असें असतां आम्हावरी जुलूम होतो याचे कोणी मनास आणीना तेव्हां पुढें विचार काय ? ' तेव्हां आम्ही करार केला कीं ' श्रीमंतांस लिहितो. मधील मधी आम्हास कांहीं करता नये. श्रीमंतांचें पत्र त्यास आणून लावूं. त्यानी मान्य केलें तरी उत्तम. न केलें तरी आम्ही श्रीमंतांची आज्ञा घेऊन भिंताड पाडून टाकूं. स्वामींचा संतोष तेंच करूं. प्रस्तुत श्रमी न व्हावें ' म्हणोन समाधानें बोलिलो......मागे शृंगेरीस कानडे लिंगाइतांनीं उपद्रव केला होता तो श्रीमंत थोरले कैलासवासी (बाजीराव) यानी आपल्या तेजप्रतापें वारिला......राणीस यवनापेक्षां ब्राह्मण ज्ञातीचा द्वेष अतिशय ' [ऐ. ले. सं.] या एका पत्रांत किती तरी भाव उमटले आहेत. त्या काळची परिस्थिति डोळयापुढें उभी राहिली आहे. जिजाबाई राणीचा हेतु काय, तर तिचे भ्रतार संभाजी राजे यांची समाधी शंकराचार्यांच्या समाधीपाशी बांधली जाऊन आचार्यांची बरोबरी करावी. बाई बळकटीला आली तसे आचार्यहि बळकटीला आले. या दोन बड्या धेंडांतील तंट्यामुळें सबंध कोल्हापूर शहर गडबडून गेले. त्या वेळचे शंकराचार्यहि अधिकारी

पुरुष दिसतात. त्यांच्याविषयीं गोविंदपंतास आदर वाटत होता. त्यांनीं सुरू केलेल्या उपोषणानें आबालवृद्धांना हळहळ लागून राणीचा अधर्म सिद्ध होण्यास ईश्वर कांहीं साक्षात्कार दाखवील व त्या योगानें तरी बाईचे डोळे उघडतील अशी आशा लोक करित बसले. वृन्दावनानें डोल दिला व त्यावर ठेवलेले नारळ पडले यापासून काय समजावयाचें ? परमेश्वर राणीवर कोपला असें समजावयाचें काय ? राणीनें लोकांकरितां तेवढ्या पुरती मान डोलविली. आणि मागाहून देवळाचें काम फिरून सुरू केलें. तेव्हां ईश्वरास आळविल्यानेंहि कार्यभाग होत नाहीं असें पाहून आचार्य गोविंदपंतास शरण गेले. देवळाचें भिंताड पाडून देऊळ जमीनदोस्त करणें हा गोविंदपंताच्या हातचा मळ होता. तथापि पेशव्यांची अनुज्ञा मिळेपर्यंत त्याला आपला हात आखडून धरावा लागला. शंकराचार्यांच्या या प्रकरणानें कोल्हापूरप्रांतांत तीस बत्तीस वर्षांपूर्वींच्या वेदोक्त प्रकरणाइतकाच लोकक्षोभ उत्पन्न केला होता असें दिसतें. गोविंदपंताच्या मतेंहि तें ब्राह्मणेतर वादाचें गमकच होय. मुसलमान ब्राह्मणांचा जितका द्वेष करीत त्यापेक्षां राणी जास्ती द्वेष करूं लागली हें गोविंदपंताचें विधान केवळ संतापाच्या भरांत त्वेषाने केलेलें होय.

ब्राह्मण व अब्राह्मण.

परंतु वरील एका उदाहरणावरून ब्राह्मण व अब्राह्मण यांचे परस्परसंबंध नीट नव्हते असें कोणी अनुमान काढील तर तें चुकीचे ठरेल. सत्पुरुष किंवा पूज्य पुरुष कोणत्याहि जातीचा असला तरी त्यास सर्व जातीकडून मान मिळत असे, तेव्हां तो ब्राह्मणांतील सत्पुरुषांनाहि मिळत असेल हे सांगावयास नकोच. ब्रह्मेंद्रस्वामीचें उदाहरण सर्वप्रसिद्ध आहेच. त्यांच्या शिष्यवर्गांत ब्राह्मण व मराठे असे दोन्ही जातींचे सरदार होते. छत्रपति शाहूमहाराज व बाजीराव पेशवे हे त्यांचे शिष्य होत. पहिला रघोजी ऊर्फ बाबासाहेब भोसले हा नागपूर येथील भोसल्यांच्या गादीचा संस्थापक. परसोजी भोसल्याचा पुतण्या बिंबाजी याचा हा पुत्र. बिंबाजीस वाई प्रांतांतील पांडवगड (पांडेवाडी) येथील रामाजीपंत कोल्हटकर नामक सत्पुरुषाच्या आशीर्वादानें हा मुलगा झाला. रामचंद्र म्हणजेच रघूजी. रामाजीपंताच्या कृपेमुळे हा पुत्र जन्मला म्हणून त्याचें नांव रघूजी असें ठेवण्यांत आलें. रामाजीपंताच्या घराण्यांतील कोन्हेराम यास पुढें रघूजीनें आपला दिवाण केले याचें कारण त्याची रामाजीपंतावरलि

भक्ति हेंच होय. हे नाते पारमार्थिक झालें. पण सामान्य व्यवहारहि याच धर्तीवर चालत होता. कोल्हापूरचे छत्रपति व मनोळीची कृष्णाबाई शिंदे यांचें वांकडे होतें. कृष्णाबाईच्या ताब्यांत कटकोळ गांव होता. हा गांव आपला पण तो कृष्णाबाईनें जबरदस्तीनें घेतला असा बोभाटा कोल्हापुरकरांनीं पेशव्यांकडे केला. उलटपक्षीं कृष्णाबाईचा व पटवर्धन घराण्याचा परम स्नेह. कृष्णाबाईबरोबर करावयाच्या पत्रव्यवहारांत गोविंद हरि तिला चिरंजीव म्हणून संबोधितो.

पहिल्या बाजीरावाची आई राधाबाई महायात्रा करून सुखरूपपणें घरीं आली; तें पाहून पेशव्यांच्या लोभांतील सर्वांना अतिशय संतोष झाला. पेशव्यांवरहि लोभ करणारांत सर्व जातींचीं माणसें होतीं. यात्रेहून आल्यावर राधाबाईनें महाप्रसाद मोठ्या थाटाचा केला असेल व त्या वेळीं भोजनसमारंभहि मोठा झाला असेल हें उघड आहे. परंतु त्यास येणें ज्यांना शक्य झालें नाहीं अशीं माणसे पुष्कळ असतील. तेव्हां त्यांची अपेक्षा कीं, गंगापूजनासाठीं आपल्याला पुण्यास जातां आलें नाहीं तें नाहीं, पण त्याचा प्रसाद तरी राधाबाईनें आपणाकडे पाठवावयाचा असता. तथापि राधाबाई झाली म्हणून तिला सर्वांचें बिनचूक स्मरण कसें रहावें ? तिच्या स्मरणांतून तळेगांवच्या दाभाडे सेनापतींच्या घराण्यापैकीं सौभाग्यवती राधाबाई दाभाडे ही सुटली. तिनें रागाचा अविर्भाव आणून राधाबाई पेशवे हिला पाठविलेल्या खोचदार पत्रांत म्हटलें ‘ अशी निष्ठुरता मजविषयीं तुम्ही कां धारण केली ? ’ राधाबाई पेशवे ही बाजीरावाची आई या नात्यानें महाराष्ट्रांतील सर्व लहान थोरांना मातुश्रीसमान वाटत होती. पिलाजी जाधवराव हा पेशव्यांचा निस्सीम व विश्वासु सेवक. तो बाजीरावाच्या सवंगड्यापैकीं असल्यानें राधाबाईस लिहिलेल्या पत्रांत स्वतःला ‘ अपत्यासमान ’ असें विशेषण लावून घेतो. संक्रान्तीच्या दिवशीं तिळगुळ देण्याची गडबड महाराष्ट्रांत केवढी तरी उडत असे. कोणीहि परिचयाचा मनुष्य गांवांतल्या गांवांत असल्यावर भेटून तिळगुळ दिल्यावांचून व गोड बोलण्याचें वचन मागितल्यावांचून राहावयाचा नाहीं. तिळगुळ हा थोरांनीं लहानाला द्यावा आणि दसऱ्याचें सोनें लहानांनीं थोरांना द्यावें असा प्रघात आहे. परंतु लहानथोरपणाचें नातें मोठ्या वयांत कुटुंबाबाहेरील माणसें स्वाभाविकच मानीत नाहींत. हिंदूंत जाती अनेक असल्या तरी त्यांच्यांत ऐक्य वाढविणारे जे रज्जू निर्माण

केले आहेत त्यांपैकीं हे सण महत्वाचे होत. पिलाजी जाधवानें राधाबाईस तिलशर्करा पाठवितांना पुढील वाक्य लिहिलें आहे. 'वडिलाकारणें संक्रमणानिमित्त तिलशर्करा पाठविली आहे.' बाजीरावापेक्षा छत्रपति शाहूमहाराज निर्विवाद श्रेष्ठ व वडील. त्यानी बाजीरावास तिळगुळ पाठविताना पुढील मजकुराचे पत्र लिहिले 'स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ६१ आनंद संवत्सरे पौष बहुल सप्तमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहूछत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्हाकारणे संक्रमणप्रयुक्त तिळगुळ पाठविला असे. घेणे जाणिजे. बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा' (पे. द. १८)

कुटुंबांतील भावबंधन

समाईक कुटुंबव्यवस्था समाजास एकंदरीनें पसंत पडली होती. एका कुटुंबांत पुरुष, स्त्रिया व मुलें मिळून पंचवीस तीस माणसेंहि आढळत व त्यांचा कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीला एकप्रकारचा अभिमानहि वाटत असे. त्या अस्वस्थतेच्या व अनिश्चित काळांत एकएकट्या व्यक्तीचा निभाव लागणें अशक्य होतें. धरपकड, मृत्यु, लुटालूट व जाळपोळ हीं संकटें नेहमीचीं. बहुतेक कर्त्यापुरुषांचा पेशा लष्करी व लष्करी नसलाच तर लष्करांतला. त्यांचा जीव मरणाला उधार-नसावयाचा, पण जे लष्करांत नसत व आपआपल्या घरीं राहून शेतवाडी व उदीम धंदा स्वस्थपणानें पहात त्यांजवर व त्यांच्या गांवावर दरवडेखोरांची, लुटारूंची किंवा शत्रूच्या फौजेची धाड केव्हां पडेल आणि त्यांच्या शेतांची पायमल्ली होईल, चीजवस्त लुटली जाईल, घरांतील कर्ता पुरुष धरून नेण्यांत येईल किंवा स्त्रिया पुंडांच्या हातीं पडतील याचा भरवसा नसे. अशापैकीं कोणतेंहि संकट कोणावरहि ओढवलें तर त्यानें स्वतःवर अवलंबून असणाऱ्या माणसांची सोय लावावयाची म्हटल्यास समाईक कुटुंबाच्या आश्रयाशिवाय त्याला दुसरा खात्रीचा उपायच असू नये. बायको मेली तर नवरा व मुलें यांना पोटाला घालण्यास, नवरा मेला तर बायकोला संभाळण्यास व नवरा, बायको दोन्ही नाहींशी झाली तर मुलाबाळांना जतन करण्यास समाईक कुटुंबाचा अनेक शाखांचा विशालवृक्षच समर्थ होता. असें कुटुंब दुःखाचा भार हलका करी व सुखाचा ठेवा वाढीस लावी. समाईक कुटुंब हें एक लहानसें राज्यच असून त्यांतील अधिकार वय व कर्तृत्व यांस

अनुसरून वाटला जाई. त्या काळीं मनुष्याची योग्यता ठरविण्याकरितां किंवा वाढविण्याकरितां हल्लींसारख्या कृत्रिम परीक्षा नव्हत्या. एकच परीक्षा दोघांनीं दिली असली म्हणजे वयानें धाकटा असलेला भाऊ जसा सांप्रत वडिल भावाची किंवा मुलगा बापाची बरोबरी करूं इच्छितो तसें बरोबरी करण्याचें सुलभ साधन त्या काळीं नसल्यामुळें वयानें व नात्यानें जे मोठे त्यांचा वचक लहानांवर असे व धाकटेहि वडिलांचा मान ठेवण्यांत भूषण समजत. मुलें बापाच्या धाकांत, धाकटे भाऊ वडील भावाच्या धाकांत व स्त्रिया पुरुषांच्या धाकांत अशी पद्धत होती.

घरांतील पुरुष कर्ते व समंजस असले म्हणजे त्या कुटुंबांतील व्यक्तींत परस्पराविषयीं माया व प्रेम विलक्षण उत्पन्न होऊन त्या सुखास व समाधानास पारावार नसे. थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पेशव्यांचें घराणें ऐन भरभराटींत होतें. दोघे भाऊ बाजीराव व चिमणाजीआप्पा रामलक्ष्मणासारखे. दोघांची संतति मनाजोगी व वीर्यशाली. संपत्तीची कमतरता संसाराला नव्हती. सर्वांच्या वरती छत्र मातुश्री राधाबाईचें. चिमणाजीचें शहाणपण व चातुर्य सर्वांहून अधिक. आणि त्याला मदत त्याचा पुतण्या बाळाजी ऊर्फ नानासाहेब याची. बापलेकांपेक्षां चुलत्या-पुतण्यांचें लागतें विशेष. प्रपंचाचा तोल कोठें जातोसा दिसला किंवा बाजीरावाकडून दुर्वर्तन होतेंसें वाटलें कीं, त्याला युक्तिप्रयुक्तींनें सन्मार्गावर आणण्याची चुलत्या-पुतण्यांची सिद्धता. त्या वेळचीं पेशव्यांच्या घराण्यांतील सगळींच माणसें रत्नाप्रमाणें तेजस्वी असून चिमणाजीची योग्यता त्याहूनहि कांहीं निराळीच. चिमणाजीस घराण्याचा अभिमान मोठा. जे कोणी जवळचे दूरचे आप्त-स्वकीय त्यांजविषयीं चिमणाजीला आपलेंपणा वाटून त्या सर्वांनीं वर्षाच्या काठीं एखाद्या दिवशीं तरी एकत्र जमून आनंद करावा असा त्याचा प्रयत्न असे. कारण साऱ्यांना मोकळा असा एखादाच दिवस वर्षांतून मिळावयाचा. म्हणून सन १७३४ त शिमगी पौर्णिमेकरितां त्यानें पुणें मुक्कामीं आप्तेष्टांना आग्रहानें बोलावलें होतें. तथापि मराठ्यांचा मुलूख शत्रूंनीं वेढलेला, उशापायथ्याशीं बसलेला मोगल घराला त्रास देईल यासाठीं त्यांचा मामेभाऊ कोठुऱ्याचा इनामदार बाबूराव बर्वे हा येऊं शकला नाहीं असें वर आलेंच आहे. जे सत्पुत्र असत त्यांना मातेविषयीं विलक्षण पूज्यबुद्धि वाटावी. आर्यांची शिकवण हृदयावर ठसलेले पुत्र मातापितरांना दैवतच समजत. मातुश्री राधाबाई हिजवर

चिमणाजीची निस्सीम भक्ति होती. दिवस धोक्याचे होते तरी माणसें धैर्याची होती. काशीयात्रा वगैरे धर्मकृत्यें त्या धोक्यांतहि स्त्रीपुरुष उरकून घेत. पेशवे झाले म्हणून त्यांच्या कुटुंबांतील माणसांना अशा प्रसंगीं चिंता नव्हती असें नाहीं. पण त्याहि मनःस्थितींत यात्रेंतून मायाळू हौसाहि तीं पुरवून घेत. राधाबाई काशीयात्रेला निघाली तेव्हां चिमणाजीआप्पाचा मुलगा सदाशिवराव अवघा पांच वर्षांचा होता. त्या आपल्या छोट्या नातवास बरोबर घ्यावें अशी राधाबाईची इच्छा. ती इच्छा चिमणाजी कसा पुरविणार नाहीं ? परंतु तें लहान मूल एखादे वेळीं हट्ट धरावयाचें, इतक्या दूर देशीं गेल्यावर बापाची आठवण काढावयाचें व रडत बसावयाचें. म्हणून चिमणाजीनें त्याला आजीबरोबर पाठविलें नाहीं. आजी यात्रेला निघून गेली. सदाशिवाची आई लहानपणींच त्याला इहलोकीं सोडून परलोकवासी झालेली. तेव्हां सदाशिव बाळाला आजीचाच लळा फार. वाटेनें आजीला चुकल्याचुकल्यासारखें व पोटांत तोडल्यातोडल्यासारखें होऊं लागलें. यासाठीं तिनें चिमणाजीला पत्र लिहून नातवाला कोणाबरोबर तरी रवाना करण्यास कळविलें. आईची मर्जी मोडली याची चुटपुट चिमणाजीलाहि लागून राहिलीच. आणि आई त्यास सोडून दूरदेशीं जसजशी जात चालली तसतसें हें आपण पाप तर केलें नाहींना असें पापभीरु व मातृभक्त चिमणाजीच्या मनांत येऊन नाजुक विकारांचें काहूर माजलें. तो लिहितो ' तुमची आज्ञा क्षेपनिक्षेप पाठवावे यैसीच असली तर लक्ष प्रकारें पाठवून देऊं. तुमच्या समाधानापेक्षां आम्हास दैवत दुसरें नाहीं....तुमचा निरोप घेतला ते समयीं आपण पायउतारा तुमचे पालखीसमागेम घटकाभर येऊन मग निरोप घेऊन यावें यैसे होते. परंतु ते समयीं चित्तांत आलें नाहीं. यामुळें चित्तांत अलीकडे आलियावर हळहळ वाटली. ' (पे. द.) किती गाढ भक्ति व किती नाजूक व प्रबळ वृत्ति ! आई पालखींत बसली असतां तिच्या पालखीबरोबर तिच्याशीं बोलत कांहीं पावलें तसाच गेलो नाहीं यामुळें केवढ्या सुखास आपण अंतरलों असें चिमणाजी मनांत वारंवार आणून दुःख करीत आहे ! चिमणाजीनें आईच्या प्रयाणसमयीं जें जरूर तें सर्व काळजीपूर्वक केलें असेल. परंतु आई काशीच्या बिकट यात्रेकरितां दूर गेल्यावर तें मायेमुळें त्याला कमी भासूं लागलें इतकेंच. धाकट्या सदाशिवाला, आणखी सव्वीस वर्षांनीं पानिपतच्या रणभूमिवर लाखों मराठ्यांना घेऊन अबदल्लीशीं झुंजण्याकरितां ठाण मांडणाऱ्या त्या भावी

पराक्रमी वीराला, आईविणें पोरक्या दिसणाऱ्या त्या आजच्या पोराला, आपल्या इतकें ममतेनें कोणी संभाळणार नाहीं म्हणून त्याची आजी राधाबाई त्याला कांशीला बरोबर घेऊन जाणार होती आणि देवधर्म करीत असतां आपल्या मातेचा पायगोवा कशाला म्हणून आप्पा, सदाशिवाचा बाप त्याला घरीं ठेवून घेणार होता !

राधाबाईसंबंधानें चिमाजी आप्पाची भक्ति या प्रकारची. बाळाजी हा चिमाजीचा पट्टशिष्य. चुलत्यावरहि त्याची कडी. तो शाहुमहाराजांपाशीं साताऱ्यास असे. आजी यात्रेला गेल्यावर तिच्या खुशालीकडे कुटुंबांतील लहान थोरांचे डोळे लागून राहिले होते. तिच्याकडून पत्र आले कीं, त्याची बातमी परगांवीहि कळविली जावी. ती ऐकतांच प्रत्येकाला काय पण हर्ष व्हावा ! चिमणाजी पुण्यास होता कीं दुसरीकडे होता, त्यानें नानासाहेबास आपल्या आईचें क्षेमकुशल कळविले. ते समजून नानासाहेबानें चिमणाजीस लिहिले, ' मातुश्री बाई प्रयाग करून काशीची यात्रा करून गयेस सुखरूप पावली म्हणून स्वामींनीं लिहिलें. त्यावरून बहुत हर्ष झाला, तो पत्री लिहावें ऐसे नाहीं. ' चिमणाजी व बाळाजी हे उभयतां साताऱ्यास छत्रपतीपाशीं रहात व बाजीराव कुटुंबांतील सर्व माणसांसुद्धां पुण्यांत असे. बाजीरावाचें घर नेहमी घोडयाच्या पाठीवर असल्यानें घरी वडीलधारें हवें म्हणूनहि राधाबाई पुण्यास रहात असेल. तिला काय दोन्ही पुत्र सारखेच. किंबहुना जो तिला सोडून दूर गेलेला त्याच्याकडे तिचा ओढा अधिक. बारीक बारीक जिन्नसहि तिनें आठवणीनें त्याच्याकडे पाठवावा. तांदूळ म्हणा, पोहे म्हणा, आवळकाठी म्हणा, चिमणाजीला मिळत कां नसेल ? पण नाहीं. आईचा जीव राहिला पाहिजे ना ? राधाबाईला वाटे, सारे मिळेल, पण मायेनें व निगोतीनें केलेला जिन्नस माझ्या आप्पाला नि नानाला कोण देईल ? त्याकाळीं मुलांची खेळणी हल्लींसारखी विपुल झाली नव्हती. हस्तिदंती व कांचेच्या बाहुल्या पुण्यासारख्या शहरांत पेशव्यासारख्या सर्वसमर्थ पंडित प्रधानाला उपलब्ध नव्हत्या. पुण्यापेक्षां तेव्हां साताऱ्याला मान मोठा. ती मराठी राज्याची राजधानी. देशोदेशीचा हर जिन्नस तेथें बाजारांत यावयाचा किंवा महाराजांच्या वाडयांत नजर म्हणून कोणी पाठवावयाचा, या समजुतीनें राधाबाई चिमाणाजीस लिहिते, ' मुलास खेळावयास हस्तिदंती बाहुली व कांचेची बाहुली पाठवून देणे. पूर्वी तांदूळ व पोहे तुमच्याकडे पाठविले, त्याचा जाब आला नाहीं. तांदूळ पटणी,

पोहे व आवळकाठी यांचें प्रयोजन असेल तर लिहून पाठविणें. ' अर्ध्या पावआण्यांत आजचे पत्र उद्याला पुण्याहून सातान्यास पोचवावयास टपालखातें नसल्यामुळें ' बाहुली ते आवळकाठी ' हा सगळा मजकूर राधाबाईने एका पत्रांत कोंबला; कारण पत्र म्हटले कीं जासूद जोडी अगर सांडणीस्वार याजबरोबर रवाना करावयास पाहिजे.

वरील उदाहरण झाले मायलेकरांच्या प्रेमसंबंधाचें. पण वेगवेगळया व अनोळखी घराण्यांत जन्मास आलेल्या जावाहि एकत्रच लहानाच्या थोर झाल्यामुळें एकमेकीवर कशा पाठच्या बहिणीप्रमाणें माया करीत याचाहि मासला पेशवेघराण्यांत पहावयास सांपडत होता. जानकीबाई ही रघुनाथराव पेशव्याची पहिली पत्नी. नानासाहेबाची पत्नी गोपिकाबाई ही तिची वडील जाऊ. जावा जावा पुण्यास एकत्रच होत्या. पुढें नानासाहेब कर्नाटकाच्या स्वारीवर गेला तेव्हां त्या दोघी व नानासाहेबाची मुलें त्याजबरोबरच गेली. नंतर जानकीबाई कांहीं कारणासाठीं पुण्यास परत आली. तेथून तिनें गोपिकाबाईस नेमानें पत्रें पाठवावयाची ती येईनात. म्हणून गोपिकाबाई धाकट्या जावेस प्रीतिपूर्वक पण छद्मी कशी लिहिते ते पहाण्यासारखे आहे.

' तेथे दादावरच माया राहिली. इकडील विसरलासे दिसते. परंतु ऐसे नसावे. येकायेकीच भिन्नपणास अंतर न पडावे. बहुधा विस्मरणे कडून होत असेल ते स्मरणे कडुन करावे. ' [पे. द. १८]

नानासाहेबाचे आकर्षण

नानासाहेब मोठा रसिक व नजरेचा सूक्ष्म होता. त्याला प्रवासांत कोठे कांहीं अनुकरणीय दिसले कीं त्याने ते स्वीकारावेच. त्याची गोपिकाबाईवर प्रीति होती. कर्नाटकाच्या एका स्वारींत गोपिकाबाई त्याच्याबरोबर नव्हती. पण फुरसतीच्या क्षणांत तिचे स्मरण त्यास स्वाभाविकपणे व्हावे. तसें झालें म्हणजे त्याने एखादा फर्माइषी जिन्नस पत्नीस पाठवावा व क्वचित् नाजूक इषाराहि द्यावा. त्या रिवाजास अनुसरून त्याने पुढील पत्र व त्यांत नमूद केलेल्या जिनसा तिजकडे रवाना केल्या. पत्र दुसऱ्या मार्फत लिहविले आहे.

' राजश्री नारोपंतनाना स्वामींचे शेवेसी–विनंति उपरी. तांब्याचा पेला एक पाठविला आहे. हा श्रीमंत बाईसाहेबास पाणी प्यावयास द्यावा. येविसी

श्रीमंतानी त्याहावयास आज्ञा केली त्याजवरून लिहिले आहे...मुगदळाचा लाडू पाठविला आहे. हा भक्षून पहावा. याजप्रमाणें करीत जावा, येविसी विनंति करावी. श्रीमंतानी दाखल्यास पाठविला आहे, म्हणून बाईसाहेबास सांगणे. हे चिठी वांचून दाखवावी ’ [पे. द. १८]

तांब्याचा पेला तो काय व मुगदळाच्या लाडवाची मातब्बरी ती किती ! कदाचित् पेला विशेष घाटदार असेल व मुगदळाच्या लाडवांत मालमसला खुमासदार घातला असेल. तथापि त्या दोन बाह्यतः क्षुल्लक जिनसा नजरेस पडल्यावर त्यांत साठविलेल्या प्रीतीमुळें खुद्द नानासाहेबांचेच दर्शन घडल्याचा आनंद गोपिकाबाईला लाभला नसेल काय ? दूरदेशीं असल्याने प्रिय पत्नीस जो विरह वाटावा तो जाणवूं न देण्याची नानासाहेबाची ही हातोटी अजब खरीच.

स्वारीवरून कधी नव्हत परत आल्यावर जे थोडे दिवस घरी सापडतील तेवढ्यांत भोगवेल तितके गृहसौख्य स्वतः भोगावे व दुसऱ्यासहि द्यावे असा नानासाहेबाचा क्रम असल्यास तो त्याच्या रसिकतेस अनुरूपच होय. रात्रीची वेळ होती. चांदणे पडले होतें. फराळाचे साहित्य सिद्ध होतें. अशा त्या शिळोप्याच्या प्रसंगीं नानासाहेब आपल्या लोभांतल्या माणसास माहित असलेल्याच गोष्टी पुनः पुनः विचारून मनोविनोद करीत होता. तेव्हां घडलेला प्रकार त्या व्यक्तीनें आपल्याहून वयाने लहान अशा दुसऱ्या व्यक्तीस पत्रद्वारे पुढील शब्दानी कळविला ‘ आसीर्वाद उपरी. काल तीर्थरूप राजश्री नाना स्वामींनी बोलावले होते. चांदण्यात बसले होते. फराळाची संविधा जवळ ठेवली होती. रिकाम्या गोष्टी बोलता पुसू लागले की तुमची प्रकृति कोण्या प्रकारची ? पुसिले याचा भाव काय की त्यास आमची प्रकृति ठाऊक नाहीं ऐसे नाहीं. तथापि हे खरे सांगतात कीं लटके सांगतात हा भाव पहावा म्हणून पुसिले. आम्ही हा भाव जाणून यथास्थित ज्याप्रमाणे सांगावयाची त्याप्रमाणे सांगितली. उगेच होते हे आसिर्वाद ’ [पे. द. १८] कोणासहि चटका लागेल असें बोलून व लिहून त्यास भजनीं लावण्याचा आकर्षक गुण नानासाहेबांत उत्कट असल्याचे दिसून येते. कोणाकडे चांगले फळ असले कीं त्याने त्याची डाली नानासाहेबाकडे पाठवावीच. तशी आंब्यांची डाली निंबाळकरानी पाठविली व सोबत अत्यंत मर्यादशील पत्र पुढीलप्रमाणें लिहिले.

' श्रीमंत राजश्री पंतप्रधान गोसावी यासी.--
अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री महाराव जानोजी जसवंत निंबाळकर कृतानेक दंडवत विनंति......यानंतर नूतन झाडे आंबीयाची लावली. त्यास फळे आली. ते शेवेसी पाठविली असेत. पसंद पडावया योग्य नाहीत. परंतु नूतन वस्तू श्रेष्ठास नजर करावी यास्तव प्रेषण केली असेत. '

आंबे आल्यानंतर ते चांगले आहेत, उगीच झाडाला आले म्हणून कसले तरी न पाठविता परीक्षा करून पाठविले आहेत असेच नानासाहेबाकडून गौरवपर पत्र निंबाळकरास गेले असेल. असा कांहीं पत्रव्यवहार झाल्यावर निंबाळकर लिहितात.

' या उपर कृपा करून पत्र पाठविले. प्रविष्ट होऊन संतोष झाला. बरावाईट हवाला ईश्वरावर घातला तर इतक्या लांब विनापरीक्षा केल्याखेरीज आंबे पाठविले की काय म्हणून लिहिले. ऐसीयासी यद्यपि परीक्षा केली तर जेथ बहुशा लक्षशा [लक्षावधि] आंबे येतात तेथे परीक्षा करूनहि पाठविले तरी मान्यतेस येणे कळतच आहे. ज्या गांवी झाडे नाहींत त्या गांवी जे झाड असल तेच तेथें मान्य. या करिता संदेहपद घातलें की बरावाईट ईश्वर जाणे. आम्ही तो बदरीफलन्याये पाठवितो. ' [पे. द.·१८] राजकीय व्यवधाने संभाळून लोकांचे चित्त वेधून घेण्याकरिता तत्कालीन थोर पुरुषाना त्याना कसे आपलेसें करावे लागत असे व त्यामुळें ब्राह्मण, मराठे आदिकरून मंडळीत किती घरोबा वसत· असे याचा हा एक दाखला आहे. अशा गोडव्या स्वभावाचे सुख कुटुंबांतील लहान थोर माणसाना सहजच चाखावयास सापडत असे. मायलेकरे, दीरजाऊ, जावाजावा व इष्टमित्र यांचे संबंध पेशवे घराण्यांत कसे आढळत याची उदाहरणे वर दिली. त्यानंतर भावाभावामधील व्यवहाराचे उदाहरण द्यावयाचे राहिले. ते पटवर्धन घराण्यांपैकीं देत आहे.

वडील बंधू धाकट्या भावावर बापाप्रमाणें अधिकार गाजवीत. त्यांतून वडील भाऊ गोपाळराव पटवर्धनासारखा रागीट असला म्हणजे तर पहावयासच नको. गोपाळरावाचा मुक्काम हैदरावरलि स्वारींत शिरें तालुक्यांत होता. मिरजेस त्याचा धाकटा भाऊ पांडुरंगराव घरचा कारभार पहात होता. त्याचीं दोन पत्रें गोपाळरावास आलीं. परंतु तीं डिंक लावून लखोट्यांत बंद केलेलीं नव्हतीं. तशांत पत्रांतील मजकूरहि यथास्थित कच्चा लिहिलेला नव्हता. मग काय बिचा-

रावें ? गोपाळरावानें एक एक डोळा एवढा केला. त्यानें पत्र लिहून विचारलें ' डिंक मिरजेस मिळत नाहीं किंवा कसें हे कळत नाहीं. मुख्य आळस खरा. वर्तमान तों कांहींच लिहीत नाहीं. सविस्तर व वर्तमान लिहीत जाणे. ' (ऐ. ले. सं. खंड. ४ सन १७७०) पांडुरंगरावाला शिस्त लागणें जरूर असल्यानें गोपाळरावानें वरीलप्रमाणें खरमरीत पत्र लिहिलें.

वृद्धावस्थेंत किंवा अशक्तपणात मनुष्याची दिनचर्या कशी असे हें मराठी राज्यांतील एक प्रसिद्ध मुत्सद्दी सखारामबापू बोकील याच्या सासवड येथील दिनचर्येवरून समजतें.

' सेवेसी विज्ञापना. राजश्री सखारामपंत सासवडीच आहेत. आम्ही दोन वेळ त्यांचे भेटीस गेलो होतो. बापू आपल्या वाडियांत येऊन राहिले आहेत. प्रातःकाळी उठावें शौच्यास जाऊन तौंड धुवून चार घटका शेगडीजवळ बसावें उपरांतिक निद्रा करावी. सहा घटकापर्यंत निजावे. तदोत्तर उठोन स्नान करावे. दोन प्रहरा भोजन करावे. त्यानंतर चार पांच डाव सोकट्याचे खेळावे. पुढें चार घटका पोथी पुस्तक वाचावें. मग श्रीवटेश्वरास जावे. मग संध्या करावी. रातीस आपला घरचा कारभार व कोण्ही आला गेला यैसे प्रहर नऊ घटका जागावे. उपरांतिक निजावे. ' (पु. द. भाग ३ रा)(ता. १३ फेब्रुवारी सन १७६९).

संकटांची संवय

महाराष्ट्र हें मर्दांचे राष्ट्र होतें. लढाई हाच त्यांतील लोकांचा पेशा. जे लोक दुसऱ्यांच्या मुलखांत जाऊन लढणार त्यांना स्वतःवर कोणी चालून आल्यास त्याच्याशी तोंड देण्याची सिद्धता ठेवणें भागच कसे. महाराष्ट्रांत येऊन केवळ महाराष्ट्रीयेतर शत्रूच लुटालूट, जाळपोळ व कापाकापी करीत असें नाहीं. तर खुद्द मराठेहि मराठ्यांना लुटीत, आबालवृद्धांना निर्दयपणानें वागवीत, द्रव्याच्या आशेनें घरें खणून काढीत व गांवें जाळून टाकीत. पुण्यासारख्या राजधानीच्या शहरावर हें संकट वारंवार येत नसे, पण लहानसान गांवातून ही पाळी वरचेवर द्यावीच लागे. या कारणानें दागदागिन्यांचें, उंची पोशाखाचें, वैभव फक्त शहरांतून आढळावें आणि शहराबाहेरील गांवें वरून कंगाल दिसावीं त्यांतील घरें बहुशः भिकार खोपटवजा असावीं, घरांत मौल्यवान्

चीजवस्त आढळू नये आणि गांवच्या लोकांनीं जवळचें डबोलें घराच्या भिंतीत किंवा जमिनींत पुरून ठेवावें यांत नवल नाहीं. संपत्ती लपवून जसे ते सदा तयार होऊन बसलेले असत त्याचप्रमाणें त्यांनीं शरीराची व मनाचीहि खंबीरी ठेवलेली असे. ते जोर, जोडी, दांडपट्टा, व कसरत कुस्ती यांचा नित्य अभ्यास ठेवून आपलीं शरीरें धष्टपुष्ट व घट्टमुट्ट करून असत आणि पुरुषांची तयारी पाहून स्त्रियाहि येईल त्या प्रसंगास पाठ देण्यास सादर होत. लहानपणापासून संकटांची संवय झाल्यामुळें महाराष्ट्रीयांच्या वृत्तींत एक प्रकारचा गंभीरपणा आला होता. त्यांना जगाच्या नश्वरतेची व जीविताच्या क्षणभंगुरतेची खात्री पटलेली होती, आणि येणाऱ्या संकटाशीं ज्याचें त्यानेंच झगडणें भाग असल्यानें जो तो धीट व स्वावलंबी बनला होता. ज्यांना लढाईवर जाण्याची पाळी येई त्यांची तयारी इतराहून जास्ती. लढाईवर सोळा सतरा वर्षांपासून तों साठ सत्तर वर्षांपर्यंतच्या पुरुषांना जावे लागे. बहुधा सर्वत्र विजय मिळत व क्वचित् अपयश येई. तथापि जय लाभो कीं, अपजय मिळो, हा जखमी झाला, तो मृत्यु पावला, त्याला शत्रूनें धरून नेलें, असला देखावा सतत दृष्टीस पडत असल्याने राज्यें चालविण्याची जोखीम केवढी आहे, आपलें व्यक्तिशः बल किती आहे, देशोदेशीच्या वीर पुरुषांत बाहुबळ, युद्धकर्म या बाबतींत फरक काय आहेत, याचा प्रकाश मनावर पडून जबाबदारीची जाणीव उत्पन्न होत असे आणि स्वकीय व परकीय यांजमधील भेद डोळयांला दिसून राष्ट्रीय भावना अन्तःकरणांत बाणत असे. विजयानें बाहू स्फुरण पावत तसे हरघडी भेटणाऱ्या संकटांनीं ईश्वराकडे मनाचा कल वळून त्याचे चरणावर भक्ति जडत असे. हा परिणाम पूर्वसंस्कार, कुलशील, वयोमान, बुद्धीची तीव्रता, भावनांचा जोर, व्यक्तीचा दर्जा, शिक्षणाची इयत्ता यांवर व्यक्तिपरत्वें अवलंबून रहाणें स्वाभाविक होय. त्यामुळें एखादा पुरुष अत्यंत बुद्धिमान् असल्यास दहा ग्रंथ वाचून किंवा वसि वर्षें जगांत जगून जें ज्ञान मिळवूं शकणार नाहीं तें ज्ञान त्याला एका मोहिमेंत प्राप्त व्हावें. युद्धांतील आप्तेष्टांचे व परिचितांचे मृत्यु व जखमा पहाण्यानें तो तत्त्वज्ञ बनावा, शत्रूचीं मुंडकीं कापण्याच्या सरावानें तो निर्दय राक्षसाच्या पंथास लागावा आणि जातांयेतांना देशोदेशींचें व शहरोशहरींचे कलाकौशल्य नजरेस पडल्यानें त्या कलेनें आपलें गांव शोभिवंत करण्याचें महत्त्व त्याच्या अंतःकरणांत उतरावें. राजे, महाराजे, सरदार यांची

पोशाखाची तऱ्हा, बोलण्याची ढब, वागणुकीची पद्धत यांचा परिचय झाल्यानें त्यांच्या पद्धतींत भारदस्तपणा व रुबाबदारी यावी आणि एकंदरीनें सर्वांच्या वृत्तींत गंभीरपणाच्या व विचारशीलतेच्या रोखानेंच पालट पडावा. तत्कालीन लोकांना इतिहास, भूगोल, राज्यशासन, अर्थशास्त्र, भूमिति, बीजगणित, भाषाशास्त्र इत्यादिकांचें शिक्षण नसतांहि त्यांच्या ठिकाणीं चतुरस्रता, रसिकता, बहुश्रुतपणा, चोखपणा, शिस्त, माहितीचा बिनचूकपणा, चौकसखोरपणा व सावधानता हे गुण प्रवास, मोहिमा, परप्रांतनिवास, यामुळेंच उत्कर्ष पावले आणि वेश्यागमन, मद्यपान यासारखें दुर्गुणहि क्वचित् जडले यांत शंका नाहीं.

पाणिपताहून परत येताना

पेशवाईतील प्रसिद्ध मुत्सद्दी व साडेतीन शहाण्यापैकीं अर्धे शहाणे नाना फडणवीस यांचे उदाहरण या दृष्टीनें मनोरम होय. पाणिपतच्या घनघोर संग्रामांत ते भाऊसाहेब पेशव्यांच्या सन्निध होते. त्यावेळीं त्यांचें वय केवळ वीस वर्षांचें. अशा अल्प वयात त्या भयंकर संग्रामांत लाखो मराठ्यांच्या रक्ताचे पाट वाहल्याचे पहाण्याचा त्यांजवर प्रसंग आला. नाना हाडाचे पापभीरु व सच्छील. त्यांच्या मनावर त्या प्रसंगाचा काय परिणाम झाला असेल! नुसती लोकांची दुःखें ते पहात होते असे नव्हे, तर त्यांतील कित्येक दुःखें स्वतःहि अनुभवीत होते. युद्धानंतरच्या धावपळीत त्यांना स्वतःला पळून जावें लागलेंच, पण त्यांची आई व बायको ही कोठें चालती झाली, कां शत्रूच्या हातीं पडली; कां मृत्युमुखी गेली याचीहि त्यांस दाद नव्हती. आधी स्वतःचा जीव वाचविण्याची काळजी; मग पत्नी व मातुश्री यांची काळजी अशा त्या विलक्षण स्थितीत नानांच्या मनाची अवस्था काय झाली असेल याची यथार्थ कल्पना इतरांना कशी येणार? ती त्यांच्याच शब्दांनीं वर्णिलेली बरी. 'मी सायंकाळचे दोन घटका दिवसास घोड्यावर पाणिपतांत आलो. त्या देशचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथें परमेश्वरें वाट दाखवावयापुरते रामाजीपंत उभे होते. सांगू लागले, घोडें वस्त्रें टाकून द्यावी. त्यावरून टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलो. रात्र जाहल्यावर चाललो तो एका कोसांत तीन चार वेळां शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला, दरखेपेस समागमेचे दहावीस तोडून टाकीत. त्यांत मी राहिलो. हे सत्ता ईश्वराची; परंतु बापूजीपंत, रामाजीपंत रहातच गेले. तो तेच शत्रू

येऊन बापूजीपंत रामाजीपंत वगैरे यांस जखमी केले. पडले. मी एकटा राहिलो. तो गवतांत गेलों. ईश्वरें तृणेकरून माझें रक्षण केले. त्यांस मोहिनी घातली. सर्वांस मारिलें असतां, मी जवळ असतां न मारिलें व गवत लांब असतां जाऊं दिलें. पुढें ते गेल्यावर जाऊं लागलो. तो पुढें मागती दोन कोसांवर दुसरे दृष्टीस पडले. तेव्हां मागती तृणांत जाऊन बसलो तो जवळ येऊन काढूं लागले. ते समयीं त्यांतीलच एका वृद्धांचे मनांत संचार करता झाला कीं, कशास मारतां ? मग गेले. तदनंतर माझी शक्ति पाणिपतावर बहुत क्षीण, आमविकारादि विकार-युक्त, अन्न चालेना असा मी, त्याजवर दयासमुद्र सांबसदाशिव जो यानें कृपा करून शरीर अशक्त, ऊन पाहिलेंच नाहीं, व पादचारी अभ्यास नसतां सोळा सतरा कोश अन्नउदकव्यतिरिक्त आलो. क्षुधा तिसरे प्रहरी लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला. तो खाऊन पाहिला. तो तोंडांत जाईना. तसाच सायं-काळीं एका ग्रांमाबाहेर आलो. तो एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकर खादली ती अमृताप्रमाणें लागली. नंतर निद्रा केली. प्रातःकाळीं गंगा-सहस्रनाम म्हणत, ईश्वर नामस्मरण करीत चाललो.' (नानाफडणविसांचे चरित्र).

नानानीं जिवाची आशा सोडूनच दिली होती. ते जिवंतपणींच यमलोकांत फिरत होते आणि यमयातना डोळ्यांनीं पहात होते. त्या संकटांतून सुटण्याचें कामीं त्यांनीं मनुष्याच्या मदतीची आशाहि धरली नव्हती. देवाची आशा उरली होती पण ती कोणाची तरी धरावयाची म्हणूनच. अशा स्थितींत शरीर यमाच्या तावडींत सापडत असतां ते मनानें परमेश्वराच्या किती जवळ आले असतील, ईश्वराचें नांव त्यांच्या जिव्हेला किती गोड लागले असेल. त्या नामस्मरणानें तर प्रत्यक्ष परमेश्वरच त्यांनीं आपल्या हृदयांत साठवून ठेवला आणि तो जन्मभर तसाच ठेवून अखेर वृद्धपणीं प्राणाबरोबरच सोडला. तो कुरुक्षेत्राजवळचा प्रदेश. त्यावर भगवान् श्रीकृष्ण व बलशाली पांडव यांनीं अलौकिक कृत्यें केलेली. शेजारून पवित्र यमुना नदी वहात असलेली. ती यमुना श्रीकृष्णाच्या बाललीला गात होती. थोड्या अंतरावर पुराणप्रसिद्ध गंगानदी. श्रीशंकराच्या जटेंतून स्तवणारा तिचा प्रवाह .त्यांच्या दर्शनानें व स्मरणानें संकटें ओसरत. जातां जातां लहानपणीं पाठ केलेले गंगासहस्रनाम नानांच्या मुखीं आलें. वैरा-ग्याचा घेतलेला वेश व तशांत तो बैराग्यांचाच देश. या कारणानें बोरीचा

पाला खाणारे नाना चांगले तपस्वी शोभले असतील नाहीं बरें ! त्यांनीं जितके क्षण त्या स्थितींत काढले तितकीं वर्षे त्यांच्या वरून जाऊन ते अल्प वयांतच वयोवृद्ध व ज्ञानवृद्धहि झाले असल्यास काय नवल ? अशा प्रकारचे बिकट प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत एकदाच का, अनेक वेळा येत व त्यामुळें ते मनानें मोठे खंबीर व स्वातंत्र्य भोगण्यास पूर्णपणें लायख ठरत. कारण स्वातंत्र्य रक्षणाकरितां प्राणाची आहुति देण्याची जी तयारी पाहिजे ती त्यांची सदैव असे. खुद्द महाराष्ट्रांत दूरच्या शत्रूंनीं येऊन लोकांची हैराणगत केल्याचीं उदाहरणें पेशवाईंत घडलीच नाहीत. परंतु महाराष्ट्राच्या भोवतालचे निजाम, हैदर, हबशी, पोर्तुगीज यांची पीडा कडेकडेच्या लोकांना वारंवार व्हावी आणि अन्तःस्थ प्रदेशांत कैक वेळां पेशव्यांच्याच सरदारांनीं अनर्थ करून सोडावे.

मोगलांचा हायदोस

असली अस्वस्थता सर्वत्र असली तरी सन १७६३ सालीं रघुनाथराव व माधवराव पेशवे यांनीं मोगलाच्या मुलखांत प्रलय माजविला. त्याचें उट्टें काढण्याकरितां मराठ्यांच्या फितुरी सरदारांच्या सहाय्यानें निजामानें मराठी राज्यांत शिरून हायदोस घातला त्याचें वर्णन वाचून अंगावर रोमांच उभे रहातात. गोविंदपंत पटवर्धनास राघोबानें मिरजेच्या किल्ल्यांतून हुसकून लावल्यावर तो मंगळवेढयाकडे भिमेच्या आसपास जाऊन राहिला. त्या बाजूला निजाम व पेशवे या दोघांचीहि सैन्यें मुलखाची पायमल्ली आळीपाळीनें करीत होतीं. सैन्यांच्या हालचालींना पाण्याचा आस्रा आवश्यक असल्यानें कोणाचींहि सैन्यें यायचीं जायचीं झालीं तरी भिमेच्या कडेनेंच येत जात. लष्कर येणार असें कळतांच नदीकाठचीं खेडीं आधीच ओस टाकून लोक चालते होत. गोविंदपंत म्हणतो, लष्करचे आवईनें नदीकिनारीं तमाम खेडीं ओस पडली व लोक पंढरपुरांत भरले ' (ऐ. ले. सं. खंड १) लुटालुटीच्या धुंदींत मोगल व मराठे हे दोघेहि क्रूरकृत्यें करीत. पण मराठ्यांवर त्यांच्या धर्माचे झालेले सात्त्विक संस्कार त्यांच्या कृत्याना सौम्यपणा आणीत. मराठी फौजेनें मराठ्यांवर केलेल्या जुलुमांतील क्रौर्य कमी असण्याचें कारण असे कीं, सैनिक व रयत हीं एकाच धर्माची, व एकाच रक्ताची. मुसलमानांची स्थिति तशी

नसून जात्याच निष्ठुर व हिंदुद्वेष्ट्या अशा त्या लोकांना मनसोक्त धिंगाणा घालण्यास ती एक उत्कृष्ट संधीच वाटली. निजामअल्लीचा भाऊ मोगलअली म्हणून होता. त्याचा सेनापति मीर आबस, तो गोविंद हरीच्या मुलखांत घुसून अनर्थपात करूं लागला. तेव्हां गोविंद हरि म्हणतो 'मीर आबस हा मोगल अल्लीचा बक्षी. केवळ दैत्यांशी, कांहीं करुणा नाहीं. त्याणें साठ सत्तर माणसें (मंगळवेढ्याकडील) रेवतगांवचीं जिवें मारलीं. त्यांत पोरे पंधरा–पांच सात वरसांची, तीन वरसांची, दोन वरसांची कापली. प्यादे (रेवतगांवकरांचे) पंचवीस तीस त्यांत झुंजून मेले. वरकड कुणबी, बायका, ब्राह्मण जो देखिला तो त्यानें तोडिला, मारला. असें मागेंहि कोणी केले नसेल, पुढेंहि करणार नाहीं. बायको जितकी तरणी देखिली तितकी पळविली. कोठें ठिकाण नाहीं. गाई मारिल्या. गांव जाळला. मागती बंद करून (लोक) नेला....बराबर रयता, बायका, बंद तमाम नेला. ...अंताजीपंत व नारोपंत उभयता बंधू सांपडले.' गोविंद हरि, मीर आबस यास दैत्यांशी कां म्हणणार नाहीं ? त्यानें दैत्याचें कोणतें कृत्य करण्याचें उरूं दिलें ? त्या दोन दोन, तीन तीन, पांच पांच, सात सात वर्षांच्या बाळांनीं त्याचा कोणता अपराध केला होता म्हणून त्यानें त्यास ठार मारले ? तरण्याताठ्या बायकांना तो धरून नेत असतां भीतीनें त्यांच्या अंगाचा किती थरकाप झाला असेल. आणि त्यांच्या नवऱ्यांचे, बापांचे व भावांचे डोळे तो प्रकार पाहून कसे फुटून गेले असतील ! गाई मारल्या, गाईच्या अंगातून गळणाऱ्या रक्ताच्या थेंबाबरोबर हिंदुमातांच्या अंगातील रक्ताच्या थेंबांचे पाण्याचे थेंब बनले असतील. बरे, मागे जे उरले त्यांना दुःखाशिवाय 'दैत्यांशी' मीर आबस यानें काय उरूं दिलें ? त्यानें त्यांजकरितां त्यांच्या घरांऐवजीं घरांची राख मात्र ठेवली, प्रत्येक गांवांत त्याचें रक्षण करण्याकरितां शूर गांवकरी प्रयत्नांची शर्थ करीत. शक्य तर त्या गांवास तालुक्यांतून सहाय्यार्थ प्यादेहि येत. अशा प्रकारचे पंचवीस तीस प्यादे मीर आबसबरोबर झुंजतां झुंजतां मेले. रेवतगांवच्या रयतेवर केवढा अनर्थ ओढवला हा ! शेवटीं मोगलांच्या सैन्याची धाड येत येत पुणें प्रांतावर आली. 'यवनाची फौज दहा पंधरा हजार. नाशिक–त्र्यंबकाकडून लुटीत, जप्ती करीत या प्रांतीं (पुणें प्रांतीं) समीप आली. आळंदी, मोशी, दिघी, भोसरी, वाघोली, अलीकडे वाकड, भांबवडे देखील उरकलें. चिंचवडच्या देवांनीं दहा पंधरा हजार रुपये खंडणी देऊन कौल घेतला......

विठ्ठलवाडीपासून तोरण्यापावेतो गुढें दाटलें आहे. बोरघाटाकडेहि तसेच. केळीवर नारळी चढतात. लोहगड विसापूर या खालीलहि गुढें यवनाचे फौजेनें लुटून नेलें. पृथ्वीप्रळय मांडला आहे' (ऐ. ले. सं. खंड १) शेवटच्या वाक्यांत सर्व अनर्थांचें सार उतरलें आहे. नाशीकपासून पुण्यापर्यंतच्या टापूंत जें म्हणून कांहीं दिसले त्यावर यवनी फौजेनें हात टाकला.

महाराष्ट्रीयांना अत्यंत पूज्य अशीं आळंदी, नाशीक, त्र्यंबक, चिंचवड हीं क्षेत्रेंहि त्या आगींत होरपळून निघालीं. शत्रूची धाड वरील टापूंत आल्यावर रयतेला उपाय एवढाच कीं, तिनें मावळ भागांतील किल्ल्यांच्या व डोंगरांच्या पायथ्याला जाऊन रहावें. पण शत्रूस घरभेदे मराठे सरदार मिळाले असल्यानें त्यांनीं त्या मराठ्यांच्या लपण्याच्या जागाहि शत्रूला दाखवून पुण्यापासून तोरण्यापर्यंत पसरलेल्या हजारों अनाथांना यवनांच्या तावडींत दिलें. त्यांत लहान थोर चटसारे सारखे. म्हणून लेखक केसो बल्लाळ गोरे आपल्या वरील पत्रांत दुःखानें म्हणतो. 'केळीवर नारळी चढतात.' म्हणजे लहानांचा आश्रयहि थोरांना करावा लागला. पण एवढ्यानें काय संपलें आहे. गांव आपआपलें रक्षण करीत, पण ते दरवडेखोरांपासून किंवा फौजेच्या एखाद्या तुकडीपासून. तथापि मोगलाच्या दहा पंधरा हजार फौजेपुढें त्यांनीं शरणच गेलें पाहिजे. अशा गांवास कांहीं हजारांचा खंडणीचा आकडा सांगून तितकी रक्कम गांवच्या प्रमुखापासून त्या वसूल करीत व मग पुढें होत. चिंचवड गांव तेथील देव घराण्याकडे इनाम असल्यानें देवांनीं मोरयाचें देवालय चीजवस्त व गांवकऱ्यांचीं घरें यांचा बचाव दहापंधरा हजार रुपये मोगलाला भरून केला. पण ज्ञानदेवाच्या आळंदीला असा त्राता कोणी भेटला नाहीं. तेथून खंडणी मिळेना. म्हणून आळंदी, वाघोली हीं गांवेंच यवनानें जाळून टाकलीं. तो वैशाखाचा महिना. रानांत नद्या, ओढे व विहिरी आटलेल्या. तरी देखा भीतीनें गांव सोडून तेथें जाऊन रहाणें लोकांना भाग. पण त्या रानांतहि मुसलमानानें त्यांना सुखरूप सोडलें नाहीं. ' वैशाख मास. अरण्यांत जल नाहीं. आणि लोकांना वनवास प्राप्त झाला...आळंदी, वाघोली आदिकरून गांवें जाळलीं. लोहगड, राजमाची या दोंहो घेऱ्यांत गुढें बहुत होतें. तें लुटून नेलें.' (ऐ. ले. सं.).

आतां पुण्याची पाळी आली. मोगलाला पैसा पाहिजे होता. पुणें ही पेशव्यांची राजधानी. सर्व हिंदुस्थान लुटून आणलेला पैसा पुण्यांत असा समज.

शेटसावकार व इतर श्रीमान यांची वस्ती पुण्यांत मोठी. त्या पुण्यांत शिरून पेशव्यांचा सूड उगवण्यासाठीं मोगल धाधावलेला. त्या पुण्याची अवस्था मोगलानें पुढीलप्रमाणें करून सोडली. ' पर्वतीच्या मूर्ती महादेव, विष्णु सर्व मूर्ती फोडल्या. पुण्यांत लूट होतच आहे. पुण्यांतलि देव एक लहान मोठा राहिला नाहीं. महादेवाच्या पिंडी व मूर्ती, गणपति, हणमंत सर्व फोडले. पर्वतीस हेच केले. सरकारचा वाडा, धर्मशाळा म्हणजे चाळीस हजार ब्राह्मण निवाऱ्यास बसावयाच्या जाळल्या. तोफखान्याचे पानशाच्या घराजवळी आग लावली ते नागझरसि येऊन पोंचली.' ज्या पेशव्यांनीं हिंदुस्थानाचे धनी काय ते आपण या तोऱ्यानें मोगली साम्राज्याची राजधानी, सर्व सत्तेचें आद्यपीठ, ठिकठिकाणच्या मुसलमान राजांचें उगमस्थान अशी दिल्ली काबीज करून व त्या दिल्लींतलि सिंहासनावर विश्वासरावास बसवून हिंदुस्थानच्या मर्यादेपलीकडील अफगाणिस्थानावर बरोबर प्रचंड सेनासागर घेऊन नजर फेंकली त्या पेशव्यांच्या राजधानीची—त्या पुणें शहराची अवघ्या दोनच वर्षांच्या अवधींत दिल्लीच्या बादशहाच्या यःकश्चित् सुभेदारानें, त्या निजामानें राखरांगोळी करून सोडावी काय ? तेथील देवांचेंहि रक्षण होऊं नये काय ? खुद्द सरकारचा वाडा व पर्वतीचे देव यांची बिटंबना कोणास टाळतां येऊं नये काय ? हल्ली पर्वतीवर व पुण्यांत जे देव दृष्टीस पडतात त्यांची स्थापना मागाहून झाली म्हणावयाची ! श्रावण मासाच्या रमण्यासाठीं येणाऱ्या चाळीस हजारापर्यंतच्या ब्राह्मणांना रहाण्याकरितां बांधलेली धर्मशाळा किती विस्तीर्ण असली पाहिजे. पर्वतीच्या दक्षिण बाजूस सांप्रत ज्या भिंती दिसतात ते सर्व त्या जळून गेलेल्या धर्मशाळेचेच अवशेष नसतील ना ! शत्रू पैसा उकळण्याकरितां काय काय युक्त्या करी त्या पहा, ' खासा मोगल यानें चाकणेस तोफा लावल्या आणि तळेगांवची खंडणी चौपासून सहा हजार घेतले. शिंदोपंताचा वाडा खणून काढला. वाड्यांत २०।२५ हजार रुपये सांपडले... लोहगडचे माचीस पुण्याचे लोक बित्तविषय घेऊन कुटुंबसहित राहिले होते. त्यांस देखील लुटून फस्त केलें. नाना फडणीस वगैरे एका वस्त्रानिशी गडावर गेले.' (ऐ. ले. सं. सन १७६३) नानावर पाणिपतानंतर हा दुसरा प्रसंग. त्याजसारख्या अव्वल दर्जाच्या व मातबर मनुष्यापाशींहि एका वस्त्राशिवाय कांहींहि उरलें नाहीं. नानाची कथा काय, पण खुद्द पेशव्याचा सख्खा भाऊ व भरारी राघोबाचा पुतण्या नारायणराव याचा विवाह गोपिकाबाईस पुण्यांतून

पळून जाऊन सिंहगडावर गुपचुपपणें करावा लागला. त्र्यंबक हरि प्रभृति परचुरे या दंग्यांत लोहगडाच्या माचीस पळून गेले. तेथें त्यांचे सनदा वगैरे कागद लुटींत गेले. निजामास सामिल झालेल्या मराठे सरदारांत नागपूरचे भोसले प्रमुख होते. त्यांनींहि मराठी मुलुखाच्या लुटालुटींत निजामाला हातभार लावला. ' मौजे जाखणगांव परगणे कर्डे रांजणगांव हा गांव निजामानें लुटला, जाळला व भोसल्यानें गुरें लुटलीं (पे. डा.).

निजामापेक्षां जंजिऱ्याच्या हबशाचा क्रूरपणा वेगळाच असे. त्याचा उपद्रव कोकणप्रांतापुरताच. मराठ्यांचें बळ वाढल्यावर हबशांचा मराठी मुलखाच्या वाटेस जाण्यास धीर होत नव्हता. पण मराठ्यांच्या चढाईच्या धोरणामुळें तो चिडल्यास त्याचें क्रौर्य अंगावर काटाच उभा करी. मराठे शत्रूची ठाणी नेहमीं शत्रूबरोबर युद्ध करूनच घेत असे नाहीं. लढाई न करतां शत्रूच्या अधिकाऱ्यास अन्य उपायानें वश करून आपले कार्य साधण्याचा मार्ग होता. मराठ्यांकडील कोणा मनुष्याचें हें राजकारण यशस्वी झालें म्हणजे त्याला कांहीं बक्षिस देण्याचा करार सरकाराशीं आगाऊच होत असे. हा मार्ग अत्यंत धोक्याचा किंबहुना जिवावरचा असला तरी धाडसी लोक तो स्वीकारण्यास कचरत नसत. ' बाळाजी नारायण भुस्कुटे यांनीं शामलाचा किल्ले सुरगड राजकारण करून हस्तगत केला. त्याजवर वेढा शामल घालून बसला. चार महिने बाळाजी नारायण यानें किल्ला भांडविला. शेवटी शामलानें बाळाजीस कबिलेसुद्धां दस्त करून नेलें व सहकुटुंब गोणत्यांत घालून समुद्रांत बुडविलें ' (पे. डा.).

' सन १७६९ मध्यें माधवराव पेशवे व जानोजी भोसले नागपूरकर यांचे युद्ध जुंपले. त्यासाठीं माधवराव नागपूर प्रांतांत गेला, तेव्हां जानोजी भोसले पुणें प्रांत खराब करून आपल्यावरील पेशव्यांचा पेच काढण्याच्या विचारांत आहे अशी बातमी पुण्यास आली. त्याबरोबर निम्मे रात्रींत पुणें फुटलें. तीन चतुर्थांश पुणें हललें. जाणाऱ्या लोकांस ओझें नेण्यास पुरेशीं वाहनें न मिळाल्यामुळें भाडे भलतेच वाढले. ते इतके कीं दर बैलास भाडे पंचवीस रुपये मागू लागले. गणेशखिंडीपावेतो बाबूराव बाबांचे गाडे व वस्तवानी गेली होती. ' (ऐ. ले. सं. खंड ३ रा.) इतक्यांत दुसरी बातमी पोचली कीं, भोसल्याच्या स्वारीची भीति खोटी आहे!

मराठी राज्याच्या सरहद्दीवरील सरदारांवर शेजारच्या परकीय राजाचा रोष

झाला असतां फार भयंकर प्रसंग ओढवत असे. नरगुंदचा सरदार व्यंकटराव भावे याचा कारभारी काळोपंत यानें टिपूच्या फौजेचा नरगुंदास पडलेला वेढा अनेक वेळां उठवून परतवून लावला होता. त्याचा सूड टिपूनें पुढील रीतीनें घेतला. ‘ नरगुंदचे व्यंकटराव भावे, त्यांचा कारभारी काळोपंत पेठे व त्या उभयतांचीं मुलेमाणसें या सर्वांच्या पायांत बेड्या घालून टिपूच्या फौजेनें त्यांची रवानगी श्रीरंगपट्टणास केली. काळोपंताची लग्न झालेली एक सुंदर मुलगी होती. तिला टिपूने आपल्या जनानखात्यांत खेचले. काळोपंत मोठा शूर होता. ’

कुंपणाने शेत खाल्लें.

शत्रूचे सैन्य व वरकड सरदार प्रजेस अशा रीतीनें छळीत. पण खुद्द राजाची स्वारी गांवावरून गेली तरी प्रजेचे हाल होतच. राजदर्शनानें प्रजेस आनंद झाला पाहिजे व तो एक प्रकारे होतहि असे. परंतु त्याबरोबर वैरणकाडी व दाणागोटा या बाबतीत उभ्या पिकास पोचणाऱ्या उपसर्गाच्या भीतीनें त्या राजदर्शनाचें सुख कोठच्या कोठें मावळून जाई. छत्रपति शाहूमहाराज सन १७३१ मध्यें साताऱ्याहून जेजुरी व सासवड या बाजूस येणार असे ठरलें; जेजुरीस जाण्यांत खंडेरायाच्या दर्शनाचा हेतु खराच, पण त्याबरोबरच परत येतांना साधल्यास मधल्या रानांत शिकारहि करण्याचा त्यांचा विचार होता. म्हणून त्यांच्या शिकारीची व्यवस्था ठेवण्यासाठीं ता. ३१ जानेवारी सन १७३१ रोजी महादोबा पुरंदऱ्याने चिमाजी आप्पास पत्र लिहिलें ‘ जेजुरीपासून पुरंधरपर्यंत डोंगरचें रान कोणी छडूं न पावें. कांकी ससे, हरणें, व डुकरे वगैरे सावजे रानांत असतील ती माणसांच्या वार्गामुळें धुडावतील. आतां माणसें जागा जागा ठेवून पहिले (पूर्वी) राजश्री आले होते ते वेळेस अखले धरली होती. ते रान देखील चौक्या ठेवून जतन करणें. ’ (पे. द.) जेजुरीपासून पुरंदर किल्ल्यापर्यंत डोंगराची एक ओळ आहे. हिची लांबी फार तर पंधरा मैलांची आहे. या डोंगरावर सध्या म्हणण्यासारखी झाडी नाहीं. कदाचित् त्याच्या आसपास लोकवस्ती वाढल्यामुळें झाडी अलीकडे तुटली असेल; पण दोनशें वर्षांपूर्वी त्यावर बरीच दाट झाडी असावी असे वाटते. त्या रानांत आजहि ससे, हरणें, रानडुकरे आहेत व त्यांना जंगल मोठें असावेंहि लागत नाहीं. परंतु ज्या अर्थी आखलेहि त्यांत

आढळत त्याअर्थी त्या काळांत तेथील जंगल मोठेंच असले पाहिजे. शाहूमहाराज त्या जंगलांत पूर्वीहि आले होते यावरूनहि ही समजूत दृढावते. महाराज साताऱ्याहून जेजुरीस पहिला मुक्काम पळशी परगणे वाई, दुसरा तडवळे, तिसरा खेड परगणे शिरवळ व चौथा वाल्हे असा करीत आले. वाई परगण्यांतून जात असतां महाराजांच्या स्वारीतील लोकांनीं मुलुखाची अवस्था नीट राहूं दिली नाहीं, असे नानासाहेब पेशव्यानें बाजीरावास लिहिलेल्या पत्रांत म्हटले आहे.

शिकारीस निघालेल्या महाराजापाशी फौज जुजबी असल्यामुळें मुल्खाला उपद्रव बेताचाच झाला असेल. परंतु सरदारांच्या फौजेच्या हालचाली चालू असतां ते आपली गरज भागविण्याकरितां रयतेचें किती नुकसान करीत याचा नेम नसे. त्या वेळीं गांवाच्या व गावच्या शिवाराच्या रक्षणाची जोखीमदारी पाटलावर व गावाला सरकारी कमाविसदार असला तर त्याच्यावर. मराठ्यांचे सरदार सातारा-पुणें या राजधान्यांहून उत्तरेंतलि आपल्या जहागिरविर परत जातांना बोरघाटांतून कल्याण भिवंडी या कोकणांतील प्रदेशांत प्रथम उतरत व नंतर कासारी घाट चढून नाशिक प्रांतांत येत. सांप्रत पुण्याहून नाशकास जाण्याचा आगगाडचा रस्ता आहे तो असाच आहे. सदर कासारी घाट चढून गेल्यावर कसबे साकोरे हा गांव वाटेवर लागत असावा. धारचा सरदार तुकोजीराव पवार याची फौज कासार घाट चढून साकोऱ्याजवळ आली. गांवचा कमावीसदार रा. गोपाळ सोनदेव याने साकोऱ्याहून पुढें पांच कोस जाऊन स्वतः तुकोजीची भेट घेतली व पाटलालाहि भेटवून त्याच्या फौजेला मुक्काम करण्यास सोयीची जागा व जनावरांच्या चाऱ्याकरितां जंगलहि दाखवितो म्हणून सांगितलें. इतकेंच नव्हे तर गांव बागाइताचा व खुद्द महाराजांचा मोकासपणाचा असल्यानें पिकाची तस झाल्यास महाराजांना खपणार नाहीं असेंहि त्याने आडपडद्यानें निवेदन केलें. पण तुकोजीनें तें ऐकून तेवढें [illegible]लें व शेवटीं करावयाचें तेंच केलें. साकोऱ्यास खुद्द शाहूमहाराजांचा उसाचा फड होता. त्यांत हत्ती उभे करून तुकोजीच्या अधिकाऱ्यांनीं तो कापून नेला. महाराजांच्या खासगी मिळकतीची त्यांच्याच सरदारानें जर अशी नासाडी करून सोडली तर गोरगरीब रयतेचे हाल काय पुसावे ? या संबंधांत साकोऱ्याच्या कमाविसदारानें बाजीरावास पुढील हकीकत कळविली, ' राजेश्री तुकोजी पवार वगैरे फौज कासार घाटीनें आली. त्यास आपन जाऊन कासारीस पांच कोस जाऊन पाटील भेटविले. आपनहि

भेटलो. गांवचे वर्तमान सांगितलें कीं, मोकासा राजश्रीचा आहे. गांव बागाइती आहे. मुक्कामाची जागा व चाऱ्याचें जंगल दाखवितो. त्यास सर्व गोष्टी मान्य करून येऊन थळांतच मुक्काम केला. अगदीं उसाची थळें उलगाड जालीं. दोन फड सरकारचे होते. त्याजमध्यें हत्ती उभे करून कही केली. थले मुतलक नाहींशी केली. सरदार उभे राहून कोनास ताकीद न केली. या सालास प्रजन्याचें आवर्षन जालें. लोकास कौलपत्रें देऊन वेळ वाक करविलें. उंटें घालून चारली. गांवहि खर्चाखालें. घासदाणा वगैरे फर्मावसी करून रुपये शंभर पडले. यामुळें गांव बहुत हुळहुळा झाला. राजश्री सुमंत तो संनिध नाहींत कीं, त्यास वर्तमान विदित करावें.' (पे. द.)

हें पत्र वाचल्यावर तुकोजीनें गांवास कसकसा त्रास दिला, हें लक्षांत येते. फौज आली म्हणजे तिच्या पोटाला गांवकऱ्यांनींच पदरचा घासदाणा देण्याचा शिरस्ता होता; तसा घासदाणा म्हणून रोख शंभर रुपये गांवाने दिले, तरी तुकोजीच्या फौजेनें उंटें चारली व उसाचे फड कापून नेले. आणि हें सारें कोण्या दिवसांत ? तर ज्या दिवसांत पर्जन्याच्या अवर्षणानें गांवची जिराईत पिकें बुडालीं होतीं त्या दिवसांत. शाहूच्या कारकीर्दीतहि राज्याची शिस्त सरदार किती पाळीत व प्रजेच्या हिताकडे किती लक्ष देत याची यावरून कल्पना येते.

पंत प्रतिनिधी हे साताऱ्याच्या महाराजांचे प्रतिनिधी. साताऱ्याच्या महाराजांचीं गांवें व महाराजांनीं प्रतिनिधींना दिलेलीं गांवें लागून होतीं. प्रतिनिधी हे महाराजांचे अंकित असतां त्यांचे लोक महाराजांच्या गांवास कधीं कधीं उपद्रव देऊन शेतकऱ्यांच्या शेतकामाला व्यत्यय आणीत. त्याचा बोभाटा अखेर महाराजांपर्यंत जाऊन त्यांना प्रतिनिधीस आज्ञापत्र सोडावें लागलें. साताऱ्याजवळ कृष्णातीरीं आरळें या नांवाचें गांव आहे. त्या गांवाखालीं बसाप्पाची वाडी ही एक लहान वस्ती आहे. वाडींत प्रतिनिधींच्या अधिकाऱ्यांनीं दांडगाई केल्यावरून महाराजांनीं पुढीलप्रमाणें आज्ञापत्र लिहिले. ' राजश्री जगजीवन पंडित प्रतिनिधी यांसी आज्ञापत्र जे-आरळे येथील वाडी हुजूर आहे. तेथील नांगर तुमच्या लोकांनीं मोडला. आणि बोलिले जे प्रतिनिधीचा कौल आणा मग नांगर धरा, नाहीं तर मारले जाल ऐसे बोलले. ' (पे. डा.) सरदारांच्या हाताखालील

अंमलदार कितपत शिस्तीनें चालत व सरदारांनीं वरिष्ठ सरकाराशीं केलेले करार कितीसे पाळीत याचें हें एक लहानसें गमक आहे.

सरदार व महाराज, सरदार व प्रजाजन यांची उदाहरणें वर दिली. आतां सरदारा–सरदारांच्या परस्परसंबंधाची उदाहरणें देतो. थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीत पेशव्यांच्या हैदरावर तीन स्वाऱ्या झाल्या. फौज स्वारीवर जातांना तिला लागणारा हरजिन्नस व कारकून शिपाई यांचा पुरवठा पुण्याहून व्हावयाचा. पुण्याहून श्रीरंगपट्टणाकडे जाण्याचा सरळ रस्ता मिरज प्रांतांतून. मिरज प्रांत पटवर्धनांच्या जहागिरीपैकीं. जहागिरीची व्यवस्था पहात मिरजेस वृद्ध गोविंदपंत बसला होता. पुण्याहून कर्नाटकांत फौजेचीं पथकें व तोफखाना जावयास निघे त्या वेळीं गोविंदपंताचा जीव अगदी थोडाथोडा होई. जाणाऱ्या फौजेनें रयतेस नागवावे व त्याचा धक्का दरसालच्या जमीन महसुलास बसून जमिनीचा वसूल बुडावा. तो वसूल बुडाल्यावर गोविंदपंतास ठेवावयास लागणाऱ्या फौजेचा खर्च कसा भागवावा ! बरें, जाणारी फौज आपल्या बरोबरीच्या सरदारांची असल्यानें त्यांच्या बरोबर वाद घालणेंहि त्याला कठीणच. म्हणून गोविंदपंत गोपाळरावास कळवितो. ‘ सरदार जावयास येतात. त्यांचा मिरजप्रांतीं उपसर्ग लागतो. तोफखान्याकडील तो अनाहूत उपसर्ग झाला. त्या अलीकडे दमाजी गायकवाडाचे पुत्र सयाजी गायकवाड (हे) तोफखाना गेला त्याच मार्गे गेले. त्यानीं आपल्या जमावाप्रमाणें उपसर्ग दिला. मुधोजी नाईक (फलटणकर) गेले त्यांचाहि उपसर्ग झाला. जो तो उपसर्ग देतो. कोणासी कजिया करतां नये. काय करावें ?’ आपल्याच फौजेनें प्रांत खराब झाला ! आपलेच दात नि आपलेच ओठ. बिचारा गोविंदपंत काय करणार ? एखादा सरदार बरा भेटला म्हणजे गोविंदपंताच्या जिवाला तितकेच हायसे वाटावे ‘ राजश्री बाबूजी नाईक (बारामतीकर) याच मार्गे (मिरजमार्गे) गेले. फारशी आवाडावी केली नाहीं. किरकोळ घासदाणा घेत गेले ! सरदारांचे हे उपसर्ग गोडीचे झाले. पण सरदारा–सरदारांत भांडणें लागली किंवा एकाच सरदाराच्या घराण्यांत भाऊबंदकीं जुंपली कीं ते दोघे मुलखाचें वाटोळें करून टाकीत. माधवराव पेशवे तिकडे हैदराची खोड मोडीत होते. व इकडे सातारा प्रांतीं भवानराव व भगवंतराव प्रतिनिधी यांनीं सन १७६५ पासून १७७५ पर्यंत म्हणजे १० वर्षे वारंवार दंगा मांडला होता. कऱ्हाड व इसलामपूर यांच्या दरम्यान

वाटेगांव म्हणून सुंदर खेडें असून त्यांत वासुदेवाचें रमणीय देवालय आहे. हा गांव पटवर्धनाकडेच होता. भवानराव--भगवंतरावांचा दंगा याच भागांत सुरू असल्यानें त्याची गोविंद हरीचा वाटेगांव येथील कारकून बाळाजी कृष्ण याला यथार्थ कल्पना होती. त्याला ती अगदी बेबंदशाहीच वाटल्यावरून त्यानें गोविंदपंतास लिहिलेल्या एकाच वाक्यांत त्या स्थितीचे सर्व सार उतरले आहे, ' श्रीमंत दूर गेले. कोणी पुसता नाहीं ऐसे झाले आहे '

सरदार व प्रजा याचा परस्परसंबंध वर दिला त्यांत सांगितलेली प्रजा स्वराज्यांतील होती, त्याच सरदारांची होती असें नाहीं. सरदार आपली प्रजा सुरक्षित रहावी यासाठीं किती काळजी वहात हें गोविंद हरीच्या पत्रांत दिसून आलेंच आहे. पण गोविंद हरीची काळजी अगदीं निःस्वार्थी नव्हती. जाणाऱ्या येणाऱ्या सरदारांनीं प्रजेची खराबी केल्यास आपला वसूल होणार नाहीं हें काळजीचें मुख्य कारण. तथापि स्वतःच्या जिवावर बेतली असतां प्रजेकडे पहाण्याची दृष्टि साहजिकच बदलत असे. मिरजेवर राघोबा स्वारी करणार व त्या स्वारींत मिरजेच्या किल्ल्यास राघोबानें वेढा घातल्यास किल्ल्यांत आडकलेलीं पटवर्धनांची मुलेमाणसें यांची उपासमार प्रारंभीं न झाली तरी जों जों अधिक दिवस लोटतील तों तों जास्ती जास्ती होत जाणार याची कल्पना गोविंदपंतास व त्याचा पुत्र गोपाळराव यास बरोबर होती. किल्ल्यांत दाण्याचा संग्रह करण्याचे उपाय दोन. रयतेपासून रोख पैसे देऊन हरजिन्नस विकत घ्यावा हा सरळ उपाय. पण त्या काळीं राजनीतीचे विचार तितके प्रगल्भ नव्हते म्हणा किंवा जरी असले तरी त्याप्रमाणें वागण्यास सरदारांपाशी रोकड नसे म्हणून म्हणा, गोपाळरावानें गांवांत गडबड करून किल्ल्यांत दाणा भरण्याचा सल्ला गोविंदपंतास पत्रद्वारें दिला. हा दुसरा अन्यायाचा उपाय गोविंदपंतास एकदम रुचला नाहीं. तसें केल्यानें बेबंद होईल असें गोविंदपंताचें मत पडलें. कारण त्याचा अर्थ राजानें प्रजेस लुटलें हा असून त्यामुळें प्रजेची गोविंदपंतावरील निष्ठा नाहींशी झाली असती. गोविंदपंतानें मिरजेच्या किल्ल्यांत राहून आपल्या जहागिरींतील एकएका गांवाहून जिन्नस आणून दारूगोळयाचा व अन्नाचा संग्रह करण्याचें योजिलें. त्यानें चिकोडीहून दारू दीड खंडी, शिसे दहा मण, तूप दहा मण, तेल पंधरा मण, तांदुळ बारा मण आणि हुबळीहून दोन खंडी शिसें व पुष्कळ मीठ आणविलें. यानंतर कांहीं दिवस गेले व एके दिवशीं राघोबा येणार असें

निश्चित वर्तमान मिरजेस पोचलें. त्याबरोबर ' घरटी एक माणूस ठेवून मिरज फुटली ! मिरजेंतून सारी वस्ती उठून गेली.' तेव्हां गोविंद हरि करील ती पूर्व दिशा. त्यानें कांहींहि केलें तरी तें पहाणार कोण ! गोविंद हरि गोपाळरावास लिहितो ' मिरज प्रांतीची खेडी तमाम पळाली. (आम्हास किल्ल्यांत सांठविण्या-करितां) गल्ला कोठून आणावयाचा नाहीं. मिरजेंत गांवात घरोघर पेवें आहेत ती आमचीच आहेत. घरें मोडून लाकडें आणूं. तुपाच्या जोड्या (बुधल्या) या मुलखांत मिळत नाहींत. मिरच्या, भांग, तमाखू व गूळ हा जिन्नस किल्ल्यांत आणिला आहे. एक जिन्नस दहा खंडी गल्ला किल्ल्यांत आला. याखेरीज एरंडो-लींचा गल्ला ५० बैल व किरकोळ दहा बैल सरासरी बारुले दहा खंडी गल्ला एकूण वीस खंडी गल्ला आला. ' ' पेशवे येतात, खांबटकीचा किंवा सालप्याचा घाट चढले अशी बातमी मिरजेस आली म्हणजे शहरांतील गल्ला लुटीस हुकूम देऊं ' असें गोविंदपंतानें मनाशीं ठरविलें होतें. (ऐ. ले. सं.) परंतु मिरज गांवच उठून गेल्यावर लोकांच्या बेदिलीची भीति न राहिल्यामुळें गोविंदपंतानें वर लिहिल्या-प्रमाणें जो जिन्नस लागला तो लुटून नेला असेल.

मनगटाचा जोर

देशांत या प्रकारचा धुमाकूळ वारंवार माजत असल्यानें अशा प्रसंगीं कोणाची मदत मिळो वा न मिळो, ज्याला त्याला शरीर बळकट ठेवून शत्रूचा प्रतिकार करण्यासाठीं लढाऊ बाण्यानें सतत रहाणें जरूर असे. दुर्बळाचा निभाव मुळीच नव्हता. मनगटांतील बळ व हातांतील हत्यार यांचा उपयोग दुहेरी होता. एक आत्मरक्षणाचा व दुसरा नशीब काढण्याचा. जीवनसंग्राम किंवा जीवनकलह हा शब्दप्रयोग त्या काळाला कसा तंतोतंत लागू होता, हे खालील पत्र वाचून लक्षांत येईल.

' विज्ञापना–नारायण पेठेंतलि गवळी याजकडे रास्ते पटवर्धन गोळे वगैरे यांचे कर्ज येणे. परंतु त्याजजवळ ऐवज नव्हता याकरितां सर्व साहुकारानीं गवळी याला कौल दिला. नारायणराव बापट बेळगांवकर यांचेहीं कर्ज त्याच्याकडून यावयाचे होते. परंतु त्यानें गवळ्यास कौल न देतां त्याच्या आईस महिना दीड आपल्या घरीं कोंडून ठेविलें. हाल बहुत केले. ही गोष्ट विसाजीपंत घाणेकर निसबत वाकेनीस यांनीं रा. तात्या यांचे कानावर घातली. त्यानीं बाळाजी-

पंत लेले याना या प्रकारणाची चौकशी करण्यास सांगितलें. त्यानीं बापट यास जबाबाकरितां बोलाविले, पण तो आला नाहीं. त्यानें बोलवावयास गेलेल्याना शिवीगाळ केली. हा मजकूर तात्यांच्या कानावर बाळाजपिंत लेले याजतर्फे विसाजीपंत बर्वे व जनार्दनपंत लघाटे यानीं घातला. तेव्हां त्यानीं त्यास ४ माणसे पाठवून आणावयास सांगितलें. त्यावरून बाळाजीपंत यानीं खंडोजी शितोळा खिजमतगार व चार आसामी ढालाईत यास बापट याजकडे पाठविलें. त्याप्रमाणें खंडोजी, बापट याजकडे गेला असतां बापटानें मगरूरीचेंच उत्तर दिले. खंडोजी म्हणाला " तुम्हाला धरून नेण्याविषयीं मला आज्ञा आहे. "त्यावरून बापट यानीं खंडोजीच्या गळयास व चोळण्यास धरून मारामारी केली. दोघांची झटापट होत आहे तों बापट यांचे जावई व पुत्र तरवारा उपसून आलें. त्यानीं खंडोजीवर दोन वार केलें तें पागोट्यावर लागलें. इतक्यांत खंडोजीच्या सोबत्यानें एकास धरलें. तो दुसऱ्यानें एक वार खंडोजीवर केला. तो त्याचे कपाळास लागला. जखम मोठी झाली. इतक्यांत बाहेरून ढालाईत धावून आले. त्यानीं दोघांच्या हातातून तरवारा घेऊन त्यांच्या मुसक्या बांधल्या. नारायणराव बापटांच्या मुसक्या बांधू लागले. तेव्हां त्यानें डोके फोडून घेतलें आणि जमीनविर घालून घेऊन मेल्यासारखे सोंग केलें. तेव्हां त्याजला खाटेवर घालून आणि दोघाना पायउतारा असें सायंकाळीं वाड्याजवळ आणलें. झाला मजकूर चिमणाजीपंत भागवत निसबत शागीर्दपेशा यानीं तात्यांच्या कानीं घातला. त्यानीं काशी बल्हाळ याजकडे गारद्यांच्या पहाऱ्यांत ठेवण्यास सांगितलें हे विज्ञापना.' (इ. सं.)

युद्धकर्माचें वळण जनतेला इतकें लागलेलें कीं, नुसत्या शिमग्यांतलि खेळांचाहि शेवट कित्येकदा कापाकापींत व्हावा. एकाच गावांत खालच्या आळींचे व वरच्या आळीचे, या तालमींतले व त्या तालमींतले अशी चुरस राहून तिची मदत बलसंवर्धनास होई. व क्वचित् प्रकरण मारामारीवरहि जाई. एका गांवांत जशी ही चूरस असे तशी शेजारच्या दोन गांवांतहि ती आढळे. नगर जिल्ह्यांत प्रवरा व गोदावरी, या दोन नद्यांच्या संगमावर प्रवरासंगम या नांवाचे क्षेत्र आहे. तें क्षेत्र पेशवाईत चांगलें भरभराटले होतें. त्या गावचे पाटील व टोकेगांवचे पाटील हे शिमग्यांत एकत्र येऊन खेळले. खेळतां खेळतां कांहीं निमित्त घडून त्यांच्यांत कज्जा झाला. ' ते समयीं प्रवरासंगमावर पाटील यांनीं टोके-

कर साखरोजी पाटील याचा पुत्र रामजी याचा हात तोडला. व आणखी दोन चार माणसे जखमी केली.'

कोणी माणूस 'क्षेत्रस्थ' म्हटला कीं, कांहीं विशिष्ट अर्थ डोळ्यापुढें येतो. क्षेत्रस्थ माणूस हा इतर गांवांतील माणसांपेक्षां अधिक अर्कट, अधिक टवाळ, अधिक दांडगट अशी समजूत आहे. ती प्रवराक्षेत्रांच्या दंगेखोरपणावरून प्रतीत होते. शिमग्यांत अद्यापि गावोगांवी कुस्त्या होतात व कुस्त्यांचा शेवट मारामारींत व्हावयाचा हेंहि ठरलेलेंच. त्याप्रमाणें प्रवरासंगमाच्या पाटलांनीं टोक्याच्या पाटलाच्या मुलाचा हात तोडला. पुढें आणखी एका वर्षी शिमग्यांतच प्रवरासंगमकरांनीं धोंडभट खरे याचा लेक मारला. ही मारामारी ब्राह्मणां-ब्राह्मणांतच झाली असली पाहिजे. कारण कित्येक क्षेत्रस्थ ब्राह्मण त्याकाळीं खूनहि पाडावयास कमी करावयाचे नाहींत.

आत्मसंरक्षण

जणूं काय सारा देश ही एक रणभूमीच बनून राहिली होती आणि त्यांत गरिबांपासून श्रीमंतापर्यंत व दुर्बलापासून प्रबलापर्यंत प्रत्येकाचा जीव धोक्यांत होता. खुद्द पेशवे हे साऱ्या मराठी राज्याचे धनी, त्यांच्या भोवती हत्यारबंद शिपायांचा बंदोबस्त व ते स्वतः खबरदार असतांहि दग्याफटक्यानें त्यांचा जीव जाण्याची भीति सामान्य लोकांइतकी किंबहुना अधिक बाळगणें शहाण-पणाचेंच समजले जात होते. 'सन १७६९ त आश्विन युद्ध एकादशीस माधव-राव पर्वतीस देवदर्शनाकरितां गेले होते. तिकडून परत येतांना त्यांजबरोबर गारदी होते. त्यांपैकीं एकानें एकाएकीं तरवार उपसून त्यांजवर वार केला. तोच त्यांनी चटकर आपली घोडी चमकावून एकीकडे घेतली. यामुळें वार लागू झाला नाहीं. बरोबरच्या लोकांनीं त्या गारद्यास तत्काळ जमिनीवर पाडले व आतां ठार मारणार इतक्यांत मोरोबादादा फडणीस यांनी त्या गारद्यास सोडवून कैदेंत ठेवलें.' (ऐ. ले. सं. खं. ३ रा.) पेशव्याचे हे गार्दी म्हणजे गार्डच. त्यांनीं धन्याचा जीव दग्याफटक्यापासून रक्षण करण्याऐवजीं त्यांपैकीं एखादा गार्दी धनी गैरसावध असतां त्याचा जीव घेण्यास निघाला तर धन्यानें भरवसा धरावा कोणाचा ? म्हणून वेळेवर ज्याचे हत्यार तेंच त्याच्या कामाचे हेंच खरे. येणें-प्रमाणें भरवसा कोणाचाहि लागत नसल्यामुळें सेनापति व सरदार हे फारच

सावधगिरीनें नेहमीच वागत. विशेषतः मोहिमेवर असतां अशा प्रकारची सावधगिरी अधिकच ठेवणें इष्ट असे. गोपाळराव पटवर्धन हैदरावरच्या स्वारींत होता. त्यास गोविंद हरि मिरजेहून पुढील इशारा देतो. ' रात्रींचे सावध व दिवसाचे सावध रहात जागें. वावगे माणूस जवळी येऊं देऊं नये. (स्वतःचे) गाडदी यांचा विश्वास धरूं नये. छद्म करावयास चुकणार नाहींत. ' (ऐ. ले. सं. भा. १ ला.)

घरदार, चीजवस्त व पैसाआडका यांपासून तों तहत प्रत्यक्ष स्वतःचे प्राण वाचविण्यापर्यंत प्रत्येक बाबतीत ज्यानें त्यानें खबरदार रहावे ही गोष्ट लाखाची. त्याखेरीज प्रतिकाराचे उपाय कांहीं असतच. संकट गांवावर आल्यास गांव एकजुटीनें त्याला तोंड देई. तोंड देण्याची साधनें प्रसंग पाहून ठरविण्यांत येत. कांहीं संकटे गांवच्या प्रमुखांनीं पुढें होऊन निवारावीं व मागाहून त्यामुळें आलेल्या जोखमीचें ओझें गांवकऱ्यांनीं व्यक्तिशः वाटून घ्यावें. सन १७५३ च्या सुमारास संगमनेर येथें दमाजी गायकवाड हा आपला १०५०१ रुपयांचा घासदाण्याचा हक्क वसूल करावयास आला. देशमूख व देशपांडे हे तेथील वतनदार पुढारी. त्यांच्याजवळ एवढी मोठी रक्कम द्यावयास नव्हती; म्हणून त्यांनीं ती गांवकऱ्यांच्या संमतीनें गांवच्या दोन सराफांकडून घेऊन भरली. ती वेळ कशी बशी निभावली. दमाजी निघून गेला. मागाहून गांवकऱ्यांनीं आपसांत वर्गणी जमवून सराफांचे देणें द्यावयाचें ते त्यांच्या हातून घडलें नाहीं. तेव्हां सराफांनीं आपली तक्रार सरकारांत नेली. सरकारानें सदर रक्कम सराफांस व्याजासुद्धां देवविली. पण त्या बाबतींत सरकारास जी खटपट पडली तिच्या मोबदला एक हजार रुपये सरकारांत घेण्यांत आले. (पे. डा. सन १७५३–५४).

निजाम व पेशवे यांचा मुलूख एकमेकांस लागून होता; पेशवे निजामावर स्वाऱ्या करून त्याच्यापासून नवीन मुलूख जिंकून घेत; तेव्हां गांवांची वांटणी कित्येक वेळा अशी चमत्कारिक झालेली असावी कीं, निजामाला आपल्या मुलखांत एका गांवाहून दुसऱ्यां गांवास जातांना वाटेंत पेशव्यांची गांवे लागावी व त्यानें ती शांततेच्या व सलोख्याच्या काळींहि विनाकारण लुटावी. ' सन १७५९ च्या सुमारास निजामअल्ली सिंदखेडास जात होता. वाटेंत पेठ कादराबाद कसबे जालनापूर येथें त्याच्या लष्कराचा तळ पडला. आयतेंच परक्याचें गांव वाटेंत भेटलें म्हणून असो किंवा सहज चार रुपये खिशांत टाकावयास मिळावे म्हणून

असो, त्यानें गांवचे प्रमुख मानसिंग जाट व मखणीलाल यांस बोलावून आणिले आणि बऱ्या बोलानें रुपये देता कीं गांव लुटूं अशी त्यांस धमकी दिली. तेव्हां जाटांनीं ६४५६२ रु. भरले व गांवकऱ्यांनीं पट्टी करून ती रक्कम फेडण्याचें कबूल केलें. ती वेळ भागली, पण मागाहून ' गरज सरो वैद्य मरो ' या न्यायानें लोकांनीं पट्टी जमविण्याचें अंगाबाहेर टाकले. तेव्हां जाट पेशव्यांकडे फिर्याद गेला. पेशव्यांनी वसूल करून जाटाची रक्कम देवविली, पण गोरगरिबास पट्टी माफ केली आणि या खटपटीबद्दल पांच हजार रुपये सरकारांत घेतले. यावरून सरकारहि कित्येक वेळा स्वसंरक्षणाची जबाबदारी गांवकऱ्यांचीच समजत असल्याचे सिद्ध होते.

कोणीहि कोणास लुटावे

ज्यानीं मुलुखाचे रक्षण करावे त्या स्वराज्यांतील सरदारानी मुलूख लुटल्याचा परिपाठ पाहून इतरांनाहि पुंडाई माजविण्यास एक प्रकारची फूस मिळावी. ' परभाजी पाटील कचाळा मौजे दुलंगे तर्फ बारागांव परगणे वाळापूर, प्रांत वऱ्हाड याची बायको तोलाई हिनें हुजूर येऊन विदित केले कीं हणमंतराव आटोळे यांनीं अन्याय नसतां आपले गांवावर स्वारी पाठवून गांव लुटून नेऊन माझी माणसे कैद करून दोन दीर जीवे मारले. वरकड माणसे कैदेंत ठेवून दोन हजार रुपये खंड केला. त्यास जामीन सयाजी पाटील मौजे जानफळ परगणे साखरखेडले यांस दिला. त्यास दोन हजारपैकीं वसूल कांहीं दिला. बाकी राहिली ते द्यावयास न मिळे. याकरितां माझा दादला, लेक, सून कैदेत ठेवून मारकूट करतात. आपल्या दोघी लेकी मौजे हिवरे येथील पाटलांनीं अटकेंत ठेवल्या आहेत. येविशी ताकीद झाली पाहिजे. ' त्याची दाद पेशव्यांनीं पुढीलप्रमाणें घेतली. ' आटोळे गैरवाजवी वर्तला व दोघेजण जिवे मारले. सबब त्याजकडून जितका ऐवज साधेल तितका सरकारहिशेबी जमा करणें व फडशाचे वर्तमान हुजूर लिहिणे. ' (पे. डा.) म्हणून खालील अधिकाऱ्यास ताकीद झाली.

देशमुख हे परगण्यांतलि वतनदार होत. प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर. पण तेहि देशांत धामधूम सुरू असतां आपला हात धुवून घेण्यास कमी करीत नसत. मात्र ते आपल्या परगण्यांतलि लोकांना लुबाडीत

नसावे असें वाटतें. ‘ कोंडाजी देशमूख व गोमाजी गोविंद देशमूख परगणे कोतूळ यांनीं चारपाचशे माणसानिशी येऊन यादो मोरेश्वर देशमूख याच्या घरीं दरवडा घालून घर लुटविलें व त्याचा भाऊ ठार मारला.–’ कदाचित् हा प्रकार अदावतीमुळेंहि घडला असेल. वर घासदाणा वगैरे हक्क सरदार लोक वसूल करीत याचीं उदाहरणें दिली आहेत. परंतु चोरटे लोक देखीलें असले कर घेत; मग सरदारांनीं घ्यावे यांत काय नवल ? ‘ तर्फ देवळे प्रांत राजापूर व त्याचप्रमाणें प्रांत दाभोळ येथें शामलाकडील (जंजिऱ्याचा शिद्दी) चोरटे येऊन चोरपट्टी वसूल करीत ’ (पे. डा.) चोर दरवडेखोर यांनीं लुबाडावें व लुटावें हें ठकि आहे. पण त्यांनीं हा स्वभावधर्म सोडून पट्टी वसूल करण्याचा राजे लोकांना शोभणारा शांततेचा मार्ग स्वीकारला यावरून निराळाच तर्क चालतो. त्यांच्या त्रासानें नागवलेल्या रयतेनें चोरट्याबरोबर तडजोड केली असावी. ती अशी कीं, त्यांनीं रयतेला वारंवार लुट्टन त्यांच्या आयुष्यक्रमांत बिघाड आणूं नये, उलट रयतेनेंहि चोरांच्या निर्वाहाची काळजी करून त्यास राजाला कर देतात त्याप्रमाणें कर देऊन त्यांची गरज भागवावी. एकंदरीत त्या बाजूस चोरांचे वाडे वसले नसले तरी त्यांना कांहीं काळ राजाचा मान मिळूं लागला इतकें खरें !

महाराष्ट्रांत दंगेखोरांच्या ज्या जाती होत्या त्यांपैकीं कोळयांची जात प्रमुख होय. हे कोळी समुद्रकाठी राहून मासे धरणारे नव्हेत. त्यांची वस्ती समुद्रकांठीं नसून कोंकण व देश यांजमधील डोंगरकठाडीला होती. नाशिक जिल्ह्यांतील कोळवण हा टापू कोळयांच्या वस्तीचाच. येथील कोळी राजांची राज्ये पेशव्यांनीं खालसा केल्यावर नाशीक व ठाणे या दोन जिल्ह्यांच्या मध्यभागीं रहाणाऱ्या या लढाऊ लोकांनीं गुजराथेपासून नगर जिल्ह्याच्या हद्दपिर्यंत पुष्कळदा धुमाकुळ घालून रयतेला हैराण करून सोडलें होतें. सन १७५८ त त्यांनीं कल्याणप्रांती दंगा करून वाणी लोकांनीं मीठ व किराणा माल ठेवला होता तो लुटला [पे. डा]. खानदेशांत सातमाळ नांवाची एक डोंगरांची रांग आहे. अजंठ्याची कोरीव लेणी त्याच रांगेंत आहेत. सातमाळ व सातपुडा यांच्या दरम्यान पसरलेला तो खानदेश. त्यास भिल्ल लोक पीडा देत. अशांचा बंदोबस्त सरकारांतून फौजा पाठवून अखेर करण्यांत येत असे. पण तोंपर्यंत ते लहानसान प्रतिकारास मुळींच दाद देत नसत. ‘ खेड्यांतील लोकांची स्थिति कशी होती याची कल्पना

पुढील हकीकतविरून येते ' लोणीखुर्द परगणे संगमनेर येथील शिदू सोनारास कान्होजी घोगरा यानें आपलें घर, दळें (शेत) व घरठाण विकले. सोनारानें घरांत राहून घराला दरवाजा लावला. मग पेठ्याहून स्वारी आली. त्यांनीं खंडणी करून पट्टी गावांत करून रुपये घेतले. पुढें संगमनेरच्या हकीमानें येऊन खंडणी भारी केली. लोक पळून गेले, गांव बेचिराक झाला. मग हसनापूरकरांनीं कान्होरचे गाडें भाडें करून गांवांतील घरें उकरून आमदानगरीं (अहमदनगरास) विकावयास नेलीं. तेव्हां शिदू सोनाराची पडसाळहि नेली. त्याजवर आपाजी देशपांडे व तुकोपंत टेकाडे [म्हणजे] देशमूख यांचा वकील यांनी इजार केला. त्यांनी जमाबंदी भारी केली. तमाम लोकास मार दिले. घरास खणत्या लावल्या. परिटाच्या घरांत खणतां रुपयाचा गोल्या लावला. ते रुपये पांचशें होते. तें हकीमानें नेले. ' [पे. डा.]

लोणी खुर्द या गांवावर हकीम व सरकार या दोघांचा अंमल दिसतो. हकीम हा मुसलमान असून त्याला वैद्यक्रियेबद्दल अहमदनगरच्या एखाद्या बादशहानें लोणीखुर्द गांवचा कांहीं अंश इनाम किंवा जहागीर दिला असावा. पेठ्यांतून म्हणजे संगमनेराहून मामलेदार अगर महालकरी यानें गांवीं येऊन सरकारची पट्टी वसूल केली. मागाहून हकीम आला, त्यानेंहि आपल्या हिश्शाची पट्टी गांवापासून घेतली. हकिमाचा जुलूम गांवावर इतका झाला कीं, गांव उठला व ओस पडला. हसनापूरच्या लोकांनीं येऊन घरें फोडली व घराची दारें, तुळया वगैरे मौल्यवान् सामान गाड्यांत भरून अहमदनगरास नेलें व विकून टाकलें. यानंतर कांहीं वर्षे गेलीं. गांवच्या जमिनींची लागण करण्यास कोणी नसल्यामुळें हकीम व सरकार या उभयतांचें नुकसान होऊं लागलें. तेव्हां त्या गांवच्या जामिनी देशमूख व देशपांडे यांनीं मक्त्यानें आपणाकडे घेतल्या. आतां फिरून वस्ती झाली होती तरी जीं घरें बेचिराक होतीं त्या घरांस खणत्या लावून त्यांत पुरून ठेवलेलें द्रव्य सांपडतें कीं काय, हें पहाण्यांत आलें. एका परटाच्या घरांत पांचशे रुपये पुरलेले सांपडले. ही बातमी हकीमास कळतांच तो ते देशमूख-देशपांड्यापासून घेऊन गेला. त्या काळच्या गांवांत अशा प्रकारचीं स्थित्यंतरें होत. म्हणून लोक आपलीं घरें सुरेख व नीटनेटकीं बांधण्याच्या भरीस न पडतां घरांची जुजबी डागडुजी करून दिवस काढीत आणि जवळ थोडा ऐवज असलाच तर तो लुटीच्या भीतीनें जमिनींत पुरून ठेवीत.

हा झाला खेड्यांचा नमुना. शहरावर खेड्याप्रमाणें लहान धाडी येत नसत. कारण त्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य शहरवासीयांत असे. निजामासारख्या शत्रूची स्वारी आली तर नागरिकावर फारच कठिण प्रसंग गुदरे. पण असे प्रसंग खेड्याच्या मानानें क्वचित् येत. सन १७६३-६४ सालीं निजामाची स्वारी अहमदनगरावर झाली. अहमदनगरास गणेश विठ्ठल हा पेशव्यांचा अंमलदार होता. पण त्याच्यानें सबंध अहमदनगरचा बचाव होण्यासारखा नव्हता. तेव्हां 'अहमदनगर येथील साहुकार व रयत यींनीं गणेश विठ्ठल याजपाशीं करार केला कीं, दंग्यामुळें आमचीं मुलेंमाणसें व वस्तभाव किल्ले नगरांत व किल्ल्याचे पाळीस उतरो द्यावी व आमचा बचाव करावा; म्हणजे आम्ही आपले सुखें एका रोजमऱ्याचा ऐवज दहा हजार रुपये शिबंदी खर्चास देऊं.' या कराराप्रमाणें वसूल करण्यास गणेश विठ्ठल यास (सरकारांतून) आज्ञा झाली व देशमूख देशपांडे तालुके अहमदनगर यांसहि तीच आज्ञा झाली. (पे. डा.)

शहरांतील जे मोठमोठे सावकार होते त्यांना अशी व्यवस्था करतां आली. पण किरकोळ लोकांना तिचा फायदा घेणें त्यांच्या शक्तीपलीकडचें असल्यानें ते आपसांतच ज्याच्या घराचा बंदोबस्त पक्का असेल त्याजपाशीं आपली चीजवस्त विश्वासानें ठेव म्हणून ठेवीत. त्यांपैकीं कोणी इमानी निघाला तर ठीकच. नाहींपेक्षां शत्रूनें लुटलें काय आणि शेजाऱ्यानें फसविलें काय त्याच्या दृष्टीनें सारखेंच. अहमदनगरचा बहिरजी आतार मोगलाच्या वरील दंग्यांत असाच फसला. त्यानें पेशवे सरकारांत फिर्याद नेली. 'बहिरजी आतार यानें हुजूर विदित केलें कीं, आपण अहमदनगरांत रहातो. त्यास मोगलाचे दंग्यांत सोन्याचे व रुप्याचे दागिने शिवाजी वाणी याजजवळ ठेवावयास दिले. व आणखीहि कित्येक लोकांनीं दिले होते. दंगा वारल्यावर मी आपले दागिने मागूं लागलों. देतों म्हणून बोलत असतां आठा चहू रोजांनीं दागिने गेले म्हणून बोलला. ग्वाहीदार व मुदई त्यास म्हणतात कीं दागिने तुजपाशीं आहेत ते दे, नाहींतर सरकारांत चल. तें न ऐकतां जबरदस्तीच्या गोष्टी सांगतो. तरी सरकारानें दाद घ्यावी' (पे. डा.)

मराठ्यांच्या फौजा स्वतःच्या मुलखांतून शत्रूवर जावयास निघाल्या असतां त्यांजकडून वाटेवरील गांवांना उपद्रव व्हावा, याचा हेतु प्रजेला मुद्दाम पीडा

देण्याचा नसे. फौजेला वाट चालतांना मुख्य अडचण दाणावैरणीची विशेषतः पडावी. फौजेबरोबर बाजार असल्यानें फौजेंतील लोकांना जरूर तो दाणा बाजारांत विकत मिळे. कारण दाणा एका मुक्कामाहून दुसऱ्या मुक्कामापर्यंत बैलावर लादून नेणे शक्य होतें. पण वैरणीचें तसे नव्हते. वैरण वाहून नेण्यास खर्च फार म्हणून फौजेचा तळ कोठें पडला, कीं त्या शिवारांतलि उभ्या पिकावर किंवा गांवातील गंजीवर धाड यावयाचीच. कधीं कधीं फौज मोठी नसल्यास तिजबरोबर बाजारहि नसावा. तेव्हां धान्यहि गांवापासूनच सरदार लोक उकळीत. खुद्द पेशव्यांच्या फौजेकडूनहि गांवाना अशी घस लागत असे. पण इतर सरदारांत व त्यांच्यांत फरक हा कीं, रयतेची झालेली तसनस भरून देण्याची व साऱ्याच्या माफीची कांहीं तरी तजवीज ते करीत. ‘ गारपीर येथें खासा स्वारीचा मुक्काम होऊन शेताची खराबी झाली व शेतें कापून आणिली. लाल टेकडीजवळ हत्तीचे झुंज लावले. त्यामुळें नुकसान झालें. त्याबद्दल १८२ रुपये कुळास दिले ’ [पे. डा.] ही नुकसानभरपाईच होय. ‘ कसबे खरडे येथील रयत उदमी व व्यापारी लोक खासा स्वारी त्या प्रांती दाखल झाली तेव्हां दहशतीमुळें परागंदा झाले; त्यांस अभयपत्र देऊन गांवी येऊन रहाण्यास सांगितले ’ [पे. डा.] म्हणजे खुद्द पेशव्यांच्या फौजेचाहि प्रजेला विश्वास वाटत नव्हता.

नुकसान भरपाई

आपल्या फौजेची गावाला तोशीस लागली, सरदारांनीं गांवाची नासाडी केली किंवा शत्रूंनीं गांव लुटला, जाळला तर त्याचा परिहार पेशवे शक्य तितका करीत. वसुलाची माफी हाच दुःखनिवारणाचा मुख्य उपाय. पण तो ते सरकारांत पैशाची ओढ असतांहि अमलांत आणीत. ‘ सन १७६३-६४ सालीं वाईप्रांती धामधूम झाली. रयत लुटली, नागवली गेली. याजकरितां चौकशी करून सोड देण्याचा हुकूम. सरकारची बोढ आहेच.’ ‘ क्षेत्र आळंदी हा गांव मोगलांचे दंग्यामुळें लुटला.नागवला,बेचिराख पडला. याजकरितां गांवाची आबादी करावी म्हणून गावास दोन वर्षांचा वसूल माफ केला. मात्र श्री ज्ञानेश्वराकडील खर्च वर्षासनें हा खर्च गांवच्या वसुलांतूनच द्यावयाचा.’ सरकारानें पदरचा द्यावयाचा नाहीं. कारण सरकारची खर्चाची ओढ. ‘ चाकण, जुन्नर वगैरे प्रांतांतलि गांवें जळालीं, दाणादुणा, वैरण, गुरेढोरें दरोबस्त लुटून नेलीं. त्यांस

वसूल माफ. ज्यांचीं घरें जळालीं नाहींत व वस्तभाव लुटली गेली नाहीं त्यांजकडून जीवन पाहून आकार घ्यावा. अर्धवट नुकसान झालेल्यांस अर्धबट सूट. सरसकट सूट न देतां ज्या प्रमाणांत नुकसान त्या प्रमाणांत सूट असा सूट देण्यांत हिशोबीपणा होता. ' नबाब निजामअल्ली यांनीं जुन्नर प्रांतांत येऊन रयतेची वस्तभाव लुटली. घरेंदारें जळालीं, यासाठीं रयतेच्या आबादीवर नजर देऊन व सरकारांत ऐवजाची निकड जाणून वसूल करणें ' (पे. डा.). एकूण रयतेपेक्षां राजाची स्थिति अधिक चांगली नव्हती, पण रयतेची दैना ऐकवत नव्हती, म्हणून तिच्या दुःखाचा परिहार शक्य तेवढा पेशवे करीत असत.

लुटालूट सर्वच मराठे सरदार प्रसंगविशेषीं करीत असले तरी हा प्रकार शिष्टसंमत नव्हता. राघोबादादानें श्रीक्षेत्र पैठण लुटल्याचें वृत्त गोविंद हरि पटवर्धनास कळलें. तें ऐकून गोविंदपंतानें पुढीलप्रमाणें उपरोधिक उद्गार काढले. ' श्रीमंत दादासाहेबी पैठणचें शिष्टकृत्य केलें ! उत्तम गोष्ट केली. ते पुण्याहून गेल्यापासून श्रेयस्कर कर्मेंच होत चालली. थोरच आहेत. ' (ऐ. ले. सं.)

वर वर्णिली ती सुलतानी संकटे. तशांत दुष्काळासारखे अस्मानी संकट गुदरले म्हणजे लोकांच्या हालाना सीमाच नसे. धान्याचा पुरवठा एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जलद होण्यास आगगाडीसारखी प्रचंड साधने उपलब्ध नसल्यामुळें लोकावर अन्न-अन्न करून प्राण टाकण्याचा प्रसंग येत असे.

सन १७१९-२० मधील बाजारभाव येथें दिले आहेत. ते स्वस्ताईच्या काळांतील होत. या भावांत उंट व हत्ती यांच्याहि किंमती आल्या आहेत.

सोनें १४ रु. तोळा.

विड्याचीं पानें पैशाला २५

ज्वारी	१ रुपयास	१४ पायली
बाजरी	,,	१० ,,
हरबरे	,,	६ ,,
तूप	,,	३। शेर
तांदूळ	,,	४॥ पायली
गूळ	,,	४॥। शेर
तेल	,,	४ शेर
हळद	,,	४॥ शेर

मीठ १	रुपयांस	४ पायली
साखर	,,	४ शेर
लाकूड		एका खंडीस ४॥ रु.
लोखंड	,,	७। शेर
दूध	,,	१२ शेर
पेढे	,,	१॥। शेर
दोडके		३ पैसे शेर
लिंबू		१ पैशाला एक
उंट		एकास २३० रु.
हत्ती		एकास ५॥ हजार रु.

(पे. डा.)

सन १७६५ त मिरजप्रांतांत महागाई होती. तेथील बाजारभावासंबंधी गोविंदपंत पटवर्धन गोपाळरावास लिहितो, ' इकडे पंधरावीस दिवसांत पर्जन्य अगदी नाहीं. आणखी आठ रोजांत पडला तरी उत्तम. नाहीतर मागती पर्जन्याची फिकीर लागेल. कारण लष्कराकडील लमाण व उदमी लोक यानी इकडे येऊन खरेदी करू लागल्यामुळें महर्घता जाहली. सहा साडेसहा पायल्यानी जोंधळे जाहले होते ते पाच पायलीवर गेले. सरकारची खरेदी आली यामुळें इकडे धान्य महाग जाले. प्रस्तुत दोन नक्षत्रे कोरडी गेली. तिसरेहि चालले. हा धाकच आहे ' [ऐ. ले. सं. खं. ३ रा] पुण्यापेक्षा मिरजी माप जवळ जवळ दुपटीने मोठे व सातारी मापापेक्षा दिढीने मोठे हा फरक येथे हिशेबात ध्यावयास पाहिजे. पेशव्यांची स्वारी श्रीरंगपट्टणाकडे होती तेथील सैन्यास लागणाऱ्या धान्याची ओढ मिरजेइतक्या दूर प्रांतीहि बसली. हे भाव पावसाळ्याच्या प्रारंभाचे, पण त्या साली पिके आल्यावर धारण सैलावून जोंधळे दहा पायली झाल्याचे पण हरभरे (लष्करी ओढमुळें,) मिळत नसल्याचे गोविंदपंत लिहितो. सन १७७० तं ज्येष्ठ मासी मिरजेतील भाव ' जोंधळे १ रुपयास ६॥–६॥। पायली, हरभरे ३॥। पायली, गहूं ३॥ पायली, तांदूळ २॥ पायली, तूप ७ रुपयास कच्चा एक मण, गूळ १॥ रुपयास एक मण, तंबाखू १॥ रु. स १ मण असे होते. ' [ऐ. ले. सं.]

सन १७७२ मधील कांहीं जिनसांचे पुण्यांतील भाव येणेंप्रमाणें–चर्मी जोडा

किंमत ८ आणे, हस्तिदंती फणी ३ आणे, लाकडी फणी १ पैसा, जानवींजोड एक आणा, गुलकंद दर शेरीं १८ रु., अंबर दर तोळयास १० रु., ५ शेर साबणाला ४ रु., ८ बैलाना १३० रु., पासोडी १॥ रुपयास एक, एक रुपयाला ५ नारळ, म्हशीची किं. ३० रु. '

पण प्रत्यक्ष दुष्काळ पडला म्हणजे जनतेची स्थिति काय विचारावी? सन १७८४ मध्यें उत्तर हिंदुस्थानात चाळसा नांवाचा भयंकर दुष्काळ पडला. त्यांत जनतेची झालेली स्थिति खालील पत्री रेखाटली आहे. ' विज्ञापना ऐसीजे. या प्रांतांत पाऊस प्रथम आरद्रापासून आश्लेषापावेतो काय पडला असेल त्याजवर जोरी बाजरी वगैरे पेरण्या झाल्या. मघापासून अगदीं पाऊस उघडला. बाजरी वाळून उडाली. पुढें रब्बीचे पेरेच नाहींसें झाले. हा मुलूख आधींच लुटला गेला. लोक कंगाल झाले; प्रांत सुका पडला. या देशांत लष्करांत महागाई. १२।१३ शेर धारण आज आहे. उद्यां ईश्वर जाणे. अशींच गति अंतर्वेद दिल्ली लाहोर काश्मीरपावेतों झाली. मुलूख तिकडील उठून दक्षिणेस येतात. हजारों, लाखो माणूस भिकार लष्करांत आले. माळव्यांत जातात, अन्न मिळत नाहीं. उपासानें माणूस फार मरतें, संहारच होऊं लागला आहे. लखनौ व श्रीकाशीप्रांती हीच दशा झाली. ' कंगाल लखनौत फार आले. त्यांची वस्ती मिरजा अमानीनें वेगळीच करविली. दर माणसीं दोन पैसे रोज देतो. वदंता आहे. ईश्वर-इच्छा काय आहे हे कळेना. विज्ञापना [इ. सं.].

राजा व प्रजा या उभयतानाहि दुष्काळाचे संकट दुस्तर वाटत असे. म्हणून दुष्काळ न पडण्यासाठीं ईश्वरास प्रसन्न करण्याचे दैवी उपाय योजण्यांत येत. वेळच्या वेळीं पाऊस न आला कीं या उपायाला सुरुवात व्हावी. नानासाहेब पेशव्याच्या कारकिर्दीत सन १७५३ मध्यें निम्मा ज्येष्ठ मास संपला, तरी पावसाचे दर्शन होईना. ' मुलकांत पर्जन्य पडून पीक झाले पाहिजे याकरितां शेपन्नास रुपये वेचून मोरगांव आणखे स्थळी ब्राह्मण अनुष्ठानास घालून पर्जन्यवृष्टि होय ते गोष्टी करणें ' अशी आज्ञा बापूजी श्रीपत यास नानासाहेबाने केली [पे.द.४३].

मराठ्यांचे यशोगान

तो काळ एकट्या महाराष्ट्रांतच नव्हे तर सगळया देशांत धामधुमीचा व संकटाचा असल्यानें सामान्य जनतेच्या अंगवळणींच पडलेला होता. त्यांत

मराठ्यांना समाधान हें कीं, त्या संकटांतून जातांना सुखाचें क्षण भेटत. विजयावाचून त्यांचें एखादें वर्षहि सुनें जात नव्हतें व ज्यांनीं विजय मिळविला त्या सेनापतींच्या व सरदारांच्या नांवाचीं स्तुतिस्तोत्रें महाराष्ट्राबाहेर प्रवासास गेलेल्या यात्रेकरूंच्या कानीं परकीयांच्या तोंडून आलीं असतां त्यांना त्याचा फार अभिमान वाटावा. मराठे तितके सगळे एक ही भावना सर्व महाराष्ट्रीयांच्या अन्तःकरणांत असलेच प्रसंग बाणवीत असत. त्यांचा परिणाम महाराष्ट्रीयांवर किती होत असेल याची कल्पना पुढील उदाहरणावरून येणार आहे. गोपाळराव पटवर्धन पेशव्यांच्या सैन्यांतील एक प्रमुख सरदार या नात्यानें हैदराबरोबर लढत होता. त्या मोहिमेवर असतांच गोपाळराव आजारी पडून त्याला मृत्यू आला. त्यावेळीं पटवर्धनांच्या आश्रितांपैकीं रामचंद्र भट वाटवे हा दक्षिणेकडील यात्रेला गेला होता. त्यानें आपला यात्रेंतील अनुभव पुढीलप्रमाणें नमूद केला आहे. 'आम्ही दक्षिण यात्रेस गेलो होतो. हरकशी निभावणूक करून तंजावरपर्यंत आलो. तेथे अल्प किंचित् वर्तमान ऐकले. पुढें त्रिचनापल्लीस जाऊन वृद्धाचलावरून अरूणाचलास फाल्गुन वद्य १२ स आलो. तेथे वाटसरू दोघे ब्राह्मण मिरजेहून आले होते. त्यांस सहजामध्यें देशचे वर्तमान विचारलेवर माघ शुद्ध पौर्णिमेस मिरजेस होतो [असें सांगून] कैलासवासी रायांचें वर्तमान [गोपाळरावाच्या मृत्यूचें] सांगितलें. खरे लटके म्हणावें तर पत्तेबार दाखले सांगितले. नंतर सत्य भासलें. आम्ही प्रवासामध्यें सर्व प्रकारे रायाचे लौकिकावर होतो. त्यांचे पराक्रमावर आम्हास किती एक लोक मानत होते.'[ऐ. ले. सं. खंड ४ था] कीर्तिमान् पुरुष स्वतः मोठेपणा पावून आपल्या देशबांधवांनाहि तो अनायसें मिळवून देतात तो असा. परप्रांतीं गेल्यावर व्यक्तिशः होणारा गौरव या प्रकारचा. पण मराठी सेना विजयी होऊन परत स्वदेशीं येई, त्यावेळीं जनतेच्या उत्साहास येणारें भरतें कांहीं वेगळेंच असे. खर्ड्याची लढाई ही मराठ्यांची शेवटची वैभवशाली लढाई. तींत फत्ते मिळवून श्रीमंत सवाई माधवराव पेशव्यांनीं पुण्यांत प्रवेश केला त्याचें वर्णन स्फूर्तिदायक आहे. 'खर्ड्याची फत्ते झाल्यावर श्रीमंत परत फिरले आणि ता. २ मे १७९५ रोजीं त्यांनीं मोठ्या समारंभानें पुण्यांत प्रवेश केला. सरकारचे वाड्यांत खासा स्वारी दाखल होण्याचा मुहूर्त वैशाख शुद्ध १३ भृगुवारी पूर्वरात्री ठरला. श्रीमंतांची स्वारी शहरांत आली ते वेळीं शहरच्या बायका आरत्या घेऊन रस्तोरस्ती दुमजल्या-तिमजल्या-

वरून उभ्या होत्या. सोन्यारुप्याची फुले उधळली. चिराखदान केले होते. श्रीमंतांची स्वारी भवानी पेठेतून, शुक्रवारांतून खासगीवाले यांचे वाड्याचे पूर्वेस बुधवारचे रस्त्यास मिळून नाना फडणीस यांच्या वाड्यापुढून सरकारचा वाडा उजवा घेऊन दिल्ली दरवाज्यानें सरकारवाड्यांत दाखल झाली. सरदार, मुत्सद्दी याणीं नजरा केल्या. खुषीच्या तोफांची सरबत्ती झाली. मोठा समारंभ झाला. पुराणांतरी श्रीरामचंद्रजींनीं लंका घेऊन अयोध्येस आले ते समयीं जाहला तद्वत जाहला.' [सांगलीकरांचा वाका]

प्रकरण सतरावें

सत्पुरुषांची समाजसेवा

शाहूमहाराजांपूर्वी व शाहूमहाराजांपासून पुढें महाराष्ट्रांत जे वरिष्ठ शिक्षण मिळत होते ते धर्मशिक्षणच होते. पंतोजीमार्फत दिल्या जाणाऱ्या कनिष्ठ शिक्षणांत व्यावहारिक शिक्षणाचा बराच अंश असे. परंतु वरिष्ठ शिक्षण प्रायः धार्मिक स्वरूपाचेच असल्यामुळें ते शिक्षण संपादून समाजांत सामील होणाऱ्या विद्वानांचा कल धर्मपर व निवृत्तिपर असावा यांत नवल नाहीं. वेदशाळांतून बाहेर पडणारे वैदिक व याज्ञिक यांचा व्यवसाय वेद म्हणण्याचा, यज्ञयागादि कर्मे करण्याचा व प्रयोग चालविण्याचा. त्यांच्या व्यवसायानें महाराष्ट्रीय हिंदु-समाज संस्कारयुक्त आचारसंपन्न व शक्य तितका वर्णाश्रमधर्म पाळणारा बनला. दरसाल श्रावण मासांत दक्षिणा घेण्यास जे गांवोगांवचे हजार दीड हजार विद्वान् ब्राह्मण पुण्यांत येत त्यांतील परप्रांतीय विद्वान् सोडून दिले तरी खुद्द महाराष्ट्रीय विद्वान् पांच सातशेपर्यंत धरण्यास हरकत नाही. या पांच सातशे पैकीं तीनचारशें शास्त्रीपंडित सहज निघतील. महाराष्ट्रांतील ज्ञानप्रसारास खरें सहाय्य झालें ते याच तीन चारशे शास्त्रीपंडितांचे. याच शास्त्रीपंडितांतून किंवा त्यांजपाशीं थोडेंबहुत अध्ययन केलेल्या तरुणांतून न्यायाधीश, वकील, मुत्सद्दी उदयास आले ते अपवादभूत होत. त्यापेक्षां साधु, कवि, हरिदास, पुराणिक यांचाच भरणा मोठा.

साधूंचा एक स्वतंत्र वर्ग होताच. परंतु त्याशिवाय उरलेले कवि, हरिदास व पुराणिक हेहि कमी-अधिक प्रमाणांत साधुवृत्तीचेच असत. जे ग्रंथ हातीं पडावे ते वाचून ज्याच्या त्याच्या अंगी साधुवृत्तिच बाणावी व त्या ग्रंथाप्रमाणें मराठी भाषेंत काव्यरचना करण्याची त्याना स्फूर्ति व्हावी. आजहि आपण तीच स्थिति निराळ्या रूपानें पहातो. सांप्रत तरुणास इंग्रजीमधून इतिहास, राज-कारण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र या विषयांवरील ग्रंथ परिशीलन करावयास मिळ-तात; त्या परिशीलनानें कोणी पूर्णपणें देशभक्त बनून संसारसुखावर लाथ मार-

तात, किंवा संसाराची उपेक्षा करितात. बाकीच्यांना देशभक्तीची उपयुक्तता पटली असली तरी तिजकरितां संसार न सोडता संसारांत राहूनच व्याख्याते, वर्तमानपत्रकार, ग्रंथकार, कवि, शिक्षक, समाजसुधारक इत्यादि व्यवसाय पत्करून ते देशसेवाच चालवितात. यांपैकीं जे स्वतःस देशभक्त म्हणवितात ते इतरापेक्षां अधिक विद्वान् असतात असे नाहीं. पण त्यांच्यापाशीं विशेष गुण असतो वैराग्याचा. मराठी राज्यांतील साधूंना हाच न्याय लागू आहे. ते साधु इतराहून विद्वान् नसले तरी विरक्त असल्यामुळें त्यांस समाजांत विद्वानापेक्षाहि अधिक मान मिळत होता; इतकेच नव्हे, तर विद्वान् लोकहि त्यांच्या पायावर आदरानें डोकें ठेवीत असत.

मुसलमानी आमदानीपेक्षां मराठ्यांच्या आमदानींत फरक पडला तो हा कीं, साधुवृंदात ब्राह्मणवर्गाशिवाय इतर वर्गातील साधु आढळेनासे झाले. हा फरक नुसत्या साधूंतच नव्हे तर कवि, हरिदास व उपदेशक यांतहि दिसून आला. याचे कारण काय असावे हें शोधण्यासारखे आहे. मुसलमानी राज्य परधर्मीयांचे व परकीयांचे असल्यामुळें त्यांत हिंदूवरील वर्णाश्रमधर्माची बंधने शिथिल पडून त्यांच्यांत स्वतंत्रपणा उत्पन्न झाला होता. या योगानें कोणत्याहि वर्णानें व जातीनें कोणत्याहि वर्णाची व जातीची कामे करावी असे होऊन आठरा पगड जातींत संत, कवि, हरिदास व उपदेशक यांचे पीक आले. पण मराठी राज्य स्थापन झाल्यावर हा मनु पालटला व सर्व समाज बराचसा वर्णाश्रमधर्माच्या शिस्तीत आणण्याचा राजकर्त्याकडून प्रयत्न झाला.

नुसते वेदोक्त कर्म घेतले तरी त्यांतून वरील विधानाचा उलगडा होणारा आहे. प्रभु व सोनार या महाराष्ट्रीय हिंदुसमाजांतील बऱ्याच वरच्या जाती होत. त्याना आपली धर्मकृत्ये वेदोक्त व्हावीं असे वाटत असून त्याप्रमाणें संधि मिळेल तेव्हां ते वागण्याचा प्रयत्नहि करीत. परंतु मराठी राज्यकर्त्यापुढें हे प्रकरण निर्णयाकरितां आले म्हणजे त्याना धर्मशास्त्र व रूढी हीं विचारांत घ्यावीच लागत. प्रभूचे वेदोक्ताविषयींचे भांडण शिवाजीमहाराजापासून सुरू आहे, असे श्रीशंकराचार्यांनीं आश्विन शुद्ध १० शके १७४९ रोजीं काढलेल्या आज्ञापत्रावरून दिसून येते. शिवाजीनें बाळाजी आवजी चिटणीस यास आपला पुत्र खंडो बल्लाळ याची मुंज वैदिक विधीने करण्याची परवानगी दिली होती. परंतु संभाजीने तो बेत रहित करविला. शाहूच्या कारकीर्दींत गोविंदराव चिटणि-

साने कांहीं ब्राह्मणांच्या मदतीनें प्रयागास अतिरुद्राचे अनुष्ठान आपल्या बंधूच्या हस्ते करविलें. तेव्हां काशी, प्रयाग येथील ब्राह्मणाशी प्रभू व तत्पक्षीय ब्राह्मण यांचा कलह माजून तेथील अधिकारी व अयोध्येच्या नबाबाचा सुभेदार राजा नवलराय याजकडे ही फिर्याद गेली. तेव्हां प्रस्तुत प्रकरण दक्षिणी लोकांचे म्हणून त्याने शाहूकडे पाठविले. त्यावरून शाहूने साताऱ्यास पंडितांची सभा भरवून वादाचा निकाल देवविला. तो प्रभू हे शूद्र आहेत असा त्यांनी दिला. नारायणराव पेशव्याच्या कारकीर्दींत हा जुना वाद पुन्हां उपस्थित झाला.

त्यानंतरचे प्रकरण असें कीं 'पेण प्रांत कल्याण येथील परभूचे घरी टकले आडनांवाचे ब्राह्मण उपाध्ये पूर्वींपासून होते. ते पक्षांत पिठाचे पिंड घालीत असत. ही रूढी बदलून भाताचे पिंड घालावे असें यजमानाचे मत पडले. पण टकले नाकबूल झाले. तेव्हां परभानी दुसरा उपाध्याय आणून त्याजकडून आपल्या इच्छेप्रमाणें कर्म करवून घेतले. अर्थात् टकले यांची वृत्ति बुडाल्यावरून त्यानी पुण्यास पेशव्याकडे फिर्याद केली. त्यावेळीं [सन १७८८] पेशवे सवाई माधवराव व त्यांचे कारभारी नाना फडणीस होते. त्यानी पंडितांचा सल्ला घेऊन निर्णय परभाविरुद्ध दिला.' [ऐ. ले. सं. खंड ८]

प्रभूप्रमाणें सोनारांचेहि प्रकरण पुण्यांत रंगले होते. पुण्यांत एक दोन सोनारांच्या घरी शालिग्राम व पंचायतने आहेत अशी बातमी सरकारात लागली. तेव्हां सोनाराना पकडून त्यांच्या घराची झडती घेण्यांत आली. तिच्यांत नारायणभट्टीचे पुस्तक, शास्त्रार्थाची पुस्तकें, महिम्न, संध्या, पुरुषसूक्त, रुद्र व न्यास यांची पुस्तके सापडली. चौकशी अंती सोनारांत जोशी, शास्त्री अशीहि नांवे आढळली. हे इसम उपाध्यायाचे काम करीत. सदर प्रकरण निर्णयाकरिता अय्याशास्त्री यांजकडे गेले असता त्यानी 'सोनार यानी दुहेरी धोतरे नेसावी. पाट लावावा, त्यांच्या विधवानी केस काढू नयेत असा निकाल दिला., [ऐ. ले. सं. ८]

शिरोळास सदू आचारी (आचार्य ?) हा सोनार जातीचा मनुष्य होता; तो करवीरकरांच्या हद्दींत राहून पटवर्धन हद्दींत कुरुंदवाड येथे जाऊन सोनार व सुतार यांच्या घरची शुभाशुभ कृत्ये वेदोक्त मंत्रानी करू लागला (सन १७८८). तेव्हा हे वर्तमान ब्राह्मणास समजताच त्यानी गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धनाचे कानावर घातले. त्यानी त्यास कैदेंत ठेवले व फिरून वेदोक्त मंत्रेकरून कोणतेहि

कार्य करू नये, याप्रमाणें कागद, कतबे व गुन्हेगारी घेऊन सोडला. पुढें तो मुळीच कार्य करण्यास येईनासा झाल्यामुळें कार्यें अडून राहिली. त्याचा चुलता धर्माचारी याला आणावा तर त्याचा जामीन घेतला असल्याने तो बाळासाहेबाच्या आज्ञेवांचून येईना. दुसरा आचारी आणावा तर त्याला सदू लबाडीने येऊ देईना. तेव्हां धर्माचारी यास परवानगी द्यावी असें कुरुंदवाडचे कारभारी महादाजी बल्लाळ यानी बाळासाहेब मिरजकर यांस लिहिले. सदूस कुरुंदवाडचे ग्रामजोशी व ब्राह्मण यानी तुला हे मंत्र कोणी सांगितले म्हणून विचारले; तेव्हां याप्रमाणें आम्ही वाड वडिलापासून करीत आलो आहो असें त्यानें सांगितलें. [ऐ. ले. सं. भाग ८ वा]

वरील गंगाधरराव बाळासाहेब यानी सन १७८८ सालांतच परशुरामभाऊस पत्र पाठविले ते असे, ' सोनारांचा उपाध्या भगवंता हा बहादुरवाडीत वेदोक्त कर्म पढवितो असें एकाने खचीत सांगितले; तेव्हां त्यास पकडून आणिले पाहिजे. यावर परशुरामभाऊनी उलट कळविले कीं, त्याच्या ओळखीचा कोणी असल्यास त्याला पाठवून द्या म्हणजे पुढची व्यवस्था करू. [ऐ ले. सं. भाग ८ वा]

ही उदाहरणें सांगण्याचे कारण असे कीं त्या काळचे समाजशासन कोणत्या नियमाना अनुसरून चालत होते हे लक्षांत यावे. सदर नियम जसे पेशवे व त्यांचे सरदार पाळीत तसेच साताऱ्याचे महाराजहि पाळीत असत. कारण शास्त्र व रूढी या त्यांनीं बनविल्या नसून पूर्वीपासूनच बनलेल्या असल्यामुळें त्यांना त्या मानाव्याच लागत होत्या. मग तसें करताना त्यांना मानसिक क्लेश कितीहि होवोत.

मुसलमानांच्या अंमलात ढिली पडलेली शिस्त मराठी अंमलात कडकपणानें पाळण्यात येऊं लागल्याचा परिणाम एकंदर समाजस्थितीवर होऊन ब्राह्मणाशिवाय इतरानी धर्मोपदेश करण्याचे बंद पडले असल्यामुळेंच इतर जातींतील साधूंचा महाराष्ट्रांत लोप झाला असावा असें वाटते. शाहूमहाराज महाराष्ट्रांत आले तेव्हांपासून पेशवाईच्या अखेरीपर्यंत जे सत्पुरुष निर्माण झाले त्यांत कचेश्वर, रामाजी नारायण कोल्हटकर, ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर, नारायण दीक्षित पाटणकर, ज्योतिपंत महाभागवत, तुकाविप्र हे प्रमुख होत. त्या काळांत महाराष्ट्र देश हल्लींप्रमाणें मनुष्य वस्तीने गजबजला नव्हता. मनुष्यवस्ती विरळ

होती व मुबलक मुलूख मोकळा पडला होता. त्यांत संतानी आपल्या पसंतीचे स्थान शोधून काढून पाण्याच्या आश्रयाने एखाद्या नदीकिनाऱ्यास, वनांत अगर दरीं कंदरीं राहून आपला मठ उठवावा. अयाचित वृत्तीनें व निरपेक्ष मनाने वास करणाऱ्या साधुवृंदाचा योगक्षेम भक्तिमान् व श्रद्धावन्त जनांनी आवर्जून चालवावा. अशा संतमंडळीपैकीं कचेश्वर होत. त्यांचा जन्म चाकणास ऋग्वेदी देशस्थ घराण्यांत वैदिक ब्राह्मणाच्या घरीं झाला होता. ते अयाचित वृत्तीनें पुणें प्रांतीं चाकणच्या रानांत रहात असत. ते सत्वशील व तपस्वी होते. साधूंची कृपा संपादण्याचा दंडक शिवाजीमहाराजांनीच घालून दिला होता. त्यास अनुसरून शाहूमहाराजांनी मोगलांच्या अटकेंतून सुटून स्वदेशी येत असतां वाटेंत कचेश्वरांचे दर्शन घेतले. कचेश्वरानीहि त्यांचा उलटपक्षी सत्कार केला. पुढें शाहूमहाराज साताऱ्यास सुखरूप येऊन राहिल्यावर त्यांनीं कचेश्वरास बोलावून आणून त्यांचा उपदेश घेतला. तेव्हां लोकहि सहजच त्यास राजगुरु म्हणूं लागले. राजाने त्यांस ऐश्वर्य देऊं केलें तें त्यानी स्वीकारले नाहीं. साताऱ्यास असतां राजाकडून रोज त्यास शिधा येत असे. तो अयाचित वृत्तीस धरून असल्यामुळें त्याचा अनादर कचेश्वर करीत नसत. ते रोजच्या निर्वाहास जरूर तेवढा भाग ठेवून बाकीचा परत करीत. कचेश्वर इतके निरिच्छ होते तरी कुटुंबवत्सल असल्याचे लक्षांत घेऊन शाहूने त्यांचा शिष्य रामचंद्र खटाटोपे याच्या हातावर सहा गांवांचे दानोदक सोडले. ते गांव रामचंद्रानें कचेश्वराच्या पुत्राच्या नांवाने करून दिले. सदर गांव येणेंप्रमाणें–सातारा जिल्ह्यांतील सासपडे व अतीत आणि पुणें जिल्ह्यांतील वाकी बुद्रुक, चांडोली, भावडी व पांगरी. या गांवांचे उत्पन्न १५।२० हजार रुपयांचे आहे. कचेश्वरांचे देहावसान उंब्रज येथें झाले व दहन माहुलीस करण्यांत आले. त्यांच्या अस्थी खटाटोपे यानें आपल्या अंगणांत पुरून त्यांवर समाधि बांधली आहे. येथें फाल्गुन शुद्ध द्वितियेस राजगुरू घराण्यांतील पुरुष त्यांची पुण्यतिथि साजरी करतात. कचेश्वरानी अनेक अभंग आरत्या व आख्याने रचली आहेत. (इ. सं.) कचेश्वरांच्या या वृत्तीचा तत्कालीन समाजावर नैतिक सुपरिणाम झाला असेल.

रामाजी नारायण कोल्हटकर हे कोकणांतील नेवरे गांवचे रहिवासी. रामाजीपंत मोठे ईश्वरभक्त व सत्पुरुष होते. त्यांनीं शाहूमहाराजास विनंति केली कीं, 'आपण स्वामींच्या राज्यांत राहोन स्नानसंध्या व श्रीचे भजन करून व स्वामीस

व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून आहो.–' अशा प्रकारच्या सत्पुरुषांचा आशीर्वाद आपणास लाभून राज्यास बळकटी यावी ही इच्छा महाराजास असल्यामुळें त्यांनीं १७०८ त कोंकणात नेवरे गावाजवळ कांहीं जमीन त्यास इनाम करून दिली. तत्कालीन साधुपुरुष सतत एका गांवी रहात नसत, ठिकठिकाणी संचार करून आपल्या संगतीनें लोकोद्धार साधण्यास झटत. रामाजीपंत कधीं रत्नागिरी जिल्ह्यांत कुंभारली घाटाखाली नवर गांवा तर कधी वाईजवळ कृष्णातीरी पांडववाडी येथें येऊन रहात. वाईजवळच्या कृष्णातीरानें तत्कालीन बऱ्याच मोठमोठ्या व्यक्तिवर मोहनी टाकली होती. नानाफडणविसांच्या मेणवलीपासून पांडववाडी अर्धकोस अंतरावर आहे. तिच्या दक्षिणेस कृष्णा नदी वहात आहे व उत्तरेस पांडवगड हा किल्ला उभा असून त्याच्या उतरणीवर ही अगदीं लहान वाडी वसली आहे. त्या वाडींतील घरांत बसून किंवा अंगणांत उभे राहून महाबळेश्वराच्या पर्वतापासून चंदनवंदन किल्ल्यापर्यंत कृष्णेने आपल्या उजव्या डाव्या अंगावर वागविलेले सौंदर्य व श्रीमंती पहातां येते. रामाजीपंताना आपले चित्त एकाग्रतेनें ईश्वरचरणी लावण्यास पांडववाडीमधलि एकांत आवडला. रामाजीपंतांची पांडववाडी कृष्णातटाकीं व त्यांची कोंकणात घरी जाण्याची वाट कोइनकाठाने. कोंकणांत जात येत असतां त्यांनीं बहिरवगडाखालीं कोयनेच्या कांठावर मुक्काम करावा. हा बहिरवगड पाटण तालुक्यांत घाटमाथ्यावर वायव्य दिशेस वीस मैल आहे. तेथें बापूजी, परसोजी व साबाजी असे तिन भोसलेबंधु रहात असत. ते मोठ्या भक्तीनें रामाजीपंतास आपल्या घरी आणून त्यांचे आदरातिथ्य करीत असत. त्यामुळें त्यांचा परस्पराशीं घरोबा वाढून लोभ जडला.

एके वेळीं बहिरवगडावर जंजिऱ्याच्या हबशाची स्वारी आली. त्यानें त्रिवर्ग भोसल्यांची घरें लुटून त्यांस कैद केले. ही गोष्ट रामाजी नाईक यांस समजली. त्या काळीं साधूना हिंदुप्रमाणें मुसलमानहि राजकीय व सामाजिक उपाधींच्या बाहेरचे मानीत. यामुळें न्याय, भूतदया, परोपकार इत्यादि सर्वश्रेष्ठ नीतितत्त्वांप्रमाणें सर्वांना समदृष्टीनें वागावयास लावण्याचा अधिकार गाजविण्यास राजसत्तेहूनहि अधिक समर्थ कोणी असले तर ते साधु व अवलिये हेच होत. दोन दरबारांत मध्यस्थी करणाऱ्या वकिलाच्या अंगाला कोणीहि धक्का लावावयाचा नाहीं, त्यापेक्षांहि जास्ती निर्भयता सत्पुरुषांना असे. म्हणून रामाजीपंतानी हब-

शाकडे जाऊन भोसल्यांना सोडविण्याकरितां रदबदली चालविली. हबशानें त्या त्रिवर्गांपासून तीन हजार रुपये दंड मागितला. तेव्हां रामाजीनें कोकणांतील आपली जिनगानी विकून हबशाला तीन हजार रुपये भरले व भोसलेबंधूंना सोडवून आणिले.

भोसल्यांचे बहिरवगडी आतां कांहीं उरले नव्हतेच. म्हणून ते रामाजीपंता-बरोबर पांडववाडीस येऊन त्यांच्या आश्रयाला राहिले. तेथें बापूजीचा पुत्र लिंबाजी यास पुत्र होईल असा आशीर्वाद रामाजीनें दिला व लिंबाजीस तसा पुत्रहि झाला. तोच प्रसिद्ध रघोजी भोसला. भोसल्यासारखे शूर पुरुष पांडववाडसि स्वस्थ माशा मारीत बसलेले रामाजीस पहावेना. त्यांचा स्वराज्यवृद्धीस उपयोग व्हावा व त्यांच्या हातून हबशी आदिकरून परधर्मीय दुष्टांचें दंडन व्हावे या हेतूनें रामाजीने भोसले बंधूंचा शाहूच्या दरबारांत प्रवेश करविला. हे उपकार स्मरून भोसले योग्यतेला चढले, तेव्हां त्यानीं रामाजपंतांच्या कुटुंबाचे कल्याण केले. रघोजीने नागपुराकडे राज्यविस्तार केल्यावर रामाजीपंतांचें वडील चिरं-जीव कोन्हेरराम यांस आपले दिवाण व धाकटे भास्करराम यांस सेनापति नेमले, भास्कररामानी बंगालचा सुभेदार आलिवर्दीखान यांजवर अनेक स्वाऱ्या करून बराच मुलूख जिंकला. तेव्हां त्यानें हें संकट निवारण्यासाठीं भास्कररामाचा मुर्शिदाबादेजवळ विश्वासघातानें वध केला (इ. सं.).

वरील दोन सत्पुरुष पुणें, सातारा व रत्नागिरी या तीन जिल्ह्यांतील होत. आतां तिसरे सत्पुरुष नारायण दीक्षित पाटणकर हे अहमदनगर जिल्ह्यांचे रहिवासी. त्यानी गोदावरी व प्रवरा या दोन नद्यांचे पवित्र तीर पाहून त्यांच्या संगमा जवळ कायगांव–टोके या क्षेत्री वास केला होता. तेथील सध्याचे जहागिरदार कायगांवकर दीक्षित त्यांचे नारायण दीक्षित मूळ पुरुष. ते बाळाजी विश्वनाथ व बाजीराव यांच्या कारकिर्दीत होते. त्यानी हिंदुस्थानातील सर्व पुण्य क्षेत्रे पाहिली असल्यामुळें त्याना देशस्थितीचे आकलन नीट झाले होते. ते स्वतः विद्वान् व अग्निहोत्री असून त्यानी काशी, कायगांव व मोगलाईतील सातारे येथे अन्नछत्रे व सदावर्तें ठेवली होती. बाजीराव व चिमणाजी अप्पा यांज-बरोबर पत्रव्यवहार करून त्यांस राजकारणांत ते आणीबाणीच्या प्रसंगीं साव. धगिरीचा इषारा देत. एके काळी बाजीरावसाहेब सवाई जयसिंगाच्या सल्ल्याने दिल्लीचे राजकारणांत गुंतले होते. मराठे व रजपूत हे उभयता हिंदू, त्यांतून

सवाई जयसिंग स्वतःचा स्नेही. त्यावर विश्वासून बाजीरावसाहेब क्वचित् प्रसंगी आपले सैन्य जवळ नसले तरी फिकीर करीत नसत. हें वर्तमान नारायण दीक्षितास कळल्यावर त्यापासून दगा होईल या भीतीनें त्यानी बाजीरावास उपदेशपर पत्र पाठवून कळविलें कीं ' स्वसैन्य टाकून एक घटिका कोठे न रहावे. रहाल तर तुम्हास माझी शपथ आहे. ' (इ. सं.)

स्वधर्मीय वीरपुरुषांच्या जीविताविषयी ही केवढी काळजी ! शाहूमहाराजांच्या कारकिर्दीतील सर्वांत प्रसिद्ध साधू ब्रह्मेंद्रस्वामी हे होत. त्यांचे जन्मस्थान वऱ्हाडांत गणपतीचे राजूरी नजीक दुधेवाडी. मूळ नांव विष्णु. विष्णूने उपनयनसंस्कार झाल्यावर आपल्या बापाजवळ तीन चार वर्षे वेदाभ्यास केला. विष्णू बारा वर्षांचा असता त्याचे आईबाप निवर्तले . बालवयांतच ईश्वराराधनेकडे लक्ष लागून विष्णूनें राजूरीच्या गणपतीपाशी अनुष्ठाने केली. पुढें राजूरीहून निघून सात आठ महिन्यानी तो काशीस गेला. काशीमध्ये ज्ञानेंद्र सरस्वती नामक एका विद्वान् यतीपाशी राहून विष्णूने त्यांचा अनुग्रह घेतला. ज्ञानेंद्र स्वामीनी त्यास चतुर्थाश्रम देऊन ब्रह्मेंद्रस्वामी असें नांव ठेवले. गुरूपासून ज्ञानप्राप्ति करून घेतल्यावर ब्रह्मेंद्रस्वामी तीर्थयात्रा करीत बद्री नारायणापर्यंत गेले. तेथून काशीस परत येऊन दणिण दिशेकडील तीर्थयात्रा करण्यास निघाले. या खेपेस त्यानी औंढ्या नागनाथाचे दर्शन घेऊन रामेश्वराची यात्रा पूर्ण केली. रामेश्वराहून ते कर्नाटकांत व कर्नाटकांतून महाराष्ट्रांत उतरले. महाराष्ट्रांत आल्यावर त्यानी प्रथम कोकणांत चिपळुणाजवळ पेढे नामक लहानशा खेड्यांत परशुरामापाशी एकान्तांत रहाण्याचे ठरविले. ब्रह्मेंद्रस्वामी मोठे योगी होते. ते तीन तीन वार समाधि लावून बसत. या त्यांच्या योगाभ्यासाची छाप जंजिऱ्याच्या हबशावरहि बसून तो त्यास मानू लागला. स्वामींनी हबशाच्या सहाय्यानें परशुरामाच्या देवालयाचे बांधकामहि सुरू केले. परंतु पुढें हत्तीच्या प्रकरणावरून सन १७२६ च्या सुमारास स्वामींचा शिद्दी सात याजबरोबर बेबनाव झाल्यामुळें त्यांस देशावर सातारा प्रांतांत येऊन रहाणेच सुरक्षितपणाचे वाटले. खेरीज ब्रह्मेंद्रस्वामींसारख्या कारस्थानी व्यक्तीच्या बुद्धिमत्तेस व कर्तृत्वास पुरेसे क्षेत्र त्याच बाजूस मिळण्यासारखे होते.

स्वामीना देशावर आल्यानंतर मुख्यतः दोन कामे साधावयाची होती. त्यास सिदी सात यानें परशुरामाचे देवालय पाडून टाकून त्यांतील मूर्ति छिन्नविछिन्न

करून फेकून दिल्याबद्दल त्याचा सूड घ्यावयाचा होता व शाहूमहाराज यांजभोवती जमून बाजीराव पेशवे, चिमाजी आप्पा, मल्हारराव होळकर, पिलाजीराव जाधव, रघोजी भोसले, फत्तेसिंग भोसले इत्यादि वीरानी व मुत्सद्द्यांनी स्वराज्यवृद्धीचा महदुद्योग नव्या जोमानें आरंभिला होता त्यास आपल्या सल्लामसलतीचा व प्रोत्साहनाचा हातभार लावावयाचा होता. स्वामीनी साऱ्या हिंदुस्थान देशाचे अवलोकन केले असल्यानें मराठी सत्तेच्या अभिवृद्धीला मुसलमान व युरोपियन लोक हेच खरे शत्रू असल्याविषयीं त्यांची खात्री झाली होती. त्यांतल्या त्यांत अलीकडच्या अनुभवानें जंजिऱ्याचा शिद्दी व गोव्याचे पोर्तुगीज यांची राज्ये हरघडी नडणारी असल्याचे पाहून त्यांविरुद्ध मराठ्यांचे बल एकवटण्याकडे त्यांनी आपले बुद्धिवैभव खर्च केले.

रामदासस्वामीप्रमाणें ब्रह्मेंद्रस्वामीचा विशिष्ट पंथ व पंथांतर्गत शिष्यसंप्रदाय नव्हता. राजकारणी पुरुष व त्यांच्या स्त्रिया यांसच स्वामी आपले शिष्या समजत व त्यांच्या कल्याणाकरितां अहर्निश झटत. शाहूमहाराज व त्यांच्या राण्या, पेशवे व त्यांच्या स्त्रिया आणि इतर सरदार व त्यांच्याहि स्त्रिया यांना आपल्या समजुतीप्रमाणें योग्य तो सल्ला देणे, त्यांजकरितां जप करणें व त्यांस नडीअडचणीच्या वेळीं द्रव्य पुरविणे या त्रिविध उपायानी स्वामी सर्वांच्या उपयोगी पडले. चतुर्थाश्रम, उग्र तपोबल, निःस्पृहपणा व द्रव्यसहाय्य या साधनानीं त्यांनीं मोठमोठ्या लोकांना अगदीं मोहून सोडले.

स्वामीनी भिक्षा मागून व सरदारापासून वार्षिक दक्षिणा मिळवून लाखो रुपये संपादन केले. त्यापैकीं कांहीं रक्कम शाहूमहाराज, पेशवे व सरदार याना कर्जाऊ देऊन त्याना स्वामीनी आपल्या अंकित आणून ठेवले आणि आपल्या धावडशीच्या आश्रमांत प्रत्यही गोरगरिबांना अन्नदान करून त्यांचाहि दुवा मिळविला. याशिवाय त्यांनी देवालये, तलाव, विहिरी बांधून महाराष्ट्रभर आपली कीर्ति केली. स्वामी राजासारखें थाटानें रहात. त्यांचा मुख्य निवास धावडशीस. धावडशीस त्यांच्याजवळ कारकून, शिपाई, प्यादे, सेवेकरणी, कोठी, मुदपाकखाना असा सरंजाम असून बसण्याकरितां घोडे, पालख्या इत्यादि वाहनेहि होती. कोकणांतून बंदरी माल आणण्यासाठीं स्वामीनी दोनशे बैल बाळगले होते. त्यांनी आपल्या संग्रहाला केशर, चंदन, अष्टगंध, साखर, मात्रा, औषधे, भरजरी शालजोड्या, मंदील, दुपट्टे, शेले व ताफते अशा दुर्मिळ व बहुमोल

चिजा ठेवाव्या. कोणत्याही जिनसाची वाण भासली कीं त्यानी तो जिन्नस सरदारापासून मागवावा. एकदा त्यांच्या जवळच्या गाई आटल्यामुळें त्याना प्यावयास ताक मिळेनासे झाले. म्हणून त्यानी फलटणचे मुघोजी नाईक निंबाळकर यांजपाशीं दुभत्या गाई मागितल्या व त्या त्यांस मिळाल्या.

स्वामीचा धावडशी येथील देवस्थानाचा खर्च चालला पाहिजे याकरितां धावडशी, वीरमाडे, अनेवाडी हे गांव शाहूने व पिंपरीतर्फ कन्हेपठार हा गांव बाजीरावानें त्यांस इनाम करून दिला. कोथळे हा गांव केवळ पालखीकरितां त्यांस पेशव्यांकडून मिळाला. ते आपल्या शिष्यावर जीव की प्राण करीत व शिष्यहि त्यांजपाशीं मन मोकळे करून बोलत. कित्येक वेळा स्वामींनीं त्यास टाकूनहि लिहावें व कित्येक वेळा त्यांचे आपण जागली म्हणजे क्षुद्र चाकर आहो असाहि झोक आणावा. महाराष्ट्रांत पाऊस पडावा याकरितां स्वामींनी जेजुरीस सराटयाच्या आसनावर सव्वा महिना बसून तप केले. तसेंच जगजीवनराव पवाराला दारूचे व्यसन जडले असून तो आपल्या आईला दुरुत्तरे करीत असे हें पाहून स्वामीनी त्याची अत्यंत कडक शब्दानी कानउघाडणी केली. शाहू महाराजाच्या राण्या महाराजाशीं भांडून त्रास देत. स्वामीस राण्यांचे या तऱ्हेचे वर्तन सहन न झाल्यामुळें त्यानी त्यांस बजावले, ' भांडाल तर हा देश टाकून चालता होईन व तुम्हावर गोमूत्र फेकून तुमचा नाश करीन. ' कुटुंबांतील माणसांत सलोखा घडवून आणण्याचे स्वामींचे हे उपाय होते.

बाजीराव व चिमणाजी आप्पा यांचे शौर्य, धैर्य, मुत्सद्दीपणा व स्वराज्यनिष्ठा इत्यादि असामान्य गुण पाहून स्वामी त्यांस राम-लक्ष्मणाची जोडी या शब्दानी गौरवपूर्वक संबोधीत. स्वामीकडून एकदा बाजीरावाच्या मागे कर्जकेडीचा सावकारी तगादा लागला असतां बाजीरावानें त्यास दिलेला जबाब त्याच्या तेजस्वी स्वभावाचा द्योतक आहे. बाजीराव बजावतो, ' तुम्ही आपल्या पैक्यासाठीं लिहिले तरी स्वामीने कांहीं चिंता न करावी. आमचा जीव आहे तो पैकीयाची काय चिंता आहे ? कोणेसमयी पाहिजे तें आम्हासहि कळते. पैका पावता करूच. आतां प्रस्तुत तो आमचा जीवच मात्र आहे. येथें येऊन घेणे अगर तेथें बोलावशील तरी सर्व संग टाकून येतो. ' या पत्रांतील मजकूर बाजीरावाने अगदीं एकेरीवर येऊन लिहिला आहे. अर्थात् दोघांचे परस्पर नाते तसे ममतेचे होते, म्हणूनच बाजीराव असली भाषा वापरण्यास प्रवृत्त झाला

हाच बाजीराव पुढें एकाएकी मरण पावला हे ऐकून स्वामींनी चिमणाजी आप्पास पाठविलेल्या पत्रांत काय उद्गार काढले ते पहा. ‘ बाजीसारखा शिष्य गेला. याउपर या मुलुखातून जावे किंवा प्राण सोडावा. काय करावे ते लिहिणें. ’

ब्रह्मेंद्रस्वामींच्या काळांत असा एकहि मोठा सरदार किंवा मातबर माणूस नव्हता, कीं ज्याच्याशी स्वामींनी आपला ममतेचा दुवा जोडला नव्हता. ते कर्त्या पुरुषाना उत्साह आणून त्यांजकडून महत्कार्ये करवीत. मराठ्यांची जंजिऱ्यावरील मोहीम व वसईवरील मोहीम या कामी स्वामींनी उत्तेजनपर पत्रे लिहून मराठ्याना हुरूप आणिला व केव्हां केव्हां वर्मी लिहून चिडविलेहि. बाजीराव व चिमाजी आप्पा या जोडीने पराक्रम करून कैक शत्रूना जिंकले व आपले नांव देशभर गाजविले. परंतु त्यांना चिपळूणचा भार्गवराम व आसपासचा प्रदेश शामलापासून सोडवून घेता आला नाही, याबद्दल स्वामींनी चिमाजी आप्पाची पुढील शब्दानी निर्भत्सना केली. ‘ आपले जन्मभूमीचा स्वामी पूजेविरहित, स्वकीयजन कुटुंबसहित क्लेशयुक्त. ऐसे असून त्याचे इष्ट आणि श्रीस्थानी उत्साह पूर्ववत् पूजा आपणासहि दर्शन घ्यावयास योग्य जेव्हां नव्हे, तेव्हां सर्व पुरुषार्थ तुमचे अयोग्य आहेत. ’

ब्रह्मेंद्रस्वामी संसारातीत असल्यामुळें त्यांना परधर्मीय लोकहि मानतात असा मराठ्यांचा समज होता व तो काहीं अंशी खराहि होता. जंजिऱ्याचे शिद्दिचि घेतले तरी त्यानीं हत्तीसंबंधानें भांडण उपस्थित होईपर्यंत स्वामींशी आदबीचेच वर्तन ठेवले होते. जंजिऱ्याची मोहीम संपून गेल्यानंतर शिद्दी स्वामीस पुनः मानू लागले व त्यानी सन १७४३ त पेढे व आवडस या गावांच्या सनदाहि स्वामींच्या नावाने करून दिल्या.

शिद्द्याबरोबर मराठ्यांची लढाई चालू होती तेव्हां शिद्द्याला मदत इंग्रजापासून मिळणार अशी बातमी स्वामींना समजली. म्हणून त्यानी शाहू महाराजांची राणी सकवारबाई हिला विचारलें, ‘ इंग्रेज बंद करावयास मी मुंबईस जावे की काय ’ आज्ञा झाली तर जाईन. ’ त्यावर बाई कळविते ‘ आपण जावे असा अर्थ नाही. परंतु कार्य होय ऐसा विचार करावा. आणि जेणेकरून इंग्रेज होऊन शामलास मदत न करी, आपणास सलूख राखे, ते करावे. ’

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून स्वामींची वीरवृत्ती सिद्ध झालीच आहे.

त्याशिवाय त्यांच्या या वृत्तीचे आणखी एक प्रमाण असें कीं, ते आपल्या संग्रही तोफा, बंदुका, पिस्तुले, निमचे, तलवारी व भाले ठेवीत आणि ते सरदाराना बक्षिसादाखल देत. उदाजी पवारास त्यानी अशाचि एक बंदूक दिली होती. ते वर्तमान ऐकून थोरातांच्या मुलानीं स्वामीपाशी खेळावयास बंदूक मागितली. यशवंतराव पवारांनेंहि आपल्या गढीत ठेवण्यासाठी एक तोफ मागितली होती. शाहूमहाराजाच्या कारकिर्दीच्या प्रारंभी ब्रह्मेंद्रस्वामींचा महाराष्ट्राच्या राजकारणांत प्रवेश झाला, तो आमरण टिकला. स्वामी शाहूपूर्वी कांहीं वर्षें समाविस्थ झाले. त्यावेळीं नानासाहेब हा पेशवा होता. बाळाजी विश्वनाथापासून तो थेट नानासाहेब व सदाशिवरावभाऊ यांजपर्यंत स्वामींचा सर्व पेशव्याबरोबर ऋणानुबंध चालू राहिला होता. धर्मस्थापना व धर्मरक्षण हें साधूंचे प्रमुख कार्य. ते कार्य स्वतः धर्माचरण करून व इतराना करावयास लावून स्वामींनी केलेंच. पण हिंदू धर्मावर परधर्मीय राज्यकर्त्यांचे घाले येऊन त्याची सर्वत्र पिच्छेहाट झाली ती थांबून धर्मस्थापना व धर्मरक्षण होण्यास परधर्मीय राज्यकर्त्यांचे उच्चाटण करणेंच अत्यंत जरूर आहे हें स्वामींना समजले व अनुभवास आले असल्यामुळें स्वामींनी मराठ्यांच्या राजकारणांत मन घातले आणि मराठ्यांनीं आर्धपासून चालविलेल्या या उद्योगास जोर आणिला. हीच ब्रह्मेंद्रस्वामींची महत्त्वाची कामगिरी होय. ब्रम्हेंद्रानी संन्यास घेतला होता व त्यांचे वयहि शंभराच्या सुमारांत होते. नाहीतर कदाचित् ते स्वतः शिपाई होऊन इतराप्रमाणें मोहिमावर जाते.

ज्योतिपंत महाभागवत हे अथर्ववेदी देशस्थ ब्राह्मण. सातारा जिल्ह्यांतील खटाव तालुक्यांत बुध-मलवडी कर्यातीचे देशपांडे. हे विद्यासंपन्न असून सरकारी नोकरींत शिरले व वाढत वाढत झांशी संस्थानाच्या दिवाणगिरीपर्यंत चढले. ती नोकरी सवाई माधवरावांच्या कारकीर्दीच्या अखेर टिकली. एकदां एका अपराधी ब्राह्मणाला न्याय देण्याच्या कामीं त्यांची मसलत मालकाने ऐकली नाहीं. सबब आपल्या जागेचा राजिनामा देऊन ते स्वदेशी परत आले. त्यांनीं लाखो रुपयांची संपत्ति मिळविली होती, ती तीर्थयात्रा करण्यांत व ठिकठिकाणीं पांडुरंगाची देवालयें बांधण्यांत खर्च केली. ते काशीस गेले असतां गंगातीरी घाटावर वेद व्यास ब्राह्मणरूपानें येऊन त्यांनीं श्रीमद्भागवताचा ग्रंथ त्यांस दिला अशी आख्यायिका आहे. तो ग्रंथ साताऱ्याजवळ कृष्णतीरी चिंचणेर येथील त्यांच्या मठांत हल्लीं आहे.

भागवतांतील पुष्कळ प्रकरणावर त्यांचे अभंग आहेत. त्याशिवाय त्याच ग्रंथावर त्यांची गद्यरूप टीका आहे. प्रवृत्ति-निवृत्ति-ऐक्यता-रत्नावली या नांवाचा त्यांचा एक गद्यात्मक ग्रंथहि आहे. (इ. सं.)

ज्योतिपंतांनीं पांडुरंगाची देवालयें ठिकठिकाणीं बांधण्याच्या क्रमास अनुसरून येवले या गांवींहि एक देऊळ बांधून त्यांत पांडुरंगाची स्थापना केली. पण पुणतांब्याचा एक माणूस बापाजी गोसावी याने व्यंकटेशाचे संस्थान येवल्यास स्थापले होते, त्याला नव्या देवस्थानाचा बडेजाव सहन न होऊन त्यानें देवळांतल्या मूर्तीच हालविल्या. ज्योतिपंत त्यावेळीं नाशकास होते. त्यांच्या मनाला या योगे परम उद्वेग झाला. त्यांनीं उपोषणास प्रारंभ करून पुण्यास न्यायाधीश वे. रामशास्त्री प्रभुणे यांना दाद घेण्यास लिहिले. सदर पत्र वाचून ज्योतिपंताची ईश्वरनिष्ठा, सात्त्विकता व करारी स्वभाव लक्षांत येतो. ते लिहितात—

‘ वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री शास्त्रीबावा स्वामीचे शेवेसी—

विद्यार्थी ज्योति गोपाळ महाभागवत. साष्टांग नमस्कार विनंति....श्रीपांडुरंगाच्या स्थापना ते प्रांतीहून करीत इकडे हे प्रांती आलो. मार्गी पेठ येवले परगणे पाटोदे येथें आलो. तेथीलहि गांवकरी अनुकूल जाले. देवालय बांधून दिल्हे. त्यावरून श्रीची स्थापना तेथें केली. येक वर्ष जाले आम्ही जनस्थानी येऊन राहिलों. आमच्या मागे राजश्री बापाजी गोसावी पुन्यस्तंबकर पेठ मजकुरी रहातात. त्यांचे तेथें संस्थान व्यंकटेशाचे आहे. त्यास त्यांनीं आमचे संवस्थानाकडे समारंभ विशेष पाहून तेथें आमचा ब्राह्मण होता त्यासी नाना प्रकारे कज्जा करून श्रीपांडुरंगाच्या मूर्ती स्थापिल्या होत्या त्यांचा उच्छेद करून घेऊन गेला. देवाल्य पाडीत होता ते गांवकरी यांनीं राहविले.. कोणाचे ऐकेनात. तदनंतर आम्ही येथून शिष्य पाठविले त्यांच्या स्वाधीन मूर्ती केल्या. पुनः स्थापनेचा आरंभ करताच मारामारी करून मूर्ती नेल्या. राजश्री शिवाजी विठ्ठल विंचूरकर यांजकडील कमविसदारांनीं व राजश्री रामचंद्रपंत आंबीकर यांजकडील कमाविसदारांनीं बहुता प्रकारें सांगितलें परंतु ऐकले नाहीं. तेथें यज्जुशाखी मंडळी आहेत. सर्वत्र मिळोन मारामारी करतात. आम्ही स्थापना करून त्याचा उत्सर्ग केला. तो देव सर्वांचा आहे. आम्हांस कांहीं अभिमान नाहीं. परंतु स्थापनेचा उदे (यो) ग कोणी करीत नाहीं. याकरितां आपणास लिहिले असे. तर हा मजकूर मनास

आणून स्थापना करावी. मशारनिलेस तेथें नेऊन चौकशी करावयाची असली तर करावी. नाहींतर कमाविसदारास ताकीदपत्रे द्यावी. हरयेक प्रकारें देव स्वस्थानी बसतील ऐसे करावे. स्वराज्यांत ऐसे कोठें जाले नाहीं. आम्ही येथें पंचवीस ब्राह्मण उपोषण करून श्रीरामचंद्रजीसंनिध पंचवटीमध्यें स्नान-संध्या करून आहो. स्थापना जाल्यावर पारणे होईल. आपण धर्मकृत्याचे ठायीं सादर आहेत. ल्याहावे ऐसे नाहीं. सूचनार्थ लिहिले असे. आपल्यास कर्तव्य ते करावे. श्रीचा प्रसाद, नारळ व बुका पाठविला आहे तो घ्यावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे ' (पे. द. ४३)

त्याकाळीं ग्रामस्थांची वृत्ति हल्लींप्रमाणेंच कूपमंडूकवत् व स्वार्थपरायण असे. ऋग्वेदी यजुर्वेदी यासारखे पोटजातींत श्रेष्ठ-कनिष्ठपणाचे क्षुद्र तंटे असत. त्या सर्वांचे प्रदर्शन वरील पत्रांत आहे. निःस्वार्थ धर्मपरायण व ईश्वरनिष्ठ असे ज्योतिपंतासारखे पुरुष विरळा. त्यांच्या सद्वर्तनाचा सुपरिणाम कांहीं ठोंगळ लोक सोडल्यास बहुजनसमाजावर व्हावयाचाच.

चिंचणेरपासूनच कांहीं अंतरावर रहिमतपूर हा गांव आहे. ह्या गांवचे तुकाविप्र हे जोशी व कुळकर्णी होत. ते जातीचे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. वासोटा किल्ल्यावरील विप्रनाथस्वामी नामक सिद्ध पुरुष, तुकाविप्राचे गुरु. यांचा गुरुबंधु तम्माणा हा कर्नाटकी वैष्णव ब्राह्मण होता. त्याने गुरूच्या आज्ञेवरून जरंड्याच्या डोंगरावर मारुतीची आराधना केली. तेव्हांपासून जरंड्याच्या मारुतीचे स्थान प्रसिद्ध झाले. गुरुकृपा झाल्यावर त्यांच्या आज्ञेनें तुकाविप्र रहिमतपुरास आले. त्यांची बायकामुलें वगैरे परिवार होता. तथापि त्यांचे प्रपंचांत लक्ष नव्हते. घरची थोडी शेतीवाडी हाच कुटुंबाचा मुख्य आधार. तुकाविप्र अयाचितवृत्तीनें रहात, नित्य सुप्रभातीं उठून कृष्णास्नानास जात, कृष्णातीरीं माध्यान्ह संध्या उरकून मग घरीं येत व भोजन झाल्यावर भागवत सांगत. पुढें जाण्यायेण्याची रोजची दगदग व वेळ वांचविण्याकरितां ते रहिमतपूर सोडून कृष्णातीरीच राहिले. तेथें त्यांस शिष्यानी मठ बांधून दिला. कौटुंबिक मंडळी व शिष्यवृंद यामुळें त्यांच्या भोवतालचा परिवार बराच वाढून ती हळुहळू ब्रह्मपुरी या नांवाची वसतीच झाली. येथें लोकांचा उपसर्ग फार होतो असे पाहून ते तेथून जवळच तारगावापाशीं रानांत बोरीचे बन होते त्यांत जाऊन राहिले. बोरवनास ते एकटेच स्नानसंध्या करून असत. पुढें या स्थळास बोरबन हेच नांव पडले. त्यांनीं समग्र भागवतावर अभंगरूप टीका केली आहे, असे म्हणतात.

तुकाविप्राची शिष्यमंडळी बरीच होती. होळकरांचा प्रसिद्ध सरदार फत्तेसिंग माने हा त्यांचा शिष्य. होळकरी दंग्यांत या फत्तेसिंगानें सातारा प्रांती कहर करून सोडला. तेव्हां लोकांनीं तुका विप्राकडे जाऊन मान्याचा बंदोबस्त व्हावा अशी विनंति केली. तुका विप्रानी मान्याला बोलावून आणून सातारा प्रांत सोडून दुसरीकडे जाण्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें तो कोल्हापूर प्रांतीं निघून गेला. दुसरा एक भिवजी वीर नामे पुंड मोगलाईत होता. तो यांचा शिष्य झाल्यावर तुका विप्रांच्या उपदेशानें उपरति होऊन पुढें सत्पुरुष निपजला असे म्हणतात. (इ. सं.).

आतांपर्यंत सहा सत्पुरुषांची चरित्रें सांगितलीं. स्वतः ईश्वराराधना करणें, धर्मनीतीने वागणे आणि सांसारिक जनाना त्याच मार्गास लावणे हें सत्पुरुषांचे कर्तव्य. त्या कर्तव्यास व्यत्यय आणणाऱ्या सांसारिक उपाधीपासून सत्पुरुष सहजच दूर रहातात. या रीतीनें त्यांचे वर्तन निवृत्तिपर दिसले तरी त्यांतील चतुर व सावध पुरुषाना लोकव्यवहाराची उपयुक्तता समजत नसते असें नाहीं. स्वधर्मास आवश्यक जें स्वराज्य तें मिळविण्याचे काम क्षत्रियांचे. अशा प्रकारचे स्वराज्यसंस्थापक क्षत्रिय उपदेशाने उत्पन्न होत नसतात. स्वराज्यस्थापनेची तळमळ व पात्रता एखाद्याच क्षत्रियाला. तो क्षत्रिय योग्य संधि आल्यावर स्वस्थ बसावयाचाच नाहीं. शिवाजीमहाराजांचे उदाहरण याच प्रकारचे. त्यांनीं स्वराज्य-स्थापनेचा उद्योग अन्तःस्फूर्तीने हाती घेतला व हिमतीने शेवटास नेला. त्यांच्या पूर्वीच्या साधूंना स्वधर्मरक्षणाच्या दृष्टीनें स्वराज्याची महती कळत नव्हती व स्वराज्य नको होते असा अर्थ नाहीं. परंतु त्यांच्या काळीं स्वराज्य नव्हते व स्वराज्य स्थापूं पहाणाराहि कोणी निघाला नव्हता; म्हणून त्यांच्या ग्रंथांतून स्वराज्यानुकूल उपदेश सहसा आढळूं नये यांत नवल काय ? स्वराज्य नसतांना जेवढे धर्मरक्षण करावयाचे तेवढे तुकारामादि साधूंनीं केलें हेच त्यांचे महाराष्ट्रसमाजावर उपकार होत. त्यांनीं आपल्या उपदेशाने समाज दुबळा बनविला हा आरोप मिथ्या आहे. कारण केवळ त्यांजसारख्या संतांच्या शिकवणीने महाराष्ट्रीय लोक दुबळे करून सोडले असले तर शिवाजीला स्वराज्यस्थापनेच्या कामीं त्याच महाराष्ट्रांतून भरपूर शूर शिपाई मिळाले हें घडलें कसे ? हा प्रभाव रामदासस्वामींच्या शिकवणीचा समजावा काय ? रामदासांचा जन्म सन १६०८ मध्यें झाला. वयाच्या बाराव्या वर्षी म्हणजे सन १६२० त

स्वतःचे लग्न निघताच रामदास घर सोडून बाहेर पडले. पुढें बारा वर्षें टाकळीस राहून त्यांनीं पुरश्चरण केलें. त्यानंतरची बारा वर्षें तीर्थाटनांत घालवून सन १६४४ चे सुमारास कृष्णाकांठीं ते रहावयास आले. येथूनच त्यांच्या शिष्यसंप्रदायास व उपदेशास सुरुवात झाली.

शिवाजी १६३० त जन्मला व त्यानें १६४७ त तोरणा किल्ला घेतला. रामदास सातारा प्रांतांत रहात होते व शिवाजी राज्य स्थापण्याचा प्रयत्न तेथून पन्नास कोसावर पुणें प्रांताच्या मावळभागांत करीत होता. त्यानें आपल्या माहितींतील मावळे जमविले व त्यांच्या मदतीनें तोरणा किल्ला काबीज केला. रामदासस्वामींनी चाफळ खोऱ्यांत रहावयास येऊन तीन चार वर्षें झाली नाहींत तोंच त्यांची तेजस्वी हाक मावळांतील आडाणी व दरिद्री शेतकऱ्यांच्या कानी पडून त्यांचा दुबळेपणा झडला आणि ते ताबडतोब धाडसी व शूर बनून शिवाजीच्या निशाणाखाली उभे राहिले हें संभवते तरी कसे ? रामदासांची शिकवण त्यांच्या शिष्याकरवी पसरून अखिल महाराष्ट्रांत ऐकू जाण्यास १६४४ नंतर सहज वीस एक वर्षांचा अवधि पाहिजे व तितका अवधि मिळाला तरी शिपाईगिरी पत्करणारा जो महाराष्ट्रीय शेतकरी वर्ग त्याच्या कानीं ती पडणे कठीण व त्याला ती समजणे त्याहूनहि कठीण. सारांश वारकरी पंथाच्या शिकवणीने महाराष्ट्रीयांना दुबळे करून सोडले हें विधान जसे अतिशयोक्तीचे तसेंच रामदासांच्या शिकवणीने महाराष्ट्र सजीव होऊन शिवाजीच्या मदतीस आला हेहि विधान अतिशयोक्तीचे. एकनाथ, नामदेव, तुकाराम, यांच्या टाळांचा कांस पडत होता व भजनाचा गजर उडत होता, तेव्हांहि हजारो मराठे शिपाई व सरदार बहामनी राजांच्या बाजूनें लढत होतेच कीं नाहीं ? त्यानी आपले भाले व तरवारी नामदेव–तुकारामांच्या चरणावर वाहून निवृत्ति मार्ग कोठे स्वीकारला होता ? कदाचित् त्यापैकीं कांहींजण घरीं नामदेव--तुकारामांचे अभंग टाळ–मृदंगांच्या नादात गात असतील व सैन्यांत हजर रहाण्याचा निरोप येतांच टाळ खाली ठेवून व भाला खांद्यावर टाकून बाहेर पडत असतील. हा दुहेरी व्यापार पेशवाईतल्याप्रमाणें याहि काळांत सुरू रहाण्यास हरकत नव्हती. म्हणून रामदासांच्या शिकवणीने महाराष्ट्रीयांच्या चित्तवृत्तींत तात्काळ फरक पडून ते स्वराज्यसंपादणारे बनले यां म्हणण्यांत कांहीं हशील नाहीं. शिवाजच्या कार्याला रामदासांच्या उपदेशापूर्वीच सुरुवात झाली

होती व रामदास स्वामी जन्मास आले नसते तरीसुद्धां शिवाजींचें कार्य शेवटास गेलेच असते.

देशांत एकाच वेळीं अनेक प्रकृतींचे थोर पुरुष भिन्न भिन्न कार्ये हातीं घेतात व त्याना त्यांच्या कार्याला जरूर तेवढे अनुयायीहि मिळतात. एकाचे कार्य दुसऱ्याचा आड येत नाहीं, झाले तर पोषकच होते. वारकरीपंथ निवृत्तिमार्गी व रामदासीपंथ प्रवृत्तिमार्गी असें मानले तरी एवढ्या मोठ्या महाराष्ट्रांत त्यांचे अनुयायी कांहीं हजारानी मोजण्याइतकेच असावयाचे. त्या बाहेरचे लक्षावधि लोक आपल्या सांसारिक उद्योगांतच निमग्न राहून तो संसार भरभराटीचा होण्याकरितां जी व्यावहारिक साधने लाभतील त्या साधनांचा अवलंब करावयाचे. शिपाईगिरी पत्करून नशीब निघत असेल तर ते शिपाई बनतील व उदीम धंदा करून दोन पैसे मिळणार असतील तर ते उदमी व्यापारी होतील. या दृष्टीनें विचार केल्यास नामदेव-तुकारामादिकांच्या वारकरीपंथाने महाराष्ट्राच्या ऐहिक उन्नतीस व्यत्यय आणिला नाहीं व रामदासांच्या पंथाने शिवाजीच्या स्वराज्यास मोठीशी मदतहि झालेली नाहीं. रामदासांचा उपदेश तेजस्वी, हिशेबी, स्वार्थत्यागी, धैर्यशाली होता. त्याचा महाराष्ट्रावर त्याच्या ऐहिक व पारमार्थिक उन्नतीस इष्ट व पोषक असाच परिणाम झाला असेल हें कोणीहि कृतज्ञतापूर्वक कबूल केलेच पाहिजे. परंतु त्याचा अर्थ असा नव्हे कीं त्यामुळेच महाराष्ट्राला स्वराज्य लाभले, एरव्ही लाभले नसते.

शिवाजीच्या वेळी तुकाराम-रामदासादि संत-साधू समाजाच्या शाश्वत कल्याणाचे जे कार्य करीत होते तेच कार्य चाकणचे कचेश्वर, पांडववाडीचे रामाजीपंत कोल्हटकर, कायगांव-टोक्याचे नारायण दीक्षित पाटणकर, धावडशीचे ब्रह्मेंद्रस्वामी, चिंचणेरचे ज्योतिपंत महाभागवत, बोरवनचे तुकाविप्र इत्यादि सत्पुरुष शाहूमहाराजांच्या व त्यानंतरच्या काळांत कमी अधिक प्रमाणांत करीत होते. त्यांच्या पैकीं कचेश्वर, ज्योतिपंत व तुकाविप्र यानी ग्रंथरचना केली आहे, पण ती स्वतंत्र नाहीं व तितकी महत्त्वाचीहि नाहीं. ते तुकारामाप्रमाणें वारकरीपंथाचे नव्हते व रामदासाप्रमाणें नवीन पंथाचे संस्थापकहि नव्हते. ते बहुतेक सर्व वैराग्यशील होते, पण त्यांचे वैराग्य एकनाथ-तुकारामासारखे चकित करून सोडणारे नव्हते. तथापि त्यांचा उपयोग तत्कालीन समाजास ऐहिक व पारमार्थिक दृष्ट्या झालाच. यांनीं धर्म व ईश्वर यांचे श्रेष्ठत्व राजकारणी पुरुषांच्या वारंवार नजरेला आणून

व त्यांच्या मनावर बिंबवून आसुरी अभिलाषापासून आवरून धरण्याचा व त्यांस न्यायाचा व सत्याचा मार्ग अनुसरावयास लावण्याचा प्रयत्न केला. सरदारांत अनेक जातींचे पुरुष सामिल झाले असून जातिमत्सरामुळें व वैयक्तिक हित-विरोधामुळें त्यांच्यांत कलह माजून राज्यांत बखेडे उद्भवण्याचे जे अनेक प्रसंग आले त्यांतील बरेच प्रसंग साधूंच्या वजनानें टळले असले पाहिजेत. ब्राह्मण लोक लष्करांत व मुलकी खात्यांत नाक्याच्या जागा पटकावतात म्हणून सर-सकट सर्व ब्राह्मणजातीला पाण्यांत पहाण्याची खोड इतर जातींना क्वचित् जडण्याच्या बेतात असली तर तिला आवरण्याची बुद्धि आपलेच गुरू जे ब्रह्मेंद्र-स्वामी, ज्योतिपंत यासारखे सत्पुरुष यांजकडे पाहून व त्यांचा उपदेश ऐकून ब्राह्मणेतरांना सहजच व्हावी. अनेक व्यक्ति मिळून कुटुंब, अनेक कुटुंबे मिळून जात व अनेक जाती मिळून समाज बनतो. त्या सर्वांचा तोल जाऊ न देतां ज्याला त्याला आपआपली पायरी संभाळावयास लावण्याचे कार्य थोड्याफार प्रमाणांत त्या काळीं सत्पुरुषाकडून पार पडणें शक्य झालें. इतकेच नव्हे तर मुसलमान व ख्रिस्ती यांसारख्या परधर्मीय लोकांवरहि वजन टाकून देशांत त्यांनीं शांति स्थापन करण्याचा प्रयत्न कसा केला, हे ब्रह्मेंद्रस्वामींच्या चरित्रा-वरून लक्षांत येते.

मराठ्यांची मध्यवर्ती सत्ता जोरदार होती तेव्हाहि रयतेला जुलमी व आड-दांड सरदाराकडून वारंवार छळ सोसावा लागत होता, तर ती सत्ता दुर्बलावस्थेस पोंचल्यावर रयतेचे हालास सीमा रहात नसेल हें काय सांगावयास पाहिजे? अशा कठिणकाळीं ज्योतिपंतासारख्या साधूकडेच रयत शरण जाई व त्याजकडून आपले संकट निवारून घेई. फत्तेसिंग मान्याची पुंडाई ज्योतिपंतच आपल्या सात्त्विक आज्ञेनें थांबवू शकले. आपला फायदा जनतेला मिळतो, हे सत्पुरुष ओळखून असत, त्याचप्रमाणें आपले धर्मकार्यहि जनतेच्या व विशेषतः सरदा-रांच्या मदतीवर अवलंबून आहे याची जाणीव सत्पुरुषांना असे. कारण स्वराज्य होते; म्हणूनच त्यांचे भजनपूजन व जपतप निर्वेधपणे चालू राहिले व त्यास लागणारे लाखो रुपयांचे धनहि मिळत गेले. या उपकाराचा मोबदला वरील-प्रमाणें साधूनी सरदारांना दिला आणि त्यांना सावध व मर्यादेत ठेवले. साधूंचा हा लगाम सरदारांना नसता तर त्यांची आसुरी संपत्ति बेताल उधळून त्यांच्या नाशास कारण झाली असती. या दृष्टीनें समाजाचा तोल संभाळण्याची गरज धर्माखालोखाल सत्पुरुषांनीं कशी भागविली हें समजते.

प्रकरण अठरावें

समाजाची मनोरचना

पेशवाईंतील ब्राह्मण, मराठे व इतर सर्व जातींचे हिंदू लोक एकाच विचारसरणींत वाढले असल्यामुळें त्यांच्या वागणुकीची रीत एकच होती. त्यांचा देवभोळेपणा अमर्याद होता. त्यांचा परंपरागत गोष्टीवर पूर्ण विश्वास होता. जे समज पिढ्यानुपिढ्या गृहीत धरलेले त्यांच्या सत्यतेविषयीं त्यांच्या मनाला सहसा शंका वाटत नसे व त्यांची ते विचक्षणाहि करीत नसत. ते लोक भित्रे नव्हते. संकटाशी झुंजणे व त्यांतून मार्ग काढणें या नित्याभ्यासामुळें ते धीट, उद्योगी व प्रयत्नवादी बनले होते. तरी पण जीं कृत्यें केवळ प्रयत्नानें साध्य होण्यास कठिण त्यांत यश येण्याकरितां देवतांची भक्ति करणें, अनुष्ठानें बसविणें, दानें देणें, नवस बोलणें, व्रतें पाळणें या उपायांचा ते अवलंब करीत. गोविंद हरि पटवर्धन हा हरभट पटवर्धनांचा पुत्र. त्याने बाळाजी विश्वनाथ पेशवे व बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दींत स्वतः मोहिमांवर जाऊन शिपाईगिरीचीं लहान मोठीं कामें केलीं होतीं. त्याचा मुलगा गोपाळराव पटवर्धन कर्ता निघाल्यावर गोविंद हरि हा आपल्या जहागिरीचा मुख्य व आवडता गांव जो मिरज तेथील किल्ल्यांत राहून जहागिरीचा कारभार पहात होता. पटवर्धनांच्या घराण्याचा पेशवे घराण्याशीं पिढ्यानुपिढ्या अगदी जिव्हाळ्याचा संबंध. पेशव्यांची त्यांजवर भिस्त फार. थोरले माधवराव पेशवे व राघोबादादा पेशवे या उभयतांत पेशवाईच्या अधिकारासंबंधानें लढा पडला होता. माधवराव वयानें लहान असल्यामुळें त्याची बाजू आई गोपिकाबाई हिनें घेतली होती. नानासाहेब पेशवे नुकतेच निवर्तलेले, त्यांचे वडिल चिरंजीव विश्वासराव लढाईंत पडलेले व पाणिपतच्या घनघोर संग्रामांत लाखो मराठ्यांचा चुराडा उडून त्या योगानें महाराष्ट्र दुःखार्णवांत बुडालेला, अशा संकटकाळीं राघोबास भाऊबंदकी सुचलेली पाहून स्वामिभक्त, प्रामाणिक व कर्तव्यनिष्ठ गोविंद हरीस राघोबाचा राग आला.

तो व त्याचा पुत्र गोपाळराव हे माधवराव व गोपिकाबाई यांच्या पक्षास मिळाले. पुढें माधवरावाचा राघोबापुढें टिकाव न लागून तो चुलत्याच्या स्वाधीन झाला. अशा रीतीनें चुलते पुतणे एक झाल्यावर राघोबानें पूर्वींचा दंश मनांत धरून पटवर्धनांची जहागीर जप्त करण्याच्या उद्देशानें मिरजेवर स्वारी केली. गोपाळराव-पटवर्धन आधीच पळून निजामाकडे गेला आणि गोविंद हरि व त्याचे इतर मुलगे यांनीं मिरजेच्या किल्ल्यांत राहून किल्ला झुंजविण्याचें ठरविलें. राघोबाचें सैन्य पन्नास हजार होतें. त्या मानानें गोविंद हरीची फौज फारच थोडी. तथापि किल्ल्याच्या आश्रयानें आपण सहज वर्ष सहा महिने दम काढूं अशी त्याला हिंमत होती. किल्ला व पदरची फौज यांचा त्याला खरा आधार, पण त्यास दैवी व काल्पनिक जितके आधार मिळतील तितके घेणें हा मनुष्यस्वभाव होय.

पिरावर भक्ति

मुसलमानांविषयीं व मुसलमानांच्या धर्माविषयीं हिंदूंचें मत चांगलें होतें असें नाहीं. त्यांस ते तिरस्कारपूर्वक यवन, अविंध अशीं नांवें देत. तरीपण त्यांच्यांतील पीर हे त्यांना शेकडो वर्षांच्या संस्कारामुळें स्वतःच्या हिंदू देवतां-इतकेच पूज्य वाटत व त्यांची त्याच भावनेनें ते भक्ति करीत. मिरजेचा पीर जो मिरासाहेब तो मिरजेच्या आजूबाजूस फार प्रख्यात आहे. त्याचा दर्गाहि पुष्कळ पैसा खर्चून बांधला असून दरसाल त्याचा उरूसहि मोठा होतो. ही पद्धत पटवर्धनांचा अंमल मिरजेंत बसण्यापूर्वी शेकडो वर्षें होती. त्यामुळें एवढा ज्या पिराचा बडेजाव त्याचें स्मरण व चिंतन गोविंद हरीनें विपत्काळीं मनाशीं चाल-विले. तो त्याच्या स्वप्नांत येऊं लागला. गोविंद हरि हा गोपाळरावास लिहितो 'ग्रामाधिपति पीर सर्व प्रकारें अनुकूल. रोज दोन स्वप्नें. एक स्वप्न नाहीं असा दिवस नाहीं. सर्व प्रकारें रक्षण करतो. मोठा चमत्कार पाहिला.' मिरजेच्या किल्ल्यावर पेशव्यांच्या फौजेनें केलेले अनेक हल्ले गोविंदपंतानें मारून काढले, हाच त्याच्या मतें पिराचा चमत्कार. त्याचें श्रेय त्यानें स्वतःच्या पराक्रमास न देतां पिरास दिलें हेंच त्याचें भोळेपण. पिराचें एवढें सामर्थ्य होतें तर त्यानें शेवटपर्यंत गोविंदपंताचा पाठपुरावा करून पेशव्यास पदरीं यश न पडतां वेढा उठवून जाण्यास लावलें पाहिजे होतें! परंतु तसें घडलें नाहीं. कांहीं महिने दम धरल्यावर आपला धन्याच्या प्रचंड फौजेपुढें निभाव लागत नाहीं असें पाहून

गोविंदपंत निशाण खाली करून पेशव्यास शरण गेला व पेशव्यांनीं त्यास किल्ला खाली करून मंगळवेढयाकडे मुलामाणसांसुद्धा जाऊन राहण्यास परवानगी दिली. याच वेढयांत गोविंदपंतानें आणखी एक दैवी उपाय केला. त्यावेळीं तो ज्यांस गुरुतुल्य समजे असे स्वामी त्याजपाशी येऊन राहिले होते. त्यांनीं गोविंद हरीस विजय प्राप्त व्हावा म्हणून देवावर संकट घालण्याकरितां उपवास सुरू केले होते. गोविंदपंत म्हणतो 'स्वामी येऊन चोवीस रोज झाले. अन्नाचा लेश नाहीं. मोठा अभिमान त्यांस पडला आहे.' (ऐ. ले. सं. भाग १ ला)

सासवडचे सरदार पुरंदरे यांची त्यांच्या कुलदैवतावर अशीच श्रद्धा होती. त्यांचे कुलदैवत खंडेराव यांवर युद्धप्रसंगीं निष्ठा ठेवून कसे वागावे हें नाना पुरंदरे याने बजावा पुरंदऱ्यास लिहिले आहे. 'आशीर्वाद उपरी, जेव्हां कोठें कामकाजास जुंजाचे मोर्च्याचे, श्रीमंत पाठवित जातील तेव्हां श्रीमार्तंडाचे स्मरण करून भंडार कपाळी लावून पागोट्यांत भंडाऱ्याची पिशवी लहानशी करून ठेवीत जावी. भंडाराचे विस्मरण तिळमात्र करूं नका. तोच सर्व विघ्ने निवारण करणार आहे. हे पत्र कोणास न दाखविणे हे आशिर्वाद' (पु. द. भा. ३ रा.) (ता. २० फेब्रुवारी सन १७६५) नानाने स्वसंरक्षणाचा हा रामबाण उपाय म्हणून बजाबास कळविला.

प्रायोपवेशन

उपोषण किंवा प्रायोपवेशन हा इलाज मोठा आततताईपणाचा आहे. त्यांत स्वतःपर किंवा इष्टमित्रावर ईश्वरी कृपा होण्याचा जसा हेतु आहे तशीच ईश्वराकडून शत्रूला शासन करण्याचीहि इच्छा आहे. पर्जन्य पडून देशात आबादानी व्हावी यासाठींहि उपोषणे करण्याचा प्रघात होता. राघोबा आपल्या कुटुंबासुद्धां गोदावरीच्या कांठीं कोपरगांवास जाऊन राहिल्यावर थोड्याच दिवसांनीं मरण पावला. त्याच्या पश्चात् त्याची बायको आनंदीबाई, दत्तकपुत्र अमृतराव, औरसपुत्र बाजीराव व चिमणाजी आप्पा आणि बाजीरावाची अल्पवयी पत्नी कोपरगांवीच रहात असत. त्या सर्वांवर पेशवे सरकारानें मुद्दाम नेमलेल्या अधिकाऱ्यांची सक्त नजर होती. ते बाईची व इतरांची दिनचर्या व बारीकसारीक बोलणी यांची खडान् खडा माहिती पुण्यास नाना फडणविसाकडे लेखी पाठवीत. कांहींना कांहीं निमित्तावरून

आनंदीबाईचा जळफळाट रोज चालत असे. त्या सुमारास दुष्काळ पडला होता. त्याचा निग्रह करणें नाना फडणवीस प्रभृति प्रमुख अधिकाऱ्यांचे कर्तव्य होय अशा समजुतीने बाई म्हणते, ‘ पर्जन्यादिक दुष्काळ पडतात. त्यास अधिकारी यांनीं निग्रह केले पाहिजेत. आम्हांकडे (अधिकार) असते तर आम्ही उपोषणेच केली असती. ’ आपण आपल्या शरीराचे हाल करून दुसऱ्याला तळतळाट देणें हा उपोषणाचा दुसरा प्रकार. थोरल्या माधवरावाने राघोबादादास पुण्यास शनिवारवाड्यांत नजर कैदेत ठेवले होतें. त्यावेळीं रागारागानें राघोबानें उपोषणें सुरू केली. माधवरावास पेशवाईचा उपभोग अवघी ११ वर्षेंहि मिळाला नाहीं. माधवराव स्वभावानें मोठा निग्रही, हट्टी व करडा होता. राघोबानें तऱ्हेतऱ्हेने आततायीपणा केला तरी त्यानें आपला अंतकाल जवळ येईपर्यंत राघोबास कैदेंतून मुक्त म्हणून केलें नाहीं. त्या प्रसंगाचे स्मरण ठेवून आनंदीबाई कोपरगांवच्या वाड्यांत पुढीलप्रमाणें उस्मरली, ‘ पूर्वी साहेबांनीं (रघुनाथराव पेशव्यांनीं) अकरा उपोषणें केली. याविसी माधवरायास दरद आला नाहीं. आपण तसेच जेवीत. याची फळे पावले. उपोषणानें एक दिवस वाखा झाला. तेव्हां थोरली बाई (गोपिकाबाई माधवरावास) दुरुत्तरे फार बोलली ’ (पे. द.) आनंदीबाईच्या मतें माधवरावास अकालीं मृत्यु आला याचे कारण राघोबाचा त्यास लागलेला तळतळाट. आपल्या मनाजोगी गोष्ट घडून आली नाहीं म्हणजे मोठी माणसेंहि रुसून अन्नत्याग करीत. बाबूजी नाईक जोशी बारामतीकर हे पेशवाईंत मोठे सावकार होते. त्यांचें शाहूछत्रपती.-वर कर्ज होतें. पैशाच्या बळावर ते राजकारणांतहि उलाढाल करीत असून त्यानी सरदारकीहि मिळविली होती. पेशवेपद मिळविण्याचे बाबतींत ते बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांचे प्रतिस्पर्धी होते हें सुप्रसिद्ध आहे. खेरीज त्यांचा व पेशवेघराण्याचा आप्तसंबंधहि होता. बाबूजी नाईक कांहीं घरगुती कुरबुरीवरून उपोषणे करूं लागले ही बातमी थोरले बाजीराव पेशवे यांची आई राधाबाई हिजला कळली. राधाबाई ही मुत्सद्दी बायको होती. नवऱ्याच्या संगतींत राजकारणाचे व इतर डावपेच तिलाहि समजूं लागले होते. म्हणून ती बाबूजी नाईकांची समजूत घालण्याकरितां बारामतीस गेली होती.

कित्येक धार्मिक व्रतेंहि कामनिक असत. राघोबा व आनंदीबाई अशी व्रतें करण्यांत पटाईत असत. पेशवाई मिळावी आणि माधवराव व नारायणराव यांचें

वाटोळें व्हावें, या हेतूनें राघोबा व्रतें करीत होताच. त्याचा हा कित्ता आनंदी-बाईच्या उपदेशावरून त्याच्या पश्चात् त्याचे चिरंजीव बाजीराव व अमृतराव यांनींहि उचलला होता असें दिसतें. त्या काळांत फुरसतीचा वेळ पोथी-पुस्तकें वाचण्यांत, धर्मग्रंथांची पारायणें करण्यांत व व्रतोद्यापनांत घालविण्याची रीत होती. तिला अनुसरून बाजीराव व अमृतराव कोपरगांवीं अगदीं अल्प-वयाचे असतांहि अनेक व्रतवैकल्यें करीत. त्यांतील कित्येक व्रतें नानाफडणीस प्रभृति कारभाऱ्यांचा नाश व्हावा व पेशवेपद आपणाकडे यावें या उद्देशानें आचरली जात असा कारभाऱ्यांना संशय आला होता. संकष्टी चतुर्थीचें व्रत कामनिक आहे. ही चतुर्थी बाजीराव व अमृतराव कोपरगांवास करीत होते, इतकेंच नव्हे तर मौनयुक्त करीत होते. ‘ अधिकस्य अधिक फलम् ’ या न्यायानें चतुर्थीला मौनाची जोड देण्यांत आली असावी असें दिसतें.

भूतबाधा

देवावर तसा भुताखेतावरहि लोकांचा विश्वास होता. कोकणांत भुतांचें बंड फार. कोकणांत विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यांतील लोक दरिद्री. जमिनीच्या लहानशा तुकड्यावरून व घरठाणावरूनहि त्यांच्यांत भाऊबंदकीची व इतर भांडणें होत. ज्याच्याशीं वाकडें असेल त्याजवर भुतें घालून त्याचें पारिपत्य करणें हा कोकणांतील लोकांचा सर्वसाधारण इलाज होता. भुतें अन्यायानें कोणावर घातली असल्यास त्यापासून रयतेचें रक्षण करणें हा सरकारास एक उद्योगच होऊन बसला होता. ‘ सदाशिव भट देवधर वस्ती कसबे मीठगावणे हे आपलें घर सोडून पोट भरण्याकरितां परागंदा झाले. त्यांच्या पश्चात् त्यांच्या ठिकाणांत बाबदेवभट परांजपे हे येऊन राहिले. त्यांजपाशीं सदाशिव भटांनीं ठिकाण मोकळें करून मागितलें. पण बाबदेव भट कांहीं केल्या ऐकेनात. तेव्हां दाद मागण्यासाठीं सदाशिव भट देवधर हे श्रावणमासी सुभ्याकडे गेले. हे पाहून परांजपे यांनीं सदाशिव भटाची खोड मोडण्याकरितां त्यावर भुतें घातलीं. त्यामुळें सदाशिवभट अधिकच संकटांत आल्यानें सरकारास त्याचा दोन्ही अडचणींतून बचाव करणें भाग पडून पेशवेसरकारांनीं पुण्याहून विजय-दुर्गाचे सुभेदार नारो त्रिंबक यांस हुकूम केला कीं, भुतांची चौकशी करावी. भूतें खरी ठरल्यास भुताळ्याकडून म्हणजे भुतें घालणाराकडून दंडादाखल खंड

घ्यावा. आणि भुतांची वारावार करून देवघरास भुतांचा उपसर्ग न होय ते करावे. (पे. डा.) कोकणांतील लांजे या गांवीं ५।७ ठिकाणीं भुते घातल्याचे आढळून आले. ही भुते ज्यानें घातली तो बाळ महाजनी खोत यानेंहि आपला अपराध कबूल केला. तेव्हां सरकारातून त्याचे खोती उत्पन्न जप्त करण्यांत आलेंच. पण शिवाय त्याला कोकण सोडून देशावर जाण्याचाहि हुकूम झाला. हे बाळ कोकणांतून देशावर आल्यानंतर ह्यानें तिकडे काय लीला केल्या तें देव जाणे !

भुतांची भीति भटभिक्षुकांनाच वाटत होती असे नव्हे, तर लढायांतून तलवार मारणाऱ्या शूर पुरुषांनाहि भुतें भिववीत. ' शंकराजी केशव फडके व त्यांचे दोघे बंधु हे परगणे माहीम येथें देशकुळकर्णी व गांव कुळकर्णी होते. त्यांनीं वसईचा किल्ला पोर्तुगीजापासून घेण्याच्या मसलतींत श्रमसाहस बहुत केलें. म्हणून त्या कामगिरीबद्दल त्यांस दहिवले हा गांव इनाम करून दिला होता. पण त्या गांवांत भुताटकी असल्यामुळें त्याच्या मोबदला त्यांनी नगावें हा गांव मागितला. तो त्यास पेशव्यांनीं इनाम दिला ' (पे. डा.). हें उदाहरण कोणीं कोणावर भुतें घातल्याचें नव्हे. तथापि भुताच्या सामर्थ्याविषयीं लोकांच्या कल्पनाच अशा अवास्तव असत कीं, त्यांच्यापुढें मांत्रिकाशिवाय सामान्य मनुष्याचा निभाव लागावयाचा नाहीं असेंच सर्व लोक समजून चालत. भुतें घालण्याचें बंड कोकणांत पुढेंपुढें फारच माजून त्यांच्या बंदोबस्ताचा पेशवे सरकारास विशेष विचार करावा लागला. सन १७७४।७५ सालीं अंजनवेल, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, विजयदुर्ग, देवगड व सौंदल या तालुक्यांत भुतें घालणाऱ्या गुन्हेगारांचा बंदोबस्त करण्याकरितां पेशवे सरकारानें दोन अधिकारी नेमले व त्यांच्या मदतीला दोन कारकून व सहा शिपाई दिले. अलीकडे इंग्रजी राज्यांत प्लेगच्या दिवसांत प्लेगमामलेदार, दुष्काळच्या दिवसांत दुष्काळमामलेदार किंवा टोळांच्या उपद्रवांत टोळमामलेदार नेमण्यांत येत असत. त्यांतलाच हा पेशवाईतील प्रकार. पण त्या अधिकाऱ्यांना पगार मात्र प्लेग किंवा टोळ मामलेदाराप्रमाणें लठ्ठ नव्हता. या मामलेदाराचा दरमहाचा जेवढा पगार तेवढा त्या अधिकाऱ्याचा सबंध वर्षाचा पगार होता. त्यास सालीना साडेतीनशे रुपये पगार व २६१ रु. भत्ता ठरला होता. सदर अधिकाऱ्यानें गुन्हेगाराची शक्ति पाहून त्यास पंचवीस ते पन्नास रुपयांपर्यंत दंड करावयाचा असे.

कोकणचीं भुतें देशावरच्या भुतांपेक्षां जास्ती खट्याळ. कोकणांतलि भुतां-इतके देशावरच्या भुतांनीं देशावरच्या लोकांना बेजार करून सोडले नव्हतें. तरी भूतें घालण्याची विद्या देशावर अगदीच अपरिचित होती असें नाहीं. 'कसबे सासवड येथील रामा न्हावी यानें सुभानजी जिनगर यास आपलीं भूतें घातलीं. त्याची चौकशीं सरकारनें पंचाक्षरी व वैद्य आणून केली.' वैद्य आणण्याचा हेतु असा कीं, एखाद्यास झालेली विकृति भुतापासूनची किंवा अंग-रोगाची याविषयीं कोणाची खात्री नसे. पुष्कळ वेळा भूतबाधा व अंगरोग यांचा घोटाळा उडत असल्यास नवल कसचें! भूतबाधा व अंगरोग यांच्या-विषयीं लोक नेहमीच बुचकळयांत पडत. कोणी मनुष्य आजारी पडला असतां त्यास भूताचें लागीर तर झालें नसेल ना या शंकेनें उपचाराकरितां वैद्याच्या जोडीला पंचाक्षरी हा बहुधा ठेवलेला.

शाहू महाराज १७४९ सालीं आजारी पडले व त्यांतच त्यांचा अखेर अंत झाला त्या वेळीं त्यांचें वय साठीच्या पुढें होतें. अशा वयांत त्यांना दृष्ट लागण्याचा किंवा त्यांजवर भुतें घालण्याचा संभव काय असणार! तथापि त्यांस उपचार करण्यास शक्य तेवढे वैद्य व पंचाक्षरी बोलावले होते असें दिसतें. त्या प्रसंगीं नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे यांना साताऱ्याहून पुण्यास पुरंदऱ्यांनीं पत्र लिहिलें होतें तें असें, 'नारू किंवा वायुविकार. प्रथम दिवशीं मुसलमान तबीबांनीं लेप लावला होता. सेकीत बसले असतां राजश्रीस मूर्च्छना आली. बापूजी बाबा (नी) पलंगावर चढोन धरले, तोंड उघडून तोंडांत पाणी घातलें. आर्ध घटकेनें किंचित् पीत पडलें. याउपरी चौ घटिकांनीं सावध जाहले. वैद्य पंचाक्षरी अवघे जमा केले होते. दर्याबाईहि जवळ आली होती.' (पे. द.)

चेटुक व देवऋषि.

चेटकाचीहि कल्पना त्याकाळीं महाराष्ट्रांत किंवा हिंदुस्थानांत होती असे नाहीं तर आठराव्या शतकाअखेरपर्यंत ती साऱ्या जगभर प्रचलित होती. इंग्लंडांत इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत चेटुक हा कायद्यानें गुन्हा ठरला होता. हा कायदा सन १५३६ त बदलला. त्या काळांत तीस हजार माणसांना या कायद्याखालीं प्राणास मुकावें लागलें असें सांगतात. ऑस्ट्रियांतहि असला

कायदा सन १७६६ पर्यंत होता. सन १७७५-७६ सालीं मार्तंड जोशी रायरीकर यास चेट्टक केल्याच्या अपराधासाठीं पेशवे सरकारानें किल्ल्यावर अटकेंत ठेवलें होतें. त्यानें अटकेंत असतां भस्म अगर गंध लावूं नये, संध्या करूं नये, स्तोत्रें म्हणूं नयेत, दिवसांतून एकदा जेवावें व तेंहि आपल्या हातानें अन्न शिजवून जेवावें अशी त्याला करडी शिक्षा होती. त्याच सुमारास पुण्यांत मोराजी नांवाचा इसम रहात होता. त्यानें चेट्टक करून एका मनुष्याचा प्राण घेतल्याचा त्याजवर आरोप आला होता. हा आरोप दुसऱ्या तिसऱ्या कोणी केला नसून त्याच्या जातीच्या ५० लोकांनीं या बाबतींत त्याच्याविरुद्ध साक्षी दिल्या. इतकेंच नव्हे तर त्याला पुन्हा चेट्टक करतां येऊं नये इतका त्याचा पक्का बंदोबस्त होण्यासाठीं त्याचे वरचें दोन दात पाडावे, त्याला चांभाराचें पाणी पाजावें व त्यास जातीबाहेर टाकावें अशीहि त्या लोकांची विनंति होती व ती सरकारनें मान्य केली. पण तेवढ्यानें मोराजी बधला नाहीं. त्यानें सांगितलें कीं हें चेट्टक मला करतां न आलें तर मांग किंवा बेरड जातीच्या लोकांकडून तें मी करवीन तेव्हां त्याला एका किल्ल्यावर अडकवून ठेवणेंच सरकारला भाग पडलें (पे. डा.)

जारणमारणाची विद्या शत्रूचा प्राण हरण करण्यासाठीं उपयोगांत आणीत असल्याकारणानें तिजपासून ज्यांना आपले किंवा आपल्या आप्तेष्टांचे प्राण वाचवावयाचे असतील तें देवऋषी, पंचाक्षरी यांना बोलावीत. देवऋष्यांची मदत इतर रीतीनेंहि घेण्यांत येई. आजारी मनुष्यानें अमुक एका देवाची सेवा केल्यास त्याच्या प्रकृतीस समाधान होईल असें देवऋषी सांगत व औषधोपचार करून कंटाळलेले त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागण्यास तयार होत. मोठमोठे सरदार देखील या बाबतींत देवऋष्यांची आज्ञा पाळीत मग सामान्य जनांची कथा काय? 'पुरुषोत्तम कृष्ण ऊर्फ दाजी पटवर्धन हा मिरजेचे प्रसिद्ध गोविंद हरि पटवर्धन यांचा पुतण्या. मिरजेच्या किल्ल्यास राघोबादादा पेशव्यांवीं ५० हजार फौजेनिशीं वेढा घातला असतां पुरुषोत्तमपंतानें गोविंद हरीच्या हाताखालीं लढून आपल्या अचाट शौर्यानें शत्रूसहि आश्चर्यभरित करून सोडलें होतें. पुढें हा पुरुषोत्तमपंत मिरजेंत बरेच दिवस आजारी पडला. गोविंद हरीनें त्याजकरितां पुष्कळ उपाय करून पाहिले. पण कांहीं केल्या गुण येईना. तेव्हां गोविंद हरीचा भाऊ त्रिंबक हरि यानें दाजीस कुरुंदवाडास नेलें. तेथेंहि औषधानें गुण येत नाहीं,

त्या अर्थी या दुखण्याचा संबंध देवदेस्कीशी असेल अशी कल्पना निघून कोणा देवऋषीस पाचारण झालें. देवऋषीनें नाईकबाच्या दर्शनास जाण्याचा तोडगा सांगितला. त्यावरून पुरुषोत्तमपंत पाटण गांवाजवळ नाईकबाचें स्थान आहे तिकडे सेवेकरितां निघून गेला' (ऐ. ले. खं. ३ रा)

त्या काळीं सध्याप्रमाणें पाश्चात्य व पौर्वात्य असें उभयविध रोगानिदान व चिकित्सा सर्वत्र रूढ झाली नव्हती व शस्त्रक्रियेचीहि माहिती असावी तितकी नव्हती. या कारणानें सामान्य दुखण्यांत वैद्याच्या औषधास गुण येण्यास विलंब फार लागे व बळकट दुखण्यांत वैद्यहकीमांची मती बहुधा चालत नसे. अशा असाहाय्य स्थितींत देवऋषि, भगत, भटभिक्षुक व अंगांत येणारे यांची पोळी चांगली पिकत असल्यास नवल काय ? भगत हेहि देवऋष्यासारखेच. धाकट्या बाजीराव पेशव्याची बायको भागीरथीबाई हिच्या प्रकृतीस कोपरगांवीं असतां समाधान नव्हतें. म्हणून आनंदीबाईनें तिला अंताजी फटांगरा जेऊरकर भगत यास बोलावून आणून दाखविलें. तो म्हणाला कीं, त्यांचे मागिल कांहीं नवस आहेत; ते फेडल्यानें चांगलें होईल. आनंदीबाईस त्याचें सांगणें खरें वाटलें. ती म्हणाली ' आमचे मागील नवस श्रीत्रिंबकेश्वर, सप्तशृंग व कोकणांत हरिहरेश्वरास व गणपतिपुळयाचा व ग्रामदेव ऐसे नवस पहिलेच आहेत. ' (पे. द.)

आजाराने फार माणसें पछाडली असतां शांतीचाहि इलाज करण्यांत येई. किल्ला हे स्थळ कोरड्या दिवसांत हवाशीर व आरोग्यकारक वाटले म्हणून पावसाळयांतहि तितकेंच मानवेल असे नाहीं. किंबहुना पावसाळयांत ते रोगटच. त्यामुळें किल्ल्यावर रहाणारी माणसें बरसातींत किंवा बरसात संपताच शीतज्वरानें बहुधा आजारी पडत. त्याप्रमाणें लोहगडाजवळच्या ' विसापूर किल्ल्यावर शेंसव्वाशें माणूस दुखणाईत पडले. पंचवीस तीस मेलें. उपाय केला. पण गुण येत नाहीं. म्हणून अद्भुत शांत करण्याचे ठरले. '

रघुनाथराव पेशव्यास फार दिवस पुत्र नव्हता म्हणून त्यानें अमृतरावास दत्तक घेतलें होतें. अमृतरावाची पहिली बायको मेल्यावर त्याचें कोपरगांवीं असतां दुसरें लग्न झालें होतें. परंतु पहिल्या बायकोच्या दीर्घ सहवासानें तिचें वारंवार स्मरण व्हावें हें योग्यच. स्मरणाचा व निदिध्यासाचा परिणाम इतका विलक्षण असतो कीं, तीं मृत माणसें पाहिल्याचा भास जिवंत माणसांना होतो. मग स्वप्नांत तीं दिसलीं तर त्यांत काय नवल ? पण विचारी मनुष्य या गोष्टी

तेवढ्यावरच सोडून देतो. पण अमृतराव तितका जाणता नव्हता व आनंदीबाईची तर स्त्रीबुद्धीच. तशांत घराणें श्रीमंताचें, यामुळें त्यांनीं हें प्रकरण बरेंच चिवडून पाहिलें तें असें, ' अमृतराव पेशवे रात्रौ निद्रिस्त असतां पिशाच्चदर्शन झालें. (पिशाच). आंत खोलींत आलें. त्यामुळें जागृत होऊन बाहेर येईतोपर्यंत पहात होते. मागेहि दोन तीन महिन्यांअलीकडे सावित्रीबाईचें दर्शन झालें होतें. म्हणोन कोपरगांवीं नथू भगत कुंभार जाणता आहे त्यास आणिलें होतें. त्याणें बंदोबस्त केला आहे.' (पे. द.)

ग्रहदशा व ग्रहशांति.

व्रतें, दानें, अनुष्ठानें व तुला केल्यानें ईश्वराचा व ग्रहादिकांचा कोप नाहींसा होऊन आलेलीं संकटें टळतात अशी सर्वांची श्रद्धा होती. आनंदीबाईस कोपरगांव येथें पुणें दरबारानें प्रतिबंधांत ठेवलें होतें. ती कैदेंतून सुटण्याकरितां दैवी प्रयत्नांचें चिंतन करूं लागली. वेगवेगळ्या संकटांवर वेगवेगळे मंत्र असून त्यांचीं माहिती ब्राह्मणांना चांगली होती. मराठ्यांचे सरदार शेंकडो होते व ते नेहमी कांहीं ना कांहीं संकटांत असतच. त्यांच्या पदरीं भिक्षुक ब्राह्मण कायमचे आश्रित म्हणून राहिलेले असत. अशा प्रकारच्या मंत्रांची माहिती ते आपल्या यजमानास सांगत व यजमान त्यांना जरूर तें साहित्य व दक्षिणा देऊन त्यांजकडून मंत्रांचा जप करून घेत. आनंदीबाईस असा मंत्र सांगणारा ब्राह्मण मिळणें शक्य नव्हतें. कारण तो तसें करील तर त्याजवर पेशवे दरबाराकडून प्राणसंकटच ओढवावयाचें. आनंदीबाईला या मंत्राची माहिती होती. पण तो जप करण्यास ब्राह्मण व त्या ब्राह्मणास दरबारची परवानगी मिळेल अशी तिला आशा नव्हती. म्हणून ती म्हणते, ' कैदविमोचनाचा मंत्र आम्हास ठाऊक आहे. पूर्वीं सदाशिवराव घोरपडा यास बिडी घातली होती तेव्हां त्यानें जप केला. त्यास गुण आला. आम्ही करणार आहों. पण कोण करतो ? भावी चुकत नाहीं–'(पे. द.). तिच्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं, आम्ही पुष्कळ म्हणतो, जप करावा म्हणून. पण तो करणारा ब्राह्मण कोठून मिळणार ?

माधवराव पेशवे आपला चुलता रघुनाथराव याच्या स्वाधीन झाल्यावर माधवरावाच्या पक्षाचें पुरस्कर्ते जे पटवर्धन त्यांच्या राशीस तो लागणार हें ठरल्यासारखें होतें. गोपाळराव पटवर्धन हा त्याच्या आम-

दार्नीतील पटवर्धन मंडळीत कर्ता व शूर पुढारी. त्याजवर रघुनाथरावाचा सारा दांत. तेव्हां गोपाळरावाचा मिरजेस जहागीर संभाळीत बसलेला बाप गोविंद हरि फारच घाबरला. रघुनाथराव मिरजेवर चालून आला तर त्याजपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, अशी गोविंदपंताच्या मनाची पक्की खात्री होती. अशा संकटकालीं त्या शूर व अनुभवी मुत्सद्दयालाहि ईश्वराराधनेकडेच वळावें लागलें. त्याने हा विचार मनांत आणिल्यावर त्या संबंधाची खडान्खडा माहिती सांगण्यास व तयारी करून देण्यास त्याजपाशीं भिक्षुकमंडळी सिद्ध होतीच. त्यांच्या पदरचे भिक्षुक वेदमूर्ति नरहरिभट जमदग्नि यांनी त्याला तीन मार्ग सांगितले. एक जप, दुसरें दान व तिसरें श्रवण. गोपाळराव मिरजेस नव्हता. म्हणून त्यास गोविंद हरीनें पत्रद्वारें कळविलें 'वेदमूर्ति नरहरिभट जमदग्नि यांनीं सांगितलें कीं, चतुर्दश प्रणव महामृत्युंजयजप चोवीस सहस्र करावा. एक म्हैसदान करावें. हरिश्चंद्राख्यान श्रवण करावें. त्यास कुरुंदवाडीं अनुष्ठान चालत आहे. त्यांत आणखी ब्राह्मण लावून चतुर्दश प्रणव महामृत्युंजयजप करणें म्हणून वेदमूर्ति रामचंद्र भट (वाटवे) उपाध्याय यांस (कुरुंदवाडीं) लिहिलें आहे. म्हैसदान तुम्ही करणें व आख्यानश्रवण तुम्हीच करणें. वरकड अनुष्ठान चालत आहे.' [ऐ. ले. सं.] मुख्य संकट गोपाळरावावर असल्यानें दान व श्रवण करण्यास गोविंदपंतानें गोपाळरावासच लिहिलें. गोविंदपंताच्या मतें गोपाळराव हा हरिश्चंद्रप्रमाणें सत्त्वशील होता; त्याचा पक्ष सत्याचा होता; तेव्हां सत्त्वपरीक्षेंत टिकलेल्या हरिश्चंद्राचें आख्यान त्यानें ऐकल्यानेंच त्याची संकटांतून सुटका होईल.

अनुष्ठानें

पहिले बाजीराव पेशवे हे अव्वल दर्जाचे वीर पुरुष. पण त्यांनाहि संकटावस्थेंत संत महंत व परमेश्वर यांच्या कृपाछत्राची आवश्यकता वाटत असे. ब्रह्मेंद्रस्वामविर त्यांची श्रद्धा कशी दृढ होती हें इतिहासज्ञांस विदितच आहे. तसाच अनुष्ठानावरहि त्यांचा विश्वास असून जें अनुष्ठान करावयाचें तें यथासांग झालें पाहिजे याविषयीं ते फार काळजी घेत. अनुष्ठान सुरू असतां फलप्राप्तीपूर्वी कांहीं दृष्टान्त होणें जरूर आहे असें वाटत असून तसा दृष्टान्त न झाल्यास किंवा स्वप्न न पडल्यास अनुष्ठानांतच कांहीं चूक होत असल्याचें ते

अनुमान काढीत. पुण्यांतील कर्वे हे पेशव्यांचे उपाध्याय, त्यांना या उपाध्ये-पणाबद्दलच पेशव्यांकडून पुढें इनाम मिळालें. त्या घराण्यांतील कृष्णंभट कर्वे यांना बाजीरावांनी ब्राह्मणांकडून कांहीं अनुष्ठान करावयास सांगितलें. अनुष्ठान चालू होतें तरी बाजीरावास स्वप्न किंवा दृष्टान्त होईना. तेव्हां ते कृष्णंभटास विचारतात, ' अनुष्ठान यथासांग होत नाही कीं काय ? ' (पे. द.).

पहिले माधवराव सन १७६९ मध्यें शरीरास समाधान नसतांहि हैदरा-वरील तिसऱ्या स्वारीवर निघाले होते. त्यावेळीं त्यांना आरोग्य व्हावे म्हणून पुण्यांत शंभर ब्राह्मण लाऊन सरकारांतून कोटी मृत्युंजयाचे अनुष्ठान सुरू केलें होते. त्या अनुष्ठानाची व्यवस्था नानाफडणविसांकडे होती. सदर अनुष्ठान यथासांग पार पडावे याकडे गोपिकाबाई, माधवराव व नानाफडणवीस यांचे पूर्ण लक्ष होते. त्यावेळीं गोपिकाबाई नाशिकाजवळ गंगापुरास रहात होती. तेथून तिनें नाना फडणविसास लिहिले, ' जे ब्राह्मण लावले तेच अनुष्ठान समाप्त होईपर्यंत राहूं द्यावे व यजमानास आरोग्य होण्याविषयीं प्रार्थना करीत जावी. कोणी (ब्राह्मण) त्वरेनें जप करतो कोणी सावकाशीनें करतो. त्यांची प्रार्थना करावी कीं ८।१५ दिवस (जास्ती) लागले तर लावून जप सांग करावा. अनुष्ठानावर शिष्ट ब्राह्मण चौकशी करवावयासी कोण ठेवले. त्यांची नांवें लिहून पाठवावीं....अनुष्ठानांत व्यंग पडूं न द्यावें. ब्राह्मणांनीं वाडयांतच निजावें. हिमाइती ब्राह्मण आणि उपयोगीं नसतील ते दूर करून परीक्षेचे उत्तम लावावें.' त्यावर नाना उत्तर लिहितात, ' मीच लष्करांत गेलो होतो. तेव्हां श्रीमंतांस विनंति केली कीं, कोटि मृत्युंजयाचे अनुष्ठान करावें. त्यावरून आज्ञा झाली कीं, तुम्ही सर्व बंदोबस्त करून सांग होई ते करणें. त्यावरून मी पुण्यास आल्यावर वेदमूर्ति राजश्री सदाशिव दीक्षित दाते यांस बोलावून त्याकडून ब्राह्मण साक्षर चांगले पाहून लिहविले. सदाशिव दीक्षितांचा प्रकार प्रामाणिक, निःस्पृह, खस-खशीत. याकरितां श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं त्यांचे मार्फत अनुष्ठानास ब्राह्मण लावावे.... मंत्रांच्या परीक्षा ब्राह्मणांच्या घेतल्या त्यांत आपस्तंब, आश्वलायन दोन मंत्र...प्रत्यह सहस्र जप ब्राह्मण करतो. तिसरे प्रहरी भोजन करतात. प्रत्यह एक पक्वान्न अथवा क्षीर. भोजनाचे उत्तम करतो. थोरले रावसाहेबांचे (बाजीरावसाहेब) दिवाणखान्यांत देवता स्थापन व ब्राह्मण जपास बसतात व भोजन करतात. व निद्रेस थोरले देवघर श्रीमंत राजश्री नारायणरायांचे केलें

आहे. ब्राह्मण हिमाइती वगैरे लावतच नाहीं व लावतानाच चांगले योजून लावले." (ऐ. ले. सं. खं.४ था.) जसा आधुनिक रसायनशाळेंतील प्रयोग यशस्वी होण्याकरितां प्रयोग करणारा शास्त्रज्ञ सर्व बाजूंनी सावधगिरीनें वागतो त्याप्रमाणें वरील अनुष्ठानांत गोपिकाबाई, माधवराव व नाना फडणीस यांनीं काळजी घेतलेली दिसते.

पायगुणावर विश्वास

पायगुणावरहि असाच विश्वास होता. दौलताबादेचा किल्ला महाराष्ट्रांत फार प्रसिद्ध. तो बांधतांना शत्रूपासून त्याचें उत्तम प्रकारें संरक्षण होण्यासाठीं जितकी तरतूद केली आहे तितकी इतरत्र क्वचित्‌च आढळते. खेरीज त्यावर जनार्दनस्वामींची समाधि असल्यामुळें तें हिंदूंचें एक पवित्र क्षेत्र होऊन राहिलें आहे. या सर्वांत त्याच्या प्रसिद्धीचें कारण हें कीं, ती यादव राजांची म्हणजे महाराष्ट्राची एक वेळ राजधानी होती. असलें स्थळ हिंदूंच्याच ताब्यांत रहावें अशी मराठ्यांची इच्छा असणें स्वाभाविक. म्हणून सन १७६० सालीं उदगीरच्या लढाईंत निजामाचा पराभव करून त्याजपासून जो मुलूख पेशव्यांनीं घेतला त्यांत दौलताबादहि मराठ्यांकडे आली. परंतु दौलतेबादेचा पायगुण चांगला नसल्यानें ती पेशव्यांनीं परत मोगलांस देऊन टाकावी, अशी गोविंद हरि पटवर्धनाची भावना होती. तो लिहितो, 'दौलताबाद ज्याकडे असेल त्याचें कल्याण होणार नाहीं. निजामानें (सलाबतजंगानें) पाच्छाई किल्लेदार (दिल्लीच्या मोगल बादशहाचा) काढून आपलीशी केली. त्याचा परिणाम कळलाच. त्या उपरी निजामअल्ली यानें दौलताबादेच्या किल्लेदारास मारून आपलीशी केली, तेव्हां निजामअल्लीची गति बालेघाटीं (उदगीरच्या लढाईंत) कशी झाली तें कळलीच आहे. त्यापासून श्रीमंतांनीं घेतली. सहा महिने नाहीं गेले तों श्रीमंत भाऊसाहेब बुडाले. वर्ष नाहीं भरले तों श्रीमंत नानासाहेब कैलासवासी झाले. याकरितां श्रीमंतांनीं (माधवरावांनीं) ती मोगलास देऊन टाकावी. तिच्यासाठीं भांडत बसूं नये.' (ऐ. ले. सं.)

मुहूर्त

मुहूर्ताची गरज पावलोपावलीं लागत होती. घरून परगावांस जाण्यास मुहूर्त व परगांवाहून घरीं येण्यासहि मुहूर्त. मुहूर्त पाहून देणें हा जोशांना एक

किफायतशीर धंदाच होता. सरदारांच्या पदरीं हे जोशी असतच. परशुरामभाऊ पटवर्धन सन १७७२ सालीं हैदराच्या स्वारीवरून परत तासगांवास आले. या स्वारींत घर सोडून ते सुमारें तीन वर्षे परमुलखांत होते. तेवढ्या मुदतींत त्यांचे कित्येक आप्तइष्ट इहलोक सोडूनहि गेले. घरचीं माणसें त्यांची वाट पांखराप्रमाणें पहात होती. त्यांना स्वतःलाहि कधीं घरीं जाऊन आपल्या माणसांत पडेन असे झालें होतें. असा मनुष्य टाकोटाक घरीं यावयाचा. पण भाऊ मुहूर्तांत गुरफटले. बरें, घरीं जाण्यास मुहूर्त तरी तसा सोयीचा ? जोशीबुवा सांगतील तो मुहूर्त. मग सोयीचा काय न् गैरसोयीचा काय ? त्या मुहूर्तावरून ते घरीं बावीस घटका रात्रीनंतर पोचले.

मोठमोठ्या लोकांच्या कुंडल्या वर्तविल्या असून त्यावरून ग्रहांची अनुकूलता केव्हां व कशी याचा जसा कांहीं नकाशाच काढून ठेवला होता. रघुनाथराव व माधवराव यांच्यांत वैर उत्पन्न होऊन दोघांची लढाई केव्हां तरी होणार व तिच्यांत सोक्षमोक्ष लागणार हें ठरल्यासारखें होतें. माधवरावाच्या पक्षांत गोपाळराव पटवर्धन अध्वर्यु. तेव्हां त्यानें रघुनाथरावाशीं गांठ केव्हां घालावी याविषयीं गोविंद हरि त्यास पुढीलप्रमाणें सूचना करतो. ‘ कार्तिकचे पौर्णिमेस चंद्रग्रहण मेषराशीस आहे. त्यास तुमची मेषराशी. आणि ग्रह गुरु, शनि, राहु, भौम असे चार दुष्ट ग्रह आहेत. त्यास सुष्टफलप्राप्त्यर्थ आम्हीं येथें कांहीं जप करविला. तुम्हीहि तेथें कांहीं करविणें. चंद्रग्रहण राशीस आहे त्याचा दानधर्म करणें. जप आम्ही ब्राह्मणापासून करवितो. तुम्हीहि करविणे. दोन महिने श्रीमंत दादासाहेबांकडे कार्तिक मार्गशीर्ष (बरे आहेत). पुढें श्रीमंत मराठ्यांची (माधवरावाची) फत्ते. जोशियापासून प्रश्न लग्नावरून वर्तोळा केला. हरएक विशी तुम्ही दोन महिने उतावळी न करणें. बलकें मार्गशीर्ष पौर्णिमेपावेतो. पुढें जय आहे हे आशीर्वाद ’ (ऐ. ले. सं. खंड ४).

ग्रहणांचे अरिष्ट

ग्रहण हें एक मोठें अरिष्ट वाटत असे. ग्रहणांत सर्व लोक शक्तीप्रमाणे दानें, स्नानें व जप करीत. त्या दिवशीं इतर व्यवहार बंद असत. ग्रहणापूर्वीचे चार दिवस व ग्रहणानंतरचे चार दिवस प्रवासास वर्ज्य मानीत. मोठाले लोक ग्रहणांत स्वतःची तुला करून ग्रहांचा कोप शांत करीत. सन १७६३ सालीं माध-

वराव व रघुनाथराव एक झाल्यानंतर त्यांनीं निजामाच्या मुलुखावर स्वारी केली. तेव्हां निजामअल्लीस मिळालेल्या मराठे सरदारांनीं गनिमी कावा स्वीकारून शत्रूचा डाव शत्रूवरच उलटविण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणें निजाम पुण्यावर चाल करून येऊं लागला. हें वर्तमान राघोबास समजतांच त्यानें मोहिमेवरून गोपिकाबाईला पुण्यास पत्र लिहिलें. त्यांत त्यानें आपल्या भावजयीस ग्राहणाचीच भीति पुढीलप्रमाणें घातली ' हा काळ संकटाचा आहे. ग्रहण व षट्ग्रही आली आहे. आणीकहि या वर्षांत २१४ ग्रह क्रूर आहेत. यास्तव पुण्याचे भरंवशावर राहूं नये. ' (ऐ. ले. सं. खंड ४) गोपिकाबाईनें मुलांसुद्धा पुणें सोडून सिंहगडावर जाऊन राहावें असा राघोबाचा आग्रह होता.

तुळादान

वैद्यकांत हल्ली इतकी प्रगति त्याकाळीं झाली नव्हती. वैद्यांचें औषध एखाद्या रोगावर गुणकारी असलें तरी त्याचा गुण येण्यास कित्येक महिने लागत. यामुळें व औषधाच्या गुणाविषयीं एकंदरीनें भरंवसा नसल्यामुळें मनुष्य देवधर्माकडे, भुताखेतांकडे व मंत्रतंत्रांकडे वळत असे. माधवराव पेशव्याना तर हकीम, वैद्य यांच्या औषधोपचारांची कमतरता नव्हती ना ? गंगाविष्णु सारखे धन्वंतरि त्यांच्या उशापायथ्याला बसून होते. तरी सुवर्णतुळा हाहि उपाय त्यांनीं करून पाहिला. तुळा करून तुळेंतील द्रव्य ब्राह्मणांना दान केल्यानें मृत्यु टळतो व आयुष्य वाढतें अशी समजूत आहे. तिला अनुसरून ज्यांना अनुकूलता असे ते लोक तुळा करीत. सुवर्ण, रौप्य, याप्रमाणें इतर धातूंच्या व पदार्थांच्याहि तुळा होत. शिवाजी महाराजांनीं राज्याभिषेकसमयीं केलेली सुवर्णतुळा प्रसिद्ध आहे; परंतु अशा प्रकारच्या सुवर्णतुळा मराठेशाहींत व पेशवाईत शेकडो स्त्रीपुरुषांच्या झाल्या आहेत, बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांनीं आपली सुवर्णतुळा अनेकदा केली होती. एका तुळेंत त्यांना १०६४१२८११ रु. खर्च आला. तिच्यांत ५८२४ मोहरा असून त्यांची किंमत रु. ८६४१०८१२ होती. व पुतळ्या २०००१८१४ रु. किंमतीच्या होत्या. नानासाहेबांनीं दुसरी तुळा सन १७६१ सालाच्या सुमारास ओंकारमांधाता येथे केली. तिला ७३१२४८१५ चें सोन्याचें नाणें लागलें. [पे. डा.] माधवराव सन १७७० मध्ये हैदरावरील स्वारीवरून परत पुण्यास यावयास निघाले असतां वाटेंत कृष्णातीरीं

ग्रहण पडलें. तेव्हां तेथें त्यांनीं सुवर्णतुळा केली. ही हकीकत नानाफडणविसानें नाशिकास गोपिकाबाईला पुढील शब्दानी कळविली. 'श्रीमंतांची पत्रे कृष्णे-अलीकडे रामतीर्थचे मुक्कामची पुण्यास आली. ग्रहणास कृष्णातीरी सुवर्णतुळा केली.' [पे. डा.]

गोविंद हरि पटवर्धन यांची प्रकृती सन १७६४ सालीं मिरजेस बिघडली होती. त्यांच्या आरोग्यार्थ तुळा केली 'त्याजवर कृतसंकल्प करून काल इंदुवारीं द्वादशीस तुळा केली. करवीर, सौदलगें, कुरुक्षेत्र (कुरुंदवाड) व समस्त देशीचे ब्राह्मण आले होते. ब्राह्मणभोजन आदिकरून यथासांग झालें. तुळा करतेवेळीं प्रथम भाताची, दुसरी गुळाची, तिसरी मिठाची, चौथी लोखंडाची याप्रमाणें चार तुळा करून पांचवी मुख्य (रुपयांची) तुळा केली. ब्राह्मण वैदिक सातशे पावेतो आगंतुक सुद्धा मिळाले होते. शिवाय ऋत्विज, आचार्य इत्यादि मिळून संतर्पण सहस्र ब्राह्मणांचें झालें. दक्षणा पात्रापात्र पाहून दोन, तीन, चार, पांच रुपये पावेतों तुळेपैकीं दिले' (ऐ. ले. सं.)

बालविवाह

बालविवाहाची चाल आजहि आपल्या देशांत प्रचलित आहे. त्याकाळी ती फारच जारी होती. मुलगी आठवर्षांपुढें लग्नावाचून राहूं देणें हा पेशवाईंत अधर्म मानला जात असून जो तो आपल्या मुलीचें लग्न तिला आठवें वर्ष संपण्याच्या आंत उरकून टाकण्यास बहुधा चुकत नसे. लग्नांत मुलीचें वय आठ किंवा जास्तींत जास्त नऊ वर्षांचें तर मुलग्याचें वय १२।१३ वर्षांचें. वधूवरांच्या वयांतील अंतराच्या मानानें हा जोडा ठीक होता. कारण लग्न झालें तें नावाचेंच. परंतु याहि मुलग्याकडून चुका व अधिक प्रसंग घडत नसत असें नाहीं. असलें कृत्य होण्याचा संभव श्रीमंतांच्या कुटुंबांत जास्त. दुसऱ्या बाजीरावाची विषयवासना त्याच्या वयाच्या मानानें फार लवकर जागृत झाली होती असें वाटतें. त्यामुळें किंवा चावट लोकांच्या चिथावणीमुळें त्यानें आपली बायको भागीरथीबाई हिला रजोदर्शन होण्यापूर्वीच आपला मानस कळवून रात्रौ एकांतीं बोलावलें. बाजीरावाचा उल्लुपणा आनंदीबाईच्या कानावर कोणत्या तरी मार्गानें गेलाच. तिला तो सहजच खपला नाहीं. दोन तीन वेळां असें झाल्यावर तिनें या गोष्टीस मनाई केली. बाजीराव तेव्हां १२।१३ वर्षांतून अधिक नसावा. तरी त्यानें नवरेपणाचा तोरा आणून आईपुढे थैमान घातले. तो आईस म्हणाला मला तू जर

असा प्रतिबंधांत ठेवणार असशील व आम्हा नवराबायकोच्या कारभांरात मन घालणार असशील तर मी माझ्या बायकोला यापुढें मातेसमान समजेन. बाजीराव आनंदीबाईपाशीं २।४ वेळां असें बोलला व तितक्या वेळां बाईनें त्यास मोडून काढलें. तरी बाजीराव आपला नाद सोडीना. त्यानें आईस अत्यंत उद्धटपणाचें उत्तर देऊन म्हटलें, 'ती तुमची सवत आहे, काय ? ' आनंदीबाई ती. तिच्या पोरानें अशी जीभ उचललेली ती कशी सहन करील ? बाजीरावाची ही बडबड कानीं पडतांच तिनें त्यास शिव्यागाळी तरी दिल्याच, पण त्याखेरीज लाथाबुक्क्यांखालीहि तुडवून काढलें. बाजीरावाचा जन्म धारेच्या किल्ल्यांत सन १७७५ त झाला. वरील प्रकार घडला तेव्हां म्हणजे सन १७८८ सालीं त्याचे वय तेरा वर्षांचें असावें. अर्थात् त्याचें लग्नहि नुकतेंच झालें असेल. त्याची बायको भागीरथीबाई एव्हाला ८।९ वर्षांची असावी. अशा कोवळ्या पोरीवर हा गहजब ! बाजीराव किंवा इतर नवरे मुलगे बारा तेरा वर्षांचे तरी असत. पण आनंदीबाईंची लग्नाची हौस किती वेडी पहा. ती चिमणाजी आप्पाचें लग्न आठव्याच वर्षीं करावें असें म्हणत होती. ती तसें म्हणत असली तरी त्याचें लग्न केव्हां झालें कोण जाणे ! परंतु लग्नांत तो आठ वर्षांचा असल्यास त्याची बायको ४।५ वर्षांचीच पाहिजे. असलें हें लग्न पाळण्यांतील न म्हटलें तरी कडेवरचें खरेंच !

मुलग्याचें लग्न इतकें लवकर करणें ही हौस झाली. पण मुलीच्या लग्नाची माल अगदी निकड. गोविंद हरि पटवर्धनाचा मुलगा वामन गोविंद पटवर्धन १७७५ त वारला. त्याची मनी नावाची मुलगी होती. ती नऊ वर्षांची झाली. तेव्हां तिला गोविंदपंत अभ्यंकर नामक गृहस्थाच्या मुलास देण्याचें ठरलें होतें. परंतु अशा रीतीनें लग्न ठरलें आणि इकडे वामनराव निवर्तले. तेव्हां तें प्रतिकूल झाल्यामुळें अभ्यंकर या मनीला कसे करून घेणार ! आणि अभ्यंकरांनीं तिला न पत्करल्यावर दुसरीं ठिकाणें हुडकीत बसण्याची पाळी यावयाची. या काळजीनें परशुरामभाऊ पटवर्धन लिहितात, 'आतां गोविंदपंत अभ्यंकर अनमान करतील असें दिसतें. बरें ईश्वरीसूत्र असेल तसें घडेल. काय करावें. मूल फार थोर झाली. एका वर्षानें करावें असें तेथें जाहल्यास पुढें दहावें वरीस लागेल ! ' [ऐ. ले. सं. खंड ५]

विषमविवाह

प्रथमवर बारा तेरा वर्षांचा व वधू सात आठ वर्षांची हा जोडा ठीक म्हणतां येईल. परंतु वराचा द्वितीय संबंध असल्यावर तो घोटाळा बघावयालाच नको. श्रीमंत नानासाहेब पेशवे हे १७६१ सालीं भाऊसाहेब बुडाल्याचें वर्तमान नर्मदातीरीं कळल्यावर परत दक्षिणेंकडे फिरले ते पैठणास आले. तेथें त्यांनीं वाखरे नामक देशस्थ ब्राह्मणाच्या मुलीशीं लग्न केलें. देशस्थ-कोकणास्थामधील हा विवाह ब्राह्मणांच्या दोन मोठ्या पोटजातींतील दुही मोडण्याच्या सद्धेतूने नानासाहेबांनीं घडवून आणिला असला तरी तो त्याकाळीं पुष्कळांना पसंत पडला नसावा. ' श्रीमंतांच्या बुद्धीस बहुत विपर्यास. कोणी राजी नाहीं. शरीर फारच अशक्त झालें आहे. असा सर्व मजकूर विपरीत आहे. लग्नहि केलें. पैठ: णची वाखरे देशस्थ यांची मुलगी केली. ताळ नाहीं. ' [ऐ. ले. सं] म्हणजे नानासाहेबास बुद्धिभ्रंश झाल्यामुळें त्यांनीं हें लग्न केलें असा लिहिण्याचा आशय. वास्तविक ब्राह्मणांतलि पोटजातींच्या दृष्टीनें नानासाहेबांचे हें लग्न अपूर्वच समजलें पाहिजे.

नानासाहेबाच्या लग्नांत हा एक गुण असला तरी दोष अनेक होते. एक तर त्यांचे या लग्नावांचून मुळींच खोळंबले नव्हतें. कारण त्यांना त्यांच्या मनगटाला मनगट शोभेल अशी गोपिकाबाई. ही कर्ती व शहाणीसुर्ती बायको जिवंत होती आणि मुलाबाळांचाहि तोटा नव्हता. तशांत त्याचें वयहि चाळीशीच्या बेतांत असून शरीर बरेच अशक्त झाले होते. अशा स्थितींत त्याने हे लग्न केल्यावर त्यास बुद्धिभ्रंश झाला असे कोणी म्हटले तर तें वाजवी नव्हे काय ? या लग्नांत नानासाहेबांचे वय किती तर चाळीस वर्षांचें. आणि त्या मुलींचे अवघे आठ नऊ वर्षांचें; म्हणजे बिबीपणात यावयाच्या आधींच मिया मसणांत जावयाचा ! नानासाहेवांच्या बाबतींत हें ताबडतोब घडलें. कारण ते त्यानंतर चार दोन महिन्यांच्या आंतच शांत झाले.

गोपाळराव पटवर्धन पसतीस वर्षांचा असतां त्याचे पहिलें कुटुंब मरण पावले. त्या सुमारास लढाईची धामधुम सारखी सुरू असल्याने गोपाळरावास लग्नाचा नीट विचार करण्यास फुरसतच मिळेना. इकडे मिरजेस गोविंद हरि मुलीच्या शोधांत होता. ' वसई प्रांती नव वर्षांची सुंदर वधू आहे. ' म्हणून

गोविंदपंतानें गोपाळरावास कळविले होते. मुलगा बिजवर तेव्हां त्याला नवरी मुलगी मोठी पाहिजे. यासाठीं वधू सुंदर व नऊ वर्षांची आहे असा गोविंदपंतानें मुद्दाम उल्लेख केला असावा. परंतु गोपाळरावास ती मुलगी पसंत नव्हती. कां कोण जाणे. गोपाळरावाकडून तसें कळल्यावरून गोविंदपंतास राग आला. त्याला त्यांत मुलानें वडिलांच्या पायरीस पाय लावला असें वाटून त्याने उलट लिहिलें, " तुम्ही दहा लग्नें करा, पण आधी हें. मग दुसरे. ' मुलगा एवढा बरोबरीचा पण त्याजवर बापाची केवढी ही कदर ! पुढें गोपाळरावाचें दुसऱ्याच एका मुलीशीं लग्न झाले. पण त्यानंतर सात आठ वर्षांनीच गोपाळराव निवर्तला. बिजवर वयानें कितीहि मोठा झाला तरी त्याची भार्या मोठ्यांत मोठी म्हणजे नऊच वर्षांची. या कारणानें समागम अकाली होऊन त्या त्रासानें स्त्रिया लवकर मृत्यु-मुखी पडत. अशा स्थितींत मात्र पुरुष बायकामागून बायका करीत. याच अनर्थामुळें नानाफडणविसांची एकंदर नऊ लग्ने झाली. त्यांतील सात बायका त्यांच्या हयातींत मरण पावल्या. व ज्या दोन त्यांच्या पश्चात् उरल्या त्या अगदीं अल्पवयी होत्या. त्यांपैकीं एक त्यांच्या मरणानंतर १५ वे दिवशी दिवं-गत झाली. पहिल्या पांच बायका मेल्या तेव्हां त्यांचे वय चाळिशीच्या पुढें गेले असावे. तरी संततीच्या आशेनें त्यांनीं आपली पांच लग्ने केली. नाना वारले तेव्हां त्यांची स्त्री जिऊबाई हिचे वय नऊ वर्षांचे होते. नाना त्यावेळीं साठीच्या घरांत होते. दोघांच्या वयांत केवढे भयंकर अंतर ! आणि केवळ पुत्राशेनें किती स्त्रियांचा हा बळी ! शेवटच्या बाजीरावाच्या सात बायका त्याच्या डोळ्या-देखत मरण पावल्या. नवरा व बायको यांच्या वयांतील विलक्षण विषमता हेंच बायकांच्या मृत्यूचें जबरदस्त कारण दिसते. खरे शास्त्री नाना फडण-विसांच्या चरित्रांत लिहितात. ' त्यावेळीं श्रीमान् लोकांच्या बायकांच्या मरणाचे प्रमाण आणि तेहि तारुण्यावस्थेस प्रारंभ होण्याच्या सुमारास हल्लींपेक्षां फारच अधिक होते. खुद्द पेशव्यांच्या घरांत रघुनाथराव दादा, सदाशिवराव भाऊ, माधवराव रावसाहेब, सवाई रावसाहेब, दुसरे बाजीराव, दुसरे चिमाजीआप्पा यांच्या पहिल्या बायका १५ पासून २५ वर्षांच्या आंतच मरण पावल्या. ' पहिल्या बायका व दुसऱ्या बायका यांच्या मृत्यूचीं कारणें वेगवेगळीं असावी. रजोदर्शन होतांच पुरुषसमागम होऊन संतत्युत्पत्तीच्या यातना असह्य झाल्यामुळें त्या पहिल्या बाळंतपणातच मरत असाव्या व दुसऱ्या पणावर दिलेल्या पुरुषाच्या

संभोगासक्तीमुळें अकाली प्राणास मुकत असाव्या म्हणूनच नुक्ती लग्ने होऊन जे पुरुष वारले त्यांच्या स्त्रिया त्यांच्या पश्चात् बरींच वर्षे जगलेल्या आढळतात. नाना फडणविसांची बायको त्यांच्या मृत्युसमयीं नऊ वर्षांची होती, त्यामुळें ती पुष्कळ वर्षे वांचलीं. सदाशिवराव भाऊची बायको पार्वतीबाई अशीच वाचली. बिजवरांना बायका लहान मिळाल्यावर त्यांचे लक्ष अंगवस्त्रें ठेवण्याकडे जात असले तर तें अस्वाभाविक नव्हे. आतां जे कुलीन व संयमी आहेत ते असल्या वाममार्गाचा अवलंब करीत नसले तरी सर्वसामान्य लोकांची प्रवृत्ति त्या मार्गाकडे सहजच होत असावी. त्या काळीं कसबिणीचा धंदा करणाऱ्या बाया लहान लहान गांवांतूनहि आढळत; त्याच्या अनेक कारणात हेहि कारण संभवनीय आहे. इतक्या कोवळ्या वयाच्या मुलींना नवऱ्याच्या पश्चात् जगण्याचीं पाळी दुर्दैवाने आली तर त्यांच्याकडून पापाचरण घडल्यावांचून राहील काय ? म्हणून त्याचाच प्रतिकार करण्यासाठींहि वपनाची व सहगमनाची चाल पडली असावी.

गरीबांचीं लग्नें.

त्याकाळीं गोरगरीब पुरुषांची लग्ने होण्यास अडचणी फार येत. त्यांना आपण होऊन मुली देणारे कोणी सहसा निघत नसत. वरपक्षाने मुलीच्या बापास पैसे दिले तर गोष्ट वेगळी. पण ज्यांच्यापाशी याहि रीतीनें द्यावयास द्रव्य नसे ते नाना प्रकारच्या युक्त्या काढीत. मुलीला पळवून नेऊन गुप्तपणे तिचे लग्न लावणें हा एक प्रकार असून त्या प्रकारच्या विवाहास पैशाच्च विवाह म्हणतात. या धर्तीचे एक लग्न वाघोली प्रांत वाई येथें घडले. त्याची हकीकत अशी—जानो माणकेश्वर कुळकर्णी हा वाघोलीस रहात होता. त्याची पाच वर्षांची एक मुलगी होती. तिला·जेवावयास घरी घेऊन जातो अशी थाप देऊन महादाजी सिद्धनाथ मेढेकर याने रानांत रामेश्वराच्या देवळांत नेले व तेथें त्याच्या मदतीस तनि विधवा स्त्रिया व महाबळेश्वरकर भट हे आले. त्या सर्वांनी मिळून सदर मुलीचे लग्न पैशाच्च पद्धतीने लावले. हे लग्न लागत असल्याची बातमी मुलीचा बाप जानोजी यास कळताच तो देवळांत गेला. पण त्यापूर्वीच लग्न पार पडले होते. महाबळेश्वरकर भटाला जानोजीने वाईस नेऊन तेथील ब्राह्मणासमोर उभे केले. त्यानी भटावर दोष ठेवून त्याजपासून दंड घेतला. व मुलीचे लग्न दुसऱ्या वराशी करण्यास परवानगी दिली. क्षेत्रस्थ ब्राह्मणांचे हें पत्र घेऊन कुळकर्णी

पुण्यास नानासाहेब व भाऊसाहेब पेशवे यांजकडे गेला. त्यानी महादाजी सिद्ध-नाथ मेढेकर याजपासून यजीद पत्र घेतले व कुळकर्ण्याला मुलीचे लग्न दुसऱ्या कोण्या वराबरोबर लावण्यास परवानगी दिली. (पे. द. ४३) दुसरे याच प्रकारचे लग्न पुण्यास होऊ घातले होते. पण त्याची बातमी आगाऊ फुटून मसलत फसली. ' त्रिंबक धारप याणें करमरकर याची मूल पळवून नेऊन लग्न लावीत होता. त्यांतील जोशी व त्याचा चुलत भाऊ हे दोघे वाड्यांत (पेश-व्यांच्या ?) होते. त्यास शहरांत फिरवून दवंडी पिटून असे फिरोन कोणी न करी असे लोकास कळवून तोफखान्यांत अटकेस बेडी खेरीज ठेवावे आणि फुटाणे गावात भीक मागून खावे. याजप्रमाणें वे॥ राजश्री शास्त्रीबावांची आज्ञा जाली आहे हे विनंति. ' (पे. द. ४३)

तिसरे एक लग्न मोगलाईत घडून आले. आंबे जोगाई प्रांतांत मौजे अनंत-गाव येथें सदाशिव नागनाथ नावाचा गृहस्थ कुटुंबासुद्धां रहात होता. तो सिंहस्थांत तीर्थविधीसाठीं गोदातीरी गेला. घरीं त्याची पत्नी व एक लग्नाची मुलगी होती. त्याच गांवांत केसो बाबाजी कुळकर्णी हाहि रहात होता. त्याचा डोळा मुलीवर आधीपासूनच होता. मुलीचा बाप गावी नाहीं ही संधि बरी सम-जून बाबाजीने शेषभट उपाध्ये व विठ्ठल भट जोशी यांस मदतीस घेऊन मुलीला जबरदस्तीनें उचलले व गांवांतच पाटलाच्या वाड्यांत नेले. त्यानी स्नान मधुपर्क, देवकप्रतिष्ठा, नांदीश्राद्ध, सप्तपदी यापैकीं कोणताच विधि न करतां फक्त मंगलाष्टके म्हटली व मुलीच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधून चार घटिकांच्या आंत सोडूनहि दिले. त्या सर्वांची समजूत अशी कीं कसेबसे एकदा लग्न होऊन गेले म्हणजे मुलीच्या बापाला नाइलाजाने ते मानणेच भाग आहे, मग तो मनांतून त्याविरुद्ध कितीहि जळफळो. बरे या लग्नाकरितां घर पाहिले ते पाटलाचे व त्यांतूनहि सुतकुल्या पाटलाचें. अर्थात् पाटील कुळकर्ण्यास सामील म्हणूनच लग्न झालें. पुढे मुलीचा बाप सदाशिव नागनाथ तर्थिविधि आटोपून गोदातीरांवरून गावी परत आला. योग असा कीं या वेळीं केसो बाबाजी कांहीं कामासाठीं पुण्यासच गेला होता. सदाशिव नागनाथाने त्याचा पत्ता काढून पेशवे सरकारांत वर्दी दिली व त्याला पुण्यास अटक करविली. सदाशिव नागनाथाने आपल्यातर्फेचा पुरावा उभा केला व ४५ ब्राह्मणांच्या सह्या घेऊन लग्न विधि-पूर्वक झाले नसल्याचे पत्र सरकारांत गुदरले. केसो बाबाजी हाहि कांहीं कमी

नव्हता. त्याच्यातर्फे त्याचे साथीदार शेषभट व विठ्ठलभट याणी लग्न विधिपूर्वक झाल्याचें पत्र अनंतगावचा जमीनदार यास दिले. तेव्हां हें प्रकरण पेशव्यानी गावाकडे चौकशीसाठीं पाठविले. त्या गावचा जमीनदार जोरावरजंग होता, त्याचा गुमास्ता व्यंकटराव याने शेषभट व विठ्ठलभट याना योगेश्वरीच्या देवालयांत नेऊन ३५ ब्राह्मणांच्या देखत शपथपूर्वक खरें सांगण्यास फर्माविलें. त्यावर त्यानी लग्न विधिपूर्वक झाले नाहीं असेंच लिहून दिलें. त्याच्या आधारें पेशव्यानी लग्न नाशाबीद ठरवून सदाशिव नागनाथ यास मुलीचे लग्न दुसऱ्याशीं लावण्यास परवानगी दिली.

औरंगाबादेजवळ कन्नड परगण्यांत जैतापूर हें गांव आहे. तेथील रहिवासी जगन्नाथ शामजी यास एक लग्नाची मुलगी होती. ती मुलगी आपल्या लेकाला करावी असा सदाशिव गबाजी बामणीकर याचा विचार होता. पण जगन्नाथ ती मुलगी देण्यास कबूल होईना. मग त्यास तो मुलगा पसंत नव्हता कीं मुलीचे पैसे घ्यावयाचे होते न कळे. सदाशिवानें आपल्या लेकाला मुलगी करावयाची तर त्या जगन्नाथाचीच करावयाची असा पक्का निर्धार ठरविला. मग त्यास ती मुलगी फार सुस्वरूप वाटली असल्यास न कळे. शेवटीं सदाशिवानें, जगन्नाथावर हत्यार चालवून त्याची मुलगी जबरदस्तीनें धरून नेऊन तिचें आपल्या लेकाशीं लग्न लावलें. या झटापटींत मुलीच्या बापाला जखमाहि झाल्या. तेव्हां या दुहेरी अपराधाकरितां प्रकरण पेशव्यांकडे गेलें. त्यांनीं सदाशिव गबाजीस कैदेची शिक्षा केली नाहीं. पण त्यापेक्षां जी शिक्षा त्याला पक्की जाणवेल असली शिक्षा ठोठावून त्याचें पांच गावांचें कुळकर्णच जप्त केलें. हे नुकसान अर्थात्च फार मोठें होतें. पण तें न करावें तर असल्या पुंडांची खोडकी मोडणार नाहीं व याच धर्तीच्या गावोगांवच्या पुंडांवर वचकहि बसणार नाही. यास्तव तसें करावें लागलें.

ब्राह्मणेतरांचीं लग्नें.

हिंदूंत ज्यांना जात नाहीं असा समाजच नाहीं, फरक इतकाच कीं, जी जात हलक्या प्रतीचीं तिच्यांत नैतिक बंधनें शिथिल. परंतु ज्यांना आपल्या जातीचा कस कमी होऊ नये असें वाटतें ते बीजशुद्धीस फार जपतात. बीजशुद्धि व क्षेत्रशुद्धि ही जातीचीं आयतत्त्वें होत. परजातींतील पुरुषांनीं आपल्या

जातींतील स्त्रियांना बिघडवूं नये व आपल्या जातींतील पुरुषांनीं परजातींतलि स्त्रीबिरोबर संबंध केला असतां त्या स्त्रीची संतति आपल्या जातींत घुसूं नये हें जात शुद्ध राखण्याचें मुख्य गमक होय. एखाद्या जातींतील पुरुषास लग्नाची बायको असून त्याखेरीज राखहि असते. राखेची संतति ती कडू संतति. कडू संतति व अस्सल संतति एका जातींत कांहीं काल पृथक्‌पणें रहातात. परंतु पुढें कडू संततीस श्रीमंती प्राप्त झाली म्हणजे एक प्रकारचें कुलीनत्व येऊन कुलीन म्हणविणारीं घराणीं खालावली असतां गरजेप्रमाणें कडूशीदेखील सोयरीक करतात व अशा रीतीनें फट बुजून जाऊन कडू घराणीं अस्सल घराण्याशी तादात्म्य पावतात. तथापि असें होण्यापूर्वी कडूंना आपलें हीनत्व न खपून ते अस्सलांशीं मिळून जाण्याची आपल्याकडून पराकाष्ठा करतात. त्या काळीं भोंवतालच्या दहापांच कोसांतील गांवांचें एकमेकांशीं दळणवळण असल्यानें तेथील लोकांची परस्परांना चांगली माहिती असे. परंतु त्याहून अधिक अंतरावरचे लोक परस्पर बहुधा अपरिचित असत. कडू कुटुंबांना ही संधि अस्सलांत घुसण्यास उत्कृष्ट असून तिचा फायदा शक्य तर घेतल्यावांचून ते रहात नसत. पुणें व संगमनेर यांच्यामध्यें पसतीस चाळीस कोसांचें अंतर आहे. संगमनेर या मोठ्या गांवच्या विशिष्ट जातीच्या लोकांना पुण्यांतलि विशिष्ट जातीच्या लोकांची माहिती बहुधा असावयाचीच. पण त्याच संगमनेराजवळील खेड्यांचें दळणवळण पुण्याशी नसल्यामुळें पुण्यांतील आपल्या जातभाईंना ते कसचे ओळखणार? ही परिस्थिति पुण्यामधील कांहीं कडू कोष्टयांनीं लक्षांत घेऊन मौजे कोऱ्हाळे परगणे संगमनेर येथें जाऊन चांगल्या जातीच्या कोष्टयांशीं सोयरिका केल्या. कोऱ्हाळयाच्या कोष्टयांना आपली चूक मागाहून कळली. तेव्हां प्रश्न उपस्थित झाला कीं, कोष्टयांतील कडू व गोड यांमध्यें सोयरिका करण्याची चाल आहे कीं नाहीं? तेव्हां कोऱ्हाळकरांची ही फिर्याद सरकारांत आली. सरकार वहिवाट पाहूनच निकाल देणार. तेव्हां वाई, कऱ्हाड, नातेपुते, तारळे, बारामती व येवले या मोठ्या वस्तीच्या गांवांतील प्रमुख कोष्टी व म्हेत्रे यांना हुजूर आणून सरकारानें विचारपूस केली. त्यांनीं अशा प्रकारची सोयरीक होत नसल्याचें सांगितल्यावरून कडूंनीं कडू जातींत वर्तावें असा निवाडा सरकारानें दिला. या बाबतींत गुन्हेगारापासून पांच हजार रुपये नजर करार केले.

मराठे लोकांतहि कडू व गोड हा भेद असल्यामुळें कनिष्ठ दर्जाचे मराठे

वरिष्ठ किंबहुना अधिक कुलीन घराण्यांतील मुलीशी केवळ पैशाच्या व सत्तेच्या जोरावर लग्ने करू चहात. अशा वेळीं कुलीन पण सामान्य मराठे लोकांना सत्ताधीशांच्या कचाट्यांतून सुटण्याकरितां युक्त्या योजाव्या लागत. त्यांपैकीं आपली मुलगी पळवून गुप्त ठेवणें हीहि एक युक्ति असे. एकदां महादजी शिंदे यांच्या मनांत सन १७७६ साली राहूरीकर तनपुरे पाटील यांच्या कन्येशी लग्न करण्याचे आले. तनपुरे ते घरंदाज पाटील होते. तनपुरे यांस याचा सुगावा लागताच त्यांनीं आपली मुलगी पळवून दुसऱ्या स्थळीं ठेवली; तेव्हां महादजी शिंद्यांनी पाटलाच्या घरी चौकी बसविली. पाटलाकडे महादजीतर्फे रोज सरदार येत व काय ते ठरवा म्हणून पाटलाला सांगत. याचा शेवट काय झाला हें समजत नाहीं (पे. द. ४३).

नीतिबाह्य वर्तनास नियंत्रण

मुलींचीं लग्ने आठव्या नवव्या वर्षी होत याच्या फायदा पोटभरू व द्रव्यलोभी लोक कधीं कधीं लबाडीने घेतल्यावांचून रहात नसत. सन १७७०–७१ मध्यें भिऊबाई व्यास या ब्राह्मण स्त्रीनें आपल्या मुलीचे लग्न दोनदा लावले. अर्थात् या युक्तीने तिने दोन जावयांपासून दोनदा कन्याविक्रयाची रक्कम वसूल केली असावी. ही गोष्ट पेशवे सरकारच्या नजरेस आल्यावर त्यांनीं मुलीची आई, मुलगी व तिचा भाऊ या सर्वांना शिवनेरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेवलें [पे. द.] हें उदाहरण ब्राह्मणाचें झालें. पण पुढचें उदाहरण माळी जातींतील आहे. सन १७५२ मध्यें बापूजी माळी याच्या मुलीचा पाट निंबाजी वल्लद येसू झागडा रहाणार सिन्नर याजबरोबर लागला. वास्तविक बापूजीच्या मुलीचा पहिला नवरा मयत झाला नव्हता. तो जिवंत असतां व त्यानें बायकोला टाकून दिली नसतां हा पाट लावण्यांत आला. सदर मुलीचा नवरा धोंडजी हा परागंदा झाला होता इतकेंच. निंबाजीनें पाट लावण्यापूर्वी धोंडजी जिवंत आहे कीं मेला याचा तपास करावयास पाहिजे होता. तो न केल्यामुळें एका बाईला दोन जिवंत नवरे असा विचित्र प्रकार घडला. त्या अपराधाबद्दल निंबाजीला सरकारांतून ८० रु. दंड करण्यांत आला. [पे. द. भाग २ रा]

वरील दोन उदाहरणांत दोन गोष्टींचा खुलासा व्हावयाचा राहिला. दोन्ही उदाहरणांतील अपराध्यांना सरकारांतून शिक्षा झाल्या खऱ्या, पण दोन्ही लग्न

झालेल्या स्त्रियांचें काय झालें हें कळलें नाहीं. जिचीं दोन लग्नें घडून आलीं ती स्त्री अखेर कोणाची बायको ठरली ? ती दुसऱ्या लग्नानंतर व लबाडी नजरेस येण्यापूर्वी ऋतुस्नात झाली नसल्यास तिचें पहिलें लग्नच कायदेशीर ठरणें जरूर होतें. परंतु तिला शिवनेरवर कैदेंत ठेवले यावरून तिला व तिजबरोबर आईला आणि भावाला जातिबहिष्कृत व्हावें लागलें असेंच दिसतें. दुसऱ्या उदाहरणांत निंबाजीला नुसता दंड झाला आहे॰ त्यावरून त्याची पाटाची बायको तिचा पहिला नवरा धोंडजी यास मिळाली असावी किंवा त्यानें ती भ्रष्ट झाल्यामुळें टाकली असल्यास निराश्रित बनून कदाचित् बटिक अथवा कुणबिण होऊन कोठें गेली असावी. वरिष्ठ जातीशिवाय बाकीच्या जातींतून विवाहबंधनें व नीतिबंधनेंहि शिथिल असत. सरकारचा यत्न सर्व जातींत नीतिबंधनें खंबीर राहून समाजाची नीतिमत्ता टिकावी याविषयीं असला तरी ज्या त्या जातीच्या रीतरिवाजाकडे लक्ष देऊन सरकार जातिपरत्वें आपल्या न्यायदृष्टींत फरक ठेवीत असे. कारण तसें न करतां वरिष्ठ जातीचे कडक नियम कनिष्ठ जातींस लावल्यानें त्यांजवर एक प्रकारचा तो जुलूमच व्हावयाचा. या दृष्टीनें संभाजी बिन हरजी गौळी खांडेकर यानें पेशव्याकडे केलेला अर्ज मननीय होय. चेऊल येथील सिंगरूप नांवाचा गवळी मयत झाल्यावर त्याची बायको निराश्रित झाल्यामुळें फिरत फिरत संभाजीचा बाप हरजी याच्या आश्रयाला आली. प्रथम उभयतांनीं परस्पराशीं कसें वागावयाचें याचा पोक्त विचार केला नव्हता. कळत न कळत दोघांच्या हातूनहि चूक घडली आणि त्या बाईचा व हरजीचा मुहूर्त न लागतां संग होऊन त्यांना चिमाजी नामक पुत्र झाला. मजल येथपर्यंत आली त्याअर्थी संभाजीची आई म्हणजे हरजीची बायको मयत असावी. एरवी तिनें या थराला गोष्ट येऊंच दिली नसती. पुढें कांहीं दिवसांनीं हरजी मेला व त्याची ती ठेवलेली बाईहि मेली. हरजीला मरतेसमयीं चिंता पडली चिमाजीची. चिमाजी हा त्याचा रक्षापुत्र होता. त्याची कांहीं वाट न लागली तर त्याला गवळयाच्या जातींत थारा मिळण्याची आशा नव्हती. म्हणून हरजीनें आपला कायदेशीर मुलगा संभाजी याला सांगून ठेवलें कीं, तूं गोत पत्करून चिमाजीला जातींत घेण्याची तजवीज कर. गोत म्हणजे जातींतील पंच. त्या पंचांनीं त्यास जातींत घेण्यास हरकत नाहीं असा निकाल दिला, कीं तो जातगंगेंत पावन झाला असें मानावें. त्यावरून संभाजी व त्याचा चुलता या दोघांनीं गोताकडे

जाऊन चिमाजीस जातींत घेण्यास सांगितलें. ही खटपट याच वेळीं करण्याचें कारण हें कीं, चिमाजीची सोयरीक पुण्यांत व्हावयाची होती. चेऊलच्या गवळ्यांनीं चिमाजीस जातींत घेतलें खरें, परंतु पुण्यांतील गवळीहि तसें करण्यास कबूल झाले पाहिजेत ना ? पण पुण्यांतील गवळ्यांस तशी आज्ञा कोणी करावयाची ? तर पेशव्यांनीं. यासाठीं सदर प्रकरण पेशव्यांकडे आले. पेशव्यांच्या आज्ञेवरून पुणेंकर गवळ्यांनीं चिमाजीचे गोत पत्करून त्यास जातींत घेतले व त्याचें लग्नहि झालें. परंतु केवळ चौल व पुणें येथील गवळ्यांच्या निकालानें चिमाजी व त्याचे सोयरे यांचा परिणाम लागणारा नव्हता. त्यांचा ज्यांच्याशीं संबंध असे गवळी महाड, पेण, बिरवाडी, भोरप, आपटे, पाल, बोरधामणी इत्यादि गांवींहि होते. त्या गांवांच्या गवळ्यांसहि पेशव्यांनीं चिमाजीस जातींत घेण्याची आज्ञा केली. तत्कालीन सरकारचें प्रजेशी वागण्याचें धोरण कसें खुबीदार व आपलेपणाचें होतें हें चिमाजीच्या दाखल्यावरून कळून येतें.

वसईच्या बाजूस कांहीं यजुर्वेदी ब्राह्मण रहात असत. मामा व भाच्या यांचें लग्न लावण्याची चाल ब्राह्मणांच्या कांहीं पोटजातींत आहे. तथापि ती चाल यजुर्वेदी ब्राह्मणांत नसतां कित्येक यजुर्वेदी ब्राह्मणांनीं आपल्या मुली त्यांच्या मामांना दिल्या. हें कर्म अयोग्य असा निर्णय होऊन अशा ब्राह्मणांपासून ५० रु. दंड घेऊन त्यांना जातबिगळें केलें (पे. डा.) गुन्ह्याच्या मानानें ही शिक्षा सद्यःकाळीं कोणास जबर वाटेल. परंतु जितकी जात श्रेष्ठ तितकी धर्मानुसार वागण्याची जोखीम तिजवर अधिक हें तत्व एकदा गृहीत धरल्यानंतर त्याविरुद्ध कुरकुर करण्यांत अर्थ काय ? तेंच खालच्या जातीस वागविण्याचें धोरण कसें निराळें होतें पहा. मौजे औंध [पुण्याजवळचें] येथील बाबाजी गुरवाचा मुलगा बहिरजी यानें महारणीशीं बदमल केला इतकेंच काय, पण तो तिला घेऊनहि राहिला. बाबाजीनें बहिरजीच्या वर्तनाकडे कानाडोळा केला; सबब बाबाजी मजकुरास गांवानें कुटुंबासहवर्तमान वाळींत घातला होता. पण त्या कुटुंबानें वाळींत तरी किती दिवस रहावयाचें ? वाळींत पडण्यानें. सदर कुटुंब स्वजातीस अंतरलें होतें, व महारांत जाऊन पडण्याचीहि त्याची तयारी नव्हती. अशा स्थितींत ही भानगड मिटविण्यास गोतच समर्थ. गोताच्या पंचाइतींत त्याला जातींत घेण्याचें ठरलें व त्या निवाड्यास सरकारची मंजुरीहि मिळाली. मात्र त्याबद्दल बाबाजीस सरकारांत ५० रु. शेरणी [दंड] भरावी लागली. [पे.

डा.] अशा रीतीनें त्या गुरवाच्या कुटुंबाला दहशत बसून खेरीज गांवांतील खेंकटेंहि मिटल्याने गांवचा व्यवहार पूर्वपद्धतीस धरून सुरळीत चालू झाला. व्यभिचाराच्या खटल्यांचा निवाडा तारतम्यानें करण्यांत येई. व खटल्याच्या स्वरूपाप्रमाणें शिक्षेचें मानहि बदलत जाई. १७५४ सालीं एका कोळणीवर बदकर्माचा आरोप आला. तिला सदर अपराधाबद्दल बटीक होण्याची पाळी यावयाची. पण तिच्या जातीच्या लोकांनीं तिच्या बाजूनें रदबदली केल्यावरून तिजपासून ५० रु. दंड घेऊन बटीकपणांतून सरकारनें तिला मुक्त केलें. सन १७८५-८६ मध्यें मावळ तालुक्यांतील विसापूरच्या किल्ल्यांत जानकी नामक स्त्री व्यभिचारावरून कैदेंत होती. तिची वर्तणूक पुढें चांगली राहील अशा विषयीं तिचा बाप जामीन राहिल्यामुळें तिची मुक्तता झाली. पण पुढील शिक्षेच्या मानानें वरील शिक्षा सौम्यच वाटतील. घोलवड प्रांत जुन्नर येथील अहिली कोम जानोजी हिनें देवजी खंडोजी रहाणार चिंचवड याजबरोबर बदकर्म केलें. म्हणून देवजीस दंड झाला व अहिलीचें नाक कापलें गेलें. अहिलीस इतकी कडक शिक्षा ती अट्टल व्यभिचारी होती म्हणूनच झाली असावी. नाक कापण्यानें ती कुरूप बनून तिच्याकडे पापी नजरेनें पाहण्याची कोणासही वासना होणार नाहीं हा शिक्षा देण्यांतील मुख्य मतलब दिसतो. खेरीज ती छाटलेल्या नाकानें जेथे जाईल तेथे तिच्या बदकर्माची प्रसिद्धि आपोआपच होईल.

सकेशा विधवा

तरुण स्त्रियांना वपन करण्याचे जिवावर येइ. एक तर त्या विद्रूप दिसत व त्यामुळें त्यांस ओळखीच्या लोकांना तोंड दाखविण्याची लाज वाटे. खेरीज डोकीवरचा तो सुंदर केशकलाप काढून टाकण्याकरितां न्हाव्यापुढे बसण्याच्या विचारानें तर त्यांच्या अंगावर काटाच उभा राहत असे. नवऱ्याच्या मृत्यूमुळें स्त्रियांना जीं अनेक दुःखे भोगावीं लागत, त्यांपैकीं हें दुःख दारुण असून नवरा क्वचित् दुष्ट व निर्दय असतांहि जिवंत रहावा यासाठीं स्त्रिया जर देवाला नवस करीत असतील तर त्याचे एक कारण हेंहि असले पाहिजे असे वाटते. कांहीं स्त्रिया त्यांना ही संन्यासदीक्षा बळजबरीनें देण्यांत आली तरी त्यांची नटण्यामुरडण्याची व पतिसुखाची आवड पुरी न झाल्यामुळें पापकर्मास प्रवृत्त होत. ' राजारामभट बिन सदाशिवभट हा ब्राह्मण गोदावरीवरील श्रीक्षेत्र पुण-

तांबे येथील रहिवासी. तो मृत्यु पावला तेव्हां त्याची स्त्री जान्हवीबाई हिचें क्षौर करण्यांत आले. पुढें ती बाई अंताजी मुकुंद गोळक राजेवाडीकर याजपाशीं राहिली. तिचे व त्याचे प्रेम जमल्यावर तिला केस वाढविण्याची व कांकणें घालण्याची आवड उत्पन्न झाली. त्याप्रमाणें तिनें केल्यावर तिला गोळकापासून पुत्र झाला. तो सात आठ वर्षांचा असतां हें बदकर्म सरकारास कळल्यावर जान्हवी व तिचा पोरगा यांना किल्ले पुरंदरास अटकेंत ठेवण्यांत आले. त्यांजपासून चुना वाटवून घ्यावा व त्यांच्या पोटास रोज द्यावा अशी त्यांस सक्त मजुरीची शिक्षा झाली.

सतीचें सहगमन

वयस्क स्त्रिया आतां आपला संसार झाला, नवऱ्याच्यामागें जगून सुख काय या भावनेनें पुष्कळदा आपखुषीनें सती जात. गोविंद हरि पटवर्धन याची बायको सत्यभामाबाई याच उद्देशानें सती गेली. अल्पवयी स्त्रिया नवऱ्याच्यामागे बिघडतील या समजुतीनें त्यांजवर सती जाण्याची सक्ती होई व अशा जालीम उपायानें व्यभिचारास आळा घालण्यांत येई. बरे, ज्या अगदीं वयस्कहि नसत व अल्पवयीहि नसत पण संतानहीन असत अशांना कोणी पुसणार नाहीं व त्यांचे हाल फार होतील म्हणूनहि सती जाण्याचा मार्ग त्या स्वीकारीत. थोरल्या माधवरावाने रमाबाईस सहगमन करण्यास स्वतःच सांगितलें होतें त्याचें कारण हें शेवटचें असावे. 'मोरोबा दादा फडणीसांचे वडील बाबूराव फडणीस वारले तेव्हां त्यांची स्त्री सती गेली. ती फार नाजूक व सुंदर होती.' (ऐ. ले. सं. खंड ४) ही बाबूरावाची दुसरी बायको. सती जाण्यानें स्त्रियांना सद्गति मिळते अशीहि समजूत होती. तिचा पारलौकिक विचार सोडला तरी ऐहिकापुरता वरील दृष्टीनें तिच्यांत अर्थ होता हें कबूल करावें लागतें. परंतु पारलौकिक विचार करणारा आप्पाजी त्रिंबक पोंक्षे हा पटवर्धनांचा पुण्यांतील कारकून पांडुरंगराव, पटवर्धनांना मिरजेस लिहितो 'कृष्णाजी हरि साठे निवर्तले. त्यांना बायका दोघी. श्रीमंतांची (नारायणराव पेशव्यांची) सासू धाकटी ती गरोदर. थोरली बायको समागमे जाईन म्हणून म्हणत होती. परंतु इष्ट संबंधी यांनीं समजावून घेतली म्हणून राहिली. कपाळीं नसतां कोठून जाईल ?' (ऐ. ले. सं. खंड ४ था सन १७७२) रूढी पुढें मान वाकवून लौकिकास्तव सती

जाऊं इच्छिणाऱ्या पण अनिश्चित स्वभावाच्या स्त्रीचें हें उदाहरण होय. त्यावरून सती जाणाऱ्यांना कोणकोणते विचार कारण होत याचा उलगडा करतां येतो. सतीची चाल एकट्या ब्राह्मणांतच होती असें नाहीं. कित्येक मराठे सरदारांच्या स्त्रियाहि सहगमन करीत. माधवराव पेशवा गोपिकाबाईस लिहितो ' महाराव जानोजी निंबाळकर यास आषाढ वद्य १२ शनिवारी देवाज्ञा झाली. त्यांची स्त्री समागमे गेली ' (ऐ. ले. खं, १ सन १७६३). सतीं जाणें म्हणजे स्वतःस जिवंतपणीं जाळून घेणें होय. यासारखें स्त्रियांचे बाबतींत लोकोत्तर धैर्याचें व स्वार्थत्यागाचें कृत्य दुसरें कोणतेंहि नसेल. तें कृत्य करण्यास तयार होणाऱ्या स्त्रियांना समाजांत दैवततुल्य मान मिळत असे. सती जाणारी स्त्री सर्व जिवंत स्त्री-पुरुषांत श्रेष्ठ समजली जाई. ती सतीचें वाण घेऊन निघे, तेव्हां तिच्या पायावर सर्व आबालवृद्ध डोकें ठेवून तिच्या आशीर्वादानें स्वतःस पावन करून घेत. सतीचें नांव त्या गांवात चिरस्मरणीय होऊन राही व तिच्या स्मरणार्थ देवालयहि बांधीत. अशा प्रकारचीं सतींची जुनीं देवळें महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं अद्यापि आढळतात. माधवराव पेशव्याची पत्नी साध्वी रमाबाई सती गेली तो प्रसंग इतिहासप्रसिद्ध होय. ती सती जाण्याकरितां धर्मशिळेवर उभी राहिली तेव्हां मोठमोठ्या सरदारानीं तिच्यापुढें आपलीं मस्तकें लवविली व तिनें प्रसाद म्हणून मोहरा, पुतळ्या, आंगठ्या वाटल्या. ह्या ज्यांना ज्यांना मिळाल्या त्यांनीं त्यांनीं अत्यंत पवित्र वस्तूप्रमाणें त्या जतन करून ठेवल्या. अशा एका साध्वीच्या बलिदानाचा एकंदर स्त्री जातीच्या हृदयावर कोरीव लेखाप्रमाणें दृढ परिणाम होत असेल. तें पातिव्रत्याचें सजीव चित्र होय. तें चित्र ज्यांच्या डोळ्यांनीं पाहिलें त्यांना पतिव्रतेचा धर्म रामायण व महाभारत यासारखे ग्रंथ तरी अधिक काय शिकविणार ? हिंदु स्त्रियांना पतिव्रता धर्माची थोरवी बिंबवून देण्यास लाखो सतींची आहुतीच पुष्कळ अंशीं कारणीभूत झाली यांत शंका नाहीं. कारण ज्यांना सती जाण्याची छाती होत नसे, त्या स्त्रियांना पतिनिधनानंतर अत्यंत पवित्र रहाण्याची ताकीद सहगमन केलेल्या स्त्रियांची स्मृति रात्रंदिवस देत असली पाहिजे. स्त्रीवर्गांत चाललेलें हें दिव्य वारंवार पाहिल्यामुळें तत्कालीन समाज तलवारीच्या पात्याप्रमाणें तेजस्वी रहावा यांत नवल काय ? मात्र सती जाणाऱ्या स्त्रिया समाजांत थोड्या असत, ही गोष्ट कोणी विसरू नये.

गरती स्त्रियाकडून व्यभिचार होऊं नये यावर समाज व सरकार या उभ-

यतांची करडी नजर होतीच. मग ज्यांचा तो पोटाचा धंदा अशा स्त्रियांना किती निंद्य व पापी मानण्यांत येत असेल याची कोणासहि सहज कल्पना येईल. गंगा व जमना या कळवंतिणी पुण्यांतील सोमवार पेठेतील नागेश्वराच्या देवळांत शिवरात्रीच्या दिवशीं गेल्या होत्या. त्यांना देवळाच्या सभामंडपांत जाण्यास हरकत असण्याचें कारण नव्हतें. पण त्या देवळाच्या गाभाऱ्यांत शिरल्या व त्यांना शंकराजी गुरवानें देवाचा प्रसादहि दिला. त्यांनीं गाभाऱ्यांत शिरून देऊळ भ्रष्ट केल्याच्या गुन्ह्याबद्दल त्यांजपासून दोनशे रुपये गुन्हेगारी घेण्याचें ठरले व सदर गुन्ह्यास मदत केल्याबद्दल गुरवापासूनहि २० रु० गुन्हेगारी करार करण्यांत आली.

बहिष्काराचें हत्यार

साताऱ्याचे छत्रपति हे हिंदूराजे असल्यामुळें त्यांच्यापाशीं राजकीय व धार्मिक अशा दोन्ही सत्ता एकवटल्या होत्या. छत्रपतींचे कुलमुखत्यार पेशवे यांजकडे त्या दोन्ही सत्ता ओघानेंच आल्या. त्या दोन्ही सत्तांचा उपयोग ते प्रजाशासनाचे वेळीं जरूरीप्रमाणें करीत. धर्मशासनांतील प्रबल शस्त्र बहिष्कार. याचा अवलंब पेशव्यांनीं अनेकवार केला आहे. गोदावरी व प्रवरा या दोन नद्यांचा संगम ज्या क्षेत्रीं झाला आहे त्यास प्रवरासंगमच म्हणतात. हें क्षेत्र नाशीक, माहुली, कऱ्हाड, पुणतांबे, पंढरपूर या क्षेत्रांच्या तोडीचें असून येथें ब्राह्मणवस्तीहि मोठी होती. त्या काळीं खून व मारामाऱ्या हल्लीइतक्या दुर्मिळ झाल्या नव्हत्या. लोकांचा हत्यारपात्याराशीं संबंध नित्याचा होता. आजकाल जशी काठी किंवा छत्री कोणाच्या हातांत किंवा बगलेंत दृष्टीस पडते, त्याप्रमाणें तलवारी, जंबिये, भाले, इत्यादि हत्यारें शिपाई गड्याच्या कंबरेस लटकावलेलीं अथवा खांद्यावर टाकलेलीं असावयाचींच. किरकोळ कारणावरून भांडण झाले तर त्याचा शेवट खून व रक्तपात यांत व्हावयाचा. जे योद्धे किंवा लढवय्ये नव्हते त्यांच्या हाताशी सदैव शस्त्रें नसलीं तरी घरांत तीं स्वसंरक्षणासाठीं ठेवलेलीं असत. हे लढाऊपणाचे वारे लाडू, जिलेब्या व कढीभात खाणाऱ्या भिक्षुक ब्राह्मणांच्या अंगांतहि खेळत होते. ते जोर जोडी करीत, नमस्कार घालीत व कुस्त्याहि मारीत. भिक्षुकीतील परान्नाचा, श्राद्धपक्षाच्या क्षणाचा व लग्नकार्यांत याचकवृत्तीनें हात पसरण्याचा कंटाळा आला असतां पळीपंचपात्री व दर्भाची काडी कोना-

ज्यांत झुगारून देऊन ते वीरवृत्तीनें समरभूमींवर उभे राहण्यास तयार होत. काय कारण घडले असेल तें असो, पण कांहीं प्रवरासंगमकर ब्राह्मणांच्या हातून ब्रह्महत्या झाली. ज्यांच्याकडून ती झाली त्यांच्याकडून ती चुकून किंवा रागाच्या भरात झाली असावी असें दिसते. म्हणून ब्रह्महत्येची बातमी पेशव्यांच्या दरबारी कळून गुन्हेगार हुडकून काढण्यासाठीं चौकशी सुरू झाली असतां तेथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं कट करून गुन्हेगार ब्राह्मणांना पाठीशीं घालण्याचे ठरविलें. कारण गुन्हेगाराचा पत्ता न लागल्यास पेशवे शिक्षा कोणाला करणार ? सारे ब्राह्मण म्हणूं लागले कीं आम्ही सर्वांनींच ब्रह्महत्या केली. आतां पेशवे काय करणार इकडे सगळे पहात राहिले. पेशव्यांनाहि कोडे पडले. पण त्यांनीं अखेर सगळयाच ब्राह्मणांना वाळींत टाकण्याची युक्ति काढून नांवें कोणाचीं समजलींच तर त्यांना बंदींत ठेवावें व ज्यांनीं ब्रह्महत्या केली नाहीं त्यांना प्रायश्चित्त देऊन बंदीतून मुक्त करावें अशी आज्ञा केली.

कनोजा ब्राह्मण सुखनिधान यानें सुमारे चौदा वर्षें आपण सदाशिवराव भाऊ आहों असें खूळ माजवून महाराष्ट्रास सतावून सोडलें होतें. तोतयाच्या चाळयांनीं विशेष पीडा झाली नाना फडणविस, सखारामबापू बोकील आदिकरून पेशव्यांच्या कारभाऱ्यांनाच. कारण कोकणांतील पुष्कळ कामगार, कमाविसदार, मामलेदार व कित्येक सरदार, दरकदार, जमीनदार व घाटावरील मुलखांतील लोक तोतयास मिळाले होते. त्यांत नारो महादेव रिसबूड, लक्ष्मण कृष्ण कोल्हटकर, फलटणचे नारोपंत रानडे वगैरे वयोवृद्ध ब्राह्मण होते. तोतयानें रत्नागिरीचा किल्ला घेऊन भोवतालचा मुलूख बळकावला. सदाशिवरावाची बायको पार्वतीबाई पेशवे हिलाहि तोतया हा खराच सदाशिवराव असावा असें भ्रमानें वाटत होतें. अखेर तोतयाचें स्वरूप उघडकीस येऊन त्याची पुण्यांतून धिंड काढून डोक्यांत मेखसूं घालून त्यास ठार मारण्यांत आलें. त्यानंतर कारभारी तोतयास जे मिलाफी होते त्यांच्या हात धुवून पाठीस लागले. अशा लोकांना त्यांच्या मतें तुरुंगाची किंवा दंडाची शिक्षा अगदींच अपुरी होती व त्यांची संख्याहि इतकी मोठी होती कीं अशी शिक्षा देऊन सर्वांचें पारिपत्य करणें दुष्कर म्हणून या राजद्रोहाच्या गुन्ह्याबद्दल वेगळीच शिक्षा कारभाऱ्यांनीं हुडकून काढली. बहिष्कार ही ती शिक्षा. सदर शिक्षेचें स्वरूप इतकें उग्र आहे कीं, तिच्या इतका जाच दुसऱ्या कोणत्याहि शिक्षेचा होणार नाहीं. सुखनिधान तोतया

रत्नागेरीच्या किल्ल्यावर अटकेंत होता. तेथील कमाविसदाराकडील कारकून शिवाजी आप्पाजी वगैरे ब्राह्मणांनीं तोतयास मिळून त्याची बिडी तोडली व कोकणांत दंगा मांडला. पुढें हुजुरून फौज पाठवून तोतयाचें व त्याचे भिलाफी यांचें पारिपत्य करण्यांत आलें. तथापि तेवढ्यानें न भागतां तोतयाकडे जे कोकणांतले व देशावरचे ब्राह्मण गेले होते त्यांचा शोध करून ज्यांनीं तोतयाचे पंक्तीस अन्नव्यवहार केला असेल, ज्यांनीं त्याची श्रावणी केली असेल, श्राद्धपक्षाचा क्षण घेतला असेल, त्या ब्राह्मणांना तूर्त प्रायश्चित्त द्यावयाचे नाहीं, व त्यांजबरोबर कोणी अन्नव्यवहार करावयाचा नाहीं असें कारभाऱ्यांनीं आज्ञापत्र काढलें. आणि रिसबूड प्रभृति सर्व फितुऱ्यांची चीजवस्त जप्त करण्यांत आली. मात्र त्यांचा संसर्ग ज्यांना झाला असेल त्यांना यथोक्त प्रायश्चित्त द्यावें एवढीच सवलत ठेवण्यांत आली.

ज्ञातिधर्माचे परिपालन

निर्बंध म्हटला कीं, त्यांत पक्षपात नसे. प्रत्येक जातसि त्या जातींत चालू असलेला व्यवसाय किंवा आचार पाळावयास लावणे पेशवे आपले कर्तव्य समजत. सोनार आपणास वेदोक्ताचा अधिकार आहे असें म्हणत. एक सोनार वेदाच्या नकला करून घेत होता. त्याबद्दल व त्यानें घरांत शाळिग्राम बाळगल्याबद्दल त्याच्या घराची झडती घेण्यांत आली आणि त्यास शासन करण्यांत आलें. एक साळयाची बाई दोन वर्षें दळण व मोलमजुरी करून रहात होती. हें कृत्य तिच्या जातीस सोडून असल्यामुळें जातवाल्यांनीं तिला वाळींत टाकलें. एक पटवेकरी व जंगम यांचा तंटा धंद्यासंबंधानें लागला. पटवेकऱ्याचें काम रेशीम वळण्याचें. तें काम आपलेंहि आहे असें जंगमाचें म्हगणें पडलें. तेव्हां हा तंटा पैठण क्षेत्रांतलि ब्राह्मणांकडे गेला. त्याचा निकाल ब्राह्मणांनीं देऊन पटवेकऱ्याचें काम रेशमाचें व जंगमाचें काम कापसाचें असें ठरविलें.

' खंडो श्यामराज बेलसरे जोशी कुळकर्णी मौजे साकुर्डे व मौजे राजेवाडी तर्फ कऱ्हेपठार व सखो मोरेश्वर बेलसरे हे उभयता एकजथी भाऊ असतां खंडो श्यामराज याजकडील सुतक सखो मोरेश्वर याने व त्यांचे सख्खे भावांनीं धरलें नाहीं; सबब सखो मोरेश्वर व त्याचा भाऊ याजवर बहिष्कार घालून त्याचे हिश्शाचें वतन मौजे मजकूर येथील तिही गावचे ज्योतिषकुळकर्णाचें

सरकारांत जप्त करून जप्ती रखमाजी नारायण कारकून शिलेदार यांचें नांवें सांगण्यांत आली ' (पे. डा.)

पुत्रजन्माचा आनंद

पुत्रजन्माचा आनंद कांहीं वेगळा असे. हा आनंद ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें व्यक्त करण्यांत येई. राघोबादादाची बायको आनंदीबाई हिला पुत्र झाला तेव्हां लोकांनीं त्यांस नजरा केल्या, पुण्यांत साखरा वाटण्यांत आल्या आणि वाजंत्रीं व कर्णे लावले होते. हा जन्म बहुधा बाजीरावाचा असावा. सवाई माधवरावाचा जन्मोत्सव अधिक थाटानें साजरा झाला. कारण त्या योगानें पेशव्यांच्या गादीस वारस उत्पन्न होऊन राघोबास गादी मिळण्याची प्रजेस वाटणारी भीति दूर झाली. नारायणराव पेशव्याचा खून राघोबा व आनंदीबाई या दोघांच्या प्रेरणेनें झाला अशी लोकांची पक्की खात्री असल्यामुळें ज्या दुष्ट हेतूनें राघोबानें हें अघोर कृत्य घडवून आणिलें तो दुष्ट हेतु निष्फळ झालेला पाहून प्रजाजनांच्या आनंदास सूड घेतल्याचें समाधानहि लाभलें. या कारणानें वरील जन्मोत्सवांत विशेषच उल्हास दिसून आला.

सवाई माधवरावाची आई गंगाबाई हिजवर आनंदीबाईकडून विषप्रयोग होईल या धास्तीनें तिला आधींपासून पुरंदर किल्ल्यावरच कारभाऱ्यांनीं बंदोबस्तानें ठेवलें होतें. त्याच्या जन्मानंतर दररोज अकरा दिवस मराठ्यांच्या बायका हेलकरणी होऊन पाणी घालीत होत्या. बारामती, सुपें, फलटण, वाई, सासवड येथील व पुण्याजवळच्या खेड्यांतील सात आठ हजार बायका हेल घालण्यासाठीं मुद्दाम आल्या होत्या. पुरंदरापासून बारामती, सुपें, फलटण, वाई, पुणें हीं गांवे बारा, पंधरा, वीस कोसांवर आहेत. त्या आल्या त्या फुकट आल्या नाहींत. कारण त्यांना त्याबद्दल इनाम किंवा आहेर म्हणून लुगडीं व चोळखण देण्यांत आले. पुण्यांतील स्त्रियांनीं शनिवारवाड्यांतच पाणी घातलें. अशा स्त्रिया दहा हजार असून त्यांसहि चोळखण मिळाले. त्यामुळें आबालवृद्धांस संतोष झाला. (ऐ. ले. सं. खंड ५ वा)

पुत्र न झाल्यास दत्तक घेण्याची वहिवाट पूर्वापार आहेच. पण मोठेपणीं दत्तक घेतलेल्या पुत्राची त्या आईबापांवर माया नसते व त्यांचीहि मुलाचें लालनपालन करण्याची हौस भागत नाहीं. यासाठीं त्या काळांत एक निराळीच युक्ति

लढविल्याचें उदाहरण सांपडतें. एकीला मुलगी झाली व: दुसरीला मुलगा झाला तर उपजतांच एकमेकींच्या खुषीनें मुलांची अदलाबदल करून पुत्रलाभाची उणीव भरून काढण्यांत येई. अशा देवघेवींत कित्येक वेळां असेंहि घडे कीं, एखादीला सगळेच मुलगे झाले असल्यास तिला कन्यालाभ व दुसरीला पुत्रलाभ करून घेतां येत असे. सवाई माधवरावाचे बाबतींत असा लोकप्रवाद आहे. परंतु त्याला ऐतिहासिक आधार मुळींच नसल्यानें कोणी कुटाळ लोकांनीं ही कंडी पिकवून दिली असावी असें वाटतें. तथापि असल्या गोष्टी त्या काळीं अगदीं अशक्य नव्हत्या हें पुढील हकीकतीवरून दिसून येईल. पुण्यास विसाजीपंत लेले याच्या बायकोस पुत्र झाला व मेहुणीस कन्या झाली. तेव्हां मेहुणीला पुत्र पाहिजे असल्यामुळें तिला तो देऊन तिजपासून विसाजीपंताच्या बायकोनें कन्या घेतली. हा सारा कारभार बारा दिवसांच्या आंतील व बायकाबायकांतील. या गोष्टीस दोन महिने होऊन गेले. तों बातमी फुटून ती गुणगुण विसाजीपंताच्या मेहुणीच्या भ्रतारास कळली. त्याला तें खपलें नाहीं. बायकोला पुत्र हवा होता तसा नवऱ्याला नको होता असें नाहीं. पण त्याला सोयऱ्याधायऱ्याचें उसनें मूल नको असल्यानें तो सरकारांत फिर्याद गेला. विसाजीपंत लेल्याला पुत्र कांहीं जड झाला नव्हता. त्यानें तो परत घेतला. (ऐ. ले. सं. खंड ४ था)

भोळसरपणा

लोक अज्ञानामुळें बरेच भोळे होते. त्यांच्या बुद्धींत चिकित्सकपणा फार कमी होता. एखादी गोष्ट कळली असतां तिच्या शक्याशक्यतेचा तादृश विचार न करतां ते तिजवर विश्वास ठेवीत. पुढें कांहीं संकट वाढून ठेवलें असलें तर त्याचीं दुश्चिन्हें सृष्टींत परमेश्वर आधी दाखवितो अशी त्यांची समजूत होती. सन १७६४ त कोळ्यांनीं सरदार पुरंदरे यांजपासून पुरंदरचा किल्ला घेतला. त्यावेळीं दुश्चिन्ह म्हणून गंगाधर बापूजी ओक फडणीस याने पुण्याहून मिरजेस गोविंद हरी पटवर्धनास पुढील चमत्कार कळविला. ‘ कोळ्यांनीं पुरंदर घेतला आणि निलकंठ महादेव (पुरंदरे) तेथें गेले. तेव्हां येथून (पुण्याहून) बाळोबा मांडवगणे सासवडास गेले होते. तेव्हां गांवाजवळ संगमेश्वर देव आहे, तेथील नदीमध्यें [करा नदींत] विहिरा होता. त्यांतील झऱ्यास रक्त येऊं

लागलें. ते समयीं हे स्वतः गेले आणि त्यांत अंगवस्त्र टाकलें. तें भिजलें तों रक्ताप्रमाणें पाणी आणि पिळलें तों रक्त पडलें. ऐसें तीन दिवस होत होतें. त्यास एक महिना झाला.' गंगाधर बापूजी फारच भोळा दिसतो. त्याला असले चमत्कार ऐकण्याचा नादच असावा. त्याच पत्रांत तो आणखी लिहितो, 'मौजे निंबगांव टाकळी घोडनदी तीर येथें ज्येष्ट वद्य ११ चे दिवशीं सायंकाळीं दिवस दोन घटका ते समयीं गांवचे दहापांच माणूस गावकरी [घोडनदीच्या] तीरास गेले होते. तेथील कौतुक–मेघडंबर आलेसें झालें. आणि अकस्मात् एक मोठा घागरीएवढा वाटोळा दगड पडला आकाशावरून. तो भूमिगत होता. तो तेथून निघाला तो आभाळास लागला. तेव्हां वर गर्जना झाली. वृष्टि एक बिघापावेतो दगडांची झाली. हें कौतुक जवळिल पहात आहेत तों तो दगड घोड्याएवढा झाला. घटकाशी जाहली तों हत्तीहूनहि मोठा झाला. गडबडत नदींत गेला. हे भयभीत तोंपर्यंत होते. मग सावध होऊन जागा बघितला तो हातभर खोल मात्र आहे आणि बिघाभर दगड पडले आहेत. त्यांनीं गांवांत जाऊन सांगितलें. मग सर्व भोंवर गांवामधील [लोक] पहाण्यासी आले. येथूनही फडणविसांनीं कारकून पाठविला. तो देखिल पाहून आला' [ऐ. ले. सं.] पाषाणवृष्टि झाल्याचीं उदाहरणें ऐकण्यांत आहेत. परंतु आकाशांतून दगड घागरीएवढा खालीं पडतो काय, तो पुन्हा आकाशापर्यंत चढतो काय, घागरीचा घोड्याएवढा होतो काय व घटकेंत त्याला हत्तीहूनहि मोठा आकार येतो काय ! या हकीकती आज अशक्य समजून त्या लिहिणाराची कोणीहि कीवच करील. पण त्या काळांत साऱ्या चमत्कारिक कंड्या खऱ्या वाटत व जगाला पुढचे दिवस फार कठिण येणार अशी सार्वत्रिक समजूत असल्यानें अशा भयसूचक गोष्टी लोक सचिंत व गंभीर मनानें ऐकून घेत. बरें, तशांतून पराचा कावळा करणाऱ्या लोकांचा स्वभाव लक्षांत घेतल्यास ते सुतानें स्वर्ग गांठण्यास ते कमी करीत नसतील.

'शके १६८६ म्हणजे सन १७६४ सालीं श्रावण शुद्ध रविवार या दिवशीं तिसरे प्रहरीं भूकंप झाला. त्याचे धक्के नाशीक, पुणें, पैठण, राहुरी, पिंपळगांव, धोम, वाई, कऱ्हाड, पंढरपूर, वारणातीर असे बहुतेक महाराष्ट्रभर बसले. त्याबद्दल गोविंदपंत पटवर्धन लिहितो, 'याचा फलादेश श्री जाणे' [ऐ. ले. सं.]-

कोल्हापुरास राणी जिजाबाईकडून कोल्हापूरच्या मठांतील जगद्गुरूच्या वृंदावनास उपद्रव झाला. त्याचा व या भूकंपाचा संबंध जोडून गोविंद हरि गोपाळरावास लिहिलेल्या पत्रांत म्हणतो, ' श्रीमंतास (माधवराव पेशव्यांस) बोध करून तेवढा उपाय करावा. अधर्म घडो लागले, त्यामुळें पृथ्विवर दुश्चिन्हें होऊं लागली. ' (ऐ. ले. सं.)

प्रकरण एकोणिसावें

दास-दासी

दासदासी बाळगण्याची चाल एक वेळ सर्व जगभर होती. प्राचीन काळी हिंदुस्थानांतहि राजे लोक दास-दासींना जवळ बाळगीत असत. पौराणिक काळातील राजांच्या भोवतीं दासींचा तर घोळकाच असे. हरिश्चंद्र राजाने स्वतःच्या पत्नीस, पुत्रास व स्वतःसहि दास म्हणून विकून घेतले. पांडवांची राणी द्रौपदी हिला द्यूतांत जिंकून घेतल्यावर दुःशासन प्रभृति कौरव तिला दासीच लेखीत होते. हिंदुस्थानाप्रमाणें आशिया, युरोप, अमेरिका इत्यादि खंडांतील देशातहि ही चाल असून तिला गुलामगिरी या सर्वसामान्य संज्ञेनें ओळखण्यांत येत असे. आफ्रिकेंतील सिद्दी लोकांना धरून अमेरिकेंत गुलाम म्हणून विकण्याचा पोर्तुगीजांचा धंदाच होता. ते लोक निग्रो या नांवाने आजहि अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांत नांदत आहेत. निग्रो लोकांनीं अमेरिकेंत गेल्यावर सुमारें तीनशे वर्षे गुलामगिरीत काढली. तेथें वर्तमानपत्रें निघाल्यावर अठराव्या शतकांतील वर्तमानपत्रात ज्या अनेक जाहिराती येत, त्यांत गाडी घोडा, घर यांच्या विक्रीच्या जाहिरातीप्रमाणें निग्रो गुलामांना विकण्याच्याहि जाहिरातीं दिल्या जात. असल्या दोन जाहिराती अमेरिकेंतील ' दि वेस्टर्न इव्हिनिंग गॅझेट ' या पत्रात सन १७४१ सालीं प्रसिद्ध झालेल्या आढळतात त्या येणेंप्रमाणें.

' या पत्राच्या मुद्रकास बोस्टन शहरांत रहाणारी एक अति उत्कृष्ट निग्रो स्त्री विकावयाची आहे. तिच्या अंगावर देवींचे व्रण आहेत. ती घोड्यासारखी जोमदार, पांखरासारखी चलाख व ' बीव्हर ' जनावरासारखी कष्टाळू आहे. '

ही जाहिरात निग्रो स्त्री विकण्याची झाली. खालील जाहिरात निग्रो पुरुष विकावयाचा त्याविषयीं आहे.

' या पत्राच्या मुद्रकाचा एक निग्रो पुरुष विक्रीस तयार आहे. त्याची उमर तीस वर्षे. त्याला शहरांतला व खेड्यांतला व्यवहार चांगला समजतो. त्यांतल्या त्यांत खेडयांतील कामाला तो विशेष उपयुक्त आहे. कारण खेडयांत दारूचे गुत्ते

नसतात. त्याने छापखान्यांत १५।१६ वर्षे काम केले आहे. त्याला कुऱ्हाड, करवत, फावडे इत्यादि शेतीची आउतें वापरता येतात. तसाच सूपशास्त्रांतहि तो निपुण आहे ! '

मुसलमानांचे पाऊल या कामांत सर्वांच्या पुढें. लढाईत शत्रूच्या पकडलेल्या स्त्री-पुरुषांना ते गुलामगिरीत घालीत. तुर्कस्थानांत गुलामांच्या विक्रीचे बाजारच असत. सर्व्हियन लोकांच्या सुंदर स्त्रिया तुर्कांनी बुटाच्या किंमतीला विकल्याचा दाखला इतिहासात सांपडतो. हिंदुस्थानात गुलामांचे राजघराणेंच दिल्लीस राज्य करीत होते. दक्षिणेतील ब्राह्मणी राज्याचा संस्थापक हुसेन खान हा दिल्लीत गंगू नामक ब्राह्मणापाशी गुलामच होता. ही चाल अठराव्या शतकांपर्यंत साऱ्यां-जगांत अस्तित्वांत असल्याने पेशवाईतहि आढळावी यांत नवल नाहीं.

पण दास व दासी यांत फरक करावयाचा झाल्यास पेशवाईत दासापेक्षां दासींच अधिक प्रमाणांत असल्याचे दिसून येते. तत्कालीन लोक दासींना कुण-बिणी किंवा बटिकी व दासाना पोरगे म्हणत. अर्थात् हे दास वयानें लहान असले पाहिजेत. पेशवाईतील सरदार, राजेरजवाडे, श्रीमंत व सुखवस्तु लोक हे आपल्या पदरी कुणबिणी व बटकी बाळगीत. त्यांचा क्रमविक्रय करण्यांत येई. जशा गोठ्यांत किंवा पागेंत गाई, बैल किंवा घोडी, तशाच कुणबिणी. बटकी व पोरगे विकणे हा हेडे, चारण इत्यादि लोकांचा धंदा होता. बटकीला किंमत सुमारें साठ रुपयापर्यंत पडावी. बटीक तिच्या पोरग्यासुद्धां विकावयाची झाल्यास त्या दोघांची किंमत दीडशे रुपयापर्यंतहि जात असे. ' तावजी भंडारी शिलेदार यानें एक बटीक साठ रुपायास विकत घेतली होती ' ' तुकोजी शिंदे यांनीं मौजे मुलखेडे तर्फ कर्यात मावळ येथे बटीक पोरसुद्धां १५० रुपायांस विकत घेतली ' (पे. डा.) बटकीच्या पोटास शेर देण्यांत येई. व तिला जरूर ते वस्त्रहि मिळत असे. सरकारहि बटकीची गणना प्रायः जनावरांतच करी. कारण चारण लोक ज्या वेळीं बटकी विकावयास आणीत, त्यावेळीं त्यांजपासून सर-कार कर वसूल करी.

कांहीं बटकींना त्यांचे मालक पागेतच रहावयास जागा देत. बदकर्म करणाऱ्या स्त्रियांवर कोणापाशीं बटिक होऊन रहाण्याचा प्रसंग यावा. दुष्काळांत आईबापांना कोंडा, भाकर देऊन ज्या मुली व मुलगे कोणी लोक घेत, ते त्यास लहानाचे मोठे केल्यावर बटकी व पोरगे या नात्याने विकून टाकीत. खेरीज

एखादा गरीब माणूस आपली मुलगी किंवा मुलगा व्यंग असल्यास त्यास कोणास विकत किंवा फुकट देई. ‘ पदाजी कारका याची लेक आंधळी होती. तीस पदाजीनें बटीक करून दिले. ’ परंतु एवढ्यानें कुणबिणींचा दिसतो इतका पुरवठा होणें शक्य नव्हते. कारण बहुधा कोणाहि सुखवस्तु मनुष्यापाशीं कुणबीण ही असावयाचीच. तेव्हां इतक्या स्त्रिया मुसलमान बादशहा आणि त्यांचे सरदार व सुभेदार लढायांत शत्रुसैन्यांतून किंवा शत्रूच्या मुलखांतून पाडाव करून आणिलेल्या स्त्रियांना गुलाम म्हणून विकीत असल्यामुळेंच मिळत असल्या पाहिजेत. कांहीं बटिकी परदेशाहूनहि हिंदुस्थानात रवाना होत. आफ्रिकेंतून जहाजेच्या जहाजे भरून निग्रो लोकांची उचलबांगडी अमेरिकेंत होऊन तेथें युरोपांतून वसाहतीस गेलेले गोरे लोक त्यांना शेतांत व खाणींत काम करण्यासाठीं विकत घेत. त्याच पद्धतीनें आफ्रिकेंतील कांहीं स्त्रियाहि हिंदुस्थानांत विकल्या जात• असाव्या. मात्र हिंदूंच्या घरांत त्यांचा प्रवेश भिन्न धर्मामुळें फारसा होत नसावा.

‘ कोकण प्रांतांत कांहीं कुणबिणी शिद्दिणी होत्या. त्या दारूखान्याच्या कामावर असून त्यांना मेहनत फार पडे. त्यांना सालाची नेमणूक तीस रुपये होती. म्हणून त्यांपैकीं दर असामीस एक रुपया बक्षिस दिला. ’ (पे. डा.) या कुणबिणींना अन्नवस्त्राची तरतूद वरील रकमेंतूनच लावावी लागत असेल. कोकण प्रांत समुद्रतीरी असल्यामुळें कोणा स्त्रियाना फुसलावणीने अगर क्वचित् खुषीनेहि धरून आणून त्यांची विक्री करण्याचा कित्येक मुसलमानांचा धंदाच होता. त्यांनीं बऱ्याचशा स्त्रिया कोठून तरी जमावाने आणाव्या व त्यांजपासून किरकोळ विक्रीकरितां चारण वगैरे लोकांनीं त्या खरेदी कराव्या. अशा प्रकारचे लालखान, मलिकखान, परिखान व दाऊदखान हे चार मुसलमान कोकणांत मौजे देवठाण परगणे शिरसाळे येथें होते. त्यांजपासून राघू वगैरे चारण जातीच्या लोकांनीं कुणबिणी म्हणून कांहीं स्त्रिया खरेदी केल्या व पेण येथें ब्राह्मणादिकाकडे विकावयास नेल्या. पण पेण येथील पेशवे सरकारचे जकाते व गाडदी यांना त्या कोणी कुलहीन बाया नसून गर्ती स्त्रिया असल्याची बातमी लागली. त्याजवरून त्या स्त्रियांना व चारणाना बोलावून आणून सरकारातर्फे त्यांची चौकशी करण्यांत आली. तेव्हां आपणास चारणानी फितवून आणल्याचे स्त्रियांनीं सांगितलें, पण चारणास विचारतां त्यांनीं वरील लालखान प्रभृतीपासून स्त्रियांना

विकत घेतल्याची जबानी दिली. अशा रीतीनें या प्रकरणास फाटे फुटूं लागलेले पाहून पेशवे सरकाराने लालखान प्रभृतींना आरोपी म्हणून हजर रहाण्याविषयीं ढालाइताबरोबर आज्ञापत्र पाठविले. ही गोष्ट ता. १५-३-१७८० रोजीं घडली. (पे. द. ४३)

अशा गवशा बाया कुणबिणी म्हणून घरीं ठेवल्या म्हणजे एखादे वेळीं अतिशूद्र जातीच्या स्त्रियाहि ब्राह्मणाच्या कुटुंबात घुसल्यामुळें प्रायश्चित्ते घेता घेता पुरेवाट व्हावयाची. असा प्रसंग बाजीराव मोरेश्वर भावे यांजवर ता. १५-९-१७९५ रोजीं पुण्यास गुदरला. बाजीराव मोरेश्वर हे आनंदराव गोपाळ जोशी यांच्या वाड्यांत रहात होते. भावे यांची कुणबीण होती ती जातीने चांभारीण असल्याचे चार महिन्यानी उमगले. पण चार महिने संसर्ग घडूं नये तो घडलाच. म्हणून त्यांस व त्यांचे घरीं बिऱ्हाडाने रहाणारास प्राजापत्य प्रायश्चित्ते सांगण्यांत आली. भावे रहात होते त्यांच्या शेजारच्या घरामध्यें व भावे यांचे घरामध्यें समाईक विहीर असल्यामुळें त्या शेजारच्या नरहर गोपाळ नामक ब्राह्मणासहि प्रायश्चित्त भोगावे लागलेच. ते असे-४८ प्राजापत्ये दर ब्राह्मणास, २४ दर स्त्रीस, २४ सोळा वर्षांच्या आंतील उपनीत मुलास व ४ शूद्रास (पे. द. ४३)

सर्व जातींतील लोकाप्रमाणें ब्राह्मणांच्या घरींहि बटकी असत हें वर आलेच आहे. अशा बटकीशी एखाद्या उच्च ब्राह्मणाला बदकर्म करण्याची दुर्बुद्धि आठवल्यास त्यांत नवल कसचे ? ' हें बदकर्म तनि रीतीनीं संभवते. एक तर त्या ब्राह्मणाचे लग्न झाले नसले पाहिजे किंवा बायको मरून तो विधुरावस्थेंत असला पाहिजे अगर सदर बटीक तरणीताठी व ठसठशीत असल्याचे पाहून त्याच्या मनाला भुरळ पडली पाहिजे. देशावरील कित्येक ब्राह्मणांना लग्नाला मुली न मिळाल्यामुळें बटिक ठेवून तिजवरच गुजारा करावा लागत असेल. अशा बटिकीपासून खालील उदाहरणांतील कुळकर्ण्याला एक मुलगी झाली. तिला पत्करणारा एक अडलेला ब्राह्मण निघाला. त्याला ती बटकीची पोर आहे हें माहीत नसल्यामुळें तो कसा फशीं पडला पहा.

' समस्त देशपांडे परगणे सुपे यांस पत्र कीं, मोरो रामचंद्र देशपांडे परगणे मजकूर यांनीं नारो भानजी कुळकर्णी मौजे भाकरवाडी परगणे दाभाडी याची लेक नवरी करून लग्न केले. ते मूल बटकीचे पोटची खरी झाली. यामुळें मोरो रामचंद्र यास व त्याचे भाऊबंद दशरात्र त्रिरात्रीचे अधिकारी सुपे व बारामतीस

रहातात, त्या सर्वांस प्रायश्चित्त द्यावे लागते. प्रायश्चित्ताचा निश्चय करून क्षेत्र वाई येथील पत्रे दिली आहेत. तरी तुम्ही समस्त दशरात्रींचे व त्रिरात्रीचे अधिकारी वाईस जाऊन ब्राह्मण सांगतील त्याप्रमाणे प्रायश्चित्त घेणें म्हणून पत्र द्यावयाची आज्ञा झाली–' [पे. द. ४३].

इंग्रज, फ्रेंच वगैरे युरोपियन लोकहि हिंदुस्थानांत असता बटकी बाळगीत. मि. मॅलेट यानें पुण्यास ६५ रुपयांस एक कुणबीण खरेदी केली.'टॉमस मोष्टीन कोशलदार [कौन्सिलर] याने रूपा नायकीण कळवंतीण इजपासून मुसलमान पोरगी २५० रुपयांस खरेदी केली. त्यास जकात माफ केली आहे ' [पे. डा.].'–फरासिसाकडील वकील पुण्यास आले आहेत. त्यांनीं पुणें येथें माळयापासून एक कुणबीण शंभर रुपयास खरेदी केली. तिचे जकातीचा आकार माफ केला आहे.' [पे. डा.]. याचे कारण असे कीं, कित्येक युरोपियनांची लग्ने हिंदुस्थानांत येण्यापूर्वी झाली नसल्यानें त्यांना ती गरज कुणबिणींना जवळ बाळगून भागवावी लागे. हिंदुस्थानांत अँग्लो–इंडियनांचा एक वर्ग या भेसळीमुळेंच उत्पन्न झाला. ' नाशकाजवळ गंगापूर येथें थोरल्या माधवराव पेशव्याची आई गोपिकाबाई रहात होती. तिच्या संरक्षणासाठीं कांहीं फौज पेशव्यांनीं ठेवली असून तिच्यात रामजी वणजारा नामक मराठा जातच्या गारद्यापाशी टॉम नावाचा इंग्रज चाकरीस होता. त्याच्याशी जानकी कुणबिणीचा संबंध होऊन ती बाटली. ती तेथून मौजे पिंपळगांव [बसवंत] येथें पळून गेली. तिला तेथून धरून आणून टॉमला बक्षिस देण्यांत आली.'[पे. डा.].

शाहूमहाराजांनीं कोंकणांतील आपल्या अधिकाऱ्याकडून कांहीं कुणबिणी मागविल्या होत्या. त्या त्यांस मनाजोग्या मिळेनात. कारण कुणबिणीच्या पेशात आपल्या मुलींना घालण्यास कोणीहि अब्रूदार माणूस कबूल होणें शक्य नव्हते. शाहू महाराजास नाकाडोळयांनीं नीटस व सुंदर मुली पाहिजे होत्या. आणि कोंकणांत दारिद्र्य फार म्हणून कोणी त्या देण्यास कबूल होईल अशी त्यांची समजूत. म्हणून खंडोजी माणकर यास महाराजांनीं कळविले, ' बटकीच्या पोरी दोन बहुत चांगल्या, दहा आकरा वर्षांच्या निरोगी, नाचावयासी लायक, लाविलियानें उपयोगीं पडतील अशा पाठवाव्या.' परंतु कोकणांत त्या मिळेनात. तेव्हां खंडोजी श्रीमंत राजश्री पंतप्रधान यास (बाजीराव) लिहितो, ' कुणबी माणूस काळे रास, देखणे नव्हे. पाहता वीट येतो. त्या कुरूप असल्या तरी त्या

द्यावयास कोणी कबूल होत नाहीं.' [पे. डा.] खंडोजीनें कोंकणी कुणब्यांचे वर्णन केले ते खोटे कसे असेल ? उन्हात वागून तिकडची माणसे काळवंडलेली, त्यांच्यावर तांबड्या मातीनें तेल्या रंग चढलेला, त्यांतून ती माणसे कुरूप. अशांची तुलना करण्यास खंडोजीला अस्वल सहजच आठवले. तरी देखील कोकणचे गरीब लोकहि आपल्या मुली असल्या कामास देण्याला कबूल होईनात, यांत त्यांचा स्वाभिमानच दिसून येतो.

शाहूमहाराजांचे बटकींचे आगत्य जाणून आवजी कवडे याने बटकी व पोरगे पाठविले ते ता. २३-११-१७४६ रोजीं सातार्‍यास जमा करण्यांत आले. त्यासंबंधीं दिलेल्या कच्चया हकिकतीवरून बटकी कोणत्या जातीच्या व वयाच्या असत हें समजते. गोजरी बटीक मौजे धानेरी येथील कुणबी जातीची व तीस वर्षें उमरीची होती. तिच्या बरोबरचा पोरगा जावजी उमर वर्षे २; राधी बटीक जातीची चांगली मराठी मौजे किन्होले उमर ३० वर्षें व पोरगा अवधूत उमर वर्षें ४; कृष्णी बटीक जातीची पंचाळ सोनार मौजे सोनपिंपरी प्रगणे उमरखेड उमर वर्षें २५; काशी बटीक जातीची रजपूत जात चांगली, दीपचंद हजारी मौजे बाभुळवाडी प्र॥ धुळे याचे घरची उमर वर्षें ३०; राधी बटीक जातीची हाटकर धनगर, चांगले कुणबी तिच्या हातचे पाणी पितात व जेवतातहि. मौजे ब्राह्मणगांव प्र॥ उमरखेड उमर वर्षें २५ वाडा मुक्काम सातारा कोठसि जमा. (पे. द. ४५). बटकी चांगल्या जातीच्या पाहूनहि घेत. याचे कारण त्यांना महाराजांच्या वाड्यांत थोरामोठ्यामध्यें वागावयाचे व त्यांना मुदपाकखान्याकडेहि कामाला लावावयाचे असे, हे होय.

पहिले बाजीराव पेशवे पुण्यांत असत. ते सातार्‍याच्या महाराजांचे पेशवे म्हणजे मुख्य कारभारी असल्यानें त्यांच्याकडे महाराजांची व राजघराण्यातील स्त्रियांची कांहीं घरगुती कामगिरी यावयाचीच. राजघराण्यांतील एक स्त्री त्यांस लिहिते, ' बटकी पंचवीस देतो म्हणून तुम्ही मान्य केलें. अद्यापि आल्या नाहींत. यावरून काय म्हणावें ? या उपर पंचवीस बटकी उत्तम सेवेयोग्य पाठविणें. पुणेंदेशी वगैरे देशात बटकीचा दुष्काळ आहे, मिळत नाहींत कीं काय, कळत नाहीं. ' (पे. द.)

बटकीकडून पडेल ते काम करून घेण्यांत येई. त्यांचे लग्न न झाल्याने त्यापैकीं पुष्कळ बदचालीच्या निघाल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. श्रीमंतापाशीं होता होईतो देखण्या स्त्रियानाच निवडून बटकी म्हणून ठेवण्यात येत असल्यामुळें

श्रीमंताजवळील हुजरेपाजरे व आश्रित यांना ते एक मनोविनोदाचे साधनच होऊन बसत असे. पेशव्यांच्या खाजगीकडे सन १७६२-६३ सालीं १९७ कुणबिणी होत्या. त्यांची नांवें उदी, अमृती, कस्तुरी, कमी, मिठी, शामी, बची मांदी, जानी, हबी अशी होती. कांहींना विशिष्ट वैचित्र्यावरून टोपण नांवेहि मिळाली होती. उदाहरणार्थ मैनी उंचेली, राधी बुद्रूक, मल्ली कानडी, या नांवावरून कुणबिणी वेगवेगळया प्रांतांतील व जातीतील कशा असत, हे लक्षांत येते. राधी नांवाच्या दोन कुणबिणी. त्यांतील वयानें वडील तिला बुद्रुक म्हणावे. मैनाहि पुष्कळ म्हणून त्या सर्वांत उंच तिला उंचेली हें टोपण नांव. या कुणबिणी पैकीं बऱ्याच जणी पेशव्यांना सरदारानी व राजानी नजर केलेल्या असत. गोविंदपंत बुंदेले, समशेर बहाद्दर, मुजफरजंग व होळकर इत्यादिकांनीं त्या आपआपल्या मुलुखातून पेशव्यांकडे पाठवून दिल्याचे दिसून येते. त्यांची वाटणी त्यांचा उपयोग लक्षांत घेऊन कोठी मुदपाक यजमानीणबाई यांजकडे केली जाई. कुणबिणीना मराठे लोक गुलामाप्रमाणें निर्दयतेने वागवीत असतील असे वाटत नाहीं. धनी जसा भेटेल किंवा त्या दासी ज्या· स्वभावाच्या आढळ-तील त्यावर त्यांना वागविण्याची रीत अवलंबून. ज्यांच्यापाशीं एखादी दुसरीच कुणबिण असेल त्या सामान्य धन्याची गोष्ट वेगळीं; परंतु ज्यांच्यापाशी नोकर चाकर बरेच असे सरदार, संस्थानिक व राजेरजवाडे यांच्या पदरच्या कुण-बिणीवर व पोरग्यावर व्यक्तिशः जुलूम किंवा कठोरपणा होण्याचा संभव नव्हता म्हटले तरी चालेल. सणवार अशा मंगलकारक व आनंदायक समयीं त्यांना पेशवे लुगडी चोळखण किंवा रोख रकमा देऊन संतुष्ट करीत. या कामी सन १७६२-६३ सालीं १३०० रु. खर्ची पडले. 'कुणबिणी यासी दसऱ्याची लुगडी व चोळखण द्यावे त्याचे नक्त रुपये दिले. वाटणी गुजारत चिंतो विश्व-नाथ कारकून निसबत मुदपाक कोठी' (पे. डा.) अशा कुणबिणीना यज-मानीणबाई आपली स्वतःची उंची जुनी लुगडी व दागदागिनेहि बक्षिस देण्या-सारख्या असल्यानें त्यांच्या मर्जीतल्या व विशेषतः त्यांच्या जवळच्या कुण-बिणींची चंगळ उडत असेल.

बटकीनें बरींच वर्षे धन्याची सेवा केली, ती म्हातारी झाली किंवा कामाला कंटाळली म्हणजे दयावंत यजमान तिला चाकरीतून मुक्त करून तिला सुखानें व समाधानानें उरलेले आयुष्य घालवितां यावे अशी तरतूद मुद्दाम करीत. शाहूमहाराजांनीं 'तापी व जनी या बायाना दास्यातून सोडवून

चरितार्थासाठीं पाबळच्या बाजूस शेतजमीन इनाम दिली.' 'कृष्णा सोनारीण कुणबीण हिला सोड दिली असे. तुझ्या मनास येईल तेथें सुखरूप रहाणे. तुला सरकारातून कोणे गोष्टीचा उपद्रव लागणार नाहीं.' गोपाळराव पटवर्धनाची आई सत्यभामाबाई हिने ता. २० डिसेंबर १७६३ रोजीं गोपाळरावास पुढील मजकुराचे पत्र लिहिले, 'तुम्ही लिहिले होतें कीं, कुणबिणी दोन पाठविल्या. तरी त्या अजून आल्या नाहींत. सौ. भागूबाईस कुणबीण देणार होतो. परंतु त्या आल्या नाहींत. चिरंजीव सदाशिव नातू घरीं गेला. येथें कुणबीण आली असती तरी त्याबरोबर कोकणांत पाठवून देतो. अद्यापि तरी कोण आहेत याचा शोध करून लिहिणें.' (ऐ. ले. सं.) कुणाबिणीचा उपयोग पुरुषापेक्षां स्त्रियानाच अधिक. ते एक विश्वासाचे घरचे माणूस जन्माचे असल्यानें त्याजवर जोखमीची व नाजूक कामें सोपविण्यांत येत. मुलांना संभाळणें, त्यांना दाईप्रमाणें घेऊन खेळविणें, त्यांच्या अंगावर घर टाकून कोठें जाणें स्त्रियांना कुणबिणीमुळें सुलभ व्हावे. जात्या मायाळू अशा स्त्रियांना इमानी कुणबीण मिळाल्यास तिचा कुटुंबांतील माणसासारखा काळजीने सांभाळ करण्यांत यावा. कुणबिणी हा हलक्या दर्जाचा व बिनपगारी असा कामगारवर्ग त्या काळीं उपलब्ध झाल्यानें कमी खर्चात सत्तेचे नोकर माणूस मिळण्याची मोठीच सोय झाली.

महादजी शिंद्याचा पुत्र दौलतराव शिंदे याचा मामा म्हणून एक नातलग होता. त्याजपाशीं दोन बटकी होत्या. त्या मि. ब्रौटन यास शिंद्याच्या लष्करांत भेटल्या असतां त्यांनी त्यास पुढील हकीकत सांगितली. 'आम्ही मामाच्या कुटुंबांत वाढलो. तेथें सुखांत आहो. मामाच्या तीन बायका लष्करांत आहेत. त्यांची आम्ही दिवसा चाकरी करावयाची व रात्रीं मामा अंथरुणावर पडल्यानंतर त्याचे पाय चेपावयाचे एवढेंच आमचे काम. रात्रीं आम्हांस कोठेंहि जाण्याची मोकळीक आहे.' दौलतरावापाशीं साऱ्या हिंदुस्थानांतील बटकी होत्या. त्यांना रोजचे जेवण व सालाची दोन लुगडी मिळत. त्याशिवाय फावल्या वेळांत इतर कामे करून त्यांनी आपली कमाई वाढवावी. ब्रौटन याचा दौलतराव शिंद्याविषयीं असा अनुभव असून जेन्किन्स याचा नागपुराकडील बटकीसंबंधीं फारसा वेगळा अनुभव नव्हता. जेन्किन्स म्हणतो, 'बटकीना धन्याच्या पदरी नोकर या नात्यानें रहावे लागते. खाणेपिणे, कपडा,

ल्ता या बाबतींत त्यांना धनी मुलांप्रमाणे वागवितो. क्वचित् प्रसंगी धन्याला मूलबाळ नसल्यास तो बाळगलेल्या पोरग्याला किंवा पोरीला दत्तक देखील घेतो. मजुरापासून जे काम घेतात तेच या दासदासीपासून घेतात. त्यास कुटुंबांतील माणसे फार ममतेनें वागवितात व तीहि कुटुंबातील माणसावर ममता करतात.'

हिंदुलोक कुत्रा मांजर, गाय, बैल, घोडे इत्यादि बाळगलेल्या मुक्या जनावरावरसुद्धां जर अत्यंत माया करतात तर कुणबिणी व पोरगे हीं तर काय माणसेच आहेत त्यांवर त्यांनी माया केल्यास नवल काय ? उलटपक्षीं कुणबिणींना व पोऱ्यांनाहि जवळचें कोणीच नसल्यानें त्यांनीं ज्या कुटुंबांत तीं लहानाचीं मोठीं होत त्यांतील लहान थोर माणसावर स्वकीयाप्रमाणेंच प्रेम करावें हें मनुष्यस्वभावास धरून होय.

कित्येकदां धनी वाईट नसला तरी कुणबीण चोर, शिनळ किंवा खव्याळ निघे. अशा रीतीनें दोघांच्या किंवा दोघांपैकीं कोणा एकाच्या दोषामुळें कुणबिणी पळून गेल्याचेहि दाखले सांपडतात. ' कृष्णराव महादेव याच्या तीन बटकी व एक पोरगा हे पळून बऱ्हाणपूर येथील सावकार लाल चतुर्भुज याच्या घरीं गेले. त्याला ही फुकटचीं माणसें राबावयास मिळालीं तर हवींच होतीं. म्हणून त्यानें त्यांस लपवून ठेवलें. ही गोष्ट सरकारांत समजल्यावर सावकारापासून त्याच्या गुन्ह्याबद्दल १६० रु. दंड घेण्यांत आला.' अर्थात् बटकी व पोरगा हीं ज्यांची त्यास परत करावीं लागलीं असतील हें सांगावयास नकोच. ' महादेव भट बापट पुराणिक दिमत गणपतराव बहिरव यांची बटीक पळाली, ती चाकणच्या पागेंत सापडली ' कारण बटकीना आडोसा असा पागेच्या जनावरांतच मिळावयाचा ! कित्येक लोकहि कमी वस्ताद नसत. बटकी कांहीं वाटेवर पडल्या नसल्यानें ज्यांना त्या पाहिजे असत त्यांना त्या हटकून पैसे मोजले कीं मिळतच असें नाहीं. म्हणून बटकींवर पाळत ठेवून व त्यांच्याशी संकेत करून धूर्त माणसे त्यांना पळवून नेत. ' मराठे यांची कुणबीण त्रिंबक जोग व केशव भट केतकर यांनीं पळवून नेली ! ' एकादी चुकार बटिक कोणास सापडली तर ती त्यास सरकारांतून बक्षिसहि देण्यांत येई. याचा अर्थ असा कीं बटीक बेवारस असली कीं तिचें मालक सरकार. म्हणजे कोणी एखाद्या बटकीला विकत घेतलें नसलें किंवा अन्य रीतीनें तिची मालकी त्याजकडे आली नसली तर जबरदस्तीनें तिला आपली बटीक म्हणून राबविण्याचा हक्क त्यास नव्हता.

प्रकरण विसावें

व्यापार व उद्योगधंदे

युरोपांतील व्यापारी राष्ट्रांचे अग्रेसर स्पेन व पोर्तुगाल. या दोन राष्ट्रां-मधील चुरस पोपने तडजोडीने थांबविली. त्या तडजोडीप्रमाणें स्पेनच्या वाट-णीस युरोपचा पश्चिम भाग म्हणजे अमेरिकाखंड व पोर्तुगालच्या वाटणीस आशिया व आफ्रिका ही खंडे आली. पंधराव्या शतकाच्या अखेरीस प्रसिद्ध पोर्तुगीज दर्यावर्दी बार्थोलोम्यू याने केप ऑफ गुडहोपला वळसा घालून हिंदु-स्थान गाठले. सन १४८६ पासून पुढलि सत्तर वर्षेपर्यंत पोर्तुगीजांचा भर हिंदुस्थानावर होता. त्यावेळीं दक्षिणेंत विजयनगरचे राज्य फार भरभराटींत असून पोर्तुगीजांचे त्याजबरोबर बरेच दळगवळग होते. ते घोडे ताप्ता, साटीण, चिनी रेशीम, पोवळी इत्यादि जिन्नस विजयनगरास विक्रीस नेऊन तेथून तलम कापड (Linen, muslins) खरेदी करून युरोपांत पाठवीत. पोर्तुगीजांच्या या व्यापरी पद्धतीचा अवलंब पुढे डच, इंग्रज, फ्रेंच यानी केला. इंग्रजांच्या वखारी सुरत, अहमदाबाद, दाभोळ, राजापूर, चौल, बऱ्हाणपूर, इत्यादि ठिकाणीं होत्या. ते हिंदुस्थानाच्या किनाऱ्याकिनाऱ्याने लाकूड, सुपारी, नारळ इत्यादि जिनसांचा क्रयविक्रय करीत असत. सुरतेच्या बंदरांतून नीळ, माणिक छीट, डिंक, आणि कापड ते इंग्लंडला पाठवीत. इंग्लंडांत लोखंडाच्या खाणीचा शोध सतराव्या शतकापूर्वी लागलेला असून इंग्रजी लोखंड हिंदुस्थानांत खपविण्याचा प्रयत्न तेव्हापासूनच सुरू होता असें दिसतें. त्यांच्या सुरत येथील वखारीवरील अधिकाऱ्यानें केलेली तक्रार लक्षांत ठेव-ण्यासारखी आहे सुरतेस लोखंडाला मागणी नाहीं, असें तो म्हणतो. लोखंडा-प्रमाणें जस्त (Tin) हि इंग्रज लोक आपल्या गलबतांतून हिंदुस्थानांत आणीत असत. परंतु चीन देशांतून जस्त येत असे व ते स्वाभाविकपणे भावालाहि स्वस्त पडत असल्यामुळें हिंदी लोक त्यालाच आश्रय देत. या कारणाने युरोपांतील जस्तालाहि असावी तशी मागणी हिंदुस्थानांत नव्हती. कारागिरीचे व कल्पकतेचे

जिन्नस बनविण्याची प्रवृत्ति युरोपांत बरीच जुनी दिसते. इंग्रज व्यापरी घडीचीं पाकिटे (Folding cases) शोभेचे ग्रंथ (Table books), थैल्या (Purses) या फर्माइशी जिनसा विजापूरच्या दरबारांत नजराण्याच्या रूपानें नेऊन खपवू पहात होते. पण तो त्यांचा प्रयत्न साधला नाहीं. त्यांनीं तलवारी व सुरेहि तेथे नेले होते. सुरे लांब व तलवारी जड म्हणून त्याहि जिनसा कोणी हातांत धरल्या नाहींत. (English Factories in India).

कोकणांतील दाभोळ बंदरांत विजापूरच्या बादशहाचा सुभेदार रहात होता. त्यासंबंधाने आर्चिबाल्ड जे भिसन हा इंग्रज व्यापारी लिहितो ' मी येथें थोडेसे शिसे विकले. चोवीस पाती विकली. येथें इंग्रजांनीं आपली वखार काढावी असा रहिवाशांचा आग्रह आहे. कारण त्यांचें म्हणणे कीं, इंग्रज व्यापारी कापड, पोवळी, शिसे, हस्तिदंत हा माल येथें विकतील तर त्याचा खप होईल. बालाघाटांत बारीक कापड (Fine linen), लाख, डिंक (Gum lac), मिरी वगैरे युरोपांत लागणाऱ्या जिनसा उत्पन्न होतात त्याहि खरेदी करतां येतील असें येथील आडत्या नारायण याचे म्हणणे आहे.' इंग्रजांच्या वखारी प्रत्येक मोठ्या बंदरांत किंवा शहरांत होत्या असें नाहीं. म्हणून इंग्रजांचे व्यापारी गुमास्ते सर्व देशभर हिंडून मुख्य मुख्य पेठांचें अवलोकन करीत व त्या त्या पेठांतून इंग्रजी व्यापाराचे बस्तान कसे बसेल यावर लक्ष ठेवीत. त्याप्रमाणें जॉन जॉन्सन नामक इंग्रज गुमास्ता तंजावरास गेला असतां तेथून सुरत येथील थॉमस ब्रॉकडेन यास ता. ३-४-१६२२ रोजीं लिहितो, ' येथील नाईक म्हणतो कीं, इंग्रज येथें व्यापार करतील तर त्यांना येथून मिरी खरेदी करतां येतील आणि त्यांनीं आणिलेले जस्त (Tin) शिसे (Lead) लोखंड व लाल कापड या पेठेत खपेल.'

या दृष्टीनें सोळाव्या सतराव्या शतकापासून दर्यावरील मुख्य व्यापार पाश्चात्य लोकांच्या हाती असून दुय्यम प्रतीचा व्यापार म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरील बंदराशी करावयाचा व्यापार एतद्देशीयाकडे होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोकणपट्टींतील बंदरातून सरदार लोक सोयीस येईल त्या ठिकाणीं आपले कारकून ठेवीत व त्यांजमार्फत आपणास जरूर तो माल आणवीत. पेशव्यांचे कारकून मुंबईसहि असत. तेथून ते पेशव्यांचा हुकूम येईल त्या बरहुकूम

मालाची रवानगी करीत. आंग्रे हे मराठ्यांचे कोंकणांतील आरमारावरचे मुख्य अधिकारी. शाहूमहाराज त्याजकडूनहि आपली कामें उरकून घेत. देशांत वारंवार माजणारी अस्वस्थता व दळणवळणाची दिरंगाई लक्षांत घेतां सामान्य लोक अत्यंत थोड्या जिनसावर आपल्या गरजा भागवीत असले पाहिजेत हें उघड आहे. त्या काळीं युरोपांतील कारागिरांनीं हिंदुस्थानाला द्यावें असें थोडे होते. कापड तर त्यांजकडून येतच नव्हते. साखर, सुका मेवा, मसाला इत्यादि जिनसा चीन, अफगाणिस्थान, इराण, अंबोयना इत्यादि आशियाखंडांतील देशांतूनच युरोपीय व्यापारी आणवून देत; तथापि विशेष चैनीच्या, कल्पकतेच्या व शोधकपणाच्या वस्तु बनविण्यास युरोपखंडानें सुरुवात केली होती.

त्यांच्या शोधकपणाच्या दृष्टीनें सतरावें, अठरावें व एकोणीसावें शतक या प्रगतीच्या क्रमवार पायऱ्याच ठरतात. दुर्बिणीचा शोध गॅलिलिओने इ. स. १६०९ त लावला. त्यामुळें ज्योतिषशास्त्राचे पाऊल झपाट्याने पुढें पडले. त्यानंतर तीस वर्षांनीं म्हणजे इ. स. १६३९ त गॅलिलिओनेच गतिशास्त्राचे मूलतत्त्व शोधून काढले. त्याचे घड्याळाच्या रचनेस सहाय्य होऊन इ. सन १७१५ त ग्रॅहॅम व हॅरिसन यांनीं घड्याळास पूर्णता आणिली. उपनेत्रांची कल्पना तेराव्या शतकांतच उद्भवून उपनेत्रांतहि सुधारणा याच सुमारास बरीच घडून आली. काच पुरातन काळापासून जगास माहीत असली तरी गारगोटीपासून ती बनविण्याचा शोध इंग्लंडात १५५७ त लागला व काचेची तावदाने वगैरे जिनसा इ. स. १६७३ मध्येंच निर्माण होण्यास प्रारंभ झाला. कागद पुरातन आहे. पण चांगला मोहोरेदार व सफाईदार कागद इ. स. १७७३ तच जगास थॉम्सन वॉटसन याने दाखविला. फोटोग्राफीस थोडथोडा आरंभ इ. स. १७७७ त होऊन १८१४ मध्यें ती चांगलीच साधली.

वर्तमानपत्रे १७ व्या शतकाच्या सुरुवातीला निघाली. छापखाने त्यावेळी निघाले असले तरी त्यांची खरी प्रगति त्या शतकाच्या अखेरीस होऊन इ. स. १८१४त इंग्लंडात वाफेच्या शक्तीवरील छापखाने निघाले. ते व तेव्हाच खरोखर वर्तमानपत्रे भरभराटीस येत चालली. १७६० पासून लोखंड व दगडी कोळसा यांच्या खाणीचा धंदा वाढीस लागून तेथील लोखंडाचा पुरवठा हिंदुस्थानास विशेष प्रमाणात करण्यांत आला. या दृष्टीने विचार केल्यास युरोपखंडातील शोधकबुद्धि हिंदुस्थाना आधी एका शतकाने जागी झाली असें लक्षांत येते. त्या बुद्धीच्या

जोरावर युरोपांत ज्या नवलपूर्ण चिजा तयार होत, त्या तयार झाल्यापासून वर्ष सहा महिन्यांच्या अवधीत युरोपियन व्यापाऱ्यांच्या, प्रवाश्यांच्या, परराष्ट्रीय वकीलांच्या व राजकारणी पुरुषांच्या मार्फत हिंदुस्थानात दाखल झाल्यावांचून रहात नसत. त्या वस्तूंच्या दर्शनाने इकडील राजेरजवाड्याना कौतुक वाटावे इतकेच. बाकी त्यांचा हिंदी व्यापारधंद्याना जाणवण्याजोगा चट्टा बसत नव्हता. केवळ व्यवहार पाहिल्यास हिंदुस्थानातील व्यवहारापेक्षा युरोपांतील व्यवहारात अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत नजरेंत भरण्यासारखा फरक पडला नव्हता. हिंदी राजेरजवाड्यांनी तिकडील परिस्थितीचे निरीक्षण करण्यासाठी कोणी मनुष्य पाठविला असता तरी त्याला आश्चर्य असें वाटले नसते. वेगवेगळया शास्त्रांतील विद्वान् व शोधक माणसे युरोपांत होती पण त्यांच्या विद्वत्तेने व शोधानी लोकव्यवहारात क्रांति अशी तोपर्यंत घडवून आणली नव्हती, आणि आशा प्रकारचे विद्वान् व शोधक लोक एकाच देशात मोठया प्रमाणात दिसण्यासारखे नसून ते सर्व युरोपांत कोठे कोठे तुरळकपणें वास्तव्य करीत होते. या कारणाने हिंदुस्थानांतून पेशव्यांनीं अगर दुसऱ्या कोणी राजानी युरोपांतील एखाद्या देशात एखादा दुसरा कोणीतरी माणूस पाठविल्यानें त्यांची विद्या अगर कला त्याला हिंदुस्थानांत आणतां आली असती असें म्हणवत नाहीं. कारण हिंदुस्थानांतलि त्या काळच्या शिक्षणांत आंधिभौतिक शास्त्रांची मूळतत्त्वेंहि समाविष्ट नव्हती. वेगवेगळया शास्त्रांतील हिंदी विद्वानांचा एखादा समुदाय जमवावयाचा, त्यांतील वेगवेगळया विद्वानांना वेगवेगळय भाषा शिकवावयाच्या व त्यांना युरोपात पाठवावयाचे असा दीर्घ प्रयत्न झाला असता तरच त्यांची विद्या थोडीशी हाती पडण्याचा संभव होता. तात्पर्य, ती खटपट जवळजवळ अशक्यप्राय असल्यानें त्या खटपटीस पेशवे अगर दुसरे कोणी हिंदी राजे लागले नाहींत, याबद्दल त्यांस दोष देण्यांत अर्थ नाहीं.

ज्यांच्या योगानें युरोपांत विलक्षण स्थित्यंतर झाले असे शोधपूर्वक उद्योग पेशव्यांचे राज्य व इतर हिंदी राजांची राज्ये इंग्रजानी घेतली त्या सुमारास किंवा त्यानंतरच लागले व त्यांनीं दिपून गेलेल्या आमच्या सुशिक्षितांनीं आपल्या पूर्वजास दोष देण्यास सुरुवात केली, यात त्यांजकडून कालविपर्यासाची चूक घडली असेंच म्हणावे लागते. युरोपांत बनविलेल्या अद्‌भुत वस्तु इकडील राजेरजवाड्यांना दिसत नव्हत्या, त्यांच्या अस्तित्वाचें ज्ञान त्याना नव्हते किंवा त्या पाहून त्याना कौतुक व

आश्चर्य वाटत नव्हते असे नाहीं. पण ते वाटण्याने त्याना ताबडतोब करतां येण्याजोगे फार थोडे होते व त्याचा चटका व्यापार व उद्योगधंदें यानाहि जाणवण्याजोगा नव्हता हें विसरतां कामा नये. युरोपांतील बाह्य सुधारणेच्या दृश्य चिन्हापैकीं शिक्षण प्रसार हें ठळक चिन्ह होय. पण हीहि सुधारणा अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत युरोपांत माहीत नव्हती. प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याचा कायदा इंग्लंडांत १८७० साली झाला. यावरून खुद्द इंग्लंडांतील बहुजनसमाज हिंदी बहुजनसमाजाइतकाच तोपर्यंत शिक्षणांत मागसलेला असल्याचेच सिद्ध होते. त्यापूर्वी शिक्षणांत प्रगति झाली होती ती इतकीच कीं, ऑक्सफर्ड व केंब्रिज यांसारख्या ठिकाणी थोडी कॉलेजे निघाली होती. पण तसें म्हटले तर हिंदुस्थानांतहि मोठमोठ्या क्षेत्रांतून पाठशाळा व मद्रेसा होत्या. तथापि युरोपांत व हिंदुस्थानांत फरक होता तो हा कीं, पाश्चात्य कॉलेजांत व्यावहारिक शास्त्रांचे थोडेबहुत शिक्षण मिळत होते ते हिंदुस्थानांतील पाठशाळांतून व मद्रेसांतून न मिळतां फक्त त्यांतून प्रायः धार्मिक विषयांचेच शिक्षण देण्यांत येत होते. म्हणून तिकडचा शिक्षित वर्ग इकडील शिक्षित वर्गापेक्षा व्यवहारज्ञानात पुढें गेलेला होता. सुधारणेचे दुसरे बाह्य चिन्ह दळणवळणाची साधने. ती इ. स. १८०२ पर्यंत इंग्लंडांत माहीत नव्हती. इ. स. १८०२ पासून १८२० पर्यंत टेलफर्ड व मॅक्याडम यानीं नवीन प्रकारचे खडी घातलेल्या रस्त्यासारखे रस्ते बांधून काढले. अर्थात् हीहि सुधारणा पेशवाईच्या अखेरीसच झाली. त्यापूर्वी हिंदुस्थानांतल्याप्रमाणेंच युरोपांत–इंग्लंडांत वाहनें असून लोक घोड्यावरून प्रवास करीत व खेचरावरूना सामानाची वाहतूक करीत. हिंदुस्थानांत त्या कामासाठीं खेचरे नव्हती, बैल होते एवढीच तफावत. असो.

महाराष्ट्रास जरूर त्या वस्तूंचा पुरवठा हल्लीप्रमाणें तेव्हाहि दोन मार्गांनीं होत असे. एक जलमार्ग व दुसरा खुष्कीचा मार्ग. जलमार्गाची मोठाली बंदरे मुंबई, चौल, दाभोळ, राजापूर इत्यादि लहान बंदरे नागोठणे, महाड, चिपळूण, रत्नागेरी, वेंगुर्ले. मालवण इत्यादि. महाराष्ट्राशेजारचे जुने बंदर सुरत. मुंबई बंदराची भरभराट होऊन सुरत मागे पडली तरी पेशवाईंत नाशीक, खानदेश, वऱ्हाड, या उत्तर महाराष्ट्राला व गुजराथ माळवा इत्यादि प्रांताना सुरतच सोयीची. या सर्व बंदरांतील मालाची वाहतूक लमाण लोक बैलांच्या पाठीवरून करीत असत. त्यानी बंदरचा माल देशावर आणावा व त्याचप्रमाणें

देशांतल्या देशांतहि पेठापेठांतील मालाची आयातनिर्गत लमाणानीच करावी. दहा दहा हजार लमाणांचा एक तांडा व प्रत्येक लमाणाजवळ एक बैल अशी व्यवस्था होती. मीठ, खोबरें, तुरटी, खारीक इत्यादि किराणा जिन्नस व परदेशी छानछोकीचा जिन्नस त्याजमार्फत देशावर वाहून आणला जात असे.

हरिपंत फडके व परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या हाताखालीं मराठ्यांची फौज गुजराथ व माळवा या प्रांतात राघोबाचा पाठलाग करीत सन १७७६ त हिंडत असतां तिला मार्गात दहा हजार लमाणांचा एक तांडा भेटला. असें अन्न आयतेच चालून आल्यावर मराठी फौजेचे लुटीकरितां हात वळवळल्यावांचून कसे रहातील ? ' मराठ्यापाशी पांच सातशे लुगारे (लुटारू स्वार, पेंढारी) होते. त्यांच्या सहाय्याने पटवर्धन व भोसले यानी तांडा लुटला. सात हजार बैल मिळविले, लष्कराची अमदानी झाली. मीठ, खोबरें, तुरटी व खारीक हे जिन्नस ते तनि चार दिवस लुटीत होते.' (ऐ. ले. सं. खंड ५ वा) लहान प्रमाणांत मालाची वाहतुक मराठे लोकहि करीत. ' गंगाजी जाधव वस्ती पेठ सोमवार कसबे पुणे याचे बैल (सर) साठ खानदेशांत जाऊन सूत खाद्या व छिटें खरेदी करून आले ' (पे. डा.) गोसावी लोक हे घोडी व उंट परप्रांतांत विकत घेऊन पुणे वगैरे शहरीं आणून विकण्याचा धंदा करीत.

इंग्रज समुद्रमार्गाने आणीत त्यास बंदरी माल म्हणत. मराठ्यांच्या आरमारावरील मुख्य अधिकारी कान्होजी आंग्रे याचा समुद्र, बंदरे व इंग्रज यांच्याशी संबंध नित्याचा. शाहूमहाराजास फर्मासी व चैनीचे जिन्नस लागत, ते महाराज कान्होजीमार्फत मागवीत. सन १७१५ त शाहूने कान्होजीकडून इंगरेजी तलवार उत्तम, इंगरेजी सुऱ्या उत्तम, हस्तिदंत, गुलाबशिसे शंभर, मेणबत्त्या चारशे, अगरू, सुरती तंबाखू, बगदादी तंबाखू, कस्तूरीची नाभी, खास खेळावयास दारू पक्की खंडी या जिनसा मागविल्या. सन १७२३ त कान्होजीच्या मार्फतच त्याने एक हजार मेणबत्त्या व गुलाबी अत्तराचे शिसे आणविले होते. सदर जिनसा राजसबाईच्या लग्नात हंड्या झुंबरांची रोषनाई करण्याकरितां व पानसुपारीच्या समारंभाकरिता पाहिजे होत्या. राजसबांई ही शाहूची भाची व शिर्के यांची कन्या. तिचे लग्न मुधोजी नाईक निंबाळकर फलटण याजबरोबर झाले.

कोकणपट्टीच्या किनाऱ्याने होणारी गलबतांची वाहतुक महाराष्ट्रीयांच्या हाती असून त्यांचा संचार सामान्यतः सुरत ते कोचीन यांच्या दरम्यान असे. त्यांस

लागणारी गलबतें कोकणांतच बांधली जात. ‘ चिमणाजी गणेश साठे रत्नागिरीच्या बाजूचे रहिवाशी यानी एक नवीन गलबत बांधले. त्यांतून मालाची नेआण करण्यास उत्तेजन म्हणून सरकाराने त्यांस जकात माफ केली ’ (Administrative system of the Marathas) अशा प्रकारचे उत्तेजन पेशवे सरकारांतून धाडसी लोकांना नेहमीं मिळे. वसईचे विठोजी कृष्ण कामत हे सावकार जहाजांतून मालाची वाहतूक करीत. त्यांचा बहुमान सरकारने पालखी देऊन केला. त्या खेरीज त्यांस रहाण्यास व वखारीस जागा व एका गांवाची खोतीहि देण्यात आली. वसई व साष्टी ही बंदरें पोर्तुगीजापासून मराठ्यांच्या ताब्यांत आल्यावर भरभराटीस आणण्याची जबाबदारी मराठ्यावर असल्यामुळें तेथें स्वराज्यांतील धार्मिक सुरक्षिततेचे महत्त्व ओळखून जे वाणी येऊन राहिले त्यांना सरकारांतून जागा व घरे मिळाली. जहाजे बांधण्याचे काम कोणा सरकारी अधिकाऱ्यानेंहि खाजगी रीतीनें हातीं घेतले तरी त्यास सरकारी सहाय्य असे. ‘ तालुके अंजनवेलचा अधिकारी कृष्णाजी विश्वनाथ नवीन जहाज बांधीत होता. त्याकरितां त्यास तीन खंडी लोखंड देण्याची आज्ञा केली.’ (पे. द. २२ सन १७६८)

बंदरी माल मुख्यतः परदेशचा. चैनीचा व अत्यंत जरूरीचा तोच असून त्याचा व एकंदरींत कोणत्याहि मालाचा खप माफक असे. हरएक धंदा बहुधा एकएकटया कुटुंबापुरता असला तरी समाईक कुटुंब फार मोठे असल्यामुळें धंद्याला माणसांचा तुटवडा नव्हता. पुण्यासारख्या मोठया शहरांत आयातनिर्गतीवर चौधऱ्याचें नियंत्रण होते. त्यनें मालाची आयातनिर्गत मांडून ठेवावी व सरकारच्या परवानगीनें मालाच्या किंमती वाढवाव्या व कमी कराव्या. दुष्काळाच्या दिवसांत त्यानें शहरास हवा तेवढा माल पुरवावा. वजनें व मापें यांजवर सरकारची देखरेख राही. आयात कापडावर छाप पट्टी शेंकडा ५ रु. व स्थानिक मालावर शेंकडा २॥ रु. घेण्यांत येई. कांहीं ठिकाणीं सरकारानें आपली दुकानें घातलीं होतीं. त्या दुकानांत कापड वगैरे माल विक्रीस असून सावकारीहि चालू होती. वाई येथील सरकारी दुकानचें कर्ज श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांनींहि घेतलें होतें. लहान मोठया शहरांत सावकार होते व त्यांजमार्फत व्यापारी व इतर लोक यांच्या पैशाची देवघेव एका गांवची दुसऱ्या गांवाशीं हुंडीच्या रूपानें चालत होती. सावकारांत अनेक जातीचे लोक असून महाराष्ट्रीय

सावकार दूरच्या बुंदेलखंडासारख्या प्रांतांतहि जाऊन राहिले होते. गणेश नाईक भावे हे सावकार छत्रपुरास होते. बुंदेलखंडचे कमावीसदार गोविंद बल्लाळ खेर हे सरकारी रक्कमा त्यांच्यामार्फत रवाना करीत. पुण्यांत चिंतामण दीक्षित पटवर्धन, बाळाजी अनंत भिडे, शिवरामभट साने, जगन्नाथ नाईक भावे, मोरो शंकर, परशराम नाईक अनगळ, श्रीधर नाईक पाठक, सीताराम नाईक श्रोत्री, त्रिविक्रम गुजर, जनभट गाडगीळ, भवानपुरी गोसावी, मोरशेट कर्जे इत्यादि सावकार असत. ज्यांनीं सरकारास लाख लाख रुपयेपर्यंत कर्ज दिलें असे सावकार पुण्यास सन १७४० त सुमारें १६२ होते. वल्लभ सुंदर, बाळाजी नाईक, जोग, गद्रे, ताटके, थत्ते, भावे, रामाजी नाईक दातार, त्रिंबक विनायक चाबुकस्वार, तापीदास काशीदास, बाघोजी बगाडे, भुतकर, कहानदास, भोकरे, वानवळे हरिभक्ति इत्यादि सावकार सन १७७७ त होते. [नाना फ. चरित्र] संतशेठ मधवे यांजपासून १९७९५ रु., बाबूराव दीक्षित पटवर्धन यांजपासून २१२१९३ रु., चिंतामण दीक्षित पटवर्धन, बाळाजी अनंत भिडे, शिवरामभट साने यांजपासून ५० हजार रु. व शिवराम नाईक भिडे, मोरो शंकर, परशराम नाईक अनगळ यांजपासून २६४११७ रु. पेशव्यांनीं कर्ज काढलें होतें. व्याजाचा दर बहुधा दरमहा दरशेंकडा १ रु. असे. पेशवे सरकारापाशीं पैशाची टंचाई असल्याचें सर्वश्रुत आहे. तथापि साऱ्या देशांतच नाण्याचा पुरवठा तुटपुंजा. बहुतेक व्यवहार जिनसांच्या अदलाबदलीनें चालावा. खेड्यांतून नाण्याची गरज क्वचित् लागे. पुरंदर किल्ल्यावरील नोकर लोकांना सरकारांतून पगाराचा बराचसा भाग, कापडचोपड व इतर जिन्नस या रूपानें देऊन उरलेल्या भागाचे पैसे मिळाल्याचा दाखला सांपडतो.

महाराष्ट्राचे पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण असे दिशावार भाग कल्पिल्यास पेशवाईपूर्वीं पश्चिम भाग मागासलेला होता. व त्या मानानें अहमदनगर व औरंगाबाद या सभोवारचा प्रदेश हिंदु व मुसलमानी राज्यछत्राखालीं सुधारलेला असून त्यांत कलाकौशल्य व उद्योगधंदे उन्नतावस्थेंत असल्याचे वर प्रसंगोपात्त दाखविलेच आहे. वऱ्हाड व खानदेश या प्रांतांचीहि अशीच प्रगति झाली होती. खानदेशांत पासोड्या व इतर कापड यांची पैदास होत असे. वऱ्हाडची पायरी खानदेशापुडची. हे दोन्ही प्रदेश कपाशीचे, पिकाऊ, आणि बऱ्हाणपूर व एलिचपूर येथील मुसलमानी राज्यछत्राच्या खास सावलींतले असल्यानें त्यांची

प्रगति सुकर झाली. एलिचपूर ही मुसलमानी अमदानींतील वऱ्हाडची राजधानी. तेथें व अकोट, बाळापूर येथें सत्रंज्या, पागोटी व इतर कापड आजहि तयार होतें. देऊळगांव राजा येथें लुगडीं व खण होतात. खोलापूर व अंजनगाव येथें रेशमी कापड, मुकटे व कद होतात. एलिचपुराजवळ करजगांव येथें धातू गाळून घंटा व इतर सामान होतें. कारंजा व देऊळगांव राजा येथें कुंकूं आणि वणी येथें लाकडी व दगडी काम होतें. बाळापूर येथें दौलताबादी कागदाच्या तोडीचा कागद बनविला जाई. बांधकामांतील कारागिरीहि वऱ्हाड प्रांतांत उत्कर्षास पोचली होती. सर आलफ्रेड लायल हे वऱ्हाडचे कमिशनर व इतिहासकार होते. त्यांच्या मतें पुरातनत्व व कारागिरी यांत अति महत्त्वाची वऱ्हाडांतील इमारत म्हणजे वऱ्हाडच्या नैर्ऋत्येकडील लोणार या गावीं असलेलें दैत्यसूदनाचें देवालय होय. या देवळाचा आकार चतुष्कोणी किंवा अष्टकोणीहि नाहीं. एका चिंचोळया पट्टीनें जोडलेलीं दोन बहुकोनी वर्तुळें घेतलीं तर त्यांचा जसा आकार होईल, तसला याचा आकार आहे. देऊळ दगडी आहे. त्यांत लाकूड व चुना कोठेहि वापरलेला नाहीं. देवळाच्या बाहेरच्या बाजूनें दगडावर असंख्य चित्रें कोरलेलीं आहेत. यांपैकीं बहुतेक चित्रें मुसलमानांच्या आमदानींत, विशेषतः औरंगजेबाच्या कारकिर्दींत फोडून छिन्नभिन्न केलेलीं आहेत.

मौजे डाकोरे प्रांत ठासरे येथलि हिऱ्याची खाण पेशव्यांची होती. तसलीच खाण बुंदेलखंडांत होती. तिच्यांत दोनशे रुपये किमतीहून अधिक किमतीचा जो हिरा सापडेल तो पुण्यास पाठविण्याचा हुकूम गोविंद बल्लाळ बुंदेले यांस झाला. कळाकुसरीच्या वस्तूंतलि महाराष्ट्राची लंगडी बाजू नाना फडणविसाच्या काळांतहि फारशी सुधारली नाहीं. म्हणून नानाने पुढील जिनसा परमुलुखांतून मागाविल्या [१] मुलाम्याची [Enamelled] अत्तरदाणी तिची पाठ हिरवी पाहिजे व तिच्यावर चमकदार फुले पाहिजेत. [२] दोन सतारी [३] एक फर्माषी पितळेची डबी व [४] आबखेरा. महादजी शिंद्यानें सवाई माधवरावास हत्तीवरची अंबारी दिली होती. ती उन्हाच्या निवारणासाठीं वरच्यावर फिरवितां येत असे. ही अंबारी त्याने उत्तरेकडील कारागिरांकडून बनविली असावी. महाराष्ट्रांतल्या महाराष्ट्रांतहि पुणें-सातारा हा प्रांत अहमदनगरापेक्षां कसबांत मागासलेला होता. यास्तव पेशव्यांना आठ घोड्यांचा रथ करावयाचा झाला तेव्हां हुजूरून शिवराम गाडीवान यास नगरास पाठविण्यांत

आलें व तेथील अधिकाऱ्यास सदर गाडीवानाला सुतार, लोहार, लाकडें वगैरे साहित्य पुरविण्याची आज्ञा झाली. नानास हा उणेपणा शल्याप्रमाणें झोंबत होता. म्हणून ही उणिव दूर करण्याकरितां त्यानें महादजी शिंद्याच्या विद्यमानें जयपूरच्या भोजराज नामक कारागिरास पुण्यास आणवून मीन्याचें काम सुरू करण्याची खटपट केली. पण जयपूरच्या राजानें आपल्या कारागिरास सोडण्याचें नाकारले, तेव्हां नानाचा निरुपाय झाला. शंकराजी सखदेव यांच्या मार्फत दिल्लीहून कृष्णाची मूर्ति आणविण्याचाहि त्यांचा प्रयत्न होता, तोहि साधला नाहीं. त्यासंबंधीं दिल्लीचा माहीतगार माणूस नानास कळवितो, ‘तुम्ही पूर्वी पाहिले होते तसे कारागीर आतां दिल्लींत राहिले नाहीत. गेल्या दुष्काळांत ते नष्ट झाले. कांहीं लखनौस निघून गेले. आतां दिल्ली पूर्वीची राहिली नाहीं.’ आग्र्याची अवस्था दिल्लीहूनहि दीनवाणी. तेथील बातमीदार नानास लिहितो, ‘आग्र्यास कारागीर नावाचे उरले आहेत. त्यांच्या ठिकाणीं ज्ञान नाहीं व कसबहि नाहीं. आश्रय नाहीं म्हणून आग्र्यांतलि कलाकौशल्य ऱ्हास पावत आहे. आग्र्यापेक्षां दिल्ली कांहीं बरी. येथें कौशल्याच्या वस्तू मुळींच आढळत नाहींत. किती हुडकलें तरी सांपडत नाहींत. हा सगळा दोष आश्रयाभावाचा असे अनुभविक लोक सांगतात. ते म्हणतात कीं, पूर्वी श्रीमंत लोक मौल्यवान वस्तू खरेदी करीत. पण तेहि भिकेस लागल्यामुळें त्यांनीं त्या विकून टाकल्या.’ जेथून कारागिरीच्या वस्तू देखील नाहींशा झाल्या तेथें कारागिरांचे नांव कशाला? म्हणून नानाला वस्तूहि मिळेनात व कारागीरहि मिळेनात. कारागिरीकरिता पेशवे व त्यांचे कारभारी इतके आतुर झाले होते कीं, मोरशेट व सदाशिव शेट वगैरे सात असामींनी सरकारांत तोफांचे काम चांगले केले यास्तव त्यांस पेशव्यांनीं तर्फ नागोठणे ता. अवचितगड पैकीं दोन गांव पांचशें रुपये कमाल आकाराचे इनाम दिले.

साताऱ्याचे छत्रपति, पेशवे व त्यांचे सरदार यांच्या उत्तेजनानें विणकलेचा प्रसार महाराष्ट्रांत होऊं लागल्यावर माल खात्रीचा निघाला पाहिजे याविषयीं काळजी घेण्याची वेळ आली. जालनापूर येथील विणकरास पुढीलप्रमाणें ताकीद झाली. ‘सध्या चांदवडी रुपये आटवून जर तयार करतात. त्यामुळें जर वाईट होतो. पूर्वी मल्हारशाही इंग्रजी, सुरती किंवा पट्टणी रुपये आटवीत तेच आतां आटवावे. रेशीम तयार करताना खार हा केळी जाळून त्यापासून बन-

विलेला असतो. त्यामुळें जरीचा काठ काळा पडतो. तेव्हां कारखानदारांनीं दत्त्या खार वापरावा. पागोटी बारा पंधरा हात लांब असतात हें बरें नाहीं. त्यांची लांबी तीस हात ठेवावी.' एखाद्या पेठेचा चांगुलपणाचा लौकिक कायम राखणें वत्राढविणे, आणि आपल्या हुकमतीनें योग्य ती दिशा दाखविणें, हा स्तुत्य उद्योग प्रजेविषयीं ममत्व वाटल्यावाचून कसा होणार ?

पेशव्यांचा वरीलप्रमाणे मराठी राज्याच्या औद्योगिक उन्नतीसाठीं प्रयत्न सुरू होता. तरी परदेशी माल येथील उद्योगधंद्यांचे उच्चाटन करीत हळूहळू आपले बस्तान बसवीतच होता. पेशव्यांचा वकील मुंबईस पहिल्या बाजीरावापासून होता. तो इंग्रजाकडे आलेल्या तऱ्हेवार जिनसांची माहिती बाजीरावास कळवून त्यापैकीं ज्या हव्या असतील त्या जिनसा पाठवीत असे; त्याने १७३४ त पुढील पत्र बाजीरावास लिहिले. 'इंग्रजांच्या सरकारात सालगुदस्तपैकी सकलाद होती. ते हल्लीं लिलाव करून सावकारास दिली. सकलाद सस्ती विकली. त्यांत सकलादी, गालिचे सुजनी वजा वेलदार, हिरवे पिवळे लाल, बहुत वेश, खुश तऱ्हा. येक गलिचा येक तक्क्या तेच वजेचा, त्याला जोडा म्हणतात. येक गालिचा व येक तक्क्या एकूण जोडयास १८। रु. किंमत लिलावात जाली. याजवरी कोणी चढेना. याजकरिता यथास्थित किंमत न होय यास्तव इंग्रजानी ठेवले. त्यापैकीं सदरहू किमतीनें वीस पंचवीस जोडे कोणा कोणास दिले आहेत. गालिचा रुंद २॥ वार, लांब ६ वार याप्रमाणें आहे. तऱ्हादार जिन्नस दृष्टीस पडला व मोरो विश्वनाथ याणी २ जोडे घेतले आहेत. सरकारात खपतील. तरी लिहून पाठविणे म्हणौन सांगितले यावरून लिहिले आहे' (पे. द.) त्यानंतर बाजीरावास त्याजकडून दुसरे पत्र आले.

'सेवेसी विज्ञापना. भेस्त्र सिलेवान इंग्रज याचे घरीं बिलोरी दिवे झाडाचे, मज्यालसींत बसकेवरी ठेवावयाचे व फानसवजा टांगावयाचे ऐसे बहुत बेश दोनशे रूपयांचा जोडा यापासून आठसे पावेतो जोडा ऐसे तऱ्हेतऱ्हेचे आहेत. मुजरद आम्हास वखारेंत नेऊन दाखविले. तसेच थोर आरसे अडीच पावणेतीन हात लांब व दोन हात रुंद, वरते काम मुलामगिरी बहुत बेश, सालगुदस्तीं विलायती ज्याहाजे आलीं होतीं त्यापैकीं सरकारांत खप असला तरी लेहून पाठविणें म्हणोन इंग्रजानें सांगितलें. त्यावरून सेवेसी विदित व्हावे याजकरितां लिहिलें आहे. जडाव हिरे यांचे घडयाळ लहान सोन्याचें ऐसे एक उत्तम आहे; त्याचे

वृत्त व हिऱ्याचा सुमार पेशजी जासुदाबरोबर लिहिला आहे, त्यावरून विदित होईल. याशिवाय दिवसाचें आकाश पहावयाचें एक यंत्र पोटरी एवढें मोठें नळीवजा आहे. त्यांतून आकाश दिवसाचें पाहिलें म्हणजे जे आकाशांत आहे तें दिसतें येसे सांगतो. ते यंत्र आम्हास दाखविले घरांत, परंतु बाहेर नेऊन आकाश दाखविलें नाहीं. दाखवीन येसें बोलला तों त्यांची दरबारास जावयाची घटका भरली तसा उठून गेला आम्ही आपल्या घरास आलो. फिरोन साक्षेप करावा, तो केला नाहीं शेवेसी कळावे यास्तव लिहिले आहे. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. विदित होणे हे विज्ञापना.' (पे. द.)

वरील दोन्ही पत्रांत इंग्रज लोक मुंबईत करींत असलेल्या व्यापाराची माहिती आहे. त्यांत वर्णिलेला सर्वच माल परदेशी होता असे नाहीं. सकलादी व गालिचे हा माल देशी असून तो इंग्रजानी युरोपांत पाठविण्याकरितां खरेदी केलेला दिसतो. ही वेळ जुना माल काढून टाकून नवीन खरेदी करण्याची होती. या कारणाने इंग्रजानी जुन्या मालाचा लिलाव चालविला होता. परदेशी मालापैकीं काचेच्या आरागिनी, स्टँड (ठाणवई), हंडया, झुंबरे, मोठाले आरसे. हिरेजडित व सोन्याची घडयाळें, दुर्बिण हा माल होता. त्यांतलि कोणता माल बाजीरावाने मागविला हे समजत नाहीं. पण यानंतर एकाच वर्षानें म्हणजे १७३५ मध्यें कॅप्टन वॉकर याने बाजीरावास लिहिलेले पत्र उपलब्ध आहे; त्यात पेशव्याजवळील इंग्रजी घडयाळ कॅप्टन मजकुराने दुरुस्त केल्याचा उल्लेख आहे. (इ. सं.) अर्थात् बाजीराव घडयाळे वापरीत होता हें सिद्ध झाले. आज घडयाळाच्या जेवढ्या तऱ्हा माहीत आहेत त्यांपैकीं बहुतेक तऱ्हा पेशव्याना परिचित असून त्यानी ती घडयाळे आपल्याजवळ बाळगली होती. वाळूचे घडयाळ अगदीच सोपे व साधे. ज्याना एखादे काम ठराविक वेळच करावयाचें असते त्यांच्या ही घडयाळे उपयोगाची. त्यांत किती वाजले हे कळत नसले तरी केव्हापासून किती वेळ गेला याचा मात्र नीट बोध होतो. माधवरावाची आई गोपिकाबाई गंगापुरास जाऊन राहिल्यावर तिला जप व ध्यान करणें इ. पुण्यकृत्यातच काळ घालावावयाचा होता. यास्तव तिजकरितां एक वालुकायंत्र तनि रुपयास खरेदी करण्यांत आले. (पे. द. २२ सन १७६८).

ही घड्याळे पंचवीस तीस वर्षापूर्वींपर्यंत आपल्याकडे तुरळक आढळांत येत असत. मराठी शाळांतून ती सरकाराकडून वापरण्याकरितां मिळत होती. माधव-

रावाचा भाऊ नारायणराव याजपाशीं एक हातघड्याळ होतें. हातघड्याळ म्हणजे वॉच. ही चीज इतकी दुर्मिळ कीं, पेशव्याशिवाय इतर फार थोड्यांना साध्य, म्हणून फार काळजीनें व बडेजावीनें वापरण्यांत येत असे. नारायण रावाचे हातघड्याळ एका सुंदर झांकणात ठेवले असून ते झांकण रघोजी जिनगराकडून मखमालीनें मढवून घेतले होते (पे. द. २२) घडयाळाची तारीफ एवढ्यानें संपली नाहीं. त्याच्या हातघडयाळाला चमेलीचे तेल लावीत असत. हें तेल घडयाळाला सुगंध यावा या हेतूनें लावण्यांत येत नसेल. घडयाळ स्वच्छ करण्याकरितां हल्ली घडयाळजी जसे तेल लावतात तसाच हाहि उपक्रम असावा. घडयाळांची इतकी मिजास कां ठेवण्यांत येत असे याचा उलगडा त्यांच्या किंमती कळल्या म्हणजेच होणार आहे.

एकदा पेशव्यांच्या खासगी ख़र्चांतून एकंदर तीन घडयाळे २७७७ रुपयास घेतली होती. त्यापैकीं एका घडयाळाची किंमत ६३५ रु., दुसऱ्याची १६९१॥ रु. पहिल्याचे वर्णन येणेंप्रमाणें–' हातघडयाळ तीन काट्यांचे, साखळी चार पदरी, शेवटास घंटा १ व अत्तरदाणींचे घर १ व किली तांबे विलाइती किं. ६३५ रु.' (पे. द. २२) घडयाळाच्या तीन काट्यापैकीं एक काटा सेकंदाचा होता हें उघड आहे. छेडयाला घंटा व अत्तरदाणीचे घर जोडून ते फारच आकर्षक बनविलेले दिसते. घडयाळांच्या तऱ्हा अनेक असून त्यांतलि एका घडयाळाला गंजाचे घडयाळ असे म्हटले आहे. सदर घडयाळ थोरल्या माधवरावापाशीं होतें. पेशव्यांना कांहीं घड्याळे इंग्रजाकडून नजर येत व कांहीं ते स्वतः खरेदी घेत. आपल्या मालाचा प्रवेश पेशव्यांच्या दरबारी करून तो सर्वांच्या नजरेस आणावा व अशा रीतीनें खप वाढवावा हाच नजराण्याचा हेतु. त्यांचा हा हेतु सफळ व्हावा यांत नवल नाहीं. घडयाळांचा वापर वाढल्यावर तीं दुरुस्त करणारे घडयाळजी लागावयाचेच. माधवरावाच्या कारकीर्दीत घडयाळे नीट करण्याचे काम पुण्यांतील कारागिरांना साधले होते. त्याचे एक मोठे इंग्रजी घडयाळ होतें. ते बहुधा भिंतीला लावण्याचे व घंटेचे असावे. ' ते नीट करण्याकरितां गोपाळजी कारीगर याजकडे दिले होते. त्याचे हाताखालीं पुरुषोत्तम लोहार व त्याचा घणकरी पेठ शुक्रवार हे असून त्यांनीं तीन महिन्यांत काम आटोपले. ते कधीं सहा घटका; कधीं प्रहर, कधीं पुरा दिवस याप्रमाणें त्यांनीं करून घडयाळाची आवते नीट केली.' (पे. द. २२) याबद्दल त्यांस २० रु. मजुरी

मिळाली. नवीन गैरमाहीत वस्तूंचा प्रचार झाला व स्वभाषेशिवाय दुसऱ्या भाषेचे ज्ञान नसले म्हणजे एकच शब्द विविध अर्थांनी वापरण्यांत येऊन भाषा श्रीमंत व प्रगल्भ बनत जाते त्याचे हें उदाहरणच आहे. हळूहळू घड्याळांचा प्रसार इतका वाढला कीं देशी राजेरजवाड्यांतहि परस्परास पाठविण्याचा तो नजराण्यापैकीं एक जिन्नसच होऊन बसला. एका राजानें दुसऱ्या राजास नजर करावयाचे घड्याळांत अपूर्वता असली तरच कांहीं शोभा. माधवराव पेशव्यानें निजामअल्लीस घड्याळ दिलें ते मोठे (क्लॉक) तर होतेच; पण त्यांतून अनेक प्रकारचे संगीत रागहि निघत असत. या घड्याळाची किंमत पांच हजार रुपये होती. (पे. द. २२) घड्याळें नादुरुस्त झाली असतां त्यांच्या दुरुस्तीची उपकरणे पेशव्यांना आपल्या संग्रही ठेवावी लागत. 'खालील जिन्नस जिन्नसखान्यांत जमा झाले. (१) ३८ रु. किंमतीच्या घड्याळाच्या कमाणा (२) २४ भिंगे घड्याळांची किंमत रु. १२' [पे. द. २२] 'खाशाकडील घड्याळास ५ आणे किंमतीची काच बसविली.' [पे. द. २२ सन १७६८] घड्याळांच्या डागडोजी करितां बंदरी तेलहि संग्रही ठेवल्याचा उल्लेख सांपडतो. [पे. द. २२] सूर्य घड्याळें सांप्रत कोणाच्या आढळांत नाहींत. ती बहुतेक उन्हांत लावण्यांत येत असावी. उन्हांत मधील काठ्याची सावली जशी फिरेल त्यावरून वेळ कळत असे. 'जमा जिन्नसखाना-खरेदी सूर्य घड्याळें गु॥ यादो विठ्ठल कोर्डे शागीर्द किंमत १५० रु. एकूण दागिना किली समवेत सुमार १' [पे. द. २२ सन १७६८.]

वयोमानामुळें किंवा डोळ्यांतील नैसर्गिक दोषामुळें ज्यांची दृष्टि मंद झाली आहे त्यांना चष्मा हा एक अनुग्रहच समजला पाहिजे. चष्म्यास चाळीशी म्हणतात. त्यावरूनहि वयाच्या चाळीसाव्या वर्षापासून कृत्रिम साधनाची गरज कशी भासूं लागते हें समजते. हल्लींप्रमाणें त्या काळीं चष्म्यांचा प्रसार सर्वत्र जोरानें झाला नसला तरी मोठमोठ्या लोकांनीं मनांत आणिल्यास त्यांना चष्मा दुष्प्राप्य नव्हता. पेशव्यांच्या संग्रही उपनेत्र असून त्यांपैकीं एकाचे घर शिसव्याचे होते.

हिंदुस्थानांत साखर होत असे, पण ती सफेत नसल्यामुळें चिनी साखर श्रीमंत लोक वापरीत. सन १७६९ त गंगापुरास गोपिकाबाईस चिनी सफेत साखर मिळेना म्हणून तेथील कारकून रामचंद्र गणेश गोरे यानें २ मण साखर

पुण्याहून मागविली. [पे. द. ३२] माधवराव पेशव्याच्या कारकीर्दींत राघोबाने नाना फडणविसास पुढील पत्र लिहिले. ' सरकारांत कमच्यांचे प्रयोजन आहे. तरी पंचवीस कमच्या इंगरेजी हुजूर सिताबीने पाठविणें. कमच्या तयार असल्यास उत्तम. नाहींतर तयार करून अगर मुंबईहून आणून पाठविणें [पे. द. ३२ सन १७६५] माधवरावाच्या वेळीं महाराष्ट्रांत इंग्रजी लोखंडाचा उपयोग सुरू होता व इंग्रजांनीं आपल्या पोलादापासून बनविलेली हत्यारेहि स्वदेशी हत्यारापेक्षां अधिक पाणीदार व उपयुक्त असल्याचें पाहून ती वापरण्यांत येत होती हें वरील पत्रावरून स्पष्टपणें सिद्ध झालें.

युरोपियन लोक भेटी म्हणून नव्यानव्या जिनसा पाठवीत, त्यांत थोरल्या माधवरावाकडे एकदां चष्मेही भेटीदाखल आले होते. ' राजश्री राव याजकडे उपनेत्रे भेटीची आली. ती बांधावयासी रुमाल खादीचा १ ' [पे. द. २२] लोहचुंबकाचा उपयोग तोफखान्याकडे काय होता हें समजत नाहीं. तथापि पेशव्यांच्या तोफखान्याकडे एक लोहचुंबक होता. आधुनिक सुधारणेच्या व ज्ञानाच्या या साधनाप्रमाणें थोर लोकांना थर्मामीटर (उष्णतामापक यंत्र) वापरण्याचेहि महत्त्व समजले होते. पेशव्यांच्या संग्रही थर्मामीटर होते. त्याचे वर्णन विशेष रीतीनें केलेले आढळते. ' पट्टी पितळेची वर (आणि) नळी काचेची मध्यें बसविली आहे. आंत पारा प्रकृति पहावयासाठीं किं. रु. १४ ' हें उष्णतामापक यंत्र पेशव्यांनीं इंग्रजापासूनच घेतले होते.

त्यांच्यापाशीं दुर्बिणहि होती. तिचे वर्णन येणेंप्रमाणें ' दुरबीण नळी लहान. घर हिरवे चर्मी, कांडी दोन पांढरी रुप्यासारखी आहेत. एक कांडे रोगणाचे हिरवे, गवसणी गजनीची किं. रु. १०० ' दुर्बिणीने आकाशस्थ दूरच्या गोलांचे आकार व रूप समजून होणारा आनंद अवर्णनीय होय. यामुळें दुर्बिण वापरण्याचा प्रघात पेशव्याप्रमाणें त्यांच्या सरदारांतहि पडला होता. विसाजी नारायण वाडदेकर याने पुण्याहून मिरजेस श्रीपतराव मोरेश्वर यास ता. २३-१२-१७८१ रोजीं पुढील मजकुराचे पत्र पाठविले. ' दुरबिणीविशी लिहिले, त्यास पुण्यांत चांगल्या उंच दुरबिणी हल्ली मिळत नाहींत. आहेत त्यांतून कोशी दोन कोशी दिसते, तेहि अंधक दिसते. साफ दिसत नाहीं. त्यांची किंमत १७ रु. पडती. तुम्ही लिहिल्याप्रमाणें पांच कोसावरील दिसत नाहीं. हल्ली इंग्रजाशीं बिघाड झालेला आहे. यामुळें माल

येत नाहीं. दोन दुरबिणी होत्या. परंतु माल चांगला नाहीं. आणि किंमत फार आणि संजाईत देत नाहीं यास्तव पाठविली नाहीं ' [ऐ. ले. सं. भाग ७ वा] पेशव्यांच्या संग्रहांतील दुर्बिणीपेक्षां या दुर्बिणी बऱ्याच हलक्या दिसतात.

रघुनाथराव पेशव्यांचे मेहुणे गोपाळराव व कृष्णराव बर्वे यांची मालमत्ता जप्त करण्यांत आली. त्यांपैकीं खालील दोन जिन्नस पेशव्यांच्या जिन्नसखान्यांत रवाना झाले. ' (१) रुप्याच्या चौकटीचा मळसूत्री आरसा, (२) दिशायंत्र रुपे वजन तोळे ।≈ ' [पे. द. २२] फोटो काढण्याचा कॅमेराहि पेशव्यांनीं इंग्रजापासून आणिला होता असें दिसतें. ' विनंति मीर अनवर–सातळी पाहून तसबीर काढावयाची पेटी इंग्रेजाकडील आणली होती. ती आपण सरकारांत मागावयास पाठविली त्याजवरून शोध करून आपणाकडे नवलोजी चव्हाण याजसमागमे पाठविली आहे. घ्यावी आणि पावती द्यावी. जमा सरकारांत धरली आहे. इंग्रेजाचे नावे खर्च लिहवितो. ' [पे. द. ३२] हें पत्र पहिला माधवराव किंवा नारायणराव यांच्या कारकीर्दीतलि असावे. पण कॅमेऱ्याचा उपयोग तसबिरी काढण्याच्या कामीं त्याकाळीं झाला नसावा. झाला असता तर पेशव्यांनीं आपल्या चित्रकाराकडून काढविलेली छायाचित्रे आज उपलब्ध होण्यास हरकत नव्हती.

वरील बहुतेक जिन्नस शास्त्रीय ज्ञानाचे आहेत. त्या बाबतींत हिंदुस्थानांत त्या काळीं हल्लीपेक्षाहि अधिक अंधार असल्यामुळें त्या दिशेनें परदेशी मालाचा प्रवेश देशभर हळूहळू पण वाढता होता. त्याखेरीज जे जिन्नस इकडे होत त्या जिनसांहून परदेशांतून येणारे जिन्नस अधिक सुबकपणा व कार्यक्षमता या गुणांच्या जोरावर स्वदेशी जिनसांना मागें टाकीत. त्या योगानेहि स्वदेशी मालाच्या खपास बराच धक्का बसून त्याचे स्थान परदेशी माल पटकावू लागला होता. आरमाणी फिरंगी वैद्यानें नारायणराव पेशव्यास सन १७६७ मध्यें एक दोन पाती चाकू व एक कात्री नजर केली. (पे. द. २२). कित्येक जिन्नस इकडे होत असलेले पाहून युरोपियनानी त्याहून वरचढ जिन्नस बनविण्याचे प्रयत्न करावे व त्यांत यश लाभले म्हणजे इकडील राजांना नजर पाठवावे आणि अशा रीतीनें आपल्या मालाला राजाश्रय मिळवावा, या उपक्रमापैकी वरील उपक्रम होय. त्यांचा सुबक माल पाहून इकडे त्या तोडीचा माल बनविणें हा एक उपाय आहे. पण त्याचा अवलंब कितपत होत असेल याविषयीं शंका आहे. शाहू

महाराजाप्रमाणें पेशव्यांना मेणबत्त्या, गुलाबी अत्तर वगैरे जिनसांची गरज लागली म्हणजे सदर जिनसा ते इंग्रज पोर्तुगीज डच यांजकडून मुंबई दमण वगैरे बंदरांतून आणवीत. नानासाहेब पेशव्यास शंकराजी केशव याने वरील बाबतींत पत्र लिहिले आहे त्यांत तो म्हणतो, ' मोमवत्त्या मुंबईहून चार हजार रुपयांच्या खरेदी करून दर मोमबत्ती एक गज लांब प्रमाणे पाठविणें म्हणून आज्ञा. आज्ञेप्रमाणें मुंबईस प्रयत्न केला तेथें मिळत नाहीं. दवणेस एका फिरंग्याकडे होत्या त्याचा प्रयत्न दवणकर करितात. अजम मतेस वियेरंदसित्व बंदरे यासी लिहून ६२२ रुपयांच्या सुमार ७३२ कारड १६ भरून पाठविल्या आहेत. दर मोमबत्ती लांब दीड पावणेदोन हात आहेत. गुलाब शिसे ४८ कारड १२ पाठविले आहेत...काचेची भिंगें पंचरंगी व आरशाची भिंगे मागाहून माणसे आणून रवाना करतो-' (पे. द. १८). मेणबत्ती हा जिन्नस इकडे पाठवून युरोपियन लोक एतद्देशीयांच्या गरजा वाढवीत होते व इकडील लोकांपासून पैसा काढून त्यांची नागवणूक करीत होते. मेणबत्त्या इकडे होत असत, पण त्याहून युरोपांतील मेणबत्त्या अधिक सुबक होत्या.

काच हिंदुस्थानांत पुरातनकालापासून उत्पन्न होत आहे. याची साक्ष बांगडयाच देत आहेत. काचेपासून आरसेहि बनविले जात असतील. पण या कलेंत पेशवाईच्या सुमारास हिंदुस्थान देश मागे पडला असावा. नाहींपेक्षां वरलि पत्रांत म्हटल्याप्रमाणें काचेची पंचरंगी भिंगे व आरशाची भिंगे शंकराजी केशव यास मुंबई अगर दमण येथील बंदरांतून विकत घेऊन पाठविण्याचें कारण नव्हते. पेशवाईच्या काळांत हिंदुस्थानांत काचेचा माल होत असला तर तो हलक्या प्रतीचा असला पाहिजे. ' कलकत्तेकर इंग्रजानी दादासाहेबास दोन काचेचे हुक्के नजर पाठविले '(पे. द. २२ सन १७६८) या एकाच उदाहरणावरून सदर धंद्यांत पाश्चात्यांची प्रगति किती झाली होती हें कळून येते. त्याच साली मुंबईकर इंग्रजानी पेशव्याकडे कांहीं जिन्नस पाठविले. त्यांत एक मळसूत्री दुहेरी आरसा होता व चार लहान कुप्यांत दोन तोळे विलायती अत्तर पाठविले होते. हिंदुस्थानांत सुगंधी द्रव्ये व फुले इतकी विपुल आहेत कीं, त्यापासून हवे ते अत्तर निघण्यास अडचण पडू नये. फार काय, पण अत्तराविषयीं कनोज शहराची प्रख्यातीच आहे. असे असून तो हिंदी धंदा हळुहळू हस्तगत करण्यावर पाश्चात्यांची नजर कशी बसली होती याचे प्रमाण दुसरे कोणते पाहिजे?

जो न्याय अत्तरांचा तोच कुलुपांचाहि. कुलपे इकडे होत असत व होतातहि. पण त्याहिंपेक्षां सुबक व मजबूत कुलपे बनवून या देशांत खपविण्यास पाश्चात्यांनीं सुरुवात केल्यापासून स्वदेशी कुलुपांचाहि धंदा बसल्यासारखाच झाला. त्याला प्रारंभ पेशवाईंतच झालेला आढळतो. कारण सन १७६८ त पेशव्यांकडे चार आणे किमतीचे पितळी लहान फिरंगाणी कुलूप खरेदी केल्याचा दाखला त्यांच्या दप्तरीं सांपडतो. कागदाचेहि तसेच. सुडाचा व साधा कागद दौलताबाद, जुन्नर इत्यादि गावी होत असे. पण त्यापेक्षां गुळगुळीत, पांढरासफेत व मोहोरेदार कागद युरोपांतून येऊ लागताच देशी कागदाचा धंदा त्यापुढें सहजच बुडत चालला. नारो बाबाजी पुण्यांतील इतिहासप्रसिद्ध अशा नगरकर घराण्याचा मूळ पुरुष अहमदनगरास किल्लेदार होता. त्याला नानासाहेब पेशव्यानें सन १७६० त उत्तर हिंदुस्थानावरील स्वारीकरितां कांहीं सरंजाम नगर येथील जकीऱ्यांपैकीं रवाना करण्यास फर्माविले. त्यात तोफांचे गोळे १९००० व शिसे १० खंडी व त्याबरोबरच फिरंगाणी कागदाचे रजमे (रिमे ?) दोन हजार पाठविण्यास त्यास लिहिले होते. नानासाहेबाच्या या हुकुमास नारो बाबाजीनें उत्तर पाठविले. त्यांत तो म्हणतो, ' फिरगाणी कागद रजमे नेमणूक दोन हजार पैकीं शहरांत शोध केला. फिरगाणी कागद मिळत नाहीं. साठ सत्तर रजमे मिळाली ती पाठवितो. आणखी तलास करितो. जी मिळतील ती पाठवितो. ' [पे. द.] नारो बाबाजीनें पाठविला तो काबद फिरंगाणी नसावा असें दिसते. परंतु देशी कागदापेक्षां परदेशी कागद चांगला अशी समजूत नानासाहेबाच्या कारकिर्दीत सन १७६० मध्येंच झाली असल्याचे या पत्रानें सिद्ध होते.

इंग्रज लोकाबरोबर चहा ही वस्तु हिंदुस्थानांत आली. पण चहा महाग व दुर्मिळ असल्यामुळें कांहीं श्रीमंत लोकांत त्याचा थोडा प्रसार झाला होता. सवाई माधवराव व त्याची आई गंगाबाई पुरंदरावर असतां ज्या जिनसा पुण्याहून मागविण्यांत आल्या त्यांत चहादाणी होती. (पे. द. ३२) प्रसिद्ध मुत्सदी सखाराम बापूदि चहा पीत असे.

घोड्याच्या गाडया म्हणजे बग्या किंवा व्हिक्टोरिया व टांगे पेशवाईच्या अखेरच्या दिवसांत पुण्यांत आले होते. खासगीवाल्याच्या त्या वेळच्या दप्तरांत तांगा हा शब्द आढळतो. तसेंच त्यांत ' २३ रु. घोडयाची गाडी नवी केली

तिला खर्च आला ' असें म्हटलें आहे. ही गाडी म्हणजेच बगी किंवा व्हिक्टोरिया. व्हिक्टोरियालाहि पुढें लोक रथ म्हणूं लागले. अशा प्रकारचा रथ दुसऱ्या बाजीरावाचा होता असें दिसतें. त्या संबंधाचे सन १८१६ सालचे पत्र येणेप्रमाणें ' विशेष–श्रीमंतांची स्वारी दर्शाकरिता फुलगावास भीमातीरास गेले. जातानां मार्गांत रथ उलथून पडल्यामुळें हातास जरब लागली आहे. झाडून मंडळी आज तेथे गेली आहे.' (पे.दं.३२) फुलगांव पुण्यापासून सात आठ कोसांवर भीमा नदीच्या काठी आहे. तो गांव बाजीरावास पसंत पडल्यावरून बाजीरावाचा विचार त्याची वस्ती शहराप्रमाणें वाढविण्याचा होता. फुलगावास त्याचा वाडा व घाट असून तेथे तो मधूनमधून जाऊन रहात असे. पुण्याहून फुलगावास जावयाचा रस्ता हल्लीच्या रस्त्यासारखा खडीचा बांधीव नसल्यामुळें बगीसारखे नाजूक वाहन त्या रस्त्यानें जाताना उलटावे यांत नवल नाहीं. खासगीवाल्याजवळची घोडयाची गाडी व बाजीरावाचा रथ ही दोन्ही वाहने म्हणजे बग्याच होत हें आणखी एका प्रमाणावरून सिद्ध होते. राघोबा पेशवा इंग्रजापाशीं असतां त्यानी त्याला चार घोडयांचा रथ दिला होता असे आनंदीबाई म्हणते. ' इंग्रजानी श्रीमंताची मर्जी पाहून रथ चार घोडयासुद्धा दिला. अशा वस्ता मेळविल्या होत्या ' [पे. द. ४]

पुराणकालापासून हिंदू लोकाना रथ माहित आहेत. त्या प्रकारचे रथ पेशवाईंत मोठ्या लोकापाशीं आढळत. सन १७३५ त निजामाच्या दरबारीं शामाजी गोविंद नावाचा पेशव्यांचा नोकर होता. त्यानें चिमाजी आप्पास पत्र लिहिले आहे. त्यांत बाजीरावाने एक रथ लष्करांतून पाठविला त्याचे वर्णन आहे. शामाजी म्हणतो ' श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीनी लष्करातून रथ रा. बाबूजी नाईक यांचा व सरकाराचे दोन बैल पाठविले. आज्ञापत्र सादर जाले कीं, रथाचे पटे वगैरे सामान तुटले आहे ते कुल धड करून पुण्यास रवाना करणे. त्यावरून हल्लीं रथास पटे नवे चढवून व बैलास झुली व रथास घटाटोप पडदे खारव्याचे करून वगैरे सामान दाघदोजी करून रथ सेवेसी रवाना केला आहे ' [पे. द. ३०] या रथाचा घाट अर्थात्‌च पुराणांतरीच्या रथाप्रमाणें असावा. अशाच प्रकारचा एक रथ तंजावरच्या राजघराण्यापाशीं असून त्याचे चित्र पारसनिसानी आपल्या इतिहाससंग्रहांत दिले आहे, ते वरील वर्णनाशी बरोबर जुळते. पण त्या रथाहून राघोबास इंग्रजापासून मिळालेला घोडयाचा रथ अग-

दीच वेगळा असला पाहिजे. बाजीरावाच्या रथासारखे रथ पेशव्यापाशी पुष्कळ असून त्यांच्या अठरा कारखान्यांत रथखाना हा एक कारखानाच होता. सखाराम बापू बोकील याच्या घरची वाटणी झाली तींत तिघा भावानी तीन रथ वाटून घेतल्याचा उल्लेख सांपडतो.

नित्याच्या वाहनांत टांगे बग्या यांचा शिरकाव झाला तसा अग्निप्रलयाचे संकट निवारण्याच्या गावठी साधनांत विलायती बंबहि येऊन बसला. ता. ४ एप्रिल १८०८ रोजीं शनिवारवाड्यांतील जवाहीरखान्याच्या खोलीस लागलेली आग विझविण्यास पाण्याचा पुरवठा केला तेव्हां बंबहि आणिला होता. 'वाडा शनिवार येथे सोमवारी सायंकाळीं आवसीचे आर्धी घटके रात्रीस जवाहिरखान्यांत खोलीचे दक्षिणेचे बाजूस अग्न लागली, त्याणे वाडा जाया व्हावा असे होते; परंतु स्वामींचे पुण्यप्रतापे बाहेरील कुमक येऊन पाहोचे तो अग्नि विझविला. किंचित् नाश जाहला आहे. पाण्याचा पुरावा बंबसुधा आणून जाहला. इतक्यांत राजश्री बापू गोखले वगैरे मंडळी येऊन पावली.' [पे. द. ३२] या पत्रांत उल्लेखलेला बंब शुक्रवारपेठेंतील सरकारी वाड्यापुढें ठेवीत असत. [पे. द. ३२]

प्रकरण एकविसावें

स्वदेशी कापड व कपडे

पेशवाईत वाफेच्या शक्तीचा शोध लागला नसल्यामुळें मनुष्याच्या गरजा मनुष्येच अंगमेहनतीने भागवीत व त्या अर्थात्च अल्प प्रमाणांत भागविल्या जात. बाष्पसामर्थ्याच्या अभावी मनुष्याची उत्पादनशक्ति जशी मर्यादित राहिली, तसेच दणवळणहि मंदगतीचेच राहिले. त्या योगाने जिनसांचा खपहि बेताचाच व्हावा. अशा स्थितींत आज मध्यम प्राप्तीच्या मनुष्याचे घर अनेक सुखसोयींनी व चिजानी गजबजलेले दिसतें, तसे त्या कालांत दिसत नव्हते. अन्न, वस्त्र व पात्र या मनुष्याच्या अत्यावश्यक गरजा होत. त्यापैकीं अन्नाविषयीं येथे लिहावयास नको. अन्न निसर्गतः उत्पन्न होते. पण वस्त्राची गोष्ट तशी नव्हे. वस्त्रास लागणारा कापूस हिंदुस्थानाच्या बऱ्याच मोठया भागांत पिकत असला तरी तो पिंजणे कातणे, त्यापासून वस्त्र विणणे व ते शेवटी शिवणे या श्रमाच्या, कौशल्याच्या व भानगडीच्या क्रिया होत. त्यांतल्या त्यांत सूत अतिशय बारकि कातणे व त्याचे अत्यंत तलम वस्त्र विणणे ही क्रिया विशेष कसबावाचून शक्य नसल्यामुळें मनुष्याला वापरावयास कापड फारच थोडे मिळावे व शिवलेले कपडे त्याहूनहि कमी वांट्यास यावे. यासाठीं त्या काळीं मनुष्याच्या वापरण्यांत कापड व कपडे कोणते होते हें समजून घेणे आगत्याचे होय.

पांघरण्याच्या वस्त्रांचे तीन प्रकार ठरतील. एक निजतांना पांघरण्याचे, दुसरे उबेकरितां एरवी अंगावर घेण्याचे व तिसरे सभेंत, दरबारांत किंवा चारचौघांत परिधान करण्याचे. घोंगडी व पासोडी हा पांघरण्याच्या वस्त्रांत गरिबांचा मुख्य आधार. घोंगडी पांघरावी अगर अंथरावीहि. गरीब शेतकऱ्याच्या खांद्यावर घोंगडी असावयाचीच. ते त्याचे भूषण. पण घोंगडी इतकी उपयुक्त असली तरी कोणी कोणास नजर केल्याचा अगर आहेर म्हणून दिल्याचा दाखला फारसा सांपडत नाहीं. शिवकालीन कागदपत्रावरून शिवाजी नजर म्हणून घोंगडीहि

देत असावा असें वाटते. त्याहून पासोडी मात्र शाहूमहाराजाच्या काळांत नजर करण्याचा प्रतिष्ठित लोकांतहि रिवाज होता. परंतु नजराण्यांतील पासोड्या उंची असल्या पाहिजेत हें उघड आहे.

ब्रह्मेंद्रस्वामींनीं चिमाजी आप्पास पत्र लिहिलें कीं, 'सोनजी व बाळकोजी यांस वस्त्रे देणे, पासोडी देणे' त्यावरून चिमणाजीने त्यास पासोडी दिली. [ब्र. स्वा. च.] राणोजी शिंदे याने ब्रह्मेंद्रस्वामीस लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे. 'स्वामीकडून केसोपंत आले. त्याजबरोबर ३००० रु. नक्त एक पासोडी, कारकुनाबाबत २०० रु. नक्त एक पागोटे दिलें.' [ब्र. स्वा. च] घोंगडीपेक्षां धाबळी हलकी पण उबदार. ती सोवळयांत पांघरण्याकारितां घेत. पासोडी इतकीच रजई दडस. ती रूभरी असल्यामुळें अधिक उबदार. जोट पासोडीपेक्षां कमी उबदार. गोविंद हरि गोपाळरावास कळवितो, 'मजजवळ जोट एकंदर नाहीं.' [ऐ. ले. सं.] ही दोन्ही पांघरुणे साधारणपणें सुस्थितीतील लोकांच्या वापरण्यांत असत. मोरो बल्लाळ पटवर्धन पुण्याहून मिरजेस गोपाळराव पटवर्धनास लिहितो. 'हल्लीं भगवंता खिजमतगार याजसमागमे रजई व पोथी पाठविली आहे.' [ऐ. ले. सं. खं. ३ रा.] रजई व दुलई या सारख्याच. सकलाद त्याहून उंची आणि शालजोडी उंची तशीच मौल्यवानहि. या जिनसा श्रीमंतांपाशीं असत. 'मोरो बल्लाळ पहिल्या माधवराव पेशव्यां. बरोबर कर्नाटकाच्या स्वारीवर असतां त्यानें बाळापुराहून गोपाळराव पटवर्धनास सन १७६७ मध्यें लिहिले, 'शालजोड्या तीर्थस्वरूप रा. नीळकंठराव यास व चिरंजीव राजश्री भाऊस किती पाहिजेत व आपणांस जरूर किती पाहिजेत, त्या लिहून पाठवाव्या म्हणजे घेऊं.' [ऐ. ले. सं. खं. ३ रा.] शालजोडी हे महावस्त्र प्रतिष्ठेचे समजले जात असे. ब्रह्मेंद्रस्वामीच्याहि ते वापरण्यांत व संग्रहांत असे. त्यांस चिमाजीआप्पा लिहितो, 'प्रसाद शालजोडी पाठविली ते पावली.'

शालजोडीचा प्रघात वरिष्ठ प्रतीच्या लोकांत सर्रास होता. सभा दरबार आदिकरून स्थळीं हिंदुसमाजांत शास्त्री पंडित प्रभृति विद्वानाना शालजोडी अंगावर घेण्यास अधिकारी समजले जात असे. पेशवाईत शालजोड्यांचा पुरवठा मुख्यतः दिल्लीहून होत असावा असे दिसते. शालजोडया व त्याचप्रमाणें उंची लोकरीची पसमल काश्मीरांत पैदा होत असल्यामुळें ती दोन्ही प्रकारची वस्त्रे

मागविण्याची उत्तरेकडील सोयीची पेठ पुण्याला दिल्ली हीच. म्हणून सन १७४५ सालीं दिल्लीहून दोनशे शालजोडया व पंचवीस पसमली रुमाल पेशव्यांनीं पुण्यास आणविले. चादर, शेले, दुपट्टे ही लौकिक वैभवाची द्योतक अशी वस्त्रें राजे, महाराजे, सरदार, दरकदार, थोर राजपुरुष धारण करीत. परगणे सिहोर यात तिवट शेले दुपट्टे आदिकरून बहुमोल वस्त्रें होत. म्हणून तेथून तिवटें शेले, दुपेटे, धोतरजोडे व महमुद्या इत्यादि शंभर सनगे पेशव्यांनीं खरेदी करून पाठविण्याविषयीं तिकडील अधिकाऱ्यांना कळविले. सन १७४९ त साताऱ्यास ताराबाईनें नानासाहेबाची आई काशीबाई व भार्या गोपिकाबाई यांना भेटीस बोलावले, तेव्हां त्याजबरोबर विश्वासराव व माधवराव हेहि गेले होते. ' त्यावेळीं ताराबाईनें गोपिकाबाईस १२५ रु. चे जरीचे पातळ व पांच रुपयांचा जरीचा खण दिला आणि विश्वासराव व माधवराव यांना दोन मंदिल, एक चाळीस रुपयांचा व दुसरा पन्नास रुपयांचा आणि दुपट्टे दोन, एक पस्तीस रुपयांचा व दुसरा पंचवीस रुपयांचा येणेंप्रमाणें जिनसा दिल्या. ' दुपट्टे केवढे असत, हें नानाफडणविसास माधवराव पेशव्यानें पत्र लिहिले त्यावरून कळून येते. ' विनंति उपरी, सोवळ्यांत पांघरण्यास दुपट्टे धुवट लांब सात हात व रुंद तीन हात याप्रमाणें येकपटी, मधी शिवण नाहीं, असे बारीक चांगले मुलाईम [मऊ] दोही पदरास मात्र गोल जर तीन बोटे रुंद, कांठास जर नसावी अशा तऱ्हेचे पांच सात चंदेरीचे अगर जैनाबादी याप्रमाणें अगर शहागडी अथवा पैठणी यांत जे मिळतील ते, परंतु बारीक व मुलाईम याप्रमाणें पाठवून देणें. ' [पे. द. ३२] या तपशिलावरून दुपट्टे हल्लींच्या उपरण्याप्रमाणेंच लांब रुंद व त्याच उपयोगाचे दिसतात. दुपट्ट्याविषयीं अधिक माहिती माधवरावाने नानाफडणविसास लिहिलेल्या पुढील पत्रांत आढळते.

' चि. रा. नारायणराव याजकरिता पोशाखास पैठणी दुपट्टे तीन हात रुंद, व पांच हात लांब याप्रमाणें, पदरास जर आसवली, अथवा नारळी पदराची अथवा साधी आठ बोटे, सहा बोटे व किनारा जाफरखानी घडीदार अथवा आसवली अगर नकसी. याप्रमाणें सनगे २ लाल, २ बनोस, २ गुलाबाची, २ हिर्वी, २ केशरी एकूण दहा दुपट्टे लिहिल्याप्रमाणें जामदारखान्यांत असल्यास पाठविणे. नसल्यास नवे खरेदी करून पाठविणें, (पे. द. ३२ सन १७६८). हें वर्णन वाचले म्हणजे दुपट्टा हें शेल्यासारखें उंची व बहुमोल वस्त्र असल्या-

विषयीं खात्री पटते, व तसे ते आढळतेहि. ब्रह्मेंद्रस्वामी बाजीरावापाशी कपडे मागताना पुढीलप्रमाणें त्यांस आठवण देतात, ‘ वस्त्रे औरंगजेब्या दोन, सकलाद उत्तम एक, पशमी थान (ठाणे) दुलई व कुडती करावयास दोन, येणेंप्रमाणे पाठवून द्या म्हटले होते. ’ [ब्र. स्वा. च.] पशमी हे उबदार व लोकरीचे उंची वस्त्र स्वामीना कुडतें शिवण्याकरिता पाहिजे होते. हे कुडते म्हणजे बंडीच असावी.

आज पुरुषांच्या डोक्याला रुमाल, टोपी, पगडी, पागोटे दिसते. कांहीं लोक बोडकेच हिंडतात. परंतु पेशवाईत शिरोभूषणे कित्येक प्रकारची असत. बहुतेकांच्या डोक्याला पागोटे, तिवट, पटका, मंदिल, फेटा, बत्ती यापैकीं कोणते ना कोणते वस्त्र असेच. ताराबाईने विश्वासराव व माधवराव याना मंदिल दिले होते. यावरून मंदिल, प्रौढापेक्षा तरुणानी किंबहुना मुलानींहि वापरण्याचा रिवाज होता असें वाटते. मंदिलाप्रमाणेंच तिवटहि तरुणांच्या व मुलांच्याहि वापरण्यांत असावा. पहिल्या बाजीरावाची बहीण भिऊबाई हिने ‘ चिरंजीव सदोबाकरिता [भाऊसाहेब पेशवे] बनोसी तिवट एक व केसरी तिवट एक असे दोन पाठविले. ’ [पे. डा.] पागोट्याचा दर्जा शिरोभूषणांत पहिला असून सर्व सभ्य व प्रतिष्ठित लोक पागोटीच घालीत. पागोट्याच्या खालची प्रत तिवटाची. तिवट केवढा व कशा प्रकारचा असे याची कल्पना माधवराव पेशव्याने नाना फडणविसास लिहिलेल्या खालील पत्रावरून येणार आहे. ‘ तिगस्ता तुमचे घरी मेजमानी जाली. ते समई पागोटे रंगिन केले होते. रंग बहुत खुष झाला होता. त्या तऱ्हेची पागोटी दोन तीन कारेगार लाऊन तयार करून पाठवून देणे. व पैठणी हिरव्या रंगाची तिवटे पोशाखी लांब पंचेचाळीस हात याप्रमाणें हिर्वा रंग चांगला गहरा असो पाच तिवटे पाठवणें म्हणोन पेशजी तुम्हास लिहिले होते. ...पुण्यास असल्यास, पाठविणे नाहींतर पैठणास लिहून लिहिल्याप्रमाणें तिवटे चांगली सूत बारीक असी पाठऊन देणे ’ [पे. द. ३२ सन १७६९] तिवटच पंचेचाळीस हात लांबीचे तर पागोटे त्याहून किती लांब असेल हें समजेल. पेशवाईत पागोटी बांधण्याचा धंदा करणारे पगडबंद थोडे होते. पागोटयांची बांधणीहि साधी असून जो तो आपल्याच हातानी आपले पागोटे हल्ली रुमाल बांधतात त्याप्रमाणे वेळच्यावेळी जिथल्या तिथे डोक्यावर बांधीत असे. नानाफडणविसास आपले पागोटे आपल्या हातानी बांधता येत नव्हते हें त्यांचे वैगुण्य पटवर्धन सरदारापैकीं पुरुषोत्तमदाजी यानी हें सर्वांच्या निदर्शनास आणण्यासाठी

एका भोजनप्रसंगी नानाना पागोटयाचा अहेर केला. अहेराचे पागोटे लागलीच बांधून घातले पाहिजे असा शिष्टसंप्रदाय असून तो नानाना सांभाळता न आल्याने त्यांचे चार चौघांत थोडे हसे झाले.

पटका व फेटा यांची गणना ऐटबाज किंबहुना छिचोर अल्लड पोशाखांत करीत. पटके अहमदाबादेहून येत असून त्यांची किंमत दर १५, २०, २५, ३०, ४० रु. येणेप्रमाणें असे. आज ज्या प्रकारच्या टोप्या हजारो लोकांच्या वापरण्यांत आहेत तसल्या टोप्या त्या काळांत कोणास माहीत नव्हत्या. तेव्हांहि टोप्या असत त्यांची तऱ्हा वेगळी. लहान मुलांच्या डोक्याला बंदाच्या टोप्या घालीत. पागोटी, तिवट, मंदिल यांजप्रमाणे कांहीं टोप्या जराच्या व मखमलीच्या असून त्या ब्रह्मेंद्रस्वामीसारख्या साधूनीहि धारण कराव्या. त्यास शंभुसिंग सरखेल याने लग्नाचा अहेर म्हणून एक शालजोडी, एक किनखाप व एक मखमलीची टोपी पाठविली [ब्र. स्वा. च.] श्रीमंतांच्या मुलांच्या व राजे लोकांच्या डोक्याला घरगुती वेळी टोप्या घालण्यांत येत. कित्येक टोप्या लहान मुले हल्ली तुरळक घालतात त्या कुंचीसारख्या होत्या. शेतकरी लोक पावसाळ्यांत घोंगडीची खोळ किंवा इरले डोक्यावर ठेवतात त्या आकाराच्या सर्वांच्या टोप्या असून त्यांचा उपयोग पर्जन्यनिवारण अगर शीतपरिहार यांजकडेच केला जात असे. या टोप्या बनातीच्या किंवा सकलादीच्या शिवत. यासंबंधीं माधवराव एका पत्रांत लिहितो, ‘ पावसाळी टोपी सकलादी दुरंगी सकलादीची करून पाठविणें, म्हणौन पेशजी लिहिले आहे. त्याप्रमाणें व येक मुलतानी सकलादीची याप्रमाणें दोन टोप्या करून जलद पाठवून द्याव्या. ’ [पे. द. ३२] परंतु सकलाद अथवा बनात श्रीमंतांनी वापरण्याजोगी. गांवाला जाताना किंवा पायी मोठमोठ्या मजली मारताना गोरगरिबांना त्यांचे काय होय ? अर्थात् त्यांना अशा कामीं बुरणूसच टिकाऊ. म्हणून त्या प्रकारचे कष्टाळू लोक, तसेच टपाल घेऊन जाणारे जासूद बुरणुसाच्या टोप्या पांघरीत. गोविंद हरि पटवर्धन गोपाळराव पटवर्धनास कळवितो ‘ तुमचा टोप वीस रोज राहिला होता. तो खेचूजवळी पाठविला आहे. ’ हा लढाईचे वेळीं डोक्याला घालावयाचा टोप दिसतो.

अंगांत घालावयाच्या कपड्यांची नांवे झगा, अंगारखा, डगला, कुडते अंगडे अशी आढळतात. झग्यापेक्षां अंगरखा व डगला आखूड, अंगरख्यापेक्षां

अंगडे आखूड, व अंगड्यापेक्षां कुडते आखूड. खालील पत्र पुण्याहून माधवराव पेशव्यातर्फे गंगापुरास पाठविले असावे. ‘ आज विजयादशमीस आपण भावसिंगाबरोबर सनगे झग्याची पाठविली ती पावली. श्रीमंतांचे पसंतीस फारच आली. त्यांतून एक झगा तयार करवून [माधवरावाने] अंगांत घातला. पहिली सनगे आपण पाठविली ती श्रीमंतांचे मर्जीस बरीच आली. ’ [पे. द.] झगा दरबारप्रसंगी घालण्याचा रिवाज होता. झगे लांब असल्यामुळें ते चुणावयास नोकर असत व त्यांजपाशीं कचकडी नांवाचे चुणण्याचे साधन असे. अंगरखा दरबारांत व इतर वेळींहि घालीत. गोविंद हरि म्हातारपणीं घरचे कामकाज पाहून होता. त्याला झग्यापेक्षां अंगरख्याचीच गरज असल्यामुळें तो गोपाळरावास लिहितो, ‘ अंगरख्याचा मजकूर लिहिला तो कळला. परंतु [अंगरखे] कशाचे करावे ? इकडील छिटे उणाख. एक रुपयाचा माल तो कवडीचा. ती छिटे कामाची नाहींत. दुसरा जिन्नस कांहीं अंगरख्यायोग्य दिसत नाहीं. ’ [ऐ. ले. सं.] गोविंदपंताला अंगरखा शिवावयाचा होता, पण त्याला पाहिजे तसे कापडच मिळत नव्हते, ही त्याची तक्रार. लांबीत झगा घोट्याइतका, अंगरखा व डगला गुडघ्याइतका, अंगडे मांड्याइतके व कुडते कंबरेबरोबर. कुडते बंडीसारखे असावे. झगा उदाहरणार्थ बादलीचा व जराचा, डगला जराचा व बुटेदार छिटाचा, अंगडे शालूचे, व औरंगजेबी कापडाचे असे. अहेरांत साडेतीन वस्त्रे देत. ती विजार, झगा, शिरपाव व अर्धे किनखापाचे ठाण मिळून होत. किंवा एक तिवट, दुसरा दुपेटा, कंबरबस्त्याकरितां किनखापाचा अर्धा तुकडा व पायजम्याकरितां महमदी किंवा कापडाचा तुकडा. असाहि अहेर करीत. उच्च दर्जाच्या नोकरांना चार वस्त्रे मिळत, तिवटाच्याऐवजी पागोटे किंवा मंदिल, दुपेटयाकरितां चादर, सबंध किनखाप व महमदी. पंतप्रधान सेनापति यांना पांच वस्त्रे मिळत व त्यांत पटकाहि असे. पहिले बाजीराव व नानासाहेब यांच्या अंगांत जाकिटासारखा कपडा आंत व वरून अंगरखा असल्यामुळें अंगरख्यांतून तो कपडा सुंदर दिसे. पहिल्या माधवरावाचा अंगरखा चिटाचा दिसतो.

स्त्रियांच्या पोशाखांत हल्लींप्रमाणें तेव्हांहि शिवलेले कपडे थोडे असत. त्यांत चोळया, परकर, लहंगा, वोढण्या, काचोळी यांचीं नांवे दृष्टीस पडत असून त्यांपैकीं महाराष्ट्रीय समाजाबाहेरच्या स्त्रीवर्गातच लहंगा, वोढणी व काचोळी

यांचा वापर होता. महाराष्ट्रीय स्त्रिया फक्त चोळया घालीत, मुली परकर नेशीत व क्वचित् काचोळीहि चढवीत. स्त्रियांच्या नेसणांत लुगडीं, साडया चिरडया, पातळे, पीतांबर, शालू व पैठण्या असत व त्या अंगावर प्रसंगविशेषी शेले घेत. पैठणी पातळाची किं. १४६ रु. व पीतांबराची किंमत २२। रु. पर्यंत असे. गरीब स्थितींतील स्त्रिया सुतडे नेसत असतीलच. परंतु श्रीमंतांच्या स्त्रियांत त्यांचा थोडा वापर असावा. बाजीरावाची पत्नी काशीबाई हिला जानोजी निंबाळकर याने ' वस्त्रे सुतडे काळे, पोफळे, चोळी तापत्याची पाठविली.' [पे. डा.]

पुरुष धोतरे नेसत. पण त्यांची अंगावर घेण्याची उपरणी हल्लींप्रमाणें तेव्हां नव्हती. धोतरजोडयाविषयीं महेश्वर, नागपूर, पैठण, अष्टी, चांदवड, सोलापूर या पेठांची प्रसिद्धि होती. पुण्यास मनाजोगे धोतरजोडे न मिळाल्यास पैठणाहून आणवीत. त्या धोतरासंबंधानें पेशव्यांची आवडनिवड कशी असे व ते कोणत्या तऱ्हेची धोतरे नेसत हें खालील उताऱ्यावरून कळून येईल. खालील सर्व पत्रे माधवराव पेशव्यानें नाना फडणविसाला लिहिली आहेत—

(१) खासगीत नेसावयासी धोत्रजोडे पैठणी पाहिजेत. त्यास येथून धोतर मासल्यास पाठविलें आहे. त्याप्रमाणें सूत व रेशीम या प्रतीचे लांब हात दहा व रुंद हात सव्वादोन येणेप्रमाणें पुण्यांत मिळतील तर धोतजोडे दहा खरेदी करून पाठवून देणे. पुण्यांत न मिळत तर पैठणाहून आणवून पाठवून देणे. [पे. द. सन १७६५]

(२) खासे धोतजोडे पैठणी जरीच्या काठाचे, काठास वेल याप्रमाणें नमोणा कागदावर लिहून दिला होता त्यांपैकीं कांहीं तयार होऊन आले असतील तर पाठविणे व पुण्यांतील सावकाराजवळ नसतील तर आणून खरेदी करून पाठविणे. तूर्त एक दोन जे मिळतात ते पाठविणे [पे. द. ३२ सन १७६६]

(३) सरकारांत खासे धोत्रजोडे अगदीं नाहींत. त्यास पैठणी धोत्रजोडे दहा दर लांब हात अकरा साडे अकरा व रुंद पावणेतीन हात याप्रमाणें सांडणीस्वाराबरोबर पाठवून देणें व कस्तूरी उंच पांच तोळे व असमानी रंगाचे रेशीम दहा तोळे पाठवून देणे. [पे. द. ३२ सन १७६९]

वर धोतरजोडे सांगितले आहेत त्यांपैकीं शेवटच्या पत्रांत ११।११॥ हात

लांब व २॥। हात रुंद धोतरजोडयांची मागणी आहे. सध्यां महाराष्ट्रांत धोतरें वापरण्यांत येतात त्यापेक्षां वरील धोतरांची लांबी व कांहींशीं रुंदीहि जास्ती आहे. इतकी मोठी धोतरें, नेसणारास सहज रीतीनें झेपावयाची तर त्यांचे सूत पुष्कळच बारीक म्हणजे ५०।६० नंबरचें असणे आवश्यक होय. अर्थात् असली धोतरें इतकी लांब रुंद, हातसुताची व हातविणीची आणि जरीकाठी किंमतीला फार महाग पडत असतील हें सांगावयास नकोच. पैठणी धोतर-जोडयांची किंमत वरील पत्रांत दिली नसली तरी तिचा अंदाज इतर पेठांतील आंकडयावरून बांधतां येणार आहे. पुण्यांतील पेशव्यांचे खाजगीवाले जे उंची नागपुरी धोतरजोडे मुलाकरितां वापरीत त्यांची किंमत ४० रु. पर्यंत असे. (ना. गो. चापेकर भा. इ. सं. मं. त्रैमासिक) ही किंमत रेशीमकाठी धोतरांची असल्यास पेशव्यांचे जरीकाठी धोतरजोडे ६०।७० रु. किंमतीचेहि असूं शकतील. सामान्य धोतर जोडे (सुती) १२॥, १५८१० व १६ रु. पर्यंत पडत.

नानासाहेब पेशव्यांचा पुत्र विश्वासराव याचा व्रतबंध झाला. त्यावेळीं आहेराकरितां २५७२९७। रुपयांचे कापड खरेदी करण्यांत आलें. त्याची यादी इतिहाससंग्रहांत दिली आहे. तिच्यावरून वस्त्रांच्या निरनिराळ्या जाती व त्यांच्या किंमती समजतात—

सणंग किंमत सरासरी तिवट रु. ८, मंदिल रु. १००, पासोडी ताडपत्री रु. ३०, पासोडी पैठणी रु. ६०, दुपट्टा रु. ५५, वोढणी रु. ७०, लुगडे पैठणी रु. २००, लुगडे ताडपत्री रु. ३६, चिर्डी पैठणी रु. ४०, लुगडे साधे रु. १५, साडी रु. १३, मुकटा जनानी रु. १७, पितांबर जनानी रु. ३४, पितांबर मर्दानी रु. ३३, धोतरजोडा रु. ८, विजार रु. ३३, पटकेबादली रु. १२, पातळ जरी रु. १९०, शालू किनारदार रु. ८०, शालू साधा रु. ९, पातळ साधे रु. ४॥, खादी पासोडी रु. २॥, खण हरजिनसी रु. ३॥.

पुणें येथील भारत इतिहास संशोधक मंडळांत एक अंगारखा असून तो नानाफडणविसांचा समजला जातो. तो पाहिला असतां तत्कालीन मोठमोठ्या लोकांच्या अंगरख्यांचा अंदाज बांधता येतो. अंगरखा असा आहे–' अंगरख्याचे कापड अत्यंत बारीक आहे. त्यांतून आंतील अंग स्पष्ट दिसते. हें कापड हात सुताचे असून मागावर विणलेले आहे. कापड पांढरें आहे. कमरे-

खालीं झोळ आहे. झोळाचा घेर १३॥ वार म्हणजे २७ हात आहे. तो नऊ ठिकाणीं जोडलेला आहे. हा १३॥ वार झोळ चुण्या घालून कमरेपाशीं एका वारांत बसविला आहे. शिवण हाताची आहे. बंद आठ असून गुंडी एक आहे. व ती हल्लीप्रमाणें उजव्या खांद्यावर नसून गळयांत घंटीजवळ आहे. छातविरील शिवण उभट अंडाकृति आहे. ' (भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष ३ रे) या-अंगरख्याचे वजन वीस तोळ्याहूह्नि कमी आहे इतके त्याचे सूत बारीक आहे. अंगात आतून कुंडते, वरून अंगरखा, डोक्याला पागोटे, खालीं पायजमा, अगर धोतर, अंगावर शेला किंवा दुपट्टा व पायांत जोडा असा महाराष्ट्रीयांचा सामान्यतः पोशाख होता. पागोटे ज्याचे त्याने डोक्याला येईल तसे बांधावे. परंतु फार लांब असे ते पागोटे ज्याचें त्याला डौलदार बांधतां येणे शक्य नसल्याचे आढळून आल्यावर पगडबंद हा वेगळाच धंदेवाईक वर्ग निर्माण झाला. सरदार वगैरे थोर लोक पागोटे अधिक शोभिवंत दिसण्याकरितां त्यावर तुरा शिरपेच व कलगी बसवीत. कंबरेभोवती एक वस्त्र गुंडाळीत त्यास बस्ता म्हणत. पेशवाईत कोणा युरोपियन बड्या लोकांचा सत्कार देशी पद्धतीच्या वस्त्रांनीच होत असे. त्यास टोपी, सूट, बूट असला पोशाख देत नसत. सन १७९० त टिपूवरील स्वारींत मराठ्यांच्या वतीनें हरिपंत फडके व परशुराम-भाऊ पटवर्धन हे सरदार इंग्रजांच्या मदतीस गेले होते. त्यावेळीं इंग्रजांचा जनरल लॉर्ड कॉर्नवालिस यास हरिपंताने बहुमानाचा पोशाख पुढीलप्रमाणें दिला.–' खासा जनरल याला शिरपेच पांचशे रुपयांचा, पोशाख १ शालजोडी १ किनखाप, २ महमुद्या, १ घोडा व त्याच्या कोशलदारास [कौंसिलर] शिरपेच किनखाप व महमुद्या. ' [ऐ. ले. सं.]

वर सांगितल्याप्रमाणें जे लोक पोशाख करीत त्यांना किंमत फार जबर पडत असेल हे उघड आहे. ज्याच्या त्याच्या योग्यतेपरत्वे ही किंमत १०० रु. पासून १००० रुपयांपर्यंत सहज जात असे. म्हणूनच समाजांतील वरिष्ठ दर्जाचे लोक सोडल्यास खालच्या प्रतीची माणसे बहुधा वस्त्रहीन असत असें म्हटले तरी चालेल. ते धोतराऐवजीं लंगोटी घालीत. दुपट्टा अगर शेला या ऐवजीं अंगावर घोंगडीपासोडीसारखे पटकुर टाकीत, डोक्याला पागोटे किंवा तिवट यांच्याऐवजीं चिंधी वांधीत. त्यांना कुडते, अंगरखा यासारखे शिवलेले वस्त्र क्वचितच घालावयास मिळत असे. कारण वस्त्रें हातानें सूत काढून मागावर

विणावयाची म्हणून महाग व शिलाईचे दरहि जबर. पण लढाईत या पोशाखानें निभाव लागणार नसल्यामुळें शिपाई नीटनेटका पोशाख करीत. तो असा-ते डोक्याला पागोटे घालीत असून तें लढतांना पडूं नये यासाठीं त्याच्या पट्टया हनुवटीखालून घेत. त्यांच्या पायांत चोळणा आणि अंगांत अंगराखा व कुडते [बंडी] असे. श्रीरंगपट्टण येथील दर्यादौलत नामक बंगल्याच्या भिंतीवर टिपूनें जी लढाईची चित्रें काढून ठेवली आहेत, त्यांतील शिपायांचा पोशाख याच धर्तीचा आहे. यावरून साऱ्या हिंदुस्थानांत सैनिकांचा पोशाख एकाच तऱ्हेचा होता असे अनुमान निघतें.

परंतु सरदारांचा पोशाख याहून विशेष प्रकारचा व अधिक सुरक्षितपणाचा होता. लढायांतून भाला, बरची, तलवार, इत्यादि हत्यारांचा विशेष उपयोग केला जाई. या हत्यारापासून स्वाराचे रक्षण व्हावे, अशी सदर पोशाखांची रचना असे. " बाजीरावाच्या नवरंगी तसबिरीत त्याच्या डोक्याला एक टोपी असून डोक्याच्या नाजूक भागाच्या बचावाची तरतूद आहे. डोक्याची कवटी, टाळू, कानशील व मान या भागावर टोपी जाड केली आहे. चांगल्या कमावलेल्या कातड्याची टोपी करून त्यावर कापड शिवले आहे. कातड्याची टोपी मध्यें घालून तिच्या खालून व वरून कापडावर कापड शिवून त्याची गोधडी बनविली आहे. टोपी डोक्यावरून पडू नये म्हणून तिला बंद बांधले आहेत. जिरेटोपाच्या खालोखाल डोक्याचे संरक्षण करण्याचे बाबतीत या टोपीची योग्यता आहे.

" टोपीसारखा अंगरखाहि गोधडीचाच आहे. गळ्यापासून कमरेपर्यंतच्या भागाचे रक्षण व्हावें हा त्याचा उद्देश आहे. अंगरख्यांत छाती, बरगडी व पोट या ठिकाणी कातड्याची योजना केली असून त्या ठिकाणची जाडी इतर भागापेक्षा जास्ती आहे. अंगरख्यास बाह्या मुळींच नसून फक्त बाहुट्यावर अंगरख्याचा थोडासा भाग आणिला आहे. यामुळें हा अंगरखा धारण करणाऱ्या शिपाईगड्यास भाल्याच्या फेकी करण्यास, पट्टयाचे हात चालविण्यास व इतर हत्यारें वापरण्यास कशाचाच व्यत्यय येत नाही. पाठीमागून कमरेखाली अंगरखा दुभागला आहे. सर्वांत छातीची काळजी जास्त घेतली आहे. बंदाच्या ऐवजी गुंड्या असत्या तर हा पेशवाईतील अंगरखा आहे किंवा इंग्रजीतील कोट आहे हें ठरविणे बरेच कठीण जाते. ठिकठिकाणीं बंदांची व्यवस्था केली असल्यानें त्याचा कपडा अंगाला अगदी चिकटून बसण्यास मदत होते.

अंगरखा व टोपी वरून निरनिराळ्या रंगाच्या उंची अशा रेशमी कापडानें मढविली आहे. साडेपांच सहा फूट उंचीच्या जवानास हा पोशाख अगदी बेताचा होतो. टोपी व अंगरखा या खाली असलीच गोधडींची इजार असेल. हा पोशाख सामान्य शिपायाचा नसून बड्या लष्करी अधिकाऱ्याचा असावा. पोशाखाच्या रचनेंत दिखाऊपणाकडेहि बरेच लक्ष दिलेले दिसते. (भा. इ. सं. मं. त्रैमासिक).

वरील अंगरख्याप्रमाणें लढाईत चिलखतेहि घालीत. त्यांचा व टोप्यांचा उल्लेख नानासाहेब पेशव्याने अंताजी नारायणास ता. २१-१२-१७४७ रोजी पत्र लिहिले त्यांत आहे. ' खासे चिलखत व चिरंजीव राजश्री भाऊचे व राजश्री महादाजी अंबाजी याचे ऐसी तीनी चिलखते तयार करविली आहेत, ते व टोप व बिन्या मुलामा करावयास दिल्या आहेत. त्या तयार करवून व जिरे परशराम जिनगर याजवळ तयार करावयास दिले आहेत, त्यास जिरे तयार जहाले असिले तरी परशराम जिनगर याजसमागमे सत्वर पाठवून देणे. तयार जाहले नसिले तरी जिरे परशराम यास येथे पाठवून देणे म्हणजे येथेच तयार करिल. मडल्याचा दुपटा हिरवे पट्टचा अभ्रा आहे तो दुपटा पाठवून देणे व खर्ची चिलखते जिरायतखान्यापैकी सुमार १० पाठविणे......खाशा चिलखतास रुप्याच्या कड्या व खजीने व वाद्या व घुंड्या तयार करवून पाठविणे. सदरहू लिहिल्याप्रमाणे सत्वर रवानगी करणे. विलंब न लावणें. '

हा लष्करी व नागर पद्धतीचा देशी पोशाख झाला. तसाच इंग्रजी पद्धतीचाहि पोशाख पेशव्यांच्या संग्रही असावा असें खालील पत्रावरून दिसते. हें पत्र सन १७७६ साली इंग्रजांचा वकील तहाचे कामी सवाई माधवराव पेशव्यास भेटण्याकरिता पुरंदर किल्ल्यावर आला तेव्हां लिहिले आहे. ' विनंति. इंग्रजाकडील वकील आला आहे. तो श्रीमंतांचे भेटीस येईल. त्याच्या टोप्या व अंगरखे पाहून श्रीमंत भयाभीत होतील. यास्तव आगोधर धीट करावे लागते. ऐशास जामदारखान्यात व जिन्नसखान्यांत वगैरे कारखान्यात टोप्या व अंगरखे इंग्रजाचे साजाचे व सोंगाचे पाठवून द्यावे, म्हणौन पत्री लिहिले त्याजवरून टोप्या व कुडत्या मिळोन साडेसहा सनगे पाठविली. '[पे. द. ३२]

गोविंदपंत बुंदेले यानी दोन सांबरी विजारी पेशवे सरकारास दिल्या होत्या. त्या दोन विजारी व एक सांबरी कातडे पाठवून देण्याविषयी त्रिंबकराव पेठे

यांस पेशव्यानी पत्र लिहिले होते. विजारी जिराईतखान्याकडे होत्या त्यावरून त्यांचा उपयोग लढाईंत होत असावा असें वाटते.

आतापर्यंत कपडयाची अनेक वर्णने आली. ते कपडे कोणत्या जातीच्या कापडाचे शिवलेले असत याची वर्गवारी पुढीलप्रमाणें होते. छीट, चादर, सुशी, औरंगजेबी, महमुदी, जाफरखानी, गजनी, बादली, तापता, किनखाप, मखमल, चिरा, सकलाद, मश्रू, मलमल, पसमी, इलाचा इत्यादि. औरंगजेबी, महमुदी व जाफरखानी ही नांवे औरंगजेब, महंमद व जाफरखान या व्यक्तीवरून पडलेली आहेत. त्यानी चालू वाणात फेरफार सुचवून जे नवे वाण कोष्टयाना बनवावयास सांगितले त्याना सदर नांवे दिलेली दिसतात. छीट, महमुदी, मलमल हीं वस्त्रे सुती असून त्यांचे अंगरखे शिवले जात. गजनी, तापता, मखमल, इलाचा ही रेशमी वस्त्रे होत. केशरी रंगाच्या पागोटयास जाफरखानी म्हणत. किनखाप, बादली, चिरा, ही जरीची वस्त्रे असून किनखापावर जरीची फुले काढीत. मोठया लोकांच्या वापरण्यांत रेशमी, उंची लोकरीची व जरीची वस्त्रे असून हिंदु व मुसलमान या उभय धर्मीयांत त्यांचा खप असल्यामुळें ही वस्त्रे मोठया प्रमाणावर विणली जात असली पाहिजेत. म्हणूनच त्यांच्या पेठा सर्व हिंदुस्थानभर अस्तित्वात होत्या. बंगालच्या मलमलीपासून तो थेट लाहोरच्या गालीच्यापर्यंत सर्व जातीचे कापड इकडे होत असे, त्यामुळें पोशाखाचा षोक अत्यंत श्रीमान् मनुष्यालाहि आपल्या हौसेप्रमाणें पुरविता येत होता. त्या भपकेबाज व डामडोलाच्या काळांत मोठमोठे लोक रेशमी व जरतारी वस्त्रानी नटलेले पाहून समाजातील लहान थोर माणसांना नेत्राचे पारणे फिटल्याचा आनंद लाभत असेल. सर्व उंची वस्त्रे हिंदुस्थानांत होत हा विशेष होय. त्या कारणाने हिंदी कारागिरीला आपोआपच मोठे उत्तेजन मिळत गेले. हीं वस्त्रें वाफेच्या शक्तीनें एकाच कारखान्यांत विणून घेणारे मोठाले भांडवलवाले त्याकाळी नसून जो तो आपल्या घरी आपल्याच मागावर ती विणत असे व आपल्या मेहनतीचे फळ बहुधा आपणच आपल्या कौटुंबियासह सुखानें चाखीत असे.

ज्या अनेक पेठा त्याकाळीं कापडाविषयीं प्रख्यात होत्या त्यापैकीं कांहीं प्रमुख पेठा पुढील प्रमाणें–पैठण, महेश्वर, नागपूर, सोलापूर, बऱ्हाणपूर, खंबायत, जालना, धनवड, अष्टी, चांदवड, चंदेरी, शहागड, मुलतान, सिरोंज, डाका. पैठणास व चंदेरीस बत्त्या, पागोटी, धोतरजोडे, पैठण्या व

पीतांबर, नागपूर, सोलापूर, चांदवड येथे धोतरजोडे; महेश्वर, खंबायत, धनवड येथे लुगडी; काशीत व बंगाल येथे ताप्ता आदिकरून रेशमी वस्त्रे, मुलतानास छीट, काश्मिरांत व लाहोरांत गालिच्या व पशमी; सिरोंज येथे खारवे होत. बहुतेक सर्व रंग कापडांतून आढळत. बंगाली ताप्ता लाल पिवळा व बदामी या तिन्ही रंगांचा असे. लुगडी काळी, पोफळी इत्यादि रंगांची असत. यापैकीं कोणताहि माल युरोपांतून इकडे येत नव्हता, इकडूनच युरोपांत जात होता. त्याची वाहतुक करणारांत इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज लोक होते. इंग्रजांच्या वखारी महाराष्ट्रांत व महाराष्ट्राच्या आसपास राजापूर, चौल, दाभोळ, मुंबई, सुरत, बऱ्हाणपूर, अहमदाबाद इत्यादि ठिकाणी असून त्या बंदरांतून विशेषतः सुरतेहून ताप्ता, साटीण, मलमल, किनखाप, मश्रू, गालिचे, धोतरे, तीळ, सुपारी, दालचिनी, लाकूड, कस्तुरी, लाख इत्यादि मालाची नेआण त्यानी करावी. चौल, राजापूर ही बंदरे कोकणांतील असली तरी तेथे कोष्टयांची वस्ती असून कापडाची पैदास बरीच होत असावी. बंदर हे देशाचे मुख होय. कोणत्या देशांत कोणत्या मालाची जरूरी आहे याचा शोध दळणवळणाच्या साधनांच्या अभावी बंदरांतच लागावयाचा; म्हणूनहि कारागिरांची वस्ती बंदरांतून झाली असावी. खेरीज आयातनिर्गतीचा मोठा व्यापार करणारे इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज प्रभृति वखारवालेहि कारागिराना बंदरांत येऊन रहाण्यास उत्तेजन देत.

मुंबई बंदर इंग्रजांच्या ताब्यांत आल्यावर त्यांनीं ते भरभराटीस आणण्याचे अनेक उपाय सुरू केले. त्यांच्याच उत्तेजनाने सन १६१८ त चौल बंदरांतून कांहीं कोष्टी मुंबईत रहावयास आले असतां त्याजकरितां एक पेठ इंग्रजांनीं वसवून दिली. राजापुरास कोष्टी होते व तेथें सूत निघत होते. ते सूत मुंबईस नेऊन त्याचे छीट (Calico) बनविण्यांत येऊं लागलें. १६८३ त अशा प्रकारचे अनेक कोष्टी मुंबईस होते व ते तऱ्हेवार माल काढीत होते. त्या सालीं मुंबई व गोवे येथें बनविलेले सुती पायमोचे पाठवून देण्याविषयीं लंडनहून मागणी आली होती. मुंबईहून इंग्लंडांत जाणाऱ्या कापडाचा खप चांगला होता. (Bombay by Samuel T Shephard). तथापि १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत मुंबई विणकामांत फारशी भरभराटलेली नव्हती. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं इंग्लंडांत हिंदी कापड जाण्याचे थांबले. कारण

सन १८१३ त इंग्लंडांत जाणाऱ्या हिंदुस्थानांतील रेशमी व सुती कापडावर ब्रिटिश सरकारानें अनुक्रमें ८० व ७० टक्के जकात बसवून हिंदी कापडास बंदी केली. इंग्लंडांत लोकरीचे कापड विणण्याची कला फार जुनी असली तरी कापसाची वस्त्रे विणण्यास प्रारंभ सन १७६० च्या सुमारासच झाला. त्या काळांत इंग्लंडच्या उत्तर भागात कापसापासून सूत व कापड विणण्याचे कारखाने निघाले. वॅटने आपल्या वाफेच्या यंत्राचा शोध सन १७८२ त लावून ठेवला होता व त्यांच्या जोरावर मोठमोठ्या गिरण्या चालविण्याची कल्पना उदय पावली होती. तिला उत्तेजन हिंदी कापडाला बंदी करून देण्यात आले. त्याचा परिणाम असा झाला कीं, इंग्लंडचा स्वस्त माल हिंदुस्थानांत शिरून त्याने हिंदी हातमागावरील कापड ठार मारले व त्याच पद्धतीनें जगातील इतर देशांतहि जाऊन त्या त्या ठिकाणच्या हिंदी कापडाच्या पेठा जिंकल्या. अशा रीतीनें हिंदी कापडाचा धंदा नामशेष होऊन वर वर्णिलेल्या प्रकारचे उत्कृष्ट कापड हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या पेठांतून विणले जात होते याचाहि विसर जगासच काय पण खुद्द हिंदी लोकांसहि पडला व हिंदुस्थान औद्योगिक बाबतीत अधोगतीस पोचला !

प्रकरण बाविसावें

दरबार व सणसमारंभ

सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत मराठ्यांच्या सत्तेची प्रगति खुंटली यांत शंका नाहीं. तरी पण त्या काळांत मराठी राज्यास स्वस्थता मिळून त्याचे वैभव व थाटमाट पुष्कळच वाढला. सवाई माधवरावापूर्वी अनेक पेशवे झाले. त्यांच्या दरबारांची व इतर समारंभाची वर्णनें उपलब्ध असती तर तुलनेने सवाई माधवरावाचे वैभव श्रेष्ठ कसें हें दाखविता आले असते. असो. सवाई माधवरावाच्या दरबारीं इंग्रजांचा वकील सर चार्ल्स मॅलेट ता. ३ मार्च सन १७८६ रोजीं पुण्यास प्रथमच रहावयास आला. त्यापूर्वी पुण्यास कित्येक इंग्रज लोक रहात असले तरी त्यांचा रेसिडेंट असा पुण्यांत नव्हता. रेसिडेंट रहावयास आल्यावर तो प्रसंगोपात्त पेशव्यांच्या दरबारांत जाऊं लागल्यामुळें त्या दरबाराची वर्णनें मराठ्यांनीं व इंग्रजांनींहि आपआपल्या पद्धतीने लिहून ठेवली व तींच सदर दरबाराची माहिती मिळण्याच्या दृष्टीनें उपयोगी पडत आहेत. मॅलेट पुण्यांत आल्यावर त्याच दिवशीं सायंकाळीं सहा घटका दिवसास श्रीमंत सवाई माधवरावास भेटला. त्याची हकीकत अशी--

'मॅलेटबरोबर १० असामी होते. बैठक तिरंदाजीच्या दिवाणखान्यांत केली होती. वकील अगोदर दिवाणखान्यांत आले आणि रा. अमृतरावजी त्यास भेटत आहेत तों श्रीमंत गेले. श्रीमंतास एकजण मुख्य तो मात्र भेटला. वकील येणार म्हणून ओढेकर, पागे, रास्ते व अमृतराव यास अगोदर बोलावून आणले होते. बारगीर दोन अडीचशेंपर्यंत चांगले पोषाखी व चिलखतें दहापांच असामीस देऊन दोहो चोहो जागास बसविले होते. व गाडदी दिल्लीदरवाज्यापासून नानाच्या वाड्यापर्यंत व पश्चिमेकडे पागेचे बुरजापर्यंत उभे केले होते. वकीलाला श्रीमंतानीं हिंदुस्थानी बोलीनें पुसलें कीं, तुम्हास कलकत्त्याहून यावयासी किती दिवस लागले ? त्यानें अर्ज केला कीं, पंचवीसावे दिवशीं मुंबईस आलो.

याखेरीज वकील यानें हिंदुस्थानी व फारशी बोलीनें दया असावी असा अर्ज

केला. कागद थैल्या तीन होत्या. त्यांपैकीं एक थैली फोडून कागद पारसनीस याजकडून वाचविला. त्यास चांगला वाचतां येईना. म्हणून त्याजकडील दुभाषानें वाचून दाखविला. नंतर वकील याजला विडे दिले व श्रीमंत उठून गेले. नंतर वकील उठून गेला.' (इ. सं.)

त्यानंतर दुसरा महत्त्वाचा दरबार पेशवे, इंग्रज व निजाम या त्रिवर्गांनी टिपूवर स्वारी करण्याच्या बाबतींत संयुक्त तह केला तेव्हाचा. हा दरबार मराठ्यांच्या इतिहासात फार मोठा समजला जातो. त्याचे वर्णन खालीलप्रमाणें—

" मॅलेट आपल्याबरोबर ८० युरोपियन व हिंदी लोक घेऊन गणपतिदिवाणखान्यांत गेला, तेव्हां दिवाणखान्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत अगदीं पांढऱ्या सफेत कापडाची बैठक घातली होती. तरुण राजा (माधवराव) गादीवर बसला होता. त्याचा पोक्त व बुद्धिमान् प्रधान नाना फडणीस त्याच्या उजव्या हातास बसला होता. बाकीचे अधिकारी व सरदार हे दुसऱ्या बाजूस अर्ध वर्तुळाकार बसले होते. पूर्वी ठरल्याप्रमाणें आम्ही सर्वजण साटणीचे जोडे व रेशमी पायमोजे घालून गेलो होतो. आम्हाला कोणीहि अडथळा केला नाहीं. आम्ही येतांच हातात रुप्याच्या काठ्या असलेल्या कित्येक चोपदारानी आम्ही आल्याची ललकारणी दिली. ती ऐकून आमचे स्वागत करण्याकरितां राजा उभा राहिला. व त्यानें प्रत्येकास भेट दिली (आलिंगन). त्याच्या प्रधानानेंहि तसेंच केलें. नंतर आम्ही सर्वजण आम्हाला जसे बसता आले तसे मांड्या घालून बसलो. अर्थात् तसे करतांना आम्ही आपल्या पायांतील जोड्यांचे तळवे शक्य तितके झांकून घेतले. ते जर दिसले. असते तर ती बेअदबी मानली गेली असती.

रेसिडेन्टानें प्रधानाच्या मार्फत पेशव्याशीं बोलणें केलें. ती बोलण्याची रीत अतिशय अंतःकरणपूर्वक व मोकळेपणाची दिसली. त्या तरुण राजाच्या अंगावर जे रत्नजडित अलंकार घातले होते त्यांची शोभा मी विसरणार नाहीं. त्या सर्वांत एक कंठा फारच मूल्यवान् होता. तो छातीवर लोंबत असून त्यांत हिरे व पाचू एकाआडएक गुंफले होते. त्यांतील प्रत्येक हिरा व पाचू जायफळाएवढी होती. या कंठ्याची किंमत फारच मोठी असली पाहिजे. आम्ही असे बसलो असतां त्या दरबाराकडे नजर टाकण्यास व तो लक्षपूर्वक पहाण्यास आम्हास भरपूर फुरसत होती. त्यांत लोकसमूहहि मोठा असून त्यांपैकीं बहु-

तेक जण मराठी राज्यांतील सुप्रसिद्ध सरदार होते. त्या मंडळींत मानाजी फाकडे हा असून त्याच्याकडे आमचे लक्ष अधिक वेधलें. त्याचा बेछूट पराक्रम मुंबईच्या सैन्याला आधीं बरेच दिवस माहीत झाला होता. त्याचा अगडबंब देह याप्रसंगीं विशेष लक्षांत भरण्यासारखा होता. त्याचा कंबरेपासूनचा वरचा भाग अस्सल मराठ्याला शोभेल असा उघडा होता. त्यानें फक्त खांद्यावरून एक शेला टाकलेला होता. त्याचे तोंड, छाती आणि दंड याजवर पांढरे पिवळे असे विलक्षण प्रकारचे पट्टे ओढलेले होते. अमेरिकेच्या जंगलांत जे रेड इंडियन सरदार नांदतात त्यांच्यापासूनच त्यानें ही तऱ्हा उचलली होती कीं काय कोण जाणे! आणि खरोखर चेहेऱ्यावर आठ्या चढवून व आपल्या ढालीवर रेलून तो पहात असे तेव्हां त्याचा बाह्य देखावा रानटी, व उग्र दिसत असे. मग त्याच्या मनांत काय हेतु असेल ते असो. कदाचित् त्याच्या मनांत असेंहि आले असेल कीं, तळेगांवच्या लढाईंत पाठ दाखवून निघून गेलेले आम्ही येथें आलो व आमचा अंतःकरणपूर्वक सत्कार झाला हे घडलें कसें ?

अशा रीतींनें आम्ही कांहीं वेळ बसल्यानंतर एक तबक फिरविण्यांत आलें व रेसिडेंटाबरोबरच्या प्रत्येक गृहस्थास पोषाख नजर करण्यांत आला. त्या नजराण्यांत प्रत्येकाच्या वाटणीला काश्मिरी शालीचे दोन फरद, किनखाबाचा एक तुकडा व एक पांढरा शेला होता. हे सर्व आमच्या नोकरांच्या स्वाधीन करण्यांत आलें. नंतर पानसुपारी व अत्तरगुलाब देण्यांत आला. रेसिडेंटाला अत्तरगुलाब प्रधानानें दिला. इतके झाल्यावर आम्हाला निरोप देण्यांत येऊन आम्ही आलों होतो त्याच ओळीनें व त्याच रस्त्यानें परत संगमावर रेसिडेन्सीकडे गेलों. यानंतर आम्ही जेव्हां जेव्हां भेटीला आलो तेव्हां तेव्हां हाच शिष्टाचार पाळण्यांत आला; फक्त एकमेकाला कडकडून भेटणें वजा करून." हे वर्णन मेजर प्राइस यानें लिहिलें असून तो वरील दरबारांत मॅलेट याजबरोबर हजर होता. त्यानें या दरबाराची तारीख ९ सपटेंबर १७९१ ही दिलीं आहे. या सुमारास भाद्रपद महिना असून पेशव्यांचे वाडयांत गणपति-उत्सव चालू होता. त्याचेच चित्र मि. वेल्स यानें रंगविलें असावें. या दरबाराची एक रंगीत तसबीर विश्रामभुवन संग्रहालयामध्यें दृष्टीस पडते. (इ. सं.)

सवाई माधवरावाचे लग्न.

"सवाई माधवराव यांच्या लग्नाचा बेत शके १७०४ (सन १७८२) मध्यें

ठरला. बाळाजी बहिरव थत्ते यांची कन्या वधू नेमस्त केली. लग्न माघ मासी व्हावयाचे होते. लग्नाकरिता सरकारी मंडळी, मामलेदार मंडळी, पुण्यांतील नागरिक अशी ब्राह्मण मंडळी, गृहस्थ, भिक्षुक, अग्निहोत्री, दीक्षित, शास्त्री, वैदिक, ज्योतिषी, उदमी व्यापारी, सावकार, सराफ या सर्वांस निमंत्रणे गेली. त्या खेरीज अष्ट प्रधान, लहान थोर सरदार व हिंदुस्थानांतलि सर्व राजेरजवाडे यानाहि बोलावण्यांत आले होते. निजामअल्लीकडे पुण्याहून कारकून सरंजाम देऊन पाठविले, तेव्हां नबाब बोलले ' बहुत अच्छा है. रावपंडित प्रधान इन्की शादी होती है. तुमने साथ फौज लेके सरंजाम समेत पुणे शादीकू जाना. ' नबाबाचा हा हुकूम पोलाजंग यास झाल्यावरून पोलाजंग पुण्यास आला.

" कृष्णाजी नाईक थत्ते यांच्या वाड्यांत लग्नसमारंभ झाला. लग्नाकरितां सवाई माधवराव निघाले, त्या मिरवणुकींचे वर्णन पुढीलप्रमाणें 'श्रीमंत देवास नमस्कार करून स्वारी बाहेर निघाली. थोरला हत्ती विनायक गज आणवून त्याजवर रुप्याची अंबारी ठेवली. त्यांत श्रीमंत बसले. पाठीमागे खवासखान्यांत आप्पा बळवंत व अमृतराव पेठे हाती चवऱ्या घेऊन बसले. पुढें खास जिलबीस बोथाटी-बारदार, विटेदार व बाणदार व लगी, त्यांच्यापुढें खास बारदार अशा जिलीब पुढें चालली. पुढें वाजंत्र्यांचे ताफे ताशे मरफे दोनशे वाजूं लागले. त्यापुढें चौघडे वाजतात. त्याचे पुढें जिलबीचे हत्ती शेपन्नास चालिले आहेत. त्यामागे जरीपटक्याचा हत्ती, मागे कोतवाल घोडे, पांचसातशे सोन्याचे गंडे पट्टे व पाठीवर भरगची झुली, गळयात मोहोरा-पुतळयांच्या माळा (असे चालले). जिलबीच्या हत्तीपुढें पाच हजार खासे घोडयावर स्वार होऊन बंदुकांचे आवाज करीत चालले. त्यांच्यापुढें दहा हजार स्वार चालला. अशी स्वारी लग्नास वाडा डावा घालून निघाली, तेव्हां आघाडी पानशे यांचे वाडयापाशी होती. श्रीमंतांच्या अंबारीमागे साहेब नौबती वाजत चालल्या. वाडयापासून तोफखान्यापावेतो एकसारखा फौजेचा थाट उभा राहिला आहे. सरकारचे अंबारीमागे वऱ्हाडिणी बायका याणी चालावे. बायकामध्यें पुरुषांची दाटी न होई अशा बेताने सभोवती शिपाई चालिले. त्यांच्यामागे भिक्षुक मंडळी, शास्त्री, पुराणिक, अग्निहोत्री, ज्योतिषी व वैदिक असा समुदाय चालला.

" त्यांच्यामागे मोठाले सरदार, मानकरी, होळकर, गायकवाड, भोसले, विंचूरकर, पटवर्धन, राजेबहाद्दर, गणेशपंत बेहरे, बहिरो अनंत, घोरपडे, निंबाळकर,

जाधव, दरेकर, पाटणकर, थोरात, मोहिते, भोइटे, अक्कलकोटवाले, असे मानकरी चालले. त्यांच्यामागे सातारकर महाराज, अष्टप्रधान समवेत व त्यांच्यामागें नबाब पोलाजंग आणि राजेरजवाडे, संस्थानिक, परराज्यांतील वकील असा समुदाय मिरवत चालला असतां त्यांच्यामागें सरकारची मुत्सद्दी मंडळी नानाफडणिससुद्धां समागमे कारकून मंडळी, शेटसावकार, उदमी असा पुण्यांतील समुदाय चालला. त्यांच्यामागें पागे सकल व कारखानदार सरकारचे व दरकदार पोतनीस, चिटणीस, मुजुम्दार असे मिरवीत असतां त्यांच्यापाठीमागें पागा घोड्यावर स्वार होऊन चालले. उंटावरील नौबती शतावधि वाजतात. अशा थाटानें व अशा समुदायानें मोठ्या सरंजामानें चालत असतां शहरचे लोक दुरस्ता माडीवर व गच्चयावर उभे राहून तमाशा पहातात. त्यासमयीं शहरचे लोकांनीं सोन्यारुप्याची फुलें श्रीमंतावर उडविली. अशी स्वारी समारंभानें नवरींचे मंडपात पोहोचली.

"त्या समयीं जलकुंभ मस्तकी घेऊन दासी उभ्या. दहीभात वरून ओवाळून टाकिले. कुळंबिणी घागरी घेऊन उभ्या होत्या त्यांस देणगी देऊन स्वारी मंडपात दाखल होऊन राजेरजवाडे, सातारकर महाराज, अष्टप्रधान, व पोलाजंग आपले सरदार लोकसुद्धां जसे जातेवेळेस लग्नास गेले, तसेच येते वेळेस त्याच थाटानें मिरवत हवया, नळे, चंद्रज्योति, झाडे नानातऱ्हेची सोडीत सोडीत सुमुहूर्तानें वाडयांत दाखल झाले. नाचरंग सर्व होऊन लक्ष्मीपूजन होऊन सर्वांस पानसुपारी वगैरे अत्तरगुलाब हारतुरे वाटले. मग सर्वांस घरीं जाण्यास हुकूम झाला.

"दुसरे दिवसापासून सर्वत्र लोकांस मेजवानीची आमंत्रणें करून भोजनास बोलाविलें. मंडळी तितकीच आली. वाढावयास सर्व कारकून मंडळी नेमिली. तूप वाढावयास शहरचे सराफ नेमले. एकएका पदार्थास एक एक कारकून नेमला. सारे कारकून पीतांबर नेसून शालजोडया कंबरेस बांधून वाढावयास लागले. चार चार कारकुनांमागें एकेक शिप्या हातीं ओली धोत्रें घेऊन वाढणारांचे घाम पुशीत असे. असा रोज समारंभ होत राहिला. होळकर, गायकवाड, भोसले, व सरकारचे मानकरी घोरपडे, जाधव, निंबाळकर, पाटणकर, दरेकर, मोहिते, शिरके, थोरात, धुळप, खानविलकर अशी मंडळी व पागेपथकेसुद्धां एकांडे अशा अवघ्यास भोजनास घालून वरासनी बसले. वरकड

मंडळी मंडपांत दाखल झाली. अगोदरच राघोजी आंग्रे व हरिपंत तात्या सोयऱ्याचे मंडपांत तरतुदीस ठेवले होते, त्यांनीं पुढें येऊन सारे मंडळीस आंत घेऊन जाऊन ज्या ज्या ठिकाणी योग्यतेनुरूप बसावयाचे तसे बसविले. श्रीमंत बसले त्या ठिकाणीं आप्पाबळवंत व अमृतराव पेठे व दाजीबा आपटे वगैरे झाडून मंडळी बसली. नंतर मधुपर्कविधि होऊन पाणिग्रहणविधि झाला. त्या समयी वाजंत्र्याचे बाजे, चौघडे व नौबती अशी एकदाच सारी वाजू लागली व तोफांची सरबत्ती झाली. मग विवाहहोम होऊन ब्राह्मणांस दक्षिणा मंडपात वाटली. मंडपात वऱ्हाडी होते त्यास पानसुपारी, हार, गजरे, तुरे वाटले. मग सर्वत्र मंडळी सरकारचा निरोप घेऊन निघाली ती आपआपले ठिकाणीं गेली. श्रीमंत मात्र राहिले.

" तेथें चार दिवस समारंभ भोजनाचा झाला. मुत्सद्दी मंडळी व बाहेरचे वऱ्हाडी सरदार वगैरे या अवघ्यास चार दिवस यथासांग.सोहाळा झाला. बाहेरची सरदार मंडळी व मराठे मानकरी यांस भोजने सरकारवाड्यांत झाली. मोठी दक्षणा देकार रमण्यांत झाला. चार दिवस झाल्यावर साडे होऊन वरातेची मिरवणूक निघाली. त्या दिवशीं शहरात सारे रस्ते झाडून सडे टाकून चिराकदानें लावली. सरकारची स्वारी अंबारीत बसून वाड्यांत यावयास निघाली. सारे सरदार, मानकरी, सर्वांस पोशाख योग्यतेनुरूप दिले. तसेच ब्राह्मण सरदार विंचूरकर, पटवर्धन, रास्ते, बेहरे, बहिरो अनंत, राजेबहाद्दर, बारामतीकर, आप्पाबळवंत, बन्या बापू मेहेंदळे, पुरंधरे, पानशे या सर्वांस अलंकार, वस्त्रे योग्यतेनुरूप दिली.

"शेवटीं नबाब पोलाजंग यास जाफत करण्याचे बलावणे केले. त्या दिवशीं पंधराशे खासा नबाबासमागमें आला. त्यास भोजनास पंधराशे रिकाबा (ताटे) रुप्याच्या नव्या करविल्या. त्या सर्वत्रांस भोजनास मांडिल्या. कारकून मंडळी अंगांत जामेनिमे घालून पायात विजारी घालून कंबरेस पटके बांधून वाढावयास लागली. सर्वत्रांची भोजने झाली. अवघ्यानी वहावा केली. मग विडे, पानसुपारी, अत्तर गुलाब, हारतुरे, गजरे देऊन सर्वत्रास पोशाख दिले. नबाबास जवाहिर दिले. असे होऊन सर्व आपले गोटांत गेले. सरदार मानकरी व शिलेदार कोणी राहिला नाहीं. असे सर्वत्रांचे सत्कार झाले. [पेशव्यांची बखर].

भोजनसमारंभ.

कोठेहि लग्नसमारंभांत भोजनाची व्यवस्था टीपदार असली म्हणजे त्यास ‘ नाना फडणिशी बेत ’ असें स्तुतिपर शब्दानी संबोधण्यांत येते. सवाई माधवरावाच्या लग्नाचा कार्यक्रम खुद्द नानांच्या नजरेखालीच झाला असल्यामुळे त्याची योजना किती नमुनेदार असेल हें सांगावयास नकोच. त्यासंबंधाच्या याद्या काव्येतिहाससंग्रहात छापल्या आहेत त्या वाचल्या असता पाटरांगोळ्यापासून नाचरंगापर्यंत सर्व बंदोबस्त कसा शिस्तींत होता याविषयीं खात्री पटते. पेशवाईतील भोजनाच्या बेताची आजहि ख्याति आहे, ती अगदीं यथार्थ होती हे खालील माहितीवरून सहज लक्षांत येईल.

“ खासे पंगतीस केळीची पाने चांगली थोर मांडावी. फाटकी व डागीळ नयेत. द्रोण दर पानास दहा बारापर्यंत मांडावे. ते चांगले दोहो काडयांचे केळीचे नोकदार असावे. चांगल्या ठशाच्या रुंदाळ रांगोळ्यानी रांगोळी घालावी. ती हिरवी, पांढरी, गुलाली वगैरे, तऱ्हतऱ्हेची असावी. पाट एके सुताने सारखे मांडावे. त्यांत खासे पंगतीस रुप्याच्या फुल्यांचे वगैरे चांगले थोर एकसारखे पाहून बसावयास व जागा असेल तसे टेकावयास मांडावे. खासे पंगतीस उदबत्तीची घरे व झाडे; रुप्याची असतील ती लावावी. वरकड जागा सोंगटी मांडावी. केशरी गंध अर्काचें व मध्यम असें दोन प्रकारचें करावें. केशरी गंधात केशराची कसर राहू नये. अक्षता उंची कस्तुरीची व मध्यम कस्तुरीची अशा दोन कराव्या. गंध लावणारे चांगले कुशल चौकस माणूस असावे. त्याणी साखळीनें कपाळी लावावें. वाकडे गंध लावू नये. अक्षत लावतेसमयीं नाकास धक्का न लागता कपाळाचा मध्य पाहून लहान. मोठी अक्षत ओघळ न येता वाटोळी लावावी. गंध उभे आडवे ज्यास जसे पाहिजे तसे लावावे. गंध अक्षता लावणार यानी नखे काढून बोटे चांगली करून लावावे. ’

“ अंगास लावावयास केशर व अर्गजा वगैरे सुवासिक एक व साधे पांढरे एक व गुलाबी चंदनाचे व कृष्णागराचे याप्रमाणे चांगली उगाळावी. हातास लावण्याचें गंध देतेसमयी भागीरथीचा गुलाब (पाणी ?) वाटीत पुढें ठेवीत जावा.

“ भोजनास भात साधा दोन प्रकारचा. खासा व मध्यम. साकरभात व

वांग्याचा भात वगैरे दररोज सरासरी दोन करीत जावे. वरण तुरीचे. सांबारी दोन प्रकारची. आमटी दोन प्रकारची. लोणचे दहा प्रकारचे चिरून व साखरेचे लोणचे. कढी सारें दोन प्रकारची. भाजा दहा बारा प्रकारच्या कराव्या. त्यांत एक दोन प्रकार तोंडली पडवळे वगैरे. मागाहून उष्ण व सगळी वांगी वगैरे उष्ण वाढावी. क्षीर वळवटे दोन प्रकारची. दररोज खिरी दोन प्रकारच्या निरनिराळया. पूर्ण पोळया सपीटाच्या. पक्वान्नें घीवर फेण्या वगैरे तीन चार प्रकार दररोज. वडे साधे व वाटल्या डाळीचे कढिवडे. तूप साजूक फार चांगले व मध्यम. मठ्ठा, चख्खा, श्रीखंड, अंबरस, खिचडी ओले हरभरे यांचे डाळीची वगैरे प्रत्यहीं एक प्रकाराची. पापड, सांडगे, फेण्या, तिळवडे, चिकवड्या, मिरगोंडे बोंडे, मेक्यांच्या काचऱ्या, चांगल्या कोशिंबिरी वीस प्रकारच्या. तिखट चटण्या चांगल्या बारीक वाटून रुचिकर कराव्या. निंबे चिरून पंचामृत, रायतीं व भरते दोन, आदिकरून पंचवीस तीस प्रकार करावे. एक दुसरी चमत्कारिक कोशिंबिरी करावी. विचारून वाढावी. मीठ धुवून पांढरे बारीक करावे. हारीनें एकास एक न लागता हिराव्या, पिवळया, लाल, काळया वगैरे रंगाचे अनुक्रमाने मध्यें थेंब न पडता गलगल न करता वाटोळया वाढाव्या. हात धुवून मग दुसरी कोशिंबीर वाढीत जावी.

" भोजनसमयीं समया खाशाचे पंगतीस दोन पात्राआड एक व वरकड पंगतीस चार पात्रा आड एक याप्रमाणें उजळ समया वाती उजळून चांगल्या कोरड्या न रहाता भिजवून तेल निवळ पांढरे असेल ते घालून पात्रावर न पाडता तजविजीनें झाऱ्यानी समयावर घालावे. रुप्याच्या समया खासे पंगतीस मांडाव्या. त्याजवर तेल रुप्याचे झाऱ्यानी घालावे. गुलदानानी गूल काढावे.

" सदर्हू साहित्य आचारी चांगले शहाणे लावून स्वयंपाक चांगला करावा. पात्रांचा अदमास पुसोन घेऊन दोन प्रहरात भोजने होत अशी तजवीज करावी. लोणची भाज्या वगैरे उष्ण रसाच्या, एक सारख्या हारीने वाटोळया वाढाव्या. एकास एक लावू नये. आंबटी, सांबारे, वरण, क्षीर, यांचे थेंबटे मध्यें पडू नयेत. तूप रुप्याचे तोटीच्या कासंड्यानी वाढावे. प्यावयाचे पाणी गाळून शीतळ करावे. वेळा, वाळा कापूर, लावून उदवून ते सिद्ध करावे. सर्वांस भोजनसमयी व फराळसमयी देत जावे. भोजनोत्तर आंचवावयास उष्ण पाणी

व हातास लावावयास साखर व दात कोरावयास लवंगा याप्रमाणें देत जावे.

" फराळाचे सामान–लोणची पाच प्रकारची व पापड, सांडगे. कोशिंबिरी दहा प्रकारच्या. पक्वान्ने व लाडू, पोहे आंबेमोहोर बारीक भात व खानदेशातून नवे पोहे आणवून ते व मातबरास लाह्या, खारीक, खोबरे, खजूर, बदाम, पिस्ते, नारळ, मेवा वगैरे. मेवामिठाई. दही, दूध, तूप साजूक व मध्यम, मुरंबे.

" विडे बांधणे ते हिरवे खर्चा पानांचा व बाजूचा सात पानांचा बांधावा, पिकल्या पट्टया, बाजूच्या सात पानांच्या, सुपारीचे पानांची गुंडी उभी घालून भरदार चांगल्या बांधाव्या. कुलपी विडे, केळीची पाने लावून, दहा पानांचा एक व बारा पानांचा त्यांत गंगेरी दोन पाने घालीत जावी. त्यास दुकाडीची खूण-करावी. सुपारी फुलबर्डा वगैरे चांगली पाहून धुवावी. त्यापैकी तबकात मोकळी घालावयाची त्यास केशराचे पाणी देऊन गुलाब घालून रंगदार करावी. कांहीं रोठा–सुपारीचे फूल पाडून ठेवावे. चिकणी सुपारी नुस्ती व खुषबोईदार करून ठेवित जावी. चुना केशरी व साधा पांढरा सफेत खासा सभेंत तबकात ठेवण्याकरिता करावा."

अभिरुचीची सूक्ष्मता हीच संस्कृति. ती समाजाच्या सर्व प्रकारच्या व्यवहारात दृष्टीस पडली म्हणजे तो समाज तितक्या प्रमाणात व त्या त्या अंगानी सुसंस्कृत झाला, असें म्हणता येते. भोजनसमारंभ हे त्यापैकी प्रमुख अंग होय. त्यांत समाजाच्या विविध मनोवृत्तींचे व सभ्याचारांचे प्रतिबिंब पहावयास सापडते. वर वर्णन केले आहे त्यावरून पेशवेकालीन वरिष्ठ प्रतीचा महाराष्ट्रीय-समाज संस्कृतीचे बाबतीत जगातील कोणत्याहि समाजास हार जाणारा नव्हता, इतकेच नव्हे तर मद्यमांसनिवृत्तीने तो पाश्चात्य देशातलि सर्व समाजाहून श्रेष्ठ होता असेच कबूल करावें लागेल. इंग्लंड हें हल्लीप्रमाणें त्याहि काळी दारूबाजीत बुडाले असून खुद्द लंडन शहरांतील गुत्ते दारूबाजानी रात्रंदिवस गजबजलेले असत.

लॉर्ड व्हॅलेंटिया पुण्यास १८०३ मध्यें आला होता. त्यावेळीं पुण्याचा रेसिडेंट सर बारी क्लोज हा होता. त्या दोघांना दुसऱ्या बाजीरावानें मेजवानी दिली. तिची हकीकत क्लोज यानें लिहून ठेवली आहे. तो लिहितो, " चार वाजल्यानंतर आम्ही स्वारीसह हिराबागेंत पेशव्याला भेटावयास निघालो. वाटेनें पेशव्याच्या स्वारीतील घोडेस्वार वगैरे गर्दी होती. म्हणून आम्हाला फाटकांतून (Gate)

आंत शिरण्यास प्रयास पडले. माझ्याबरोबर आमच्या लायनीतील शिपायांची तुकडी होती म्हणून बरें झाले. ही बाग एका विस्तीर्ण तळयाच्या कांठीं आहे. तळयाच्या मधील बेटांत एक देवालय आहे. बागेतील घर सामान्य प्रतीचे आहे. बाग सुरेख असून तिच्यांत मोठाली आंब्याची झाडे व पुष्कळ नारळी आहेत. पेशव्यांची गादी पडवींत होती. समोर कारंजी असून त्याभोवती द्राक्ष-वेली सोडल्या होत्या.

"मग आम्ही अरुंद जिन्यातून माडीवर गेलो. माडी कलमदानी होती. तिच्या दोन्ही बाजूला पडव्या होत्या. पलीकडच्या अंगाला पांढरी बैठक असून त्यावर आम्हा इंग्रज गृहस्थाकरितां केळीची पाने मांडली होती. त्यावर ब्राह्मणी पद्धतीचे जेवण वाढले असून त्यांत भात, पापड, पापड्या, करंजा इत्यादि पदार्थ होते. एका ओळीला रंगारंगाची पक्वान्ने होती व दुसऱ्या ओळीला सात प्रकारच्या चटण्या कोशिंबिरी होत्या. पानाच्या एका अंगाला खीर, तूप व दुसरे पातळ पदार्थ होते. हे सर्व पदार्थ उत्कृष्ट बनविले होते. आम्ही आपल्याकरितां स्वतः बरोबर काटे, चमचे व सुऱ्या आणिल्या होत्या. त्यांचा आम्हीं हवा तसा उपयोग केला. बाजीरावसाहेब पलीकडे गादीवर बसले होते. पण आमच्यासमोर जेवावयास बसून त्यांनीं आपणांस भ्रष्ट करून घेतले नाहीं." (पूना इन बायगॉन डेज).

सवाई माधवरावांचा नगरप्रवेश

"खडर्याच्या लढाईंत निजामावर विजय मिळवून मराठी सैन्य पुण्यास परत आले. सुमुहूर्त पाहून सवाई माधवरावांचा नगरप्रवेश व्हावयाचा असल्यामुळें सैन्य पुण्यापासून पांच कोसावर उतरले. मुहूर्त वैशाख शुद्ध ५ शके १७१७ या दिवशीं रात्रौ बारा घटिकांचा ठरला होता. पंचमीचे दिवशीं सारे सरदार यांस सरकारची ताकीद झाली कीं, 'आज रात्रौ शहरांत जावयाचे. त्यास सर्वांनी आपआपले खासे असतील त्या मुख्य खाशानिशी सायंकाळचे चार घटिका दिवसास सरकारचे डेऱ्याजवळ यावे.' त्याप्रमाणें सर्व सरदार होळकर व शिंदे गायकवाड व भोसले निंबाळकर, पटवर्धन, विंचूरकर, राजेबहादूर, दरेकर, पाटणकर, पोवार, शितोळे, आयतोळे, तसेच पंतप्रतिनिधी, पंतसचिव व आणखी संस्थानी, तसेच पागे असे सर्व खासे अंबारीसमवेत सरकारचे डेऱ्यापाशीं

आले. तुकोजी होळकर, रघोजी राजे भोसले, फत्तेसिंग गायकवाड, गोविंदराव गायकवाड, दौलतराव शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन, माधवराव रास्ते, रघुनाथ-राव पटवर्धन, चिंतामणराव पटवर्धन व बाळासाहेब पटवर्धन, खंडेराव जिवाजी, विंचूरकर, राजेबहाद्दर, बहिरो अनंत, कितूरकर देसाई, सुरापूरकर बेरड, मालोजी राजे घोरपडे, जानराव नाईक निंबाळकर, फत्तेसिंग भोसले, अक्कलकोट-वाले, बहिरोजीराव पाटणकर, खंडेराव दरेकर, जोत्याजी जाधव व त्रिवर्ग जाधव, तसेच भुइंजकर, शिंदखेडकर, गांडापूरकर, भोइटे, थोरात, तसेच पोवार, धारकर, सुपेकर, नगरदेवळेकर, मलठणकर, शिरके, मोहिते, असे मानकरी किती गणतीस धरावे ? तसेच सारे पागे धामबर, पायगुडे, थोरात, निकम, भोइटे, बापूराव अनंत, भास्कर जगन्नाथ, निळकंठराव रामचंद्र अशा ५२ पागा इत्यादिकांची नांवे लिहिता मोठा विस्तार होईल. म्हणून एकंदर पागा सांगि-तल्या. पुरंदरे, पानसे, अप्पा बळवंत, रंगराव ओढेकर, बन्याबापू मेहेंदळे, माधवराव रामचंद्र बिनीवाले, शिवाय मुत्सद्दीमंडळ मुख्य नाना फडणीस, नारोपंत चक्रदेव, बाबा फडके, महादजीपंत गुरुजी, त्रिंबकराव परचुरे, बापू लेले, बहिरोपंत चिटणीस, पोतनीस, मुजुमदार, आंग्रे असा किती लहानथोर नांवांचा विस्तार सांगावा ? असे सायंकाळचे समयीं सरकारचे डेऱ्यापाशीं येऊन आपआपले सरंजामानिशी तयार होऊन उभे राहिले. खेरीज हुजुरात जरीपटक्यासुद्धां, तसेच मानकरी, खेरीज शिलेदार व एकांडे व किरकोळ सरं-जामी असे सर्वत्र लहान थोर तयार होऊन डेऱ्यापाशी आले.

"याच्यापूर्वी राघोपंत गडबोले दिवसास शहरांत तयारीसाठीं पाठविले होते, त्याणी शहरांत येऊन आनंदराव काशी शहरचे कोतवाल यांस बलावून ताकीद केली कीं, ' आज सरकारची स्वारी सुमुहूर्तानें येत आहे. यासाठीं शहरचे रास्ते झाडून कुंकुमाचे सडे घालावे व घाशीराम याचे तळ्यापासून तहत दरवाजा-पावेतो दुरस्ता बढई बोलावून चिराकदानाचीहि तयारी करावी आणि गुलाला-च्या रांगोळ्या घालाव्या. ' अशी ताकीद होताच कोतवाल यानी सांगितल्यापेक्षां अधिक तयारी केली. तेव्हां सरकारची स्वारी घाशीराम याचे तळ्यापासून नीट शुक्रवारच्या रस्त्याने बुधवारांतून वाड्यांत यावयाची तेथपर्यंत तळ्यापासून वाडयापावेतो. बढई याणी दुरस्ता खांब ठोकून वरती तक्ते मांडून त्यांजवर

पणत्या दर पणतीस पावशेर तेल मावे अशा मोठ्या लाविल्या. अशी चिराख लावली. हजारो बुधले तेलाचे हमाल घेऊन उभे आहेत.

"सरकारची स्वारी पहिल्या चार घटिका रात्रीस निघाली. तेव्हां खासे खासे हुजुरातीचे मानकरी व जरीपटका सर्वांपुढे चालता केला. हजार स्वार जरीपटक्यासमागमे चालले. त्यांच्या मागे जितके सरदारांचे चौघडे होते तितके वाजू लागले. त्यांच्यामागे साहीमरातबचे हत्ती पांच. त्यांच्यामागे नालकी चालली. त्यांच्यामागे कोतवाल घोडे चारशे, सोन्याचे गंडे पट्टे घालून गळयांत पुतळ्यांच्या माळा, पाठीवर भरगच्ची किनखापी झुली घातलेले, असे दुरस्ता मोतद्दार घेऊन चालले. त्यांचे पाठीमागे झाडून गारदी यांचे जमादार व चाऊस दफेदार व आरब शिद्दी व रोहिले पठाण खासे खासे दोन हजार निशाणांचे फरारा सोडून ताशे मरफे वाजवीत चालले. त्यांच्यामागे खास चिलीब, व सरकाराकडील व शिंदे याजकडील व गायकवाड याजकडील व भोसले याजकडील बोथाट्या, विटे, बाण, बल्लम खासबारदार, लगींसुद्धा हजार माणसे पुढें चालली आहेत. त्यांच्यामागे रुप्याची अंबारी हत्तीवर ठेवलेली, त्या अंबारीत खासे श्रीमंत बसले; पाठीमागे खवासखान्यात आप्पा बळवंत व अमृतराव पेठे असे उभयता बसले आहेत. एकाचे हाती चवरी व एकाचे हाती मोरचेल असे श्रीमंतावर वारितात. त्या हत्तीभोवती मशाली हजारो लागल्या. पुढे जिलबेचे हत्ती होते त्यांजवर हवया लाविल्या. त्यांच्यापुढे शेदोनशे सांडणी स्वार चालले आहेत. श्रीमंतांचे अंबारीबरोबर रघोजीराजे भोसले, तसेच शिंदे होळकर, गायकवाड, जितक्या सरदारास अंबारी होती तितके सरदार अंबारींत बसून चालले. नानाफडणीसहि ते दिवशीं अंबारींत बसले. अशी स्वारी थाटाने चालली असता त्यांचे मागे साहेब नौबती हत्तीवर वीस पंचवीस; वाजत चालल्या आहेत. त्या हत्तींच्या मागे दहा हजार स्वार खासे खासे चालले आहेत. त्यांच्या पाठीमागे उंटावरील नौबती शेदोनशे वाजतात. अशा थाटाने स्वारी शहरांत चालली, त्यासमयीं पानसे यांच्या वाड्यापासून श्रीमंतावर सोन्या-रुप्याची फुले उधळावयास प्रारंभ केला. तो तहत सरकारचे वाड्यापावेतो. सर्वांच्या मागे मश्चुन्मुलुख धरून आणिला होता तो हत्तींचे हौद्यात त्याचे सरंजामाबरोबर (येत होता). सरकारचे स्वार गारदी पाच हजार सरंजाम (त्याचे) रखवालीस होता ते सर्वांच्या पाठीमागे (चालले).

"याप्रमाणें मोठ्या थाटाने, बादशाही डौलाने चालत असता चौदा घटका रात्रीचे अमलात वाड्यांत स्वारी सरकारची दाखल झाली. दिल्ली दरवाजात अंबारी खाली उतरल्यानंतर कित्येक दहीभातच्या पाट्या श्रीमंतावरून ओवाळून टाकल्या. सरकारात सोन्या-रुप्याची फुले केली होती ती श्रीमंतावर थोरल्या चौकाच्या बाहेर दिल्लीदरवाजात तेथें उधळली. मग श्रीमंत आत जाऊन देवास नमस्कार करून येऊन दरबारात बसले. त्यासमयीं झाडून सरदार लहान थोर दरकदार व मुत्सद्दी व कारकून येऊन बसले. मश्रुँन्मुलुख याचा हत्ती गणेश दरवाज्याजवळ उभा होता. मश्रुन्मुलुखास खजिन्याचे विहिरिपाशी बंगल्याचे बागेत नेऊन उतरविले [पेशव्यांची बखर].

गणेशोत्सव

पुण्यास सवाई माधवराव रहावयास आल्यानंतर गणेशोत्सव पेशवे सरकारच्या योग्यतेस साजेशा थाटाने साजरा होत असेल व त्या पूर्वीच्या पेशव्यांच्या कारकीर्दीत त्याचा थाट कमी अधिक प्रमाणांत असेलच. परंतु सवाई माधवरावाच्या जन्मापासून तो ते मोठे होईपर्यंत त्याना पुरंदरावरच ठेयण्यांत आले असल्यामुळें इतर अनेक उत्सवाप्रमाणें हाहि उत्सव तेथेंच करीत असत. पुरंदरची वस्ती डोंगरावरची व थोडी या कारणानें पुण्यांतील सर त्या उत्सवास येत नसली पाहिजे हें उघड आहे. तथापि पुरंदरावरलि उत्सवाचे वर्णन कोणीं वाचले म्हणजे पुण्यांतील उत्सवाची कल्पना करतां येणार आहे.

खालील पत्र मल्हार बल्लाळ याने पुरंदरावरून ता. २९-८-१७७८ रोजी लिहिले आहे, 'पुरंदरी श्रीगणपतीचा उत्साह चतुर्थीपासून काल शुक्रवारपर्यंत यथास्थित जाहला. रात्रौ नित्य श्रीमंत कथेस बसत होते. दीड पावणे दोन प्रहरापर्यंत रात्र कथेस होत असे. काल सहा घटिका दिवस शेष राहिला होता, तेव्हां श्रीगणपतीचे प्रस्थान जाहले. स्वारीसमागमे श्रीमंत गेले होते. पर्जन्याची झड बसली होती, परंतु स्वारी जातेसमयी चांगला पर्जन्य उघडला होता. स्वारीस शोभा फारच चांगली आली होती. राजहंस बच्चा हत्ती याजवर जरीपटका दिला होता व तेजरावा हत्तीण शिवापुराहून आणिली होती तिजवर नौबत ठेवली होती. श्रीमंतांची मर्जी बहुतच प्रसन्न होती. आज तेजरावा हत्तीण मागती शिवापुरास रवाना केली. स्वारीचा बंदोबस्त राजश्री बळवंतराव

पटवर्धन याणी चांगला केला होता. आपण श्रीमंतांचे पालखीजवळ होते. स्वामीच्या वाड्यापुढील रस्त्याने थोरल्या तळयाकडे स्वारी गेली होती.' (पे. द. ४३)

या उत्सवाचे वेळीं सवाई माधवरावाचे वय अवघे पांच वर्षांचे होते. श्रीमंतांची स्वारी गडावर असल्यामुळें गणेशोत्सव अशा रीतीने तेथें होत असता पुण्यांत शनिवारवाड्यांत उत्सवाची व्यवस्था कशी असे, हे पुढील दोन पत्रावरून कळून येते. हीं पत्रें नारो आप्पाजी खासगीवाले यांस पुरंदराहून सखारामबापू यानी लिहिली आहेत.

पत्र नंबर १–' पत्र पाठविले ते पावले. गणपतिउछावाची याद पावली. अनुष्ठानाचे एकवीस ब्राह्मण चार दिवस लावणे. कलावंताचे ताफे चांगले पांच–सात व हरदास जुने बहुता दिवसांचे सात, आठ, दहापर्यंत असतील तितके या करवी उछाह करणे. सालाबादप्रमाणे इतक्यास बिदागी करणे. विशेष कांहीं करावयाचे नाहीं.' [पे. द. ३२ ता. ५–९–१७७४.]

पत्र नंबर २–' श्रीगणपतीचा उत्साह होत आहे त्यास ललिताचे दिवशी समारंभ बहुत होत असे तो तसा करावयाचा नाहीं. नित्य हरिकीर्तन होत असते. त्याप्रमाणेंच ललिताचे रोजी करून ललिताच्या चार ओव्या म्हणून आर्ती करवावी. खिरापत वाटल्यानंतर स्वस्थपणें बसोन प्रसाद श्रीमंतास वगैरे घेणे ते घ्यावे. बंदोबस्त चांगला राखावा. गणपति पोहोचवाल त्या-दिवशी पालखीत गणपति घालून समागमे वाजंत्री यांचा एक ताफा देऊन पोहोचवावा. आणखी कांहीं समागमे न देणें.' (पे. द. ३२ ता. ११–९–१७७४.)

दसरा

विजयादशमी हा मराठ्यांचा राष्ट्रीय सण. साडे तीन मुहूर्तातला तो एक मुहूर्त. त्या दिवशीं मराठे लोक आपली हत्यारें साफसूफ करून, घोड्यांना स्नान घालून शृंगारून व त्यांजवर आरूढ होऊन सीमोल्लंघनास निघत. या सीमो-ल्लंघनाचा थाट प्रत्येक लहानथोर गांवात प्रेक्षणीय असे. आबालवृद्ध उंची वस्त्रें व अलंकार घालून सीमोल्लंघनाच्या मिरवणुकींत सामील होत, शमीची पूजा करीत, शेतांतील कणसे तोडून ती सोने म्हणून लुटीत व अशी लुटूपुटीची मर्दु-

मकी गाजवून घरीं आलेल्या मुलांना त्यांच्या बहिणी व आया कौतुकानें ओवाळीत. दुसरा बाजीराव हा सण कसा साजरा करीत होता याचे वर्णन सर जॉन मालकम पुढीलप्रमाणें करतो. " या दिवशीं पेशवा आपले सरदार व शिपाई बरोबर घेऊन शहरापाशीं लष्करी तळावर जातो. प्रत्येकाजवळ त्याचे निशाण असते. जो तो आपल्या उत्कृष्ट घोडयावर बसतो, उत्तम कपडे घालतो व हत्यारें घासून पुसून चक्क करतो. घोडे, हत्ती व उंट यांना शृंगारतात. या मिरवणुकीत शहरांतील सर्व लोक सामील होतात. ते शमीवृक्षाकडे जातात. पेशवा पूजा करून शमीची पाने खुडतो. नंतर तोफा व बंदुका यांची सरबत्ती होते. त्यासाठीं मुद्दाम खरेदी केलेल्या शेतांतलीं बाजरीची अगर ज्वारीची ताटे पेशवा उपटतो. मग कोणी जवळच्या बंदुका उडवतात तर कोणी बाण सोडतात. शेतात शिरून हाताला लागतील तेवढी ताटे तोडतात व मग आनंदाने परत येतात. सीमोल्लंघनाहून परत आल्यावर पेशवा दरबार भरवी व सर्वांना ज्याच्यात्याच्या योग्यतेप्रमाणें पोशाख देई. १७९४ त त्याने २२०१४४ रु. चे पोशाख दिले. ते घेणारात सातारचे महाराज, पंतप्रतिनिधि, पंतसचीव, चिंतामणराव पटवर्धन, तुकोजी पवार, दौलतराव शिंदे इत्यादि होते. ' (पूना इन बायगॉन डेज).

वसंतपंचमी

माघ शुद्ध पंचमी म्हणजे वसंतपंचमी. या पक्षांत शिशिर ऋतु असून वद्य पक्षांत वसंत ऋतूस सुरुवात होते. येथून रंगपंचमी दीड महिना उरते. परंतु या सुमारास हिवाळा बहुतेक उलगडून उन्हाची तीव्रता किंचित् भासत असल्यामुळें रंगपंचमीप्रमाणेंच याहि पंचमीला रंग खेळण्यांत येत असे. हा सण आतां बंद पडला असला तरी पेशवाईत थाटानें साजरा होत होता. खालील वर्णन दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीमधील आहे. सदर वर्णन बाजीरावाचा कारभारी त्रिंबकजी डेंगळा यास मल्हारराव भोसल्यानें लिहून पाठवेले आहे.

" श्रीमंत राजश्री त्रिंबकजी तात्या डेंगळे साहेबाचे शेवेसी—आज्ञाधारक मल्हारराव भोसले रामराम विनंति विज्ञापना तागाईत माघ शु॥ ६ शनिवार पावेतो साहेबाचे कृपावलोकणे करोण यथास्थित असो विशेष. काल वसंत पंचमीस विश्रामबागेंत स्वारी श्रीमंत बाबासाहेब आले होते. केसरी रंग जाला होता.

शास्त्री पुराणिक यांची बैठक भोजन-उत्तर होऊन सायंकाळी मागील चार घटका दिवस राहताणी ग्रहस्त लोक व मानकरी यांची बैठक जाली. नाच कलावंतणी व्यंकटनरसी होती. दुसरे शेनवारचे वाड्यात श्रीमंत आप्पासाहेब याणी रंग करून चार लोक वगैरे त्या मंडळीतील जितके होते तितक्यास रंग जाला. आज शनिवारी पाषाणास स्वारी जाणार, याकरिता शुक्रवारचे वाडयापासून बेलबागेपरियंत स्वार व लोक दोन अडीच प्रहर उभे होत. नंतर स्वारी विश्रामबागेत आली ती सायंकाळपर्यंत तेथेच आहे. पुढे होईल ते कळवू." (पे. द. ४१)

शिमगा

शिमग्याचा सण हल्लींहि महाराष्ट्रांत गावोगांवी साजरा होतो. त्यांत नाच, रंग, तमाशे, डफगाणीं, कुस्त्या वगैरे करमणुकीचे व मर्दानी खेळ होतात. त्याखेरीज उखाणे, शिव्यागाळी, धुळवड, इत्यादि ग्राम्य प्रकारानाहि ऊत येतो. अलीकडे शिक्षणप्रसारामुळें यांतील असभ्यपणा कमी होत चालला आहे ही सुधारणा होय. परंतु एकंदर समाजावर औदासीन्य, खिन्नता, निरुत्साह व स्वाभिमानशून्यता यांची कळा इतकी पसरली आहे कीं, त्यायोगाने या सणांतील सामर्थ्य व सुख पार लोपून गेले आहे. मात्र पेशवाईत अशी स्थिति नव्हती. राज्यकर्ते व प्रजाजन यांचा धर्म एक व सुखदुःखहि एक. याचा परिणाम असा घडला कीं, पेशवे व त्यांचे सरदार हे स्वतःच आपल्या घरी हा सण उत्साहाने व धर्मभावनेने साजरा करून त्यास त्यांच्या समजुतीप्रमाणें इष्ट तें वळण देत. या कारणाने सर्व महाराष्ट्रभर सदर सण एक आठवडा वीर्याची व आनंदाची प्रचंड लाट उसळून देत असे. पेशव्यांच्या दरबारात सवाईमाधवरावाच्या कारकिर्दीत सन १७८६ त हा सण कसा साजरा झाला त्याचे वर्णन ता. १६-३-१७८६ रोजीं नाना फडणविसांच्या भेणवली दप्तरांत पुढीलप्रमाणें केले आहे.

"सेवेसी विज्ञापना तागाईत फाल्गुन वद्य २ विशेष-हुताशनीचे दिवशी श्रीमंत दिल्ली दरवाजाचे बाहेर सायंकाळी दोन घटिका रात्री होळीजवळ येऊन दर्शन घेऊन, दरवाजाचे वर एक क्षण बसून तमाशा पाहून मग आत गेले. दुसरे दिवशीं प्रातःकाळी चार घटका दिवसास भोजन करून, तिरंदाजीचे दिवाणखान्यांत बसून वरकड जवळचे बसणारे अमृतराव व वोढेकर व आबा हशबनीस व आनंदराव रास्ते व मोरोबा फडके दोघे मुले घरची घेऊन आले होते.

......खेळ, तमाशे बीन चार पांचशे पर्यंत होते. आगोदर वाघ–बकरीचा खेळ जाहला. मग श्रीमंत तेथून उठले. मंडळी घरास गेली. खेळांत पुढाईत बाळाजीपंत ठोसर व बाळाजीपंत केळकर हे दोघे. रात्रीं डफगाणे चार फड आणिले होते. गोविंदा सोंग्या व राणू पाटलाचा पुतण्या पोरे पाच जण होते. त्यांत एक चांगला होता. वरकड कांहीं चांगले नव्हते. श्रीमंत भोजन करून तिसरे घटकेस चाफेखाणांत आले. वाड्यांतील मंडळी समागमे होती. अमृतराव पाचवे घटकेस आले. बाळाजीपंत लेले, मोरोबा फडके, खंडेराव त्रिंबक, खंडो अनंत, व शिदोबा नाईक, थत्ते जनार्दन राम, बाळंभट थत्ते, वरकड मंडळी होती. पाच सात सोंगे गुदस्तप्रमाणें आली. एक प्रहर रात्र जाली. श्रीमंत उठोन निद्रेस गेले. वरकड मंडळी सर्वेच गेली. होळीचे अगोदर कोतवालास ताकीद ‘ गावांत कोणी खटखट न करी अशी पेठोपेठी ताकीद करणे. ’ त्यावरून कोतवालानी आपले प्यादे व कारकून पाठवून ताकीद केली. कोणासी कजिया जाले नाहीं. वाड्यांतील आत बाहेर चौकीचा बंदोबस्त चांगला होता. सेवेसी कळावे हे विज्ञापना वद्य तृतीया भृगुवार...

“ काल दुसऱ्यानें वाड्यांत खेळ भवानीपंताचा जाला. श्रीमंत दोन घटिका रात्री येऊन चाफेखणांत फडी तेथें बैठक. दोन तीन पोरे नाचणारे होते. मागे डफगाणे. भवानी पंताचा अशकारा मात्र. सोंगे कांहीं चमत्कारिक नव्हती. तमाशा पहावयास मंडळी आली. त्यांची नांवनिशी–अमृतराव, मोरोबा फडके, व वोढेकर व खंडो अनंत, जनार्दन आप्पाजी, व त्यांचे चिरंजीव रामचंद्र, नारायण व महादाजीपंत गुरुजी, व जनार्दन राम, सोयरे थत्ते मंडळी. वाड्यांतील मंडळी होती. खाले तमास बीन, एक प्रहर खेळ झाला. तदनंतर श्रीमंत उठोन निद्रेस गेले. बजाबा मामा यांस बोलावू पाठविले होते. त्यांचे कपाळ दुखते म्हणून चोपदार सांगत होते......काल सकाळचे पोरांचे खेळांत दो ठिकाणी कजिया जाला. एक बुधवारचे हावदाजवळ दोघे तिघे द्रवीड ब्राह्मण जात होते, पोरानी शेण अंगावर टाकले. ते शिव्या देत. पोरे अनिवार. अधिक धूळ टाकिली. एक दोघास टाळक्यास धोंडे लागले. रडत निघाले. कोतवालानी समजावून वाटे लाविले. दुसरे, जोगेश्वरीजवळ तेलंग ब्राह्मणास धक्काबुक्की केली. इतके जाले हे विज्ञापना ” (इ. सं.)

त्याच वर्षी शिमग्याच्या सणांतील रंगपंचमींचा सण कसा साजरा करण्यांत

आला याची हकीकत पुण्याहून चार दिवसानी पाठविलेली भेणवली दप्तरांत खालीलप्रमाणें दिली आहे.

रंगपंचमीचा खेळ

" सेवेसी विज्ञापना–काल श्रीमंत पंचमीस बाळाजी नाईक थत्ते यांचे येथें भोजनास गेले होते. सौभाग्यवती रमाबाई अगोदर गेली. मग श्रीमंत प्रहर दिवसानी घोड्यावर बसून दिल्लीदरवाजाने निघोन, समागमे अमृतराव मल्हारपंत भडभडे व बाळाजीपंत ठोसर, वाड्यांतील मंडळी कार्याकारण गेली. भोजन होऊन थत्ते यानी श्रीमंतास पोशाख दिल्हा. तदनंतर घोड्यावर बसून गणेशदरवाज्याने आंत गेले. तिसरा प्रहरा पंचमीचा रंग केला. मजलस गणपतीचे दिवाणखान्यांत केली. कलावंतिणीचे दोन ताफे होते. अमृतराव तिसरा प्रहरा आले. ते चाफेखणांत फडी बसून मग मजलसींत गेले. मंडळीस अगोदर बोलावणी केली. तेहि आले. पांच सहा घटिका दिवस रहाताना श्रीमंत आले. जवळच असणारे अमृतराव, कृष्णाजी नाईक थत्ते, बाळाजी नाईक थत्ते, बजाबा मामा व आनंदराव रास्ते, बाळाजीपंत लेले, वोढेकर खंडो अनंत, जनार्दन राम पागेवाले, जनार्दन आप्पाजीचे चिरंजीव रामचंद्र, नारायण, व गुरुजींचे चिरंजीव व पारसनिसांचे मूल, चिटणीस, मजमदारांचे कारकून, हरि गोपाळाचे चिरंजीव व मोरोबा फडके, चिटकोपंत व गोविंदराव प्रभु व वाड्यांतील मंडळी वगैरे लोक होते. चार घटिका नाच होऊन मग रंगास आरंभ केला. श्रीमंतानी आपले हाते चिरकांडीने कार्याकारण यांचे अंगावर घातला. तदनंतर रंगाची व गुलालाची रेल जाली. आंग व पोशाख भिजून चिंब जाली. येथपर्यंत रंग खेळले. मग उठोन संधेस गेले. रात्री खेळ करावयास सांगितले. भोजन करून दोन घटिका रात्री चाफेखणांत येऊन फडी बसले. जवळचे बसणारे रास्तेखेरीज आवघे होते. गुरुजी बाबाहि आले होते. खेळ, डफगाणे, व पोराचा नाच, गोविंदाची सोंगे सहा घटिकापर्यंत खेळ जाहला. मग श्रीमंत उठोन निद्रेस गेले. पांच दिवस खेळ जाला. पहिले दिवसी दिवसा जेठीची झोंबी व वाघ–बकरीचे खेळ, सायंकाळीं डफ गाणे, पोऱ्याचा नाच. गोविंदा राणू यानी सोंगे आणिली. दुसरे दिवशीं त्याप्रमाणेंच भवानीपंताचा फड व तिसरे डफ गाणे महादू सुतार याने लाकडाची बाहुली कळासूत्री, व सूर्याचा रथ केला, तो चौथे दिवशीं

दिल्लीचे कळासूत्री मजालस पातशाही अमीरपसंत तो खेळ चांगला जाला. पांचवे दिवशीं दिवसा रंग, रात्री डफगाणे, पोरे नाचणारे, गोविंद राणू सोंगाडे, याप्रमाणें पांच दिवस खेळ जाला. यामधें चांगले पोरे नाचणारे सासवडकर एक, दुसरा जंगमाचा; शाहीरहि गाणारे त्यांचेच हे चांगले. बाकीचे कनिष्ठ भरती आणिले होते. सोंगात भवानीपंतापैकीं दोन सोंगे, एक दाईचे व दुसरे मोगलाचे. गोविंदापैकीं गणपतीचे व दुसरे मुरळीचे, राणूपैकीं तपकिरीची नक्कल व सुतारापैकीं सूर्याचे याप्रमाणें तँमाशा जाहला. सेवेसी कळावें." (इ. सं.)

महादजी शिंदे यांची स्वारी सन १७९२ सालीं पुण्यांत होती. त्यांच्या व श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांच्या गांठी पडत. एकदा महादजी शिंदे यांनीं जयपूर, उदेपूर, मथुरा इकडील रंगाच्या गोष्टी सांगितल्या व तसा थाट पुण्यास झाला पाहिजे असें श्रीमंतास सुचविले. माधवरावांचा त्यास रुकार मिळाल्यावर त्या वर्षाची रंगपंचमी होऊन गेली असल्यामुळें वर्षप्रतिपदेच्या दिवशींच तो समारंभ करण्याचे ठरले. श्रीमंतानी आपल्या पुण्यातील सरदारांना रंगाची तयारी ठेवण्यास आज्ञा केली व महादजी शिंदे यांनीं आपला रंगाचा बेत वानवडीस योजला. प्रथम शनिवारवाड्यांत रंग खेळून झाल्यावर 'सरकारची स्वारी सायंकाळचे दहा घटका दिवसास वानवडीस जाण्यास अंबारीत बसली. मागे खवासखान्यांत महादजी शिंदे व आप्पा बळवंत बसले. घाडा डावा घालून सरकार स्वारी बुधवारातून, कापडआळीने आदितवारात हरिपंत तात्यांचे वाड्यापाशीं येई तो पावेतो वाटेने सरकारचे लोकांनीं रंग करून ठेवला होता. त्यांनीं एकच गर्दी रंगाची केली. तसेच हरिपंततात्यांचे वाड्यापाशीं स्वारी आल्यानंतर तेथें दोन घटिकापर्यंत रंगाचा मार झाला. त्या रंगाच्या योगानें रस्त्यानें चिखल पडला. व शेंकडो पल्ले गुलाल उधळला. असा दोन घटिका रंग खेळून झाल्यावर सरकारची स्वारी पुढें रंग खेळत चालली. शेंकडो पल्ले गुलाल हत्तीवर ठेवला होता तो रस्त्यांत उधळीत चालले. असे नाकझरी उतरून रास्ते यांचे पेठेतून चालले असतां रास्ते यांचे वाड्यापाशीं आले. तेथें रास्ते यांनीं रंगाचा समारंभ केला. गच्च्यावरून रंगाचे बंब उडूं लागले. तेव्हां स्वारीमध्यें जसा पर्जन्य पडतो तसा रंग पडूं पडला. दोन घटिका तेथें रंग खेळून वानवडीस स्वारी दाखल झाली.

"मग श्रीमंत त्यांच्या बसावयाच्या जागीं गेले. तेव्हां झाडून सरदार, मान-

करी, पागे व मुत्सद्दी व कारकून त्या कचेरींत येऊन बसले. बसल्यानंतर दोन घटिका नाच व गाणे झाले. मग रंग खेळावयास प्रारंभ झाला. रंग खेळता खेळता रंगाचे पाट नदीस मिळाले. असा रंग द्वापारयुगी श्रीकृष्ण भगवान् खेळले; तसा कलियुगी श्रीमंत सवाई माधवराव खेळले. रस्त्यामध्यें गुलालाचा पेर व रंगाचा चिखल झाला, तो किती गणतीस धरावा ? असा रंग खेळल्यावर सरकारची स्वारी स्नानास उठली. त्यासमयीं शिंदे यांनीं शेंकडो कढया पाण्याच्या तापलेल्या ठेवल्या होत्या. शेंकडो ब्राह्मण पाणके घंगाळ घागरी घेऊन उभे होते. असा बंदोबस्त स्नानाचा ब्राह्मग मंडळींचा झाला. तसाच मराठे सरदार व मानकरी यांचा बंदोबस्त केला होता. मग अवघ्यांची स्नाने झाल्यावर ज्या कचेरीत रंग खेळले त्याच मखमाली डेऱ्यांत फरास याने येऊन ती बिछायत काढून व नवी बिछायत घालून तयारी केली. सर्व मंडळी स्नाने करून व नवीन वस्त्रे घेऊन कचेरीस बसली. मग नाचाचा प्रारंभ झाला. मग महादजी शिंदे यांनीं श्रीमंतास सर्व पोशाख, जवाहीर, शिरपेच, व तुरा वगैरे गळ्यांत मोत्यांच्या माळा असा दिला. तसेच सर्व कारभारी, मुत्सद्दी व कारकून मंडळी व शिलेदार लोक,; मानकरी हुजुरातीचे लोक, पागे पथके असे सर्वास शिंदे यांनीं पोशाख वाटून नंतर पानसुपारी अत्तर गुलाब हार तुरे गजरे दिले. इतका समारंभ होईपर्यंत तीन घटिका रात्र झाली. मग सरकारची स्वारी पुण्यास यावयास निघाली. ''

(पेशव्यांची बखर)

आतषबाजी

लग्नसमारंभ, दिवाळीसारखे सण व विशेष आनंदाचे प्रसंग आले असतां दीपोत्सव व आतषबाजी यांना त्यादि काळीं प्राधान्य होतें.

सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत अशा समारंभात तऱ्हेतऱ्हेचे दारुकाम होत असे. त्याची नांवें खालीलप्रमाणें:—

[१] तावदानी रोषनाई म्हणजे कांचेच्या कमानी करून व त्यास आरसे लावून जे दारूकाम होत असे ते.

[२] आकाशमंडळतारांगण–दारुकामाची उंच झाडे तयार करून त्यांतून आकाशांतील ताऱ्यांप्रमाणें नानारंगांचे तारे उडवीत, त्याचे नांव.

[३] चादरी दारुकाम–तप्तसुवर्णाप्रमाणें लाल व पिवळ्या रंगांच्या फुलांची झाडे तयार करीत. त्याचे नांव.

[४] नारळीझाडे–उंच झाडे तयार करून त्यांतून तोफाप्रमाणें व बंदुकाप्रमाणें आवाज निघत, सर्पाकार तोंटे फिरत व फुलें दृष्टीस पडत.

[५] प्रभाचमक–प्रातःकाळीं सूर्योदयाचे वेळीं प्रभा चमकते त्याप्रमाणें यांत देखावा दृष्टीस पडे.

[६] कैचीची झाडे–यांतून हवाईचे लोट उडत.

[७] बादलगर्ज–या दारुकामाचा मेघगर्जनेप्रमाणें आवाज होतो.

याशिवाय बाण, पाणकोंबडी, हातनळे, कोठ्याचे नळे, फुलबाज्या, महताफा वगैरे दारूकामाचे अनेक प्रकार होते. [इ. सं.]

प्रकरण तेविसावें

स्वधर्मनिष्ठा व परधर्मसाहिष्णुता

तत्कालीन हिंदू मग तो महाराष्ट्रांतील असो कीं महाराष्ट्रांबाहेरचा असो, त्याच्या डोक्यात धर्म हाच विषय प्रामुख्याने घोळत होता. ऐहिक सुखे अशाश्वत होत, मनुष्याने ते आपले इतिकर्तव्य मानू नये, त्याहून श्रेष्ठ ईश्वर असून त्यासंबंधाची विशिष्ट कर्तव्ये मनुष्यास आहेत व ती त्य ने केली पाहिजेत व मोक्ष हे आपले ध्येय मानून त्याच्या रोखाने आपली ऐहिक वर्तणूक ठेवली पाहिजे अशी सार्वत्रिक विचारसरणी होती. या विचारसरणीच्या बळावरच त्यानी देशाच्या राजकीय व धार्मिक संकटकाळात चिकाटीने स्वधर्मरक्षण करून दिवस काढले. महाराष्ट्रात ज्ञानेश्वरापासून रामदासापर्यंतची तीनशे साडेतनिशे वर्षे मुसलमानांच्या जुलमी व रानटी राजवटीखाली गेली. त्याकाळी साधुसंतांच्या नामघोषाने, उपदेशाने व निरूपणाने ही विचारसरणी सर्व महाराष्ट्रांत फैलावून तिनेच महाराष्ट्राचे धार्मिक व नैतिक दृष्टया संरक्षण केले.

गोहत्येस बंदी

शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन झाल्यावर महाराष्ट्रीयाना धर्मरक्षणासाठीं अत्यंत आवश्यक असें राजकीय सामर्थ्य लाभले. शिवाजी महाराजांची गोब्राह्मणप्रतिपालक ही मुळी बिरुदावलीच. तत्कालीन समजुतीप्रमाणें गोब्राह्मणप्रतिपालन म्हणजेच धर्मरक्षण. कारण गोमातेचे पालन म्हणजे गोरगरीबांचे रक्षण व ब्राह्मणांचे पालन म्हणजे हिंदूंचे धर्मग्रंथ आचार विचार व विद्या यांचेच रक्षण. इतका व्यापक अर्थ लक्षांत घेऊनच शिवाजीने वरील बिरुदावली धारण केली होती. शिवाजीचे हेच धोरण त्याच्या मागून झालेल्या मराठी राज्यकर्त्यानी चालविले. किंबहुना त्यांच्या हाती राजसत्ता व सांपत्तिक सामर्थ्य अधिक प्रमाणात एकवटल्याने फार वर्षे पारतंत्र्यात घालवावी लागून जो मानसिक वृत्तींचा कोंडमारा झाला होता त्यावर प्रतिक्रियाच अशा स्वरूपांत त्यांचा स्वधर्माभिमान अतिशय उफाळून बाहेर आला. गोब्राह्मण-

प्रतिपालक हे शिवाजी महाराजांचे ब्रीद, त्यांतून पेशवे तर जातीचे ब्राह्मण, तेव्हां त्यानी ते ब्रीद पुढे चालविण्याच्या कामी विशेष दक्ष असावे यांत नवल कसले ? मराठी राज्यांत गांवोगांवी मुसलमानांची वस्ती होती. त्यांच्या वस्तीत गोवधाचा संभव विशेष असल्यामुळें त्या भागावरील आपल्या अधिकाऱ्याना सक्त नजर ठेवण्यास पेशव्यांचा हुकूम असे. केसो भिकाजी हा तर्फ तगाड व फारकडा यावर हवालदार होता. त्या टापूतील मुसलमान गोवध करतात पण हवालदार खबरदारी घेत नाही-अशी तक्रार पेशव्याकडे आली. तेव्हां त्यासंबंधी पेशव्यानी केसो भिकाजीपाशी जाब विचारला असता चौकशी अंती सदर तक्रार निराधार असल्याचा खुलासा केसो भिकाजी याने केला. (पे. द. ४३)

पुण्यांत पेशवे सरकाराचे प्यादे कोण कोठे कसला गुन्हा करीत आहे याची टेहेळणी करीत हिंडत असत. ही टेहेळणी गुन्ह्याचा तलास लागण्यासाठी गुप्त होत असली पाहिजे. अशा एका फिरस्त्या प्याद्याला सन १७७६ साली कसबा पेठेतून हिंडत असता तेथील एका कसाबाने गाय मारल्याचे व तिचे मांस विकल्याचे वर्तमान समजले. त्याने ही वर्दी 'चाहुडीवर' दिली. त्याजवरून कसाबास धरून आणून चौकशी करता जंगली नामक कसाबाने आपल्या घरची दोन वर्षांची कालवड जमाल कसाबाच्या मदतीने जीवे मारल्याचे, तिचे मास किरकोळ मुसलमानाना विकल्याचे व कांहीं त्या दोघानी आपसात वाटून घेऊन खाल्ल्याचे उघडकीस आले. तेव्हां 'त्याचे हाती चिमोटे खिळवून व पायी बेड्या घालून अटकेस ठेविले आणि हे वर्तमान राजश्री जनोबादादा यासी व राजश्री शास्त्रीबावास (रामशास्त्री) सविस्तर कळविले. ' (पे. द. ४३)

गोहत्या केवळ मुसलमानच करीत असें नव्हे. हा गुन्हा करणारांत मांग वगैरे हीन जातीचे लोकहि असत. सन १७९३ च्या आक्टोबर महिन्यातील गोष्ट. मौजे कल्याण घेरा किले सिंहगड येथील केदारी मांग यान्च्या घरी येशा व आंबऱ्या मांग मौजे किकवी तर्फ खेडेबारे येथील रहिवासी, चार महिने येऊन राहिले होते. केदारी मांग व हे दोघे यानी मोघरवाडीचे रानात गेलेल्या गुरापैकीं धोंडजी करजवणा याची काळी गाय धरून आणिली व कल्याणचे रानात दिवसा बांधून ठेवून सायंकाळी तिघा जणानी सुरा, कुऱ्हाड, विळे व वस्तरा यानी जिवे मारली. धोंडजीने आपली गाय नाहीशी झाल्याची वर्दी सिंहगडा वरील शिपाई व कल्याणचे पाटील याना दिली. ते बेरडाना बरोबर घेऊन तपा

सास निघाले. त्याना जाग्याचा थांग मोघम दऱ्यात लागला. तेथून कल्याणास येऊन त्यानी महारांच्या घरांचे झाडे घेतले. मग मांगाच्या घरांत गेले तो केदाऱ्या मांगाचे घरांत मास सापडले व मुद्दा लागला. सदर घर जप्त करून तिघा मांगाना किल्ल्यास आणून जबानी घेतली. मांग खोड्यात घालून अटकेंत ठेवावे असे केशवराव जगन्नाथ (कमाविसदार ?) याने हणमंतराव साळवी यास सांगोन पाठविले. ‘ गुन्हा थोर आहे ’ ‘ पारिपत्य चांगले झाले म्हणजे सर्वत्र जागा दहशत पडेल. पारिपत्याविषयीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. ’ (पे. द. ४३)

इंग्रजांची बरीच मोठी वस्ती मुंबईत होती. त्यांना व तत्सम लोकांना गोमांस फार प्रिय. मुंबईला वेढा मराठ्यांच्या मुलुखाचा. तेव्हां गोमांसाचे बाबतींत मुंबईकरांना मराठ्यांच्या मुलुखावर अवलंबून रहावे लागे. मुंबई व साष्टी येथें गोमांसाचा क्रयविक्रम करणोर कसाब असत. ते मराठी राज्यात गोवधास बंदी असल्यामुळें गाई खरेदी करण्याचा धंदा गुप्तपणें चालवीत. याची माहिती पेशवे सरकारास कळल्यावर त्यांनीं सरहद्दविर पक्की नाकेबंदी करून ‘ गाई जाऊ न पावेत असा बंदोबस्त जरूर करण्याचा ’ हुकूम सोडला. [पे. द. ४३]

मद्यपानप्रतिबंध

गोहत्या हे जसे महापातक तसेंच मद्यपान हेंहि महापातक मानण्यांत येत होते. पण गोहत्येला जितकी कडक बंदी होती, तितकी मद्यपानाला नव्हती. तथापि मद्याचा प्रसार न व्हावा यासाठीं योग्य ती खबरदारी घेण्यांत येत असे. सन १७७६ त म्हणजे नानाफडणविसांचे कारकीर्दींत मराठी राज्यांतील एकंदर बंदोबस्त प्रशंसनीय होता. पुण्यांत गुन्ह्यावर नजर ठेवणारे फिरस्ते प्यादे असत, हें वर सांगितलेंच आहे. त्यांच्या तपासांत पुढील हकीकत आढळली, ‘ दुसरे वर्तमान नारायण पेठेमध्यें बोडकी द्रविडीण ब्राह्मण म्हातारी रहात आहे. तिचे घरीं दारूचे भरले शिसे वीस पंचवीस सांपडले व बकरे याचे मास यैसे सांपडले. ते मुद्यासुधा चावडीस धरून आणिले. चौकशी करतां ती म्हातारी दारूचा उदीम करते, कोणाची नांवे सांगत नाहीं. व ती रांड भिकारीण आहे. पैशास उत्पन्न नाहीं. दारू मात्र सांपडली. इतकेच मात्र जाले. गांवांत पाप बहुत होऊं लागले. त्याचे शासन यथास्थित घडल्यास श्रेयस्कर ’ [पे. द. ४३] हे वृत्त धोंडो बाळाजी याने पेशवे सरकारांत कळविले.

खालील हुकूम पेशव्यांनीं दिला आहे. तो लक्षांत घेतल्यास मद्यपानप्रात-बंधासाठीं त्यांजकडून कसकसे प्रयत्न होत असत याची कल्पना करतां येते. ‘ विनंति उपरी, बाजारांतील कलालाची दारू मना करणें म्हणोन लिहिले, त्याजवरून आज ताकीद करून भट्टया मना करवितो कळले पाहिजे हे विनंति ’ [पे. द. ४३] ह्या हुकमाचे साल नमूद असते तर कोणत्या पेशव्याची ती कारकीर्द हें समजले असते.

मौजे पेठ पारगांव तर्फ खेड सरकार जुन्नर येथील बाळाजी धोंडदेव कुळकर्णी हा ब्राह्मण असा निघाला कीं, तो कलावंतिणीशी गमन, भोजन, मांसभक्षक व सुरापान यांत अट्टल बनला. याप्रकारे तो पतित झाला व त्याजबरोबर पंक्ति-व्यवहार करणारे भाऊबंद अपंक्त झाले. पण हा बखेडा केव्हां तरी मोडणेच जरूर होते व त्यावर उपाय प्रायश्चित्त हाच. म्हणून पुण्यांत ब्राह्मणसभा झाली. ब्राह्मणसभेनें सर्वांना प्रायश्चित्त सांगितले. त्यांत बाळाजीच्या वाट्यास पूर्वांग प्रायश्चित्त पृथ्वी प्रदक्षिणा व तीर्थस्नाने हे प्रायश्चित्त आले. [पे. द. ४३]

मद्यपानाविरुद्ध पेशवे सरकाराचा इतका कटाक्ष होता त्यावेळीं इंग्लंडची अवस्था कशी होती याचे वृत्त बोधप्रद आहे. इंग्लंडची राजधानी लंडन तिच्या-तील गुत्त्यात दारूबाजांची रात्रंदिवस गर्दी असे. नीति धर्म या बाबतींत पेश-वाईत अत्यंत कडक निर्बंध पाळले जात असतां इंग्लंडात त्याविरुद्ध अनुभव येत होता. १६६० त दुसरा चार्ल्स फ्रान्समधून इंग्लंडात राज्य करावयास आला, तेव्हांपासून इ. स. १७४२ पर्यंतचा काळ इंग्लंडात अत्यंत भ्रष्टाकाराचा समजला जातो. त्या काळांत धर्मश्रद्धेचा लोप झाला असून लोक अनीतीच्या व दुर्वर्तनाच्या मार्गास लागले होते.

ब्राह्मणप्रतिपालन

धर्मरक्षणदृष्ट्या गोपालनापेक्षांहि ब्राह्मणप्रतिपालन अधिक जरूरीचे. ब्राह्मण-प्रतिपालन हें ब्राह्मणजातींत जन्मलेल्या कोणाचेहि पालन नसून जो ब्राह्मणधर्म यथासांग पाळतो त्याचे पालन होय. ब्राह्मणधर्मांप्रमाणें वागणाऱ्या ब्राह्मणाच्या कृत्यांत अध्ययन, अध्यापन, यजन, याजन. दान, प्रतिग्रह ही षट्कर्मे येतात. तो स्वतः वेदशास्त्राचे अध्ययन करतो व वेदशास्त्रें दुसऱ्यांना शिकवितो. त्या-योगानें चार वेद व सहा शास्त्रें ही जिवंत राहून त्यांचा प्रचार वाढतो, आणि त्यांचा अर्थ व उपयोग शिष्योपशिष्यांना समजल्यानें त्यांचे ज्ञान बहुजन-

समाजांत पसरतें. पेशव्यांच्या काळांत छापण्याची कला महाराष्ट्रास माहीत नव्हती. पोथी पुस्तकें फार थोडी होती व त्यांचा प्रसार महिनोन् महिने लेखकांनीं सदर पोथ्यांच्या परिश्रमपूर्वक नकला करून घेऊन काय होईल तेवढाच; अशा स्थितींत जे ब्राह्मण या प्रकारचे ग्रंथ मुखोद्गत करून धर्मकार्य करीत असतील त्यांची थोरवी एकंदर हिंदुसमाजास फार वाटून त्यांजविषयीं नितांत आदर वसावा यांत आश्चर्य कसले ? आधी समाजांत अक्षरओळख कमी, त्यांतून वेदशास्त्रांचें अध्ययन फारच कमी. म्हणून वैदिक, शास्त्री व पंडित यांना हिंदुसमाज भूदेवच मानीत होता यांत त्यांचा दोष कांहींच नव्हता. कारण हिंदु धर्मातील सर्व जनांचे कुळधर्म, कुलाचार, ज्ञातिधर्म, ज्ञातीचे आचार, पितृधर्म देवदेवतांची प्राणप्रतिष्ठा, सोळा संस्कार, यात्रा, जत्रा, इत्यादि शेकडो नित्य नैमित्तिक कृत्यें पार पडणें, पौराणिक कथा सांगणे हे सर्व ब्राह्मणांच्या हातीं असल्यानें हिंदुसमाज व विशेषतः हिंदूराजे दान, दक्षिणा, भोजन इत्यादि रूपानें ब्राह्मणांची उत्तम प्रकारें संभावना करीत. त्या वहिवाटीस अनुसरून शाहू महाराज व पेशवे यांनीं त्यांचा नानाप्रकारानी परामर्श घेतला.

शाहूमहाराजानें त्यांची राणी आजारी असतां तिच्या प्रकृतीस आराम पडावा यासाठीं ' इंदुवारीं गजदान, उष्ट्रदान, दोन अश्वदानें, म्हशीचीं दोन दानें पांच सात गोदानें, कृष्णाजिनदान व किरकोळ दशदानें ब्राह्मणांस दिली. ' ही दानें सध्याप्रमाणें द्रव्य रूपानें न देतां प्रत्यक्ष हत्ती, उंट, घोडे, या रूपानेंच दिलीं जात. भिक्षुक ब्राह्मणांना हत्तींचा व उंटांचा काय उपयोग ? ही मोठालीं जनावरें कोणातरी त्याच योग्यतेच्या मातबर मनुष्यास ते विकून रोख पैसे करीत असतील हें उघड आहे. अशा प्रकारचीं मोठी दाने मिळाल्यानें ब्राह्मणाची आर्थिक स्थिति लवकर सुधारून तो एकदोन पिढ्यांच्या आंत भिक्षुकाचा सावकार बनावा.

सन १७४९ सालीं शाहू महाराजांस बरें वाटत नव्हते. तेव्हां जागोजागच्या देवस्थानांत ब्राह्मण अनुष्ठानाला बसविले ते पुढीलप्रमाणें ' भीमाशंकर, मोरेश्वर, थेऊर, जेजुरी, श्रीनारायण संस्थान पुरंदर. आकरा ब्राह्मण बाकीच्या चार जागीं ठेवण्यांत आले. ' [पे. डा.] अनुष्ठानाचे प्रसंग वारंवार येऊन ब्राह्मणांना वेदविद्या शिकण्यास उत्तेजन मिळाले. क्षेत्राच्या ठिकाणीं राहून त्यांचा निर्वाह नीट चालू लागल्यावर क्षेत्रांत विद्वान् ब्राह्मणांची कायमची वस्ती झाली.

क्षेत्रांचाहि ग्राम्यपणा जाऊन त्यांस प्रतिष्ठितपणा आला, व त्यांच्या मार्फत भोवतालच्या प्रदेशांत सदाचाराचा व आर्यसंस्कृतीचा प्रसार होण्यास मदत झाली. ' श्रीमंत महाराज सौभाग्यवती मातुश्री दुर्गाबाईसाहेब थोरली धनीन सातारा यांची स्वारी कन्यागती सातार्‍याहून माहुलीसंगमी श्रीकृष्णास्नानास गेली होती. तेव्हां ब्राह्मणास धारादत्त जमीन इनाम द्यावयाचा करार केला. वेद मूर्ति रघुनाथभट पराडकर, गणेश भट वालेकर व लक्ष्मण भट अभ्यंकर यांस मिळून दोन चाहूर ' (पे. डा.) जमीन इनाम मिळाल्यानें या ब्राह्मणांची पिढ्यानुपिढ्या ददात मिटली. ती तिघांत दोन चाहूर जमीन म्हणजे प्रत्येंकाच्या वाट्यास ऐशी बिघे. ही दाने चांगले पढिक ब्राह्मण पाहून त्यांना देण्यांत येत. त्यांच्या प्रपंचास लागणार्‍या धान्याची बेगमी यांवर सहज होऊन ते बिनघोर बनत व आपल्या वेदविद्येंत गुंगून जात. निस्पृहपणा, विरक्ति, ऋजुता, शुचिर्भूतपणा, आचारसंपन्नता इत्यादि सद्गुणांचे संवर्धन ब्राह्मणवर्गात याच स्वास्थामुळें होत गेले. ते त्यायोगानें स्वतःच्या अध्ययनाची उपस्थिति ठेवीत व आपल्या पुत्रपौत्राना किंवा आसपासच्या गांवाहून त्यांजपाशीं येऊन राहिलेल्या आस्थेवाईक शिष्यांना तीच विद्या शिकवून त्यांच्या निर्वाहाचे साधन मिळवून देत. वाई, माहुली, कर्‍हाड, नाशिक, पुणतांबे, त्र्यंबक, प्रवरासंगम, सांगली, हरिपूर इत्यादि क्षेत्रे असल्या राजाश्रयानेंच भरभराटीस आली.

भिक्षुक ब्राह्मणांच्या अन्नाप्रमाणें त्यांच्या निवासाचीहि तजवीज करणे राजे व धनिक लोक आपले कर्तव्य समजत. वाईस धर्मपुरी नांवाची एक आळी सरदार रास्ते यांनीं ब्राह्मणांना धर्मार्थ बांधून दिली. तसाच उपक्रम गोपाळ नाईक तांबवेकर या सावकारानें केला. गोपाळ ' नाईक हा सातारा जिल्ह्यांत वाळवें तालुक्यांत कासेगांवाजवळ कृष्णातीरीं तांबवे म्हणून गांव आहे तेथील रहाणारा. थोरल्या माधवराव पेशव्यांचे कारकीर्दीत सराफीच्या धंद्यावर यानें लाखो रुपये मिळविले, काशीपासून रामेश्वरापर्यंत आपल्या पेढ्या स्थापिल्या व कोटयवधि रुपयांची संपत्ति मिळविली. थोरल्या बाजीरावास लक्षावधि रुपये कर्ज देणारा जसा परशुराम नाईक अनगळ तसा महादजी शिंदे यास कर्ज देणारा हा गोपाळ नाईक तांबवेकर. यानें बत्तीसशिराळे येथील जहागिरदारीण पार्वतीबाई भोसले हिजकडून कृष्णातीरीं मालखेड म्हणून गांव आहे तो खरेदी घेऊन चौपन ब्राह्मणास अग्रहार दिला. या ब्राह्म-

णांत चारी वेदांचे निरनिराळ्या पंथांचे त्याप्रमाणें कोकणस्थ, देशस्थ, शेणवी अशा निरनिराळ्या पोटभेदांचे ब्राह्मण यांचा संग्रह दृष्टीस पडतो. शेणवी हे षट्कर्माधिकारी आहेत कीं नाहीं याविषयीं पुण्यास मोठा वाद झाला. तेव्हां रामशास्त्री आदिकरून पंडितानीं ते तसें असल्याचा निर्णय दिला. त्याप्रमाणें गोपाळ नाईक तांबवेकराचे दानपत्रांत एका वैदिक दशग्रंथी शेणव्याचे नांव घालण्यांत आलें. हा गांव देताना प्रत्येक ब्राह्मणास एक पांच खणी तिघई घर पुढें आंगण मागें परसू व शौचकूप असें. पांच माणसांच्या प्रपंचास लागणारी भांडी व एक वर्ष पुरेल इतकी अन्नसामुग्री अशा प्रकारची तजवीज करून देण्यांत आली. नायकाचे वंशज मालखेड येथेंच रहातात. मालखेडास कृष्णातीरीं एक घाट व विष्णुमंदिर गोपाळ नाइकानें बांधलेलें आहे.' (इ. सं.)

ही मदत सर्वकाळीं व सर्वस्थळीं शक्य नसल्यानें अन्य रीतीनेंहि कित्येक ब्राह्मणांची गरज भागविण्यांत येई 'वेदमूर्ति दिवाकर भट गोडबोले यांनीं कल्याणास घर बांधावयास लाकडें खरेदी केलीं आहेत. त्यास सरकारचा शिरस्ता दर शेंकडा पांच लाकडें घ्यावयाचा आहे. तो न घ्यावा म्हणून सनद.' [पे. डा.] हा नवीन घर बांधण्यावरचा एक प्रकारचा सरकारी कर दिसतो. तो या सनदेनें माफ करण्यांत आला. नव्या घरावरचा हा कर झाला. पण घर बांधून झाल्यानंतर त्यावर ठळक गांवांतून घरपट्टी म्हणून वेगळा कर असेच. 'प्रांत वसई तर्फ आगाशी येथील जे सामवेदी ब्राह्मण स्नानसंध्या करून व ब्राह्मण-धर्माचे आचरण करून रहात असतील त्यांस घरपट्टी व वेठ माफ' [पे. द.] यावरून अशा सवलती कोणत्या प्रकारच्या ब्राह्मणास असत हें समजतें.

इहलोकची वस्ती क्षणभंगुर आहे. आत्म्याचें शाश्वत स्थान परलोकीं आहे. तेव्हां परलोकांत आत्म्याला सद्गति मिळण्याकरितां मृताचें और्ध्वदेहिक जो तो आपल्या शक्तीप्रमाणें पैसा खर्चून करीत असे. इतकेंच नव्हे तर मृत्यूनंतरहि श्राद्धपक्षादि कृत्यें मृताच्या वासना शिल्लक राहिल्या असतील या भावनेनें त्या तृप्त करण्यासाठीं श्रद्धापूर्वक होत.

दानधर्म.

पहिले बाजीराव पेशवे निवर्तले त्याबद्दल हरभट बिन महादेव भट पटवर्धन वेदशास्त्रसंपन्न पाहून त्यास भूमिदान म्हणून मौजे चौल येथें दहा बिघे जमीन

नानासाहेबांनीं दिली. चिमणाजी आप्पाच्या और्ध्वदेहिकाकरितां शय्यादान, शिबिकादान, वैतरणीदान, वृषोत्सर्ग, गोदान म्हणून रु. १००४१-० इतका खर्च आला.

शाहू महाराजाचे उत्तरकार्य त्यांच्या योग्यतेस शोभण्यासारखे करण्याचे नानासाहेब पेशव्याने ठरविलें होतें. त्याप्रमाणें अनेक प्रकारची दाने ब्राह्मणाना देण्यांत आली. नारायणभट पंडित, अनंतशास्त्री गडबोले, बापूभट कुंभारे, माहुलीकर, नारायणभट गोखले या सर्वांस मिळून एक चाहूर जमीन देण्यांत आली. जान जोशास हुक्का, चिली, राघोबा जोशास काठी, कोणास चिमटा, पिकदाणी, सुरई, तस्त, तिफुला, गुलाबदाणी दिली. एखादा उत्तमसा ब्राह्मण आल्यास त्यास देण्याकरितां दहा पंधरा दाने अमानत राहू दिली. हत्ती व अफदागिऱ्या दिल्या. यापैकीं कांहीं दाने विद्यार्थी, पुराणिक, अगांतुक जोशी यांना दिली. [पे. द.] शाहू महाराजास तंबाखू ओढण्याचे व्यसन मुसलमानासारखे कसे जबर लागले होते व ते तो किती मिजासीने चालवीत होता याचे रहस्य त्याच्या हुक्क्यांत व चिलीम-चिमट्यांत सांठविले आहे. बाजीरावाची भार्या काशीबाई हिची काशीयात्रा थाटाने झालीच होती. पण मरणोत्तर तिच्या अस्थीहि काशीस कृष्णाजी महादेव चिपळूणकर याजबरोबर थाटाने पाठविण्यांत आल्या. त्यास नेमणुकीपेक्षा ७३१२८१२ जास्ती खर्च लागला. [पे. द.] नानासाहेब मरण पावल्यावर त्याच्या वर्षश्राद्धास खर्च पुष्कळच आला असेल. पण सन १७६८-६९ साली त्याचे वार्षिक श्राद्ध झाले त्यास रु. १८७२-१०-० खर्च करण्यांत आले.

मृतासाठीं जेव्हां दक्षिणा वाटण्यांत येई तेव्हां ती कधी कधी नामधारी ब्राह्मणासहि मिळत असे व तिच्यावर पोसलेले ब्राह्मणब्रुव समाजांत थोडे नसत. किंबहुना त्याच प्रकारचे ब्राह्मण असली दक्षिग स्वीकारण्यास पुढे होत. थोरले माधवराव पेशव्यांची शेवटच्या दुखण्यांत पुढील प्रमाणें आज्ञा होती ' पुण्यांत ब्राह्मणभोजन पांच हजार घालावे, एकशे ऐशी गाई दान केल्या त्या क्षेत्रीं पाठवाव्या ' (ऐ. ले. सं.) अन्नदानासारखें मनुष्याच्या अंतरात्म्यास संतोषविणारें दुसरें दान नाहीं. त्यानें तृप्त झालेल्या ब्राह्मणांपैकीं एखाद्याच्या आशीर्वादानें आपणास आरोग्य लाभेल ही त्यांची एक आशा. १८१ गाई नुसत्या पुण्यांत किंवा थेऊरांत न वाटतां दूरदूरच्या क्षेत्रांतून स्नानसंध्या करून रहा-

णाऱ्या गरीब ब्राह्मणांच्या वाट्यास येऊन त्यांचा दुवा मिळेल ही त्यांची दुसरी आशा.

विद्वान् व गुणी ब्राह्मणांना कर्ज फार होऊन तें फेडणें त्यांच्या शक्तीपलीकडे गेलें म्हणजे पेशवे त्यांचें कर्ज फेडीत. ही सगळी रक्कम फेडण्याचें स्वतःच्या शिरावर न घेतां तो बोजा ते आपल्या सरदारांवर वाटीत. ' हरिभक्तिपरायण तिमया गोसावी वास्तव्य नाशीक यांस कर्ज झालें. तें एकंदर तीस हजार रुपये होते. तें वारावयाकरितां सरदारांवर वाटणी केली. त्याप्रमाणें ११५५० रु. मल्हारजी होळकर, ११५५० रु. केदारजी शिंदे, ५००० रु. लिंबकराव शिवदेव, ४८०० रु. खंडेराव पवार येणेंप्रमाणें. (पे. डा.) ही वारलेली रक्कम तीस हजारांहून जास्ती दिसते. कदाचित् ती व्याजासुद्धां असावी. हें कर्ज फारच मोठें यांत शंका नाहीं. कर्जाचा बोजा इतका वाढूं देणारे हरिदासबुवांचें प्रस्थ दांडगेंच असलें पाहिजे. प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांचें कर्जहि पेशव्यांनींच वारलें होतें. गुणी विद्वज्जनांना हा आधार केवढा वाटत असेल? ' वेदमूर्ति राजश्री विश्वनाथभट वैद्य मंडलेश्वरकर यांस सूर्यग्रहणपर्वी धारादत्त इनाम जमीन चावर एक द्यावयाचा करार करून सनद दिली असे. अशी जमीन नर्मदा तीरी चारपांच कोस गांव चांगला पाहून भटजीस इनाम पत्रें करून द्यावीं. ' (पे. डा.) मुसलमानी अमल होता तेव्हां माळवा वगैरे प्रांतांत धर्मास राजाश्रय नसल्यानें आर्य संस्कृतीचा पूर्ण लोप झाला होता. तिचें पुनरुज्जीवन विद्वान् ब्राह्मणांना पवित्र नर्मदातीरीं स्थापून पेशव्यांनीं केलें. इनाम जमीन घेऊन वंशपरंपरेनें रहाणारा एक विद्वान् ब्राह्मण हा आर्यधर्माचा व आर्यसंस्कृतीचा दीपच होय. मराठी साम्राज्याची हिंदुधर्मप्रसारास महाराष्ट्राबाहेर असली मदत किती तरी झाली. श्रीकाशी हें हिंदूंचें मुख्यक्षेत्र, धर्मपीठ व विद्येचें माहेर. हिंदुस्थानांतील निरनिराळया प्रांतांतील ब्राह्मण विद्यार्जनाकरितां काशीस जाऊन रहात किंवा इतरत्र कोठे विद्या संपादन केली असल्यास तिची परीक्षा देण्याकरितां काशीचीच वाट धरीत. त्यामुळें ठिकठिकाणाहून हजारो ब्राह्मण काशीस वस्ती करून असत. त्यांचा योगक्षेम धर्मादायावरच चालावयाचा हें पेशव्यांना माहीत असल्यानें सत्पात्र ब्राह्मण पाहून त्यांना ते मुद्दाम कारकून पाठवून वर्षासनें देत. ' श्रीकाशींत ब्राह्मण आहेत. त्यांस वर्षासनें वाटण्याकरितां नारोबल्लाळ भट कारकून पाठविले आहेत. ' (पे. डा.). श्रीमंत थोरले माधवराव

पेशवे यांनीं आपल्या आजारांत महाराष्ट्रांतील ब्राह्मणांना दानधर्म केलाच; परंतु महाराष्ट्राबाहेर जीं हिंदूंचीं धर्मक्षेत्रें आहेत तीं आपलींच असून तेथील ब्राह्मणांचाहि परामर्श घेणें आपलें कर्तव्य असें जाणून तिकडेहि आपल्या औदार्याचा ओघ वळविला. कांची व कामाक्षी हीं क्षेत्रें दक्षिणेंत द्रविड देशांत आहेत. 'त्यांस पन्नास हजार रुपयांच्या मोहरा लाऊन देणें म्हणून (त्यानी) उदक सोडलें !'

पेशवे स्वतः ब्राह्मण असल्यानें त्यांच्यापैकीं पुष्कळांना स्वतः ब्राह्मणकर्म करून रहाण्याची ऊर्मी येत असे. पण क्षात्रकर्म, राज्यभार व ब्राह्मणकर्म या तिन्हीचा मेळ बसणें अशक्य होऊन माधवराव, रघुनाथराव यांसारख्यांना आपली ऊर्मी आवरावी लागे. रघुनाथरावांना गोदातीरीं रहाण्याची हौस मोठी. ती त्यांनीं नाशीकाजवळ आनंदवल्ली नांवाचें नवीन गांव वसवून पूर्ण करून घेतली. त्यांचा स्नानसंध्येचा दंभ फार. त्यांच्या भोवती शागीर्दाशिष्यांचीहि दाटी तशीच. त्यांच्या मनांत एकदा अग्निहोत्र घेण्याचें आलें. पण वृत्ति अस्थिर पडल्यानें घटकेंत नवा बेत अशी स्थिति घडत असे. त्यासंबंधीं त्रिंबकरावमामा पेठे यांनीं नाशिकाहून गोविंदपंत पटवर्धनास लिहिलेले पत्र वाचनीय आहे. मामा सन १७६४ त लिहितात 'श्रीमंत दादासाहेब श्री त्रिंबकेश्वरीं राहाणार. नवे घरहि त्रिंबकीं पेठेस बांधलें. नाशकाजवळ दोन कोसावर चावडस म्हणून लहान खेडें आहे. तोच गांव पसंत करून त्या गांवींहि घरवाडा लहानसा बांधतात. अग्निहोत्र घेणार होते. कुंडें घालून संकल्प करावा येथपर्यंत आल्यावर 'हे किरकिर आम्हांस पुरणार नाहीं' असें म्हणून कुंडें गंगेंत टाकलीं. भट जमा झाले होते. पालख्या घोडे पाठवून आणिले होते. त्यांस निरोप दिला.' (ऐ. ले. सं.) सर्वच पेशव्यांचा ओढा कृष्णातीरापेक्षां गोदातीराकडे विशेष दिसतो. आनंदवल्ली व कोपरगांव या दोन गांवीं राघोबा सहकुटुंब घरें बांधून राहिलेच होते. माधवरावाची आई गोपिकाबाई हीहि नाशकाजवळ गंगापुरास वस्ती करून होतीच. खुद्द पेशवे सरकारांनीं नाशिकास वाडा उठविला होताच. त्यामुळें ब्रह्मवृंदांना राजाश्रय यथास्थित मिळून संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन झालेंच; पण खेरीज गोदावरीवर ठिकठिकाणीं घाट व सुंदर देवालयें बांधलीं जाऊन श्रीरामचंद्र, लक्ष्मण व सीतादेवी यांनीं आपल्या पदधूलीनें पवित्र केलेल्या गोदाकांठास शोभा आली.

राघोबांचे चिरंजीव रावबाजी यांनीं सगळ्या बाबतींत कळस केला तसा धर्मादायांतहि केला. ' ते स्वतः मोठमोठीं अनुष्ठानें करीत. आणि त्याप्रीत्यर्थ ब्राह्मणांचीं लक्ष भोजनें घालीत. सन १७९७ सालच्या श्रावण मासाच्या दक्षिणेंत तर मोहरा, पुतळ्या, मोती, पाच, माणकें अशी पंचमेळ खिचडी करून तिची खैरात श्रीमंतांनीं ओंजळीं भर भरून ब्राह्मणांस वाटली!' (नाना फडणविसांचें चरित्र, खरेकृत)

पेशव्यांच्या दानाचा वर्षाव हजाऱ्यानें पाणी घालावें त्याप्रमाणें सर्व महाराष्ट्रभर होऊन वर्षाऋतूंत हरिततृणांकुरांनीं चित्तास प्रसन्न करणाऱ्या भूमीचें सौंदर्य महाराष्ट्राच्या वाट्यास आलें. पेशवे नेहमी मोहिमेवर असत व त्यांचा केव्हां कोठे मुक्काम पडेल याचा नेम नसे. सणवार, ग्रहणें, पर्वकाळ यासारखे योग वाटेंतच येत. पण ते आले असतां योग्य तें धर्माचरण करण्यास पेशवे चुकत नसत. सन १७६३ सालच्या सुमारास माधवराव पेशवे तापी तीरीं असतां चैत्र मासीं सूर्यग्रहण आलें. तेव्हां ' परमेश्वरभट बिन वासुदेवभट वास्तव्य श्रीसुंदर क्षेत्र चांगदेव परगणे एदलाबाद प्रांत खानदेश यांस सूर्यग्रहणी एक चाहुर जमीन दान केली. ' मुसलमानांच्या अमदानींत जेथील धर्मक्षेत्रांचा व ब्राह्मणांचा उच्छेद झाला होता त्या तापीतीरावर धर्मपिपासूंकरितां ही एक पाणपोईच स्थापण्यांत आली म्हणावयाची ! पेशवाई स्थापन होईपर्यंतच्या काळांत तापींतून पाणी वहात होतें, पण त्या पाण्यास पावित्र्य आणणारा हिंदुधर्मसंस्कृतीचा ओघ मात्र वहावयाचा थांबल्यामुळें शांतीच्या अभावी खानदेश अगदी धगधगीत झाला होता.

देवास अनुष्ठान केल्यानें ईश्वरी कृपा वळून किल्लेहि हस्तगत होतात अशी धर्मभावना होती. किल्ले घेण्याचे जे सामदामादि यत्न ते चालूच असत, पण त्याखेरीज ईश्वराची आराधनाहि केव्हां केव्हां करण्यांत येत असे.

' प्रतापगड किल्ला सरकारांत यावा याबद्दल चाफाजी टिळेकर खिजमतगार यानें श्रीभवानीस नवस केला होता. त्याप्रमाणें श्रीस पुतळ्यांची माळ देविली असे. ' नारायणराव पेशव्यांचा खून चुकविण्याकरितां ज्यानें आपला बळी दिला तोच हा स्वामिभक्त चाफाजी. एखाद्या प्रदेशावर परचक्र आले असतां त्यांतून निभावण्याकरितां त्या प्रदेशांतील लोक इतर उपायांबरोबर ईश्वराराधनेचाहि अवलंब करीत. त्या बाबतींत रयतेस आलेला खर्च आपण भागविणें सरकार आपलें कर्तव्य समजत असे. ' साल गुदस्त कसबे नगरानजीक मोगल आला

होता. ते समयी श्रीशुक्रेश्वर महादेव कसबे भिंगार या देवास होमद्वारा महारुद्र करावयास गणेश विठ्ठल तर्फ हवेली नगर यांनीं नवस केला होता. तो करावया बद्दल ३०० रु. करार करून दिलें असत.' (पे. डा.) अहमदनगरचा प्रदेश शेकडा वर्षे मुसलमानी अमलांत होता व अलीकडे स्वराज्यांत असला तरी मोगलाचा उपद्रव त्यास वारंवार होत असल्यानें तिकडील हिंदुधर्मास प्रेतकळाच प्राप्त झाली होती. त्यावर याप्रकारची अनुष्ठानें अमृतवृष्टीसारखीच उपकारक झाल्यावांचून रहात नसतील.

देवाना दागिने

त्र्यंबकेश्वर किल्ला यावा म्हणून नवस केल्यावरून त्र्यंबकेश्वरास सोन्याचा मुखवटा व वस्त्रें देण्यांत आलीं. मुखवट्याचे वजन १८०।≈॥ तोळे होतें. त्याखेरीज रुप्याचा मुखवटा, साडी, चोळखण, चादर, मंदिल इत्यादि नग व वस्त्रें देण्यांत आलीं. पेशवे महाराष्ट्रांतील एकएका देवस्थानाचें पांग फेडीत चालले. पेशवाईपूर्वी महाराष्ट्र हा गरीब देश होता. त्यांतील देवालयें भिकार, मूर्ती कुरूप व वैभवशून्य होत्या. पेशव्यांना हें दैन्य पहावलें नाहीं; इतकेंच नव्हे तर दाक्षिणेकडील देवालयांचा तो दिमाख, तें ऐश्वर्य व ती श्रीमंती दृष्टीस पडल्यानंतर त्यांना महाराष्ट्रांतील देवालयांच्या दुःस्थितीविषयीं खंती वाटूं लागली असेल यांत शंका नाहीं. म्हणूनच नवसाचें निमित्त करून त्यांनीं त्र्यंबकेश्वराच्या थाटमाटांत हळूहळू भर घालण्यास सुरुवात केली.

त्र्यंबकेश्वर हें हिंदुस्थानांतील बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक महत्त्वाचें ज्योतिर्लिंग आहे. ती अखिल भारतीय योग्यता जेजुरीच्या खंडेरायास नसली तरी महाराष्ट्रांतील लाखो मराठे व ब्राह्मण यांचें तें कुलदैवत असल्यानें त्याची गणना प्रमुख देवस्थानांतच होत आली आहे. श्रीशाहूमहाराज, शिंदे, होळकर यांची खंडेरायावर भक्ति अलोट. त्याची व्यवस्था पेशव्यांनीं उत्तम प्रकारें ठेवली. त्यांनीं ' सोन्याचा मुखवटा जेजुरीच्या खंडोबास वजन तोळे ११८८॥१ चा दिला. खेरीज मंदिल, दुपट्टा, मश्रू, जामवार, कमरबंद हींहि वस्त्रें व भूषणें अर्पिलीं. कोकणांत रेवदंडा येथील श्री भवानी नागोद देवी हिला सोन्याचा मुखवटा तोळे २३॥।१। इतक्या वजनाचा वाहिला. बहिरीस तितक्याच वजनाचा सोन्याचा मुखवटा दिला. शिवाय लुगडें, चोळखण, मंदिल, चादर, कमरबंद, मश्रू, झग्यास तिवट याप्रमाणें वस्त्रें समर्पण केली. ' (पे. डा.)

पेशव्यांचें लक्ष केवळ स्वतःचा बडेजाव वाढविण्याकडे नव्हतें. महाराष्ट्राचे राज्यकर्ते या नात्यानें त्यांना साऱ्या महाराष्ट्राचा अभिमान असून महाराष्ट्राचा जो लौकिक तोच आपला लौकिक व महाराष्ट्राचा जो उणेपणा तोच आपला उणेपणा असे ते मानीत असल्याचींच हीं उदाहरणें होत.

सवाई माधवराव पेशव्याच्या जन्माने बारभाईला जो आनंद झाला तो सांगता पुरवत नाहीं. त्याच्या जन्माबद्दल नवस करण्यांत आले, त्यांची रक्कम १३४०४२ रु. होती. ती जेजुरीचा खंडोबा, गिरीचा व्यंकोबा, पुळयाचा गणपति, पुरंदराजवळील नारायण महादेव, पुण्यांतील जोगेश्वरी, भीमाशंकर, त्र्यंबकेश्वर, मोरेश्वर, थेऊर, आवंढा नागनाथ येथलि देवता याना वाटावयाची होती.

हिंदु धर्माच्या पाठशाळा

महाराष्ट्रांत रम्य वनस्थळें पुष्कळ आहेत. नदी, डोंगर, अरण्य, एकांत यांची अनुकूलता पाहून पेशव्यांनीं व इतर सरदारांनीं देवालयें बांधून त्या अनुकूलतेचा उपयोग ईश्वराराधनेच्या कामीं करण्याची संधि कधींहि वाया जाऊं दिली नाहीं. त्यांनीं जुनी देवळें दुरुस्त केलीं व नवीन बांधली. त्यांच्या भोवती बेल, चाफा, शमी, चिंच, कवठ, आंबा, इत्यादि वृक्ष लावून छाया केली व देवाचें पूजासाहित्य कायमचें जुळवून ठेवलें. खेरीज नदीला किंवा ओढ्याला घाट व कुंडे बांधून स्नानपानाची बारमहाची ददात मिटविली आणि शेजारी पडशाळा उभ्या करून अतीथ-अभ्यागतांना व सेवेकऱ्यांना निवारा मिळवून दिला. अशी योजना आगाऊच केल्यामुळें अनुष्ठानाकरितां त्या त्या देवापाशीं ब्राह्मण ठेवताना कसलीच अडचण पडत नसे. ‘ श्री मोरेश्वर, श्री सोमयादेव, सिद्धेश्वर परगणा पारनेर, बल्लाळेश्वर पाल हवेली, यवतेश्वर सातारा, जेजुरी, श्रीदेव नारायण किल्ले पुरंदर, बनेश्वर, भगवती वेरूर, गणपति रांजणगांव यांस पांच अनुष्ठानाचे ब्राह्मण, एक आचारी, एक खटपटया यांची सामुग्री द्यावी. अशी योजना करण्यांत आली,’ (पे. डा.)

वरील यादींतील देवस्थाने आजहि महाराष्ट्रांत सुविख्यात व दर्शनीय ठरलेलीं आहेत. निर्धूत बनलेल्या महाराष्ट्र भूमीच्या अंगावर चढविलेले हे मूल्यवान् दागदागिनेच होत. त्यांनींच महाराष्ट्रभू महाराष्ट्रीयास किती तरी प्रिय करून

सोडली आहे. ही स्थळें महाराष्ट्राच्या ज्या ज्या भागात विखुरली आहेत त्या त्या भागांतील अज्ञ जनाना हिंदु धर्म व हिंदु संस्कृति यांचे ममतेने शिक्षण देणाऱ्या त्या शाळा–पाठशाळाच होऊन राहिल्या. त्या देवालयांतून पुराणे चालत असतील, मंत्र घोष होत असतील, सदाचार पाळले जात असतील, आणि ते सर्व पाहून व ऐकून लाखो लोकांची अध्यात्मिक व ऐहिक उन्नति घडून येत असेल.

मात्र यापैकीं मुख्य देवस्थानांत यात्रेच्या वेळीं दर्शनास जाणाऱ्या हजारो यात्रेकरूंपैकीं शेकडो लोकांना मृत्युमुखी पडून इहलोकास तर तत्काळ मुकावे लागत होतेच; मग त्यांना पारमार्थिक मुक्ति मिळो अगर न मिळो. महाराष्ट्रांत जेजुरी हे मोठे क्षेत्र समजले जात असून तेथें चैत्र शुद्ध पौर्णिमेस यात्राहि जंगीं भरते. तशा प्रकारची यात्रा पेशवाईत एकदा भरली असतां केवढा अनर्थ ओढवला हे खालील पत्रावरून लक्षांत येते. सदर पत्र परशुराम भाऊ पटवर्धनानी चैत्र वद्य चतुर्थी ता. ३ एप्रिल १७९० रोजीं पुण्याहून मिरजेस बाळासाहेब मिरजकरास लिहिले आहे. त्यांत ते म्हणतात, ‘चैत्र शु॥ १५ची यात्रा जेजुरीस होती. त्यास यात्रेच्या दाटीमुळें नगारखान्याचे दरवाजापाशीं झगडा होऊन पावणे तीनशे मनुष्य ठार झाले. या खेरीज सव्वाशे जाया आहे. यांतून काय जगते पहावे. होणारास उपाय नाहीं. ईश्वरी क्षोभ इलाज नाहीं.’ (ऐ. ले. सं. ८). यात्रेचा बंदोबस्त हल्लींसारखा नव्हता त्याचा हा परिणाम असावा.

मोठी देवस्थानेंच काय, पण खेड्यापाड्यांतील किरकोळ देवस्थानेंहि पेशव्यांच्या नजरेतून सुटली नाहींत. ‘ कसबे ओतूर (जुन्नर प्रांत) येथील भवानीस रुप्याचा मुखवटा वजन ११७॥। तोळे व बहिरी मौजे खेड (प्रांत पुणें) यास २३॥। तोळे रुप्याचा मुखवटा दिला. ’ आज खेड्यांकडे दृष्टि फेकल्यास तेथील गरीब माणसांच्या मनाला उत्साह वाटावा, समाधान लाभावें, नवल दिसावें असें तेथें क्वचित् असते. चित्रकार रोज एक रंग भरून चित्राची आकृति सहृदयतेने पुरी करीत आणतो तोच प्रकार महाराष्ट्राच्या सौंदर्यपूर्तीच्या कामीं पेशव्यांनीं आपल्या कारकीर्दीत चालू ठेवला होता. अशा राज्यकर्त्याविषयीं सर्व प्रजाजनांचीं मनें अभिमानाच्या व आपलेपणाच्या भावनेनें तुडुंब भरून वहात असली पाहिजेत.

पेशव्यांची देवाच्या ठिकाणीं निष्ठा असेच, पण देवभक्तांच्या ठिकाणींहि

तशीच निष्ठा असे. ते देवांना उत्पन्न करून देत, त्याप्रमाणेंच देवाचे जे भक्त त्यांनाहि उत्पन्नें देत. ‘ चिंचवडचे जगन्नाथ देव यांस सुदउंबरे हा गांव स्नान-संध्यादि षट्कर्मे आचरून रहाण्याकरितां इनाम दिला. ’ चिंचवडच्या गणपतीचे संस्थापक प्रसिद्ध मोरया गोसावी यांच्या सारखाच त्यांच्या वंशजांचा काल स्नानसंध्यादि कर्मांत निर्वेधपणें जावा हाच त्यांस इनाम देण्यांतील हेतु स्पष्ट दिसतो.

परधर्मीयापासून हिंदु धर्मीयांचें रक्षण करण्यासाठीं शिवाजी महाराजांनीं स्वराज्य स्थापलें. शिवाजीचा हा उद्देश पेशव्यांपुढें सदैव जागृत होता. त्यांस केवळ धर्मरक्षणासाठीं मुसलमानाबरोबर झगडण्याचें कारण उरलें नाहीं. त्यांच्या मुसलमान राज्यकर्त्यांवरील दराऱ्यानें हें कार्य सहज साधत असे. तथापि पोर्तुगीजांपासून महाराष्ट्रीय हिंदूंचा छळ होत असल्याचें समजतांच सन १७३९ मध्यें चिमणाजी आप्पा कसा वाघासारखा वसईवर धावून गेला ते महाशूरच आहे. त्यांत विजयश्रीनें चिमाजीस वरल्यावर त्यानें ब्रह्मेंद्रस्वामीस लिहिलेल्य पत्रांत त्याचा परधर्मीयाविषयींचा तिटकारा मूर्तिमंत प्रगट झाला आहे. ‘ फिरंगी धर्मद्वेष्टे बहिःपंथ होऊन अष्टमीस प्रहर दिवसास सलोख्यास आले... श्रीचे सुदर्शने-करून धर्मद्वेष्टे यांच्या मस्तकी वज्रप्रहार होऊन टोपीकर म्लानवत् झाले. अन्यथा वसई होती व फिरंगी आगीचा पुतळा होता. स्वामीचा महिमा स्वामी जाणत. वसई फत्ते होतांच १२५ पुतळी पाठवून देणें व श्री भुलेबास १२५ रुपयांचा मुगुट घालावा म्हणून आज्ञा केली. त्याजप्रमाणें श्रीनिवास केदार यांजबरोबर पाठविले आहेत. ’ हें पत्र वाचून चिमणाजी आप्पासमवेत आपणहि रणांगणावर उभे आहोत व आपणांवरहि तोफेच्या गोळयांचा वर्षाव होत असून त्यायोगानें आपल्याहि अंगांत रणमद संचारत आहे असा भास झाल्यावाचून रहात नाहीं.

स्नानसंध्येची शिस्त

रणभूमीवर महिनेच्या महिने शत्रूशीं झुंजतांना ब्राह्मण सरदारांना स्नानसंध्या व नित्यकर्मे करण्यास कसे फावत असेल अशी शंका कोणास येईल. पण प्रकृत स्थळीं हें लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं, त्याकाळच्या ब्राह्मणांची धर्मनिष्ठा दांभिक-पणाची किंवा सोंगढोंगाची नव्हती. जर आपण आपल्या नित्यकर्मास चुकू तर ईश्वराच्या घरीं आपणांस पातक लागेल अशी त्यांची दृढ श्रद्धा असल्यानें ते

स्वकर्तव्यास चुकत नसत. मिरजेच्या पटवर्धन घराण्यांतील वामनराव पटवर्धन सन १७७२ सालीं म्हैसूरच्या स्वारींतून कळवितो, 'आम्ही अरुणोदयीं स्नान-संध्या आटोपून बाहेर निघून चार घटका सहा घटका रात्रपर्यंत आसपास घिरव्या घालून गोटास येत आहो.' (ऐ. ले. सं. खं. ४ था) एकदां रोजच्या उद्योगास लागल्यावर स्नानसंध्येला सवड होणार नाहीं, म्हणून छावणींत पहाटेच स्नानसंध्या आटोपून वामनराव बाहेर पडत असे. इतर ब्राह्मण सरदारांचीहि बहुधा हीच रीत असावी. प्रातःस्नान सर्वजण निग्रहपूर्वक उरकून घेत.

रणांगणावर जर इतकी कडक शिस्त तर स्वस्थतेच्या वेळीं ती अधिकच पाळली जात असेल यांत संशय नाहीं. मराठी राज्यांतील प्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणीस यांची दिनचर्या पुढीलप्रमाणें होती. 'ते नेहमी अरुणोदयाबरोबर उठत. मुखमार्जन वगैरे आटोपल्यावर थोडा वेळ देवाचें नामस्मरण करून नंतर कांहीं वेळ जरूरीचीं तितकीं कामें पहात असत. नंतर स्नानसंध्या पूजा वगैरे नित्य कृत्यांत दोन तास घालवीत. याच वेळी कोणी विद्वान् शास्त्री पंडित वगैरे नवीन आले असतील त्यांच्या तारतम्याने भेटी होत व त्यांची यथायोग्य संभावना होई. इतकें होईतों प्रहर दिवस येई. नंतर ते पालखींत बसून देवदर्शनाकरितां बेलबागेंत जात. तेथे गेल्यावर हातपाय धुवून सोवळें नेसणें होईपर्यंत शहरचे रोजचे वर्दीवाले यांनीं येऊन बाजार जिनसांचे निरख वाचून दाखवावें व शहरांत कांहीं कमजास्ती झालेसी गोष्ट कळवावी. नंतर देवाची सुमारे घटकाभर मंत्रोपचारयुक्त पूजा करून सवडीप्रमाणें एखादा विष्णुसहस्र नामाचा पाठ म्हणत. नंतर ते आपल्या वाडयांत परत जाऊन सुमारे बाराव्या घटकेच्या अमलांत भोजन करीत. भोजनोत्तर विश्रांति घेण्याचा त्यांचा परिपाठ असे. नंतर ते कारभारास बसत. ते सायंकाळचा घटका दिवस राहीतों जाग्यावरून हलत नसत. सरकारी काम आटोपल्यावर दोन घटका विश्रांति घेत किंवा कोठे बाहेर देवदर्शनास जावयाचें असल्यास तिकडे जात. त्यांच्या भरवशाची कांहीं मुत्सद्दी मंडळी होती व त्यापैकीं निरनिराळया असामीकडे निरनिराळीं कामें वाटून दिलीं होतीं त्यांची वर्दी घेणें व विचारपूस करून त्यांस दुसरीं कामें सांगणें हें त्यानंतर दोन तीन घटका होऊन सायंसंध्या कांहीं नियामित स्तोत्रपाठ व उपाहार होत असे. नंतर प्रहर रात्रीपासून मध्यरात्रीपर्यंत गुप्त हेरांनीं आणलेल्या बातम्या ऐकणें, कोणाचीं पत्रें आलीं असतील त्यांचीं उत्तरें लिहिणें, कारभारी मंडळीशीं

खलबत करणें ही कामें होत. यानंतर दीड प्रहर कायती निद्रा घेण्यांत येत असे ' (खरेकृत नाना फडणविसाचें चरित्र] या धर्मनिष्ठेनें प्रमुख मुत्सद्द्यांत व सरदारांत एक कडक शिस्त उत्पन्न झाली. जबाबदारी ध्यानांत येऊन प्रत्येक महत्त्वाच्या विषयाचा गंभीरपणानें विचार करण्याची सवय लागली व कोणतेंहि पत्करलेलें काम टापटीपीनें व वक्तशीर केल्यावाचून त्यांच्या मनाला स्वस्थता वाटेनाशी झाली. राज्याचा भार उचलणारांच्या अंगीं याच गुणांची आवश्यकता असते व त्यालाच दानत हें व्यापक नांव देण्यांत येतें. कांहीं सरदारांत कर्मठपणाचा अतिरेक होऊन त्याचे दुष्परिणामहि दृष्टीस पडत. हा अतिरेक राघोबांत होता. १७६०त सदाशिवराव भाऊ पाणिपतावर गेले असतां दरबारचा कारभार दादासाहेबाकडे आला. त्यासंबंधीं एक पत्रलेखक म्हणतो 'प्रस्तुत दरबारी कारभार दादासाहेबाकडे आहे. दोन प्रहर पावेतो स्नानसंध्या. तृतीय प्रहरी कारभार करणार. लोकांचा परिणाम कसा लागतो ? भाऊसाहेब सर्वज्ञ होते. आता गाठ याशी पडली आहे' [ऐ. ले. सं.] कर्मठपणाचा अतिरेक झाल्यावर सरकारी कामकाजास व्यत्यय यावा व कामे तुंबून पडावी हें ठरलेलें. म्हणूनच पुढें कांहीं प्रसंगावरून माधवराव पेशव्याने त्यास लिहिले कीं उत्तम प्रकारे राज्य करण्यात स्नानसंध्येइतकेच पुण्य आहे.

हिंदु लोक इतके धर्मनिष्ठ किंबहुना धर्मभोळे होते तर मुसलमानांत त्यांचे प्राबल्य विशेष असल्यास नवल काय ? टिपूसुलतान हा कडवा हिंदुधर्मद्वेष्टा. त्याने कैक हिंदूंना मुसलमान केले होते. पण सन १७९१ त इंग्रज, मराठे व निजाम टिपूवर चालून गेले तेव्हां त्या संकटाने टिपू इतका घाबरला कीं, त्याने हिंदू देवता व खुद्द शृंगेरीचे शंकराचार्य यानाहि आळविण्यास सुरुवात केली. यासंबंधींचे वर्तमान हरिपंत फडक्यानी पुण्यास पुढीलप्रमाणें लिहून पाठविले.

' रंगस्वामीपाशी व शिवालयी ब्राह्मण अनुष्ठानास घालून प्रयोग चालविले आहेत. एक ब्राह्मण जलांत मस्तक ठेवून दोन अडीच प्रहर वरते पाय करून अनुष्ठान करीत आहे. बहुत ब्राह्मणाकरवी अनुष्ठाने चालविली. त्यांत कोण्ही भोजन करून कोणी निरशनाचा फराळ करून आहेत. शृंगेरीकर स्वामी यास तेथे नेले आहे. ते उपवास करितात. त्याजकरिता भोजनाविशी बहुत आग्रह केला. त्याणी उत्तर केले जे, भोजनाचा प्रकार ज्या वेळी घडेल तेव्हां करीन. तेव्हां बहुत प्रकारे सांगितले जे, तुम्ही स्वस्थ असावे. द्रव्य पाहिजे

तितके देईन. सर्व यथास्थित करून देईन. याप्रमाणें बोलोन सुवर्णप्रतिमा फार कांहीं एक करून दिल्या. चाळीस सहस्राचा शिधा ब्राह्मणभोजनाकरिता देविला. पट्टणांत दररोज दोन हजार ब्राह्मण भोजन करीत आहेत.' [इ. सं.]

भिक्षुकांची भांडणे

राज्य चालविण्याची जबाबदारी पेशवे, सरदार व मुत्सद्दी यांजवर असल्यामुळें प्रतिपक्षाशी तडजोड करण्याचे प्रसंग वारंवार येऊन त्यांची मनें एकंदरीनें उदार बनत. पण भिक्षुकवर्गाचे तसें नसे. त्यांच्यांत ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी, तैत्तिरीय, वाजसनीय अशा प्रकारचे पोटभेद असून त्यांच्या दरम्यान मोठेपणाविषयीं अहमहमिका लागून तट पडत, मारामाऱ्या होत व ग्रामण्येंहि माजत. त्यांच्या या क्षुद्र मनोवृत्तीमुळें क्षेत्रांतील जीवितक्रम किती कुत्सितपणाचा बनत असेल व त्याची परस्थाना कशी कींव येत असेल याची कल्पना आजच्या काळांतहि कांहीं क्षेत्रांची अवस्था पाहून करता येण्यासारखी आहे. ही यादवी राज्यकर्ते आपला अधिकार चालवून मोडीत, तेव्हांच काय तो सलोखा नांदू लागे. भिन्न शाखांचे वैदिक एकत्र जमले असता ऋग्वेद्यानी मंत्र म्हणण्यास सर्वांच्या आधीं सुरुवात करावी, असा रिवाज असला तरी इतर शाखीयाना तो अपमानच वाटत असे. पेशवाईंत नाशिक क्षेत्री एकदा प्रयोजन झाले. त्यास सर्व शाखांचे ब्राह्मण जमले होते. मंत्र म्हणण्याचे वेळी रीतीप्रमाणें ऋग्वेदी ब्राह्मणानी आरंभ केला. त्यांच्या मागून तैत्तिरीय ब्राह्मणानी म्हणण्यास सुरुवात केली. मग वाजसनीयांची पाळी आली. तेव्हां वाजसनीय तो अपमान समजून इतराशी मारामारीवर आले. त्याचा परिणाम असा झाला की, ऋग्वेदी प्रभृति समस्त ब्राह्मणानी समापत्र करून वाजसनीयाबरोबर अन्नव्यवहार बंद ठेवला. अशी नाशीक क्षेत्रीं स्थिति असता भाऊसाहेब पेशवे तेथे यात्रेकरिता आले. त्याना सर्व ब्राह्मणांची पूजा करावयाची होती. त्यास वरील भांडणामुळे अडचण उत्पन्न झाली. म्हणून तेथील ब्राह्मणानी केलेली समापत्रे स्वतःपाशी ठेवून घेऊन श्रावणमासी देशोदेशीचे ब्राह्मण पुण्यास जमतील तेव्हां त्यांजपुढें हा विषय मांडून त्याचा निकाल लावू असे त्यांनीं आश्वासन दिले. त्याप्रमाणें श्रावणांत ब्राह्मण जमल्यावर त्यांची सभा करण्यांत आली. सभेस काशीपासून रामेश्वरापर्यंतचे महाराष्ट्र, तैलंग, कानडे व द्रविड ब्राह्मण हजर होते. त्यानी भागवत, विष्णुपुराण, चरणव्यूह इत्यादि

ग्रंथ पाहून शास्त्रनिश्चय सांगितला तो असा–प्रथम मंत्र ऋग्वेद, द्वितीय मंत्र तैत्तिरीय शाखा, तदनंतर वाजसनीय व कात्यायन, त्यानंतर सामवेदी व अथर्ववेदी. हा अनादि शिष्टाचार असल्यामुळें त्याप्रमाणें त्र्यंबकेश्वर व नाशीक येथील ब्राह्मणानी वागावे अशी आज्ञा नानासाहेब पेशवे यानी (सन १७५१) केली. (पे. द. ४३)

स्त्रियांचा धर्मभोळेपणा

पुरुषांपेक्षां स्त्रिया जास्ती कर्मठ व धर्मभोळया. त्यांची समजूत कोती असल्यामुळें पदरच्या भिक्षुक ब्राह्मणांनीं धर्माच्या नांवाखालीं त्यांस जें कांहीं करावयास सांगावें त्यास श्रीमंतांच्या घरच्या स्त्रियांची तयारी असावयाची. याचें एक कारण असें कीं प्रपंचाचीं कामें नोकरचाकरांकडून झाल्यानें फुरसत फार. तशांत सदर स्त्रिया विधवा असल्यावर बोलावयासच नको. बऱ्याचशा प्रपंचांतून मोकळ्या झालेल्या या स्त्रियांना व्रतें–उद्यापनें या शिवाय शरीर व मन गुंतविण्यास अन्य साधनच नसे. राघोबादादा स्वतः कर्मठ, तेव्हां त्यांच्या पत्नीस तेंच वळण न लागावें तर दुसरें कोणतें लागावें ? नवऱ्याच्या पश्चात् कोपरगांवी असतां तिनें तें वळण स्वतः चांगलें गिरवून आपल्या नजेरखाली बाजीराव, चिमणाजी, अमृतराव या लहानाच्या मोठ्या होत चाललेल्या पुत्रांनाहि लावलें. राघोबा मृत्यू पावल्यावर कारभाऱ्यांनीं आनंदीबाईस कोपरगांवातच ठेवून तिच्या खर्चाकरितां सालीना दोन लाख रुपयांची नेमणूक करून दिली होती. तिच्यावर देखरेख केसो महादेव व अप्पाजी राम सहस्रबुद्धे हे ठेवीत. त्यांनीं आनंदीबाईच्या सर्व बारीक मोठ्या हालचालींची व भाषण–संभाषणांचीं हकीकत नाना फडणविसास कळवावी. त्यांनीं ता. २ आक्टोबर सन १७८७ पासून वेळोवेळीं लिहिलेल्या पत्रांतून पुढील मजकूर आहे. ' आनंदीबाई रोज भविष्योत्तर पुराण श्रवण करीत होती. त्यांत (पुराणांत) नानाप्रकारचीं व्रतें निघतात. त्याचा उपक्रम करावयासी करीत आहेत. सायंकाळी नित्य शुक्रेश्वरीं नाटकशाळा आणून गाववीत आहेत. सवासणी बायका कोपरगांवच्या वगैरे मिळोन नित्य एक दोन. शिवाय व्रतें वगैरे उगेच नांव सांगोन दहापांच बायका दोन चार दिवशीं भोजनास आणवीत आहेत. ' (ता. २ आक्टोबर १७८७ रोजीं) कपिला षष्ठींचे दिवशीं अमृतराव व आनंदीबाई यांनीं दान दिलें, त्यांत सोन्याचें (गाईचें)

शिंग, रुप्याचे खूर व गाईची किंमत ८॥ रु. दिली...सुभाभट तेलंग यांनीं शुक्रेश्वरास ११००० प्रदक्षिणा घातल्या व बाईंनीं विष्णुसहस्रनाम सहस्र आवर्तन व शिवसहस्रनाम सहस्र आवर्तन केलें याबद्दल गोप्रदान केलें.'

सोंगाड्यांचा भ्रष्टाकार

अशा प्रकारच्या व्रतवैकल्याच्या व ब्राह्मणभोजनांच्या उद्योगांत अकस्मात् भलतीच बिलामत गळयांत यावी. जेवण व दक्षिणा फक्त ब्राह्मणांनाच मिळते असें कळल्यावर कांहीं लुच्च्या लोकानी ब्राह्मणाचें सोंग घेऊन फसविण्याचाहि प्रयत्न करावा. तसला प्रकार आनंदीबाई कोपरगांवास असतां घडल्याचे वृत्त आप्पाजी राम सहस्रबुद्ध याने नाना फडणविसास ता. १८-१०-१७८८ रोजी कळविले. 'कोपर गांवाचे बागेत उभयता श्रीमंत वगैरे मंडळी झाडून आवळी भोजनास गेले. तेथे एक, संन्याशाचे सोंगाने भोजनास आला. समय पाहून भोजनास घेतला. तों त्याचे चिन्ह कांहीं ब्राह्मणाचे नव्हे. सोंगसे दिसोन आले. मग समय भोजनाचा याकरिता पंगतीभेद करून पात्र ठेविले. भोजनास बसला तो चिलावली घातल्या नाहींत. त्याजवरून पुसो लागले तो मौन्य जाहला. कांहीं बोलेना. मग भोजनोत्तर बरोबर माणूस देऊन घेऊन आलो. चौकशी करतां कानास चाप लावले, व जेरबंद मारिले. तो कबूल जाहला कीं, 'मी कोष्टी मौजे लासणगांव परगणे चांदवड येथील. पोटाकरितां सोंग केले.' त्याजवरून त्यास बिडी घालून ठेवला आहे. व श्रीमंत सुद्धां झाडून मंडळी संसर्गदोष जाहला म्हणून येक दिवस उपोषण करून छ. १७ रोजीं प्रातःकाळी पंचगव्य घेऊन भोजन केले. हाली त्याची चौकशी करावयाकरिता मौजे लासणगांवी माणसे पाठविली आहेत. नंतर काय चौकशीने ठरेल ते स्वामीस लिहून पाठवीन (पे. द. ४३)

सांप्रत विशिष्ट मुदतीपर्यंत नोकरी झाल्यावर नोकराला पेन्शन म्हणजे बैठा तनखा देण्याचा हल्ली सरकारी नियम आहे. तसा नियम पेशवाईत नव्हता. बहुतकरून सेवानिवृत्त होणाऱ्या नोकराच्या पुत्राला किंवा आप्ताला त्याची असामी देऊन त्याच्या कौटुंबिकांचे योगक्षेम चालविण्याची तजवीज करण्यांत येई व नोकराचें समाधान राखले जाई. पण जे धार्मिक प्रवृत्तीचे चाकर असत व ज्यांना उरलेले आयुष्य क्षेत्री राहून ईश्वराराधनेंत घालविण्याची इच्छा असे त्यांना पेनशनासारखा बैठा तनखा दिल्याचाहि दाखला सांपडतो. 'हरि उमाजी

कारकून शिलेदार नेहमीं श्रीकाशीमध्यें रहावयास जातात. सबब तेथें त्यांनीं स्नानसंध्या करून असावें, चाकरी कोणाकडे करूं नये, कोणे घालमेलींत पडूं नये येणेंप्रमाणें करार करून त्यांस सालीना नेमणूक तीनशे रुपये करार केले असेत.' (पे. डा.) सरकारी नोकर अशक्त झाला व त्याच्या नित्यनियमास व्यत्यय येऊं लागला तर त्यास भत्ता देऊन त्याच्या मार्गातील अडचण सरकार दूर करीत असे. कृष्णास्नानास दररोज कोस दोन कोसांवरून जाण्याचा नियम पुष्कळांचा पूर्वी असे व हल्लींहि क्वचित् आहे. 'सातान्याच्या किल्ल्यावरील अधिकारी दामोदर गणेश निसवत त्रिंबकराव विश्वनाथ यांचे शरीर अशक्त झाले. कृष्णास्नानास जाववत नाहीं. सबब एक घोडी व पोरगा ठेवण्याबद्दल दरमहा ७ रु. मंजूर ' (पे. डा.)

अग्निहोत्र

अग्निहोत्र घेणारे ब्राह्मण पुष्कळ असत. अग्निहोत्रास नित्याचा खर्च व इष्टीसारखा नैमित्तिक खर्च बराच येतो. तो खर्च स्वतःच्या पदरचा करण्याची शक्ति भिक्षुकवर्गात स्वाभाविकच नसते. त्यांना संस्थानिकांनीं मदत करण्याची वहिवाट अद्यापिहि थोडथोडी आहे. ही वहिवाट पेशवाईतील पद्धतीचा अवशेषच होय. हें द्रव्यसहाय्य करण्याचा उद्देश अग्निहोत्रासारखी पुरातन धार्मिक संस्था चालविण्याचाच होता. अशा प्रकारचे अग्निहोत्री कृष्णा व गोदावरी यांच्या कांठच्या क्षेत्रांतून रहात असून त्यांना पेशव्याकडून मासिक अगर वार्षिक नेमणूक मिळत असे. ' वेदमूर्ति मुकुंद जोशी अग्निहोत्री नाशिककर यांस तीन असामीचा कोठींतून शिधा पावतो. त्यांस शाकभाजी वगैरे साहित्याबद्दल पांच रुपये दरमहा देत जाणे. ' अग्निहोत्र्यांना जर मदत होत असे तर यज्ञ करणारांना ती आवश्य होत असेल हें सांगावयास नकोच. ' शंकर भट सुरकर उपनांव लोकाक्षी हे मौजे सावखेडे गंगातीर येथे यज्ञ करणार. त्यांस यज्ञाचे साहित्याकरितां ६०० रु., गाई ७, वृषभ ५, दोन हजार असामींचा शिधा व सोमवेलींचे गाडे दोन देणें ' (पे. डा. सन १७६५-६६) या यज्ञाची सर्व हमी पेशव्यांनींच घेतल्याचे दिसते. याचप्रकारचें आणखी एक उदाहरण, ' वीरेश्वर दीक्षित यज्ञ करणार होते. त्यांस चार हजार ब्राह्मणांचे साहित्य, सामग्री पुर्णाच्या पोळ्याची, पानपत्रावळ, यज्ञाची कुंडे व मंडप करून देण्यास विसाजी कृष्ण जोग यांस आज्ञा. '

सेवेकरी व उपासक

परीक्षा नापास झाली म्हणून जीव देणारे विद्यार्थी हल्लीं मधून मधून आढळतात. तत्कालीन कित्येक लोकांचें मन केवळ पारमार्थिक विचारांत गढून गेले असल्यानें त्या प्रकारचा आततायीपणा त्यांच्या हातून घडे. ईश्वरप्राप्तीकरितां जिवावर उदार होणें, रोगानें किंवा इतर आपत्तीने इहलोक नकोसा झाल्यास देहत्याग करणें, इष्टकामनासिद्धीसाठीं अन्नत्याग करून देवाजवळ धरणें धरणें व अनेक प्रकारच्या शारीरिक हालअपेष्टा सोसून ईश्वरोपासनेंत आयुष्य घालविणें अपूर्व नव्हते. प्रसिद्ध क्षेत्रे व देवस्थानें यांत दूरदूरचे सेवेकरी यासाठीं मुद्दाम येऊन रहात. अशा प्रकारचे सेवेकरी किंवा विद्यार्थी सुधागड पेठ्यांतील पाली येथील श्रीबल्लाळेश्वरच्या सेवेला राहिले होते. त्यांचा शेवट खेदजनक झाला. ‘ श्री बल्लाळेश्वर कसबे पाली येथील विद्यार्थी यांनीं जिव्हा वाहिल्या. यास्तव अर्चा-शुद्ध करावी म्हणोन देवानें दृष्टान्त दिला. अर्चा शुद्ध याकरितां दोनशे ते चारशे रुपयेपर्यंत सरकारांतून खर्च मंजूर झाला. ’ दुसरा जलसमाधीचा प्रकार. ‘ वडगांव, देऊळगांव, शिदापूर तर्फ पाटस या गांवची पाटिलकी छत्रपति स्वामी यांची. त्यांचा गुमास्ता बाबूराव आप्पाजी यानें गोदावरींत जलसमाधि घेतली. ’ कोणी उपासक केवळ दुग्धप्राशन करून रहात. कोणी धूम्रपान करीत, कोणी नमस्कार घालीत, कोणी धरणें धरीत. त्यांजवरहि पेशव्यांची कृपादृष्टि असे. ‘ महिपतराव जगन्नाथ कमाविसदार परगणे नाशिक यांस सनद कीं, जयनभदास बैरागी दुधाधारी (दुग्धाहारी) हा बैरागी ब्राह्मण स्नानसंध्या करून सुकर्म करीत असेल आणि निराहार करीत असेल याची चौकशी करून दररोज दोन शेर दूध त्यास देत जाणे. ’ हा धर्मादाय करतांना ढोंगी व लुच्चया लोकांचे फावूं नये यासाठीं विशेष काळजी घेण्यांत येत होती हे लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ‘ धूम्रपानी गोसावी ८४ आसनें करीत असतो. त्यास एकमहा वीस रुपये आनंदवल्लीपैकीं देत जाणे. याशिवाय पांच शेर लाकडें (धूम्रपानाकरितां) दररोज देत जाणें. ’ ‘ पंच हजारी ब्राह्मण यास नेहमी दररोज बाराशे नमस्कार घालण्याची नेमणूक असून ब्राह्मणास दररोज देणेची नेमणूक बितपशील दररोज रुपये दोन दूध दोन शेर. ’

पंढरपूर, नाशीक,, पैठण वगैरे धर्मक्षेत्रांचा महाराष्ट्रीयांना फार अभिमान

वाटत होता. त्या क्षेत्रांचा मराठ्याकडून उच्छेद होणें, ही गोष्ट विपरीत व अनुचित असल्यानें इतरांच्या अंगाचा तिळपापड होऊन ते अशा मनुष्याची तुलना मोगलाशी करीत. रामचंद्रराव जाधव मराठा सरदार १७६२ त पेशव्यांचा पक्ष सोडून निजामअल्लीस मिळाला होता. त्यानें त्या सालीं पंढरपुरास राहून ब्राह्मणास उपद्रव केला. त्याबद्दल गोविंद हरि पटवर्धन लिहितो ' जाधवराऊ याणें मोगलाई मांडली. हिंदुधर्म सोडून यवनांचा धर्मप्रारंभ मांडला. याचें कल्याण कोणे रीतीनें होणार ? श्रीपंढरी क्षेत्रास चांडाळानें अरिष्ट केलें. मोगलापेक्षां अधिक झाला ? (ऐ. ले. सं.) असले अपवाद सोडल्यास स्वधर्मरक्षणास स्वराज्य हाच तोडगा याविषयीं महाराष्ट्रीयांची बालंबाल खात्री पटली होती. वृक्षाला जीवन जसें त्याच्या मुळ्यामधून मिळते, तशींच धर्माचीहि अवस्था आहे. धर्माचा वृक्ष स्वराज्यांत रुजला असला म्हणजे तो कसा नाना रीतींनीं पोसला जातो याचे किती तरी दाखले आतांपर्यंत वर दिले आहेत. स्वराज्याची ही उपयुक्तता जे लोक मराठी राज्यांत नव्हते त्यांना पदोपदी जाणवून आपण स्वराज्याच्या सावलीखालीं कधी येऊं असें त्यांस होऊन गेले होते. पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपर्यंत पोर्तुगीजांचा अमल वसई प्रांतीं बराच पसरला असून त्यांच्या गांजणुकीनें प्रजा जर्जर झाली होती. गंगाजी नाईक साळोखी जात पाठारे याने सातान्यास जाऊन शाहू महाराजास पुढीलप्रमाणे विनंति केली ' वसई प्रांत फिरंगी याजकडे आहे. त्यानें देवस्थानें व तीर्थे यांचा व महाराष्ट्र धर्म यांचा लोप केला. हिंदु लोक भ्रष्टवून क्षार केले. आपण पुरातन वतनदार, देशनाड गौडपणाचें वतन होतें. तें फिरंगी यांजकडे प्रांत झाल्यापासून चालू देत नाहींत, म्हणून कल्याण प्रांतीं येऊन राहिलो. पुढें कै. आप्पा खासा यांनीं येऊन प्रांत मजकूर सोडवून स्वराज्य केलें, त्याजमुळें स्वधर्मस्थापना होऊन देवधर्मादिक चालते केले. ' गंगाजी नाईकास हिंदुधर्म व महाराष्ट्र धर्म यामधील सूक्ष्म भेद कसा कळत होता व स्वराज्यावाचून धर्मरक्षण नाहीं, हें कसें पक्कें उमजलें होते याची यथार्थ कल्पना वरील विनंतीवरून येते.

शंकराचार्यांचा अधिकार

स्वराज्य चालविणाऱ्या लोकांची मनें मोठीं असतात व दृष्टि व्यापक असते. एखाद्या गोष्टींत चूक झाली असल्याचें त्यांस पटतांच ती दुरुस्त

करण्यास ते भीत नाहींत याची थोडीशी चुणूक खालील उदाहरणांत आढळते: 'आप्पाजी चिमणाजी देहाडराय यजुर्वेदी ब्राह्मण वस्ती कसबे पुणतांबे उमर वर्षे २० यास कांहीं भ्रम झाला. तो साताऱ्यास गेला. तेथे बनसीपुरी याजकडील गोसाव्याकडे जाऊन त्यांनी डोकें बोडून गोसावी केला. १५ दिवसांनीं शुद्धीवर आला. पुण्याच्या ब्राह्मणानीं त्यास चांद्रायण प्रायश्चित्त सांगितलें. तसें प्रायश्चित्त त्यास देण्याविषयीं पुणतांबे, टोके व प्रवरासंगम या क्षेत्रांतलि ब्राम्हणांस पेशव्यानी कळविले आणि त्याबद्दल दोनशे रुपयेपर्यंत खर्च सरकारांतून देण्याचे कबूल केले' देहाडराय या खासगी व्यक्तीकरितां पेशव्यानी इतके प्रयत्न करण्याचे ठरविले याचे कारण स्वधर्मीयाविषयीं त्यांचे ठिकाणी बसणारी ममत्वबुद्धि याशिवाय दुसरे कोणते असणार? या बाबी राज्यकर्त्यांच्या हुकमतीतील होत. श्रीशंकराचार्यांच्या हुकमतींतील नव्हत हा तत्कालीन समजहि लक्षांत घेण्यासारखा आहे. पटवर्धनासारखे सरदारहि धर्मसंबंधीं शासनाचा अधिकार आपला असें समजत होते, मग पेशवेहि तसे समजत असतील तर त्यांत नवल काय? पटवर्धनाच्या हद्दींत हिंगणगावी तेथील कुळकर्ण्याचे एका ब्राह्मणाशी भांडण होऊन त्यांत त्याने त्या ब्राह्मणास काठ्यानी मार दिला. त्या माराखालीं ब्राह्मण मेला, तेव्हां सरकारी अधिकाऱ्यानी कुलकर्णी व त्याचा बाप याना राज्यांतून घालवून देऊन त्यांची जिनगी व वतन, ब्रह्महत्येबद्दल शिक्षा म्हणून जप्त केले. कुळकर्ण्याच्या घरांतील सगळीच माणसे सरकारानें बहिष्कृत ठरविली. त्याबरोबर त्याची पत्नीहि बहिष्कृतच गणली गेली. वस्तुतः आपला गुन्ह्याशी संबंध नाहीं, असे वाटून ती बाई शंकराचार्यांकडे गेली व तिनें आपली शुद्धता होण्याविषयीं आचार्यांपाशीं विनंति केली. आचार्यांनीं शुद्ध करून तिला तीर्थप्रसाद दिला व गांवकरास आज्ञापत्र पाठवून तिच्याशीं पूर्ववत् ज्ञातिव्यवहार सुरू करण्याविषयीं कळविले. परंतु आचार्यांचे हे आज्ञापत्र परशुरामभाऊ पटवर्धन व गंगाधरराव बाळासाहेब पटवर्धन यांनीं न मानल्यामुळें गांवकऱ्यांनी तिला तसेच बहिष्कृत ठेवले. (ऐ. ले. सं. खं. ८) या पुराव्यावरून एक सिद्धान्त स्पष्ट होतो तो असा कीं, राजा स्वधर्मीय असला म्हणजे धर्मसंबंधीं निर्णय देण्याचा शेवटचा अधिकार त्याचाच. आद्य शंकराचार्यांनीं बौद्धमताचे खंडन करून वैदिक धर्माची स्थापना केली, या कामगिरीबद्दल त्यांच्या पीठाला वैदिक धर्माभिमान्यानी मान दिला पाहिजे व तो पेशवे वगैरे हिंदु

राज्यकर्ते देतहि असत. परंतु धर्मविषयक निर्णयाची सत्ता त्यांनीं आपल्याकडेच ठेवली होती. मात्र सदर निर्णय ते क्षेत्रांतील विद्वान् व अधिकारी ब्रह्मवृंदाकडून करवून घेत व आपण राज्यकर्ते या नात्यानें त्यास मान्यता देऊन तो अमलांत आणीत. शंकराचार्यापेक्षां लोकव्यवहाराशीं राज्यकर्त्यांचा संबंध निकट असल्यानें त्यांस कालदेशवर्तमानाचा विचार करून इष्ट काय व अनिष्ट काय हे ठरविण्याची पात्रताहि अधिक असली पाहिजे, यांत संदेह नाहीं. मग शंकराचार्यांच्या पीठाची समाजाला आवश्यकता काय असा प्रश्न शिल्लक उरतो. त्याचे उत्तर हेंच कीं, मराठी राज्यापूर्वी सुमारे साडेतीनशे वर्षें महाराष्ट्रांत स्वराज्य नव्हते व मराठी राज्यानंतरहि सुमारें सव्वाशे वर्षांत स्वराज्य नाहीं; या अवनतीच्या काळांत ठिकठिकाणच्या ब्रह्मवृंदाना आज्ञापत्रें सोडून व धर्माधर्माचा निर्णय देण्यास विशिष्ट ठिकाणचे ब्रह्मवृंद असमर्थ असल्यास त्यास आपल्या पदरच्या अधिकारी विद्वानांनीं सांगितलेला निर्णय कळवून धर्मरक्षण कसेंबसें चालू ठेवणें हें कार्य आचार्यांचें पीठ करीत आल्याचें दिसून येतें.

आचार्यांच्या पीठाचें हें महत्त्व पेशव्यास अवगत असल्यानें ते पीठास हरतऱ्हेची मदत करीत व त्यांचा मान राखीत. शृंगेरीच्या पीठावर अनेक आचार्य होऊन गेले. त्यांपैकीं एका आचार्यांनीं मुक्काम पंचवटी कसबे नाशीक येथें देह ठेवला. त्या बाबतींत नाशीकच्या अधिकाऱ्यास पेशव्यांनीं पुढीलप्रमाणें आज्ञापत्र पाठविलें. ‘श्रीशंकराचार्य स्वामी शृंगेरीकर यांची समाधि पंचवटी कसबे नाशीक येथे आहे. त्यास जागा समाधिसन्निध पूर्वेस ४० गज व पश्चिमेस ६० गज देण्यांत यावी. ती जागा पुजारी यांची आहे. तरी त्यांस त्या ऐवजीं दुसरी जागा देऊन चालविणें’ [पे. डा.] लँड ॲक्विझिशन ॲक्टाप्रमाणें सरकार एखाद्या सार्वजनिक कार्याकरितां कोणा व्यक्तीच्या खाजगी जमिनीचा कबजा घेते व सदर जमिनीच्या मालकास नुकसानभरपाई म्हणून रोख रक्कम देवविते. तेंच तत्त्व पेशव्यांच्या वरील हुकुमांत गोवलेलें आहे. त्यांनीं पुजाऱ्यांस पैसा न देतां त्यास हवी असलेली जमीन मोबदला देऊन त्याची अधिक सोय पाहिली हा फरक. पेशव्यांच्या राज्यांत संकेश्वराच्या शंकराचार्यांचा एकच मठ होता असें नाहीं. निरनिराळ्या पंथांच्या आचार्यांचे मठ होते व त्यातील विशिष्ट मठाचा अभिमान धरून इतर मठांविषयीं पक्षपात न करता ते सर्वांकडे कसे समदृष्टीनें पहात हें पुढील उदाहरणावरून लक्षांत येणार आहे. ‘ श्रीमत् परम-

हंसाहि श्रीपूर्णानंदसरस्वती व श्रीरामानंद सरस्वती स्वामी मठ कवळे व खानापूर यांस भिक्षेस मौजे मळेवाडी हा गांव कै. नानासाहेब (पेशवे) यांनीं इनाम करून दिला. तो परंपरागत चालल्यानें राज्यास श्रेयस्कर म्हणून इनाम करून दिला असे ' (पे. डा.)

धर्मांतर

स्वधर्मांतल्याच पण अन्य जातीयाशी निषिद्ध कर्म घडले असतां प्रायश्चित्तानें मनुष्यांची शुद्धि होत असे. पण एखाद्याचे धर्मांतर झाल्यास त्यावेळीं राज्यकर्त्यांना बराच विचार पडे. ' पुताजी बिन मुधोजी वाडघर चौगुला कसबे जिंती तर्फ चांभारगोंदे हा देवळाजी सोमवंशी याजबरोबरच्या सैन्यांतून सुरतेस गेला. तेथें मोगलांच्या हाती सांपडून तो भ्रष्ट झाला. तो मोगलाच्या छावणीत एक वर्षभर होता. बाळाजी पंतप्रधान दिल्लीहून येत असतां पुताजी त्यांच्या सैन्यात दाखल होऊन आपल्या गांवीं आला. त्याने घडलेली हकीकत गोताला कळविली. त्यांनीं त्यास जातींत घेण्याचे ठरविलें. चांभारगोंदे, राशीन व इतर गांवें येथील पाटलानी हा जातीचा निकाल राजाला (शाहू) कळविला. व त्याची तसे करण्यास परवानगी मागितली. राजाने त्यांस आज्ञा केली कीं, शास्त्रास अनुसरून प्रथम शुद्ध करून घ्यावे व मग जातीत घ्यावे ' (पे. द. १)

पुताजीस थोडे दिवसच परधर्माचा संसर्ग झाला होता. परंतु ज्यांची पुष्कळ वर्षे परधर्मांत गेली त्याना मात्र शुद्धीचा मार्ग अगदीं बंद असे.

' खरगोण बत्तिशी या भागांतील कुकशी येथील दोघे ब्राह्मण पीरजादे याचे शिष्य झाले होते व त्यांचे यावनी मार्गानें चालत होते. हा क्रम त्यांच्या घराण्यांत पूर्वी शंभर वर्षे चालत आला होता. माणसे मेल्यावर त्यांना अग्निदहनादि संस्कारहि होत नसे. असें असतां हरिराम व नंदराम फघडे या दोन ब्राह्मणांनीं पुढें होऊन व आपल्या पक्षास पन्नास घराना ओढून त्यांना पंगतीस घेतले. त्याबरोबर गांवांत दोन तट पडले. दुसऱ्या तटांतील ब्राह्मणांनीं घडलेली हकीकत पेशव्यांना कळविली. यावनी मार्गाने वागणाऱ्या दोघा ब्राह्मणांची ब्राह्मणसमाजांत येण्याची तीव्र इच्छा लक्षांत घेऊनच त्यांची कुचंबणा दूर करण्याचा मार्ग वरील प्रकारे अनुसरला होता. पेशव्यानें या बाबतींत कोणताच आग्रह न धरता नागर वगैरे ब्राह्मण जातींतील शास्त्रसंपन्नाना शास्त्रार्थ पुसून

शास्त्रमत असेल त्याप्रमाणें आज्ञा करण्यास मल्हारराव होळकर यांस लिहिलें. (पे. द. ४३ ता. १२-५-१७६४) हा मुलूख महाराष्ट्राबाहेरचा व मल्हारराव होळकराच्या ताब्यांत दिलेला होता.

पाणिपतच्या गर्दीत बरेच ब्राह्मण व मराठे आदिकरून महाराष्ट्रीय यवनांच्या हातीं लागले व स्वधर्मापासून च्युत झाले. त्यांचे सामाजिक दृष्ट्या जीवित कसे कष्टमय झाले असेल याची कल्पना आतां करतां येण्यासारखी आहे. कोणा नरहरी रनाळेकर नामक ब्राह्मणास यवनानी धरून नेऊन भ्रष्ट केले होते. पुढें सन १७७२ पर्यंत म्हणजे जवळजवळ एक तपभर तो यवनांत राहून यवनमयच झाला होता. त्याची दया येऊन पैठणच्या कांहीं ब्राह्मणांनीं त्याला शुद्ध केलें. या कृत्यास विरोधी असा दुसरा पक्ष होताच. त्यानें ही खबर पुण्यास दिली. तेव्हां पेशव्यांनीं वैदिक व पंडित यांची सभा करून दहा बारा वर्षे यवनमय झालेल्यास शुद्ध करून घेतां येत नाहीं असा निर्णय दिला व त्याबरहुकूम ज्यानी नरहरीस शुद्ध केले होते त्या पैठणकर ब्राह्मणावर बहिष्कार घातला. त्या ब्राह्मणपैकीं बहुतेकांनीं प्रायश्चित्त घेतले; पण बाकीचे चाळीस पन्नास ब्राह्मण प्रायश्चित्त न घेतां तसेच बहिष्कृत राहिले. पुढें पैठणावर अंमल मोगलाचा बसला तेव्हां मोगलाकडील कमाविसदारानें बहिष्कृतांचा पक्ष घेऊन जबरदस्तीने सर्व ब्राह्मणांची पंगत एक करून एकंकार केला. अशा स्थितींत पेशव्यांना पैठणच्या कारभारांत हात घालता येत नसल्यामुळें तेथील ब्राह्मण अहमदनगरास येतील तेवढ्यांचाच बंदोबस्त करण्याचे ठरवून त्यांना अहमदनगरच्या ब्राह्मणांनीं पंक्तीला घेऊं नये अशी ताकीद दिली (पे.द.४३ता. २४।८।१७७२). या नरहरीचा चुलतभाऊ नारो यशवंत म्हणून होता. त्याचाहि नरहरीशीं पंक्तिव्यवहार झाला होता. म्हणून रामशास्त्री प्रभुणे यांनीं आज्ञा करून त्याजकडून नरहरीचा घटस्फोट करविला व त्यास प्रायश्चित्तार्थ श्रीत्र्यंबकेश्वराच्या दहा कोसांच्या १२१ प्रदक्षिणा घालण्यास त्र्यंबकेश्वरी पाठविला. (पे. द. ४३).

शास्त्रीबुवा फार कडक. शास्त्राला सोडून तिळमात्रहि वागावयाचे नाहीं असा त्यांचा कटाक्ष. त्यांनी नरहरीच्या चुलतभावास वरीलप्रमाणें प्रायश्चित्त सांगितलें व ते त्यानें घेतले. पुढें नरहरीच्या पत्नीने काय करावें हा प्रश्न शिल्लक राहिला. तिने शास्त्रीबुवास त्याप्रमाणें विनंति केली असतां कृष्णातीरीं वाईस

तिचाहि घटस्फोट करावा असा निकाल सांगण्यांत आला. (पे. द. ४३) अर्थात् तिचा पत्नीत्वाचा संबंध घटस्फोटानंतर तुटला.

कन्यादान

कन्यादानाचें पुण्य फार समजलें जाई. स्त्रियांच्या लग्नांना विघ्नें फार या दृष्टीनें त्यांत तथ्यांशहि आहे यांत शंका नाहीं. विशेषेकरून गरिबांच्या पोरींचीं लग्नें लागणें किती अवघड जातें याची कल्पना ज्यांस आहे त्यांना लग्नाचें महत्त्व कळून येणार आहे. म्हणूनच श्रीमंत लोक धर्मार्थ लग्नें लावण्याचें पुण्य जोडीत. अशा लग्नांची वर्दळ पेशव्यांना सर्वांपेक्षां अधिक लागावी हें स्वाभाविक होय. गरिबांच्या लग्नाची सर्व जोखीम नेहमींच ते आपल्या शिरावर घेत असें नाहीं; तर मुलीच्या बापाला कांहीं रक्कम बक्षिस देऊनहि मोकळे होत. त्यांनी ' किल्ले विसापूर (मावळ) येथील हवालदार येवजी लोंबट याच्या कन्येच्या लग्नासाठीं दोनशें रुपये बक्षिस दिले. ' (पे. डा.) तुळेचे द्रव्यदान करतांनाहि नानासाहेब पेशव्याचे हे धोरण असे.

राजश्री बाबूराव राम स्वामी गोसावी (फडणीस) यांस नानासाहेबांचे पत्र-' तुळेपैकीं मोहरा पांच हजार रुपयांच्या सुमारें ३२७ स्वार दिमत बहिरजी बाबर याजबरोबर पाठविल्या आहेत. तर गरीब अनुत्पन्न असे व असेच असोन ज्याचे घरीं लग्नमुंज इत्यादिक प्रयोजन ज्यास कर्तव्य असेल असे ब्राह्मण पुण्यास असतील ते अथवा आसपास जे आढळतील त्यास शंभर रुपयेपर्यंत एकास याप्रमाणें धर्मादाय करणें. ' या पत्रांतील खुद्द नानासाहेबांच्या हातची पुढील अक्षरे आहेत. ' केवळ दरिद्री पाहून लग्न-मुंजीस देणे हे विनंति. त्याची नांवनिशी पाठविणें. वैशाख शुद्धास वाटणें म्हणजे वद्य पक्षांत लग्नें होतील, खरेखुरे लग्न होत, नाहीं, हे तहकीक करून देणें हे विनंति. ' (पे. द. १८)

गंगोदकाचे पावित्र्य

गंगोदकाइतकी पवित्र वस्तु त्याकाळीं हिंदुमात्राना दुसरी नव्हती. गंगेचे दर्शन बहुतेकांना दुर्लभ. म्हणून गंगोदक कोणी घेऊन आल्यास त्या गंगोदकाचे सेवन आदरपूर्वक सर्वांकडून होई व ते आणणारांची द्रव्य देऊन संभावना कर-

ण्यांत येई. या पवित्र भावनेची खात्री खालील पत्रावरून पटते. हें पत्र सन १७५३ मध्यें राधाबाई पेशवे नानासाहेबाची आजी हिने त्यास लिहिले आहे. ‘ दयाराम पुरोहित गड मुक्तेश्वर यानी गंगोदकाच्या कावडी सुमारें ५ पाठविल्या त्या आम्ही येथें घेतल्या. त्याचे पत्र आले ते व अजुरदार ऐसे पाठविले आहेत. तेथें आपण त्यांची बिदागी करावी. ’ (पे. द. १८)

आधी गुलाबपाणी प्रिय, त्यांतून ते गंगोदकाचें व ब्राह्मणाकरवीं पाठविलेले फारच प्रिय. असले गुलाबपाणी पहिल्या बाजीरावाने मागविले होते. त्यास सागर येथून बाळाजी गोविंद बुंदेले याने लिहिले ‘ आज्ञापत्र सादर जाले. तेथें आज्ञा कीं, गुलाबपाण्याचे प्रयोजन आहे. तरी दोन मण ब्राह्मणोदक श्री भागिरथीचे उदकाचे करवून ब्राह्मणासमागमे पाठविणें म्हणोन. ऐशीयास आज्ञेप्रमाणें गुलाब करविला आहे. मागाहून पाठवून देऊं. ’ (पे. द. १८) बाजीरावाची गंगोदकावरील भक्ति खालील पत्रातूनहि प्रतीत होत आहे.

हे पत्र बाजीरावास काशीहून सदाशिव जोशी यानें पाठविले आहे. ‘ श्री विश्वेश्वर नगरींत सुखरूप असो. विशेष......रावजी ! शरीरद्वारा पीडा विशेष जाहली. स्वामीपासून ब्राह्मण नरहरी भट सप्रे व प्राणनाथ भट गाडगीळ व विश्वंभर भट वगैरे ब्राह्मण आले. त्यांनीं महाराजाचा येस कीर्ति प्रताप उदारत्व श्रुत केले. तेच मात्रा कर्णद्वारे प्राशन करून आरोग्य थोडे बहुत झाले. चिरंजीव बाबूजींचे पत्र आले त्यांत लिहिलें कीं, श्री तीर्थ येजमान सेवन करतात. आणखीहि ब्राह्मणद्वारा पाठवून देणे. त्या पत्रावरून तीर्थ कावडी तीन, गंगाजल कावडी एक एकूण कावडी चार पाठविल्या आहेत त्या पावतील. ’ (पे. द. १८) सदाशिव जोशी हे बाबूजी नाइकाचे पिते. ते काशीवास सेवीत असून त्यांची सावकारी मोठी होती.

महाक्षेत्रांचे स्वामित्व

सबंध हिंदुस्थान मुसलमान राजांच्या अमलांतून सुटून आपल्या ताब्यांत यावा अशी पेशव्यांची महत्त्वाकांक्षा होती व ती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य-स्थापनेच्या मूळ हेतूस धरूनच होती. पण पाणिपतच्या समरभूमीवर मराठ्यांच्या झालेल्या निःपाताबरोबर ती महत्त्वाकांक्षा जवळजवळ जमीनदोस्त झाली. तथापि थोरल्या माधवरावानें पतन पावलेल्या महाराष्ट्रास अमृतसिंच-

नानें जिवंत करून उठविल्यावर ती महत्त्वाकांक्षा फिरून उठून उभी राहिली. पण बारा वर्षांनंतर माधवरावाच्या मृत्यूनें तिला निद्रा आणिली, ती लवकरच काळनिद्राच ठरली. नाना फडणीस हे पेशवाईतील शेवटचे मुत्सद्दी, त्यांनी मराठी राज्य खूप शर्तीनें राखलें. त्यांना अव्वल पेशवाईतील राजकारणी पुरुषांचें अंतरंग पूर्णपणें माहित होते. ते त्यांच्याशी समरस झाले होते. हिंदुपदशाहीची स्थापना सर्व हिंदुस्थानभर करणें त्यांच्या आटोक्याबाहेरचें असलें तरी काशी, प्रयाग, मथुरा, वृंदावन आदि करून महाक्षेत्रांचा हिंदुधर्माच्या दृष्टीनें जीर्णोद्धार करण्याची आशा त्यांनीं अजिबात सोडून दिली नव्हती. नानानी यासाठीं निरनिराळया मार्गानी प्रयत्न केले. पहिला प्रयत्न त्यानी महादजी शिंद्यांच्या मार्फत करून पाहिला. महादजी शिंद्यांचे उत्तर हिंदुस्थानात वजन दांडगे होते. त्याना दिल्ली दरबार, मुसलमान अमीर उमराव व खुद्द इंग्रज लोक वचकून असत. तेव्हां अशा मातबर सरदाराच्या मार्फत आपले कार्य सिद्धीस नेण्याकरितां समशेर बहाद्दराचा मुलगा अलीबहादर याचा दिवाण भिकाजी नारायण याजबरोबर नानानी पत्रव्यवहार चालविला. भिकाजी नारायण हा आपल्या धन्यासह महादजीच्या लष्करांत असल्यामुळें त्याने महादजीशी बोलणे करावे व महादजीनीं त्याचा आशय नानास कळवावा असा क्रम सुरू होता. नानानी भिकाजीला लिहिलेला मजकूर पुढील प्रमाणें होता. ‘ श्रीकाशीक्षेत्रात श्रीविश्वेश्वराचे देवालय एक हजार वर्षांचे जुने. त्यास अलीकडे पातशाहीत कोणी काय समजावून मशीद केली. त्यास विश्वेश्वराचे स्थळ मोकळे होऊन पूर्ववत् देवालय व देवस्थापना व्हावी हे हिंदुधर्मास योग्य आहे. या काळी पादशहाजवळ उद्योग केल्यास होईल असे आहे. त्यास ऐसी गोष्ट जाहली पाहिजे. फिरोन दावा न राहे. पूर्वापार मजकूर पातशहास समजावून कधी कोणाकडून उपद्रव न होयसे पत्र करून घ्यावे. या गोष्टीचा उद्योग जरूर करावा. सांप्रत काळी काशीत इंग्रजांचा अंमल आहे. ते कोणाचे धर्मास अडथळा आणीत नाहींत. येविशी त्यासी बोलता येईल. विश्वेश्वराचे स्थळात वस्ती असल्यास त्याचे इमल्याचा पैका देविला जाईल. परंतु पादशाही परवानगी निर्वेधपणे जाहली पाहिजे. मथुरा-वृंदावन ही स्थळे सरकार खालशांत असावी. त्यांच्या सनदा सरकारचे नांवे करून पाठविणे म्हणून राजश्री पाटिलबावास पत्र सरकारचे लिहून पाठविले आहे. ’

नानाच्या वरील पत्राचा आशय असा कीं, मथुरा व वृंदावन ही स्थळें दिल्लीपतीच्या ताब्यांतून पेशवे सरकारच्या ताब्यांत यावी आणि इंग्रजांच्या अमलांतील काशी पेशवे सरकारास मिळण्याचा संभव नसल्यामुळें धार्मिक बाबतींतील इंग्रजांच्या तटस्थ धोरणाचा फायदा घेऊन विश्वेश्वराच्या देवळाच्या जागी बांधलेली मशीद पाडून व त्याबद्दल नुकसानभरपाईहि देऊन विश्वेश्वराचें देऊळ पुनः बांधण्यांत यावे. यासंबंधी भिकाजी नारायणाने ता. २२ मार्च सन १७८९ रोजी येणेप्रमाणें नानास पत्र लिहिले ' ही गोष्ट पाटिलबावाशी दोन चार वेळा बोलले. त्यास काशीचे मजकुराचा जावसाल स्पष्ट कांहींच सांगितला नाहीं. लांबणीचे जाबसाल बोलतात कीं, ही गोष्ट केल्याने सर्वां यवनास वाकडें वाटेल- अस्फत दौले व इंग्रज एक आहेत. त्यांचीहि भीड इंग्रजास पडेल. अशी पर्यायाची बोलणी बोलतात. परंतु आम्ही त्यास सांगतो कीं येणे करून आपला सर्व हिंदूंत नक्ष होईल. सरकारसेवाहि थोरलीच घडेल. कीर्तिस्पद होईल. मथुरा–वृंदावन येथील मजकूर-पातशाई फर्माने करून आणावयाचे मसुदे केले आहेत, दोहो चहू रोजात दिल्लीस पाठवून सनदा करून आणवितो. याप्रमाणें बोलले आहेत. होऊन आलियावर सेवेसीं रवाना करूं' [इ. सं.]

महादजीमार्फत नानांची कारवाई अशा रीतीनें सुरू असतां नानांची इंग्रजाबरोबरहि दोस्ती स्वतंत्रपणे जुळलीच होती. तेव्हां तिचाहि फायदा घेण्याचें नानांनीं ठरविलें. "टिपूवर दुसरी मोहीम करण्यापूर्वी मराठे, मोगल व इंग्रज या तिघांनीं सन १७९० त आपसात तह केला. या तहाच्या निमित्तानें नानांनीं इंग्रजांना भीड घातली कीं, ' सांप्रत काशीक्षेत्र तुमच्या ताब्यांत आहे. तेथें श्रीविश्वेश्वराच्या देवालयाचा सभामंडप पाडून त्या जागीं औरंगजेबानें पूर्वी मशीद बांधली आहे. ती मशीद पाडून पुनः मंडप बांधावा असें आमच्या मनांत आहे. त्याप्रमाणें आम्हास करूं द्यावें ! थोरले बाजीराव साहेब यांच्या कारकिर्दीपासून मराठ्यांनीं या गोष्टीचा ध्यास घेतला होता. परंतु इंग्रजांनीं गुळचट थापा मारून ही वेळ मारून नेली " [नाना फडणविसांचें चरित्र.] इंग्रजांना पुरतें माहींत कीं, मुसलमानांच्या धार्मिक भावनांना धक्का लावण्याची सोय नाहीं. त्यापेक्षां सत्ताधारी मराठ्यांची मर्जी थोडीशी गेली तरी चालेल. मराठ्यांना विश्वेश्वराचा सभामंडप मुसलमानांना व इंग्रजांना भीड घालून मशिदीच्या जागीं बांधण्याचें साधलें नाहीं, तरी आपल्या राज्यांतील मुसलमानांशीं सहिष्णुतेनें

वागण्याचें किंबहुना त्यांचे लाडहि पुरविण्याचें व्रत त्यांनीं सहसा सोडलें नाहीं. जुन्या मशिदींचीं बादशाही अमलांतील उत्पन्नें त्यांनीं पुढें सुरू ठेवणें राजनीतीस धरून होतें. पण नव्या मशिदींसहि नवीं उत्पन्नें चालू करून त्यांनीं आपलें औदार्य दाखविलें. ' महमद साले सातारी साऊकार यांनीं मौजे सोपारे प्रांत वसई येथें मशिदी बांधल्या. त्यास दिवाबत्तीस व मशिदीची खिजमत करील त्यास पोटास पडजिराईत जमीन तीन बिघे दिली. ठाण्यास दीड बिघा जमीन दिली. ' हिंदु राजे मुसलमानांवर अशा रीतीनें भाळून जात याचें एक कारण असें दिसतें कीं, मुसलमान लोक प्रजाजनांचें नातें आलें कीं, परधर्मीय सरकाराशी आदबीनें, गोडीगुलाबीनें, फार काय खुशामतीनें वागण्यांत पटाईत आहेत.

परधर्म व परधर्मीय

हिंदु व मुसलमान यांच्यांत पक्षपात करून मुसलमानांस अन्यायानें वागविण्याचें हिंदु राजांच्या स्वप्नींहि येत नव्हते. उलट या उभयतांच्या वादांत हिंदु राजांकडून अन्याय झाला तर हिंदुनाच व्हावयाचा. यामुळें हिंदूंच्या अमलाखालीं असतां स्वराज्यांत असल्यासारखेच मुसलमान खुषींत रहात. ' मखण मुसलमानणीच्या मागे अमरसिंगाचा कर्जाबाबत तगादा होता. त्यानें तिचे दोन मुलगे व एक मुलगी अटकावून ठेवली होती. फक्त १२ रुपये द्यावयाचे राहिले होते. ते खैरातदाखल पेशव्यांनीं देऊन मखणला अमरसिंगाच्या काचांतून सोडविले ! ' अंतःकरणाचें दयालुत्व हेंहि त्याचें एक कारण असू शकेल. मराठे हे मुसलमानापेक्षां अंतःकरणानें दयाळू व निरुपद्रवी असले तरी मुसलमान राजांनीं भलतेच अन्याय केल्यास त्यांचा ' जशास तसे ' या न्यायानें सूड घेतल्यावांचून ते रहात नसत. जंजिऱ्याचा शामल [शिद्दी] यानें ब्राह्मणावर जुलूम केला असतां पेशव्यांनीं त्या जुलमाचा सूड आपल्या राज्यांतील मुसलमानावर घेण्याचें ठरविलें. कोकणांत दापोली तालुक्यांत समुद्रकाठीं कोळथरे या गांवीं कोळेश्वराचे प्रसिद्ध देवालय आहे. या गांवचे ' जनार्दन रुद्र, नारो विश्वनाथ, बाळाजीराम व बाळाजी त्रिंबक छत्रे इत्यादि ब्राह्मणांस जंजिऱ्याच्या शामलानें राजपुरीस धरून नेऊन खंड घेतला. त्यांचें झालेलें नुकसान पेशव्यांच्या हद्दींतिल मुसलमानांपासून पट्टी वसूल करून भरून द्यावयाचे हाच उपाय परिणामकारक. यासाठीं कल्याण, सुवर्णदुर्ग, उंदेरी इत्यादि

तालुक्यांतील अधिकाऱ्यांस पत्रें लिहून ८५०० रु. वसूल करण्यास पेशव्यांनीं सांगितलें.' [पे. डा.]

मुसलमान राज्यकर्ते परधर्माचे द्वेष्टे व स्वधर्माचे कडवे अभिमानी असल्याचें प्रसिद्ध आहे आणि त्यांची ही मनोरचना त्यांच्या धर्मग्रंथांतील शिकवणीनें बनली आहे यांत शंका नाहीं. तथापि त्यांची सर्व प्रजा हिंदु असल्यामुळें उठल्या सुटल्या हिंदु म्हणून त्यांजवर जुलूम करून व त्यांच्या देवस्थानांचा वेळी अवेळीं विध्वंस मांडून त्यांना स्वतःला सुख लागणें व त्यांचा राज्यकारभार सुरळीत चालणें शक्य नव्हतें हें तत्त्व मुसलमान राज्यकर्ते जाणून होतेच. शिवाय शेजारी मराठ्यांची सत्ता मजबूत स्थापन झाल्यावर त्यांच्या धाकानें आपल्या राज्यांतील हिंदूस धर्मदृष्ट्या सौजन्यानें वागविण्याची मुसलमान राज्यकर्त्यांवर एक प्रकारची जबाबदारीहि पडली. 'मोगलाईतून निजाम अल्लीखान यांनीं ब्राह्मणांस दररोजच्या दक्षिणेचा करार करून सनदा दिल्या होत्या. त्याप्रमाणें चालत आलें. पण मोगलाई अंमल पेशवे सरकारांत आल्यापासून चालत नाहीं. तरी कृपाकरून करार करून द्यावा म्हणून ब्राह्मणांनीं विनंति केली. त्यावरून निजाम अल्लीखान याजकडील सनदा पाहून करार करून दिला असे.' (पे. डा.) मोगलांचा कांहीं मुलूख पेशव्यांनीं युद्धांत जिंकून घेतल्यावर मोगलाईंतलि मामुली वहिवाट माहीत नसलेल्या पेशव्यांच्या अधिकाऱ्यांकडून ब्राह्मणांना दक्षिणा देण्याचें काम बंद पडलें. त्यावरून मोगलाईतील ब्राह्मणांचा पेशव्यांकडे अर्ज असा कीं, कृपा करून ती दक्षिणा चालू ठेवा ! त्या अर्जाप्रमाणें त्यांनीं सदर दक्षिणा चालू केली.

मुसलमान राज्यकर्ते हिंदु देवतांची व ब्राह्मणांचीं उत्पन्नें चालवीत तसे पेशवेहि आपल्या हद्दींतलि मुसलमानी व इतर परधर्मीयांना दिलेलीं उत्पन्नें दक्षतापूर्वक चालवीत असत हें सांगण्याचें कारणच नाहीं. भोपाळच्या बेगमेचा मुलूख मराठ्यांनीं घेतला, तेव्हां किल्ले सातगड तालुक्याच्या बाबतींत पेशव्यांनीं पुढीलप्रमाणें हुकूम दिला. 'बेगमेचे निसबतीचे पीरजादे व ब्राह्मण यांचें चालवावयास तीन हजार तनख्याचा सरंजाम इनाम सदर तालुकियांत द्यावा.' (पे. डा. सन १७६०-६१) दररोज येतील तितक्या भिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर धान्य घालण्याच्या पद्धतीस मुसलमान लोक लंगर म्हणतात. मुसलमान राज्यकर्त्यांच्या या दानपद्धतीचेंच अनुकरण बडोदेसारख्या ठिकाणीं मराठे

संस्थानिकांनीं खिचडीच्या रूपानें केलेलें दिसतें. बऱ्हाणपूर शहर मोगलाई अंमलांत होतें. तें पेशव्यांच्या ताब्यांत आल्यावर तेथील लंगरखान्यासंबंधीं पुढील व्यवस्था केली. ' बऱ्हाणपूर येथें मोगलाई अंमलांत दररोज लंगर ५।७ पल्ले धान्याचा चालत होता. त्यास हल्लीं तीन पल्ले दाणा लंगराचा करार करून दिला असे. ' (पे. डा. सन १७६६-६७)

ज्यानें त्यानें स्वधर्माप्रमाणें वर्तावे ही हिंदुधर्माची उदार शिकवण आहे. परंतु मुसलमानांचा सहवास शतकानुशतकें राज्यकर्ते या नात्याने घडल्यामुळें मुसलमानानी जुलूम केला असतां त्याजविषयीं हिंदूंना तात्कालिक चीड येत असली तरी ते त्यांच्या पीरांना आपल्या देवांच्या खालोखाल भजत यांत शंका नाहीं. ' पेशव्यांचा पुण्यांतील सुप्रसिद्ध शनिवारवाडा बांधावयाचा मुहूर्त इ. सन १७२९ त केला. त्यावेळीं देव व पीर यांजपुढें चार आणे दाक्षिणा ठेवली.' (पे. डा.) सदाशिवरावभाऊ पेशवे याना लहानपणी पुण्यास देवी आल्या तेव्हां सैद सादत पीर कसबे पुर्णे यास कंदोरीचा नवस केला होता.' [पे. द. ४३]

मिरजेच्या किल्ल्यास रघुनाथराव व माधवराव पेशवे यांनीं वेढा घातला व वेढ्यांत गोविंद हरि पटवर्धन अडकून पडला. तेव्हां त्यानें हिंदू देवतांबरोबरच मुसलमानांच्या पिरावरहि भार टाकला. तो गोपाळरावास लिहितो ' पीर (मिरजेचा मिरासाहेब-शम्नामीर) सर्व प्रकारे मदतीस. नरसोबा देव सर्वस्वी अनुकूल. थळ [ग्राम दैवत] अनुकूल. त्यामुळें [पेशवे] पराभव पावले.' पण ज्या मुसलमानांच्या पीरावर गोविंदरावाचा भार ते मुसलमान हिंदूंवर कोपले म्हणजे केव्हां केव्हां हात दाखवीत त्याबद्दल तोच गोविंदराव कसे दातओठ खातो पहा. हैदरावर माधवराव पेशव्यानें सन १७७० त तिसरी स्वारी केली. हैदर हिंदूंचा धर्मदृष्ट्या छळ करीत नसे, इतका छल टिपूच्या हातून होत होता. या वेळीं हैदर जिवंत असल्यामुळें टिपूकडे सर्व मुखत्यारी नव्हती तरी त्याच्याकडे स्वारीचा जो मुलूख होता तेवढयांत तो हिंदूंना छळल्यावांचून सोडीत नसे. गोविंदपंत म्हणतो ' टिपू सावनूर प्रांतीं येऊन महद अरिष्ट त्यानें केलें. हनगल वगैरे खेड्यांचा सत्यानाश केला. ब्राह्मण बाटविले. बायकांना बाटविलें. विरूपकरण केलें ' [ऐ. ले. सं. खंड ४ था] अशा रीतीनें हिंदूंच्या अंगाची संतापानें आग होत असे. पण हिंदू हे जात्याच सहनशील व क्षमावान् पड-

त्यामुळें राग विसरून जात व दीर्घद्वेष धरीत नसत. त्यांचा संताप व्यक्त करण्याचा एक मार्ग अजिबात खुंटला होता.

मुसलमान कांय किंवा पोर्तुगीज काय यांनीं हिंदूंतील स्त्रीपुरुषांना बाटविल्यावरहि त्याचें उसनें मुसलमानांना किंवा पोर्तुगीजांना बाटवून त्यांना फेडतांच येत नसे. या कारणानें त्या उभयतांना चुचकारून स्वधर्माचा शक्य तितका बचाव करण्यांतच हिंदू राज्यकर्ते शहाणपणा व दूरदर्शित्व समजत. म्हणून परधर्मीयांवर होतलि तेवढे उपकार करूनच त्यांस मनानें मारण्याचा ते प्रयत्न करीत असावे. अहमदनगराजवळचा एक गांव हुसेन शहा पीरजादे या फकिरास अलमगीर (औरंगजेब) व बहादुरशहा पातशहा यांनीं इनाम दिला होता. पूर्वीच्या अमलांत जीं उत्पन्नें चालू असतील ती पुढील अमलांनींहि चालविण्याच्या शिरस्त्याप्रमाणें बाळाजी विश्वनाथ, बाजीराव, नानासाहेब यांनीं त्यास राजपत्रें दिलीं. मध्यंतरीं फकीर मक्केस गेला. यामुळें गांव त्याजकडे आठ वर्षें चालला नाहीं. तो केदारजी शिंदे यानें खाल्ला. पुढें फकीर परत आल्यावर त्यानें माधवराव पेशव्याकडे फिर्याद केली. तेव्हां त्यांनीं सदर गांव फकिरास देण्याची शिंद्यास ताकीद दिली. ‘ किल्ले चांबड येथे चांदरातीस विड्याचे पानाबद्दल [पानसुपारीच्या] सालीना नेमणूक केली ’ ‘ किल्ले शिवनेर येथे मुसलमानांची ईद, रमजान, व मोहरम यावेळीं करावयाच्या तोफांच्या बाराकरितां नेमणूक ’ ‘ किल्ले कुंजरगड येथे हनुमंत व पीर आहेत. त्यांस दीपाबद्दल तेल मंजूर ’ कांहीं गांवीं पेशव्यांनीं व त्यांच्या सरदारांनींहि मुसलमानांच्या जमिनी घेऊन त्यांत देवालयें बांधलीं. पण त्या जमिनींचा कबजा त्यांजपासून जबरदस्तीनें किंवा मोफत न घेतां त्यांच्या खुषीनें त्यांस मोबदला देऊन घेतला. आनंदराव रास्त्यांनी वाईस धर्मपुरी पेठ, घरें व देवालयें बांधण्याकरितां याच रीतीनें जागा मिळविली. त्या खरेदीखताचा सारांश येणेप्रमाणें ‘शके १६९३ आषाढ शुद्ध द्वितीया (सन १७७१) ते दिवशीं आनंदराव भिकाजी रास्ते यांसी खरेदी पत्र लिहून देणार शाहा सुलहसन, शाहामीरशहा, काशीमशहा, अहमदशहा, लालशहा व हजरतशहा वल्लद दाऊदशहा काजी प्रांत वाई व कुडाळ. आम्ही कर्जवाम बहुत जाहलें तें फेडण्याकरितां आमचा शक्कर बिबीचा बाग घेऊन कर्जमुक्त करावें असें निवेदन केलें. तें तुम्ही मान्य केलें. बाग बिघे १५ यासी चतुःसीमा पूर्वेस शहर वाई, पश्चिमेस सत्यनाथ पुरी, उत्तरेस बाग खतिपा

व दक्षिणेस रस्ता व शिनगार वेस कबर शकर बिबी येणेप्रमाणें; आमचे वडिलांचे कबरस्थान वजा करून बाकी जमीन आंबराईसुद्धां रु. ५००० घेऊन खुष खेरदी दिली असे. ' आनंदराव यांनीं काजी यांचेकडून पंधरा बिघे जमीन खरेदी घेऊन श्रीमहाविष्णु, श्रीमहालक्ष्मी अशीं देवालयें बांधलीं. ४८ (५२) घरें बांधून ब्राह्मणांस दान दिली व या जागेस पेठ धर्मपुरी असें नांव ठेवलें. पुढें श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांनीं धर्मपुरींतील देवब्राह्मणांस सनद करून दिली. ' [गोखले व गोखले–रास्ते घराण्याचा इतिहास]

पेशव्यानीं सहिष्णुतेचें धोरण पोर्तुगिजाशींहि ठेवलें होतें. ' पाद्री फेलपाद्र फिरंगी वैद्य यानी हुजूर कसबे पुणे येथील मुक्कामी येऊन अर्ज केला कीं आपला देव माजरदेस मामले रेवदंडा येथे आहे. तिचा उत्सव नवरात्र होतो. त्यास शेवटच्या दिवशीं तोफेचा बार एक करावयाचा हुकूम आहे. त्या ऐवजीं दोन बार करावे. ही विनंति मंजूर ' (पे. डा.) रेवदंड्यावर पूर्वी अंमल पोर्तुगीजांचा होता म्हणून त्यांच्या देवाची स्थापना तेथें झाली होती.

महाराष्ट्रधर्म व महाराष्ट्रसंस्कृति.

मराठ्यांनीं महाराष्ट्रांत स्वधर्म व स्वसंस्कृति यांची स्थापना परधर्मसहिष्णुतापूर्वक करून यावनी संस्कृतींतून महाराष्ट्र सोडविला. पण याशिवाय महाराष्ट्रीय सरदार परप्रांतीं स्थायिक होऊन राहिले, त्यांनीं काय कामगिरी या दिशेनें बजावली तिची हकीकत धारचे रहिवासी रा. का. कृ. लेले यांनीं लिहिलेली भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकांत त्याच्या सहाव्या वर्षीं प्रसिद्ध झाली ती येणेप्रमाणें.

" दक्षिणेंतून उत्तर हिंदुस्थानांत प्रवेश करतांना आधी माळवा प्रांत लागत असल्यानें मराठ्यांनीं आपली सत्ता प्रथमतः त्या प्रांतांत स्थापन केली. ही स्थापना इंदूरचे श्री गौड जातीचे ब्राह्मण मंडलोई नंदलाल व जयपूरचे रजपुत राजे सवाई जयसिंह या उभयतांच्या सहाय्यानें झाली. तिची हकिकत नंदलाल मंडलोई यांचे नातवानें सर जॉन माल्कम यांस कळविली. तिचा सारांश मालकम साहेबांचे ग्रंथावरून देण्यांत येत आहे.

" महंमदशाचे कारकिर्दींत माळव्याची स्थिति बिघडली होती. सवाई जयसिंग व नंदलाल यांनीं बाजीराव साहेब यांस बोलवण्याचें ठरविलें. त्यांनीं येऊन

माळव्यांतील बादशाही सुभेदार दयाबहादूर यास गारद करून ठिकठिकाणीं आपलीं ठाणीं बसविलीं."

मराठे सरदार जेथें कायम होत तेथें त्यांजबरोबर कांही महाराष्ट्रीय ब्राह्मण कामगार असावयाचेच. शिवाय त्यांचे उपाध्ये, शास्त्री, पुराणिक, जोशी, वैद्य, याज्ञिक, वैदिक, कथेकरी, हरिदास, भजनीमंडळी यावयाची. त्यांनीं विद्यादान फुकट करावयाचें. सर्व विद्वान् व साक्षर ब्राह्मणांचे घरीं थोडेबहुत विद्यार्थी जमत व विद्येचे व सदाचाराचे धडे घेत. याप्रमाणें नवीन जिंकलेल्या प्रांतांत महाराष्ट्र ब्राह्मणांच्या शुद्ध संस्कृतीचा प्रसार होत गेला, आणि तद्देशीय ब्राह्मण विद्वान् व सदाचारसंपन्न होऊं लागले. अशा रीतीनें मुसलमानी अमदानींत नष्ट भ्रष्ट झालेल्या हिंदूंच्या पूर्व संस्कृतीची दुरुस्ती व पुनरुज्जीवन मराठी राज्याचे उदयकाळापासून होत आले. मराठी पंतोजीपासून व्यावहारिक कारकुनांचे म्हणजे जमाखर्ची व चिटणिशी लिहिण्याचें कामांतहि तद्देशीय विद्यार्थी तयार होऊं लागले.

मराठेशाहींत जमाखर्ची लिहिण्याची शिस्त फारच चांगली अशी पेशवाई दप्तराची पुष्कळ युरोपियन लेखकांनीं मोठी तारीफ केली आहे. ही शिस्त उत्तर हिंदुस्थानांतील पुष्कळ संस्थानिक अंगीकारीत. त्यांपैकीं अनेकांनीं आपल्या दरबारीं दक्षिणी कारकून ठेवून ती शिस्त चालविली. ती अद्यापहि कोठे कोठे सांपडेल.

मराठी अंमल जेथे जेथें कायम होई, तेथील मुसलमानी अमदानीपासून अपूजित राहिलेल्या देवस्थानांचा जीर्णोद्धार होऊन पूजा-अर्चा, धूपदीप, नैवेद्य, उत्सव, यांचा बंदोबस्त होऊं लागला. देवळांतून पाठ अनुष्ठानें सप्ताह, पारायणें जपजाप्य इत्यादि गोष्टी सुरू झाल्या. दक्षिणी ब्राह्मणांची वस्ती जेथे जास्त होई तेथें श्रौत, स्मार्त कर्मे सुरू होत. अग्निहोत्री यांचे घरीं यज्ञयागाची सुरुवात होऊन इष्टि, चातुर्मास्य, होमहवन इत्यादि मुसलमानी अमदानींत नष्ट झालेल्या आचारांचा पुन्हा प्रचार सुरू झाला. त्याचप्रमाणें मुंजी, लग्ने वगैरे संस्कार तद्देशीय ब्राह्मणांकडे वैदिक रीतीनें पुनः वेळेवर होऊ लागले. क्षेत्रांचे ठिकाणीं तर मराठ्यांच्या उपकृतीचीं प्रमाणें फार सांपडतील. तेथे यवनांनीं विच्छिन्न केलेलीं देवळें, घाट, कुंडें, तीर्थे इत्यादि

पुनः कायम केली आणि धर्मशाळा बांधून अन्नसत्रें घातलीं. त्यांचें अनुकरण तद्देशीय राजेहि करूं लागले.

काशी, मथुरा, उज्जयिनी इत्यादि क्षेत्रीं चांगले विद्वान् स्नानसंध्याशील तपस्वी ब्राह्मण बसवून त्यांस स्वास्थ्यें करून दिलीं. पठणपाठणास उत्तेजन दिलें. ग्रंथलेखन चालविलें.त्यामुळें दुर्मिळ ग्रंथ मिळूं लागले. व तेथे सहस्रावधि विद्वान् ब्राह्मणांचीं घराणीं कायम होऊन त्यांच्या शिष्यपरंपरा व पुत्रपरंपरा पुढें चालल्या. त्याचप्रमाणें तद्देशीयांतहि शेकडो पंडित तयार होऊन त्यांच्याहि परंपरा सुरू झाल्या.

तद्देशिय संस्थानिकांसहि मराठयांच्या रीती आवडून त्यांनीं चांगले विद्वान् दक्षिणी ब्राह्मण आणवून त्यांस वेतनें, इनामे, मानपान देऊन आपले दरवारी बसविले. व त्यांचे सहाय्यानें आपले राज्यांत विद्या व सदाचार यांची वृद्धि केली. राजपुतान्यांत जयपूर, जोधपूर, उदेपूर, कोटा, बुंदी, बुंदेलखंडांतील व बघेल खंडांतील संस्थानें यांत अद्यापि अशा प्रकारचीं अनेक जुनीं ब्राह्मण घराणीं आढळतात.

बुंदेलखंडांत तर झाशी, जालवण, सागर इत्यादि कऱ्हाडे ब्राह्मणांची संस्थानें पुष्कळ दिवस भरभराटींत आलीं होतीं. त्यांचा परिणाम तिकडील प्रांतावर जो झाला त्याचीं चिन्हें मध्यप्रांतांत विपुल सांपडतात. बदरीनारायणापासून उज्जयनीच्या महाकाळापर्यंत अनेक उच्छिन्न देवस्थानांत पूजा–अर्चा नीट चालत नव्हती. ती चांगली चालावी याकरितां बहुतेक ठिकाणीं कर्नाटक, तेलंगण व द्रविड देश येथून चांगले शुद्ध आचाराचे ब्राह्मण बोलावून त्यांजकडे देवस्थानांच्या पूजा–अर्चांची व्यवस्था सोपविली.

धार येथील एका बावशि ब्राह्मणाचे घरील १६९ वर्षांचे दोन जुने कागद सांपडले. त्यांत श्रीमंत बाळाजी बाजीराव पेशवे यांचे वेळीं एतद्देशीय ब्राह्मणांचे आचारांत शास्त्रविरुद्ध प्रचार चालू होते ते बंद करून शास्त्रोक्त आचार चालू करण्याबद्दल आज्ञा लिहिल्या आहेत. त्या दोन कागदांपैकीं एक निषिद्ध आचारांची यादी असून दुसरे यशवंतराव पवार यांनीं वर्तमान भावी कमाविसदारांचे नावें लिहिलेलें ताकीदपत्र आहे. ते संक्षेपानें येणेंप्रमाणें

श्री.

यादी धर्मस्थापना शास्त्रप्रमाण वेदपुरुषाज्ञाप्रमाण
नाना धर्म प्रवृत्त होत नाना स्थलीं.

१ गोत्र, प्रवर, शाख, सूत्र, देवमंत्रपूर्वक स्नानसंध्यादिक आन्हिक कर्म करावें. पूर्वसंप्रदाय टाकावा.

२ ब्राह्मण जातीनें घरी रहाट न ठेवावा. सूत स्त्रियांनीं न काढावें. पूर्व वृत्तें टाकावीं.

३ नवरीचे गळ्यांत जवाळी (माळ खारका बदाम पिस्ते इत्यादिकांची) मुचीची (चांभारानें) केलेली न घालावी. आपले घरीं करून घालावी. ब्राह्मण जातीनें एकादशाह द्वादशाह भोजन न करावे. तेरावे दिवशीं ब्राह्मण सुखरूप भोजनास घालावे.

४ सौभाग्यवती स्त्रीनें लाखेचा व नरोटीचा चुडा न धरावा.

५ सौभाग्यवती ब्राह्मण स्त्रीचे पंगतीमध्यें विधवेनें मधी बसोन भोजन न करावें.

६ सौभाग्यवतीनें विधवेचे पंगतसि भोजनास न बसावे.

७ विधवा स्त्रीनें शेंडी धरून विष्णु पूजा न करतां ते शेंडी सोडावी. निर्मल मुंडन करावें.

८ ब्राह्मणाही विवाहामध्यें नवऱ्या-नवरीचे पाईमोचे घालून वैदिक कर्म न करावें.

९ विवाहामध्यें षोडश संस्कारामध्यें ब्राह्मण जातीहि स्नान करून अस्पर्श धौत वस्त्र परिधान करून संध्या, ब्रह्मयज्ञ, तर्पण, नैवेद्य, वैश्वदेव, भोजन करावें. पूर्व रीत टाकावीं.

१० ब्राह्मण जातीनें प्रथम मागणी न करावी, तात्काळ विवाह करावा.

११ सौभाग्यवती ब्राह्मण स्त्रीनें चोळी धरावी, काचोळी टाकावी.

१२ सौ. ब्राह्मण स्त्रीनें काशा-पितळेचें बिच्छवे (पायाच्या बोटांतील भूषणें) न धरावें, रुप्याचे धरावे.

१३ ब्राह्मणाहि उदक व स्त्रियांनीं खांद्यावरीं व कडेवरी आणावें, मस्तकी जळ न आणावें.

१४ ब्राह्मण जातीने आटासाठा न करावा.

१५ ब्राह्मणास ज्यास जेवावयास सांगितलें त्याणें जावें, पोरास समागमे न न्यावें.

१६ ब्राह्मण भोजन व स्त्रीसवासीण भोजन यांमध्यें विधवा पंगतीस नसावी.

१७ भांड अपशब्दोउच्चारणपूर्वक ब्राह्मण स्त्रीनें मणी न धरावे, वेदमंत्रोच्चारणपूर्वक सकल कर्मे करावीं.

१८ समस्त ब्राह्मणाही षोडशकर्म सांगतासिद्धयर्थ ज्या त्या संस्कारीं यथासामर्थ्य ब्राह्मण जेवू घालावे.

१९ समस्त ब्राह्मणाही भोजनकर्माचे ठायीं पवित्र होऊन स्वयंपाक करावा, पक्वान्नें पापड लोणचे आदिकरून.

२० समस्त ब्राह्मणांहीं विवाहामध्यें नवऱ्यानवरीचे मस्तकीं पुष्पमाला बांधाव्या. मोचीयाचे घरचे घरमोड न बांधावे.

२१ समस्त ब्राह्मण जातीनें मृत प्राण्यांच्या उत्तरक्रिया शास्त्राप्रमाणें कराव्या.

२२ जो ब्राह्मण मरेल त्याचे स्त्रीचे केस प्रथम अथवा दहावे दिवशीं काढावे तेव्हां शुद्ध.

२३ समस्त ब्राह्मण स्त्रिया याणी प्रत्यही स्नान सवस्त्र करून वस्त्रे नित्य धुवोन परिधान करावी. चोळी व लुगडी सोवळी धुवोन ठेवावी.

२४ गोत्रप्रवर सापिंड निर्णयपूर्वक स्वसूत्रोक्त वेदमंत्रेंकरून विवाहादिक षोडश संस्कार करावे. पूर्व संप्रदाय टाकावा.

२५ ब्राह्मण जातीच्या समस्त विधवा स्त्रीनें प्रथम रजोदर्शन झाल्यानंतर केस मस्तकीं व आभूषण व चोळी कांचोळी लहंगा न धरावी. एक वस्त्र सकच्छ धारण करावें.

२६ सौ. ब्राह्मण स्त्रीनें नाडे मस्तकी न बांधावे.

२७ सौ. ब्राह्मण स्त्रीनें गळयापासून मस्तकापर्यंत यथासामर्थ्य सुवर्ण आभूषण धरावे, रुप्याचे नग मस्तकीं न धरावे.

२८ सर्व ब्राह्मणाही ब्राह्मणापासून वेदमंत्रांचा उपदेश घ्यावा. त्रिदंडी संन्यासी जटिल गोसावी बैरागी मात्मसाद असे पाखंडी आहेत, त्यांचा मंत्र अथवा त्यांचे अन्नेमध्यें न चालावे. त्यांचा त्याग करावा. ब्राह्मण जातीनें ब्राह्मणापासून उपदेश घ्यावा.

२९ यज्ञोपवीत रहाटाचे सुताची न करावी. आपले स्वहस्ते सूत काढून करावी आणि धारण करावे समंत्रक.

३० ब्राह्मण जातीनें ब्राह्मणोदकेकरून सर्वदा स्नान करावें. समाराधनादिक करावी, तेथें शूद्रोदक नसावें.

३१ सर्व ब्राह्मण स्त्रीनें सव्य लुगडें नेसून कच्छ धरावा, लहंगा टाकावा.

३२ सर्व ब्राह्मणाही जेवतेसमयीं एकास एका स्पर्श न करावा. सौभाग्यवती स्त्रीनेंहि स्पर्श न करावें.

३३ सकल ब्राह्मण जातीनें साता वर्षांनंतर दहा वर्षेपर्यंत तत्काळ विवाह करावा.

३४ ब्राह्मण जातीनें ज्या गांवीं वधू असेल तेथें सहकुटुंब जाऊन तेथें मंडप घालून देवप्रतिष्ठा करून लग्न संपादावें.

३५ ब्राह्मणाही ब्राह्मविधीनें विवाह करावा.

३६ ब्राह्मण जातीनें आपली कन्या विक्रय करून विवाह न करावा.

३७ सकल ब्राह्मण यांचे स्त्रीनें स्वयंपाक करतेवेळेस, भोजन करतेवेळेस दर्याईची (रेशमी) चोळी घालावी किंवा धूत वस्त्र सोवळ्यांत घालावें ते चोळी वस्त्रें धारण करावें.

३८ समस्त ब्राह्मणाही समाराधना व पितृकार्य व विवाहकार्याचे स्वयंपाक करणें तो स्वयंपाक करणार यांनीं उपोषण असतां पाक करावा अथवा पीठ भक्षावयास द्यावें, आणखी न सेवावे.

३९ समस्त ब्राह्मण यांचे पुत्रानें वेदाध्ययन करावें.

४० जो ब्राह्मण अनाचार न सोडी त्यास वाळीत घालावें. यथोक्त प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घ्यावें.

४१ समस्त ब्राह्मणाचे पितृकार्यी वेदपाठो ब्राह्मण सांगावे भोजनास.

४२ समस्त ब्राह्मणाही पितृकार्याचे ठाईं ब्राह्मण बोलावले असतील तितके जेऊं घालावें.

४३ ब्राह्मणाही शूद्राचे घरीं विवाहादिक कर्म शूद्रकमलाकर ग्रंथप्रमाण करावे, वेदप्रमाण न करावें.

श्री भवानीचरणीं तत्पर

आनंदराव सुत यशवंत पवार

निरंतर संवत् १७९२

(रा. लेले यांचा फेरबदल करून घेतलेला उतारा समाप्त.)

परधर्माची लाट देशावर कित्येक शतकें टिकून ओसरली तरी तिचे दुष्परिणाम खरडून काढून स्वधर्म व स्वसंस्कृति यांची स्थापना करण्यास किती कष्ट पडतात हें वरील हकीकत वाचून कळण्यासारखे आहे. अर्थात् अशा प्रकारचे झगडे वरचेवर करण्याचे प्रसंग हिंदूवर आल्यामुळें त्यांना आपली घडी मनाजोगी कधींच बसवितां आली नाहीं. हिंदुसमाजात आगंतुक दोष तसेच कायमचे राहून गेले. तथापि एवढा मोठा हिंदुसमाज आपली संस्कृति व नीतिमत्ता बऱ्याच प्रमाणात टिकवूं शकला, याचे परकीय राज्यकर्त्यांनाहि आश्चर्य वाटले. ज्या मालकम साहेबाच्या ग्रंथातूनच वरील उतारा घेण्यात आला आहे त्या मालकम साहेबाने या बाबतींत दिलेला अभिप्राय मननीय आहे. तो म्हणतो. ‘ हिंदी लोकांत बरेच नैतिक दोष आढळतात. जुलूम व अंदाधुंदीची राज्यपद्धति यांचा तो परिणाम आहे. पण त्यांतून हिंदुस्थान देश आतां बऱ्याच अंशी मुक्त झाला आहे. हिंदुस्थानांत आजवर कित्येक स्थित्यंतरे घडून आली व जुलमी राज्येहि होऊन गेली. इतक्या प्रतिकूल परिस्थितीत हिंदी लोकांतील बऱ्याच मोठ्या जनसमूहाने इतके सद्गुण व नीतिमत्ता कायम राखली, असले उदाहरण जगांत इतरत्र पहावयास सांपडणार नाहीं. त्याचे श्रेय हिंदु लोकांच्या धर्मसंस्थाना, विशेषतः ज्ञातिसंस्थेलाच दिले पाहिजे. ज्या ज्ञातिसंस्थेने त्यांना फार प्राचीन काळीं सांप्रतच्या दर्जास चढविले आहे, त्याच ज्ञातिसंस्थेने त्यांना त्याच ठिकाणीं स्थिर करून ठेवले हेहि खोटे नव्हे. हिंदूंच्या (धर्म) संस्थापासून त्यांना जे फायदे झाले आहेत त्यांपैकींच चोरी, दारूबाजी व अत्याचार यांचा अभाव हे फायदे असून त्याशिवाय कौटुंबिक बंधने व मायापाश यांचीहि योग्यता कमी नाहीं. आतां त्यांच्या कांहीं चाली व भोळसरपणा असा आहे कीं, त्याबद्दल कोणीहि खेदच दर्शवील.’

(Instructions by Sir John Malcolm
Dated 28-8-1821).

प्रकरण चोविसावें

काशीयात्रा

देशांत कोठें ना कोठे धामधूम होती तरी श्रद्धाळू लोक महायात्रा पवित्र कर्तव्य समजून ती पार पडल्यावांचून रहात नसत. आज एकटा मनुष्य महायात्रा करून महिना दीड महिन्यांत आपल्या गांवीं परत येऊ शकतो. त्याला तितकी घाईच असल्यास बारा पंधरा दिवसांतहि तो यात्रा उरकील. पण पेशवाईत काशीयात्रा अशी सोपी नव्हती. बैरागी; संन्याशी किंवा ब्रह्मचारी वगळल्यास बाकीच्या सर्व सांसारिकाना काशीयात्रेस जमावानेच निघणे भाग असे. प्रवास पायी, डोलींतून, किंवा घोड्यावरून करीत. रस्ते हल्लीप्रमाणें बांधून काढलेले नसल्याने बैलगाड्या बसून जाण्याला सुखाच्या असल्या तरी त्या आडरस्त्याने जाऊ शकत नसत. रस्त्यातून घाट, बाऱ्या इत्यादि अडचणींच्या जागीं दग्याची व चोराचिलटाची भीति फार असे. प्रवास फार लांबणीचा. दक्षिणेंतून निघून फक्त वाटेंत रात्रीचा तेवढाच मुक्काम करीत जावयाचे म्हटले तरी नुसत्या प्रयागास पोचावयास चाळीस पंचेचाळीस दिवस लागावे. तेथून पुढे काशी व नंतर गया. त्याला किमान १५।२० दिवस. मिळून एकंदर दोन महिने जाण्यास व तितकेच महिने परत येण्यास. यांचीच बेरीज चार महिन्यावर जाते. परंतु महायात्रा म्हणजे केवळ गंगायमुनांचे किंवा फल्गु नदीचे स्नान करणे आणि काशीविश्वेश्वराचे व विष्णुपदाचे दर्शन घेणे नव्हे. त्या सर्व क्षेत्री गेल्यावर तीर्थश्राद्धे वगैरे अनेक विधि असून त्यांत कांहीं दिवस मोडत. बरे, नानाप्रकारचे कष्ट सोसून मनुष्य इतका दूर देशी आला असल्यामुळें त्याला काशीवास व इतर क्षेत्रांचा वास घडावा असें सहजच वाटून त्याचा मुक्काम प्रत्येक क्षेत्रांत कमी अधिक दिवस पडावा. काशीस गेल्यानंतर कित्येकाना अयोध्या मथुरा यासारखी रामकृष्णादिकांची अवतारकृत्ये जेथे घडली ती स्थळे पहाण्याची इच्छा स्वाभाविकच व्हावी. यदाकदाचित् तेहि शक्य न झाल्यास दक्षिणेंतील आपला गांव सोडल्यावर वाटेने लागणाऱ्या महानद्या व त्यांच्या तीरावरची

तीर्थें येथेंहि मुक्काम पडल्यामुळें काशीयात्रा हा जातायेता मिळून तब्बल सहा महिन्यांचा उद्योग होऊन बसावा.

इतक्या दीर्घ कालीन प्रवासास जो जमाव निघे त्याला लहानशा मोहिमेचे स्वरूप येत असे. यात्रेकरूना कोणास जिंकावयाचे नसले तरी आत्मसंरक्षणासाठीं लढण्याचा प्रसंग आला असतां त्याकरिता जरूर ती तयारी त्याना करावीच लागे. भिल्ल, पेंढार यासारखे लुटारूहि चार दोन किंवा दहापाच नसून त्यांची संख्या शेकड्यानी हजारानी मोजण्यासारखी असल्यामुळें त्यांना तोंड देण्याकरिता तितकेच फौजबंद लोक यात्रेकरू आपल्या बरोबर बाळगीत. सैन्यापाशी अन्नसामग्री पुरविण्याकरितां बाजार असतो तसा यात्रेकरूबरोबर फिरता बाजार निघत असे. सैनिक हे तंबू डेरे राहुटया यांत वाटेने मुक्कामाच्या जागी उतरतात तसे यात्रेकरूहि ठिकठिकाणच्या तळावर तंबू, डेरे, राहुटया पाले ठोकून रहात असत. यात्रेकरू दोनचार हजारापर्यंत धरल्यास त्यांच्या बरोबरचा लवाजमा व फौजफाटा मिळून एकंदर जमाव पांचसहा हजाराच्या घरांत जाण्यास हरकत नाही. यात्रेकरू व त्यांचे सामानसुमान वाहून नेणारी शेकडो घोडी, डोल्या, व गाडे वाटेने चालत. अशा यात्रेची थोडीशी कल्पना आळंदीहून पंढरपुरास आषाढमासी ज्ञानोबाची पालखी जाते तिच्यावरून येण्यासारखी आहे.

पेशवे घराण्यांतील तीन स्त्रियांनीं काशीयात्रा केली होती. त्यापैकीं बाजीरावाची आई राधाबाई हिची यात्रा बाजीरावाच्या हयातींत सन १७३६ सालीं पुरी झाली. राधाबाईची एक कन्या भिऊबाई ही काशीचे प्रसिद्ध सावकार सदाशिव नाईक यांचे चिरंजीव आबूजी नाईक यास दिली होती. सदाशिव नाईक यास दोन पुत्र, वडील पुत्र बाबूजी नाईक व धाकटे आबूजी नाईक. हे दोघेहि बारामतीस रहात असत. राधाबाईचा काशीयात्रेचा बेत झाला तेव्हां सदाशिव नाईक काशीस होते. हा बाईला मोठाच स्थानिक आश्रय होता यांत शंका नाहीं. त्याशिवाय दुसरा आश्रय असा कीं, बाजीराव व चिमाजी आप्पा यांचे गुरु कायगांवकर नारायण दीक्षित यापूर्वी कांहीं दिवस कायगांवाहून काशीस रहावयास गेले होते.

दीक्षितांचे प्रयाण ता. २१-१०-१७३४ रोजीं घडले. दीक्षित काशींत आहेत या आधारावरच राधाबाई त्यांच्यामागून पांच सात महिन्यांनीं काशीस

जाण्यास निघाल्याचें दिसून येते. तिने आपल्याबरोबर आपल्या जावयाचा वडील भाऊ बाबूजी नाईक यास घेतले होते. बाबूजी नाईक शूर व आप्त असल्यामुळें तो राधाबाईस यात्रा करून सुखरूप देशी परत आणील याविषयीं बाजीराव व चिमाजी आप्पा यांस खात्री होती. बाई वाटेनें जयनगरावरून (जयपूर) गेली. तेथें तिचा मुक्काम आषाढमासीं पंधरा दिवस महाराज सवाई जयसिंग यांजकडे होता. जयपुराहून मार्ग क्रमीत राधाबाई व बाबूजी हीं कार्तिक शुद्ध द्वादशीस काशीस पोचली. दानधर्म कसा झाला याचे वर्णन नारायण दीक्षित यांनीं बाजीराव व चिमाजी आप्पा यांस लिहिलेल्या पत्रांत पुढीलप्रमाणें केले आहे. 'येथील वर्तमान. तरी राधाबाई कार्तिक शुद्ध द्वादशीस श्रीस आली. त्रयोदशीपासून तीर्थविध आरंभिला. तो सर्व करून पौष वद्य पंचमीस स्वार होऊन गयेस गेली. येथें जो धर्म जाहला तो पत्री लिहिता येत नाहीं. परस्पर लोक सांगतां कळो येईल. आम्हांस पुशिले परंतु नाहीं. पंचवीसा तीसामध्यें (हजार) तर उत्तम धर्म होता. लोकोत्तर कीर्त होती. परंतु ईश्वरास कर्तव्य ते जाहले. महाराष्ट्र ब्राह्मणांस येक कपर्दिका कोणास पावली नाहीं. व चित्तपावनास उत्तम प्रती पाचासातास दाहापर्यंत पावले. वरकडास एक दोन पावले. दाहापाचास कपर्दिकहि पावली नाहीं. व येक कराडी बायको महादाजीपंताची माय आली होती तिने आपल्या ज्ञातीस सर्वांस दाहदाह रुपये पाविले. वरकड सर्व जातींस तीन तीन रुपये पाविले. हे तुम्हांस पररस्पर कळेलच. यानंतर बाईच्या धर्मामध्यें आपण मन घालून धर्म करवावा तर आपणांस काशी सोडून देशास जावे लागेल, यास्तव आपण बोललो नाहीं.' (पे. द. ३०).

नारायण दीक्षितांच्या तक्रारीचा आशय असा कीं, बाईनी पंचवीस तीस हजार रुपायाहून जास्ती रकमेचा दानधर्म काशीस केला, परंतु तो तारतम्य पाहून केला नसल्यामुळें महाराष्ट्र ब्राह्मणांना दक्षिणा मिळावी तितकी मिळाली नाहीं व इतर ब्राह्मणांना जास्ती मिळून बाईच्या लौकिकांस उणेपणा आला. याचे कारण बाईचे सल्लागार महाराष्ट्रीय भिक्षुक नव्हते, काशीचे गौड ब्राह्मण किंवा पंडे वगैरे लोक होते. नारायण दीक्षितांना ही व्यवस्था बदलता आली असती, परंतु तसे केल्यानें स्थानिक गौड आदिकरून ब्राह्मणांशीं वाकुडपणा येऊन दीक्षितांना काशींत नांदणे बिकट झाले असते. असो. अशा रीतीने बाईने काशी आटोपून गया केली व ती बढवाई वेरूळ या मार्गानें मे सन १७३६ च्या सुमा-

रास पुण्यास आली. दीक्षितांच्या पत्रांतील दक्षिणेचा आकडा लक्षांत घेतां बाईला यात्रेचा खर्च लाख रुपये आला असावा.

बाजीरावाची पत्नी काशीबाई व सून म्हणजे जनार्दनपंताची पत्नी सगुणाबाई यांच्या यात्रा नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीत झाल्या. काशीबाई काशी यात्रेस ता. १६-२-१७४६ रोजीं निघाली. तिजबरोबर तिचा भाऊ कृष्णराव महादेव जोशी चासकर हा होता. त्याशिवाय विसाजी दादाजी नांवाचा खासगी कारभारीहि नानासाहेबानें दिला होता. बाई कायगांव-टोके, वेरूळ, ब्ऱ्हाणपूर, सिरोंज, काल्पी या मार्गानें प्रयागास गेली. तिचा मुक्काम प्रयागास फाल्गुन वद्य अष्टमीस होता. प्रयागाहून काशी व काशीहून गया असा तिचा पुढील प्रवास शिरस्त्याप्रमाणें झाला. तिच्या यात्रेचा बंदोबस्त उत्तर हिंदुस्थानांत मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यांजकडे होता. सामान्य व गरीब लोकांना स्वतंत्रपणें यात्रा करणें अवघड असल्यामुळें कोणातरी राजाच्या, संस्थानिकांच्या किंवा त्यांच्या कुटुंबातील स्त्रियांच्या आश्रयानेंच यात्रेस निघावे लागे. कारण फौजेचे संरक्षण हें यात्रेतलि मुख्य होऊन बसलेले साधन इतरांना सुलभ नव्हते. काशीबाई सिरोंज येथें पोचली, तेव्हां तिजजवळ दहा हजार यात्रा जमली होती. त्यावेळीं यात्रेला जकातीच्या बाबतींत दिल्लीच्या बादशहाचा किंवा अयोध्येच्या नबाबाचा माफीचा दस्तक मिळाल्यास यात्रेतील मोठीच अडचण दूर होत असे. अशा प्रकारची माफी पेशव्यासारख्या थोरांनांच शक्य असल्यामुळें यात्रेकरूंना त्यांचा आश्रय करण्यास तेहि एक निमित्त होतेच.

काशीबाईकरिता दिल्लीहून दस्तक मागविला होता. तो सिरोंजेस लवकर न आल्यावरून काशीबाईचा त्या गांवी ८।१० दिवस मुक्काम पडला. बाईचे वय यावेळीं ४२ वर्षांचे असावे. सारांश, या वेळी ती तरुणच समजण्यास हरकत नाहीं. केवळ पतिनिधन लवकर झाले म्हणूनच तिला या वयांत काशीयात्रा करणें शोभले. बाई शांत व गरीब स्वभावाची असल्याचे सरदेसाई म्हणत असले तरी प्रस्तुत यात्रेंत तिचा स्वभाव बरोबरचा कारभारी विसाजी दादाजी याच्या अनुभवास आला त्यावरून बाई धर्मनिष्ठ पण बरीच आग्रही व तापट असावी. सिरोंज येथेच बाईच्या पायास व्यथा झाली होती. त्यांतून तिला बरे वाटून काशीविश्वेश्वराचे दर्शन कसें घडतें याची काळजी विसाजीस होती. पुढें त्या व्यथेनेच असेल, बाईला दोनचार दिवसानी मधून

मधून ज्वर येऊ लागला, तथापि तिचा काशीस जाण्याचा निर्धार कायम राहिला हे तिच्या धर्मनिष्ठेचे लक्षण समजता येईल. काल्पहून पुढे यमुनेपर्यंत मराठ्यांचाच अंमल असल्यामुळें दग्याची भीति नव्हती. पण यमुना उतरताना विसाजीला संरक्षणार्थ अधिक फौजेची जरूरी वाटल्यावरून नारोपंत (नारोशंकर राजेबहाद्दर) फौजेनिशी मदतीस आले. व सर्व यात्रा यमुनापार झाल्यावर परतले. तथापि बाईस सिरोंजहून काशीस पोचण्यास जुलई महिना निम्मा झाला; म्हणजे एवढ्या प्रवासातच उणे पुरे चार महिने मोडले.

बाई काशीस गेली तेव्हां काशीचा राजा बलवंतसिंग होता. त्याने ती पेशव्याची आई म्हणून आपल्या राजवाड्यांतच तिला रहावयास जागा दिली. पण बाईबरोबरची उंटे घोडी वगैरे जनावरे त्याने दुसरीकडे ठेवली. जनावरे दृष्टिआड राहिल्याचा चटका बाईला असा बसला कीं, त्यांतील पांच घोडी चोरीस गेली. बाईच्या कारभाऱ्यांचा वहीम बलवंतसिंगावर. त्यांच्या मते, असली चोरी बलवंतसिंगाचे अंग असल्यावांचून व्हावयाची नाहीं. त्याने दोन घोडी आणून दिली. पण त्यामुळें तर चोरीचा वहीम त्याला चांगलाच चिकटल्याने बाईची घोडी त्याजपाशी ओघानेच मागण्यांत आली. तेव्हां बलवंतसिंग चिडला. तो सुभेदार मनसूर अल्लीच्या ताब्यांतील, म्हणून त्याने मनसूरचे कान भरून बाईला लवकरच काशीबाहेर घालविण्याची मसलत सुचविली व कारण असें सांगितले कीं, बाईजवळील लोक फौजेच्या जोरावर आपल्याशी कज्जा करतात. मनसूरने बाईस श्रावणअखेर काशीत रहाण्यास सवड दिली. परंतु श्रावण मास म्हणजे ऐन पावसाळा, त्यांत बाई काशींतून निघून गयेस सुरक्षित कशी जाणार असा विचार विसाजीस पडला. तो लिहितो 'श्रावण जाहलीयावर हा जा म्हणेल तेव्हां पुढें जावे; तरी पर्जन्य बहुत, मार्ग चालत नाहीं. उंट न चालत. पुढें जाणे कैसे होईल हें संकट आहे.' [पे. द. ४०]

पण बलवंतसिंग इतका चिडला होता तरी या वादाचा निकाल बाईला अनुकूल असाच लागला. कारण बाई कार्तिक वद्यांत गयेस गेली. अर्थात् तिने पुढें चार महिने काशीवासच केला. बाईचा कारकून गोविंद कृष्ण हा नानासाहेबास ता. २७-११-४६ रोजीं पाठविलेल्या पत्रात म्हणतो, 'येथील क्षेमतागायत. कार्तिक वद्य ९ जाणून लोक सहवर्तमान सेवकाचे वर्तमान यथास्थित असो विशेष. श्रीहून मातुश्री ताई समागमे सेवा करीत मजल दरमजल गयेस आलो.'

काशीबाई गयेहून काशीस ता. १ जानेवारी सन १७४७ रोजीं म्हणजे महिन्या-सव्वा महिन्यानी परत आली. त्या सुमारास नबाब अमीरखान मारला गेल्यामुळें जमीनदार गडबड करू लागले. दिल्लीहून नव्या सुभेदाराची नेमणूक होईपर्यंत गडबड थांबणारी नसल्यामुळें काशींत अधिक मुक्काम करणे धोक्याचें होते. बाईचा इरादा काशींत शिवरात्रीपर्यंत रहाण्याचा. शिवरात्रीला अवकाश महिना दीड महिना. तेव्हां हें जमावे कसें ? बाईबरोबर यात्राहि थोडी थोडकी नव्हती, तीस चाळीस हजारापर्यंत होती. बाई पुढें तर असें म्हणू लागली कीं ' मी काशींत आणखी एक वर्ष रहाणार. तुम्हास कोणास रहाणे असेल तरी रहाणे. नाहीतर जाणे. ' नानासाहेबाची पत्रे त्रिस्थळी होताच निघावे अशी होती. काशीचा राजा बलवंतसिंग व मनसूर अल्लीखान विरुद्ध, म्हणूनहि रहाणे अनिष्ट. बाई कोणालाच जुमानीना. रामचंद्र बाबा शेणवी त्यावेळीं बुंदेलखंडांत असल्यामुळें बाईचे कारभारी त्याचीहि सल्ला घेत. विसाजी दादाजींची पत्रे दिल्लीस बापूजी महादेव व दक्षिणेत नानासाहेब यांस गेली. त्यांची उत्तरे काशीतून लवकर निघा अशी आली. मल्हारराव होळकर व जयाप्पा शिंदे यानीहि तगादा लावला. तेव्हां बाई रामचंद्रबाबाला लिहिते, ' मला संकट पडले आहे. कैसे म्हणाल तर माझ्या चित्तात काशीत दोन चार महिने रहावे. परंतु हे मला बळेच ओढून काढतात......माझे रहाणे काशीत होय ते करावे हे आशीर्वाद ' (पे. द. १८) बाई अशा रीतीने बळकटीला आली तेव्हां बरोबरचे बाईचे बंधू कृष्णराव [चासकर] यानीहि त्रागाच करण्याचे ठरविले. ते बाईस म्हणाले, ' तुम्ही यमुना उतरीत नाहीं तरी आपण वेणींत जीव देतो. ' असें सांगून ते डेऱ्यातून निघून गंगातीरी गेले. विसाजी दादाजी, रामचंद्र बाबास कळवितो ' आम्ही बहुता प्रकारे सांगोन याच्या डेऱ्याजवळ मातुश्रीस नेऊन त्यास राहवून निदानी इतकाच विचार केला की, तुम्ही यमुना उतरून कालपीच्या घाटास चला. तेंथे राजश्री मल्हारराव, व रा. जयाप्पा व रा. बाबा आहेत. ते सांगतील तैसा विचार करावा. इतके ठरवून येथून कूच करावेसे जाले आहे. उद्या कूच करून पुढे येणार पण विश्वास येत नाहीं. घडीघडी विचार नवेच होतात. ये सोबतीने यावयाचे आम्ही कबूल करीत नव्हतो. त्यास बहुता प्रकारे श्रीमंतानी सांगोन समागमे लावून दिल्हे. आजी पावेतो तिरस्थली यात्रा उत्तम प्रकारे सर्वांची झाली. या उपरी हे विघ्न निर्माण झाले. आम्ही गरीब माणूस, हे

तो संकट येऊन पडले. जर तुम्हा पावेतो पावेस केले आहे हे घडून आले म्हणजे पुढें आपण विचार करणे तो करतील.' [पे. द. ४०] बिचारा विसाजी अगदींच भेदरला. त्याला आपण मोठ्याच्या लचांडांत कोठून सांपडलो असें झालें. रामचंद्र बाबा उत्तरेंत होता. त्याजवर नानासाहेबाचा विश्वास असल्याने त्याची आणि मल्हारराव होळकर, जयाप्पा शिंदे यांची गांठ पडण्यासाठीं विसाजी अगदीं उत्कंठित झाला. विसाजीचे हे पत्र फेब्रुवारींतील आहे. तेव्हां याच वेळी बाईला यात्रेस निघून एक वर्ष झाले होते. बाईने याच सुमारास गंगा काठचे बहादुरपुरा या गांवाहून मल्हारराव व जयाप्पा याना पत्र लिहिले आहे. त्यांत ती म्हणते ' श्रीहून [काशीहून] निघोन गयेस जाऊन तेथील यात्राविधि संपादून पौष शुद्ध चतुर्थीस कूच करून मजल दरमजल मुक्काममजकुरी आलो. तेथून एक दो रोजा सत्वरच निघोन प्रयागास माघस्नानास जात आहो.' [पे. द. १८] बाई प्रयागास माघस्नानाकरिता आली असल्यास आषाढ महिन्याच्या सुमारास पुण्यास पोचली असावी. अशा रीतीने तिच्या यात्रेस सवा वर्ष सहज लागले असेल.

काशीबाईमागून तिची सून जनार्दनपंताची बायको, सगुणाबाई ही काशीयात्रेस जाण्यास ता. १०-३-१७५७ रोजीं म्हणजे अकरा वर्षांनीं निघाल्याचे दिसून येते. या दोन्ही सासवासुनांच्या यात्रा पेशव्यांचे वैभव मध्यान्ही असतांना झाल्या. बहुतेक स्त्रिया पतिनिधनानंतरच यात्रेला जात असत. कारण पतीच्या हयातींत त्या संसारांत गुंतलेल्या असल्यामुळें त्यांना यात्रा करण्यास फुरसत नसे व यात्रेस जाण्याची निकड किंबहुना गरजहि वाटत नसे. पेशवे घराण्यांतील स्त्रियांनीं पाणिपतच्या युद्धापर्यंतच काशीयात्रा केली असेल तेवढीच. त्यानंतर कोणाहि स्त्रीस यात्रेचा योग आला नाहीं. माधवरावाची आई गोपिकाबाई काशीयात्रेचा ध्यास घेतच मरण पावली व राघोबाची पत्नी आनंदीबाईहि यात्रेवांचून अशीच तळमळत इहलोक सोडून गेली. तिनें याविषयीं काढलेले उद्गार महत्त्वाचे आहेत. बाईंचे बोलणे कोपरगांवाहून कारभाऱ्यांनीं नानाला येणेंप्रमाणें कळविले. ' महायात्रेस जाण्याची गोष्ट निघाली. पूर्वी माधवराव असतां थोरली बाईचे (गोपिकाबाई) जाणे जाले नाहीं. त्यापक्षी आतां कोण पाठवितो ? घरांतील म्हातारी भोवते आहेत. ' या उद्गारांतील आशय बारभाई आम्हा बायकांना विनाकारण छळतात असा आहे. बाई स्वतःसंबंधीं म्हणते,

'महायात्रेस जाण्याची हौस आहे. परंतु आमचे हातून (नाना) धर्म होऊं देत नाहीं. धर्म झाल्यास चळ होईल. पदोपदी आम्हांस जपतात.' आनंदीबाई गोपिकाबाईच्या यात्रेविषयीं पृच्छा करते. 'बाई महायात्रेस किमर्थ जात नाहीं? गनिमाई म्हणावी तर पूर्वीं ताईसाहेब गेली. तेव्हां धनी होते. आतां कोण आहे? त्यापक्षी जाणे कठीण.' (पे. द. ४४) ताईसाहेब म्हणजे बाजीरावाची स्त्री काशीताई ही गनिमाई म्हणजे मुसुलमानांची धामधूम काशीच्या आसपास असतांच काशीस गेली. कारण खुद्द नानासाहेब, भाऊसाहेब, दादासाहेब यांज-सारखे कर्ते पुरुष जिवंत होते म्हणून तिचे जाणे झाले. असो. आनंदीबाईने सांगितले तेच कारण खरे. पुढील काळांत पेशवे घराण्यास स्वास्थ्य लाभले नाहीं व त्यांच्या उत्तरेकडील सत्तेस ओहटीहि लागली.

सगुणाबाईच्या प्रवासाचा सुगावा काल्वीपासूनच लागतो. काल्पीहून ब्रह्मा-वर्तास गंगातीरी ती तिसऱ्या दिवशीं पोचली. तेथें तीर्थविधि व गंगास्नान झाले. तेथें तिचे चौदा दिवस रहाणें पडले. बरोबर तुबाजी अनंत नांवाचा कारभारी होता व इतर यात्राहि बरीच होती. ब्रह्मावर्तास जास्ती मुक्काम पडण्याचे कारण असे कीं, काशीचा राजा बळवंतसिंग व अयोध्येचा सुभा यांचा बिघाड झाल्या-मुळें सुभेदार दहा पंधरा हजार फौज घेऊन काशीवर आला व काशीहून बळ-वंतसिंग पळून डोंगरांत गेल्याकारणानें त्या बाजूला धुंद माजली. मातबर लोक काशी टाकून गेले. अशा स्थितींत पुढें जाण्याची पंचाइत पडली. नानासाहेबाने नबाबास व प्रयागच्या सुभ्यास देण्याकरितां सगुणाबाईबरोबर पत्रे दिली होती. ती तुबाजी अनंत यानें पुढें पाठविली व मागाहून नबाबाकडे नारोपंत नांवाचा गृहस्थहि रवाना केला. त्यांची उत्तरे आल्यावर यात्रा प्रयागाकडे जाण्यास निघाली. ती कुरा–जहानाबादेवरून प्रयागास सन १७५९ त फाल्गुन वद्य चतुर्द-शीस पोचली. तेथें त्रिवेणीसंगमावर त्रिरात्र राहून बाईंने तीर्थविधि उरकला व चौथ्या दिवशीं काशीकडे रवाना झाली. बाई काशीस रामनवमीस आली. तेथें ८ दिवस राहून व तीर्थविधि उरकून तिनें गयेकडे कूच केले. गयेस ती चैत्र शुद्ध प्रतिपदेस पोचली. सगुणाबाई विधवा, पोटी पुत्रसंतान नाहीं, केवळ दीरांच्या मर्जीवर अवलंबून. त्यांनीं कृपा केली म्हणून तिला यात्रा घडली. त्या कामी भाऊसाहेब पेशव्याकडे पुढारीपण असून सगुणाबाईची बहुतेक पत्रे त्यालाच उद्देशून लिहिलेली आहेत. त्या पत्रावरूनहि बाई एकंदर परिस्थिति

लक्षांत घेऊन वागत असल्याचें दिसून येते. पत्रांची धर्ती पाहिली असतां बाईचा स्वभावहि गरीब असल्याविषयींच खात्री पटते.

भाऊसाहेबांची इच्छा सगुणाबाईने काशीयात्रा संपल्यावर मथुरा, वृंदावन हींहि पाहून यावें अशी होती. तिकडे लक्ष देऊन तिनें प्रयागाहून झाशीस परत आल्यावर भाऊसाहेबांस पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें, ' अपत्ये सगुणेने नमस्कार विनंति येथील क्षेम त॥ फाल्गुन वद्य पंचमी मुक्काम झाशी येथास्थित असो विशेष. वडिलांचे आशीर्वाद पत्र छ ९ रविलाखरचे आले ते पावोन वर्तमान कळले. श्रीप्रयागचे मुक्कामीहून पत्र पाठविले होते त्यावरून वर्तमान कळेल. माघस्नान करून प्रयागीहून माघ वद्य सप्तमीस निघालो तो झाशीस फाल्गुन शुद्ध चतुर्दशीस आलो. वडिलांची आज्ञा मथुरेस जावयाची आली होती. त्यास त्या प्रांती धामधूम झाली याकरितां परभारे झाशीस आलो. सांप्रतहि जावयाचा हेतु आहे. याजकरितां तीर्थरूप राजश्री दादाकडे पत्र लिहिले आहे. आज्ञा झाली तरी जाऊं, न झाली तरी देशास येऊं बहुत काय लिहिणे हे विनंति. (पे. द. १८).

सगुणाबाई झाशीहून ओंकारमांधाता येथें आली. तेथून तिनें ता. १३-४ १७५९ रोजीं म्हणजे एक महिन्यानें नानासाहेबास पत्र लिहिलें. ती म्हणते ' छ ८ जमादिलोवली कृष्णातीरचे मुक्कामचें पत्र लिहिले तें छ १ रजबीं सिरोंजचे मुक्कामीं पावले. समाधान झालें. दिल्लीकडे गडबड झाली आहे. मथुरेस एकंदर न जाणे म्हणून आज्ञा. त्यास, अंतरवेदींतून पत्र लिहिलें त्याजवरून श्रवण झालेच असेल. त्या उपरांत झाशीस आलों, चहूकडील बातम्या आणून मथुरेस जावे हा निश्चय होता. तों फारच अनिवार पठणाची फौज. दिल्लींत वतुळाकार करून मथुरा मारिली; आण आगरीस (आग्र्यास) फौज पठाणाची आली. हें अकस्मात् वर्तमान आल्यानंतर तमाम झाशींतील प्रजा परागंदा झाली. तमाम संस्थानिक राजे दतियेकर वगैरे यांच्या मुलकांत जागा जागा चोऱ्या होऊं लागल्या. तीर्थरूप राजश्री दादा इंदुरी आले होते. मथुरेस जाणे तों सहजच राहिलें. झाशीस आठ पंधरा दिवस रहावे तरी दिवसेंदिवस पठाण फारच शेर झाला. राजश्री अंताजी माणकेश्वर व नारो शंकर व समशेर बहाद्दर व गोविंद बल्लाळ यांचे चिरंजीव पठाणापासून वीस कोसावर राहो लागले. पठाणाचीं दौड फार हे जाणून दोन चार दिवस झाशीस राहून निघोन दर मजल सुरोंजेस

आलो. तेथें वडिलांची आज्ञा आली कीं, मथुरेस न जाणें. त्याजवरून निघोन उज्जनीस त्रिरात्र राहून येथें आलो. येथील तीर्थविधि झाल्यानंतर त्रिंबकास जाऊन देशास येऊं. येथून कूच उदईक करून चवथे पांचवे दिवशीं बुऱ्हानपुरास जाऊं. येथून कासिरीच्या घाटे (कासार बारी) घाट चढून येवलियावरून नाशिकास जाऊन तेथून पुनः सविस्तर वर्तमान शेंवेसी लिहून पाठवूं.' (पे. द.)

सगुणाबाईप्रमाणें पेशव्यांच्या आप्तापैकीं कोणी दुसरी स्त्री येसूबाई सन १७५७ त काशीयात्रेस गेली होती. तिच्याबरोबर तिच्या लव्याजम्यापैकीं व इतर यात्रेकरू माणसें बरीच होती. त्यांनीं बरोबर राघोबादादाची पत्रें घेतली होती. हेतु असा कीं, त्या त्या ठिकाणच्या मुसलमान अगर हिंदु अधिकाऱ्यांना ती दिली असतां कराची किंवा इतर तसदी लागूं नये. परंतु त्या पत्रांचा कांहीं उपयोग न होतां जो त्रास पडावयाचा तो पडला. अथवा जास्तीच पडला. या मंडळीचा मुक्काम काशी–गयेच्या बाजूस कोठेतरी असतां त्यांजपासून पैसा उकळण्याकरितां पठाणानें त्यास पकडून ठेवले. तेव्हां त्यांनीं रुपये आणण्यासाठीं गयेस माणूस पाठविला. तो परत येण्यापूर्वींच पठाण या मंडळीना घेऊन निघाला. पाठविलेला माणूस पैसे घेऊन परत येत असतां वाटेंत त्याचे रुपये मारून नेण्यांत आले. ही मंडळी पठाणाच्या लष्करांत आठ दिवस होती. मग लष्कर गयेस आल्यावर त्यांनीं राहिलेली बाकी दिली, तेव्हां त्यांची सुटका झाली. यात्रेंत करांचा मोठाच जाच होत असे. ' गयेस खापरास ९। रु. गरीब असेल त्याजपासून ८। रु. माणसीं कर घेण्यांत आला, तेव्हां गया वर्जनें झाली. अशा रीतीनें त्यांजपासून गयेस ३५ हजार रुपये घेतले. दाऊदनगर येथें जीवास एक पावला घेतला. काशीच्या राजानें दर जीवास जातेसमयीं अर्धा रु. व येतेसमयीं अर्धा रु. एकूण ४ हजार रु. घेतले. व ज्या कोणी नवी सणगे खरेदी केली होती त्यांजपासून जकात घेतली. तिचे रुपये एक हजार झाले. येणेप्रमाणें ६२ हजार रुपये यात्रेस पडले.' पठाणानें यात्रेपासून रु. घेतले हे वर्तमान रघुनाथरावास कळल्यावर त्यानें पठाणास व सुभ्यास पत्रें पाठविलीं. पण त्यांचा उपयोग झाला नाहीं. या ६२ हजारात पेशवे यांच्या बाईस १० हजार रु. पडले व बाकीचे रु. यात्रेकरूंस पडले. यांत पेशव्यास अर्थात्‌च कमीपणा आला. तेव्हां ' जे गोष्टीनें रुपये माघारे येत आणि स्वामींचा नक्ष राहे तो अर्थ झाल्यानें सर्वांस संतोष आहे.' असें तिनें पत्रांत शेवटीं म्हटलें आहे. (पत्र नंबर

१४६ पे. द. १८) यात्रेस गेलेली ही येसूबाई राघोबास चिरंजीव लिहिते.

सरदार पटवर्धनापैकीं त्रिंबक हरि पटवर्धन याने सन १७६९ त काशी-यात्रा केली. यात्रा संपवून तो पुण्यास आला तेव्हां एकव्या पुण्यांतच दोन हजार लोक उतरले. यावरून त्याजबरोबरच्या जमावाची कल्पना येते. यासंबंधाने रामाजी नारायण गोखले पुण्याहून मिरजेस लिहितो, 'आज गांवात श्रीची यात्रा दोन हजार पावेतो आली.'

काशीयात्रेची एक यथास्थित हकीकत रा. वासुदेवशास्त्री खरे यांनीं ऐ. लें. संग्रहाच्या सातव्या भागांत दिली आहे. पटवर्धन सरदारांपैकीं अत्यंत शूर सरदार गोपाळराव पटवर्धन यांची पत्नी सरस्वतीबाई सन १७८३ च्या आक्टोबर महिन्यांत मिरजेहून काशीयात्रेस निघाली. मराठ्यांचा मुलुखगिरीवर निघण्याचा व यात्रेचा काळ एकच. कारण या सुमारास म्हणजे आश्विन मासी पावसाळा संपत आला असून दिवस एकंदरीनें उघडिपीचे असतात. धड पावसाळा संपला नाहीं व थंडीहि सुरू झाली नाहीं अशा या काळीं प्रवास कमी त्रासाचा असल्यामुळेंच यात्रेला काय किंवा मोहिमेला काय, मराठे हेच दिवस पसंत करीत. सरस्वतीबाई यात्रेस निघणार ही आवाई मिरजेच्या आसपास सांगली, कुरुंदवाड, गणेशवाडी, हरिपूर, तासगांव, इचलकरंजी, जमखिंडी, तेरदाळ, मनोळी, नरगुंद, रामदुर्ग इत्यादि गांवी आधींच होऊन सरस्वतीबाईनें मिरज सोडली तेव्हां पांच चारशे यात्रेकरू तिच्या बरोबर मार्गस्थ झाले. बाईंचे दीर बाळासाहेब यांनीं बाईंच्या दर्जास शोभेसा उंट, घोडे, डोल्या, स्वार, प्यादे शागीर्द इत्यादि लवाजमा दिला होता. यात्रेचा परचक्रापासून बचाव करण्याकरितां सैन्यात वाटेनें आघाडीपिच्छाडीचा ज्या रीतीने बंदोबस्त ठेवतात त्या रीतीनें यात्रेचा बंदोबस्त ठेवण्यांत आला होता. यात्रेच्या आघाडीला पटवर्धनांचे आप्तइष्ट व आश्रित यांपैकीं गोविंदपंत सखदेव व चिंतोपंत चालत, मध्यें कानोपंत रहात व पिच्छाडीचें रक्षण बळवंतराव यादवाडकर करीत. मार्ग क्रमताना ही व्यवस्था होती. पण तळावर मुक्काम पडला म्हणजे रात्रींच्या वेळीं अधिकच काळजी घ्यावी लागे. तेथें प्रमुख लोक रात्रीं जागून आळीपाळीनें गस्त घालीत.

यात्रेकरूंत आठरा पगड जातीचे लोक असत. पटवर्धनांची भाऊबंद मंडळीं व आप्तइष्ट होतेच. पण त्याशिवाय शास्त्रीपंडित, भिक्षुक हरिदास, पुराणिक, अग्निहोत्री हे असून त्यांतील कित्येकांना नीट घोड्यावर बसतां येत नसे किंवा

बसण्याची शक्ति नसे. पुरुषाप्रमाणें स्त्रिया असत व त्यांतील कांहीं निघतानांच गरोदर असत किंवा वाटेंतच गरोदर रहात. स्त्रिया प्रवासातच प्रसूत होत व त्या गर्दीत कांहींची अर्भकें आबाळीने प्राणास मुकत. इतकेंच काय, पण केव्हां केव्हां बाळंतीण स्त्रीसहि मृत्युमुखी पडण्याची पाळी येई. वाटेनें लग्नें लागत नसत एवढेंच कमी, बाकी मुंजीसुद्धां उरकून घेतल्या जात. रोज चार दोन माणसे तरी घोड्यावरून खालीं यावी व चार दोन माणसांना घोडी एकमेकांस चावू लागली किंवा कळवंडून एकमेकांस लाथा देऊ लागली म्हणजे लाथा मिळून ती घायाळ व्हावी. रोगराईचें संकट त्याशिवाय. यात्रेकरूं सर्वच सुस्थितीतील नसत. त्यांत कंगाल बहुत. त्यामुळें जेथें मुक्काम पडे तेथें गलिच्छपणा माजून महामारीसारखी साथ उद्भवल्यावाचून रहात नसे. त्या साथींत किती माणसे मरतील यास गणतीच असू नये. रोगाशिवाय दुष्काळाचेंहि संकट गुदरावे. निघतांना देशांत सुकाळ असला तरी कांहीं मजली गेल्यावर दुष्काळ भेटावा. मग माणसांच्या व जनावरांच्या हालाना पारावारच उरू नये. सांप्रत आगगाडीच्या साधनामुळें कोठे दुष्काळहि नाहीं व सुकाळहि नाहीं. सर्वत्र गुढग्याइतके पाणी. एका भागांतील दुष्काळाचे दुसऱ्या भागामधून धान्य येऊन निवारण होऊं शकते. पण त्या काळांत तशी स्थिति नव्हती. म्हणजे दुष्काळ आला कीं, त्या प्रदेशांत रहाणाऱ्या मनुष्याला अन्नाची भ्रांति पडून माणसाने माणसाला खावे असा कडाका उडावा. उलटपक्षी सुकाळांत दाणामाती बरोबर होऊन अन्न वाया जावे.

काशीयात्रेचा रस्ता अशा रीतीनें आखलेला होता कीं, मोठ्या नद्या, तीर्थें व क्षेत्रें सहज लागावी. महाराष्ट्रांतून काशीस जाताना मोगलाई, खानदेश, नेमाड, माळवा, बुंदेलखंड इत्यादि प्रांतांतून मार्गक्रमणा होत असे. वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक भेटत. वाटेवरील मुक्कामाच्या गावांच्या दाट परिचयाने त्यांची खडान्‌खडा माहिती होऊन समयज्ञता, चतुरस्रता, प्रसंगावधान, धाडस, युक्तिबाजपणा इत्यादि गुण मनुष्यांत यावे. हल्लीं आगगाड्या, मोटारी यांतून प्रवास करून मनुष्याला देशस्थितीचे जे ज्ञान मिळते त्याहून शेकडो पटीनी अधिक बिनचूक व परिपूर्ण ज्ञान तेव्हां लाभावे. किंबहुना सध्याची प्रवासाची साधने देशस्थितीचे ज्ञान मिळविण्याची नसून केवळ अंतर तोडण्याची साधने आहेत असे म्हणणेच यथार्थ ठरेल.

सरस्वतीबाईनी सन १७८३ च्या आक्टोबर महिन्यात मिरज सोडली, त्या-वेळी पुढील सर्व अडचणी लक्षांत आणून परशुरामभाऊ पटवर्धन व खुद्द पेशवे यांची पत्रे शिंदे, होळकर, इंग्रज इत्यादिकास घेतली होती. मिरजेहून रहिमत-पूर व रहिमतपुरावरून बारामती या मार्गानें जाऊन यात्रेने भिमेच्या काठचे गार–दौंड गांठले. गार–दौंडापर्यंत ठिकठिकाणीं नवी याला येऊन मिळतच होती. गार–दौंडाहून सरस्वतीबाई दरकूच दरमजल करीत कायगांव टोक्यास पोचल्या. कायगांव व टोके ही दोन क्षेत्रे व त्यांच्या शेजारी प्रवरासंगम हें तिसरे क्षेत्र आहे. मिरज सोडल्यापासून हीच तीन महत्त्वाची क्षेत्रे होत. संख्येने ती तीन असली तरी सान्निध्यामुळें त्या सर्वांस एकच क्षेत्र समजण्यास हरकत नाहीं. या स्थळीं प्रवरा नदी गोदावरीस मिळाली असल्याने प्रवरासंगम क्षेत्राचे पावित्र्य विशेष समजण्यांत येते. गोदावरी नदीची गणना महा नद्यांत असून ती जेथे भेटेल तेथे निदान त्रिरात्र मुक्काम करावा. पहिल्या दिवशी उपोषण व दुसऱ्या दिवशी तर्थिश्राद्ध उरकावे असा क्रम असे. तथापि बाईनी तीन दिवसा ऐवजी सात दिवस तेथे मुक्काम केला. या मुक्कामास चोहोकडची यात्रा आणखी जमून मूळ यात्रा नदीच्या प्रवाहाप्रमाणें एकसारखी फुगत चालली. कायगांव, टोके व प्रवरासंगम या तीन गांवात यात्रा पांगली होती तरी ती चार हजारापर्यंत असावी असा बाईनीं तर्क केला. त्या काळीं वेदशास्त्र हाच ब्राह्मणांच्या मुलांचा मुख्य अभ्यास. ती विद्या शिकत असताना एखाद्या तामसी गुरुजीपाशी न जमले तर विद्यार्थी पळून दुसऱ्या गुरुजीकडे निघून जात. तसे हरिपुराहून टोक्यास आलेले तीन विद्यार्थी बाईला भेटले. बाईनी त्यास परत घरी जावयास सांगितले अस-ताहि मुलानी ते ऐकले नाहीं. त्या काळीं कायगांव–टोके हे प्रसिद्ध क्षेत्र असून त्यांत विद्वान् ब्राह्मणांची अनेक घराणी होती. त्याच ब्राह्मणवर्गात नारायण दीक्षित पाटणकरांचे घराणे व नारायण दिक्षितामुळें पेशवे व इतर सरदार यांचे कायगांवास येणे जाणे, या कारणाने सदर क्षेत्र भरभराटीस आले होते. काय-गांवास आल्यानंतर बाईना उत्तर हिंदुस्थानांतील बातम्या उडत उडत समजून काशीक्षेत्रांत दुष्काळ पडला असल्याची वार्ता कळली. त्याबरोबर यात्रा गड-बडली. तथापि काशीविश्वेश्वरावर हवाला टाकून तेथून पुढे जाण्यास बाई हलल्या.

यात्रेचा मार्ग असा होता कीं, त्यातून दर्शनीय क्षेत्रे गळू नयेत. कायगांवास गोदातीर सोडल्यावर यात्रा वेरूळला आली. वेरुळास घृष्णेश्वर हे बारा

ज्योतीर्लिंगापैकीं प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. देवालय व तीर्थ अहल्याबाई होळकर यानी बांधले आहे. वेरूळची लेणी आज जगविख्यात आहेत. पण त्यांची माहिती त्या काळच्या लोकाना नसावी असे वाटते. कारण ती पाहिल्याचा उल्लेख सरस्वतीबाईच्या पत्रांत नाही व तत्कालीन इतर पत्रांतहि कोणी केलेला नाहीं. वेरुळाहून देवगांव, देवगांवाहून वाकळे व वाकळयाहून कासारबारींतून भडगांव-वरणगांव असा पुढचा प्रवास झाला. बाराव्या दिवशी यात्रेने बऱ्हाणपूर गांठले. बऱ्हाणपुरास यात्रा सहासात हजार झाली. डोल्या ऐशी होल्या. येथे महाराष्ट्राची हद्द संपून नेमाड प्रांत लागला. मुख्य मुख्य मुक्कामावरून सरस्वतीबाई जासूद–जोडीबरोबर मिरजेस टपाल पाठवीत, तसें त्यानी बऱ्हाणपुराहून टपाल पाठविले. त्या टपालातून यात्रेमधील इतर लोकहि आपली पत्रे रवाना करीत. बऱ्हाणपुराहून बाई मिरजेस बाळासाहेबाना लिहितात ' मार्गी चालताना अडचणीची वाट लागली म्हणजे यात्रेचा खोळंबा फार वेळ होतो. दररोज एक दोन माणसे घोड्यावरून पडोन अथवा लाथ लागोन जाया होत असतात. कोणी थकले भागले तर गाडे भाड्यांचे करून झाडून यात्रा आली म्हणजे पिछाडीस रहाणारे चि. रा. बळवंतराव सायंकाळच्या चारसहा घटका दिवसास येतात. यात्रेंत फार करून कंगाल आहे. यात्रेंत चोरीचा उपद्रव भारी आहे. याजमुळें नवे प्यादे असामी २५ ठेवले आहेत. यात्रेंत चारी प्रहर घस्त करावी लागते. याजमुळें राजश्री कानोपंत व चिंतोपंत व विठ्ठलपंत यासी रात्रीच्या घस्ती नेमून दिल्या आहेत. ' बऱ्हाणपुराहून माळव्यांत जाताना हंड्याच्या किंवा महेश्वराच्या घाटाने उतरावे लागत होते. पण हंडयाच्या घाटांत भिल्लांची गडबड असल्याचे समजल्यावरून यात्रा महेश्वराकडे वळली. महेश्वर ही अहल्याबाईंची राजधानी होती. महेश्वराजवळ नर्मदा नदी. ती यात्रेने नांवातून उतरली. बाई यात्रेसुद्धां ज्या दिवशी महेश्वरास पोचल्या त्या दिवशी तीर्थविधि करून उपोषण केले. दुसरे दिवशीं तीर्थश्राद्ध केले. तिसऱ्या दिवशी पुढें जाण्यास यात्रा निघणार तोंच अहल्याबाई भिल्लांचे बंड मोडावयास गेलेल्या महेश्वरी परत आल्या. त्यानी यात्रेतील ब्राह्मणाना व गोरगरिबाना शिधा व एक एक रुपया दक्षिणा दिली. सरस्वतीबाईची व अहल्याबाईची भेट झाली. महेश्वरास असताच बातमी आली की, 'उत्तरेंत महर्घता फार झाली आहे, काल्पीकडे व प्रयाग वगैरे प्रांतांत सातआठ शेरांची धारण झाली आहे. झाशीपासून उज्जनपावेतो

कंगाल येऊन राहिले आहे. तिकडून यात्रा जातेसमयी अन्नाविषयी यात्रेची निभावणी होऊ देणार नाहीं.' यासाठी पुढचा बेत सर्वांचे विचारें ठरविण्या-करिता बाईनी मातबर गृहस्थांची सभा भरवून त्याजपुढे हा प्रश्न ठेवला. पण कोणाचाहि पक्का मनसबा ठरेना. तेव्हां महाकाळेश्वराचे दर्शन घेऊन भेलशा-पर्यंत जावें व पुढचा बेत पुढें करावा, असा निकाल बाईनी सांगितला. अहल्या-बाईसहि हा मनसबा पसंत पडून तिनें आपणाकडील शंभर राऊत यात्रेबरोबर उज्जनीपर्यंत दिले. महेश्वरापासून उज्जनीपर्यंत होळकरांचा मुलूख होता. त्यांत होळकरांच्या ठिकठिकाणच्या कमाविसदारानी यात्रेचा बंदोबस्त उत्तम ठेवला. उज्जनीहून भेलशाला जाताना शिंद्यानीं आपले राऊत व प्यादे यात्रेबरोबर दिले. भेलशास यात्रेचे चारपांच मुक्काम झाले. भेलसा सोडल्यावर पाऊस लागला व कंगालानीहि उपद्रव केला. त्याचे वर्णन सरस्वतीबाईंच्या शब्दांतच देणे इष्ट. बाई बाळासाहेबास लिहितात. 'गोरगरीब भाकरी करू लागल्यास (कंगालानी) वर पडोन न्यावी व उष्ट्या पत्रावळी टाकावयास गेले तर हातातून घ्याव्या. या प्रमाणें कंगालांच्या झुंडीच्या झुंडी जागा जागा जमा झाल्या होत्या. मार्गाने चालो लागले म्हणजे एकीकडून यात्रेची रव व एकीकडून कंगालांची रव पडावी. याप्रमाणें पांच पांच हजार मिळोन देशाकडे जाऊ लागले. पर्जन्य भारी लागला. दोन दोन दिवस सूर्यदर्शन नाहीं अशी पावसाची झड लागली.'

सागर ही गोविंदपंत बुंदेल्याची राजधानी. या वेळीं गोविंदपंताचे जागी त्यांचे चिरंजीव बाळाजीपंत बुंदेले होते. सागरपासून यमुनेपर्यंत बुंदेल्यांचा मुलूखच असल्यामुळें बुंदेल्यानी आपल्या कमाविसदारांना पत्रे दिली व यात्रेबरो-बर पंचवीस स्वार व नगारानिशाणहि ठेवले. यात्रा यमुनेवर गेल्यानंतर प्रयाग पांच मजला राहिला. प्रयाग, काशी व गया ही तीनही हिंदूंची प्रमुख क्षेत्रे त्या वेळीं इंग्रजांच्या ताब्यांत होती. यासाठीं बाईने पेशवे सरकारचे पत्र जासूद-जोडीबरोबर प्रयागच्या इंग्रजाकडे आगाऊ रवाना केले. म्हणून यमुना उतरल्या-वर प्रयागापर्यंत दोन चौक्या होत्या तरी बाईंच्या यात्रेस एक पैसाहि पडला नाहीं. प्रयागास प्रयागवळाबरोबर दक्षिणा करार केली ती दर स्वारीस रुपये वीस व सड्या माणसास रुपये तीन येणेप्रमाणें होती. प्रयागाप्रमाणें काशीसहि इंग्रजांच्या बंदोबस्तामुळें यात्रेस जकातीचा उपसर्ग पोचला नाहीं. इंग्रजांचा दस्तक, चकती, तेलंगे टोपीकर असामी २ व हरकारे जोडी यांच्या जोरावर यात्रा

निर्विघ्नपणें काशीत गेली. यात्रा क्षेत्री गेल्यावर इंग्रजांनीं गंगापुलास ताकीद दिली कीं, ' यात्रेकरू आहेत यासी कोणी कज्जा भांडण जास्ती जलाल करूं नये ? ' बाई काशीस होत्या तेव्हां स्वदेशी (महाराष्ट्रीय) व परदेशी यात्रा ४०।५० हजार पावेतो मिळाली होती. काशीहून निघताना लॉर्ड हेस्टिंग्जपासून रहदारीचे दस्तक व गयेच्या महसुलाची चकती बाईनी मिळविली असल्यामुळें त्यांना गयेसहि कर पडला नाहीं. गयेला जातांना बाईबरोबर दहा हजार यात्रा होती. पण एवढ्या यात्रेकरितां करमाफी मिळविण्याचे कामी बाईला दरबार खर्च दहा हजार रुपये आला. सरस्वतीबाईनी नवऱ्याचीं पांच व घरांतील मंडळीचीं नऊ एकूण चौदा गयावर्जने केली, त्याचा खर्च साडे आठ हजार रुपयावर गेला. त्यांत रोख रुपये दोन हजार, दोन शेरांची दोन सोन्याची कडी. एक शेराची सोन्याची साखळी, कुडक्या, चांदीचे एक ताट, दोन वाट्या, चंबू, पंचपात्री, पळी असा विषय आणि शालजोडी, पीतांबर ही वस्त्रे होती. खेरीज गयावळास मोडनिंब तालुक्यांत शंभर रुपयांची जमीन इनाम करून देण्यांत आली. गयेंत यात्रेचा मुक्काम तीन महिने पडला. त्या मुक्कामांत मरीचा उपद्रव होऊन नित्य माणसे मरावी. त्यांतील पुरुषाबरोबर त्यांच्या स्त्रियानी अग्निप्रवेश करावा हा प्रकार घडतच होता. काशीहून गयेस जाण्यास चौदा दिवस लागले. टोक्यापासून प्रयाग ५४ व्या मजलीस पावले. वाटेंत मुक्काम २६।२७ झाले व प्रवास ४६१ कोस झाला. रोजची मजल सरासरी ८।१० कोसांची असे. काशीस यात्रा परत आल्यावर कोणी अयोध्या, मथुरा, हरिद्वार, बदरीकेदार इकडे गेले व बाकीचे देशी जाण्यास निघाले. ''

अहल्याबाईने सरस्वतीबाईच्या यात्रेचा समाचार महेश्वरास कसा घेतला हें वर आलेच आहे. अहल्याबाई मोठी दानशूर. तिची ब्राह्मणावर निष्ठा जबर. तशांत ते ब्राह्मण विद्वान् व महायात्रेस निघालेले असल्यास त्या निष्ठेस अधिकच भरती येई. महाराष्ट्रांतून काशीस जाणारे हे लोक महेश्वरास बाईच्य. दरबारी जात व तेथें बाईकडून त्यांच्या योग्यतेनुरूप संभावना केली जाई- वाटेंत भिल्लानी किंवा दुसऱ्या कोणी त्यास लुटले असल्यास बाईने त्यांस वस्त्र-पात्र देऊन त्यांची रवानगी करावी.

' राजश्री त्रिंबक अनंत गोडबोले श्री महायात्रेस जावयानिमित्त महेश्वरास आले (ता. २३-११-८६) त्यांची व बाईची पातळ व चोळी देऊन भेट कर-

विली. उभयतांचे भाषण उत्तम पारमार्थिक जाले. स्तव परस्परे होऊन बिऱ्हाडास गेले. बाई त्यांस शिधा देऊं लागली तो त्यानी घेतला नाहीं. समागमे इतर लोक होते. त्यांचा शिधा वीस माणसांचा व घोडी दोन यांचा दाणाचारा परभारे दिला. ' (इ. सं.) कित्येक विद्वान् लोक निःस्पृह व निर्लोभ असत. त्यांपैकींच गोडबोले हे दिसतात. गोडबोले यांच्यामागून कांहीं दिवसांनीं म्हणजे ता. ३।१२।१७८६ रोजीं पेशव्यांच्या पदरचे कुटुंबशास्त्री काशीस जाताना वाटेंत महेश्वरी मुक्कामास आले. ' वे. शा. सं. कुटुंबशास्त्री सहकुटुंब वाराणशसि जावयास आले. त्यांचा सत्कार करून बाईनी त्यास दोन शत रुपये रोख व वस्त्रे देऊन मार्गस्थ केले. ' कुटुंबशास्त्री गोडबोल्यासारखे निस्पृह नसून खरेच कौटुंबिक दिसतात !

प्रकरण पंचविसावें

ग्रामव्यवस्था

महाराष्ट्रांत मध्यम गांवास मौजे म्हणत. मौजापेक्षां मोठा गांव तो कसबा व लहान खेडें तें मजरें. लहान गांवास वाड्याखेडीं किंवा खेडींपाडीं असें सरसकट म्हणण्याची रीत आहे. परंतु संज्ञांच्या या जोड्या केवळ म्हणण्याच्या सोयीकरितां जमविण्यांत आल्या नसून त्या अर्थपूर्ण आहेत. मौजाखाली खेडीं असतात व वाड्याहि असतात. मौजाहून खेडें लहान व खेड्याहून वाडी लहान. सर्वांत लहान गांवास वाडी हें नांव देशावर आहे, तर कोकणांत कोठे कोठे वाडीलाचा पाडा म्हणतात. कसबा हा मौजापेक्षा वस्तीनें मोठा असतो व त्यांत बाजार भरतो. ह्या दोन गोष्टी अधिक. एरव्ही मौजे हें कसब्या इतकेंच सर्वांगपरिपूर्ण गांव असें समजण्यास हरकत नाहीं. मौजाची वसाहत पाटलाने केली, त्यामुळें मौजांत पाटलांकडे साहजिकच प्राधान्य आलें. जें महत्त्व देशावर पाटलाला तेंच महत्त्व कोकणांत खोताला. कारण कोकणांतीलहि बरेच गांव खोतांनींच वसाविले. पाटलाच्या खालोखाल मान कुळकर्ण्याचा. पाटील हा गांवचा राजा व कुळकर्णी हा प्रधान. कुळकर्ण्याला वऱ्हाडांत पांड्या अशी संज्ञा आहे. पांड्या हा पंडित या शब्दाचा अपभ्रंश होय. उत्तर हिंदुस्थानांत कोणाहि ब्राह्मणास पंडित ही पदवी लावतात; मग तो ब्राह्मण विद्वान्च असला पाहिजे असें नाहीं. कुळकर्णाचें वतन महाराष्ट्रांत सर्वत्र बहुशः ब्राह्मणाकडेच होतें. त्यामुळें वऱ्हाडांत कुळकर्ण्याला पांडे किंवा पांड्या म्हणण्याचा रिवाज पडला. याच पांड्याला देश, घाट, इत्यादि उपपदें लावलीं असतां त्या त्या मानानें पांड्याचें अधिकारक्षेत्र वाढत जातें. जसे देशपांडे, घाटपांडे. कुळकर्णांचें जें काम पांडे एका गांवापुरतें करतो तें काम त्याजकडे देशाचें किंवा घाटाचें देण्यांत आलें कीं तो देशपांडे किंवा घाटपांडे बनला. पटवारी हें तिसरें नांव कोठें कोठें कुळकर्ण्याला लावलें जातें. द्राविड भाषेंत कुल याचा अर्थ शेतकरी व करणं याचा अर्थ कुळकर्णी असा आहे. मराठींतहि शेतकऱ्यांना कुळ म्हणतातच. कुळा-

संबंधाचे सर्व सरकारी कागदपत्र तयार करणारा तो कुळकर्णी. कोकणांत कुळकर्णी व पाटील या हुद्याचे स्वतंत्र कामगार नसून हीं दोन्हीं कामें खोतीच्या गांवीं खोतच संभाळतात.

गांवचा राजा पाटील. तेव्हां त्याच्या त्या दर्जास शोभणाराच त्याचा इतमाम प्राचीन काळापासून ठेवण्यांत आला. एकंदर ग्रामसंस्थेप्रमाणेंच त्यांतील पाटील व कुळकर्णी हे प्रमुख अधिकारी प्राचीन हिंदू राजापासून अस्तित्वांत आले व ते तसेच मुसलमानी अमलांत व मराठी राज्यांत कायम राहिले. त्यांचा गांवकऱ्यांत बोज राहील व त्यांना स्वतःलाहि आपल्या हुद्याचीं अवघड, जोखमीचीं व जिकिरीचीं कामें पार पाडण्यांत भूषण वाटेल असाच त्यांचा इतमाम मराठी राज्यांत होता. पाटील मोठ्या डामडौलानें वागत असे. पाटलास पाटिलकीच्या कामाबद्दल जमीन इनाम असून तिला पासोडी म्हणतात. हें त्याचें वतन होय. या जमिनी गांवास लागून असत व त्यांसच पांढरी मुंड किंवा हाडोळी असे पर्याय शब्द लावीत. तिला पांढरी म्हणण्याचें कारण हें कीं ती रंगानें पांढरी असे. तसेंच तिला हाडोळी याकरितां म्हणण्यांत येई कीं तिच्यांत पाटलाच्या भाऊपणांतील मयतांना पुरण्याची अगर जाळण्याची जागा राखून ठेवली असे. इनामी जमिनीशिवाय बहुतेकांना मिराशी शेतें असत. गांवच्या शिवारांत जी शेतें सोडून देऊन शेतकरी परागंदा होत व जीं वहाण्यास कोणी मिळत नसे अशा प्रकारचीं गतकुळी शेतें सरकारी सारा भरण्याच्या करारावर पाटलांना स्वतःच्या ताब्यांत घेण्यास हरकत नसे. इनामी व मिराशी जमिनीखेरीज गांवच्या शेतसाऱ्यावर नक्त मुशाहिरा त्यांस मिळे तो वेगळाच. गांवच्या एकंदर वसुलाचा दहावा हिस्सा पाटील व कुळकर्णी यांच्या वाटणीस येत असून पाटील व कुळकर्णी यांजमधील हिस्सेरशीचे प्रमाण २ : १ असे पडे. पाटिल घराण्यांत कितीहि पुरुष असले तरी नमूद पाटील वडील घराण्यांतील असावयाचा व त्याला मोकदम पाटील असे म्हणत. मोकदम पाटील तोच खरा पाटील. बाकीच्यास गांवकऱ्यांनीं खुष राखण्याकरितां पाटील या नांवानें गौरवावें इतकेंच. ‘का पाटील ?’ म्हटले कीं कोणताहि मराठा खुषींत येतो हें पुष्कळांच्या पहाण्यांत असेल.

पाटिलकीच्या वतनाच्याहि वेगवेगळया दोन तीन घराण्यांत वाटण्या होत व त्या प्रत्येक घराण्याला तक्षीम हें नांव असे. पाटलाचे हक्क व मानपान पुष्कळ

असत. त्या रूपानें त्याची सत्ता गावांतील सर्व लहान थोर माणसांना जाणवत असे. किंबहुना हक्काच्या व मानपानाच्या बाबतींत गांवकरी हे त्याचे नोकर किंवा प्रजाजनहि मानले गेल्याप्रमाणें असत. हे हक्क व मानपान वडील व धाकट्या भावांत वाटल्याचेहि दाखले सापडतात. अशी वाटणी छत्रपति शाहू महाराजांचे कारकिर्दींत लोणी भापकर परगणे सुपे, सरकार जुन्नर येथील पाटिलकींत झालेली आढळते. त्यांत दोघांचे मानपान व हक्क सारखेच, फरक काय तो आधी कोण व मागाहून कोण इतक्यापुरताच. पाटलाचा कांहीं मान सरकार–दरबारांतून व कांहीं मान गांवच्या आलुत्याबलुत्याकडून होत असे. दिवाणांतून पाटलाला मानाचा शिरपाव व पानें मिळावीं. पोळ्याच्या दिवशीं गांवचे बैल वेशींतून गांवाबाहेर पडतांना सर्व बैलांच्या अग्रभागीं पाटलाचा बैल चालावा. पाटलाच्या दरवाजावर बांधावयाचें वाखाचें तोरण मांगानें व घराला लाववयाचा गेरू महारानें आणून द्यावा. दिवाळीच्या सणांत घडशांनीं पाटलाच्या दारांत वाजंत्रीं वाजवावीं. पाटलाच्या घरचें पाणी कोळ्यानें भरावें. शिमग्यांत गांवच्या होळीला नैवेद्याचीं पोळीं आधी पाटलाची. माळ्यानें पाटलाच्या देवाकरितां फुलें आणावी. दसऱ्याच्या दिवशीं सायंकाळीं शिवलंघन झाल्यावर आपट्याची पूजा पाटलाच्या हातून व्हावी व मग तो आपटा सर्वांनीं सोनें म्हणून लुटावा. दसरा, शिराळशेट, गौरीगणपति यांच्या वेळीं वाजवावयाच्या वाजंत्र्यांची व्यवस्था दिवाळीच्या सणासारखीच. गावाच्या रीतिस्थितीप्रमाणें मानपान व हक्क यांत कमी जास्ती फरक होते असे. साळी, धनगर, चांभार इत्यादिकांची वस्ती प्रत्येक गांवी असतेच असें नाहीं आणि उसाचे फड व पानमळे करण्याइतकें बागाईत दर गांवास शक्य असतेंच असें नाहीं. तथापि ते जेथें असेल त्या ठिकाणीं साळ्यानें मागाला एक पासोडी, धनगरानें चवाळें, तेल्यानें घाण्याला दररोज पावशेर तेल, चांभारानें जोडे, महारानें सणावारी सर्पणाच्या मोळ्या पाटलाला पुरवाव्या. गुऱ्हाळाला एक ढेप, संक्रांतीला कुंभारानें सुगडें, तांबोळ्याच्या दुकानामागे दररोज १३ पानें, वाण्याकडून खोबऱ्याच्या वाट्या पाटलाच्या घरीं पोचत्या होत आणि शेताचें उत्पन्न व हक्कवसुली यावर पाटलाच्या बहुतेक सर्व प्रापंचिक गरजा भागत. लग्नमुहूर्ताचा शक, गोंधळ व मुहूर्त (पाट) यांचा विडा हेहि मान पाटलाला मिळत.

पाटलाच्या खालोखाल कुळकर्ण्याचे हक्क व मानपान. पण त्यांचे प्रमाण पाट-

लाच्या हक्कांच्या व मानपानांच्या बहुतेक निमेंने असे. पाटलाच्या मागून कुळकर्ण्याला दिवाणांतून शिरपाव मिळावयाचा. तेल्यापासून दर दुकानास दररोज ९ टाक तेल, चांभारापासून वर्षास एक जोडा, कोळयापासून पाणी, महारापासून मोळी, तांबोळ्यापासून पाने, पाटलाच्या निम्मेनें शाईला तेल व दप्तराचे कागद बांधावयास रुमाल. गांवांत एखादें प्रसिद्ध देवस्थान असले व त्याची उत्सव-जत्रा होत असली तर पाटील–कुळकर्ण्याच्या हक्कांत व मानपानात आणखी भर पडत असे. उदाहरणार्थ, मौजे निंबगांव नागाणा तर्फ खेड सरकार जुन्नर येथें मार्तंडाचें देऊळ होते. त्या देवाच्या पौर्णिमेच्या यात्रेस उत्पन्नांपैकीं २॥ टक्के कुळकर्ण्याचे, मिठाई पाटलाच्या निम्मे, भंडारा–प्रसाद पाटलामागे, आश्विनी आदितवारी ऊद पाटलामागें कुलकर्ण्याचा. कुळकर्णपणाचे वतनाबरोबरच कांहीं गांवीं कुळकर्ण्याकडे जोशी वतनहि असे. त्याचे हक्क वेगळे असत. निंबगांवीं ज्योतिष्याचे बलुतें त्यास गुरवाबरोबर व देवळांतील प्रसाद इतर बलुत्याबरोबर मिळावयाचा. त्याशिवाय इनाम शेत २५ बिघे १२॥ मण उत्पन्नाचे.

पाटील व कुळकर्णी यांची मिळकत पुष्कळ व मानहि मोठा असला तरी ती सुळावरची पोळी होती. कारण गांवच्या संरक्षणाची, व्यवस्थेची व सरकारी वसुलाची जबाबदारी त्यांजवरच असे. गांवावर परचक्र आल्यास त्यापासून गांवाचा बचाव करण्याकरितां गांवची शिबंदी पाटलाने जमवून शत्रूला तोंड द्यावें, शत्रूचा मोड न झाल्यामुळें तो शिरजोर होऊन गांवाजवळ खंडणी मागूं लागल्यास पाटीलकुळकर्ण्यानींच पुढें जाऊन ती भरावी. खंडणीची रक्कम ताबडतोब जुळणे शक्य नसल्यास शत्रू पाटलास कैद करून नेत असे. कित्येकदां गांवांवर याहूनहि मोठमोठ्या धाडी येऊन गांव उठून जाई व सर्व रयत परागंदा होऊन गांवच्या शिवारांतील लावणी व संचणी बंद पडण्याचीहि पाळी येई. त्या वेळीं पाटलानेंच गांवची वसाहत फिरून करावी व लावणीसंचणीसाठीं रयतेला उत्तेजन द्यावें. गांवचा सरकारी वसूल रयतेमागें सक्ति लावून पाटीलकुळकर्ण्यानींच करावयाचा. कोणी आल्यागेल्याची सरबराई पाटील—कुलकर्ण्यांनींच ठेवावयाची. क्वचित् गांवचे शिलेदार शत्रूस मिळण्याचाहि संभव असे. तो टाळण्याकरितां सरकार पाटील–कुळकर्ण्यांना जामीन धरी. सगळे हक्क व मानमरातब पाटलानें उपभोगावे व उलटपक्षीं पाटलाकडून गांवकऱ्यांना कोणताच सुखसोहळा अनुभवण्यास मिळूं नये; ही गोष्ट अनिष्ट असल्यानें गांवच्या बलुत्यांना पाटलानें वर्षांतून एक दोन जेवणावळी देणें भाग पडे.

पाटील व कुळकर्णी हे दोघे गांवाला राजा व प्रधान यांच्याजागीं असले तरी त्यांचे जीवित गांवच्या शेतकऱ्यावरच अवलंबून. कारण त्याचा जो व्यवसाय तोच गांवचा मुख्य व्यवसाय. त्याच्या गरजा भागविणाराचे दोन वर्ग पडतात. एक बलुतदारांचा व दुसरा आलुतदारांचा. बलुत्याची पद्धत उत्तरहिंदुस्थानांत फार प्राचीन आहे तशी ती महाराष्ट्रांतहि आहे. हे दोन्ही वर्ग गांवचे नोकर होत. त्यांपैकीं आलुतदारापेक्षां बलुतदाराचे काम गांवाला अधिक निकडीचे. खेड्यांतून बारा हा आकडा फार प्रिय. बारा वाड्या, बारा खेडी, बारा आलुती, व बारा बलुती मौजाला असावयाची अशी सर्वसामान्य समजूत. परंतु ती अक्षरशः खरी आहे असे नाहीं. कारण त्यांची संख्या मोजावयास गेले तर ती कमी भरेल किंवा जास्ती भरेल. चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव, कोळी हे बारा बलुतेदार आणि तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डौरी, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाणी, वाजंत्री, घडशी, कलावंत, तराळ, भोई इत्यादि आलुतेदार. बलुतेदार व अलुतेदार यांचें हें वर्गीकरण निरपवाद नव्हे. ज्यांची गणन बालुतेदारांत झाली आहे त्यांची गणना आलुतेदारांत किंवा कित्येक आलुतेदारांची गणना बलुतेदारांतहि होण्यासारखी आहे. कारण गांवकीच्या कामांत त्यांतील बहुतेकजण सारखेच गुरफटलेले असत. या सर्वांकडे गांवकीचे कोणते ना कोणते काम मराठी राज्यांत वाटून आलेले होते. गांवकीच्या कामांतहि दोन तऱ्हा असत. एक काम खास गांवकऱ्यांचे करावयाचे तें व दुसरे काम गांवातर्फे सरकारांत करावयाचे तें. गांवकऱ्यांचे काम केल्याबद्दल आलुतेदारांना व बलुतेदारांना शेतकऱ्यांच्या खळयावर आलुतेबलुते म्हणून पेंडीकाडी मिळावयाचीं व सरकारी कामाबद्दल नोकर—इनाम असावयाचे. चौगुला, महार, रामोशी, तराळ, पोतदार यांनी पाटील-कुळकर्ण्याच्या हाताखालीं वागून सरकारी कामास मदत करावयाची व बाकीच्यांनीं गांवकऱ्यांच्या गरजेला उपयोगीं पडावयाचे.

पाटील-कुळकर्ण्यांच्या हाताखालीं राहून सरकारी काम करणारांना नोकर-इनाम म्हणून जमिनी असतच. बुलतेदार व आलुतेदार ज्याप्रमाणें कुणब्यापासून त्याच्या खळयावर सळई, पेंढी, घुगरी घेत त्याप्रमाणें पांढरीवर म्हणजे गांवांत दुकानदार व इतर कसबी लोक यांजकडून शेव, फसकी व वर्तोळा घेत.

पाटील व कुळकर्णी यांचीं कोणकोणती घरगुती कामें बलुतेदारांना व अलुतेदारांना करावी लागत, ते वर लिहिलेच आहे. ती सर्व नसलीं तरी तसलीं बरींच किरकोळ कामें त्यांना शेतकऱ्यांचीहि करावी लागत. त्याचा मोबदला म्हणून त्यांस बलुते घालणें शेतकऱ्याचे कर्तव्य असे. उदाहरणार्थ, शेतकऱ्यास चांभारापासून जोडा किंवा मोट अथवा मांगापासून नाडा घ्यावयाचा असल्यास त्याची किंमत त्यास द्यावी लागे. परंतु सदर मोट फाटल्यानंतर तिला ठिगळ लावणें, असली चिल्लर कामें बलुत्याच्या मोबदल्यांत त्यांस करून मिळत. त्या काळीं नाण्याची टंचाई सर्वांनाच भासत असल्यानें रोख पैसा न मोजतां इतर रीतीनें जेवढा व्यवहार चालेल तेवढा चालवून घेण्याकडे सर्व लोक लक्ष देत. मौजांतील ग्रामस्थ आपल्या गरजा आलुत्याबलुत्याच्या व अंगमेहनतीच्या रूपानें बहुतकरून भागवून घेत. मोबदल्याचा मोठा जिन्नस म्हणजे धान्य. जी गरज वरील उपायानें न निभेल ती गरज धान्य देऊन भागविली जात असे. इतकेंच काय, पण सरकारी देणें सुद्धां रयतेकडून धान्याच्या रूपानेंच कित्येकदां मिळे. मराठी राज्यांत सातारा जिल्ह्यांतील रहिमतपुराजवळील कठापूर या गांवाकडून जमीरधारा धान्यरूपानें घेण्यांत आला, तर पिंपळगांव बसवंत येथून पैशाच्या रूपानें वसूल करण्यांत आला. धारा धान्यरूपानें घेण्यांत आल्यावर कांहीं गल्ला गांवोगांव पेवांतून व अंबारांतून शिल्लक पडे व तो खर्च न केल्यास खराब होण्याचा संभव असे; तेव्हां सरकारी नोकरांस द्यावयाच्या पगाराचा कांहीं हिस्सा धान्यांतून देत.

शेतसाऱ्याखेरीज तूप, मध, औषधें, मांस, भाजीपाला, फुलें, जनावरें यावरहि स्मृतिकाळीं कर होता. अशा प्रकारचे कर मराठी राज्यांतहि असून ते सरकारी हुकुमानें पाटील, कुळकर्णी, देशमुख, देशपांडे, शेटे वगैरे वतनदार गावकऱ्यापासून स्वतःसाठीं व गावासाठी वसूल करीत. त्यांचा फायदा सरकारास न मिळतां गावासच मिळत असे. गावांत जो सरकारी कर वसूल होई, त्याचे १५।२० टक्के गावांतील सरकारी व सार्वजनिक खर्चांकरितां गावांतच राखून ठेवण्यांत येत. त्यास गावफंड असें म्हणण्यास हरकत नाहीं. या फंडांतून गांवच्या देवस्थानाची व्यवस्था नीट राहून जत्रा उत्सव व तमाशे केले जात. अतीथअभ्यागत व फकीरबैरागी यांचा परामर्श घेतला जाई आणि सरकारी अधिकाऱ्यांची सरबराई, पाटलाचा मानपान, गुणिजनांचा सन्मान व बक्षिसी इत्यादि खर्च चालत.

खेडयांतील व्यवसायाचे काळी व पांढरी असे दोन ठळक भेद असले तरी तेथील मुख्य धंदा शेतकीचाच. प्राचीनकाळीहि तीच स्थिति असल्याचे चाणक्यहि आपल्या ग्रंथांत म्हणतो. काळींत खपणारे ते कुणबी किंवा शेतकरी व पांढरींत काम करणारे ते पांढरपेशे. पांढरपेशांचा व्यवसाय अधिक प्रतिष्ठेचा व कमी दगदगीचा. काळींत खपणारे जे शेतकरी त्यांचे दोन वर्ग. एक मिरासदार व दुसरा उपरी. मिरासदारास जमीन वहाण्याचा हक्क वंशपरंपरेनें मिळालेला असून त्यांना जमिनींची खेरदीविक्री करतां येत असे. मिरासदाराचे दुसरें नांव वतनदार. मिरासदाराकडून सरकारसारा वेळचे वेळीं वसूल होत आहे तोंपर्यंत त्याची जमीन सरकारास काढून घेतां येत नसे. मिराशीवरील साराहि वाढविण्याचा अधिकार सरकारास नसे. कोकणांत मिरासदारास धारेकरी म्हणतात. जो मिरासदार नाहीं तो उपरी. खालसा किंवा सरकारी जमीन सरकार उपरी कुळाकडे कांहीं मुदतीपर्यंत कौलानें लावी. मिरासदारास इतकीहि सवलत असे कीं, मिरासदार तीस वर्षांवर परागंदा झाल्याशिवाय मिरासजमीन सरकारनें खालसा करूं नये व कर्ज उगविण्यासाठीं सावकारानेहि ती विक्रीस काढू नये. परंतु उपऱ्यांचा जमिनीवर निरंतरचा असा कांहींएक हक्क नसे. 'गांवगाडा' कर्ते रा. अत्रे यांच्या मतें वतन हा शब्द वर्तन या संस्कृत शब्दापासून निघाला असावा. आरबी भाषेत रहावयाच्या जागेस वतन म्हणतात. जातीचा धंदा, वंशपरंपरागत काम, चाकरी, नेमणूक, उत्पन्न, अधिकार, मानपान, हक्क, वडिलोपार्जित मिळकत व स्थावर मिळकत हींहि व्यापक अर्थानें वतनेंच होत. त्या अर्थानें मौजांतील सर्वच रहिवाशांस वतनदार समजण्यास हरकत नाहीं.

गांवांत पांढरपेशा वर्गापैकीं मराठे-ब्राह्मण, वाणी-उदमी, सोनार-शिंपी, न्हावी, कोळी, तेली इत्यादि प्रमुख होत. त्यांतील मराठे हे पाटील घराण्यांपैकीं. तेव्हां ते संकुचित व खऱ्या अर्थानें वतनदार. ब्राह्मण हे कुळकर्णी किंवा जोशी म्हणून वतनदार. शेटे हे वाण्या-उदम्यापैकींच असून त्यांजकडे गांवच्या पेठेचें जबाबदारीचें काम असे. शहरगांव असल्यास त्यांत नवीन पेठा वसविणें, एखाद्या गावास बाजार भरत नसल्यास तो सुरू करणें, आपलें रास्त माप व वजन कोणीं वापरण्यासाटीं मागितल्यास तें देणें इत्यादि कामें शेट्याची. त्यास गांवकामगारासारखेच हक्क मिळत. बाजारच्या दिवशीं दर

दुकानदारापासून एक सुपारी, तांबोळ्यापासून दररोज पांच पानें, तेल्यापासून नऊ टाक तेल, प्रत्येक पोत्यामागे अच्छेर हरभरे, प्रत्येक माळणीपासून मूठभर भाजी, विणकरापासून एक पासोडी, चांभारापासून जोडा, दसरा, दिवाळी, शिमगा, वर्षप्रतिपदा या दिवशीं प्रत्येक दुकानांतून पावशेर गहू किंवा तांदूळ हे शेट्याचे हक्क होत. त्याच्या मापानें जो धान्य मोजील त्यापासून प्रत्येक पोत्यामागे पावशेर धान्य तो घेई. त्यांखेरीज खाटीक व कोळी यांजपासून मांस व खारवलेले मासे व लग्नांत खोबऱ्याची वाटी त्यास हक्कानें मिळे. गावास घरपट्टी लागू असेल तर ती त्याला माफ असे. या व्यवस्थेंत दोन सोयीकडे लक्ष दिलें गेलें. एक तर शेट्यासारखे जे पांढरपेशे लोक त्यांना वतनदारीच्या जमिनी नसल्यामुळें सालबेगमीच्या धान्याचा बंदोबस्त अशा रूपानें करण्यांत आला व दुसरें, बाजारांत ज्यांनीं आपल्या जिनसा विकावयास आणिल्या त्यांना कराचा पैसा न द्यावा लागल्यामुळें त्यांजकडील कराची वसुली जिनसांच्या रूपानें करण्याची सोय झाली. सोनार हाच गांवचा पोतदार असून त्यानें चावडीवरील सरकारी भरण्यांत जीं नाणीं येतील तीं व वाणीउदमी लोकांकडे खाजगी व्यवहारांत जीं नाणीं येतील तीं पारखून द्यावयाचीं असत. या कामगिरीबद्दल त्यास दर रुपयामागें एक दमडी मिळत असे. गावांतील कोणाहि मनुष्याचा पिढजाद धंदा हें त्याचें वतनच होय. मग त्याबद्दल त्यास जमीन अगर इतर हक्क गावकीच्या व्यवस्थेंत असो अगर नसो. ज्याचा जो धंदा आहे तोच त्यानें करावा असा सामान्य नियम. पण तो नियम कारणपरत्वे मोडल्याची उदाहरणें महाराष्ट्रांत त्याहि काळांत घडत होती. त्या व पिढीजाद वतनाच्याहि दृष्टीनें पुढील दाखला सूचक आहे. मौजे खोडद तर्फ नारायणगांव प्रांत जुन्नर येथील लोहारकीचें वतन निंबाजी वल्लद शिवाजी सुतार याजकडे होतें. सटवाजी नांवाचा लोहार जातीचा इसम मौजे कळम तर्फ महाळुंगे येथें रहात होता. तो तेथून खोडद येथें रहावयास आला. तेथील महाराच्या बायकोनें मारुतीजवळ बगाड लावलें. त्याचा गळ लोहारानें टोचावयाचा असतो. पण सदर गळ सटवाच टोचूं लागला. त्याला त्या गांवचा हक्कदार लोहार या नात्यानें निंबाजी सुतारानें हरकत देऊन कज्जा केला व कमाविसदारास वर्तमान सांगितलें. कमाविसदारानें निंबाजीपाशी १०० रु. नजर मागून निंबाजी सुतारास पुढें लोहारकीचें काम

चालविण्यास सांगितलें. त्याप्रमाणें निंबाजीनें घरची बटिक विकून १०० रु. नजर दिली व काम चालवूं लागला. उलटपक्षीं सटवाजी लोहारहि खोडदची लोहारकी आपली वंशपरंपरेची आहे असें म्हणूं लागला. तेव्हां कमाविसदारानें दोन्ही पक्षांचे राजिनामे मिळविले व त्यांजपासून पांढर सांगेल त्याप्रमाणें वागण्याचे कबूल करून घेतलें. हें प्रकरण प्रथम पांढर, पांढर मागाहून पंचाईत व पंचायतीमागून खुद्द पेशवे यांजपर्यंत गेले. पेशव्यांनीं सुतारास अनुकूल असाच निकाल देऊन त्याजपासून २०० रु. हरकीबद्दल करार केले.

उपरी व मिरासदार हा लढा केवळ जमिनीपुरताच नसून गांवातील पांढरपेशांच्या व्यवसायासहि लागू असे. याचें हें एक उदाहरण. लोणी खुर्द परगणे संगमनेर येथें उपरी सोनार कोण व मिरासदार सोनार कोण याबद्दल लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार हे उभयता भांडत होते. मूळ लोणी हा एकच गांव होता. त्याचे पुढें बुद्रुक व खुर्द असे दोन गांव झाले. त्यांपैकीं लोणीखुर्द हा मौजा तुटून त्याची लोणीखुर्द व हसनापुर अशीं आणखी दोन गांवें फुटली. त्या सुमारास लक्ष्मणाचा बाप मरून त्याच्या आईनें भेरडपूरच्या सोनाराशीं घरोबा केल्यानें ती लोणीखुर्द येथून लहान लक्ष्मणासह निघून भेरडपुरास जाऊन राहिली. इकडे लोणीखुर्द येथील सोनारकीचें काम चालविण्यास कोणी नसल्यानें तेथील काम १०।२० वर्षे पाथरकर सोनारानें केलें. त्याच्या पश्चात् वाडे गव्हाणीहून शिदू नांवाचा दुसरा सोनार लोणीखुर्द येथें राहून सोनारकाम करूं लागला व बलुतें खाऊं लागला. त्याचा पुत्र मल्हारी व मल्हारीचा लेक सदाशिव सोनार हे उपरी ठरून लोणी बुद्रुक, लोणीखुर्द व हसनापूर या तिन्ही पांढऱ्यांच्या मतें लक्ष्मण सोनार हाच पुरातन वतनदार व मिरासदार शाबीत होऊन त्यानें लोणी बुद्रुक व हसनापूर येथील वतनाप्रमाणेंच लोणीखुर्द येथीलहि वतन खावें असें ठरलें. या दुसऱ्या उदाहरणावरून आणखी एक गोष्ट सिद्ध झाली ती ही कीं, खळ्यावर जाऊन बलुते मागण्याचा हक्क महार, रामोशी, न्हावी, यासारखे किरकोळ वतनदारच केवळ बजावीत असें नव्हे, तर त्यांत सोनारासारखेहि श्रेष्ठ बलुतेदार असत. याचा अर्थ हा कीं, निवळ शेतकी हाच ज्यांचा धंदा त्यांचे शेतीचे उत्पन्न पांढरपेशा बलुतेदारापेक्षां पुष्कळ पटीनीं मोठें असून त्याचा हिस्सा पेंढी-काडीच्या रूपानें बलुतेदारास मिळाल्यावांचून त्याच्या निर्वाहाची योग्य भरती होणें शक्य नसे. गांवांतील

कायम वस्तीच्या मनुष्याचा निर्वाह व त्याच्या मोबदला काम यांची काळजी ग्रामव्यवस्थेंत घेतलेली आढळून येते.

बलुतेदारांचीं कामें त्रिविध असत. एक सरकारोपयोगी, दुसरें ग्रामोपयोगी व तिसरे कुलोपयोगी म्हणजे शेतकऱ्याच्या उपयोगाचें. अस्पृश्य वतनदारांत महारावर कामाचा भार फार. सरकारी वसुलाचा जो पैसा चावडीवर जमेल त्यास पोतें म्हणतात. हें पोतें तालुक्यांत अगर तहशिलींत महारानेंच पोचवावयाचें. गांवांत एखादें गाढव, मांजर, कुत्रें, गुरूं मरून पडलें तर त्याला पडें म्हणतात. हें पडें महारानेंच गांवाबाहेर ओढीत न्यावयाचे. मृताच्या दहनास लागणाऱ्या लाकूडफाट्यास सरण म्हणतात. हें सरण महारानेंच वहावयाचें. हीं महाराची मुलकी कामें झालीं. त्याखेरीज त्याजकडे फौजदारी कामें असत. त्यानें चोरांचा तपास लावावा, माग काढावा, वहिमी लोकांची पाटलाला वर्दी द्यावी. हीं कामें करणाऱ्या महारास जागल्या म्हणत. जागल्या म्हणजे आजचा पोलीस शिपाई. जागल्यांनीं रात्रंदिवस आळीपाळीनें चावडीवर पहाऱ्यास बसलें पाहिजे. हें काम करीत जो गांवच्या वेशीवर बसतो तो येसकर. गांवच्या रक्षणाची जबाबदारी गांवावरच असल्यानें हें काम मामुली स्वरूपाचें असल्यास तें रामोशाकडूनच पाटील करून घेई. परंतु कित्येकदां रामोशांची तुटपुंजी संख्या या कामीं अपुरी वाटल्यास गांवच्या रक्षणाची जबाबदारी पाळीपाळीनें सर्व गांवकऱ्याकडे येई. त्याकरितां आठ किंवा त्याहून कमी अधिक सोटे चावडीवर ठेवलेले असत व सदर सोटे पाळीप्रमाणें पाटील सांगेल त्यांच्या घरीं जागल्यानें नेऊन टाकावे व ते घेऊन ज्यांनीं त्यांनीं रात्री चावडीवर निजावयास यावे अशी रीत होती. दरोडे किंवा परराजाच्या धाडी यांच्या वेळीं एवढ्या बंदोबस्तानेंहि भागण्यासारखें नसल्यानें पाटील हा शेतसनदी ऊर्फ गांवलष्कर जमवी किंवा तहशिलींतून अगर तालुक्यांतून शिबंदी बोलावी. सरकारी नोकरीसाठीं पगार न देतां शेतें देण्याच्या पद्धतीस शेतसनद म्हणत. गांवास परचक्राच्या खालोखाल दुसरी भीति आगीची. गांवांतील एखाद्या गंजीस अथवा घरास आग लागली असतां ती विझविण्यास पाण्याचा पुरवठा एकदम होणें शक्य नसे. याकरितां प्रत्येक घराच्या मालकास आपल्या घराच्या ओट्यावर पाण्याचे दोन घडे भरून ठेवावे लागत. घरटी दोन घडे या हिशेबानें साऱ्या गांवचे घडे एकदम गोळा झाल्यानें आग सहज आटोक्यांत येई.

वतनदारी पद्धतींत गांवासंबंधीं हरएक काम अखंडितपणें सतत चालू रहाण्याचा टिकाऊपणाचा गुण आहे. परंतु त्यांत वतन उपभोगणाऱ्या माणसाच्या पात्रतेचा विचार क्वचित् होत असे. जोशाचें काम हें गांवांतील सर्व कामांत धर्मदृष्ट्या पवित्र व श्रेष्ठ प्रतीचें काम होय. जोशानें गांवांतील लग्नें लावावीं, मुहूर्त काढून द्यावे व तिथिमित्ति सांगावी. असा मनुष्य विद्वान् व सदाचारसंपन्न पाहिजे. तसा तो नसल्यास त्याचें वतन काढून दुसऱ्या कोणा लायख इसमाकडे देण्याची गांवांकडून किंवा सरकारांतून व्यवस्था होणें जरूर आहे. परंतु या गोष्टीकडे त्या काळीं लक्ष दिलें जात नसल्यानें दुराचरणी इसमहि क्वचित् जोशी वतनासारखीं वतनें चालवितांना दृष्टीस पडत. ' खंड भट व नारायण भट हे उभयता बेंबळे, घोटी व पऱ्हेटे या तीन गांवांचे वतनदार जोशी होते. नारायण भट निपुत्रिक मेला. त्याला सुभाना नांवाचा दासीपुत्र होता. तो घोटीच्या निम्म्या वतनाची वहिवाट करूं लागला. तेव्हां नारायण भटाच्या नातवानें सुभान्याविरुद्ध फिर्याद केली. तिचा निकाल सरकारी कारकून, देशमुख व देशपांडे परगणे पुणें यांनीं मिळून केला. त्यांनीं दासीपुत्राकडे वारसा पोचत नाहीं असें ठरवून सुभान्यापासून लेखी राजिनामा घेतला. हिंदूंचीं धर्मकृत्यें चालविण्यास जोशी. पण हिंदूतहि लिंगायत पंथासारखे पंथ उद्भवले व मुसलमानांच्या अंमलामुळें मुसलमानांची वस्तीहि गांवगन्ना कमीअधिक झाली. त्यांच्याहि धार्मिक कृत्यांची काळजी तत्कालीन हिंदु व मुसलमान राज्यकर्त्यांनीं केल्यावरून लिंगायतांचा जंगम व मुसलमानांचा मुंजावर किंवा मुलाणी याचा समावेश ग्रामव्यवस्थेंत करण्यांत आला होता. ग्रामव्यवस्थेंत एक गुण असा होता कीं, माल व त्याचें गिऱ्हाईक याची गांठ घालून दिली होती व वतनदारी पद्धतीमुळें स्पर्धा नाहींशी होऊन ज्या त्या जिनसाच्या उत्पादकास एक प्रकारचें संरक्षण मिळाल्यासारखें होतें. त्याचा एक वाईट परिणाम झाला. ज्या गांवांची विशिष्ट मालासंबंधानें ख्याति होती त्या गांवचा माल इतरत्र खपत असे. परंतु सर्वसाधारण जिनसा गांवच्या गांवांत खपत असल्यानें त्यांत कारागिरीचें नैपुण्य किंवा कौशल्य प्राप्त करून घेण्यास कारागिरास उत्तेजन मिळत नसे व आवश्यकताहि रहात नसे.

गांवांत उपस्थित होणारे खटले दोन प्रकारचे. एक फौजदारी व दुसरे दिवाणी. दिवाणीपेक्षां फौजदारी गुन्हे फार थोडे घडत. एल्फिन्स्टन महाराष्ट्राविषयीं म्हणतो ' या देशांत गुन्हे बहुधा घडत नाहींत व दरवडे माझ्या

पहाण्यांत नाहींत. बंगाल्यापेक्षां या देशांत गुन्ह्यांचें मान फार कमी.' फौजदारी कामांत गांवांतील मुख्य अधिकारी पाटील. त्याजकडे मुलकी व फौजदारी हे दोन्ही अधिकार असत. जागल्या हा पाटलाचा मदतनीस. त्याला गांवच्या चोराचिलटाची व लुच्च्यालफंग्यांची माहिती खडान्खडा असावयाची. गांवच्या शिवेंत झालेल्या चोरीचा पत्ता लावण्याची जबाबदारी जागल्यावर राही. चोरीचा माग गावच्या शिवेबाहेर न निघाला तर जागल्याकडून चोरी भरून घेत. कित्येक गांवीं चोरीचा माग लावण्याचे काम रामोशाकडेहि असे. गुन्ह्याच्या तपासांत महार किंवा मांग यांना मदत रामोशी, भिल्ल व कोळी यांची असे. आबाजी खंडो यास खंडाळे–बावडे येथें चोरानीं लुटलें. 'आबाजी खंडो हा राघोबापासून पत्र घेऊन निघाला होता. खंडाळयाच्या रामोशांनीं चोरीचा माग भुइंजेपर्यंत लावला. तेथून तो चिंधवलीपर्यंत लावला जावयास पाहिजे होता. परंतु रामोशांनीं आपसांत संगनमत करून ठरविलें कीं, खडकीच्या रामोशांनीं हा गुन्हा केला व आबाजी खंडो याची समजूतहि त्यांनीं तशीच करून दिली. म्हणून खडकीच्या रामोशांना तुरुंगांत ठेवण्यांत आलें. पण त्यांच्यविरुद्ध कांहींच पुरावा नव्हता. शेवटीं सात गांवांच्या रामोशांनीं वर्गणी करून त्याचें नुकसान भरून द्यावे असें ठरलें, .(राजवाडे यांची मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड १० वा) चोरीचा तपास लावण्याचें याम महार किंवा रामोशी यांचें. गुन्हेगारी त्यांच्या गळ्यांत आली असतां त्यांस वरीलप्रमाणें दंड पडे.

फौजदारी कामांत चौकशीचा क्रम पाटील, कमाविसदार किंवा मामलेदार, सरसुभेदार, सरन्यायाधीश किंवा पेशवा असा असून दिवाणी दाव्यांत पंचायतीचा जितका उपयोग करण्यांत येई तितका फौजदारी कामांत करण्यांत येत नसे. किरकोळ फौजदारी गुन्ह्याची चौकशी करण्याचा, आणि अपराध्यास, दंडाची किंवा कैदेची शिक्षा देण्याचा अधिकार पाटलासच होता. हे निकाल पाटील स्वतः किंबा पंचामार्फत लावी व महत्त्वाचे खटले मामलेदाराकडे किंवा हुजुराकडे पाठवी. पेशवाईतलि न्यायपद्धतीसंबंधानें मि. चॅपलीन आपल्या सन १८२४ सालच्या रिपोर्टांत लिहितो 'शिवीगाळ, किरकोळ मारामारी व अतिक्रमण यासारखे खटले पाटील स्वतः चालवी. त्याच्या अधिकाराला स्पष्ट अशी मर्यादा नव्हती. तो जी शिक्षा देई ती थोड्याशा चापट्या किंवा चावडीवरील एक दोन दिवसांची कैद यापेक्षां जास्ती नसे. यापेक्षा अधिक शिक्षेची जरूरी, असल्यास पाटील सदर खटला मामलेदाराकडे पाठवीत असे.'

प्रकरण सव्विसावें

जमीनमहसूल पद्धति

गांवचा पाटील हा फार प्राचीन काळापासून जमीन महसुलासंबंधाने जिम्मेदार समजण्यांत आला आहे. त्याने गांवातील सगळया कुळापासून वसूल जमवावा व तो सरकारांत भरावा. जमीनमहसूलपद्धतीस महाराष्ट्रांत नवीन प्रकारची थोडशी शिस्त मलिकंबरापासून लागलेली दिसते. तो अहमनगरच्या निजामशाहीत दिवाण असून त्याने आपली शिस्त सन १६०५ ते १६२६ च्या दरम्यान महाराष्ट्रांत सुरू केली असावी. त्याच्या कारकिर्दींत जमिनीची प्रत्यक्ष मोजणी झाली असेल असें म्हणवत नाहीं. तथापि त्याने जमिनीच्या सरस व निरस अशा दोन प्रती ठरविल्या आणि शेतसाऱ्याबद्दल धान्य न घेता पैसा घेण्यास सुरुवात केली. [बॉंबे गॅझीटीयर व्हॉ. १८ वा भाग २ रा]

मलिकंबराच्या मागून या बाबतींत दुसरा प्रयत्न सन १६६० त शिवाजीने केला. त्यानेहि शेतसाऱ्याबद्दल धान्य न घेता पैसा घेण्याचेच धोरण पसंत केलें. एकंदर उत्पन्नाचा एकतृतीयांश वाटा शेतकऱ्यानें द्यावा असें त्याने ठरविले. हा शेतसारा प्रत्येक शेतकऱ्यापासून तो वसूल करीत नसून सबंध गांवाने सरकारांत वटसारा किती भरावा हें त्याने निश्चित केले व त्याची वाटणी गांवकऱ्यांत करण्याचे काम पाटलावरच सोपविले. सारांश, गांवच्या वसुलाबद्दल शिवाजीस पाटील जबाबदार, शेतकरी जबाबदार नव्हे. अर्थात्‌च या पद्धतीमुळें पाटलाचे अधिकार गांवापुरते पुष्कळच वाढले असतील यांत संशय नाहीं.

परंतु मलिकंबर काय किंवा शिवाजी काय यांच्या संबंधाची माहिती बरीचशी अनुमानधबक्याचीच होय. त्यापेक्षां अधिक विश्वसनीय माहिती बाळाजी बाजीराव पेशव्यापासूनच मिळते. त्याच्या हातांत पेशवाईचा अधिकार शाहूमहाराजाच्या मृत्यूनंतर स्थिर झाल्यावर व राज्यांतील घोटाळ्याचे प्रश्न मिटल्यावर त्याने आपले लक्ष जमीनमहसुलाच्या पद्धतीकडे लावून सन १७५८ त वसुलाची घडी नीट बसवून दिली व तीच पद्धति चांगली रुळल्यावर तिच्यांत

ज्या उणीवा आढळून आल्या त्या नाना फडणविसाने आपल्या कारकिर्दीत दूर करून तिला पूर्णत्व आणिलें. शेवटच्या बाजीरावाच्या वेळीं ही रुळलेली पद्धति किंचित् बिघडली असली तरी पेशवाई बुडाल्यानंतर जुन्या पद्धतीची उपयुक्तता व चोखपणा ओळखून तीच पद्धत थोड्याशा फरकानें इंग्रज सरकारानें अमलात आणिली व आज तागायत ती तशीच सुरू ठेवली आहे.

पेशवाईंत सरकारी वसुलाच्या बाबी पुष्कळ असल्या तरी त्या सर्वांत जमीन बाब ही मुख्य होय. जमिनीच्या मगदुराप्रमाणें तिची अव्वल, दुवम व सीम अशी प्रतबंदी करण्यांत आली होती. ही प्रतबंदी जिराइतापुरती. त्याखेरीज बागाईत जमिनीची पाटस्थळ व मोटस्थळ अशी वर्गवारी पाडलेली होती. जिराइतांत अव्वल जमिनीचा आकार दर बिघ्याला दोन रुपये. दुवम प्रतीस दीड रु. व सीम प्रतीस एक रुपया सामान्यतः ठरला होता. उदाहरणार्थ, नाशीक जिल्ह्यांतील परगणे पिंपळगांव बसवंत येथील काळया जमिनीचा आकार दर बिघा दोन रुपये व माळजमिनीस एक रुपया होता. अर्थात् माळजमीन ही कनिष्ठ म्हणजे सीम प्रत होय. साऱ्याबद्दल पैसा घेण्याचा शिरस्ता असला तरी शेतकऱ्याची सोय नक्त रकमेऐवजी धान्य घालण्यांत असल्यास त्याजपासून धान्यहि घेत. कठापूर संमत कोरेगांव (जिल्हा सातारा) येथील शेतकऱ्याकरिता सरकारांत ध्यावयाच्या धान्याचेच निरख ठरविले होते. ते असे–अव्वल जमिनीस दर बिघ्याला बारुले ३। मण १ पायली, दुवम जमिनीस २॥ मण २ पायली व सीम जमिनीस १॥ मण १ पायली. (पे. डा.) निरख ठरविण्याची ही पद्धति वरून आडनिडी दिसते. परंतु शक्य तेवढा मोठा भाग मणांत सांगून उरलेल्या पायली दाखविणे शेतकऱ्याच्या दृष्टीने समजण्यास सोंपे असेल. धान्याचे हे प्रमाणहि २, १॥, १ या रुपयांच्या प्रमाणास बरेचसे धरून आहे. सीम जमिनीस एक रुपया या प्रमाणांत कठापूरच्या सीम जमिनीस धान्य २२ पायली धरले आहे. त्यावरून धान्याचा भाव सातारा प्रांती रुपयाला २२ पायली होताच असें अनुमान निघत नाहीं. सरकारास पडणारा वाहतुकीचा आजोरा हिशेबांत धरून धान्याचा अधिक भाव धरण्यांत आला असला पाहिजे. रुपया ऐवजी धान्य घेताना वरील भाव सर्व स्थळी व काळी सारखाच होता असे नाही. स्थलकालपरत्वे त्यांतील बदल स्वाभाविक होय.

कठापूर हा सातारा जिल्ह्यांतील देशावरचा गांव. त्याकरिता ठरविलेल्या भावापेक्षा मावळ भागाचा भाव भिन्न आढळतो. मावळासाठीं सन १७४२-४३ मध्यें पुढीलप्रमाणें भाव होते.

भात लहान मोठें	दर मणी	१। रु.
वरी	,,	,,
नागली	,,	१॥ रु.
ज्वारी	दरखंडी	३५ रु.
गहू	,,	४० रु.
हरभरे	,,	४० रु.
तीळ	एक रुपयास	४ पायली
तूप	,,	२ शेर

बागाईत जमिनीवरील शेतसारा सर्वत्र सारखा नव्हता. त्याची आकारणी पिकाच्या जातीवर अवलंबून असे. बागाइतात ऊस असला तर त्याचा आकार दर बिघ्याला ६ रु. व माळवे असले तर त्याचा आकार ५ रु. घेत. पिकपरत्वे करावयाचा हा बदल जिराईत जमिनीसहि लागू करण्यांत येई. भातजमिनीस दर बिघ्याला दहा मण सरकारांत घेत. अशा रीतीनें हजारो खंडी सरकारी गल्ला राज्यांत ठिकाठिकाणी गोळा होत असे. बेदरच्या राज्यांतील मंगळवेढ्याचा दामाजीपंत याच्या कथेचे मूळ याच स्वरूपाच्या गल्ल्यांत सांपडण्यासारखे आहे. या रीतीनें जमलेल्या गल्ल्यापैकीं कांहीं गल्ला सरकारी खर्चाकरिता पेवातून अगर अंबारांतून राखून ठेवीत व बाकीचा विकून टाकीत. कोकणांत सरकारसारा म्हणून जे भात जमा होत असे ते व्यापाऱ्यांना देत व व्यापारी ते जहाजांतून मुंबईस नेऊन विकीत, असें खालील पत्रांवरून वाटते. हें पत्र कुलाबा जिल्ह्यांतील नागोठणे बंदरावरील कोणा अधिकाऱ्यानें नानासाहेब पेशव्यास लिहिले आहे.

‘ विज्ञापना. बंदर नागोठणे येथें पूर्वापार सावकार येतात. त्यास पूर्वीं खुंटवा अगर गैरउपसर्ग कुलाबकराकडून लागत नव्हता. हल्लीं स्वराज्य जालिया तागायत रेवसेस कुलाबकर खुंटवा दरखंडीस चवलप्रमाणें घेत असतां चवलाचा पावला, पावल्याचा अर्धा, अर्ध्याचा रुपया याप्रमाणें घेऊं लागले. त्यास हल्लीं

सरकारचे भात फरोक्तपैकीं सावकार घेऊन जातात. त्यास दोन चार रोजे रेवसेस उगेच खोटी करून रजेचे (?) से दोनसे तीनसे पावेतो रुपये घेऊन निरोप देतात. यामुळें सावकार दहशत खातात. बंदरी सावकारानी भात घेऊन फडावर राशी घातल्या आहेत. रेवसचे धास्तिमुळें नेत नाहीं. येविसी पूर्वी सेवेसी लिहिले होते कीं, सरकारचे भात मुंबईस जाईल त्यास अटकाव न करणें म्हणोन अंगारकास ताकदिपत्र पाठवावे म्हणोन एक दोनवेळा सेवेसी विनंति लिहिली. परंतु पत्र येऊन त्याचा वंदोबस्त न झाला.हाली याप्रमाणें वर्तमान आहे. अंगारकास ताकीद होऊन सुदामतप्रमाणें न झाले तर सावकारांस भात दिल्हे आहे ते फिरोन घ्यावे सारके होईल. भाताच्या राशी फडावर पडल्यामुळें सावकाराकडून रुपये येत नाहीं व बंदरहि पाडिले येविसीची काय आज्ञा ते करण्यास स्वामीं खावंद समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना '(पे. द. २३) या पत्रांतलि अंगारक म्हणजे आंग्रे. रेवस हे आंग्र्याच्या ताब्यातील बंदर, आणि सावकार म्हणजे घाऊक व्यापारी. पेशवे व आंग्रे यांचा नानासाहेबाच्या वेळी बेबनाव असून आंग्रे पेशव्यास जुमानति नव्हता.नागोठणें हें पेशव्यांचे बंदर. त्या बंदरांत सावकारानी भात खरेदी केल्यावर तें रेवसवरून मुंबईला रवाना व्हावयाचें. पण त्यावर रेवस येथें आंग्रे वाढत्या प्रमाणांत जकात घेऊ लागल्यामुळें सावकारानी भात नागोठणे बंदरांत तसेच पाडून ठेवले. त्या योगानें त्याजपासून यावयाच्या रकमा थांबल्यावरून आंग्र्याचा बंदोबस्त करण्यास तेथील अधिकाऱ्यानें वरील पत्रांत नानासाहेबास लिहिले आहे.

पिकाच्या जातीप्रमाणें साऱ्याची आकारणी करावयाची असल्यामुळें त्या कामाकरितां पहाणीकारकुनाची नेमणूक होत असून त्यास पगार दरमहा ७।८ रु. मिळे. त्याकाळीं तरमबंदीहि हल्लींप्रमाणें तीस वर्षांनीं होत नसे. अतिवृष्टि, अनावृष्टि व सैन्याच्या हालचाली किंवा परचक्राचे आगमन यामुळें जमिनीचे व पिकांचे नुकसान वारंवार होत असल्याने त्या काळांत तरमबंदी पांच वर्षांहून अधिक मुदतीची करीत नसत. या पद्धतीचें नांव कौल हें असून हा कौल त्या त्या गांवापुरता किंवा प्रदेशापुरता वेगवेगळा देत. ' तालुके विजयदुर्ग येथील मुलकी जमाबंदीचा मक्ता पांच सालांचा करून दिला होता. ती पांच वर्षे पुरी झाल्यावर पहाणी व्हावी ती झाली नाहीं. मागील मक्त्याचे शेवटील सालच्या बेरजेप्रमाणें सालोसाल उगवणी होत आहे. याजकरितां पहाणी करून

जमाबंदी करावी म्हणून दोन तीन वर्षें रयतेचें बोलणे आहे. सालमजकुरी रयतेनें सुभा येऊन फार गवगवा केला. तरी बागाईत जिराईत व नक्त बाब यांची हंगामाचे दिवसांत पहाणी करणे. गुदस्त बेरजेस सरासरीमुळें कमी न आणतां जास्ती साधतां येईल ते साधावें (पे. डा.) या उताऱ्यावरून एक मुद्दा लक्षांत येतो, तो असा कीं, बहुधा प्रत्येक गांवांत जमीनमहसूल देण्यांत दोन पक्ष असावे. एक पक्ष धान्य घालीत असे व दुसरा रोख रकमा देत असे.

अशा रीतीने जमीनधारा पांच वर्षांचा ठरला तरी रयतेवर त्या मुदती-पूर्वी अस्मानीसुलतानीं गुदरली असतां त्या त्या सालासाठीं वसुलाचे बाबतींत विशेष विचार सरकार करीत असे. मोगलाईच्या हद्दीवर आणि पुणें व औरंगा-बाद यांच्यामधील महाराष्ट्राचा जो प्रदेश त्याला मोगल-मराठ्यांच्या लढाईत उपद्रव वारंवार व्हावा. ‘ सन १७५१–५२ सालीं मोगलाचा दंगा झाल्यामुळें मौजे हिंगणें व गणेगांव तर्फ कर्डेरांजणगांव लुटले गेलें, घरें जळालीं, साठीं गांवांस सालमजकुरी माफीचा कौल दिला. ’ शत्रूकडून मराठ्यांच्या मुलुखाचे असें नुकसान व्हावेंच, पण त्याखेरीज खुद्द पेशव्यांच्या सैन्याचा मोहिमेवर जातांना वाटेंत तळ पडला असतां रयतेस उपसर्ग पोचावा. ‘ सन १७५९–६० मध्यें मौजे रांजणगांव व सांडस येथे भाऊसाहेब पेशवे यांचे स्वारींत डेरे व लष्कर यांचा मुक्काम आठ दिवस पडला. त्यामुळे शेताच्या झालेल्या खराबीसाठीं सरकार शिरस्तेप्रमाणें पाटलास शेतसारा मजुरा देण्याचा हुकूम झाला. ’ पाऊस नियमित व भरपूर पडला तरच बागाईत जमिनीस पाण्याचा पुरवठा पुरेसा व्हावयाचा. पण तेंच पावसाचे मान कमी झाले असतां बागाइतास हिसका बसणें स्वाभाविक होय. तसे झाल्यास बागाताइचा आकार सरकारनें कमी करावा. ‘ सायवडीं बागाईत आहे. दर बिघ्यास ६ रु. सारा घेण्याचा शिरस्ता आहे. पण अलीकडे पाणी नाहीं. म्हणून बागाईत जात असल्यामुळें सालमज-कुरापासून (१७५१–५२) बिघ्यास तीन रुपये सोड दिली. ’ म्हणजे बागा-इताचा आकार निम्मा केला. पाऊस फार पडून कित्येक गांवांच्या जमिनी वाहून जाव्या. तसे होऊन जमिनींचा कस कमी झाल्यास सारावसुलीचा फेरविचार व्हावा. ‘ पाडळी संमत कोरेगांव (जि. सातारा) ह्या गांवची जमीन वाहून जाऊन माळ झाला व पीक होईना. म्हणून दुसाला गल्ला माफ केला. तसली जमीन जमाबंदीस वजा घातली. पुढें पीक येईल त्याप्रमाणें आकार. ’ कोठें दुष्काळ

पडून नापीक झाल्यास साऱ्याची पूर्ण माफी देण्यासहि सरकारांतून हयगय होऊं नये. ‘ मौजे पाचोरे परगणें वण येथे नापीक झालें म्हणून बाकीचा ऐवज सोड दिला. ’ परंतु सोड द्यावयाची किंवा निम्मा आकार घ्यावयाचा हें केवळ रयतेच्या तक्रारी आल्या म्हणून करण्यांत सरकारची फसवणूक होण्याचा संभव फार. तशा प्रकारची फसवणूक न होण्यासाठीं पहाणीची व्यवस्था फार काळजीपूर्वक करणें अत्यंत जरूर यांत शंका नाही. ‘ कोकणांत तोतयाच्या पारिपत्या करितां फौजा घाटाखालीं उतरल्या. त्यामुळें शेताभाताची तसनस झाली. ते निमित्त साऱ्या रयतेस होऊन रयत वसूल देणार नाहीं. याकरितां तालुक्या-तालुक्यास चांगले कारकून जलदीनें शेतेभात आहेत तो पाठवावे व कोणते तालुक्यात कोणा रयतीचा किती माल खराब झाला तो आकारून आणावा. ’ असा पेशव्यांकडून तिकडील अधिकाऱ्यांना हुकूम गेला. यावरून वसुलाचे काम कसे कसोशीनें होत असे व रयतेस अन्याय न होण्याविषयीं जशी काळजी घेण्यांत येई तशीच रयतेस पोकळ न सांपडतां सरकारच्या वाजवी वसुलांत तूट पडूं नये, याकडे कसें लक्ष पुरविले जात असे हें लक्षांत येतें. फळझाडावर वसुलाची आकारणी वेगळी व्हावी. आंबे फळावरील साऱ्याची आकारणी हजारी एक रुपया होती.

शेतकीस उत्तेजन देण्याचे प्रकारहि पुष्कळ असत. एक प्रकार म्हणजे जमिनींत नवीन लागण करतांना कांहीं मुदतीपर्यंत साऱ्याची माफी देणें. ‘ माडाची व सुपारीची नवी लावण वसई, साष्टी, बेलापूर या प्रांतांत होण्या साठीं कौल दिला. तो असा कीं, माड बारा वर्षें व सुपारी आठ वर्षेंपर्यंत वसूल माफ. ’ पड जमिनीची नवी लावणी करतांना रयतेवर अशीच मेहरनजर असे. पड जमीन लावणीस घेतांच तिच्यांत एकदम उत्कृष्ट उत्पन्न येणें शक्य नसते. तिची सुधारणा आस्ते आस्ते होत जाते व त्याच प्रमाणांत तिचें उत्पन्न वाढत असते. ही गोष्ट लक्षांत घेऊनच कनवाळू राज्यकर्ते आपल्या कराचें ओझें क्रमाक्रमानें वाढवीत असतात. ‘ परगणे पिंपळगांव बसवंत (जि. नाशिक) येथील काळया जमिनीस दर बिघा २ रु. व माळ मुरुड जमिनीस दर बिघा १ रु. धारा ठरला. पड जमिनीची नवी लावणी करतांना पहिल्या वर्षी काळे जमिनीस रु. -।- दुसरे वर्षीं रु. -॥- तिसरे वर्षीं १ रु., चौथे वर्षी १॥ रु. पांचवे वर्षी २ रु. असा चढता क्रम असे. बरड जमिनीस याच्या निम्यानें दर

असे. बागायत पड जमिनीचा आकार पुढीलप्रमाणें.–पहिल्या वर्षी ५ रु , दुसऱ्या वर्षी ६ रु., तिसऱ्या वर्षी ७ रु., चौथ्या वर्षी ८ रु., व पांचव्या वर्षी १० रु. सारांश, जमिनीची पूर्ण सुधारणा होण्यास किंवा तिच्यांत उलट दिशेने फरक घडून येण्यास त्याकाळीं कमाल मुदत पांच वर्षांची धरीत असे दिसते. आतां ज्या जमिनी लावणीस आहेत परंतु जिराईत असून त्यांत मोटस्थळ करावयाचें आहे अशांची आकारणी वेगळया तत्त्वावर होत असे. जिराईत जमिनींत जे विहीर खणून बागायत करतील त्यांस पुढीलप्रमाणें आकार ठरवीत—पहिल्या वर्षी एक रुपया, दुसऱ्या वर्षी दोन रु. तिसऱ्या वर्षी तीन, चौथ्या वर्षी चार व पांचव्या वर्षी पांच रुपये. पानमळ्यापासून सरकारी सारा घ्यावयाचा त्याची पद्धत वेगळी होती. तो सारा बिघ्यावर नसून खुंटावर असे. ‘ तालुका रत्नागिरी येथे पानवेलीचा सरकार दस्त १०० खुंटास पाऊण रुपया होता. ’ जे ब्राह्मण ब्राह्मणांच्या वृत्तीनें म्हणजे ब्राह्मणांची जीं कर्तव्यें आहेत त्यांचें पालन करून रहात त्या ब्राह्मणांस कित्येक सवलती असत. त्यांपैकीं जमीनबाबच घेतली तर इतर कुळांपासून जितका सारा घ्यावयाचा त्याच्यापेक्षां ब्राह्मणांपासून कमी घेण्यांत येई. ‘ तर्फ तुंगार्तन हा कोकणांतील गांव आंग्र्याकडे होता. ते समयीं ब्राह्मणांपासून दर बिघा दहा मण भात सरकारांत घेत. आतां तो सरकारांत (म्हणजे पेशव्यांकडे) आला तरी कल्याण प्रांतीच्या शिरस्त्या प्रमाणें ब्राह्मणापासून घेत जावा. त्याजपासून वेठ बिगार व खरेदी घेऊं नये. ’ या अर्जाचा पेशवे सरकाराकडून विचार होऊन ब्राह्मणापासून दर बिघा ५ रु, ३। आणे घ्यावे असे ठरलें. शेतकऱ्याकडे केव्हां केव्हां एक एका वर्षाची साऱ्याची बाकी धान्याच्या रूपानें राहिली असतां दुसऱ्या वर्षी त्याची दिढी वसूल करावी. हा प्रकार सावकारी पद्धतीचा झाला. जे गांव तोटयाचे असतील किंवा ज्यांना नक्त रकम देण्याची ताकद नसेल त्या गांवांची बटाई करावी म्हणजे त्याजपासून खंड घ्यावा. ‘ प्रांत जुन्नर येथील खानापूर, आगर व शिरोली खुर्द या तीन गांवीं पाऊसपाणी नाहीं, व मोगलाचे कसाले भारी म्हणून पाटील व मिरासदार कुणबी परागंदा झाले. उपरी कुणबी गांवावर आहेत त्यांस बटाईचा कौल दिल्यास पेस्तर कीर्द होईल. त्यांच्यापासून येणाऱ्या वसुलाचे तीन हिस्से करून एक हिस्सा रयतेस ठेवावा, एक हिस्सा स्वराज्यांत घ्यावा व एक हिस्सा मोगलाईस द्यावा. ’ या उदाहरणांतून दोन गोष्टी निष्पन्न होतात.

सरकारास धान्यापेक्षां द्रव्यरूपानें वसूल करणें सोयीचें असले तरी रयतेस अनेक अडचणीमुळें वसूल तसा देणें शक्य नसल्यामुळें धान्य तर धान्यच घेणें भाग पडे. दुसरी गोष्ट अशी कीं, कैक गांव दुअमलीहि असल्यानें त्यांचा वसूल दोघांत वाटून द्यावा लागे.

वरील उदाहरणांत एकंदर उत्पन्नाचा एकतृतीयांशच सरकारानें रयतेकडे ठेवलेला दिसून येतो. ज्यांच्यापासून हा वसूल करावयाचा तीं कुळें मिरासदार म्हणजे जमिनीचे मालक अशीं नव्हतीं. उपरी म्हणजे खंडकरी अशी असल्यानें हल्ली ज्याप्रमाणें जमिनीचा मालक आपल्याकडे एकंदर उत्पन्नाचे दोन हिस्से घेतो व कुळाकडे एक हिस्सा ठेवतो त्यांतीलच हा प्रकार आहे. कारण उपरी कुळांच्या जमिनींचे मालक त्या काळीं सरकारच समजलें जात होतें. रयतेचें नुकसान झालें असतां त्या नुकसानीपुरतीच तिला साऱ्याची माफी देण्याची दक्षता ठेवण्यांत येत असे त्याचप्रमाणें रयत उठून गेली म्हणजे तिला जाग्यावर बसविण्याकरितांहि अशीच दक्षता बाळगावी लागत असे. ' कोकणांत तोतयाच्या पारिपत्याकरितां फौजा घाटाखालीं उतरल्या. ते दहशतीनें रयत उठोन गेली. पुढें किल्ले सरकारांत सर झाल्यावर रयतीस सुभाहून कौल देऊन वसाहत होऊं लागली. सरकारच्या रावतांनीं गोरेगाव वगैरे प्रांतात कांहीं तसनस केली. याजमुळे रयतीस भरवसा पुरवत नाहीं. रयतेस कोणेविषयीं उपसर्ग देऊं नये. जीवन पाहून जमाबंदी करून निभावणी केली जाईल. ' या हुकुमांत तीन सूचना गर्भित आहेत. सरकारी फौज तितकी कैदशीर नसल्यामुळे तिच्या हातून प्रजाजनावर जुलूम होत असे. त्या जुलमानें भेदरलेली रयत परत गावीं येऊन रहाण्यास धजत नसे. याकरितां तिच्यांत भरवसा उत्पन्न करणें व तिजवर तिची शक्ति पाहून साऱ्याचा बोजा बसविणें हें सरकारचें कर्तव्य समजलें जाई. गावास मूळचा वसूल झेपेनासा झाल्यास गावाकडून नवीन पहाणीची मागणी आली तर सरकार पांच वर्षांच्या मुदतीची वाट न पाहता कारकून, शिपाई व मोजणार पटवारी यांस पाठवून पाहाणी करी; पण सरकार आपण होऊन जेव्हां पहाणी करी तेव्हां त्यापासून सरकारचा तसा फायदा होण्याची खात्री असल्यावाचून करीत नसे. ' प्रांत भिवंडी येथील पहाणी साल मजकुरी झाल्याशिवाय जमाबंदी समजणार नाहीं. याचकरितां पहाणी करण्यास व पहाणी-

दारांच्या भोजनखर्चांस ७।८ शे रु.लागतील. म्हणून तुम्ही विनंति केली. तरी पहाणीमुळें जमा जास्ती येत असेल तर पहाणी करावी व ती रयतेच्या राजी-रोखीनें करावी.' असा सरकारानें भिवंडीच्या अधिकाऱ्यास हुकूम केला. सरकारचा फायदा व रयतेची खुषी या दोन्हीचा मेळ घालण्याचा सरकारचा प्रयत्न असे. सन १७५०-५१ सालीं पाचोरें परगणा वण येथील रयत पुण्यास गेली व तिनें पिक बुडालें असल्यामुळें पेशवे सरकारापाशीं साऱ्याची सूट व तहकुबी मागितली. त्याप्रमाणें २६१३ रुपयांतून १३१३ रुपयांची सूट देण्यांत आली व बाकीचें १३०० रु. रयतेनें चार वर्षांत चार हप्त्यांनीं फेडावें असें ठरलें. सन १७६३-६४ मध्ये भिकाजी विश्वनाथ हवालदार तर्फ चाकण व देशमुख-देशपांडे प्रांत जुन्नर यांनीं हुजूर येऊन सांगितलें कीं जुन्नर प्रांत मोगलानें लुटला व जाळला. सुभेदारांनीं रयतेला सवलती द्याव्या. पण सुभेदार पहाणी करण्यास आले नाहींत आणि पेरणीचा हंगाम जात चालला. म्हणून हुजुरांनीं रयतेस कौल द्यावा. त्यावरून पुढीलप्रमाणें सवलती दिल्या. 'जीं गांवें जळाली व त्यांतील गुरें, वैरण व दाणा जळाला त्या गावाला सबंध वर्षाची सारा—माफी. जीं गांवे अर्धवट जळालीं व अर्धवट लुटलीं गेलीं पण जळालीं नाहींत, त्यांना एक वर्षपर्यंत ½ सारामाफी. जीं गांवें त्यांनीं खंडणी दिल्यामुळें बचावलीं त्यांना एक वर्ष साऱ्याची निमी माफी. ज्या गावाना मुळीच इजा पोचली नाहीं त्यापासून भर आकार घ्यावा. पुढील आकारणी प्रत्येक गांवची पुढील स्थिति पाहून ठरविण्यांत येईल.' सरकार व रयत यांचा जिवाला जीव मिळाला असला म्हणजेच इतक्या काळजीकाळ्याने रयतेच्या स्थितीचा विचार केला जातो.

वसुलाच्या पद्धति अनेक असत. मुख्य पद्धत म्हणजे मामलेदार हा पगारी अंमलदार नेमून त्याजकडून वसूल करविण्याची. प्रत्येक कुळाने किती सारा भरावा याचा कौल पांच वर्षांचा ठरलेला असेच. तो थकूं न देता पाटील कुलकर्णी व आपल्या हाताखालील इतर नोकर यांच्या मदतीने वसूल करणें हेच मामलेदाराचे मुख्य काम. ते नीट रीतीनें पार पडण्यास जसे हाताखालील अधिकाऱ्यांचे सहकार्य पाहिजे तसेच प्रजेचे व तिच्या पिकाचेहि रक्षण परचक्रा-पासून किंवा लुटारू लोकांपासून व्हावयास पाहिजे. याकरितां मामलेदार जवळ शिबंदी बाळगून प्रजेचें रक्षण करीत. त्यांच्या ताब्यांतील सर्वच्या सर्व जमिनी मिरासदार शेतकऱ्यांच्या वहीत असत असें नाहीं. ज्या मिरासदाराकडे असत

त्यांचा सारा ठरलेला असे. परंतु त्याशिवाय उरलेल्या जमिनी उपरी कुळाकडे खंडाने लावण्यांत येत. त्यांचा वसूल करण्याचे काम मामलेदार आपल्या हाताखालील कमाविसदारांना सांगत. या खंडपद्धतीस कमाविसी असेंहि म्हणत.

नवीन जिंकलेला मुलूख ताब्यांत आल्यावर त्यांत पेशव्यांची वसूलपद्धति एकदम लागू करणें शक्य नसे. याकरितां कोठे खंडपद्धति तर कोठें मक्त्याचीपद्धति तात्पुरती सुरू करावी लागे व मागाहून कांहीं वर्षांनीं स्थिरस्थावर झाल्यानंतर शेतकऱ्यांना पांच वर्षांचा कौल देणे सोयीचे ठरे. मक्त्याच्या पद्धतींत मामलेदार अगर कमाविसदार कांहीं उक्ती रक्कम सरकारास जमीनमहसूल म्हणून देत व कुळाशी परभारे करार करून त्यांजपासून वसूल घेत. सरकारांत भरलेल्या रकमेंत व मामलेदारानी कुळापासून उगविलेल्या रकमेंत रहाणारी कूस हाच मामलेदाराचा फायदा, म्हणजेच पगार. अर्थात् हें काम अत्यंत कष्टाचे, जोखमीचे व जिकीरीचे असल्यामुळें त्यांत मामलेदाराला वाजवी पगाराहून अधिक लाभ होत असल्यास तो क्षम्यच समजला पाहिजे. जैनाबाद हा परगणा बऱ्हाणपुराजवळचा. त्याची व्यवस्था नानासाहेब पेशव्याच्या वेळीं नुकतीच लागत असून त्या कामावर रामाजी केशव यास कमाविसदार नेमण्यात आले होते. त्यानें आपण कोणती कामागिरी बजावली याचा तपशील ता. ८।४।१७४५ रोजीं लिहिलेल्या पत्रांत दिला आहे. सदर पत्रांतील कांहीं भाग मधून मधून रा. सरदेसाई यांनी गाळाला आहे. त्यांनीं छापलेल्या भागांतीलहि जरूर तेवढाच मजकूर येथें उद्धृत केला आहे.

‘शहर बऱ्हाणपूर येथील उपद्याप करून सरकारांत करोडागिरी व लाल. बाग वगैरे बाग जप्त केले. त्या सालात कमाविसीने जो आकार जाहला तो सरकारात जमा केला. त्यानंतर सन खमसात सदरहू आमलाचा मक्ता करणें म्हणोन आज्ञा केली. सन मजकुरापासून चार सालां पातशाही अमलाचा मक्ता करार करून दिला. आज्ञेप्रमाणे आमल चालत होता. बागास तगाबी व नहर पाणियाचे दागदोजी करून लावणी उत्तम केली. सालदरसाल मामालियेतविर चढ व कर्जपट्टीची नेमणूक आहे, त्यास ऐवज जाहला पाहिजे, म्हणोन कितेक प्रकारे बंदोबस्त केला...परगणे मजकूरचे वर्तमान तरी या सालांत... तमाम बांडी जाहली. लोकास कांहीं केल्या धीर पुरत नाहीं...सर्वांचे वाटेप्रमाणें तुमचा निरवाह करणार श्रमिंत समर्थ आहेत. याप्रमाणें लोकांचें समा-

धान करून कामकाजास लाविले आहेत. या प्रांती भिल्लाचा उपद्रव बहुत आणि हा महाल शहरनजीकचा. सिबंदी मातबर लागत आहे. सालाबाद सरकारांतून शंभर रावतां (ची) आहे. त्यास सालमजकुरी राऊत आले नाहींत. हंगामाचे दिवस आहेत. शंभर रावताची आज्ञा केली पाहिजे कीं, सर्व बंदोबस्त होईल. भिलाचा उपद्रव बहुत आहे...सेवकास आज्ञापत्र येईल तर राऊत येथें चाकर ठेऊ.' (पे. द. २३).

कांहीं कमाविसदारांचा अधिकार मामलेदाराइतका असे. त्यापैकींच परगणे जैनाबदचा कमाविसदार रामाजी केशव हा दिसतो. त्याची कर्तव्ये किती प्रकारची होती याची सर्व माहिती वरील पत्रांत आहे. कुळाना तगाई देणें, पाटाची डागडुजी करणें, बागा खंडानें लावणे, शेतकऱ्यास धरि देऊन त्यांच्याकडून शेतकाम करवून घेणे, राऊत पदरी बाळगून भिल्लापासून त्यांस राक्षिणे इत्यादि कामाची जबाबदारी अंगावर घेऊन परप्रांतीं करावयाची कमाविशी सुखाची कशी नव्हती हें सर्व रामाजी केशवाचे पत्र वाचून मनांत भरते.

कोंकणांत जव्हार संस्थान व त्याच्या आसपासची कोळी राजांची संस्थानें यांजपासून मुलूख जिंकून घेण्याचे काम पहिल्या बाजीराव पेशव्याच्या कारकिर्दीत सुरू होते. त्या संबंधाच्या लढाईत जो प्रदेश ताब्यांत येई, त्याच मामला मक्त्यानें दिला जात होता. त्यावरूनहि मक्त्याची मामलत ही एक कामचलाऊ व्यवस्था समजण्यांत येई हेंच सिद्ध होते. शंकराजी केशव हा सरदार जव्हार व इतर कोळी संस्थानें यांच्या तोंडावर बहादुरपुरा येथें होता. त्यानें चिमणाजी आप्पास ता. २८।६।१७३९ रोजीं खालील पत्र लिहिले आहे.

' कोहज मामला राजश्री पंताजीपंत यास आहे. त्यास सालमजकुरी कोणी गृहस्थ जास्ती कबूल करून मामला स्वामी सांगतात म्हणून आइकिले. ऐसीयासी पंताजी मोरेश्वर हे गृहस्थ भले आहेत. आणि स्वामिकार्याचे सेवक एकनिष्ठ इतबारी आहेत. आणि त्यानी आजी दोन वर्षे मामलाहि चांगला राखून कस्त मेहनतहि चांगलीच केली आहे व असरीच्या वेढ्यासहि मेहनत बरी केली. स्वामीसहि विदित आहे. ऐसीयासी त्यांचा मामला स्वामीनी काढून दुसरीयास सांगावा असे नाहीं. आणि याप्रमाणें दुसरा वर्तेल ऐसेहि नाहीं. मशारनिल्हेचा मामला काढावा हे गोष्ट स्वामीनी न करावी. दुसरा मामलेदार येईल

त्यास पोटास लागोन जहाज फरमास व स्वामीकार्याची तिडीक लागणार नाहीं. यामुळें आमचे साहित्य होणार नाहीं. त्याचे हाते रामनगरकर हाती धरून घेणें. प्रांतीचे कोळी व एक वनसाड्याचे राजकारण आणिले आहे. त्याजकडून राजश्री गोपाळ महादेव जमावानिशी भवानीगडास रात्रंदिवस काम करतात. दाहून चालत्या कामास अंतर पडेसे न करावे' (पे. द. ४०).

वरील पत्रांत मक्त्याच्या मामलतीचे स्वरूप चांगले व्यक्त झाले आहे. लिलावातल्याप्रमाणें जो जास्ती रक्कम देईल त्याजकडे मामलत सोंपवावयाची. मुलुख नवीन ताब्यांत आल्यावर इंग्रज सरकार त्याजवर कमिशनरी अमल सांप्रत बसविते त्यांतलाच हा एक प्रकार. मुलूख नवा, त्यांत शांतता प्रस्थापित न झालेली, जमिनींची पहाणी 'मोजणी व आकारणीहि व्हावयाची राहिलेली, अशा प्रदेशांतून जो येईल तो वसूल करणारा लायक पण कडक अमलदार नेमावयाचा ही पेशवाईतलि रीत होती. त्या रीतीप्रमाणें पंताजी मोरेश्वर यास मामलेदार नेमले असता त्यास काढून टाकून त्याच्या जागी अधिक मक्ता घालणारास चिमणाजी आप्पा मामलत सांगणार असें समजताच तिकडलि लष्करी कामगिरीवरील अधिकारी शंकराजी केशव यानें पंताजीपंताची शिफारस करून त्याजकडेच मामलत ठेवण्याविषयीं चिमणाजी आप्पास आग्रहपूर्वक लिहिले आहे. कारण पंताजीपंत चांगला मेहनती, स्वामिकार्याची आस्था वाळगणारा व मोहिमेस सहाय्य करणार आहे अशी शंकराजी केशवाची खात्री होती.

मामलेदार पगारी असल्यास त्यास सालीना पाच हजार रुपयापर्यंत तनखा मिळे. मामलत पगारी असो कीं, मक्त्याची असो त्याच्या प्राप्तिचा निरख सामान्यतः शेकडा एक टक्का याप्रमाणें असून त्याजकडून यावयाचा वसूल हप्त्याहप्त्यानी आगाऊच घ्यावयाची रीत होती. अर्थात् ही रक्कम त्याला कित्येक वेळा पदरचीच द्यावी लागत असेल हें उघड आहे. यावरून मामलतीवर नेमावयाचा माणूस घरचा ऐपतदार व पतीचा असला पाहिजे यांत शंका नाहीं. या दृष्टीनें विचार केल्यास मामलतविर नेमावयाची माणसे समाजांतलि उच्च दर्जाची व ऐपतवान असल्याचेच सिद्ध होते मामलेदाराकडून यावयाचा वसूल थोडाथोडका नसून चारपाच लाखापेक्षाहि अधिक असे. त्यांच्या मागे वसुलाची निकड कशी लावण्यांत येई याचा अंदाज पुढील पत्रावरून कोणीहि बांधील. हें

पत्र नानाफडनविसाचे वडिल जनार्दन बल्लाळ यास नानासाहेबाने ता. ११।७ १७५५ रोजी लिहिले आहे.

‘ सालमजकुरी फौजेची समजावीस लौकर करून स्वारीचा डौल त्वरित जाला पाहिजे. ऐशास रसदाचा पट आकारून मामलेदारापासून रसदा घ्यावयास आरंभ करणें. श्रावणमास समीप आला. दक्षणेस ऐपत पाहिजे. तर मातबर मामलेदार ज्याचा गुंता नाहीं त्याजपासून ऐवज रसदेचा घ्यावयास आरंभ करणे. पंचवीसतीस लाख रुपये पावेतो ऐवज लौकर जमा होये ऐशी तरतूद करणें. सालमजकूरचा रसदेचा अजमास पाऊणकरोड ऐशी लाखपर्यंत आहे. ऐवज जमा करावयाची डौल करणे. मातबर मामलेदार राजश्री गोविंद बल्लाळ व नारो शंकर व हरि विठ्ठल इत्यादिक आहेत. यांच्या कारभाऱ्यास ताकीद करून ऐवज रसदेचा लौकर मागणे. सर्व लहानथोर कमाविसदार यांस रसदेविसी पत्रे लिहून पाठविणे आणि ऐवज जमा करावयाची तरतूद करणे. रसदाचा पट व कोणे माहाली काये दिकत हे ताा वार पट लौकर पाठवून देणें. येथूनहि कळेल त्याप्रमाणें लिहून पाठवू. तूर्त ऐवज जमा करण्यास प्रारंभ करणें ’ [पे. द. २३].

या पत्राने पेशव्यांच्या राज्यकारभारावर बराच प्रकाश पडतो. नानासाहेबाची काराकिर्द हा मराठ्यांच्या वैभवाचा कळस समजला जातो. प्रस्तुत पत्र ता. ११।७।१७५५ मधील आहे. पत्र जुलई महिन्यातले म्हणजे श्रावण मासापूर्वी महिना सव्वा महिना पाठविलेले आहे. रयतेकडून वसूल व्हावयाचे रब्बी व खरीप यांचे दोन हप्ते अद्यापि चार सहा महिने दूर. त्यापूर्वींच पट तयार करून रसदेचा तगादा मामलेदारामागे लावण्यास नानासाहेबाने स्वारीवरून पुण्यास जनार्दन बल्लाल यास लिहिले आहे. अर्थात् ही रसद त्याजपासून वसुलापूर्वीच घ्यावयाची होती. त्यावरून पैशाची पेशव्याना सदा जाणवणारी तंगी प्रतीतीस येतेच, पण त्याशिवाय वसुलाची पद्धतिहि समजते. पत्रात पंचवीस तीस लाखांचीच अपेक्षा करण्यांत आली असल्याने हा रसदेचा पहिला हप्ता दिसतो. मामलेदारापासून सामान्यतः किती वसूल यावयाचा याचा अंदाज खालील हुकुमात लागतो.

‘ लक्ष्मण शंकर यास बुंदेलखंडात परगणे अहिरवाडा, परगणे उचाड एकूण

चौमहालांचा मामला सांगितला. मामल्याची रसद तीन लक्ष वीस हजार रुपये त्याने सरकारात भरावयाचे ' (पे. डा.)

कित्येकदा मामलेदारानी रसदेच्या पटाप्रमाणें सरकारात अगाऊ भरणा करावा व तितकी रक्कम सगळीच्या सगळी रयतेकडून मागाहून वसूल न झाल्यामुळें मामलेदारांची बाकी सरकारांत रहावी. नानासाहेबाच्या पत्रांत गुंता म्हटला आहे तो याच बाकीचा. अशी बाकी सरकारात असल्यावर एकाच इसमाकडे मामलत सालोसाल चालत रहावी हें क्रमप्राप्त होय. या रीतीचा उलगडा रामचंद्र बाबा शेणवी यास नानासाहेबाने पाठविलेल्या पुढील पत्रात आहे.

' विनंति उपरी. राजश्री लक्ष्मण शंकर व नारो शंकर व गोविंद बल्लाळ हे मातबर मामलेदार त्या प्रांतीचे. गुदस्ता त्याजपासून रसदा घेणे त्या घेतल्या. पुढें रसदा घेतल्या पाहिजेत. त्यास कोणाचा ऐवज कसा उगवला, पुढें कोणापासून काय रसद घेतली पाहिजे त्याचा अजमास आषाढा अलीकडे लेहून पाठविणे म्हणोन तुम्हास सांगितले असता हा कालपर्यंत येविसीचे तुमचे पत्र आले नाहीं. दसरा समीप आला तर अतःपर सविस्तर लेहून पाठविणे. मामलेदारासहि येविसी ताकीद करून रसदीचे ऐवज येथे भरीत ते करणे. दोन तीन वर्षे लक्ष्मणपंत, गोविंदपंत, नारोपंत, यांचा हिशेब आला नाहीं. यंदा त्यांचा ऐवज आम्हाकडे किती गुंतला, उगवला किती, हा हिशेब त्याजकडील शहाण्या कारकुनासमागमे पाठवणे. दसऱ्यास येथे रसदा त्याजकडील कारभारी येऊन देत ते करणे. येथील फौजेचा अर्ज जाणत आहाच. ' (पे. द. २३)

रामचंद्र बाबा हा यावेळीं उत्तर हिंदुस्थानात रेव्हिन्यू कमिशनराच्या किंवा सरसुभ्याच्या तोलाचा अधिकारी होता. त्याचा दर्जा गोविंदपंत बुंदेल्याहूनहि वरचा असल्याचे या पत्रात ध्वनित झाले आहेच. मामलेदार पुण्यापासून दोनशे तीनशे कोसावर असले तरी त्यांचा साक्षात् संबंध पुणे दरबाराशी असून त्यांच्या कारकुनाने पुण्यास जाऊन हिशेब दिला पाहिजे असा वरील पत्राचा स्पष्ट अर्थ आहे.

शेवटच्या बाजीरावाच्या कारकिर्दीत मराठ्यांची वरील उत्कृष्ट वसुलीपद्धत मोडली व मामलती मक्त्याने देण्यास सुरुवात झाली. मक्त्याच्या पद्धतीत मामलेदाराकडून रयतेवर जुलुम होण्यास सवड असल्याने या पद्धतीचे दुष्परिणाम

रयतेस भोवले व त्यामुळें अज्ञ लोकात मराठ्यांच्या पूर्वापर चालत आलेल्या उत्कृष्ट पद्धतीविषयीं विनाकारण दुर्लौकिक पसरला.

तालुक्यांचा व परगण्यांचा वसूल करण्याकरिता मामलेदार व कमाविसदार असत. पण कोकणांतील रत्नागिरी जिल्ह्यामध्यें गांवाकडून जो वसूल यावयाचा तो खोतामार्फत करण्यात येई. कोकणातील कित्येक गांव खोतांनीं वसविले. खोत हा एकटाच गांवचा पाटील व कुळकर्णी. कुळकर्ण्यानें करावयाचें हिशेबाचें काम स्वतः खोतानें करावें किंवा हाताखाली कारकून ठेवून त्याजकडून करवून घ्यावें. कारकुनास कुळकर्णी म्हणत. खोतास हा एक अधिकार पाटलापेक्षांहि जास्ती होता. गांवच्या वसुलाचा मक्ता खोताकडेच असे. मात्र पाटिलकीचें वतन पाटलाकडे वंशपरंपरेनें चाले तशी खोती खोताकडे चालत नव्हती. मक्त्याचा ठराव जो खोत कबूल न करील त्याचा गांव दूर करून दुसऱ्या इसमास द्यावा. खोती कोणाकडे द्यावी हें महालकऱ्यानें ठरवावे, व ती ऐपत पाहून द्यावी. खोती एक एका इसमाकडे कित्येक वर्षेंहि चालत असे. परंतु ती एकाकडे फार वर्षें राहिल्यानें सदर इसम डोईजड होण्याचा संभव असल्यामुळें सरकार त्या कामीं विशेष दक्ष असे. ' बाळंभट परांजपे यांजकडे खोती १५ वर्षे होती ती एकाकडे बहुत वर्षे नसावी या करितां ती दुसऱ्यास नजर घेऊन द्यावी. ' (पे. डा.)

' अंजनवेली येथील खोती नारो अनंत परचुरे यांजकडे आहे. तेथील सरकारची वेठबिगार, चुडावोंडा, शाकार, फडफर्मास, व राबता महार वगैरे हक्क यावयाचे ते परचुरे यांस दिले आहेत. ' ' मौजे रेवाळी तर्फ अष्टमी मामले अवचितगड येथील खोती नारायण हरि व शंकराजी हरि यांजकडे होती. ते उभयता विभक्त होऊन भांडूं लागले म्हणून त्याजकडून खोती दूर करून रामाजी मल्हार यांस सांगितली. त्याजपासून मौजे मजकुराची उगवणी करणें ' कोठें कोठे खोतावर सरखोतहि असत. इजारदारी हा वसुलीचा आणखी एक प्रकार. हा प्रकार नागपूर प्रांतांत अमलांत होता. कमाविशी जशी परगण्याची तशी इजारदारी परगण्याची. ' आण्णाजी शामराज यांनीं परगणे निंबाईत येथील इजारा केला होता. त्या परगण्यांतील किनगांव येथील ऐवज बाकी राहिला तेव्हां तेथील पाटील कुळकर्णी यांस हुजूर आणून कैदेंत ठेवले. तेव्हां पाटील कुळकर्णी यांनी कांहीं रक्कम दिली व बाकीची त्यांस माफ केली.'

दूरदूरच्या प्रांतांतील मुलकी अमलदारांनीं वसूल केलेला किंवा पाठवावयाचा ऐवज पुण्यास हुंडीनें येत असे. 'लक्ष्मण शंकर यास बुंदेलखंडांत परगणे अहिरवाडा, परगणे उचाड एकूण चौमहालांचा मामला सांगितला. मामल्याची रसद तीन लक्ष वीस हजार रुपये त्यानें सरकारांत भरावयाचे. रसदेचा ऐवज पुण्यापर्यंत यावयाचा तो हुंडीवाल्यामार्फत यावयाचा.' एका सावकारानें दुसऱ्या सावकारास व दुसऱ्यानें तिसऱ्यास या क्रमानें सदर रक्कम पुण्यास पोचती होत असे. हुंडणावळीचा दर बुंदेलखंड ते औरंगाबाद शे. ४ रु., नाशिक ४॥ रु., व पुणें ५ रु. येणेप्रमाणें होता.

शेतसाऱ्याशिवाय कराच्या इतर बाबा अनेक होत्या. दुकानदारावर दर दुकानामागें वार्षिक कर रु. ५।६।७ येणेंप्रमाणें असून त्याला मोहतर्फा म्हणत. लोहारापासून ४ रु. व चांभारापासून ४।५।६ रु. दरसाल वसूल केले जात. जत्रेत गांवोगांवचे दुकानदार माल विक्रीकरितां पाले घालून बसत. त्या पालावरील कराला बाजारबैठक हें नांव होतें. मोठमोठ्या गांवातून घरपट्टी असे. लग्नावरील कराला लग्न-टक्का व म्होतूर लागला असतां त्यावरील कराला पाटदाम म्हणत. म्हशीवर पट्टी होती तशी बकऱ्यावरहि पट्टी होती. दगडाच्या खाणी खोदणारे बेलदार यांनी खाणीतून शंभर रुपयांचा माल काढला म्हणजे त्यास त्यावर पांच रुपये कर सरकारांत भरावा लागे. त्या काळीं प्रवासाच्या वाहनापैकीं डोली हें एक वाहन होतें. आजारी व म्हातारी माणसे, लहान मुलें, बाळंतिणी व इतर स्त्रिया यांना डोलींत घालून एका गांवाहून दुसऱ्या गांवाला नेत. हा धंदा बहुधा कोळ्यांचा असून त्यांना डोलकरहि म्हणत. पुण्यांत असल्या डोलीवाल्यांची वस्ती पूर्वीं जीत होती अशी डोलकर आळी आजहि प्रसिद्ध आहे. डोलींतहि जाती असत. बहेरीची डोली, बलकशीची डोली व खाडीतील डोली. बहेरीच्या डोलीस ८ रु., बलकशीचे डोलीस २ रु. व खाडींतील डोडीस ५ रु. येणेप्रमाणें वार्षिक पट्टी होती.

खाडींतून वहातुक करणाऱ्या गलबतावर पांच खंडीचे गलबतास पावला व त्याहून थोर गलबतास ८ आणे असा कराचा निरख होता. सुरत वगैरे बंदरांतून रनाळे, औरंगाबाद, बऱ्हाणपूर, शहागड, वऱ्हाड इत्यादि दूरदूरच्या प्रदेशांत मालाची वहातुक बैलांच्या पाठीवरून करणारा हुंडेकरी म्हणून वर्ग होता. आजहि शहरांतून हा वर्ग आढळतो. ते एक प्रकारचे भाडेकरीच होत. त्यानी

भाडे घेऊन माल पावता करावयाचा. सदर हुंडेकऱ्याकडून बैलास एक रुपया अशी सरकारी जकात असे. 'हुंडेकऱ्याकडून बैलास १ रु. व सरदेशमुखीचे चार आणे एकूण १। रु. श्रीधर जिवाजी यानी घ्यावा व या मामलतीचे रु. २००१ सरकारांत भरावे ' ' पेशवाईंत जकातीचे उत्पन्न ५ लक्ष रु. होते. मेंढरे चारावयाच्या कुरणांचे उत्पन्न २५ हजार रु., पुण्यांतील टाकसाळीचे उत्पन्न १० हजार रु., वतनजप्तींचे उत्पन्न ५० हजार रु. व अबकारीचे उत्पन्न १० हजार रुपये होते. ' असें पेशवाई अखेर इंग्रज सरकाराने नेमलेला कमिशनर मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा आपल्या रिपोर्टांत म्हणतो. या शिवाय सरकारी जमिनी म्हणजे शेऱ्या, कुरणे, बागा व आंबराया असत त्यांचे उत्पन्न वेगळे. ही उत्पन्ने अगदींच थोडी असून दारूचे उत्पन्न लोकसंख्येच्या मानाने फारच थोडे आहे. दारू कमी खपण्याचें कारण असें कीं, ती कोणी पिऊ नये असाच सरकारचा हेतु होता. दारूची दुकानेच कमी म्हणून दारूचे उत्पन्न कमी. यासंबंधीं एलफिन्स्टन याने मारलेला शेरा मननीय आहे. तो लिहितो ' The use of spiritual liquors was forbidden at Poona & discouraged every where else; the effect of this system on the sobriety of the people was very conspicuous. ' याचा अर्थ असा:— ' पुण्यांत दारूला प्रतिबंध होता व इतरत्र ती खपू नये असेंच धोरण होते. यामुळें एकंदर जनतेची वर्तणूक व्यवस्थित असल्याचे निदर्शनास येत होतें.' हा रिपोर्ट एलफिन्स्टन याने सन १८२१ सालीं केला. त्यावेळीं पेशवाई बुडून अवघी तीनच वर्षे झाली होती. त्यापूर्वी कांहीं वर्षे तो पुण्यास कंपनी सरकारचा पेशवे दरबारांतील रेसिडेंट या नात्याने रहात असल्यामुळें त्याचा वरील उद्गार स्वानुभवसिद्ध आहे हें लक्षांत ठेवले पाहिजे.

प्रकरण सत्ताविसावें

मुलकीखातें

मुलकीखाते हें मुख्यतः सरकारी वसुलाचे खाते. सरकारी कर वसूल करण्याचे काम फार प्राचीन काळापासून वतनदाराकडेच असल्याचे आढळून येते. राजघराणी आली व गेली तरी वतनदार कायमच असत. त्यांचा चरितार्थ त्यांस सरकारांतून मिळालेल्या इनाम जमिनीवर चालावयाचा व त्यांजकडे सदर जमिनी वंशपरंपरेने रहावयाच्या असल्यामुळें सरकारास त्यांना नक्त नेमणुकीच्या रूपानें फार थोडी मदत करावी लागत नसे. सदर जमिनी वतनदारांच्या घराण्यांत राखण्याची जोखीम सरकारावर. एक वतनदार मरण पावला तर त्याचा मुलगा त्याचे काम पहाण्यास पुढें यावा, किंवा तो अल्पवयी असला तर त्याच्या तर्फे गुमास्त्याकडून सरकाराने काम करून घ्यावें. या पद्धतींत सरकारास वसुलाचे कामीं खर्च थोडा येत असल्यामुळेंच ती अमलांत राहिली. ही वतनदारीची पद्धति वरपासून खालपर्यंत पोचली होती. सर्वांत वरचा अधिकारी जो सुभेदार किंवा सरसुभेदार याची प्रारंभी नेमणूक म्हणून होत असली तरी एकदा तो नेमून आल्यानंतर विशेष कारणाशिवाय त्याच्या घरण्यांतून सदर अधिकार काढून घेण्यांत येत नसल्यामुळें तेथेंहि हळूहळू वतनदारीच दृढमूल होई. या पद्धतीचे मुख्य कारण असें दिसते कीं, राजा व त्याचे मंत्रिमंडळ यांजवरील कामाचा भार हलका होऊन राजाच्या खजिन्यांत पडावयाचा पैका बिनघोर यावा.

वतनदारीची पद्धति मुसलमानापूर्वी हिंदू राजांच्या काळापासूनच अमलांत आली असावी, असें बहुतेकांचे मत असून तेच खरे वाटते. वतनदारांतील वरिष्ठ वतनदाराचे देशमुख देशपांडे इत्यादि हुद्दे पूर्णपणें देशीच आहेत. हिंदूंची राज्ये बुडवून मुसलमानानी आपली राज्ये स्थापन केली त्या वेळी त्याना हें जुने राज्ययंत्र आयते मिळताच ते त्यानी आपल्या कामी लावले. मुसलमानी सत्तेतून वाचून ते पेशव्यांच्या हाती लागल्यावर त्याची मोडतोड न करता

त्याचा सांगाडा शक्य तितका कायम राखून जरूर त्या ठिकाणी त्यानी त्याला नवे जोड दिले. जुन्या वतनदार अधिकाऱ्यांचे तीन वर्ग पाडता येतील. वरिष्ठ वर्ग देशमुख देशपांडे इत्यादिकांचा, मध्यम वर्ग दिवाण, फडणीस, पोतनीस इत्यादिकांचा. या दुसऱ्या वर्गाचा उल्लेख एलफिन्स्टन याने दरकदार या संज्ञेने केला आहे. तिसरा कनिष्ठ वर्ग पाटील, कुळकर्णी इत्यादिकांचा.

देशमुख व देशपांडे हे देशाधिकारी. या ठिकाणी देश या शब्दाचा अर्थ मर्यादितच घेतला पाहिजे. साधारणपणे तालुक्या एवढ्या प्रदेशास वरील व्यवस्थेंत देश समजत. उदाहरणार्थ वाई देश. हा सगळा प्रदेश हल्लींच्या वाई तालुक्यांतच मोडतो. अशा प्रकारचे १०।१२ प्रदेश एकत्र केले म्हणजे सुभा होत असे.

गावात जे काम पाटील व कुळकर्णी यांचे, तेच काम देशांत देशमुख व देशपांडे यांचे. पाटील व कुळकर्णी यांनीं गावाचा वसूल जमा करावयाचा व अशा रीतीने गावोगावच्या पाटील कुळकर्ण्यांनीं जमविलेला पैसा देशमुख व देशपांडें यांजकडे जावयाचा. म्हणून पाटील व कुळकर्णी यांना साहाय्य करण्याकरितां गावात जसे वतनदार नोकर असत तसे देशाच्या मुख्य गावी देशमुख व देशपांडे यांच्याहि मदतीकरितां वरिष्ठ प्रतीचे वतनदार नोकर असत. दिवाण, फडणीस, पोतनीस इत्यादि नोकर मूळचे देशमुख व देशपांडे यांच्या हाताखालचेच असावे. शेतसारा वसूल होण्याचे बाबतींत अधिकार चालवावयाचा देशमुखाने व देशमुखाच्या अधिकाराने वसूल आल्यावर त्याचा हिशेब ठेवावयाचा देशपांड्याने. देशमुख हा जातीने बहुधा मराठा, म्हणून साहाजिकच लिहिणारा वाचणारा नसल्यामुळें त्याचा कारभार करावयाचा दिवाणाने, हिशेब तपासावयाचे मुजुमदाराने, दस्तऐवज नोंदावयाचे फडणिसाने, जाबजबाब लिहावयाचे दप्तरदाराने, वसुलाचा पैसा संभाळावयाचा पोतनिसाने व तो पोतनिसाकडे जाण्यापूर्वी नीट पारखून घ्यावयाचा पोतदाराने, अशी देशमुखाच्या कचेरीतील कामाची व्यवस्था होती. हें काम वरिष्ठ कचेरीतलि झाले. पण कनिष्ठ कचेरी जी गांवच्या पाटलाची चावडी तेथील कामाची रीत याच प्रकारची होती. पाटलाच्या हुकुमावरून महाराने रयतेला चावडीत बोलावून आणावे, तिने आणलेला पैसा पोतदाराने पारखावा, व पाटलाच्या ताब्यांत द्यावा, त्याची पावती कुळकर्ण्यानं रयतेस द्यावी व पाटलाने बराचसा

वसूल जमला म्हणजे महाराबरोबर देशमुखाकडे पाठवावा. वसुलाची हीच पद्धति वऱ्हाडांतहि होती. पेशव्यांच्या वेळीं या पद्धतींत बराच महत्त्वाचा फेरबदल करण्यांत आला. मुसलमानांच्या पूर्वीच्या काळापासून पेशव्यापर्यंत चालत आलेली पद्धति तितकी संगीन राहिली नव्हती. किंबहुना मुळांतहि तितकी संगीन नव्हती. पेशव्यांना पाटील, कुळकर्णी व त्यांचे गांवांतील वतनी नोकर कार्यक्षम आढळले. परंतु तितकी कार्यक्षमता त्यांना देशमुख–देशपांडे यासारख्या वरिष्ठ प्रतीच्या वतनदारांत दिसली नसावी. बऱ्याच गांवांचे पाटील हाताखाली घेऊन त्यांजकडून जमिनी वहीत आणविणे व वहीत असलेल्या जमिनींचा वसूल करणें ही जोखमीची कामे संभाळण्याचा वकूब प्रत्येक देशमुखात व त्याच्या हाताखालच्या कामगारांत असेलच असें नाहीं. तो नसला कीं, सबंध तालुकाच तालुका वसुलाच्या दृष्टीनें नुकसानीचा ठरावयाचा. खेरीज कित्येक देशमुख व देशपांडे इत्यादि अप्रबुद्ध व अज्ञानहि निपजावयाचे. यासाठीं वरतीं देशमुख व देशपांडे प्रभृति देशकामगार व खाली पाटील–कुळकर्णीप्रभृति गांवकामगार कायम ठेवून देशमुख–देशपांड्यांच्या हातांत वसुलाचा पैसा जाण्याचे मात्र त्यांनीं अजिबात बंद केले व ही कामगिरी बजावणारा निराळा केवळ पगारी वर्गच निर्माण केला. यातच मामलेदार, कमाविसदार, तरफदार, शेखदार इत्यादि अधिकारी मोडतात. तालुक्यावरचा अधिकारी तो मामलेदार, परगण्याचा कमाविसदार, तरफेवरचा तरफदार व त्याहून लहान टापूवरचा तो शेखदार किंवा कारकून. कमाविसदारापासूनचे खालील सर्व अधिकारी मामलेदाराच्या ताब्यांत असून त्याने त्यांच्या सहाय्याने पाटील कुळकर्णी यांजकडून गांवच्या इनाम जमिनी, रयतावा, व पड जमिनी यांचे पत्रक तयार करावे. हेंच जमाबंदीचे अंदाजपत्रक होय. याच्याच आधारावर गांवचा वसूल व्हावयाचा.

अशा रीतीने मामलेदार व त्याचे आंकित कामगार यांनी आपला सांधा जुन्या वतनदार गांवनोकराशी जोडला; तसाच तो देशमुख, देशपांडे इत्यादि वरिष्ठ वतनदार अधिकाऱ्याशी जोडणे इष्ट होते. तीहि तजवीज पेशव्यानी मोठ्या चातुर्याने केली. देशमुख-देशपांडे हे एका अर्थाने मामलेदाराच्या बरोबरीचे जुने अधिकारी. त्यांच्या खालचे दिवाण, फडणीस, पोतनीस, मुजुमदार इत्यादि अधिकारी मोठ्या योग्यतेचे. यासाठीं सदर वतनदार अधिकाऱ्यांचा

दाब मामलेदार वगैरे उपरी पगारी अधिकाऱ्यांवर ठेवण्यांत आला होता. पेशवाईत देशमुख व देशपांडे हे शेतकरी वर्गाचे हितकर्ते समजले जात असत. मामलेदाराकडून कुळावर वसुलाचे बाबतींत जुलूम होऊं लागला किंवा जरूर ती सूट मिळेनाशी झाली तर पाटील हे देशमुख व देशपांडे यांच्या मध्यस्थीने आपला हेतु साधून घेत. गांवचे पोते पाटील महाराबरोबर मामलेदार कचेरींत भरणा करण्याकरिता पाठवी त्यावेळीं त्याची एक अर्जदस्त मामलेदाराकडे गुदरण्यासाठीं जशी त्याने द्यावी तशी तिची एक नक्कल देशमुख-देशपांड्याकडेहिं पाठवावी. त्यायोगाने झालेला वसुलाचा पडताळा दोन जागीं पहावयास सापडावा. देशमुख-देशपांडे याशिवाय उरलेले वतनदार अधिकारी म्हणजे दिवाण वगैरे दरकदार .हे पिढीजाद व सरकाराने नेमलेले असून त्यांची सही सर्व कागदावर आवश्यक असे. दिवाण हा मामलेदाराचा (डेप्युटी) दुय्यम अधिकारी. मामलेदारच्या सहीशेजारी त्याने सही करावयाची. मुजुमदाराने हिशेब तपासावे, फडणीसाने सनदापत्रे नोंदावी. या सर्वांना वतनाखेरीज पगार मिळत असे. उदाहरणार्थ दिवाणाला सालीना ५९० रु., मुजुमदाराला ४९० रु., फडणीसाला ६१० रु. दप्तरदाराला २८० रु. चिटणीसाला १०० रु. हे सर्व अधिकारी मिळून मामलेदार कचेरी. मामलेदार एकटा पगारी व त्याच्या मदतीला हे सर्व अधिकारी मुख्यतः वतनी व अंशतः पगारी. कमाविसदार, तरफदार व शेखदार हे मामलेदार कचेरींतील अधिकारी नसून त्यांची नेमणूक वसुलाच्या बाबतींत मामलेदारास मदत करण्यासाठीं तालुक्याच्या पाडलेल्या लहान लहान पोटविभागांत केलेली असे. त्यानीच आपल्या विभागांतील गांवी जाऊन पाटील-कुळकर्ण्यांच्या मदतीने वसुलाची अंदाजपत्रके आगाऊ तयार करावी, ती मामलेदाराने त्या त्या विभागांत जाऊन पाटलासमक्ष पहावी व पिके तयार झाल्यावर व पिकाच्या प्रत्यक्ष पहाणीनंतर ती पक्की व्हावी. वर्षअखेर वसुल झाल्यावर मामलेदार वसुली हिशेबाचे कागद पेशवे सरकाराकडे पाठवी. त्याच्या कागदावर देशमुखांच्याहि सह्या असत. याचा अर्थ असा कीं, त्यानी ते तपासलेले असत. मामलेदाराचा मुखत्यार पुणे दरबारात असून त्याजमार्फत सरकारी हुकूम त्याजकडे येत त्याचे जबाब तो देई. वर्षातून कांहीं महिने भोवतालच्या भागांतील मामलेदारहि पुण्यात असत. हें झालें पुण्याभोवतालच्या प्रदेशाचे. पण कोकण खानदेश, गुजराथ, कर्नाटक, माळवा, बुंदेलखंड इत्यादि प्रांत दूरचे असल्यामुळें

तिकडील मामलेदाराशी साक्षात् सर्व बारीक बाबतीत पत्रव्यवहार करणे व भानगडींचा निकाल लावणे पुणे दरबाराला शक्य नसे. यासाठीं मामलेदार व पुणें दरबार याना जोडणारा सरसुभेदार हा वेगळा अधिकारी त्या त्या प्रांती होता. नानासाहेबाच्या वेळी रामचंद्र बाबा शेणवी हा बुंदेलखंड, माळवा या बाजूला सरसुभेदार असावा.

वरील वर्णनावरून पेशव्यानी जुनी वतनी पद्धति कायम ठेवून तिचा नवीन उपरी अधिकाऱ्यांशी कसा मेळ घातला होता हें चांगलें समजते. हा मेळ प्रजेवर वसुलाचा जुल्म तर होऊ नये पण सरकारच्या वाजवी उत्पन्नास खोट तर येऊ नये या दृष्टीने उत्कृष्ट होता. इंग्रजी राज्यांत ती पद्धति फारच थोडया फेरबदलाने गेली ११६ वर्षे टिकून आहे. हा तिच्या चोखपणाचा प्रत्यक्ष पुरावाच समजण्यास हरकत नाहीं. मात्र पेशवाईतील मुलकी खात्याची मांडणी एकत्र कोठे तत्कालीन लोकानीं लिहून ठेवलेली आढळत नसल्यामुळें कांहीं शंकास्थळे शिल्लक रहातात, हें खरें आहे. हल्ली इंग्रजी राज्यांत प्रांताची विभागणी येणेप्रमाणें करण्यांत येते. सर्वांत मोठा इलाखा, त्याखाली भाग (डिव्हिजन) व त्याखाली जिल्हा. ही वांटणी हिंदुस्थानांत कोठेहि सर्वत्र सारखीच आढळते. जिल्ह्यांतील एखाद्या गांवाचा उल्लेख पुढील रीतीने करता येतो—मौजे परिंचे तालुके पुरंदर जिल्हा पुणें. एवढ्यावरून आपणास परिंचे या गांवाचा दर्जा, तो गांव ज्या तालुक्यांत आहे तो तालुका व ज्या जिल्ह्यांत आहे तो जिल्हा इतक्यांचा पत्ता लागतो. आणि त्याबरोबरच तालुक्याच्या व जिल्ह्याच्या व्याप्तीचीहि कल्पना येते. तसेच वतनदारीची उचलबांगडी बहुतेक सर्व अधिकाऱ्याच्या जागांवरून झाली असल्याने तालुक्याची कचेरी व जिल्ह्याची कचेरी कशी बनली आहे हें आपणास नीट समजतें; पण मराठी राज्याचें तसें नव्हते. तें कसें होतें हें आतां पाहूं.

हल्लीचा एक इलाखा घेतल्यास त्याचे तालुका, जिल्हा व भाग असे विभाग पडतात. आणि अधिकाऱ्यांच्या पायऱ्या मामलेदार, कलेक्टर, कमिशनर व गव्हर्नर, अशा ठोकळ मानानें लागतात. पेशवाईतील म्हणजे मराठी राज्यांतील कोणताहि कागद पाहूं गेल्यास त्यांत एक अशी संगतीच सापडत नाहीं. उदाहरणार्थ—

(१) मौजे पाषाण तर्फ हवेली कर्यात मावळ

(२) मौजे वाठार कर्यात वडगांव प्रांत पन्हाळा
(३) मौंजे कामेरी तर्फ वाळवे प्रांत कऱ्हाड
(४) मौजे राजूरी परगणे बेलापूर सरकार संगमनेर
(५) मौंजे दहिटणें परगणे रांजणगांव सरकार जुन्नर

वरील पांच उदाहरणांत एक गोष्ट नजरेस येते ती हीं कीं, कोणत्याहि खेड्याचा उल्लेख करतांना त्याची लयी लिहिली जावयाची. मौजे हें विभागाचे नामभिमान पांचहि उदाहरणांत साधारण, पण बाकीच्यांचा नियम नाहीं. हल्लीच्या भाषेंत बोलावयाचें तर पहिल्या उदाहरणांत• कर्यात या विभागानें जिल्ह्याची जागा घेतली आहे, दुसऱ्या उदाहरणांत कर्यात हा विभाग जिल्ह्याच्या जागेवरून घसरून तालुक्याच्या जागेवर बसला आहे. प्रांत व सरकार यांनीं मात्र आपल्या जागा कायम ठेवल्या आहेत. हल्लींचे मौजे तेंच पूर्वीचें मौजे. प्रांत म्हणजे सरकार. कर्यात म्हणजे कधी प्रांत तर कधी तालुका. तर्फ, परगणे व कर्यात हे जवळजवळ सारखे व ते तालुक्याच्या तोडीचे. प्रांत व सरकार यांचें तिसरें नांव सुभा. विभागांचीं हीं वेगवेगळीं नांवें पाहिलीं असतां त्यांस निश्चित अर्थ नव्हता असें म्हणावें लागतें. ज्यांनां जीं नांवें एकदा पूर्वी कधी पडलीं तीं त्यांचें महत्त्व कमी झालें तरी कायम राहिलीं. कर्यात वडगांव प्रांत पन्हाळा हें उदाहरण यांपैकींच होय. वडगांव हा विभाग एक वेळ प्रांताच्या दर्जाचा असावा. परंतु तो परगण्याच्या तोलाचा झाला तरी त्याचें कर्यात हें जुनें नांव तसेंच पुढें चालू राहिलें.

मौंजे हा सगळ्यांत धाकटा विभाग. त्याचे मुख्य मुलकी अधिकारी पाटील व कुळकर्णी. कित्येक मौजाखाली वाड्या असत. त्याना मजरे अशींहि संज्ञा आहे. पण त्यांस मुलकी अधिकारी मौजाचेच. मौजाच्या वरचा विभाग परगणा. पेशवाईचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे भेद केल्यास पेशवाईच्या पूर्वार्धांत (पहिल्या माधवरावापर्यंत) परगणा हा शब्द तालुका यां अर्थानें बहुतेक ठिकाणीं वापरलेला आढळतो. ज्यास पेशवाईच्या पूर्वार्धांत परगणा म्हणत असत, त्यालाच उत्तरार्धांत तालुका म्हणूं लागले असें दिसतें. तर्फ किंवा तरफ हा जरी एक वेळ परगण्याच्या तोडीचा भाग असला तरी त्याचें महत्त्व कमी होऊन तो परगण्याच्या किंवा तालुक्याच्या पोटांत शिरला व तरफदार हा अधिकारी परगण्यावरील अधिकाऱ्याचा अंकित होऊन राहिला. कारण पेशव्यांची रोज-

निशी ६ वी सवाई माधवराव पेशवे भाग २ रा यांत विश्वासराव रामचंद्र मामलेदार परगणे बोदवड प्रांत खानदेश याच्या नांवाची सन १७७३।७४ मधील सनद आहे. तिच्यांत त्याच्या हाताखालील ज्या नोकरांचा उल्लेख आहे त्यांत तरफदारांची गणना केली असून त्यांचा सालीना पगार ३५० रु. सांगितला आहे.

तरफदारांच्या वरचा अधिकारी कमाविसदार अगर मामलेदार. पेशवाईतील मुलकी अधिकाऱ्यांत कमाविसदारांचा भरणा मोठा दिसतो. त्याच्या ताब्यांत एकच गांव असे किंवा परगणाहि असे. म्हणजे सामान्य कारकुनापासून मामलेदाराच्या हुद्द्यापर्यंतच्या अधिकाऱ्यांना कमाविसदार म्हटलेलें आढळतें. मात्र त्याची ज्या गावीं नेमणूक करण्यांत येई त्या गावीं तो स्वतंत्र अधिकारी या नात्यानें अमल चालवति असे. थोडक्यांत सांगावयाचें तर कमाविसदार म्हणजे व्यवस्थापक किंवा वहिवाटदार. मौजे वरि तर्फ निरथडी प्रांत पुणे येथील राजश्री आनाजी सुंदर याचा शाहू छत्रपति भाग १ पहिला सन १७५२-५३ यांत कमाविसदार या हुद्यानेंच उल्लेख केला आहे. अर्थात् याची कमाविसी म्हणजे एका गांवाची वहिवाटदारीच होय. नवीन प्रदेश जिंकून तो मराठी राज्यास जोडल्यावर त्याचा बंदोबस्त करण्यास ज्या अधिकाऱ्यास नेमीत त्यासहि कमाविसदार म्हणत. त्या खेरीज एखाद्या परगण्याची मामलत करणारासहि कमाविसदार असेंच संबोधीत. परगणे भूपाल येथील कमाविसदार रामचंद्र बळवंत यास सालीना पगार सात हजार रुपये होता व त्याच्या ताब्यातील मुलुखाचा वसूल पावणेदोन लक्ष रुपये होता. त्यावरून हा कमाविसदार अव्वल दर्जाच्या मामलेदाराच्या योग्यतेचा समजावा लागतो. कांहीं कमाविसदारांना सालिना वेतन ८०० रुपयांचेहि असे. असले कमाविसदार हल्लींच्या महालकऱ्याच्या योग्यतेचे होत. महालकरी हा जसा मामलेदाराच्या अंकित असतो तसे कांहीं लहान कमाविसदार मामलेदाराच्या अंकित असत. परगणे बोदवड प्रांत खानदेश येथील मामलतदार विश्वासराव रामचंद्र यांजकडे असून त्याच्या हाताखालील नोकरांत कमाविसदार हा अधिकारी आहे व त्याचा पगार सालीना पांचशे रु. लावला आहे.

एल्फिन्स्टन आपल्या रिपोर्टांत म्हणतो, 'मोठ्या विभागाचा अधिकारी तो मामलेदार व छोट्या विभागाचा अधिकारी तो कमाविसदार.' एल्फिन्स्टन यानें वर्णिलेली व्यवस्था पेशवाईच्या उत्तरकाळांत झाली असेल. परंतु पूर्वकाळांत म्हणजे पहिल्या

माधवरावाच्या कारकीर्दींपर्यंत त्या व्यवस्थेस इतका ठामपणा आला नसल्यानें कमविसदार हा हुद्दा एखाद्या गांवच्या वहिवाटदारापासून तो थेट मामलेदारापर्यंत लावला जात असावा असे वाटते. म्हणूनच कमविसदाराची जागा मिळणें हा त्या काळांत पुष्कळदां मोठा मान समजला जात असे. मोठमोठे सरदारहि ती जागा आपल्या आप्तेष्टाकरितां प्राप्त करून घेण्यास वशिले लावीत. सन १७६४ सालीं पहिले माधवराव पेशवे हैदरावर स्वारीस गेले असतां त्यांजबरोबरच्या प्रमुख सरदारांपैकीं गोपाळराव पटवर्धन यांची आई सत्यभामाबाई हिनें आपला जावई त्रिंबकराव यास नवीन जिकलेल्या मुलुखांत कमविसदारीवर माधवराव यांजकडून नेमून घेण्याविषयीं गोपाळरावाच्या मागें टुमणें लावलें होते. ती गोपाळरावास लिहिते ' चिरंजीव राजश्री त्रिंबकराव जावई यांस तूर्त ऐनापुरी पाठविले आहे. परंतु शाश्वत नाहीं. याजकरितां तिकडे कुंदगोळ वगैरे ठागीं आहेत तेथें कोणी कमाविसदार ठेवले नसले तरी त्रिंबकराव यांस सांगावे. दोन चार हजारापर्यंत रसदहि देतील असे आहे ' (ऐ. ले. सं. भाग २ रा). एखाद्याचे वतन मोठे असले व ते कांहीं कारणावरून सरकारांत जप्त झाले तर त्याच्या वतनाची व्यवस्था पहाण्यास नेमलेला अधिकारी तो कमविसदारच. ' कर्यातं आटपाडी येथील देशपांडे हैदर नाईक याजकडे जाऊन चाकरीस राहिला म्हणून कर्यात मजकूर येथील देशपांड्याचे बतन जप्त करून त्यावर कमविसदार नेमण्यांत आला. ' घाटातून देशावर व कोकणांत जाणाऱ्या मालावरील जकात वसूल करणारा अधिकारीहि कमविसदारच. सारांश, सामान्यतः मुल्की अमलदार म्हणजे कमाविसदार असेच समजलें जात होते. कांहीं ठिकाणीं कमाविसी व मामलत हे शब्द समानार्थकच वापरले आहेत. पेशव्यांच्या रोजनिशीचा सहावा भाग पान ३४ यांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे. ' महादाजी रामचंद्र यांचे नांवें सनद कीं, परगणे जंबूसर प्रांत गुजराथ येथील कमावीस सांगोन तुम्हास पाठविले असेत. तरी इमाने इतबारे वर्तोन अंमल चौकशीनें करणें. सदरहू मामलत संमंधे कलमें. ' इत्यादि.

अशा रीतीनें कमाविसी व मामलत किंवा कमविसदार व मामलेदार हीं नांवें कैक वेळा समानार्थकच वापरली जात होती. तथापि कमविसदार हा जसा एखाद्या खेडयावरचा व परगण्यावरचाहि अधिकारी दिसतो तसा मामलेदार हा दिसत नसून मामलेदार हा फक्त परगण्याचा किंवा तालुक्याचाच अधिकारी

आढळतो. पूर्व पेशवाईंत तालुका हा शब्द बहुतकरून सांपडत नाहीं. परंतु उत्तर पेशवाईत तो सर्रास सांपडतो व तो परगणा या अर्थानेंच वापरण्यांत येतो. यावरून पूर्व पेशवाईत ज्या विभागास परगणा म्हणत त्याला उत्तर पेशवाईत सर्रास तालुका म्हणूं लागले व परगण्याच्या अधिकाऱ्यास कमाविसदार या हुद्याऐवजी मामलेदार हा हुद्दा लावूं लागले असें अनुमान निघते एलफिन्स्टनच्या रिपोर्टातहि कमाविसदार हा शब्द क्वचित् दृष्टीस पडतो व जेव्हां दृष्टीस पडतो तेव्हां तो महालकरी म्हणजे मामलेदाराचा अंकित या अर्थानेंच वापरलेला आढळत असल्यानें पेशवाईच्या अखेरीस कमविसदार हा वर्ग अल्प प्रमाणांत राहिला होता असे वाटते.

प्रांत किंवा सरकार हा विभाग तालुक्यावरचा. सरकार हा मुसलमानी अंमलांतील शब्द विभाग या अर्थानें मराठी राज्यांत मागें पडत चालला. सांप्रतहि असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टरास प्रांतसाहेब म्हणतात. असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टराच्या ताब्यांत जिल्ह्यांपैकीं पांच सहा तालुके असतात. मराठी राज्यांतील प्रांत क्वचित् हल्लींच्या पांच सहा तालुक्याएवढा असे व क्वचित् जिल्ह्यांहूनहि मोठा असे. त्याकाळीं खानदेश, कोकण, बेलापूर, कल्याण, भिवंडी, जुन्नर, पुणें, गंगथडी, वाई, संगमनेर, वसई, गुजराथ, इत्यादि लहान मोठे प्रांत असत व त्यांजवरील मुलकी अधिकाऱ्यांना कित्येक स्थळीं सरसुभेदारहि म्हणत. सन १७७३–७४ मध्यें कोकण प्रांताचे सरसुभेदार त्रिंबक विनायक, सन १७७६–७७ मध्यें खानदेशाचे सरसुभेदार नारो कृष्ण व नाशिक प्रांताचे सरसुभेदार बाबुराव बल्लाळ हे असल्याचा उल्लेख सांपडतो. कमाविसदार, मामलेदार व सरसुभेदार यांच्या नेमणुका, बदल्या व बडतर्फ्या पुणें दरबाराकडून होत. कमाविसदार व मामलेदार यांचा मानमरातब सरकारांतून चांगला ठेवण्यांत येई. त्यांच्या तैनातीस चोपदार, दिवट्या व अफतागिऱ्या असे. चोपदारास दरमहा पगार रु. ३, दिवट्यास पगार रु. ४ व अफतागिऱ्यास रु. ५ असत. हा पगार बारा महिन्यांत फक्त आठ महिन्यांचाच आकारला जाई. कमाविसदारास रहावयाची घरें जरूर त्या ठिकाणी सरकारांतून बांधून मिळत.

मराठ्यांच्या मुलकी खात्यांत एका टोकाला पाटील कुळकर्णी व दुसऱ्या टोकाला पुणें दरबार. पाटील कुळकर्णी हे वतनी अधिकारी व त्यांचे मदतनीस चौगुला, पोतदार व महार हेहि वतनी नोकरच. या वतनदारांकडे गांवचा

वसुली कारभार ठेवल्यापासून राज्याचा तोटा नसून फायदाच होता. कारण पाटील कुळकर्णी यांजकडे इतकी बहुविध कामें होतीं कीं, तीं वतनाच्या ओढीवाचून केवळ अल्प अशा प्राप्तीसाठीं करण्यास त्यांच्या इतक्या योग्यतेचे व आस्थेचे अधिकारी मिळणें बहुधा अशक्य होतें. म्हणून पेशव्यांनीं त्यांचीं वतनें व कामें त्यांजकडे कायम राखलीं.

पाटील–कुळकर्ण्यांच्या वरचा मोठा मुलकी अधिकारी मामलेदार. त्याच्या हाताखालीं शिबंदी असे. तिचा उपयोग परगण्यांत शांतता राखण्याचे कामीं होऊन खेरीज वसुलाचे बाबतींत पाटील–कुळकर्ण्यांस मदत करण्याकरितां त्यांना गांवगन्ना पाठविण्यांत येत असल्यानें जी नाठाळ कुळें पीक चांगलें येऊनहि वसूल देण्याचें टाळीत त्यांस ताळ्यावर आणणें सोयीचें होई. एल्फिन्स्टन म्हणतो ' आगोटीच्या प्रारंभीं मामलेदार पाटलास बोलावून घेई. वहीत जमीन किती, खराब जमीन किती, नवीन लागणीस दिलेली जमीन किती व अंदाजी वसूल किती याची माहिती पाटलानें मामलेदारास सांगावी. पाटलाने आपल्या गांवीं परत गेल्यावर शेतकऱ्यास जमिनीची लागवड करण्यास उत्तेजन द्यावें आणि त्यास सावकारापासून कर्ज व सरकारांतून तगाई मिळवून द्यावी. वर्षअखेर आपल्या तालुक्यांत पहाणी करण्यास मामलेदारानें निघावें, व त्याची पाटील, कुळकर्णी व शेकदार यांच्या मदतीनें त्यानें जमाबंदी करावी. '

अलीकडे आगगाडी वगैरे दळणवळणाची साधनें वाढल्यामुळें मध्यवर्ती सत्तेस आपले हात तालुक्यापर्यंत सुलभतेनें पोचवितां येतात. परंतु मराठी राज्यांत ही सोय नसल्यामुळें व तो काळ एकंदरींत अस्वस्थतेचा असल्यामुळें देशमुख-देशपांड्यासारखे वतनदार जतन करून त्यांच्या मार्फत आपली त्या त्या ठिकाणची सत्ता स्थिर ठेवल्यावांचून पेशव्यांना गत्यंतर नव्हते. मात्र त्या असहाय्यतेचा फायदा घेऊन वरील वतनदारांना मध्यवर्ती सत्ता झुगारून देण्यास सापडूं नये म्हणून मामलेदारासारखे अधिकारी परगण्यावर ठेवण्याची पेशव्यांना तोड काढावी लागली. सदर मामलेदार मध्यवर्ती सत्तेचे प्रतिनिधी शोभतील असा त्यांस पगार देण्यांत येत होता व त्यांचा तसा इतमामहि ठेवण्यांत येत होता. कारण त्यांस पालखी, अफतागिर, मशाल इत्यादि मानमरातब मिळत होता. अशा अधिकाऱ्यास शेतकरीवर्गापासून किंवा इतरापासून लाचलुचपत घेण्यांत कमीपणाच वाटावा व कदाचित् त्यास तशी दुर्वा-

सना झाली तरी देशमुख-देशपांड्यांच्या नजरेखालीं तसें करणें अशक्य व्हावें. तीच गोष्ट इतर नोकरांचीहि. दरकदारांना वतनी जमीन व पगार असे व त्यांनाहि त्यांच्या योग्यतेप्रमाणें लवाजमा असे. त्याखेरीज कारकून व शिपाई प्यादे यांस ४।५।६ रु. पगार आजच्या मानानें थोडा वाटत असला तरी त्या काळच्या स्वस्ताईच्या दृष्टीनें तो त्यांस भरपूर होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. सांप्रत मामलेदाराच्यावर कलेक्टर व कलेक्टराच्यावर कमिशनर अशी व्यवस्था आहे. त्या व्यवस्थेस अनुरूप अशी पेशवाईंत व्यवस्था असण्यास मामलेदार, सुभेदार, सरसुभेदार ही श्रेणी चांगली जमते. पण तिच्यापैकीं सुभ्याचा सुगावा कोठे लागत नाहीं. उलट सुभा हाच क्वचित् मामलेदार दिसतो. खरें म्हटलें तर सुभेदार हे जिल्हाधिकारी व सरसुभेदार हे भागाचे (डिव्हिजनचे) अधिकारी. सर सुभेदार दूरच्या प्रांताना काय ते होते. पुण्याच्या जवळपासच्या भागांना नव्हते. सुभेदार म्हणजे जिल्हाधिकारी. हा मामलेदारावरचा अधिकारी असतांहि मामलेदारांना आपल्या परगण्याचे हिशेब पहिल्या माधवरावाचे कारकीर्दींत व पुढेहि पुण्यास आणून दाखवावे लागत. (ऐ. ले. सं. भाग ३ रा). ' नानाफडणीस, मोरोबादादा फडणिस, महादाजीपंत गुरूजी, नारोआप्पाजी तुळसीबागवाले, हरिपंत फडके, रामाजीपंत चिटणीस, माधवराव जाधवराव, गोविंद शिवराम खासगीवाले, कृष्णराव बल्लाळ काळे वगैरेंच्या द्वारें महालोमहालांचे हिशेब पहाण्याचें व नवीन मामलती ठरवून देण्याचें काम श्रीमंत माधवराव पेशवे स्वतः करीत. लक्ष्मण कोन्हेर म्हणून गंगथडीचा मामलेदार होता. त्यानें दरबारांतील कांहीं लोकांस पैसे चारून खोटे हिशेब सरकारांत गुदरले होते. परंतु रावसाहेबांनी त्याच्या घरावर जप्ती नेऊन कच्चे कागद जप्त करून आणिले व त्यानें ३॥। लक्ष रु. मामलतींत खाल्ल्याचें शाबित केलें. (ऐ. ले. सं. भाग ३ रा) रावसाहेबांनीं मुलकखात्यांत आणिलेला हा चोखपणा नाना फडणविसांनीं वाढवून सर्व कारभार एका शिस्तींत बसवून दिला व तो त्या स्वरूपांत शेवटच्या बाजीरावापर्यंत टिकला.

प्रकरण अठ्ठाविसावें

शेतकीखातें

हे खाते स्वतंत्र नसून त्याची व्यवस्था मामलेदार, कमाविसदार व ग्रामस्थ यांजकडेच होती. त्या बाबतींत त्यांजकडून हुजुरात जशी शिफारस होईल त्याप्रमाणें विचारपूर्वक योजना करण्यांत येत असे. सांप्रत इंग्रजी राज्यांत शेतकऱ्यांना सरकारांतून तगाई मिळते तिची कल्पना नवीन नसून पेशवाईंतील पद्धतीचेंच ते अनुकरण आहे. ‘ सुभानजीराव एरूणकर किल्ले राजमाची यास तगाई १० खंडी दिली. ती दीड सवाई हिशेबानें दुसऱ्या वर्षी वसूल करावयाची. ’ पण दुसऱ्या वर्षी नापीक झाले तर तगाई तहकूब ठेवण्यांत येई. ‘ कसबे पाल हवेली येथील रयतेची घरें जळाली. तेव्हां तिला भक्षावयास जमीन घेऊन भात तगाई दिले व जळिताच्या सालीं सालमजकुरी तहकुबी दिली ’ ही उदाहरणे रोख रकमेची नसून धान्याच्या तगाईची होत. हे धान्य अर्थात्च गांवोगांवीं सरकारी पेवे किंवा कोठारे असत त्यांतून मिळे. पुढील उदाहरण रोकड तगाईचे आहे. ‘ सन १७५०–५१ मध्यें राघो गोविंद यानी पातोड परगण्यांत कसबे मुरवडे या गांवांस १५०० रु. तगाई देऊन ती दोन वर्षांत फेडून घेण्याचे योजिले. ’ ‘ प्रांत राजापूरच्या रयतेस तगाई दिली. व्याजाचा मामुली दर ७५ टक्के असतां ही तगाई २५ टक्के दराने दिली. ’ ‘ लक्ष्मण हरि यांस कळविले कीं, तुम्ही कसबे गोवळे येथील खोत इब्राहिमजी नाडकर याच्या मागे तगाईची तसदी यंदा लावूं नये; कारण पीक बुडाले आहे ’ (सन १७४३–४४). तगाईच्या रकमा कमाविसदार व मामलेदार आपल्या जवळच्या पैशातून देत व वसूल करून घेत.

बागाइताने शेतीचे उत्पन्न अधिक येत असल्यामुळें तिकडेहि पेशव्यांचे लक्ष असे. ‘ प्रांत बागलाण येथील बागाइतास पाटाचे पाणी, बंधारे फुटले म्हणून जात नाहीं. ते पाट बांधण्याकरितां दरसाल ५ हजार रु. प्रमाणें एकूण २५ हजार रुपये खर्चण्याचे ठरले. ’ ‘ बनेश्वर येथील धरणास खर्च ८०० रु. येतो.

त्यांपैकीं ४०० रु. रोख सरकरांतून दिले. बाकीचे ४०० रु. ज्यांस धरणाचे पाणी मिळणार त्याजपासून दामाशाहीनें घ्यावयाचे ' ' तुंगभद्रेच्या कालव्याचा बंधारा फुटला होता. तो बांधण्याबद्दल हुजूरहून दोन हजार होन दिले.' 'कसबे जायखेड प्रांत बागलाण येथें पाटस्थळाचे जमिनीस दोन बंधारे होते. त्यांपैकीं एक वाहून गेला. तो बंदिस्त करावयास राघो नारायण कुळकर्णी हा उमेदवार आहे. खर्च ८।१० हजार रुपये येईल. गांवाचे उत्पन्न ५ हजार ते बंधारा बांधल्यास १४ वर्षांत ८५०० रु. होण्याचा संभव, तरी राघो नारायण यानें बंधारा बांधावा. त्यास त्याबद्दल १०० बिघे नवीन बागायत जमिनीमागे १० बिघे इनाम याप्रमाणें ४० बिघे जमीन इनाम देण्याचा करार केला.' राघो नारायणानें पदरचे पैसे खर्चून बंधार बांधावा आणि त्याचा फायदा तो, गांवकरी व सरकार या त्रिवर्गांनी घ्यावा. रयतेतील लोकांना स्वावलंबी व कर्तृत्ववान् बनविण्याचा हा मार्ग प्रशंसनीय नव्हे काय ? ' मौजे सावकी परगणे लोहनेर येथील बंधारा जीर्ण होऊन चार पांच जागी पाणी वाहून जाऊं लागले. त्याच्या डागडुजीची हयगय झाल्यास दोन हजाराचा गांव चार पांचशावर येईल. यास्तव सावकाराकडून रुपये काढून डागडुजी करण्यास पेशवे सरकारानें आज्ञा केली.' (पे. डा.)

शेतकी सुधारण्याचे पुढील उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखे आहे. नारो अनंत परचुरे महाजन कसबे गुहागर यांनीं पुरंदर मुक्कामीं हुजूरकडे येऊन विनंति केल्याप्रमाणें पुढील गोष्टीस पेशव्यांनीं मंजुरी दिली. ' (१) दुसरीकडची माती आणून तालुक्यांतील खडकाळ जमीन सुधरावयाची आहे व ओढेनाले त्याकरितां भरून काढावयाचे आहेत. असें जो करील त्याला निमी जमीन इनाम मिळेल व निम्या जमिनीस २० वर्षेपर्यंत निम्मा सारा व त्यानंतरच्या पांच वर्षांत साऱ्याचा आकार कमी ठेवण्यांत येईल. व २५ वर्षांनीं नेहमीचा आकार घेतला जाईल. (२) समुद्राच्या पाण्यांत बुडालेली पण शेतीच्या उपयोगी अशी जमीन तिला बंधारा घालून रयतेस लागवडीस आणावयाची आहे. असें जो करील त्यास त्या जमिनीपैकीं ¼ जमीन इनाम मिळेल व निम्या ¾ जमिनीवरील साऱ्याची माफी किती वर्षे मुदतीची द्यावयाची व किती द्यावयाची याचा विचार या कामासाठीं मेहनत व पैसा किती खर्च झाला यांवरून ठरेल (ही गोष्ट सवाई माधवराव पेशव्याच्या कारकीर्दीत घडली)

पेशव्यांच्या अशा प्रकारच्या उत्तेजनाने महाराष्ट्रात पेशवाईच्या अखेरीस पडजमिन थोडी उरली. हा मुलूख पाहून डयूक ऑफ वेलिंग्टन म्हणतो ' The country is highly cultivated 'देशांतली जमीन पुष्कळच लागवडीस आली आहे ', मराठ्यांची ही पद्धति एलफिन्स्टन यालाहि पसंत पडून तीच सुरू ठेवण्याची शिफारस त्याने इंग्रज सरकारास केली.

चांगल्या जातिवंत जनावरांची पैदास हे शेतकी सुधारण्याचे उपयुक्त अंग होय. पेशव्यापाशी उत्कृष्ट हणमगाईंचा संग्रह असून नानासाहेबाने त्या जातीच्या पांचशे गाई मागविल्याचे पत्र ' प्राणिसंग्रह ' या प्रकरणांत आलेच आहे. तथापि शेतकऱ्याजवळची जनावरे सुधारण्याकरिता त्यानी काय प्रयत्न केले हे समजत नाहीं. तथापि प्रतिनिधी व सरदार यांनी आपल्या जहागिरीत यासंबंधी ज्या खटपटी केल्या त्यावरून पेशव्यांच्या प्रयत्नाची कल्पना होईल. प्रतिनिधी घराण्यांतील प्रसिद्ध पुरुष श्रीपतराव प्रतिनिधी यानी गुरांचे खिल्लार बाळगले व ते शेतकऱ्यास अप्रत्यक्षपणे उपकारक झाले त्याची हकीकत प्रतिनिधी घराण्याच्या इतिहासात पुढीलप्रमाणें आढळते.

' कर्नाटकांतून स्वदेशीं परत येतांना श्रीपतराव प्रतिनिधि यांनी अमृतमहाल गांवाहून गाईबैलांच्या जोडया आणल्या, त्यांच्याप्रमाणें रंगरूपानें गाई बैल जमविण्याचा त्यांस नाद लागला. त्यांनीं आपल्या कारकिर्दीत तीनशे साडेतीनशे गाई वासरांचें खिल्लार तयार केलें व तें आपल्या प्रांतांतील निरनिराळ्या कुरणांच्या ठिकाणीं ठेवलें. त्या खिल्लाराचें एक नवें खातेंच स्थापन झालें. त्यावर कारकून दरोगे नेमून त्याचा योग्य बंदोबस्त केला. या खिल्लाराप्रमाणें प्रतिनिधींनीं मेंढरांचेंहि मोठें खिल्लार तयार केलें. त्या खिल्लारांत प्रत्येक प्रतिनिधीच्या कारकिर्दीत भरच पडत गेली. खिल्लारांतील गाई व बैल हे हणम जातीचे असून ही जात दिसण्यांत सुंदर व बळकट आहे. खिल्लार बाळगण्याचा मुख्य उद्देश जातिवंत जनावर शेतकीच्या व इतर कामास आपल्यास व आपल्या शेतकरीवर्गास मिळावें, गांवोगांवीं या जातीच्या जनावरांची पैदास व्हावी, उत्तम बैल व दुभत्या गाई उत्पन्न व्हाव्या. आणि खताचा व दुधाचा उपयोग लोकांना व्हावा, हा आहे. हे खिल्लार ७०० पर्यंत वाढलें होतें. (साताराच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रंथांक २)

वेठ-बिगार

सरकारी कुरणांचे वगैरे काम हे शेतकऱ्यांनी व इतरानी स्वतःचेच काम समजून सरकारास मदत करावी असा शिरस्ता होता. मात्र वेठे काम करीत तोंपर्यंत त्यांच्या पोटाची व्यवस्था थोडीशी मजुरी देऊन करावी लागत होती. त्यावरूनच ' बैठेसे बिगार' ही म्हण आजहि प्रचारांत आहे. गांवकऱ्यानी वेठे पुरविलेच पाहिजेत असा नियम होता. कांहीं गांवास वेठीची माफी होती. वेठीस वर्षातून किती वेळा बोलवावे हेहि ठरलेले. वेठीस बोलावले असता एखाद्या गांवाने वेठे न पाठविले तर त्या गांवास दंड द्यावा लागे. ' फलटणाहून १८ वेठे यावयाचे होते ते आले नाहींत म्हणून दर गांवास रुपये वसूल केले ते १८ रु. ' ' राजापुर प्रांताचे महार दरसाल हुजूर वेठीस येत. त्यास एक वर्षी वेठ मना करून दरगांवास एका रुपया वसूल केला. ' 'उरुणकर खारपाटची रयत मिठागरीं. त्यामध्यें ज्याचे घरी मनुष्यबळ असेल त्याने अंगे वेठ पंधरवडा करावी. ज्याच्या घरी बळ नसेल त्याने १॥ रु. द्यावा. त्याच्या मागें वेठीचे तोष्ट लावू नये. वेठे न आले म्हणजे दंडाचे उत्पन्न सरकारास मोठे होत असे. खालील उदाहरणात त्याचा आकडा आहे, तसेच वेठ्याना सांगावयाची कामेहि आहेत.

' सरकारचे कुरणांतील गवत कापण्यासाठीं महालानिहायचे बेगारी येऊन सालाबाद गवत कापून उतरून देतात. ज्यास बेगारी पाठविणें शक्य नसते ते दर हजार गवतामागे ४ रु. पाठवितात. त्याप्रमाणें परगणें दिंडोरीहून एक हजार रु., परगणे हवेली संगमनेर येथून ८०० रु., कसबे वावीहून ११० रु. व इतर ठिकाणचे मिळून ४९९० रु. ' मिरजेच्या किल्ल्यास राघोबाचा वेढा (१७६२) पडणार असें गोविंद हरीस कळले. तेव्हां किल्ल्याची डागडुजी करणे जरूर. म्हणून गोपाळराव मिरजेस न येतां मनेराजुरीपाशी पटवर्धनाचे हद्दींत तळ देऊन सैन्यानिशी होता. त्यानें खंडे राजुरी व गुंडेवाडी या गांवचे वेठे कुदळी खोरी पाट्या यासुद्धां मिरजेस किल्ल्याच्या दुरुस्तीस पाठविले. ' नानासाहेब पेशवा चिमाजी अप्पास लिहितो कीं, ' (सन १७-२-१७३१) शाहूमहाराज दहीगाव, धायगुड्याची पाडळी, शिरवळ, परिंचे, व तेथून शिवरीचे खिंडीने जेजुरीस जातील. तरी परिंचे व सासवड येथे गवत, फाटा, मडकी याचे कांहीं सामान परिंच्यास करवावें व कांहीं सासवडास करवावे. बापूजीपंत हें गावगन्नाचे कुंभार, बुरूड व गुरव वेठे आणून कारखाना घालून साहित्य करतील. ' (पे. द.)

रयतेला जर वेठीस धरावयाचे तर गलबतानाहि का धरूं नये असा प्रश्न उद्भवल्यावरून त्यानाहि धरण्यांत येऊ लागले. पण त्यामुळें जहाजांची वहातूक बंद होण्याची व रयतेला माल न मिळण्याची आपत्ति आली. म्हणून जहाजाना माफी मिळाली. ' जलमार्गाची अमदानी राहिली पाहिजे, यास्तव पेण, पनवेल, कल्याण, भिवंडी येथें येणाऱ्या सावकारांच्या गलबताना वेठीचे तोष्ट लावू नये म्हणून आज्ञा. '

सरकारी नोकरानाहि सरकारांतून वेठ देण्यात येई. ' हरि भिकाजी फणसे (गणपतीच्या) पाली नजीक घर बांधणार होते. त्यास पेंढे दोन हजार, २० वेठे आठ दिवस, ३ सुतार १५ दिवस देण्यात आले ' न्हाव्यालाहि वेठ दिल्याचा उल्लेख आहे. ' जिवाजी न्हावी यांचे घरी लग्न होते. त्यास पांच वेठे व लाकूडफाटा दिला. ' (पे. डा.)

प्रकरण एकोणतिसावें

न्यायपद्धति.

शिवाजीमहाराजांनीं जी न्यायपद्धति आपल्या राज्यांत सुरू केली तीच पेशव्यांनीं पुढें चालविली. न्यायाचीं मुख्य सूत्रें न्यायाधीशाच्या हातीं असत. हे न्यायाधीश शास्त्री असल्यामुळें त्यांनीं मनु, याज्ञवल्क्य, नारद, विष्णु, बृहस्पति, कौटिल्य इत्यादिकांच्या ग्रंथांचें अध्ययन केलेलें होतें. या कारणानें ते जो न्याय देत किंवा जी शिक्षा सांगत ती हिंदूंच्या शास्त्रास धरून असे. मराठी राज्यापूर्वी महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेर हिंदु राज्यें पुष्कळ होतीं. त्या राज्यांतहि जुन्या हिंदु धर्मशास्त्राप्रमाणेंच न्याय देण्यांत येत होता. त्यामुळें त्या सर्वांच्या न्यायपद्धतींत अतिशय साम्य आढळावें यांत आश्चर्य नाहीं. पूर्वीचे शातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव राजे आणि मराठे यांच्या आमदानीच्या मधल्या काळांत मुसलमानांचें राज्य होतें तरी मुसलमानांनीं हिंदूंच्या न्यायपद्धतींतील महत्त्वाच्या बाबींत कमीजास्ती न करतां ती जशीच्या तशीच चालू ठेवली. या कारणानेंहि मराठ्यांना राज्यकर्ते या नात्यानें न्यायखात्याची पुनर्घटना करतांना विशेष खटपट पडली नसावी असें वाटतें. मुसलमान राज्यकर्ते मुसलमानी धर्मशास्त्राचें ज्ञान असलेले काजी न्यायखात्यांत नेमीत असत. त्यांचा उपयोग मुसलमान प्रजेला चांगला होत असेल. पण हिंदू प्रजेस हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें न्याय मिळण्याकरितां ते शास्त्री-पंडितांची नेमणूक करीत असतील हें संभवनीय वाटत नाहीं. तथापि हिंदूंना हिंदूपद्धतीस धरूनच न्याय होता होईल तो मिळावा यासाठीं तसल्या धार्मिक प्रश्नांत धर्माधिकारी व क्षेत्रस्थ विद्वान् ब्राह्मण यांच्या मताप्रमाणें ते वागत. न्यायखात्यांत दिवाणी व फौजदारी हा भेद मुसलमानांनींच पाडला. ब्रिटिश रियासतींतहि तोच भेद प्रचलित आहे. ऋणदान, लग्नसंबंधीं वाद, वारसा हक्क, स्थावरजंगम मिळकत इत्यादि व्यवहाराचा निर्णय दिवाणी कोर्ट करतात आणि सार्वजनिक शांततेचा भंग ज्यामुळें होईल अशीं कृत्यें करणारांचें व भयंकर गुन्हेगारांचें शासन कर-

ण्यासाठीं फौजदारी कोर्टें स्थापन झालीं आहेत. मुसलमानी राज्यांत दिवाणी खटले दिवाणाकडे व फौजदारी खटले फौजदाराकडे सोपविलेले होते. व हे दोन अधिकारी प्रत्येक परगण्याचे मुख्य ठिकाणीं नेमलेले होते. बिनभानगडच्या खटल्यांचा निकाल ते मामुली पद्धतीनें लावीत व जेथें धर्मशास्त्राची गरज अशा खटल्यांत ते गावच्या शास्त्र्याची किंवा धर्माधिकाऱ्याची मदत घेत. सातारचे छत्रपति जेव्हां मराठ्यांचा राज्यकारभार पहात होते त्यावेळीं न्यायखात्याचे प्रमुखत्व छत्रपतींच्या अष्टप्रधानांपैकीं पंडितरावाकडे होतें. पण पेशवाईंत त्या कामाकरितां न्यायाधीश नेमण्यांत आला. पेशवाईंतील रामशास्त्री प्रमुणे हे न्यायाधीश प्रसिद्धच आहेत. ते बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दींत प्रसिद्धीस आले. त्यांनीं १७५१ मध्यें शास्त्रीमंडळीत त्यांची नेमणूक केली. त्या सालीं रामशास्त्री यांस रोजमुरा दीडमाही ४० रुपये प्रमाणें मिळूं लागला. त्याशिवाय श्रावणमासाची दक्षिणा ५०० रु. व कापड ५५१ रुपयांचे. पुढें दोन वर्षांनी त्यास श्रीमंतांनीं घोडा बक्षिस दिला व त्याबद्दल दरमहा १५ रुपयेप्रमाणें जास्त वाढविले. थोरल्या माधवरावानें त्यास न्यायाधीशाचे काम सांगितले व पालखी दिली. त्यामुळें त्यांस पालखीची नेमणूक सालाची १००० रु. अधिक मिळूं लागली. १७८० मध्यें नाना फडणीसांनीं त्यांना दोन हजार रुपये जातीस तनखा, एक हजार रुपये पालखीस खर्च, एक हजार रुपये श्रावणमासदक्षिणा व दसऱ्याचा पोशाख देण्यास सुरुवात केली. ते १७८९ त मृत्यु पावले. त्यांच्यामागें त्यांचे चिरंजीव गोपालशास्त्री होते. त्यांना पेशवाईतून सालींना ३२०० रुपये मिळत असत. (इ. सं.)

रामशास्त्री यांच्या मरणोत्तर अय्याशास्त्री यांजकडे न्यायाधीशाचे काम देण्यांत आले. हे न्यायाधीश धर्मशास्त्राच्या आधारे इन्साफ करीत व व्यवहारमयूख यासारख्या ग्रंथास अनुसरून खटले चालवीत. याज्ञवल्क्य म्हणतो, ‘ राजाने स्वतः न्याय द्यावा. पण राज्यकारभारापुढें न्याय देण्यास राजाला फुरसत नसेल तर त्याने धर्मशास्त्र जाणणारा न्यायाधीश नेमावा. त्याच्या मदतीला सभ्य म्हणजे पंच असावे. ते धर्मज्ञ, वेदज्ञ व सत्यवादी नेमण्यांत यावे. अशा पंचांच्या सहाय्यानें न्यायाधीशाने न्याय द्यावा. राजाने त्यास अनुसरून अपराध्याला शासन करावे. ’ पेशवाईत शक्य तितका याच पद्धतीचा अवलंब करण्यांत येत होता.

ब्रिटिश राज्यांत न्यायपद्धति अगदीं व्यवस्थित आहे. दिवाणी कामात सर्वांत खालचे कोर्ट गांवमुन्सफाचे व सर्वांत वरिष्ठ हायकोर्ट. फौजदारी कामाची व्यवस्था तशीच आहे. तालुक्याला दुसरा व तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेट आणि जिल्ह्याला पहिला वर्ग व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट. फौजदारीपैकीं जे खटले चालविण्याचा अधिकार मॅजिस्ट्रेटला नाहीं, ते खटले अखेर सेशन्स जज्जाकडे जाऊन सेशन्स जज्ज व डिस्ट्रिक्ट जज्ज यांच्या अधिकारांचा संगम होतो.

अशा रीतीनें न्यायाच्या कामाची वाटणी करण्यांत आल्यावर न्यायाधीशानें न्याय कशाच्या आधारें द्यावयाचा हा प्रश्न उपस्थित होतो. त्यासाठीं इंडियन पिनल कोड, क्रिमिनिल प्रोसीजर कोड, सिव्हिल प्रोसीजर कोड इत्यादि कायद्याच्या पुस्तकांची रचना झाली आहे. आणि त्या कायद्यात दुरुस्ती करण्यासाठीं अगर नवे कायदे बनविण्यासाठीं इलाख्याला व देशाला कायदेकौन्सिलें देण्यांत आली आहेत. न्यायाची पद्धति पेशवाईत किंवा त्या पूर्वीच्या कोणत्याही राजवटीत इतकी सुयंत्र व दोरीत धरल्यासारखी नव्हती. इतर अनेक व्यवहाराप्रमाणें न्यायाचा व्यवहारहि सरकारानें लोकांवरच बराचसा सोपवून त्यांस स्वावलंबी बनविलें होतें.

न्यायखात्याचे नाना फडणविसांचे कारकीर्दीतील स्वरूप हे पेशवाईमधील परिपक्क स्वरूप होय. इंग्रजी अमल महाराष्ट्रांत सुरू झाल्यावर इंग्रज अधिकाऱ्यांना पूर्वीची पद्धत समजूत घेणे अपरिहार्य असल्याने त्यांनीं नानांच्या कारकीर्दीची ज्याला माहिती आहे अशा जुन्या अनुभविक इसमास विचारून कांहीं टाचणे मागविली होती. ती टाचणे रावसाहेब सरदेसाई यांनीं पेशवेदप्तराच्या ४५ व्या भागांत प्रसिद्ध केली आहेत. त्यांत न्यायपद्धतीचें स्वरूप आले आहे. ती वाचून खालीलप्रमाणें शोध लागतो. ' पेशव्यांचे मुख्य न्यायाधीश रामशास्त्री होत. ते मरण पावल्यावर त्यांच्याजागीं अय्याशास्त्री यांची नेमणूक झाली. पण न्यायखात्याचे अवाढव्य काम एकट्या मुख्य न्यायाधीशाकडून उरकणे शक्य नव्हते. तथापि त्यांच्या मदतीकरितां त्यांच्याच कचेरीत इतर न्यायाधीश या हुद्द्याचे अधिकारी नेमलेले नसत, पण पुणें शहरांतील चांगल्या दानतीचे व निःस्पृह लोक निवडून काढून त्यांजकडे नाना न्यायाची इतर कामे देत असत. कोकणपट्टीचे सरसुभे यांचा मुक्काम बहुधा पुण्यासच असल्याने तेहि आपल्या हद्दीतील इन्साफ पुण्यांतच करीत. पुण्याभोवताच्या महालोमहालीचे मामले-

दारहि वर्षांतून कित्येक महिने पुण्यांत रहात. तसेच पुणें भागाचे सुभेहि पुण्यातच रहात. ते सर्व आपली मामुली कामे संभाळून आपआपल्या हद्दींतील कज्जांचे निकाल लावीत.

"रामशास्त्री यांचे कारकिर्दीत त्यांच्या हाताखाली अमीन व दफ्तरदार हे अधिकारी होते. फिर्यादीची अर्जी व प्रतिवादीची जबानी ज्याची त्यानी लिहून आणावी. ती अमीन यानी पाहून दफ्तरदार यांचे हवाली करावी. दफ्तरदारानी ती अर्जी पाहून प्रतिवादी यास पुसावयाचे सवाल निवडून काढावे, त्याचे जाब लिहून घ्यावे व साधनांचे (पुराव्याचे) कागदपत्र वादीप्रतिवादी यांचे असतील ते अमीन यानें पाहून त्यांच्या नकला दफ्तरी ठेवाव्या. त्या पुराव्याची चौकशी दफ्तरदार व अमीन यानी करावी.

"वतन व देणेंघेणे यांच्या दाव्यात वादी वप्रतिवादी यांचे म्हणणे लेखी घेत. साक्षीदारांच्या लेखी साक्षी असत, तोंडी नसत. प्रतिवादीस आणण्याकरिता शिपायाबरोबर चिठी जात असे. चिठी गेली पण प्रतिवादी आला नाहीं असें सहसा घडत नव्हते. प्रतिवादी हजर न राहिल्यास वादीच्या बाजूने एकतर्फी निकाल देण्याची पद्धत नव्हती. प्रतिवादी हजर होऊन खटल्यास सुरुवात झाल्यानंतर खटला ऐकण्यास न्यायाधीशाने आरंभापासून येऊन बसण्याची गरज नव्हती. न्यायाधीशाच्या हाताखालील ज्या नोकराकडे जे काम असेल ते तो सुरू करी. त्याने लेखी जाबजबाब घ्यावे, प्रश्न विचारावे व हें काम सुरू असता न्यायाधीशानी केव्हां केव्हां येऊन त्याजवर नजर ठेवावी. शेवटी न्यायाधीश सर्व पुराव्याचा विचार करून निकाल लिहीत. त्या कामी ते पंचांचा सल्ला अवश्य घेत.

"देण्याघेण्याच्या दाव्यात वादीप्रतिवादींचे घरचे लिहिणे व जमाखर्च पहात. त्यावरून निश्चय न करवला तर प्रतिवादींची शपथेवर साक्ष घेत. 'जेथवर चौकशीची नजर पुरेल तेथवर पहात होते.' वादीप्रतिवादी पंचास राजी नसले व ते खाविंदानींच निकाल द्यावा असे म्हणू लागले तर खाविंद सगळे काम आपल्याकडेच घेत. पण निकाल मात्र चार शहाण्यांचा अभिप्राय जमेस धरूनच सांगत. दाव्याच्या रकमेच्या प्रमाणांत दाव्याच्या निकालाला दिवस लागत. लहान म्हणजे शेपन्नास रुपयांचा तंटा महिनापंधरा दिवसात, पाच हजार व त्यावरचा तंटा दोन वर्षांच्या आंत संपे. हे देण्याघेण्याचे तंटे. पण

वतनाच्या तंट्याना ५।१०।१२।१५।२० पर्यंतहि वर्षे लागत. सर सालांत सर्व प्रकारच्या एकंदर कज्जांचा आकडा हुजूर, न्यायाधीश, सरसुभा प्रांत कोंकण, व पुण्यांतील महालोमहालीचे मामलेदार यांचा मिळून दोन हजारापर्यंत जात असे. वतनदारीची पंचाईत करावयास महाल मजकूरचे देशमुख, देशपांडे अगर परमहालाचे वतनदार बसून इन्साफ करीत. कज्जांत जो खोटा होईल त्याजपासून गुन्हेगारी व खरा होईल त्याजपासून हरकी घेण्यांत येई." ही एक प्रकारची स्टांपड्यूटीच होय. कारण वतनाच्या खटल्यांत वतनी उत्पन्न व वाद्याची ताकद पाहून गुन्हेगारी व हरकी घ्यावयाची असे.

"खटल्याचा निकाल लिहून झाल्यावर त्याजवर इन्साफ करणाराने मखलासी करावी. नंतर तो सारांश हुजूर दाखल होऊन 'द्यावे' कारभारी यांचे व 'देणे' खावंदांचे अशा प्रकारचे शेरे होत. वतनदारीचे कज्जांत वतनदार साक्षीस येण्यापूर्वी त्याला देवळांत अगर शक्य तेथें कृष्णा, भीमा, गंगा (गोदावरी) या नद्यांचे स्नान घालण्यांत येई. शिवेच्या कज्जांत सरकारांतून अमीन व शिपाई त्या कामाकरितां गांवीं पाठवीत. तेथें साक्षीदार, शिवेचे नकाशे, इतर पुराव्याचे कागद हजर ठेवण्यांत येत. त्यांच्या मदतीस भोवतालच्या पांच गांवांचे पाटील, देशमुख, देशपांडे जमा होऊन सीमा पंचासमोर ठरवीत. एवढ्याने न भागले तर पाटील अगर महार शिवेवर दिव्य करून चालत. 'दिव्यांत घागर घेऊन चालणे, ओले कातडे घेऊन चालणे, बेलभंडार शिवून चालणे इत्यादि प्रकार असत." (पे. द.४५) ही हकीकत तत्कालीन गृहस्थानें इंग्रज सरकारच्या माहितीकरितां लिहून पाठविलेली दिसते, म्हणून ती विश्वसनीय समजण्यास हरकत नाहीं. सदर हकीकत संक्षिप्त असल्यामुळें तिची नीट कल्पना येण्यास अनेक उदाहरणांच्या आधारे विस्तार करणेच आवश्यक होय.

"न्यायखात्यांतील वरच्या पायऱ्या आतां सांगितल्या; पण त्या पायऱ्यांपर्यंत आपले कज्जे नेणारे लोक थोडे. तसाच महत्त्वाचा खटला असल्यास वादीप्रतिवादी तितक्या भानगडीत शिरत. इतर तंट्यांचा निकाल गांवांतल्या गांवांतच लागत असे. न्यायदानाचें सर्वांत सुलभ व सोयीचें साधन म्हणजे पंचायत. त्यासंबंधानें कै. वासुदेव वामनशास्त्री खरे नानाफडणविसांच्या चरित्रांत लिहितात 'पेशवाईमध्यें अत्यंत महत्त्वाची संस्था म्हटली म्हणजे पंचाईत ही होय.

गांवांत देवघेवीसंबंधें कोणी पाटलाकडे फिर्याद नेल्यास तो प्रथम वादी-प्रतिवादींची समजूत स्नेही या नात्यानें करून पाही. त्यांचें न जमल्यास मग तो पंचाईत भरवून तिच्या मार्फत तंट्याचा निकाल लावी. पंच नेमण्याचें काम जरी पाटलाकडे असे तरी अमुक पंच आम्हास नको असें वादी किंवा प्रतिवादी यांनीं म्हटल्यास तो पंच नेमला जात नसे. पाटलाकडे किंवा गांवच्या पंचाकडे फिर्याद न न्यावी असा वादीचा हेतु असल्यास तो मामलेदाराकडे जाई. मामलेदारहि प्रथम आपसात तंटा मिटविण्याचा प्रयत्न करी. तो यत्न सफळ न झाल्यास तोहि पंचाईत भरवूनच निकाल करवी. तेथेंहि वादीचें समाधान न होईल तर त्यानें सर सुभेदाराकडे व त्यापुढें रामशास्त्री किंवा खुद्द नाना फडणीस यांजकडे फिर्याद न्यावी. तो कोठेंहि गेला तरी निकाल पंचामार्फतच व्हावयाचा. पाटील किंवा मामलेदार यांनीं नेमलेल्या पंचानीं अन्याय केला आहे किंवा कांहीं लाचलुचपतीचा प्रकार झाला आहे अशी पक्की खात्री झाल्याशिवाय वरिष्ठ अधिकारी असल्या फिर्यादी मनास आणीत नसत.

"पंचांची संख्या पांचाहून कमी नसे व कधीं फार महत्त्वाचा तंटा असेल तर पन्नासापर्यंत देखील पंच नेमले जात. पंचासमोर प्रतिवादी हजर न होईल तर त्याजवर सक्ती करण्यांत येई. तो हजर झाल्यावर वादीची फिर्याद व तिजवर प्रतिवादीचें उत्तर हें लिहून घेतलें जाई. नंतर खुलाशाकरितां दोघास प्रश्न विचारले जात. व दोहों तर्फांच्या साक्षी होत. साक्षीदारांची तपासणी फार काळजीपूर्वक होई व त्यास लिहितां येत असल्यास लेखी साक्षी घेण्याची वहिवाट होती. साक्षीपुरावा झाल्यावर पंचामध्यें 'भवति न भवति' होऊन शेवटीं सर्व खटल्याचा सारांश काढला जाई. यांत वादीची फिर्याद, प्रतिवादीचें उत्तर, तोंडजबान्यांचें किंवा लेखी साक्षीचें तात्पर्य, पुराव्यासाठीं हजर केलेले कागदपत्र इतक्यांची नीट छाननी करून शेवटीं पंचांचा निकाल दिलेला असे. या सारांशपत्रकाला महजर असें नांव असे. धर्मशास्त्रासंबंधीं कांहीं भानगड उपस्थित झाल्यास शास्त्रीपंडित यांची मदत घेण्यांत येई. पंच जसा निकाल करतील त्याप्रमाणें वादीप्रतिवादीस वागावयास लावण्याचें काम सरकारी अधिकाऱ्यांकडे असे. जातीसंबंधाचे तंटे त्या त्या जातींच्या मुख्याकडे निकालासाठीं जात व त्या त्या जातीच्या पंचामार्फत निकाल होत. पाटील व मामलेदार वगैरे शिवाय तंटे तोडण्यासाठीं कित्येक शहरांत सरकारांतून न्यायाधीश नेम-

लेले असत. सर्व न्यायाधीशांवर मुख्य रामशास्त्री हे नेहमीं पुण्यास रहात. त्यांपैकीं दोघे असामी तर विद्वत्तेनें, निस्पृहतेनें व चातुर्यानें रामशास्त्र्यांच्या बरोबरीचे होते. खटल्यांची तपासणी करण्यासाठीं पुष्कळ वेळां पंचाखेरीज रामशास्त्री व त्यांच्या हाताखालचे दुसरे शास्त्री सरकारतर्फे बसत. त्यावेळीं पंचांचें काम हल्लींचे सरकार ज्यूरर नेमते त्याप्रमाणें असे.

"गुन्ह्याच्या चौकशीचें व गुन्हेगारास शिक्षा करण्याचे काम पाटील मामलेदार वगैरेकडे असे. पण अमुक गुन्ह्यास अमुकच शिक्षा द्यावी असा कायदा नसल्यामुळें अंमलदारास गुन्हा कमी अगर जास्त महत्त्वाचा वाटेल, त्याप्रमाणें तो शिक्षा करी. त्या त्या ठिकाणचा रिवाज हाच काय तो सरकारी अधिकाऱ्यांस आधार. देहान्त शिक्षा देणें झाल्यास मात्र नाना फडणविसांची व पुढें पुढें पेशव्यांची परवानगी लागे. पण भिल्ल, मांग, रामोशी वगैरे जातींच्या गुन्ह्यासंबंधानें या परवानगीचीहि जरूर नसे. मामलेदार त्या लोकांस नुसत्या संशयावरून धरून पाहिजे ती क्रूर शिक्षा देत असत. गुन्ह्याच्या चौकशीसाठीं केव्हां केव्हां पंच नेमले जात. परंतु हा प्रकार सार्वत्रिक नव्हता. सरकारच्या विरुद्ध ज्यानें फंद फितुर केला असेल त्यास मात्र देहान्त शिक्षा देण्यांत येई. ' ज्यांनीं खून केला आहे अशांपैकीं पुष्कळ असामी सरकारास दंड देऊन व ज्याचा खून केलेला असेल त्याचे कुटुंबांतील माणसांस नुकसानदाखल द्रव्य देऊन मोकळे होत."

वरील उताऱ्यांत रा. खरे यांनीं नानाफडणविसाच्या काळांतील न्यायपद्धतीचे थोडक्यांत वर्णन केलें आहे. नानाफडणविसाच्या काळी जी पद्धत होती तीच त्याच्या पूर्वकाळच्या पेशवाईतहि बऱ्याच अंशी प्रचलित असली पाहिजे. एक मुख्य गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, न्यायाची बहुतेक सारी भिस्त पंचायतीवर होती व तेव्हां हल्लीसारखे कायदेकानू नसले तरी महत्त्वाच्या खटल्याची अथपासून इतिपर्यंत होणारी चौकशी व निवाड्याचें काम हल्लीप्रमाणेंच होत असे. किंबहुना सध्याची पद्धति ही पेशवाईतील पद्धतीची सुधारून वाढविलेली आवृत्ति असल्याचें कबूल करावें लागतें. बहुतेक खटल्यांचा निकाल मग तो खटला खालच्या खाली पंचच लावीत असल्यानें व पंचांची निवड वादी व प्रतिवादी यांच्या अनुमतीनेंच झाल्यानें खटल्यांत पक्षकारांच्या पैशाचा चुराडा हल्लीप्रमाणें होत नव्हता व खरा न्यायहि गांवांतल्या गांवात मिळत होता. आज पंचायती नष्ट

झाल्या आहेत, पण पंचाईत हा शब्द मराठी भाषेंत कायमच आहे. कोणत्याहि गोष्टीची फार घासाघीस सुरू झाली कीं ‘ काय पंचाईत मांडली हो ’ किंवा ‘काय पंचाईत पडली आहे हो ’ असें म्हणण्याची चाल आहे. तिच्यावरून पंच जेव्हां दाव्याचा निवाडा करीत तेव्हां उभय पक्षी किती घोळ पडत असेल याची अटकळ बांधता येते. खाली एक उदाहरण देत आहे, ते न्यायपद्धति समजण्यास उत्कृष्ट साधन मानण्यासारखे नमुनेदार आहे. त्यांत पंचायतीपासून हुजुरपर्यंत न्यायाचे सर्व टप्पे आले आहेत. सन १७६५ त कराड हा गांव पंतप्रतिनिधींच्या अमलांत होता. पंतांची राजधानी किनई होती. कराडांतील सोमवंशी कासार व लिंगायत वाणी यांजमध्यें लग्नामधील चालीसंबंधीं वाद उपस्थित झाला. कासारांत अशी चाल होती कीं, लग्नसमारंभात वरात निघते तेव्हां ती कलशासमवेत देवदर्शन होऊन जानवशाचे घरी भिरवीत यावी. लिंगायत वाण्यांच्या मते अशी चाल कासारांत नसून ते नव्यानेच पाडीत आहेत. या समजुतीने त्यानी दत्ताजी शेट बिन कृष्णाजी सोमवंशी कासार याजबरोबर कज्जा केला. वाण्यानी सातान्यास महाराजांचे कारभारी विसाजी दादाजी यांजकडे फिर्याद नेली. पण सदर तंटा पंतप्रतिनिधी यांच्या हद्दींतील असल्यामुळें श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांजकडे आला. प्रतिनिधीनी दत्ताजीशेट कासार यास बोलावून आणून चौकशीचा क्रम आखला. गांवच्या उदमी मंडळींचे प्रमुख शेटे महाजन. त्यानी प्रथम चौकशीस सुरुवात करावी अशी योजना ठरून प्रतिनिधींच्या सूचनेवरून कासाराने कराडच्या शेटे महाजनाना पत्र (अर्ज) लिहिले. प्रतिनिधीनींहि त्यास पत्र पाठवून शिवाय पाटिल-कुळकर्ण्यानाहि कळविले. शेटे–महाजन यानी सर्व लिंगायत वाण्याना बोलवून आणून वादाला उभे रहाण्याची तयारी आहे काय असे त्यास विचारले. त्यावर त्यानी शेटे–महाजन हे सर्वांना वडिलासारखे असल्यामुळे त्यांच्या बाहेर आपण नाहीं म्हणून सांगितले. वाण्यानी आपण पूर्वापार चालत आलेली वहिवाट मान्य करू असे लिहून दिले. त्यानंतर शास्त्रार्थ पहाण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. त्यासाठी शेटे महाजन व कुळकर्णी यानी चिमणगांवास यमाजीपंत आण्णा या शास्त्रज्ञाची गाठ घेतली. त्यानी यातिनिर्णय ग्रंथ पाहून कासार सोमवंशी यांची वरात कलशासहित जाण्यास हरकत नसल्याचा निर्णय दिला. गांवात आल्यावर शेटे महाजन व कुळकर्णी यांनी सदर निर्णयास समस्त लिंगायत वाण्याच्या संमतिनिदर्शक लेखी साक्षी घेतल्या. काजी

(मुसलमान) यानें मोहर केली, कुळकर्णी याने विकलम केले. व शेटे–महाजन यानी निशाण्या घातल्या. त्यांखेरीज पांढरीतलि प्रमुख लोकांच्याहि साक्षी घातल्या. पुढें याहूनहि खुंटा हलवून बळकट करून घेण्याकरिता वाण्यानी नावनिशीवार पत्र द्यावे असें ठरले. त्यासाठीं जिल्ह्याचे अंमलदार, हुजूर मामलतीकडील अंमलदार, देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, पाटील, कुळकर्णी व समस्त पांढर असे पेठेमध्ये जमले. त्या सर्वांनीं वाण्यापाशी पत्र मागितले; तेव्हां आपण शास्त्राधाराप्रमाणे वर्तू व कासारानीहि तसे वर्तावे असें वाण्यानीं सांगितले. त्यावर बहिरवाच्या देवळांत वरील सर्व ग्रामस्थानी, सरकारी अधिकाऱ्यानी व वतनदारानी जमून वेदशास्त्रसंपन्न अशा शिष्ट ब्राह्मणांना शास्त्रार्थ पाहून व जातिनिर्णयाचा शोध करून निकाल देण्यास विनंति केली. त्याना कासार सोम वंशी क्षत्रिय असल्यानें त्यांना वरात कलशासहित पेठेतून मिरविण्याचा अधिकार असल्याविषयीं अभिप्राय दिला. त्यास लिंगायत वाण्यानी नावनिशीवार पत्र देऊन संमति दिली. त्या पत्रावर दफातवार व समाकुल पांढरीच्या साक्षी झाल्या.’ [पे. द. ४३ ता.१८-१७-५-६५) हें उदाहरण साताऱ्च्या महाराजांच्या हद्दींतले व प्रतिनिधींच्या अमलातले होय. कऱ्हाड येथील गावकीच्या कामात काजी हा एक महत्त्वाचा घटक होऊन बसण्याइतके हिंदू व मुसलमान हे दोन समाज एकजीव बनले होते. मुसलमानी बादशहांच्या आमदानींत मुसलमानांची लहानथोर गावांतून जी एकदा घडी बसवून देण्यात आली ती मराठी राज्यांतहि स्वाभाविकपणे तशीच कायम राहिली. खुद्द हिंदूत जाती अनेक असल्या तरी ग्रामव्यवस्थेंत सहकारितेने काम करण्याचे प्रसंग हरघडी येत असल्यामुळें आपण सर्व एक आहो, एकाच धर्माचे व संस्कृतचि आहो ही भावना त्यांच्या ठिकाणीं सतत जागृत होती.

पुढील उदाहरणांचा संबंध पेशव्याशी पोचतो.—

‘ मौजे कानोर तर्फ मावळ येथील सुतारा–सुतारांतील सुतारकीसंबंधीं तंटा देशमुख, देशपांडे व गोत यांनीं निकालांत काढला. तो निकाल पेशव्यांनीं आज्ञापत्रानें मंजूर केला. ’ (बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी भाग २ रा.) यांतील गोत शब्दाचा अर्थ सुतार जातींतील पंच असा होईल. प्रकृत स्थळीं सुतारांनीं आपला वतनदारीचा तंटा परगण्याच्या देशमुख–देशपांड्याकडे नेला. त्यांच्या देखरेखीखालीं पंचांनीं जो निकाल दिला तो शेवटीं पेशव्याकडे मंजुरी-

करितां जावा लागला. कारण सरकारच्या मंजुरीशिवाय निकालाचा अंमल होत नसे. देशमुख देशपांडे हे वतनी अधिकारी होत. मामलेदार, सुभेदार यांजप्रमाणें खास सरकारी अधिकारी नसल्यानें त्यांच्या निकालाचा अंमल त्यांना करतां येणें शक्य नव्हते. पंचायतीच्या निकालास मंजुरी देतांना सरकार पक्षकाराकडून नजर म्हणून बरीच मोठी रक्कम घेत असे. कित्येक कज्जे खुद्द पेशव्यांपर्यंतहि जात. तरी देखील पेशवे त्या बाबतींत पंचांचीच मदत घेत. ‘ मौजे पिंपरी हा गांव सयद यासीन यांजकडे मुकासा आहे. त्यांची कमकुवत यामुळें बाबतीवाले यांचा वगैरे मनस्वी उपसर्ग गांवास लागून गांवची बेबुदी जाहली. त्यांत कुळकर्णी यांमध्यें दायाद संबंधे कजिया निर्माण होऊन त्यांची पंचायती हुजूर पुण्यांत जाहली. तेथे जो खोटा जाहला त्यांनीं येऊन प्रतिनिधींचा (पंतप्रतिनिधी) आश्रय केला. ’ (ऐ. ले. सं. खं. ३ रा.) ‘ विठोजी जिनगर कसबे सासवड यानें गोविंदजी देशमुखावर चोरीचे तुफान घेतले. त्याचा निवाडा भगत, गोत व भले लोक यांनीं जमून केला. त्यांत विठोजी खोटा ठरला. त्यास ७५ रु. दंड करण्यांत आला. ’ या ठिकाणीं भले लोक म्हणजे शिलेदार असे समजावयाचे. प्रस्तुत दावा फौजदारी स्वरूपाचा आहे, व वर दिलेली उदाहरणें दिवाणी दाव्याची आहेत. या दोन्ही प्रकारच्या दाव्यांची चौकशी पंचाइतीमार्फतच झाली. त्यावरून पंचांना दोन्ही प्रकारचे खटले चालविण्याचा अधिकार असल्याचे दिसून आले. सासवडच्या कज्जांत वादी जिनगर व प्रतिवादी देशमुख असे होते. त्यामुळें पंचांत उभय पक्षांचे इसम असणें जरूर म्हणून गोत हे जिनगराचे जातभाई व भले लोक हे देशमुखाचे जातभाई दिसतात. पंतप्रतिनिधि हे स्वतःस पेशव्यांचे अंकित समजत नसत. तेव्हां त्यांच्या आश्रयास गेल्यानें आपली कांहीं डाळ शिजेल ही पहिल्या दाव्यांत जो हरला त्याची समजूत. फौजदारी खटल्यांत उभय पक्षकारांपैकीं कोणच्याहि वतीनें एखाद्या साक्षीदारानें खोटी साक्ष दिल्यास दंड करण्यांत येई. त्या दंडाची रक्कम साक्षीदाराची स्थिति व गुन्ह्याचें स्वरूप लक्षांत घेऊन घेतली जाई. एखाद्या प्रकरणीं नेमके गुन्हेगार सांपडण्याचा संभव नसे. अशा स्थितींत गांवच्या मोकदमावर म्हणजे कामगार पाटलावर गुन्ह्याची जबाबदारी ठेवून त्याजपासून दंड वसूल केला जाई. ‘ थोपणदास कळवणकर पुण्याहून तटू रुपये व हांडेभांडे घेऊन कळवणास जात असतां वाटेंत नाणे मावळांत माऊ येथें वस्तीस राहिला तेव्हां

रात्रींची कंठाळच चोरांनीं नेली. याची जोखीम गांवच्या मोकदमावर ठेवून त्याजपासून १० रु. दंड घेण्यांत आला. ' पाटलाला जबाबदार धरण्याचे कारण असें कीं, ज्या गांवात गुन्हा घडला त्या गांवातच गुन्हेगार सांपडण्याचा संभव अधिक. गांवातील गुन्ह्याचा शोध लावण्याचे काम गांवच्या महारांचे व गांवचे महार पाटलाच्या हाताखालचे. म्हणून पाटलाला हा दंड. या दृष्टीने खालील निवाडा फारच नमुनेदार आहे. त्यांत गुन्ह्याच्या जबाबदारीची वाटणी फारच चौकसपणानें करून त्याप्रमाणें शिक्षा करण्यांत आल्या आहेत.

' यादी रामचंद्र भेलगिरी दिमत पागा दाजजी दिघे सु॥ इहिदे तिसैन मया व अलफ. मशार निल्हे तिगस्ता भाद्रपद मासी पागेचे ठाण्यातून पुण्यास येतेसमई मौजे धामरी तर्फ पाबळ प्रांत जुन्नर येथें श्रीविठोबाचे देवालयीं रात्रीस राहिले. पाहाटेचे प्रहर रात्रीस निघोन पुण्याचे मार्गे येत होते, तेव्हां गांवापासून बाणाचे टप्प्यावर चोरांनीं लुटले. यावर माघारे गांवात येऊन आरोळी केली. तेव्हां गांवकरी चौघे मिळोन मशारनिल्हेजवळ आले. तेव्हां लुटल्याचे वर्तमान गांवकरी यांजवळ सांगितले. यावर मशारनिल्हेचा माणूस घेऊन गांवकरी चोरी झाली त्या जागेवर गेले. तेथें पहाता दोन घोडी चरत होती. तेथें आसपाशीं शोध करतां पावशा कुळंबी याचे मळंईत कंठाळ व कागदाचा रुमालसुद्धां सांपडली. ते व घोडी घेऊन मशारनिल्हेची माणसे व गांवकरी गांवात आले. रामसिंग व ताल्या कुळकर्णी व तावजी हंबीर हे पुढें रामसिंगाचे बैल व आपले (बैल) राणू डफळ व बाळ्या पोरगा यानें चारावयास नेले होते, त्याचे शोधास गेले. गांवकरी गांवात आल्यावर माग काढावा तरी गांवचे रखवालीचा बेरड पेराजीच पळून गेला होता. त्याजवर रामचंद्र भेलगिरी (हे) घोडी व कंठाळ घेऊन पुण्यास आले. आणि सरकारात चोरीचे वर्तमान विदित केले. तेव्हां गांवकरी यांस हुजूर आणून मनास आणिता रामचंद्र भेलगिरी गांवात वस्तीस राहिले. तेव्हां जागले मागावे ते मागितले नाहीं. प्रहर रात्रीं निघाले. वाटाड्या मागितला नाहीं. परंतु ' मी निघालो तेव्हां कुणबी याने बैल सोडून माझे आगेमागे जात होता. त्याची व चोरांची गाठ पडली ' म्हणोन मशारनिल्हेनीं सांगितले. त्याजवरून बैलक्याची चौकशी करतां राणू डफळ बैल सोडून गेला होता. त्यास हुजूर आणून पुरशीस करतां त्यानें सांगितले कीं, ' मला दोघे गांवचे मांग रखमा व महाद्या भेटले. त्यांनीं मला

दाबले, तेव्हां पळोन बैल घेऊन आपले मळंइत गेलो. तेथें मागाहून रामसिंग व तावजी हंबीर व तात्या कुळकर्णी हे बैलाचे शोधास आले. त्यांजवळ हरदू जण मांग भेटले, हे वर्तमान सांगितले. मग तिघे निघोन गांवात गेले. ' याप्रमाणें राणू मजकूर याणे सांगितले. यावर मांग व रामसिंग वगैरे तिघे यांस हुजूर आणून पुरसीस केली. त्यानी केंदूरचे मांगानी व बेरडानी चोरी केली म्हणोन लिहून दिले. त्याजवरून केंदूरचे मांग आणिले. यावर धामरीचे मांग म्हणू लागले की आम्ही त्यांची नांवे गांवकरी यांचे सांगण्यावरून लिहून दिली. तेव्हां फिरोन मांगास पुरसीस करता रखम्या बोलला की, दाव माळयाची मका खंडून घेतली होती, तेथे माळयावर राखीत होतो, ते रात्रीस गांवात बोंब जाहाली. हे कशाची म्हणोन दाव माळ्याने मला जागे करून विचारले. तेव्हां दाव माळ्यास हुजूर आणून पुरसीस केली तेव्हां दाव माळी बोलला कीं, आपण रखम्यास हाक मारली नाही. रखम्याने मला हाक मारली कीं, गांवात गलबला कशाचा ? तेव्हां लांडग्याचा गलबला असेल असे मी बोललो; व माझी मकाहि मांगाने घेतली नाहीं ' याप्रमाणें लिहून दिले. त्याजवरून रखम्याने चोरी करून दाव माळयास जागे करून बोलला असें संभवते. त्यास सारांश पहाता गांवकरी चोरीत होते नव्हते याचे निखालसे करावे तर मांग × × × खरी आहे म्हणतात. परंतु गांवकरी आपण यात नाहीं म्हणोन लिहून देतात, तेव्हां गांवकरी यांजकडे चोरीचा संबंध दिसत नाहीं. चिंचौलीचे पत्रांत कुमक करावी असे आहे. मांग तरी चोरीत निखालस होते असे राणूस आढळले आणि त्यानी त्यास दाबविले असे राणूचे म्हणणे आहे. आणि ते समई दुसऱ्याजवळ बोलला आहे त्यापक्षी मांग चोरीत होते हे जाणोन रामचंद्र भेलगिरी यास वस्तवानी काय गेली ते खरे लिहून देणे म्हणोन सांगितले. त्याजवरून त्यानी अजमासे किमती घालून साडेचारशे रुपयांची सनगे व नक्त सुद्धा गेली म्हणोन सांगितले. परंतु अजमासे जुन्या व नव्या सनगाच्या किमती घातल्या त्याचे प्रमाण काय ? सबब मोहघम चोरीचा ठराव ३५० रुपये

तपशील

१५० रखम्या व महाद्या मांग यानी द्यावे व अगोदर चोरी भरून द्यावयासी माळी जामीनहि दिला होता.

२०० गांवकरी यानी द्यावे. सबब कीं, मांगच चिंचोलीस गेले होते त्यानी गांवचे कामकाज करावे याबद्दल सत्या मांग यास आणावयास रखमाजीस व लक्ष्मण डफळ व बाळया माळी हे तिघे गेले. तेव्हां मांग मजकूर बोलला कीं, सरकारचा आरोप कांहीं चोरीचा आला होता. म्हणोन पाचसहा महिने सरकारांत पेचांत होतो. त्यास आदामसाला वगैरे पडला तो देऊन सुटून आलो. त्यास कुमक करावी त्याजवरून गांवास नेऊन चौघांचे विचारे कुमक होईल ते करूं म्हणून चिंचोलीकरास त्रिवर्ग गांवकरी यानी लिहून दिले. सबब गांवकरी यानी द्यावे मांग नादान यजीत झाले सबब रुपये १५०

५० रामसिंग व तावजी व राणू डफळ व ताल्या कुळकर्णी यांस चोरीचा मजकूर समजला असतां चौकशी करावयास कारकून गेला, त्याजवळ मजकूर सांगितला नाहीं सबब रुपये

२००

३५०

(पे. द. ४३)

वरील यादी सन १७९०–९१ मधील आहे. तिच्यांत गुन्ह्याची चौकशी व निवाडा ही आहेत. रामचंद्र मेलगिरी याने ४५० रुपयांचे नुकसान झाल्याचें सांगितले असले तरी न्यायाधीशाने वाजवी किंमत ३५० रुपयेच धरली. खटल्यांतील आरोपी व साक्षीदार व फिर्यादी यांना पुण्यास एकाच वेळीं बोलावून खटला उभारला नसून पोलिसापुढील कच्च्या चौकशींत जसा सुगावा व गरज लागेल त्याप्रमाणें पक्षकारांना बोलावण्याची पद्धत सांप्रत आहे तिचा

अवलंब या खटल्यांत केला आहे. चोरी रखम्या व महाद्या यानीच केल्याचे न्यायाधीशाने अनेक प्रमाणावरून सिद्ध केले आहे, त्यांत त्याची छाननी बिनचूक दिसते. १५० रु. आरोपीनी भरावयाचे, पण २०० रु. गांवकऱ्यांनीं गुन्ह्याशी त्यांचा संबंध नसता द्यावयाचे याचे कारण प्रस्तुत प्रकरणी त्यांनीं सत्या मांग याचा हवाला घेतला होता हें होय. रामचंद्र मेलगिरी याची भरती करावयास पाहिजे म्हणूनच सदर रकम त्यांजपासून घ्यावयाची ठरविलेले दिसते. रामसिंग प्रभृतींनी चोरीची माहिती सांगण्याचे त्यांचे कर्तव्य असता ते केले नाहीं याबद्दल दंड म्हणून ५० रु. त्यांजवर बसविले आहेत. एकंदरींत निवाडा फार चातुर्याने केलेला दिसतो.

नवऱ्यानें चोरी केली तरी तिचे प्रायश्चित्त त्याच्या बायकामुलांना मिळे. ‘ खंडया बेरड चाकणकर चोऱ्या करीत होता म्हणून त्याची माणसें कैद करून किल्ल्यांत ठेवलीं ’ याचा एक उपयोग असा. चोरी करणारा सांपडत नसल्यास किंवा फरारी असल्यास त्याची कौटुंबिक माणसें धरून ठेवलीं म्हणजे गुन्हेगार इसम आपण होऊन, आपल्या माणसांच्या हालअपेष्टा चुकविण्याकरितां सरकारच्या स्वाधीन होतो. ‘ बाजी सोनार यानें चोरी केली म्हणून त्याच्या बायकोस कैदेंत ठेवलें.’ सोनार फरारी झाला नसला तर त्याच्या चोरींत बायकोचेंहि अंग असेल या संशयानें तिला कैद झाली असावी. ही वहिवाट पेशवाईतच होती असें नव्हे तर कौटिल्याच्या काळींहि होती. कौटिल्य म्हणतो, ‘ खुनी इसमाच्या किंवा चोराच्या मुलांनाव बायकांना—हे त्यात सामील असतील तर अटकेंत ठेवावें.’ गुन्हा सबंध गावानें केला असल्याचे आढळल्यास गावापासून सगळा दंड वसूल करण्यांत येई. ‘ शामराव विश्वनाथ सालगुदस्त (१७५१-५२) मोगलांचे दंग्यासमयीं लष्करांत येत होते. ते वाटेंत पाथरे खुर्द तर्फ बेलापूरच्या हद्दींत लुटले गेले. तो माल गांवकऱ्यापाशीं मिळाला व तो ज्याचा त्यास दिला. या लुटीबद्दल गावापासून ७५० रु. दंड वसूल केला.’ (पे. डा.) पेशव्यांच्या लष्करचा माणूस त्यांच्या लष्करांत येत असतां त्यास वाटेंत त्यांच्याच राज्यांतील गावकऱ्यांनीं लुटावें यांत राज्यकर्ते व त्यांचे प्रजाजन हें नातें कोठे राहिलें ? हा प्रकार अधमपणाचा झाल्यामुळें वरील दंड पाथरे गावावर बसला. हा न्याय अर्थात् लष्करी न्यायच झाला.

दोन गावांत तंटा लागल्यास त्या दोन गावांची लढाई होऊन सरकाराकडे

न जातां परभारेच तंट्याचा निकाल लावण्यांत येई. पण या लढाईचीं बातमी सरकारांत कळल्यावर सरकार त्यांच्या नजरेस येईल त्याप्रमाणें न्याय करीत असे. ‘ मौजे मुडले परगणे सुपे व कोन्हाळे बुद्रुक परगणे सुपे याजमधील शिवेचा कज्जा होता. त्या दोन गावांत झुंज झालें. त्यांत कोन्हाळेकराकडील एक भला माणूस, एक घोडा व एक तट्टू ठार झालें. व वस्तभाव पाडाव झाली. मुडलेकरांनीं हें फारच भयंकर कृत्य केले. त्याची खबर सरकारांत लागतांच सरकारनें त्यास या गुन्ह्याबद्दल पांचशें रुपये दंड केला. (पे. डा.) त्याकाळीं कोर्ट फी, स्टांप या सारख्या बाबी न्यायखात्याचा खर्च भागविण्यास सरकारापाशीं नव्हत्या. पण न्यायखाते तर चाललेंच पाहिजे; यासाठीं पक्षकारापासून दंड, चौथाई, शेरणी हरकी, गुन्हेगारी या बाबी वसूल केल्या जात. दिवाणी दाव्यातील उत्पन्नाची वाटणी सरकारातर्फे होताना सरकार उत्पन्नाचा चौथा हिस्सा सरकारजमा करीत असे हीच चौथाई. एखाद्याचे कर्ज ऋणकोकडून वसूल करून देतानाहि सरकार चौथाई घेई. ज्या पक्षाला अपयश आले त्याला यजीत पत्र लिहून द्यावे लागे व सरकारांत गुन्हेगारी भरावी लागे. जो पक्ष यशस्वी झाला त्याला सरकारांत हरकी किंवा शेरणी द्यावी लागे. ही हरकीची रक्कम मिळकतीच्या चतुर्थांशाइतकी असे. तथापि एखाद्या पक्षकाराची स्थिति निकृष्ट असल्यास हरकीची माफी मिळे. पंचायतीच्या निकालावर नाराज पक्षकारास अपील करतां येई. पण अपिलाचा निकाल विरुद्ध लागल्यास त्याला गुन्हेगारी म्हणून दंड द्यावा लागे. त्याचप्रमाणें दाव्याचा आरंभ होण्यापूर्वी दाव्याच्या निकालासां धरून वागेन अशाबद्दल पक्षकारापासून जामीन घेतला जाई. अपील ऐकतांना मामलेदार किंवा इतर अधिकारी यांनीं नवीन पंचायत नेमावी किंवा पंचायतीशिवायहि निवाडा करावा. परंतु पंचायतीवाचून न्याय-निवाडा झाल्यानें पंचायत नेमली नव्हती, या मुद्यावर दाव्याची फिरून चौकशी करण्यास कारण उत्पन्न होत असे. यावरून पंचायतीवर रयतेचा विश्वास किती होता हें दिसून येतें. पांचामुखीं परमेश्वर किंवा पंच परमेश्वर ही म्हण त्यावरूनच पडली व पंचायतीवांचून निवाडा करावयाचाच नाहीं असा प्रघातच पडला. हद्दीच्या वादांत पंचामध्यें पाटील, देशमुख, देशपांडे व त्यांच्या मदतीस महार असत. सरकारी अधिकाऱ्यांच्या मंजुरीवांचून पंचांना आपलें काम करतां येत नसे. परंतु क्वचित् तसें घडलेंच तर हेतु लक्षांत घेऊन सरकारी अधिकारी गय करीत.

कोणचा दावा हुजुरांत किंवा मुख्य न्यायाधीशाकडे जावा, कोणच्या दाव्याचा निकाल पाटील, कमाविसदार, मामलेदार या सरकारी नोकरांनीं पंचायतीमार्फत खालच्या खालीं करावा याचा नियम नव्हता, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. खालचे दावे वर येण्याचीं कारणें वेगवेगळीं असत. एखादे वेळीं खालचे अधिकारी वादी–प्रतिवादीपैकीं कोणी डोईजड माणूस असल्यास न्याय देण्यास कचरत. तेव्हां ते पक्षकारास हुजुरकडेच फिर्याद घेऊन जाण्यास सांगत. ‘मौजे परवारे परगणे गांडापूर येथील मोकदम पाटलानें हरबाजी कोनेर कुलकर्णी व जोशी आणि त्याचा चुलतभाऊ बचाजी श्यामराज व त्याचा पुत्र यांच्या घरांत दरवडा घालून त्यांस जिवें मारलें.’ खुद्द पाटलानें केलेला हा अत्याचार. असल्या पाटलावर काम चालविण्यास मामलेदार वगैरे अधिकारी क्वचित् कचरावयाचे. म्हणून असले खटले हुजुराकडे आले असतां पेशव्यांना स्वारी कामामुळें किंवा अन्य कारणानें त्यांत लक्ष घालण्यास फुरसत नसेल तेव्हां ते खटले पेशवे वजनदार अशा स्वतंत्र्य अधिकाऱ्याकडे नेमून देत. ‘मंगळवेढेकर देशमुख व कुणबी व देशपांडे व कुळकर्णी यांचा नारो बाबाजीकडे इन्साफ (श्रीमंत थोरले माधवराव यानी) नेमून दिला होता. निकरास गोष्ट आली होती. त्यास कलेढोणकर खंडेरावहि देशमुखांनीं आणिला होता. त्यास प्रतिनिधींचे जमीदार अनुकूल जाहले. तेव्हां (आम्ही) श्रीमंतास समजावून घुगऱ्याचा न्याय एकीकडे ठेवून आधी देशपांडे कुळकर्णी यांचा व खंडेराव यांचा न्याय द्यावा म्हणोन सांगोन न्याय इंदापुरास महादाजी नारायण याजकडे दिला. आम्ही व राजश्री नारो बाबाजी मिळोन श्रीमंतास दोन वेळा विनंति केली कीं, न्याय जदीस (जिकिरीस) आला आहे. कागद आपण स्वतः पहावे आणि समजावे. आणि कर्तव्य ते करावे’ [ऐ. ले. सं. खंड ३ रा] हें पत्र शिवाजी बाबाजी यानें गोपाळराव पटवर्धनास लिहिलें. हा वाद मोठा अवघड दिसतो. त्यात एक पक्ष पटवर्धनांनीं व दुसरा पक्ष प्रतिनिधींनीं घेतलेला दिसतो. त्याचा न्याय एकदा नारो बाबाजीकडे सोपविला असतां त्यानें सदर न्याय करण्याची श्रीमंतांनाच दोन वेळा विनंति केली होती. यावरून सदर भानगडींत पडून वाईटपणा घेण्याची नारो बाबाजी सारख्यांचीहि इच्छा नव्हती हें उघड होतें.

‘नेवासें परगण्यांतील न्हाव्यामधील मेंहेतरेपणाचा कज्जा न्हाव्यांनीं पाटिल–कुळकर्ण्यांनिशी हुजुरास येऊन तोडून घेतला.’ कित्येक कज्जे पेशव्यांवरच अवलं-

बून ठेवले म्हणजे पेशवे स्वारीहून पुण्यास परत येईपर्यंत तहकूब रहात. यामुळें कांहीं कज्जांचा निकाल वर्षानुवर्षे लांबणीवर पडत असे. ‘ सन १७६४ च्या अखेरीस न्यायधीश रामशास्त्री प्रभुणे यांजपुढें पंढरपूरच्या बडव्यांचा तंटा सुरू होता. मोरो हरि हा शास्त्रीबुवांच्या मदतीस सरकारांतून पंच होता. या वादांत गंगाधर बडवे हा पटवर्धनांच्या कृपेंतील होता. पण न्यायाधीश व पंच यांचा त्यास प्रतिकूल निकाल देण्याचा रोख होता. पेशवे स्वारीहून परत येईपर्यंत तरी शेवटचा निकाल देण्याचें तहकूब व्हावें यासाठीं गोविंद हरि पटवर्धनाची खटपट होती ’ [ऐ. ले. सं.]. या उदाहरणानें एक गोष्ट स्पष्ट होते. ती अशी कीं, महत्त्वाच्या व वादग्रस्त दाव्यांत वादी–प्रतिवादी या उभयतांच्या किंवा एकाच्या तर्फे झट-ण्यास पेशव्यांच्या दरबारीं वजन असलेले मातबर लोक उभे असत. त्यामुळें दाव्याची चौकशी कसोशीनें होऊन अन्यायाचा संभव उरत नसे. न्याय मिळ-ण्याचे बाबतींत लोक इतके तत्पर असत कीं, ते रामशास्त्री प्रभुण्यासारख्या निःस्पृह न्यायाधीशासंबंधानेंहि लाचलुचपतीची शंका घेण्यास प्रवृत्त होत. सन १७६४ सालीं गोपाळराव पटवर्धन हैदराच्या स्वारीवर असतां त्यास गोविंद हरि मिरजे-हून लिहितो “ बिरनाळकर [गोसावी] यांचा इन्साफ होऊन राजश्री राम-शास्त्री [प्रभुणे] यांनीं निवाड्याचा मसुदा श्रीमंताकडे [स्वारीवर] पाठविला. त्याप्रमाणें पत्रें लिहून शिक्के करून [श्रीमंतांनीं] पाठवावे. त्यास नरसप्पा यांनीं ‘ मनसुबी [योग्य] झाली नाहीं. लाच दरम्यान शास्त्री यानी खाऊन कागद लेहून दिले आहेत ’ असें नाना प्रकारें लांडे लटके आपले पक्षी जे आहेत त्यांस व श्रीमंतास लिहून कारकून रामाजी शिवराम पाठविला आहे ” (ऐ. ले. सं. खंड ३ रा) एखाद्या न्यायाधीशाविरुद्ध लाचाची कागाळी केली असतां सध्याच्या इंग्रजी कायद्याप्रमाणें ती पुराव्यानें सिद्ध केली तर न्यायाधीश शिक्षेस पात्र होतो व सिद्ध न केली तर तसा आरोप करणारा माणूस शिक्षा भोगतो. पण पेशवाईंत या प्रकारचा कायदाच नसल्यानें कांहींहि आक्षेप घेतले जात असें दिसतें. तथापि ही मोकळीक उभयपक्षीं असल्याने तिच्या कैचींत सापडलेल्या न्यायाधीशास आपला बोज कायम राखावयाचा तर न्यायच देणें भाग असे.

शिक्षेच्या प्रकारांत स्थावर व जंगम मालाची जप्ती हा एक महत्त्वाचा भाग होता. ‘ पुण्यांतील एका सोनारानें बनावट नाणें केलें. त्याबद्दल त्याचे घर सर-कारांत घेतलें. ’ (पे. डा.) रोख रक्कम मिळण्याचा संभव नाहीं अशा प्रसंगीं

स्थावर प्रमाणें जंगम मालहि सरकारजमा करण्यांत येत असे. ‘ अमीरबेग नांवाचा मुसलमान बऱ्हाणपुराहून वाटमार्गी औरंगाबाद प्रांती चाकरीसाठीं येत होता. तो मौजे डामरूळ येथें वस्तीस असतां त्याची चाळीस घोडी गांवकऱ्यांनीं नेली. हुजुरहून हुकूम आला कीं, त्यांतील पांच घोडी सरकार पागेत जमा करावी व बाकीची त्यास परत द्यावी ’ (पे. डा.) दोन पक्षांत मिळकत किंवा वतन यासंबंधीं तंटा असेल तेव्हां तें उत्पन्न सध्याहि सरकार ताब्यांत घेते. पण खर्चवेच वजा जाऊन जो पैसा उरेल तो तंट्याचा निकाल लागल्यावर ज्यानें दावा जिंकला त्यास सरकार देतें. पण पेशव्यांची रीत तेवढ्या मुदतीतील उत्पन्न सरकारजमा करण्याची होती. ‘ वसई प्रांतांतील पाताणे परभूंच्या घरचे उपाध्येपण करण्यासंबंधानें पळशे व ब्राह्मण यांत तंटा लागला होता. पेशव्यांनीं तंट्याच्या निकालापर्यंत गुमास्ता नेमला आणि निम्मे उत्पन्न गुमास्त्यास दिले व निम्मे सरकारांत घेतलें. ’ (पे. डा.) पेशव्यांच्या मुलखांत रहाणारा माणूस फितूर होऊन शत्रूस मिळाल्याचे सरकारांत समजल्यास त्यासाठीं करावयाच्या जप्तीस सीमाच नसे. ‘ भिकाजी बाबूराव शिलेदार लष्करांतून निरोप घेऊन घरास गेले. तेथून ते मोगलाईत गेले, असे समजते. तरी ते तसे गेले असल्यास त्यांजकडे डुबेर हा गांव आहे तो जप्त करणें. ’ पेशव्यांच्या पदरचा शिलेदार निजाम-हैदरासारख्या शत्रूस मिळाल्यावर पेशव्यांना राग कां येऊं नये ? ‘ कर्यात आटपाडी येथील देशपांडे हैदर नाईक यांजकडे जाऊन चाकरीस राहिला. म्हणून कर्यात मजकूर येथील देशपांडेपणाचे वतन सरकारांत जप्त करून त्यावर कमाविसदार नेमला. ’ (पे. डा.) एखाद्या गांवाने शत्रूस फितूर झालेल्या इसमास त्याची उंट–घोडी गांवात ठेवून घेऊन आश्रय दिला तर त्याबद्दल गांवापासून चौदा हजार रुपयांपर्यंतहि गुन्हेगारी घेण्यांत येई. जे फितूर होऊन शत्रूस मिळाले असतील त्यांची घरें व मुलें माणसेहि जप्त केली जात.

बदकर्म हें पंच महापातकांपैकी एक पातक हिंदु धर्मशास्त्रानें गणले आहे. या पापाबद्दल पेशवाईत वेगवेगळया प्रकारच्या शिक्षा होत. बदकर्माच्या गुन्ह्यांत पुरुष व स्त्री हीं दोघेंहि सामील असल्यामुळें शिक्षेस पात्र होतात. बदकर्माबद्दल दंड ही एक शिक्षा असे. पण हा दंड द्रव्यरूपानेंच भरावा अशी सक्ति नव्हती. एक गवळी व गवळण यांनीं सदर गुन्हा केला म्हणून त्यांजपासून

एक खंडी तूप सरकारांत घ्यावे असा निकाल एका खटल्यांत देण्यांत आला. (पे. डा.) बदकर्म करणाऱ्या स्त्रीस क्वचित् बटिकपणाचीहि शिक्षा मिळे. 'मल्हार दिनकर देशपांडे तर्फ चाकण यानें मौजे चांगदेव तर्फ एदलाबाद येथील शंकर पांड्या गुजराथी याच्या बायकोशीं अकर्म करून शंकरास जिवे मारले. यांत देशपांड्यानें दोन गुन्हे केले. एक व्यभिचाराचा व दुसरा खुनाचा. त्याबद्दल देशपांड्याचे वतन सरकारानें जप्त केले व त्याच्या खुळांत जे होते त्यांच्यापासून पांचशे, एक हजार याप्रमाणें दंड घेतला.' (पे. डा.) अकर्माचा गुन्हा असा आहे कीं, तो झाल्याचे सिद्ध होणें कित्येकदां कठिण जाते. अशा वेळीं दिव्य करून आपला निरपराधपणा सिद्ध करण्याची संधि देण्यांत येत असे. 'रखमाजी रेपाळा याची मुलगी बनाम मैनी ही शिवाजी परीट याजजवळ गेली असा तिजवर सोयराजी थोरात याने आरोपी केला. तेव्हां तिला दिव्य करण्यास लावलें. त्याप्रमाणें तापलेल्या तेलांत एक धातूचा तुकडा टाकण्यांत आला. तो तुकडा मैनीनें काढला त्यावेळीं तिचा हात भाजला नाहीं. दिव्याच्या भाषेंत बोलावयाचे तर तिने रवा काढला, रव्यास उतरली व खरी झाली.' (पे. डा.) या रीतीनें मैनी निरपराधी ठरली. खुनाला देहान्त शासन देतच असें नाहीं. दंड, वतनजप्ती नुकसानभरपाई व कैद यांपैकीं एक अगर अधिक शिक्षा मिळे. ब्रह्महत्येबद्दलहि वतन जप्त होई. 'प्रवरा संगमकर पाटील व टोकेकर पाटील यांचे शिमग्याचे खेळांत भांडण जुंपून त्यात प्रवरासंगमकर पाटलांनीं टोकेकर पाटलाच्या वतीच्या लोकांचे खून पाडले. त्यावरून प्रवरासंगमकर पाटलांना पुण्यास कैद करून आणण्यांत आले. पुढें काम चालून प्रवरासंगमकर पाटील दोषी ठरल्यावरून त्यांची अर्धा चाहूर जमीन टोकेकर पाटलास द्यावी असा हुकूम झाला' (पे. डा.)

'मौजे पचाड परगणे रतलाम येथील उदीच्य ब्राह्मणाचा खून एका रजपुतानें केला. त्याबद्दल त्या रजपुतास देशाबाहेर घालवून देण्यांत आलें, त्याचे जहागिरीचे बारा गांव सरकारनें जप्त केले व ब्राह्मणाच्या भावास एक चाहूर जमीन इनाम दिली.' (पे. डा.) 'एका कुळकर्ण्यानें थोराताचा घासदाणा वसूल केला नाहीं. म्हणून त्यास थोराताच्या लोकांनीं बांधून नेलें. वाटेनें नेत असतां कुळकर्णी मेला. या नुकसानीबद्दल कुळकर्ण्याच्या मुलास जमीन इनाम मिळाली. (पे. डा.). 'एका वाण्यानें पुण्यांतील सोमवार पेठेंत आपल्या बायकोस जिवे

मारली. त्याबद्दल त्याजपासून सरकारनें दोन हजार रु. दंड घेतला' (पे. डा.) जिवास जीव घेण्यानें कांहीं फलप्राप्ति आहे, अशी त्या काळीं समजूत नव्हती. देहान्त शिक्षेपासून वचक बसून जनता असे गुन्हे करण्यास भिते, हें खरें आहे; तथापि वर वर्णिलेल्या शिक्षा इतक्या वेगवेगळ्या प्रकारच्या आहेत कीं, त्या योगानें गुन्हेगार जीवितास नसला तरी वित्तास मुकतो व ज्या घराण्याची खुनानें हानि झाली त्यास जमिनीच्या किंवा अन्य रूपानें मदत मिळून घडलेलें नुकसान अंशत: भरून निबतें. पण सध्याच्या फाशीच्या शिक्षेंत तशा प्रकारची भरपाई मिळण्याची सोय मुळींच नाहीं. ज्यांची मनुष्यहानि घडली त्यांना गुन्हेगाराचें पारिपत्य झालें याबद्दल काय मानसिक समाधान लाभेल तेवढेंच.

पेशवाईतील न्यायाचा एक मासला म्हणून पुढील उदाहरण वाचकांना मजेदार वाटेल. हें उदाहरण घाशीराम कोतवालाचें असून सवाई माधवरावाच्या कारकिर्दींत नाना फडनवीस कारभारी असतां घडलें. हीच घाशीरामी या नांवानें पेशवाईच्या अखेरच्या काळांत प्रसिद्ध आहे. 'घाशीराम याचे सबंध नाव घाशीराम सावळादास. त्यास १७८२ सालीं पुणें शहरची कोतवाली मक्त्यानें मिळाली. घाशीरामाचें पुणें दरबाराकडे कर्ज येणें होतें. शिवाय त्यानें पुणें दरबारच्या दुसऱ्या एका सावकाराचा हवाला घेतला होता. त्यामुळेंच त्याला कोतवालीचा हुद्दा देण्यांत आला. मात्र पांडुरंग कृष्ण सर अमीन याला विचारल्याशिवाय कोतवालानें कोणताहि कारभार करूं नये अशी नानांची सक्त ताकीद होती.' (नाना फडणविसांचें चरित्र).

'सन १७९१ त श्रावणमासची दक्षिणा होऊन गेल्यावर पुण्याहून द्रविड ब्राह्मण आपल्या देशांस जाण्याकरितां निघोन असामी ३५ (?) श्रावण वद्य १४ रविवारी प्रहर दिवसास सायंकाळीं घाशीराम कोतवाल यांचे बागांत जाऊन उतरले. तेथें ब्राह्मणांनीं कणसें मळ्यांतील मक्याची दहा तोडलीं. त्यावरून माळ्याचा व त्यांचा कजिया झाला. माळ्यानें शिवीगाळ केली. त्यावरून ब्राह्मणांनीं त्यास मारिलें. त्याजवरून माळी फिर्याद घेऊन कोतवाल यांजकडे आला आणि सांगितलें कीं, 'फितवेकरी चोर कोमटी वगैरे आहेत. मळ्यांत दंगा करतात. मला मारिलें त्यांचे पारिपत्य केलें पाहिजे' असें सांगितलें. त्याजवरून कोतवाल यानें पंचवीस प्यादे पाठवून ब्राह्मणांस मारामार करोन बांधोन भवानी पेठेंत त्याचा वाडा आहे. तेथें भुयारामध्यें रविवारीं प्रहर रात्रीस घातलें. आंत

जात ना तेव्हां मारून घातलें. रविवारची रात्र, सोमवारचा दिवस रात्र. मंगवारीं भाद्र. शु. १ प्रातःकाळीं मानाजी फाकडे याजला वर्तमान कळलें. त्यांणीं तेथें जाऊन जबरदस्तीनें कुलपें तोडून भुयार उघडून ब्राह्मण ओढून बाहेर काढले. त्यांत अठरा ब्राह्मण मेलेले. तीन ब्राह्मणांस जीव मात्र होता. तेहि वरती काढल्यावर सायंकाळीं मेले. सहा ब्राह्मण मात्र वाचले. हे वर्तमान फाकडे यांनीं श्रीमंत राजश्री रावसाहेब पेशवे यांस सांगोन पाठविलें. रावसाहेबांनीं नानाकडे सांगोन पाठविले. त्याजवरून कोतवाल याजला बोलावून आणून पुसिलें. त्यांनीं सांगितलें कीं, कोमटी वगैरे जातीचे फितव्यामध्यें कांहीं होते व चोरीहि करीत होते. ते बातमी पक्की लावून त्याजला पेठेंत ठेवलें.यांणीं कांहीं जणांनीं अफू व सोमल खाऊन मेले,असें कोतवाल यानें नानास समजाविलें. नानांनीं मेलेल्यास जाळण्याची परवानगी दिली. कोतवाल याणें कारकून मुर्दे जाळावयास पाठविला. तो मुर्दाजवळ गेला, तेथें फाकडे बसले होते ते त्यास मुर्दे नेऊं देईनात, कीं 'रावसाहेब यांची परवानगी आल्याशिवाय जाऊं देत नाहीं. कोतवालाचें ऐकत नाहीं' असें साफ सांगोन कारकून याजला पाठविलें. त्याजवरून कोतवाल याजला बोलावून आणून नानांनीं पुसिलें. तेव्हां त्यानें पहिल्यासारखें सांगितलें. त्याजवरून नानांनीं चौकीमध्यें बसविला. आणि चौकशीस कारकून पाठविला. तों मंगळवारीं चार घटका दिवस पावेतो हा मजकूर झाला. तों हजार ब्राह्मण तेलंग मिळोन एकच आकांत केला. नानांनीं दरवाजा लावला. सहा घटिका रात्र जाली. वे॥ राजश्री अय्याशास्त्री यांस बोलावून आणिलें. ते नानांचे वाड्यापुढें येतांच ब्राह्मणांनीं मारामार करून शास्त्रीबुवांची शालजोडी व पागोटें फाडिलें. नंतर वाड्यांत गेले. नानांचें व त्यांचें बोलणें झालें. याजला पारिपत्य देहांत असें शास्त्रीबुवांनीं साफ सांगितलें. ब्राह्मणांचा कट बहुत. 'कोतवाल याजला जिवें मारावें.' तेव्हां मग रात्रीस हत्ती आणून त्याचे पाठीवर उपडा बांधून चार पेठा फिरवून रात्रीस रमण्यामध्यें घालून चौकी देऊन ठेविला. तेथेंहि ब्राह्मण दोनशें पावेतो चौकीस राहिले. बुधवारीं प्रातःकाळीं ब्राह्मण जमा झाले. रावसाहेबांचा नेट भारी कीं, याचे पारिपत्य करून डोकें मारावें. निकर्ष फार, तेव्हां मग बुधवारीं दोन प्रहरीं चावडीवर कोतवाल याजला आणून उंटावर बसवून अवघें शहर फिरवून सायंकाळीं दोन घटका दिवसास भवानी पेठेच्या पलीकडे अदकोसावर नेऊन सोडला.

बसला राहिला. हातास काढणी लावून म्हारांनीं धरली होती. तों समागमें द्रविड ब्राह्मण होते. त्यांनीं दगड उचलून मस्तकावर घालून जिवें मारिला.... भृगुवारीं कोतवालीकडील कारकुनास बिड्या फडणीस मजमदार याजवेगळे सगळ्यांस घातल्या. दोघा लोकांसहि बिडी घातली. घराचीहि जप्ती जाहली. कुंटणी कोतवाल यानें ठेवल्या होत्या. त्यांचे व माणसें कोतवालीकडील यांचे हात पाय नाक, कान काढावे अशी बोलवा आहे. कोतवालाचे शरीरास आग नाहीं. अद्यापि पडलें आहे. नदींत टाकलें नाहीं. ' (नाना फडणविसांचें चरित्र व ऐ. ले. सं. खंड ६)

वरील हकिकतींतील अय्याशास्त्री हे न्यायाधीश होत. त्यांचें पागोटें व शालजोडी फाडण्याइतके तेलंगे ब्राह्मण घाशीरामाच्या घोर कृत्यानें चिडून गेले होते. तथापि त्यांनीं आय्याशास्त्रयांशीं केलेली वागणूक अत्यंत गैरशिस्त यांत शंका नाहीं. घाशीरामाचा वध द्रविड ब्राह्मणानी अत्यंत क्रूरपणानें केला याबद्दलहि वाद नाहीं. परंतु त्यावर असें म्हणतां येईल कीं, जसा अपराध भयंकर तसें त्याला शासनहि भयंकर. गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणें कैदेची शिक्षा मिळे. मात्र अमुकच गुन्ह्यास कैदेची शिक्षा असें निश्चित नव्हतें. कैद्यांना बहुतकरून स्वतंत्र बांधलेल्या तुरुंगांत न ठेवतां किल्ल्यावरच बंदोबस्तानें ठेवीत. ' मल्हारजी वीर वाणी कसबे सासवड याजकडे चोरीचें लिगाड आहे. याजकरितां त्याचे पायीं बिडी घालून घनगड किल्ल्यावर त्यास कैदेंत ठेवून दिलें. त्यास दररोज अडसेरी गल्ला कैली ८८। चौथवा भार व मीठ देत जाणे. ' (पे. डा.) लढाईंत धरून आणलेल्यांना किल्ल्यांतच ठेवीत, मात्र त्यांच्या योग्यतेप्रमाणें वागवीत. ' हैदराकडील नारायणराव व योगींद्रराव पाडाव झाले. त्यांस लक्ष्मेश्वरास (धारवाड जिल्हा) पाठविण्यांत आले. त्यांना मिळणारा सिधा पुढील प्रमाणें होता. ' १ शेर तांदूळ बारीक असडीक, १ शेर कणिक, तूप, डाळ, सुपारी, मीठ, साखर, पान. ' ' हैदरखानाकडील सरदारखाना यास चाकण किल्ल्यांत ठेवला होता. त्याच्या पायांत बेडी होती पण त्याला शिधा बारीक सडीक तांदूळ, कणीक, डाळ, तूप, साखर, सुपारी, पानें, हिंग, जिरेमिरे, तमाखू, दिव्यास तेल असा होता. ' (पे. डा.) ' सुभाण्णा ब्राह्मण व मर्या जासूद हैदर नायकाचे फितुरी यांना किल्ले सिंहगडांवर अटकें ठेवलें होते.' (पे. डा.).

पेशव्यांच्या न्यायपद्धतींत पंचायतसि प्रमुख स्थान कसें होतें हें वर आलेंच आहे. मनुष्यकृत पुराव्यानें कज्जाचा निकाल लागला नाही, म्हणजे दिव्याचा शेवटचा इलाज करण्यांत येत असे. त्याचे एक उदाहरण वर दिलेच आहे. दिव्य त्याचा अर्थ दैवी इलाज. ईश्वर सर्व साक्षी आहे. त्याला कोठे काय झालें हें दिसतें व समजतें. तेव्हां त्याच्यावर हवाला टाकून जो निर्णय लागला तो खरा अशी लोकांची श्रद्धा होती. किंबहुना ज्यांची तशी श्रद्धा असे त्यांच्याच बाबतींत दिव्याचा उपयोग करीत. दिव्य हें एखाद्या पुरातन व प्रसिद्ध अशा शंकराच्या देवालयांत होत असे. कृष्णा, गोदावरी यासारख्या पवित्र नद्यांची तीरेहि दिव्याकरितां योग्य मानलीं जात. गुंजण मावळांत नसरापूर व भोर यांचे मध्यभागीं गुंजवणी नदीच्या काठीं मोहरी नांवाचें एक लहानसें खेडें आहे. त्या खेड्यांत अमृतेश्वराचें देवालय आहे. तसेंच पुण्यापासून दोन कोसावर पाषाणगांव आहे. त्या गावानजीक सोमेश्वराचें देवालय आहे. या दोन ठिकाणीहि बरीचशीं दिव्यें झाल्याचा दाखला सांपडतो. लांबलांबचे पक्षकार असले तरी त्यांना या ठिकाणीं येणे केव्हां केव्हां भाग पडे. त्याचप्रमाणें सुधागड पेठ्यांतील पाली हे अष्ट विनायकांपैकीं एक स्थान दिव्या करितां पसंत करीत.

(१) पेशव्यांच्या तोफखान्यावरील प्रमुख अधिकारी सरदार पानसे हे होत. त्यांचे गांव सोनोरी. हा गांव दिव्याच्या घाटापासून कांहीं अंतरावर आहे. गावाशेजारी एक डोंगरी किल्ला आहे. या किल्ल्यानें पुण्याकडून पुरंदराकडे जाण्याचा शत्रूचा मार्ग रोखला जातो. असें हें नाक्याचे ठिकाण आहे. त्या गावच्या कुळकर्णपणाच्या वृत्तीबद्दल पानशांचे एक पूर्वज गोविंद विश्वनाथ पानसे व रामाजी कृष्ण गावखंडेराव या दोघांत तंटा लागला. दोघांचेंहि म्हणणें हें वतन आपलें. अखेर पेशव्यांनीं दिव्य नेमून दिलें. त्यांजपासून प्रथम प्रमाणें राजिनामे लिहून घेण्यांत आले. ते असे कीं दोघांनीं वेगवेगळालीं दिव्यें करावीं. त्यासाठीं दोन तपेल्या, दोन ताम्हने व दोन रवे घ्यावे. आणि दिव्यांना सुरुवात एकदमच व्हावी. दिव्यांत जो खरा होईल त्यास कुळकर्णाची वृत्ति वंशपरंपरा मिळेल, खोटा होईल त्याची वृत्ति काढून घेतली जाईल. दोघेहि कदाचित् खरे झाले तर सदर वतन दोघांना सारखे वाटून मिळेल व उलटपक्षी दोघेहि खोटे ठरले तर दोघांनाहि वतनावरून हाकून देण्यांत येईल.

“ अशा रीतीनें राजिनामे घेऊन झाल्यावर सरकारानें बाबाजी मोरदेव व

चिटणीस या दोघास सरकारतर्फेचे मुख्य अधिकारी म्हणून मोहरीस पाठविले. दिव्याच्या वेळीं मौजे सोनोरीचे मोकदम व बलुते आणि मोहरीचेहि मोकदम बाजे, प्राश्निक लोक व गोत हजर होते. या सर्वांपुढें प्रथम गोविंद विश्वनाथ पानसे यांनीं सांगितलें कीं गिधवी यांनीं आपल्या पूर्वजास कुळकरण मिरास करून दिले असून त्याच्याशीं गांव खंडेरावाचा कांहीं संबंध नाहीं. त्यानंतर रामाजी कृष्ण हेहि म्हणाले कीं कुळकरण पूर्वीपासून आमचे आहे. गिधवी किंवा पानसे यांचा कांहीं संबंध नाहीं. ही प्रतिज्ञा झाल्यावर साक्षीदारांच्या साक्षी घेण्यांत आल्या. दिव्य बहुधा रविवारी करीत असत. शनिवारी पानसे व गांव खंडेराव यांच्या उजव्या हाताच्या बोटांची नखें काढविली. नंतर हातास लिंबू व साबण लावून बोटे स्वच्छ करविली. मग कापडी पिशव्यांत हातांचे पंजे घालून व पिशव्या बांधून त्यावर सरकारी अधिकाऱ्यांच्या मुद्रेच्या मोहरा करण्यांत आल्या. पिशव्या घालण्यापूर्वी पंजा व बोटे यावरील बारीक सारीक सर्व खाणाखुणांची नोंद झाली. दुसरे दिवशीं म्हणजे रविवारीं दिव्यास प्रारंभ झाला. वेळ सकाळची पहिल्या प्रहरची होती.

" दिव्यासाठीं पुढीलप्रमाणें व्यवस्था होती. ज्या ठिकाणीं दिव्य व्हावयाचें त्या ठिकाणीं सात मंडळे काढलेलीं होतीं. त्यांच्या शेवटी एक अग्निकुंड असे. या अग्निकुंडांत सुमारे अच्छेर वजनाचा लोखंडी गोळा लाल होईपर्यंत लोहाराकडून तापवीत व तो चांगला तापला आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं त्याच्यावर वाळलेलें गवत टाकीत. तें गवत टाकताक्षणी पेटलें म्हणजे गोळा पाहिजे तेवढा तापला असें समजत. इतकें झाल्यावर ज्यानें दिव्य करावयाचें त्याच्या हाताची पिशवी, तिजवरची मोहर फुटली नाहीं अशी खात्री करून घेऊन काढीत. इतकी बारीक परीक्षा करण्याचें कारण असें कीं, लबाडी करण्यास यांतूनहि सवड राही. लोखंडाचा गोळा लाल झाला तरी त्यानें हात भाजूं नये यासाठीं कांहीं औषधें असत. तीं औषधें पहारेकऱ्यास लाच देऊन हस्तगत करण्याचा व हातास चोळण्याचा सदर इसमानें प्रयत्न केला नसेल कशावरून ? म्हणून पिशवीवरील मोहरेसंबंधीं खात्री करून घ्यावी लागे. अशी खात्री झाल्यावर सदर गृहस्थाच्या दोन्ही हातांच्या ओंजळींत पिंपळाची पाच सहा पानें ठेवून त्यांना तूप चोळींत. त्यानें दिलेली शपथेवरील जबानी व कधी कधी राजिनामाहि त्याच्य डोक्याला बांधीत. याला चीरपत्र किंवा भालपत्र म्हणत. मग त्याच्याकडूना

जबानींतील सर्व मजकूर पुन्हा वदवून घेत. महाराकडून आणलेले पाणी एका कुंडांत व मांगाकडून आणलेलें पाणी दुसऱ्या कुंडांत ठेवीत. त्या पाण्याची शपथ त्याजकडून घेववीत. तसेच आपण खोटें बोललो तर महारामांगाचें वस्त्र आपल्या मस्तकीं बसो अशीहि शपथ घेववीत. ही शपथक्रिया झाल्यावर त्याच्या ओंजळींतील तूप चोपडलेल्या पानावर लोहार आपल्या सांडसानें तो तापवून लाल झालेला गोळा ठेवी. पुढें दुसरा वादी आपल्या वस्त्राची छाया दिव्य करणाऱ्या वाद्याच्या डोक्यावर धरी. नंतर तो वादी हा लाल गोळा घेऊन एका मंडळांतून दुसऱ्या मंडळांत व दुसऱ्यांतून तिसऱ्यांत• असा सातहि मंडळें चालून गेल्यावर पलीकडे ठेवलेल्या गवताच्या वाळक्या पेंढीवर तो गोळा टाकून देई. गोळा त्यावेळीं इतका तप्त असला पाहिजे कीं, तो टाकतांच गवतानें पेट घ्यावा. इतकें कृत्य झाल्यावर दिव्य करणाराच्या हाताला पिशवी घालून व तिला मोहर करून कोठडींमध्यें पहाऱ्यांत ठेवीत. त्या स्थितींत दोन दिवस गेल्यानंतर तिसरे दिवशीं त्याला सर्व न्याय देणाऱ्या लोकांसमोर आणून व पिशवीची मोहर फुटली नाहीं अशी खात्री करून घेऊन पिशवी उघडीत. त्यावेळीं दिव्यापूर्वीपेक्षां जास्त खुणा म्हणजे फोड, फुटकुळ्या वगैरे हातावर दिसल्यास दिव्य करणारा माणूस खोटा ठरला असा न्यायसभा निकाल देई. प्रस्तुत प्रकरणी गोविंद विश्वनाथ पानसे व रामजी कृष्णराव गांवखंडेराव या दोघांनींहि दिव्य केले. त्यांत गांवखंडेरावाच्या हाताला फोड आले म्हणून तो खोटा व पानसे खरे झाले. ही गोष्ट सन १७६८ त घडली. (पानसे घराण्याचा इतिहास.)

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या तृतीय संमेलनवृत्तांतात धुळ्याचे रा. भास्कर वामन भट यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत वर्णिलेल्या दिव्यांत वरील दिव्यापेक्षां थोडा फरक आढळतो. वरील दिव्यांत पिंपळाचीं पानें दिव्य करणाराच्या पंजावर ठेवीत असें म्हटलें आहे. पण रा. भट यांनीं वर्णिलेल्या दिव्यांत दिव्य करणाराच्या पंजाला पिंपळाची पानें नव्या दोऱ्यानें बांधलीं, त्यावर तापलेला लोखंडाचा गोळा ठेवला व सदर गोळा त्यानें धान्याच्या लहान राशीवर टाकला व तें धान्य जळून गेलें म्हणून दिव्य करणारा लबाड नव्हता असें सिद्ध झाल्याचें वर्णन आहे. यांत दुसरा फरक हा आहे कीं, तो गोळा गवताच्या राशीवर न टाकतां धान्याच्या राशीवर टाकला.

(२) लोखंडाचा तापलेला गोळा हातांत घेणें हा दिव्याचा एक प्रकार झाला. पण इतर कांहीं प्रसंगीं गोळा हातांत न घेतां ताम्हनांत किंवा कढईंत कडकडति तापलेलें तेल ओतींत व त्यांतून दिव्य करणाराकडून सोन्याचा रवा म्हणजे तुकडा काढून घेत. (३) फुरसंगी येथील पाटिलकी वतनाविषयीं कामटे व भिकाजी हरपाळे यांजमध्यें वाद उत्पन्न झाला होता. तेव्हां दिव्य केलें ते वेगळ्या प्रकारचे होतें. त्यांना कृष्णातिरीं जाण्यास सांगितलें. दिव्याकरितां शुभ दिन नेमण्यांत आला. त्या दिवशीं स्नान करून पांढर (फुरसंगीचे लोक) तीरावर उभी राहिली. वादीप्रतिवादी कृष्णेच्या पाण्यांत उभे राहिले. तेव्हां गोत व बलुतेदार यांनीं एकनाक महाराला ज्याचा पक्ष त्याच्या मतानें खरा असेल त्यास नदीच्या पात्रांतून ओढून काढण्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केलें. अर्थात् या कामाकरितां जो मनुष्य निवडावयाचा तो विश्वसनीय असल्याविषयीं गोत व गांवचे लोक यांची खात्री असली पाहिजे. प्रस्तुत प्रकरणीं महारानें निकाल दिला तरी तो भिकाजी हरपाळे यास मान्य झाला नाहीं. कारण महाराचा निकाल कामटे यास अनुकूल होता. तेव्हां ते उभयता शाहू महाराजाकडे गेले. तेथे भिकाजी हरपाळा म्हणाला, ' महाराजांचे पाय हीच माझी कृष्णा. म्हणून मी महाराजांच्या पायावर हात मारणार.' त्याप्रमाणें त्यानें शपथ वाहिली कीं, फुरसंगीचें वतन माझें आहे व कामटे हा मिरासदार शेतकरी आहे. ही शपथ घेतल्यापासून दोन दिवसांच्या आंत भिकाजी हरपाळे यास पटकी आली. तेव्हां त्याला बैलावर घालून गांवीं नेण्यात आलें. गांवीं गेल्यावर एका महिन्यानें भिकाजी मरण पावला. अशा रीतीनें तो खोटा ठरला व कामटे खरा झाला. (४) मौजे चांबळी तर्फ कऱ्हे पठार प्रांत पुणे येथील पाटिलकीचा तंटा होता. अयाजी यानें मौजे पाषाण येथे श्रीसान्निध अग्निदिव्य केलें. तेव्हां अयाजीचा पक्ष खरा ठरून पाटिलकी अयाजीस मिळाली. हें दिव्य सरकारच्या आज्ञेवरून केलें होतें. (५) राघो नारायण व खंडो नारायण यांमध्यें भाऊबंदकीचा तंटा असतां राघो नारायण यानें गोदावरीच्या तीरावर कोपरगांव येथे पेशव्यांच्या आज्ञेवरून दिव्य केलें. (६) 'मौजे उरूण ता. वाळवे प्रांत पन्हाळा व मौजे बोरगांव या दोन गावांत शिवेविषयीं कज्जा होता. दोन्ही गांवें सरकारांत फिर्याद झाली. तेव्हां मनसुबी करण्यास बाळाजी महादेव यास आज्ञा केली. त्यांनीं आपल्याकडलि कारकून बाबाजी अनंत यास शिवेवर पाठविलें.

दोन्ही गांवच्या लोकांच्या साक्षी घेतल्या. दोघांकडून राजिनामे घेतलें. तेव्हां उरणकरातर्फे बाबाजी बिन नाथाजी पाटील यानें कराराप्रमाणें मस्तकीं चर्म व श्रीकृष्णेचा चबूं भरलेला उजवे हातीं घेऊन शिवेनें चालून शीव खरी केली. त्यास चंबू जड झाला व सर्प निघाला. त्यास आक्षेप बोरगांवकरांनीं घेतला. तदुत्तर बोरगांवकर आग्रहास पडून रव्याचें दिव्य करतो म्हणून त्यांनीं अर्ज केला. त्यावरून साहेबीं दिव्याची आज्ञा केली. दोन्ही पक्षाकडून राजिनामे घेऊन मौजे पाषाण येथे सोमेश्वरासन्निध दिव्य करण्याची साहेबी आज्ञा केली. तेथे श्रीसान्निध थोरथोर शास्त्रज्ञ ब्राह्मणांच्या मतें भिवाजी बिन सुभानजी मोरे पाटील बोरगांवकर याजपासून दिव्य करविलें. त्यांनीं रवा काढला. हातास फोड येऊन बोरगांवकर खोटे झाले. त्यांनीं उरूणकरास यजीत पत्र लिहून दिलें. उरूणकरांपासून सरकारानें हरकी घेतली.'

दिव्याची ही पद्धति कितपत न्याय्य याविषयींहि संशय उत्पन्न झाल्यावाचून रहात नाहीं. कांहीं दिव्यें केवळ भरवशावर अवलंबून असत व कांहीं श्रद्धेबर अवलंबून असत. तथापि दिव्याचा न्याय स्मृतिकाळाइतका जुंना आहे. बृहस्पति, मनू, आपस्तंब यांनीं ज्या प्रकारचीं दिव्यें वर्णिलीं आहेत तींच पेशवे करवीत. हीं दिव्यें हिंदुस्थानांत सर्वत्र व सर्वकाळीं प्रचलित होतीं. चिनी प्रवासी ह्यू एन त्संग इसवी सनाच्या सातव्या शतकांत हिंदुस्थानांत आला होता. त्याला दिव्याचे प्रकार आढळले. गझनचा सुलतान महमद याजबरोबर अबू रिहान अल्बेरूणी हिंदुस्थानांत आला होता त्यानें पाणी, अग्नि, तप्त धातू यांच्या दिव्यांचें वर्णन केलें आहे. शाहू राजाच्या पायाची शपथ घेणें हेंहि एक दिव्य होतें. त्यालाहि शुक्रनीतींत आधार सापडतो.

प्रकरण तिसावें

इतर राज्यव्यवस्था

नानासाहेब पेशव्यांच्या वेळीं जमीन बाब व इतर किरकोळ कर यांचें उत्पन्न पेशव्यांना पाऊण कोट रुपयापर्यंत येत होते. सन १७७८–७९ मधील उत्पन्नाचा आकडा इतिहाससंग्रहकारांनीं दिला आहे, तो पाहिल्यास तेव्हांचे उत्पन्न व त्याचा प्रांतवार तपशील पुढीलप्रमाणें—

रुपये	प्रांत
३८३४००२८१४	प्रांत माळवा.
३२७९७७१	झाशी.
९२०५७६८१२८६	सरकार ग्वाल्हेर
९६२४१	संस्थान नरवर.
३६६७८२९	प्रांत बुंदेलखंड.
१६७७३८	प्रांत बुंदी.
३९७८०८ ८१३	प्रांत अहीरवाडा.
१६१०८०	संस्थान उदेपूर.
४००००००	प्रांत बघेलखंड.
१०५४५१	प्रांत खेची वाडा.
६६७४६६०८४	प्रांत अंतर्वेद.
४५००००००	स्वारीचे जमेची वांटणी.
२७८०५१५८८११८६	

[इ. सं.]

हा आकडा उत्तर हिंदुस्थानांतील असून त्यांत तिकडील संस्थानांतून येणाऱ्या खंडण्यांचाहि समावेश झालेला दिसतो. तथापि त्यांत गुजराथ प्रांताचा वसूल नाहीं व दक्षिणेंतला मुळींच नाहीं तो जमेस धरल्यास एकंदर उत्पन्न पांच कोटीच्या अजमासांत जाईल. एकूण उत्पन्नाची वर्गवारी करतांना सरदारांच्या ताब्यांत असलेल्या सरंजामी मुलखातून सरदारांचा खर्च व

इतमाम वजा जाता उरलेला अंश लक्षांत घेतला पाहिजे. राज्याची भरभराट जसजशी होत गेली तसतशी कारभाराची व्यवस्था लागून नानासाहेब, माधवराव व सवाई माधवराव यांच्या कारकीर्दींत क्रमानें सगळीं घडी नीट बसली.

सन १७७२ त माधवराव पेशवे आजारी पडले त्यावेळीं त्यांनीं कारभाराची व्यवस्था केली. तिच्यावरून खुद्द पेशव्यांचा राज्यकारभाराशीं कसा संबंध होता, हे कळून येते. ‘ धाकटे श्रीमंतास [नारायणरावास] जवळ घेऊन बापू [सखारामपंत] सर्व कारभार करतात. वरकड राजश्री मलबा पानशे व महादाजीपंत गुरुजी यांजकडून करवितात. महालच्या रसदा घेऊन बंदोबस्त करणें हें देखील कारभारी यांजकडेच झाले. काम कारभार तडका चालतो. ’ [ऐ. ले. सं. खं. ४ था] जी कामे पेशव्यांनीं करावयाचीं ती माधवरावाच्या आजारामुळें कारभाऱ्याकडे आली. मामलेदारानीं आपल्या तालुक्यात जो वसूल करावयाचा त्याची निम्मी रक्कम त्यांना सरकारांत दरसाल आगाऊ भरावी लागत असे. तिला रसद म्हणत. पेशव्यांनीं जे हुकूम कोणत्याहि बाबतींत सोडावयाचे त्यांत ‘ द्यावें ’ व ‘ देणे ’ असे दोन शेरे असत. माधवरावाच्यां मृत्यूनंतर राघोबा व नारायणराव हे दोघे मिळून कारभार कांहीं दिवस पाहूं लागले तेव्हां आरंभीं ‘ द्यावें ’ दादासाहेब करीत. व ‘देणे’ राव (नारायण राव] करीत [ऐ. ले. सं. खं. ४ था]. पेशव्यांची कचेरी हल्लींच्या इंग्रज सरकारच्या वेळेप्रमाणें भरत नसून सकाळी व दुपारी भरत असे.

सरदारांच्या स्वाधीन जो मुलूख करण्यांत आला होता, त्याच्यावर हुकमत पेशवेच चालवीत. त्यांचे हिशेब पेशवे तपाशीत, त्यांच्या मुलुखातील कांहीं महत्त्वाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक पेशवे करीत. सरदारांचा वारसाहक्क पेशवेच ठरवीत व सरदारांच्या घराण्यांत भाऊबंदकीचा तंटा लागला किंवा इतर कांहीं बखेडा माजला तर त्यांच्या महालांची जप्तीहि पेशवे करीत. सारांश, सरदारास व सरंजामदारास मुलुखजहागिर देण्यापासून तो सदर मुलूख काढून घेण्यापर्यंत सगळी सत्ता पेशव्याकडेच असे. यावरून सरदार हे एखाद्या राजाप्रमाणें स्वतंत्र नव्हते, ते केवळ नोकर होते याविषयीं खात्री पटते. आतां शिंद्यांचाच विचार केल्यास केदारजी व महादजी शिंदे यांची दिवाणगिरी माधवराव पेशव्याने अच्युत गणेश दिमत नारो शंकर राजे बहाद्दर यांस सांगितली.

एकवेळ शिंद्यांच्या घरगुती भांडणांत त्यांच्या महालांची जप्ती करून त्यांची कमाविस अंताजी महादेव यांस सांगण्यांत आली. मल्हारराव होळकर मरण पावल्यावर त्याच्या पश्चात् मालेराव होळकर याजपासून मल्हाररावाच्या स्वारीच्या खर्चाचा हिशेब पेशव्यांनी घेतला.

शिंद्याप्रमाणेंच गायकवाड, होळकर आदिकरून सरदारांचे दिवाण पेशव्यांनीं नेमलेले असत. सन १७६२ सालीं गायकवाडाखेरीज इतर सरदाराकडून ५० लक्षापावेतो रकमेचा भरणा पेशव्याकडे झाल्याचा उल्लेख एका पत्रांत आहे (ऐ. ले. सं. खंड १ ला) एक सरदार मेल्यावर त्याच्या जागी वारसाची नेमणूक करताना पेशवे त्यांजपासून नजराणा घेत. कोठें कोठें एका गांवांत दोघांचे अंमल असत. मल्हारजी होळकर यांना बिबली प्रांत जुन्नर हा गांव दुमाला होता. त्यांतून पेशवे आपल्या हुजूर पागेकरितां गल्ला व कडबा घेत असत. ‘ मौजे राजापूर परगणे वण येथील जहागिरीचा अंमल (पेशवे) सरकारांत आहे व मोकासाबाबती सरदेशमुखीचा अंमल पंतप्रतिनिधी यांजकडे आहे. त्यास लावणीची तरतूद न पाहता कमाविसदारानी सालोसाल जमाबंद्या भारी केल्या. आपत्तीमुळें गांवांत जीवन राहिले नाहीं. यास्तव सरकारांतून बंदोबस्त करून दिला पाहिजे. म्हणून पाटील, कुळकर्णी यांनीं हुजूर अर्ज केला. त्यावरून हे काम दिगंबर महादेव कमाविसदार यास सांगण्यात आले. याकरितां १५० रु. कारकून व ३० रु. प्यादा हा वार्षिक खर्च ठेवून निमा ऐवज पंतप्रतिनिधी यांचे हिश्शांतून वजा करून घेणे. ’ अशा रीतीनें दुअमली गांवांचा वसूल करण्याची पेशव्यांची पद्धत होती. सरदार किंवा जहागिरदार व पेशवे यांचे हितसंबंध एकत्र आले असतां मुख्य अधिकार पेशवेच कसा चालवीत यासंबंधीं दुसरे प्रत्यंतर. ‘ परगणे वरणगांव येथील जहागिरीचां अंमल नबाबाकडे आहे. त्यास जहागिरीचा व स्वराज्याचा अंमल यांचा तपशील येणेंप्रमाणें—

७०	हिस्सा जहागिरदार
४२॥	स्वराज्य
३०	मुकासा व बाबती
१२॥	सरदेशमुखी
१५५	

याजपैकीं ‘ स्वराज्याचा अंमल जास्ती घेता तो घेऊं नये ’ असें पेशव्यांनीं कमाविसदारास लिहिले. म्हणजे हल्लीं सरकार आपल्या वसुलाबरोबर इनामदारांचाहि वसूल करून देते, तशीच पेशव्यांची रीत होती. इतक्या ठिकाणीं लायख माणसे पाहून पेशवे नेमीत. या नेमणुकी करतांना मुलकी खात्यांतला मनुष्य लष्करी खात्यांतहि जात असे. गोविंदपंत पटवर्धन हे इंद्रोजी कदम यांच्या पथकाचे फडणीस होते. कदम दिल्लीच्या एका स्वारीत पडल्यावर त्यांच्या पथकाची सरदारी बाजीरावाने गोविंदपंतास दिली. हरिपंत फडके सरदारकी मिळण्यापूर्वी फडणीसच होते.

पेशव्यांचा फड

पेशव्यांची पुण्यांतील फडणिशी कचेरी तिचे नांव फड. कारकुनी कामात हुशारी दाखवून योग्यतेस चढण्याचें हें मुख्य स्थळ होते. त्यांत ज्यांनीं आपली पात्रता शाबीद केली त्याना निरनिराळ्या सरदारांच्या मुलुखांतहि मोठमोठ्या हुद्द्यावर नेमून पाठविण्यात येत असे. नाना फडणवीस हे या फडावरचे मुख्य अधिकारी बरीच वर्षे होते व त्यानीच फड नावारूपास आणून ती वाकबगार कामगारांची शाळाच बनविली. शेवटच्या बाजीरावाच्या कारकीर्दीच्या अव्वलीस फडांत पंधराशे कारकून होते. त्यांची वर्गवारी अशी [१] निसबत हुजूर दप्तर ३०० [२] निसबत खासगीवाले १०० [३] निसबत तोफखाना १०० [४] निसबत पुणे सुभा १०० [५] निसबत पागा ६०० [६] निसबत हशमनीस ५० [७] निसबत गाडदी ५० [८] निसबत शिलेदार २०० एकूण १५००. ठिकठिकाणीं सुभेदार, मामलेदार, कमाविसदार व सरदार होते, त्यांच्या निसबतीचे कारकून धरल्यास साऱ्या मराठी राज्यांत मिळून कमीतकमी वीस हजार मुलकी कामगार सहज भरतील. नाना हे मराठी राज्याच्या कारभाराची घडी बसविणारे एकच समर्थ अधिकारी नानासाहेब, भाऊसाहेब व माधवराव पेशवे यांच्या नंतर झाले. त्यानी जी शिस्त घालून दिली ती सर्व सरदारानी आपल्या संस्थानास लागू करून राज्ययंत्र नमुनेदार बनविले.

‘ नानाला फडनविशीच्या दरकाचे उत्पन्न एक लाखापेक्षा पुष्कळच जास्त होते. त्याशिवाय पेशव्यांच्या पदरचे शिंदे होळकर पटवर्धन वगैरे सरदारांचे

सरंजाम व पेशवाई राज्यांतील शेकडो किल्ले येथील फडणिशीच्या कामावर कारकून नेमण्याचा हक्क नानाकडेच होता. त्या त्या जागावर ते आपले हस्तक नेमीत असत. त्या हस्तकाकडून नानास स्वामित्वाबद्दल अजमासे दीड लाख रुपये मिळत असतील. एकंदरीत नानाना फडणिशीच्या दरकाबद्दल सालीना चार पांच लाख रुपये मिळत असावे.' [नाना फडणविसांचें चरित्र)

याच फडांतून जे पुरुष उदयास आले त्यांपैकीं हरिपंत फडके हे एक होत. ते मूळ कारकूनच होते. पण कारकुनांपेक्षां शिपाईगिरीच मनुष्यास अधिक भाग्य लाभून देणारी असल्यामुळें हरिपंत सेनापती म्हणूनच प्रसिद्धीस आले. बजाबा बावळे नामक नानाच्या मर्जीतला एक कारकून होता. त्याजकडे किरकोळ न्यायमनसुबीची कामे नाना कधीमधी सोपवीत असत नानाजवळ राजहंस आडनावाचा कोणी कारकून होता त्यास बढती मिळण्याचा योग येईना. बिचारा पुष्कळ वर्षे वाट पाहून थकला. शेवटी त्याने खाली दिलेला श्लोक चिठीवरं लिहून नानाकडे पाठविला--

भानूदयी निजसुरा भट होय जागा ॥
तो बावळा असुनि न्याय करी बजा गा ॥
पीतांबरासमहि त्या फडक्यास मान ॥
मी राजहंस फुटक्या कवडीसमान ॥

यांत भानू, निजसुरा, बावळा, पीतांबर व फडका या शब्दांत श्लेष असून ते सर्व वेगवेगळ्या व्यक्तींची आडनांवे दर्शवितात. हा श्लोक नानाने वाचून तरी राजहंसाचें भाग्य उघडले कीं नाहीं कोण जाणे !

कोतवाली खाते.

पुण्याची कोतवाली हा पेशवाईमध्यें अधिकाराचा व महत्त्वाचा हुद्दा होता. थोरल्या माधवराव पेशव्यानीं शहराची लोकवस्ती अधिक वाढलेली पाहून इ. स. १७६४ मध्यें पोलीसखाते स्वतंत्र केलें व त्यावर कोतवाल नेमला. या पहिल्या कोतवालाचे नांव बाळाजी नारायण केतकर. त्यानंतर धोंडो बाबाजी व आनंदराव काशी असें कोतवाल झाले. आनंदराव काशीची कारकीर्द सन १७७५ पासून १७७८ पर्यंत झालीं. पुढें घाशीराम कोतवाल याची कारकीर्द सुरूं झाली. त्याला कोतवालीचा पूर्ण अधिकार १७८१ त मिळाला.

पुण्याच्या कोतवालाचा अम्मल पुणें शहरच्या रयतेपुरताच असे. श्रीमंतांचे वाडे किंवा सरदारांच्या पागा ह्यांच्याकडे कोतवालाचा कांहीं संबंध नसे. राजवाड्यावरील पहाऱ्यास स्वार शिबंदी वगैरे लोक लष्करी खात्यापैकीं असत. कोतवालाकडे फौजदारी व दिवाणी असे बहुतेक सर्व अधिकार असत. त्यामुळें त्याचा दरारा फार असे. कोतवालापुढें चोरी, बदफैली, जारकर्म, मद्यपान वगैरे मुख्य गुन्हे येत असत. या सर्व खटल्यांचा निकाल त्याचेमार्फत होत असे. कोतवालीच्या उत्पन्नाच्या हरकी व दंड, गुन्हेगारी, पाटदाम, कर्जचौथाई, बैतनमाल, कबलें, बटछपाई, नजर, जुव्याबद्दल दंड या मुख्य बाबी असत. कोतवालीचे उत्पन्न तीस हजारापासून पन्नास हजारापर्यंत असे. हे सरकारी उत्पन्न. या शिवाय कोतवालास अंतःस्थ व कारकुनी मिळत असे.

" घाशीराम कोतवाल याचा पगार दिवट्यासुद्धां सालाचा ६२१ रुपये होता. त्याच्या हाताखालीं मुजुमदार, फडणीस व दप्तरदार असे तीन अधिकारी असत. त्या सर्वांचा मिळून सालिना ६४० रुपये पगार होता. पुणें शहरच्या मुख्य चावड्या पांच होत्या. त्या सोमवार, वेताळ, आदितवार, नारायण पेठ व शनिवार. या पांच चावड्यावर मिळून कोतवालाच्या शिबंदीत (पोलीस शिपायात) ७८ लोक होते. १७७८ मध्यें त्यांत २५ इसम अधिक ठेवलें. त्या सर्वांचा मिळून सालिना खर्च अदमासें तीन साडेतीन हजारापर्यंत होता. याशिवाय पांच चावड्यावर पहाऱ्याकरितां प्रत्येकीं दोन प्रमाणें दहा इसम असत. ते सर्व मिळून घाशीरामाच्या अमलाखाली सर्व पुणे शहराकरितां ११३ पोलिस शिपाई होते. पुढें ही संख्या आणखी वाढली. रावबाजीच्या कारकीर्दीत कोतवाली मक्त्यानें देण्यास सुरुवात झाली. (इ. सं.).

पुणें येथील कोतवालाची कामे वरील उताऱ्यांत आहेत. त्यांचा अधिक खुलासा इतरत्र येणेंप्रमाणें आढळतो. ' पेठा, पुरे व कसबे येथील कज्जे कमाविसदारानी मनास आणावे. मातबर कजिया कमाविसदारानें मनास आणून हरकी गुन्हेगारी घेत जाणे, बाजार जिनसांचा निरख करणे, बिगारीचा बंदोबस्त करणे, अदगज नवा करून देणे, पेंढारी, बाजेकरी यांजपासून घर उदीम पाहून रुपया अर्ध रुपया घेत जाणे, नव्या मापावर शिक्के करून देणें, तेल्याचे घाण्यास दररोज रुके घेणे, दसऱ्यास गोंधळ व बकऱ्याची रेघ व्हावी लागते तो सरकारचा हक्क चालविणें, जाग्याची खरेदीविक्री करणें ती आपल्या

मार्फत करणे, रस्त्याचा, गल्लीचा व घराचा कज्जा लागेल त्याचा इन्साफ करणें, जुवेगारीस नियंत्रण ठेवणें, दौंडी फिरविणे, गस्त घालणे.' (पे. डा.) ही कामाची यादी फारच मोठी आहे. तिच्यात सध्याची पोलीस खात्याची कामे असून सिटी मॅजिस्ट्रेट, शहर मामलेदार व म्युनिसिपालिटी यांच्याहि कामांचा समावेश झाला आहे. कमाविसदार हा कोतवालाच्या हाताखालचा व कोतवालावर अधिकार खुद्द कारभाऱ्याचा म्हणजे आधुनिक दिवाणाचा. कारण बाळाजी नारायण केतकर यास माधवराव पेशव्यानें पुण्याचा कोतवाल नेमले तेव्हां त्यानें बाळाजी जनार्दन (नाना फडणीस] यांच्या हाताखाली काम करावे असें फर्मावले होते.

पुण्याप्रमाणें इतर लहान मोठ्या शहरी कोतवाल असत. राजे विठ्ठल शिवदेव उमदे तुलमुलुख बहाद्दर यांस अहमदाबादेची कोतवाली सांगितली होती. 'जुन्नर येथील कोतवाली रामचंद्र शिवाजी यांस सांगून तैनात सालीना तनिशे रुपये करार केली. शहरात घर रिकामे असेल ते त्यांस रहाण्यास द्यावें' 'रुस्तुमखान त्रिंबककर यांची कोतवाली कसबे त्रिंबक येथें पुरातन असता दरम्यान बंद झाली होती. ती पुन्हा सुरू करण्यांत आली. त्यास पगार दरमहा १० रु.'

लहानमोठी शहरे सोडल्यास इतर मुलुखाच्या बंदोवस्ताकरितां मामलेदार, कमाविसदार यांच्या हाताखालीं शिबंदी असे. बंदोबस्ताच्या दृष्टीने किल्ल्यांचा उपयोग मोठा. किल्ल्यावरील शिबंदी भोवतालच्या टापूचे संरक्षण करी. यात्राप्रसंगी तेथील शिबंदी त्या त्या गांवी पाठविण्यांत येई. सातारा प्रांती पाल या गांवी पौष मासी खंडोबाची जत्रा मोठी भरते. 'तिजकरितां साताऱ्याच्या किल्ल्यावरून ५०, वंदन किल्ल्यापैकीं ५० व चंदन किल्ल्यापैकीं ५० रखवालदार व त्याखेरीज २५ राऊत पाठविण्यांत आले.' (पे. डा.) देवाची आळंदी येथील यात्राहि फार मोठी. तिच्या बंदोबस्तासाठीं व्यवस्था करण्यांत आली ती अशीः–' आळंदीचे यात्रेचे समयी ५० राऊत, १५० हशमी व गाडदी मिळून दोनशे असामी यात्रेच्या अवलपासून अखेरपर्यंत साल दरसाल सरकारांतून दिले जातील.' [पे. डा.] पाटील कुळकर्णी यांजवर गांवाची जोखमि म्हणून प्रसंग विशेषी सरकार आपले प्यादे त्यांच्या मदतीस पाठवून बंदोबस्त करी. 'मौजे सुकेणे परगणा चांदवड येथे नरसोजी जाधव याने धामधूम मांडली

होती. त्याचा बंदोबस्त पाटील कुळकर्णी यांस २५ प्यादे देऊन त्यांजकडून करविला. दंग्यामुळें शेतकऱ्यांचा माल खळयातच पडला. ' 'पाली [सुधागड] येथील देवालयाची इमारत (बल्लाळेश्वर) होत असता त्या बाजूस श्यामलाची धामधूम होती. म्हणून रखवालीस नारो त्रिंबक देशमुख यांस २५ माणूस देवविले ' केव्हांकेव्हां हे काम देशमुख–देशपांडे यांजकडेहि सोपविण्यांत येत असें. खानदेशांत चाळीसगांव, शेंदूरणी या बाजूस भिल्लांचा उपद्रव झाला होता. त्यांच्या बंदोबस्तासाठीं गांवोगांव भिल्ल–पट्टी बसवून ती वसूल करून देशमुख व देशपांडे यानी व्यवस्था ठेवावी असे ठरले. एक एका गांवावर एक हजारापासून सहा हजारापर्यंत पट्टी बसली होती. ही गोष्ट सन १७४०–४१ त घडली. गुजराथेंत कोळी व भिल्ल यानी दंगा आरंभिला होता. त्यांचे पारिपत्य करण्याकरिता परगणे बहाद्दरपुरा येथील कमविसदार वासुदेव रघुनाथ यानी पेशव्यापाशी जास्ती प्यादे मागितले. खानदेशापैकीच परगणे रावेर, अशेर, सावदे, चोपडे इत्यादि ठिकाणचे जमीनदार कोळी व भिल्ल मिलाफी होऊन व गांवगन्ना माल जाळून सरकाराची नुकसानी करीत होते. तरी त्या सर्वांची वतने जप्त करून वतनाची कमविसी माधवराव विश्वनाथ यास सांगण्यात आली (सन १७५४–५५). हे भिल्ल शरण आले तेव्हां यानी पुनः डोके वर काढून नये या हेतूने त्यांना घातलेल्या अटी कल्पकतेच्या द्योतक आहेत. भिल्लाकडून येणेप्रमाणे कबूल करून घेण्यात आले–आम्ही गांवगन्ना जागल करून राहू, रानांत व डोंगरात हव्या आहेत त्या मोडू, तरवार बंदूक बाळगणार नाहीं, कमठा व तीर दर गांवास जागलीस व वाट घाट चालवयास बाळगू, लाखेचा लखोटा गळयांत सरकारच्या मोहरेचा बाळगू, लखोट्याशिवाय भिल्ल राहील त्याचे पारिपत्य करावें. ' [पे. डा.] असल्या कडक अटी आफ्रिकेतील तद्देशीयावर सांप्रत गोऱ्यावसाहतवाल्यानी लादल्या आहेत.

जुन्नरच्या बाजूस कोळयांचा दंगा झाला होता. तो दंगा भांगरे, वांबले व बोकड कोळी यांस दोन गांव इनाम दिल्याखेरीज शमणार नाहीं असे हुजूर विदित झाल्यावरून शिवनेर तालुक्यापैकीं चारशे रुपये जमाबंदीचा गांव त्यांचे नांवे करण्यात आला. पूर्वी त्या बाजूस कोळयांचे राज्य होते, ते खालसा झाल्याने कोळी खवळले. म्हणून त्यांचे समाधान या उपायाने केलेले दिसते. असो. बंदोबस्ताचे मार्ग येणेप्रमाणें विविध असत. गुन्ह्याबद्दल ज्याना शिक्षा झाली

त्याना अटकेंत ठेवण्याकरिता हल्लीप्रमाणें तुरुंग बांधलेले नसत. कैद्याना परिस्थिति लक्षांत घेऊन लोहगड, माहुली, पुरंदर, सिंहगड, अहमदनगर इत्यादि किल्ल्यांत अडकविण्यात येत असे. त्यांस पोटाकरितां धान्य त्यांच्या योग्यतेप्रमाणे मिळे. त्यांजवर नजर हवालदाराची. कांहीं कैद्यांच्या पायात बेड्या असत. कैदी ब्राह्मण असल्यास त्याला ब्राह्मणाकडून पोटाला घालण्यात येई.

'चिंतामण नारायण गोळे यानें नाशिक येथे कळावंतिणीशी अधमाचरण केले. सबब त्याच्या पायात बेडी घालून किल्ले शिवनेरीस अटकेत ठेवावयास पाठविले आहे. पायांत बेडी घातली आहे ती भोजनाचे वेळीं काढावी ! [पे. डा.] 'किल्ले अहमदनगर येथे पांच असामी कैदेत आहेत. त्यापैकीं चौघांचा एक एक हात तोडून त्यास सोडून द्यावे.' 'बापू नटवा यासी किल्ले कोहज येथे अटकेत ठेवला आहे. त्यास तो अन्यायी आहे सबब त्याचा उजवा हात व डावा पाय पत्रदर्शनीं तोडून किल्ल्याखालीं सोडून द्यावे ! गुन्हेगार पकडून देण्याकरितां बक्षिसेहि लावीत. 'लहुबाराय कोळी याने पूर्वी चोऱ्या करून सांप्रत मुलुखात दंगा करतो. कोळी मजकुराची बातमी राखून शिरच्छेद करून आणावा. हजीर केल्यास दोन सोन्याची कडी व दहा रुप्याची कडी बक्षिस देविली जातलि.' या कडकपणाचा परिणाम असा झाला कीं, नाना फडणिसांच्या वेळीं गुन्हे घडण्याचे मराठी राज्यांत बहुतेक थांबले. या बाबतींत पुण्याचा रेसिडेंट एलफिन्स्टन याचा अभिप्राय महत्त्वाचा आहे. तो म्हणतो, 'महाराष्ट्रांत गुन्हे बहुधा घडत नाहीत' [Maratha country is peculiarly free from crimes]. याचे कारण असे कीं, राज्यकर्ते स्वभावतः क्रूर नव्हते. ते शिक्षा विचारपूर्वक देत. राजद्रोहासारख्या गुन्ह्याबद्दलहि केव्हां माफी मिळे. सुमेरसिंगाच्या कांहीं साथीदारांची सुटका थोड्याशा दंडावर झाली. अशा रीतीनें प्रजेस नेहमी दयाळूपणानें वागविण्यात येत असल्यामुळें एखादे वेळीं धाक जबर बसण्याकरितां शिक्षा दिल्यास ती फार परिणामकारक होई.'

टांकसाळी.

'सर्व मुसलमानी बादशहात अकबराच्या राजवटीतच चलनी नाण्याला व्यवस्थित स्वरूप आलेले दिसते. अकबराच्या टांकसाळी त्याच्या राज्यांत अटक, अजमीर, अहमदाबाद, आग्रा, अलवार, अलाहाबाद, अयोध्या,

उज्जनी, बदाऊन, बनारस, बक्कर, पट्टण, पाटणा, टंडा, जालंदर, जानपूर, सिरोंज, सुरत, साहरणपूर, सियालकोट, कनोज, काबुल, काल्पी, ग्वाल्हेर, गोरखपूर, लाहोर, लखनौं, मथुरा, मुलतान, मंडू, नागोर, व हरिद्वार, इत्यादि स्थळी होत्या. टांकसाळीवर दरोगा, सराफ, अमीन, मुश्रीफ, खजीनदार तोलाट वगैरे अधिकारी असत. सदर टांकसाळीत शहानशहा, लहान शहानशहा, रहस, आश्म, अशा प्रकारची लहान मोठी २८ जातींची सोन्याची नाणी पाडण्यांत येत. चांदीच्या नाण्यात मुख्य रुपया. एक रुपया वाटोळा व दुसरा चौकोनी होता. त्याखाली पावली, चवली, आणेली व त्याहूनहि लहान व हलकी नाणी असत. वाटोळ्या रुपयाचे वजन ११॥ मासे. तांब्याच्या नाण्यात दामाचा आकार वाटोळा असून त्याचे वजन ५ टाक. याच दामाला पैसा म्हणत. त्याची किंमत $\frac{1}{४}$ रुपाया. अर्थात् हल्लींच्या पैशाच्या दीडपटाहून अधिक. पैशाहून लहान अधेला त्याची किंमत पैशाच्या निम्याने. त्याच्या खालची नाणी पावला व दमडी. पावल्याची किंमत पैशाच्या $\frac{1}{४}$ व दमडीची $\frac{1}{८}$; त्याखेरीज कवड्या व कडवे बदाम हेहि प्रचारांत असत. टांकसाळींत सरकार स्वतःची नाणी पाडीच पण व्यापाऱ्यानीं अशुद्ध धातू किंवा जुनी नाणी आणून दिल्यास त्यांना नवी नाणी पाडून मिळत. पण त्याबद्दल स्वामित्वाचे ५॥ टक्के कसर घेतली जाई. [भा. इ. सं. मं. वर्ष ३ रे, वा. सी. बेंद्रे यांचा लेख].

रा. बेंद्रे यानी आपल्या लेखात अकबरानें पाडलेली सोन्याची नाणी नमूद केली आहेत त्यांत मोहर, होन व पुतळी ही नांवे नाहीत. पण त्याच्या काळांत मोहर वापरण्यांत होती असें दिसते. यावरून अकबराच्या काही नाण्याना लोक मोहर, होन इत्यादि संज्ञा देऊ लागले असें म्हणावे अगर ही नाणी अकबराच्या पूर्वीपासून स्वतंत्र नावानींच प्रचारांत होती असेंहि समजावे. ते कांहीं असले तरी अकबराच्या काळात ज्या प्रकारची सोने, चांदी व तांबे यांची नाणी होती तसलीच बरीचशी नाणी पेशवाईतहि असल्याचे आढळून येते. पेशवाईंत दिल्लीच्या बादशहांची सत्ता निर्बळ झाल्यामुळें सर्व देशांतील शेकडों राजेरजवाड्यानीं स्वतःच्या मुखत्यारीनें नाणी पाडण्यास सुरूवात केली होती. त्या काळीं कोणत्या व कोठल्या नाण्यांचा प्रचार होता हें लक्षांत येण्याकरितां नाण्यांच्या टांकसाळींची नांवेच देतो.

मोहर हे सर्वांत श्रेष्ठ प्रतीचे नाणे. ते अहमदाबादी, पुणेरी, औरंगाबादी,

जयनगरी, चिंचवडी, अलमशाही, शेटशाही, तळेगावी, बऱ्हानपुरी व महमदशाही (दिल्लीचे) या नावानी प्रसिद्ध होते. म्हणजे इतक्या ठिकाणच्या टांकसाळी मोहरा पाडीत. मोहरेपेक्षां होन हे नाणे अधिक गावी पाडले जात असे. होन एलोरी, हैदरी, सनगिरी, धारवाडी, सबदन अल्ली, दुर्गी, सावनुरी, नागरपट्टणी, अच्युतरायी, हरपनहळ्ळी, व्यंकटपति, महमदशाही. या नावावरून एक सत्य मनावर बिंबते तें असें कीं, मोहरा मुख्यतः उत्तर हिंदुस्थानांत व होन कर्नाटकात तयार होत. कदाचित् मोहर हे नाणे उत्तर हिंदुस्थानी व होन हे द्रविडी असेल. दुर्गी होन कर्नाटकांत चित्रदुर्ग संस्थानांतील. त्यांची किंमत ३॥ रु. पासून ३।॥ रुपयांपर्यंत. होन साडेतीन माशांचा असावा असा शिरस्ता. मोहरेचें वजन पाऊण तोळा, पावणे दोन मासे व एक गुंज. याशिवाय पुतळीचाहि वापर होता.

रुपाया—फुलचेरी म्हणजे पांडिचेरीचा, मालखेड, बागलकोटी, निळकंठशाही, तुटकुरी, दिल्ली, आग्रा, सुरत, बनारस, अर्काट, चिंचवड, तळेगांव, गंजीकोट, येथील. तसेंच पोत चाल हाल्ली शिक्का, चांदवडी, मलकापुरी, दौलताबाद शिक्का, हुकेरी, बडोदी व रहिमतपुरी. रुपयाचे वजन ११। मासे. रुपायाप्रमाणें अधेल्याहि असून त्या चांदवडास होत. पैशात ढबू, अलमगिरी व शिवराई या जाती होत्या.

पेशव्यांच्या टांकसाळी पुणे, चिंचवड, तळेगांव दाभाडे, वसई, नागोठणें, चांदवड, नाशीक, दौलताबाद, रहिमतपूर, घारवाड या गांवी होत्या. या टांकसाळीत मोहरा, रुपये, त्या खालची चांदीची नाणी व पैसे पाडीत असत. पेशव्यांनीं आपल्या शिक्क्याचें नाणे पाडले नव्हते. पातशाही शिक्काच कायम ठेवला होता. तांब्याच्या पैशावर शिवराई शिक्का होता. कर्नाटक प्रांत मराठ्यानी जिंकून आपल्या राज्यास जोडल्यावर त्याना तिकडे गावोगावी खरी खोटी नाणी पाडीत असल्याचे आढळून आले. त्या दृष्टीने पुढील मजकूर महत्त्वाचा आहे—

"सुभे धारवाड येथें पुरातन होन वगैरे नाणें खरें होत होतें. पुढें जमीदारांनीं घरोघर टांकसाळा घालून खोटें नाणें पाडण्यास सुरुवात केली. येणेकरून बटातोटा फार पडूं लागला. म्हणून नानासाहेबांनीं कांहीं बंदोबस्त केला. तो पुढें मोडून जमीनदार खोटें नाणें करूं लागले. याजकरितां साल मजकुरापासून

(१७६५–६६) अहद कृष्णा तहद तुंगभद्रापर्यंत खोट्या टांकसाळा आहेत त्या मोडून एक जागा धारवाडी टांकसाळ घालावी. याप्रमाणें करार करून पांडुरंग मुरार यांस टांकसाळीचे काम सांगितलें. तें नाणें पुढीलप्रमाणें–होन एकेरी दहा कसी साडे तीन मासी वजन पुरें. नक्त रुपये फुलचरी आरकाटी माल खरा तोल पुरा. मोहर बाराकसी वजन दिल्ली शिक्क्याप्रमाणें. होन, मोहरा व रुपये यांचे शिक्के नवे करावे. टांकसाळेचा शिरस्ता एक हजार रुपयांस ६ रुपये, एक हजार होनास सहा होन, एक हजार मोहरास सहा मोहरा सरकारांत द्याव्या. ढालाईत ५ असामी टांकसाळेच्या कामावर सरकारांतून नेमून दिले आहेत. त्यांचा रोजमुरा व्यंकटराव नारायण यांजकडून देविला असे. टांकसाळ फक्त धारवाडास ठेवावी. वसूल खऱ्या नाण्यांतूनच घ्यावा. म्हणजे खोटें नाणें कोणी घेणार नाहीं. खोट्या नाण्यामुळें सरकारांत बट्टातोटा येत आहे. तालुक्याचे अंमलदार जमीदार व पेठापेठांचे सावकार लोक यांस ताकीद करून खऱ्या नाण्याची चाल करणें (खरें नाणें घ्यावयास लावणें). कारीगारास पत्रें कीं, तुम्ही धारवाड टंकसाळेंत सरकार चाकरी इमानेंइतबारे करणे. समस्त घटकार, आणकार व कारीगार पेठ धारवाड यांस पत्र ' [पे. डा.]

कांहीं टांकसाळी पेशव्यांनीं स्वतःच्या मालकीच्या ठेवल्या होत्या व कांहीं सावकारांना मक्त्यानें दिल्या होत्या. नाशिक येथें सरकारी टांकसाळ होती. ' नाशिक येथें टांकसाळ घालण्याची नेमणूक करून टांकसाळेचा कारभार लक्ष्मण आप्पाजी यांस सांगितला आहे. त्यासाठीं एक कारकून व दोन प्यादे. शिक्के करावयास लोहार, सोनार, घणकरी, भातेकरी. टांकसाळ सरकारांतून घातली. ' ' चिंचवडास टांकसाळ होती. तीत रुपये व मोहर खरी उतरत नव्हती म्हणून चौकशी करून ताकीद. ' ' तळेगांव दाभाड्याचे येथें (सन १७६६) टांकसाळ आहे तींत मोहरा व रुपये खरे उतरत नाहींत तरी जुने फुलचरीप्रमाणें वजन पुरे व रुपे त्या कसाप्रमाणें असावे. शिक्का सुर्तीची नक्कल पेशजीप्रमाणें पाडावा. ' (पे. डा.)

' चांदवड येथें खरा माल होत नसल्यामुळें बंद केलेली टांकसाळ तुकोजी होळकर यांच्या विनंतीवरून सुरू केली (सन १७७२–७३) मात्र तिचा खर्च सरकारांतून द्यावयाचा नाहीं असे ठरले. ' टांकसाळीस लोखंड, कोळसे, खार, चिंच लागत असे. ' बाळाजी बापूजी यांस कसबे नागोठणे येथें टांकसाळ

घालण्यास परवानगी दिली. त्यांनीं पैसा पाडावा. पैशाचे वजन १० मासे असावे. याहून कमी वजनाचा पैसा पाडला तर दंड होईल. हा परवाना तीन वर्षांचा आहे. व त्याकरितां बाळाजी बापूजी यांनीं पहिल्या वर्षी ५० रु. दुसऱ्या वर्षी ७५ रु. तिसऱ्या वर्षी १०० रु. द्यावे.' (रानडे यांचे किरकोळ लेख)

'राजश्री माधवराव विश्वनाथ स्वामी गोसावी यासी विनंति उपरी--यंदा सरकारांत ऐवजाची वोढ बहुत. रोजमुऱ्यास ऐवज फार लागेल. त्यास पुण्यांत टंकसाळ घालावी. पातशाही शिक्का कसवा. रुप्याचे रुपये व अधेल्या कराव्या. हा प्रकार तुम्हांस सांगितलाच आहे. त्यास सरकारचे दागिने रुप्यासोन्याचे किती, याचा जाबता आकारून पाठवून देणें. रुप्याच्या दागिन्यांत देवाची उपकरणे, ताटे. वाटया व गुलाबदाण्या, तबके वगैरे चांगले दागिने खेरीज करून बाकी गोबरे दागिने, घागरी, हंडे, पराता वगैरे भांडी, साखळदंड वगैरे दागिने मोडून त्यांचे रुपये व अधेल्या कराव्या. सोन्याच्या दागिन्यात देवाची उपकरणी वगैरे चांगले दागिने व ताटे वाटया खेरीज करून बाकी दागिने काढून त्यांच्या मोहरा कराव्या. याप्रमाणें जरूर करावें लागते. यास्तव तुम्हास लिहिले असे. तरी एकंदर सोन्यारुप्याचे दागिने किती होतात याची याद व एकंदर दागिन्यापैकीं मोडावयाचे लिहिले आहेत त्यांचे वजन किती होते याची याद लिहून पाठवून देणे. आणि लिहिल्याप्रमाणे टंकसाळ घालून पातशाही शिक्का करून, रुपये व अधेल्या व मोहरा याप्रमाणें जिन्नस तयार करणें जाणिजे.' [इ. सं.]

ही टांकसाळ सन १७६१ नंतर माधवराव पेशव्याने घातली व तिचे काम पुण्यातील प्रसिद्ध नगरशेट दुल्लभ शेट यांजकडे सोपविले असें रा. ब. पारसनीस यांच्या सदर पत्रास जोडलेल्या टीपेवरून वाटते. माधवरावाच्या कारकिर्दीच्या प्रारंभी आलेल्या अनेक संकटात नाण्याची ओढ पडल्यामुळें सोन्यारुप्याचे दागदागिने व भांडीकुंडी मोडून नाणे करण्याचा प्रसंग त्याजवर गुदरला. सदर टांकसाळ सरकारी होती व तिच्यात मोहरा, रुपये व अधेल्या ही नाणी पातशाही शिक्याची पाडण्यात आली इतके स्पष्ट झाले. माधवरावाचेच एक पत्र रा. सा. सरदेसाई यानी पेशवे दप्तराच्या ३९ व्या भागांत छापले आहे, त्याचा पहिला बंद गहाळ झाला असल्याने ते कोठल्या टांकसाळीस उद्देशून आहे हे संदर्भावरून पाहिल्यास वसईस उद्देशून लिहिलेले दिसते. त्यांत तेथील लक्ष्मण शेटास

खुर्दा म्हणजे तांब्याचे नाणे पाडण्यास आज्ञा झाली आहे. कारण वसईस पेशव्यांची टांकसाळ होतीच. नाशीक, चिंचवड, तळेगांव इत्यादि ठिकाणच्या टांकसाळींचा उल्लेख वर आला असून तेथील नाणी खरी नसल्याची तक्रार आहे. तिचा अर्थ इतकाच कीं, ती नाणी पुऱ्या तोलाची व निर्भेळ नसत. सर्व नाण्यात फुलचेरी [पांदीचेरी] येथील फ्रेंचांचें व अर्काट येथील इंग्रजांचे नाणे विश्वसनीय ठरले होते. रुपये पाडावयाचे ते फुलचेरीप्रमाणें असे वरील उताऱ्यांत तळेगांव व धारवाड येथील टांकसाळीबाबत आलेच आहे.

जंगलखातें

पेशव्यांचे जंगलखाते इंग्रजांच्या फॉरेस्ट खात्याइतकें पद्धतशीर नव्हते. त्यांच्या कुरणांचे उत्पन्न पंचवीस हजारापर्यंत होते. कुरणांची म्हणजे चराऊ रानांची गणना हल्लीं जंगलखात्यांत करण्यांत येते. त्यांत आणखी कांहीं हजारांची भर घातल्यास जंगलाच्या उत्पन्नाची कल्पना होईल. पेशव्यांच्या अठरा कारखान्यांत कुरण हाहि एक कारखाना असून तो खासगीवाल्यांच्या ताब्यांत होता. तसाच लकडखानाहि त्यांच्याच देखरेखीखाली होता. पेशव्यांच्या लकडखान्यास लागणारे सर्पण जंगलांतूनच आणविण्यांत येत असले पाहिजे.

बाळाजी कृष्ण यास कुरणांचा मामलेदार नेमलें होतें (पे. द. भाग ३ रा पान २५०) त्याला पुढीलप्रमाणें हुकूम होता. ‘ त्यानें सरकारांत पुणें येथें गवताच्या पेंढ्या १५ लक्ष द्याव्या व तितकेंच गवत शहरापासून पांच सहा कोसाच्या घेऱ्यांतील कुरणांत सरकारी उपयोगाकरितां तयार ठेवावें. त्याकरितां पुण्यापासून १५।२० कोसांच्या पट्टयांतील सर्व कुरणें त्यानें ताब्यांत घ्यावीं मग तीं सरकारी असोत किंवा खाजगी असोत. ती घेऊन त्यांत सरकारी कुरणें स्थापन करावीं. १६०० खंडी सरपण व १५० खंडी कोळसा सरकारांत द्यावा. खाजगी कुरणांतील साग, सरपण, गवत, कळक, पानें व इतर जिनसा त्या कुरणाच्या मालकास त्याच्या सालबेगमीपुरत्या द्याव्या. बाकीचा भाग सरकारी उपयोगाकरितां ठेवून उरलेला विकावा व ती रक्कम सरकारांत जमा करावी. सर्व व्यापाऱ्याकडून बैलास चार आणे याप्रमाणें नेलेल्या सरपणाबद्दल कर घ्यावा. सर्व गुरांच्यापासून वनचराई घ्यावी व ती सरकारजमा करावी. ’ सारांश कुरणमामलेदाराला जंगलाचाहि अधिकार देण्यांत आला होता.

सरकारी सर्पणाप्रमाणेंच जंगलाचा विनियोग आरमार तोफखाना व किल्ले याजकडे करण्यांत येई. ‘ मुसा जारज [जॉर्ज] फिरंगी याजकडे सरकारच्या तोफा व बंदुका आहेत. त्यांची डागडुजी करावयास कोळसे तीन खंडी वजनाचे पडत अशी लाकडे जळाऊ तर्फ पौड खोरे येथील रानापैकी देविली असेत. तरी मशारनिल्हे माणसे पाठवून तोडतील त्यास तोडू देणे म्हणून आनंदराव भिकाजी यांचे नावे रसानगी. ’ ‘ आरमारचे उपयोगी गैरदस्ती झाडे पाडून तोडणे व दस्ती झाड सरकार कामामुळे जरूराती लागल्यास आरमाराकडे तोडून नेणे आणि मासलेदारास लिहून देणे असे आनंदराव धुळपास पत्र.’ म्हणजे झाडांतहि दस्ती व गैरदस्ती असा भेद असून दस्ती झाडे केवळ सरकारी व गैरदस्ती झाडे सार्वजनिक उपयोगाची ठरली होती. तसेच जंगलाचा कारभारहि मुलकी कारभाराप्रमाणे मामलेदार व कमाविसदार यांजकडेच सोपविला होता. ‘ किल्ले कोथळागडचे पायथळा लगत मौजे मालेगांव तर्फ अंदरमावळ येथील रान आहे. ते राखोन ठेवल्यास ते किल्ल्याच्या उपयोगी पडेल. याजकरितां हैबतराव माणकेश्वर यांस आज्ञा केली आहे. ते रानाची हद्द नेमून देतलि त्याप्रमाणें रान राखणे, शेते पोते कोणास करू न देणे. त्या रानापैकी किल्ल्याचे कारसाईस चुडी, ओंडे घेत जाणे म्हणून संभाजी भावे हवालदार व कारकून यांस पत्र. यांत राखीव जंगलाच्या प्रचलित पद्धतीची बीजे स्पष्ट दिसतात. ‘ तर्फ नागोठणे, तर्फ अष्टमी व तर्फ सियाल तालुके अवचितगड यांत सागवानी झाडे तोडावयास अलीकडे मनाई केली आहे. त्यास वरकसी धारा गावगन्ना आहे त्या धान्याचे ऐवजी रान तोडून वरकस करावा तरी सागवानी झाडे तुटतात. या अडचणीमुळें वरकस होत नाही. ऐशास सागवानी रान भारी असेल तितके मात्र राखावे, वरकड असेल ते रयतीने तोडावे ! ’ [पे.डा.] या पत्रांत मौल्यवान झाडे राखून ठेवणे व शेतकऱ्याना अधिक जमीन लागवडसि आणण्यास मोकळी करणे या दोन्ही सोयींचा मेळ घातला आहे. जंगलातून जे सर्पण लोक नेत त्यांजपासून एका बैलाच्या ओझ्याला ४ आणे असा दस्त होता याचाहि खुलासा वर आलाच आहे.

टपालखाते

टपालखाते सार्वजनिक नव्हते. मात्र सरकारी पत्रें न्यावयास जासूद ठेवीत.

त्याचप्रमाणे सरदार व सावकार यांचेहि जासूद असत. हे जासूद सरकारी किंवा त्यांच्या मालकांची पत्रे घेऊन जात तेव्हां खाजगी लोकानाहि आपली पत्रे त्यांजबरोबर पाठविता येत. जवळपासच्या गावांना पत्रे पोचविण्याकरितां गडी पाठवावा लागे. सरकारी पत्रे जासूद काशीद किंवा हरकारी घेऊन जात असतां त्यास वाटेनें मदत करण्यास गांवगन्नाच्या पाटील–कुळकर्ण्यांना आज्ञा असे. पुण्याहून पत्रे घेऊन दिल्ली, कलकत्ता, श्रीरंगपट्टण, अर्काट इत्यादि शेकडो कोसावरलि राजधान्याना जासूद जात. प्रवास फार लांबचा. वाटेने, डोंगर, नद्या व जंगले. त्यांत संकटे आल्यास किंवा आजार झाल्यास एकाची दुसऱ्यास मदत व्हावी, तसेच एक शत्रूच्या हाती लागला तर निदान दुसरा तरी सुरक्षितपणे इष्ट स्थळीं पोचावा या उद्देशाने एका जासुदाच्या जोडीला दुसरा जासूद देत. गांवातील अंतराप्रमाणें कोणत्या गांवाला किती मुदतीत जासूदानें पोचले पाहिजे त्याचे प्रमाण ठरलेले असे. जासूद मुदतशीर न पोचले तर त्यांना द्यावयाची मजुरी कापली जाई. पण ते लवकर पोचावयास पाहिजेत असे असून त्याप्रमाणें ते पोचल्यास त्याना इनामहि मिळे. बापूजी महादेव यास सन १७५३–५४ मध्यें पुण्याहून दिल्लीस पत्र लिहिले आहे. त्यांत 'काशीद सोळाव्या दिवशीं दिल्लीस पोचल्यास त्याला ५०रु., सतरावे दिवशीं ४० रु., आठरावे दिवशीं ३०. व एकोणिसाव्या दिवशीं पोचल्यास कांहींहि न द्यावे' असें स्पष्ट बजावले होते. दिल्ली पुण्याहून सातशे मैल धरली व जासूद सोळाव्या दिवशीं पोचले असे मानले तर दररोजची त्यांची चाल ४५ मैलांची पडते. मेजर ब्रौटन याने आपल्या पुस्तकांत जासूदाविषयीं प्रशंसोदार काढले आहेत. तो म्हणतो ' हे हरकारे फार चलाख व हुशार लोक आहेत. त्यांचे काम माहिती मिळविणें, वाटाडे होणे व पत्रे नेणे हे आहे. त्याना रोजमुरा ३ रु. रोज मिळत असे. ' पुण्याहून ठिकठिकाणच्या सरदाराकडे, राजेरजवाड्याकडे, अधिकाऱ्याकडे जासूद रवाना होत, तसे उलट त्यांजकडून पुण्यासहि येत. या कारणानें सदर कामात देशांतील हजारो लोक गुंतलेले असत.

' नाना फडणविसाने टपालखात्यास अधिक व्यवस्थितपणा आणिला. त्याचा बातमीचा पल्ला फार दूरवर असून त्यास बातमी फार जलद कळत असे. इंग्रज व फ्रेंच यांशी मराठी राज्याचा संबंध जसजसा अधिक येऊ लागला तसतशी नानास कलकत्ता, मद्रास, मुंबई, पांडिचिरी, माही इत्यादि ठिकाणाहून बारीक

बातमीदेखील कळू लागली. हिंदुस्थानाबाहेर फ्रेंच व इंग्रज यांच्या हालचाली चालत; त्याजकडे नानाचे लक्ष असे. फ्रेंचांचा सरदार बुशी हा फ्रान्स देशाहून फौज घेऊन मॉरिशस बेटात आला. युरोपांत फ्रेंच, डच, पोर्तुगीज हे इंग्रजावर उठले आहेत. असलीहि वर्तमाने त्याला कळत. हिंदुस्थानाच्या प्रत्येक भागांत त्याचे हेर तेलंग ब्राह्मण, गोसावी व दुसरे पुष्कळ असत.' (नाना फडणविसांचे चरित्र).

'मद्रास येथील इंग्रजांची बातमी काढण्याकरितां नानानी हैदराबादेचे वकील गोविंदराव काळे याजमार्फत व्यंकटराम पिल्ले या नांवाचा एक मद्रासी इसम ठेवला होता. तो इंग्रजी जाणत असल्यामुळें त्याजकडून इंग्रजांचे घरांतील विलायतेची बातमी मिळेल अशी नानास आशा होती. त्यास पगार दरमहा शंभर रुपये द्यावा अशी गोविंदरावाने नानास शिफारस केली. (इ. सं.).

अठरा कारखाने

पेशव्यांचा गृहप्रपंच पुणे शहर व खुद्द पेशव्यावरील लष्करी व इतर जबाबदाऱ्या नीट रीतीने पार पडण्याकरिता जी कामांची विभागणी केली होती तिला अठरा कारखाने अशी संज्ञा होती. ते कारखाने व त्यांजवरील विवक्षित कालचे अधिकारी व इतर व्यवस्था खाली दिली आहे.

(१) तोफखाना—त्यावरचे अधिकारी [१] माधवराव पानसे [२] महिपतराव पानसे. दारुगोळा, खलाशी वगैरे कामगार, रखवालीचे गाडदी गाड्यांचे बैलसुद्धां.

(२) पीलखाना—यांत हत्ती शंभर होते, सरदार-[१] भगवंत परसजी [२] अल्ली महात. कारकून--रामचंद्रपंत गाडगीळ.

(३) उष्टरखाना—गणपतराव मोरेश्वर. त्यांत उंट अजमासे एक हजार.

(४) शिलेखाना—[शस्त्रागार] सदाशिवपंत वाकणकर.

(५) फरासखाना—राघोपंत आंबीकर याजकडे, खर्ड्यांच्या स्वारींतील डेरे, राहुटया, दलबादल राहुटयासुद्धां

(६) कोठी. (७) लकडखाना. (८) इमारत. (९) बागा. (१०) कुरणे. (११) रथखाना. (१२) पुणे पेठा—हे सर्व कारखाने

नारो शिवराम खाजगीवाले यांजकडे होते. खाजगीवाले यांच्या हाताखालीं गणेशपंत मटंगे.

(१३) थट्टी—(दुभती जनावरें) नारायण रामचंद्र पुणें सुभा याजकडे

(१४) पोते व जामदारखाना—शामराव कृष्ण पोतनीस.

(१५) जिन्नसखाना.

(१६) वैद्यशाळा—शामराव बाबूराव करमरकर यांजकडे.

(१७) पुस्तकशाळा—गोविंदपंत आपटे.

(१८) खाजगी—नारो शिवराम खाजगीवाले.

परदरबाराशी संबंध

परदरबारात मराठ्यांचे वकील होते. त्यापैकीं कांहींची माहिती पुढीलप्रमाणें- ‘हैदराच्या दरबारी पेशव्यांचे वकील असत. त्यांपैकीं नरसिंगराव वेरूळकर यांचे नांव फार प्रसिद्ध आहे. हे फारशी भाषेंत मोठे निपुण होते. हे टिपूच्या कारकिर्दीमध्यें श्रीरंगपट्टण येथे होते. त्यांचे चिरंजीव आनंदराव नरसी. हे महादजी शिंदे यांच्या पदरी असून त्यांच्या वतीने दिल्लीच्या शहाअलम बादशहाजवळ कांहीं दिवस वकिलीवर होते. यानीच बादशहाची सोंगें आणून बादशहाचा अपमान केला होता. ’ [इ. सं]

गोविंदराव काळे पेशव्यांचे निजामी दरबारचे वकील. हे एकदा निजामअल्लीस भेटावयास गेले असतां तो उघडा होता. तेव्हां ते परत येण्यास निघाले. परंतु निजाम अल्लीने त्यास ठेवून घेऊन आपल्या पोटावरचा फोड दाखविला व तुमच्याशी मी परकीयपणाने वागत नाहीं असें सांगितले. निजामअल्लीचे दंड पैलवानासारखे पिळदार असल्यांचे गोविंदरावास आढळले.

कलकत्तेकर इंग्रज यांजजवळ मराठ्यांचा वकील लाला सेवकराम हा होता. गोविंदराव पुरुषोत्तम व दामोदर देवराव हिंगणे हे दिल्लीच्या बादशहाजवळ पेशव्यांचे वकील होते. तसेच भोसल्याकडे बाबूराव वैद्य व शिंद्याकडे नारो शिवदेव हे होते. परदरबारी जसे पेशव्यांचे वकील होते तसे पेशव्यांच्या दरबारी परकीयांचे व स्वकीय सरदारांचेहि वकील होते. त्यांच्याशी बोलणे करण्याकरिता व त्यांच्या तक्रारी ऐकून घेण्याकरिता नानानी पुण्यास निरनिराळे मुत्सद्दी नेमले होते. त्यांस परदरबारमंत्री म्हटल्यास चालेल. इंग्रजांच्या वकिलास पुणे दरबाराशी कांहीं

बोलावयाचे झाल्यास त्याने माधवराव जाधवराव व बहिरोपंत पिंगळे यांज-मार्फत बोलावे. हैदराच्या वकिलानी रास्त्यामार्फत बोलावे. मि. मॅलेट हा इंग्र-जांचा वकील पुणे दरबारी होता. त्याच्या पूर्वी सन १७७६ त इंग्रजांचा वकील कर्नल ऑप्टन पुरंदरावर तह करण्याकरिता आला होता. त्याच्या बाजूचे लोक आणि नाना व बापू यांची तहाची बोलणी चालत. त्यासंबंधी पुरुषोत्तम कृष्ण पटवर्धन परशुराम भाऊस लिहितो ' आजपावेतो बोलतात त्यात सल्ला करावा अशी निर्मळपणाची बोलणी आहेत. गवस गवसू देत नाही. हेहि त्यास गवस गवसू देत नाहींत. ते (इंग्रज) आले आहेत. त्यांत दोन असामी आहेत ते फार शहाणे थोर माणूस आहेत. विलायतवाल्या इंग्रजाचा इतबार त्याजवर आहे......त्यांच्या व श्रीमंतांच्या भेटी व्हावयाच्या यास्तव (सवाईमाधवरावा-पुढें) टोप्या कुडतानें घालून माणसें बसविलीं होती. पुढें भेटीचे समयीं भितील यास्तव अगोदरच धीट करितात. पागोटे शिरपेच श्रीमंत राजश्री रावसाहेबांस घालीत असतात. आप्तन बरोबर ६ पालख्या, १२ हत्ती, गोरा शंभर रांगडे वगैरे असें सामान आहे, [ऐ. ले. सं.]

पेशवे व निजाम यांचे युद्धप्रसंग वारंवार घडत. तरी त्यांचे खासगी संबंध कधीं कधीं लोभाचे असत. सदाशिवरावभाऊची मुंज झाली हे वर्तमान निजा-मास १७३६ त कळलें. तेव्हां नबाबाचे दरबारांतील पेशव्यांच्या सुहृदाकडून चिमाजीस पत्र आले ते असे ' नबाब पुसत होते कीं, राजश्री चिमणाजी पंडित यांचे घरी शादी झाली ते कोणाची ? आम्ही सांगितलें कीं, पुत्राची मुंज झाली. बेटा कैसा आहे ? आम्ही अर्ज केला बहुत माकुल आहे. त्यावरी खुदा म्हणून लिवचन बोलिले. यैसियास आपले घरीं व्रतबंध जाहला याचे वर्तमान सर्वांस कळले. नबाबासहि कळलें. याकरितां वस्त्रे उत्तम नबाबास नजर पाठविली तरी उत्तम आहे. पाठवावी '–राधाबाई काशीयात्रेस जातांना जयपूर, उदेपूर येथील राजांचा सत्कार घेत गेली. उदेपुरास राणाजीनी तिला मोत्यांची एक माळ, एक पदक, सोन्याचे चुडे व ५००० रु. खर्चास दिले. राघोबानें १७७३ त मोगलां-वर मोहीम केली. त्यावेळीं तहासाठीं निजामअल्ली भेटावयास आला, तेव्हां त्याचा सत्कार राघोबाने केला. मोत्यांची कंठी किंमत ४५०० रु., सिरपेच ३००० रु., मोत्यांची माळ १५०० रु. येणेंप्रमाणें जवाहीर दिले. हत्ती दोन चांगले, घोडे दोन मिळून किं रु. ८०० (ऐ. ले. सं. खंड ५).

मानमरातब

सरकाराची मोठी कामगिरी बजाविली किंवा भूषणावह असें दुसरे कृत्य केले तर त्याबद्दल हल्लींप्रमाणें त्या काळींहि किताब मिळे. पण किताब हे पोकळ होत. त्यापेक्षां पालखी, अफतागिर, मशाल, वस्त्रे व महावस्त्रे देण्याने व्यक्तीना खरा लाभ वाटावा हे स्वाभाविक होय. अर्थात् सदर मान योग्यतेच्या माणसांना मिळत व ते मिळाले म्हणजे त्यामुळें उत्पन्न व्हावयाच्या खर्चाची तजवीजहि सरकारासच करावी लागे. खुद्द पेशवे हे राजे नव्हेत, तेव्हां राजाची किंवा तितक्या महत्त्वाची दुसरी पदवी देण्याचा पेशव्यांना अधिकार नव्हता. ते सरदारक्या नव्या उत्पन्न करीत. किंवा पिढीजाद सरदारांच्या वंशजांना सरदारकीची वस्त्रे देत. पेशवे घरण्यांतील पुरुषांना सातान्याच्या छत्रपतीनी पेशवाईची वस्त्रे द्यावयाची तेव्हां दरबार भरविण्यांत येत. त्या दरबारात पेशव्याने महाराजापासून वस्त्रे घेऊन जावे व ती घातल्यावर परत येऊन महाराजास मुजरा करावा. विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांस सन १७५१ मध्यें घड्याळ बाळगण्याविषयीं आज्ञा झाली. पण या ठिकाणीं घड्याळ बाळगणे हा मान होता हें लक्षांत ठेवण्यासारखे आहे. म्हणून सदर घड्याळ बाळगण्यामुळें येणाऱ्या खर्चाचीहि सरकारने नेमणूक ठरवून दिली. अखेराज नाईक वणजारे वस्ती विजयगड हा बैलतांडे भरून मुलखात उदीम व्यापार करीत असे. या त्याच्या लोकोपयोगी कामगिरीबद्दल त्यास नगारा व निशाण बाळगण्याची सन १७५३–५४ मध्यें आज्ञा झाली. मानाजी शिंदे यास सरदारी सांगून त्याचा बहुमान केला त्या वेळीं त्यास शिरपेच घाट साधा, १ पांच २२ हिरे व हिरकण्या आणि ६ माणके देण्यांत आली. बदनसिंग जमातदार किल्ले सातारा यास आफ्तागिरीची तैनात दरमहा रु. ५ प्रमाणें सुरू झाली. बाबूराव राम फडणीस व बाळाजी जनार्दन फडणीस यांस पालखीचे सरंजामास प्रांत खानदेश पैकीं गांव दिले. साबाजी भोसले व मुधोजी भोसले नागपूरकर यांजमध्यें तंटा असतां सेनासाहेब सुभ्याची वस्त्रे साबाजीस नारायणराव पेशव्याने दिली. (ऐ. ले. सं. खंड ४) आखेराज रावळ भावनगरकर संस्थान घोगे यांनीं सरकारचे काम केले, सबब आफ्तागिरे व दिवटे नवे करार करून दिले.

'तालुके रेवदंडा येथें होतयाचा वेढा बसला होता ते समयीं चाकरी मेहनतीने केली, सबब सरदारास नवी आफ्तागिरे दिली. त्याबद्दल प्रत्येक आफ्तागिऱ्यास

तैनात महिना ५ रु., दिवट्ये दिले त्यास प्रत्येक दिवट्याबद्दल तैनात दरमहा ३ रु., जावजी शिंदे यास चवरी दिली त्यास तैनात दरमहा ४ रु.' (पे. डा.) सन १७६७ मध्यें माधवराव व रघुनाथराव नाशकाजवळ रघुनाथरावाचे आवडीचे स्थळ आनंदवल्ली येथें गेले असतां दसऱ्याचा सण पडला. ' उभयता श्रीमंत सीमोल्लंघनास आनंदवल्लीचे उत्तरतीरी गंगापार गेले होते. चांगल्या समारंभाने जाऊन आले. त्यांनीं त्या सणानिमित्त धोंडो केशव आठवले, रंगो कोनेर, पाद्री वैद्य व लिंगाप्पा कदम यांस पालख्या दिल्या. पागेकडील बारगीर लक्ष्मणपंत आपटे व बाबूराव कृष्ण निसबत कुरणे यास दिवट्ये व अफ्तागिरे दिले. '

'अफ्तागिऱ्या यांचा उपयोग छत्रीप्रमाणें उष्णनिवारणासाठीं. सरकारांतून ज्यांना त्या मिळाल्या त्यांनींच घ्यावयाच्या. त्यास सरकाराकडून अफ्तागिऱ्या धरणारांचा पगार व दर तीन वर्षांनीं अफ्तागिरीचे नवे सामान मिळे. बाकीचे सर्व आबालवृद्ध उन्हातूनच फिरत. पेशव्यांच्या मांडीस मांडी लावून बसण्याचा मान फक्त राजपथकी लोकांचा म्हणजे महाराज छत्रपतीकडून ज्यांना सरदाऱ्या व मानमरातब मिळाले त्यांचा. निशाण, अर्धे आसन, मांडीस मांडी लावून बसण्याचा मान, चौघडा पालखी, हत्ती, दिवटी हे मान राष्ट्रांतील लोकांत तेज जागृत रहावे यासाठीं राजकर्ते देत. सन्मानार्थ जमिनीहि इनाम देत. गोपिकाबाईस अशीच देणगी निजामाने स्वतःची बहीण समजून दिली. पेशव्याकडून सरदारास दसऱ्याचा व इतर सणांचा पोशाख जात असे व सरदाराकडून पेशव्यास नजराणा येत असे. श्रीमंत सवाई माधवराव हे अमरसिंह जाधव, खंडेराव दरेकर, बाळाजी नाईक, त्रिंबकराव महिपतराव चिटणीस यांजकडे लग्न-मुंज इत्यादि मंगल समारंभाच्या निमित्ताने मेजवानीस गेले होते. कोणीहि सरदार कोणाहि सरदाराच्या भेटीस गेला असतां त्याचा बहुमान वस्त्रे देऊन व्हावयाचा. त्रिंबकराव मामा पेठे हैदराच्या स्वारीवरून परत पुण्यास येतांना वाटेंत मिरजेस उतरले. ' त्रिंबकराव मामांचा मुक्काम वाडीवर (नरसिंहवाडी) झाला होता. घरास आणिले. मेजवानी केली, वस्त्रे दिली म्हणून तपशीलवार लिहिले ते कळले ' असे मोरो बल्लाळाने पुण्याहून मिरजेस पांडुरंगरावास पत्र पाठविले होते. (ऐ. ले. सं. खंड ४)

पुणें दरबारचा वकील पांडेचरीस फ्रेंचाकडे [१७८२] गेला असतां

फ्रेंचांनीं त्याचें हिंदी पद्धतीनें स्वागत केलें. दिवाण व कारभारी दोनशें माणूस वाजंत्री, नायकिणी व पालखी घेऊन आले. १७९२ त निजामाचा वकील पुण्यास आला. त्याला पेशव्यांच्या वाड्यांत रात्रीं आणिले. रस्त्यावर चंदनाचे सडे घातले होते. व दारू काम सोडलें होतें. वाड्यांत त्याजपुढें बेंकट नरसीचा नाच केला. १७९३ त महादजी शिंदे यांनीं माधवराव पेशव्यांस मेजवानीस बोलावलें, त्यावेळीं वाटेने मृदंग, चौघडा, नगारा, शिंग व कर्णा वाजत होता. १७९६ त परशुरामभाऊ पटवर्धन जुन्नरास बाजीरावाला व त्याच्या भावांना आणण्याकरितां गेले. तेव्हां त्याजबरोबर अंबारी घातलेले हत्ती, चार पालख्या, २० कोतवाल घोडे, १२५ उंट तंबू राहुट्या घेतलेले, सोन्याच्या काठ्या घेतलेले भालदार, स्वार व प्यादे होते. बाजीराव जुन्नराहून निघाला तेव्हां त्याजबरोबर ५० ब्राह्मण आश्रित, पुराणिक, ज्योतिषी, आचारी व शागीर्द होते. बाजीरावानें आग्रह धरला कीं, सगळ्यांच्या पुढे शंकराची पालखी निघावी. बाजीराव पुण्यास आल्यावर हजारो लोक त्यास पहाण्यासाठीं रस्त्यांत उभे राहिले. १७१८ त कान्होजी आंग्रे व शाहू महाराज यांची भेट जेजुरीस झाली. जेजुरी व सातारा यांजमधलि अंतर ४५ मैलांचें. पण ते चालून जाण्यास ५ दिवस लागले. आंग्रयानें स्वारीची फार उत्तम व्यवस्था ठेवली होती. हत्तिवर पांच प्रकारचा गुलाल ठेवला होता. साऱ्या रस्त्यानें नाच चालू होता. गुलाबपाणी व गुलाल उडविण्यांत येत होता. दररोज १० मैल अंतर चालून होई.

सरदार व राजे यांच्या भेटीच्या वेळीं त्यांचा हात धरून त्यांस आणणें किंवा विशेष स्नेहसंबंध दाखविण्यासाठीं आलिंगन देणें होत असे. म्हैसूरच्या युद्धांत हिंदी राजे-रजवाड्यांना कॉर्नवालीसानें आलिंगन दिलें. सरदार व राजे हत्तीवरून उतरल्यावर तंबूच्या दरवाजाशीं कार्नवालीस व मे. मेडोज हे त्यांचें स्वागत करीत व मग आलिंगन देत. पेशवे हा आलिंगनाचा मान विशिष्ट पाहुण्यांनाच देत. त्यास बगलगिरी म्हणत. इंग्रज लोक पेशव्याच्या दरबारी आले म्हणजे त्यांना मराठ्यांच्या रीतीरिवाजाप्रमाणेंच वागावें लागत असे. त्याना कातडी पादत्राण (Shoes) काढून ठेवून साटणीची पादत्राणे (Shoes) व रेशमी पायमोजे घालावे लागत व मांडी घालून दरबारांत बसावें लागे. पेशवे मालेटचे स्वागत प्रथम प्रथम तितकें मनापासून करीत नसत. मालेटनें

दरबारांत पेशवे येण्यापूर्वी यावें व पेशव्यांनी मालेट पूर्वी जावे अशी व्यवस्था होती. त्या योगानें मालेटकरितां उभे राहण्याचा पेशव्यावरील प्रसंग चुकत असे. पेशव्यानी त्याजबरोबर फक्त हस्तांदोलन करावयाचें. मुश्रलउल्मुल्क पेशव्यांच्या दरबारीं आला तेव्हां त्याच्या पगडीवर गुलाबपाणी शिंपडण्यांत आलें. त्याला अत्तर लावलें व त्याच्या गळयांत हार व हातांत गजरे घालण्यांत आलें. कोणत्याहि स्वागतांत नायकिणी या असावयाच्याच. वेंकट नरसी या नायकिणीस १५० पासून २५० रु. पर्यंत दरमहा पगार होता. तिचा नाच महिन्यांतून फक्त चार वेळा होत असे.

बादशहाचे फर्मान पेशव्यास आलें म्हणजे पेशवे त्याचा फार मान राखींत. ते फर्मान प्रथम कपाळाला लावावयाचे व मग फार्सी जाणणाऱ्या मुनशीकडे वाचावयास द्यावयाचें. त्याशिवाय १०१ मोहरा त्यास नजर म्हणून काढून ठेवावयाच्या. इंग्लंडच्या राजाचे पत्र पेशव्यास आले तेव्हां त्याचा मान दिल्लीच्या बादशहाच्या फर्मानासारखा राखावा अशी चार टोपीवाल्यांनीं खटपट केली. पेशव्यानें त्या पत्रास सामोरे जावें अशी त्यांची इच्छा होती. पण नाना फडणिसांनीं तें कबूल केलें नाहीं. दिल्लीच्या बादशहाशिवाय इतरास हा मान मिळणार नाहीं, टोपीकरांनीं तें पत्र पेशवे येऊन गादीवर बसण्यापूर्वी त्यास द्यावें असें नानाने त्यास सांगितलें. त्याचप्रमाणें त्यास १०० तोफांची सलामी न मिळतां २० तोफांची मिळे. जय मिळून सरदार परत राजधानींत येत, तेव्हां त्यांजकरितां कमानी उभारण्यांत येत व चिराखदान करीत.. मालेटसाहेब नाताळांत परशुरामभाऊसारख्या सरदाराकडे भेटीदाखल मिठाई पाठवी. व पोशाखाबरोबर नवीन नवीन परदेशी चिजा देई.

पेशव्यांच्या एखाद्या महत्त्वाच्या सरदाराच्या मृत्यूची बातमी पेशव्यास कळतांच सरकारी कामकाज बंद ठेवीत. १७७१ त गोपाळराव पटवर्धनाच्या मृत्यूचें वर्तमान पुण्यास समजतांच चार दिवस काम बंद ठेवलें होते. दिल्लीचा बादशहा मेला म्हणजे दरबार व चौघडा बंद, शहरांत हरताळ, दहा दिवस दुकानें बंद. दिल्लीचा वजीर मेल्यास तीन दिवस. उदेपूरच्या राजाबद्दल बादशहाप्रमाणें १० दिवस. प्रतिनिधीबद्दल १० दिवस. पेशव्याबद्दल फक्त १ दिवस. वस्त्रांचा आहेर मराठी राज्यांत अगदी ठरलेला. परशुरामभाऊंनीं सवाईमाधवरावाच्या मुंजीत त्यांस १००० रुपयांची कंठी दिली. त्यांच्या

मुंजींत आमंत्रणे देण्यास पुण्यांत नाना फडणीस घरोघर गेले. त्यावेळीं त्यांना अहेर करण्यांत आले. गोकुळअष्टमी व रंगपंचमी या दिवशीं माधवराव महादजी शिंद्याकडे गेले तेव्हां महादजीनें त्यांस उंची पोशाख दिला. परराष्ट्रीय वकिलास द्यावयाच्या आहेरांत उंची पोशाख व हत्ती सुद्धां असे. तहाच्या वेळीं पोशाखाचें देवाणघेवाण होत असे. आनंदाची बातमी आणणारास शेलापागोटे देण्यांत येई. हे पोशाख परगावींहि पाठविण्यांत येत. मरणासंबंधी दुखवटयाचीं वस्त्रें पाठवीत. हीं दुखवटयाचीं वस्त्रें पेशवे हे राजमाचीकर किंवा कर्वे यांचे हातीं रवाना करीत.

पेशवे हे राज्यांत मुख्य झाल्यावर सरदारांत दोन वर्ग निर्माण झाले. एक छत्रपतींच्या वेळच्या सरदारांचा व दुसरा पेशव्यांनीं उत्पन्न केलेल्या सरदारांचा. शिंदे, होळकर, रास्ते वगैरे आपणास पेशव्यांचे चाकर समजत. तर पूर्वींचे जाधवराव, भोसले, आंग्रे पेशव्यांस बरोबरीचे लेखीत. ‘ आपण पुण्यास येऊ तेव्हां पेशव्यांनीं एक कोस सामोरे यावे, पेशव्यांनीं घोडयावरून खाली उतरावे, आपल्याला गाशावर बसवावे व नंतर वाडयांत घेऊन जावें ” अशी आंग्र्यांची इच्छा असे. नागपूरचे भोसले व शिंदे एकाच मोहिमेंत असले तर सेनापतीचा अधिकार आपणाकडे असावा असे भोसल्यांच्या मनात येई.

प्रकरण एकतिसावें

लष्करी व्यवसाय

स्वार, पायदळ, तोफखाना व घोडेस्वार हे मराठ्यांचे चतुरंग सैन्य. सैन्याच्या या चार अंगांपैकीं त्यांचा मुख्य भर घोडेस्वारावर. शिवाजीच्या काळांत मराठयांचे लष्करी बळ फारच कमी असून त्याहून पुष्कळ पटीनी मोठया अशा मुसलमानांच्या सैन्याशी सामना देण्याचा प्रसंग त्याजवर होता. या स्थितीत मुसलमानी सैन्यावर एकाएकी छापा घालून त्याचे नुकसान करण्यास व बाजू अंगावर आल्यास त्यांच्या पाठलागातून झुकांडी देऊन निसटून जाण्यास घोडेस्वारांइतके चलाख साधन त्याला दुसरे नव्हते. म्हणून शिवाजीला आपल्या कामगिरीच्या सुरुवातीस मावळी पायदळावर भिस्त ठेवावी लागली असली तरी हळूहळू त्याने आपले घोडेस्वार वाढविले व तेंच त्याचे धोरण त्याच्या पुढील वंशजानी व पेशव्यानीहि आपल्या समोर ठेवले. शिवाय घोडेस्वारांच्या भरतीला अनुकूलता महाराष्ट्राइतकी इतर प्रांताना क्वचित्च होती. महाराष्ट्रांत कृष्णा, निरा, घोडनदी, भिमा, प्रवरा, गोदावरी या प्रमुख नद्या होत. यांपैकी कृष्णानदीपेक्षांहि भिमा, प्रवरा, निरा, घोडनदी, गोदावरी या नद्यांचे पाणी घोडयाना चांगले मानवणारे असल्यामुळें त्या पाण्यावर पोसलेली घोडी बळकट, चलाख, इमानी व पाणीदार असत. त्या नद्यांच्या तीरावरील घोडयाना अन्वर्थक अशी नांवे देऊन मराठे लोक त्याना एक प्रकारे गौरवीत. निरथडी, गंगथडी, भिमथडी, प्रवरथडी अशा घोडयांच्या जाती असून ती सर्व घोडी वरील गुणानी युक्त असत. पेशवाईत युद्धाकरिता कमीत कमी एक लाख स्वार तयार ठेवावा लागे. युद्धात दरसाल दहापाच हजार घोडी ठार, अगर निकामी होत. त्याऐवजी शत्रुसैन्याला लुटून कांहीं घोडी मिळाली तरी तेवढ्याने तूट भरून येणारी नसल्याने कमीत कमी पांचसात हजार घोडयांची पैदास करण्यावाचून मराठयाना गत्यंतर नसे. वरील नद्यांच्या कांठीं मोठाली कुरणे असत. त्या कुरणांतून घोडी चारावी, नद्यांचे पाणी त्यास पाजावे व अशा रीतीने हजारो घोडी तयार ठेवावी हा उद्योग कित्येक लोक खाजगी प्रयत्नाने करीत.

त्यांतूनच घरपागा तयार होत, त्या अशा:–'कोणी सधन मनुष्यानें पदरचा पैसा खर्चून अथवा कर्ज काढून घोडे खरेदी करावे, व बारगीर नोकरीस ठेवावे. दर वर्षास लढाया व मुलुखगिऱ्या असतच. तेव्हां अर्थात् तशा तऱ्हेनें सजलेल्या घरपागेच्या मालकास आपली पागा घेऊन मोहिमेंत हजर होण्याविषयीं सरकारांतून बोलावणें येई. मग पागेचा मालक किंवा त्याच्या घरचे मुलगे किंवा जवळचे आप्त अथवा कोणी विश्वासू कारकून पागा घेऊन मोहिमेवर जाई. या नोकरीबद्दल मालकास सरकारांतून पागेपैकीं प्रत्येक स्वारास तीनशें रुपये या हिशेबानें पैका मिळे. लुटीवर घोड्याचें पोट व बारगिरांचे पगार भागवावे व सरकारी तनखा अजिबात खिशांत टाकावा असा पागेच्या मालकाचा हेतू असे. असल्या पागांतून वीस पंचवीसपासून पांचशेंपर्यंत घोडीं असत. यंदा बरकत आली तर पुढील वर्षी त्यानें आणखी घोडीं खरेदी करावीं. हा एक त्या काळचा प्रतिष्ठित धंदा होता- पांचपन्नास घोडे पागेंत जमत तों पाग्या सरकारांतून एकाद्या नदीच्या कांठीं कुरणें व दोन चार खेडीं बहुधा इनाम मिळवी. मग त्यांतून एखादें बरेंसे खेडे पाहून त्यास तटबंदी करी व राही.' (ऐ. ले. सं.) खुद्द पेशव्यांचेहि त्या दिशेचे प्रयत्न असत. अहमदनगर जिल्ह्यांत प्रवरानदीपाशीं अश्वी म्हणून एक खेडें आहे. त्या खेड्याच्या नांवावरूनच तेथें अश्वांची पैदास होत असली पाहिजे. तेथें पेशव्यांच्या मादवानी व वळू ठेवून चांगली अंवलाद निर्माण करण्यांत येत असे. घोडनदी हें नांवहि असेंच अर्थबोधक होय. मौंट स्टुअर्ट एलफिन्स्टनानेंहि आपल्या रिपोर्टांत तसेंच म्हटलें आहे. तो लिहितो, 'गंगेथडी व अहमदनगर यांमधील मुलुखांत मराठ्यांचे घोडे निपजतात व शिलेदार रहातात.' ही महाराष्ट्रांतील स्थानिक घोडीं झालीं. यावर रिसाल्याची मुख्य गरज सहज भागे. परंतु महाराष्ट्रीय घोड्यांची चण महाराष्ट्रीय लोकांप्रमाणेंच मध्यम असल्यामुळें त्याहून मोठ्या घोड्यांची जी थोडीशी आवश्यकता वाटे त्याकरितां परदेशांतून व परप्रांतांतूनहि घोडीं आणाविण्यांत येत.

'स्वारांत करोल, भालेकरी व आडहत्यारी असे भेद असत. करोल म्हणजे बंदूकवाले व आडहत्यारी म्हणजे मिळेल तें हत्यार चालविणारे. त्यांत बारगीर व शिलेदार हे दोन मुख्य भेद. बारगीराचा घोडा सरकारी, हत्यार सरकारी व त्याला स्वतःला पगार सरकारी. म्हणजे तो सरकारचा पगारी

नोकर. पण शिलेदार तसा नसे. शिलेदाराचा घोडा स्वतःचा व हत्यारहि स्वतः चें. बारगिरास पगार चार पांच रुपयांपासून आठदहा रुपयांपर्यंत माणूस पाहून असे. हे बारगीर पेशवे स्वतः ठेवीत, तसे त्यांचे सरदारहि बाळगीत. बरेच बारगीर व घोडे एकत्र केले म्हणजे त्यांची पागा बने. पागेवरच्या अंमलदारास पाग्या म्हणत. एका पागेंत दहा घोड्यांपासून पांच सातशेंपर्यंत घोडे ठेवण्यांत येत. पाग्याचा दर्जा त्याच्या हाताखालच्या घोड्यांच्या संख्येप्रमाणें चढता असे. ज्याच्या पागेंत पांचसातशेंपर्यंत घोडा त्याची गणना पुढें सरदारांत होऊन त्याला लवाजमा सरदाराप्रमाणेंच मिळे. त्याच्या पागेकडे नौबत, निशाण, पालख्या वगैरे इतमाम, फडणसि पोतनीस वगैरे दरकदार, मशालजी, शिंग्ये, पखाली, खासदार, नालबंद, दाणेकरी, जासूद, गारदी, फरास, डेरे, राहुट्या इत्यादि सरंजाम, ओझ्याची व दाणावैरणीचीं तट्टे, बैल, उंट, हत्ती इत्यादि जनावरें असत. त्याचा सर्व कच्चा खर्च सरकारांतून चाले. एक पागा म्हणजे हजारो लोकांचे पोट भरण्याचे साधन.' [हरिवंशाची बखर] सारांश मोठा पाग्या म्हणजे सरदार. लहान पागे स्वतंत्र असत किंवा सरदारांचे नोकर असत.

'घरची घोडी घेऊन सैन्यात चाकरी करणारे ते शिलेदार. त्यांच्या समुदायास पथक म्हणत. अशा शिलेदारांच्या समुदायावरचे सरदार ते पथके किंवा पथकी [पतकी]. पथकाचे सर्व खर्च पागेच्या खर्चाप्रमाणेंच असत. पथकाच्या खर्चास सरकारांतून नक्त पैसा मिळत असेल तर त्यास इतलाखी पथक हे नांव, पथकाच्या खर्चास मुलूख तोडून दिला असेल तर त्यास सरंजामी पथक हे नांव. शिलेदारांचा पगार घोडे माणूस हत्यार पाहून दरमहा वीसपासून तीस रुपयापर्यंत. पथक्यांच्या याशिवाय खासगी पागाहि असत. हुजूर म्हणजे मुख्य धनी, त्याबरोबर स्वारीस निघणारी फौज ती हुजुरात. महाराजाबरोबर असणारी ती राजहुजुरात. अर्थात् पथक्यामध्येंहि पथकी व राजपथकी असे भेद उत्पन्न होत. पथक्यांत वरिष्ठ शिंदे होळकर. राजपथक्यात वरिष्ठ पेशवे, भोसले व गायकवाड.' [हरिवंशाची बखर.]

प्रसिद्ध जिवबादादा बक्षी हा पथक्याचाच सेनापति बनला. त्याचे थोडेसे वृत्त येथे देतो. कोकणांत गोवें प्रांतांत केरी नांवाचे एक लहानसें गांव आहे. तेथे विठ्ठलपंत या सारस्वत ब्राह्मणाच्या पोटीं जीवबाचा जन्म १७४० त

झाला. त्यास पोहणें, होडी वल्हवणें, धांवणें, झाडावर चढणें, कुस्ती खेळणें, याचा नाद लागला. जिवबा कोल्हापुरास आला व कोल्हापुराहून पुण्यास आला. पुण्यास सरदार बर्वे यांच्या शिफारशीनें त्याची व नानासाहेब पेशव्याची भेट झाली. बर्वे मरण पावल्यावर त्यांच्या पथकाची व्यवस्था नानासाहेबानें जिवबास सांगितली. १७६१ त पेशव्यांच्या इतर सरदारांबरोबर कर्नाटकांतून जिवबा पानिपतावर गेला. त्यानंतर त्याचा शिंद्यांच्या दरबारी पेशव्यांच्या प्रोत्साहनानें प्रवेश झाला. जिवबा शिंद्याचा सेनापती झाला. खर्ड्याच्या लढाईत त्यानें मोठा पराक्रम केला. जिवबा १७९६ त मरण पावला. त्यानें आपल्या ज्ञातींतील पुष्कळांस ग्वाल्हेरीस कोकणांतून नेऊन योग्यतेस चढविलें.

'शिलेदारांत ' एकांडे शिलेदार ' हा एक लहानसा वर्ग होता. हें निधडया छातीचे मर्द शिलेदार ब्राह्मण, मराठे, रजपूत, मुसलमान वगैरे सर्व जातीत असत. सामान्य स्वाराचे वेतन जरी अडीचशे, तीनशे, चारशे रुपयेपर्यंत असले तरी सातआठशेपासून दोन दोन हजारापर्यंत तैनात देऊन व पालख्या आबदागिऱ्या वगैरे बहुमान देऊन हे एकांडे प्रत्येक पथकात व पागेत दहा, वीस, पन्नास, शंभर असे एकंदर स्वारांच्या संख्येचे मान पाहून बाळगलेले असत. आणीबाणीच्या वेळीं नेहमीं हे मोहरे अघाडीस असावयाचे. हेच पुढें बढती मिळून पागे व पथके होत असत.' [हरिवंशाची बखर] प्रसिद्ध सखाराम हरि गुप्ते हे असेच एकांडे शिलेदार होते.

पागेतील घोडे एकाच तोलाचे नसून त्यांच्या राशी म्हणजे प्रती लावण्यात येत. पहिल्या राशीत प्रत्येकी चारशें रु. किंमत असे घोडे, दुसरींत दोनशें रु. व तिसरींत प्रत्येकीं शंभर रु. अशा किंमतीचे घोडे सामान्यतः असत. पागेंत कांहीं घोड्याहि असल्याने त्यांतील पसू घोड्या काढवून देण्याकरितां वळू घोडे बाळगीत. घोडी जशी निवडक पाहून ठेवीत तसे त्याजवरील राऊतहि चांगल्या कसदार मुलुखातले परीक्षा करून आणवीत. एकदा माधवराव पेशव्यानी गोपाळराव पटवर्धनाच्या फौजेस दोष दिला. तेव्हां ती किती लायख आहे हें सिद्ध करण्याकरितां गोपाळरावाने पुढीलप्रमाणें कारणे सांगितली. ' फलटण देश, पुणें देश, अकलूज, सोलापूर, माणदेश, करकंब वगैरे व कानडे वळणाचे लोक आमच्या पथकांत आहेत. कृष्णापारचे आहेत त्यांचा दाखला मालोजी घोरपडे मुधोळकर व दौलतराव गजेंद्रगडकर यांस पुसावा. अलीकडचे आहेत

त्यांचा दाखला फकीरजी फडतरे, थोरात, महादजी शितोळे यांस व माणदेशाचा दाखला निंबाळकर, माने यांस पुसावा. त्यांचा दाखला मनास आणून धारकरी माणूस किती आहे हें पहावे. ’ जी माणसे ठेवीत ती त्या त्या भागांतील सरदारांच्या माहितीने ठेवीत. (ऐ. ले. सं. खंड ४ था)

फौजेंत भरती करतांना कोणत्या प्रदेशांतील माणसे युद्धाला लायख याचा अंदाज गोपाळरावाने वरीलप्रमाणें आपल्या मनाशी करून ठेवला होता. तो लक्षांत घेतला असतां महाराष्ट्रांतल्या महाराष्ट्रांत मराठे लोकांत उंच, सशक्त, शूर व हुशार माणसे फलटण, पुणें, सोलापूर, माण, कृष्णातीर या बाजूची असें गोपाळराव मानीत होता. त्याच्या आटोक्यांतील ती माणसे एवढाच त्याचा अर्थ. बाकी महाराष्ट्राच्या इतर भागांत तशी माणसे नव्हती असे समजण्याचे कारण नाहीं.

कित्येक शिलेदार छोटे असून त्यांनीं पदरी राऊत बाळगून पेशवे सांगतील त्या सरदारापाशी चाकरी करावी. त्याबद्दल त्यास गांव सरंजाम असे. शिलेदाराजवळ नुसतेच घोडे व राऊत असत. शिबंदी म्हणजे पायदळ नसे. ज्याच्या ताब्यांत राऊत व शिबंदी ते सरंजामदार. हे राऊत म्हणजे बारगीरच. सरंजामदार मोठा असला कीं, त्याला सरदार म्हणत. पटवर्धन, शिंदे, होळकर, विंचूरकर, राजेबहाद्दर हे सारे सरदार. सरदाराचा इतमाम सरंजामदारापेक्षां मोठा. म्हणून त्याच्या ताब्यांतील मुलूख ती त्याची जहागीर. पटवर्धन सरदाराना सर्वांत मिळून २४ लक्षांची जहागीर होती. दर स्वारास तीनशें रुपये या हिशोबाने त्यांनीं आठ हजार स्वार ठेवावयाचे. हे सर्व स्वार शिलेदार असत. त्यांनीं पदरचा घोडा, हत्यार व दारूगोळी वगैरे तीनशें रुपयांत बाळगावे. त्याखेरीज पटवर्धनांच्या तीन घराण्यांच्या तीन पागा होत्या. पागेंतील घोडे पटवर्धनांच्या मालकीचे. त्यांजवर बसणारे ते बारगीर. बारगीरांचा पगार, हत्यार व दारूगोळी हीं सर्व पटवर्धनांच्या खर्चाची. शिलेदारांचा समुदाय ते पथक. व बारगीरांची ती पागा.

लढाईकरितां पथके व पागा या निघतच, पण पथकातलि शिलेदार आपआपल्या गावी; ते सर्व वेळेवर येतलि अशी खात्री नसे. या कारणाने विशेष आणीबाणीच्या प्रसंगी सरदारांची भिस्त आपल्या घरच्या पागेवरच असे. अशा पागा शाहू महाराज होते तेव्हां त्यांना व पुढें पेशव्यांनाहि ठेवाव्या

लागत होत्या. लढाईवर निघावयाचे ठरले कीं, पागेंतील घोडे व बारगीर सदैव सिद्धच असत; पण सरदार सरंजामदार व शिलेदार सर्वत्र पांगलेले, त्यांना जमविता जमबिता सरकारची पुरेवाट व्हावी. त्याची कांहीं उदाहरणे येथें दिलेली बरी. 'राजश्री शंभूसिंग जाधव (माळेगावकर) यांस खासदस्तकचे पत्र जे, मसलतीस (मोहिमेस) राऊत पाठविणे ते गांवास जाताच रवाना करतो म्हणोन स्वामी यासी बोलून गेलात, त्यास जाऊन दिवसगत झाली, अद्यापि एकहि राऊत आला नाहीं. यावरून स्वामींनी अपूर्व मानले आहे. मसलतीचे कामास तुम्हीं लोकानी दिरंगाईवर घालावे ऐसे नाहीं. स्वामींचीं आज्ञापत्रें पाठवावयाची सीमा जाली. या उप्पर देखत आज्ञापत्र बोलीप्रमाणें आपणाकडील राऊत व एक सरदार शिताबीने पाठविणें. एक घडीचा उजूर न करणे' (सन १७३४–३५ पे. डा.).

दुसरे अज्ञापत्र येणेंप्रमाणे––'राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराव यास खास दस्तकचे पत्र जे, तुम्ही आपणाकडील पाचशे राऊत मसलतीस पाठवावे अशी आज्ञा स्वामिनी स्वमुखे तुम्हास केली, तुम्हीहि मान्य करून गेला. परंतु एकहि राऊत न पाठविला. मसलतीचे दिवस गेल्यावर फौज येऊन काय कामाची ?' (पे. डा.) या दोनहि पत्रांतील मजकूर शाहू महाराजांचे आज्ञेवरून लिहिला असून सरदार व सरंजामदार यांजकडून मदतीची दिरंगाई कशी होत असे हें त्यांत प्रतिबिंबित झाले आहे. परंतु मध्यवर्ती सत्तेस कामाची वाटणी करण्याला एवढाच उपाय असल्यानें महाराजांच्या वेळीं पडलेला प्रघात पेशव्यांनाहि पुढें चालू ठेवणें भाग पडले. एखाद्या सरदाराकडून फौज ठेवण्यांत येई तेव्हां फौजेच्या खर्चाची व्यवस्था मुलूख तोडून देऊन महाराज किंवा पेशवे करीत, त्याचप्रमाणें त्यास त्याच्या दर्जाने रहाता यावे यासाठीहि कांहीं मुलुख दिला जाई. 'राजे विठ्ठल शिवदेव यांस फौज ठेवावयास आज्ञा झाली. त्यावेळीं त्यांच्या स्वतःच्या खर्चाकरिता सालीना ५० हजार रुपयांची नेमणूक करून देण्यांत आली. १५ लक्ष रु. स्वाराकरिता नेमणूक. या रकमेंतून पाच हजार स्वार कायमचे ठेवावे, त्यांची हुजूर हजिरी घ्यावी, जुंजात स्वाराचे घोडे किंवा माणूस पडले तर सर्व इतलाख दर स्वारास रु. ३०० नेमणूक केली त्यांत समजून घ्यावें. हजिरीस स्वार कमी झाले तर त्याचा पैका सरकारात यावा. १२५ हजार रु. ग्वाल्हेर किल्ल्याचा सरंजाम म्हणून किल्ल्यांत

शिबंदी ठेवावी. किल्ल्याची मरामत करावी. पूर्वीचा धर्मादाय, वर्षासने ब्राह्मणास वैगेर चालवावी. घोडे ३।४ शें रु. किमतीचे. माणूस चांगला असावा. स्वाराची नेमणूक तनिशें रुपये. स्वारास रोजमुरा हुजुरातून खर्ची पडला तर तो हिशेबी धरावा. स्वाराची चाकरी बारमहाची. जिकडे चाकरीस पाठवू तिकडे गेले पाहिजे.' सरदाराशी या प्रकारचे करार केलेले असत. या कराराप्रमाणें सरदार वागतील तो पावेतोच त्यांजकडे दिलेला मुलूख रहावयाचा; नाहींतर तो परत सरकारांत घ्यावयाचा.

सरदारास मुलूख तोडून देताना ज्या बाबी लक्षांत घेतल्या जात त्या महिपतराव कवडे यांच्या करारांत स्पष्ट झाल्या आहेत. महिपतराव कवडे यांस ६००० रु. खाशास तैनात, १२०००० रु. घरखर्च सांसारिक, २००० रु. दोन पालख्याकरितां, ४००० रु. चार हत्तींचा खर्च, १००० रु. शागीर्दपेशा. सरदाराना सरंजाम फौजेच्या खर्चाकरितां दिलेला असल्यामुळें लढाईसाठीं जी नवी फौज ठेवावयाची ती ठेवावी न लागल्यास त्यावर्षी सरंजामाचा पैका सरकारांत देण्याविषयीं सरदाराना हुकूम देण्यात येई. 'साल मजकुरी फौज न ठेवणे. सरंजामाचा पैका सरकारांत देणे' (ऐ. ले. सं. खंड ३ रा सन १७६७). याचे कारण असें कीं, सरदारांच्या फौजेपैकीं कांहीं फौज कायमची व कांहीं हंगामी स्वरूपाची होती हे होय. स्वारास सालीना जे वेतन द्यावयाचे त्याचा निमे किंवा तिजाई भाग आगाऊ देत. त्यास नालबंदी म्हणत. शिलेदारांची पथके ही नालबंदी आगाऊ हाती पडल्यावाचून लढाईवर येत नसत. फौजा इतक्या खर्चाने उभारलेल्या व त्याजकरितां सरदाराना मुलूख तोडून दिलेला या कारणानें लढाईच्या वेळी सरदारानी कराराइतके सैन्य जमविले कीं नाहीं याची पहाणी व गणति खुद्द स्वारींतहि करीत. या कामी माधवरावाची कदर कडक होती. सन १७६७ त हैदरावरील दुसऱ्या स्वारींत प्रत्येक सरदाराच्या गोटाच्या गणत्या घेण्यांत आल्या. त्यासंबधीं मोरो बल्लाळ पटवर्धन गोपाळराव पटवर्धनास लिहितो 'गणत्या घ्यावयाची फार चौकशी जाली, ती पत्री कोठवर लिहावी? पर्वा तमाम गोट गणत्या घेतल्या. राजश्री रामचंद्र गणेश, गुरुजी व हरिपंत फडके वगैरे मातबर मातबर पाठविले. समागमे खिजमतगार चोर बातमीने येणेप्रमाणें चौकशी केली. त्यास रा. नारो कोल्हेर हे जितकर भोसल्याची (अक्कलकोटकर शहाजी राजे भोसले यांची) गणति घ्यावयास गेले. चांगली घोडी

असता वाईट घोडी म्हणून निमित्य ठेवून घसघस केली. तेव्हां त्यानी (भोसल्यानी) शंभर रुपये कबूल केले. ते रात्री घेतले इतके श्रीमंतांस कळले. बोलावून आणून चौकशी केली. शेवटी अंगी लावणे रुजुवातीने. पहिले एक दुसेर निमित्य होतेच. ढालाईत लावून लष्कराबाहेर लावून द्यावयाची आज्ञा जाली.' (ऐ. ले. सं.) गणती करताना कारकुनाने लाच खाल्ला त्याचे हे प्रायश्चित्त.

पागेतील घोड्यांना चंदी त्यांच्या राशीबरहुकूम ठरे. त्याना चंदी हरभरे व बाजरी यांची. हत्तीला मोठे सडीक तांदूळ, तूप, गूळ, मीठ, मसाला मिळे. घोडी रास दोन व नौबतीचा उंट यांना कणीक, तूप, गूळ, मिरी, देत. पर्जन्य-काळीं घोडी उंट यांस हत्तीचा मसाला कधीं कधीं चारावा लागे. तेव्हां त्यांना दररोज तूप चारीत. पण लढाईवर असतां जनावरांची ही निगा न रहातां केव्हां तर त्यांना दाणावैरणीचीहि मारामार पडे. मोरो बल्लाळ पटवर्धन गोपाळ-रावास ता. १७ जानेवारी सन १७६७ रोजीं हैदरावरील स्वारीतून लिहितो. 'लष्करांत महर्गता बहुत जाली. दोन दिवस घोड्यास व उंटास चंदी दिली नाहीं. दर रुपयेस जोरी बाजरी चार शेर आहेत. व तांदूळ दर रुपयेस दोन शेर अडीच शेर येणेंप्रमाणें आहेत. धारण मात्र आहे, धान्य मिळत नाहीं. याजकरितां चार गोण्या दाणे व दोन गोण्या तांदूळ येणेंप्रमाणें वडिली समागमे राऊत देऊन आम्हाकडे पाठवून द्यावे तरी अन्नास मिळो.'

खास पेशव्यांची फौज म्हणजे हुजुरात पेशव्यांच्या मध्यवर्ती सत्तेकरितां ती शक्य तितकी मोठी असणे जरूर. सामान्यतः हुजूरपागेला घोडा दहा हजारापर्यंत असे. व त्याची पथके ५२ असून प्रत्येक पथकावर वेगवेगळे सरदार असत. या बाबतींत गोपाळरावाने गोविंदपंतास कळविले '(माधवराव पेशवे) हुजुरात बारा हजार ठेवणार' त्यावर गोविंदपंताचा अभिप्राय कीं, हुजुरात कनिष्ठ पक्ष २५ हजार पावेतो असावी.' लढाईचा प्रसंग नसतां पागेंत इतकी घोडी बांधून ठेवल्यास खर्च भारी यावयाचा. यासाठीं त्यांस बाहेरगांवीं चारणीस पाठवीत. 'श्रीमंतानी पागादेखील चारणीस बहुतकरून पाठविल्या. उंटांचे कारखानेदेखील चारणीस गेले. पन्नास उंटे मात्र ठेवून घेतली आहेत.' (ऐ. ले. सं. खंड ३ रा).

पागेकडे फडणीस पोतनसि इत्यादि दरकदार व पथकास बक्षी असत.

बक्षीस तैनात सालीना ३००० रु. व पालखी तैनात १००० रु. पर्यंत. पुण्यात हुजूरपागेकरितां लागणारे सामान पुण्यातल्या पुण्यात तयार होणार नाहीं इतके मोठे असून त्याला कारागीरहि नाना प्रकारचे हवे असत. म्हणून ते काम गांवगन्ना पाठवून करून घेण्यांत येई. लोहाराकडून खिळे व पट्ट्या बसवीत. खळीबद्दल जिनगरांस चिंचोके देऊन त्याजकडून जीन तयार करवीत. ही जिने गांवगन्ना तयार होऊन दसऱ्यापूर्वी पुण्यास येत. ती कर्यात तळेगांव, कर्यात नारायणगांव, वडगांव बांडे, कर्यात सुपे, कर्यात सासवड व मौजे बेलसर या ठिकाणाहून कोठून दहा, कोठून पांचचार अशी आणवीत. हुजूरपागेच्या इतर सामानाकरितां सदाशिवरावभाऊने राबते महार ९२ चऱ्हाटे वळणारे १० मांग व फरसावयास १० चांभार मागविले. खेड्यापाड्यांत रहाणाऱ्या कारागीर लोकांना आपले घर, वतन व शेतवाडी संभाळून प्रपंचाला हातभार लावण्यास मराठी राज्याचा फौजफाटा किती मदत करीत होता याची अंधुक कल्पना केवळ पेशव्यांच्या हुजूरपागेंतील कामकाजाने येते. अशा प्रकारच्या पागा महाराष्ट्रभर सर्व सरदारांच्या व शिलेदारांच्याहि असल्याने खेड्यांतील स्पृश्यास्पृश्य कारागिरांना भरपूर रोजगार घरबसल्या मिळाल्यामुळें खेड्याना आर्थिक सुस्थिति लाभत असली पाहिजे हें उघड आहे.

शिलेदारापाशी पांच पंचवीस स्वार असत. शिलेदाराना आपले पथक घेऊन स्वारीस निघण्याची आज्ञा करण्यांत येई. त्याप्रमाणें ते हजर न झाल्यास त्यांची घरें जप्त होत. पेशव्यांचे सर्वच सैन्य आयत्या वेळीं जमविलेले नसे, हे आतांपर्यंत वाचकांच्या लक्षांत आले असेलच. कारण सैन्याचा उपयोग केवळ त्यांना लढाईपुरता नव्हता. परसत्तेचा मुलूख तहान्वये आपल्याकडे आल्यानंतर त्याचा ताबा घेण्याकरितां फौज पाठवावी लागे. शिवाय स्वतःच्या ताब्यातील मुलखांत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठींहि सैन्याची आवश्यकता पेशव्यांना असेच. म्हणून कायमचे कांहीं सैन्य सतत जय्यत ठेवले जाई. परगणे व तालुके यावरलि अधिकारी कमावीसदार व मामलेदार, यांच्या हाताखाली त्यांच्या अमलातील प्रदेशाच्या बंदोबस्तासाठीं मैदानात पागा व किल्ल्यावर शिबंदी असे. ‘ परगणे अथणी वगैरे महाल तालुका यांची मामलत तुम्हास सांगून पागा पथकसुद्धां महालात ठेवले आहे. त्याची बेगमी सालमजकुरपासून ९० बारगीर रु. १३७४ दीडमाही रोजमुरा, ८३ बाजे लोक ५८५ रु., ७३ खासदार ३७७ रु. ’ [पे. डा.].

पायदळ

पेशवाईंत मराठ्यांजवळ मुख्य भरणा स्वारांचा होता. किल्ले वगैरे घेण्याच्या कामी पायदळाची जरूरी. माधवरावाने इ. स. १७७० त हैदराविरुद्धजोराच प्रयत्न करून त्याचा चक्काचूर उडविण्याचे ठरविले होते. त्याकरिता त्यास पायदळाची गरज वाटल्यावरून त्याने ते बरेच वाढविले. ' श्रीमंत पंधरा हजारापर्यंत गाडदी ठेवणार. तसेच हशम दहा हजार. एकूण पायीचे माणूस पंचवीस हजार पावेतो ठेवितात. स्वारीची तयारी होत आहे.' असें मोरो बल्लाळाचे पुण्याहून गोपाळराव पटवर्धनास पत्र गेले. ता. २४ ऑगष्ट सन १७७०(ऐ. ले. सं.) पायदळांत फक्त मराठे म्हणजे महाराष्ट्रीय तेवढेच घ्यावयाचे इतर प्रांतांतील, धर्मांतील व जातीतील लोक घ्यावयाचे नाहींत असा नियम नव्हता. ' श्रीमंत राजश्री पंत प्रधान (माधवराव) डेरे दाखल भाद्रपद शुद्ध त्रयोदशीस रविवारी प्रातःकाळच्या दोन तास दिवस जाले. स्वारी कर्नाटक प्रांते यंदा फारच जलद यावी, जलमार्गे आरमार आणावे, पायीचे लोक आरब गाडदी फिरंगी जो कोणी कसबी असेल त्यास ठेवावे (याप्रमाणे ठरले आहे). तोफाहि तयार होत आहेत. कुऱ्हाडी दहा हजार पावेतो नवीन तयार केल्या आहेत. यंदा खामखा शत्रूचे पारपत्य करावे अशी धमक आहे. बेलदार ठेवले आहेत. ' (पुण्याहून नारो बाबाजी दामले यांचे गंगाधरराव पटवर्धन यांस मिरजेस पत्र सन १७७०) पेशव्यांच्या सैन्यातील सर्वच गाडदी कवाईत शिकलेले असत असें नाहीं. सैन्यांत हिंदूहूनजे वेगळया जातींचे एतद्देशीय शिपाई त्यानाहि गाडदीच म्हणण्याची: वहिवाट होती. उत्तर हिंदुस्थानातील रोहिले, पठाण, शीख हेहि गाडदीच. (ऐ. ले. सं.)

पठाणाप्रमाणें सिद्दीहि ठेवीत ' सिद्दी जाफर व सिलेमान बुदाऊद या दोन असाम्या करार केल्या. त्यासी तैनात दरमहा ११ ' (पे. डा. सन १७४२-४३) गाडदी लोक एकंदरीनें शूर पण आडदांड व बेगुमान. मराठी फौजेवर मराठे सरदारांचा जितका वचक तितका या परदेशी शिपायावर नव्हता. कारण ते आडदांड, हिंदूसंस्कृतीबाहेरचे व कदाचित् सर्वसाधारण मराठ्यापेक्षां शरीरसामर्थ्यानें अधिक असल्यामुळें बेफाम असत. हैदरावरील तिसऱ्या स्वारींत गोपाळराव पटवर्धनाने कडबाचे (कडाप्या) ठाणे घेतले. तेव्हां

तेथील ब्राह्मण व रयत यांस तेथून निघून जाण्यास गोपाळरावाने सांगितल्या-वरून ते सोईने जात असतां गोपाळरावाच्या सैन्यांतील गाड्यानी ब्राह्मणास लुटले. ते पाहून गोपाळराव लिहितो 'त्यानी चिरगूट पांघरूण भांडी कंबळी तमाम हिरावून घेतल्या. इलाज काय? श्रीमंतासहि लिहिले आहे. गाड्यांचे पारिपत्त्य करतील तेव्हां करोत.' (ऐ. ले. सं. खंड ४) फिरंग्यांचा म्हणजे पोर्तुगीज लोकांचा उल्लेख वर आलाच आहे. त्यावरून युरोपियन लोकहि पायदळात अस-ल्याचे सिद्ध होतच आहे. पायदळाप्रमाणेंच तोफखान्यातहि युरोपियन असत. अहमदाबाद येथलि तोफखान्यात जोफी, माणिक, पारासिस, रुद्रेक, जेकब रुजेल, मालक मल्फर या नांवाचे फ्रेंच इंग्रज वगैरे गोरे होते. तोफखान्याच्या कलेत गोरे लोक महाराष्ट्रीयापेक्षां अधिक तरबेज असल्यामुळें त्यांना घेण्यात येत असले पाहिजे. परंतु तितकी गरज पायदळास नसल्यावरून पायदळात ते अगदीच तुरळक प्रमाणात असतील हे उघड आहे. वरील नांवाचे सारेच गोरे दिसणारे लोक युरोपियन असत असे नाहीं. त्यापैकीं कांहीं लेकावळेहि (अँग्लो इंडियन) असत.

तोफखाना

मराठ्यानीं डोंगरकठाडीच्या आश्रयानें राहून शत्रूशी लढण्याचें सोडून दिले व ते मैदानांत शत्रूबरोबर समोरासमोर सामन्यास उभे राहिले, तेव्हां त्यांना आपल्या लष्करी सामर्थ्यातील कित्येक व्यंगे घालविण्याची जरूरी भासली. पहिल्या बाजीरावानेच प्रथमः मुसलमानाशीं मैदानात गांठ घातली. त्याचा जबरदस्त शत्रू निजाम उल्मुल्क. त्याजपाशीं तोफखाना होता पण बाजी-रावापाशीं तो नव्हता तोपर्यंत बाजीरावाला निजामाचा मोड करण्यास फार वळणे घ्यावी लागली. म्हणून त्याने स्वतःचा तोफखाना सज्ज करण्याचे ठरविले आणि त्यावर यशवंतराव पानसे व माधवराव पानसे यांस नेमले. वसईच्या मोहिमेंत ते दोघे हजर होते. पण त्यावेळीं मराठ्यांचा तोफखाना तितका सर्वांग-परिपूर्ण नव्हता. ही उणवि सन १७५४ सालीं कुकडी नदीवर पेशव्यांची लढाई निजामाबरोबर झाली तींत कायम होती. निजामाचा तोफखाना फ्रेंच दरोगा बुसी याच्या हाताखाली मराठ्यापेक्षां फारच वरचढ आढळला. म्हणून पेशव्यानी बुसीच्या तालमींत तयार झालेला मुझफरखान यास आपल्याकडे

ओढण्याचा प्रयत्न केला. लवकरच मुझफरखान व बुसी यांचा बेबनाव झाला. त्याचा फायदा घेऊन पेशव्यांनीं मुझफरखानास आपल्या पदरी ठेवले. तोफखान्याचे वरिष्ठ शिक्षण यशवंतराव व माधवराव पानसे यांस पेशव्यांनीं मुझफरखानाकडूनच देवविले. पुढें पेशव्यांचे कारभारी पुरंदरे व मुझफरखान यांचे वितुष्ट आल्यावर मुझफरखानानें मराठ्यांची चाकरी सोडून सावनूरकर नबाबाची चाकरी धरली. नंतर एकाच वर्षानें सावनूरच्या नबाबावर मराठ्यांची मोहीम झाली. तिच्यांत माधवराव पानसे मुझफरखानाशी लढत असता मेला. तरी मराठ्यानी नबाबास जिंकलेच. या मोहिमेचा सेनापति सदाशिवरावभाऊ असून त्याने मुझफरखानास आपल्या नोकरींत घेतले. [पानसे घराण्याचा इतिहास] पण पुढें मुझफरखान याने खुद्द सदाशिवरावाशीच दगलबाजी होऊन वार केल्यामुळें मुझफरखान जाऊन त्याच्या जागीं इब्राहीमखान आला. सन १७६१ सालीं पानिपतचा घनघोर रणसंग्राम झाला त्यांत तोफखान्यावर माधवरावाचा भाऊ महिपतराव पानसे हजर होता. पण त्याजपेक्षां इब्राहिमखान गारदी त्या कलेंत वरचढ म्हणून त्याजकडे तोफखान्याचा कुलअधिकार भाऊसाहेबानें दिला. त्या युद्धांत तोंडावर तरवारीच्या जखमा होऊन महिपतराव देशीं परत आला. अशा रीतीनें बाजीरावानें तोफखान्याचे सैन्यास जोडलेलें अंग त्याच्या उपयुक्ततेमुळें पेशवाईअखेर कायम राहिलें.

बाजीरावापूर्वी मराठ्यांपाशीं तोफा होत्या, पण तोफखाना नव्हता. शत्रूपासून बचाव करण्याकरितां सर्व किल्ल्यांवरून तोफा असत; पण सैन्याबरोबर तोफखान्याचे लटांबर बाळगण्यांत येत नव्हतें, ते बचावाचें धोरण जाऊन चढाईचें धोरण स्वीकारल्यावर शत्रूंचे किल्ले त्वरेनें घेण्याकरितां व शत्रुसैन्याचा धुव्वा उडविण्याकरितां बाळगणें जरूर झालें. तोफांत सूत्रनाळा, गरनाळा अशा जाती असून सूत्रनाळा उंटावरच्या. गरनाळा बहुधा किल्ल्यावरूनच ठेवण्यांत येत. या तोफा लहान व हलक्या दमाच्या असून त्या ओतविण्याचें काम इकडेच होत असे व त्यांना लागणारे गोळेहि इकडचेच कारागीर पाडीत. ‘ नागोठण्यास देवशेटी कासार यानें गरनाळेचे पंधरा गोळे हुजूर हुकुमावरून ओतलें. ’ म्हणजे कासारांना आपल्या बांगड्यांच्या जुन्या धंद्याला हा अधिक प्राप्तीचा नवा जोडधंदाच मिळाला. आंबेगव्हाण तर्फे ओतूर, प्रांत जुन्नर येथेंहि गरनाळांच्या गोळ्यांचा कारखाना होता. महाराष्ट्रांतील किल्ले

डोंगराडोंगरावर आहेत व या डोंगरांच्या ओळी महाराष्ट्रभर पसरल्या आहेत. म्हणून तोफेच्या गोळ्यांचे हे कारखाने गांवोगांव निघत. पुष्कळ गांवच्या लोकांना चरितार्थाचा तो नवीन व्यवसाय झाला असेल. सदाशिरावभाऊनें १७५९ सालीं आप्पाजी कोकिळ कासार याजकडून तोफांचे गोळे करवून घेतले. त्यानें त्यास पांच हजार गोळे करावयास सांगितले होते. यावरून तोफांच्या गोळ्यांचे कसब इतर जातींपेक्षां कासारानांच अधिक सुसाध्य होते.

पेशवाईंत तोफा इंग्रजांकडून मुंबईहून मागविण्यांत येत. त्यांजपासून त्या घेण्याचें काम पेशव्यांनीं साष्टी प्रांताच्या आपल्या अधिकाऱ्याकडे सोंपविले होतें. पेशवाईंतच काय पण शिवाजीच्या काळींहि मराठे लोक तोफा इंग्रज, पोर्तुगीज, यांजपासूनच घेत. या कलेंत पाश्चात्य राष्ट्रें पुढें होतीं, हें त्याचे कारण. ज्या तोफा परदेशांतून यावयाच्या त्यांचे गोळेहि अर्थात् परदेशीच असत. सन १८६४ साली हंड्रेडवेट हे वजन मराठ्याना तोफेच्या गोळ्यामुळें माहीत होते. हंड्रेडवेटास ते ' हंडरवट ' म्हणत. एक हंड्रेडवेट वजनास १९ रु. किंमत पडे. मुंबईहून हे गोळे रत्नोजी आगरवाले व पालणजी पार्शी खरेदी करून पुण्यास पाठवीत.

विशेष सामर्थ्याच्या व पल्ल्याच्या तोफा मुख्यतः परदेशी असल्या तरी य बाबतीत परदेशावर अवलंबून राहिल्याने तोफांचा भरपूर पुरवठा होणारा नसल्यामुळें ठिकठिकाणी लहान प्रमाणांत तोफांचे कारखाने निघाले. पण देशी तोफा त्यांतून गोळे सोडताना फुटण्याची भीति फार. तोफांचा एक कारखाना अहमदाबादेसहि होता. खुद्द पुण्यास सन १७६९ साली कारखाना सुरू झाला तो फार मोठा होता. हा कारखाना पुण्यात शुक्रवार पेठेंत पानश्यांच्या वाड्याशेजारी असून काळ्या हौदापासून नागझरीपर्यंतचे विस्तृत क्षेत्र त्याने व्यापले होते. त्यांत नवीन तोफा ओतीत व जुन्या दुरुस्त करीत. कारखान्यामध्ये ४ सुतार, ४ लोहार, ७ बाणांचे कारागीर, १ गोळ्यांचा कारागीर, २ गोलंदाज, १६ खलाशी जमादार, २२ दर्यावर्दी जमादार, २६ गाडीवान, २ जेजालदार, ३ ढालाईत, १ संदुकाचा हवालदार, ५ बेलदार, १ घणकरी, २ जिनगर, २ भालदार, ३ जासूद, ३ खासदार, ९९ कामाठी, ४ आरेकस, ६ बाणदार, १ शिंपी, २ पखालवाले, १ परीट, २ कलाल, ३ तबेलदार, १ फरास, ३ कोठावळे, १ रखवान, १२ गाडदी, १ बारगीर व सांडणीस्वार होते.

सारांश, कारखान्यात दीडशे माणूस कामावर असून ते भिन्न जातींचे व व्यवसायांचे होते. कारखान्याचे क्षेत्रफळ पूर्वेस गणपतीचे देऊळ, पश्चिमेस शेवाळे यांचा वाडा, उत्तरेस इमारतीचा मोठा दरवाजा व दक्षिणेस बारा इमामचा पीर एवढे होते (पानसे घराण्याचा इतिहास). स्वराज्यांत नवे रोजगार मिळून शेकडो हजारो लोक पोटाला लागतात ते असे. एकदा कारखान्यासाठीं एक हजार चोंडसी तयार करावयाच्या होत्या. त्याना हवी तशी माती मौजे वडवली प्रांत साष्टी येथे मिळते असें कळल्यावरून वडवलीस चोंडसीचा कारखाना घालून त्या चांगल्या कारागिराकडून तयार करवाव्या व बेगारीने पुण्यास पाठवाव्या, अशी अधिकाऱ्यास आज्ञा झाली.

मुंबईहून हंड्रेडवेटाच्या वजनावर गोळे येत असले तरी मराठे लोकांचे वजन शेरावरच असे. त्यांचे गोळे सात शेर ते वीस शेर वजनापर्यंत असत. तोफखान्या वर तोफंदाज, देगंदाज, बंधानी, खारवे, गोलंदाज हे अधिकारी असून तोफ-खान्याकडील हजिरीचे व पगार वाटणी वगैरेचे काम दिवाण, मजमदार, फड-णीस, सबनीस यांजकडे असे. हजेरी घेणे व लिहिणे हें काम सबनीसाचे, एकुणात मुजुमदाराची व तारीख फडणिसाची. तोफखान्याकडील पगार दर चांदरातीस व्हावा. त्याकाळी सर्वांचेच पगार चांदरातसि होत असल्यावरून चांदरात या-शब्दास विशिष्ट अर्थ लाभला आहे. सध्याहि जुने लोक पगाराच्या दिवशी ‘ आज काय चांदरात झडणार ना ’ म्हणतात.

माधवरावाच्या वेळी हैदरावरील स्वारी चालू असता, दर तोफेस ओढण्यास सव्वाशे दडिशे बैल लागत होते. सन १७७० साली रणमंडळ तोफ पुण्या-हून म्हैसुराकडे मागाहून नेण्यात आली, ती वीस शेर गोळ्यांची होती. तोफांची नांवें रणमंडळ, जयवंती, ज्वालाभवानी, जय, फत्तेमुबारक अशी उग्र असत. तोफखान्यावरील गाडदी चांगले कवाईत शिकलेले असत. हैदरावरील एका स्वारीसाठीं माधवरावाने पंधरा हजार गाडदी तयार केले होते. तोफाबरोबर गाड्याखेरीज कामाठी, दर्यावर्दी, खलाशी, सुतार, लोहार, तबलदार, बेलदार यानाहि लढाईवर जावे लागे. अर्थात् त्याना सहजच वर्षानुवर्ष काम मिळे. एक एक मोहीम वर्ष, दीडवर्ष चाले. हैदरावरची तिसरी मोहीम अडीच वर्षे सुरू होती. शत्रूच्या किल्ल्यावर उंच ठिकाणी तोफांची मारगिरी करता येण्या-साठी जे धक्के बांधून त्यावर तोफा चढवीत त्यांस धमधमा किंवा बातेरी म्हणत.

हत्यारे

मराठे वापरीत त्या हत्यारांची नांवे प्रसंगाने वर आलीच आहेत. त्याखेरीज इतर कित्येक हत्यारे त्यांच्या वापरण्यांत असत. ती मिळून येणेप्रमाणें--

१ पेषकबज—अंगरख्यावरून कमरेभोवती गुंडाळलेल्या रुमालांत अगर पट्टयांत अडकविण्याचे हत्यार. पात्याची लांबी एक फूट.

२ कट्यार—बाळगण्याची तऱ्हा वरीलप्रमाणेंच. पात्याची लांबी १० ते १४ इंच. मुठीच्या दोन कांबी आपल्या मुठींत दाबून धरावयाच्या.

३ जंबिया—बाळगण्याची तऱ्हा वरीलप्रमाणेंच. या हत्यारांत पात्याचे आकार हरतऱ्हेचे असतात. लांबी ८ ते १० इंच.

४ माडू—मध्ये साधी मूठ व दोन्ही बाजूस नऊ इंची पाती. अंगावर गर्दी आली असता चारी दिशास उपयोग करावयाचा.

५ पट्टा--पातें दुधारी, कोपरापर्यंत हात घालण्यास मूठ, लांब ३। फूट, रुंदी दीड इंचाहून अधिक नसते, वळतो पण तुटत नाहीं.

६ खंजीर—दोन्ही बाजूनी निमुळती लहान तलवार.

७ कडाबिन—बंदुकीच्या जातीचे लहान हत्यार. लांबी दीड फूट. प्रथम दारू ठासून वर खडे, तांब्याचे तुकडे आदिकरून ठासावयाचे. त्याच्या घोडयावर चकमक असते व कान्यावर असलेली दारू घोडा ओढताच पेट घेत. पल्ला ६० फूट. बंदुकीप्रमाणें सरळ नेम धरून मारण्याचे हे हत्यार नव्हे. दोन्ही हातात धरून गरदिशी वाटोळे फिरविल्याने अधिक लोकांस मारा देता येतो.

८ बरचा - एक प्रकारचा भाला. यालाच अंकुश म्हणतात. हत्तीला टोचून त्याजकडून कामे करून घेण्याकरितां

९बिचवा--एक प्रकारचा खंजीर.

१० तीरकमठा--यासच बाण व धनुष्य म्हणतात. कमाण म्हणजेहि धनुष्यच. कमठा पोलादी असतो. बाण धनुष्यातून उडविण्याचा व दारूचा असा दोन्ही प्रकारचा.

११ खांडा—यासच तेबा म्हणतात. कमरेस लटकावण्याचे जबरदस्त हत्यार. पात्याची लांबी २ फूट २॥ इंच. मोठी रुंदी तीन इंच. धार पुढील बाजूस व टोकाला दोन्ही बाजूनी.

१२ बल्लभ—यालाच सांग म्हणतात. हत्यार सबंध पोलादी. दांडा व फळ

यासह सलग लांबी ७ फूट. फळ पोलादी. फळ लांब २॥ फूट. उपयोग भाल्यासारखा.

१३ गुरगुज—एक प्रकारचा शूळ.

१४ पंचहत्यार— पेषकबज, जांबिया, कट्यार, कडाबिन इत्यादि मिळून.

१५ सोटा—पोलादी मोठी काठी. आठ बाजूस धारा व काटे असतात. लांब २–२। फूट.

१६ वाघनखे—ही पोलादाची असतात.

१७ इटा—हे भाल्याचे जातीचे पायदळाचे हत्यार आहे. याचा मारा बारा हातापर्यंत चालतो. एक इटेकरी व दहा पटेकरी बरोबर अशी म्हण आहे.

१८ निमचा—लहान वाकडी तलवार

१९ रेहेकला—सुरुंग उडविण्याचे हत्यार.

त्याशिवाय बंदुखा, पिस्तोल, सुरे, त्रिशूळ इत्यादि.

वरील हत्यारांपैकी कित्येक हत्यारे इकडेच पैदा होत. गोविंद बल्लाळ प्रांत बुंदेलखंड यास बहुत वेश फमासी बंदुका प्रत्येकीं किंमत ५।६।७।८ रु. खरेदी करून पाठविण्यास लिहिलें होते. हत्यारे ठेवण्याच्या ठिकाणास दास्तान म्हणत. त्यांत बंदुकी दारूगोळया, असत. जेजालंदाज बाण तयार करीत. ' शेख यासी दिमत दर्याखान जेजालंदाज हशम याजकडून साठ बाण तयार करून घेतले. ' बंदुकांचा मारा उत्तम करतां यावा म्हणून तुकडया तुकडयानीं उभे केलेले गाडयांचे जमाव यास बुरूज-बंदी म्हणत. बाणांचा कारखाना नाशिक येथे बाळ खंडेराव याजकडे घातला होता. दर बाणास किंमत रु. ५. बाणांच्या कामास बाभळीची लाकडे लागत. ' बागलकोट येथे दारूचा कारखाना घालून ५० खंडी दारू जलदीनें तयार करण्यास आज्ञा' झाली होती. ' कल्याणास नवी दारू करवली. त्यापैकीं १० खंडी शिसे अप्पाजी हरि यास साष्टीस इंग्रजाचे पारिपत्य करण्यास दिले. ' बंदुकासुद्धां बहुतेक सर्व हत्यारें हिंदुस्थानातच बनवीत. बंदुका लाहोर, नरवर इत्यादि ठिकाणी होत असत.

पेंढारी

पेंढारी हेहि एक लष्कराचेच अंग होते. पेंढाऱ्यात मुख्य भरणा मुसलमानांचा व त्यांजवरील प्रमुखहि मुसलमानच. ते बहुतकरून मुलतानी म्हणजे

पठाण असत. हल्ली मुंबईंत दंगे-धोपे व लुटालूट करणारास मवाली म्हणतात आणि त्या मवाल्यात वायव्य सरहद्दीकडून आलेले बलुची व पठाण असतात. त्यांचा मुंबईस येऊन असला उनाडपणा व आडदांडपणा करण्यांत उदरंभरण हाच उद्देश असल्याचे सर्वांस माहीतच आहे. मराठ्यांच्या लष्करांत तरी ते त्याच उद्देशानें रहात. पेंढाऱ्यास लष्करांत येऊन रहाण्याची परवानगी सरकारापासून घ्यावी लागे. सरदारांचेहि पेंढार असे ते त्यांच्या फौजेबरोबर राही. पेंढाऱ्यानीं दर पालामागे ५ रु. सरकारांत भरावे, या करारावर त्यांस परवानगीची ढाल देण्यांत येई. ‘ मीरखान व हसनखान मुलतानी उर्फ पेंढारी यांनीं आपल्या जमावासुद्धां लष्करांत येतो व आपले पोट भरून पालपट्टी शिरस्त्याप्रमाणें देतो म्हणून अर्ज केला. त्यास गणेश गंगाधर यांच्या गोटाजवळ लष्करांत रहाण्यास परवानगी दिली ’ [पे. डा.]. लष्करांत राहिल्यावर पेंढारी लष्कराबरोबर फिरत व शत्रूच्या मुलुखाची लूटमार करून पोट भरीत. लढाईत शत्रूचा पराभव होऊन तो पळत सुटला म्हणजे त्याच्या फौजेची व छावणीची लूट सरकारचे सैन्य करी व त्याला मदत पेंढाऱ्यांची होत असे. पेंढाऱ्यानीं लुटींत हत्ती, पालख्या, नगारा, निशाणे वगैरे सांपडल्यास तें सरकारांत द्यावे हाच सरकाराचा पेंढाऱ्यापासून फायदा. बाकीची लूट पेंढाऱ्यांना हा पेंढाऱ्यांचा फायदा.

बुणगे

सैन्यांतील हत्यारी लोकाशिवाय बिनहत्यारी पण लष्करी उपयोगाच्या नोकरचाकरांचा व कारागिरांचा समुदाय बरोबर बराच मोठा बाळगावा लागत होता. खिजमतगार, परीट, शिंपी, पखाली, हलालखोर, दिवटे, भोई, सारवान, हरकारे, पाणके ब्राह्मण, रिकीबदार, नालबंद, हुलसार, नगारजी, कोठावळे, जामदार, भोई, जिनगर, चोपदार, चांभार, ढोर, जासूद, न्हावी, आफतागिरे, कर्णेकरी, पोतदार, खासदार अशा उपयुक्त जमावानिशीं सैन्य मोहिमेवर निघत असे. या प्रकारचे हजारों हरहुन्नर लोक सैन्याबरोबर असून त्यांना धंदा मिळून त्यांचा व महाराष्ट्रभर पसरलेल्या त्यांच्या हजारो कुटुंबांचा लष्करी व्यवसायावर चरितार्थ चालत असे. यातच कामाठी, नोकर, कुणबिणी, आचारी, वगैरे लोक असून त्या सर्वांस मिळून बुणगे ही संज्ञा होती. विश्रांति घ्यावयाची झाली तर सरदार व शिपाई बुणग्यात येऊन रहात.

किल्ले

शिवाजीच्या वेळीं त्याचे किल्ले २४० होते. हे किल्ले घाटांतील वाटावर बांधलेले आहेत. शिवाजीला किल्ल्यांच्या आश्रयानें मुसलमानी फौजेशी झुंजून आत्मरक्षण करावे लागत असल्यानें त्याने स्वतःचे नवीन किल्ले बांधून जुन्या किल्ल्यांत बरीच भर घातली. पण पेशवाईत मराठी राज्य हजारो कोसपर्यंत पसरल्यानंतर सह्याद्रीतील डोंगरी किल्ल्यांची गरज मराठ्यांना तितकी राहिली नाहीं, म्हणून त्यांनीं नवीन किल्ले थोडेच बांधले. किल्ल्यावर हवालदार, सबनीस, सरनोबत, फडणीस, कारखानीस हे अधिकारी असून त्यांना खर्चाकरितां नेमणुका असत. हवालदार हा मुख्य अधिकारी व त्याचा दर्जाहि मोठा. त्यास पालखी, अफ्दागिरी इत्यादि सरंजाम असे. हवालदार, सबनीस व सरनोबत यानीं मिळून किल्ल्यावरील कारभार पहावा. धान्याची कोठी व युद्धसाहित्य यावर नेमणूक कारखानिसाची. हिशेब त्याच्या नजरेखाली लिहिले जावयाचे. हवालदार व सरनोबत हे मराठे, सबनीस हा ब्राह्मण, कारखानीस प्रभु. किल्ल्याच्या किल्ल्या हवालदारापाशी, हजिरीपत्रक सबनिसापाशी. कांहीं ठिकाणी किल्ल्यावरील अधिकाऱ्यांचे पगाराचा आकडा देण्यांत आला आहे. त्यावरून पगार फार लहान असत. उदाहरणार्थ, हवालदारास दरमहा १४ रु. सर नौबत १५ रु., कारखानीस ७ रु., पण सबनिसाचा वार्षिक पगार ६०० रु. अर्थात् पगाराचे मान किल्ल्याच्या महत्त्वावर अवलंबून असले पाहिजे. किल्ला मोठा असल्यास त्यावर पाच ते सात सरनोबत असत. त्यांच्या हाताखाली शिबंदी. शिबंदीच्या दहा असामीवर एक नाईक. शिबंदीतील बिनहत्यांरी शिपायास आढाव, हत्यारी शिपायास हशम, बंदुकवाल्यास बरकंदाज म्हणत. कांहीं तिरंदाज व कांहीं इतर हत्यारे बाळगणारे असत. आढावास तैनात (पगार) दरमहा ४॥ रु. व बरकंदाजास जवळजवळ तितकीच. किल्ल्यावरील शिपायात गोलंदाजामध्यें गोरे लोकहि असत. मलावेल रुद्रिक (रॉड्रिक) यास पुरंदरावर व वास्कोल रुजाल (रॉजर्स) यास सिंहगडावर गोलंदाज म्हणून पाठविले होते.

किल्ल्यातील बंदोबस्त किती कडक असे हे धारवाडचा अधिकारी बापूजी शिंदे यास केलेल्या आज्ञेवरून समजते.—' बापूजी शिंदे धारवाड यास, तुम्ही किल्ल्याचा कारभार किल्ल्यांत राहून पहावा. महालाचा कारभार पेठेंत राहून

पहावा. किल्ल्यांत लोक येतील जातील त्यांची परवानगी हवालदार यांस सांगावी. किल्ल्यांतील भरतीचे लोकांची रजा, कामगिरी, हजिरी, वाटणी करणें ती हवालदार, दरकदार यांस सदरेस बसवून करीत जाणे, त्यांचे इतल्याखेरीज न करणें. दरवाजे व कोठ्यांच्या किल्ल्या हवालदार याजवळ ठेवाव्या. दरवाजे व कोठ्या उघडणें व लावणें ते वेळचे वेळेस तुम्ही हवालदारास परवानगी सांगून करवीत जाणें. हशमनीस व हशमाचे फडणीस पेशजीपासून किल्ल्यांत राहून दरकाचे कामकाज करतात त्याप्रमाणें हल्ली किल्ल्यांत रहातील. दरकाचें काम ज्यांचे त्यांचे हातून घेत जाणें ' (पे. द.). बापूजी शिंदे हा महालकरी किंवा मामलेदार असून त्याच्याकडे धारवाडच्या किल्ल्याचाहि अधिकार होता.

किल्ल्यावर शिबंदीकडे दोन कामे. त्यानी किल्ल्याचा बंदोबस्त ठेवून किल्ल्यावर जे कैदी असतील त्यांना संभाळावे आणि भोवतालच्या सपाटीवरील प्रदेशास कुमक लागल्यास ती करावी. बऱ्याच भागातून तालुक्यांची ठाणीहि किल्ल्यावरच असत. म्हणून अद्यापिहि कित्येक तालुक्यांना त्यांतील किल्ल्यांचेच नांव चालत आहे. आसपास भरणाऱ्या यात्रेच्या बंदोबस्तालाहि किल्ल्यावरूनच प्यादे रवाना होत. किल्ल्यावर जेजाला, लहान तोफा व दारूगोळाहि ठेवण्यांत येई. किल्ल्यावरील शिबंदी वगैरे खर्च चालावा म्हणून निराळे गांवहि तोडून दिलेले असत. ते त्या किल्ल्याचे गिर्दनवांई गांव. मिरज किल्ल्याच्या गिर्दनवाईस पासष्ट हजार रुपये सालीना उत्पन्नाची खेडी तोडून दिली होती ती अद्यापि मिरज संस्थानाकडे चालत आहेत.

आरमार

शिवाजीने सन १६६१ त जंजिऱ्याच्या शिद्दीच्या ताब्यांतील दंडा राजपुरी या बंदरावर हल्ला केला आणि मालवणाजवळ सिंधुदुर्ग नांवाचे बेट आहे त्यावर किल्ला बांधून कुलाबा, सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे किल्ले दुरुस्त केले. विजयदुर्ग बंदरातच शिवाजीने आपले आरमार उभारले. त्याच्या आरामारावरील पहिले दोन अधिकारी मुसलमानच होते. पुढें तुकोजी आंग्रे हा आरमारी सुभेदार झाला. तो मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र कान्होजी आरमाराचे काम पाहू लागला. ही गोष्ट सन १६९८ त घडली. त्यावेळीं महाराष्ट्रात औरंगजेबाचा धिंगाणा सुरू असून

राजाराम जिंजीस जाऊन राहिल्यामुळें कान्होजी प्रायः स्वतंत्रच होता. मुंबई-पासून वेंगुर्ल्यापर्यंतच्या पश्चिम किनाऱ्यावर कान्होजीने आपला दरारा बसविला. सन १७०७ त त्याने मुंबईकर इंग्रजांच्या आरमारावर हल्ला करून त्यांना आपल्या शौर्याची चुणूक दाखविली व सन १७१० त कान्हेरी बेट घेऊन त्याला तटबंदी केली. शाहूमहाराज साताऱ्यास गादीवर बसले तेव्हां आरमारावरील प्रमुख कान्होजीच असून त्याजमार्फत शाहू इंग्रज वगैरे युरोपियन लोकाकडलि फर्माइषी माल आणवीत असे. सन १७२९ त कान्होजी मेल्यावर त्याचा पुत्र संभाजी याजकडे आरमाराची सुभेदारी आली. त्याच्या आरमारांत ८ ते १० गुराब व ४० ते ५० गलबते होती. सन १७३० त संभाजी आंग्र्याच्या ४ गुराबानी व १५ गलबतानी बांबे व बेंगाल या नांवाच्या दोन इंग्रजी गलबतांचा [Galleys] नाश केला. सन १७४३ त संभाजी आंग्रे मेला व त्याचा पुत्र तुळाजी त्याचे काम पाहूं लागला. तोहि कान्होजी व संभाजी यांच्यासारखाच शूर होता.

आंग्रे शूर होते तरी शिवाजीनंतरच्या काळात स्वतंत्रपणे वागण्याची सवय कान्होजीस लागल्यापासून त्याला व त्याच्या वंशजाना शाहूच्या वर्चस्वाचा मनातून जाचच वाटत होता. शाहू सन १७४९ त मृत्यु पावला व नानासाहेब पेशवे याजकडे मराठी राज्याची मुखत्यारी आली. ती ज्या कित्येक मराठे सरदाराना सहन होत नव्हती त्यापैकींच तुळाजी असल्यामुळें तो पेशव्याना मुळींच जुमानीनासा झाला. कोकणपट्टीच्या रक्षणाच्या दृष्टीने आंग्र्यांची ही स्वतंत्र व चढेल वृत्ति घातकच होय यांत शंका नाहीं. म्हणून नानासाहेबाने इंग्रजांची मदत घेऊन सन १७५६ त तुळाजीस पकडून कैदेंत ठेवले व विजयदुर्गास नवी तटबंदी करून ते आपल्या आरमाराचे आणखी एक मुख्य ठाणे बनविले. आणखी एक म्हणण्याचे कारण असे कीं, आंग्रे त्यास जुमानीनासे झाल्यापासून पेशव्यानी आपल्या पृथक् आरमाराची उभारणी सुरू ठेवलीच होती.

पेशव्यानी आपले वेगळे आरमार सन १७३७ च्या सुमारास म्हणजे वसई घेण्यापूर्वीच वसईच्या बाजूस आरनाळ्याजवळ स्थापले होते. वसईच्या मोहिमेंत शंकराजी केशव फडके हा पेशव्यांच्या आरमाराचा प्रमुख होता. तुळाजी आंग्र्यास बुडविल्यावर पेशव्यांच्या आरमाराचे दोन प्रमुख विभाग झाले. एक वसईचे आरमार व दुसरे विजयदुर्गचे आरमार. पण या दोन्ही ठिकाणच्या

आरमाराचे अधिपत्य धुळप यांजकडेच आलेले दिसते. धुळपांच्या घराण्यापैकीं पहिला पुरुष आनंदराव. तोच या आरमारावरचा सुभेदार. मोहिमेवर सेनापति जाई त्याच्या हाताखाली जसा कारभारी मोहिमेची व्यवस्था पहाण्यास असे तसा आरमारावरलि सुभेदाराचा कारभार करण्यास एक कारभारी ठेवीत. आनंदरावाच्या हाताखाली जगन्नाथ नारायण हा कारभारी होता. सिंहगडच्या किल्लेदारीवरून त्याची बदली या जागेवर सन १७६५ त झाली. (पे. डा.) जगन्नाथ नारायण कारभारी, बाळाजी हरि अमीन, आनंदराव धुळप आरमार सुभा अशी ही जुळणी होती. अमीनाला अंकित असे फडणीस, कारखानीस, जमादार, हशमनीस इत्यादि अधिकारी होते. कारभाराची शिस्त कोणत्याहि खात्यांत सारखीच असल्याने मुलकी, लष्करी, आरमारी वगैरे सर्व खात्यांतील हुद्दे जवळ जवळ सारखेच असत. वसई, विजयदुर्ग, रत्नागिरी, देवगड, रेवदंडा, अंजनवेल ही आरमाराची ठाणी होती. प्रत्येक ठाण्यास तालुका म्हणत. अनाजी नाईक बोरकर यास तालुका रत्नागिरी येथे पांच गलबतांची सरदारी सांगितली होती. या वेगवेगळ्या ठाण्यांत एकसूत्रता आणण्याकरिता आनंदरावास वर लिहिल्याप्रमाणें सुभेदार नेमण्यांत आले व आरमारखर्चाकरिता कांहीं महाल लावून देण्यांत आले.

कोकणात विजयदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल व देवगड येथें दालदी, गांवीत व भंडारी इत्यादि जातींचे लोक नौकानयनांत निपुण होते. त्यांपैकीं कांहींना तालुकानिहाय ठेवून बाकीच्याना आरमाराकडे चाकर ठेवण्यास आनंदरावाला पेशव्याने आज्ञा केली. या आरमारांत मोठ्या तिरकस गुराबा २, दुधोशी गुराबा ४, भर्त्या गलबते २३ व किरकोळ महागिऱ्या वगैरे ५ मिळून ३४ गलबते होती. त्यावर हशम लोक ९२४ व दर्यावर्दी ८६० मिळून १७८४ लोक प्रारंभी होते. पण पुढें हे आरमार पुष्कळच वाढले. (इ. सं.) गुराब हें एक तऱ्हेचें मोठे लढाऊ जहाज होते. गुराब हा शब्द आरबी आहे. आरब लोक प्राचीन काळापासून दर्यावर्दीपणात निपुण. त्यांच्या सफरी नेहमीं हिंदुस्थानाशी होत असल्याने या संघटनाबरोबर त्यांच्या संज्ञाहि मराठींत घुसल्या. मचव्यांचाहि उपयोग आरमाराकडे करीत. त्यांचे वजन १००।१२५ खंडी असून त्याला एक लहान व एक मोठे शीड असे व त्यांत ४०।५० लोक असत. तेच लोक खलाशी व तेच लढाऊ शिपाई. प्रत्येक मचव्यावर ६।७ तोफा ठेवण्यांत येत.

लढाईच्या वेळीं त्यावरील खलाशी झपाझप वल्ही मारून हा हा म्हणतां शत्रूस गाठीत. (ऐ. ले. सं.)

' तालुके सुवर्णदुर्ग येथील आरमाराकडे महादेव नांवाचे नवे गलबत तयार आहे. त्याजवरील ६१ असामींचे खर्चाकरितां ३८६२ रु. ची नेमणूक करून दिली आहे. ' (पे. डा.) महागिरी हे लढाऊ सामान नेण्याचे गलबत असून त्यांतून जाऊन कोळी लोक शत्रूंची घरे वगैरे यांची जाळपोळहि करीत. हैदरावरील स्वारीत माधवरावाने आपले आरमारहि पश्चिम किनाऱ्याने म्हैसूरच्या समुद्रकाठांपर्यंत नेले होते. त्या आरमाराने समुद्रातील लढाईत कामकाज चांगले केल्याबद्दल त्यांतील शिपाई, सारंग, सरदार इत्यादिकास ४२५० रु. बक्षिस देण्यांत आले. (पे. डा.)

इंग्रजांचे आरमारावरील लढाऊ लोक शिस्तवार व कामात वाकबगार अशी मराठ्यांची खात्री, यास्तव त्यांच्याशीं लढण्याचा प्रसंग आपल्या आरमारास आल्यास त्यांतील आपली माणसेहि तशीच पाहिजेत इकडे लक्ष ठेवण्यांत येई. याच साली आनंदराव धुळपास माधवरावाने ' गहाळ माणूस दूर करून चांगल्या माणसांची जंगजोड करण्यास व आंग्र्याचे शिलकी जर्जर झालेल्या आरमाराची मरामत करण्यास ताकीद दिली होती. '

मराठ्यांना आरमाराचा उपयोग चाचेगिरीचा बंदोबस्त करणे, व्यापारी जहाजापासून जकात वसूल करणे, समुद्रांत फुटलेली जहाजे ताब्यांत घेणें व समुद्रकिनाऱ्याचे संरक्षण शत्रूपासून करणे हा होता. बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत सुभेदाराचा सालीना पगार ११८६ रु. नक्त व १६॥ मण धान्य इतका होता. सर तांडेलाला दरमहा १० रु., तांडेलाला ७॥ रु. व खलाशाला ४॥–५ रु. मिळत. जगन्नाथ नारायण यास माधवरावाने धुळपाचा कारभारी नेमले त्याचा पगार सालीना २००० रु. होता. अर्थात् या वेळीं धुळपांचा पगारहि वाढलाच असेल.

लष्करी छावणी

मराठ्यांच्या लष्करी छावणीची कल्पना पुढील वर्णन वाचून येईल. हे वर्णन दौलतराव शिंदे यांच्या छावणीचे आहे.—ज्या दिवशीं तळ हलवयाचा त्या दिवशीं बिनीवाला पहाटे उठून चालूं लागतो. ज्या

ठिकाणीं सैन्याचा तळ पडावयाचा तेथें तो एक पांढरें निशाण उभें करतो. येथेंच महाराजांचे तंबू ठोकावयाचे असतात. त्या सर्व तंबूना मिळून देवडी असें म्हणतात. मागाहून बाजारांची निशाणे येतात व ती येतील तशीं रोवली जातात. दुकानांच्या दोन ओळी असतात व त्या समोरासमोर असतात. सैन्याच्या आघाडीपासून पिछाडीपर्यंत तो एक मोठा थोरला रस्ताच होतो. हा रस्ता तीन तीन चार चार मैल लांब पसरलेला असतो. देवडीची लांबी त्याच्या पाऊणपट असते. तिच्या पाठीमागच्या बाजूस चौरीबाजार असतो. मुख्य रस्त्याच्या डाव्या उजव्या अंगाला सरदारांचे तळ पडतात. त्यांचे तळ पडताना स्वच्छता, सोय किंवा शिस्त इकडे मुळींच लक्ष दिलेले नसते. घोडे, बैल, माणसे व उंट ही सगळी एकत्रच असतात. या एका तळाच्या भोंवताली असलेच इतरांचे तळ पडलेले असतात. हे मुख्य लष्कर. त्याला बडा लष्कर म्हणतात. बाजारांतील दुकानें बांबूवर घोंगड्या किंवा तरटे बांधून बनविलेली असतात. डोक्यावर एक वासा ठोकला आणि दोन्ही बाजूंला खिळे रोवले कीं झालें दुकान उभे. याना पाले म्हणतात. ती तीनपासून नऊ फूट उंच असतात. असल्या जागेंत विक्रीचा मालहि तेथेंच आणि दुकानदाराची मुलेंमाणसेंहि तेथेंच. ती अशा स्थितींत वर्षानुवर्षे रहातात. श्रीमंत व्यापारी असली पाले वापरतात. पण सरदार लोकांची पालें याहून अधिक निवाऱ्याची व सुखकर असतात. त्यांना दुहेरी तिहेरी पडदे असतात. एका बाजूनें ते बंद असतात व दुसऱ्या बाजूनें वारा पाऊस लागूं नये म्हणून पडदे सोडलेले असतात. याना राहुट्या म्हणतात. त्यांचे आकार वेगवेगळे असतात. सरदार लोक त्यांत रहातात. एवढ्या मोठ्या छावणींत आमच्या युरोपियन अधिकाऱ्याच्या तंबूसारखे दहा तंबू सांपडतील कीं नाहीं याची शंकाच आहे."

(ब्रौटन)

हें वर्णन दौलतराव शिंदे यांच्या छावणीचें असले तरी पेशव्यांच्याहि छावणीस पुष्कळ अंशी लागूं पडेल. त्यांच्या छावणीतील वाणी, बकाल, उदमी यांना छावणीच्या कूच-मुक्कामाची खबर देणारा एक अधिकारी असून त्याला त्या कामगिरीबद्दल दुकानदाराकडूनच वेतन मिळण्याची तजवीज केलेली होती. 'अलाबक्ष फकीर हा लष्करामध्यें छावणीसमागमे राहून बाजारचे वाणी, बकाल, उदमी यांस कूच-मुक्कामाची खबर देत असे. त्याबद्दल बाजारच्या

शेटयाने त्यास दर दुकानी आठवडा एक दमडी व दर दुकानी चुटकीभर आटा करार करून दिला. ' [पे. डा.]

मराठ्यांची छावणी पडली म्हणजे खुद्द लढाईशिवाय बंदोबस्ताची इतर कामेहि फौजेकडे येऊन त्यांत बरीच फौज गुंतून पडे. ' हैदरावरील तिसऱ्या स्वारीत तीस हजार फौजेपैकीं सात हजार फौज तलाव्याच्या कामावर आणि कही छबीना मिळून सात हजार एकूण चौदा हजार फौजेला हे काम पडे. तलाव्याची फौज रोज दहाबारा कोस जाऊन व त्या टापूतील गांवे लुटून लष्कराकरिता दाणावैरण आणी. कहीच्या फौजेचे काम लाकूडफाटा सर्पणाकरिता आणण्याचे व छबिन्याचे काम गोटापासून रात्रभर कोस अर्ध कोसावर पहारा करीत हिंडण्याचे. तलाव्याकरिता स्वतः गोपाळराव पटवर्धन जात आणि छबिन्यासहि सरदार लोक आळीपाळीने असत. हैदरावरील स्वारीत थोरले लष्कर माधवराव पेशव्याबरोबर होते व बाकीच्या लष्कराचे तळ कित्येक मैलांच्या अंतरावर पडले होते. धाकटे लष्कर गोपाळराव पटवर्धनाच्या हाताखाली हैदराच्या टेहळणीवर होते. गोपाळरावाचा चुलतभाऊ मोरो बल्लाळ हा माधवरावापाशी होता. त्यास गोपाळराव आपल्या छावणीतून कळवितो ' आजीपावेतो चांदणे होते. आतां काळोखी रात्र आली आहे. चारपांच छबीने असतात. डेऱ्याजवळ चौकीचे राऊत असतात. चार गोट (गोपाळराव, नीलकंठराव, परशुरामभाऊ व आनंदराव रास्ते यांचे) मिळोन वाणी बकाल मिळोन दोनशे पाले असतील' (ऐ. ले. सं. खं. ४ था सन १७७०)

दाणावैरण लष्कराबरोबर बाजारांतच नसली म्हणजे लुटालूट हाच जीवरक्षणाचा इलाज. गोपाळराव तक्रार करतो, ' आज चार दिवस दाणा मिळत नाही. मोठा कडाड झाला आहे. नाचण्या मात्र पोटापुरत्या मिळतात. उपाय नाही. '[ऐ. ले. सं. खंड ४ था सन १७७०] यापूर्वी तीन वर्षे गोपाळराव घरी मिरजेस असता हैदराबरच्या स्वारीत मराठ्यांच्या लष्करांत असेच हाल चालू असल्याचे मोरो बल्लाळच्या पत्रावरून समजते. ' लष्करांत महर्गता बहुत जाली. दोन दिवस घोडयांस व उंटास चंदी दिली नाही. दर रुपयेस जोरी बाजरी चार शेर आहेत. व तांदूळ दर रुपयेस दोन शेर अडीच शेर येणेप्रमाणें आहेत. धारण मात्र आहे, धान्य मिळत नाही. याजकारितां चार गोण्या

दाणे व दोन गोण्या तांदूळ येणेप्रमाणें वडिली समागमे राऊत देऊन आम्हाकडे पाठवून द्यावे, तरी अन्नास मिळो ' (ऐ. ले. सं.)

दाणादुणा, वैरण व पैसाआडका याकरिता रयतेला लुटणे मराठे सरदारांना मनापासून नको असे. परंतु वर सांगितली त्या प्रकारची दैना उडाली म्हणजे त्यांचा नाइलाज व्हावा. माधवराव पेशवा आपल्याकडून या अपकृत्यास आळा घालण्याचा प्रयत्न करीत होता व आपल्या सरदारांना तसें कळवीतहि होता. गोपाळरावाच्या हाताखालील फौजेने उपद्रव दिला त्याविरुद्ध चित्रदुर्गकराकडून माधवरावाकडे तक्रार आली असता गोपाळरावानें खुलासा केला ' तूर्त दुर्गकरांचे मुलखास (आमच्या लष्कराकडून) वैरणीचा उपद्रव लागतो. नित्य बोभाटे येतात. आम्ही ताकीद करावयास चुकत नाहीं. लहान खेडी एका बुरुजाची असतील तेथून वैरण आणवितो. लष्करचा उपद्रव (कसा काय असतो हे) आम्हास दखल आहे. कोणी एखादे घर जाळतात. घरांत शिरून दाणादुणा आणितात. एखादे दिवशी आणीत असतील. अनिवार लष्कर. त्यांत निक्षून ताकींद करता येत नाहीं. तथापि फार ताकीद आहे...वैरण न आणीन म्हटल्यास गत्यंतर नाहीं. असा चहूकडून पेच आहे.' [ऐ. ले. सं. खं.४था].

हें धान्यवैरणीचे झाले. पण जवळ पैसा नसला म्हणजे त्याकरिताहि रयतेस जाच होत असे. हैदरावरील स्वारींत माधवराव पेशवे फौजेनिशी कर्नाटकांत गबूर गावाजवळ गेले. तेथून मोरो बल्लाळ गोपाळरावास लिहितो. ' गबूर मातबर कसबा आहे [तेथील लोक] पळून जातील, यास्तव १० हजार फौज भवत्या चौक्या देऊन बसावयास पाठबिली आहे. तोफाहि पाठविल्या आहेत. बरी जरब देऊन चार रुपये घ्यावे असे आहे...चार रुपये मिळावयाची जाग आहे. ' [ऐ. ले. सं.]

सैन्यातील लोकांना लढाईस तोंड लागल्यावर कित्येकदां स्वयंपाक करून जेवण्यासहि फुरसत मिळूं नये. एकदां हैदराच्या सैन्यांत असाच प्रकार घडला. आप्पाजी राम गाडगीळ अक्कलकोटचे शहाजी राजे यांचा दिवाण साबनुराहून गोपाळराव पटवर्धनास पुढील बातमी देतो, ' पर्वाचे दिवशीं बातमी आली कीं, आठा दिसांच्या भाकरी करून (शत्रूनें आपल्या लष्करांत) वाटल्या. ' याचा अर्थ असा कीं, पुढील आठ दिवसांत सैन्यास स्वयंपाक करण्याचीहि फुरसत न देतां लढाई करावयाची.

लष्करांत दारूबाजीस सामान्यतः बंदी असली तरी गाडदी वगैरे परदेशी लोक निशा भागविल्यावाचून रहात नसत. विठ्ठल शिवदेव सावनुराहून गोपाळराव पटवर्धनास लिहितो 'आम्हाकडील अलाहादखान चारशें लोक व जुने गाडदी अडीचशें ऐसे [तेथें आम्ही पूर्वी पाठविलेले] बेफाम राहिले. त्यानें शिंदीच्या पखाला तीस पाठवून शिंदी सवंग जशी ज्याणें मागितली तशी देऊन टाकली. लोकांनीं पिऊन बेशुद्ध निजले....गढीत दारू दिवसाचे भक्षावयाचे ऐसे बेवकूफ. अशा स्थितीत शत्रूचे लोक प्रातःकाळीं येऊन पडले. बाहेर पहारेकरी होते. ते धरून [शत्रूनें] मुसके बांधले.' हा प्रकार हैदराबरील स्वारीचे वेळीं झाला.

मोहिमा.

पुण्याहून कर्नाटकांत म्हैसुराकडे पेशव्यांच्या मोहिमा होत. तेव्हां फौजा बहुधा खालील मार्गांनीं जातः—

(१) गोकाकेपाशीं कृष्णा उतरून गदग, लक्ष्मेश्वर, हरिहर, बसवापूर, हागलवाडी, चिकनाइकहल्ली, नागमंगलावरून पट्टण.

(२) तालिकोट तालुक्यांतून मुधेबयाळ संगमापाशीं कृष्णा उतरून गजेंद्रगडावरून कम्पल्लीपाशीं तुंगभद्रा उतरून बल्लारी, रायदुर्ग, चित्रदुर्ग, शिरे मदगिरी, देवराय दुर्गावरून.

(३) मोगलाईतून पटदरापाशीं कृष्णा उतरून कर्नोळ, नंद्याळ, शिरवळ, चांगल, कडपे सिंधवट, गंजीकोटा; तेथून घाट चढून गुरुमकोंडा डाव्या हातास सोडून सरशीपाल्यावरून बेंगरुळावर रस्ता उतरतो. मध्यें सरशीपाल्यापाशीं थोडी झाडी आहे. (इ. सं.)

पेशव्यांचें सैन्य मोहिमेवर निघालें म्हणजे खुद्द पेशवेच सैन्याबरोबर असल्यास त्याचें आधिपत्य पेशवेच आपल्याकडे घेत हें उघड आहे. परंतु ते हजर नसत तेव्हां त्यांतील अनेक सरदारांपैकीं एकाकडे मुख्य सरदारकी देत. सन १७६९ त माधवरावानें शिंदे–होळकरासुद्धां हिंदुस्तानच्या स्वारीवर जी फौज पाठविली होती तीवर रामचंद्र गणेश कानडे यांस मुख्य सरदार नेमले होते. पण मुख्य सरदार म्हटला कीं, त्याचा कारभार पहाण्यास दुसरा कोणी मातबर माणूस पाहिजेच. यास्तव कानडे यांच्या जोडीस विसाजी कृष्ण बिनी-

वाले यांना कारभारी केले होते. पण पुढें दिल्ली व रोहिलखंड प्रकरणीं कानडे यांचें धोरण पेशव्यांस पसंत न पडल्यामुळें बिनिवाले यांस मुख्य सरदारी देऊन रामचंद्र गणेश याना परत बोलावण्यांत आलें. याचा कानडे यांना जबर धक्का बसला. एवढ्या मोठ्या पदावरून कमी झाल्यानें वैतागून त्यांनीं संन्यास घेण्याचा उपक्रम केला व त्याप्रमाणें तीन दिवस भिक्षाही मागितली. हें वर्तमान माधवराव पेशव्यास व सखारामबापूस कळलें. त्यावरून त्यांनीं कानडे यांजकडे दोन गृहस्थ पाठवून संन्यास न घेण्यास सांगितलें.

'पेशवे स्वारीवर निघाले म्हणजे त्यांच्याबरोबर त्यांचे कारभारीहि जातच. त्यांचे डेरे प्रथम गारपिरावर (म्हणजे पुणें जिल्ह्याच्या कलेक्टराची कचेरी जेथें आहे तेथून जवळच) देत. ती त्यांचे ठिकठिकाणचे सरदार व शिलेदार यांना लवकर येऊन मिळण्याची खूणच होती. गारपिरावर त्यांचा तळ सहज महिना पंधरा दिवस पडावा. तेवढी मुदत फौजेस जमण्यास बस्स होई. त्या मुदतींत पेशवे आपल्या पंचयात्रा आटोपून घेत. पुण्याच्या आसपास पर्वती, थेऊर, जेजुरी, मोरेश्वर व कुरकुंभा (करकंब) ही पांच देवस्थानें आहेत, त्यांचें दर्शन ते घेत व मग कूच करीत. कूच केल्यावर वाटेंत मुक्कामामुक्कामावर त्यांना बाकीची फौज येऊन मिळे. पेशव्याना स्वाऱ्या कराव्या लागत, त्यांची कारणें वेगवेगळी असत. कधी ते नवीन मुलूख जिंकण्याकरितां शत्रूशी लढण्यास जात, कधी मांडलिकापासून खंडणी वसूल करण्यास जात, व कधी आपल्या सरदारांना वठणीवर आणण्यास जात. मिळून कोणत्या ना कोणत्या कारणासाठीं त्याना नेहमींच आपली तलवार फिरती ठेवावी लागे, तेव्हांच सर्व कांहीं जुळे.' (ऐ. ले. सं.) मराठ्यांचें सैन्य वाट चालू लागले म्हणजे त्याची शिस्त कशी असे यासंबंधीं मि. जोन्स आपल्या इतिहासांत लिहितो, 'मराठे कूच करतात तेव्हां त्यांच्या फौजा टोळयाटोळयानीं निघतात. वाटेत दोन्ही बाजूनीं कोठें शेते असतात, त्या शेतांच्या कुंपणामधील चिंचोळया रस्त्यानें चालत असतां जणू काय स्वार, पायदळ व बुणगे यांचा लोंढाच जमिनीवरून कित्येक मैलपर्यंत वहात आहे असा भास व्हावा. त्यांच्या त्या घोळक्यांत स्वार, निशाणे नौबत घेतलेले उंट, हत्ती, बैल, नायकिणी, फकीर, बहुरूपी हेहि मिसळलेले दिसत.' हें वर्णन अतिशयोक्तिपूर्ण व टवाळखोरहि असण्याचा संभव आहे. परंतु मराठे कवाईत शिकलेले नव्हते या दृष्टीनें त्यांत तितकी शिस्त नसावी हे

स्वाभाविक होय. पण हा नियम एकट्या मराठ्यांच्या सैन्यास लागू नसून एतद्देशीय सर्व राजांची सैन्ये अशींच असत. मोठमोठ्या सैन्यांना प्रवासांत मुख्य अडचण पाण्याची. वहाते पाणी असल्यावांचून माणसे व जनावरें यांचा निर्वाह लागावयाचा नाहीं. म्हणून ती शक्य तितकी नद्यांच्या काठाकाठानेच मार्ग काढीत. गोपाळराव पटवर्धन पेशव्याविरुद्ध निजामास मिळून निजामाबरोबर मराठी मुलुखाकडे चालून येत होता. निजामाचा रोख मिरज पेशव्यापासून घेऊन गोपाळरावास परत देण्याकरितां मिरजेकडे येण्याचा होता. त्यास उद्देशून गोविंद हरि, गोपाळरावास लिहितो 'भिवरेच्या पाण्यानें विजापूर उजवे टाकून कृष्णेच्या पाण्यास नबाब येतात हें लिहिले ते कळलें. जतेकडून जागाजागा पाणी पुष्कळ आहे. तिकडून यावें...अथवा भिवरेच्या पाण्यानें माघारा माणेस (माणनदी) आणावा. माणेच्या पाण्यानें निजामास आणवा म्हणजे पाण्यास उणे नाहीं' (ऐ. ले. सं.)

मराठे शत्रुसैन्याशी सामना देण्यास ठाण मांडून समोर उभे राहिले म्हणजे ते कसे लढत याचे वर्णन खालील पत्रांत आढळते. सदर पत्र ता. २९।१२।१७५७ रोजीं लिहिलें आहे.

'मोगलाचे व आमच्या फौजेचें झुंज सुरू झालें. भोवताले उभे रहावे, कही [धान्य लुटणारी टोळी] मारावी, बंद करावी, पातळ सापडल्यावर उठावे, त्याप्रमाणें प्रत्यह होत असे. तोफा पांचसातदां लागू केल्या. मोगलाच्या फौजेवर मार बसविला. बाणहि टाकीत. असो. उजवे बाजूस गोपाळराव (पटवर्धन) मल्हारराव, महिपतराव कवडे. तमाम फौजा तोफांच्या पाठीमागें उभ्या केल्या. तोफेचे गोळे मोगलाच्या फौजेत फार बेष लागू झाले. इब्राहिमखान गारदी पांच हजार गाड्यानिशी आमच्या तोफावर चालून आला. मोठी मार झाली. आमचे गाडदी व जेजाला हा मार आम्हीं दिला. हात-धोंड्यावर ते (शत्रू) व आम्हीं उभे. कांहीं लोकांचे हात लागले.'

हे वर्णन हातघाईच्या लढाईचे आहे. त्यांत लढताना सैन्याची रचना कशी होती व शत्रूशी वागण्याची तऱ्हा कोणती होती याची नीट ओळख पटते. या लढाईत इब्राहिमखान गारदी मराठ्यांच्या शत्रुपक्षास होता. तरी त्याचे मराठ्यांच्या शौर्यापुढे कांहीं चालले नाहीं. सन १७६१ त मोगल व मराठे यांचे आणखी

एक युद्ध झाले त्याची हकीकत गोविंद हरि पटवर्धनाने आपला भाऊ त्रिंबक हरि यास कळविली ती येणेप्रमाणे–

'श्रीमंतांचे व यवनांचे युद्ध तृतीय प्रहरापासून घटका रात्र पावेतोचांभार गोंद्या अलीकडे दोन कोसावर तुंबळ जाले. डावे बाजूने पिछाडीकडे श्रीमंतानी तोफा लागू केल्या. तो मार व उजवे बाजूस चिरंजीव सारी पथके सुद्धां खडपे होते. त्यांच्या आश्रयास गोळीच्या अंतराने उभे राहून बांणांचा व गोळयांचा मार (करीत होते.) तो व हुजरातीकडील मार. व भोसले व बाबूजी नाईक वगैरे तमाम सरदार चोहीकडून एकदम हल्ला केली. तेव्हां मोगल घटकाभर उभा राहिला. पुढें पाणी कोसभर, निभाव होणार नाहीं. यास्तव पिछाडीकडे फिरोन तोफा लागू केल्या होत्या. त्याजवर मोगलाकडील टोळी उठली. शिद्दी व आरब व गणेश विठ्ठल तोफाजवळ होते. बहुत मारामार जाहली. ते समयी भोसल्याकडील मराठे यानी बहुत मेहनत करून मोगलाची टोळी माघारी फिरविली. चोहीकडून तोफा व बाण व जेजाला व बंदुकांचा मार बराच बसला. घटका रात्रपर्यंत मोगलाने मार तसाच सोशिला. पाणी नाहीं. बाणानी शर्तच केली. दोन घटका रात्र जाहली. श्रीमंत निघाले, तेव्हां जवळ दोन बाणांच्या टप्प्यावर ओढा होता, त्याजवर मोगलाने मुक्काम केला.'

वरील वर्णनांत इतर अनेक शस्त्रास्त्रासमवेत बाणांचा होत असलेला उपयोग व प्रभाव लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

लढाईवर जाणे म्हणजे हातावर शीर घेऊन उभे रहाणे कसे होते हे पुढील हकीकत वाचून चांगले समजते. हैदरावरील एक स्वारीत गोपाळराव पटवर्धन बेसावध असतां त्याच्या गोटावर हैदर एकाएकी रात्रीचा न कळत चालून आला. त्यावेळीं गोपाळराव पटवर्धन, परशरामभाऊ पटवर्धन, व माधवराव कृष्ण पटवर्धन हे त्रिवर्ग गोटाच्या रक्षणार्थ घोडयावर स्वार होऊन चार साडेचार घटका तोफांचा व बाणांचा मार खात उभे राहिले. तो प्रसंग गोपाळरावाने पुढील प्रमाणें वर्णिला आहे.

'आमच्या नौबती टंकारे ऐकून अगदी तोफांचा मार शत्रूने आम्हांवर धरला......परशराम शिंदा पोरगा आमच्या डाव्या हाताजवळच होता. त्यास गोळा लागोन ठार जाला. मेंदू आमच्या अंगावर उसळून अंग रक्ताने अगदी भरले. घोडे माणूस त्याच जाग्यावर गोळयानी व बाणानी ठार फार जाले. चिरं-

जीव राजश्री माधवराव अण्णाचे घोडयास गोळी लागून घोडी ठार जाली. उजव्या गुडघ्यास चिरंजीव अण्णाच्या, गोळी लागून वरील मास–कातडयाच्या चिंध्या जाल्या. हाड वॅ गुडघ्याची वाटी शाबूत राहिली. त्याच गोळ्यानें तीच घोडी पडली. चिरंजीव राजश्री भाऊ बसल्या घोडयावर बसले असतां [एकामागून एक] दोन घोडया गोळे लागून पडल्या. एक कोतवाली पडली. एकूण तीन घोडया चिरंजीव भाऊच्या पडल्या. '[ऐ. ले. सं. खंड ४ था सन १७७०]

युद्धप्रसंग म्हणजे प्राणाशीच गाठ. या कारणाने युद्धास जाणारानी जिवाची आशा सोडावी व त्यांची आशा घरच्या आप्तेष्टानी सोडावी अशी स्थिति होती. म्हणून मातबर माणूस लढाईंत ठार झाला असतां त्याच्या आप्तवर्गाचे समाधान खुद्द पेशव्यानी पत्र लिहून करावे. त्या पत्रांतील भाषा गौरवपर व स्फूर्तिदायक असावी. पटवर्धन मंडळीपैकी नीळकंठराव पटवर्धन हैदरावरील संग्रामांत पडला. तेव्हां माधवराव पेशव्याने पाठविलेले पत्र असेच स्फूर्तिदायक व वीर्यशाली होते. माधवराव लिहितो 'तथापि नीळकंठरावानी अरिसमरी नीट सन्मुख होऊन, स्वामिसेवेवर जीवित्व तृणप्राय करून देह विसर्जन केला. मृत्युं चापि सुरांगना. या पत्रांत मराठ्यांचे स्फूर्तिस्थान स्वामिसेवा हे होते व ती सेवा करीत असतां मृत्यु आल्यास स्वर्गांतील सुखे त्यांस लाभतात अशी· त्यांची श्रद्धा असल्याचे स्पष्ट दिसते. लढाईंत कित्येक मरत व कित्येक जखमी होत. मृताच्या आप्तांना इनाम जमीन किंवा इतर मोबदला देत. अर्थात् तो मोठा असे.

नानासाहेबांच्या कारकिर्दीत आप्पाजी शितोळे न्हावीकर लढाईंत पडल्या-वरून त्यांचा मुलगा मुधोजा ।शितोळे याच्या हातात बावीस मोहरांची दोन सोन्याची कडी घालण्याची आज्ञा भाऊसाहेबांस झाली. सन १७५५ साली कर्नाटकांतील स्वारींत मुडलगी हा गांव घेतांना साखरे आडनांवाचा मराठा ठार झाला. त्याला चार पुत्र होते. त्यानी गांव इनाम करून मागितला म्हणून नागा· पूर तर्फ अवसरी प्रांत जुन्नर हा गांव त्यास इनाम दिला. मृतांच्या बायका-मुलांना पेन्शन देत. त्याला बालपरवेशी अशी संज्ञा होती.

जे लढाईंत जखमी होत त्यानाहि बदल म्हणजे नुकसानभरपाई देत. जखमांचे नमुने–डोळ्यांतील बाहुलीवर तरवारेची जखम, गळ्याजवळ भाल्याची जखम, मनगटास तरवारेची जखम, घोडा अंगावर पडून जखम, दगडाची जखम. एक एकास पांच पांच जखमाहि होत. कित्येकांची हाडे फोडून त्यांतून

गोळी पार निघून जाई. या जखमाना त्यांच्या भयंकर स्वरूपानुसारे कमजास्त बदल देण्यांत येते. ही रकम १०।१५ रु. पासून १००।१२५ रुपयांपर्यंत असे. उदाहरणार्थ, बाहुलीवरलि जखमेस १५ रु.

या खुद्द लढाईतील जखमा झाल्या. पण लढाईंत शत्रूचे हाती लागले असतां त्या सर्वांना कैद करून न ठेवता त्यापैकी कांहींची नाके कापून व त्याना विद्रूप बनवून सोडून देण्यांत येत असे.. अर्थात् ही स्थिति अत्यंत अपमानकारक यांत शंका नाहीं. इ. स. १७७० त हैदराने मराठ्यांच्या सैन्यापैकीं ऐशी माणसांची नाके कापून त्याना सोडून दिले. त्यांत केसो राम फाटक हा ब्राह्मण होता. त्याची ही विद्रूपता झाकण्याकरितां तेव्हाच्या इलाजाप्रमाणें त्याच्या 'गालफडाचे कातडे काढून नाकासारखे नाक बसविले आहे. नाक लागले तर फारसा ऐब दिसणार नाहीं.' (ऐ. ले. सं.) अर्थात् हा इलाज यशस्वी झाला होता असें म्हणवत नाहीं.

मोहिमेवर लोक वर्षानुवर्षं रहात. मायलेकरे, नवरा–बायको, बापलेक यांच्या ताटातुटीमुळें घरीं मागे रहाणारांच्या मनाची अवस्था कशी होत असेल व वैरीहि चिंतणार नाहीं असे विचार 'अतिस्नेहः पापशंकी' या न्यायानें स्वकियांचे मन कसे चिंतीत असेल, याची कांहींशी कल्पना खालील पत्रे वाचून येईल. गोपाळराव पटवर्धन हैदरावरील स्वारींत असतां त्याची आई सत्यभामाबाई त्यास मिरजेहून लिहिते, 'तुमचे आमचे भेटीस एक वर्ष झाले. भेट जाहली नाहीं. किती एक गोष्टी बोलावयाच्या होत्या त्या राहिल्या. बरे! जे समयीं श्रीसित्तेने भेट होईल तेव्हां होऊ. प्रस्तुत तो आमचा येण्याचा प्रकार कांहीं दिसत नाहीं. बरें. श्रीसत्ता प्रमाण' (ऐ. ले. सं.)

हैदरावरील तिसरी स्वारी २॥ वर्षे चालली. त्या अवधीत पटवर्धन सरदार स्वारीवर अडकून पडले. तरी त्यांस घरीं परत येण्याची परवानगी श्रीमंता-पासून घ्यावी म्हणून त्रिंबक हरि पटवर्धनाने मोरो बल्लाळ पटवर्धन यास पुण्यास पुढील पत्र लिहिले. 'ईश्वरे मुलुखगिरीत तिघे चिरंजीव (गोपाळराव व माधवराव हे पुतणे व नीलकंठराव हा पुत्र) नेले. यामध्यें गोपाळराव कर्ता मनुष्य लौकिकाचा गेला. तैसाच निळकंठराव गेला. माधवराव गेला. चिरंजीव राजश्री गोविंदपंत व सौभाग्यवती सत्यभामाबाई गेली. कर्ते गेले. आज तीन वर्षे लोक रानात. यंदाहि श्रीमंत रहा म्हणतील तेथें राहिले

पाहिजे. राहिल्यास लोक रहात नाहींत. एक दुसरे राहिले तर रहातील. घरांत बायकांचा अतिशय आहे (बायको आक्रोश करते की मी थकत चालले. माझा अंतकाळ समीप आला. माझी मुले परदेशी स्वारीत आहेत त्यास आणून भेटवा.) चिरंजीव कोन्हेरीचे [स्मरण बायको] करते.' [ऐ. ले. सं. खंड ४ था] हैदरावरील मोहिमामुळें पटवर्धन घराण्यावर मोठाच कहर गुदरून. स्त्रिया दुःखानें पोळून गेल्या होत्या. गोपाळरावाच्या मृत्यूमुळें त्याचे वडील गोविंदपंत हायहाय करून मेले, व आई सत्यभामाबाई सती गेली. त्रिंबकपंताचा स्वतःचा मुलगाहि मरण पावल्यानें त्याची बायको शोक करीत घरी पडून तिने लढाईवर गेलेला मुलगा कोन्हेरराव, नातू रघुनाथराव नीलकंठ, आणि पुतणे वामनराव व परशुरामभाऊ यांच्या भेटीकरिता जीव काढून ठेवला होता.

मराठ्यांच्या लढाईच्या पद्धतीला गनिमी कावा म्हणतात. त्या पद्धतीत ते फार पटाईत असत. शत्रूची युद्धाची सिद्धता कशीहि असली तरी त्याची त्रेधा उडवून देण्याची युक्ति त्यांच्याजवळ होती. ते लुटालूट व जाळपोळ करीत शत्रूच्या मुलखातून हिंडत तेव्हां शत्रूच्यानें त्यांचा पाठलाग करवत नसे. तो फक्त घोडेस्वाराची फौज घेऊन त्यांच्या पाठीस लागला तर ते बेलाशक त्याजवर उलटून त्याचा चुराडा उडवीत. त्यांतून पायदळ व तोफखाना यांचे लटांबर शत्रूबरोबर असल्यास त्याला ते मग मुळींच आवरत नसत. तो जवळीजवळ येत आहे तो गेले हे शेपन्नास कोस दूर आणि लागले त्याच्या मुलुखाचा सत्यानाश करावयाला. तो तेथें त्यांना गाठावयास गेला तर तेथूनहि हे पुनः नाहीसे होऊन भलत्याच ठिकाणीं उगवत. मराठ्यांची फौज शत्रूपेक्षा कमी असली किंवा शत्रूस हेलपाटे घालावयास लावून बेजार केल्यावर त्याच्याशी गाठ घालावयाचा त्यांचा विचार असला तर ते याप्रमाणें वागत. पाणिपतच्या युद्धानंतर मराठ्यांनीं पहिली स्वारी निजामाच्या मुलखावर केली, तेव्हां त्यांची फौज निजामाच्याहून बरीच कमी असल्यानें त्यांनीं याच पद्धतीचा स्वीकार केला होता. त्यावेळीं गोपाळराव पटवर्धन निजामास मिळाला होता. त्याजकडील वर्तमान ऐकल्यावर गोविंदपंत पटवर्धन मिरजेहून पत्र लिहून निजामाची तिरिपट उडण्याचे कारण स्वानुभवावरून गोपाळरावास कळवितो, 'तुमची [मोगलांची] फौज श्रीमंतांच्या दुप्पट. परंतु त्यांच्या भविष्यानुसार तुम्हा साऱ्यांचीच घोडी थकून राहिली. श्रीमंतांच्या फौजेस हमेशा धावणीचा दंड क-

नबाबाकडलि फौजेस [धावण्याचा] दंडक नाहीं. यामुळें थकतो. ' गोविंदपंताच्या लिहिण्याचा आशय कीं, मोगलाची फौज दमावी हेच पेशव्यांना साधावयाचे आहे. कारण मराठे दिवसात घोड्यावरून बारबारा चौदा चौदा कोसांच्या मजली करीत. त्यांची फौज मोगलाईत लुटालूट करण्याकरितां सन १७६३ साली येद्वराहून निघाली ती मजल दरमजल सालप्याच्या घाटे चौदावे दिवशीं औरंगाबादेस पोचली.

मराठ्यांची फौज शत्रूपेक्षां दिढी दुपटीने अधिक असली तर ते जेथें शत्रु असेल तेथें जाऊन त्यास घेरीत. त्याच्या लहानसहान टोळ्यावर झडप घालून त्या मारून टाकीत. चांगली दहा पंधरा हजारांची टोळी मुख्य फौज सोडून चालून आली म्हणजे आपण भ्यालोसे दाखवून तिला पाठीवर घेत व बऱ्याच अंतरावर धांवत गेल्यामुळें त्याची लाढईची व्यवस्था मोडल्याचे पाहून व एखाद्या अडचणीच्या जागेंत उलटून तिच्यावर तुटून पडत व संहार करीत. ते शत्रूच्या लष्कराभोंवती रात्रंदिवस घिरटया घालीत, त्यांच्या चौक्या मारून त्या तुडवून टाकीत, त्यास अन्नपाणी व वैरण पोचूं नये असा बंदोबस्त करीत, रात्री त्याच्या लष्करात बाणांचा वर्षाव करीत व दिवसा जेजालांचा व बंदुकांचा मारा करीत. अशा स्थितींत तो हैराण होऊन व तळ हालवून कूच करूं लागला म्हणजे त्याच्या पिछाडीवर राहून त्यास पायबंद बसवीत. यामुळें त्यास मुक्काम करणेंच भाग पडे. त्यानें मुक्काम केल्यावर ते त्याचे अन्नपाणी बंद करून त्यास शरण येण्यास भाग पाडीत. सन १७६१ त चांभारगोंद्यापाशीं मोगल-मराठ्यांचे युद्ध झाल्याचे वर्णन वर आलेच आहे; ते या पद्धतीने झाले.

मराठ्यांच्या या गनिमीकाव्यास हिरीरीहि म्हणत. ' साऱ्या फौजेचा एकदम हल्ला क्वचित्‌च होई. याचे कारण हे कीं, सर्व फौजेने असा हल्ला केला व तो शत्रूने माघारा फिरविला तर साऱ्या फौजेचा धीर सुटून पळ सुटावयाचा. यासाठीं शत्रूस जिंकू अशी पक्की खात्री असल्याशिवाय सारी फौज शत्रूवर घालण्यास सरदार तयार नसत. ' (ऐ. ले. सं.) या युद्धपद्धतींत मराठ्यांचा स्वभाव व परिस्थिति दिसून येते. अबदालीशी दत्ताजी शिंद्याची लढाई झाली ती याच पद्धतीने. कारण अबदालीचे सामर्थ्य मोठे होते व त्याचे सैनिकहि मराठ्यांना ताकतीने भारी. या दृष्टीनें भाऊसाहेबाने अबदालीवर स्वारी केली त्यासंबंधीं मार्मिक शेरा पटवर्धनांच्या पत्रांत आढळतो तो असा ' भाऊसाहे-

बांची हिंमत मोठी. पेशव्यांची फौज अबदालीपासून साठ कोसावर उभी रहात नव्हती ती त्यांनीं नेऊन झुंजावयास लावली आहे.' शत्रूच्या समोर उभे राहून शक्य तो युद्ध न करणें याचाहि अन्तर्भाव गनिमी काव्याच्या युद्धातच होतो. ब्रह्मेंद्रस्वामीनी सन १७३८ मध्यें बाजीराव पेशव्यास पत्र लिहिले ते याच अर्थाने. ते म्हणतात, 'तुमचे पदरी श्रीदयेने महद कार्ये तीन यशे पडली. कोणती म्हणाल तरी एक सैदाचा सला केलात, एक दिल्लीस गेलेत आणि कालीच (काल) मोगल बुडविलात. समारंगनी चाळीस हजार घोडा शिवाजीजवळ होता. परंतु कोठे समोर मोगलासी युद्ध केले ? ते गोष्ट तुम्ही केलीत. सामान्य येशे श्रीने तुमचे पदरी घातली ऐसे नाहीं.' बाजीराव मोगलाशी समोर उभा राहून लढला याची स्वामीस इतकी अपूर्वाई वाटली कीं, तेवढ्यासाठीं स्वामीनी बाजीरावास शिवाजीवरहि ताण केल्याची शाबासकी दिली. 'गनिमी काव्याच्या युद्धाचा भर फसवणुकीवर, म्हणून शत्रूला फसविण्यासाठीं मराठे अनेक युक्त्या काढीत. आपले सैन्य मोठे आहे असे त्याना शत्रूस दाखवावयाचे असल्यास मराठेस्वार भाल्याना पासोड्या बांधीत.' (ऐ. ले. सं. खंड ४ था) पासोड्या बांधल्यानें भाल्याच्या ठिकाणीं मनुष्यांच्या जमावाचा भास दुरून व्हावा.

शत्रूच्या फौजेतील बातम्या काढण्याठी त्यानीं केलेले प्रयत्न लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. गोपाळराव पटवर्धन हैदरावरील स्वारीतून लिहितो 'चहूकडील बातमी चहू प्रकारची येते. कोणाची खरीं बातमी, कोणाची लटकी बातमी असे होते. [म्हणून]दहा पंधराकडून बातमी नित्य आणवीत असतो.' [ऐ.ले.सं] अशा निरनिराळया उगमांतून बातम्या काढाव्या व त्यांचा ताळा-पडताळा पाहून मग नक्की कोणती ते ठरवावें असा स्वाभाविक क्रम. शत्रूच्या फौजेच्या आसपास सुमारे चार कोसावर डाक बसवून मराठे लोक रोजच्या रोज बातमी काढित. त्यासाठीं बातमीदार सोंगेहि घेत. गोपाळराव पटवर्धनानें बंकापूरचा किल्लेदार शिवाजी गणेश यास गरीबाचे रूप देऊन जासूद पाठवावा म्हणून लिहिले होते. तेव्हां शिवाजी गणेश त्यास उलट कळवितो 'आज्ञेप्रमाणें एक कारकून गरीब ब्राह्मणाचा वेष देऊन व जंगम दोन असे तीन असामी उडगणी शिकारपुरापासून अलीकडे चार कोसावर हुलगडी गांव आहे तेथे आमचें कारकुनाचे ओळखीचे एक दोन गृहस्थ आहेत, त्यांजकडे कारकुनाने रहावे,

त्या अलीकडे हैदरखानाचे मुलखाचे सरदेपावेतो जंगमानी रहावे, त्या अलीकडे सावनूरकराचे सरदेत आमचे जासूद माणसानीं दो दो कोसावर रहावे याप्रमाणें बंदोवस्त करून आज संक्रान्तीमुळें भोजनोत्तर दहा असामी रवाना करतो.' [ऐ. ले. सं. खंड ४ था] बातम्याकरितां त्यानीं माळच लावली होती. कारकुनाने गरीब ब्राह्मणाचा वेष घेऊन हैदराच्या हद्दींत रहावे. त्यानें खरी बातमी जंगमास व जंगमानी पेशव्यांच्या जासुदास सांगावी.

'मराठे व इंग्रज यांचे पहिले युद्ध तळेगांवापाशीं झालें. त्याकारितां इंग्रज सरदार जनरल गॉडर्ड हा येत होता. त्याच्या लष्करांत गुलाब व॥ रुपचंद जाट या नांवाचा बातमीदार होता. तो गॉडर्डचा दिवाण चिनापा याजकडे पनवेलीस जात असतां त्यास मराठी सैन्यांतील पेंढाऱ्यांनीं पकडून परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या लष्करांत नेलें. त्यानें आपल्या जबानींत इंग्रजाकडील पलटणे, गोरे काळे शिपाई, धान्याचा भाव, हत्ती उंट यांची हकीकत सांगितली. त्यावरून इंग्रजांच्या सैन्यांत बंगाली पलटणें, तुर्क स्वार, कर्नाटकीं लोक आणि कंदाहरी स्वार होते असें दिसून आले.' [इ. सं]

उपसंहार.

मराठी राज्य म्हणजेच पेशव्यांचे राज्य बुडून अवघी ११७ च वर्षे झाली आहेत. इतक्या अल्प काळांतहि त्या राज्यांतलि देशस्थितीची ओळख बहुतेक बुजून गेली आहे. तत्कालीन वैभव, व्यवस्था व देखावे पार गडप झाले आहेत. त्या योगाने आमच्या पूर्वजांचे यथार्थ ज्ञान आम्हास न राहून त्यांजविषयी बऱ्याचशा विपरीत कल्पना समाजांत फैलावल्या आहेत. आमचे पूर्वज राजनीतिशास्त्रांत व व्यावहारिक विद्येंत इंग्रजांच्या मागे पडल्यामुळें आमचे राज्य बुडाले हें निर्विवाद होय. परंतु ज्याअर्थी त्यानी शंभर सवाशें वर्षांपर्यंत राज्य चालविले व टिकविले त्याअर्थी त्यांच्यांत विशिष्ट प्रकारचे सद्गुण होते याविषयीं मतभेद असण्याचे कारण नाहीं. किंबहुना हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि लोकापेक्षा राज्यकर्त्यांचे गुण महाराष्ट्रीयात अधिक प्रमाणात असल्याची साक्ष इतर सर्व राजाना जिंकून व अनेक घरगुती संकटाना तोंड देऊन त्यानी आपले राज्य वाढविले व टिकविले यांत मिळण्यासारखी आहे. ते साधार दाखविण्याकरितां प्रस्तुत प्रयत्न आहे. हा ग्रंथ वाचून मराठ्यांच्या गुणाबरोबर दोषांचेहि ज्ञान वाचकाना यथार्थ होणार आहे.

खुद्द महाराष्ट्रापुरते पाहिले तरी पेशवाईंत महाराष्ट्रीयांच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीनें घडलेले कार्य फार मूल्यवान् व महत्वाचे होय. पेशव्यांचे राज्य हे सगळ्या मराठ्यांचे मिळून होते. कोणत्याहि एका विशिष्ट जातीचे नव्हते. पेशवे हे त्या राज्याचे पुढारी होते इतकेंच. तसे नसते तर नारायणराव पेशव्याच्या वधानंतर व सवाई माधवराव जन्मास येऊन मोठा होईपर्यंत ते टिकूच शकले नसते. म्हणजे सदर राज्य बहुजनसमाजाचे व राष्ट्रीय स्वरूपाचे असल्यामुळेंच पेशव्याना व त्यांच्या कारभाऱ्याना ते चालविताना आपले वैभव बादशाही थाटाने वाढविण्यापेक्षा बहुजनसमाजाच्या गरजावर दृष्टि ठेवून वाढविणेच भाग पडले. दिल्लीचे मोगल बादशहा किंवा इतर मुसलमान राज्यकर्ते परकीय व परधर्मीय होते. बहुजनसमाजाची दुःखे व गरजा त्या साऱ्या त्यांच्या नव्हत्या. म्हणूनच स्वतःच्या महत्त्वाकांक्षेवर दृष्टि ठेवून त्याना ताजमहालासारख्या टोलेजंग व प्रेक्षणीय इमारती बांधण्यासाठी कोट्या-

वधि रुपये उडवितां आले. महाराष्ट्रांत ताजमहाल किंवा गोलघुमट यांच्या तोलाच्या इमारती पेशव्यानी बांधल्या नाहींत त्याचे बीज मराठे व मुसलमान त्यांच्या विचारसरणींतलि व परिस्थितीतील भेदांत सांपडते.

दुसरा मुद्दा लक्षांत घ्यावयाचा तो असा की, महाराष्ट्र प्रांत हा इतर प्रांतापेक्षा कलाकौशल्य व संस्कृति या बाबतींत फार मागासलेला होता. त्यास इतर प्रांतांच्या बरोबरीस आणणे ही पेशव्यांवरील मुख्य जबाबदारी असून तिला ते कसे जागले हें प्रस्तुत ग्रंथ वाचून लक्षांत येणार आहे. इतर प्रांतांच्या मानानें महाराष्ट्रांतील समाजाचा बौद्धिक व शैक्षणिक दर्जाहि कनिष्ठ होता. अशा समाजाची पेशवाईच्या अल्प काळांत त्वरेने झालेली प्रगतिहि आश्चर्यकारक समजली पाहिजे.

प्राचीन तत्त्वज्ञानाचा व वेदान्तान्या विपर्यस्त शिकवणीचा परिणाम हिंदू लोकाना घातक होऊन ते दैववादी, प्रयत्नहीन, विनाकारण गंभीर व दुर्मुखलेले बनले असाहि आक्षेप घेण्यात येतो. तो खोटा असल्याचे प्रस्तुत ग्रंथ वाचून कळेल. ते गंभीरप्रसंगीं गंभीर तसे रंगेलप्रसंगीं रंगेलहि असत, आणि सण-वार उत्सवसमारंभ हसत खेळत व ऐषआरामात साजरें करति. त्यावेळीं आबालवृद्धावर आनंदाच्या व उत्साहाच्या लहरी उसळत. समाजावर हल्लीं पसरलेली खिन्नता हा पारतंत्र्याचा परिणाम आहे, वेदान्ताच्या शिकवणुकीचा नाहीं. ते दैववादी नव्हते असें वसईचा संग्राम, पाणिपतची मोहिम व मराठ्यांनीं मारलेल्या शेकडों लढाया कंठरवाने सांगत आहेत. धार्मिक शिकवणुकीमुळें त्यानीं प्रयत्नांची कास सोडली असे नव्हे तर प्रयत्न करूनहि यश न आल्यास समाधान मानणे त्यांस सोपें झालें.

महाराष्ट्रीयांची उपास्य दैवतेहि त्या काळांत वीरवृत्तीचीच होती. विठ्ठलभक्ति पेशवाईंत हल्लीइतकी पसरली नसून विठ्ठलोपासकांचे म्हणजे वारकरी पंथाचे ग्रंथहि शिष्टांच्या संग्रही असल्याचे आढळून येत नाहीं. तुळजापूरची व करवीरची जगदंबा, जेजुरी, पाल, मणेराजुरी येथील मल्लारी, सिंदुरासुराचा वध करणारा गणपति, त्रिपुरांतक शंकर यांचीच उपासना बहुतेकांच्या घरांतून चालू असून त्यांचेच कुलधर्म व कुलाचार घरोघरी पाळण्यात येत असत. या देवदेवता बुद्धिप्रधान वा क्षात्रधर्माची दीक्षा देणाऱ्या असल्यामुळें महाराष्ट्रीयात क्षात्रधर्माचाच प्रसार सर्वत्र झाला व त्या धर्मास अनुकूल अशा महाभारत,

रामायण आदिकरून ग्रंथांचे परिशीलन योद्धे, मुत्सद्दी व शिपाई यांजकडून होत राहिले. या शिस्तीत व संस्कारांत मुरलेले तत्कालीन महाराष्ट्रीय हल्लीच्या महाराष्ट्रीयाहून अनेक पटीनी उद्योगी धाडसी शिस्तीचे व कर्तत्ववान् होते.

इंग्रजांशी मराठयांचा अगदी निकट संबंध शिवाजीपासून आला व तो पेशवाईअखेरपर्यंत एकसारखा दाटच होत गेला. असे असतां इंग्रजांचे कला-कौशल्य व औद्योगिक श्रेष्ठपणा पेशव्यांच्या नजरेसमोर नाचत असूनहि त्यानी त्या बाबतीत त्यांच्या बरोबरीस येण्याचा प्रयत्न केला नाहीं, असाहि एक आक्षेप आहे. त्याला उत्तर हे की, मराठे लोक उद्योगधंद्यात व कलाकौश-ल्यांत मूलतःच इतर प्रांतांच्या मागे होते. त्याना त्या प्रांतांशी समान दर्जास आणण्यातच पेशव्यांचे व त्यांच्या कारभाऱ्यांचे परिश्रम खर्ची पडले. अशा स्थितीत इतर प्रांतानाहि जर पाश्चात्यांची वरील गोष्टीत स्पर्धा करवली नाही, तर महा-राष्ट्रीयांच्या हातून ती न झाल्याबद्दल महाराष्ट्रीय राज्यकर्त्याना दोष देण्यात अर्थ काय ?

महाराष्ट्रीयाना युरोपात पाठवून त्यांजकडून तिकडील ज्ञान संपादन कर-ण्यानेहि औद्योगिक व शास्त्रीय बाबतीत महाराष्ट्राची प्रगति झाली असती; किंबहुना मराठी राज्यहि इंग्रजांच्या तावडीतून वाचविता आले असते असेहि सांगण्यांत येतें. परंतु हा आक्षेप स्वीकारण्यापूर्वी एक वस्तुस्थिति लक्षांत घेतली पाहिजे, ती अशी कीं, पाश्चात्त्य शास्त्रीय ज्ञान ग्रहण करण्यास ज्या प्रकारचे व्यावहारिक शिक्षण महाराष्ट्रीयाना मिळावयास पाहिजे ते पेशवाईच्या अखेरी-अखेरीपर्यंतहि उपलब्ध नव्हते व त्याची कल्पनाही नव्हती. ज्या विद्येचा बव्हंशी धर्मांशी संबंध आहे अशीच विद्या पूर्वीपासून भारतीयाना माहीत असून तिचेच पुनरुज्जीवन पेशव्यांच्या दक्षिणेनें महाराष्ट्रांत व महाराष्ट्रा-बाहेर झाले. मुसलमानी अमदानींत राजाश्रयाच्या अभावी ज्या प्राचीन विद्येचा लोप झाला होता ती विद्या फिरून आटोक्यात आणून देण्याचा उद्योग पेश-वाईत करण्यात आला. सदर विद्या शिकूनहि महाराष्ट्रीय लोक यादवकालीन ब्राम्हणांची बरोबरी करू शकले नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यादव-कालांत व त्यापूर्वीं गणित, ज्योतिष, धर्मशास्त्र यांत जे संशोधन महाराष्ट्रीयानीं केलें होते ते संशोधन पेशवाईतील महाराष्ट्रीयाकडून घडले नाहीं. त्यांनीं फक्त

जुन्यांचा उजळणी कायती केली. अर्थात् इतकी मजल मारण्याला त्याना मिळालेली चाळीस पन्नास वर्षातील धामधुमीच्या काळची मुदत अपुरीहि असेल.

हल्लींच्या प्राथमिक शाळांतून जितके व्यावहारिक शिक्षण मिळते तितकेहि तेव्हां महाराष्ट्रांत उपलब्ध नव्हते, मग दुय्यम किंवा वरिष्ठ शिक्षणाची गोष्ट दूरच राहिली. त्याची थोडीशी ओळख नाना फडणविसास पेशवाईच्या अखेरच्या दिवसात इंग्रजांच्या संगतीमुळें होऊन त्याने सवाई माधवरावाच्या शिक्षणक्रमात ती पद्धति कांहींशीं अंमलातहि आणिली. म्हणजे त्या पद्धतीवरील शिक्षण तसेच सुधारत जाऊन सर्वत्र पसरले असते तर पाश्चात्यांच्या विद्या व शास्त्रीय ज्ञान यांचे आकलन महाराष्ट्रीयाना होऊन ते त्यांच्या बरोबरीस येण्याचा संभव होता. पण याला अवधीहि आणखी पंचवसि बर्षांचा तरी मिळावयास हवा होता. पण नाना इ. स. १८०० त वारल्यामुळें पुढील बाजीरावींत सारीच आशा खुंटली. दुसरे असे कीं, पाश्चात्यांच्या अधिभौतिक ज्ञानाचा विशेष प्रकाश पडून जगांत स्थित्यंतर घडून आले ते मुख्यतः अठराव्या शतकाच्या शेवटीं, म्हणजेच पेशवाई बुडाण्याच्या सुमारास हेहि विसरता कामा नये.

पेशवेकालीन मराठ्यांचे दोष दाखविताना इतक्या सर्व दृष्टीनी विचार करावयास पाहिजे. मोगलांचे व दक्षिणेंतील मुसलमानांची राज्ये दोन अडचिशें वर्षेपर्यंत टिकली व मराठ्यांचे राज्य तेवढेंच फक्त सवाशें दीडशें वर्षेपर्यंत जेमतेम टिकले असा भेद दाखवून मराठ्यांचा राजकीय कमकुवतपणा नजरेस आणला जातो. पण तोहि निराधार आहे. दक्षिणेंतील मुसलमानांचे एकऐंका वंशाचे राज्य घेतले तर ते मराठी राज्यापेक्षां फारसे दीर्घकाल टिकले नाहीं. बहामनी राज्य व तें मोडून वेगवेगळी बनलेली मुसलमानी राज्ये मिळून काळ साडेतीनशें वर्षेच भरतो. दिल्लीच्या बादशाही घराण्यांतहि मोगल घराणें हे एकटेच काय ते कसेबसे दोन अडीचशें वर्षे चालल्याचा दाखला सांपडतो. पण त्या दृष्टीनें पाहिल्यास मराठी राज्यहि बाजीरावासारखा दुर्बळ राज्यकर्ता दुर्दैवाने महाराष्ट्रीयांच्या वाट्यास आल्यावरहि तितकीच वर्षे जिवंत रहाण्यास हरकत नव्हती. कारण मराठ्यांना हिंदी राज्यकर्त्यांत वरचढ असा राज्यकर्ता एकहि नव्हता. खेरीज मराठ्यांचे राज्य हे एकट्या पेशव्यांचे नसून अखिल महाराष्ट्रीयांचे असल्यामुळें त्यांच्या मदतीनें ते कोणाहि परप्रांतीय सत्तेस भारीच होते. परंतु इंग्रजांची सत्ता अशीच हिंदुस्थानाला भेटली कीं, तिच्यापुढें एकट्या

मराठ्यांनीच काय पण मोगलानी व शिखानीहि लोटांगणेच घालावी. तिची व मराठ्यांची गांठ लवकर पडली व मोगलांची उशिरा पडली एवढाच फरक.

जित राष्ट्राचे गुण व वैभव लपवून त्यांचे दोष व हीनत्व दाखविण्यांत परकीय राजकर्त्यांचा मतलब असतो. त्यांना जितांचा तेजोवध करून आत्मविश्वास घालवायाचा असतो. त्यांच्या जातभाईनी लिहिलेल्या एकतर्फी इतिहासाचा हाच उद्देश असून ती एकच बाजू वाचकांच्यापुढें असेपर्यंत साधतोहि. मराठ्यांच्या इतिहासाची अवस्था कांहीं अंशी अशीच झाली आहे. मराठे शूर होते, कर्तृत्ववान् होते, प्रगतिप्रिय होते, विद्येचे भोक्ते होते, धूर्त होते व शहाणेहि होते. त्यानीं स्वराज्य व साम्राज्य मिळवून ते टिकविण्याकरितां आत्मयज्ञ करून अनंत हालअपेष्टाहि सोसल्या. पण त्या काळातील ठळक दोष असा कीं, ब्राह्मणासारखे अगदी थोडे पांढरपेशे वर्ग महाराष्ट्रांत राज्याची धुरा धारण करण्यास बौद्धिक व नैतिक दृष्ट्या लायख होते. अर्थात् हे संख्याबल अत्यंत अपुरे असून बाकीचा बहुजनसमाज शूर व कष्टाळू असला तरी कांहीं अपवाद सोडल्यास राजकीय गुणात कमी प्रतीचा होता. इंग्रजी राज्याची महाराष्ट्रांत स्थापना होऊन ११७ वर्षे झाली व शिक्षण शेकडो पटीनी प्रसार पावले तरी ही कमतरता अद्यापिहि जाणवत आहे. ती भरून येण्यास जितका काळ लागेल तितका महाराष्ट्राचा भाग्योदय दूर आहे, असेच समजले पाहिजे. मराठ्यांनी गतकाळांत मिळविलेले भाग्य व वैभव अस्तास गेले असून त्यांच्या खुणाहि सांप्रत शिल्लक राहिलेल्या नाहींत. आग्र्याचा ताजमहाल, दिल्लीचे राजवाडे, विजापूरचा गोलघुमट या योगाने मुसलमान बादशहांच्या ऐश्वर्याची साक्ष आजहि पटते. मराठ्यांच्या ऐश्वर्याची तसली साक्ष देणाऱ्या इमारती महाराष्ट्रांत नाहींत ! ही उणीव महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाची सर्वांगीण उन्नति करून महाराष्ट्रीय राज्यकर्त्यांनीं भरून आणिली. नुसते दगडावर दगड रचून सुंदर इमला उभारण्यापेक्षा मनुष्यमात्राचे कर्तृत्व व दर्जा वाढविणें याची थोरवी विशेष होय. ती थोरवी पेशवाईनें कशी वाढविली हें समजले म्हणजे हिंदुस्थानांतील तत्कालीन मुसलमान व हिंदू राज्यकर्त्यापेक्षा मराठी राज्यकर्त्यांचे श्रेष्ठपण सहज शाबित होते.